सेतु माधवराव पगडी

जीवनसेतु

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

जी व न से तु

पगडी यांचे इतर साहित्य

उषा (लघुकथासंग्रह), १९३८
मराठवाड्यातील आधुनिक कविता (परीक्षण), १९३९
अलकनंदा (लघुकथासंग्रह), एप्रिल १९४०
अशोकाची पाने (निबंधसंग्रह), १९४१
मराठवाड्यांतील गद्य वाङ्मय (परीक्षण), १९४२
त्रिलिंग देशातील दैनदिनी (निबंधसंग्रह), ऑगस्ट १९४३
वरंगलचे काकतीय राजे (इतिहास), १९४६
Among the Gonds of Adilabad, १९४९
दुसरी आवृत्ती, नोव्हेंबर १९५२
Grammar of the kolami Language. एप्रिल १९५०
Tribal welfare in Adilabad, ऑगस्ट १९५०
सूफी संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि कार्य, मार्च १९५३
Grammar of the Gondi Language, फेब्रुवारी १९५४
हैदराबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळींचा इतिहास, १९५६
History of freedom struggle in Hyderabad, 1800-1920 in three volumes, Edited, १९५६
मिर्जा गालिब आणि त्याच्या उर्दू गजला, जुलै १९५८
मराठे व निजाम, १९६१
पानिपतचा संग्राम, १९६१
उर्दू काव्याचा परिचय, १९६१
मणिकांचन, ऑक्टोबर १९६१
मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, खाफीखानाचा साधन ग्रंथ, १९६२
महाराष्ट्र आणि मराठे, १९६३
मोगल आणि मराठे, तारीखे दिल्कुशा १९६३
Eighteenth Century Deccan जुलै १९६३
विडा रंगतो असा, ऑगस्ट १९६३
मराठे व औरंगजेब, फेब्रुवारी १९६३
फिर्दौसीच्या कथा, भाग १ व २, नोव्हेंबर १९६४
मोगल मराठा संघर्ष, १९६५
इतिहासाचा मागोवा, मे १९६५
हिंदवी स्वराज्य आणि मोगल, फेब्रुवारी १९६६
Maratha Mughal relations, 1680-1707, १९६६
सुंदरा मनामधि भरली, मे १९६६
Tahmasnama १९६७



सेतु माधवराव पगडी

जीवनसेतु

आत्मचरित्र

कॉन्टिने ... पुणे

प्रकाशन क्रमांक ५५२

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९६९

किंमत वीस रुपये

प्रकाशक : अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे ३०

मुद्रक : चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, ' शिव-पार्वती ', पुणे ३०

माझी आई

कृष्णाबाई

आणि वडील

प. वा. श्रीनिवासराव

यांस

मातृदेवो भव । पितृदेवो भव ।

प्र स्ता व ना

माझे आत्मचरित्र लिहून काढावे किंवा नाही याबद्दल कित्येक दिवस माझ्या मनाची निश्चिती होत नव्हती. आमचे घराणे हे माझ्या लहानपणी कनिष्ठ मध्यम वर्गात मोडणारे होते. घरची सुबत्ता असली तरी माझे बालपण खेड्यापाड्यांत आणि तालुक्याच्या लहानशा गावात गेल्यामुळे आमच्या गरजाही कधी वाढल्या नव्हत्या. पुणे, बनारस, अलाहाबाद इत्यादि ठिकाणी माझे शिक्षण झाले. नंतर मी सरकारी नोकरीत शिरलो. इतर मध्यम वर्गीयां-प्रमाणेच माझे जीवन होते. शिक्षण, नोकरी, विवाह, मुलेबाळे, त्यांचे शिक्षण आणि मंगलकार्ये, ही सामान्यांच्या जीवनाची चाकोरी माझ्याही वाट्याला आली. आत्म-चरित्र लिहिण्याइतके त्याला काही महत्त्व आहे असे मला वाटेना.

आत्म चरित्र वाङ्मयाचे वाचन हा एक माझा आवडता छंद आहे. इंग्रजी, मराठी, उर्दू आणि फार्सी या भाषांतून मी जवळ जवळ शंभर आत्मचरित्रे वाचून काढली आहेत. इंग्रजीतून वाचलेल्या आत्मचरित्रांत हिटलर, चर्चिल,

अँथोनी ईडन, मॅक्मिलन, डफ कूपर, आयसेनहॉवर, ॲडीनार, दी गॉल, ओमर ब्रॅडले, जनरल डीन, ट्रूमन, जॉर्ज केनन इत्यादि मुत्सद्दी अगर सेनाधिकारी मंडळी, एच. जी. वेल्स, विल ड्यूरंट, चेस्टर्टन, मार्टिनेट, मार्क ट्वेन, सिमान दी बोवाये, इल्या एहरनबर्ग, बर्ट्रांड् रसेल, आंद्रे गीद, रुसो, इत्यादि साहित्यिक, भारतातील थोर पुरुषांतील महात्मा गांधी, स्वामी श्रद्धानंद, रवींद्रनाथ टागोर, राजेंद्रप्रसाद, जवाहरलाल नेहरू इत्यादींची आत्मचरित्रें माझ्या वाचनात आली. बाबरचे आत्मचरित्र आणि जहांगीरची दैनंदिनी हे ग्रंथ आत्मचरित्र वाङ्मयाचे उत्तम नमुने म्हणता येतील.

मराठी आत्मचरित्रांत मी जवळ जवळ चाळीस ग्रंथ वाचले. अण्णासाहेब कर्वे, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे, न. चिं. केळकर, वीर सावरकर, चिंतामणराव कोल्हटकर, आचार्य अत्रे अशी कितीतरी साहित्यिकांची आत्मचरित्रे माझ्या नजरेखालून गेली आहेत.

हे वाङ्मय वाचून मला वाटू लागले की आपल्या जीवनात आलेले अनुभव मांडून ठेवण्यास काय हरकत आहे? राष्ट्रीय चळवळींच्या काळची आमची पिढी. महात्मा गांधी, पंडित नेहरू इत्यादींच्या प्रभावाने देशात त्यावेळी प्रचंड जागृती झाली होती. ते संस्कार आमच्यावर क्षणोक्षणी होत होते. बनारसचे खडतर विद्यार्थी-जीवन माझ्या वाट्याला आले होते; पण त्याबरोबरच अनेक सज्जनांशी माझा संबंध आला आणि माझे जीवन पार बदलून गेले. निजामी राजवटीतील जीवन जितके कठिण तितकीच माझी जिद्दही वाढत गेली. साहित्यसेवेकडे मी वळलो याचे कारण ती जिद्दच होय. निजामी राजवट, रजाकार चळवळ, पोलिस ॲक्शन ही सर्व मला जवळून पाहण्यास मिळाली त्यापूर्वी १९२६ पासून १९३३ या राजकीय चळवळींच्या काळात मी बनारस आणि अलाहाबाद येथे होतो. या दीर्घ काळातील मला आलेले अनुभव इतरांना सांगावे, हीच माझ्या आत्मचरित्राच्या मागची भूमिका

आहे. या अनुभवाबद्दल मी उर्दू कवीच्या शब्दांत हेच म्हणेन—

अय् गर्दिशे अय्याम तेरा शुक्रिया ।
हमने दुनियाकी हर पहलू देख ली

हे कालचक्रा, आम्ही तुझे आभारी आहोत. तुझ्यामुळे आम्हांला जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अनुभव लाभला.

मी आत्मचरित्र लिहून काढावे असे माझ्या पत्नीने प्रथम सुचविले; पण माझे जिव्हाळ्याचे स्नेही आणि माजी आलमगीरचे संपादक श्री. चंद्रकांत बावडेकर यांनी आग्रह धरून आपली 'आलमगीर'ची पाने माझ्या लेखनासाठी उपलब्ध करून दिली नसती तर, हे आत्मचरित्र लिहिलेच गेले नसते. मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. आलमगीर बंद पडल्यावर, धनुर्धारी साप्ताहिकाचे संपादक श्री. सुतार यांनी अगत्यपूर्वक माझे आत्मचरित्रपर लेख छापण्याचे कबूल केले. दुर्दैवाने ते साप्ताहिकही बंद पडले.

माझे यशस्वी प्रकाशक मित्र श्री. अनंतराव कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे यांनी ग्रंथप्रकाशनाची जबाबदारी घेतली. ते आणि त्यांचे उत्साही चिरंजीव श्री. अनिरुद्ध यांच्याशी तर अगदी जिव्हाळ्याचे संबंध जडले आहेत.

ग्रंथ उत्तम प्रकारे आणि लवकर छापून दिल्याबद्दल कल्पना मुद्रणालय, पुणे यांचेही आभार मानणे आवश्यक आहे. माझ्या आत्मचरित्राला "जीवनसेतु" हे नाव सुचविण्याचे श्रेय माझे निकटचे मित्र डॉक्टर दत्तात्रय विष्णु जोग, प्राध्यापक पवई इन्स्टिट्यूट यांना आहे.

सुशील, आर्थर बंदर रोड
कुलाबा, मुंबई ५ — सेतुमाधवराव पगडी
३१ डिसेंबर १९६९

अ नु क्र म णि का

१

बालपण
१९१० ते १९१८

माझा जन्म निलंगा (निजामी राज्यात बेदर जिल्हा, आता महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हा) येथे सत्तावीस ऑगस्ट १९१० रोजी शनिवारी झाला. तो दिवस गोकुळ अष्टमीचा होता (शके १८३२), वेळ दुपारची तीन वाजून पंचावन्न मिनिटांची होती. घरात ओसरीवर माझे वडील त्या वेळी मातीचे गोकुळ बनवीत होते असे ते मला पुढे सांगत असत.

त्यावेळी माझे वडील (त्यांना आम्ही अप्पा म्हणत असू, आजी त्यांना अण्णा म्हणे) निलंग्याच्या मामलेदार कचेरीत पेश्कार म्हणजे अव्वल कारकून होते. माझी आई, मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात केज हा तालुका आहे, तेथील वडगाव या गावची. हा गाव मांजरा नदीच्या काठावर आहे. आईचे माहेरचे अडनाव चंद्रस. शिवाजी महाराजांनी पुरंदरचा किल्ला ज्या नीलकंठरावाच्या मुलांकडून घेतला त्यांचेही आडनाव चंद्रस होते.

माझी आई, कृष्णाबाई, ही सामान्य कुटुंबातील होती. घरी पन्नास एक एकर जमीन होती, तिच्यावरच

या कुटुंबाचा निर्वाह चालत असे. पण आईची मावशी ही धारुरच्या प्रसिद्ध देशपांडे घराण्यात दिली होती. तिला मुलगी नव्हती म्हणून तिने आईला आपल्याजवळ ठेवून घेतले. त्यामुळे आईचे लहानपण मोठ्या सुखात गेले. इ. स. १९०५ मध्ये ती बारा वर्षांची असताना तिचे लग्न कळंब येथे झाले. माझी आई म्हणजे माझ्या वडिलांचे दुसरे कुटुंब. आमची सावत्र आई इ. स. १९०५ मध्ये कळंब (उस्मानाबाद जिल्हा) येथे प्लेगने वारली. त्या वेळीं माझे वडील कळंबच्या मामलेदार कचेरीत पेश्कार होते. त्यानंतर हा दुसरा संबंध घडून आला. आमची एक सावत्र बहीण होती. तिला आम्ही यमनाक्का म्हणत असू. तिचे लग्न होऊन ती पुढे इ. स. १९२० मध्ये वारली. तिची मुले जगली नाहीत. तिच्या नवऱ्याने पुढे दुसरे लग्न केले.

मला निलंग्याची काहीच आठवण नाही. आम्ही माध्व संप्रदायी वैष्णव. दक्षिण कानडा जिल्ह्यात उडुपीचे बाळकृष्णाचे देऊळ हे आमचे तीर्थस्थान. मी चार वर्षांचा असताना आई-वडील उडुपीच्या यात्रेला गेले होते. तेथे मध्व-सरोवर नावाची एक पुष्करणी आहे. तेथे लोक स्नान करीत. तेव्हा त्यांच्या लांब लांब शेंडीतील तेल पाण्यावर पसरत असल्याची अगदी अंधुक अशी आठवण मला आहे. यापलीकडे मला काही आठवत नाही.

मला वाटते इ. स. १९१४ च्या अखेरीस माझ्या वडिलांची बदली निलंग्याहून गुलबर्गा जिल्ह्यातील जेवरगी या तालुक्यावर झाली. भीमा नदी या तालुक्यातून वाहात जाते. निलंग्याहून आम्ही निघालो तो लातूर कुर्डुवाडीमार्गे आम्ही जेवरगीकडे निघालो. लातूरहून रेल्वेने प्रवास करीत असता माझ्या डोक्याला कानटोपी होती ती खिडकीतून बाहेर पडल्याचे मला आठवते. पुढे जेवरगीला जाताना आम्हांला भीमा नदी ओलांडावी लागली. नावांना लाकडी घोड्याची डोकी लावली होती, ती पाहून मला त्यावेळी मोठी मौज वाटली.

पाच वर्षांच्या वयापासूनच्या गोष्टी मला चांगल्याच आठवतात. जेवरगी हा गाव म्हणजे बेडर जमातीचा प्रदेश. कर्नाटकातील ही लढाऊ जमात भीमा आणि कृष्णा यांच्या संगमाजवळील प्रदेशात राहाणारी. बेडरांना शिकारीचा मोठा शौक असे. कधी रानडुकरे तर कधी ससे अशा जनावरांची शिकार करून ती आमच्या घरासमोरून नेताना मी बेडरांना अनेक वेळा पाहिल्याचे आठवते.

जेवरगी मुक्कामी माझ्या आजीचे डोळे गेले. वडिलांनी ऑपरेशन करवून ते बरे करवितो म्हणून तिला पुष्कळ सांगून पाहिले, पण तिने शेवटपर्यंत ऐकले नाही.

मला आजीची आठवण म्हणजे ती आम्हांला रोज गोष्टी सांगे

मला लहानपणी गोष्टी ऐकण्याचा विलक्षण नाद होता. रात्री मी आजीच्यामागे लागून तिला गोष्टी सांगण्यास लावीत असे. कधी वाघाची तर कधी पक्ष्यांची अशा अनेक गोष्टी ती सांगे. त्यांपैकी अगदी थोड्या आठवणीत राहिल्या आहेत. काही पुढीलप्रमाणे असाव्यात :

एक होता कोल्हा. त्याला भूक लागली. एका वाघाने नुकतीच एक शिकार करून आणली होती. ती आपल्या गुहेत ठेवून तो बाहेर गेला होता. कोल्हा वाघाच्या गुहेत घुसला आणि शिकार खाऊ लागला. काही वेळाने वाघ परत आला. पाहतो तो गुहेत कोणी तरी आहे. कोल्ह्याचे अवसान गळाले होते. पण तो मोठा युक्तिबाज, त्याने खोटे अवसान आणून दरडावून विचारले, ‘ कोण आहे ? ’ वाघाने म्हटले, ‘ मी वाघ आहे. ’ यावर कोल्हा म्हणतो, ‘ तू वाघ असशील तर मी तुझ्या भुवया उपटून टाकीन ’ हे ऐकून वाघ घाबरला. त्याला वाटले की हा कोणी महाभयंकर प्राणी आहे. तो पळत सुटला. वाटेत त्याला लांडगा भेटला. त्याला त्याने आपली हकीकत सांगितली. लांडगा गुहेपाशी आला. कोल्ह्याने त्याला विचारले, ‘ कोण आहे ? ’ लांडगा म्हणाला, ‘ मी लांडगा ’. कोल्हा म्हणाला, ‘ तू लांडगा असशील तर तुझी मान मुरगाळून ठेवीन ’ हे ऐकून लांडगाही पळत सुटला. असे अनेक जनावरांचे झाले. शेवटी या गोंधळात कोल्ह्याचे भोजन आटोपले आणि तो संधी साधून गुहेतून निसटला.

आजीने भुताची एक गोष्ट सांगितलेली आठवणीत आहे. एक शेतकरी आपल्या शेतात गुऱ्हाळ चालवीत होता. तो एक भूत त्याच्याजवळ येऊन बसले. आणि शेतकऱ्याकडून जबरदस्तीने काकवी घेऊन खाऊ लागले. शेवटी कंटाळून शेतकऱ्याने एक जळते लाकूड घेऊन भुताच्या नाजूक भागाला डाग दिला. भूत अल्लारे अल्लारे म्हणत पळून गेले. भूत अल्लोपासक असते ही गोष्ट आठवून अद्याप मला हसू येते.

आमच्या आजीची एक बहीण तुळसाबाई नावाची होती. माझा जन्म झाल्यावर थोड्याच दिवसांनी ती वारली असावी. आमची आजी सांगे, “ तुळसाबाईची डोळ्याची बुबुळे उलटी (म्हणजे काय ?) होती त्यामुळे तिला भुते दिसत. एकदा ती विहिरीवर धुणी धुण्यासाठी म्हणून गेली होती. पाहते तो विहिरीवर एक भूत बसलेले. ते पाय धूत होते. तुळसाबाईला पाहून ते तिला म्हणते काय, “ अग माझे पाय फारच खडबडीत आहेत. जरा धुऊन दे पाहू ” तुळसाबाई घाबरली. पण धीर धरून ती म्हणाली, “ थांब, मी घरी जाऊन ” असे म्हणून ती धावत धावत घरी आली आणि खोलीत घुसून आतून कडी लावून घेतली. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर ते भूत

घरी आले. आणि त्याने दाराला धडका मारण्यास सुरवात केली. तुळसाबाईने सांगून ठेवले होते की काही झाले तरी दार उघडावयाचे नाही. भूत दाराला धक्के देऊन देऊन दमले आणि निघून गेले. तुळसाबाईने नंतर सांगितले की दाराला लोखंडाची कडी असल्यामुळे भुताला आत येणे शक्य झाले नाही. लोखंडावर भुताची मात्रा चालत नाही.

आजीने सांगितलेल्या पुष्कळ गोष्टी मी आता विसरलो आहे. तिने श्रावणातील शुक्रवारच्या गोष्टी आम्हांला सांगितल्या. हरवलेल्या मुलाच्या आईला कित्येक वर्षांनी मुलगा दृष्टीस पडताच पान्हा फुटला आणि मग आईची आणि लेकराची भेट झाली, ही गोष्ट मला वाटते, शुक्रवारच्या कहाणीतील असावी. पुष्कळदा गोष्टी सांगून सांगून आजी कंटाळत असे. एकदा मी तिला म्हटले, 'आजी मला वाघाची गोष्ट सांग' ती कंटाळून म्हणाली, 'वाघाचे डोके भादरले'. यावर मी म्हटले, 'आजी, वाघाला डोके असते का ग?'

आज (१९६९) माझा नातू प्रियदर्शन मला गोष्टी सांगा म्हणून माझ्या मागे लागत असतो. तेव्हा माझ्या लहानपणीच्या गोष्टी ऐकण्याच्या नादाची आठवण हटकून होते.

वयाच्या चौथ्या वर्षापासून मी बाराखडी शिकण्यास सुरुवात केली असावी. कारण अक्षरे काढण्यात मी चुकल्यामुळे वडिलांच्याकडून चापटी खाल्ल्याचे मला आठवते. इ. स. १९१५ मध्ये (मला पाचवे वर्ष चालू झाले) मला जेवरगीच्या शाळेत बसविण्यात आले. ती प्राथमिक शाळा होती. कानडी आणि उर्दू या माध्यमाचे वर्ग असत. मला उर्दू माध्यमाच्या वर्गात बसविण्यात आले. शाळेत मला बऱ्याच वेळा मार खावा लागला असावा. कारण शाळेची तीच एक आठवण मला राहिली आहे. शाळेच्या उर्दू मास्तरांबद्दल आम्ही दोन ओळी म्हणत असू.

अलीफ बे ची फळी, मास्तरांची ओढवली फजीती
अलीफ बे की तख्ती हजरत को आयी कमबख्ती

शिक्षेचे प्रकारही विलक्षण असत. एकदा मला दोराला लटकवण्यात आले. माझी मुंज झाली नसल्यामुळे खाली लंगोटीही नव्हती. इजार किंवा चड्डी हीही आम्हांला माहीत नव्हती. दोराला लोंबकळत असता मास्तरांचे छड्या मारण्याचे काम चालूच असे. अशा वागणुकीमुळे मला शाळेत जावेसे वाटत नसे. मला वाटते, मी दोनचार दिवस शाळेत गेलो नाही. एक दिवस चार मुले आमच्या घरी आली. मला उचलून शाळेत नेण्यासाठी ती आली होती. त्यांना पाहताच मी आजीच्या मागे जाऊन लपलो. मुलांनी मला तेथून ओढून काढले आणि कुणी

माझे डोके धरले, कुणी माझे पाय धरले आणि अशा रीतीने प्रेत उचलून नेतात तसे ती मला शाळेत घेऊन गेली. मी काय शिकलो याची मला काही म्हणता काही आठवण नाही.

जेवरगीला असताना मी एकदा अंगणात खेळत होतो. घरावरून एक मिरवणूक चालली होती. ती पाहण्यासाठी मी दाराकडे पळत निघालो तो मध्येच पाय घसरून मी जोरात आपटलो. डोक्याला भली मोठी खोक पडली, ती खूण अद्याप आहे. आईने जखम धुऊन पट्टी बांधली. पुष्कळ दिवसपर्यंत ती सांजा करून मला खाऊ घालत होती. मला सांजा फार आवडे. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव (जन्म १९०८) माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठे होते. ते सांज्यासाठी हट्ट धरीत आणि मी काही तो त्यांना देत नसे. त्यांनी शेवटी चिडून म्हटले, ' थांब, मीही डोक्याला खोक पाडून घेतो म्हणजे मग आई मला सांजा करून घालील. ई तुला त्यातला एक घासही देणार नाही. '

वयाच्या पाचव्या किंवा सहाव्या वर्षी बाहेरच्या जगाचे आम्हांला ज्ञान काय असणार ? पण त्यावेळी माझ्या काही काही समजुती काय होत्या याची अद्याप मला आठवण आहे.

उदाहरणे म्हणजे : आभाळ भरून आले आणि पाऊस पडू लागला की मला वाटे जगात सर्वत्र पाऊस पडत असावा. माझी बहीण सीताबाई हिचा जन्म जेवरगीला (१५ फेब्रुवारी १९१५) झाला. मुले कशी जन्मतात यासंबंधी माझी इतकीच कल्पना होती की पोट फाडून मुले बाहेर येतात आणि देव (परमेश्वर) बारीक केसाने पोट शिवून टाकतो. निजामासंबंधी माझी अशी समजूत होती की सोन्याच्या अतिशय उंच अशा पलंगावर एक गलमिशा असलेला मनुष्य अंगावर उंची कपडे घालून बसला आहे. धार्मिक भेदाची मला काहीच कल्पना नव्हती. ख्रिस्ती मनुष्य मी पाहिलाच नव्हता. इंग्रजही मी प्रथम पाहिला तो १९१८ मध्ये. त्यावेळी पहिले जागतिक महायुद्ध चालू होते. पण त्याचीही मला कल्पना नव्हती. माझे जग आमच्या कुटुंबाच्या पुढे गेलेच नाही. घरात आई, वडील, माझे मोठे बंधू बिंदुमाधवराव, धाकटी बहीण सीताबाई, आजी आणि क्वचित् आईचे वडील आणि आईचा भाऊ अप्पाराव ही माणसे आठवतात. घरात एक मोलकरीण होती. तिचे नाव लक्ष्मी. ती नकटी होती. ती आम्हा भावंडांना खेळवीत असे. मला नवरा समजून ती माझ्या नावाने उखाणे घेई. माझ्या बंधूंना वाटे की ती खरोखरीच माझी बायको आहे. ते काळजीयुक्त स्वरात माझ्या आईला म्हणत, ' आई ही कुठली घोरपड सेतूच्या गळ्यात येऊन पडली आहे कोण जाणे ! '

मला वाटते, वडिलांची बदली इ. स. १९१६ मध्ये जेवरगीहून प्रथम कोडंगलला (हा तालुका तेलगू भाषिक असून गुलबर्गा जिल्ह्यात होता.) झाली; पण तेथून एक दोन महिन्यांतच वडिलांना चिंचोळी तालुक्यावर (गुलबर्गा जिल्हा, कानडी भाषिक) बदलण्यात आले. चिंचोळीला जाण्यासाठी आम्हांला तांडूरच्या रेल्वेस्टेशनवर उतरावे लागले. आगगाडीची ती माझी पहिली आठवण आहे. स्टेशनच्या फलाटावर फिरत फिरत मी टोकापर्यंत गेलो. पलीकडे सिग्नलचे हिरवे-तांबडे दिवे दिसत होते. पलीकडे अंधार होता. दिव्याच्या पलीकडच्या जगाबद्दल मला त्यावेळी विलक्षण कुतूहल वाटत असल्याचे आठवते. आगगाडी, स्टेशने, सिग्नल या सर्व गोष्टी म्हणजे मला चमत्कारच वाटत असत.

मला वाटते, माझ्या वडिलांनी चिंचोळीला हंगामी मामलेदार म्हणून काही महिने तरी काम केले असावे. वडिलांच्या बोलण्यात असे आले की गुलबर्गा प्रांतावर सुभेदार म्हणून फसीहुद्दीन ऊर्फ फसीहजंग हा काम करीत होता. सुभेदार म्हणजे कमिशनर. तो लाचखाऊ म्हणून प्रसिद्ध होता. गुलबर्गा प्रांतात गुलबर्गा, बेदर, उस्मानाबाद आणि रायचूर हे चार जिल्हे होते. तालुक्यांची संख्या चाळीसच्या जवळपास होती.

प्रवाद असा होता की फसीहुद्दीन हा सपाटून पैसे खात असे. तालुक्याचे तहसीलदार (मामलेदार) त्याला पैसे पुरवीत आणि ते तो निजामाला पुरवीत असे. निजामाची समजूत करून देण्यात आली होती की आपली प्रजा स्वामिनिष्ठ असून आपल्याला नजराणा म्हणून पैसे देऊ इच्छिते. ते वसूल करण्याची परवानगी द्यावी. निजामाला तरी जितके पैसे मिळतील तितके हवेच होते. त्याने होकार दिला आणि मग नजराण्याच्या नावाखाली अधिकाऱ्यांनी हरतऱ्हेने प्रजेकडून रुपये उकळले काही तालुक्यांतून तर शेतसारा दोन दोन वेळा वसूल करण्यात आला. यात अधिकाऱ्यांनी आपले खिसेही भरून घेतले. वडील म्हणत की चाळीस तालुक्यांचे मामलेदार हे सुभेदाराला (कमिशनर) सांगत असत, 'साहेब, आपण काही काळजी करू नका. आम्ही आपले नाव बद्दू होऊ देणार नाही. असे समजा की आपण अलीबाबा आहात आणि आम्ही चाळीस चोर आहोत.'

प्रजेकडून पैसे उकळण्याच्या या वाईट सवयीमुळे निजामाचे नाव अतिशय बद्दू झाले. फसीहुद्दीन उर्फ फसीहजंग हे पुढे महसूल खात्याचे सचिव झाले. पुढे इंग्रजांनी निजामाला मंत्रिमंडळ बनविण्यास भाग पाडले. मुख्य मंत्र्याला मंत्रिमंडळाचे (त्याला एक्जीक्यूटिव कौन्सिल, बाबे-हुकूमत म्हणत) अध्यक्ष (सदरे आज़म बाबे-हुकमत, प्रेसिडेंट ऑफ दि एक्जीक्यूटिव कौन्सिल) बनविण्यात

आले. इ. स. १९१४ पासून १९१६ च्या अखेरपर्यंत निजामाने मंत्री असा नेमलाच नव्हता. सगळा कारभार सचिवांच्या साहाय्याने तोच करीत असे. मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर त्यात काही इंग्रज अधिकारी घेण्यात आले. लाचलुचपतीच्या प्रकाराला आळा बसू लागला. यानंतर लवकरच महसूल सचिव फसीहजंग यांचा एकाएकी मृत्यू झाला. लोकप्रवाद असा की पैसे खाण्याचे मार्ग संपुष्टात आले आणि निजामाचा तर तगादा की दर आठवड्याला इतके इतके रुपये देण्याचे तुम्ही कबूल केले आहेत ते माझे मला मिळाले पाहिजेत. या कुचंबणुकीत फसीहजंगांनी विष प्राशन करून आत्महत्या केली. खरे खोटे परमेश्वर जाणे!

अर्थात् या गोष्टी मला नंतर कळल्या. वडील जेवरगीला असताना निजामाच्या हव्यासातून एक विलक्षण प्रकरण उद्‌भवले ते सांगायला हवे. अर्थात ही गोष्ट ऐकलेली आहे; पाहिलेली नाही.

गुलबर्गा जिल्ह्यात भीमा नदीच्या काठावर इटगी नावाचे स्थळ आहे. तेथे एक दत्तभक्त साधू राहात असे. काही काळाने तो वारला (जलसमाधी तरी घेतली असावी अगर पाण्यात पडून मेला असावा). त्याचे प्रेत वाहात वाहात जेवरगी तालुक्याच्या एका खेड्याला येऊन लागले. गावच्या पाटलाला साधूने स्वप्नात येऊन सांगितले की मी तुझ्या गावाला आलो आहे. अमक्या ठिकाणी माझे प्रेत आहे. ते पाण्यातून काढून तू माझी समाधी बांध. पाटलाने दुसऱ्या दिवशी नदीच्या काठी शोध घेतला तो त्याला साधूचे प्रेत सापडले. त्याने ते ताब्यात घेतले. लवकरच समाधी बांधण्यात येऊन साधूला तेथे पुरण्यात आले. साधूने स्वप्नात पाटलाला भेट दिल्याची हकीकत हा हा म्हणता चहूकडे पसरली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी समाधीच्या दर्शनासाठी येऊ लागल्या. समाधीपाशी लवकरच पन्नास साठ हजार रुपये जमले. मी वडिलांच्या बरोबर समाधी पाहण्यासाठी गेल्याचे मला आठवते. काही महिन्यांनी यात्रेकरू स्त्रीपुरुषांना गुंडांचा उपसर्ग होऊ लागला. साधूने पाटलाला पुन्हा स्वप्नात येऊन सांगितले की मी आता येथे राहात नाही. पाटील दुसऱ्या दिवशी जाऊन पाहतो तो समाधीला मोठी चीर पडली होती आणि समाधीत साधूचे प्रेत नव्हते. यात्रा भरेनाशी झाली. जेवरगीच्या मामलेदाराने समाधीमुळे जमलेली पन्नास हजारांची रक्कम आपल्या ताब्यात घेतली आणि सगळी हकीगत गुलबर्ग्याच्या कलेक्टरला (अव्वल तालुकदार म्हणत) लिहून कळविली. गुलबर्ग्याच्या कमिशनर (सुभेदार) ने निर्णय घेतला की रक्कम अमानत म्हणून कलेक्टरच्या नावे गुलबर्ग्याच्या खजिन्यात ठेवावी. लोकहिताची एखादी योजना आखून तिच्यावर वरील रक्कम

खर्च करण्यात यावी.

ही हकीकत १९१५–१६ ची आहे. १९२५ पर्यंत व्याजासकट ती रक्कम साठसत्तर हजारांच्या घरात गेली. गुलबर्ग्यावर जे कलेक्टर नेमून आले त्यांनी या रकमेकडे लक्ष दिले नाही. पण १९२४-२५ मध्ये एक कलेक्टर आले. निजामाला नजराणा म्हणून काही रक्कम द्यावी आणि आपले भले करून घ्यावे असे त्यांना वाटले. त्यांची नजर वरील रकमेकडे वळली. त्यांनी विचार केला की ही रक्कम काही सरकारी नाही. कलेक्टरच्या नावे ठेवण्यात आली आहे. ती अलगत उचलावी आणि निजामाला देऊन टाकावी. आपले कोण काय करणार आहे? मनात विचार येण्याचा अवकाश, त्यांनी खजिन्यातून रक्कम काढली आणि निजामाकडे पाठवून दिली. ही रक्कम कशी जमविण्यात आली याची निजामानेही चौकशी केली नाही. जशी आली तशी त्याने आपल्या तिजोरीत भरली.

गुलबर्ग्यात मात्र या बातमीने मोठीच खळबळ उडाली. सार्वजनिक कार्यासाठी राखून ठेवलेली रक्कम उचलण्याचा कलेक्टर (त्याला अव्वल तालुकदार म्हणत) ला अधिकार काय आणि निजामाला तरी नजराणा म्हणून स्वीकारण्याचा हक्क कसा पोहोचतो, असे जो तो विचारू लागला. ह्यावेळी इंग्रज अधिकारी महसूल आणि पोलीस या खात्यावर वरिष्ठ म्हणून आले होते. गुलबर्ग्याच्या नागरिकांनी त्यांना तारा पाठविल्या. त्यांना निजामाची भीड बाळगण्याचे कारण नव्हते. त्यांनी गुलबर्ग्याच्या पोलिसप्रमुखाला हुकूम केला की कलेक्टरला कैद करून हैदराबादेस घेऊन यावे.

इंग्रजांच्या वरील हुकुमाचा सुगावा कलेक्टरला लागला. तालुकदार (म्हणजेच कलेक्टर) साहेबांची पाचावर धारण बसली. या संकटाला कसे तोंड द्यावे हे त्यांना समजेना. शेवटी हैदराबादेस जाऊन निजामाचे पाय धरावे असे त्यांनी ठरविले. पण पोलिसांचा डोळा चुकवून हैदराबादेस जावे कसे? तालुकदारसाहेबांनी अंगावर बुरखा चढविला. या बुरखेवालीने रेल्वेच्या गार्डाची मूठ दाबून हैद्राबादचा प्रवास पूर्ण केला. स्टेशनवरून तालुकदारसाहेबांनी तडक निजामाचा राजवाडा (त्याचे नाव किंगकोठी, निजामसाहेब तेथेच राहात.) गाठला आणि त्यांचे पाय धरले. तक्षकाबरोबर इंद्रालाही ओढण्याची तयारी झाली तर अनवस्था प्रसंग ओढवेल म्हणून निजामाने इंग्रजांना कळविले की तालुकदारसाहेब माझ्याकडेच आले आहेत. गैरसमजाने माझ्याकडे रक्कम पाठविण्यात आली आहे ती मी गुलबर्ग्याला परत करीत आहे. यावर ते प्रकरण निकालात निघाले. ती रक्कम पुढे गुलबर्ग्याच्या पाणीपुरवठ्यावर खर्च करण्यात आली. तालुकदारसाहेबांना सेवानिवृत्त करण्यात आले. पण निजामसाहेबांच्या

आज्ञेने त्यांना पाचशे रुपये दरमहाची पेन्शन तहहयात चालू झाली. ते आपल्या गावाला, लखनौला निघून गेले. निजामसाहेबांना दुवा देत त्यांनी आयुष्यभर पाचशे रुपये दरमहाचा उपभोग घेतला.

चिंचोळी हे गाव अगदी लहान आहे. तेथील दोनचारच गोष्टी मला आठवतात. आम्ही ज्या घरात राहात होतो त्याचे मालक रंगाचार्य या नावाचे होते. त्यांची स्वतःची आंबराई असावी. कारण आंब्यांच्या मोसमात घरात खूप आंबे येऊन पडत. आम्ही आंब्यांवर सारखे चरत असू. एकदा तर घरमालकांनी आम्हांला आढी घातलेल्या खोलीत नेऊन सोडले आणि आम्हांला सांगितले की पोटभर आंबे खाल्ल्याशिवाय खोलीच्या बाहेर यावयाचे नाही. असे म्हणून त्यांनी दाराला बाहेरून कडी लावून घेतली. मला वाटते तीन प्रहर होईपर्यंत आम्ही खोलीच्या बाहेर पडलो नाही. प्रत्येकी आम्ही पंचवीस तीस तरी आंबे खाल्ले असावेत!

चिंचोळीची दुसरी आठवण म्हणजे तेथील शाळामास्तर हणमंतराव धारवाडकर यांची. शाळेत मी काय शिकलो याची मला काहीच आठवण नाही. पण मला आठवतात त्या मास्तरांच्या आकडेदार मिशा. त्यामुळे त्यांचा चेहरा अतिशयच उग्र दिसत असे. ते हसले तरच समजावे की यांना राग आलेला नाही. मला वाटते की आम्ही त्यांच्यापाशी थोडे तरी इंग्रजी पढलो असू. पण त्याचा मनावर काही ठसा उमटलेला नाही.

चिंचोळीला देशमुखांचे घराणे नावाजलेले होते. त्यांच्या घरी हत्ती होता. आम्ही मुले कितीतरी वेळा हत्तीवर बसलो. हत्ती ऊस, गूळ, तांदूळ खात असे. त्याच्याकडे पाहात उभे राहणे हा आमचा नेहमीचाच चाळा होता.

इ. स. १९१७ मध्ये वडिलांची बदली चिंचोळीहून कोडंगलला झाली. हा तालुका गुलबर्गा जिल्ह्यात असून तेलगू भाषिक आहे. राज्यपुनर्रचनेनंतर हा तालुका आंध्र प्रदेशात समाविष्ट झाला आहे.

त्यावेळीं मला सातवे वर्ष लागले होते. कोडंगलला आमचे घर नातेवाइकांनी आणि पाहुण्यांनी नुसते गजबजून गेले होते. घर समृद्ध असावे. कारण मला स्वतःला सोन्याचांदीचे अलंकार घालण्यास मिळत. त्यात डोक्याला (मुंज झाली नसल्यामुळे माझ्या डोक्याला झुलपे होती) सोन्याचे फूल, कानात मोती, गळ्यात गोफ आणि कंठी, हातांत कडी, बोटात आंगठी, कमरेला सोन्याचा कडदोरा, पायात चांदीचे पाजेब असा माझा लहानपणीचा थाट असे. घरात आचारी, पाणकी, नोकरचाकर, गाईम्हशी, दूधदुभते यांची चंगळ होती. दहीपोहे, कालवलेले पोहे, लाह्याचे पीठ आणि ताक, दही किंवा दूध, रव्याचे,

बेसनाचे, किंवा तिळाचे आणि तांदळाचे लाडू हे फराळाचे जिन्नस मला आठवतात. घरी नोकर-चाकर असल्यामुळे हाताने काम करण्याची सवय अशी मला कधी लागलीच नाही.

आमच्या घरात कमीत कमी पंधरा माणसे तरी असावीत. आई, वडील, आम्ही तिघे भाऊ आणि एक बहीण, मोठी काकी (बालविधवा), धाकटी काकी लक्ष्मीदेवी आणि तिची मुले व्यंकोबराव (डेप्युटी कलेक्टर, म्हैसूर राज्य. हे १९६८ मध्ये वारले.), सीताराम (हा इ. स. १९२५ मध्ये प्लेगने वारला) आणि मुलगी पद्मावती उर्फ पद्मक्का, आम्ही तिघे भाऊ म्हणजे वडील बंधू बिंदु-माधवराव, मी आणि धाकटा भाऊ गुरुमध्व (याचा जन्म १९१७ मध्ये कोडंगलला झाला. तो १९४४ मध्ये वारला) आणि बहीण सीताबाई, माझे आजोबा (आईचे वडील) आणि मामा अप्पाराव आणि माझी बालविधवा आतेबहीण भागिरथी ही माणसे मला आठवतात. माझी आजी आंधळी होती. पण माझ्या वडिलांचे तिच्या सोयीगैरसोयींकडे सारखे लक्ष असे. त्यापायी आम्हा भावंडांना अनेकदा वडिलांच्या हातचा प्रसाद खावा लागला.

माझ्या आजीला बाराच्या वर मुले झाली. पण मला समजू लागले, त्यावेळी तिची फक्त दोन मुले हयात होती. एक माझे वडील आणि दुसरे माझे काका पुरुषोत्तमराव. आजीची काही मुले कर्तीसवरती होऊन वारली. माझे मोठे काका नारायणराव ऊर्फ नानासाहेब हे जेवरगीच्या मामलेदार कचेरीत फौजदारी कारकून होते. ते तीस वर्षांचे होऊन वारले. दुसरे काका आनंदराव उर्फ अप्पासाहेब हेही हैद्राबाद शहर तालुक्याच्या मामलेदार कचेरीत होते. तेही पंचवीस वर्षांचे होऊन वारले. त्यांचीच विधवा आमच्या घरात होती. ती माझी सर्वात मोठी काकी. तिचा भाऊ, भावजय, भाचा आणि भाची ही आमच्या घरी महिनोमहिने राहात. आम्ही लहान मुले सातआठ तरी असू. आमचे घर म्हणजे कसे गोकुळासारखे गजबजलेले असे.

माझे काका लहानसहान नोकऱ्या करीत. एकदा ते यादगीरला असताना आम्ही भावंडे कोडंगलहून त्यांच्याकडे गेलो होतो. तेथे आम्ही एकदोन महिनेच राहिलो असू. तेवढ्या काळात आम्हांला तेथील शाळेत बसविण्यात आले.

त्या शाळेत मी काय शिकलो हे मला आठवत नाही पण शिक्षेचा एक प्रकार अद्याप आठवतो. शाळेचा शिक्षक हा एक भयंकर प्राणी होता. तो टेबलाच्या खणात आमचा हात घालून खण जोरात बंद करण्याचा प्रयत्न करी. आम्ही किती कळवळून जात असू, याची कल्पनाच केलेली बरी! हातावर लाकडी रुळाने मारणे हा तर सामान्य प्रकार होता. मला वाटते शिक्षकाच्या

हातचा मार, आणि तोही नवीन नवीन मार्गांनी, खाण्यात आमची पिढी तरबेज झाली होती.

माझे काका इ. स. १९१८ च्या सुमारास प्लेगने वारले. माझ्या आजीवर दुःखाचा डोंगर कोसळला. ती धाय मोकलून रडत होती आणि माझे वडील तिचे सांत्वन करीत होते. यानंतर दोनचार दिवसांनी माझी काकी आपल्या मुलांना घेऊन चिंचोळीहून (तेथे माझे काका वारले) कोडंगलला आली. तिची कष्टी मुद्रा मला अद्याप आठवते. तिच्या केशवपनाचा प्रसंगही आठवतो.।

घरातील सोवळ्या बाया म्हणजे आजी, मोठी काकू, धाकटी काकू, आणि आतेबहीण या होत्या. आम्हा वैष्णवांच्या घरात सोवळेओवळे, पूजापाठ, धर्मकर्मे, सणवार, उत्सव-समारंभ यांचे महत्त्व असे. माझी मुंज झाली नसल्याने मला सोवळ्याओवळ्याचे इतके बंधन नसे. पण घरात मोठा स्वयंपाक हा सोवळ्याचा असे. पूजापाठ, नैवेद्य, अभिषेक ही उरकल्याशिवाय जेवणाची पंगत मांडीत नसत. गंध, अंगारा, अक्षता (उभा अंगारा आणि टोकाला अक्षत, आणि पोटावर आणि हातावर गंधाचे पट्टे) असाआमचा थाट असे. घरात पूजेचे ब्राह्मण वेगळे, अतिथी म्हणून येणारे ब्राह्मण वेगळे. सारांश, रोजच्या पंक्तीला पंचवीस माणसे तरी असत.

संध्याकाळी आम्ही पुराण ऐकत असू. महाभारत, भागवत या पुराणांची गोडी मला आमच्या घरच्या वातावरणामुळे लागली. कोणी ब्राह्मण पांथस्थ आमच्याकडे उतरले की आम्ही त्यांच्याकडून रामायण-महाभारताच्या गोष्टी ऐकत असू. एकदा एक ब्राह्मण रामेश्वरची यात्रा करून आमच्याकडे आला. तो आम्हांला म्हणाला, 'मी लंकेच्या अर्ध्या वाटेवर जाऊन आलो आहे. लंकेला जाण्यास समुद्रातून जावे लागते. समुद्रात हत्तीएवढ्या लाटा असतात. जहाजाला समोर एक कात्रीसारखे शस्त्र लावलेले असते. ते सारखे चालू असते. समोरून मगरीसारखे प्राणी आले की ते या कात्रीने कापले गेलेच असे समजावे.' आम्ही त्याला विचारले, 'तुम्ही राक्षसांना पाहिले काय?' तो हसून म्हणाला, हो, तर! ते फार भयंकर असतात.' आम्हांला त्याच्याविषयी कोण भयंकर आदर वाटू लागला म्हणता!

आमच्या घराला लागूनच केशवाचे देऊळ होते. देऊळ मोठे आणि चांगलेच प्रशस्त होते. देवळाचे पटांगण म्हणजे हजार पाचशे माणसे मावतील इतके मोठे होते. तेथे पुराण-संकीर्तन इत्यादी कार्यक्रम चालत. तेही नेहमी आमच्या पाहण्यात येत. वैष्णव स्वामींचे वैष्णव समाजात अतिशय महत्त्व आहे. वैष्णवांचे अनेक मठ आहेत. त्याची परंपरा थोडक्यात अशी आहे :

द्वैत मताचे संस्थापक श्री. मध्वाचार्य (मृत्यू सुमारे इ. स. १३१०) हे कानडा जिल्ह्यातील मंगळूरजवळच्या उडपी या गावचे. तेथे त्यांनी बाळकृष्णाची मूर्ती स्थापन करून देवाच्या पूजेअर्चेसाठी शिष्य नेमले. त्या शिष्यांपासून आठ मठ उडपी येथे अस्तित्वात आले. द्वैत संप्रदायाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी दोन मठ नेमले. एक उत्तरेसाठी आणि दुसरा दक्षिणेसाठी. उत्तरेतील प्रचाराच्या मठाला उत्तराधी मठ म्हणतात. या मठाचे अनेक नामांकित स्वामी होऊन गेले. मध्वाचार्यांच्या ग्रंथांचे भाष्यकार जयतीर्थ (मृत्यू सुमारे इ. स. १३२८) यांना टीकाचार्य म्हणत. ते वैष्णवांचे विद्यारण्य म्हटले पाहिजेत. दुसरे एक स्वामी म्हणजे राघवेंद्र स्वामी (मृत्यू इ. स. १६७०) हे होत. यांचा मठ पुढे वेगळा झाला. यांची समाधी अधोनीजवळ तुंगभद्रेच्या काठी मंत्रालय येथे आहे. समाधीच्या वार्षिक आराधनेच्या वेळीं आजही तेथे हजारो वैष्णवांची गर्दी होते. राघवेंद्रस्वामी हे नवसाला पावतात अशी लाखो लोकांची श्रद्धा आहे. त्यांच्या समाधीची प्रतीके, (त्यांना वृंदावन म्हणतात) जवळ जवळ सर्व वैष्णवांच्या घरात आढळतात. रोजच्या देवपूजेबरोबर वृंदावनांची पूजा होते. त्यावेळीं राघवेंद्र स्तोत्र नावाचे संस्कृत स्तोत्र म्हणावयाचा प्रघात आहे.

माझ्या लहानपणी उत्तराधी मठाचे स्वामी सत्यधानतीर्थ हे होते. त्यांच्या विद्वत्तेची ख्याती सगळ्या हिंदुस्थानभर पसरली होती. जयतीर्थांच्या नंतर वैष्णवांच्यात इतका विद्वान् आणि अधिकारी पुरुष दुसरा झाला नाही असे जाणकारांचे मत आहे. संस्कृतमध्ये त्यांचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. वैष्णव स्वामींच्या प्रचारात रामाची पूजा, प्रवचने, वैष्णव भक्तांना तप्त मुद्रा, विद्वान पंडितांच्या चर्चा इत्यादींचा समावेश असे. चक्राकार मुद्रा आगीत तापवून भक्तांच्या अंगावर लावीत. आम्ही सर्व भावंडांनी दोन तीन वेळा तरी या तप्त मुद्रा घेतल्या आहेत. लहान मुलांना मुद्रा देत त्या अगदी हळुवारपणे. स्वामी तापलेल्या मुद्रा प्रथम आपल्या तळहातावर ठेवून ती किती गरम आहे ते पाहात आणि मगच ती लहान मुलांच्या अंगाला लावीत.

आम्ही कोडंगलला असताना सत्यध्यानतीर्थांचे आगमन झाले. त्यावेळी गावात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरलेले होते. उत्तराधी मठाला लाख दोन लाखांच्या जहागिरी असल्यामुळे स्वामी एखाद्या संस्थानिकाच्या वैभवात राहात. पालख्या, मेणे, हत्ती, घोडे इत्यादी सर्व प्रकारचा सरंजाम त्यांच्याबरोबर असे. स्वामींचे स्वागत करण्यासाठी गावची प्रतिष्ठित मंडळी गावाबाहेर दोन मैल त्यांना सामोरी गेली. मला तो प्रसंग अद्याप आठवतो. गावाबाहेर आम्ही सर्व-जण स्वामींच्या येण्याची वाट पाहात होतो. वेळ संध्याकाळची होती. दर पंधरा

मिनिटांनी निरोप घेऊन लोक येत. स्वामी आता पाच मैलांवर आहेत, आता चार मैलांवर आहेत, आता तीन मैलांवर आले आहेत. यानंतर हत्ती, घोडे, उंट इत्यादी लवाजमा आमच्या समोरून जाऊ लागला. घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींचे ओरडणे, उंटांची चाल. आमची उत्सुकता शिगेला जाऊन पोहोचली होती. दूर अंतरावर मशाली दिसू लागल्या. थोड्या वेळाने स्वामींचा मेणा वाहणाऱ्या भोयांचा 'हुई हुई' असा ध्वनी ऐकू येऊ लागला. साधारणपणे साडेसात आठच्या सुमारास स्वामींचा मेणा आमच्यासमोर आला. स्वामींनी मेणा थांबविला. जमलेल्या मंडळींनी त्यांना अभिवादन केले. स्वामींचे वय पन्नास आणि साठच्या मध्ये असावे. त्यांचा आवाज करडा होता. त्यामुळे लोकांना धाक वाटे.

स्वामींच्या उतरण्याची व्यवस्था केशवस्वामींच्या देवळात केली होती. त्यांच्या मुक्कामाचे दिवस म्हणजे कोडंगलच्या लोकांना पर्वणीच होती. मठातील रोजच्या जेवणाला हजार दोन हजार माणसे जमत असावीत. जेवण चालू असताना स्वामी देवाच्या गाभाऱ्यासमोरील सभामंडपात खुर्चीवर बसत. रोजचा त्यांचा श्रीरामाच्या पूजेचा थाट काही विचारू नका. रामाच्या पूजेचा मंडप कधी चांदीचा, तर कधी सोन्याचा, तर कधी विविध रत्नांचा (त्याला वज्रमंडप म्हणत) असे. स्वामी आपल्या भक्तांची पूजा स्वीकारण्यास त्यांच्या घरी जात. आमच्या घरी त्यांनी वज्रमंडप घालून रामाची पूजा केली. त्यासाठी वडिलांनी मठाला दोन हजार रुपयांची दक्षिणा दिली.

माझ्या वडिलांचा स्वभाव अतिशय धार्मिक होता. सरकारी कामाच्या वेळेखेरीज त्यांचा सगळा वेळ पूजापाठ, अनुष्ठाने, व्रते, वैकल्ये, पुराणश्रवण, हरिकीर्तन, यांतच जात असे. काही संकटे आली की ते अनुष्ठानासाठी म्हणून तुंगभद्रेच्या काठी मंत्रालयाला, किंवा गाणदाळला (तुंगभद्रेच्या काठावर मारुतीचे जाग्रत स्थान आहे) किंवा मंत्रोद्धार (विजयनगरजवळ, रामाचे जाग्रत स्थान आहे) ला जात; तेथे ते कडकडीत अनुष्ठान करीत. वीस एकवीस दिवसांनंतर त्यांना काही तरी दृष्टांत होई आणि ते समाधानाने परत येत. मंत्रोद्धार येथे त्यांना एकदा प्रचंड भुजंगाचे दर्शन घडले होते. परमेश्वराची आपल्यावर कृपा आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांची एकादशी म्हणजे अक्षरशः निर्जळी असावयाची.

घरच्या मंडळींच्या धार्मिक हौशी त्यांनी पूर्णपणे पुरविल्या. नोकरीवर असताना त्यांनी काशीरामेश्वराच्या दोनदा यात्रा केल्या. काशीयात्रेस जाताना ते आईबरोबर इ. स. १९०७ मध्ये प्रथम मुंबईला आले होते. त्यावेळी ते माधव-

बागेत उतरले होते. त्यावेळी मुंबईत नुकतीच ट्रामगाड्यांची सुरवात झाली होती. पण नाशकाला त्यावेळी घोड्याच्या ट्रामगाड्या चालू होत्या. काशीहून परत आल्यावर माझ्या वडील बंधूंचा जन्म झाला. काशीयात्रेची आठवण म्हणून माझ्या बंधूंचे नाव बिंदुमाधव ठेवण्यात आले. आणि रामेश्वरच्या यात्रेची आठवण म्हणून माझे नाव सेतुमाधव ठेवण्यात आले.

निलंग्यास असताना माझ्या आजीने विष्णुपंचकाचे व्रत धरले होते. व्रताच्या उद्यापनाच्या वेळीं वडिलांनी आजीचे तुलादान केले. त्याची रक्कम दोन हजार भरली. माझ्या आईनेही अनंत व्रत आणि हनुमंत व्रत ही धरली होती. उद्यापनाच्या वेळी चादा ब्राह्मण दंपतींना जेवण देण्यात आले. त्यानंतर चौदा आणि तीस सवाष्णींना आईने प्रत्येकी एक एक नथ आणि हारातील एकेक पुतळी दान म्हणून देण्यात आली. माझ्या बंधूंची आणि चुलत बंधूंची मुंज झाली त्यावेळीं वडिलांनी पाच हजार रुपये खर्च केला. निलंग्याला जवळच कल्याणीच्या नाबाबाची जहागीर आहे. मुंजीसाठी नबाबाने आपला हत्ती पाठवून दिला होता. माझ्या भावांची हत्तीवरून मोठी थाटाची मिरवणूक निघाली होती. सनई वाजविणाऱ्यांनाच प्रत्येकी एकेक अंगठी बक्षीस म्हणून देण्यात आली. मग इतरांना किती दानधर्म झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी !

निलंग्याला वडिलांनी स्वतः शेकडो रुपये खर्च करून आणि हजारोच्या वर्गण्या करून दोन देवळे बांधली आहेत. एक मध्वमंदिर आणि दुसरे कृष्ण-मंदिर. ती अद्याप चांगल्या स्थितीत आहेत. जेवरगीलाही त्यांनी एका देवळात अशीच कायमची नंदादीपाची व्यवस्था करून ठेवली आहे. उस्मानाबाद, गुलबर्गा आणि रायचूर या तिन्ही जिल्ह्यांतून श्रीनिवासराव पगडी हे नाव, अद्याप हजारो लोकांच्या आठवणीत आहे. त्यांनी कौटुंबिक जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली, अनेकांना अन्नाला लावले, धर्मकर्मे केली, आणि परमेश्वरा-वर अढळ श्रद्धा ठेवली. कोणत्याही संकटात ते डगमगले नाहीत. त्यांना मी निराश झालेले कधीच पाहिले नाही. त्यांची ही वृत्ती त्यांच्या परमेश्वरी श्रद्धेतूनच निर्माण झाली होती. त्यांच्या व्यक्तित्वाचा माझ्या मनावर खोल ठसा उमटलेला आहे. परमेश्वरावरील श्रद्धेबद्दल, मला काही समजत नाही, इतकेच मी म्हणू शकेन. पण माणसाच्या सद्भावनांवर मात्र माझी पुरेपूर श्रद्धा आहे. जगात चांगली माणसे अधिक आणि दुष्ट कमी अशी माझी भावना आहे. मलाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, मनाला धक्का देणारे अनेक प्रसंग आले. पण मला मदत करण्यास अनेक चांगली माणसे पुढे आली. त्यांच्यामुळे

माझ्या अडचणींचे निवारण झाले आणि माझा जीवनप्रवास सुकर झाला. हे त्यांचे फार मोठे ऋण माझ्यावर आहे. आपण आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या, कुणाचे वाईट चिंतू नये, झाले तर चांगलेच करावे अशी भूमिका आपण ठेवली तर आपल्याबद्दल सहानुभूतीचे प्रचंड धरणच तयार होते. आणि मग या जगात आपण अगदीच एकटे नाही असे वाटू लागते. या विश्वासामुळेच मलाही आयुष्यात खचल्यासारखे कधीच वाटले नाही. माझ्या वडिलांकडून मला मिळालेला हा सर्वात मोठा वारसा होय, असे मी समजतो.

ज्या दिवशी स्वामींनी आमच्या घरांत वज्रमंडप घालून श्रीरामाची पूजा केली, त्या दिवशी आमच्या घराला विवाह-समारंभाचे स्वरूप आले होते. आम्ही सर्वांनी स्वामींच्याकडून तप्तमुद्रा घेतल्या. पूजेचा मंडप, सोन्याचांदीची भांडी, पूजेचे साहित्य, नंदादीप, समया, रामाच्या अंगावरील अलंकार, इत्यादी पाहून माझे डोळे अक्षरशः दिपून गेले. ब्राह्मण वेदमंत्र म्हणत होते, मध्व-विजयाची स्तोत्रे म्हणत होते, घरभर उदबत्त्यांचा सुगंध सुटला होता. त्या दिवशीच्या जेवणाला सातआठशे माणसे तरी असली पाहिजेत.

उत्तराधी मठात श्रीरामाची मूर्ती आहे. आख्यायिका अशी आहे की, श्री मध्वाचार्यांचे पट्टशिष्य नरहरीतीर्थ हे ओरिसाच्या राज्यात मोठ्या अधिकारावर होते. तेथून निवताना त्यांनी ओरिसा राज्याच्या खजिन्यात असलेल्या राम आणि सीता यांच्या मूर्ती पळविल्या. उत्तराधी मठात या दोन्ही मूर्तींची पूजा चालू असे. सतराव्या शतकात राघवेंद्रस्वामींचा वेगळा मठ अस्तित्वात आला. मठामठांतील चुरशीच्या पायी उत्तराधी मठांतून राम आणि सीता यांच्या मूर्तींची चोरी झाली. त्या वेळच्या स्वामींनी मूर्ती परत मिळाव्या म्हणून आमरण उपोषण आरंभिले. लवकरच त्यांना दृष्टांत झाला की अमक्या अमक्या ठिकाणी एका विहिरीच्या काठावर तुम्हांला मूर्ती आढळेल. स्वामी त्या ठिकाणी पोहोचले. विहिरीवर फक्त सीतेची मू ा होती. तीच मठात आणून स्वामींनी तिची स्थापना केली. रामाची दुसरी मूर्ती बसविण्यात आली. चोरीस गेलेली रामाची मूर्ती राघवेंद्र मठात सापडली. तेथे तिची पूजा अद्याप होते. त्या मूर्तीला मूलराम म्हणतात.

असे म्हणतात, की प्रभू रामचंद्र वनवासाला गेल्यावर दशरथाला अतिशय दुःख झाले. तेव्हा त्याने स्वतःचे दुःख हलके व्हावे म्हणून सीता आणि राम यांच्या मूर्ती तयार करवून घेतल्या. कालांतराने त्या मूर्ती ओरिसाच्या हिंदू राज-घराण्यापाशी आल्या आणि तेथून ओरिसाच्या मठात आल्या. त्यांपैकी मूलरामाची मूर्ती राघवेंद्र मठात गेली. याचे उत्तराधी मठाला मोठे वैषम्य वाटत

आले आहे. उलट आपण मूलरामाची मूर्ती मिळविली याचा राघवेंद्र मठाला मोठा अभिमान वाटतो. उत्तराधी मठातील वैष्णव दृष्टीस पडले की राघवेंद्र मठाचे शिष्य त्यांना खिजविण्यासाठी मुद्दाम 'मूलरामो विजयते' असे ओरडत. पुढे इ. स. १९३३ मध्ये मी रायचूरला मामलेदारीचे प्रशिक्षण घेत असता या घोषणेपायी उत्तराधी आणि राघवेंद्र या मठांच्या अनुयायांत दंगल होण्याची वेळ आली होती.

मठाची इस्टेट लाखो रुपयांची होती. तिच्या व्यवस्थापकाला दिवाणजी म्हणत. हे अतिशय विद्वान असत. स्वामींच्या निधनानंतर अनेक वेळा दिवाणच संन्यास घेऊन स्वामी बनत. अशी अनेक उदाहरणे घडली आहेत. इतक्या मोठ्या मठाच्या आधिपत्याचा मोह कुणाला सुटला आहे? अनेक स्वामींना विषप्रयोग झाल्याच्या दंतकथा आमच्या कानांवर येत. एका स्वामींनी रामाला नैवेद्य दाखविला. अन्नात विष कालविले होते. त्यामुळे नैवेद्य दाखविताक्षणीच रामाची मूर्ती गळ्यापाशी निळी झाली असे म्हणत.

आमच्या भोवती वावरणारा समाज खाऊनपिऊन सुखी असावा. कोडंगल हा तेलंगणचा भाग. त्यामुळे तेथे अनेक तलाव होते. भाताची पिके वर्षातून दोनदा काढण्यात येत. एखादे भातशेत आणि चिंचेची झाडे असली की मालक सुखवस्तू समजला जाई. आंबराया तर तेलंगणात विपुल. आंब्याचा मोसम सुरू झाला की घरोघर कैऱ्यांच्या कितीतरी प्रकारच्या चटण्या आणि लोणची तयार करण्यात येत. लोणच्यांचे किती प्रकार म्हणून सांगावे. प्रत्येक घरात पाचसात प्रकारची तरी लोणची घालीत. लोणच्यांच्या बाबतीत घरोघर एक प्रकारची स्पर्धाच चालत असे म्हणानात! इतकेच नव्हे तर आम्ही नवीन लोणची घातली आहेत, त्यांचा स्वाद घेण्यासाठी या म्हणून या कलेतील दर्दी मंडळींना आवर्जून आमंत्रणे देण्यात येत. जेवणात पहिल्या भाताला एक प्रकारचे लोणचे, दुसऱ्या भाताला दुसरे, तिसऱ्या भाताला तिसरे, अशी लोणची वाढण्यात येत. जेवणे झाल्यावर कोणते लोणचे उत्कृष्ट याचे सर्टिफिकेट ती तज्ज्ञ माणसे देत. आणि मग त्या लोणच्याचा गावभर गवगवा होई. कित्येक घराणी आपल्या लोणच्याचे ट्रेड सीक्रेट कुणाला सांगत नसत. तेलंगणातील लोणच्यांची सर इतर कोणत्याही लोणच्यांना येणार नाही असे माझे मत आहे. तेलंगणात जेवणात चिंच जास्त, तिखट जास्त, आणि गूळ, साखर कमी अशी पद्धत आहे. उलट कर्नाटकात गूळ-साखरेचे प्रमाण अधिक आढळते.

मुलांना पित्त झाले तर कर्नाटकात शिरा खाण्यास देतात, उलट तेलंगणात चिंच उकळून त्याचे चाटण खाण्यास देत. भातांत रावणभात (त्याला चित्रान्न

धिकाऱ्याला अव्वल तालुकेदार म्हणत. गुलबर्गा, रायचूर, बीदर, आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांचा मिळून गुलबर्ग्याचा सुभा म्हणजे प्रांत होई. सुभ्याच्या मुख्याला सुभेदार म्हणत. हैदराबाद राज्य हे सरंजामी पद्धतीचे राज्य म्हणता येईल. मोठमोठ्या अधिकारांवर सरदार-जहागिरदारांच्या नेमणुका होत. त्यांत बहुसंख्य मुसलमान असले तरी हिंदू जहागिरदार–सरंजामदार यांची संख्या काही कमी नव्हती. हैदराबाद राज्य हे ब्याऐंशी हजार चौरस मैलांचे होते. या राज्यात तेवीस हजार खेडी, एकशे तीस तालुके, सोळा जिल्हे आणि चार सुभे होते. इ. स. १९४७ पर्यंत राज्याचे उत्पन्न बत्तीस कोटींपर्यंत गेले होते. राज्यात खुद्द निजामाचा स्वतःचा खाजगीचा सरंजाम दोन कोटी रुपयांचा होता. त्याचे दोन जिल्हे आणि एकोणीस तालुके होते. या सरंजामाला सर्फेखास म्हणत. निजामाचे घराणे अस्तित्वात येण्यापूर्वी तेलंगण आणि कर्नाटक या प्रांतात हिंदू सरदार मोठेमोठे सरंजाम बाळगून असत, ते त्यांच्यापाशी कायम करण्यात आले. अशा सरदारांच्या सरंजामांना हैदराबादेकडे संस्थाने म्हणत. तेलंगणात गद्वाल, वनपर्ती, जटप्रोल, गोपाळपेठ, दोमकोंडा, सिर्नापल्ली, आणि कर्नाटकात सुरपुर, गुरगुंटा, अनागोंदी अशी संस्थाने होती. त्यांचे उत्पन्न एक लाखापासून वीस लाखांपर्यंत होते.

निजामाने निर्माण केलेले सरदार–जहागिरदार अनेक होते. हैदराबाद राज्यातील जहागिरदारांची संख्या अठराशे होती. त्यांची उत्पन्ने एक हजारापासून एक कोटीपर्यंत होती. त्यांतही प्रमुख असे जहागिरदार दहा होते. त्यांना उमराये उज्जाम म्हणजे श्रेष्ठ अमीर असे म्हणत. पायग्याचे अमीर, तीन पाती मिळून उत्पन्न दीड कोटी, सालारजंग, उत्पन्न तेवीस लाख, महाराजा किशनप्रसाद (पंजाबचे खत्री घराणे) उत्पन्न पंधरा लाख, राजा इंद्रकर्ण (उत्तर प्रदेशचे कायस्थ घराणे) उत्पन्न पाच लाख, राजे रायरायान (महाराष्ट्रीय, आडनाव भालेराव) उत्पन्न चार लाख, फख्रूलमुल्क आणि खानेखानान (हैदराबादचे एके काळचे पंतप्रधान [१७५३–१७५७] शहानवाजखान यांचे वंशज) उत्पन्न अनुक्रमे पाच लाख आणि चार लाख, शौकतजंग (यांचा पूर्वज उद्गीरच्या लढाईत मारला गेला) उत्पन्न दोन लाख; असे हे श्रेष्ठ अमीर होते.

आम्ही कोडंगलला असताना गुलबर्गा प्रांताचे सुभेदार राजा इंद्रकर्ण हे होते. ते माझ्या वडिलांना फार चाहत असत. ते कोडंगलच्या दौऱ्यावर आले, त्यावेळी त्यांचे स्वागत अतिशय थाटाचे झाले. मला आठवते ती त्यावेळी झालेली अतिशबाजी. दारूकाम मोठे प्रेक्षणीय होते. दारू उडविण्यात आली आणि तीतून 'इंद्रकरण दीर्घायू होवो' अशी अक्षरे प्रकट झाली. सुभेदारांच्यासाठी तंबू, शामियाने उभे केले होते. त्यामुळे तळाला एका छावणीचे स्वरूप आले

होते. राजा इंद्रकर्ण हे मध्यम बांध्याचे, गोरे, स्थूल पण रुबाबदार दिसणारे गृहस्थ होते.

कोडंगलला आम्ही आल्यावर माझ्या वडिलांनी मला उर्दू शाळेत घातले. या शाळेतही मी काय शिकलो हे मला आठवत नाही. पण उर्दू पहिले किंवा दुसरे पुस्तक मी वाचू लागलो होतो. शाळेची एकच आठवण मला राहिली आहे. शाळेच्या तपासणीसाठी कोणी अधिकारी आले होते. तपासणीनंतर मला बक्षीस म्हणून एक वही मिळाल्याचे आठवते.

घरी मात्र उर्दू, मोडी किंत्ते गिरवणे चालू असे. बालबोधही वाचता येऊ लागले होते. पण मराठी क्रमिक पुस्तके वाचल्याचे आठवत नाही. आमच्या घरात कानडी आणि मराठी या दोन्ही भाषा चालत. पुरंदरदास, कनकदास इत्यादी हरिदासांची बरीच कानडी भजने मला पाठ झाली होती. आमचे घराणे पुरंदरदासाची परंपरा पाळीत असे. वर्षातून एकदा पाच घरांतून भिक्षा मागण्यासाठी आम्हांला पाठविण्यात येई. कपाळाला गोपीचंदन आणि गळ्यात तंबोरा अशा थाटात आम्ही लहान मुले शेजाऱ्यांच्या घरी जाऊन पुरंदरदासाची भजने म्हणत असू. तेव्हा आमचे कोण कौतुक होई ! शेजारी आम्हांला आदराने बसवून आमची भजने ऐकत आणि भिक्षा म्हणून चार पाच रुपये तरी देत.

घरी मराठी भजने म्हणत, त्यात जुन्यातील जुनी आठवण म्हणजे आरत्यांची आहे. लंबोदर पीतांबर फणीवरबंधना, दुर्गे दुर्घटभारी तुजविण संसारी, उठोनिया प्रातःकाळी, शेषाचल अवतार तारक तू देवा, विडा घ्या हो नारायणा, तू माझा यजमान रामा, ही भजने आणि आरत्या आठवतात. संस्कृतमध्ये राघवेंद्रस्तोत्र, मध्वविजय, आणि क्वचित् विष्णुस्तोत्र ही कानावरून जात. पण संस्कृतचा पद्धतशीर अभ्यास असा झालाच नाही. रामायण, महाभारत आणि भागवत यांतील गोष्टी मात्र बऱ्याच माहीत झाल्या होत्या.

आमच्या कोडंगलच्या सुखी आणि संतुष्ट जीवनात एक महाभयंकर प्राणी शिरला. तो म्हणजे आमचा खाजगी शिक्षक विनायकराव. हा पुणे-मुंबईकडचा सेवानिवृत्त शिक्षक असावा. वडिलांनी त्याला कोठून पकडून आणला होता कोण जाणे ! 'एका वर्षात इंग्रजी तिसरे पुस्तक मुले वाचू शकतील असे करीन' असे त्याने वडिलांना वचन दिले होते. वडिलांनी घराशेजारी त्याला एक खोली घेऊन दिली. विनायकरावाचे जेवणखाण आमच्याकडेच असे.

आम्ही चार भावंडे होतो. मी आणि माझे बंधू बिंदुमाधवराव आणि आमचे चुलत भाऊ व्यंकोबराव आणि सीताराम. घराशेजारीच असलेल्या केशवस्वामीच्या देवळात प्रशस्त जागा होती. तेथे आमचे शिक्षण चाले.

शेजारपाजारची मुलेही शिकण्यासाठी तेथे जमत असत.

विनायकराव हा पन्नास-पंचावन्न वर्षांचा होता. त्याचा चेहरा उग्र होता. त्याने झुबकेदार मिशा आणि कल्ले राखले होते. त्याच्याइतका मारहाण करणारा शिक्षक मी आयुष्यात पाहिला नाही. लहानसहान गोष्टीवरून तो आम्हा मुलांना वेदम झोडपून काढी. रेघा ओढण्याचे लाकडी रूळ दोन्ही पायांच्या मध्ये घालून आणि मुलांचे हात बांधून तो त्यांना जमिनीवर उताणे पाडीत असे. त्याने आमचे इंग्रजी चांगले करून दिले. पण गणिताकडे अगदी दुर्लक्ष केले. विनायकरावाच्या मारहाणीची आम्ही विलक्षण धास्ती घेतली होती. रात्री झोपेतसुद्धा आम्ही दचकून जागे होत असू. बरे, या सर्व गोष्टी वडिलांपाशी सांगण्याची सोय नव्हती. जितका मार जास्त बसेल तितकी विद्या चांगली येईल अशी त्यांची समजूत होती! पण आई मात्र या दुःखाने कळवळून जाई. विनायक-रावाच्या विनाकारण मारहाणीचे एकच उदाहरण सांगतो. त्यावेळी आम्ही बोरूच्या लेखण्या वापरीत असू. लेखण्या तयार करून चाकूने त्यांची टोके व्यवस्थित करण्यात येत. मोडी कित्त्यासाठी लेखण्या वेगळ्या, आणि उर्दूसाठी वेगळ्या असत. एकदा वडिलांनी मला एक पेन घेऊन दिली. तिचे मला कोण कौतुक! ती सर्वांना दाखवीत मी फिरलो. पुढे दुपारच्या जेवणाची वेळ झाली. ती पेन ठेवावी कुठे हा विचार मला पडला. आम्हा मुलांना स्वतंत्र पेट्या, कपाटे किंवा कोनाडे यांपैकी काहीही नव्हते. शेवटी माझा धाकटा भाऊ गुरुमध्व याच्या पाळण्यात बिछान्याखाली मी ती पेन ठेवली आणि जेवायला गेलो. त्या दुष्ट शिक्षकाने ती पेन उचलून आपल्या खिशात घातली. आमची जेवणे आटोपली. मी तृप्त मनाने पोटावर हात फिरवीत सोप्यावर आलो. तेथे विनायकराव आला. त्याने मला विचारले, ‘ पेन कुठे आहे ? ’ मी घाबरून भावाच्या पाळण्यात पेन शोधू लागलो. ती मला कशी सापडावी ? इतक्यात विनायकराव जवळ आला. त्याने खाडकन् माझ्या थोबाडीत लगावली आणि पेन माझ्या हाती देऊन मला म्हटले, ‘ पेन पुन्हा हरवू नकोस. ’ भरल्या पोटावर मला थोबाडीत बसली. मी तिरमिरी येऊन खाली जमिनीवर पडलो. आजही त्या प्रकाराची आठवण झाली की अंगाचा तिळपापड होतो.

माझ्या आईला हे अगदी सहन होत नसे. पण करते काय ? तिला गप्प बसणे भाग होते. पण एक दिवस मात्र कहर झाला. आम्ही केशवस्वामीच्या देवळात शिकत बसलो होतो. शाईचे लहान मडके मध्ये ठेवले होते. त्या काळी शाई विकत घेत नसत. घरीच तयार करीत. त्यात बरेच प्रकार मिसळत असावेत. कारण शाई काळी असली तर काळीभोर, निळी असली तर चमकदार

असावी, अशी काळजी घेण्यात येई. माझे बंधू बिंदुमाधवराव हे पलीकडचे कागद घेण्यासाठी म्हणून ओणवे झाले. तोच त्यांच्या धक्क्याने शाईचे मडके उलटले आणि शाई सांडली. अजून माझे बंधू ओणवेच होते. विनायकरावाने त्यांच्यावर छड्यांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. त्याला डोळ्यांत खून चढल्यासारखा झाला, आम्ही घाबरून पाहत होतो. माझे बंधू तसेच जमिनीवर पडले तरी मास्तराच्या छड्या थांबेनात. याच वेळी माझी आई शेजारच्या विहिरीवरून पाणी घेऊन चालली होती. तिने ते दृश्य पाहिले. एक शब्द न बोलता ती घरी गेली. तिने माझ्या मामाला सगळी हकीकत सांगितली. तो चवताळून देवळात आला. त्याच्या हातात वस्तरा होता. येताक्षणीच त्याने मास्तराला हाताने धरून ओढले आणि खडसावून विचारले, 'बोल, लेकरांना का मारतोस ?' मामाने वस्तरा काढून मास्तराच्या नाकावर ठेवला आणि म्हटले, 'याद राखून ठेव, पुन्हा मुलांना मारशील तर ! तुझे नाक कापून टाकीन, आणि खबरदार, ही हकीकत मोठ्या साहेबांना (माझ्या वडिलांना) सांगितलीस तर.' मास्तर नुसता थरथर कापत होता. मामाने त्याला एक धक्का दिला आणि तो निघून गेला. त्या दिवशी आम्हा मुलांना झालेला आनंद अवर्णनीय होता. भली खोड मोडली मास्तरची म्हणून आम्ही आनंदाने घरात सारख्या उड्या मारीत होतो !

विनायकराव मास्तराच्या सवयीही चांगल्या नव्हत्या. चोरून साय खाण्याची त्याला सवय होती. आमच्या घरी दूधदुभते भक्कम असे. न्हाणीघरात पाणी तापवीत तेथेच विस्तवावर दूध तापविण्याची भांडी ठेवलेली असत. थंडीच्या दिवसांत चुलीच्या समोर शेकण्यासाठी म्हणून हा मास्तर बसे आणि कोणी पाहात नाही असे पाहून चक्क दुधातली साय गिळंकृत करीत असे. आई नेहमी आमच्या नावाने ओरडे की, तुम्हांला घरात काय कमी पडते म्हणून तुम्ही साय चोरून खाता ? आम्ही सांगत असू की आम्ही साय खाल्ली नाही. पण आईचा आमच्या बोलण्यावर विश्वास बसेना. योगायोग असा की एक दिवस आई न्हाणीघरात जायला आणि मास्तरने साय उचलून तोंडात टाकायला एकच गाठ पडली. आईने पाहिले तो मास्तरच्या झुबकेदार मिशांना साय लोंबकळत होती. आई गप्प बसली. पुढे वडिलांच्या कानावर या गोष्टी गेल्या. पण ते गुरकावून म्हणाले, 'खाऊ द्या त्याला हवी तितकी साय. खबरदार, मास्तरांना कोणी काही बोलता कामा नये.'

मास्तराची आम्हांला किती दहशत बसली होती याचे आणखी एक उदाहरण सांगतो. इ. स. १९१८ मध्ये माझे बंधू बिंदुमाधवराव यांचे लग्न

ठरले. त्यावेळीं त्यांना दहावे वर्ष लागले होते. ऐन लग्न लागण्याच्या दिवशी सकाळी मी कोठीघरात होतो. फराळाची पातेली भरली होती. इतक्यात माझे बंधू खोलीत आले. पीतांबर, शेला, अंगभर अलंकार असा त्यांचा थाट होता. पण चेहरा मात्र भीतीने पांढरा फटफटीत पडला होता. मी म्हटले, 'अरे, आज तुझे लग्न आहे. मग तू असा भेदरला का आहेस ?' यावर ते म्हणाले, 'अरे, त्या दुष्ट मास्तराने वेसनाचे लाडू खायला मागितले आहेत. लाडू लवकर आणून दे, नाही तर तुला बेदम मारतो म्हणतो आहे. लवकर लाडू दे बाबा, एकदा नेऊन त्याच्या समोर ठेवतो.'

असा हा मास्तर. आम्ही कोडंगल सोडून गेल्यावर त्याचा आणि आमचा संबंध सुटला. तो पुढे कुठे कुठे भटकला कोण जाणे ! इ. स. १९२४ मध्ये वडील परंड्यास (उस्मानाबाद जिल्हा) होते. माझा धाकटा भाऊ गुरुमध्व (जन्म १९१७, मृत्यू १९४४) याला वडिलांनी माझ्या आईचे मावसभाऊ धारुरचे (बीड जिल्हा) देशपांडे यांच्याकडे शिक्षणासाठी म्हणून काही दिवस ठेवले. धारुरला देशपांड्यांच्याकडे हाच विनायकराव मास्तर खाजगी शिक्षक म्हणून लागला होता. माझ्या बंधूंना त्यानेच शिक्षण दिले. पण त्यापायी त्यांचे विलक्षण हाल केले. बाराखड्या काढायला शिकविताना तो बंधूंना विस्तवाचा चटका देई, तर कधी शेंडी उपटी. तर कधी विहिरीच्या तोंडाशी नेऊन त्यांना आत ढकलू पाही. माझा भाऊ घरी आला तेव्हा तो अगदी मरू पडलेला दिसला. साध्या साध्या गोष्टीने तो भेदरल्यासारखा होई. मी त्याला बाराखड्या काढण्यास सांगितले की तो म्हणे विस्तवाचा काढू, का विहिरीत ढकलण्याचा म काढू, का खोड्यात अडकल्याचा क काढू ? मला त्याचे बोलणे समजेना. मग त्याने मला सांगितले, 'ग शिकविताना विनायकराव मास्तरने येथे डागण्या दिल्या, म शिकविताना मला विहिरीत ढकलण्यासाठी तो मला घेऊन गेला, क शिकविताना त्याने मला खोड्यात अडकवून ठेवले' तेव्हा मला त्याच्या बोलण्याचा उलगडा झाला. धारुरकर देशपांड्यांना माझ्या भावाचे हाल बघवेनात. त्यांनी वडिलांना पत्र लिहिले की 'तुम्हांला मुले जास्त झाली असली तर हा मुलगा आम्हांला दत्तक द्या. पण या कसाब मास्तरच्या हवाली त्याला करू नका' शेवटी वडिलांनी भावाला धारुरहून बोलावून घेतले.

आज शिशुविहार आणि प्राथमिक शाळा यांमधून फुलपाखरांप्रमाणे आनंदाने बागडणारी मुले पाहिली की मला अत्यंत समाधान वाटते. ही पिढी किती भाग्यवान आहे असे वाटू लागते. आणि आमच्या लहानपणाच्या मारहाणीचे प्रकार आठवले की अजूनही अनावर असा क्षोभ होतो. ते दिवस गेले. पण

आठवणी मात्र कायमच्या राहिल्या आहेत.

माझ्या आईला एक भाऊ आणि एक बहीण ही भावंडे होती. माझी मावशी आंबेजोगाई (बीड जिल्हा) जवळ ढिगूळ म्हणून गाव आहे तेथील देसायांच्याकडे दिली होती. तिला मी फार उशीरा पाहिली. पण माझे मामा आणि आजोबा (आईचे वडील) यांना मात्र मी माझ्या वयाच्या पाचव्या वर्षापासून पाहात आलो. माझे आजोळ वडगाव, तालुका केज, जिल्हा बीड. तेथे माझ्या आजोबांची पन्नास एकर शेती होती. माझी आजी (आईची आई) ही नात्याने आजोबांची मामेबहीण लागत होती. वडगावला बापूसाहेब काटे म्हणून सधन आणि सुखवस्तू गृहस्थ होते. त्यांची ती मुलगी.

लग्नानंतर माझी आई आपल्या भावाला, माझ्या मामाला शिक्षणासाठी म्हणून गुलबर्ग्यास घेऊन आली. त्यावेळीं मामाचे वय चौदा-पंधरा वर्षांचे असावे. त्याला मोडी आणि बाळबोधही लिहिता येत होते. पण त्याला उर्दू शिकवून कामाला लावावा अशी वडिलांची इच्छा. त्यांनी गुलबर्ग्याला एक मौलवी उर्दू शिकविण्यासाठी म्हणून लावला. मामाने उर्दू शिकण्याचा प्रयत्न केला. पण त्याला ते काही जमेना. आणि मौलवी हाही एक भयंकर प्राणी होता. लहानसहान गोष्टीवरून तो मामाला विलक्षण मारहाण करी. मामाला पुढे पुढे हे अतिशय असह्य झाले. एक दिवस त्याने मास्तरच्या बसण्याच्या जागेवर एक खड्डा खणला. त्यात काटेकुटे भरले. खड्ड्यावर सतरंजी अंथरली आणि तो स्वतः बाजूला उभा राहिला. मौलवी साहेब आले. सतरंजीवर बसताच ते खड्ड्यात अडकले. काटे बोचू लागलेले पाहून ते हैराण झाले. इतक्यात मामाने वेताच्या छडीने मौलवीसाहेबांना बेदम झोडपून काढले. मौलवीसाहेब आरडाओरडा करीत घरातून पळून गेले. त्यावेळीं माझे वडील कचेरीला गेले होते. ते परत आले की आपली शंभर वर्षे भरली हे मामाने ओळखले. वडिलांच्या भीतीने मामा घरातून पळाला. हा पंधरा-सोळा वर्षांचा मुलगा दीडशे मैल पायी चालून वडगावला आपल्या घरी पोहोचला. तो पुढे चार-पाच वर्षे तरी आमच्याकडे आलाच नाही.

कोडंगलला मी मामाला पाहिला. तो काहीच काम करीत नसे. खावे-प्यावे आणि दिवसभर इकडे तिकडे चकाट्या पिटीत फिरावे हाच त्याचा कार्यक्रम असे. माझी आजी (आईची आई) वारली होती. घरात माझे आजोबा आणि मामा हे दोघेच असत. त्यामुळे ते मधून मधून आमच्याकडे येऊन राहात.

माझ्या मामाचे गुणही चांगले नव्हते. त्याला पुढे वेश्यांचा नाद लागला. नाटके, गाणी यांचाही त्याला शौक होता. त्यावेळी मला कळत नव्हते. पण

आमच्या घरात एक हृदयद्रावक प्रकार घडला. त्याच्या मुळाशी माझा मामा होता असा सामान्य समज होता.

विजापुरापासून बारा मैलांवर कारजोळ म्हणून गाव आहे. हे गाव पेशवाईत तेथील देशपांड्यांना जहागीर म्हणून मिळाले. माझी पणजी या घराण्यातील होती. इ. स. १८२२ मध्ये माझे पणजे आनंदपंत यांना कारजोळ गावात जहागिरदारांनी इनाम जमिनी दिल्या आणि तेव्हापासून ते कारजोळला स्थायिक झाले. कारजोळच्या देशपांडे घराण्याशी आमचे चार पिढ्यांपासून विवाहाचे संबंध आहेत. व्यंकटराव देशपांडे यांना माझी आत्या दिली होती. उलट व्यंकटरावांची बहीण ही माझी सावत्र आई. माझी आत्या वारल्यावर व्यंकटरावांनी दुसरे लग्न केले. या संबंधापासून झालेली मुलगी माझे चुलत बंधू व्यंकोबराव यांना दिली आहे.

माझी सख्खी आतेबहीण भागीरथी ही बालविधवा होती. तिची आई वारल्यानंतर ती आमच्याकडे राहात असे. तिचे वय पंचवीस एक वर्षांचे असावे. ती स्वभावाने अतिशय गोड आणि मनमिळावू होती. माझे तर ती फारच लाड करी. एके दिवशी ती आजारी पडली. त्या दिवसापासून ती माडीवरच्या एका खोलीत झोपू लागली. मी चौकशी केली तर मला सांगण्यात आले की भागीरथी आजारी आहे. तिला कोणी त्रास द्यावयाचा नाही. तिला भेटण्याची माझी चुळबुळ चालली होती. शेवटी एक दिवस मी सर्वांची नजर चुकवून माडीवर गेलो. पाहातो तो ती एका कोपऱ्यात सतरंजीवर बसली होती आणि शून्य मनाने समोर पाहात होती. माझी चाहूल लागताच ती केवढ्याने तरी दचकली. मला पाहताच तिला धीर आला. तिने मला पाहून क्षीण हास्य केले. पण तिची भेदरलेली नजर, आज त्या गोष्टीला पन्नास वर्षे झाली तरी मला सारखी दिसते आहे. मी तिला हाक मारली 'भागीरथी.' ती काहीच बोलली नाही. फक्त खुणेने तिने मला परत जाण्यास सांगितले. मी तिचा इतका लाडका. पण तिने मला जा म्हणून सांगावे का? मला अतिशय दुःख झाले. आणि एके दिवशी आम्हांला सांगण्यात आले, की भागीरथी मेली. आम्ही भावंडे घाईघाईने माडीवर गेलो. भागीरथी मरून पडली होती. ती एका कुशीवर होती. तिचे हातपाय अस्ताव्यस्त पसरले होते. तिच्या तोंडातून पाणी गळले असावे. कारण जमिनीवर पाणी पसरले होते. आम्हांला ते दृश्य पाहवेना. आम्ही सुन्न होऊन खाली आलो. भागीरथी गेली. पुढे मी मोठा झाल्यावर काय प्रकार घडला हे मला समजले. भागीरथीचा मामाशी अनैतिक संबंध जडला होता. तिला दिवस गेले होते. त्यामुळे आजाराचे निमित्त करून ती माडीवरच्या खोलीत पडून राहू

लागली. मला वाटते, मामाने तिला गर्भपाताची औषधे खाऊ घातली. पेरू, पपया अशी उष्ण फळेही तिने खूप खाल्ली असावीत. यातूनच तिला दुखणे येऊन तिचा अंत झाला. आमच्या वडिलांचा स्वभाव या बाबतीत अतिशय कडक होता. त्यांना हा प्रकार कळला असता तर त्यांनी मामाचा खूनच केला असता. म्हणून त्यांच्या कानावर या गोष्टी कोणीच पडू दिल्या नाहीत. मामा घर सोडून पळून गेला तो बरेच दिवस आला नाही. मला वाटते, वडिलांना पुढे कित्येक वर्षांनी ही हकीकत कळली. भागीरथीची आठवण झाली की अद्याप पोटात कसे पीळ पडल्यासारखे होते. स्त्री-जन्मा, ही तुझी कहाणी !

लहानपणी मी अशक्तच असे. माझी प्रकृती उष्ण असल्यामुळे, अंगावर फोड येणे, अशी लहानसहान दुखणी चालू असत. मनगटाला एक गळूवजा फोड झाला होता, त्याची खूण अद्याप शिल्लक आहे. माझा स्वभावही बराच हट्टी असावा. आईच्या म्हणण्याप्रमाणे मी तिचे दूध तब्बल चार वर्षांचा होईपर्यंत प्यालो. याला कारण म्हणजे माझ्या पाठीवर एक मुलगी झाली होती ती वारली. माझे दूध सुटावे म्हणून आईने पुष्कळ प्रयत्न केला. पण काही उपयोग होईना. शेवटी मी दूध पिण्याचा हट्ट करतो हे पाहून ती आपल्या छातीला लोणची फासू लागली. ती तिखट लोणची तोंडात जाऊन मी ओरडू लागलो आणि मग माझे दूध हळुहळू सुटले. अशक्त प्रकृतीमुळे मी दांडगाईचे खेळ टाळीत असे. पण विटीदांडू, आंधळी कोशिंबीर, भोवरे फिरविणे, पतंग उडविणे, हे खेळ मला आठवतात. खो खो, हुतुतू, झाडावर चढणे हे खेळ आठवत नाहीत. होळीच्या सणात लाकडे आणि गोवऱ्या चोरण्यासाठी गेल्याचे आठवते. आणि काही अश्लील शिव्या आणि गाणी आठवतात. अर्थात् त्यावेळी त्या शिव्यांचा आम्हांला अर्थ कळत नव्हता.

कोडंगलला असताना आमच्या मास्तरानी हैद्राबादेहून फुटबॉलचे पार्सल मागविले. त्यांनी वडिलांना आधी कळविले नव्हते. त्यामुळे फुटबॉल, पंप आणि रबराची पिशवी पाहून वडील गोंधळले. दुमडलेला फुटबॉल पाहून त्यांना वाटले की ही साहेबाची हॅट असावी. मास्तरांनी खुलासा केल्यावर त्यांचे समाधान झाले. त्या दिवशी आम्ही प्रथमच फुटबॉल खेळलो. तेव्हा तो पाहण्यासाठी लोकांची गर्दी जमली होती.

आमच्या घरात खुर्च्या नव्हत्या, टेबले नव्हती, कपाटेही आठवत नाहीत. सोप्यावर सतरंज्या, लोड हे ठेवलेले असत. वडिलांनाही स्वतंत्र खोली होती असे वाटत नाही. बायकांचे व्यवहार माजघरात आणि पुरुषांचे सोप्यावर असत. गिरणीचा तांदूळ वापरीत नसत, घरी मोलकरणींना बोलावून साळी कांडून घेत.

मोठ्या उखळात साळी घालून बायका मुसळांनी कांडीत; त्यावेळीं त्या गाणी म्हणत, त्याची आम्हांला गंमत वाटे. काम आटोपून बायका परत चालल्या की त्या ओच्यात तांदूळ लपवून तर नेत नाहीत ना म्हणून त्यांची झडती घेत. ज्वारी आणि गहू घरातच दळून घेत. आई जात्यावर बसली म्हणजे मी तिच्या-जवळ बसत असे. आणि आमच्यावर ओव्या म्हण म्हणून तिच्या मागे लागत असे. आम्हांला त्यावेळीं काव्य म्हणजे काय हे ठाऊक नसे. पण आईने ओवीतून " माझा ग सेतूराव आहे ग मोठा शहाणा " असे म्हटले की आम्हांला कोण आनंद होई !

माझी बहीण सीताबाई हिला लहानपणी पायाला इसब झाले होते; ती रात्री मोठ्याने रडत असे. घरचे लोक कातावून जात. मग तिला भीती दाखवून गप्प करण्यासाठी आमचा मामा अस्वलाचे सोंग घेऊन येई आणि मग सीताबाई घाबरून गप्प होई. आमच्या घरी वर्तमानपत्रे येत नसत. करमणूक म्हणून वडील मंडळी दशावताराचे गंजिफे खेळत. दिवाळीत सोंगट्यांचा डाव चाले. मुली गजगे आणि गुंज्या खेळत. आम्हीही त्यात भाग घेत असू. घरात व्रते, वैकल्ये, सण, वार, अनुष्ठाने, पुराण-कथन इत्यादींची गर्दी असे. बाहेर केशवस्वामी, मारुती, क्वचित् बाहेरगावी जुटपल्लीचा राम, यांची दर्शने हे आमचे भाविक जीवन होते. आम्हांला वीज, टेलिफोन, वर्तमानपत्रे, राष्ट्रीय चळवळी, महायुद्ध, चहा, कॉफी, साबण, फर्निचर, गिरणीचे दळण, केक, पेस्ट्री, पावरोटी, इत्यादींचा पत्ता नव्हता. पण दूध, फराळाचे जिन्नस, पक्वान्ने इत्यादींची चंगळ होती. आज ते दिवस आठवले म्हणजे मनात कोठे तरी कढ येताहेत असे वाटते.

इ. स. १९१८ मध्ये माझे वडील बंधू बिंदुमाधवराव यांचे लग्न कोडंगलला झाले. त्यांना त्या वेळी दहावे वर्ष चालू होते. आमच्या शेजारी कोडंगलचे देशपांडे हणमंतराव राहात होते. त्यांची मुलगी सुभद्रा ही सात वर्षाची होती. तिच्याशी बंधूंचा विवाह झाला. मला त्यावेळीं आठवे वर्ष लागले होते. माझी मुंजही त्याच वेळेस झाली.

आमच्या बंधूच्या लग्नाचा थाट काय वर्णावा ! तो समारंभ एक महिनाभर चालला होता. या निमित्ताने वडिलांनी कमीत कमी पाच हजार रुपये तरी (म्हणजे आजचे पंचवीस हजार म्हणा ना) खर्च केले असावेत. तालुक्याचे तहसीलदार (मामलेदार) आणि पोलीसचे इन्स्पेक्टर ही मुसलमान मंडळी शामियाने आणि लग्नमंडप उभारण्याच्या कामी सारखी झटत होती. विवाहाच्या आठवड्यात तर वडिलांनी गावजेवणी दिली. कुणाला घरात स्वयंपाक करू दिला नाही. आम्ही मुले तर महिनाभर नुसत्या उनाडक्या करीत होतो. माझ्या

मामाला नाटके पाहण्याचा नाद असे. त्याने मला सौभद्रातील काही गाणी शिकविली. मला परिचित झालेले पहिले मराठी नाटक म्हणजे सौभद्र होय. माझ्या बंधूंना चिडविण्यासाठी मी सैाभद्रातील गाणे ‘ बघुनि सुभद्रेला यति कसा वेडावुनि गेला ’ हे म्हणत असे. याशिवाय ‘ पायि खडावा चटचट वाजे ’, ‘ अरसिक किती हा ग शेला ’, ‘ पांडुनृपति जनक जया ’ ही गाणी मी मामाच्या नादाने गुणगुणण्यास शिकलो. शारदा नाटकातील पदेही त्यावेळीं मी म्हणत असावा. ‘ म्हातारा इतुका न ’, ‘ बघुनि त्या भयंकर भूता ’, ‘ रडशि काय म्हणुनि अशी ’, ‘ सुंदर खाशी सुबक ठेंगणी ’ ही पदे मला आठवतात. भोजनाच्या वेळीं मामाने मला एक कविता म्हणण्यास सांगितली ती आज पन्नास वर्षांनीही आठवली की हसू येते, ती कविता अशी :

गणपती तुझी सोंड वाकडी
शारदे तुझे नाक फाकडे
उंदिरा तुझे शेपूट गुंतले
मांजरा तुझे काम साधले

ही काय कविता म्हणायची ! पण त्यावेळीं मला कोण कौतुक वाटे.

लग्नात वडिलांनी हैदराबादेहून कलावंतिणी बोलविल्या होत्या. आठपंधरा दिवस लग्नमंडपात त्यांचे गाणे-बजावणे होई. अधिकारी आणि प्रतिष्ठित मंडळी जमत. माझे बंधू कपडेलत्ते, अलंकार घालून बैठकीला हजर राहात. गाणे-बजावणे आम्हांला काही समजत नसे. पण कलावंतिणींचे चेहरे मला अद्याप आठवतात. लग्नात सगळे कार्यक्रम थाटाचे झाले. आई तर सोन्यामोत्याच्या अलंकारांनी मढली होती. गोठ, तोडे, पाटल्या, बुगडी, नथ, सोन्याच्या कळ्या, सोन्याचे हार, कंबरपट्टा, असे एक की दोन किती म्हणून दागिने सांगावेत ! रुखवत, रासन्हाणी, व्याहीभोजने, वरात, साडे, वधूवरांच्या आंघोळी, उटणी, सुपारी मुठीत धरून बसणे, उखाणी असे किती म्हणून कार्यक्रम सांगावे ! उखाण्यात माझ्या बंधूंचा “ भाजीत भाजी मेथीची सुभद्रा माझ्या प्रीतीची ” हा उखाणा मला आठवतो. माझी मुंज झाल्यावर माझ्या झुलपाची सुवर्णफुले गेली, त्याऐवजी शेंडी आली. गळ्यात जानवे आले, लंगोटी आली, संध्या आली आणि संध्येचा ब्राह्मण आला.

बंधूंच्या लग्नापर्यंत आईने काही व्रते पाळली होती. मोठ्या मुलाचे लग्न होईपर्यंत आया ती पाळतात. ती चौरंगावर बसत नसे, कार्ल्यांच्या वेलीच्या मांडवाखालून जात नसे. भाताची पेज वाहात असली तर ओलांडून जात नसे, हिरवी साडी नेशीत नसे, हिरव्या बांगड्या घालीत नसे, अगदी शुक्रवारच्या

कहाणीतील पुरोहिताच्या बायकोप्रमाणे ती वागत होती. विवाहसमारंभात आईच्या विहिणीने तिचा थाटाचा सत्कार करून व्रताची सांगता करविली. तिला चौरंगावर बसविली, काऱ्ल्याच्या मांडवाखालून नेली, भाताची पेज ओलांडण्यास लावली, हिरवी वस्त्रे आणि हिरव्या बांगड्या यांचा आहेर केला. या प्रसंगी माझ्या आजीने शुक्रवारची कहाणी मला सांगितली. तिची आठवण अद्याप ताजी आहे.

बंधूंच्या विवाहानंतर वडिलांनी ठरविले की पुढील शिक्षणासाठी आम्हा भावंडांना हैदराबादेस ठेवावे. आम्हांला आनंद झाला. त्याचे मुख्य कारण म्हणजे आमच्या भयंकर मास्तराची आणि आमची संगत सुटणार होती. इ. स. १९१८ चा जून महिना असावा. हैदराबाद शहर मी, प्रथमच पाहिले. त्या वेळची एक आठवण म्हणजे सार्वजनिक उद्यानात (त्याला बागे आम म्हणत) ठेवलेली जनावरे पाहिल्याची आहे. हैदराबादेत मी, माझे बंधू, धाकटी काकी, तिची मुले असे आम्ही बिऱ्हाड केले. चादरघाट हायस्कूलच्या फर्स्ट फॉर्म (इंग्रजी तिसरी) मध्ये आम्हांला घालण्यात आले. शाळेचा हेड-मास्तर इंग्रज होता. तो अतिशय उंच होता. आयुष्यात मी प्रथम पाहिला तो हाच इंग्रज असावा.

आम्ही हैद्राबादेत महिनापंधरा दिवसांच्या वर राहिलो नाही. वडिलांची बदली गुलबर्ग्यास झाली. गुलबर्गा हे प्रांताचे मुख्य ठाणे असल्यामुळे तेथे बऱ्याच शाळा होत्या. त्यामुळे हैदराबादेस वेगळे बिऱ्हाड ठेवण्याचे कारण उरले नाही.

वडील गुलबर्ग्याला जाऊन कामावर रुजू झाल्यावर आम्ही भावंडेही गुलबर्ग्यास आलो. तो १९१८ चा जुलै महिना असावा. मला आठवे वर्ष संपत आले होते. गुलबर्ग्यात मात्र बाह्य जगाशी माझा प्रथमच संबंध येऊ लागला.

२

गुलबर्गा
१९१८ ते १९२१

आम्ही गुलबर्ग्यास आलो तो महिना इ. स. १९१८ चा जून-जुलैचा असावा. गुलबर्गा हे सोलापूर जिल्ह्याला लागून असून, दक्षिणच्या इतिहासात गाजलेले शहर आहे. इ. स. १३५० पासून १४२४ पर्यंत हे शहर बहमनी घराण्याचे राजधानीचे ठिकाण होते. खानदेश सोडून सध्याचा संपूर्ण महाराष्ट्र, तेलंगणचे दहा आणि कर्नाटकचे पाच सहा जिल्हे इतक्या भागावर बहमनींचे राज्य पसरले होते. हे पाहता गुलबर्गा शहराचे महत्त्व लक्षात येईल. गुलबर्ग्याचा किल्ला आणि किल्ल्यातील मशीद ही अतिशय प्रेक्षणीय आहेत.

हिंदुस्थानात मुसल्मानांच्यात अनेक संतमहात्मे होऊन गेले. त्यांपैकी प्रख्यात म्हणजे अजमीरचा मुइनुद्दीन चिश्ती, दिल्लीचा निजामुद्दीन औलिया (१२६५ ते १३२४) आणि गुलबर्ग्याचा बंदेनवाज गेसूदराज (१३२४ ते १४२४) हे होत. या संतांच्या पुण्यतिथीला अद्याप लाखो यात्रेकरूंची गर्दी होते. गेसूदराज म्हणजे लांब केश. बंदेनवाजने केस लांब राखले होते म्हणून त्याला ते नाव

पडले. बंदे नवाज हा मूळचा दिल्लीचा. निजामुद्दीन औलिया याचा शिष्य नसीरुद्दीन चिराग देहलवी (मृत्यू १३५०) याचा हा शिष्य होय. तैमूर-लंगाच्या आक्रमणानंतर त्याने दिल्ली सोडली आणि तो गुलबर्ग्यास येऊन स्थायिक झाला. या सूफी संताने जवळ जवळ शंभर ग्रंथ लिहिले. त्यांपैकी त्र्याहत्तर ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्याचा 'असमाऊल असरार' हा ग्रंथ म्हणजे सुफी पंथाचा मार्गदर्शक ग्रंथ होय. मात्र अनेक सूफींच्याप्रमाणे तो अद्वैती नव्हता. इब्ने अरबीच्या अद्वैत मतांवर त्याने कडाडून हल्ला चढविला आहे. बंदे नवाजने काही ग्रंथ उर्दू भाषेत लिहून काढले आहेत. उर्दू गद्यरचनेचा तो पहिला प्रवर्तक होय.

बंदे नवाजच्या मृत्यूनंतर त्याचे महत्त्व अधिकच वाढले. अनेक बादशहांनी त्याच्या वंशजांना जहागिऱ्या दिल्या. बंदे नवाजच्या दर्ग्याचे आणि मठाचे उत्पन्न वार्षिक दोन लाखांच्यावर आहे. संभाजी राजांचा वध केल्यानंतर औरंगजेबाने बंदे नवाजच्या मठाला दानधर्म म्हणून दहा हजार रुपये पाठवून दिले. इतका या मठाबद्दल त्या बादशहाला आदर होता.

साहजिकच गुलबर्ग्याला मुसल्मानांची वस्ती बरीच होती. शिवाय ते शहर हे सुभ्याचे ठिकाण होते. सुभेदार, (कमिशनर), तालुकदार (कलेक्टर) यांच्या कचेऱ्या तेथे होत्या.

गुलबर्ग्याला वडिलांनी ब्रह्मपुरीत म्हणजे ब्राह्मण आळींत घर घेतले होते. आम्ही गुलबर्ग्याला गेल्यावर आम्हांला प्रथम नूतन विद्यालय या खासगी शाळेत बसविण्यात आले. गुलबर्ग्यात त्यावेळीं सार्वजनिक चळवळींना सुरुवात झाली होती. विठ्ठलराव देऊळगावकर आणि केशवराव कोरटकर (हे पुढे न्यायमूर्ती बनले आणि हैद्राबादचे मोठे पुढारी झाले) यांच्या प्रयत्नांनी गुलबर्ग्यात नूतन विद्यालय ही शाळा काढण्यात आली. हैद्राबाद राज्यात जी पुढे जागृती झाली ती घडवून आणण्यात नूतन विद्यालय या संस्थेने नाव घेण्यासारखी कामगिरी बजावली आहे. गुलबर्गा जिल्हा हा महाराष्ट्राला लागून असल्यामुळे गुलबर्ग्याचे अनेक तरुण पुण्या-मुंबईच्या शिक्षणसंस्थांतून शिकून तयार झाले होते आणि त्यांच्या द्वारे शहरात चळवळीचे लोण पसरत होते.

ब्राह्मण आळींत लिंगायत पंथीयांचे शरणबसवेश्वराचे मोठे देऊळ, ब्राह्मणांचा सभेशानंद मठ, रामाचे देऊळ, विठोबाचे देऊळ आणि आळीला लागूनच पण गावाबाहेर दत्तात्रेयाचा मठ या धार्मिक संस्था होत्या. राममंदिरात प्रवचने होत. सभेशानंद मठात नेहमी पुराणे, कीर्तने इत्यादींची गर्दी असे. तेथील कितीतरी कार्यक्रम पाहिल्याचे मला आठवतात.

गुलबर्गा १९१८-१९२१

नूतन विद्यालयात मला चवथीच्या इयत्तेत बसविण्यात आले. शिक्षकांत मला देऊळगावकर मास्तर हे आठवतात. शाळेचे मुख्याध्यापक कोणी भोरकर होते. त्यांच्या डोक्यावर पुणेरी पगडी असे. आयुष्यात मी पहिल्याने पगडी पाहिली ती त्यांच्या डोक्यावर. हणमंतराव धारवाडकर हे शिक्षक मी चिंचोळीला असताना होते. ते नूतन विद्यालयात मला पुन्हा दिसले. त्यांच्या आकडेदार मिशांमुळे ते रागीट आणि रुबाबदार दिसत.

नूतन विद्यालयात आम्ही एकदोन महिनेच होतो. त्यानंतर वडिलांनी आम्हांला सरकारी हायस्कुलात घातले. या शाळेचे मुख्याध्यापक, किर्कपॅट्रिक नावाचे इंग्रज गृहस्थ होते. ते उंचीने साडेसहा फूट तरी असावेत. आम्हांला फर्स्ट फॉर्ममध्ये (इंग्रजी तिसरी) बसविण्यात आले.

कोडंगलनंतर आम्हा भावंडांचा आणि कर्दनकाळ मास्तर विनायकराव याचा संबंध सुटला. गुलबर्ग्याला वडिलांनी मदन गोपाळ नावाच्या पंजाबी मास्तराची आमचे खासगी शिक्षक म्हणून नेमणूक केली. हे मास्तर मोठे रंगेल होते. यांची एक रखेली होती. तिचे नाव लक्ष्मी. गोड आणि सदा हसतमुख असा चेहरा आणि हनुवटीला खळी असे तिचे रूप मला आठवते. मास्तर आम्हांला शिकवीत त्यावेळी ती येई ती काहीशी दबकतच. तेव्हा मास्तर सिग्रेटचा धूर सोडीत तिच्याकडे धुंद नजरेने पाहात म्हणत, “लक्ष्मी शरमा रही है, लक्ष्मी लाजते आहे.”

दुपारी आम्ही मास्तरांच्याकडे गेलो की त्यांच्या खोलीचे दार बंद असे. मास्तर आणि लक्ष्मी ही खोलीत असत. आत काय चालले आहे ते दृष्टीस पडावे म्हणून आम्ही दरवाजाच्या फटीतून पाहण्याचा प्रयत्न करीत असू. तो आमचा नेहमीचा चाळा होता. मास्तरांच्यापाशी आम्ही काय शिकलो असू हे परमेश्वरालाच माहीत! पण लक्ष्मी-मदनगोपाळ यांचा प्रणय पाहण्यात आम्हांला आकर्षण वाटू लागले होते हे खास.

मास्तरना आमच्या घरचे साजुक तूप, फराळाचे जिन्नस हे आवडत. आम्ही मास्तरांच्याकडे दोन दोन चार चार दिवस जात नसू. आणि मग मास्तर रागवू नयेत म्हणून आम्ही घरातून खाण्याचे पदार्थ चोरून त्यांच्याकडे घेऊन जात असू. एकदा आम्ही घरातून साजुक तुपाने भरलेले भांडे पळविले. वरच्या माडीवरून आम्ही दोर बांधून भांडे सडकेवर सोडले आणि मास्तरांना नेऊन दिले. मास्तर अशा भेटींनी फार खुश होत आणि मग आम्ही त्यांच्या शिकवणीला बुट्टी देत असू याची विशेष चौकशी करीत नसत. पण एक दिवस हे बेंड फुटले. त्या दिवशी वडिलांचा राग पाहण्यासारखा होता. आम्ही शिक्षकाकडे

जाण्याचे टाळतो आहोत हे त्यांना कळले. आम्ही माडीवर होतो. त्यांनी आम्हांला बोलावू पाठविले. आम्ही तिथे खाली आलो. ओसरीवर काही ब्राह्मण पाहुणे बसले होते. आमच्याकडे शास्त्री, वैदिक, पुराणिक इत्यादी मंडळींची नेहमी वर्दळ असे. केव्हाही पाहा, ओसरीवर दोन चार मंडळी बसलेली असावयाची. यांपैकी काही जण रात्रीच्या जेवणापूर्वी आम्हांला रामायण-महाभारताच्या कथा सांगत. मला आठवते की, एक ब्राह्मण, वेळ असेल त्याप्रमाणे कथा लहान अगर मोठी करून सांगण्यात पटाईत होते. ते आम्हांला विचारीत, 'बोला, किती मिनिटांचे रामायण हवे? दहा मिनिटांचे, की पंधरा मिनिटांचे की अर्ध्या तासाचे ?' आणि आम्ही सांगू त्या वेळात रामायण संपवीत. सुदैवाने आम्हांला वडिलांनी बोलावून आणविले त्यावेळी ते कथाकार ओसरीवर बसले होते. वडिलांनी आम्हांला दरडावताच मी घाबरून खरी हकीकत सांगितली. मला ते मारण्यासाठी हात उगारण्यापूर्वीच कथाकार म्हणाले, "रावसाहेब, याला मारू नका. हा खरे बोलला आहे." वडिलांनी माझ्यावरचा हात आवरता घेतला. माझे वडील बंधू बिंधुमाधवराव यांना शिपायाने धरले होते. ते हिसका देऊन घरातून पळून गेले. ते मध्यरात्रीपर्यंत आले नाहीत. वडिलांच्या तावडीत माझे चुलतबंधू व्यंकोबराव हे सापडले. त्या दिवशी माझ्या वडिलांनी त्यांना अक्षरशः गुराप्रमाणे बडविले. घरात माझी आई आणि काकी रडू लागल्या; पण वडिलांचा राग सरता सरेना. ते गर्जून म्हणाले, 'पोरे मेली तरी बेहत्तर. शिक्षणात टंगळमंगळ करतील तर ते मी सहन करणार नाही.' शिक्षणाबरोबरच आमचे लक्ष्मी-मदनगोपाळ प्रणयाचे ऑडिओ-विज्युअल ज्ञान वाढत होते हे। त्यांना कोणी सांगावे ?

इ. स. १९१८ मध्ये माझी सावत्र बहीण यमनाक्का ही माहेरी आली होती. तिला कोप्पळला (रायचूर जिल्हा) आमच्या नात्यातच दिली होती (वडिलांच्या आतेभावाच्या मुलाला.). असे असूनही तिचा सासरी फार छळ होत असे. एकदा तर तिच्या सासरच्या मंडळींनी तिच्यावर चोरीचा आरोप लादला आणि दिव्य म्हणून तिला कढत्या तेलात हात बुडविण्यास सांगितले. शेजाऱ्यांनी छीः थूः केली म्हणून तिच्यावरचा तो भयंकर प्रसंग टळला. यमनाक्काचा माझ्यावर फार जीव होता. १९१८ मध्ये पहिले महायुद्ध चालू होते. गावात कोणीतरी बातमी उठविली की इंग्रज अधिकारी रिक्रूट भरतीसाठी म्हणून मुलांना पळवून नेतात. त्या दिवशी यमनाक्का अतिशय घाबरली. आम्हा मुलांना शाळेत जाऊ नका म्हणून तिने बजावले आणि या गोष्टीवर ती वडिलांशी भांडली देखील.

माझ्या पायात एकदा काटा मोडला होता. काटा सहज हाताने काढून टाकता आला असता. पण मी तसाच रडत रडत घरी आलो. तो काटा काढण्यास म्हणून यमनाक्का बसली. पण मी तिला काट्याला हात लावू देईना. शेवटी ती माझ्या समाधानासाठी म्हणून बिब्बा, हळद, तेल ही घेऊन आली. तिने माझ्या पायाला बिब्बा लावण्याचे सोंग केले आणि माझे लक्ष नाही हे पाहून तिने माझ्या पायातील, काटा खसकन् काढला. इतका सहज काटा निघावा आणि यमनाक्काने बिब्बा वगैरे लावण्याचे सोंग करावे याचा मला राग आला. माझ्या डोळ्यांत एकीकडे अश्रू तर दुसरीकडे तोंडावर हसू होते. तीही मला कसे बनविले म्हणून हसत होती.

या खेपेस ती सासरी परत गेली ती पुन्हा आली नाही. पुढच्याच वर्षी ती कोप्पळला वारल्याचे कळले. तिचे एकही मूल जगले नाही. तिच्या नवऱ्याने दुसरे लग्न केले, आज त्या गोष्टीला जवळजवळ पन्नास वर्षे होत आली. पण यमनाक्काचे वात्सल्याने भरलेले मोठे डोळे अद्यापही आठवतात आणि मनात खोल रुतलेले दुःख उचंबळून येते.

१९१८ ची इन्फ्लुएंझाची साथ मला चांगलीच आठवते. स्मशानाकडे जाणारी वाट आमच्या घरावरून असे. रोज पाच पंचवीस तरी प्रेते घरावरून जात. आम्ही मुले घाबरून जात असू. मला वाटते याच कारणांनी वडिलांनी ते घर बदलले. आम्ही त्याच आळीत दुसऱ्या घरी राहण्यास गेलो.

इ. स. १९१८ च्या अकरा नोव्हेंबरला पहिले महायुद्ध संपले. आमच्या शाळेतील सर्व मुलांना रांगेत बसवून मिठाईचे पुडे वाटण्यात आले. हे कसले महायुद्ध हे समजण्याचे माझे त्यावेळी वय नव्हते.

आम्हा वैष्णवांत सोवळ्याओवळ्याचे फार प्रस्थ असे. यामुळे कधी कधी मोठ्या हास्यास्पद गोष्टी घडत. आम्ही मुले संध्याकाळीं शाळेतून घरी आलो की दुपारच्या जेवणाचे झाकून ठेवलेले आम्हांला खायला देत. अन्न सोवळ्यात ठेवलेले असे. यामुळे आम्ही आल्यावर आई धाबळ नेसून अन्न काढून देई. एकदा आमच्याकडे लक्ष्मीबाई नावाची लांब नात्यातील बाई आली होती. आई त्या दिवशी काही कामात होती. लक्ष्मीबाईने म्हटले, ‘ बाई, मी मुलांना वाढते ’ असे म्हणून तिने आम्हांला स्वयंपाकघरात नेले. स्वयंपाकघरात तिला कपडे बदलून धाबळ नेसायची होती. पण ऐनवेळी धाबळ दृष्टीस पडेना. आत सोवळ्याचे काय करावे ? तिने पाहिले की आम्ही लहान मुले होतो. तिने चटकन् अंगावरचे लुगडे फेडून टाकले आणि ब्रह्मा विष्णू महेश यांना वाढताना अनसूया जशी दिसली असेल तशी आम्हांला लक्ष्मीबाई दिसली. बाई फार

स्थूल होती. म्हणून लोक तिला मुलुख-मैदान म्हणत. आम्ही असे रूप पूर्वी कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे आम्ही त्या दिवशी घाबरून गेलो. पण लक्ष्मीबाई निर्विकार चेहऱ्याने म्हणत होत्या, ' लहान मुले तुम्ही. तुमच्यासमोर रे कसला संकोच ! '

रायचूर जिल्ह्यात अव्वल कारकून असलेल्या एका कडक वष्णवाची अशीच एक कथा आहे. हे गृहस्थ ऑफिसात काम करीत असताना तहानेने व्याकुळ झाले. ऑफिसमध्ये सोवळ्याची सोय नव्हती. मग पाणी कसे प्यावे ? यामुळे ते तडक घरात गेले. त्यांचे कुटुंब माहेरी गेले होते. ते घरात गेले. आपण केव्हा पाणी पितो असे त्यांना होऊन गेले होते. त्यांनी घराचे दार नुसते लोटून घेतले आणि धाबळ नेसण्यास दम न निघाल्यामुळे ते विवस्त्र झाले व उभे राहूनच गटागटा पाणी पिऊ लागले.

दुर्दैव पाहा, एका गावच्या कुळकर्ण्याचे त्यांच्याकडे काम निघाले. तो ऑफिसात गेला. तेथे त्याला साहेब घरी गेल्याचे कळले; तो त्यांच्या घरावर आला. दार नुसते लोटलेले पाहून त्याने ते ढकलले आणि तो आत आला. तो काय, अव्वल कारकून साहेब नग्नावस्थेत असून उभे राहून तांब्याभर पाणी पीत आहेत. त्याने मागच्या पावलानेच पळ काढला. दुसऱ्या दिवशी ही बातमी गावभर पसरली आणि ऐकणाऱ्यांची हसता हसता मुरकुंडी वळली.

देशातील चळवळींचे पडसाद गावात मधूनमधून उमटत असत. पण आम्हांला त्यांचा पत्ताही नव्हता. पण एकदा-दोनदा भारतीय पुढारी शौकतअली आणि महंमदअली हे गुलबर्ग्याला जात असताना त्यांना पाहण्यासाठी म्हणून मी गेलो होतो. स्टेशनवर तुफान गर्दी होती. माझ्या मामाने मला खांद्यावर बसवून मला अलीबंधू दाखविले. असेच एकदा लोकमान्य टिळक गाडीतून चालले होते. नक्की साल आठवत नाही. त्यांची पगडी घातलेली आणि गाडीच्या खिडकीजवळ बसलेली मूर्ती मला, पुसटपणे का होईना, आठवते. लोकमान्यांचे मला तेवढेच घडलेले दर्शन. ते माझे अवर्णनीय असे स्मृतिधन आहे.

इ. स. १९१९ मध्ये माझी मोठी काकी आपल्या माहेरी वारली. माझ्यावर तिचा फार जीव होता. तिने मला दत्तक घेण्याचा विचार केला होता असे मला नंतर कळले.

गुलबर्ग्याच्या सरकारी हायस्कुलात आम्ही भावंडे तीन वर्षे होतो. इ. स. १९१८ मध्ये मी इंग्रजी तिसरी (फर्स्ट फॉर्म) मध्ये दाखल झालो. त्या वर्षी मी नापास झालो. एकोणीसशे वीसमध्ये मी ती इयत्ता पास होऊन चवथीत गेलो. एकोणीसशे एकवीसमध्ये मी इंग्रजी चवथी पास झाल्यावर ते हायस्कूल सुटले.

शाळेत आम्ही मराठी शिकलोच नाही. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते. इंग्रजी, उर्दू आणि फारसी या भाषा आम्हांला शिकवीत. इंग्रजी आणि इतिहास हे माझे आवडते विषय होते. गणिताचा प्रथमपासूनच मी धसका घेतला होता. त्यामुळेच मी तिसरीत नापास झालो.

गुलबर्ग्याच्या सरकारी हायस्कुलाचा हेडमास्तर हा इंग्रज होता. शिक्षकांत वर्मा हे आम्हांला इंग्रजी आणि इतिहास शिकवीत. ते चांगले शिकवीत असत. पण वर्गात येता जाता झोप काढीत. उर्दू-फारसी शिक्षकांत एक सज्जाद हुसेन आठवतात. मी, माझे बंधू बिंदुमाधवराव आणि चुलत बंधू व्यंकोबराव यांना ते बाळाजी विश्वनाथ, बाजीराव आणि बाळाजी बाजीराव म्हणून हाक मारीत. अशा रीतीने पेशव्यांची नावे प्रथमच माझ्या कानांवरून गेली.

शाळेच्या वार्षिक संमेलनाच्या प्रसंगी करमणुकीचे कार्यक्रम करीत. त्यावेळीं एका नाटकातील एक प्रवेश करण्यात आला होता. तो अद्याप आठवतो. अश्वत्थामा आपले जानवे तोडतो, तो प्रसंग होता. पुढे कित्येक दिवसांनी मला कळले की तो वेणीसंहार नाटकातला प्रवेश होता. कर्णचरित्रावर आधारलेल्या एका नाटकातील काही प्रवेश करण्यात आले होते. मला वाटते त्या नाटकाचे नाव तेजोभंग हे असावे. याच विषयावरील एक नाटक नूतन विद्यालय हायस्कूलच्या मुलांनी केले होते. ते माझ्या पाहण्यात आले. शाळेत राळेरासकर नावाचे एक महाराष्ट्रीय शिक्षक होते. ते वरच्या वर्गांना इंग्रजी शिकवीत. चांगले शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता. विद्यार्थ्यांवर, विशेषतः तरुण आणि देखण्या विद्यार्थ्यांवर त्यांचे फार प्रेम असे. तेजोभंग नाटकातील प्रवेशाच्या तालमी आम्ही त्यांच्या घरात करीत असू, याची मला चांगलीच आठवण आहे.

शाळेतील शिक्षण चांगले होते. माझे इंग्रजी, इतिहास, उर्दू आणि फारसी हे विषय बरे झाले. पण गणितात मी अतिशय कच्चा राहिलो. शाळेत शिस्तही चांगली होती. शाळेत पोहोचण्यास थोडा उशीर झाला की प्रथम हेडमास्तरांच्या ऑफिसमध्ये जाऊन नाव नोंदवावे लागे. नंतर वर्गात प्रवेश मिळे. दुपारच्या मध्यंतरात अशा मुलांना शाळेतील मैदानात एकत्र जमवून त्यांना उन्हात कवाईत करायला लावीत. वर्षातील काही दिवस तरी शाळा सकाळची असे. सकाळीं घरून निघताना आमची कोण तारांबळ उडे! आई आम्हांला लाह्याच्या पिठाचे लाडू करून देई. ते रस्त्यातून खात खात आम्ही शाळा गाठीत असू. शाळेला उशीर झाला तर शाळेला न जाता दिवसभर कोठे तरी रेंगाळत आम्ही घरी परत येत असू. असेच एकदा आम्ही तलावाच्या काठावर रेंगाळत असता आमच्या शाळेतील अग्निहोत्री नावाचे शिक्षक समोरून येताना दिसले. त्यांना

पाहताच आमची घाबरगुंडी उडाली. आम्ही भावंडे एका झाडावर चढून बसलो. मास्तर लांब जाईपर्यंत आम्ही खाली उतरलोच नाही.

शाळेत आम्ही इंग्रजी, उर्दू आणि फारसी शिकत असू; घरात मराठी वाचनाची गोडी मला याच सुमारास लागली. चिपळूणकर आणि मंडळींनी प्रकाशित केलेला महाभारताचा मराठी अनुवाद वडिलांनी विकत घेतला होता. तांबड्या कव्हरचे ते अनेक खंड मला इतकी वर्षे झाली तरी काल पाहिल्या-सारखे आठवतात. भागवताचे मराठी भाषांतर असलेल्या पुस्तकाचे दोन खंड आमच्या घरात होते. वडील ऑफिसातून आले की हातपाय धुऊन अंगणा-तील तुळशीवृंदावनाच्या ओट्यावर बसत. आणि माझ्याकडून महाभारत वाचून घेत. अशा रीतीने भारताची सगळी पर्वे मी माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी वाचून काढली. समग्र भागवत पण मी याच वयात संपविले.

महाभारत आणि भागवत यांचा माझ्या मनावर अतिशय खोल असा परिणाम झाला आहे. महाभारतातील कौरव-पांडवांच्या कथा, अठरा दिवसांचे युद्ध, त्यातील अभिमन्यू, द्रोण, भगदत्त, घटोत्कच, कर्ण, दुःशासन, जयद्रथ, दुर्योधन, इत्यादींच्या वधांची वर्णने, महाभारताची ती संस्कृतप्रचुर प्रौढ आणि वीरश्रीयुक्त भाषा, या सर्व गोष्टींत मी अगदी रंगून गेलो होतो. महाभारताचे ते विश्व म्हणजे रम्य, अद्‌भुत, आणि अवर्णनीय असे होते. ग्रंथातील चित्रेही मला अद्याप आठवतात. अर्जुन सुभद्रेला घेऊन चालला आहे, कर्ण रथाचे चाक काढीत आहे, श्रीकृष्ण परीक्षिताच्या जन्मप्रसंगी प्रकट झाला आहे, असे एक की दोन प्रसंग, शेकडो प्रसंगांची चित्रे माझ्या मनावर कोरलेली आहेत. या वाचनामुळे प्रौढ, प्रगल्भ आणि संस्कृतप्रचुर मराठीची मला नेहमीसाठी गोडी लागली. भारतीय वीरांच्या कथा आवडू लागल्या. आपल्या संस्कृतीबद्दल अभि-मान निर्माण झाला. भागवताची, विशेषतः त्यातील दशम स्कंधाची गोडी काय वर्णावी! आमच्या घरात रामभक्तीपेक्षा कृष्णभक्तीचे महत्त्व अधिक असे. घरात भागवताची नेहमी पारायणे होत. भागवताचे मी कितीतरी वेळा वाचन केले आहे. आमच्या घराजवळच सभेशानंदाचा मठ होता. तेथे एक पुराणिक भागवत सांगत. त्यांची वर्णनशैली मोठी आकर्षक असे. मी त्यांचे पुराण ऐकण्यास नेमाने जात असे. मला अद्याप आठवते, श्रीकृष्ण गोकुळ सोडून मथुरेला जात असल्याचा प्रसंग पुराणिकबुवा सांगत होते. गोपीगीत वर्णन करून ते सांगू लागले, तसा त्यांचा गळा भरून आला. त्यांच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या आणि मग ऐकणारेही ओक्साबोक्शी रडू लागले. मला वाटते, माझ्या इतिहासप्रेमाचे मूळ महाभारत-भागवताच्या वाचनात आहे.

आमचे घर (इ. स. १९१९) त्यावेळीं कसे गजबजलेले असे. घरात गायी-म्हशी असल्यामुळे दूध-दुभते भक्कम असे. आप्तइष्ट, पाहुणेरावळे मिळून रोजच्या जेवणाला नेहमी पाचपंचवीस माणसे असत. आचारी, पाणके, शागीर्दपेशा, वार लावून जेवणारे विद्यार्थी, पूजेचे ब्राह्मण, भागवत सांगणारे पुराणिक, सगळे घर कसे भरल्यासारखे वाटे.

कर्नाटकात ललिताचा प्रकार आहे, त्याला बैलाटा म्हणजे उघड्यावरील खेळ असे नाव आहे. हौशी माणसे एकत्र येऊन हे खेळ करीत. खेळात भयंकर आरडाओरडा चाले. उदाहरणार्थ रावण प्रवेश करू लागला की राक्षसाच्या गर्जना, वाद्याचा कर्कश आवाज, यामध्ये रावण रंगमंचावर येई. रावणाचा वीरश्रीयुक्त नाच होई, त्यावेळी रंगमंच हादरत असे. पेटलेल्या दिव्यात राळ फेकीत त्यामुळे आगीचा भडका उडे. त्या प्रकाशात रावण भयंकर दिसे. नाच करता करता तो सूत्रधाराला, मांजर उंदराला खेळविते तसा खेळवी. बराच वेळ त्याचा धांगडधिंगा संपल्यावर सूत्रधार त्याला विचारी, ' महाराज, आपण कोण आहात ? ' यावर पुन्हा त्याचा धांगडधिंगा सुरू होई आणि मग मोठ्या मुष्किलीने तो उत्तर देई. राम वनवासाला निघतात तो प्रवेश मोठा हृदयद्रावक असे. खेळ पाहायला आलेले लोक जमिनीवर घोंगड्या अंथरून बसत. हे खेळ रात्रभर चालत. रामायण, हरिश्चंद्र, नळदमयंती, इत्यादि खेळ पाहिल्याचे मला आठवतात. स्त्री पात्रे शक्यतोवर पंधरा सोळा वर्षांची मुले असत. पण मोठ्या माणसांना स्त्रीपार्ट दिला तर ते लुगडी नेशीत, पण मिशा काढीत नसत. असाच एक झुबकेदार मिशा ठेवलेला नट द्रौपदी म्हणून रंगभूमीवर वावरू लागला तसे मला कसेसेच वाटले. पण श्रोते शांतपणे खेळ पाहात होते. मिशा असल्या म्हणून काय झाले, द्रौपदीचे काम बघा असे ते म्हणत.

आम्ही लहान मुले कानडीत उघड्यावरचे खेळ करीत असू. गावाला लागून दत्ताच्या मठात, सतरंज्या आणि जाजमा यांचे पडदे करून, ' वक्रतुंड नररुंडमालधर पार्वतीश आधी नमितो ' हे पद कोरस म्हणून म्हटलेले मला आठवते.

माझ्या वडिलांना नाटके पाहण्याची मोठी आवड असे. त्यातल्या त्यात पौराणिक नाटके त्यांना विशेष आवडत. सुदैवाने त्या सुमारास गुलबर्ग्याला बेळगावकर नाटक मंडळी आली होती. कंपनीची मालक कोणी यंकूबाई नावाची बाई होती. या कंपनीचे कुंजविहारी, मनोविजय, सौभद्र, भक्त प्रल्हाद हे खेळ पाहिल्याचे मला आठवते. सौभद्रात यंकूबाई ही बलरामाचे काम करी. भक्त प्रल्हाद नाटकातील पद ' आनंदाचा कंद हरि हा देवकिनंदन पाहिला ' हे पुढे कित्येक

दिवस माझ्या तोंडात होते. कुंजविहारीत कृष्णाचे काम करणारा नटही मोठा देखणा होता.

आम्ही गुलबर्ग्याला असताना मला वाटते, महाराष्ट्र नाटक मंडळी तेथे आली होती. मत्स्यगंधा, दक्षकन्या ही नाटके पाहिल्याचे मला नक्की आठवते. विशेषतः दक्षकन्येने होमकुंडात उडी घेतल्याचा प्रसंग आज पन्नास वर्षांनंतरही मी विसरलो नाही. नाटकांच्याबद्दल मला पुढे जी विलक्षण गोडी लागली त्याला कारण गुलबर्ग्याला लहानपणी पाहिलेली नाटके होत, असे म्हटले पाहिजे.

सिनेमांची (मूकपट) माझी ओळखही याच १९१९–२० च्या काळात झाली. कोणीतरी वडिलांना येऊन सांगितले की गावात सिनेमोटोग्राफ नावाचा खेळ आला आहे. तो जादूचा खेळ आहे. खेळ अंधारात होत असतो. खेळात खून, मारामाऱ्या हे प्रसंग दाखविले जातात. विद्यार्थ्यांना हा खेळ आण्या-दोन आण्यांत दाखविण्याची सोय केली आहे. यावर आम्ही मुले खेळ पाहण्यास गेलो. थिएटरमध्ये अंधार होता. माझ्या आयुष्यातील पाहिलेला तो पहिला सिनेमा मला आठवतो. खेळात मुले पळत पळत आली आणि त्यांनी समोरच्या तळ्यात उड्या घेतल्या. पाण्याचे असंख्य शिंतोडे पडतील म्हणून मी अंग चोरून बसल्याचे मला अद्याप आठवते. असे एकदोन सिनेमे पाहिल्यावर मला वाटू लागले, की सिनेमात काम करणारी माणसे पडद्याआड लपून बसत असावीत. त्याची खात्री करून घेण्यासाठी मी एकदा मध्यंतरात पडद्याच्या मागे जाऊन पाहिले. तो काय, काही माणसे विड्या ओढीत बसली होती आणि काही झोपली होती. सिनेमा तंत्राचा उलगडा मला पुढे कित्येक दिवस झाला नाही.

आमच्या घरात सणवार नेहमीच चालू असत. रोज सकाळीं वडील पंचांग घेऊन सण हुडकून काढण्यास बसत. रामनवमी, अक्षय्यतृतीया, गुढीपाडवा, गोकुळ अष्टमी, नवरात्र, दसरा, दिवाळीं, हे तर प्रमुख सण झाले. पण लहान सणही कसोशीने पाळले जात. याशिवाय वैष्णव संतांच्या आणि स्वामींच्या पुण्यतिथ्या या तर कधीच संपत नसत. आणि मग जेवणात विविध पक्वान्नांची चंगळ असे. नवरात्रात तर आमच्याकडे नऊ दिवसपर्यंत रोज वेगळे पक्वान्न असे. मुख्य भर पुरणपोळ्या, खीर, बुंदीचे लाडू आणि जिलब्या यांच्यावर असे. श्रीखंडाला माझे वडील पक्वान्न म्हणून समजत नसत. नवरात्रात संध्याकाळीं व्यंकटेशमाहात्म्य वाचीत.

आमचे शेजारी अश्वत्थराव नावाचे गृहस्थ मामलेदार कचेरीत वडिलांच्या बरोबर नगदीकडील कारकून म्हणून काम करीत. त्यांचा मेहुणा व्यंकटेशाची कथा गाऊन दाखवी. त्याचा आवाज गोड होता आणि त्याची वर्णनाची

शलीही आकर्षक होती. यामुळे त्याच्या तोंडून व्यंकटेशकथा ऐकून माझी धार्मिक भावना आणखी दृढ झाली.

पुराण ऐकण्यास जमणाऱ्या बायकांची मला एक गंमत वाटे. पुराण सांगताना पुराणिकबुवांनी पौराणिक व्यक्तींनी एकमेकाला नमस्कार केला असे सांगितले की बायका हातातील वाती वळण्याचे काम बाजूला सारून गंभीर भावाने नमस्कार करीत. मग त्या व्यक्ती कोणीही असोत. उदाहरणार्थ पुराणिकबुवांनी सांगितले की लक्ष्मणाला मूर्च्छित करून इंद्रजित हा रावणापाशी आला आणि त्याला त्याने नमस्कार केला. लगेच बायकांनी गंभीरपणे नमस्कारासाठी हात जोडलेच!

वैष्णवांच्या बायका एकंदरीत दिसायला आकर्षक वाटत. हळदीकुंकवाच्या निमित्ताने त्या आमच्या घरी जमल्या की आम्ही लहान मुले त्यांच्या भोवती पिंगा घालीत असू. दागिन्यांत, बायका, गोठ, पाटल्या, सोन्याच्या बांगड्या, चंद्रहार, नथ, बुगड्या, डोक्यात चांदीच्या साखळ्या घालीत. पण आकर्षक अलंकार म्हणजे सोन्याचा कमरपट्टा आणि वेणीत सोन्याच्या कळ्या हे असत. वैष्णव स्त्रियांच्या कपाळावरील लहान बदामाच्या आकाराचे उभे कुंकू हे मला अतिशय आवडते. त्याच्यापुढे गोल टिकली, चंद्रकोर किंवा कपाळभर मळवट किंवा आडवे कुंकू या तऱ्हा अगदी फिक्कट वाटतात. उभट चेहरा आणि सरळ नाक यांना उभे कुंकू कसे शोभून दिसते! त्यात गहिरे डोळे मग ते निळे, काळे किंवा घारे, कसेही असोत, असले की पाहणाऱ्याचा निकाल लागला असेच समजा. माझी आई तरुणपणी अतिशय सुंदर (अर्थात मला) दिसत असे. हळदी-कुंकवात बायका हातांना आणि हनुवटींना चंदनाची उटी लावीत. आकर्षक वस्त्रालंकार, अंगाला चंदनाची उटी आणि ओटींत प्रसादाच्या डाळी अशा थाटात वैष्णवसुंदरी निघाल्या तर 'जन मागुनी पुढुनी तुला मुरडोनि पाहत राहिले' अशी लोकांची स्थिती होई.

त्या वयात (नवव्या वर्षी) मला लैंगिक आकर्षणाची काहीच कल्पना नव्हती. पण आमचे खासगी शिक्षक आणि लक्ष्मी यांची 'तरुण-तरुणिची सलज्ज कुजबुज' ही डोळ्यासमोर असल्यामुळे स्त्रीपुरुषांची परस्परांत काही गडबड असते इतपत मला समजू लागले होते. पण त्याच्या स्वरूपाची किंवा तपशिलाची काहीच कल्पना नव्हती.

धार्मिक उत्सवात रामाच्या देवळातील रामजन्मोत्सव, लिंगायतांच्या शरणबसवेश्वराच्या देवळातील जत्रा ही मला आठवतात. खिस्ती धर्म आम्हांला ऐकूनही ठाऊक नव्हता. मुसल्मानी धर्माची ओळख अगदी जुजबी होती.

आमच्या आळींत मोहरममध्ये पीर बसवीत. रात्रंदिवस तेथे ताशांचा कडकडाट चाले. दहाव्या दिवशी मोहरमचे वाघ निघत. त्यांना पाहण्यास लोकांची गर्दी होत असे.

बंदेनवाज गेसूदराजचा वार्षिक उरुस मोठा प्रेक्षणीय होत असे. बंदेनवाजचा दर्गा आमच्या ब्राह्मण आळीपासून तीन मैलांच्या अंतरावर होता. उरुस निदान एक आठवडा तरी मोठ्या उत्साहाने साजरा करीत. बंदेनवाजच्या समाधीला चंदनाचा लेप लावीत. चंदनाच्या पेटीची मोठी मिरवणूक निघे. तिला संदल का जुलूस म्हणत. शेवटच्या दिवशी दर्ग्याच्या कळसाला दोर फेकून त्याच्या सहाय्याने घुमट चढून जाण्याच्या स्पर्धा होत. घुमट गुळगुळींत, पाय टेकण्यास जागा नाही. अशा स्थितीत धाडसी तरुण दोर धरून घुमट चढून जाण्याचा प्रयत्न करीत. तेव्हा तें दृश्य पाहून आम्हांला भीतीने मनात धडकी भरत असे.

बकरीद आणि रमजान या सणांचे मोठे नमाज किल्ल्यातील मशिदीत साजरे करीत. सरकारी अधिकारी म्हणून वडिलांना नमाजाच्या व्यवस्थेत भाग घ्यावा लागे. मीही एक दोन वेळा मशिदीत गेलो होतो. मशीद इतिहासप्रसिद्ध असून बहमनी काळातील (इ. स. १३४७ ते १४८५) होती. बहमनी बादशहा दाऊद बहमनी याचा खून याच मशिदीत झाला होता. मशीद भव्य असून तीत एकाच वेळीं पाच हजार माणसे नमाज पढू शकत. गुलबर्ग्यातील हिंदू देखील बंदेनवाजाला ग्रामदैवत समजत. माझे बंधू बिंदुमाधवराव एकदा तापाने आजारी पडले असताना वडिलांनी त्यांना बंदेनवाजच्या समाधीवर नेऊन घातले होते, असे माझी आई मला सांगत असे.

गुलबर्ग्याला असताना एकदा वडिलांनी आम्हा भावंडांना मंत्रालय येथे राघवेंद्र स्वामीच्या समाधीच्या दर्शनासाठी पाठविले होते. मंत्रालय हे तुंगभद्रा नदीच्या काठावर वसले असून अतिशय रम्य स्थळ आहे. आम्हा वैष्णवांत राघवेंद्र स्वामींच्याबद्दल दृढ असा भक्तिभाव आहे. ते नवसाला पावतात अशी सर्वांची श्रद्धा आहे. स्वामींच्या वार्षिक पुण्यतिथिसमारंभाला हजारो भाविकांची गर्दी होते. आमच्या घरी शिवभक्तीला काहीच महत्त्व नसे. शिवरात्रीच्या दिवशी आमच्या घरी पुरणपोळीचे पक्वान्न होई. रताळी घातलेली पुरणपोळी हे माझे आवडते पक्वान्न आहे. शिवरात्रीला रताळ्याची पुरणपोळी करीत. शिवलीलामृत, शिवपुराण इत्यादी ग्रंथ माझ्या अद्याप वाचण्यात नाहीत. शिवरात्रीच्या दिवशी आमच्या देवाला नैवद्य देताना शिवांतर्गत विष्णवे नमः असे म्हणून नैवद्य दाखवीत.

असे असूनही वडील मधून मधून शिवाचे अनुष्ठान करीत. परमेश्वर हा

शिवभक्तीच्या द्वारेसुद्धा आपल्यावर कृपा करतो अशी त्यांची श्रद्धा असावी. घाणदाळ नावाच्या गावी (हे स्थळ रायचूर जिल्ह्यात तुंगभद्रेच्या काठी आहे) पंचमुखी मारुतीचे जागृत स्थान आहे. वडील जेवरगीला असताना त्यांना गुलबर्ग्याचा सुभेदार (कमिशनर) फसीहजंग याने एकदा सस्पेंड केले होते. तेव्हा वडील घाणदाळला जाऊन मारुतीच्या अनुष्ठानाला बसले. अनुष्ठानाच्या शेवटच्या दिवशी त्यांना दृष्टांत झाला. त्यात त्यांना भगवंताचा प्रसाद मिळाला. तो आडवे गंध लावलेल्या शैवाच्या हातून. वडिलांनी आश्चर्याने विचारले, ‘ भगवन, मी वैष्णव आहे. शिवभक्तांच्या हातांनी मला अनुग्रह का ? ’ यावर उत्तर मिळाले की ‘ या प्रकरणात तुला शिवभक्ताकडूनच मदत होणार आहे. ’

माझे वडील सांगत, ‘ अनुष्ठान आटोपून मी हैदराबादेस गेलो. मला सस्पेंड करण्यात आले होते. आपल्याला फिरून कामावर कसे घेण्यात येईल या काळजीत मी होतो. एकदा रस्त्यावरून मी चाललो असताना पाठीमागे मोटार थांबली. मी वळून पाहिले तो मला सस्पेंड करणारे सुभेदार फसीहजंग हे मोटारीत होते. मला पाहताच ते मला म्हणाले, ‘ श्रीनिवासराव, तुम्ही होता कुठे इतके दिवस ? तुम्हांला कामावर घेण्यात आले असून तुम्हांला चिंचोळीचे हंगामी मामलेदार (तहसीलदार) म्हणून बढती देण्यात आली आहे. ऑफिसात येऊन हुकूम घेऊन जा पाहू. ’ त्यांचे उद्गार ऐकून मी मनात म्हटले, ‘ ही सर्व त्या पंचमुखी मारुतीची कृपा ! नाही तर तुम्ही काय आमच्यावर कृपा करणार होता ? ’ राक्षस हे शिवाचे भक्त त्यामुळे मुसलमान अधिकाऱ्यांकडून कृपा म्हणजे शिवभक्त राक्षसांकडून कृपा अशी त्यांची मनोधारणा असावी.

गुलबर्ग्याजवळ नरोणी म्हणून गाव आहे. तेथे महादेवाचे जागृत स्थान आहे. माझे वडील तेथे अनुष्ठानासाठी म्हणून गेले होते. आम्ही भावंडे पण काही दिवसांसाठी नरोणीला गेलो होतो. रावणाचा वध केल्यावर रामाला ब्रह्महत्येचे पातक लागले. त्या पातकातून तो नरोणी (न रावण)च्या महादेवाजवळ मुक्त झाला अशी दंतकथा आहे.

माझ्या आईवडिलांचा दृष्टांतावर आणि स्वप्नावर विश्वास होता. कधी कधी देवदैवतांना पाहिल्याचा त्यांना भास होई. माझी आई सांगते, ‘ बिंदुमाधवाच्या जन्माच्या वेळीं मी बाळंतीण होते. मी आपल्या खोलीत पलंगावर पडले होते. इतक्यात एक सवाष्ण बाई खोलीत आली. तिच्या नाकात नथ होती. तिने प्रेमळपणे माझ्या आईकडे पाहिले. आणि थोडा वेळ खोलीत थांबून बाहेर निघून गेली. ’ साक्षात् लक्ष्मीच आपल्या घरी आली असा आईचा विश्वास आहे. इ. स. १९३३ मध्ये मला मामलेदारी मिळाली, त्यावेळीं आईच्या

स्वप्नात नखशिखांत दागिन्यांनी मढलेली मुलगी आली होती; ती लक्ष्मी होती असे आईचे म्हणणे आहे.

दत्ताच्या मठाला लागून मोठे मैदान होते. तेथे माणिकप्रभू मठाचे खंडेराव महाराज कधी कधी उतरत असत. त्यांचे दर्शन घेण्यासाठी लोकांची गर्दी होई. त्यांचा सर्वच थाट राजविलासी असे. ते डोक्यावर भरजरी टोपी घालत, एवढे मला आठवते. लोक म्हणत की खंडेराव महाराजांचे सगळे व्यवहार रात्री चालतात. ते दिवसा झोप काढतात. बेदर जिल्ह्यात हुमणाबाद येथे माणिक प्रभू (१८१७–१८६७) नावाचे सत्पुरुष होऊन गेले. सर्व मतांचा समन्वय हे त्यांचे तत्त्व होते. हुमणाबादला त्यांचा मोठा प्रेक्षणीय असा मठ आहे. खंडेराव महाराज हे त्या मठाचे अधिपती होते. अर्थात त्यांचे काय तत्त्वज्ञान आहे हे समजण्याचे माझे वय नव्हते.

इतर सामान्य मुलांप्रमाणे पतंग उडविणे, गोट्या खेळणे, चेंडू, चेंडूफळी, हुतुतू, इत्यादी खेळ मी खेळत असे. दत्ताच्या मठामागच्या मैदानात आम्ही 'किल्ला सर' नावाचा खेळ खेळत असू. मुलांचे दोन संघ बनत आणि एखादी टेकडी जिंकण्यासाठी त्यांच्यात अहमहमिका लागे. टेकडीच्या पलीकडे काही अंतरावर सार्वजनिक उद्यान होते. उद्यानाच्या कडेला विलायती चिंचेची उंच झाडे असत. चिंचा पाडून खाणे ही आमची नेहमीची करमणूक होती.

इ. स. १९१९ मध्ये गुलबर्गा जिल्ह्यात दुष्काळ पडला असावा. पण सरकारने सूट जाहीर न करता पुरेपूर शेतसारा वसूल करण्याचे हुकूम सोडले. गुलबर्ग्याचा कमिशनर (सुभेदार) राजा इंद्रकर्ण हा खानदानी, प्रतिष्ठित, आणि सौम्य प्रकृतीचा होता. उलट गुलबर्ग्याचा कलेक्टर सरदार अली खान उर्फ सरदार नवाजजंग नावाचा अतिशय बुद्धिमान आणि मग्रूर अधिकारी होता.

सरदार अलीखान आणि त्याचा बाप सरदार अब्दुल हक ही जोडी हैदराबादच्या इतिहासात गाजलेली आहे. अब्दुल हक हा पश्चिम महाराष्ट्रातील राहणारा. त्याला हैदराबाद राज्यात नोकरी लागली. गुलबर्गा जिल्ह्याच्या सरहद्दीवर इंग्रजांनी वासुदेव बळवंत फडके यास पकडले, त्या प्रकरणात हैदराबाद पोलिसतर्फे अब्दुल हक याची इंग्रजांना अतिशय मदत झाली. त्याच्या या कामगिरीचा इंग्रजांनी गौरव केला. निजाम सरकारने त्यांना दिलेरजंग ही पदवी दिली. अब्दुल हक हे इ. स. १८८५–८६ च्या सुमारास निजाम राज्याच्या गृहखात्याचे सचिव झाले.

याच सुमारास हैद्राबाद राज्यातील खनिज संपत्तीचा शोध आणि उत्पादन ही व्हावी म्हणून निजाम सरकारने हिंदुस्थान सरकारच्या सल्लामसलतीने एक योजना

आखली. इंग्लंडमध्ये एक कंपनी कायम करण्यात आली. या प्रकरणात प्रथम-पासून अखेरपर्यंत हैद्राबादचे गृहसचिव या नात्याने अब्दुल हक याचा हात होता. या कंपनीच्या संचालकांत विलायतेतील बडीबडी मंडळी होती आणि त्याला हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेंटचे भरपूर साहाय्य होते. निजाम सरकारची या कंपनीत भागीदारी होती. पण इंग्रज संचालकांना या कंपनीत भक्कम आर्थिक फायदा करून देण्यात आला आणि हे काम अब्दुल हकने केले, आपल्या निजाम सरकारचा विश्वासघात करण्याच्या मोबदल्यात त्याने या कंपनीत सत्तर हजार पौंडाचे (आजच्या हिशेबाने अठरा लाख वीस हजार रुपये) शेअर्स फुकट खरेदी केले. ही गोष्ट त्याने निजामसरकारला कळविली नांही. हिंदुस्थान सरकार आणि इंग्रज रेसिडेंट यांनी ही गोष्ट दाबून ठेवली. पुढे कंपनी कायम झाल्यावर अब्दुल हकने तेच शेअर्स किंमती वाढवून निजाम सरकारला विकले आणि त्याचे लाखो रुपये आपल्या खिशात घातले.

ही गोष्ट फुटल्याशिवाय कशी राहील? अब्दुल हकच्या या कारस्थानाचा हैदराबादेत अतिशय गवगवा झाला. अब्दुल हकने या पैशातून मुंबईत घरे, हाटेले ही विकत घेतली. निजाम सरकारने इंग्लंडचे एक आर्थिक तज्ज्ञ मिस्टर फरीवन यांच्या मदतीने या प्रकरणाची कसून चौकशी केली. अब्दुल हक यांना सचिव पदावरून बडतर्फ करण्यात आले.

या प्रकरणाचा विलायतेत फार गवगवा झाला. शेवटी पार्लमेंटने याची छाननी करण्यासाठी एक समिती नेमली. समितीने कंपनीचे संचालक अब्दुल हक आणि निजाम सरकार यांना आपल्यासमोर बोलावले. निजाम सरकारतर्फे महसूल सचिव मेहदीअली मुहसिनुल्मुल्क यांना विलायतेला पाठविण्यात आले. समितीचे चौकशीचे काम कित्येक महिने चालले होते. खटल्याचे कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत. समितीने शेवटी आपला निर्णय दिला की कंपनीचा व्यवहार सरळ नाही. हिंदुस्थान सरकारने या बाबतीत निजाम सरकारचे योग्य मार्गदर्शन केले नाही. कंपनीचा व्यवहार संपविण्यात यावा. निजाम सरकारने भागीदारीत ज्या रकमा गुंतवल्या आहेत त्या परत करण्यात याव्या. अब्दुल हकने आपले शेअर्स निजाम सरकारला भलत्या भावाने विकून लाखो रुपये कमावले होते ते त्यांच्यावर दिवाणी खटला करून निजाम सरकारने वसूल करावे.

समितीच्या निर्णयानुसार कंपनीची पुनर्घटना करण्यात येऊन निजाम सरकारच्या योग्य हक्कांचे संरक्षण करण्यात आले. निजाम सरकारने अब्दुल हकव मुंबईच्या कोर्टात दिवाणी दावा लावला. आणि आपल्या रकमा आणि शेअर्स ही दोन्ही वसूल केली. या खटल्यात अब्दुल हकची मुंबईतील इस्टेट पार धुळीला

मिळून तो अगदी खंक झाला.

ही हकीकत इ. स. १८८८–८९ ची आहे. अब्दुल हक हैद्राबादेस आला. त्याने निजाम सरकारात पुन्हा नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. पण त्याची डाळ शिजली नाही. तो पुढे विपन्नावस्थेत मरण पावला. हैद्राबाद आणि सिंकद्राबाद या शहरांच्या मधोमध हुसेन सागर नावाचा प्रचंड तलाव आहे. या तलावाच्या काठावर सिकंद्राबादला लागून अब्दुल हकची कबर आहे. कबरीवर लहानसा घुमट आहे. तुम्ही केव्हाही त्या रस्त्यावरून जा, कबरीवर गाढवे लोळत असताना तुम्हांला दिसतील.

अशा या दिव्य पित्याचे दिव्य चिरंजीव सरदार अलीखान उर्फ सरदार नवाजजंग, गुलबर्ग्याचे कलेक्टर (तालुकदार). सरदार नवाजजंग हा अतिशय बुद्धिमान होता. इंग्रजीवर त्याचे असामान्य प्रभुत्व होते. त्याने व्हाइसरॉय लार्ड रीडिंग यांचे इंग्रजी चरित्र लिहिले आहे. ते भाषा, विषयाची मांडणी आणि शैली या सर्वच बाबतीत अप्रतिम गणले गेले आहे. सरदार नवाजजंगाचे मराठीही अस्खलित होते. आपल्या महाराष्ट्रीय कारकुनांना तो शुद्ध मराठीत ‘काय श्रीमंत, काम नीट करा. आमची रास वृश्चिक आहे हे विसरू नका’ अशा शब्दांत दम देत असे.

त्याला आपल्या बुद्धिमत्तेचा अतिशय गर्व होता. हैदराबादेतील जुनी सरदार घराणी त्याला कःपदार्थ वाटत. त्यांच्याबद्दल तो तिरस्काराचे आणि हेटाळणीचे उद्‌गार काढी. गंगाधरशास्त्री पटवर्धन जसे बाजीराव पेशव्याबद्दल डॅम फूल असे उद्गार काढून आपल्या इंग्रजी ज्ञानाचे प्रदर्शन करीत, तसे उद्‌गार हाही काढी. गुलबर्ग्याचे कमिशनर (सुभेदार) राजा इंद्रकर्ण हे खानदानी सरदार. त्यांची इस्टेट चार लाखांची. त्यांचे पूर्वज राजा रघुनाथदास हे शहाजहान बादशहाचे अर्थमंत्री. राजा सागरमल हे पहिल्या निजामाबरोबर दक्षिणेत आले. त्यांना तेलंगण प्रांताच्या महसूल मंत्र्याचे पद प्राप्त झाले. त्यांचे इंद्रकर्ण हे वंशज. जातीने हे उत्तर प्रदेशाचे कायस्थ. आडनाव माथुर. इंद्रकर्ण हे वृत्तीने दिलदार होते. अर्थात् सरदार नवाज जंगाची बुद्धिमत्ता आणि तडफ ही त्यांच्यात नव्हती. सरदार नवाजजंग, राजा इंद्रकर्ण यांच्याबद्दल म्हणे ‘क्या कहते है गोबर गणेश प्रसाद, तुमचे गोबर गणेश (गोबर म्हणजे शेण, गोबर गणेश म्हणजे शेणाचा गणपती) गणेश प्रसाद काय म्हणतात ?’

या गोष्टी इंद्रकर्ण यांच्या कानांवर गेल्याशिवाय कशा राहतील ? सरदार नवाजजंगाचा आणि त्यांचा संघर्ष सुरू झाला. दोघेही एकमेकाला हाणून पाडण्यासाठी प्रयत्न करू लागले. लवकरच इंद्रकर्ण यांना ती संधी मिळाली.

त्या वर्षाच्या दुष्काळी परिस्थितीत सरकारने निर्दयपणे शेतसारा वसूल केला असा अतिशय गवगवा झाला. राजा इंद्रकर्ण यांचे म्हणणे की साऱ्यात सूट द्या, दुष्काळी भागात सारा तहकूब करा, रयतेवर जुल्म करू नका, असे हुकूम आपण दिले. पण सरदार नवाजजंगांनी आपले हुकूम मानले नाहीत. त्यामुळे सरकारची बदनामी झाली आहे. त्यांनी सरकारकडे मागणी केली की सरदार नवाजजंगांना नोकरीवरून काढून टाकण्यात यावे.

सरकारने या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमले. कमिशनवर आकिल जंग, पोलिसप्रमुख मिस्टर हेंकिन्स आणि न्यायमूर्ती राय बालमुकुंद हे सभासद होते. कमिशन गुलबर्ग्याला आले. त्याने आपले चौकशीचे काम सुरू केले. माझे वडील त्यावेळी गुलबर्गा तालुक्याचे हंगामी मामलेदार होते. त्यांची साक्ष महत्त्वाची होती. राजा इंद्रकर्ण आणि सरदार नवाज जंग या दोघांनीही त्यांना बोलावून आपल्या तर्फेने साक्ष देण्यास बजावले. कमिशनच्या कचेरीत दोघेही समोरच बसलेले. वडिलांना साक्ष देताना काय बोलावे हे समजेना. काहीही बोलले तरी दोघांपैकी एकजण नाराज होणार. शेतसारा सरकारी नियमानुसार आणि सरकारी हुकुमाने वसूल करण्यात आला. परिस्थिती अगदीच दुष्काळी होती असे समजण्यास पुरेसा पुरावा नाही. शेतसारा भरताना क्वचित् लोकांना त्रास झाला असणे संभवनीय आहे. पण सरकारी नियमाचे उल्लंघन करण्यात आले असे म्हणता येणार नाही. अशाच प्रकारची उडवाउडवीची उत्तरे त्यांनी दिली. कमिशनचे सभासद राय बालमुकुंद हे वडिलांवर चिडले. त्यांनी वडिलांच्या बडतर्फीचा हुकूम काढला. झाले. एका क्षणात वडिलांची नोकरी गेली. वडिलांच्या जबाबाने सरदार नवाज जंगाचेही समाधान झाले नाही. त्याने फारसी भाषेतील पुढील म्हण म्हटली 'आखीर गुर्गजादा गुर्ग मी शवद–लांडग्याचा बचा शेवटी लांडगाच होणार.'

त्या दिवशी वडील घरी आले ते अगदी कष्टी होऊन. नेहमीप्रमाणे त्यांनी माझ्याकडून महाभारत वाचून घेतले नाही. ते देवघरात जाऊन देवापाशी बराच वेळ बसून होते.

वडील सांगत, 'त्या रात्री मला दृष्टांत झाला. कुठे तरी उत्सव चालू होता. भोजनाची तयारी चालू होती. कोपऱ्यात भाताचे ढिगारे साचले होते. मंडळी जेवायला बसली. पण मला कोणी बैस म्हणेना. इतक्यात कोणीतरी ओरडून म्हटले, 'अरे यांना कोणी तरी वाढा. यांच्या वाट्याचा भात यांना मिळू द्या.' आणि मग मला बसविण्यात येऊन माझ्या पानात भात वाढण्यात आला. मला जाग आली. देवाचे नाव घेऊन मी दुसऱ्या दिवशी कमिशनच्या ऑफिसात

गेलो. तो आकिल जंगचे कारकून नरहरराव (त्यांचे पुढे माझी चुलत बहीण पद्मावती इच्याशी लग्न झाले) मला भेटले. ते म्हणाले, 'श्रीनिवासरावजी, काल रात्री काय घडले तुम्ही ऐकलेत काय ?' मी म्हटले, 'नाही.' ते म्हणाले, 'अहो, राय बालमुकुंद यांनी तुम्हांला बडतर्फ केले ही बातमी राजा इंद्रकर्ण यांना कळली. ते मध्यरात्रीच्या सुमारास राय बालमुकुंदकडे गेले आणि त्यांना म्हणाले, 'रायसाहेब, मी आणि सरदार नवाज जंग या दोन हत्तींची टक्कर आहे. तुमच्यात सामर्थ्य असेल तर आम्हा दोघांना आपला प्रभाव दाखवा, गरीब श्रीनिवासरावावर आघात करून तुम्ही काही शतकृत्य केले असे वाटते काय ? ते काही नाही, तुम्ही त्यांच्या बडतर्फीचा हुकूम मागे घेतला पाहिजे.' असे म्हणून राजा इंद्रकर्ण यांनी राय बालमुकुंद यांना बडतर्फीचा कागद फाडण्यास लावला.' अशा रीतीने वडिलांची या प्रकरणातून सुटका झाली.

राजा इंद्रकर्ण ह्यांची गुलबर्ग्याहून बदली झाली. त्यांना कस्टम खात्याचे (हैदराबादेत या खात्याला करोडगिरी म्हणत) कमिशनर म्हणून नेमण्यात आले. सरदार नवाज जंगांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. माझ्या वडिलांची बदली रायचूर जिल्ह्यात प्रथम सिंधनूरला आणि नंतर लवकरच गंगावती तालुक्यावर करण्यात आली.

सरदार नवाजजंगाची पुढील कथा सांगणे अवश्य आहे. जवळ जवळ अठरा महिनेपर्यंत सरदार नवाजजंग हा घरी स्वस्थ बसून होता. आपल्याला नोकरीवर परत घेतील असे त्याला वाटेना. पण हैदराबादेतील राजकारण त्याच्या पथ्यावर पडले. १९१९-२० मध्ये निजामाला संपत्ती गोळा करण्याचा मोह झाला. कुठून आणि कुणीकडून का होईना, त्याला पैसा हवा होता. यासाठी तो वाटेल तो मार्ग पत्करू लागला. आपल्या सरदार जहागिरदारांच्याकडे निजामाने एखादी भेट पाठविली की त्यांनी भली मोठी रक्कम नजर म्हणून पाठविली पाहिजे, असा शिरस्ता असे. उदाहरणार्थ, पूर्वीच्या एका निजामाने पायग्याच्या एका सरदाराकडे एक आंबा पाठविला. या कृपेबद्दल त्या सरदाराने सोन्याचा आंबा तयार करून तो निजामाला दिला. तोच प्रकार या निजामाने अवलंबिला. तो आपल्या सरदारांच्याकडे अगदी क्षुल्लक भेटी पाठवी. एखादे लहान फळ, फार काय, एखादी लाल किंवा हिरवी मिरची अशी भेटही तो पाठवी. भेटी-बरोबर एका कागदावर या कृपेच्या मोबदल्यात निजामाला किती रकमेची अपेक्षा आहे हेही लिहून पाठवीत. आणि मग तितकी रक्कम तो सरदार निजामाकडे नजराणा म्हणून पाठवी. अशी निजामाने बरीच रक्कम गोळा केली. त्याचा दुसरा मार्ग म्हणजे सरकारी नोकरांकडून पैसे गोळा करणे हा होता.

मणुका, बढत्या, बदल्या या प्रकरणांतही तो नजराण्याच्या नावाखाली पैसे खाऊ लागला. त्याच्या या वृत्तीचा लाभ सरदार नवाजजंगाने घेतला. असे म्हणतात की सरदार नवाजजंगाने निजामाला कळविले की आपल्याला नोकरीवर परत घेऊन कमिशनर (सुभेदार) म्हणून बढती द्यावी, गेले अठरा महिने आपण घरी बसून आहोत ही हंगामी बडतर्फी रद्द समजावी. त्या अठरा महिन्यांचा पगार (सुमारे पंचवीस हजार रुपये) आपल्याला मिळावा म्हणजे तो सर्व पगार मी आपल्याला नजराणा म्हणून देतो. निजामाने हे म्हणणे मान्य केले. बडतर्फ केल्या तारखेपासून सरदार नवाजजंगाला परत नोकरीवर घेण्यात आले. त्याला कलेक्टरीवरून बढती देऊन गुलबर्गा सुभ्याचा कमिशनर (सुभेदार) म्हणून नेमण्यात आले. आणि या कृपेच्या मोबदल्यात सरदार नवाजजंगाने निजामाला पंचवीस हजार रुपये नजराणा म्हणून दिले आणि तो गुलबर्ग्यावर सुभेदार होऊन आला.

गुलबर्ग्यात त्याने काही वर्षे काम केले. यानंतर तो टपालखात्याचा कमिशनर बनून हैदराबादेस गेला. तेथे तो काम करीत असता एका विलक्षण घटनेमुळे तो पुन्हा गोत्यात आला. तो प्रकार असा : सरदार नवाजजंग हा बाहेरख्याली होता. गुलबर्ग्याला तो कलेक्टर असताना त्याचे लक्ष तिप्पी नावाच्या रस्ते झाडणारणीकडे गेले. ती अतिशय देखणी होती. तिला त्याने आपल्याजवळ बाळगली. पुढे तो कमिशनर (सुभेदार) झाला. त्याची समजूत अशी की आपल्याला बढती मिळाली ती तिप्पीच्या पायगुणामुळे होय. त्याने तिप्पीशी (कानडीत तिप्पी उकिरड्याला म्हणतात.) निका लावला. सरदार नवाजजंग आणि तिप्पी बेगम हे जोडपे अजमीरच्या ख्वाजा मुइनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्याची यात्रा करून आले. सरदार नवाजजंग आणि तिप्पी यांचा प्रणय हा गुलबर्ग्यात मोठ्या चर्चेचा विषय होता.

असे हे सरदार नवाजजंग हैदराबादेत टपालखात्याचे कमिशनर असताना संकटात सापडले. एकदा हैदराबादच्या सार्वजनिक उद्यानात (बागे आम) गाण्याची मोठी मैफिल झाली. गवई फैयाजखान हे असावेत. या मैफिलीला निजाम हजर होते. त्यांच्या काही बेगमाही आल्या होत्या. त्यांची पडद्याआड सोय करण्यात आली होती. सरदार नवाजजंग हा निजामाच्या मागील रांगेत बसला होता. शेकडो आमंत्रित मैफलीला हजर होते. गाणे ऐन रंगात आले असताना निजामाने सहज मागे वळून पाहिले. सरदार नवाजजंग हा मिशीला पीळ भरीत बेगमांच्या पडद्याकडे पाहात होता. हे दृश्य पाहाताच निजामाचे पित्त खवळले. त्यावेळचा त्याचा क्रोध भयंकर होता असे लोक सांगतात. निजाम उठून

उभा राहिला. काढून टाका याला, निकाल दो निकाल दो असे तो ओरडत होता. हां हां म्हणता खिजमतदारांनी सरदार नवाजजंगाच्या गळ्यात हात घालून त्याला धक्के देत सार्वजनिक उद्यानातून बाहेर घालविले. निजामाचा राग अनावर झाला होता. असे म्हणतात की हैदराबादचे पंतप्रधान (१९०१–१९१२ आणि १९२६ ते १९३७) आणि श्रेष्ठ हिंदू जहागिरदार महाराजा सर किशनप्रसाद यांनी आपली डोक्यावरची पगडी निजामाच्या पायावर घातली, तेव्हा कोठे त्याचा राग शांत झाला. मैफिल बरखास्त झाली. यानंतर सरदार नवाजजंग मरेपर्यंत अज्ञातावस्थेत घरी बसून काळ कंठीत होता.

अशी या पितापुत्रांची, अब्दुल हक दिलेरजंग आणि सरदार अलीखान सरदार नवाजजंग यांची विलक्षण हकीकत आहे.

इ. स. १९१९ च्या अखेरीस माझ्या वडिलांनी गुलबर्ग्यास ब्राह्मण आळीत एक घर विकत घेतले. आम्ही आमच्या मालकीच्या घरात राहण्यास आलो. हे घर ऐसपैस होते. मध्ये मोठे अंगण, अंगण ओलांडल्यावर पायऱ्या चढून जायच्या; मग ओसरी आणि नंतर खोल्या. अंगणाच्या समोर बैठकीची खोली आणि उजवीकडे ओसरी आणि स्वयंपाकघर. हे घर मला अतिशय आवडे.

आम्ही तेथे राहायला जाऊन काही आठवडे होतात न होतात तोच वडिलांची बदली सिंधनूर आणि नंतर गंगावती या तालुक्यांवर झाली. आई वडिलांच्या बरोबर गेली. आमच्या शिक्षणासाठी म्हणून धाकटी काकी गुलबर्ग्याला राहिली.

१९२० मध्ये मी फर्स्ट फॉर्म (इंग्रजी तिसरीची) परीक्षा पास होऊन सेकंड फार्म (चवथी) मध्ये गेलो. परीक्षा झाल्यावर आम्ही भावंडे—मी, माझे बंधू बिंदुमाधवराव, चुलत बंधू व्यंकोबराव आणि सीताराम असे गंगावतीला वडिलांच्याकडे गेलो.

गंगावती हे गाव रायचूर जिल्ह्यात आहे. गंगावतीपासून दहा बारा मैलांवर तुंगभद्रा नदीच्या पलीकडे सुप्रसिद्ध विजयनगरचे अवशेष आहेत. नदीच्या अलीकडे विजयनगरचे उपनगर अनागोंदी हे गंगावती तालुक्यात आहे. अनागोंदीला विजयनगरच्या सम्राटांचे वंशज राहतात. त्यांना पन्नास एक हजार रुपयांच्या उत्पन्नाची जहागीर होती.

१९२० च्या उन्हाळ्याची सुटी आम्ही गंगावतीला काढली. तेथे माझा धाकटा भाऊ राघवेंद्र (आता स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या एका शाखेचा मॅनेजर) याचा जन्म वीस एप्रिल रोजी झाला. गंगावतीला असताना आम्ही हंपीचे विरुपाक्षाचे देऊळ, विजयविठ्ठलाचे देऊळ, हजार रामाचे देऊळ, नरसिंहाची मूर्ती, ही विजयनगरमधील स्थळे पाहिली. रामायणात प्रसिद्ध

असलेले पंपासरोवर, मारुतीचे जन्मस्थान ऋष्यमूक पर्वत, यंत्रोद्धाराचे राममंदिर ही स्थळेही जवळच आहेत. तुंगभद्रा नदीतील नावा कातड्याच्या आणि आकाराने गोल असतात. त्यांना हरगोल म्हणतात. त्यांत बसताना मला सारखी अशी भीती वाटे, की आपण धडपणे पलीकडच्या किनाऱ्याला लागतो की नाही!

गंगावती हे गाव बोलून चालून तालुक्याचे ठिकाण. गाव तसे मागासलेले होते. अधिकाऱ्यांची मुले म्हणून आमचे कौतुक होई. संध्याकाळीं वडिलांच्या बैठकीत गावची मंडळीं जमत. गोष्टी चालत त्या मुख्यतः देवाधर्माच्या आणि कचेरीच्या. घरात आईकडे शेजारच्या बायका येत. कचेरीत केशवराव नावाचे एक वयस्कर कारकून होते. त्यांची बायको तरुण आणि देखणी होती. ती आईकडे येत असे. केव्हाही पहा, तिच्या अंगाला अत्तराचा घमघमाट येई. माझे वय त्यावेळीं दहा वर्षांचे होते. अर्थात त्या वयात मला सौंदर्यदृष्टी असण्याचा प्रश्नच नव्हता. पण असे असूनही तिचा देखणेपणा माझ्या आठवणीत राहिला आहे. आणि आज त्या गोष्टीला सुमारे पन्नास वर्षे झाली, तरी तिच्या अंगाचा अत्तराचा सुगंध अद्याप माझ्या स्मृतीत रेंगाळत आहे.

गंगावतीत रात्री गस्तवाले गावातून हुश्शार हुश्शार म्हणून ओरडत फिरत असत. आम्हांला त्यांची भीती वाटे. आम्हांला वाटे की गस्तवाले आणि चोर यांच्यांत रात्रभर पाठशिवणीचा खेळ चालू असावा.

गंगावतीचे लोक जेवणात विष घालून बाहेरच्या लोकांना मारतात असा गवगवा होता. त्यामुळे आई आम्हांला बाहेर जेवावयास जाऊ देत नसे. आमची स्वयंपाकीण रिंदम्मा हिच्यावरही बारीक नजर ठेवण्यात येई. आई तेथे नसताना त्या बाईने वडिलांना जेवणात विष घालण्याचा प्रयत्न केला होता. पण तो वेळीच उघडकीस आला असे आई आम्हांला सांगत असे. हा प्रवाद खरा की खोटा हे सांगणे कठीण आहे. पण आम्हांला स्वयंपाकिणीचा अनुभव होता तो निराळाच. संध्याकाळच्या फराळाच्या वेळीं विवस्त्र होऊन सोवळ्याने ती आम्हांला फराळाचे वाढी, तेव्हा आम्हांला तिचे पूर्ण दर्शन घडत असे. ही गोष्ट आमच्या अंगवळणी पडल्यामुळे आम्हांला तिचे पुढे पुढे काहीच वाटेनासे झाले.

उन्हाळ्याची सुटी संपल्यानंतर आम्ही भावंडे धाकट्या काकीबरोबर गुलबर्ग्याला परत आलो. धाकट्या काकीचे माहेर कर्नाटकातील बळ्ळारी जिल्ह्यात. तिला कानडी लिहिता वाचता चांगले येत असे. जेवणे आटोपल्यावर रात्री ती आम्हांला एक कानडी कादंबरी वाचून दाखवी. मला वाटते तीत राक्षसांच्या गोष्टी असाव्यात. आमच्या घरी रामचंद्र आणि भीमसेन असे दोन नोकर होते.

भीमसेनाच्यामुळे नवनाथ चरित्र वाचण्यास मिळाले. मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ इत्यादींच्या कथा कानावरून गेल्या. बाहेरच्या जगाचीही कल्पना हळूहळू येऊ लागली. आमच्या आळींत वामन काळे आणि विठ्ठल काळे हे भाऊ राहात. संध्याकाळीं पांडुरंगाच्या देवळात आम्ही जमत असू, त्यावेळीं ते मराठ्यांच्या इतिहासातील गोष्टी सांगत. मराठे मोगलांशी लढत त्या वेळीं ते भुयारातून दूरदूर अंतरापर्यंत जाऊन मोगलांवर तुटून पडत, असे ते सांगत. मला तर असे वाटू लागले की महाराष्ट्रात भुयारेच भुयारे असावीत. शिवाजी, संभाजी, राजाराम ही नावे याच वेळीं कानावरून जाऊ लागली. शाळेत इंग्लंड, अमेरिका इत्यादी देशांची नावे अभ्यासात येऊ लागली. पण वाचनात महाभारत, भागवत, रामायण ही सोडून इतर पुस्तके आठवत नाहीत. एक इंग्रजी कोश पाहण्यात आला. त्यातील कुत्री, पक्षी, इत्यादींची रंगीबेरंगी चित्रे मला आवडल्याचे आठवते. लंडन, फिलाडेल्फिया अशी नावे माझ्या आठवणीत आहेत. माझ्या समजुतीही विचित्र होत्या. फिलाडेल्फियात रस्ते सगळे रबराचे असतात. आपण उत्तर दिशेने जसजसे जाऊ, तसे आपल्याला उंच उंच चढत जावे लागते (भूगोलाच्या नकाशात उत्तर दिशा वर दाखवितात त्याचा हा परिणाम असावा), हस्तिनापुरात पांडवांचे सिंहासन अद्याप असून त्यावर ज्वारी टाकली की तिच्या लाह्या होतात, अश्वत्थामा अद्याप रानावनात भटकत असून तो भेटण्याचा संभव आहे. महाभारताच्या युद्धातून पळून आलेल्या सैनिकांपैकी काहीजण अद्याप जिवंत असून गुहेमधून दडून बसले आहेत. इंग्रज हे पूर्वजन्मीचे लाल तोंडाचे वानर असून सीतेने त्यांना रामावतारी वर दिल्यामुळे ते आज आमच्यावर राज्य करीत आहेत. लंकेत अद्याप बिभीषण राज्य करीत आहे. जादूच्या दिव्याने राक्षस आणि भुते आपल्याला वश होतात, (मला वाटते अरेबियन नाइटसच्या अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा, अलीबाबा आणि चाळीस चोर, सिंदबादची सफर, या गोष्टी आणि वेताळ-पंचविशी, सिंहासन-बत्तिशी या गोष्टी वाचनात आल्या असाव्या.) अशा कितीतरी विचित्र समजुती मी त्या काळीं मनाशी बाळगून होतो. आमचा एक मित्र शाम गजेंद्रगडकर म्हणून होता. आम्ही त्याच्या बरेच नादी लागलो होतो. त्याने आम्हांला सांगितले की इतके लक्ष गायत्रीचा जप केला की देवी प्रसन्न होते. इतके लक्ष जप केला की सूर्य प्रसन्न होतो. मग काय उठल्या सुटल्या आम्ही गायत्रीमंत्राचा जप करू लागलो. हा प्रकार बरेच दिवस चालू होता. अरेबियन नाइटसच्या गोष्टींचा माझे चुलत बंधू व्यंकोबराव यांच्या मनावर इतका परिणाम झाला की त्यांनी १९१८ मध्ये वडिलांच्या पेटीतून रुपये चोरले आणि आम्हा भावांच्या

पुस्तकांच्या कोनाड्यात लपवून ठेवले. ते आम्हांला म्हणू लागले, "मला भुते वश आहेत. पाहा, मी त्यांना आज्ञा केली आहे की तुमच्या कोनाड्यात पैसे ठेवावेत. तुम्ही कोनाडे शोधा पाहू." आम्ही शोधतो तो काय, आमच्या पुस्तकातून रुपये पटापट खाली पडू लागले. आमच्या चुलत बंधूंचे आम्हांला त्यावेळी कोण कौतुक वाटू लागले. आम्ही त्याच्या भोवती गोळा होऊन त्याला म्हणू लागलो, 'अरे आम्हांलाही भुते वश होतील असे कर ना' इतक्यात वडिलांच्या पेटीतून रुपये चोरीला गेले असा आरडाओरडा झाला आणि मग सगळेच बिंग बाहेर पडले. आमच्या चुलतबंधूंना मार बसला आणि मग त्यांनी आपण रुपये चोरले होते असे कबूल केले.

त्या वयात अधिकारी वर्गाशी आमचा संबंध येण्याचे काही कारण नव्हते. माझे वडील एकदा सरदार नवाज जंगांच्या भेटीस गेले होते, तेव्हा मला बरोबर घेऊन गेले होते; राजा इंद्रकर्ण यांच्या जनानखान्यात मी आईबरोबर गेलो होतो. तेथील बायकांनी उत्तर भारतीय पद्धतीच्या नथी घातल्याचे मला आठवते.

१९१९ मध्ये आमच्या घरातच एका भागात राहणारे अश्वत्थराव नगदी कारकून (मामलेदार कचेरीतील ट्रेजरी क्लार्क) यांच्या ताब्यात असलेल्या रकमेत काही अफरातफर झाली. या प्रकरणाची चौकशी गुप्त पोलीस (त्यांना खुफिया म्हणत) करीत आहेत असा गवगवा झाला. आमच्या घरी एकदा बहुरूपीचा खेळ झाला. आईने आम्हांला बजाविले की हे लोक बहुरूपी नाहीत. खुफिया आहेत. तुम्ही गप्प राहा. एक शब्द बोलू नका. आम्ही घाबरून गप्प होतो. आमच्याकडे रोजच्या जेवणाच्या पंक्तीस दहा पाच ब्राह्मण असत. एकदा एक ब्राह्मण आमच्या घरी जेवणासाठी म्हणून आला. त्याचा वेष काहीसा विचित्र होता. त्याने डोक्याला शाल गुंडाळली होती. (सौभद्रात संन्यासी वेषात अर्जुन गुंडाळतो तशी) तो आमच्या पंक्तीस बसला. घरात कुजबूज सुरू झाली की तो आहे खुफिया म्हणजे गुप्तपोलीस. त्याला चित्रावती नीट घालता आल्या नाहीत. तीर्थ नीट घेता आले नाही. ब्राह्मण मंत्र म्हणत असताना तो गप्प होता. त्या दिवशी जेवणाच्या वेळी कोणी एक शब्दही बोलले नाही. या गोष्टीची चर्चा बरेच दिवस चालू होती. अफरातफर करणारा चोर कोण असावा हे शोधून काढण्यासाठी अश्वत्थरावांनी बरेच प्रयत्न केले. एकदा एका मुलाच्या नखाला कोणते तरी अंजन लावून नखाकडे पाहण्यास त्यांनी त्याला सांगितले. मुलगा सांगू लागला, 'मला अमकी अमकी माणसे दिसतात. सरकारी खजिन्यातील रक्कम ती चोरीत आहेत. माणसे अशा वर्णाची, अशा वेषाची आहेत.' हे ऐकून आम्ही मुले थक्क झालो. त्या प्रकरणातून अश्वत्थराव बहुधा सुटले

असावेत. मनुष्य अतिशय सज्जन आणि धार्मिक वृत्तीचा. त्यांचे आपल्या बायकोवर अतिशय प्रेम होते. सकाळी कचेरीत जातांना ते बायकोचा निरोप घेत, तेव्हा त्यांचा पाय घरातून बाहेर पडता पडत नसे. आणि माझ्या वडिलांना पुन्हा पुन्हा म्हणावे लागे, ‘ अश्वत्थरावजी, आम्ही बाहेर वाट पाहात आहोत, चला लवकर. ’

त्या वयात वर्तमानपत्रे वाचल्याचे मला आठवत नाही. योगायोग पाहा, एकदा आम्ही आमचे मास्तर मदन गोपाळ यांच्याकडे गेलो असता आम्ही मराठा या इंग्रजी साप्ताहिकाचा अंक पाहिला. त्यात आम्हांला काय दिसावे! काळ्या बॉर्डरमध्ये छापलेली लोकमान्यांच्या निधनाची बातमी! ती जणू काल पाहिल्याप्रमाणे माझ्या आठवणीत आहे.

आमच्या नव्या मालकीच्या घरात एक कुटुंब भाड्याने राहण्यास आले. त्या कुटुंबात एक मुलगी होती. तिचे नाव भारती. ती सोळा सतरा वर्षांची असावी. ती गोरीपान आणि देखणी होती. तिच्याबद्दल मला मोठे आकर्षण वाटे. माझ्या त्या वयात या आकर्षणाचे स्वरूप काय असावे हे आजही मला नीट सांगता येणार नाही. आज माझ्या आठवणीतून तिचे स्वरूप नाहीसे झाले आहे. आठवण आहे तिच्या भारती या नावाची.

असा होता माझ्या लहानपणचा, माझ्या भोवती वावरणारा समाज. ही माणसे कनिष्ठ मध्यम वर्गाची होती. कारकून, अव्वल कारकून, इन्स्पेक्टर या लहानसहान जागांपलीकडे त्यांची मजल गेली नव्हती. त्यांना राजकीय जागृती, राष्ट्रीय चळवळ, सामाजिक सुधारणा, वर्तमानपत्रे, सभा-संमेलने या गोष्टी माहीत नव्हत्या. थोडेबहुत शिक्षण घ्यावे, लहानसहान नोकऱ्या कराव्या आणि संसार चालवावा एवढीच त्यांची महत्त्वाकांक्षा. देवाधर्माचे, सणांचे, उत्सवांचे, पुराणकीर्तनाचे बरेच प्रस्थ या समाजात होते. नूतन विद्यालयासारख्या शिक्षण-संस्थेमुळे समाजात हळूहळू जागृती होत होती. पण अतिशय मंदगतीने. अशा समाजात मी लहानपणी वाढलो.

इ. स. १९२१ च्या एप्रिल महिन्यात माझ्या वडिलांची बदली गंगावतीहून मराठवाड्यात उस्मानाबाद या जिल्ह्याच्या ठिकाणी झाली. मी त्या वर्षी सेकंड फॉर्म (इंग्रजी चवथी) पास होऊन थर्ड फॉर्म (मिडल, इंग्रजी पाचवी) मध्ये गेलो. आईवडील गंगावतीहून गुलबर्ग्याला आले. गुलबर्ग्याहून तीन मैलांवर बबलाद या गावी त्यांनी एक मळा विकत घेतला होता. तेथे विहीर दुरुस्त करण्याचे काम चालू होते. आम्ही एक दिवसासाठी बबलादला जाऊन आलो.

आम्ही ज्या आठवड्यात गुलबर्गा सोडले, त्यावेळी गुलबर्ग्याच्या राम-

मंदिरात रामायणाच्या सुंदर कांडावर प्रवचने चालू होती. मी प्रवचने ऐकण्यास नेमाने जात असे. प्रवचनकारांचा (ते बहुधा देऊळगावकर असावेत) आवाज खणखणीत होता. त्यांची भाषा प्रभावी आणि वाणी ओघवती होती. मला प्रवचने आवडू लागली होती. पण आम्ही गुलबर्गा सोडल्यामुळे मला त्यांचे शेवटचे प्रवचन ऐकण्यास मिळाले नाही. याची मला हुरहुर लागल्याचे अद्याप आठवते.

आम्ही गुलबर्गा सोडले त्यावेळीं मला अकरावे वर्ष चालू होते. १९२१ च्या राजकीय चळवळींचा मला पत्ताही नव्हता. सामाजिक चळवळीही अपरिचित होत्या. इंग्रजी, उर्दू आणि फारसी या भाषांची क्रमिक पुस्तके काय ती वाचनात होती. मराठी वाचनात महाभारत, रामायण, भागवत, हरिवंश ही पुस्तके वाचनात आली. पण मनोरंजन, लोकमित्र, चित्रमय-जगत यांचे फुटकळ अंक सोडता, मराठी वर्तमानपत्रे आणि नियतकालिके वाचल्याचे मला आठवत नाही. भविष्यात आपले आयुष्य कसे राहील याचा त्यावेळीं विचारही नव्हता. एक गोष्ट मात्र आठवते. आई बाळंतीण झाली की, महिना दोन महिने तिला मऊ आणि पातळ भात देत. मला तसला भात फार आवडे. भातावर लोणकढे तूप घालावे आणि भाताचा गोळा करून तो मेतकुटात कालवावा. थोडेसे मीठ घालावे. हा मेतकूट भात मी आईकडून आवर्जून मागून घेई. त्यावेळीं मला वाटे की आपण मोठे झालो की तूप–मेतकूट–भाताशिवाय दुसरे काही खाणार नाही. त्या वयात सुखी जीवनाची माझी तीच कल्पना असावी.

३

उस्मानाबाद
१९२१ ते १९२२

आम्ही उस्मानाबादला १९२१ च्या एप्रिल-मेच्या सुमारास आलो. उस्मानाबाद हे मराठवाड्यात असून जिल्ह्याचे ठिकाण आहे. ते सोलापुरापासून सुमारे पन्नास मैलांवर आहे. गावाचे पूर्वीचे नाव धाराशिव असे होते. ते बदलून निजाम उस्मान अलीखान यांनी उस्मानाबाद असे ठेवले. गावाला रेल्वे स्टेशन नाही. अगदी जवळचे रेल्वे स्टेशन येडसी हे मिरज-लातूर मार्गावर असून ते उस्मानाबादपासून बारा मैलांवर आहे. गावाची वस्ती पंधरा ते वीस हजारांची असावी. आता-पर्यंत माझे दिवस कोडंगल या तेलुगू भाषिक प्रांतात अगर जेवरगी, चिंचोळी आणि गुलबर्गा या कानडी मुलुखात गेले होते. पण उस्मानाबाद मराठी भाषिक जिल्हा होता. तेलंगणात जागोजाग आढळणारे तलाव, भाताची शेते अगर चिंचेची झाडे येथे नव्हती. काळी माती, आणि ज्वारी, भुईमूग, गहू, हरभरा ही मराठवाड्याची पिके ही या जिल्ह्यात आढळून येत.

उस्मानाबादेत वडिलांनी ब्राह्मण आळीत घर घेतले. या

घराला लागूनच महादेवाचे देऊळ होते. घरात भूत वावरते असा बोलवा होता. पण आपल्या घरात नेहमी धर्मकर्मे चालतात, यामुळे भूत आपल्या वाटेस जाणे शक्य नाही असे सांगून वडिलांनी तेच घर पसंत केले. वडील रोज रात्री देवघरात देवासमोर भजन करीत. हातात तंबोरा, गळ्यात माळ, पायांत घुंगरू अशा वेषात ते देवासमोर नाचत भजने म्हणत. जवळ जवळ दीड दोन तास हा कार्यक्रम चालत असे. वडील म्हणत, 'देवाची नर्तनसेवा करीत भजने म्हणत असता मला पुष्कळदा भास होई की कोणी तरी आपल्या मागे उभे असून आपल्यासारखेच पायात घुंगरू बांधून नाचत आहे.' माधव सखाराम वळसंगकर नावाचे पेष्कार (अव्वल कारकून) आमच्या आळीत राहात होते. त्यांचा आणि आमचा कित्येक वर्षांपासून घरोबा होता. माधव सखाराम हे सेवानिवृत्त झाले होते. त्यांचा मोठा मुलगा डेप्युटी कलेक्टर (दुय्यम तालुकदार) चा मुख्य कारकून (मीर मुन्शी) म्हणून काम करीत होता. त्यांचा धाकटा मुलगा गोविंद हा आमच्या वर्गात होता. त्याची आई यमुनाबाई ही आम्हांला भुतासंबंधीचे आपले अनुभव सांगत असे. तिच्या वाड्यात म्हणे पूर्वी राहून गेलेल्या एका माणसाचे भूत वावरत होते. या भुताला लहान मुलांचा लळा असे. यमुनाबाई सांगत असे, 'पुष्कळदा मला एक म्हातारा मनुष्य अंगणातील पायऱ्यांवर बसलेला दिसे. मला पाहताच तो मला वाट देई. घरात पाळण्यातील मुले रडू लागली की ते भूत पाळण्याला झोके देत असे आणि मुलांचे रडणे थांबे. आम्हांला भुताचा उपद्रव असा झाला नाही.'

त्यावेळी तरी आम्हां मुलांचा भुतांच्या अस्तित्वावर विश्वास असे. पण आम्ही त्यावेळी गायत्री मंत्राचे जप हजारोंनी करीत असू. जानव्याची ब्रह्मगाठ दाखविली की भूत पळून जाते, असा आमचा विश्वास होता. त्यामुळे आम्हांला भुताची भीती वाटत नसे. त्यावेळी आमच्या घरात आजी, आई, वडील, आम्ही चार भाऊ (बिंदुमाधवराव, मी, गुरुमध्व आणि राघवेंद्र) आणि एक बहीण (सीताबाई), आमची धाकटी काकी लक्ष्मीदेवी आणि तिची मुले व्यंकोबराव, सीताराम आणि पद्मावती अशी बारा माणसे होती.

माझे मामा अप्पाराव यांचा बाहेरख्यालीपणा वाढत जाईल या भीतीने आजोबांनी (आईचे वडील) त्यांचे लग्न करून दिले. त्या वेळीं ते उस्मानाबाद जिल्ह्यात कळंब या तालुक्याच्या ठिकाणी राहात होते. उस्मानाबादेस आल्यावर मी आणि माझे बंधू बिंदुमाधवराव हे कळंबला जाऊन आलो. कळंब हे तालुक्याचे गाव असून मांजरा नदीच्या काठावर वसले आहे. नदीच्या पलीकडच्या काठावर बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात आमचे आजोळगाव वडगाव हे आहे. माझ्या

आजोबांनी कळंबला बिऱ्हाड केले होते. कळंबला आम्ही पहिल्याने आमच्य मामीला पाहिले. ही पुणे जिल्ह्यातील इंदापूरच्या पानसरे घराण्यातील होती. ती वर्णाने सावळी, बांध्याने उंच आणि हाडापेराने मजबूत होती. तिच्या समोर माझा मामा अगदी किरकोळ वाटे. मामी सदा हसतमुख असे. तिला रागावलेली पाहिल्याचे मला आठवत नाही. माझा मामा कित्येकदा रागावून तिला मारायला जाई. तेव्हा ती त्याचे हात धरून ठेवी. तो तिला चिडून म्हणे, 'सोड माझा हात.' ती म्हणे 'मी काय म्हणून तुमचे हात सोडू?' तो म्हणे, 'मला तुला मारायचे आहे. तू माझे हात धरून ठेवलेस तर मी तुला मारणार तरी कसा?' यावर मामी म्हणे, 'मला मारणार नाही असे वचन दिलेत तर मी तुमचे हात सोडीन, नाही तर नाही.' हे दृश्य पाहून आमची हसून हसून मुरकुंडी वळे.

कळंबहून उस्मानाबादेस परत येताना कळंबपासून तडवडच्या रेल्वे स्टेशनपर्यंत येण्यास आमच्या आजोबांनी भाड्याची घोडी करून दिली होती. आयुष्यात प्रथमच माझा घोड्यावर बसण्याचा तो प्रसंग होता. घोड्याचा मालक घोडा हाताने धरून चालवीत होता; तरी माझी तारांबळ उडत होती, आम्ही उस्मानाबादला आल्यावर काही दिवसांनी माझे आजोबा, मामा आणि मामी हेही आले आणि त्यांनी आमच्या आळीतच बिऱ्हाड केले.

माझे आजोबा चोखंदळ आणि रसिक होते. त्यांना उर्दू आणि फारशी या दोन्ही भाषा येत होत्या, त्यांचे मोडी अक्षर चांगले आणि वळणदार असे. त्यांची राहणी स्वच्छ आणि रुबाबदार असे. संध्याकाळीं ते काठी टेकीत आमच्याकडे येत. त्यावेळीं त्यांचा पोशाख पांढरा शुभ्र अंगरखा, आणि डोक्याला जरीकाठी रुमाल असा असे. त्यांचे बोलणेही रुबाबदार असे. त्यांच्या चोखंदळ स्वभावाचे मला एक उदाहरण आठवते. विड्याच्या पानासाठी त्यांना चुना लागे तो मऊ आणि सुगंधी. चुन्यात ते केशर घालीत आणि मऊपणा यावा म्हणून चुन्यात लोणी मिसळीत. माझ्या आजोबांनी जन्मभर काही उद्योगधंदा केला नाही. वडगाव येथील पन्नास एकर शेतीवर त्यांनी गुजराण केली. त्यांचे चंद्रस घराणे मूळचे जालन्याचे (औरंगाबाद जिल्हा.) त्यांचे मामा बापूसाहेब काटे हे वडगावचे सुखवस्तू गृहस्थ. बापूसाहेबांना मुलगा नव्हता. त्यांनी माझ्या आजोबांना आपली मुलगी देऊन घरजावई केले. बापूसाहेबांची मोठी मुलगी, माझ्या आईची मावशी, ही धारूर (बीड जिल्हा)चे आबासाहेब देशपांडे यांना दिली होती. मी आबासाहेबांना पाहिले तेव्हा ते सत्तरीच्या पुढे गेले होते. ते उंच आणि धिप्पाड होते. त्यांना पाहून मराठेशाहीतील सरदारांची आठवण होई. त्यांना मुलगी नव्हती म्हणून त्यांनी

माझ्या आईचे पालनपोषण आपल्यापाशीच केले.

माझे आजोबा घरजावई म्हणून आपल्या मामाच्या इस्टेटीची व्यवस्था पाहात असत. काही काळाने बापूसाहेबांनी दुसरे लग्न केले, त्यांना मुलगा झाला. आता त्यांना माझ्या आजोबांची (सोनाजीपंत हे त्यांचे नाव) गरज राहिली नाही. एकदा माझे आजोबा मळ्यात गेले असता बापूसाहेबांच्या इशाऱ्याने त्यांना मारहाण करण्यात आली. गोष्टी या थराला आलेल्या पाहताच माझी आजी (आईची आई) घराबाहेर पडली. बापूसाहेबांचा आपल्या मुलीवर फार जीव. ते कळवळून म्हणाले, ' मनुताई, तू मला सोडून जाऊ नकोस, तुझ्या नवऱ्याला प्रथम स्वतःच्या चरितार्थाची सोय पाहू दे ' माझ्या आजीने म्हटले, ' तुम्हांला मुलगा झाल्याबरोबर तुमची नजर फिरली. माझ्या नवऱ्याला मारहाण करीपर्यंत तुमची मजल गेली. माझ्या नवऱ्याच्या बरोबर भिकेची झोळी घेऊन मी फिरेन. पण तुमच्या घरात यापुढे पाऊल ठेवणार नाही. ' माझ्या आजीने गावातच दुसरीकडे बिऱ्हाड केले, तिने एकदा तरी घरी यावे म्हणून बापूसाहेबांनी तिची आर्जवे केली. पण तिने ऐकले नाही. पुढे बापूसाहेबांचा मृत्यू जवळ आला. अंतकाळी त्यांनी माझ्या आजीला घरी बोलावली. ती आली. पण उंबरठ्याबाहेर बसून राहिली. बापूसाहेब तिला म्हणाले, ' मनूताई, काय हा तुझा हट्ट, अग आत ये ' माझी आजी म्हणाली, ' बापूसाहेब, तुमची लेक या उंबरठ्यातून बाहेर पडली, ती परत येण्यासाठी नाही. मी अशीच मानाने जगावे इतका आशीर्वाद तुम्ही मला दिला तरी माझ्या जन्माचे सार्थक झाले असे मी समजेन. ' ही मराठवाड्याची माणसे ! मी माझ्या आजीला पाहिली नाही. माझ्या वडील बंधूंच्या जन्मापर्यंत ती हयात होती.

माझा मामा अगदी आळशी. काही कामाचा नाही. त्याला नेहमी पैशाची गरज भासे. त्यात त्याचे लग्न झालेले. आजोबा त्याला झडझडून पैसे देत नसत. त्यामुळे बापलेकांची नेहमी भांडणे चालत आणि मग मामी घाईघाईने आमच्या घरी येऊन आईला मध्यस्थीसाठी घेऊन जाई. एकदा तर मामाने आजोबांना खाली पाडले आणि त्यांच्या छातीवर बसून त्यांच्या जानव्याची किल्ली काढून घेतली. नंतर त्यांची पेटी उघडून आपल्याला हवे तितके पैसे काढून घेतले.

माझे आजोबा इ. स. १९२१ च्या अखेरीस अगर १९२२ च्या सुरवातीस वारले. त्या दिवशी सकाळी मामी आमच्या घरी आली आणि तिने ती बातमी सांगितली. आम्ही भावंडे आईबरोबर गेलो. आजोबा उघडे पडले होते. आईने त्यांना व्यवस्थित निजविले. त्यांच्या अंत्यसंस्काराला आम्ही मुले गेलो नाही. पण पुढे कित्येक दिवस माझ्या आजोबांची मृत्युकाळची मुद्रा माझ्या स्वप्नात

येत असे. त्यांच्या मृत्यूनंतर मामा आणि मामी आमच्या घरी राहण्यास आली.

उस्मानाबादेस सरकारी हायस्कूल होते. तेथे इंग्रजी पाचवीपर्यंत [मिडल अगर थर्ड फार्म) इंग्रजी आणि उर्दू या दोन्ही माध्यमांचे वर्ग होते. इंग्रजी सहावी आणि सातवी म्हणजे मॅट्रिक या दोन्ही वर्गांचे माध्यम उर्दू होते. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव हे इंग्रजी सहावी म्हणजे फोर्थ फार्ममध्ये दाखल झाले. मी आणि माझे चुलत बंधू व्यंकोबराव (हे गुलबर्ग्याला मिडल नापास झाले होते) हे मिडल (इंग्रजी पाचवी) मध्ये बसलो. गुलबर्ग्याहून आमची सर्टिफिकिटे येण्यास उशीर लागला. वडिलांनी उस्मानाबाद तालुक्याच्या मामलेदाराकडून (त्यांना तहसीलदार म्हणत) हेडमास्तरांच्याकडे आमच्या बद्दल शिफारस करविली. तहसीलदार वाजद अलीखान हा अतिशय स्थूल असा मनुष्य होता. त्याचे वजन अडीचशे पौंड तरी असावे. आम्हांला शाळेत प्रवेश मिळाला. शाळेचा हेडमास्तर सी. पॉल नावाचा ख्रिस्ती गृहस्थ होता. त्याचे इंग्रजी अतिशय उत्तम असल्याचा लौकिक होता. परीक्षा जवळ आल्या तसे त्याने शाळा सुटल्यावर आमचे इंग्रजीचे वर्ग घेतले. आम्हांला या गोष्टीचे कोण कौतुक वाटे !

या शाळेतही मराठी शिकण्याचा मला योग आला नाही. शाळेत माझे इंग्रजी सुधारले असावे. इंग्रजी क्रमिक पुस्तकातून प्रथमच टेनिसन, आणि वर्डस्वर्थ यांच्या कविता मला वाचाव्या लागल्या. अमीरअलीखानाने वाघीण कशी मारली ('ठगाची जबानी' या पुस्तकातील प्रकरण) हा धडा मला अद्याप आठवतो. इतिहास, इंग्रजी, उर्दू हे माझ्या आवडीचे विषय होते. पण गणित, काही मला शेवटपर्यंत जमले नाही. उद्धवराव पोफळे आम्हांला इंग्रजी आणि इतिहास शिकवीत, गणपतराव हे गणित शिकवीत. आमचे गणित सुधारावे म्हणून वडिलांनी आमच्यासाठी गणपतरावांना खासगी शिक्षक म्हणून नेमले. पण त्याचा विशेष उपयोग झाल्याचे मला आठवत नाही.

घरी आमचे मोडी आणि उर्दू कित्ते गिरविणे चालू होते. उस्मानाबादेस माझे महाभारत व रामायण यांचे वाचन सुटले. आमच्या घरापासून जवळच एक मराठी ग्रंथालय होते. ग्रंथालय कसले, एका भिकार खोलीत दोन तीन कपाटांत पुस्तके अव्यवस्थितपणे रचलेली असत. ती मला वाचायला मिळत. तीन शिलेदार, दुःखाअंती सुख, माणिक बाग, नाटक्याचे तारे, भद्रंभद्र, ही पुस्तके या ग्रंथालयातून वाचलेली मला आठवतात. १९२२ च्या दिवाळीच्या सुटीत पुण्याहून मी आलो तेव्हा हरि नारायण आपट्यांची उषःकाल ही कादंबरी

मी उस्मानाबादेस वाचली. सावरकरांचा सिंहगडावरचा पोवाडा त्याच सुमारास मी तोंडपाठ केला असावा. पण १९२१ मध्ये मराठीचे वाचन विशेष झाले असे मला आठवत नाही. शाळेच्या वाचनालयातून मी काही उर्दू पुस्तके वाचली. हैदराबादची उर्दू वर्तमानपत्रे सहीफा आणि मुशीर दकन ही मधूनमधून वाचण्यास मिळत. घरी वर्तमानपत्रे येत नसत. पण लोकमान्य अधून मधून वाचल्याचे मला आठवते. बाहेरच्या जगाची आम्हांला हळूहळू जाणीव होऊ लागली होती. माझे वडील बंधू गुलबर्ग्याहून आले त्या दिवशी उस्मानाबादच्या सरकारी क्लबात वडिलांनी आम्हांला नेले होते. टेनिसचा खेळ तेथे मी प्रथमच पाहिला. माझ्या बंधूंच्या डोक्यावर मी प्रथमच गांधी टोपी पाहिली. मी विचारले, 'तुमची फरक्याप कोठे आहे ?' त्यांनी सांगितले, 'गुलबर्ग्याच्या स्टेशनावर लोकांनी परदेशी माल म्हणून माझी टोपी हिसकावून घेतली. आणि जाळून टाकली.' आमच्या घरी कोणी पाहुणे आले होते. ते नागपूर काँग्रेस अधिवेशनाच्या गोष्टी सांगत. त्यांनी सांगितले, 'अधिवेशनात मागच्या बाकांवर बसलेली काही माणसे गडबड करू लागली. अलीबंधूंनी माणसांसकट बाक उचलून अधिवेशनाच्या बाहेर ठेवला!' पाहुणे खादीधारी होते. मला वाटते खादी मी त्याच वेळी प्रथम पाहिली. लार्ड रीडिंग हे व्हाइसराय म्हणून आल्याचे लोकमान्यामध्ये वाचल्याचे स्मरते. महात्मा गांधींचे नाव याच सुमारास कानावरून जाऊ लागले. पण देशातील प्रचंड चळवळीची मला काहीच कल्पना नव्हती. शाळेत क्वचित् नाटकातील काही प्रवेश (शिवाजी महाराजांच्या आग्र्याच्या सुटकेचे, शेक्सपीयरच्या किंग जॉन नाटकातील राजपुत्र ऑर्थर संबंधीचे) विद्यार्थ्यांनी करून दाखविल्याचे आठवतात. एका प्रसंगी मी उर्दूमध्ये एक लहानसे भाषण केल्याचे आठवते. शाळेतील भाषणाचे विषय म्हणजे अकबर श्रेष्ठ की औरंगजेब श्रेष्ठ ? खेड्यातील जीवन चांगले की शहरातील ? असे असत.

पण घरातील वातावरण धार्मिक असे. सणवार, उत्सव, वैष्णवस्वामींच्या पुण्यतिथ्या, सुग्रास भोजने, पंचपक्वान्ने हे आमचे जीवन पूर्वीप्रमाणेच चालू असे. आता लंगोटी सुटून मी धोतर नेसू लागलो होतो. पण सोवळेओवळे आम्ही कटाक्षाने पाळीत असू. डोक्यावर केस राखण्यास घरात बंदी होती. महिन्यातून एकदा तरी न्हाव्याच्या हाती मान द्यावी लागे. आमची गुळगुळीत चंपी (घेरा आणि शेंडी राखून) होई, वर आंब्याच्या कोयीने डोके खरडीत. त्यामुळे आमच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागत. मग आई त्यादिवशी आम्हांला आंघोळ घातल्यावर खूपसे ताक घातलेले लाह्याचे पीठ खाऊ घाली.

उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूरचे तीर्थस्थान आहे. आमच्या घरी तिरुपतीचा

व्यंकटेश आणि तुळजापूरची अंबाबाई ही कुलदैवते. माझा धाकटा भाऊ गुरुमध्व याची मुंज तुळजापूरला देवीच्या देवळात झाली. देवीच्या दर्शनाने मी भारावून गेलो. देवळात आम्ही शकुनाचा दगड हातात धरला. मनासारखे होणार असेल तर तो दगड आपोआप गोल फिरू लागतो असे आम्हांला सांगण्यात आले. देवळात एका बाईच्या अंगात आले होते. ती नाचत बडबडत होती आणि स्त्री-पुरुष तिच्या भोवती गोळा होऊन तिला प्रश्न विचारीत होते. तिची वाणी खरी होते असे लोक बोलत.

मराठी तमाशा मी प्रथमच तुळजापूरला पाहिला. आमच्या कचेरीतला शिपाई श्रीपती मोहिते हा आम्हांला तमाशा दाखविण्यास घेऊन गेला. कृष्ण आणि गौळणी यांच्या संवादात बराच अश्लील भाग असल्याचे मला जाणवले. एका गाळणीचा उखाणा अद्याप आठवतो. समोर होता कोनाडा, त्यात होती किल्ली...पुढची ओळ लिहवत नाही.

आमचे शृंगार शास्त्राचे ऐकीव ज्ञान हळूहळू वाढीस लागू लागले होते. आम्ही राहात होतो त्या घरात पूर्वी कोणी रंगेल मनुष्य राहात असावा. वरच्या माडी-वरील खोलीत भिंतीवर काही रंगेल चित्रे चितारली होती. या खोलीला लागूनच महादेवाच्या देवळाची गच्ची होती. गच्चीवर जायचे तर खिडकीतून चढून जावे लागे. खिडकीच्या दरवाजाच्या आड भिंतीवर स्त्री-पुरुषसंभोगाचे चित्र कोरले होते. आम्ही भावंडे मोठ्या कुतूहलाने ते चित्र पाहात असू. कोकशास्त्रातील एक धडा तरी आम्हांला तेथे पाहण्यास मिळाला. होमो सेक्सूअलच्या गोष्टीही कानांवर पडू लागल्या. स्त्रियांच्याकडे पाहण्यात अधिक कुतूहल वाटू लागले. समवयस्क मित्रांत मधून मधून चावट गोष्टींची चर्चा होऊ लागली. पण यात कुतूहलाशिवाय दुसरे काही नव्हते.

मला वाटते त्या वर्षी पाऊस कमी झाला असावा. वडिलांनी महादेवाच्या देवळात चाळीस दिवस सतत अभिषेकाची व्यवस्था करविली होती. उस्मानाबादेहून दोन तीन मैलांवर जुनी लेणी आहेत. तेथे वडिलांनी एक मोठा यज्ञ घडवून आणला. जिल्हा कचेरीतील अकौंटस आफिसर मुरलीधरराव यांनी त्यांना या कामात मोठी मदत केली. आठ दहा दिवस तरी यज्ञाचा मोठा सोहळा चालला होता. कुठे होमहवन चालले आहे. कुठे पुराणपठण चालले आहे, कुठे भजने होत आहेत, कुठे कीर्तन चालू आहे आणि रोज शेकडोंनी भोजनाच्या पंक्ती उठत आहेत असा तो विलक्षण समारंभ होता. त्यासाठी लांबलांबचे अग्निहोत्री, वैदिक, पुराणिक, कीर्तनकार वगैरे बोलावण्यात आले होते. मला वाटते या समारंभासाठी हजारो रुपये वर्गणी म्हणून गोळा करण्यात

आले असावेत.

समारंभात आम्ही मुले नुसती हुंदडत होतो. वडिलांनी आम्हांला काम देण्याचे ठरविले. आम्हांला त्यांनी अनुष्ठानाला बसविले. मंत्रालयाचे राघवेंद्रस्वामी यांचे आम्ही वैष्णवभक्त होतो. त्यांना नवस करणे, मंत्रालयाची यात्रा करणे, त्यांचे स्तोत्र रोज एकशेआठ वेळा म्हणण्याचे व्रत धरणे ही परंपरा आमच्या घरात असे. वडिलांनी आम्हांला या अनुष्ठानाला बसविले. सकाळीं सात वाजल्यापासून दुपारी एक वाजेपर्यंत आम्हांला एके जागी बसून राघवेंद्र स्तोत्र एकशेआठ वेळा म्हणावे लागे. त्याचा हिशेब ठेवण्यासाठी आम्ही खडे जमिनीवर मांडीत असू. स्तोत्र एकदा म्हणून झाले की खडा समोर ठेवायचा. दहा खड्यांची उभी ओळ झाली की ती पुन्हा आडवी करायची. आम्ही स्तोत्र म्हणत असू. पण एकशेआठपर्यंत पोहोचणे कठीण होते. वडील येऊन मधून मधून चौकशी करीत. कोणी पाहात नाही असे दिसताच आम्ही स्तोत्रांचा आकडा वाढवून खड्यांच्या उभ्या ओळी आडव्या करीत असू. माझे बंधू बिंदुमाधवराव यांनी आमच्याही पुढे आघाडी मारली. आमच्या समोरून एक देखणी मुलगी चालली होती. (तिचे पुढे एका प्रतिष्ठित वकिलाशी लग्न झाले.) माझे बंधू तिला खडे मारू लागले. कोण खडा मारते आहे, म्हणून ती आमच्या दिशेने पाहू लागताच माझे बंधू खाली मान घालून मोठमोठ्याने स्तोत्र म्हणू लागत. तिच्या लक्षात ही गोष्ट येईपर्यंत त्यांनी सगळे खडे संपविले. आपल्या भक्ताचे हे चाळे पाहून राघवेंद्रस्वामींच्या आत्म्याने कपाळ बडवून घेतले असावे. त्या मुलीने आरडाओरडा केला. काय झाले हे पाहण्यासाठी वडील तेथे येईपर्यंत माझ्या बंधूंनी तेथून पोबारा केला. संध्याकाळपर्यंत त्यांनी तोंड दाखविले नाही. आमचे अनुष्ठान अशा रीतीने निकालात निघाले.

माझे बंधू बिंदुमाधवराव हे बुद्धिमान म्हणून वडिलांचे अधिक लाडके होते. त्यांचे उर्दू हस्ताक्षर फारच उत्कृष्ट होते. कोणी अर्जदार आला की उर्दूतून अर्ज करावे लागत. वडिलांच्या सांगण्यावरून माझे बंधू अर्ज लिहून देत. त्यांच्या अक्षरावर खुश होऊन अर्जदार त्यांना एक रुपया देई. त्यांनी कमाई केली म्हणून त्यांचे घरात कोण कौतुक होई. प्रथम त्यांना एक रुपया मिळाला तेव्हा घरात पेढे वाटण्यात आले. आम्हांला त्यांचा भारी हेवा वाटे. त्यांचे उर्दू आणि फारसी या भाषांचे ज्ञान आमच्यापेक्षा चांगले होते. त्यामुळे ते अधिकाऱ्यांना हवेहवेसे वाटत. ते वयाने माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठे होते. बायकांसंबंधी गोष्टी करण्यात थोडेसे अघळपघळ असावेत. एकदा ते आईला सांगू लागले " आई, ती अमकी अमकी मुलगी (तिचे लग्न पुढे एका प्रतिष्ठित कुटुंबात

झाले) आहे ना, तिने मला डोळा मारला. माझे वय लहान आहे. मी तरी काय करू शकतो, सांग बरे !" आई त्यांचे बोलणे हसून टाळी. आपल्याला बुद्धिमान समजतात म्हणून त्यांना मोठ्यांच्या बैठकीत मध्ये मध्ये बोलण्याची आणि रिमार्क पास करण्याची सवय लागली होती. मुर्डी श्रीनिवासराव नावाचे मुन्सफ उस्मानाबादेस बदलून आले होते. ते वैष्णव होते. वडिलांनी त्यांना एकदा जेवणास बोलाविले. भलतेसलते काही बोलू नका असे वडिलांनी आम्हांला आधीच बजावून ठेवले होते, आम्ही सगळी जेवायला बसलो होतो. श्रीनिवासराव मुन्सफ हे गोरेपान होते. वैष्णवांत गंध लावतात, ते पोटावर तीन उभे पट्टे, छातीवर दोन्ही बाजूंस दोन पट्टे, मध्ये एक गोल, खांद्यावर दोन पट्टे आणि कपाळावर उभा पट्टा. या शेवटच्या पट्ट्याच्या मधोमध उभा अंगारा आणि अंगाऱ्याच्याखाली गोल अक्षता असा आमचा थाट असे. अशाच थाटात मुन्सफ श्रीनिवासराव जेवायला बसले. वडील त्यांच्याशी आदराने बोलत होते. इतक्यात माझे बंधू म्हणाले, ' रावसाहेब, हे गंधाचे पट्टे आपल्याला किती शोभून दिसतात, नाही. ' हा अनपेक्षित रिमार्क ऐकून मुन्सफसाहेब ओशाळले. वडिलांनी माझ्या बंधूंकडे रागाने पाहिले. पण करतात काय ? जेवल्यानंतर माडीवरल्या बैठकीत पानसुपारीची व्यवस्था केली होती, तेथे मुन्सफसाहेब आले. तेथे त्यांना आमच्या बंधूंनी म्हटले, ' रावसाहेब, (रावसाहेब स्थूल होते) पायऱ्या चढून येताना आपल्याला श्रम झाले असतील नाही ? ' पुन्हा मुन्सफसाहेब ओशाळले. आमच्या बंधूंचा तिसरा रिमार्क ' रावसाहेब लोडाला टेकताना जरा जपूनच बरे का ! लोडाचे अभ्रे धुवायला गेले आहेत म्हणून वळकटीभोवती चादर गुंडाळून लोड म्हणून ठेवली आहे. ' मुन्सफसाहेबांनी कपाळाला आठ्या घालून माझ्या बंधूंकडे पाहिले. वडिलांचा राग काही विचारू नका. पण मुन्सफसाहेब समोर बसले असल्यामुळे त्यांना काहीच बोलता येईना.

उस्मानाबादेत विटीदांडू, चेंडूफळी, फुटबाल, पतंग उडविणे, लोखंडाचे अगर पत्र्याचे चाक लाकडी फळ्याने फिरवीत आळीभर फिरणे हे खेळ मी खेळत असे. माझे वडील आफिसला घोड्यावर बसून जात. मीही घोड्यावरून फेरफटका मारीत असे. एकदा घोड्याला पाणी पाजण्यासाठी मी नदीवर घेऊन गेलो होतो. दोन्ही पाय एकाच बाजला घेऊन घोड्यावरून मी उतरायला गेलो. तो खाली दगडावर आपटून माझ्या हनुवटीतून रक्त येऊ लागले. हनुवटीला अद्याप त्या जखमेची खूण आहे. सुट्टीच्या दिवशी माझ्या मित्रांबरोबर कलेक्टर कचेरीच्या रस्त्यावरून भटकणे, झाडावरच्या कैऱ्या पाडून खाणे हा आमचा आवडता छंद असे. शाळेतील माझ्या मित्रांत सदाशिव देशपांडे

(आता वकील उस्मानाबाद आणि माझ्या मुलीचे चुलतसासरे), नरहर महाजन (शिक्षक), पंडितराव दानवे (सेवानिवृत्त अव्वल कारकून, पेश्कार), त्यांचा भाचा प्रभाकर, गोविंद वळसंगकर (हा पुढे प्लेगाने वारला) इत्यादि मुले होती. पंडितरावचे वडील रंगराव पेश्कार यांचा आणि आमच्या वडिलांचा घरोबा होता. आमच्या घरात प्लेगचे उंदीर पडू लागले म्हणून आम्ही काही दिवस त्यांच्या घरी राहिलो होतो. रंगरावांची मुलगी कोंडूताई ही अतिशय देखणी आणि प्रेमळ होती. तिला परंड्याच्या देशमुखांच्या घरी दिली होती. तिचे आमच्यावर बहिणीपेक्षाही अधिक प्रेम होते. अशी सुस्वरूप बहीण आम्हांला लाभली म्हणून आम्हांला कोण आनंद व्हायचा.

शाळेत माझे बरेच कौतुक होत असे. मला त्यावेळी बारावे वर्ष चालू होते. या लहान वयात मी इंग्रजी पाचवीत होतो हे एक कारण असावे, शिवाय इंग्रजी, इतिहास आणि उर्दू हे माझे विषय चांगले होते, हे दुसरे कारण असावे. आमचा हेडमास्तर सी पॉलही इंग्रजी छान शिकवी. पण त्याची शिस्त कडक असे. त्याच्या हिटलर-छाप मिशा मला अद्याप आठवतात. आम्हांला नंतर कळले की तो बी. ए. पास झाला नसताना बनावट सर्टिफिकिटे दाखवून शिक्षण-खात्यात शिरला होता. त्याची लबाडी उघडकीस आल्यावर तो नोकरी सोडून पळून गेला. शाळेत मी छड्या खाल्ल्या नाहीत. पण एका भलत्याच कारणासाठी हेडमास्तरच्या हातचा प्रसाद खावा लागला. तो प्रकार असा :

उस्मानाबादेत एक मुसलमान सतार वाजविणारा राहात असे. तो सतार उत्कृष्ट वाजवी, आमच्या घरी तो मधून मधून येत असे. त्याचे सतारवादन मी ऐकले आहे. या गृहस्थाची एक खोड होती. त्याला वास्कोट म्हणून कुणी हाक मारली की तो चिडत असे. ही गोष्ट लोकांना माहीत झाल्यावर ते त्याला वास्कोट म्हणून हाक मारू लागले. एकदा शाळेच्या मध्यंतरात आम्ही मुले शाळेसमोरच्या आंबराईत बसलो होतो. हा सतारवाला समोरून चालला होता. त्याला पाहताच आमच्यापैकी एकाने वास्कोट म्हणून हाक मारली. ती ऐकताच तो सरळ शाळेत घुसला आणि त्याने हेडमास्तरांपाशी तक्रार केली. शाळेचा शिपाई आम्हांला बोलवायला आला. मुलांनी मला पळून जाण्याचा सल्ला दिला. पण मी जागचा हललो नाही. आम्हा दहा पंधरा मुलांना हेडमास्तरांच्यासमोर जावे लागले. हेडमास्तरांनी मला पुन्हा पुन्हा विचारले, 'खरे सांग, कुणी यांना वास्कोट म्हटले, एकानेच म्हटले असावे. नाव सांगशील तर तुला सोडून देतो' पण मी सर्वांच्यासारखे उत्तर दिले. 'आंबराईत: कुठून तरी आवाज आला. कोण बोलले हे आम्हांला माहीत नाही' झाले, सर्वांच्या बरोबरीने हेडमास्तरांनी

मलाही छड्या लगावल्या. पुढे कित्येक दिवसपर्यंत माझा हात दुखत होता.

माझी मिडल (थर्ड फार्म, इंग्रजी पांचवी)ची परीक्षा संपली. परीक्षा बोर्डाची असल्यामुळे निकाल हैदराबादेहून जाहीर होत. माझे पेपर बरे गेले होते. पण पास होईनच याची खात्री नव्हती. मी रोज न चुकता महादेव, राम आणि मारुती यांचे दर्शन घेऊन देवांना प्रदक्षिणा घालू लागलो. सकाळी आंघोळ करून, कपाळाला गोपीचंदन लावून मी घराबाहेर पडे आणि देवांची दर्शने आटोपून दीड दोन तासांनी परत येई. पुढे हैदराबाद राज्याच्या शिक्षण खात्याचा संचालक म्हणून मी उस्मानाबादेस भेट दिली. ज्या शाळेत मी शिकलो तिची तपासणी करताना मनात जुन्या आठवणींची गर्दी झाली. रामाच्या देवळात माझे व्याख्यान झाले. त्यावेळी परीक्षा पास होण्यासाठी रामाला मी प्रदक्षिणा घालत होतो, याची आठवण होऊन व्याख्यान देता देता माझा गळा भरून आला. उस्मानाबादेस त्यावेळी एक स्वामी आले होते. त्यांच्या दर्शनास मी जात असे. 'रागिणी' कादंबरीतील स्वामीप्रमाणे तेही 'सविकल्प समाधी'च्या प्रयत्नात असत असे मला नंतर कळले. कीर्तनांसही मी हजर राहात असे. मला वाटते मोरोपंतांच्या आर्या आणि वामन पंडिताचे श्लोक यांचा परिचय मला कीर्तनांमधूनच घडला असावा. त्या सुमारास एक बाई कीर्तन करीत असत. कुतूहल म्हणून त्यांच्या कीर्तनाला बरीच गर्दी होई. त्यांनी एकदा गोरोबा कुंभाराचे आख्यान लावले होते. 'गोरोबा कुंभार, तेरढोकीचा राहाणार, घट निर्माण करुनिया, विक्तिसे' या ओळी माझ्या अद्याप स्मरणात आहेत. आम्ही भावंडे गोरोबाचे तेर पाहून आलो. हे गाव उस्मानाबादेपासून दहा बारा मैलांवर आहे. शिलाहार वंशीय राजांची राजधानी खिस्त शकारंभीचे तगर ते हेच गाव असे मला वाटते. ज्ञानदेव, तुकाराम यांची नावे मला त्यावेळी माहीत नव्हती. माहितीतील पहिला मराठी संत म्हणजे गोरोबा असावा. आम्ही तुळजापूरची यात्रा केली होती. त्यावेळी दत्तात्रय माधव कुळकर्णी यांचे 'तुळजापूर-वर्णन' हे पुस्तक आमच्या वाचनात आले होते. या पुस्तकात तुळजापूरबद्दल जुनी माहिती फार कसोशीने एकत्र आणण्यात आली आहे.

परीक्षेचा निकाल लागण्याच्या आधी वडिलांनी ठरविले की मी, माझे बंधू बिंदुमाधवराव, आणि चुलत बंधू व्यंकोबराव यांनी राघवेंद्र स्वामींचे मंत्रालय या गावी जाऊन दोन आठवडे अनुष्ठान करून यावे. आमच्या बरोबर सोबत म्हणून आमच्या मामाला देण्यात आले होते. आम्ही भावंडे मंत्रालयाला जाण्यास नाखुष होतो. पण वडिलांची आज्ञा. तेथे अपीलच नव्हते.

मुंबई मद्रास रेल्वेवर रायचूरच्या पुढे तुंगभद्रा हे स्टेशन आहे. तेथून बारा

मैलांवर मंत्रालय हे गाव तुंगभद्रा नदीवर वसले आहे. आम्हा वैष्णवांचे श्रद्धास्थान राघवेंद्रस्वामी यांची भव्य समाधी (समाधीला वृंदावन म्हणतात) मंत्रालयला आहे. समाधीची इमारत प्रशस्त असून अंगणही मोठे आणि विस्तृत आहे. मंदिराला भोवती मोठमोठ्या ओवऱ्या आहेत. गावात एक दोन मोठ्या धर्मशाळा आहेत. गावाला लागूनच तुंगभद्रा नदी वाहात जाते. एकंदरीत तो परिसर अतिशय रमणीय आहे, पण आम्ही सहलीसाठी तेथे गेलो नव्हतो, अनुष्ठानासाठी गेलो होतो. त्यामुळे आमचे खाण्यापिण्याचे अतिशय हाल झाले.

मंत्रालयमधील आमचा कार्यक्रम असा होता. सकाळीं उठून आम्ही तुंगभद्रेवर आंघोळीला जात असू. आंघोळ झाली की राघवेंद्रस्वामीच्या देवळात जायचे. पहिल्या दिवशी समाधीपाशी जाऊन अनुष्ठानाचा संकल्प सोडायचा असतो. मी म्हटले, ' यथाशक्ती सेवा असा संकल्प करू या. ' पण आमचा मामा निरुद्योगी. शिवाय त्याला अनुष्ठान करायचे नव्हते. तो फक्त आमच्यावर देखरेख ठेवण्यासाठी आला होता. त्याने आम्हांला खडसाविले, ' यथाशक्ती नाही, रोज देवळाला एकशे आठ प्रदक्षिणा घालायच्या आणि राघवेंद्र स्तोत्र एकशे आठ वेळा म्हणायचे. ' शेवटी तसाच संकल्प आम्हांला सोडावा लागला.

सकाळीं सातपासून दुपारी एक वाजेपर्यंत आम्ही देवळाला प्रदक्षिणा घालीत असू. आणि प्रदक्षिणा घालता घालता राघवेंद्र स्तोत्र म्हणत असू. प्रदक्षिणा आणि स्तोत्रे संपता संपत नसत. भुकेने आमचे प्राण व्याकुळ होत. आमचा मामा मात्र सकाळीं प्रशस्त फराळ करून देवळात यायचा आणि ओवरीत बसून विड्या ओढीत आमच्यावर ' देखरेख ' ठेवायचा. देवळाभोवती जागजागी पार असून त्यावर लिंबाची झाडे होती. पारावर वाळू पसरलेली असे. एक प्रदक्षिणा आणि एकदा स्तोत्र संपविले की लिंबाच्या काडीने आम्ही वाळूवर आकडा नोंदून ठेवीत असू. लिंबाच्या झाडापाशी आम्ही रेंगाळलो की मामा कडाडून म्हणे, ' हं चला पुढे ! ' डोक्यावर ऊन्ह आणि पोटात भूक अशा स्थितीत एकशे आठ प्रदक्षिणा संपवीपर्यंत आमचे प्राण कंठाशी यावयाचे. आम्हांला मामाचा असा काही राग यायचा म्हणता ! पण करता काय ? दुपारी एक वाजता देवळात पूजा आणि आरती होई. त्यावेळीं आम्ही देवळात हजर राहात असू. पूजेचा थाट मोठा प्रेक्षणीय असे. राघवेंद्र स्वामींच्या समाधीला (वृंदावन) वैष्णव पंथाप्रमाणे गंधाचे पट्टे लावलेले असत. समाधीला अलंकार आणि माळा घालीत. समाधीवरील वस्त्रे म्हणजे भगव्या छाट्या, आरतीच्या वेळी शेकडो भाविक, आमच्यासारखे सेवाव्रत घेतलेले, अंगातील भुते सोडवून घेण्यासाठी जमलेल्या बायका,

अशी शेकडो स्त्री-पुरुषांची गर्दी होई. तो देखावा मोठा प्रेक्षणीय असे.

भुतांनी पछाडलेल्या बायका देवळात येत. राघवेंद्र स्वामींचे तीर्थ त्यांच्या अंगावर शिंपडले की त्या बायकांच्या अंगातील भुते कळवळून जात आणि बायकांच्या तोंडून बोलत, ' मी अमका अमका आहे. माझी वासना अतृप्त राहिली आहे. म्हणून मी हिला पछाडले आहे. मी हिला सोडणार नाही. ' स्वामींचे तीर्थ पुन्हा पुन्हा त्या बाईच्या अंगावर शिंपडण्यात येई. जसे जसे तीर्थ शिंपडावे तशी ती बाई चाबकाचे फटके बसल्याप्रमाणे ओरडू लागे आणि म्हणे, ' मला मारू नका, मी हिला सोडून जातो. ' असे म्हणून ती बेशुद्ध होई. थोड्या वेळाने ती शुद्धीवर आली की तिला घेऊन जात. पुजारी म्हणत, ' आता तिला पुन्हा भूतबाधा होणार नाही. ' अशी कितीतरी उदाहरणे आम्हांला तेथे पाहायला मिळाली. कोड वगैरेसारखे रोग असलेले, नोकऱ्यांतून अगर धंद्यातून बडतर्फ झालेले, घरगुती अडचणींनी पछाडलेले असे कितीतरी लोक तेथे सेवेला येत. म्हैसूर दरबारातील एक गायिका पुट्टम्मा मंत्रालयाला येऊन राहिली होती. आम्हा मुलांना तिने गाणी म्हणून दाखविली.

भुकेले असे आम्ही दुपारी दोनच्या सुमारास आमच्या मुक्कामावर परतत असू. त्यानंतर जेवण. जेवणात नुसता भात असे. पोळी, भाकरी, किंवा पक्वान्न यांचे नाव नसे. जेवणी झाल्यावर थोडी विश्रांती. नंतर मध्वाचार्यांचा भारत-तात्पर्यनिर्णय हा ग्रंथ आम्ही वाचीत असू. संध्याकाळी नदीवर थोडेसे फिरून आल्यावर रात्री आमच्या वाट्याला नुसता फराळ असे. फराळात कालवलेले पोहे देत. आम्ही व्रतस्थ म्हणून रात्रीचे जेवण आम्हांला देत नसत. एक वेळ जेवणावर आम्हांला भागवावे लागे.

भारत-तात्पर्य—निर्णय म्हणजे द्वैतमतस्थापक मध्वाचार्य यांनी लिहिलेले महाभारत. मूळ ग्रंथ संस्कृतात आहे. त्याच्या अनुवादाचे आमच्या घरी पारायण करीत. मंत्रालय मुक्कामी आम्ही हा ग्रंथ वाचून काढला. अगदी पुराणिकांच्या पद्धतीप्रमाणे आम्हांला ग्रंथ वाचावा लागे. मध्वाचार्यांची भाषा रसाळ आणि शैली ओघवती आहे. ग्रंथाचे विवेचन वैष्णव दृष्टिकोनातून केले आहे. आम्हा वैष्णवांच्या मते विष्णू हे परम दैवत. आणि वायू हा त्याचा एकनिष्ठ भक्त. वायूचे तीन अवतार झाले. मारुती, भीम आणि मध्वाचार्य. कारव हे पूर्व जन्मीचे राक्षस. कर्ण हा पूर्वजन्मीचा सुग्रीव. वाली हा अर्जुन. हे राक्षसच पुढे कलियुगात अद्वैती झाले. शंकराचार्य हे पूर्वजन्मीचे मणिमान राक्षस. भीमाने मणिमानचा वध केला. मणिमानने शंकराचार्यांचा अवतार घेऊन अद्वैत वेदान्त हाच खरा वेदान्त होय, असा प्रचार केला, तेव्हा विष्णूच्या आज्ञेने वायूने

मध्वाचार्यांचा अवतार घेऊन आणि द्वैतमताची स्थापना करून शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त खोडून काढला. मध्वाचार्यांच्या महाभारताचा नायक भीम आहे. तोच विष्णूचा म्हणजे श्रीकृष्णाचा अनन्यभक्त. बाकीचे पांडव दुय्यम दर्जाचे. द्रौपदी ही भारती देवीचा अवतार. ही भीमावरच प्रेम करी.

मध्वाचार्य म्हणतात, " द्रौपदी ही पांडवांची पत्नी खरी. पण ती लौकिक अर्थाने. भीमाला सोडून इतर पांडव द्रौपदीशी समागम करीत तेव्हा त्यांचे देहभान हरपलेले असे. त्यांच्या शरीरात भीम प्रवेश करून द्रौपदीचा भोग घेई. धर्म, अर्जुन, नकुळ, सहदेव यांना वाटे की आपण द्रौपदीशी समागम करीत आहोत. या भ्रमातच ते शेवटपर्यंत राहिले. पण खरे रहस्य एक द्रौपदीला माहीत की भीमाला माहीत !

या परकाया-प्रवेशाचा मला आजही उलगडा झालेला नाही.

त्या ग्रंथातील दुसरी गंमत मला आठवते. मध्वाचार्य म्हणतात, " भारतीय युद्धानंतर पांडव हस्तिनापुरात राज्य करीत असता एकदा धर्मराजाने श्रीकृष्णाला विचारले, ' हे भगवन्, आम्हा पांडवांमध्ये एकट्या अर्जुनाच्या नशिबीच फार भटकणे आले. याचे काय बरे कारण असावे ? ' " यावर श्रीकृष्ण काही उत्तर देण्याच्या आधीच द्रौपदीने डोळ्याचा इशारा करून श्रीकृष्णाला गप्प राहण्याची खूण केली. ते रहस्य मध्वाचार्यांनी सांगितले ते असें, "अर्जुनाचे एका बाजूचे वृषण, थोडेसे खाली आले होते. या व्यंगामुळे अर्जुनावर पायपिटीचा प्रसंग आला ! " अशाच अर्थाचा मजकूर भारत–तात्पर्यनिर्णयात त्या वयात वाचल्याचे स्मरते. एक वृषण अधिक खाली लोंबण्याचा आणि पायपिटीचा संबंध काय आणि हे रहस्य सांगण्याची काय आवश्यकता होती हे कोडे मला अद्याप उलगडले नाही !

आठवडा संपत आला तशी आम्हांला आमच्या हालअपेष्टांची अधिकच जाणीव होऊ लागली. एक वाजेपर्यंतची प्रदक्षिणा आणि स्तोत्रे, एकवेळचे साधे सुमार जेवण, यामुळे आम्हीं मेटाकुटीला आलो. मंत्रालयातून सुटका कशी करून घ्यावी याचा आम्ही विचार करू लागलो. शेवटी मी एक युक्ती शोधून काढली.

काही दिवस सेवा केली आणि ती रुजू झाली की राघवेंद्रस्वामी भक्ताच्या स्वप्नात येतात आणि प्रसाद देतात. असे स्वप्न पडले की आपल्याला जाण्यासाठी निरोप मिळाला असे समजावे. मग आपणही आपल्याला स्वप्न पडले असे खोटे सांगून पोबारा करावा, असे आम्ही ठरविले. त्या दिवशी रात्री मी चारच्या सुमारास उठून ओरडू लागलो, ' मामा, बिंदुराव, व्यंकोब, ऐका, ऐका, मला आताच स्वप्न पडले. राघवेंद्रस्वामींची आपल्या सर्वांवर पूर्ण कृपा झाली असून तुम्ही परीक्षा पास होणार, आता तुम्ही घरी परत जा, असा प्रेमळ निरोप

त्यांनी दिला आहे' असे मी त्यांना सांगितले. मी म्हटले, एक मोठे देऊळ होते. देवळाचे शिखर सोन्याचे होते. त्याचे दरवाजे चांदीचे होते. मंदिरात भक्तांची एकच गर्दी होती. आम्हांला मोठ्या कष्टाने वाट मिळाली. आत गेल्यावर राघवेंद्र-स्वामींनी आमच्याकडे प्रेमळपणे पाहिले आणि जवळ बोलावून त्यांनी आम्हांला प्रसाद दिला. मी मामाला म्हटले, "मामा, आता आपण उद्या परत निघायचे. आपले येथील काम झाले आहे." आम्ही भावंडे आनंदाने नाचू लागलो.

मामाला आमच्या कारस्थानाचा संशय आला होता की काय कोण जाणे! त्याने आम्हांला खणखणीतपणे बजाविले की मी तुमचे काही ऐकणार नाही. रावसाहेबांनी (माझे वडील) सांगितले आहे 'मुलांना दोन आठवडे अनुष्ठानाला बसवा. अजून एक आठवडा तुम्ही येथे राहिलेच पाहिजे.' असे सांगून मामा झोपी गेला. आमचे कारस्थान फसले. आणखी आठ दिवस आम्हांला मंत्रालयात काढावे लागले. दुपारच्या जेवणाच्या वेळी आम्हांला घरचे सुग्रास अन्न आठवे आणि आम्हांला रडे कोसळे. आम्ही राघवेंद्रस्वामींची करुणा भाकीत असू, 'स्वामी, आम्ही लहान मुले आहोत, आमच्याने ही उपासमार सहन होत नाही. एक एक वाजेपर्यंतच्या प्रदक्षिणा आमच्याने होत नाहीत. स्वामी, आम्ही मोठे झाल्यावर देहदंडन करून अनुष्ठाने करण्यास सारे आयुष्य मोकळे पडले आहे, त्यावेळी आम्ही मंत्रालयाला परत येऊ आणि महिना महिना अनुष्ठान करू. पण स्वामी, आता आमची सुटका करा.'

शेवटी ते पुढचे सात दिवस संपले. अनुष्ठान संपल्यावर शेवटच्या दिवशी पारणे असते. पारण्यांत राघवेंद्रस्वामींचे आवडते पक्वान्न तळलेले कडबू करून त्यांचा नैवेद्य देण्यात येतो. ज्या सेवेकऱ्यांच्या येथे स्वयंपाकाची सोय नसते, ते पुजाऱ्यांच्या हातात ठरलेली रक्कम देतात आणि ते स्वयंपाकाची व्यवस्था करतात. या प्रकाराला हस्तोदक म्हणतात. त्या दिवशी आम्ही तळलेल्या कडबूंवर यथेच्छ ताव मारला. आयुष्यात आम्ही कधी जेवलो होतो की नाही असे आम्हांला झाले होते.

जेवणी आटोपल्यानंतर आम्ही बैलगाडी तयार केली. लागलीच आम्ही मंत्रालय सोडले. गाडीत बसल्यावर आम्ही मागे वळून देखील पाहिले नाही. न जाणो, राघवेंद्रस्वामी आम्हांला पुन्हा बोलवावयाचे. संध्याकाळी आम्ही तुंगभद्रा स्टेशनवर आलो. स्टेशनचे हिरवे-निळे दिवे पाहून आम्हांला कोण आनंद झाला. पुढे दहा अकरा वर्षेपर्यंत मंत्रालयाला जाण्याचा योग आला नाही.

आम्ही भावंडे उस्मानाबादेस परत आलो. परीक्षेच्या निकालाचे दिवस जसजसे जवळ येऊ लागले तसा मी अस्वस्थ होऊ लागलो. मिडल परीक्षेचे

निकाल हैदराबादेत जाहीर होत आणि वर्तमानपत्रातून येत. रोज पोस्ट ऑफिसजवळ विद्यार्थ्यांची गर्दी जमे. मधूनमधून हैदराबादेहून येणारे कोणी आले की आम्ही त्यांना गराडा घालून निकालासंबंधी विचारीत असू. असेच एकदा बिंदावन नावाचे हैदराबादचे अत्तरविके आमच्या शाळेत शिक्षक होते, ते हैदराबादेहून आले. आम्ही त्यांच्याभोवती गोळा झालो. त्यांनी एकाच वाक्यात आमचा निकाल लावला, " कत्ले आम हो गया, कत्तल झाली आहे. " म्हणजे परीक्षेचा निकाल अतिशय कडक लागला आहे. माझ्या पोटात धस्स झाले. सुदैवाने लवकरच निकाल लागून मी परीक्षा पास झालो. माझे चुलत बंधू व्यंकोबराव मात्र परीक्षा नापास झाले.

मला वाटते आईचे आणि धाकट्या काकीचे पटत नसावे. घरातील कर्त्या पुरुषाची बायको म्हणून आईचा मान अर्थात्‌च मोठा होता. धाकटी काकीही मानी होती. मुलांना घेऊन आपण आपल्या दिराच्या आश्रयाला आलो आहोत, या गोष्टीने ती कष्टी असे. आमच्या घरात मामा आणि मामी राहायला आल्यापासून आईला माहेरची माणसे अधिक जवळची वाटू लागली असावीत. एकदा मामीच्या बाळंतपणाची गोष्ट. आईने डिंकाचे लाडू तयार केले होते. माझ्या चुलतभावानी डिंकाचा लाडू मागितला. कुणीतरी त्यांना नकार दिला असावा. आमच्या वडिलांना ही बातमी लागली. ती सकाळच्या पूजेची वेळ होती. वडील गंध उगाळीत होते. आणि आई चुलीपाशी बसली होती. ' मुलाला डिंकाचा लाडू का दिला नाही ? ' वडिलांनी विचारले. आई म्हणाली, ' बाळंतिणीचे देऊन झाल्यावर देईन. ' वडिलांचा राग अनावर झाला. त्यांनी चंदनाचे खोड आईवर भिरकावले. ते आईच्या हाताला लागले. ती तशीच उठली आणि तिने लाडवाचे भांडे आणून त्यांच्यासमोर आदळले. ती म्हणाली, ' द्या, कुणा-कुणाला लाडू द्यावयाचे ते हवे तितके द्या. '

अशा घटनांमुळे माझ्या आईत आणि धाकट्या काकीत तेढ वाढीला लागली. धाकटी काकी घरातील लहानसहान वस्तू चोरते अशी कुजबूज सुरू झाली. एकदा घरात हळदीकुंकवाचा समारंभ होता. आळीतील अनेक बायका जमल्या होत्या. माझ्या आईचा थाट काही विचारू नका. भरजरी शालू, अंगावर दागिने, नाकात नथ, कमरेला सोन्याचा पट्टा असे किती दागिने सांगावेत. त्यावेळी आई एकोणतीस-तीस वर्षांची असावी. तिने त्या समारंभात घेतलेला उखाणा मला अद्याप आठवतो. " सोन्याचा पट आणि चांदीचे फासे, शोभून दिसती श्रीनिवासराव खासे ". समारंभ थाटात पार पडला. बायका घरोघर निघून गेल्या. यानंतर आईच्या लक्षात आले की आपला एक दागिना हरवला

आहे. तिने एका मांत्रिकाला बोलावून आणले. त्याने काही तरी पूजा केली आणि एका साखळीला एक चप्पल अडकविली. आम्ही घरची मंडळी सगळी जमलो होतो. मांत्रिकाने सांगितले, "दागिना घरातच आहे" असे म्हणून त्याने साखळी हलविली. चप्पल गरगर फिरून थांबली. चपलेचे टोक धाकटी काकी बसली होती तिच्या दिशेकडे थांबले. यावर कोणी काही बोलले नाही. पण आई आणि इतर जमलेल्या बायकांनी परस्परांना सूचक खुणा केल्या. धाकट्या काकीने दागिना चोरला असावा असे त्यांना सूचित करावयाचे होते. माझ्या वडिलांना या गोष्टींचा पत्ताही नसे. पण धाकट्या काकीला अशा गोष्टींनी अतिशय दुःख होई. माझी आई कष्टाळू होती. दिवसभर ती कामाचा रगाडा उचलीत असे. अगदी सकाळी उठून देवपूजेची उपकरणे, समया, नंदादीप, ताटल्या, झारे, वाट्या, यांना चिंच लावून लख्ख धुणे, स्वयंपाकपाणी करणे, ज्वारी दळणे, कुटणे, फराळाचे आणि स्वयंपाकाचे करणे, दहा पंधरा माणसांची धोतरे आणि लुगडी धुणे, अशी ती सारखी कामात गुंतलेली असे. पण ती मानी होती, आणि अतिशय तापट होती. तिला राग आला तर ती काय बोलेल आणि काय नाही याचा नेम नव्हता. धाकटी काकीही कमी मानी नव्हती. अशा परिस्थितीत दोघींचे पटणे कठीण होते. आतापर्यंत निभावले होते ते वडिलांच्या कडकपणामुळे. पण आईच्या माहेरची माणसे उस्मानाबादला (बीड जिल्हा लागूनच होता) सारखी येऊ लागली. माझा मावसभाऊ बंडू, त्याचे वडील ढिगूळकर देसाई, आईचे मावस बंधू गोपाळराव देशपांडे धारुरकर यांना मी प्रथम उस्मानबादेस पाहिले.

याच वेळी माझे चुलत बंधू व्यंकोबराव हे परीक्षा नापास झाले त्यामुळे धाकट्या काकीने उस्मानाबाद सोडून हैदराबादेस बिऱ्हाड करण्याचे ठरविले. मी पुण्याला गेलो असताना तिने माहेरच्या नात्यात लग्न निघाले आहे अशी सबब सांगितली आणि मुलाबाळांना घेऊन ती हैदराबादेस निघून गेली.

माझे वडील बंधू फोर्थ फॉर्म पास होऊन फिफ्थ फॉर्म म्हणजे मॅट्रिकच्या वर्गात गेले. मी मिडल पास होऊन फोर्थ फॉर्म (इंग्रजी सहावी) मध्ये बसलो. माझा वर्गबंधू सदाशिव देशपांडे हा पुढील शिक्षणासाठी पुण्याला गेला. उस्मानाबादचे सिव्हिल सर्जन डॉक्टर बाम यांची मुले भालचंद्र आणि शरच्चंद्र ही पुण्याला शिकत होती. या गोष्टी ऐकून मलाही पुण्याला जावे असे वाटू लागले. यापुढचे उस्मानाबादेतील शिक्षण उर्दू माध्यमातून होते. ते मला थोडेसे जड जाऊ लागले होते. माझ्या वडिलांनाही मी पुढचे शिक्षण पुण्यात घ्यावे असे वाटू लागले. कदाचित पुण्याला माझे जाणे झाले नसते. म्हणून मी उस्माना-

बादच्या हायस्कुलात जाऊ लागलो होतो.

आमच्या वर्गातील एक गमतीची गोष्ट मला अद्याप आठवते. आमचे उर्दूचे शिक्षक अन्सारी हे उर्दूचा धडा शिकवीत होते. मला वाटते ती कविता असावी. कवितेत एके ठिकाणी कत्राये मनी हा शब्द आला. त्याचा अर्थ वीर्यबिंदु असा होतो. मला वीर्य कशाला म्हणतात हेच माहीत नव्हते; मग शब्द कसा समजणार ? मी मास्तरांना म्हटले, 'कत्राये मनी के मानी (अर्थ) क्या ?' शिक्षकांनी माझ्याकडे पाहिले, त्यावेळीं माझे वय बारा वर्षांचे होते. ते म्हणाले, 'ऐसा कत्रा। (बिंदू) जिससे बच्चे पैदा होते हैं.' माझा गोंधळ पाहून वर्गात एकच हशा पिकला.

एक दिवस वर्गातील विद्यार्थ्यांनी अतिशय गडबड माजविली. आमच्या उर्दू शिक्षकांनी आम्हांला शिक्षा करण्याचे ठरविले. वेताची छडी हेडमास्तरांच्या खोलीत ठेवलेली असे. ती आणण्यासाठी शिक्षक वर्गातून बाहेर गेले. ते जाताच माझा वर्गबंधू शंकरराव जाधव (हा पुढे हैदराबादेस प्रख्यात डॉक्टर झाला) मला म्हणाला, "अरे तू लवकरच पुण्यास जाणार आहेस. मग वर्गात बसून विनाकारण मार का खातोस ? येथून पळून जा कसा." मी मुकाट्याने उठलो आणि वर्गातून निसटलो. घरी आल्यावर मी दोन तीन दिवस सारखा हट्ट करीत होतो की मला पुण्याला जायचे आहे. शेवटी वडिलांनी माझ्या रवानगीची व्यवस्था केली.

गोकुळअष्टमी म्हणजे माझा वाढदिवस. तो उरकून जा म्हणून आई म्हणाली. पण मला पुण्याला जाण्याची घाई झाली होती. मी आदल्या दिवशीच निघालो. वडिलांनी माझ्याबरोबर डांगे नावाचा माहितगार कारकून दिला होता. घर सोडण्याचा खेद आणि पुण्यातील जीवनाबद्दल कुतूहल अशा संमिश्र भावनांतच माझा प्रवास सुरू झाला.

४

पुणे

१९२२ ते १९२५

आठ ऑगस्ट १९२२ रोजी गोकुळ अष्टमीच्या दिवशी मी आणि आमच्या कचेरीतील कारकून डांगे पुण्याला पोहोचलो. डांग्यांनी मला शनिवार पेठेतील एका खानावळींत नेले. तिला मुक्ताबाईची खानावळ म्हणत. ही खानावळ शनिवारवाड्याच्या फुटक्या बुरुजाजवळ होती. मुक्ताबाई ही एक चाळीस पंचेचाळीस वर्षांची विधवा बाई होती. खानावळींत राहण्याचीही सोय होती. जेवणीखाणी झाल्यावर डांग्यांनी मला न्यू इंग्लिश स्कूलच्या वसतिगृहात नेले. ते शनिवार पेठेतील गद्रे वाड्यात होते. आता मुक्ताबाईची खानावळही नाही आणि गद्रेवाडाही नाही. खानावळींची जागा उघडी आहे. आणि गद्रेवाड्याच्या जागेवर आता मुलींच्या हायस्कूलची भव्य इमारत उभी आहे.

मी वसतिगृहात दाखल झालो, त्यावेळी तेथील सुपरिंटेंडेंट कै. माधवराव पटवर्धन (माधव ज्यूलियन) हे होते. त्यांचे सहाय्यक दत्तात्रय लक्ष्मण गोखले (रविकिरण मंडळाचे सभासद) हे होते. वसतिगृहात शेदीडशे विद्यार्थी

होते. माझ्या खोलीत दोन तीन विद्यार्थी होते. जेवण सामुदायिक असे. बहुतेक मुले अंगावरील कपडे न काढता जेवायला बसत. पूजाअर्चा, नैवेद्य, वैश्वदेव, सोवळे-ओवळे या गोष्टी वसतिगृहात कोठून येणार? एक दोन महिन्यांतच आमचे गोपीचंदन, गंधाचे पट्टे, मुद्रा इत्यादींची आणि माझी फारकत झाली. संध्यावंदनही बंद पडले. पुण्याच्या सपक जेवणाची सवय झाली. पातळ भाजी, अळणी वरण, शिरापुरी, भाताची मूद (आमच्या घरी परातीतला भात हाताने ताटात ढकलीत), खोबऱ्याचा कीस विखुरलेली खिचडी, आणि येता-जाता बटाट्याची भाजी हे पुण्यातील जेवणाचे प्रकार होते. आमच्या घरच्या जेवणाची ती पंचपक्वान्ने, पुरणपोळ्या, तळलेले कडबू, वाफेचे कडबू, भेंडीचे कायरस, गव्हाची खीर, मुगाची खीर, सात आठ प्रकारची लोणची इत्यादींची आठवण येऊन मी त्या वयात कितीदा तरी रडकुंडीला आलो असेन. शिरापुरी किंवा पोळी साखर किंवा श्रीखंडपुरी ही काय पक्वाने म्हणावीत! कोरडा शिरा, किंवा पोळीबरोबर नुसती साखर ही घशात उतरावीत तरी कशी! एकदा माझे कसे चालले आहे हे पाहण्यासाठी वडिलांनी आपला शिपाई श्रीपती मोहिते याला पुण्याला पाठविला. त्याला पाहताच मला असे काही भडभडून आले म्हणता! मी त्याच्या मागे लागलो की मला कोठे तरी घेऊन चल आणि आमच्या घरच्या पद्धतीचे जेवण घाल. श्रीपती तरी काय करणार? पुण्यात का वाफेचे कडबू होते, का तळलेले कडबू होते, का गव्हाची खीर होती का मुद्दाभाजी होती. तेथे तर पातळ भाजी आणि अळणी वरण यांची रेलचेल होती.

अभ्यासात मी अगदीच कच्चा होतो. इंग्रजी, फारसी आणि इतिहास या विषयांची मला गोडी होती. पण गणित आणि सायन्स ही नावे ऐकताच माझ्या अंगावर काटा उभा राही. हे विषय मला शेवटपर्यंत कळलेच नाहीत. खरे पाहता इंग्रजी सहावीत बसण्याच्या ऐवजी मी पाचवीतच बसायला हवे होते. उस्मानाबाद हायस्कूलमधील मिडल वर्गाचा अभ्यास म्हणजे अगदीच प्राथमिक स्वरूपाचा होता. थोडेबहुत गणित, जुजबी अल्जेब्रा, तितकीच जुजबी जॉमिट्री (त्यातही थिओरेम्स शिकवीत नसत) असा प्रकार होता. असे असूनही आम्ही कधी जेमतेम पास तर कधी ग्रेस मार्क मिळवून पास होत होतो.

पुण्याला आल्यावर मला तीन जाड पुस्तके देण्यात आली. एक गोखलेज् ॲरिथमेटिक, दुसरे आठवलेज् अल्जेब्रा, आणि तिसरे पीयर पांइटस जिऑमिट्री. ती पुस्तके पाहून माझ्या छातीत धस्स झाले! तीन वर्षे (मॅट्रिकमध्ये मी एकदा आपटी खाल्ली) ती पुस्तके माझ्या उरावर नाचत होती, माझा गळा दाबू पाहात होती आणि मी हताश होऊन इकडे तिकडे पाहात बसत होतो. अल्जेब्रा-

मध्ये 'सपोज एक्स इज द नंबर' असे आमचे करंदीकर मास्तर म्हणाले की माझ्या डोळ्यांसमोर अंधारी येत असे. ते फळ्यावर उदाहरणे सोडवीत. मला त्यातले काही समजत नसे. जिऑमिट्रीत रायडर म्हणजे थ्योरमची उदाहरणे असावीत. मी बरेच दिवस रायडर म्हणजे घोडेस्वार असे समजत होतो. मॅट्रिकच्या परीक्षेत मी फक्त थ्योरम लिहून काढले आणि कसबसा पास झालो. रायडर (घोडेस्वार) च्या नावाला गेलो नाही.

दिवाळीच्या सुट्टीत (१९२२) मी घरी गेलो. महिना पंधरा दिवस पोटभर जेवून घेतले. सुट्टीनंतर मी पुण्याला निघालो तेव्हा माझी मामी इंदापूरला आपल्या माहेरी चालली होती ती माझ्याबरोबर आली.

गाडीतील एक प्रसंग मला आठवतो. माझी मामी स्वभावाने अतिशय प्रेमळ होती. तिच्या चेहऱ्यावर मोठा गोडवा होता. ती सदा हसतमुख असायची. आपला नवरा नादान आणि निरुद्योगी आहे या जाणिवेने ती कष्टी होत असली पाहिजे. पण तिने आपले दुःख कधी बाहेर दाखविले नाही. मला तिचा मोठा ळळा लागला होता. गाडीतून आम्ही प्रवास करीत असताना मी खिडकीतून बाहेर पाहिले. शेतात माणसे काम करीत होती. निवळ खोडकरपणा म्हणून मी खिडकीच्या बाहेर हात काढला आणि हाताची मूठ करून त्या माणसांच्या दिशेने मी मूठ खालीवर केली. असे करणे सदभिरुचीच्या विरुद्ध होते. मामीने ते पाहिले. तिने मला डोळ्याच्या इषाऱ्याने दटावले. तिच्या काळ्याभोर आणि मोठ्या डोळ्यांत प्रेमळपणा आणि लटकी दटावणी यांचा असा काही मधुर संगम झाला होता म्हणता. ती हसून मला हलकेच म्हणाली, 'हं, सेतुराव, असे काय वेड्यासारखे ! तुम्ही मोठ्या घरची माणसे, असे करू नये.' मी ओशाळलो. इंदापूर स्टेशनवर ती उतरली. तीच माझी तिची शेवटची भेट ! काही महिन्यांतच आजारी पडून ती मरण पावली. आजपर्यंत मला तिची आठवण झाली की तिचे शेवटचे शब्द आठवतात 'तुम्ही मोठ्या घरची माणसे.' आयुष्यात माणसांच्या मनावर असंख्य संस्कार होत जातात ते अशा प्रकारे.

आमच्या वसतिगृहाचे सुपरिंटेंडेंट माधवराव पटवर्धन यांचे व्यक्तिमत्त्व मोठे आकर्षक होते. आम्हा विद्यार्थ्यांना ते अतिशय आवडावयाचे. कवितेच्या ओळी गुणगुणताना ते आम्हांला नेहमी दिसत. त्यांची विद्वत्ता, त्यांचे काव्य, त्यांची रसिकता या गोष्टी मला त्यावेळी कशा समजणार ! पण ते कुणीतरी अतिशय मोठे आहेत आणि आपण त्यांच्या वसतिगृहात आहोत हे आपले फार मोठे भाग्य आहे, असे मला वाटे. मी इंग्रजी सातवीत असताना त्यांनी आम्हांला काही इंग्रजी कविता शिकविल्याचे आठवते. गद्रे-वाड्याच्या दिवाण-

खान्यात मी यशवंत कवींना 'आई' ही कविता म्हणून दाखविताना ऐकले आहे. यशवंत, गिरीश इत्यादि मंडळीं माधवरावांच्या मुळे गद्रेवाड्यात जमत वरदा नायडू हिला मी गद्रेवाड्यात दोनचारदा तरी पाहिली आहे. अर्थात पुढे माधवरावांच्या विरुद्ध जे काहूर उठले त्याची आम्हांला त्यावेळी काहीच कल्पना नव्हती. योगायोग पाहा. इ. स. १९५० मध्ये मी हैद्राबादेत घर बांधले त्यासाठी मी जागा विकत घेतली ती वरदाबाईंचे यजमान केशवलू नायडू यांच्याकडून. इ. स. १९४०–१९४३ मध्ये मी तेलंगणात करीमनगरला असताना केशवलू हे तेथील हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. हैद्राबादेत वरदाबाई माझ्या शेजारी राहत असत.

माधवराव वसतिगृहात आम्हांला मधून मधून इंग्रजी शिकवीत. त्यांचे शिकवणे मोठे आस्थापूर्वक असे. आम्हा विद्यार्थ्यांशी त्यांची वागणूक मोठी प्रेमळपणाची असे. त्यावेळीं मी इंग्रजी सहावीत होतो. सहावी आणि सातवी या वर्गांच्या मुलांना आपापल्या खोल्यांतून झोपण्याची परवानगी असे. इतर मुले कॉमन डॉर्मिटरीत झोपत. पण माझे वय लहान म्हणून (मी त्यावेळी तेरा वर्षांचा होतो) मला कॉमन डॉर्मिटरीत झोपण्यास सांगण्यात आले. मला ही गोष्ट आवडली नाही. माधवरावांच्याकडे जाऊन मी तक्रार केली. मला ती गोष्ट अपमानास्पद वाटली. माधवरावांना माझे गाऱ्हाणे सांगता सांगता मला एकदम रडू कोसळले. माधवराव एकदम विरघळले. माझ्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले, 'वेड्या मुला, इतकी लहानशी गोष्ट, मनाला किती लावून घेतोस. बरे जा, आजपासून तू आपल्या खोलीतच झोपत जा पाहू.'

असे होते माधवराव. त्या लहान वयात त्यांच्याबद्दल मला अतिशय आदर वाटे. पुढे कॉलेजमध्ये असताना मी त्यांची उमरखय्यामच्या रुबाया, विरहतरंग, सुधारक, गज्जलांजली ही पुस्तके वाचली.

इ. स. १९३९ मध्ये मी पुण्याला गेलो असताना माधवरावांच्या घरी गेलो होतो. त्यांच्याशी तासभर गप्पा झाल्या. मराठवाड्यातील साहित्यासंबंधी त्यांनी मोठ्या कळकळीने चौकशी केली. तीच माझी आणि त्यांची शेवटची भेट होय.

मी विचार करतो तशी एक गोष्ट जाणवू लागते. माझ्या साहित्यातील रोमँटिक भावनांवर असलेला भर हा माधवरावांच्याबद्दल मला वाटणाऱ्या आदराचा परिणाम आहे. त्यांची विद्वत्ता, त्यांचे फारसी पांडित्य, त्यांचे काव्यात्म व्यक्तित्व याबद्दल मला नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. माधवराव पटवर्धन आणि सेतुमाधवराव पगडी हे मराठीतील दोन फारसी पंडित आहेत असे कोणी म्हटले की माझ्या मनाला सुखद अशा संवेदना होतात.

पुण्याला असताना मंडईत जाऊन अंजिरे खाणे आणि चोरून सिनेमे पाहणे हा माझा आवडता कार्यक्रम होता. त्या काळात रे मार्केट जवळच्या आर्यन सिनेमात अमेरिकन चित्रपट लागत. एकच कथा—उदाहरणार्थ हूडेड टेरर—क्रमशः दाखविली जाई. हा चित्रपट कित्येक आठवडे चालू होता. दर आठवड्याला कथेचा पुढचा भाग दाखविण्यात येई. आठवड्याच्या सुरवातीला थिएटरमध्ये विलक्षण गर्दी असे. त्या काळचे गाजलेले नट आणि नटी म्हणजे डग्लस फेअरब्यांक, मेरी पिकफर्ड, चार्ली च्याप्लिन, ग्लोरिया स्व्यान्सन, नॉर्मा शिअरर, पर्ल व्हाइट (हिला मराठीत मुक्ता ढवळे म्हणत.) ही होती. हूडेड टेररमध्ये पर्ल व्हाइटने नायिकेचे काम केले होते. एके दिवशी मी सर्वांची नजर चुकवून वसतिगृहातून बाहेर पडलो. वेळ दुपारची होती. रे मार्केटमध्ये जाऊन मी माझी आवडीची अंजिरे खाल्ली. आणि घाईघाईने आर्यन सिनेमात आलो. चित्रपट सुरू झाला होता. थिएटरमध्ये अंधार होता. आत गेल्यावर मला एक रिकामी खुर्ची दिसली. मी तिच्यावर बसलो. जवळचे गृहस्थ म्हणाले, 'अहो ही खुर्ची माझ्या मित्राची आहे.' मी म्हटले, 'त्यांना येऊ तर द्या. मग मी खुर्ची रिकामी करीन.' ते गृहस्थ गप्प बसले. थोड्या वेळाने मध्यंतर झाले आणि दिवे लागले. मी त्या गृहस्थांकडे पाहिले. ते होते कवी गिरीश. त्यांनी मला ओळखले. मागे वळून त्यांनी कुणाला तरी हाक मारली आणि म्हटले, 'या माधवराव.' मी वळून पाहतो तो माधवराव पटवर्धन. प्रेक्षकांच्या रांगेतून वाट काढीत ते आमच्याकडे येत होते. भीतीने माझी बोबडी वळली. मी त्यांची नजर चुकवून तेथून पळ काढला.

पुण्यास असताना मला बरेच सिनेमे पाहण्यास मिळाले. इंग्रजी आणि मराठी दोन्हीही. गड आला पण सिंह गेला, महारथी कर्ण, कृष्ण-लीला, जरासंध-वध, इत्यादी चित्रपट पाहिल्याचे मला आठवतात.

गणेशोत्सवाचे मेळे पाहण्यास आम्हांला रात्री वसतिगृहाबाहेर जाण्याची परवानगी असे. यांतूनच मला अद्याप न सुटलेले नाटकाचे वेड लागले. मला वाटते ते १९२२ चे वर्ष असावे. मेळे पाहण्यासाठी म्हणून मी बाहेर पडलो. खिशात आठ बारा आणे होते. फिरत फिरत मी किर्लोस्कर थियेटरपाशी आलो. आणि काय वाटले कोणास ठाऊक, अगदी शेवटच्या दराचे तिकीट काढून मी वरच्या मजल्यावरच्या ग्यालरीत जाऊन बसलो. नाटक सुरू होऊन बराच वेळ झाला होता. नाटक होते गंधर्व नाटक मंडळीचे मृच्छकटिक. मी गेलो तेव्हा बालगंधर्वांचे गाणे चालू होते. 'दासी ऐसे मानुनिया कार्य मला सांगतसे, सुदिन काय उगवला आज मनी वाटतसे.'

त्या दृश्याचा माझ्या मनावर जो परिणाम झाला, त्याचे वर्णन शब्दांनी करणे अशक्य आहे. आज त्या गोष्टीला सत्तेचाळीस वर्षे झाली आहेत. पण बालगंधर्वांनी उभी केलेली वसंतसेना अद्यापही दृष्टीसमोरून हलत नाही. त्या नाटकाने मला एका अद्भुत जगात नेऊन सोडले. त्या दिवसापासून मी पुण्यात होतो तोपर्यंत, चोरून अगर उघड, नाटके पाहण्याची एकही संधी दवडली नाही. आप्त-इष्ट पुण्यात आले तर त्यांना नाटक दाखवायचे आहे म्हणून, नाही तर दुसरे काही तरी निमित्त सांगून मी होतो तोपर्यंत पुढील नाटके पाहिल्याचे मला आठवते. गंधर्व नाटक मंडळींची मृच्छकटिक, स्वयंवर, एकच प्याला, बलवंत संगीत मंडळीचे भावबंधन, ललित कलादर्शचे सत्तेचे गुलाम, राणे नाटक मंडळींची संत तुकाराम, गुलबकावली, झाशीची राणी, यशवंत संगीत मंडळींची सौभद्र, चलती दुनिया, भास्यांच्या कंपनीचे पंजाब मेल, महाराष्ट्र नाटक मंडळींची शिवसंभव, बेबंदशाही, राजाचे बंड इत्यादि.

या दोन अडीच वर्षांच्या काळात मी नाटकाच्या जगात अगदी गुंगून गेलो होतो. बालगंधर्वांची गाणी—मानस का बधिरावे, अजि लागे हृदयी हुरहुर, मम आत्मा गमला हा, नाथ हा माझा, करिन यदुमनि सदना, चंद्र चवथिचा, कृष्णरावांचे लपविला लाल, ललना मना, मास्टर दीनानाथाचे कठिण कठिण किती पुरुषहृदय बाई, दळवीचे अजि हौस जिवीची पुरवा, सरनाइकाचे अरसिक किती हा ग शेला, पुष्पपराग सुगंधित—अशी एक की दोन, असंख्य गाणी अद्याप कानात घुमत असल्यासारखी वाटतात. ते स्वर्गीय संगीत आमच्या पिढीप्रमाणे माझेही स्मृतिधन आहे. बालगंधर्व, मास्टर कृष्णराव, चिंतामणराव कोल्हटकर, औंधकर, बापूराव पेंढारकर, सरनाईक, नानासाहेब चाफेकर, नानासाहेब फाटक, वालावलकर, कामण्णा, रानडे, इत्यादि नटांची कामे आम्हांला पाहायला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

१९२३ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मी उस्मानाबादेस गेलो होतो. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव हे त्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा नापास झाले. ते गुलबर्ग्याच्या हायस्कूलमध्ये दाखल झाले. सुट्टी संपल्यानंतर मी पुण्याला आलो. आणि वडिलांची बदली उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा या तालुक्याच्या गावी झाली. सप्टेंबर महिन्यात माझे आई-वडील यांनी आम्हा सर्वांना घेऊन तिरुपतीची यात्रा केली. या यात्रेमुळे मला प्रथमच रेणीगुंठा, गुंतकल, गोविंदराजपट्टण, तिरुपती ही गावे पाहण्यास मिळाली. तिरुपतीला नवरात्रांत रोज उत्सवमूर्तीची निरनिराळ्या वाहनांवरून मिरवणूक काढतात. तिरुपतीतील व्यंकटेशाची मूर्ती भव्य आहे. पाताळगंगा, पद्मावतीचे देऊळ ही स्थळेही

पाहण्यात आली. मद्रासकडील लोकांच्या राहणीची या यात्रेमुळे मला चांगलीच कल्पना आली.

यात्रेत आम्ही आमच्याबरोबर कोडंगल येथे असताना आमच्यापाशी असलेला आमचा स्वयंपाकी सीनाप्पा याला बरोबर नेला होता. सीनाप्पाचे वय त्यावेळी साठ वर्षांचे तरी असावे. त्याने एक बाई बाळगली होती. तिचे नाव रंगम्मा. तिचे वय वीस एक वर्षांचे होते. ती दिसायला मोठी गोड होती. आम्ही मुले तिच्या भोवती पिंगा घालीत असू. सीनाप्पाने आपली बाई यात्रेत बरोबर आणावी हे वडिलांना आवडले नाही. पण करतात काय? त्यांना गप्प बसावे लागले. सीनाप्पाचा स्वयंपाक मोठा उत्कृष्ट होत असे. विशेषतः त्याच्या हातच्या पुरणाच्या पोळ्या आम्हांला भारी आवडत. सीनाप्पाची धडपड अशी की आपली तरुण रखेली आपल्या कंट्रोलमध्ये राहावी. पण ती तरुण पोरगी त्याला काय दाद देते? त्या जोडप्याची नेहमी कुरकुर चाले. ती पाहून आम्हाला मोठी मौज वाटे.

तिरुपतीच्या यात्रेहून मी सरळ पुण्याला परत आलो. त्या वर्षी दिवाळीच्या सुट्टीत मी परंड्याला गेलो नाही. पुण्यालाच राहिलो. मध्ये आठ दिवसांसाठी मी मुंबईला आलो होतो.

इ. स. १९२३ सालीं मी प्रथमच मुंबई पाहिली. माझा खेर नावाचा मित्र होता. त्याचे बंधू मुंबईला शिक्षक होते. खेरबरोबर मी मुंबईला आलो. गिरगावात नोगी कंपनीच्या दुकानापासून जवळच हमरस्त्यावरच्या एका घरात उतरल्याचे मला आठवते. आयुष्यात मी प्रथमच समुद्र पाहिला तो मुंबईत. त्यावेळी समुद्र चर्चगेट स्टेशनच्या अगदी जवळ असावा. ट्राम हाही एक नवीनच अनुभव होता. मुंबईत सिनेमा पाहिला तो अद्याप आठवतो. सती सरदारबा हे त्या सिनेमाचे नाव.

सरनाइकाचे सौभद्र नाटक मी मुंबईला पाहिले. ते बहुतेक ऑपेरा हाऊसच्या थियेटरमध्ये असावे. या नाटकात करंदीकर नावाच्या नटांनी अर्जुनाचे काम केले होते. काय झाले कोणास ठाऊक, शेवटच्या अंकात करंदीकर हे काम करीत असता प्रेक्षकांमधून कोणीतरी त्यांच्यावर कचरा भरलेले भेंडोळे फेकले. ते त्यांच्यापाशी जाऊन पडले. करंदीकरांनी डोळे वटारून प्रेक्षकांकडे पाहिले. ते दृश्य मला अद्याप आठवते.

इ. स. १९५१–५२ मध्ये मी औरंगाबादेस कलेक्टर असताना गंधर्व नाटक मंडळी तेथे आली होती. बालगंधर्व मला भेटले. त्यांना जाण्यायेण्यास आणि इतर कामासाठी मी माझी गाडी दिली. त्यांचे विद्याहरण आणि सौभद्र ही

नाटके पाहिली. विद्याहरणात त्यांनी देवयानी आणि सौभद्रात अर्जुन या भूमिका केल्या. मला वाटते गौहर बाईनी सुभद्रेची आणि बापूराव माने यांनी रुक्मिणीची या भूमिका केल्या असाव्या. लोळत कच मुखमधुवरि हे गाणे रंगमंचावर चालू होते. बालगंधर्वांच्या देवयानीच्या भूमिकेकडे मला पाहावेना. मी डोळे मिटून घेतले. माझ्या डोळ्यांसमोर पुण्याला पाहिलेल्या बालगंधर्वांच्या वसंतसेना, रुक्मिणी आणि सिंधू या भूमिका उभ्या राहिल्या. त्याच काळात मी वावरत होतो. त्यावरच मी संतुष्ट आहे. मास्टर दीनानाथ, सरनाईक, बालगंधर्व, टिपणीस, बापूराव पेंढारकर, चिंतामणराव कोल्हटकर इत्यादींनी आमच्या-सारख्या हजारो माणसांना नाट्यवेडे केले. लाखो मध्यम वर्गीयांच्या जीवनात त्यांनी आनंदाचे क्षण निर्माण केले. ही मंडळी धन्य आहेत. कृतार्थ आहेत.

वसतिगृहात इंग्रजी चौथीपासून सातवीपर्यंत शिकणारे विद्यार्थी होते. महाराष्ट्रातील सर्व भागांतून ही मुले आली होती. याशिवाय हैदराबादेहून रेड्डी समाजाचे बरेच विद्यार्थी होते. एल. आर. पाटील, वकील पुसद, आर. डी. ऊर्फ राजाभाऊ देशपांडे उमरावती, कवि मनमोहन नातू, वसईचे गोविंद-राव बर्वे, भाजे येथील चितळे, पाध्ये, प्रभुणे, आठल्ये, बाम, असे कितीतरी मित्र आठवतात. वसतिगृहात राहिल्यामुळे मला मित्रांत मिळून-मिसळून राहण्याची सवय झाली. स्वभावातील एकलकोंडेपणा बराच कमी झाला. स्पृश्यास्पृश्य, सोवळे-ओवळे; वैष्णव मताबद्दलचा आत्यंतिक अभिमान या गोष्टी बऱ्याच प्रमाणात मनातून नाहीशा झाल्या.

आमची शाळा नानावाड्यात होती. शाळेचे सुपरिंटेंडेंट गोपाळराव तुळपुळे हे होते. यांची शिस्त कडक असे. शाळेतील शिक्षकांत पप्पू हे आम्हांला इंग्रजी आणि इतिहास शिकवीत, मल्हार हरि गोखले हे इंग्रजी शिकवीत, आपटे इंग्रजी शिकवीत, मसूरकर भूगोल शिकवीत, आठल्ये गणित शिकवीत, करंदीकर अल्जिब्रा शिकवीत, फारसी एक मौलवीसाहेब शिकवीत.

मला इंग्रजी आणि इतिहास या विषयांत गोडी असे. आयुष्यातील मी वाचलेली पहिली इंग्रजी कादंबरी म्हणजे वाल्टर स्कॉटची ऐव्हानो ही होय. इंग्रजी सहावीत ते पुस्तक आम्हांला टेक्स्ट बुक होते. सातवीत ऑप्शनल इंग्लिशमध्ये पप्पू मास्तर आम्हांला कॉनन डॉइलची व्हाईट कंपनी ही कादंबरी शिकवीत. सातवीत टेल्स ऑफ इंडियन शिव्हलरी, हे पुस्तक होते. याशिवाय पुण्यास असताना चार्लोटी ब्रॉंटचे यंग ड्यूक, सदेचे नेल्सन चरित्र ही इंग्रजी पुस्तके वाचल्याचे मला आठवते. शेक्सपीयरच्या रोमियो ज्युलियट या नाटकातील काही प्रवेश आम्हांला होते. वसतिगृहाच्या वार्षिक संमेलनात मी

रोमियोच्या नोकराचे काम केले होते. ज्यूलियटच्या प्रेतावर घालण्यासाठी त्याला फुले द्यावयाची असतात. ती फुले मी द्यावयाची. प्रवेशापूर्वी मी व्यवस्थापकांना फुले मागितली. पण प्रत्येक जण आपल्याच तोऱ्यात आणि गडबडीत असल्यामुळे माझ्याकडे कुणीच लक्ष दिले नाही. प्रवेश सुरू झाला. फुले घेतल्यावाचून मला रंगभूमीवर यावे लागले. रोमियो (किंवा ड्यूक पॅरिस असावा) ने मला म्हटले "आण रे फुले" तेव्हा मी माझा उजवा तळहात त्याच्यासमोर धरला, आणि मधले बोट उभे करून म्हटले, "हियर, माय लॉर्ड आर दि फ्लॉवर्स." प्रेक्षकांची हसून हसून मुरकुन्डी वळली.

इंग्रजी कविता त्या काळात वाचण्यात आल्या त्यांपैकी टेनिसनचे इनक आर्डन, गिनीव्हियर, वर्डस्वर्थचे हॅपी वॉरियर, कौपरचे (मला वाटते) मूर मूर दिब्राजे, ईग्यालंट क्रू, या आठवतात. इतिहासात आम्हांला इंग्लंडचा इतिहास, आणि हिंदुस्थानचा इतिहास शिकवीत. हे दोन्ही माझ्या आवडीचे विषय होते. इंग्रजीच्या शिक्षकांत मला आरोळे, गोखले आणि आपटे, आणि पप्पू हे आठवतात. गोखल्यांना वाक्यावाक्यामागे यू नो व्हाट असे म्हणण्याची सवय होती. एका तासात ते हे शब्द किती वेळा उच्चारतात याची आम्ही नोंद ठेवीत असू. त्यांनी शंभराचा आकडा गाठला की आम्ही सेंच्युरी सेंच्युरी म्हणत टेबलावर हात आपटीत असू. आपट्यांचे शिकविणे नाट्यपूर्ण असे. धडा सुरू करताना आदल्या दिवशीचा धड्याचा संदर्भ ते आकर्षक पद्धतीने करून देत. उदाहरणार्थ, ते म्हणत, 'काल आपण बिचाऱ्या तुळशीला चितेजवळ सोडली होती, तिचे पुढे काय झाले ते ऐका.' पप्पू हेही इतिहास शिकविताना इतिहास हे एक नाटक असल्याप्रमाणे शिकवीत. ते म्हणत, 'पडदा उघडतो आणि आता रंगभूमीवर आपल्याला वॉरन हेस्टिंग्स दिसू लागतो.'

वर्गातील ओळखीच्या मुलांपैकी मेजर शंकर चाफेकर आणि वसंत खेडकर (भूगर्भशास्त्रज्ञ) यांनी पुढील आयुष्यात नाव कमावले. शंकर चाफेकर हा अतिशय खेळकर, खोडकर आणि विनोदी असा होता. शिक्षकांना विचित्र प्रश्न विचारून तो वर्गात विनोद निर्माण करी, कधी तो जेमतेम मांडी झाकेल इतकी लहान चड्डी घालून शाळेत येई. हैदराबादेस विवेकवर्धिनी नावाची शाळा आहे. तिचा उल्लेख करताना तो विक्रमोर्वशीय शाळा म्हणे. ग्यादरिंगमध्ये तो नाटकात काम करी. होळकर वाड्यातील एका समारंभात त्याने एक प्रवेश केला होता. 'पर-नार विषाचा प्याला' हे त्याचे वाक्य मला अद्याप आठवते.

आमच्या वर्गात वयाने मोठी असलेली मुले बरीच होती. अशाच एका मुलाला मास्तरांनी म्हटले, "अहो, तुम्हाला मिशा आल्या आहेत. तुम्हांला

आम्ही शिक्षा तरी कशी करावी ? " त्या मुलाने उत्तर दिले, " त्यात काय आहे ! तेवढीच अडचण असली तर उद्या काढून येतो. "

शिक्षक चांगले पण आम्हीच सायन्स आणि गणित या विषयांत कच्चे होतो त्याला काय करावे ?

एकदा सहामाही परीक्षेत मी जॉमिट्रीचा पेपर सोडवीत होतो. आम्हांला पायथागोरसचा थ्योरम सोडवायचा होता. तो मला काही केल्या आठवेना. माझ्यासमोर बाम म्हणून माझा मित्र बसला होता. सुपरवायजरचा डोळा चुकवून मी त्याचा पेपर ओढून घेतला आणि भराभर थ्योरम लिहून काढला. बाम सारखा पुटपुटत होता, " अरे, माझा पेपर लवकर दे " इतक्यात सुपरवायजर आमच्या बाजूने येतो आहे असे पाहून त्याने आपला पेपर माझ्या हातातून हिसकावून घेतला. अरे देवा ! मी थ्योरम लिहिला खरा, पण आकृती काढू शकलो नाही. ती मला आठवेना. ड्राइंगमध्ये माझी मजल उंदीर आणि कपबशी यांची चित्रे काढणे यापलीकडे कधीच गेली नाही. मी बामची विनवणी केली की दोन मिनिटांसाठी तुझा पेपर दे. मी आकृती तेवढी काढून तुला पेपर परत देतो. पण रामाचे नाव ! तो पेपर देतो कशाला ! इतक्यात घंटा वाजली आणि सुपरवायजरने आमचे पेपर गोळा केले. मला एकोणीसच्या ऐवजी नऊ मार्क मिळाले. बामला एकोणतीसच्या ऐवजी एकोणीस मिळाले. मास्तरांनी आम्हा दोघांना बोलाविले आणि माझा कान पकडून म्हटले, " पगडी, गाढवा, कॉपी करायलाहि अक्कल लागते. " यावर मी काय बोलणार ?

गणिताच्या बाबतीतही आमचे असेच बारा वाजत. जमाखर्च, वजाबाकी, गुणाकार, भागाकार हे मला जमत. पण त्रैराशिक, पंचराशिक, काळ-कामवेग इत्यादी प्रकार मला उमगलेच नाहीत. दोन माणसे चार दिवसांत एक काम करतात तर दहा माणसे तेच काम किती वेळात करतील, असे एखादे उदाहरण समोर आले की मला लगेच वाटायचे की उगीच तुम्ही त्या लोकांच्या मागे लागता. तुम्हाला इतर उद्योग नाहीत की काय ! वर्गात एकदा असेच एक वाह्यात उदाहरण मास्तरांनी दिले. उदाहरणाचा तपशील मला आठवत नाही. पण त्याचे स्वरूप काहीसे पुढीलप्रमाणे होते : समजा, पाण्याचे एक टाके आहे. त्याला खाली एक भोक आहे. भोक उघडले तर भरलेले टाके रिकामे होण्यास इतका वेळ लागतो. बरे, भोक बंद करून वरून नळ सोडला तर रिकामे टाके भरण्यास इतका वेळ लागतो. तर एकाच वेळी नळ सोडला आणि भोकही उघडले तर टाके किती वेळात भरेल हे सांगा.

आता कुणीही सांगावे की पाण्याचा हा अपव्यय म्हणजे किती अन्यायाची

गोष्ट आहे. पण मास्तरांना त्याचे काय होय ? मी मास्तरांना म्हटले देखील की एकाच वेळी नळ सोडणारा आणि भोक उघडे ठेवणारा माणूस विचित्र असला पाहिजे. 'पुन्हा असे काही म्हणशील तर थोबाडीत खाशील' असे मास्तरांनी आम्हांला दरडावून सांगितले आणि आम्हांला गप्प बसावे लागले. मॅट्रिकच्या परीक्षेच्या आधी मी गणिताची शिकवणी ठेवली होती. जोग नावाचे शिक्षक मला गणित शिकवीत. माझे गणिताचे अगाध ज्ञान पाहून ते रडकुंडीला येत आणि वैतागाने मला म्हणत, "पगडी, पगडी, इट इज टू लेट नाऊ."

मी तरी काय करणार ?

सायन्स हा आणखी एक अवघड विषय ! हाही मला शेवटपर्यंत उमगला नाही. ऑक्सिजन आणि हैड्रोजन मिळून पाणी बनते 'आय विल मेक वॉटर नाऊ' असे आमच्या शिक्षकांनी म्हणताच आम्ही काय हसलो ! ही एकच गोष्ट मला सायन्सबद्दल आठवणीत राहिली आहे. बर्फ वितळतो हे समजायला मला काही महिने लागले. आमची शाळा नानावाड्यात असे. त्या दिवशी शेवटचा तास हा सायन्सचा होता. मास्तरांनी आम्हांला काही प्रयोग करण्यासाठी म्हणून प्रत्येकी बर्फाचा एकेक तुकडा दिला. तो मी मुकाट्याने खिशात ठेवून दिला. हेतू हा की वसतिगृहात गेल्यावर तो खावा. लवकरच शाळा सुटली आणि मी फुटक्या बुरुजावरून गद्रेवाड्याकडे जाऊ लागलो. खिशातला बर्फ वितळून त्याचे गार पाणी माझ्या प्यांटच्यावाटे जमिनीवर सांडू लागले. येणारे जाणारे माझ्या-कडे संशयाच्या नजरेने पाहू लागले. मी अस्वस्थ झालो. माझ्या प्यांटमधून गळणारे पाणी कोठून येत आहे हे मला समजेना. शेवटी मी कसाबसा गद्रे-वाड्यात जाऊन पोहोचलो. खोलीत शिरल्यावर मी दार बंद करून घेतले. आणि बर्फाचा तुकडा काढून खावा म्हणून खिसा चाचपला. पण तेथे बर्फ कोठे ! मग मला समजले की वितळणे हा बर्फाचा गुण आहे. अशा अवघड प्रयोगातून मला हा महत्त्वाचा शोध लागला.

आज त्या गोष्टीला इतकी वर्षे झाली. पण सायन्स तर सोडूनच द्या, पण साध्या तांत्रिक विषयात सुद्धा आम्ही कोरेच राहिलो. अद्याप थर्मामीटर पाहताना मी गडगडतो. घरात दिवे गेले, नळ वाहू लागला, घड्याळ बंद पडले, रेडिओ आपल्याला हव्या त्या स्टेशनावर लावायचा असला तर मुले ही कामे करून देई-पर्यंत मी स्वस्थ बसून राहतो. फार काय, पेनमध्ये स्वतः शाई भरण्याचे मी शक्य तितके टाळतो. लिहिण्याच्या बाबतीत मी एक मोठा शोध लावला आहे. शाईची दऊत जवळ असली तर फाउंटनपेन भरून घेण्याची जरूर नाही. पेन शाईतून बुचकळून लिहिणे यासारखी सोपी गोष्ट नाही. लेखकांनी प्रयोग

करून पाहावा.

मराठी मी कोणत्याही शाळेत शिकलो नव्हतो. घरी मोडी कित्ते गिरविले आणि बालबोध लिहिता वाचता येऊ लागले. महाभारत, रामायण, भागवत हे ग्रंथ मी पूर्णपणे वाचून काढले. त्यामुळे मला मराठी वाचनाचा नाद लागला, पण मला मराठी नीट बोलता येत नसे. मराठी लेखन वडिलांना पत्रे लिहिण्या-पुरतेच मर्यादित होते. मराठी व्याकरणाचा तर मला गंधही नव्हता. वसतिगृहात मराठी घेतलेले विद्यार्थी कधी कधी व्याकरणाच्या गोष्टी बोलत. त्यामुळे व्याकरणाबद्दल माझ्या विचित्र समजुती झाल्या होत्या. भावे प्रयोग म्हणजे भावे नावाच्या माणसाने मराठीवर केलेला प्रयोग, षष्ठी म्हणजे हजामत. सामान्य रूप म्हणजे साधे सौंदर्य, धातू म्हणजे लोखंड, तांबे इत्यादि, नाम म्हणजे 'गोड तुझे रूप, गोड तुझे नाम' पैकी परमेश्वराचे नाव. भुतकाळ भूतांचा काळ. भूतभूत म्हणजे मुलांना भीती दाखविण्यासाठी केलेला शब्दप्रयोग, अशा या वेळीं माझ्या समजुती होत्या. पुण्याला आल्यावर माझे मराठी बोलणे सुधारू लागले. मराठी वाचनही बरेच होऊ लागले. वसतिगृहात एक सामान्य ग्रंथालय होते. त्यात मिळाली ती मराठी पुस्तके वाचून काढली. काही विकत घेतली, काही उस्मानाबादेत सुट्टीत गेलो असताना वाचली. मला वाटते पुण्याला असेपर्यंत मी शंभर एक मराठी पुस्तके वाचली असावीत. काही पुस्तकांची नावे आठवतात ती अशी : नाथमाधवांच्या स्वराज्यावरील सगळ्या कादंबऱ्या. वीरधवल व देशमुखवाडी, डॉक्टर कादंबरी, रायक्लब अथवा सोनेरी टोळी, सावळ्या तांडेल. हरिभाऊ आपट्यांच्या पण लक्षात कोण घेतो, मधली स्थिती, भयंकर दिव्य, यशवंतराव खरे, मी, उषःकाल, सूर्योदय, सूर्यग्रहण, वज्राघात, चंद्रगुप्त, गड आला पण सिंह गेला, स्फुट गोष्टी. ना. ह. आपट्यांच्या सुखाचा मूलमंत्र, रजपुतांचा भीष्म, वैभवाच्या कोंदणांत, पहाटेपूर्वीचा काळोख. तसेच अरुणोदय, जालियानवाला बाग, जवानमर्द ब्राह्मण भाई, वगैरे कादंबऱ्या चिंतामणराव वैद्यांचे शिवाजी चरित्र, दामल्यांचे बाजीराव मस्तानीवरील "अडीचशे वर्षांपूर्वी", टेरेन्स मॅकस्विनी, नेपोलियनचे चरित्र, सुशील यमुना, सुदाम्याचे पोहे, रासेलस, अरबी भाषेतील सुरस गोष्टी, दुर्दैवी रंगू, आगरकरांचे निबंध अशी विविध प्रकारची पुस्तके वाचल्याचे आठवते. गडकऱ्यांची नाटके सगळी वाचण्यात आली. कोल्हटकरांची वीरतनय, मूकनायक ही नाटके वाचल्याचे आठवते. रूपांतरित कादंबऱ्यांत आजपासून पन्नास वर्षांनी (प्राइड ॲण्ड प्रिज्युडिस), करुणसिंह (ऐव्हानो), संग्रामसिंह (टॅलिसमन), श्वेतांबरा (वूमन इन व्हाईट), माणिकबाग, अनाथ पांडुरंग ही पुस्तके आठवतात. शिवराम महादेव परांजपे यांची विंध्याचल ही कादंबरी याच सुमारास

वाचली. ‘ आर्यतेज ’ ही वाचल्याचे आठवते.

मराठी काव्यही या सुमारास माझ्या वाचनात आणि ऐकण्यात आले. रविकिरणचे वीणाझंकार, अनंततनयांचा कवितासंग्रह, कवी विनायकांचा कवितासंग्रह वाग्वैजयंती, ही पुस्तके आठवतात. गडकऱ्यांच्या राजहंस माझा निजला, गुलाबी कोडे, कृष्णाकाठी कुंडल, महाराष्ट्रगीत या कविता मी गुणगुणत असे. रहस्यकथांमध्ये सोनेरी खंजीर ही कादंबरी मला फार आवडली.

त्या वयात मला काल्पनिक आणि वास्तविक यांतील भेद कळत नसे. ‘ मनोरंजन ’ मासिकात एखादी गोष्ट वाचली की ती सत्यकथा असावी असे वाटे. उदाहरणार्थ, एका गोष्टीत असे काही तरी वाक्य होते, ‘ वाचक हो, आमच्या कथानायकाचा टांगा सदाशिवपेठ घरनंबर पाचशे दहासमोर थांबला. ’ मला वाटे तो कथानायक खरोखरीच त्या घरात राहात असावा. मी व्यायाम म्हणून नेहमी पर्वतीला जात असे. वाटेवर सदाशिव पेठेतील ते घर हुडकून काढण्याचा मला काही दिवस नादच लागला होता. ‘ मौन-यौवना ’ कादंबरीची नायिका अद्याप दिल्लीला राहात असली पाहिजे असे मी कित्येक दिवस समजत होतो. राम गणेश गडकरी कोण हे मला बरेच दिवस माहीत नव्हते. एकदा मनोरंजन मासिकात ‘ भिकार कोकणात ’ ही गोष्ट माझ्या वाचण्यात आली. त्या गोष्टीत रामकृष्णपंत गडकरी नावाचे पात्र होते. मला वाटले एकच प्याला लिहिणारे गडकरी ते हेच आणि मी माझ्या मित्रांना सांगू लागलो, ‘ अरे रामकृष्णपंत गडकरी काय छान लिहितात. बिचाऱ्यांना भिकार कोकणात काय त्रास झाला ! ’ मुले म्हणत, ‘ अरे हे रामकृष्णपंत गडकरी कुठले ? ’ मी म्हणे ‘ अरे त्या भिकार कोकणात ’ या गोष्टीतले. मुले हसत आणि म्हणत, ‘ अरे, ती गोष्ट आहे. ती खरी नसते. ’

बाहुलीच्या हौदाजवळ गोभक्त गाणी म्हणत आणि चोपडी विकीत. एका चोपड्यात गाईला वाचा फुटून ती मला मारू नका असे कसाबांना म्हणते आहे अशा अर्थाची कविता होती. पुढे कित्येक दिवसपर्यंत ती गोष्ट खरीच असावी असे मी समजत होतो !

फडक्यांची ‘ कुलाब्याची दांडी ’ ही कादंबरी मला वाटते मी एकोणीसशे पंचवीसमध्ये वाचली. ती आठवण्याचे कारण गंमतीचे आहे. कादंबरीत कोठे तरी एक वाक्य आहे ‘ चुंबनाचा चच असा आवाज झाला. ” आपणही असा प्रयोग करून पाहावा अशी मला इच्छा झाली, पण चुंबन घ्यायचे कुणाचे ? शेवटी खोलीचे दार बंद करून मी माझ्या हाताची चुंबनावर चुंबने घेतली आणि त्याचा आवाज कसा होतो याचे प्रात्यक्षिक अनुभवले.

वसतिगृहातर्फे मधून मधून सहली काढण्यात येत. हडपसरची कागदाची गिरणी, सिंहगड, भाजे येथील लेणी, लोहगडचा किल्ला, मळवलीचा रविवर्मा स्टुडियो ही स्थळे मी पाहिली. भाजे येथील लेणी पाहण्यास गेलो, त्यावेळी आम्ही चितळे यांच्या घरी उतरलो. तेथे मी प्रथमच तांदुळाची भाकरी खाल्ली. त्या दिवशी दुपारी आम्ही एका टेकडीवर बसलो होतो. समोर रेल्वेचे रूळ दिसत होते. एकाच वेळी दोन गाड्या जाऊ शकतील असे डबल रूळ घातले आहेत याची मला कल्पना नव्हती. मी पाहातो तो मुंबईकडून एक आणि पुण्याकडून एक अशा गाड्या येत होत्या. मला वाटले, आता यांची टक्कर होणार. मी भीतीने डोळे हातांनी झाकून घेतले. माझ्याजवळ वसईचा गोविंद नारायण बर्वे बसला होता. त्याला माझ्या वागणुकीने हसू आले. गाड्या निघून गेल्यानंतर त्याने मुंबई आणि पुणे यांच्या दरम्यान डबल रूळ घातलेले असतात म्हणून सांगितले, तेव्हा कोठे माझे समाधान झाले. दोन तीन वर्षांपूर्वी मी व्याख्याना-साठी वसईला गेलो असताना गोविंदराव बर्व्यांनी मला लहानपणची ही आठवण सांगितली, तेव्हा मला मौज वाटली.

वसतिगृहात मधून मधून वार्षिकोत्सव, व्याख्याने इत्यादि समारंभ होत, शाळेतही व्याख्याने होत; पण कमी. मी असताना मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन, भास्करराव जाधव इत्यादींनी शाळेला भेटी दिल्याचे आठवते. फर्ग्युसन कॉलेजमध्ये श्रीनिवासशास्त्रींचे व्याख्यान ऐकण्यास आम्ही मुले गेलो होतो. शास्त्रींच्या सोज्ज्वळ व्यक्तिमत्त्वाचा आणि अस्खलित वक्तृत्वाचा मनावर मोठा प्रभाव पडल्याचे मला आठवते. असेच एकदा वाडिया थियेटरमध्ये कोण्या एका इंग्रजाने शेक्सपीयरच्या नाटकातील प्रवेश करून दाखविले होते. त्या कार्यक्रमाला मी हजर होतो. इरावतीबाई कर्व्यांना मी प्रथम तेथे पाहिल्याचे आठवते. मुलांचा आरडाओरडा, शिट्या फुंकणे, कागदी बाण फेकणे हे प्रकार पाहून मी गोंधळून गेलो. सरनाइकांचे गाणेही मी वाडिया थियेटरमध्ये ऐकले आहे.

फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात (त्याला रेसिडेन्सी म्हणत) हैदराबादचे अनेक विद्यार्थी राहात. त्यांच्या वार्षिक संमेलनाला आम्ही हैदराबादची मुले गेलो होतो. भोजनात कोण किती जास्त जिलब्या खातो याच्या स्पर्धा चालत. मला आठवते वीरा रेड्डी आणि भीमसेनराव कुद्रीमोती (पुढे हैदराबाद सी. आय. डी. चे नायब संचालक) यांनी प्रत्येकी साठ साठ जिलब्या खाल्ल्या. फर्ग्युसन कॉलेजचे वातावरण मला मोठे आकर्षक वाटे. त्यावेळी मुले पी. वाय. देशपांडे आणि विमल कोल्हटकर आणि कवि अनिल आणि कुसुम जयवंत यांच्याबद्दल बोलत असत. प्रेमात पडणे म्हणजे काय हे मला त्यावेळी समजत

नसे. अर्थात् तो अनुभव मला स्वतःला आला, तेव्हा त्या शब्दांचा अर्थ मला कळला.

वसतिगृहात आमचे सुपरिंटेंडेंट माधवराव पटवर्धन आणि त्यांच्यानंतर आलेले प्राध्यापक व्ही. ए. आपटे हे नामांकित लोकांची व्याख्याने घडवून आणीत. गद्रेवाड्यात मी डॉक्टर शिखरे, ज्ञानप्रकाशचे आंबेकर, एस. आर. कानिटकर, रँग्लर महाजनी, राघवेंद्र शर्मा यांची व्याख्याने ऐकली आहेत. यशवंत, गिरीश, डी. एल. गोखले हे रविकिरण मंडळाचे सदस्य यांच्या कविता ऐकायला मिळाल्या. र्‍यांग्लर महाजनींना आशानिराशा नाटकातील पद ' हजरत सलाम घ्यावा ' हे गुणगुणताना मी ऐकले आहे. ग्यादरिंगमध्ये चंद्रग्रहण नाटकातील काही प्रवेश करण्यात आले. त्यात मी भाग घेतला होता.

वसतिगृहात लोकमान्यांचे नाव उच्चारण्याची चोरी असे. लोकमान्यांच्या पुतळ्याचे अनावरण मोतीलाल नेहरूंनी केले. त्या समारंभाला हजर राहिल्या-बद्दल माझ्या काही मित्रांना छड्या मारण्यात आल्या. या मंडळींचा लोकमान्यांवर इतका राग का हे त्या वयात मला समजले नाही. एका सभेत मला राजगोपाला-चारी, अली बंधू आणि बी अम्मा यांची भाषणे ऐकण्यास मिळाली. राज-गोपाळाचारींच्या भाषणाच्या मराठी अनुवादातील ' विधायक कार्यक्रम ' हे शब्द मला आठवतात. शिवरामपंत परांजप्यांना मी पाहिले. पण त्यांचे भाषण ऐकण्याचा योग आला नाही. शिवाजी मंदिरात मी देशबंधू दास यांना पाहिले. त्यांचे भाषण ऐकले. स्वयंसेवकांच्या रांगेतून धीरगंभीरपणे चालत असलेली त्यांची मूर्ती माझ्या हृदयावर अद्याप कोरलेली आहे. त्यावेळीं केळकरांचेही भाषण झाले. भाषण आठवत नाही. त्यांचा खोकला आठवतो.

एकंदरीत पाहता आम्हांला राजकारणाचे वारे तीन वर्षांत स्पर्शही करून गेले नाही. देशात काहीतरी मोठा गोंधळ चालू आहे इतकेच वाटत होते. महात्मा गांधींच्यावर पुण्यात त्यावेळी अपेंडिसायटिसची शस्त्रक्रिया झाली. मला या गोष्टीचा पत्ताही नव्हता. चित्रमयजगत्, किर्लोस्कर, रत्नाकर, मनोरंजन ही नियतकालिके आणि नवाकाळ, स्वराज्य, लोकमान्य ही वर्तमानपत्रे (केसरी वाचल्याची आठवण नाही) गद्रेवाड्याच्या शेजारी असलेल्या मराठे यांच्या दवाखान्यात वाचायला मिळत; ती चाळून काय माहिती मिळेल तेवढीच.

आमचे सुपरिंटेंडेंट आपटे यांनी एकदा गद्रेवाड्यात आठवले नावाच्या गृहस्थांचे कीर्तन घडवून आणले होते. आठवले हे आगरकरांचे सहकारी होते, असे आम्हांला कुणीतरी सांगितले. कीर्तनासाठी त्यांनी सामाजिक विषय निवडला असावा. इंग्रजीमिश्रित मराठीचे एक उदाहरण त्यांनी दिल्याचे मला

आठवते. ‘ मिस्टर नानाभाई, तुम्ही जो धाडिलात सर्व्हेंट, गुड फॉर नथिंग आहे, दुसऱ्याची आहे आम्हा वॉंट. ’

वसतिगृहात काय किंवा शाळेत काय आम्हाला पद्धतशीरपणे व्यायाम, वाचन, करमणुकीचे प्रकार, शिकविण्याचे प्रयत्न कोणीच केले नाहीत. पण त्याबरोबरच बाहेर जाण्यायेण्यावर नियंत्रणही कडक नसे. रे मार्केटमध्ये जाऊन अंजिरे खाण्याचा नाद लागला होता. बाहेर हाटेलातून चमचमीत पदार्थ खाण्याची मला चांगलीच सवय लागली होती. मथुराभवनमधील मसाल्याचे दूध, जोगेश्वरी बोळातील गोऱ्यांच्या हाटेलातील चकली, शेव आणि चिवडा, बोळाच्या तोंडाशीच असलेले आइसक्रीमचे दुकान, त्याच्या समोरच्या विश्रांतिगृहातील चहा आणि डबल रोटी ही अद्याप आठवतात. व्यायामाची आवड मला लागलीच नाही. माझा मित्र खंडेराव निंबाळकर याजबरोबर काही दिवस तालीमखान्यात जाऊन दंड बैठका काढून मी हैराण झालो. काही दिवस रनिंगही करून पाहिले. टिळक तलावात जाऊन पोहायला शिकलो. पर्वतीला मात्र मी न चुकता कित्येक महिने जात असे. तेवढाच माझा आवडता व्यायाम होता.

पुण्यातील लोकांना क्रिकेटची विलक्षण आवड. पुण्याला येण्यापूर्वी मला या खेळाची काहीच कल्पना नव्हती. पण पुण्याला आल्यावर ज्याच्या त्याच्या तोंडी क्रिकेट हा शब्द ऐकू येई. पी. वाय. सी. जिमखान्यावर मी क्रिकेटचे बरेच सामने पाहिले. तेथेच मी शकुंतलाबाई परांजप्यांना सायकल हातात धरून शेंगा खात असताना प्रथम पाहिल्याचे आठवते. एकदा क्रिकेटचा चौरंगी सामना पुण्याला क्यांपात झाला. सी. के. नायडू, विठ्ठल, नवले, वजीफदार इत्यादींचे खेळ पाहण्यास मिळाले. मुंबईला सामने होत तेव्हा संध्याकाळी निकाल ऐकण्यासाठी रे मार्केट जवळील रानडे कॉंट्रॅक्टर यांच्या घरावर लोक जमत आणि टेलिफोनवर तासातासांनी येणाऱ्या बातम्या मोठ्या आवडीने ऐकत.

त्यावेळचे पुणे स्वच्छ असल्याचे मला आठवत नाही. पावसाळ्यात रस्त्यावर चिखलच चिखल होई. अरुंद रस्ते आणि गल्ल्याबोळ ही पुण्याची वैशिष्ट्ये. विजेचे दिवे नसावे. म्युनिसिपालिटीचे दिवे आठवतात. वसतिगृहात विद्यार्थी कंदिल वापरत. भोजनगृहात ग्यासच्या बत्त्या असत. रोगराईच्या वेळी रे मार्केटजवळ आज इतकी लागण, इतके मृत्यू असे नोंदलेले कागद फळ्यावर चिकटवीत. शहरात मलेरियाचा उपद्रव होता. नव्या पुलापलीकडे वस्ती अगदी तुरळक होती. जंगली महाराज रोडचे अस्तित्वही नव्हते. देवळांपैकी पर्वती, तुळशीबाग, बेलबाग, अमृतेश्वर ही देवळे गजबजलेली असत. पुण्याचे जीवन

मात्र रसरसलेले असे. व्याख्याने, सभा, संमेलने, नाटके, सिनेमा, गणेशोत्सव, मोहरमचे डोले, असे सदा काही ना काही चालू असे. शनिवार वाड्याजवळचा जुना बाजार तर पाहण्यासारखा असे. तेथे एकदा जादूची अंगठी विकत घेऊन मी फसलो होतो. तसेच चित्रमय जगतातील त्रिकालदर्शी आरशाची (गुण न आल्यास पैसे परत) जाहिरात वाचून मी काठेवाडातून आरसा मागविला. आरसा हिरव्या रंगाचा होता. त्यात मला भूत, भविष्य आढळले नाही. फक्त माझा चेहराच दिसे. आपली फजीती लपवून ठेवून मी काही दिवस माझ्या मित्रांना बनविले. पण शेवटी बिंग बाहेर पडलेच !

१९२४ मध्ये मॅट्रिकची परीक्षा देऊन मी घरी परत आलो. वडील त्यावेळी परंड्याला होते. परंड्याचा भुइकोट किल्ला मोठा प्रेक्षणीय आहे. बहमनी घराण्याच्या काळातील लष्करी वास्तूचा एक उत्कृष्ट नमुना असे या किल्ल्याचे वर्णन करता येईल. परंड्याची वस्ती चार पाच हजारांहून अधिक नाही. गावात पाण्याचा त्रास असे. उन्हाळ्यात दोन दोन मैलांवरून पाणी आणावे लागे. त्यावेळी तालुक्याचे मामलेदार कुंजकिशोरलाल नावाचे गृहस्थ होते. त्यांच्याजवळ बसून एकदा सहज कचेरीचे कामकाज पाहिले. पुढे आपण १९३८ पासून याच तालुक्याचे मामलेदार होऊन येऊ याची मला त्यावेळी कल्पना नव्हती.

कुंजकिशोरलाल यांच्यानंतर सद्‌गुरु नारायण नावाचे कायस्थ गृहस्थ मामलेदार म्हणून आले. त्यांचे बंधू रामचंद्र नारायण यांची दुय्यम तालुकदार (डेप्युटी कलेक्टर) म्हणून नेमणूक झाली होती. रामचंद्र नारायण आणि सद्‌गुरु नारायण यांनी निजामाला पंचवीस हजार रुपये नजराणा म्हणून चारले आणि वरील नेमणुका मिळविल्या, निजामाने त्यांच्या नेमणुकींचा हुकूम लिहिला तो सिगरेटच्या प्याकेटवर (कागद हाताशी नसल्यामुळे), असा त्यावेळी गवगवा झाला होता. आपल्या वडील बंधूंना डेप्युटी कलेक्टरची जागा मिळावी आणि आपल्याला फक्त मामलेदारी मिळावी याचे सद्‌गुरु नारायण यांना मोठे वैषम्य वाटे. पुढे दोघा बंधूंच्यात वितुष्ट आले. सद्‌गुरु नारायण यांनी सरकारात अर्ज केला की नेमणुकीच्या वेळी माझ्या बंधूंचे वय पस्तीस वर्षांचे असताना त्यांनी आपले वय पंचवीस असे दाखवून नेमणूक मिळविली आहे, त्यावेळी माझे वय पंचवीस होते आणि आम्ही काही जुळे नाहीत. सरकारने चौकशी करावी. पण रामचंद्र नारायण यांनी वर काय कळ फिरविली कोण जाणे. सरकारने निर्णय दिला की सद्‌गुरु नारायण यांनी आपले स्वतःचे वय काहीही नोंदवले असले तर त्याला ते जबाबदार आहेत. असे म्हणून सरकारने ते प्रकरण निकालात काढले. मला रामचंद्र नारायण सांगत, ' निजामाने जेव्हा आमच्या नेमणुका केल्या तेव्हा

माझे बंधू मध्यस्थामार्फत पुन्हा पुन्हा विचारू लागले ‘ खरेच का सरकार मला फक्त मामलेदारी देत आहेत ’ यावर निजामाने सांगून पाठविले की ‘ ज्याची जशी योग्यता तशी नोकरी मी दिली आहे. फार ओढून धरू नका. ’ रामचंद्र नारायण म्हणत, ‘ पाहिलेत माधवराव ? निजाम सरकार किती अलौकिक बुद्धिमत्तेचे आहेत. त्यांनी ओळखले, की मी डेप्युटी कलेक्टर होण्याच्या योग्यतेचा आहे. ती योग्यता माझ्या बंधूंच्यात नाही. ’ वास्तविक पाहता दोघेही बंधू हे एकाच माळेचे मणी होते. निजामाला पंचवीसच्या ऐवजी तीस हजार मिळाले असते तर ते दोघेही डेप्युटी कलेक्टर झाले असते.

परंड्यास मी असताना एका महार तरुणाने इस्लाम धर्माचा स्वीकार केला. त्याचे नाव वजीर अली ठेवण्यात आले. एका महिन्याने तो विहिरीवर पोहण्यास गेला असताना उडी टाकताना दगडावर आपटून मेला. आमच्या घोड्याचा मोतद्दार महार होता. तो म्हणाला, ‘ हाडाचा महार. तो मुसलमान झाला तर देवाला कसे आवडावे ? आपल्या करणीने तो मेला. ’ भारतीय मुसलमानांच्या प्रश्नाचा मी गेली चाळीस पंचेचाळीस वर्षे अभ्यास करीत आहे. या अभ्यासाला प्ररणा वरील घटनेने मिळाली असावी असे मला वाटते.

परंड्याला घरात माणसे होती ती म्हणजे आई, वडील, आजी, मामा, आम्ही चार भाऊ आणि दोन बहिणी ही होत. घरी अतिथिअभ्यागत, पुराणिक, कीर्तनकार इत्यादींची ये–जा चालू असे. मी उन्हाळ्याच्या सुट्टीत परंड्यास असताना रमल सांगणारा एक ब्राह्मण आमच्याकडे येऊन राहिला होता. त्याचे रमलविद्येचे प्रयोग पाहून आम्हांला गंमत वाटली. तो पंचावन्न वर्षांचा तरी असला पाहिजे. त्याने या वयात लग्न केले होते. बायको अवघी दहा वर्षांची होती. म्हातारा मोठा रोम्यांटिक होता. तो बायकांच्या गोष्टी करी. मी विचारले, ‘ शास्त्रीबुवा, तुमची बायको इतकी लहान कशी ? ’ तो म्हणाला ‘ हो माझी बायको पारु (पार्वती) दहा वर्षांची आहे खरी, पण रावसाहेब, पिकलेल्या पाडापेक्षा हिरव्या कैऱ्यांची लज्जत काही औरच असते. ’ त्याचे हे उत्तर ऐकून मी थक्कच झालो.

आमच्याकडे उतरणारे सगळेच ब्राह्मण सौजन्यशील आणि विद्वान होते असे नाही. काही ब्राह्मण तर दुर्वासाची आठवण करून देणारे होते. एकदा एक ब्राह्मण दुपारी आमच्या घरी आला. त्यावेळी बायकांची जेवणीखाणी आटोपली होती. आईने ब्राह्मणाला आंघोळीला पाणी काढून दिले, आणि ती पुन्हा स्वयंपाकाला लागली. त्या ब्राह्मणाने म्हणावे काय ? ‘ तुम्हा बायकांना अकला म्हणून नाहीत, कोणी अतिथि-अभ्यागत येतो, त्याची वाट पाहायची

सोडून भराभर जेवणी काय उरकून घेता ! ' या बाबतीत वडिलांची शिस्त फार कडक असे.

घरात काही रंगेल पुराणिकांच्या गोष्टी चालत.

एक रंगेल पुराणिक होते. एकदा एक पुराण सांगत असता त्यांनी एक विधान केले, ' परस्त्रीशी जो संबंध ठेवील त्याला आणि त्याच्या प्रेयसीला परलोकात आगीच्या खांबाला बांधण्यात येईल. ' पुराण श्रवण करणाऱ्यात पुराणिकबुवांची प्रेयसी पण होती. पुराणिकबुवांनी दिलेली माहिती ऐकून ती घाबरली. पुढे रात्री त्यांची एकांतात गाठ पडली. तेव्हा तिने पुराणिकबुवांना म्हटले, ' हं, माझ्या अंगाला हात लावू नका. ' पुराणिकबुवा म्हणाले, ' झाले तरी काय ? ' ती म्हणाली, ' तुम्हीच आज पुराण सांगताना म्हटले ना, की परलोकात आपल्याला अग्नीच्या खांबाला बांधतील म्हणून. ' पुराणिकबुवांनी तिला आपल्याजवळ ओढली आणि हसत म्हटले, ' अग वेडे, आतापर्यंत इतक्या जोडप्यांना खांबाला बांधण्यात आले आहे की खांबातला अग्नी पार विझून गेला आहे. आपल्याला काही धोका नाही. '

संस्कृतचा गंधही नसलेले ब्राह्मण काही थोडे थोडके नव्हते. एका ब्राह्मणाची गोष्ट आम्ही ऐकली ती ही. त्याला मार्जार आणि वृषण हे दोनच शब्द माहीत होते. या दोन शब्दांच्या आधारावर त्याने एका लग्नसमारंभाचे पौराहित्य पार पाडले. वधूवरांना समोर बसवून तो शेवटपर्यंत वरील दोनच शब्द निरनिराळ्या तऱ्हेने उच्चारीत राहिला. वृषणः मार्जारः मार्जारः वृषणः (हं मम म्हणा) मार्जारः वृषणः, मारः जारः (परस्परांना हात लावा) असे करीत त्याने सगळे लग्न पार पाडले. अशा गोष्टी ऐकून आमची हसून हसून मुरकुंडी वळत असे.

अर्थात् आमच्याकडे येणाऱ्या ब्राह्मणांत सच्छील, कर्मनिष्ठ आणि विद्वान अनेक असत. त्यांच्या वास्तव्यामुळे आमचे घर, पूजाअर्चा, कीर्तन, पुराण, भजन इत्यादींनी सदा गजबजलेले असे.

वडिलांच्या सेवानिवृत्तीचे दिवस जवळ आले होते. एकदा कलेक्टरांना (अव्वल तालुकदार) भेटण्यासाठी म्हणून ते उस्मानाबादेस गेले. मलाही त्यांनी आपल्याबरोबर नेले होते. उस्मानाबादचे कलेक्टर कुतुबनवाज जंग हे पट्टीचे शिकारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचाच मुलगा हमीदुद्दीन हा पोलीस ॲक्शनच्या वेळी हैदराबाद नभोवाणी केंद्राचा संचालक होता. तो आत पाकिस्तानात आहे. कलेक्टराला आम्ही भेटलो तेव्हा त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे वडिलांनी मला नजर देण्यास लावली. म्हणजे तळहातावर हातरुमालाची घडी करावयाची, घडीवर एक रुपाया ठेवून तो कलेक्टरच्या समोर धरावयाचा. कले-

क्टरने फक्त रुपयाला स्पर्श करावयाचा. नजर उचलून स्वीकारण्याचा मान फक्त निजामाचा असे. कलेक्टरला भेटावे आणि आपल्या सेवानिवृत्तीनंतर माझ्या मोठ्या बंधूंना कारकून म्हणून नोकरी मिळवून द्यावी असा वडिलांचा विचार होता.

उस्मानाबादेहून परंड्याला परत येत असताना वाटेत बार्शी येथे मला म्याट्रिकचा निकाल पाहावयास मिळाला. मी नापास झालो होतो. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव हे गुलबर्ग्याहून उस्मानिया म्याट्रिक पास झाले होते. मी नापास झाल्याचे पाहून माझे वडील मोठ्या काळजीत पडले. सेवानिवृत्ती एक वर्षावर आलेली. माझी बहीण सीताबाई ही दहा वर्षांची झाली होती. तिचे लग्न उरकून घ्यावे असा वडिलांचा विचार होता. त्याकरिता ते पैशाची तरतूद करीत होते. माझा वसतिगृहाचा खर्च झेपेल असे त्यांना वाटेना. ते मला म्हणाले, ' पंढरपूरला प्रद्युम्नाचार्य वरखेडकर यांची संस्कृत पाठशाळा आहे. प्रद्युम्नाचार्यांना मी हजारो रुपयांची मदत केली आहे. त्यांच्या येथे तुझ्या जेवणाची आणि राहण्याची सोय होईल. तूं पंढरपूरच्या व्हिक्टोरिया ज्युबिली हायस्कूलमधे दाखल हो. पंढरपूरला जमतच नाही असे वाटले तर पुण्याला जा.'

१९२४ ची उन्हाळ्याची सुट्टी संपल्यावर मी पंढरपूरला गेलो. त्या दिवशी मला वाटते एकादशी असावी. मी आणि आमचे परंड्याचे घरमालक कृष्णाचार्य हे एका बडव्यांच्या घरी उतरलो. हे घर रुक्मिणीच्या बारीजवळच्या आळीत होते. मी पांडुरंगाचे दर्शन घेतले आणि चंद्रभागेचे दृश्य पाहात घाटावरून हिंडू लागलो. हिंडता हिंडता सहज कुतूहल म्हणून मी भानुदासाच्या मठात शिरलो. तेथे सभागृहात एक गृहस्थ गळ्यात तंबोरा अडकवून विठ्ठल नामाचा घोष करीत फिरत होते. दहा पाच मिनिटे मी त्यांच्याकडे पाहात होतो. मठातून निघण्यापूर्वी त्यांचा निरोप घ्यावा म्हणून मी त्यांच्याजवळ जाऊन त्यांना वाकून नमस्कार केला. तो लागलीच त्यांनी तंबोरा माझ्या गळ्यात अडकविला. ते म्हणाले, ' बाळ, या मठातील पद्धत सांगतो. तंबोरा घेऊन फिरत फिरत चालणारे हे भजन अखंड आहे. तंबोरा खाली ठेवायचा नाही आणि नामस्मरण थांबवायचे नाही. कुणी येऊन तुला वाकून नमस्कार केला की त्याच्या गळ्यात तंबोरा अडकवायचा आणि चालू लागायचे. नेहमी माणसे येत असतात. तुला फार वेळ भजन करावे लागायचे नाही.' असे म्हणून ते निघून गेले. मी विठ्ठल विठ्ठल म्हणत आणि तंबोऱ्यावरून हात फिरवीत मठात फिरू लागलो. मला मोठी गंमत वाटू लागली. पण अर्ध्या तासात मला भजनाचा कंटाळा येऊ लागला. कोणीच मला नमस्कार करण्यास येईना. लोक माझ्याकडे कौतुकाने पाहात. पण

जवळ येत ना. मी विठ्ठल विठ्ठल करीत फिरत होतो. लोकांपैकी कोणी तरी जवळ येऊन नमस्कार करावा म्हणून त्यांच्याजवळ जात होतो. पण माणसे मला पाहून आदराने बाजूला होत आणि म्हणत 'धन्य या पोराची ! लेकराचे वय पाहा, आणि त्याच्या मुखावाटे चाललेला विठ्ठलाचा घोष पाहा, हे पूर्वजन्मीचे संस्कार बरे, शुचीनाम् श्रीमताम् गेहे योगभ्रष्टोपि जायते' एक तास झाला, दोन तास झाले. तीन तास गेले, कोणी माझा तंबोरा घेण्यास येईल तर शपथ ! भुकेने माझे प्राण कासावीस झाले होते. घशाला कोरड पडली होती. पण बोटे तंबोऱ्यावरून फिरत आणि तोंडातून विठ्ठल विठ्ठल असा गजर चालू होता. मी पांडुरंगाचा धावा करू लागलो. "हे दयाघना, हे पांडुरंगा, मी अजाण लेकरू, किती वेळ मी तुझे भजन करावे. अरे माझ्या भोंवतालची माणसे बघ, खजूर खाताहेत, गूळ शेंगा खात आहेत आणि मी बघ, कसा उपाशी आहे. देवा मला आता सोडीव यातून.' तब्बल पाच तासांनी त्या दयाघन परमेश्वराला करुणा आली आणि मग कोणीतरी येऊन मला नमस्कार केला. मी त्याच्या गळ्यात तंबोरा अडकविला आणि मठातून पोबारा केला. यानंतर मी कधीही पंरढपूरला गेलो, की भानुदासांचा मठ आवर्जून टाळीत असे. पापी अजामिळाने मृत्युसमयी आपल्या मुलाला नारायण, नारायण म्हणून हाक मारली तर तो नरकातून वाचला आणि विष्णुदूत त्याला वैकुंठाला घेऊन गेले, अशी भागवत कथा आहे. मग मी तर तब्बल पाच तास विठ्ठलाचा धावा करीत होतो. माझी सेवा पांडुरंगाच्या चरणी रुजू झाली असली पाहिजे. हा भवसागर तरून आपणही वैकुंठाला जाणार याची मला खात्री आहे.

संध्याकाळी आम्ही प्रद्युम्नाचार्यांच्या मठात गेलो. प्रद्युम्नाचार्यांसारखा सच्छील, शुचिर्भूत आणि विद्वान पुरुष महाराष्ट्रात सापडणे कठीण. संस्कृतचे ते गाढे पंडित आहेत. आमच्या माध्वसंप्रदायांत त्यांच्याबद्दल विलक्षण आदर आहे. त्यांचे बंधू नरसिंहाचार्य, हे तर बनारसला अनेक वर्षे संस्कृतचे प्राध्यापक होते. प्रद्युम्नाचार्यांचे चिरंजीव बाळाचार्य, आणि नरसिंहाचार्यांचे चिरंजीव कृष्णाचार्य हेही पट्टीचे विद्वान आहेत. प्रद्युम्नाचार्य आणि नरसिंहाचार्य यांच्या हाताखाली शेकडो संस्कृत पंडित तयार झाले असून ते महाराष्ट्र आणि कर्नाटक या प्रांतांतून विद्यादानाचे आणि धर्मशिक्षणाचे काम करीत आहेत.

प्रद्युम्नाचार्यांनी दुसऱ्या दिवशी पहाटे द्वादशीच्या जेवणाचे आमंत्रण दिले. वैष्णव मंडळीं द्वादशीचे पारणे वेळेवर सोडण्याची किती दक्षता घेतात याची मला कल्पना होती. म्हणून मी भल्या पहाटे उठून चंद्रभागेवर आंघोळ करून मठात गेलो. इतक्या लवकर तेथे जाऊन पाहतो तो काय ? सर्वांची जेवणी

आटोपली होती आणि माझे पान वाढून ठेवले होते. मी मुकाट्याने जेवून घेतले. पण मठातील शिस्त, ते सोवळे ओवळे ही पाहून मी मनाशी खूणगाठ बांधली की आपण येथील राहणीला अयोग्य आहोत.

पंढरपुरांत मी पुढे दोन तीन दिवस राहिलो असेन. मला पुण्याला जाऊ द्या अशा अर्थाचे मी वडिलांना पत्र लिहिले, त्यांच्या उत्तराची वाट पाहात मी पंढरपुरात राहिलो.

मी बडव्यांच्या वाड्यात राहिलो होतो. तो वाडा जुन्या पद्धतीचा आणि बंदिस्त होता. दारातून आत शिरल्यावर अंगण, दगडी पायऱ्या चढून गेल्यावर सोपा आणि सोप्याच्या मागे खोल्या असे वाड्याचे स्वरूप होते. मी आत खोलीत झोपत असे. बडवे दांपत्य आणि मुले सोप्यावर झोपत. रात्री झोपण्याच्या आधी घरातील सगळे दिवे मालविण्यात येत. सर्वत्र अंधार असे. एके रात्री मला लघवीसाठी उठण्याची वेळ आली. अंधारात कसे आणि कुठे जावे हे मला समजेना. घरात कुणाला जागे करावे असेही वाटेना. लवकरच उजाडेल असे समजून मी बराच वेळ पडून होतो. पण पहाट होण्याचे चिन्ह दिसेना. बिछान्यावर पडून राहणे असह्य झाले. शेवटी वाट चाचपडत आपण अंगणांत उतरावे असे मी ठरविले. मी उठलो आणि हळूच खोलीबाहेर आलो. दोन पावले गेलो असेन नसेन, तोच माझा पाय बडवे पतिपत्नी एकमेकांना बिलगून झोपली होती, त्यांच्या अंगावर पडला. ते जोडपे कसे झोपले होते ते सांगणे सभ्यपणाचे होणार नाही. माझा पाय पडताच बाई ओरडली, 'अरे देवा!' बडवे ओरडले, 'चोर चोर!' मुले किंचाळू लागली. मी मात्र चोरासारखा भिंतीला टेकून उभा होतो. थोड्या वेळाने मी म्हटले, 'मी परंड्याहून आलेला पाहुणा आहे. मला लघवीला जायचे आहे.' बडवे म्हणाले, 'कोण रावसाहेब काय, थांबा हं. दिवा लावतो,' आणि मग आम्ही आमची लघुशंका उरकली.

दुसऱ्या दिवशी सकाळीं पाहतो तो बडवे गंभीर होते. आणि त्यांची पत्नी मला तोंड चुकवीत होती. मी ओळखले की आपण या दंपतीच्या मर्मावर आघात केला आहे. मी वडिलांच्या पत्राची वाट न पाहता त्याच दिवशी दुपारच्या गाडीने पुण्याला निघून गेलो.

पुण्यात मी पुन्हा वसतिगृहात दाखल झालो. नानावाड्यात पुन्हा म्याट्रिकचा अभ्यास सुरू झाला. मला वाटते, शंकर चाफेकर हाही माझ्याप्रमाणे मॅट्रिक नापास झाला होता. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक चांगले होते. पण अभ्यासात मी अगदीच कच्चा असल्यामुळे ते जे सांगत त्यापैकी बराच भाग डोक्यावरून जाई. शिक्षणात भोवतालच्या वातावरणाशी दुवा जोडण्याचा प्रयत्न झाला

पाहिजे. नानावाड्याच्या खिडकीतून मी तीन वर्षे शनिवारवाड्याकडे पाहात असे. पण इतिहासाच्या शिक्षकांनी एक दिवस तरी शनिवारवाड्याचा उल्लेख केला असल्याचे मला आठवत नाही. खुद्द नानावाडा हा नाना फडणिसांचा वाडा होय हे समजण्यास मला बरेच दिवस लागले. आम्ही साऱ्या हिंदुस्थानचा आणि इंग्लंडचा इतिहास वाचीत बसू. पण नाना वाड्यासमोर असलेल्या शिवाजी महाराजांच्या वाड्याच्या जागेची माहिती आम्हांला कोणीही करून दिली नाही. नाना वाड्याच्या समोरील कोणतीही इमारत दिसली की तिच्या खिडकीतून शायिस्ताखान पळाला असे मी समजत असे. चिंतामणराव वैद्यांची दुर्दैवी रंगू ही कादंबरी वाचल्यानंतर मला अप्पा बळवंतचा चौक आणि मेहेंदळ्यांचा वाडा यांच्याबद्दल आपलेपणा वाटू लागला. शनिवारवाडा, पर्वती, हिराबाग, नानावाडा, मोरोबादादांचा वाडा, विश्रामबागवाडा ही लक्षात राहिली. सिंहगड पाहिला. पण सिंहगडाचे महत्त्व आम्हांला कोणी पटवून दिले नाही. भाऊमहाराजांचा वाडा म्हणजे भाऊसाहेब पेशव्यांचा वाडा असे मी समजत होतो. वानवडी तर मी अद्याप पाहिली नाही. पुण्याला लागून वाहणारी नदी ही मुळा की मुठा हे समजण्यास मला बरेच दिवस लागले. आणि तोपर्यंत मी जगाचा भूगोल वाचून काढला होता! विद्यार्थ्यांना मार्गदर्शन नीट होत नसावे, असेच म्हणावे लागेल.

एकच उदाहरण सांगतो. न्यू इंग्लिश स्कूलचे असे एक ग्रंथालय आहे हे मला तीन वर्षेपर्यंत समजले नाही. एकदा एका मुलाजवळ मी एक पुस्तक पाहिले. त्यावर न्यू इंग्लिश स्कूल लायब्ररी असा शिक्का होता. तेव्हा कोठे मला कळले की नानावाड्याच्या तिसऱ्या मजल्यावर लायब्ररी आहे. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. अशा गोष्टींची खंत वाटल्यामुळेच मी औरंगाबादेस कलेक्टर असताना (१९५१–५२) आणि हैदराबादच्या शिक्षण खात्याचा संचालक असताना (१९५३–५५) वाचनालयांच्या चळवळीसाठी जिवाचे रान केले.

शिक्षकांच्या हातच्या छड्या खाण्याचे प्रसंग माझ्यावर दोनतीनदा आले. आमच्या पर्शियनचे शिक्षक अतिशय सज्जन. मौलवीसाहेबांच्या तासात आम्हांला फार मोकळे वाटे. गप्पा-गोष्टींना ऊत येत असे. एकदा ते वर्गात आले नव्हते. आम्हांला उद्योग नव्हता. शाळेचे सुपरिंटेंडेंट गोपाळराव तुळपुळे होते. वर्गांची फेरी मारीत ते आमच्या खोलीत आले. आमच्यापैकी कोणी बाकावर झोंपले आहे, थट्टामस्करी करीत आहे, कोणी गाणे म्हणत आहे, असा आमचा धुडगुस चालू होता. आम्ही तुळपुळ्यांना पाहाताच सर्द झालो. थोड्या वेळाने शिपाई येऊन आम्हांला त्यांच्या खोलीत घेऊन गेला. तुळपुळ्यांनी आमच्या

हातावर छड्या मारल्या. इ. स. १९५१–५२ मध्ये मी औरंगाबादेस कलेक्टर असताना, डॉक्टर तुळपुळे, पुणे विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख, हे माझ्याकडे आले होते. त्यावेळी मी त्यांना म्हटले, ' अहो तुळपुळे, तुमच्या वडिलांच्या हातच्या छड्या खाल्ल्या आहेत. त्या मी विसरणे शक्य नाही. '

माधवराव पटवर्धनांच्यानंतर प्राध्यापक व्ही. ए. आपटे हे आमचे सुपरिंटेंडेंट होऊन आले. त्यांचा दरारा मोठा आणि शिस्त कडक. एका महिन्यासाठी मी डायनिंग हॉलचा मॉनिटर होतो. दुपारच्या फराळाच्या वेळी मुले कधी कधी गोंधळ घालीत. त्या दिवशी काही मुलांनी अगदी उनाडपणा केला. मला आठवते, काही मुले शिऱ्याचे गोळे करून उडवीत होती. मी त्यांना आवरण्याचा प्रयत्न करीत होतो. हा प्रकार सुपरिंटेंडेंटचे साहाय्यक सोनटक्के (वैदिक संशोधनचे सोनटक्के यांचे बंधू) यांनी पाहिला. त्यांनी आपट्यांना ही हकीकत सांगितली. आपट्यांनी मला बोलावून दोनचार छड्या लगावल्या. (हा अन्याय होता असे मला अद्याप वाटते.) आम्ही धिंगाणा घालण्यास सुरवात केली आणि मला मॉनिटरच्या जागेवरून काढले. मुले तरी काय कमी होती. त्यांनी मला पुन्हा निवडून दिले.

१९६६ च्या मे महिन्यात पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेत माझे व्याख्यान होते. व्याख्यानाला आपटे आवर्जून आले होते. व्याख्यान सुरू होण्याच्या आधी आम्ही चार पाचजण बोलत बसलो होतो. जुन्या आठवणी काढताना आपटे म्हणाले, ' मोठी पुंड पोरे, एकेकाला असे चोपून काढले म्हणता ! ' छडी मारल्याची आठवण जसा मी विसरलो नाही, तसे तेही विसरलेले दिसत नाहीत ! तेच माधवराव पटवर्धन असते तर ते मला इतकेच म्हणाले असते, ' वेड्या मुला, काय रे हा गोंधळ ! बरे जा, पुन्हा असे करू नकोस. '

१९२५ च्या सुरवातीला माझी बहीण सीताबाई हिचे लग्न झाले. त्यावेळी ती दहा वर्षांची होती. माझे मेहुणे रामराव हे गुलबर्गा जिल्ह्यातील निडगुंद (चिंचोळी तालुका) येथील देशपांडे. त्यावेळी ते म्याट्रिकच्या वर्गात शिकत होते. पुढे ते हैदराबाद राज्याच्या कस्टम खात्यात इन्स्पेक्टर झाले. आता ते सेवानिवृत्त होऊन आपल्या गावी राहात असतात. या लग्नांत वडिलांना बराच खर्च आला असावा.

म्याट्रिकची परीक्षा दिल्यावर मी एप्रिल १९२५ मध्ये पुणे सोडले, त्यावेळी मला पंधरावे वर्ष चालू होते. आमच्या चार पिढ्या महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात गेल्या होत्या. पुण्यामुळे मला महाराष्ट्राची पुन्हा ओळख झाली. निदान शंभर तरी मराठी पुस्तके वाचून झाली. धर्मासंबंधीच्या आत्यंतिक मतांना तडे गेले.

आपटे, गडकरी, अनंततनय कवि विनायक इत्यादि साहित्यिकांची नावे कानावरून गेली. चांगले वक्ते आणि पुढारी पाहण्यास मिळाले. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल गोडी लागली. सारांश, जन्मभर पुरेल इतकी शिदोरी मला पुण्यास लाभली. मला आणखी काय हवे होते ?

पण सर्वात अधिक असा प्रभाव माझ्या मनावर पडला तो माधवराव पटवर्धनांच्या व्यक्तित्वाचा होय. इ. स. १९३७ मध्ये पुण्याला गोखले हॉलमध्ये एका संमेलनाप्रसंगी माझी त्यांची गाठ पडली. माझे नाव सांगताच त्यांनी मला ओळखले. मी त्यावेळी मराठवाड्यात कळमनुरीला मामलेदार होतो. त्यांनी माझी आस्थापूर्वक चौकशी केली. इ. स. १९३८ मध्ये माझा पहिला लघुकथा संग्रह 'उषा' हा प्रसिद्ध झाला. त्याची एक प्रत मी त्यांच्याकडे पाठविली. त्यावर त्यांनी जे पत्र पाठविले ते पुढे देत आहे.


राजाराम कॉलेज, कोल्हापूर
ता. २८।२।३९

श्री. सेतुमाधव पगडी यांस,

स. नमस्कार वि. वि. तुम्ही आपले 'उषा' हे पुस्तक पाठविले ते यथाकाल पावले. काल मी ते समग्र वाचून पाहिले. मराठवाड्यातील साहित्यनिर्मिती-विषयी अधिक कुतूहल आणि तुमच्या लेखनातील नावीन्य या दोन्ही कारणांनी पुस्तक समग्र वाचले. आनंद झाला. मुद्रणदोषामुळे अशुद्धे फार राहून गेली आहेत. ती खुपतात. तसे पुन्हा होऊ देऊ नये. 'मधुरा', 'शापित' 'आठवण', 'सुखस्वप्न', 'एक्सपेरिमेंट', 'ओढ' या गोष्टी मला फार आवडल्या. वर्णनाच्या रूपाने बाह्यस्थितीचे वर्णन तुम्ही बरेच केले आहे. अधिक निरीक्षणाने तिकडील विशिष्ट मनःस्थितीचेही वर्णन तुम्हांला करिता येईल. पुसट का होईना मला तिकडचा परिचय असल्याने मला या पुस्तकाविषयी एक प्रकारचा आपलेपणा वाटला. तुम्ही भाषा मात्र अधिक शुद्ध केली पाहिजे. इकडल्यापेक्षा सुद्धा तिकडील लेखकांनी भाषाशुद्धीकडे अधिक लक्ष पुरविणे अगत्याचे आहे. आपल्या खांद्यावर भाषेच्या स्थिरतेची, प्रगतीची धुरा आहे हे लेखकांनी कधीही विसरता कामा नये. आपल्या लघुकथांतून वर्णने थोडी उणावली तरी चालतील; पण संवादाला अधिक वाव द्यायला हवा.

तुमच्याकडून उत्तरोत्तर अधिकाधिक साहित्यसेवा होवो नि मराठवाड्याचे पाङ्ग फिटोत हीच इच्छा.

तुमचा
माधवराव पटवर्धन



राजाराम कॉलेज, कोल्हापूर
ता० २८/२/३८

श्री० सेतुमाधव पगडी यांस,

स० नमस्कार वि. वि. तुम्ही आपलें 'मुजा' हें पुस्तक पाठविलें तें [illegible] मिळालें. [illegible] तें सगळें वाचून पाहिलें. मराठवाड्यांतील साहित्यनिर्मितीसंबंधी अधिक कुतूहल आहे. [illegible] लेखकांनीहि [illegible] मराठीत [illegible] पुस्तक [illegible]. आनंद झाला. मुद्रणदोषांमुळें अशुद्धें फार राहून गेलीं आहेत तीं खुपतात. तसें पुन्हा होऊं देऊं नये. 'मजूर', 'शापित', [illegible], [illegible], Experiment 'ओर' या गोष्टी मला फार आवडल्या. [illegible] काव्यस्थितीचें [illegible] तुम्ही [illegible] केलें आहे. अधिक [illegible] विशिष्ट अन्तःस्थितीचें हि वर्णन तुम्हांला करितां येईल [illegible] पुढें [illegible] मला [illegible] पुस्तकाविषयीं [illegible]. [illegible] भाषा मात्र अधिक शुद्ध केली पाहिजे. [illegible] आणि [illegible] इ०.

उत्तरोत्तर अधिकाधिक साहित्यसेवा होवो व मराठवाड्याचें नांव [illegible] होवो ही इच्छा.

आपला
माधवराव पटवर्धन

—

आज [illegible] मला [illegible] आहे.

माधवराव पटवर्धनांचें मला पत्र

गुरुवर्य परशुराम नारायण
ऊर्फ अण्णासाहेब पाटणकर





बनारस हिंदु विश्वविद्यालयांत १९२७, मी उजवीकडे अनवाणी उभा



माझी आई कृष्णाबाई



माझी पत्नी उषा १९५१

माझी पत्नी उषा
१९६६





आमच्या विवाहप्रसंगी, ७ डिसेंबर १९३३.

सा. क. : ‘आज पृथक् पोस्टाने भाषाशुद्धी विवेकाची एक प्रत भेट म्हणून पाठवीत आहे.’

*   *   *

आज (१९६९) पर्यंत माझे २५ मराठी आणि १० इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. माधवरावांची इच्छा मी अंशतः तरी पूर्ण करू शकलो याचे मला अंतःकरणातून समाधान वाटते.

अद्यापही मी पुण्याला गेलो की गद्रेवाड्याच्या जागेसमोरून काही ना काही निमित्त काढून फेरी मारतो. तेथील जुन्या आठवणींनी मनाची विलक्षण कालवाकालव होते. त्यातील मुख्य आठवण म्हणजे माधवराव पटवर्धन हे एखादी कविता गुणगुणत मित्रांच्या बरोबर गप्पागोष्टी करीत कबूतरखान्याकडे चालले आहेत ही होय.

आणि या आठवणीने डोळे पाण्याने भरून येतात आणि काही सुचेनासे होते.

माधवराव पटवर्धन यांचा मृत्यू नोव्हेंबर १९३९ मध्ये झाला. त्याच्या चार महिने आधी त्यांनी मला आणखी एक पत्र पाठविले तेही मी जपून ठेवले आहे. ते पत्र पुढीलप्रमाणे आहे :

“ २५ जुलै, १९३९ राजाराम कॉलेज,
कोल्हापूर

श्रीयुत सेतुमाधव पगडी यांस, सा. न. वि. वि.

तुमचे सविस्तर पत्र पावले. मी सध्या काविळेने अंथरुणावर पडून असल्याने मला मात्र तितके सविस्तर उत्तर धाडता येणार नाही. तथापि अवश्य त्या सूचना मी करितोच. पहिली गोष्ट म्हणजे ज्या प्रकारचे पुस्तक तुम्ही लिहावे अशी माझी इच्छा त्या प्रकारचे पुस्तक हैदराबादचे प्राध्यापक सी. बी. जोशी लिहीत होते. त्यांनी नुकतेच आपले पुस्तक य. गो. जोशी यांच्या विद्यमाने प्रकाशित केले आहे असे मी ऐकतो. ते पुस्तक परिपूर्ण असल्यास हा विचारच टाकून द्यावा लागेल. तसे ते नसल्यास तुम्हांला तुमचे काम चालू करायला अडचण नाही. असे पुस्तक टीकात्मकापेक्षा परिचयात्मक असावे. पुढे पुढे चरित्रविषयक खरी माहिती मिळणे अशक्य होते. ती बिनचूक तावून सुलाखून घेणे हे अशा ग्रंथांचे आद्य कर्तव्य होय. नंतर ग्रंथाचे स्वरूप सांगणे, त्रोटक सारांश देणे होय. आणि शेवटी ग्रंथकाराने आपले ग्रंथाच्या महत्त्वाविषयी मत द्यावे. अशा ग्रंथाला वेळ फार लागतो. पण घाई मुळीच कामाची नाही.

जे लेखक इकडून मराठवाड्यात जाऊन अनेक वर्षे स्थायिक झाले त्यांचा समावेश तिकडील लेखकांत करावा. जे तिकडून इकडे आले त्यांची जर पुष्कळ वर्षे तिकडेच गेली असतील तर त्यांना तिकडचेच म्हटले पाहिजे. हा प्रश्न तारतम्याने सोडवायला हवा. कळावे.

आपला,
माधवराव पटवर्धन

आरंभ हंसराजापासूनच करावा. ”

५

हैदराबाद
१९२५ ते १९२६

इ. स. १९२५ च्या एप्रिल महिन्यात मी म्याट्रिकची परीक्षा देऊन परंड्याला परत आलो. माझे बंधू बिंदु माधवराव हे त्यावेळी हैदराबादेस उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या इंटरच्या पहिल्या वर्षात होते. ते हैदराबादेस कॉलेजच्या वसतिगृहात राहात होते.

माझी बहीण सीताबाई हिच्या लग्नात वडिलांना बराच खर्च आला. त्यांची सेवानिवृत्ती मे १९२५ मध्ये होती. वास्तविक पाहता त्यांना चौपन्न वर्षे पूर्ण झाली होती, पंचावन्न नव्हती. आणखी एक वर्ष ते नोकरी करू शकले असते. पण माझे बंधू बिंदु माधवराव यांची जिल्हा कचेरीत पगार ३० ते ६० वर कारकून म्हणून नेमणूक करावी. त्यांचे इंटरचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत म्हणजे एक वर्ष त्यांना बिनपगारी रजा देण्यात यावी. रजा संपल्यावर १९२६ च्या जूनपासून ते आपल्या जागेवर रुजू होतील, या अटीवर माझे वडील एक वर्ष आधीच सेवानिवृत्त होणार होते.

सेवानिवृत्त होण्यापूर्वी आमच्या इनाम जमिनी होत्या

त्या कारजोळ गावाला जाऊन येण्याचे वडिलांनी ठरविले. मी त्यांच्या बरोबर गेलो. कारजोळला जाण्यापूर्वी कृष्णाकाठावर बसून एक आठवडाभर अनुष्ठान करावे असा वडिलांनी बेत केला. त्याप्रमाणे आम्ही प्रथम बागलकोटजवळ सीतीमनी या कृष्णाकाठच्या गावी गेलो. सीतीमनी हे गाव टुमदार असून तेथे कृष्णेचा प्रवाह मोठा आकर्षक वाटतो. गावाला लागून असलेल्या धर्मशाळेत आम्ही उतरलो होतो. वडील अनुष्ठान करीत असल्यामुळे अन्नग्रहण त्यांना वर्ज्य होते. ते फराळावर राहात. मला स्वतःसाठी स्वयंपाक करावा लागे. ही पाळी यापूर्वी माझ्यावर कधीच आली नसल्यामुळे, मोठा हास्यास्पद प्रसंग ओढवे. भात कसा शिजवावा हे माहीत नसल्यामुळे भांड्यातील भाताचे तीन प्रकार एकाच वेळी माझ्या वाट्याला येत. तळाजवळचा भात करपलेला, मधला भात गोपीचंदनासारखा गिच्च गोळा, आणि वरचा भात म्हणजे मंत्राक्षताचे तांदूळ! डाळही कधी शिजता शिजायची नाही. भाजी करता येत नसे, म्हणून मी वांग्याचे भरीत करून घेत असे. सीतीमनीत (सीतेचे येथे वास्तव्य होते अशी दंतकथा) तूप, दही, दूध, लोणी मुबलक आणि स्वस्त मिळे. त्यामुळे सीतीमनीला दह्यादुधाची मोठी चंगळ असे. पण लोणी कढवून त्याचे तूप तयार करणे मला जमले नाही. लोणी वितळले की त्याचे लगेच तूप होते अशी माझी समजूत होती. आणि मग लोणकढ्या तुपाचा जो सुगंध येतो तो मी तयार केलेल्या तुपाला का येऊ नये हे मला समजत नसे.

वडिलांचे अनुष्ठान चालू असताना मी एक दिवस बागलकोटला गेलो. तेथे मला माझ्या म्याट्रिकच्या परीक्षेचा निकाल कळला. एकदाचा मी पास झालो. गणिताची मी इतकी धास्ती घेतली होती की निकाल कळेपर्यंत आपण परीक्षेत पास होऊ याची मला खात्री नव्हती. आज त्या गोष्टीला बेचाळीस वर्षे झाली. पण माझा म्याट्रिकच्या परीक्षेचा रोल नंबर दोन हजार नऊशे अडतीस मला अद्याप आठवतो. म्याट्रिक झाल्यापासून आजपर्यंत मी गणित, अल्जिब्रा आणि जामिट्री यांजकडे ढुंकूनही बघितले नाही.

सीतीमनीची आठवण मला आणखी एका कारणामुळे राहिली आहे. सीतीमनीचा स्टेशनमास्तर मोठा रंगेल मनुष्य होता. तो रोज सकाळी कृष्णेवर आंघोळीला येई. तेथे आमची गाठ पडे. तो अनेक गमती सांगे. एक गोष्ट त्याने सांगितली ती अशी: एका धर्मशास्त्रज्ञाचे एका धनगराच्या सिद्धी नावाच्या मुलीवर प्रेम बसले. पण सिद्धीला वाटले की आपली जात वेगळी आणि आपल्या प्रियकराची जात वेगळी! आपले जुळावे कसे? धर्मशास्त्रज्ञांनी तिला सांगितले की आपल्या प्रेमाला प्रत्यक्ष भगवंतांनी भगवद्गीतेमध्ये संमती

देऊन ठेवली आहे. असे म्हणून त्यांनी तिला गीतेतील एक श्लोक म्हणून दाखविला ' कुर्वत्सिद्धि मवाप्स्यसि । '

तिने विचारले, ' याचा अर्थ काय ' ते म्हणाले ' अर्थ उघड आहे. ' कुर्बर (कानडीमध्ये, धनगराची) सिद्धी (सिद्धी मुलगी) मम (माझ्या) अप्पन (बापाची) सशी (सून) म्हणजे तू माझ्या बापाची सून म्हणजे माझी बायको. बोल, आता तरी झाले ना समाधान ? ' असे म्हणून तो धर्मशास्त्रज्ञ तिला प्रणयशास्त्राचे पाठ देऊ लागला.

गीतेतील शब्दांतून अनेक विनोद काढण्यात आलेले मला आठवतात, रोमहर्षश्च जायते, हर्षाने रोमवर स्वारी केली. जन्मानि तव चार्जुन, तुझा जन्म चार जूनचा ! सर्वस्य चाहं हृदि संनिविष्ट, चहा स्टोव्हवरच करावा ! पण मी ऐकलेली वरची आचरट गोष्ट म्हणजे अफाटच म्हटली पाहिजे. बेदरच्या बादशहाने एका ब्राह्मणाला विचारले, ' तुमच्या धर्मग्रंथात सर्व काही आढळते म्हणता ! मग माझी दासी च्यामी त्यात आहे काय ? ' ब्राह्मण म्हणाला, ' आहे तर ! तुमच्या दासीचे नाव आम्ही रोज जेवणापूर्वी घेत असतो ना ! सत्यंत वर्तेन परिषिंचामि, ही घ्या तुमची च्यामी. '

सीतीमनीहून आम्ही आमच्या कारजोळ गावी गेलो. तेथे माझे पणजे आनंद गोपाळ यांनी १८२२ मध्ये मिळविलेल्या जमिनी अद्याप आमच्या घराण्यात चालत आहेत. जमिनी मिळविल्यावर आनंद गोपाळ यांनी कारजोळात वाडा बांधला. ते जहागिरीची कामे पाहात. विजापुराहून बागलकोटकडे जाणाऱ्या मालावर कारजोळ गावच्या हद्दीत ते जकात वसूल करीत. यावरून त्यांना जकाते हे आडनाव पडले. अद्यापपर्यंत कारजोळच्या रेव्हेन्यू कागदपत्रात आमचे जकाते हेच आडनाव नोंदले जात आहे. हे आडनाव पणजोबांच्या वेळेपासून रूढ झाले.

माझे पणजे आनंदपंत हे इ. स. १८६९ मध्ये वारले. त्यांना दोन मुले. वडील मुलगा वासोपंत आणि धाकटा शेषगीरराव म्हणजे माझे आजोबा. वासोपंतांना एक मुलगा सीतारामपंत हा होता. त्याला मूलबाळ नसल्यामुळे त्याने माझा भाऊ गुरुमध्व याला दत्तक घेतला. वासोपंत हे कारजोळलाच राहिले. माझे आजोबा मात्र सरकारी नोकरीच्या निमित्ताने रायचूर जिल्ह्यात गेले. ते चिपळूणकरी पगडी वापरीत म्हणून त्यांना पगडी हे आडनाव पडले.

कारजोळच्या देशपांडे घराण्यातील व्यंकटराव यांची बहीण ही माझी सावत्र आई. आणि त्यांची पहिली बायको ही माझी सख्खी आत्या. माझ्या आतेला मुलगा झाला नाही, मुलीच झाल्या. तिच्या मृत्यूनंतर व्यंकटरावांनी दुसरे लग्न केले. बायको बारा वर्षांची होती. असे असूनही त्यांना आठ मुले झाली.

माझे वडील म्हणत ' विजापूर जिल्ह्यातील माणसांचे मुख्य अन्न म्हणजे गव्हाची कुटून केलेली खीर हे होय. हे ज्यांचे खाद्य त्यांना संततीची वाण कधीच भासत नाही. व्यंकटरावांचा मोठा मुलगा, माझा सावत्र आतेभाऊ महिपती. हा माझ्या बरोबरीचा. कारजोळला असताना आम्ही एकत्र खेळत असू, आमच्या शेतावर जात असू. आमची दोघांची गट्टी चांगलीच जमली. कारजोळला कलमेश्वर महादेवाचे देऊळ मोठे प्रेक्षणीय आहे. त्याचे मी दर्शन घेतले.

मी मॅट्रिक झालो होतो. मला पंधरावे वर्ष चालू होते. साहजिकच माझा भाव वाढला होता. कारजोळच्या देशपांड्यांच्या मुख्य घराण्यातून एक मुलगी मला सांगून आली. मुलीला पाहण्यासाठी आम्ही देशपांड्यांच्या वाड्यात गेलो. मुलगी गोरी, नाकीडोळी नीटस आणि देखणी होती. मुलगी मला आवडली. पण मला वाटले कमीत कमी बी. ए. होईपर्यंत आपण लग्नाचा विचार करू नये, असे ठरवून मी वडिलांना तसे सांगितले. त्यामुळे लग्नाचा विचार रहित झाला असावा.

कारजोळला लागूनच असलेल्या मुळवाड या गावी वडिलांनी इ. स. १९१० मध्ये दोन शेते विकत घेतली होती. तीही मी पाहून आलो. तसेच कारजोळहून पाच मैलांवर कारवंडकी हे गाव आहे. महिपती स्वामी नावाचे एक थोर सत्पुरुष तेथे तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांची समाधी त्या ठिकाणी आहे. दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथीला मोठा उत्सव होतो. मी महिपत स्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. उत्सवात समाधी आनंदाने डोलू लागते अशी आख्यायिका आहे.

विजापूर हा जिल्हा दुष्काळी भाग म्हणून प्रसिद्ध आहे. लोक नाचणी आणि ज्वारीची भाकर खातात. गोडधोड खाणे क्वचितच त्यांना लाभते. ही उणीव ते महिपतस्वामींच्या उत्सवात भरून काढीत. उत्सवात पुरणपोळी आणि लोणकढे तूप हे मुख्य पक्वान्न असे. त्याबद्दलची एक दंतकथा सांगतात. एकाच वेळी पाच पाच सहा सहा पुरणपोळ्या वाढीत. त्यांचे पाळे करून त्यात काठोकाठ भरेल इतके तूप वाढीत. एकाने आधाशाप्रमाणे इतक्या पोळ्या खाल्ल्या आणि इतके तूप खाल्ले की त्याच्या पोटातील जठराग्नी विझून गेला. तो मेला असे समजून त्याला चितेवर ठेवण्यात आले. चितेच्या अग्नीमुळे त्याच्या पोटात भिनलेले तूप वितळू लागले. आणि तो जिवंत होऊन पुन्हा जेवायला बसला !

कारजोळला असलेले आमचे घर पडून गेले होते. जागेवर कडबा साठवून ठेवलेला असे. पण ती जागा पाहून माझे खापर पणजोबा गोपाळपंत, पणजे आनंदपंत आणि आजे शेषगीरराव तेथेच नांदले याची आठवण होऊन माझे हृदय भरून आले. कारजोळहून आम्ही विजापूरला आलो. विजापूर मी प्रथमच पाहात होतो. गोल घुमट, इब्राहीमरोजा, मुलूखमैदान तोफ, आसारमहाल,

आनंदमहाल, म्युझियम, ताजबावडी ही स्थळे पाहिली. तेथून निघून आम्ही परंड्याला परत आलो.

मे महिन्यात माझे वडील सेवानिवृत्त झाले. त्यावेळी वडिलांना पंचावन्नावे वर्ष लागले होते. पंच्याहत्तर वर्षांची आंधळी आजी होती. माझ्या आईचे वय बत्तीस वर्षांचे होते. माझ्या वडील बंधूचे वय सतरा, माझे पंधरा, बहीण सीताबाई दहा, भाऊ गुरुमध्व आठ, भाऊ राघवेंद्र पाच (याची मुंज नुकतीच झाली होती.) आणि बहीण सुशीला तीन. अशी आम्ही भावंडे होतो. मामा आम्हांला चिकटून होता. नोकरी संपली आणि आम्हा भावंडांचे अजून सर्वच काही व्हावयाचे होते. नोकरी गेल्याबरोबर वडिलांची स्थिती फार हलाखीची झाली. आम्ही मे महिन्यातच परंडा सोडून गुलबर्ग्याला आलो. आमच्या घराचा एक भाग आम्ही बाळकृष्णराव, गुलबर्ग्याच्या मामलेदार कचेरीतील नगदीकडील कारकून यांना भाड्याने दिला होता. आम्ही आमच्यासाठी राखून ठेवलेल्या भागात उतरलो.

बाळकृष्णराव हे एक रंगेल आणि रसिक गृहस्थ होते. त्यांनी आपली बायको सुंदराबाई हिला घराबाहेर हाकलली होती, गिरम्मा नावाची एक बाई त्यांनी जवळ बाळगली होती. ही बाई मोठी रसिक आणि चोखंदळ होती. आम्हा मुलांचे ती अतिशय कौतुक करी. बाळकृष्णरावांनी आपली लग्नाची बायको हाकलून लावावी आणि घरात एक रखेली आणून ठेवावी हे त्यांच्या वडिलांना आवडले नाही. या कारणावरून पितापुत्रांचे भांडण झाले. बरीच वर्षे ते एकमेकांशी बोलत नसत. पुढे वडिलांचा अंतकाळ जवळ आला. शेवटची भेट म्हणून बाळकृष्णराव आपल्या वडिलांच्याकडे गेले. वडिलांनी त्यांना म्हटले, ' माझी शेवटची इच्छा समजून तू या बाईचा नाद सोड आणि तसे वचन मला दे. तरच मी तुझ्या हातून शेवटचे तीर्थ (गंगाजळ) घेईन. ' पण धन्य बाळकृष्णरावांची, त्यांनी वचन देण्याचे नाकारले. आणि त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहात त्यांच्या वडिलांनी प्राण सोडला !

मला वाटते, त्याकाळी अंगवस्त्रे (रखेल्या) बाळगण्याचा प्रघात बऱ्याच प्रमाणात असावा. माझ्या मामाने एक रखेली ठेवली होती. आमच्या शेजारचे फौजदार नरसिंगराव यांची एक मुसलमान रखेली होती. तिचा मुलगा हुसेनी हा आमच्या घरी नेहमी येत असे. आमचे खासगी शिक्षक मदनगोपाळ यांची प्रेयसी लक्ष्मी हिचा उल्लेख मी यापूर्वी केला आहे. माझ्या थोरल्या काकींच्या भावजईचे बंधू अण्णाराव हे जिल्हा कचेरीत कारकून होते. त्यांनी एक बाई बाळगली होती. त्यांच्यापासून तिला अनेक मुले झाली. त्यांची नावे त्यांनी

ठेवली ती राघवेंद्र, धीरेंद्र, उपेंद्र अशी वैष्णव स्वामींची. माझे वडील या अण्णारावांच्यावर फार चिडत. ते म्हणत 'या माणसाच्या आचरटपणाची कमाल झाली. रखेली ठेवतो आणि वर तिच्या मुलांना वैष्णव स्वामींची नावे देतो. काय म्हणावे याला!' आमचा स्वयंपाकी सीनाप्पा याची प्रेयसी रंगव्वा हिचा उल्लेख मी तिरुपतीच्या यात्रेच्या संदर्भात केला आहे. बाळकृष्णरावाची प्रेयसी गिरम्मा मला म्हणे, 'सेतुराव, तुमचे आमचे नाते आहे. तुमच्या वडिलांचे मावस भाऊ बापूसाहेब यांनी माझ्या मावशीला ठेवली होती.' या तिच्या उद्गारावर मी काय बोलणार! वडिलांना मात्र या गोष्टी मुळीच आवडत नसत.

बिंदूमाधवरावांची बायको सुभद्रा ही लग्नात सात वर्षांची होती. ती आमच्याकडे जाऊनयेऊन असे. आम्ही १९२३ मध्ये तिरुपतीला गेलो असताना ती गोविंदराजपट्टण येथे वयात आली. 'रावसाहेब, आपल्याला नातू झाला' या शब्दात आमचा स्वयंपाकी सीनाप्पा याने वडिलांना ही बातमी दिली. त्यानंतर माझी वहिनी आजारी पडली. मला वाटते तो टायफाइड असावा. तिचा आजार बराच लांबला. त्यातून ती कशीबशी बरी झाली. पण एक दोन वर्षांतच तिला दम्याची व्यथा जडली. ती आजपर्यंत दुखणेकरी आहे. या माझ्या बंधूंच्या वाट्याला संसाराचे सुख असे आलेच नाही.

उन्हाळ्याच्या सुट्टया संपल्यावर मी हैदराबादला गेलो. माझे बंधू उस्मानिया विद्यापीठात इंटर सेकंड इयरला होते. उस्मानिया विद्यापीठात शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. मी निजाम कॉलेजात प्रवेश घेतला. निजाम कॉलेजात शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते. हे कॉलेज मद्रास विद्यापीठाला जोडले होते. हैदराबाद राज्यात इ. स. १९१७ मध्ये उस्मानिया विद्यापीठ स्थापन होईपर्यंत निजाम कॉलेज हे एकच कॉलेज होते. याची स्थापना इ. स. १८७५ ची. सरोजिनी नायडूंचे वडील अघोरनाथ चट्टोपाध्याय हे काही वर्षे या कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. मी निजाम कॉलेजात होतो; त्यावेळी बर्नेट नावाचा इंग्रज हा प्रिन्सिपॉल होता. तो आम्हांला इंग्रजी शिकवी. ड्यूच्यांड नावाचा सेवानिवृत्त लष्करी अधिकारी आम्हांला तर्कशास्त्र शिकवीत असे. इतिहास हा विषय प्रोफेसर आगा आणि प्रोफेसर हणमंतराव हे शिकवीत. सुरवातीचे तीन महिने मी वसतिगृहात होतो. त्यावेळी हणमंतराव हे वसतिगृहाचे सुपरिंटेंडेंट होते. निजाम कॉलेजात मी एक वर्ष होतो. त्या काळी आमच्या कॉलेजात आणि वसतिगृहात असलेली बरीच मुले पुढे बरीच प्रसिद्ध झाली. उस्मानिया विद्यापीठाचे उपकुलगुरू, बेंगलोरच्या सायन्स इन्स्टिट्यूटचे प्रमुख आणि भारत सरकारचे लष्करी खात्यातील वैज्ञानिक सल्लागार, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉक्टर

भगवंतम् हे त्यावेळी इंटर सेकंड इयरमध्ये शिकत होते. पोलिस ॲक्शनच्या वेळचे हैदराबाद राज्याचे एक सचिव जहीर अहमद (आता यू. एन. ओ. त) हे बी. ए. च्या वर्गात होते. इंग्रजीतून साहित्यनिर्मिती करून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविणारा भारतीय साहित्यिक राजाराव, सध्याचे सांगलीचे सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज रामचंद्रराव जनिब, हिंदुमहासभेचे पुढारी वाय. डी. जोशी हे माझ्या वर्गात होते.

माझे बंधू उस्मानिया विद्यापीठाच्या वसतिगृहात राहात. माझी तिकडे नेहमी ये-जा असे. उस्मानिया विद्यापीठात उर्दू फारशीचे नामांकित पंडित त्यावेळी एकत्र आले होते. उर्दूचे प्राध्यापक सज्जाद देहलवी. सर सय्यद अहमदचे सहकारी वहीदुद्दीन सलीम, फारसी पंडित डॉक्टर निजामुद्दीन, इतिहासज्ञ हारुनखान शेरवानी, गणिती आणि खगोलज्ञ प्रिन्सिपाल अब्दुल रेहमान, धर्मशास्त्रज्ञ मनाजिरुल्हसन गीलानी, अर्थशास्त्रज्ञ इलियास बरनी असे विद्वान हिंदुस्थानच्या कान्याकोपऱ्यातून उस्मानिया विद्यापीठात गोळा झाले होते. पुण्याच्या आणि हैदराबादच्या वातावरणात जमीनअस्मानाचा फरक होता. हैदराबाद हे वैभवशाली शहर आहे. या शहराची निर्मिती इ. स. १५९६ मध्ये झाली. त्यापूर्वी सध्या हैदराबाद नगरपालिकेच्या हद्दीत असलेला गोवळकोंड्याचा किल्ला ही कुतुबशाही सुलतानांची राजधानी होती. इ. स. १५९६ मध्ये महंमद कुली कुतुबशहा याने पश्चिम पूर्व वाहणाऱ्या मुसा नदीच्या दक्षिणेला हैदराबाद शहर वसविले ते सध्याचे जुने शहर होय. तेथे चारमिनार, मक्कामशीद, निजामाचे चौमोहल्ला, पंचमोहल्ला, पुरानी हवेली हे राजवाडे, प्रधानांचे, सरदारांचे मोठमोठे वाडे आहेत. हायकोर्टाची प्रेक्षणीय इमारतही नदीच्या दक्षिण तीरावर आहे.

नदीच्या उत्तरेला वस्ती वाढू लागली, ती. इ. स. १८०५ पासून होय. रेसिडेंटचा वाडा, निजाम कॉलेज, आबिद रोड हा बाजाराचा रस्ता, सार्वजनिक उद्यान, हैदराबादचे रेल्वेस्टेशन, सचिवालये, निजामाचा सध्याचा राहता वाडा, (याला किंग कोठी म्हणतात) उस्मानिया विद्यापीठ ही सर्व स्थळे नदीच्या उत्तरेला आहेत. हैदराबाद आणि सिकंदराबाद ही दोन शहरे आता एक झाली आहेत आणि एकाच महानगरपालिकेच्या अधिकारात आहेत. आता या दोन्ही शहरांची मिळून सध्याची वस्ती वीस लाखांपर्यंत गेली आहे.

हैदराबाद ही निजामाची राजधानी. शहरात मुसलमानांची संख्या त्या काळी शेकडा साठ तरी असावी. शहरात उर्दू भाषेचे प्राबल्य होते. मराठी, कानडी आणि तेलगू या भाषांना कांहीच महत्त्व नव्हते. इंग्रजीचा प्रभाव मात्र बराच

होता. मुसलमानांच्या राहणीचा, वेषभूषेचा, आणि भाषेचा प्रभाव सर्वांच्यावर झालेला दिसून येई. उर्दू ही सरकारदरबारची भाषा असल्यामुळे ती सर्वांना येणे अपरिहार्य होते. लोक पायजामा (सैल अगर चुडीदार) आणि शेरवाणी वापरीत. हिंदूंच्यात काळ्या गोंड्याची लाल उभी टोपी वापरणे फ्याशनेबल समजत, आमचे इतिहासाचे प्रोफेसर हणमंतराव हे सुटाबुटात कॉलेजला येत. ते वैष्णव होते. सूटबूट, कपाळावर अंगाऱ्याची रेघ आणि शेवटी गोल अक्षता, आणि वर डोक्याला काळ्या गोंड्याची लाल टोपी (याला तुर्की अगर रुमी टोपी म्हणत) अशा थाटात त्यांची मूर्ती प्रेक्षणीय दिसत असे. डॉक्टर भगवंतम हेही तुर्की टोपी वापरीत असत. मला आठवते, काहींची दास्यवृत्ती इतकी केविलवाणी असे की तुम्ही हिंदू आहात काय, तुमच्या पोशाखावरून वाटलं की तुम्ही मुसल्मान असाल, असे कोणाला म्हटले तर त्याला मोठे धन्य वाटे.

निजाम कालेजमध्ये इंग्रजीचे प्राबल्य असे. मला उर्दू आणि फारसी या भाषांचा अभ्यास होता त्यामुळे हैदराबादचे वातावरण अपरिचित वाटले नाही.

प्रिन्सिपाल बर्नेट हे आम्हांला इंग्रजी शिकवीत. त्यांचे शिकवणे आम्हांला पुष्कळदा समजत नसे. प्रोफेसर ड्यूऱ्यांड हे तर्कशास्त्र शिकवीत. हा विषय काही माझ्या डोक्यात उतरला नाही. इतिहास हा विषय माझ्या आवडीचा. त्यांत मी रमून जात असे. प्रोफेसर हणमंतराव हे बाबर या शब्दाचा उच्चार बेबर असा करीत, तेव्हा मला मोठी गंमत वाटे. सुरवातीला मी फारसी हा विषय घेतला होता. पण पुण्यातील शाळेच्या फारसीच्या मानाने हैदराबादचे फारसी जड जाऊ लागले म्हणून मराठी हा विषय घेतला. मराठीचे प्राध्यापक श्री. क्षीरसागर हे होते. मला वाटते पाठ्यक्रमात आम्हांला व्यंकटराव लेलेकृत अकबर चरित्र हे असावे. माझे मराठी वाचन बऱ्यापैकी होते. बोलणेही व्यवस्थित होते. पण लिहिण्याची सवय फक्त पत्रलेखनापुरती मर्यादित होती. त्यामुळे क्वचित् निबंध लिहिण्याची वेळ आली की तारांबळ उडे. ऱ्हस्व, दीर्घ जोडाक्षरे इत्यादि बाबतीत माझ्या असंख्य चुका होत. अनुस्वार कोठे द्यावे आणि कोठे देऊ नये हेच समजत नसे. सहामाही परीक्षेत मला शंभरपैकीं अवघे सत्तावीस मार्क मिळाले. तेव्हा मी मनातून चांगलाच हादरलो.

निजाम कॉलेजात असताना वाचन जसे म्हणावे तसे झाले नाही. कॉलेजच्या ग्रंथालयाची व्यवस्था अगदी भोंगळ असे. पुस्तके लाकडी कपाटात (काचेच्या नव्हे) भरून ठेवीत; त्यामुळे कपाटाकडे पाहून आत कोणती पुस्तके आहेत हे समजत नसे. टेबलावरील क्याटलागवरून पुस्तके निवडावी लागत. फर्स्ट इयरच्या मुलांना आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पुस्तके घेता येत असत. क्याटलॉग-

वरून पुस्तक निवडावे, स्लिपवर पुस्तकाचे नाव लिहावे आणि गोरक्षफंडासारखी एक पेटी ठेवलेली असे तिच्या भोकात स्लिप घालावी हा नियम असे. बहुतेक वेळा कॉलेज सुटल्यावर पुस्तक घेण्यासाठी जावे तो ग्रंथपालांनी पुस्तक नाही असे सांगावे असा प्रकार होत असे. आणि मग पुढच्या आठवड्यापर्यंत वाट पाहावी लागत असे.

बेदर जिल्ह्यात मैलार नावाचे तीर्थस्थान आहे. तेथे खंडोबाचे प्रसिद्ध देऊळ आहे. असे म्हणतात की एक भक्त खंडोबाच्या दर्शनाला गेला. त्या प्रदेशात तो नवखा होता. दर्शन घेऊन तो परत निघाला. तो प्रवासात असताना संध्याकाळ झाली. त्याच्यापाशी दोन हजार रुपये होते. ही जड जोखीम बरोबर बाळगीत तो वाट चालू लागला. रात्र जसजशी अधिक होऊ लागली तसतशी त्याची काळजी वाढू लागली. एखादे गाव आढळले तर रात्रीचा मुक्काम करावा असा त्याचा विचार होता. मध्य रात्रीच्या सुमारास त्याला एक गजबजलेले शहर आढळले. शहरातील रस्ते, वाडे, बाजारपेठ, अलोट जनसमुदाय ही पाहून तो प्रवासी बुचकळ्यात पडला. हे कोणते शहर असावे हे त्याला कळेना. शहरात कोठेतरी मुक्काम करावा या विचारात तो असता, एका घराच्या दारात एक म्हातारी बाई उभी असलेली आढळली. तो प्रवासी म्हणाला, ‘ बाई, मला एका रात्रीसाठी तुमच्या घरी मुक्काम करता येईल का ? मी या प्रदेशात नवखा आहे. ’ ती बाई म्हणाली ‘ या ना, आत या, तुम्ही खुशाल माझ्या घरी राहू शकता. ’ तो तिच्या मागोमाग घरात गेला. बाईने पाहुण्याची उत्तम बडदास्त ठेवली. रात्री झोपण्यापूर्वी त्याने आपल्या जवळ असलेली दोन हजार रुपयांची पिशवी बाईच्या हातात दिली आणि तिला म्हटले, ‘ बाई मी उद्या येथून निघताना ही पिशवी मला परत द्या. ’ बाई म्हणाली, ‘ तुम्ही त्याची अगदी काळजी करू नका. तुमचे रुपये माझ्यापाशी सुरक्षित राहतील. ’ प्रवासी झोपी गेला. सकाळी त्याला जाग आली. तो आपण एका उकिरड्यावर झोपलो आहोत. असे त्याला आढळले. शहराचा कोठेच पत्ता नव्हता. प्रवाशाचे सगळे पैसे नाहीसे झाले होते. तो वेड्यासारखा इकडे तिकडे भटकू लागला. बरेच लांब गेल्यावर त्याला एक मनुष्य भेटला. प्रवाश्याने त्याला आपली हकीकत सांगितली. तो माणूस म्हणाला, ‘ अरेरे, तुला काल रात्री जे शहर आढळले, तो भुतांचा बाजार होता. ’ ती माणसे नव्हती, भुते होती. ’ हे ऐकून तो प्रवासी रडू लागला. ‘ अरे देवा, माझे रुपये नाहीसे झाले. आता काय करू ’ म्हणून तो शोक करू लागला. तो माणूस म्हणाला, ‘ एक उपाय आहे. दर बारा वर्षांनी एकदा हा भुतांचा बाजार भरतो. तर तू बारा वर्षांनी पुन्हा एकदा इकडे ये. ती म्हातारी आपल्या घराच्या

दारात उभी असलेली दिसेल. तिच्यापाशी तू आपले रुपये माग. ते परत मिळण्याची शक्यता आहे. '

बारा वर्षे त्या प्रवाश्याने वाट पाहिली. आणि नंतर ठरलेल्या वेळी तो त्या ठिकाणी गेला. तेथे भुतांचा बाजार भरला होता. प्रवाश्याला ती म्हातारी दारात उभी राहिलेली दिसली. तिला पाहताच तो म्हणाला 'बाई, माझी रुपयांची पिशवी तुमच्याकडे राहिली आहे. ती तेवढी परत द्या पाहू.' ती बाई म्हणाली 'या या, मी कधीपासून तुमची वाट पाहात आहे. ही घ्या तुमची पिशवी.' असे म्हणून तिने पिशवी त्याच्या हातात दिली. ती घेऊन त्या इसमाने भुतांच्या बाजारातून पळ काढला.

निजाम कालेजचे ग्रंथालय म्हणजे भुतांचा बाजार, पुस्तक मिळाले नाही की आठ दिवसपर्यंत वाट पाहायची, पुन्हा मिळाले नाही की पुन्हा वाट पाहात राहायचे. अशा परिस्थितीत कालेज ग्रंथालयातून मी किती पुस्तके मिळविली असतील याची कल्पनाच केलेली बरी! कॉलेजमध्ये माझा वर्गबंधू कै. डी. माणिकराव (वकील रायचूर) आणि त्यांचा भाचा व्यंकटेश हे होते. त्यांच्याकडून मला टागोरांच्या कादंबऱ्या गोरा, नौकाडूबी या वाचण्यास मिळाल्या. दिगंबर माननीकर या वर्गबंधूकडून शर्लाक होम्सच्या डिटेक्टिव कथा मिळाल्या. वसतिगृहाचे सुपरिंटेंडेंट प्रोफेसर हणमंतराव यांनी मध्वाचार्यांचे इंग्रजी चरित्र वाचण्यास दिले. आबिद रोडवर आसफिया स्टेट लायब्ररी हे राज्य ग्रंथालय होते. तेथे मी रोज संध्याकाळी जात असे. तेथे जनरल श्रीनागेश यांचे वडील नेमाने येत. तेथेही काही पुस्तके वाचण्यास मिळाली. माझ्या बंधूंच्या मार्फतीने उस्मानिया विद्यापीठ ग्रंथालयातून मी काही पुस्तके घेऊन वाचली.

याच सुमारास ब्रह्मचर्य हेच जीवन, वीर्यनाश हाच मृत्यू हे पुस्तक आमच्या हाती लागले. ते आम्ही दोघा बंधूंनी अधाशासारखे वाचून काढले. इतकेच नव्हे तर आमच्या वडिलांचे मित्र मध्वराव तहशीलदार यांना आम्ही ते पुस्तक वाचण्याची शिफारस केली.

मध्वराव तहशीलदारासारखा चिक्कू मनुष्य मी आयुष्यांत कधी पाहिला नसेल. यांचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. इ. स. १८५३ मध्ये इंग्रजांनी निजामाकडून वऱ्हाड प्रांत आणि उस्मानाबाद आणि रायचूर हे जिल्हे गहाण म्हणून घेतले. रायचूर आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांवर इंग्रजांचा अंमल १८५३ पासून १८६१ पर्यंत होता. या आठ वर्षांच्या काळात इंग्रजांनी या जिल्ह्यात खूपच सुधारणा केल्या. त्यांनी अनेक स्थानिक लोकांना नोकरीत घेतले. त्यांपैकी दोन बंधू गुरुभीमराव आणि स्वामिराव हे पुढे निजाम राज्यात

कमिशनरच्या हुद्यापर्यंत चढले. हे दोघे बंधू सिंधनूर तालुक्यातील एका खेड्याचे कुलकर्णी. पण इंग्रजी अंमलात त्यांनी नोकऱ्या पत्करल्या आणि महसूल खात्यात चांगली कामगिरी बजावली. इंग्रजांनी १८६१ मध्ये रायचूर जिल्हा निजामाला परत दिला. तेव्हा गुरुभीमराव आणि स्वामिराव हे निजामाच्या नोकरीत दाखल झाले. मध्वराव हे गुरुभीमरावाच्या घरचे पुजारी आणि घरजावई. गुरुभीमरावांना मुलगा नव्हता त्यामुळे त्यांनी आपली एकुलती एक मुलगी मध्वरावांना देऊन त्यांना आपले घरजावई करून घेतले. गुरुभीमरावांवर हैदराबादचे मुख्य प्रधान सर सालारजंग (१८५३ ते १८८३) यांची फार मर्जी होती. गुरुभीमराव आणि स्वामिराव यांचा कर्तबगार सुभेदार म्हणून निजाम राज्यात मोठा लौकिक झाला. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातीतील अधिकाऱ्यांना त्यांच्याबद्दल फार आदर वाटे. गुरुभीमरावाच्या मृत्यूनंतर निजाम सरकारने त्यांच्या बायकोला आणि मुलीला तहाहयात पेन्शन चालू केली. त्या रायचूर जिल्ह्यातील मुद्गल या गावी राहू लागल्या. मध्वराव हे घरजावई म्हणून त्यांच्यापाशी राहात. आणि सराफीचा धंदा करीत. माझे आजोबा शेषगीरराव हे गुरुभीमरावांच्या हाताखाली काम करीत. त्यामुळे माझ्या वडिलांना गुरुभीमरावांच्या घराण्याविषयी फार आदर वाटे.

त्यावेळी वडील रायचूर जिल्हा कचेरीत गोषवारा नवीस (ट्रेझरी ॲब्स्ट्रॅक्ट) म्हणून काम करीत होते. तो काळ इ. स. १९०० च्या आसपासचा असावा. त्यावेळी मध्वराव हे आपली बायको आणि सासू यांना घेऊन रायचुरास आले होते. माझे वडील त्यांना भेटण्यास म्हणून गेले. गुरुभीमरावासारख्या कमिशन-राचा (सुभेदार-जावई एका खेड्यात सराफीचा धंदा करीत बसला आहे हे पाहून माझ्या वडिलांना फार वाईट वाटले. त्यांना हैदराबादेस नेऊन मंत्र्यांची त्यांची गाठ घालून द्यावी म्हणजे मध्वरावांना त्यांच्या योग्यतेनुरूप जागा मिळेल असे त्यांना वाटले. गुरुभीमरावांच्याबद्दल आदर बाळगणारे असंख्य हिंदूमुसल-मान अधिकारी त्यावेळी हैदराबादेत होते. मध्वरावांची सासू त्यांना सोडण्यास तयार नव्हती, मोठ्या मुष्किलीने माझ्या वडिलांनी तिचे मन वळविले आणि मध्वरावांना घेऊन ते हैदराबादेला गेले.

मंत्र्यांना भेटायचे तर जामानिमा करून जाणे आवश्यक होते. चांगला पायजामा, उंची शेरवाणी, आणि डोक्यावर हैदराबादी पगडी हा त्यावेळचा दरबारी पोषाक होता. निजामाकडे जाताना मात्र वरील पोशाकाला जोडून कमरपट्टा (याला बगलूस म्हणत) वापरीत. मध्वरावांनी मद्रासकडील पद्धती-प्रमाणे भलीभक्कम शेंडी राखली होती. तिच्या भोवती ते गजराही घालीत.

आता शेंडीवर पगडी ठेवली तर ती बसेना. मागून उंच होऊन ती कपाळावर घसरू लागली. माझ्या वडिलांनी मध्वरावांना सांगितले की तुम्ही शेंडी कमी करा. नाहीतर मुलाखतीच्या वेळी तुमचे ध्यान बावळट दिसेल. पण मध्वराव हे काही केल्या शेंडी कमी करण्यास तयार होईनात. हे पाहून माझ्या वडिलांनी एक युक्ती योजिली. रात्री मध्वराव झोपले असता माझ्या वडिलांनी कात्री घेऊन त्यांची शेंडी कापून आटोपशीर केली. सकाळी मध्वराव जागे होऊन शेंडी कुरवाळू पाहतात तो काय, फक्त बारीकशी शेंडी त्यांच्या हाती लागली. माझी शेंडी कुणीतरी कापली म्हणून ते मोठ्याने गळा काढून रडू लागले. माझे वडील त्यांना म्हणाले, 'तुमची शेंडी कुणी कापली हे मला माहीत नाही. पण आता रडून काय उपयोग! शेंडी बारीक झाली इतकेच ना! मग त्याचा इतका शोक का करावा? ईश्वर करील तर पुन्हा शेंडी वाढेल आणि तुम्ही पुन्हा तिच्या भोवती गजरा बांधू शकाल.' असे सांगून त्यांनी मध्वरावाचे समाधान केले आणि ते त्यांना मंत्र्यांच्या भेटीला घेऊन गेले. गुरुभीमरावांचे जावई ते हे, म्हणून मंत्र्यांना सांगितल्याबरोबर त्यांनी मध्वरावांचा मोठा आदर-सत्कार केला. त्यांनी मध्वरावांची जिल्हा ट्रेझरीचे सुपरिंटेंडेंट (त्यांना खजानदार म्हणत) म्हणून नेमणूक केली. आणि लवकरच मामलेदार म्हणून नेमतो असे त्यांना आश्वासन दिले. त्याप्रमाणे मध्वराव हे लवकरच तहसीलदार (मामले-दार) झाले. पण गृहस्थ अत्यंत चिक्कू. आपल्या हुद्याचा बडेजाव त्यांना सांभाळता आला नाही. त्यामुळे ते शेवटपर्यंत तहसीलदारच राहिले. इतकेच नव्हे तर लाचखाऊ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हेरले की मध्वराव हे पैसे बाळगून आहेत. ते मधून मधून मध्वरावांवर काहीतरी बालंट आणीत आणि त्यांना सस्पेंड करण्याची धमकी देत. त्या धमकीने घाबरून जाऊन मध्वराव त्यांना दहा पाच हजार रुपये देऊन आपली सुटका करून घेत. अशा रीतीने त्यांचा बराच पैसा नाहीसा झाला.

माझ्या वडिलांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिघडू लागली. पेन्शनचा निकाल लवकर लागेना. शेतावरून आणलेले पैसे संपत आले असावेत. आम्हा दोघा बंधूना त्यांनी वसतिगृहात ठेवले होते. तो खर्च त्यांना झेपेना. शेवटी हैदराबादेस बिऱ्हाड करावे म्हणून सर्वांना घेऊन ते हैदराबादेस आले. आणि आमचे वसतिगृह सुटले.

हैदराबादेत आम्ही प्रथम जामबाग आळीत माधवराव अंबडकर यांचे घरी बिऱ्हाड करून राहिलो. तेथे आम्ही दोन तीन महिने राहिलो असू.

जामबागेत आम्ही असताना माझ्या वडिलांचे कोडंगल मधील शेजारी

गोपाळराव (फारेस्ट खात्यात कारकून होते.) हे एकदा आमच्या घरी आले. सडेतोड आणि फटकळ म्हणून त्यांची ख्याती होती. अनेकांना त्यांचे वागणे तऱ्हेवाईक वाटे. मला त्याचा अनुभव आला तो असा : गोपाळरावांना मुलगा नव्हता. फक्त एकुलती एक मुलगी होती. ती मला द्यावी असा त्यांचा विचार होता. ते आमच्याकडे आले आणि मला म्हणाले, ' सेतुराव, मला आपली मुलगी तुम्हांला द्यायची आहे. तुम्ही हो म्हणालात की आपण तिरुपतीला जाऊन चटकन् लग्न उरकून घेऊ. ' मी म्हटले, ' मला इतक्यात लग्न करावयाचे नाही. ' गोपाळराव म्हणाले, ' हा काय चावटपणा चालविला आहे ? का लग्न करावयाचे नाही ? तुमचे डोके ठिकाणावर आहे का नाही ? ' मी नम्रपणे म्हटले, ' मला अजून शिकायचे आहे. ' गोपाळराव म्हणतात, ' काय ! हा फाजीलपणा पुरे झाला. असे डोके फिरल्यासारखे वागू नका. ' या पठाणी पद्धतीला मी काहीच उत्तर दिले नाही. मी कॉलेजला निघून गेलो. गोपाळरावांनीही कंटाळून माझा नाद सोडला.

दोन तीन महिन्यांत आम्ही आमचे बिऱ्हाड बदलून नव्या घरात बिऱ्हाड केले. तुळजा गुडा नावाच्या आळीत हे घर होते. आमची सांपत्तिक स्थिती खालावली असली तरी पाहुण्यांची आणि आप्तेष्टांची वर्दळ काही थांबली नव्हती. आमचा मामा तर आम्हांला कायमचाच चिकटल्यासारखा होता. दिवसभर तो विड्या फुंकीत हिंडत असे. मला एकदा तो म्हणाला, ' बरे का रे, वयाच्या पंधराव्या वर्षापासून मी विड्या ओढीत आहे, ' मी म्हटले, ' मामा, आणि बायकांचा नाद तुला कधीपासून रे लागला ? ' ' तोही त्याच वेळेपासून, ' मामाने ऐटीत उत्तर दिले. मामा जरीचा रुमाल वापरीत असे. त्याचा त्याला मोठा अभिमान वाटे. एकदा त्याने रुमाल धुवायला दिला. धोब्याने तो आठ दहा दिवस आणला नाही. टोपी घालून फिरण्यास त्याला फार वाईट वाटे. एक दिवस आम्ही दोघे जामबागेतून फिरत होतो. तो समोरून आमचा धोबी येत होता. त्याला पाहताच माझ्या मामाची तळपायाची आग मस्तकाला गेली. तो त्याच्या मागे धावत सुटला. धोब्याने जलदीने पळ काढला. मी मोठ्या कष्टाने मामाला आवरले. मी म्हटले, ' मामा, अरे हा काय तमाशा आहे ? ' तो म्हणाला, ' हरामखोर लेकाचा, त्याच्या डोक्यावरचा रुमाल पाहिलास ना ! अरे, तो जरीकाठीचा रुमाल माझा. मी आठ दिवसांपासून टोपी घालून फिरत आहे आणि हा लेकाचा माझा रुमाल डोक्यावर मिरवीत आहे. '

तुळजा गुडाच्या घरात मध्वराव तहसीलदारही पाहुणे म्हणून दोन तीन दिवस राहिले होते. त्यांची पहिली बायको वारली होती, म्हणून त्यांनी दुसरे

लग्न केले होते. आमचे वडील जुन्या ऋणानुबंधामुळे त्यांची फारच बडदास्त ठेवीत. मध्वरावांनी आम्हांला विचारले, 'एखादे पुस्तक वाचण्यास देता काय ?' त्याच सुमारास आम्ही 'ब्रह्मचर्य हेच जीवन, वीर्यनाश हाच मृत्यू' हे पुस्तक वाचीत होतो. त्या पुस्तकामुळे वीर्यासंबंधी आमचे भलतेच समज झाले. आम्हांला वाटू लागले की मनुष्य जितका अधिक लंगोटबंद तितका तो पराक्रमी समजावा. पुस्तकात आम्ही वाचले की रामाने आयुष्यातून एकदाच सीतेशी समागम केला म्हणून लवकुशासारखे सिंहतुल्य पुत्र निपजले. पुस्तकाने आम्ही भारावून गेलो. कित्येक दिवस आम्ही 'मरणम् बिंदुपातेन जीवनम् बिंदुधारणात्' हा मंत्र समजून त्याचा उच्चार करीत होतो. आम्ही मध्वरावांना या पुस्तकाची शिफारस केली. अर्थात ते पुस्तक त्यांनी घेतले. त्यांना मराठी घेताचे येत होते, म्हणून बरे; नाहीतर नवीन कुटुंबापासून त्यांना पांच-सहा मुले झाली ती त्यांना हे पुस्तक वाचून झाली नसती !

मला वाटते तो नोव्हेंबर अगर डिसेंबर (१९२५)चा महिना असावा. आमच्या घरी त्यावेळी लांबपैकी नात्यातील बाई येऊन राहिली होती. तिचे वय पंचवीस आणि तीसच्या दरम्यान असावे. हैदराबादच्या दक्षिण भागात (त्याला शाली बंडा म्हणत.) तिच्या मालकीचे एक घर होते. एकदा ती मला म्हणाली, 'आमचे जुने घर शालीबंड्यात आहे. घरात कोणीच राहात नाही. पुष्कळ दिवसांपासून मी घराकडे गेले नाही. आज जावे म्हणते. तुम्ही माझ्याबरोबर येता काय ?' मला त्या दिवशी सुट्टी असावी. मी म्हटले, 'ठीक आहे. मी तुझ्या-बरोबर येतो.' आम्ही दोघे शालीबंड्याला गेलो. घर मोठे आणि प्रशस्त होते. पण जुनाट वस्तीतील जुनाट घर होते. घर पाहून झाल्यावर आम्ही परत यायला निघालो. टांगा न मिळाल्यामुळे आम्ही एक शिक्राम ठरविला. हे वाहन त्यावेळी हैदराबादेत चालू होते. शिक्रामला घोडा जोडलेला असे. पण शिक्राम टांग्या-प्रमाणे उघडा नसे. शिक्राममध्ये आत बसले की पडद्याची पूर्ण सोय असे. शिक्राम हाकणारा समोर बसे, पडदा बाजूला सारून मुद्दाम आत पाहिले, तरच त्याला आतले दिसावे, एरव्ही नाही. आम्ही शिक्राममध्ये बसून निघालो, चारमिनारपर्यंत आलो असू, नसू, तोच जोराचा पाऊस पडू लागला. घोड्याला पुढे चालणे अशक्य झाले, गाडीवाल्याने गाडी अंमळ आडोशाला उभी केली, गाडीला पडदे लावले असल्यामुळे आम्ही दोघे, ती तरुणी आणि मी पडद्यात होतो. इतक्यात त्या तरुणीच्या मनात काय आले कुणास ठाऊक तिने मला जवळ ओढून घट्ट आलिंगन दिले. तिच्या डोळ्यातील मला अगदी अपरिचित असलेला भाव पाहून मी अगदी गोंधळून गेलो. तिच्या मिठीचा धक्का इतका

मोठा होता की आमचा शिक्राम हलला. गाडीवाल्याने पडदा बाजूला सारून आत डोकावून पाहिले. तोपर्यंत ती तरुणी बाजला सरकून बसली होती.

तो एकच क्षण ! लवकरच पाऊस थांबला आणि आम्ही शिक्राममधून घरी परतलो. मी ती घटना पुढे विसरून गेलो. अद्याप मी असे धरून चालतो की त्या तरुणीचा त्या वेळचा आवेग बाहेरच्या पावसाचा आणि थंडीचा परिणाम असावा. त्यात काही हेतू नसावा. पण शृंगाराला मी जर अगदीच नवखा नसतो, तर त्यावेळी काय घडले असते आणि त्या एकच प्याल्याचे काय परिणाम झाले असते याची कल्पनाही करवत नाही. हा नाद लागला असता आणि मी माझ्या मामाच्या वळणावर गेलो असतो, तर आयुष्यातील जिद्दच नाहीशी झाली असती असे मला वाटते.

१९२५ च्या नोव्हेंबरपासून माझे वडील संधिवाताने आजारी पडले. त्यांना गेली पचवीस वर्षे संधिवाताचा विकार होता. पण या खेपेस त्यांचे दुखणे फारच विकोपाला गेले. आमच्या घरावर एक प्रकारची अवकळा पसरली.

आमच्या घरात पूजाअर्चा, नैवेद्य, वैश्वदेव, भजनपूजन ही नेहमी चालू असत. आम्हांला नंतर असे कळले, की आमचे घर ज्या जागी होते तेथे पूर्वी मुसलमानांचे कबरस्तान होते. माझे वडील सांगत, "मला कित्येकदा भयंकर स्वप्ने पडत. मला स्वप्नांत कोणी मुसलमान माझ्या छातीवर बसून माझा गळा दाबू पाहात आहे असे वाटे. आणि प्रत्येक खेपेस त्रिनामधारी मूर्ती (श्री व्यंकटेश) प्रकट होई आणि तो मुसलमान 'छोड दिया छोड दिया' म्हणत पळून जाई."

त्या दुखण्यात वडील वारले असते तर आमचे घर बसलेच असते. माझे बंधू उस्मानाबाद जिल्हा कचेरीत कारकून म्हणून रुजू झाले असते. मलाही कोठे तरी नोकरी पत्करावी लागली असती. भावाबहिणींचे शिक्षण, आई, आजी यांचा सांभाळ या सर्व गोष्टी मला कारकुनी पत्करून पार पाडाव्या लागल्या असत्या. गुलबर्ग्याचे घर आणि विजापूरकडची शेतीवाडी ही विकली गेली असती. कदाचित् मीही वडिलांप्रमाणे अव्वल कारकून म्हणून सेवानिवृत्त झालो असतो.

पण परमेश्वराने खैर केली. हैदराबादची दमट हवा संधिवाताच्या दुखणे-कऱ्याला अतिशय वाईट. त्यापेक्षा गुलबर्ग्याची कोरडी हवा किती तरी चांगली- आम्ही ताबडतोब हैदराबादचे बिऱ्हाड मोडले आणि वडिलांना घेऊन गुलबर्ग्यास आमच्या घरी आलो. त्यावेळी वडील अत्यवस्थ होते. पण पंधरा दिवसांतच त्यांचे दुखणे कमी होऊ लागले. एक महिन्यात ते पूर्ण बरे झाले.

नाताळाची सुट्टी संपल्यावर आम्ही दोघे बंधू हैदराबादेस आलो. वसति-

गृहाचा खर्च झेपण्यासारखा नव्हता. हैदराबादेस एका मध्यवर्ती जागेत शाळा, कॉलेजे आणि सरकारी आफिसे यांना जवळ असलेले मुरलीधरबाग नावाचे स्थळ आहे. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी राजा मुरलीधर नावाच्या सरदाराने ही बाग विकत घेऊन तेथे देवीचे भव्य देऊळ बांधले. बागेच्या ऐवजी या जागेच्या आवारात जहागिरदाराने पाच पंचवीस घरे बांधून ती भाड्याने दिली, देवळा-भोवती ओवऱ्या होत्या. त्यांच्या खोल्या पाडल्या आणि त्याही भाड्याने दिल्या. आम्ही त्यांपैकीच दोन खोल्या भाड्याने घेतल्या. आम्ही हाताने स्वयंपाक करून घेत असू. मुरलीधर बागेत त्यावेळी बळवंतराव नावाचे वकील राहात. गुलबर्गा जिल्ह्यातील चिन्मळ्ळी या गावच्या जहागिरीत त्यांचा वाटा होता. यामुळे त्यांना बळवंतराव जहागिरदार म्हणत. त्यांचा मोठा मुलगा राघू जहागिरदार हा राष्ट्रीय वृत्तीचा होता: म्याट्रिकच्या परीक्षेत तो गणिताच्या पायी चार पाच वेळा तरी नापास झाला असावा. तो खादीधारी असून काँग्रेसचे एकही अधिवेशन चुकवीत नसे. तो आम्हांला परप्रांतांतील अनेक नवीन नवीन गोष्टी सांगे. गांगुली म्हणजे गंगोपाध्याय, मुखर्जी म्हणजे मुख्योपाध्याय, ब्यानर्जी म्हणजे बंधोपाध्याय, च्याटर्जी म्हणजे चट्टोपाध्याय, टागोर म्हणजे टाकूर हे मला प्रथम त्याच्याकडून कळले. राघू जहागिरदार हा पुढे शांतिनिकेतनमध्ये जाऊन राहिला. तेथून परत आल्यावर तो जर्नलिस्ट झाला. पोलिस ॲक्शननंतर तो राज्यसभेचा सभासद झाला. आता हैदराबादेत जर्नलिस्ट म्हणून तो काम करीत आहे. राघू जहागिरदाराचा मावस भाऊ जानिब हा माझा वर्गबंधू. तोही मुरलीधर बागेत राहत असे. तो आता सांगलीला डिस्ट्रिक्ट जज्ज आहे. (आता सेवानिवृत्त).

माझे कॉलेजचे शिक्षण चालू होते. वाचनात डिकन्स, स्कॉट, जेन ऑस्टिन, कॉनन डॉईल इत्यादींच्या कादंबऱ्या येत होत्या. क्वचित् इतिहासाची पुस्तकेही वाचण्यास मिळत. मला आठवते काही मराठी विद्यार्थ्यांनी एक मित्र मंडळ काढले होते. त्याचे प्रमुख मुरलीधर घाणेकर (आता सेवानिवृत्त नायब संचालक शिक्षण खाते, पुणे) हे होते. या मंडळात मी एकदा भाषण केल्याचे मला आठवते.

वर्तमानपत्रे वाचण्याची सवय मला हळूहळू लागत चालली होती. मला वाटते मी बॉंबे क्रानिकल आवडीने वाचत असावा. पण भारतीय राजकारणाचा किंवा हैदराबादच्या राजकारणाचा मी त्यावेळी अभ्यास केला नाही. हैदरा-बादचे संस्थानी वातावरण राजकारणाला विशेष पोषक नव्हते. हैदराबादच्या पुढाऱ्यांत न्यायमूर्ती केशवराव कोरटकर, धर्मवीर वामनराव नाईक, जनार्दनराव देसाई, माडपाटी हणमंतराव इत्यादींची नावे पुढे येऊ लागली होती. राघवेंद्रशर्मा हे हैदराबाद सोडून पुण्यास स्थायिक झाले होते. तेथून ते संस्थानी

प्रजेच्या चळवळी चालवीत. केशवराव कोरटकर हे प्रामुख्याने आर्यसमाज, सामाजिक सुधारणा, शिक्षणसंस्था, ग्रंथालये इत्यादींच्या द्वारे जागृती घडवून आणीत होते. माडपाटी हणमंतराव हे तेलंगण प्रांतात ग्रंथालयद्वारे चळवळ चालवीत होते.

पण हैदराबादेत खरे वर्चस्व मुसलमान समाजाचे होते. राज्यकारभाराची भाषा उर्दू होती. उस्मानिया विद्यापीठ इ. स. १९१७ मध्ये स्थापन झाले होते. यांचे श्रेय त्यावेळचे अर्थसचिव सर अकबर हैदरी, (हे पुढे पंतप्रधान झाले) यांच्याकडे जाते. या विद्यापीठामुळे मुसलमान मध्यम वर्गातून अनेक पदवीधर तयार झाले. त्यांना नोकऱ्या हव्या होत्या. तोपर्यंत पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, मद्रास इत्यादी प्रांतांतून सुशिक्षित मुसलमान शेकडोंनी येऊन हैद्राबादेत नोकऱ्या करू लागले होते. त्यांच्यात आणि उस्मानिया विद्यापीठाच्या पदवीधरांत स्पर्धा सुरू झाली आणि तीतूनच मुल्की-गैर मुल्की चळवळ सुरू झाली. इ. स. १८५८ नंतर बाहेरून आलेल्या मुसलमानांतूनच जवळ जवळ सर्वत्र उच्चाधिकाराच्या जागा भरल्या गेल्या. हैद्राबादचा पिढीजाद जहागिरदारांचा वर्ग मागे पडला होता. इ. स. १९२५ मध्ये पायग्याचे सरदार नबाब वलीउद्दौला हे पंतप्रधान होते. इ. स. १९२६ मध्ये ते मक्केच्या यात्रेला गेले. जाण्यापूर्वी त्यांनी मद्यपान वर्ज्य केले होते.

ते मक्केच्या यात्रेला निघाले ते अगदी विरक्त होऊनच. स्टेशनवर महाराजा सर किशनप्रसाद यांनी त्यांना आशीर्वाद देताना म्हटले, 'यशस्वीपणे यात्रा आटोपून परत या' यावर नबाब वलीउद्दौला म्हणाले 'नाही, नाही, महाराजासाहेब आता परत येणे नाही.' ते मक्केतच मरण पावले. जन्मभर अमाप ऐश्वर्य भोगणाऱ्याचा विरक्त मनःस्थितीत मक्केत मृत्यू व्हावा याबद्दल हैदराबादेतील मुसलमान समाजाने धन्योद्गार काढले. त्यांच्या मृत्यूनंतर हैदराबादचे श्रेष्ठ हिंदू जहागिरदार, अकबरकालीन तोडरमलचे वंशज, मूळचे पंजाबी खत्री, किशनप्रसाद (आडनाव मेहरा) हे पंतप्रधान झाले. ते नावाचेच पंतप्रधान होते. राज्याची सूत्रे इंग्रज मंत्री आणि सर अकबर हैदरी अर्थमंत्री यांच्याच मर्जीने हलत.

इ. स. १९२६ मध्ये वऱ्हाड प्रकरणात लॉर्ड रीडिंग याने निजामाला सणसणीत पत्र लिहून गप्प बसविले आणि त्याच्या नाड्या अधिक आवळून धरण्यासाठी हैदराबाद राज्यात इंग्रज अधिकारी भरले; याचा आम्हांला आतून आनंद होत होता. पण तो व्यक्त करण्याची सोय नव्हती.

हैदराबादेस आल्यावर आमचे सोवळे,–ओवळे, उपास–तापास ही पार

नाहीशी झाली. सुरवातीला माझे बंधू वसतिगृहात असताना एकादशीचा उपवास करीत. एका एकादशीला त्यांनी आपल्या खोलीतील मित्र शंकरराव जाधव यांच्या आग्रहाला न जुमानता उपवास केला. रात्री त्यांना सपाटून भूक लागली. तीमुळे त्यांना झोप येईना. खोलीतील दिवे मालविले होते. जाधवला झोप लागली असावी या समजुतीने माझे बंधू हळूच उठले. पलंगाखाली कालवलेल्या पोह्यांची पुरचुंडी होती, ती त्यांनी काढली आणि अंधारात पलंगावर बसून ते पोहे खाऊ लागले. खाण्याचा आवाज येऊ लागला. तसा शंकर जाधव जागा झाला. त्याला प्रथम वाटले की उंदीर खुडबूड करीत आहेत. थोड्या वेळाने त्याच्या लक्षात आले की माझे बंधू चोरून पोहे खात आहेत. त्याला हसू आले. तो माझ्या बंधूंना म्हणाला, ' अरे, असा अंधारात काय खात बसला आहेस ? लाइट लावून खा ना ! तू एकादशीचा उपवास मोडलास हे मी कुणालाच सांगणार नाही. ' माझे बंधू खजील झाले. ते म्हणाले, ' अरे, मला अतिशय भूक लागली होती. मी तरी काय करू ? '

पण आम्ही मुरलीधर बागेत बिऱ्हाड केल्यावर हे उपासतापास संपले; सोवळेओवळेही आम्ही पाळीनासे झालो. इतकेच नव्हे तर सोवळ्याओवळ्याची आम्ही टिंगल करू लागलो. सोवळ्याओवळ्याच्या भलत्याच समजुतीतून विनोद कसे निर्माण होत याचे उदाहरण रायचूर जिल्ह्याच्या एका ब्राह्मणाच्या बाबतीत घडले. हा ब्राह्मण गौळीगुडा आळीतील एका घरी उतरला होता. त्याला कोणी-तरी सांगितले की नळात वॉशर असतो तो कातड्याचा. मग नळाचे पाणी सोवळ्याला कसे चालावे ? त्या ब्राह्मणाने आपल्या बरोबर हरिणीचे कातडे आणले होते. रात्री सगळे झोपी गेले असताना त्याने हरिणाच्या कातड्याचा तुकडा घेतला. नळात तो बसवावा ही त्याची इच्छा. त्याने दगडाने आघात करून नळ फोडला. तोच नळाचे पाणी धो धो वाहू लागले. घरातील मंडळी जागी झाली. पाहतात तो हा ब्राह्मण हरिणाच्या कातड्याचा तुकडा नळात बसविण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्वांनी त्यांना हात जोडून सांगितले की, ' आचार्य ' आपण रायचूरला परत जाऊन विहिरीच्या पाण्याने आपली सोवळ्याची गरज यथेच्छ भागवून घ्यावी. हैदराबादेत आपला निभाव लागणे कठीण आहे. '

इ. स १९२६ च्या मार्च महिन्यात हैदराबादेत प्लेगचा उद्भव झाला. त्यात माझा चुलत भाऊ सीताराम हा मरण पावला. प्लेग दिवसेंदिवस वाढू लागलेला पाहून कॉलेजच्या परीक्षा उन्हाळ्याच्या सुट्ट्यानंतर घ्याव्या असे ठरविण्यात आले. निजाम कॉलेजला सुट्टी देण्यात आली आणि मी एप्रिलच्या सुरवातीला

गुलबर्ग्याला परत आलो. माझे बंधू बिंदुमाधवराव हेही इंटरची परीक्षा आटोपून गुलबर्ग्यास परत आले. सुट्ट्या संपल्यानंतर उस्मानाबादच्या कलेक्टर कचेरीत त्यांना कारकुनीवर रुजू व्हावयाचे होते.

माझ्या वडिलांची तब्येत बरी होऊन ते हिंडू फिरू लागले होते. घरात आमच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीचा परिणाम दिसून येऊ लागला होता. माझे वडील बंधू नोकरीवर केव्हा रुजू होतात याची वाट पाहात वडील बसले होते. माझी पहिली मामी वारल्यापासून मामा आमच्याकडे राहिला होता. गुलबर्ग्याला त्याने एक रखेली ठेवली होती. तिच्या पायी तो आपल्या बायकोच्या दागिन्यांची धूळधाण करीत होता. आपल्या रखेलीला त्याने हजार बाराशेची नथ दिली होती. एक दिवस तो मला म्हणाला, ‘काय रे येतोस का माझ्या-बरोबर, माझा माल कसा आहे तो पाहा तर खरा.’ मी त्याच्या बरोबर गेलो. रेल्वेस्टेशनच्या जवळच त्या बाईचे घर होते. बाईने आमचे स्वागत केले. ती दिसण्यात मोठी गोड होती. माझा मामा समोरच तिच्या मांडीवर डोके टेकून निजला. मी हे दृश्य मोठ्या कौतुकाने पाहात होतो. तिला वाटत असलेला संकोच माझ्या अद्याप आठवणीत आहे.

मामाची वागणूक पाहून माझ्या आईच्या जिवाची घालमेल होऊ लागली. याला वेळीच आवरला नाही तर हा सगळी शेतीवाडी नष्ट करून टाकील याची तिला खात्री वाटू लागली. त्याचे लग्न करून दिले की हा संसाराला लागेल असे तिला वाटले. तिने त्याच्याकरता मुली पाहण्यास सुरवात केली. विजापूरला एक मुलगी आहे असे तिला कळले. तिला पाहण्यासाठी मी आणि आई विजापूरला गेलो. मुलगी तेरा-चवदा वर्षांची होती. तिचे नाव सेतुलक्ष्मी. आईला मुलगी पसंत पडली. लग्नाची तिथी ठरवूनच आम्ही विजापूरहून परतलो.

विजापुराहून मी आणि आई निघालो तो भल्या पहाटे गुलबर्गा स्टेशनवर पोहोचलो. टांग्यात मी पुढच्या बाजूला बसलो. आई मागे बसली. आमचे घर आळीच्या आतल्या बाजूला होते. टांगा रस्त्यावर उभा राहिला. टांग्यातून आम्ही खाली उतरताना आईची दागिन्यांची लहानशी पेटी खाली टांग्यात पडली. पेटीत नथ, बुगड्या, आंगठी इत्यादि दीड दोन हजारांचे दागिने होते. आम्ही घरी पोहोचलो तरी माल हरवल्याचे आमच्या लक्षात आले नाही. दोन तीन तासांनी तो टांगेवाला आमच्या आळीत विचारीत आला, ‘येथे कोणी बाई आणि तिचा मुलगा हे सकाळच्या गाडीने आले काय?’ तो भाडे जास्त मागण्याच्या हेतूने आला असावा, असे समजून आमच्या घरातून येथे कोणी आले नाही असे सांगण्यात आले.

दागिने गहाळ झाल्याचे लक्षात आले ते दुपारी. आणि मग सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. टांगेवाल्याचा शोध कसा लावावा ? वरच्या आळीत काही टांगेवाल्यांची घरे आहेत हे मला माहीत होते. मी शोध करीत तेथे पोहोचलो. तो एका घराच्या ओसरीवर एक मुसलमान बाई बसली होती. मी पाहतो तो तिच्या अंगावर माझ्या आईचे दागिने. मी लगेच आरडाओरडा करण्यास सुरवात केली. टांगेवालाही दबला. तो दागिने घेऊन माझ्या बरोबर आला. घरची सगळी माणसे अतिशय काळजीत होती, दागिने परत देताना टांगेवाला म्हणाला, ' साब कुत्तेको कभी घी हजम होता है क्या ? कुत्र्याला तूप कधी पचेल काय, ' त्याला बक्षीस देण्यात आले.

मामाच्या लग्नाला मी विजापूरला गेलो नाही. आई गेली होती, लग्नसमारंभ आटोपला. नवीन मामी आमच्या घरी आली. आता मामाच्या आयुष्यात बदल होऊ लागला.

उन्हाळ्याची सर्व सुट्टी मी गुलबर्ग्यास घालविली. माझे मेव्हणे रामराव देशपांडे हे गुलबर्ग्याला आपले मेव्हणे विठ्ठलराव हकीम (पंधराव्या शतकातील सुप्रसिद्ध वैद्य विठ्ठल गलांड याचे वंशज) यांच्याकडे राहिले होते. त्यांच्या वडिलांनी त्यांचे पुढचे शिक्षण करण्याचे नाकारल्यामुळे ते नोकरीच्या शोधात होते. ते एकदा घरी आले असताना त्यांच्या हातात बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे त्रैमासिक माझ्या पाहण्यात आले. त्यामुळे बनारसबद्दल मला आकर्षण वाटू लागले.

गुलबर्ग्याचे माझे लहानपणाचे मित्र विद्याभ्यासाच्या अगर नोकरीच्या निमित्ताने ठिकठिकाणी पांगले होते. सुट्टया संपत आल्या, आणि हैदराबादेस परत जाण्याचे दिवस जवळ येऊ लागले. हैदराबादेत मी एक वर्षभर निजाम कॉलेजात होतो. हैद्राबादच्या वास्तव्यात डिकन्स, स्कॉट, कॉनन डाईल, जेन आस्टिन इत्यादींच्या वाङ्मयाचा परिचय झाला. व्हिन्सेंट स्मिथकृत भारताचा इतिहास आणि टॉउनशेंडकृत इंग्लंडचा इतिहास यांचा अभ्यास झाला. हैदराबादेतील हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजांचा परिचय झाला, निजाम राज्यातील चळवळींची थोडीबहुत कल्पना आली. निजाम कॉलेज काय आणि उस्मानिया विद्यापीठ काय बहुसंख्य विद्यार्थ्यांत ध्येय होते ते फक्त नोकऱ्या मिळविण्याचे. राजकारणाकडे कुणाचेच लक्ष नव्हते. सरकारी नोकर आणि जहागिरदार हेच समाजाचे पुढारी होते आणि त्यांचे आणि राजकीय चळवळीचे वावडे होते. १९३८ नंतर हैदराबादेत राजकीय जागृती झाली. इ. स. १९२६ मध्ये तिचा मागमूसही नव्हता.

माझ्या वडिलांचे पेन्शन अवघे पन्नास रुपये, गुलबर्ग्याचे मालकीचे घर असल्यामुळे घरभाड्याचा प्रश्न नव्हता. शेतीचे उत्पन्न हजार बाराशेच्या वर नसे. आणि तेही नियमितपणे येत नसे. गुलबर्ग्याच्या राहणीमानास अनुसरून आम्हांला खाण्यापिण्याची ददात नसावी. पण हैदराबादच्या माझ्या शिक्षणासाठी पैसे उचलून देणे माझ्या वडिलांना भयंकर जड जात असावे. सुट्टी संपण्याच्या दोन चार दिवस आधी त्यांनी मला सांगितले, ‘ माझे मित्र मध्वराव तहशील्दार हे सिंधनूरला आहेत. त्यांच्याकडे मी तुला पत्र देऊन पाठवितो. तू त्यांना भेट. ’ मला वाटले काही महत्त्वाच्या मजकुराचे पत्र असावे. मी ते पत्र घेऊन निघालो.

सिंधनूर हे रायचूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण. रायचूरपासून चौपन मैलांवर सिंधनूर आहे. त्यावेळी रायचूर ते सिंधनूर बसची सोय नव्हती. लोक रायचूरच्या पुढे तीन चार स्टेशने ओलांडून कुपगल स्टेशनावर उतरत. तेथून तुंगभद्रेच्या काठावर येत, नदी ओलांडून दहा बारा मैल बैलगाडीचा प्रवास करून सिंधनूरला येत. मी प्रथम रायचूरला गेलो. हैदराबादचे कॅाग्रेस पुढारी जनार्दन देसाई हे माझ्याबरोबर होते. त्यांना सिंधनूरलगतच्या मानवी तालुक्याच्या आपल्या गावी जावयाचे होते. आम्ही दोघे कुपगलहून बसने तुंगभद्रेच्या काठी पोहोचलो. काठावरील गावात आम्ही रात्री मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी नदी ओलांडावयाची शक्यता होती. त्या दिवशी रात्री मला सहज विचार आला, वडिलांनी मध्वरावांना पत्र लिहिले तो मजकूर तरी काय असावा. पत्र उघडून पाहायला काय हरकत आहे? मी अलगदपणे पाकीट उघडले. आणि आतील पत्र काढले. पत्र उर्दूत होते. त्यात लिहिले होते : ‘ मुलाला तुमच्याकडे पाठवीत आहे. त्याला कॅालेज शिक्षणासाठी हैदराबादेस जावयाचे आहे. तर त्याला पैशाची काही मदत करावी. त्याला काही कपडे शिवून द्यावे. ’

ते पत्र वाचून माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली. हे पत्र घेऊन मी मध्वरावांकडे—जगातील अत्यंत कद्रू माणसाकडे जायचे. आणि वडिलांनी तरी असे पत्र लिहिण्याची काय जरूर होती. मी त्या क्षणी निश्चय केला की आपण मध्वरावांकडे जायचे नाही. सुदैवाने दुसऱ्या दिवशी सकाळी तुंगभद्रेला खरोखरीच पाणी वाढले. लोकांनी सांगितले की नदी ओलांडणे धोक्याचे आहे. जनार्दनराव देसाई मला म्हणाले, ‘ आपल्याला नदी ओलांडून जाणे शक्य नाही. आपण गुलबर्ग्याला परत जाऊ या ’ मी म्हटले, ‘ माझे वडील रागावतील ’ ते म्हणाले, ‘ जीव धोक्यात का घालायचा. मी तुमच्या वडिलांना

समजावून सांगेन.'

मलाही तेच हवे होते. मी उघडलेले पत्र पुन्हा पाकिटात ठेवून बंद केले. आपण ते पत्र वाचले आहे याची मी वडिलांना शेवटपर्यंत जाणीव दिली नाही. आठ जून, १९२६ रोजी सकाळी मी गुलबर्ग्याला परत आलो. त्या दिवशी द्वादशी असावी. वडिलांना मी सांगितले की नदीला पूर आल्यामुळे मला सिंधनूरला जाणे शक्य झाले नाही. वडील माझ्यावर भयंकर चिडले, ते म्हणाले पत्र महत्त्वाचे होते. तू तुंगभद्रेवर दोन दिवस वाट पाहायची आणि पाणी ओसरल्यावर जायचे असते.' मी काहीच बोललो नाही.

जेवणे आटोपली. तेव्हाही वडील रागातच होते. मी तास दोन तासपर्यंत शांतपणे विचार केला. आपल्या शिक्षणाचा भार यापुढे आपल्या वडिलांवर घालायचा नाही असे मी ठरविले. घर सोडून निघून जायचे हा माझा निश्चय झाला. पण जायचे कुठे? मला एकाएकी कल्पना आली. बनारसला का नको? बनारसला जावे आणि मदन मोहन मालवीयांच्या हिंदू युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळवावा. पैशाचे जसे जमेल तसे पाहता येईल. पण आधी घर सोडावे.

योगायोग पहा. दुपारी वडील मला म्हणाले, 'मी तुला पंचवीस रुपये देतो. तू मखदूमपुऱ्याच्या मार्केटमधून ज्वारी घेऊन ये. बरोबर गुरुमध्वाला (माझा धाकटा भाऊ) घेऊन जा.'

मी इच्छिलेली संधी आयतीच चालून आली. मी दुपारी चारच्या सुमारास धाकट्या भावाला घेऊन घरातून बाहेर पडलो. आमचे घर ब्रह्मपुरीत होते. मखदूमपुऱ्याचे मार्केट तेथून दोन मैल आहे. मधली वाट गुलबर्ग्याच्या किल्ल्याला लागून जाते. मी साधारण अर्धा मैल गेल्यावर माझ्या भावाला म्हटले, तू येथे थोडा वेळ बैस. मी आता परत घरी जाऊन येतो. घरून पैसे आणायचे राहिले आहेत.' तो तेथे पुलावर बसला. मी तेथून निघालो आणि तडक स्टेशनची वाट धरली.

गुलबर्ग्याच्या स्टेशनवर मी पोहोचलो. तो स्टेशनात पुण्याला जाणारी गाडी उभी होती. मी काही विचार न करता दौण्डचे तिकिट काढले. इतक्यात माझा लहानपणचा मित्र वासू वळसंगकर (आता पुण्याच्या सर्व्हे सेटलमेंटच्या खात्यात कमिशनरचा पी. ए.) मला भेटला. सुदैवाने तो घाईत असल्यामुळे त्याने माझी विशेष चौकशी केली नाही. मी घाईघाईने गाडीत बसलो. खिशात वीस एक रुपये असावेत. यापलीकडे माझ्याजवळ काही नव्हते. आपण बनारसला कसे पोहोचू (भूगोलाचे माझे ज्ञान यथातथाच होते) आणि तेथे आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याचा विचार करण्याच्या मनःस्थितीत मी नव्हतो. फक्त एकच

विचार मनात सारखा चालू होता. “घर सोडा आणि स्वतःच्या पायावर उभे राहून आपले नशीब काढा.”

गाडी चालू झाली. तो दिवस होता, आठ जून एकोणीसशे सव्वीस !

६

बनारस

१९२६ ते १९३०

आठ जून १९२६ रोजी मी गुलबर्गा सोडले. आमची गाडी रात्री दौंड स्टेशनवर आली. मी तेथे गाडी बदलून मनमाडच्या गाडीत बसलो. तो मनमाडला सकाळी दहा वाजता आलो. तेथून पुढे कोणत्या मार्गाने जायचे, बनारसची वाट कोणती, गाडी कोणती, याचा मला काहीच पत्ता नव्हता. स्टेशनावर मी जेवण घेतले आणि तिकीट घेण्यासाठी मी तिकीटविक्रीच्या खिडकीपाशी गेलो. कोणत्या स्टेशनचे तिकीट काढावे याचा मी विचार करीत होतो. तो माझ्या समोरचा उतारू म्हणाला, ' मुझे झांशी का एक तिकीट दो. '

माझ्या स्वभावात काहीसा स्वप्नाळूपणा, आणि काहीशी अद्‌भुताची आवड यांचे मिश्रण झाले आहे. वेदांताची, घटपटादीची चर्चा, अध्यात्म, तर्कशास्त्र, इत्यादि विषय मला आवडत नाहीत. उलट कथा, इतिहास, काव्य इत्यादीत मन रमते. ज्ञानेश्वर, रामदास, एकनाथ यांपेक्षा अधिक आकर्षण वाटते ते वामन पंडित, मोरोपंत, मुक्तेश्वर इत्यादींचे. भगवद्‌गीतेपेक्षा अधिक आवड भागवत,

भारत, रामायण यांतील कथांची वाटते. बरे अद्‌भुताच्या आवडीमुळे स्थळ-काळाचा पाचपोच राहात नाही. समोरच्या उतारूच्या तोंडून झाशी हा शब्द ऐकला मात्र, माझे अंग थरारून गेले. झाशी, लक्ष्मीबाईची झाशी. 'झाशीच्या कुहरामध्ये सिंहीण निजे घायाळ, फेकिला तटाहुनि घोडा' या ओळींची आठवण होऊन माझे देहभान हरपले. पण १९२६ ची झाशी म्हणजे १८५८ ची नव्हे, हे माझ्या लक्षात यावयाला हवे होते. बरे, बनारसला जायचे तर इटारसी जबलपूर माणिकपूर या मार्गाने जायला हवे. झाशी हे दिल्लीच्या मार्गावर आहे, बनारसच्या नव्हे याचा तरी मी विचार करायला हवा होता. पण तसा विचार करायला माझी मनःस्थिती तरी धड असायला हवी होती ना! मी पुढे होऊन झाशीचे तिकीट काढले. बरे, तिकीट काढल्यावर कोणत्या गाडीने जावे याचा तरी तपास काढायला हवा. तर तसेही मला सुचले नाही. एका गाडीवर भुसावळ असे लिहिले होते. हीच गाडी पुढे झाशीला जाणार असेल असे समजून मी त्या गाडीत चढलो.

ती दुपारची दोन वाजण्याची वेळ असावी. गाडी चालू झाली. हा भाग मी प्रथमच पाहात होतो. त्यामुळे मी वाटेतील स्टेशने पाहण्यात मग्न होतो. डब्यात माणसे विशेष नव्हती.

काही वेळाने माझ्या लक्षात आले की एक गृहस्थ माझ्याकडे पाहात आहेत. ते माझ्यासमोर बसले होते. उंच बांध्याचा, मध्यम वयाचा, धोतर, कोट, टोपी, पायांत चपला असा पोशाक असलेला तो एक महाराष्ट्रीय गृहस्थ होता. त्याने मला विचारले, 'का हो, कुठे चाललात?' मी म्हटले 'हिंदू युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळविण्यासाठी मी बनारसला चाललो आहे.' ते म्हणाले 'मग तुम्ही या गाडीत कसे? अहो ही तर भुसावळ प्यासेंजर आहे. ही भुसावळलाच थांबणार. बरे, तुम्ही बनारसचेच तिकिट काढले आहे ना.' मी म्हटले, 'मी झाशीचे तिकीट काढले आहे,' ते म्हणाले, 'कमाल आहे तुमची, अहो जायचे बनारसला आणि तिकिट झाशीचे' मी तरी काय बोलणार, मी थोडेंच म्हणणार होतो, राणी लक्ष्मीबाईसाहेब झाशीच्या स्टेशनवर माझे स्वागत करण्यासाठी येणार आहेत म्हणून. मी गप्प बसलो. ते गृहस्थ म्हणाले, 'तुमच्यापाशी सामानही दिसत नाही. तुम्ही घरून पळून तर चालला नाहीत ना?'

माझ्या मनातील गोंधळ माझ्या चेहऱ्यावर उमटला असावा. मी म्हटले, 'छे छे, घरची गरीबी आहे आणि घरून लवकर निघावे लागले, कॉलेज उघडण्याचे दिवस जवळ आले आहेत ना. म्हणून माझ्यापाशी सामान नाही.'

ते गृहस्थ हसून म्हणाले, ' तुमच्या कानातील मोती आणि चेहऱ्यावरची झाक पाहून तुम्हांला कोणीही गरीब म्हणणार नाही. बरे ते जाऊ द्या. मी रेल्वे लाईन इन्स्पेक्टर आहे. माझे नाव दिघे. भुसावळला माझे घर आहे. तुम्ही आज माझ्याकडे राहा उद्या सकाळी दिल्लीला जाणारी गाडी येते. तीत मी तुम्हांला बसवून देईन. '

मी हो म्हटले. आम्ही संध्याकाळी पाचच्या सुमारास भुसावळला पोहोचलो. मी दिघ्यांच्या बरोबर त्यांच्या घरी गेलो. घरातील राहणीवरून दिघे हे मराठा समाजातील असावे असे वाटले. घरात त्यांची आई आणि बायको या असाव्यात. त्यांच्याकडे चहा झाल्यावर मी आणि दिघे संध्याकाळी तापी तीरावर फिरायला गेलो. मी आपल्या शिक्षणाची हकीगत त्यांना सांगितली. घरून पळून आल्याचे मात्र मी बोललो नाही. त्या रात्री मी दिघ्यांकडे राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी मला उठविले. अम्ही चहा घेतला. दिघ्यांनी मला एक धोतर आणि फुलपात्र दिले. ते म्हणाले, मी गरीब मनुष्य आहे. मी तुम्हांला नगद काही देऊ शकत नाही. पण माझी आठवण म्हणून हे धोतर आणि फुलपात्र जवळ असू द्या. ' स्टेशनवर त्यांनी मला डबल रोटीचा एक भक्कम तुकडा घेऊन दिला. ' प्रवास लांबचा आहे. तुम्हांला मधे खायला उपयोगी पडेल ' असे म्हणत त्यांनी डबल रोट माझ्या हातात दिला.

गाडी आली. दिघ्यांनी मला गाडीत बसविले आणि म्हटले, ' उद्या तुम्ही मोठे झाल्यावर या गरिबाची आठवण ठेवा बरे का ? ' माझे डोळे पाण्याने भरून आले. आज त्या गोष्टीला चाळीसच्यावर वर्षे होऊन गेली. पण त्या सज्जन माणसाची आठवण मला नेहमी होते. पुन्हा त्यांची माझी कधीच गाठ पडली नाही. एका भांबावलेल्या मुलाला त्यांनी चार घास खाऊ घालून आणि चार गोड शब्द बोलून मार्गस्थ केले हे त्यांचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. त्यांच्या स्मृतीला सहस्र प्रणाम.

सकाळची वेळ होती. गाडी वेगाने चालली होती. सकाळी नऊच्या सुमारास वर बर्थवर झोपलेले एक गृहस्थ खाली उतरले आणि माझ्याजवळ बसले. थोड्या वेळाने त्यांच्याशी गप्पा सुरू झाल्या. मी त्यांना म्हटले, ' मी हिंदू युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळविण्यासाठी बनारसला जात आहे. तेथे जाऊन राहण्याची खोली मिळविण्यास वेळ लागेल. मला बनारसची काहीच माहिती नाही. ' ते म्हणाले, ' अहो मी कैक वेळा बनारसला गेलो आहे. माझे नाव सोमण, मी रेल्वेमध्ये मेल सॉर्टर आहे. बनारसला महाराष्ट्रीयांची बरीच वस्ती आहे. ही मुख्यतः, दुर्गा घाटावर आहे. तेथे पटवर्धन, शिंदे, फडणीस, आंग्रे, किबे, भोसले, फाळके

इत्यादी सरदारांचे वाडे आहेत. तुम्ही दुर्गा घाटावरील सांगलीकरांच्या वाड्यात जा. तेथे काही दिवसांसाठी तुम्हांला राहण्यास मिळेल. नंतर तुम्ही आपली सोय पाहा.'

सांगलीकर पटवर्धन हे नाव ऐकताच माझ्या मनात पुन्हा ऐतिहासिक व्यक्तींचे थैमान सुरू झाले. गोविंद हरी, गोपाळ गोविंद, परशुरामभाऊ, पांडुरंगराव, चिंतामणराव, वामनराव, मेघःश्यामराव इत्यादि पटवर्धन सरदारांच्या आठवणींने माझे देहभान हरपल्यासारखे झाले. मला वाटले, मी बनारसला जाईन, सांगली-करांच्या वाड्यात जाईन. तेथे सांगलीकरांचे कारभारी बसलेले असतील. मी त्यांना मुजरा करीन. ते माझी विचारपूस करतील. आणि मग कुणाला तरी पेशवेकालीन भाषेत म्हणतील, कोण आहेरे तिकडे ? रावसाहेब देशीहून आले आहेत यांचा योग्य बंदोबस्त राखा. असे हे माझे स्वप्नाळू मन इतिहासात सारखे रमत होते.

तो सगळा दिवस मी दिघ्यांनी दिलेल्या डबल रोटावर काढला. वाटेत बुराणपूर, होशंगाबाद, खांडवा, इतारसी, भुपाळ, बीना, ललितपूर ही स्टेशने लागली. मी अधाशासारखी ती स्टेशने पाहात होतो, भुपाळ पाहून तेथील नबाबाची आठवण झाली, आणि ललितपूर पाहून गुप्तकालीन शिल्पाची आठवण झाली.

झाशीला मी रात्री दहाच्या सुमारास पोहोचलो असेन. झाशीहून बनारसला जायचे तर माणिकपूर मार्गे जावे लागेल असे सोमणांनी सांगितले. झाशीच्या स्टेशनवर मी सोमणांचा निरोप घेतला आणि मला बनारसच्या सांगलीकरांच्या वाड्याचा पत्ता देऊन तो देवदूत आपल्या मार्गाला लागला. आयुष्यात पुन्हा काही त्याची गाठ पडली नाही.

झाशीच्या स्टेशनवर मी ती रात्र खाण्यापिण्यावाचून काढली. जवळ असलेले पैसे तिकिटाला कमी पडतील की काय या भीतीने खायचे काही विकत घ्यायला मन धजेना. उपवास म्हणजे काय हे मला आता कळू लागले होते. एका डबल-रोटीशिवाय पोटात दिवसभर काहीच गेले नव्हते. रात्री भुकेमुळे झोप येईना, मी अर्धवट गुंगीतच रात्र काढली. सकाळी गावात जाऊन यावे तर पैसे कुठे होते ? झाशी माणिकपूर ही गाडी सकाळी अकराच्या सुमारास सुटत होती. भुकेने मी अगदी व्याकुळ झालो होतो. माझ्यापाशी सात रुपये चार आणे होते त्यातून दुधाचे दोन आणे गेले. सात रुपये दोन आणे उरले. आणि मी जेव्हा तिकिट विकत घेण्यास गेलो तेव्हा कळले की बनारसला नेमके सात रुपये चार आणे लागत होते. मी गोंधळून गेलो. दोन आणे आणायचे कोठून ? आपण विनाकारण दोन आण्याचे दूध प्यालो असे मला वाटू लागले. मी इकडे-

तिकडे पाहू लागलो. तो एक उत्तर भारतीय, बहुतेक खत्री जमातीचा असावा, जवळच उभा होता. गौरवर्ण, उभट चेहरा डोक्याला गोल टोपी अशी आकृती मला अद्याप आठवते. मी त्याच्याजवळ गेलो आणि त्याला म्हटले, ' माफ करा अं, तिकिट क्लार्कजवळ मोड नाही. मला एक चार आणे हवे आहेत, ते तुम्ही देऊ शकाल काय ? त्याने माझ्याकडे क्षणभर पाहिले, तो हसला पण काही न बोलता त्याने मला चार आणे काढून दिले.

त्याचे चार आण्यांचे ऋण अद्याप माझ्या डोक्यावर आहे.

मी बनारसचे तिकीट काढले. आणि झाशी—माणिकपूरच्या गाडीत बसलो. गाडी चालू झाली. थोड्या वेळाने तिकीट चेकर आला. त्याने माझे तिकीट पाहिले. तो म्हणाला, ' अहो, या गाडीत कशाला बसला ? तुमचे तिकीट कानपूर मार्गे आहे. आणि ही गाडी तर माणिकपूरला जाते. ' आता आली पंचाईत. मी चाट पडलो. आमचे डोकेच ठिकाणावर नव्हते त्याला आम्ही तरी काय करावे ! मी म्हटले ' अहो कानपूरकडून गेलो काय, इकडून गेलो काय सारखेच ना ? ' तो हसून म्हणाला, ' तुम्ही हात समोर आणून घास तोंडात घातला काय आणि हात डोक्याच्या पाठीमागून नेऊन घास घेतला काय, एकूण एकच ना. ' असे म्हणून त्याने हाताने प्रात्यक्षिक करून दाखविले. मी गप्प बसलो. त्याने तिकीट परत केले आणि तो निघून गेला.

भुकेने माझा जीव व्याकुळ झाला होता. बुंदेलखंडातील उन्हाळा, आणि जूनचा महिना, अंगाची नुसती लाही लाही होत होती. मी सारखा पाणी पीत होतो. कोणत्या तरी स्टेशनवर एक मुलगा आणि एक तरुणी गाडीत चढली. ती त्या मुलाची बहीण अगर भावजय असावी. त्या तरुणीचे सौंदर्य अवर्णनीय होते. तिचा पोशाक रजपूत स्त्रियांसारखा, म्हणजे घागरा आणि दुपट्टा असा होता. चित्रसंग्रहात आढळून येणाऱ्या रजपूत स्त्रियांप्रमाणे ती दिसत होती. अंगावर अलंकार विशेष नसावेत. पण तिच्या नाकातील चमकीकडे (माझा आवडता अलंकार) माझे लक्ष पुन्हा पुन्हा जाई. त्या एका दागिन्यामुळे तिच्या चेहऱ्याला विलक्षण गोडवा आला होता. मी तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होतो. आणि असे करण्यात काही काळ तरी भूकतहान विसरून गेलो. रात्रीच्या धुंद वातावरणात आकाशात एकच तारा चमकत असताना दिसावा त्याप्रमाणे काळाच्या धुक्यातून त्या तरुणीचा चेहरा आणि तिची चमकी ही मला अद्याप दिसतात.

एक दोन स्टेशनांनंतर ती माणसे उतरून गेली. आणि मला भुकेने पुन्हा सतावण्यास सुरवात केली. घरचे सुग्रास अन्न, पुरणपोळ्या, कडबू, तांदुळाची खीर, लोणकढे तूप इत्यादींची आठवण येऊन मला पोटात भडभडून येई, पण

आता हळहळ करून काय उपयोग होता !

झांशी मणिकपूर मार्गावर अनेक इतिहासप्रसिद्ध स्टेशने आहेत. ती पाहात पाहात आणि त्यांचा इतिहास आठवीत मी भूक विसरण्याचा प्रयत्न करीत होतो. ओर्च्छा रोड पाहून अबूल फजलचा वध करणारा आणि जहांगीर बादशहाचा मित्र वीरसिंग बुंदेला याची आठवण झाली. छत्रपूर स्टेशनमुळे छत्रसालच्या आठवणी जागृत झाल्या. बांदा स्टेशनमुळे बाजीराव, मस्तानी, समशेर बहादुर (बांद्याचे नबाब हे मस्तानीचे वंशज) या व्यक्ती मनश्चक्षूसमोर आल्या. करवी स्टेशनमुळे शेवटच्या बाजीरावाचा भाऊ अमृतराव पेशवे याची आठवण झाली. आणि चित्रकूट स्टेशन, रामचंद्राचे चित्रकूट.

चित्रकूट के घाटपर भइ संतनकी भीड
तुलसिदास चंदन घिसे, तिलक लगाय रघुवीर

आधीच रामायण रोमारोमांत भिनलेले. मला देहभान हरपल्यासारखे झाले. मला वाटले, ' तुळसीदासाला दिसले तसे रामलक्ष्मण मला दिसले तर मी त्यांना म्हणेन, ' प्रभू रामचंद्रा, मला भूक लागली आहे. मला चांगले जेवण द्या. माझे दुसरे काही मागणे नाही. '

संध्याकाळी एकदाचे माणिकपूर आले. मी स्टेशनवर विचारपूस केली. ' बनारसला जाणारी गाडी केव्हा मिळेल ? ' लोक हसले आणि म्हणाले. ' उद्या सकाळी अकरा वाजता अलाहाबादची गाडी मिळेल. ती अलाहाबादला संध्याकाळी पोहोचेल. तेथून पुढे बनारस. मी मटकन खाली बसलो. भुकेने प्राण कासावीस, खिशात फक्त दोन आणे आणि गाडी तर उद्या अकरा वाजता आणि ती सुद्धा अलाहाबादपर्यंत. विपण्णपणे मी बाकावर बसून राहिलो, एक मारवाडी उतारू माझ्याजवळ बसला होता. त्याने माझी स्थिती पाहिली. तो म्हणाला, ' अशी काळजी काय करता ? रात्री बाराच्या सुमारास, कलकत्त्याला जाणारी तुफान एक्सप्रेस येईल. तिच्यात आपण घुसू. ती आपल्याला मोगलसरायपर्यंत घेऊन जाईल. तेथून बनारस जवळ आहे. '

त्याच्या बोलण्याने मला धीर आला. मी हिंमत करून एक आण्याची पुरीभाजी घेतली. दोन पुऱ्या आणि भोपळ्याची भाजी, ते अन्न मला ' अमृताहून गोड ' असे भासले. पण तेवढ्याने छत्तीस तासांची भूक थोडीच भागणारी होती ? भूक शमविण्यासाठी मी तांब्याभर तरी पाणी प्यालो असेन.

रात्री बारा एकच्या सुमारास तुफान एक्सप्रेस (किंवा मेल) आली. मी आणि माझ्याजवळ उभा असलेला मारवाडी असे आम्ही दोघे समोर दिसला त्या डब्यात घुसलो. गाडी चालू झाली. डब्यातील गाद्यांची बाके, वरचे गाद्यांचे

बर्थ आणि पंखे इत्यादि पाहून मी अगदी खुष झालो. मी मनात म्हटले, ‘ उत्तर भारतातील या गाड्या किती चांगल्या आहेत. हे साधे डबे सुद्धा पहिल्या वर्गासारखे वाटतात ’ गाडी चुनार स्टेशनवर थांबली. त्र्यंबकजी डेंगळे याला कैदेत ठेवले होते तो चुनारगड हाच. मी लघवीला म्हणून बाथरूममध्ये गेलो. माझे लक्ष सहज दाराकडे गेले. त्यावरची अक्षरे मी पाहिली. ‘ फर्स्टक्लास ’ माझे धावे दणाणले. अरे बापरे ! हा डबा कसा फर्स्टक्लासप्रमाणे आहे असे आपण समजत होतो तो खरोखरीच फर्स्टक्लासचा निघाला. आणि आपण मूर्खासारखे या डब्यात चढलो. आपल्यापाशी तिकीट थर्डक्लासचे, आणि खिशात एक आणा. माझे डोके सुन्न झाले. क्षणभराने मी विचार केला, अद्याप वेळ गेली नाही आता ज्या स्टेशनवर गाडी थांबेल तेथे उतरावे आणि थर्डक्लासमध्ये चढावे. मी स्टेशन येण्याची वाट पाहू लागलो. थोड्या वेळाने स्टेशन आले पण ते कोणते ? ते मोगलसराय जंक्शन होते. आणि मला तेथेच उतरायचे होते. मी आपले धोतर आणि तांब्या घेऊन घाईघाईने उतरलो. तो तिकिट चेकर समोरच उभा ! मुकाट्याने मी आपले तिकीट त्याला दाखविले, तो म्हणाला ‘ ओहो, थर्ड क्लासचे तिकीट बाळगून फर्स्ट क्लासने प्रवास करता काय ? चला माझ्या बरोबर स्टेशनमास्तरकडे. ’ मी मुकाट्याने त्याच्या मागोमाग चालू लागलो. स्टेशन मास्तर अँग्लो इंडियन होता. तो आरामखुर्चीवर पडला होता. मी त्याला इंग्रजीत सांगितले, ‘ केवळ अज्ञानाने ही चूक घडली आहे. मी बनारस हिंदु युनिव्हर्सिटीत शिक्षण घेण्यासाठी जात आहे. सध्या माझ्याजवळ पैसा नाही पण बनारसला पोहोचल्यावर मी पैसे पाठवून देईन. ’ तो हसून म्हणाला ‘ बरे जा, जा, पुन्हा असे करू नका. ’ मी मुकाट्याने चालू लागावे की नाही. मी त्याला म्हटले, ‘ बनारसला जाणारी गाडी कोठे आहे, मला माहीत नाही. कुणाला माझ्याबरोबर द्याल काय ? त्याने त्या तिकिट चेकरलाच माझ्याबरोबर पाठविले. आपल्याला या पोराकडून काही पैसे मिळाले नाहीत याचा त्याला राग आला होता. त्याने मला बनारसची गाडी दाखविली. तिकडे जाता जाता मी त्याला मनःपूर्वक म्हटले, ‘ माफ करा अं; माझ्यापाशी तुम्हांला देण्यासारखे काही नाही. नाही तर मी तुम्हांला पैसे दिले असते. ’ यावर माझ्याकडे अत्यंत तिरस्काराने पाहून तो म्हणतो काय, ‘ व्हाट ह्याव यू एक्सेप्ट् दॅट फकिंग थिंग विथ यू ! ’ या वाक्याचा मराठी अनुवाद मी मुद्दामच देत नाही.

गाडी चालू झाली. त्यावेळी नुकतेच उजाडत होते. मला वाटले, बनारसला पोहोचण्यास दुपारचे बारा एक तरी वाजतील. खिशात उरलेला एक आणा काय खाण्यात खर्च करावा याचा मी विचार करीत होतो. इतक्यात आमची गाडी

गंगेवरील डफरीन ब्रिजवरून जाऊ लागली आणि गंगेचे शांत आणि विस्तीर्ण पात्र आणि बनारसचे शेकडो घाट ही माझ्या नजरेस पडली.

काशी पाहून त्या क्षणी माझे मन कसे भरून आले हे शब्दांनी वर्णन करणे अशक्य आहे. स्तिमित होऊन मी बनारसकडे पाहात होतो. राजघाटापासून अस्सी घाटापर्यंत (तुळसीदासाचा घाट) दोनशेच्यावर घाट आहेत. गंगेवरील देवळे तर शेकडोंनी असतील. गंगेवर हजारो माणसे आंघोळ करीत होती. लहान लहान नावा तर असंख्य होत्या. मी थक्क होऊन ते दृश्य पाहात होतो. थोड्या वेळाने गाडी राजघाट स्टेशनवर आली. बनारसच्या मुख्य स्टेशनच्या आधीचे हे स्टेशन. मी स्टेशनवर उतरलो.

मी बनारसला पोहोचलो तो दिवस म्हणजे बारा जून एकोणीसशे सव्वीसचा होय. सोमण यांनी दिलेला पत्ता, सांगलीकरांचा वाडा, दुर्गाघाट, शोधीत मी वाट चालू लागलो. बनारसच्या अरुंद गल्ल्या आणि बोळ यातून मार्ग काढीत मी दुर्गाघाटच्या दिशेने चाललो होतो. दुर्गाघाटावर प्रामुख्याने महाराष्ट्रीयांची वस्ती आहे. एकाने मला सांगितले, ‘ हा पहा सांगलीकरांचा वाडा. ’ वाडा मोठा आणि चिरेबंदी होता. मला वाटले आता आपले श्रम आणि कष्ट संपले. वाड्यात माणसांची वर्दळ असेल. त्यात आपली सोय सहज लागून जाईल. मी दारातून आत गेलो. इतका मोठा वाडा पण आत शुकशुकाट होता. अंगणात एक पंचा नेसलेला मध्यम वयाचा मनुष्य गाईची धार काढीत होता. त्याने माझ्याकडे पाहिले. मी म्हटले, ‘ सांगलीकरांचा वाडा हाच काय ? ’ त्याने कपाळाला आठ्या घातल्या आणि मला म्हटले ‘ हो, काय काम आहे ? ’ मी नम्रपणे म्हटले, ‘ मी दक्षिणेतून आलो आहे. हिंदू युनिव्हर्सिटीत मला प्रवेश मिळवायचा आहे. काही दिवस येथे माझी राहण्याची आणि जेवणाची सोय होईल काय ? ’ तो म्हणाला, ‘ राहण्याची सोय धर्मशाळेत आणि जेवणाची सोय अन्नछत्रात. इथे काही सोय होणार नाही. ’ हे उत्तर ऐकून मला अक्षरशः घेरी आली. मी भिंतीला टेकून उभा राहिलो आणि हताशपणे वर आकाशाकडे पाहिले.

एकाएकी माझे लक्ष वरच्या मजल्यावरच्या गच्चीकडे गेले. मी पाहतो तो दोन अतिशय प्रेमळ डोळे माझ्याकडे टक लावून पाहात होते. ती एक मध्यम वयाची गोरीपान अशी सोवळी बाई होती. पेशवाईतील सोवळ्या बायकांची (बयाबाई आपटे, बाजीराव पेशव्यांची मुलगी वगैरे) आपण चित्रे पाहतो तशी ती दिसत होती. तिच्या अंगावर उंची शाल होती. बनारसकडे ती पेशवाई पद्धत त्यावेळी चालू होती. त्या बाईकडे पाहून मला धीर आला. तो गृहस्थ दुधाचे भांडे ठेवण्यासाठी म्हणून आत गेला. ती संधी साधून मी वर माडीवर

गेलो आणि त्या बाईला म्हटले, 'बाई, मी कोणी लबाड भोंदू नाही. मी विद्यार्थी आहे. बनारसला मी नवखा आहे. युनिव्हर्सिटीत मी प्रवेश घेणार आहे. माझी दुसरीकडे सोय लागेपर्यंत मला आसरा हवा आहे.'

इतक्यात तो माणूस बाहेर आला. मला पाहून तो म्हणतो कसा, 'तुम्ही वर पोहोचलेत काय?' मी काहीच बोललो नाही. ती बाई उसळून त्याला म्हणाली, 'काय मांडले आहे हे! हे लेकरू तुम्हांला लबाड लटके वाटते की काय?' त्या परिस्थितीतही लेकरू, लबाड, लटके हे पेशवेकालीन शब्द ऐकून मला बरे वाटले. त्यानंतर ती मला म्हणाली, 'जा बाळ, गंगेवर जाऊन आंघोळ करून ये. मी तुला पंचगंगेवरील शिंदे सरकारांच्या अन्नछत्रात घेऊन जाईन.'

त्या बाईचा तो अवतार पाहून तो माणूस गप्प बसला. मी गंगेवर गेलो. गंगेत बुडी मारताना मला उचंबळून आले. त्या भावनांनी माझ्या अंगावर काटा आला. अनेक शतकांपासून भारतीयांचा उद्धार करीत, त्यांचे जीवन समृद्ध करीत वाहणारी हीच ती गंगामाई. आज तिच्या पात्रात मला आंघोळ करण्यास मिळत आहे, तिचे तीर्थ प्राशन करण्यास मिळत आहे. धन्य मी. त्रिवार धन्य मी. माझ्या जवळच एक इसम उभा राहून पाण्यात बुडी मारत होता आणि तोंडाने म्हणत होता, 'श्री नार नारायण, श्री नार नारायण.' त्याचा चेहरा अगदी काल पाहिल्यासारखा आठवणीत राहिला आहे. असे का व्हावे याचे कारण समजत नाही.

स्नान आटोपून मी सांगलीकरांच्या वाड्यात परत आलो. ती बाई माझी वाट पाहात होती. तिने मला पंचगंगा घाटावर असलेल्या शिंदे सरकारच्या बालाजी मंदिरात नेले. मंदिर भव्य आहे. मंदिराला जोडूनच अन्नछत्र आहे. तेथे तिने मला नेऊन सोडले. 'हा विद्यार्थी तुमच्या छत्रात आज जेवणार आहे. त्याची सोय करा.' असे तिने म्यानेजरला सांगितले आणि 'जेवण झाल्यावर वाड्यात ये बरे का' असे मला सांगून ती निघून गेली. शिंद्यांचे म्यानेजर म्हणजे एक वल्ली होती. कपाळाला आडवे गंध, डोक्याला मोठी पगडी आणि हातात हुक्का असा त्यांचा रुबाब होतात. ते मला म्हणाले,

'असा समोर बैस, तुझे नाव काय?'

मी म्हटले, 'सेतुमाधव.'

मॅनेजर : (हुक्क्याचा धूर सोडीत) तू ब्राह्मण ना?

मी : होय, मी ब्राह्मण आहे.

मॅनेजर : तुझे गोत्र काय?

मी : हरितस.

मॅनेजर : तुझे प्रवर किती ?

मी : तीन.

मॅनेजर : (धूर सोडीत) ते कोणते ?

मी : अंगिरस, अंबरीष, यौवनाश्व.

मॅनेजर : गायत्री मंत्र येतो काय ?

मी : हो.

मॅनेजर : म्हणून दाखीव पाहू.

मी गायत्री मंत्र म्हणून दाखविला.

मॅनेजर म्हणाले, 'ठीक आहे. तुझ्या जेवणाची सोय होईल.' त्यांनी हाक मारली. 'अहो वर्तक, या पोराची जेवणाची सोय करा.'

वर्तक हे बालाजी संस्थानातील कारकून असावेत. ते माझ्याजवळ आले. त्यांनी माझी चौकशी केली. ते जवळच राहात असत. ते मला आपल्या घरी घेऊन गेले. माझे ओले धोतर मी त्यांच्या घरी वाळत घातले. वर्तकांना मी म्हटले, 'मी सध्या सांगलीकरांच्या वाड्यात उतरलो आहे. पण तेथे फार काळ राहता येईल असे वाटत नाही. कॉलेज उघडेपर्यंत माझी कुठे सोय होऊ शकेल तर बरे.'

वर्तक म्हणाले, 'मी तुम्हांला एक पत्ता देतो. गोदौलिया चौकात प्रोफेसर परशुराम नारायण ऊर्फ अण्णासाहेब पाटणकर हे राहतात. हिंदू युनिव्हर्सिटीत ते संस्कृतचे प्रोफेसर आहेत. त्यांच्याकडे तुमची सोय होईल. ती जर झाली नाही, तर तुम्ही माझ्याकडे काही दिवस राहू शकता. तुम्हांला डाळभात कमी पडणार नाही.'

हा एक देवदूत. मला वाटले, परमेश्वराने विचार केला असेल, 'हे वेडे कोकरू कळपातून निघून भटकते आहे, याचे संरक्षण केले पाहिजे.' म्हणून त्याने माझ्या मार्गदर्शनासाठी वाटेत जागजागी देवदूत आणि देवता उभ्या केल्या असाव्यात. यामुळेच दिघे, सोमण, झाशी स्टेशनवरचा खत्री, सांगलीकरांच्या वाड्यातील बाई आणि वर्तक ही मंडळी मला भेटत गेली आणि माझे मार्गदर्शन करीत गेली.

शिंद्यांच्या अन्नछत्रात मी जेवायला बसलो. अडीच दिवसांत तर मला पहिल्याने जेवण मिळत होते. शिंदे सरकारना दुवा देत मी जेवणावर यथेच्छ ताव मारला. जेवण झाल्यावर मी सांगलीकरांच्या वाड्यात आलो. वरच्या खोलीत मी वाम-कुक्षीसाठी लवंडलो. मी अर्धवट झोपेत होतो. मला जवळच्या खोलीत कोणी तरी

बोलत असल्याचे ऐकू आले. मला जाग आली. वाड्यातील तो मनुष्य त्या बाईला म्हणत होता, ' मी तुमचे काही ऐकणार नाही. या मुलाचा काय भरंवसा आहे ? ही पोरे मोठी लबाड असतात. ' ती बाई म्हणाली, ' अहो हा मुलगा असा दिसत नाही. त्याचे बोलणेचालणे पाहा. तो खानदानी घराण्याचा दिसतो. ' तो माणूस म्हणाला, ' तुम्हांला जगाचा अनुभव नाही. मी त्या मुलाला सांगणार आहे, पुन्हा या वाड्यात यायचे नाही म्हणून. '

मी उठून बसलो. पांचदहा मिनिटांनी मी अंगात कपडे घातले आणि बाहेर निघालो. मी त्या माणसाला सांगितले, ' गोदौलिया चौकात प्रोफेसर पाटणकर राहतात. मी त्यांच्याकडे जात आहे. ' तो म्हणाला, ' झोपायला इथे यायचे नाही. ' त्यांचे बोलणे आपण ऐकले आहे याची जाणीव न देता मी म्हटले, ' ठीक आहे, मी रात्री येणार नाही. '

सांगलीकरांच्या वाड्यातून मी तीन चारच्या सुमारास बाहेर पडलो. प्रोफेसर अण्णासाहेब पाटणकर गोदौलिया चौकात घटाट्यांच्या राममंदिरात राहात असत. नागपूरचे श्रीमंत नागरिक घटाटे यांनी बनारसला गोदौलिया चौकात एक मोठा वाडा बांधला आहे. वाड्यातच सुंदरसे राममंदिर आहे. रामाच्या पूजेसाठी घटाट्यांनी एक ब्राह्मण कुटुंब ठेवले होते. ती मंडळी वरच्या मजल्या-वरील खोल्यांतून राहात. तळमजल्यावरच्या खोल्यांतून पाटणकर राहात. त्यांच्या बिऱ्हाडाच्या आणि राममंदिराच्या मध्ये अंगण होते. मंदिरातील राम, लक्ष्मण आणि सीता यांच्या मूर्ती अप्रतिम होत्या. त्यांच्याकडे सारखे पाहात राहावेसे वाटे. गाभाऱ्यासमोर मोठा हॉल होता. हॉलच्या भिंतींना मोठे आरसे लावले होते. या हॉलमध्ये पुराण, भजन, कीर्तन इत्यादि कार्यक्रम चालत.

मी वाट विचारीत विचारीत संध्याकाळी पाचच्या सुमारास घटाट्यांच्या राममंदिरात पोहोचलो. मंदिरात त्यावेळी पुराण चालले होते. वाड्यात जाऊन मी ' अण्णासाहेब पाटणकर आहेत काय ? ' म्हणून विचारले. जवळच्या खोलीतून एक साठ वर्षांचे गृहस्थ बाहेर आले. ते पंचा नेसले होते. त्याशिवाय त्यांच्या अंगावर काही कपडे नव्हते. त्यांनी विचारले, ' काय काम आहे ' मी म्हटले, ' मला अण्णासाहेबांना भेटायचे आहे. ' ' मीच अण्णासाहेब. ' असे म्हणून ते मला आपल्या खोलीत घेऊन गेले. खोलीत जिकडे तिकडे पुस्तके पसरली होती. त्यांची गंभीर आणि तेजस्वी मुद्रा पाहून मी भारावून गेलो. मी नम्रपणे म्हटले, ' मी हैदराबादेहून आलो आहे. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल-मधून मी मॅट्रिक पास झालो आहे. हिंदू युनिव्हर्सिटीत मला प्रवेश मिळवायचा आहे. माझी इतरत्र सोय होईपर्यंत आपल्याजवळ मला राहू द्यावे अशी

विनंती आहे.'

पाटणकरांनी माझ्याकडे थोडा वेळ रोखून पाहिले. त्यानंतर ते म्हणाले, 'ठीक आहे. तू माझ्याकडे राहू शकतोस. पण जेवणाची सोय व्हायची नाही. पण तूर्त दहा दिवसांसाठी अहिल्याबाई होळकरांच्या वाड्यात मी तुझी जेवणाची सोय करून देतो.' असे म्हणून त्यांनी आपल्या मुलीला हाक मारली, 'ताईबाई.'

हाक ऐकून राममंदिरातील पुराणश्रवण सोडून एक तरुण सोवळी बाई खोलीत आली. अण्णासाहेब तिला म्हणाले, 'ताईबाई, हा विद्यार्थी दक्षिणेतून आला आहे. मी त्याला आपल्याकडे ठेवून घेत आहे. तूर्त याची जेवणाची सोय होळकरवाड्यात करायची. तू याला विष्णुपंत म्यानेजर यांच्याकडे घेऊन जा; त्यांना माझा निरोप सांग. त्यांना म्हणावे, आता वाड्यात दशहरा दहा दिवसांचा उत्सव सुरू आहे. हे दहा दिवस होळकरांच्या अन्नछत्रात या मुलाची जेवणाखाणाची सोय करा.'

ज्येष्ठ महिन्यात गंगा नदीचा उत्सव करतात. त्याला दशहरा म्हणतात. होळकर वाड्यात हे दहा दिवस भजन, पूजन, कीर्तन, भोजने हे कार्यक्रम चालत. मी ताईबाईच्या बरोबर दशाश्वमेध घाटावरील होळकरवाड्यात गेलो. त्यावेळी वाड्यात कीर्तन चालले होते. कीर्तन संपल्यावर ताईबाईंनी विष्णुपंतांना सांगितले, 'हा आमचा मुलगा आहे. याची दहा दिवस जेवणाची सोय करा असे अण्णांनी सांगून पाठविले आहे' विष्णुपंतांनी कबूल केले.

होळकर वाड्यातून आम्ही बाहेर पडलो तेव्हा अंधार पडत चालला होता. वाड्याच्या समोरील गल्लीत पटवर्धन नावाच्या इसमाने उदबत्त्यांचे दुकान घातले होते. ताईबाई तेथे थोडा वेळ थांबल्या. त्यांनी मला म्हटले, 'बरे, तू आता जा, उद्या सकाळी तुझे काय सामान असेल ते घेऊन राममंदिरांत ये' मी 'बरे' म्हटले, पण माझ्या पोटात गोळा उठला. रात्री मुक्कामाला कोठे जायचे? सांगलीकरांच्या वाड्यात 'तुम्ही झोपायला येऊ नका' असे मला सांगण्यात आले होते. मी ताईबाईच्या बरोबर चालू लागलो. चालता चालता वाटेत ठेच लागल्याचा आविर्भाव करून मी ओरडलो. ताईबाईंनी विचारले, 'काय झाले रे?' मी म्हटले, 'मला ठेच लागली. पायाचा आंगठा दुखू लागला आहे. मला वाट ओळखीची नाही. यावेळी मी दुर्गा घाटावर सांगलीकरांच्या वाड्याकडे कसे जावे?' ताईबाई म्हणाल्या, 'बरे तर माझ्याबरोबर घरी चल.' मी त्यांच्याबरोबर घरी गेलो. दुपारी शिंद्यांच्या अन्नछत्रात घशाशी येईपर्यंत मी जेवलो होतो. त्यामुळे रात्री जेवणाचा प्रश्नच नव्हता. घरी गेल्यावर ताईबाईने मला राम-

मंदिरात झोपायला सांगितले. तिने घरातून चटई आणून दिली. मी चटईवर पसरलो. चार दिवसांच्या प्रवासाने आणि शारीरिक आणि मानसिक श्रमाने मी अगदी थकून गेलो होतो. इतके कष्ट केल्याप्रमाणे एका सज्जन कुटुंबाचा आसरा मिळाला हे माझे भाग्यच होय. समोर मंदिराच्या गाभाऱ्यात प्रभू रामचंद्राची प्रसन्न मूर्ती उभी होती. तिच्यावर समईतील दिव्याचा मंद प्रकाश पडला होता. रामाच्या मूर्तीकडे मी टक लावून पाहात होतो. या चार दिवसांच्या संकटात मला परमेश्वरानेच वाचविले असे मला वाटले. त्या क्षणी तरी माझे मन राममय होऊन गेले. त्याच स्थितीत मला केव्हा झोप लागली हे कळले नाही. इतकी गाढ झोप मला आयुष्यात क्वचितच लाभली असेल.

दुसऱ्या दिवशी, (तेरा जून, एकोणीसशे सव्वीस) अण्णासाहेब पाटणकरांनी मला एक कार्ड देऊन म्हटले, ' आताच्या आता तू आपल्या घरी पत्र लिहून मी येथे बनारसला आहे, काळजी करू नये, असे कळीव. घरी तुझे आईवडील काळजीत असतील ' मी ताबडतोब घरी पत्र लिहिले. चार वर्षांनी मी घरी परत गेल्यावर आईने मला सांगितले, की मी नाहीसा झाल्यावर घरात आकांत झाला. त्यावेळी गुलबर्ग्यात हूल उठली होती की निजामाचे अधिकारी मुलांना पळवून नेऊन त्यांना मुसलमान करतात. तसाच प्रसंग माझ्यावर आला असेल असे समजून घरातील मंडळी घाबरून गेली. वडिलांचे मित्र आणि शेजारीपाजारी हे माझ्या शोधार्थ रात्रभर हिंडत होते. पण माझा पत्ता लागला नाही. दुसऱ्या दिवशी आईने ज्योतिष्याला बोलाविले. त्याने पाटावर शेणाचे पांडव चारी दिशेने मांडले. उत्तरेकडची शेणाची मूर्ती थोड्याच वेळात कोसळली. ज्योतिष्याने सांगितले, ' मुलगा उत्तरेकडे निघून गेला आहे. थोड्याच दिवसांत त्याचे पत्र येईल. तो खुशाल आहे. काळजी करण्याचे कारण नाही ' पुढे एका आठवड्यातच माझे पत्र मिळाल्यामुळे सर्वांचा जीव खाली पडला.

घरातून निघण्याच्या दोन चार दिवस आधी मी आईला म्हटले होते. ' पुष्कळ दिवस झाले. एकदा रताळ्याच्या पुरणपोळ्या (पुरणात रताळी घालून करतात) करून घाल ना ' माझ्या बोलण्याची आठवण होऊन आईला वाटे, हा रताळ्याच्या पुरणपोळ्या न खाता गेला. ती फार हळहळ करी. चार वर्षेपर्यंत घरात रताळ्याच्या पोळ्या म्हणून तिने केल्या नाहीत. आणि स्वतःही खाल्ल्या नाहीत. पुढे बी. ए. ची परीक्षा देऊन मी घरी गेलो तेव्हा तिने मला मोठ्या आवडीने रताळ्याच्या पोळ्या करून घातल्या.

सकाळी उठून मी दुर्गा घाटावरील सांगलीकरांच्या वाड्यात गेलो. माझे धोतर आणि फुलपात्रे ही तेथेच राहिली होती. ती मी घेतली. जाताना वाड्या-

तील माणसाने मला पुन्हा बजाविले, ‘ पुन्हा या वाड्यात यायचे नाही. ’ मी त्याला म्हटले, ‘ आपण निश्चिंत असावे. माझी सोय झाली आहे. मी या वाड्यात पुन्हा येणार नाही. ’ कालची ती बाई जवळच उभी होती. मी तिला म्हटले, ‘ बाई, तुम्ही मला धीराच्या चार गोष्टी सांगितल्या, आणि शिंद्यांच्या अन्नछत्रात जेवणाची सोय करून दिली. मी तुमचा अत्यंत आभारी आहे. ’ तिने माझ्याकडे एक खिन्न पण प्रेमळ कटाक्ष टाकला आणि म्हटले, ‘ खुशाल राहा. ’

मी पुन्हा सांगलीकरांच्या वाड्यात पाऊल टाकले नाही.

परत येताना मी गंगेवर आंघोळीला गेलो. दशाश्वमेध घाट यात्रेकरूंनी गजबजून गेला होता. मला छान पोहता येत होते. मी बराच वेळ पाण्यात डुंबत होतो. मला सर्वात गंमत वाटली ती बंगाली लोकांची. ही माणसे घाटावर एक एक दोन दोन पैशाचे तेल घेत आणि बेंबीत ते भरून घेत आणि त्याच्यावर हात थापटीत. घाटावर पंडे गंध उगाळीत बसलेले असत. बनारसला ऊन्ह अतिशय कडक असल्यामुळे पंड्यांच्या आसनावर ताडाच्या मोठ्या आणि गोल छत्र्या लावलेल्या असत. घाटावर भारतातील सर्व भागांतील माणसे आढळून येत. मी दुपारी बाराच्या सुमारास होळकर वाड्यात गेलो. तेथे जेवणाची तयारी चालली होती.

विष्णुपंतांनी मला पाहिले आणि म्हटले, ‘ अरे पाटणकर, (त्यांना वाटले माझे आडनाव पाटणकर आहे.) चल पत्रावळी मांडायला घे पाहू. ’ मी मुकाट्याने पत्रावळी हातात धरायला गेलो. तसे ते म्हणाले, ‘ अरे, तुम्ही दक्षिणेतून येणारी पोरे धर्मभ्रष्ट आहात. कोरड्या धोतराने पत्रावळी मांडतोस काय ? चल, ओले धोतर नेसून पाने मांडायला घे. ’

मी मुकाट्याने धोतर बदलले. ओले नेसलो आणि पाने मांडू लागलो. भांड्याभांड्यांतून पाणी भरले आणि जेवणास बसलो. कुठे तरी आत भडभडून आले. आमच्या घरी पंचवीस माणसे तरी पंक्तीला असायची. स्वयंपाकी, पाणके, आचारी, शागीर्दपेशा, बाराचे ब्राह्मण, विद्यार्थी, पुराणिक, पुजारी इत्यादींनी घर गजबजलेले असे. घरात मी का कधी पत्रावळी हातात धरल्या होत्या का कधी पाणी वाढले होते ! ते करणे आज आपल्या नशिबी आले ! पण काही इलाज नव्हता.

जेवण मात्र दणदणीत असे. जेवणात मुख्य अन्न म्हणजे गव्हाच्या पोळ्या आणि गुळांबा. दहा दिवस मी अगदी घशाशी येईपर्यंत जेवीत असे. कारण पुढे चोवीस तासांपर्यंत खायला मिळत नसे. बनारसला गंगेचे पाणी पचायला थोडे

जडच असे. दिवसातून दोनदा खवखवून भूक लागली असे क्वचितच घडे. यासंबंधी बनारसला एक आख्यायिका प्रचलित होती.

गंगा स्वर्गातून भूलोकावर आली. ती बनारसजवळ आली तसे तिला भगवान शंकरांनी हटकले. ते म्हणाले, 'हां हां गंगे, या शहराजवळून जायचे नाही.' गंगा म्हणाली, 'भगवन्, आपल्या पायाजवळून वाहात जाण्याचे पुण्य मला लाभणार आहे. आपण मला अशी लोटू नका.' शंकर म्हणाले, 'काय करावे, तुझ्या पाण्याला ओढ फार, माझे भक्त वाहून जातील, तुझ्या पात्रात मगरी-सुसरींचा सुळसुळाट, माझे भक्त नाश पावतील, तुझे पाणी पाचक आहे आणि माझे भक्त गरीब आहेत. त्यांना खायला अन्न मिळण्याची मारामार. जे मिळाले ते तुझ्या पाण्यामुळे लवकर पचत गेले तर त्यांनी काय करावे?' गंगा म्हणाली, 'भगवन्, मग मी आपल्याला वचन देते, माझे पात्र येथे शांत राहील. बनारसला माझ्या पाण्यात मगरी-सुसरी आढळणार नाहीत. आणि माझे पाणी येथे जड राहील. अन्न लवकर पचणार नाही.' या अटीवर शंकरांनी गंगेला बनारसजवळून वाहण्याची परवानगी दिली. त्यामुळे शंकरभक्तांची मोठी सोय झाली.

बनारसला भांग घोटून पिण्याचा बराच प्रघात आहे. भांग घोटून त्यांत बदाम, खडीसाखर, बर्फ इत्यादि पदार्थ घालून पितात. भांग चढली की त्या तारेंत लोक सडकून व्यायाम करीत. आपण किती दंड बैठका काढीत आहोत याचे त्यांना भान राहात नसे. जेवणाआधी ही भांग पीत; त्यामुळे कितीही खाल्ले तरी खाल्ल्यासारखे वाटत नसे. याचा अनुभव मलाही आला आहे. बनारसचे ब्राह्मण जेवायला बसले की एक लाडू, दोन लाडू असा आग्रह होत नसे. पाच पाच लाडू पंचपाळ्यात ठेवून एकदम पाच लाडू वाढीत. लाडू किती खाल्ले याचा हिशेब करताना किती पंचकड्या (पाच लाडवांचा एक गट) खाल्ला असे विचारीत. बनारसला दूध आणि मलई ही मुबलक मिळे. मातीच्या भांड्यातून (त्यांना पुरवा म्हणत) आणा दोन आण्याला भक्कम दूधमलई मिळे. त्यामुळे भोजनांनी तृप्त झालेले अनेक गलेलठ्ठ ब्राह्मण ठिकठिकाणी आढळत.

परशुराम नारायण ऊर्फ अण्णासाहेब पाटणकर यांना उपमा द्यावयाची तर प्राचीन काळच्या ऋषिमहर्षींची द्यावी लागेल. त्यांनी माझ्यावर केलेले उपकार जन्मोजन्मी तरी मी फेडू शकेन की नाही याची मला शंका वाटते. सात आठ महिन्यांतच ते आजारी पडून आपल्या गावी इंदूरला निघून गेले. पण या अल्पकाळातच त्यांच्या तेजस्वी आणि गंभीर व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर जन्मभर राहील इतका परिणाम झाला आहे. बनारसच्या शांत वातावरणात

माझे पाय स्थिर राहिले ते त्यांच्यामुळे, जीवनात काहीतरी करून दाखवावे ही जिद्द त्यांच्यामुळे निर्माण झाली. त्यांच्यामुळे अखंड वाचनाची गोडी लागली. त्यांनी मला काय दिले नाही ? जन्मभर पुरेल इतके ध्येयधन ते मला देऊन गेले आहेत. त्यांच्या सहवासाने माझे जीवन धन्य झाले, कृतार्थ झाले !

आण्णासाहेब हे पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेजमधे प्राध्यापक होते. लोकमान्य टिळकांनी सोसायटी सोडली तेव्हा त्यांच्याच बरोबर पाटणकर यांनीही सोसायटीचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनीं इंदूर, धार, देवास, उज्जैन या ठिकाणी संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम केले. पुढे ते बनारस येथील ॲनी बेझंट यांनी काढलेल्या सेंट्रल हिंदू कॉलेजमधे संस्कृतचे प्राध्यापक म्हणून दाखल झाले, तेथून ते इ. स. १९१८ मध्ये सेवानिवृत्त होऊन इंदूरला गेले. तेथे त्यांनी घर बांधले. ‘ दहा लोधी मोहल्ला, जुना तोफखाना इंदूर ’ हा त्यांचा पत्ता अद्याप माझ्या आठवणीत आहे. इंदूर, धार, देवास येथे त्यांनी पुन्हा अध्यापनाचे थोडेबहुत काम केले असावे. पण खर्चाची समाधानकारक सोय झाली नसावी. म्हणून १९२५ च्या सुमारास ते पुन्हा बनारसला आले. मालवीयजींनी त्यांची योग्यता ओळखून त्यांना युनिव्हर्सिटीत रिलीजियस इन्स्ट्रक्टर, आणि मराठीचे प्राध्यापक म्हणून नेमले. काम विशेष दगदगीचे नसे. त्यांचे वयही झाले होते. धार्मिक शिक्षणाचा एखादा तास आणि मराठीचे आठवड्यातून दोन तीन तास ते घेत. त्यांना दोनअडीचशे रुपये मिळत असावेत. त्यांचे मुख्य बिऱ्हाड इंदूरला असल्यामुळे बनारसला कधी त्यांची पत्नी तर कधी बालविधवा मुलगी ताईबाई ही त्यांच्याजवळ येऊन राहात. पाटणकरांच्याकडे एक मोठी खोली होती. तीच बैठक, आणि तेच स्वयंपाकघर. या हॉलवजा खोलीला लागून एक अगदी लहान खोली होती. तेथे मी माझे अंथरूण-पांघरूण आणि इतर सामान ठेवीत असे. दहा पंधरा दिवसांतच वडिलांनी माझे अंथरूणपांघरूण, पुस्तके, ही पाठवून दिली. दहा पंधरा रुपयेही पाठविले. माझा बराच वेळ मात्र राममंदिराच्या हॉलमध्ये वाचनात जात असे.

अण्णासाहेब पाटणकरांना दोन मुलगे आणि तीन मुली. मोठा मुलगा चिंतामण हा होळकर कॉलेजात इंदूरला फर्स्ट ईयरमध्ये शिकत होता. दुसरा मुलगा शाळेत शिकत होता.

अण्णासाहेबांची मोठी मुलगी ताईबाई ही पुण्याला बुधवारात भिड्यांच्याकडे दिली होती. अल्प वयातच तिचा पती वारला. त्यामुळे ताईबाई आपल्या वडिलांकडे परत आली. ती परत पुण्याला सासरी गेलेली दिसत नव्हती.

अण्णासाहेबांची दुसरी मुलगी ही इंदूरला आपटे नावाचे मोठे अधिकारी होते त्यांना दिली होती. तिसरी मुलगी फाटक घराण्यात दिली होती. श्रीमती फाटक आणि त्यांचा मुलगा ही कल्याणला असतात. व्याख्यानाच्या निमित्ताने मी मधून मधून कल्याणला जातो तेव्हा त्यांची गाठ पडत असते.

घाट्यांनी राममंदिराची व्यवस्था जिंतूरकर नावाच्या कुटुंबाकडे सोपविली होती. मी बनारसला गेलो त्यावेळी गोपीनाथपंत जिंतूरकर हे वारले होते. त्यांची विधवा सरस्वतीबाई ऊर्फ आत्याबाई ही पंचावन्न एक वर्षांची बाई मंदिराची व्यवस्था पाहात असे. तिला मूलबाळ नव्हते. तिचे माहेर रेवा संस्थानात होते. सरस्वतीबाईने आपल्या भावाचा मुलगा विश्वनाथ घुले (हा पुढे १९३० मध्ये वारला.) याला आपल्याजवळ आणून ठेवला होता. विश्वनाथ त्यावेळी म्याट्रिक्च्या वर्गात शिकत होता. रामाची पूजाअर्चा तोच करी. विश्वनाथच्या दोन विधवा बहिणी बनारसला पण वेगळ्या घरात राहात. त्यांपैकी एका बहिणीला एक सहासात वर्षांचा मुलगा होता. त्याला पोऱ्या म्हणत.

आत्याबाई जिंतूरकर ही शिस्तीने कडक, वृत्तीने तापट आणि मनाने प्रेमळ अशी बाई होती. चार वर्षे मी तिच्या सहवासात होतो. तिने मला आपल्या पोटच्या पोराप्रमाणे वागविले. तिच्या बोलण्यात हिंदी शब्द बरेच येत. पेशवेकालीन मराठी म्हणाना ! ‘ काय सेतू, देशीहून डाक आली काय ’ म्हणजे घराहून पत्र आले काय, ’ ‘ तुम्ही इतके पढलेले ’ (म्हणजे शिकलेले), ‘ काय पोऱ्या खिलवाड करतो आहे ’ (म्हणजे खेळतो आहे.), ‘ पोऱ्या घाटावरून इतक्या जोराने कुदला की गंगेत हजारहा छींटे उडाली ’ असे ती बोले, तेव्हा मला मोठी गंमत वाटे.

खुद्द बनारसची मराठी माणसे असेच बोलत, ‘ का हो, आमचा छता (आमची छत्री) पाहिला आहे काय ? ’ ‘ अहो दरज्जाच्या आत (दरवाजाच्या मागे) पाहा ’, ‘ अहो गुरू, येथे तर आहेच नाही आहे. ’ ‘ काय भांगेची छिनब्वल चालली आहे काय ? ’ म्हणजे भांग तयार करणे चालले आहे काय ? ‘ हा माल बहुत बढिया आहे ’ (ही वस्तू फार चांगली आहे.), ‘ काही फिकीर नाही. चालून जाईल आहे ’ (काही चिंता नाही, धकू शकेल). अशी वाक्ये कानावर पडत. मुन्नालालजी, कामतानाथजी, बाळू, भैय्या, अशी नांवेही महाराष्ट्रीयांची आढळून येत. तिकडची मराठी बोलण्यात मीही काही दिवसांत तरबेज झालो.

बनारसला गेल्यावर दोनचार दिवसांतच घडलेली ही घटना. एकदा संध्याकाळी मी घरी असताना आत्याबाईनी मला हाक मारली, ‘ अरे, सेतू, जरा वर

येऊन लाडू खाऊन जा पाहू.' मी वर गेलो. पाहतो तो त्यांच्या पापण्यांना काही तरी तांबडे लावले होते. त्यामुळे त्यांचा चेहरा उग्र दिसत होता. मी मनात थोडा चरकलो. लाडू खाण्यासाठी म्हणून त्या आग्रह करू लागल्या तसतसे मला वाटू लागले की ही बाई मला विष तर घालीत नसेल. कुठे पाहुण्यांना विष घालून मारतात असे मी लहानपणापासून ऐकत होतो. मला वाटले ही उग्र दिसणारी बाई आपल्यावर असाच प्रयोग करणार असेल. मी मनातून घाबरून गेलो. पण तिच्यासमोर खाण्यास नकार देता येईना. शेवटी परमेश्वरा, मला या संकटातून वाचीव अशी मनातून प्रार्थना करीत मी लाडू खाल्ला. पण विषाचा आपल्यावर परिणाम होईल या भीतीने मी रात्रभर अस्वस्थ होतो. वास्तविक तसा काही प्रकार नव्हता. दुसऱ्या दिवशी मी आत्याबाईंना सहज विचारले, 'आत्याबाई, तुम्ही आपल्या डोळ्यांना लाल लाल काय लावीत असता हो?' त्या म्हणाल्या, 'अरे, असा हा कडक उन्हाळा. डोळे जळजळ करतात. म्हणून रक्तचंदन लावते. त्यामुळे डोळ्यांना गारवा वाटतो.' अर्थात् मला आलेला लाडुबद्दलचा संशय मी त्यांना कधीच बोलून दाखविला नाही!

आत्याबाईंना स्वच्छतेची अतिशय आवड, जेव्हा पाहावे तेव्हा बादल्या बादल्या पाणी ओतून फरशी धुऊन काढीत आहेत; हॉल, खोल्या, स्वयंपाकघर, माजघर, व्हरांडा काही म्हणता काही त्यांच्या या स्वच्छता मोहिमेतून सुटावयाचे नाही. त्यांचे यजमान गोपीनाथपंत हे भांग पीत असत. आणि उशिरा घरी येत असत. साहजिकच ते सकाळी उशिरा उठत. आत्याबाई सकाळी चारलाच उठून घरकामाला लागत. कडाक्याच्या थंडीत त्या यजमान झोपलेल्या हॉलमधे पाणी ओतून फरशी झाडू लागत. आणि नवऱ्याला म्हणत, 'अहो उठा, मला सोवळ्यात जायचे आहे. मला फरशी धुऊन घेऊ द्या' गोपीनाथपंत कुरकुरत उठत आणि त्या ऐन थंडीत कोपऱ्यात एखाद्या केरसुणीप्रमाणे सुन्न बसून राहात. आत्याबाई त्यांचा बिछाना उचलून गुंडाळून ठेवून देत आणि भरभर फरशी धुऊन आंघोळीसाठी गंगेवर निघून जात. एके दिवशी गोपीनाथपंत रात्री बारा एकच्या सुमारास घरी आले. दोन तास त्यांना झोप मिळाली असेल नसेल, तोच आत्याबाईंची किरकिर सुरू झाली. 'अहो उठा, मला फरशी धुऊन घेऊ द्या. मला सोवळ्यात जायचे आहे.' त्या दिवशी गोपीनाथपंत रागावूनच उठले आणि त्यांच्या तोंडून निघून गेले. 'तुम्ही नेहमीच्या सोवळ्या व्हा!' मी ऐकले आहे की त्यानंतर सहा महिन्यांच्या आतच गोपीनाथपंत वारले आणि आपली स्वच्छतेची मनमुराद हौस फेडून घेण्यास आत्याबाई कायमच्या मोकळ्या झाल्या.

अण्णासाहेब पाटणकरांना माझ्याबद्दल जिव्हाळा निर्माण होण्यास अनेक कारणे होती. त्यांपैकी एक म्हणजे त्यांचा मुलगा तात्या आणि मी यांमध्ये विलक्षण साम्य होते. एकाला झाकावे आणि दुसऱ्याला काढावे असे आमचे साम्य होते. जणू काय आम्ही दोघे जुळी भावंडेच होतो. उंची, अंगलट, चेहऱ्याची ठेवण आमची दोघांची सारखीच होती. फार काय, माझ्या नाकावर देवीचे वण आहेत. तसेच तात्याच्या नाकावरही होते. तात्या त्यावेळी इंदूरला होता. अण्णासाहेबांच्याकडे येणारी माणसे मला पाहून प्रथम गोंधळून जात. कोणी मला म्हणे, 'काय तात्या, इंदूरहून केव्हा आला ?' कोणी अण्णासाहेबांना म्हणे, 'अण्णासाहेब, हा तुमचा मुलगा काय शिकतो ?' आणि मग अण्णासाहेब, हलकेच हसून म्हणत, 'सेतूला मी माझा मुलगाच म्हणून मानला आहे.' ताईबाईपण सर्वांना सांगे, 'अहो हा माझा भाऊ.'

अण्णासाहेबांचे लेखन-वाचन सतत चाललेले असे. त्यांनी टेबले, खुर्च्या यांची भानगड ठेवली नाही. त्यांची बैठक जमिनीवर असे. त्यांच्या भोवती शेकडो पुस्तके पसरलेली असत. अण्णासाहेब हे धर्मसंगती नावाचे संस्कृत पाक्षिक चालवीत असत. त्यांनी वीरधर्मदर्पण नावाचे आणि जयद्रथ वधावर आधारलेले संस्कृत नाटक लिहिले आहे. अनेक वर्षे ते अजमेर इंटरमिजिएट बोर्डाच्या पाठ्यक्रमात होते. लोकमान्य टिळक बनारसला गेले की अण्णासाहेबांना भेटल्याशिवाय राहात नसत. लोकमान्यांच्या आठवणी आणि आख्यायिका या ग्रंथांत अण्णासाहेबांनी लोकमान्यांच्या आठवणी नमूद केल्या आहेत.

अण्णासाहेबांचा ग्रंथसंग्रह म्हणजे मला पर्वणीच लाभली. बनारसला गेल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच माझे चौफेर वाचन सुरू झाले. त्यांच्या संग्रहातील पुस्तकांवर मी सतत चरू लागलो. माझ्या वाचनाच्या वेडाचे त्यांना कौतुक वाटू लागले. अण्णासाहेब मितभाषी होते. पण त्यांच्या डोळ्यांतील कौतुकाचा भाव मला स्पष्ट दिसत असे.

होळकर वाड्यात दहा दिवसपर्यंत माझी जेवणाची चंगळ होती. पोळी आणि गुळांबा हीच पक्वान्ने दहा दिवस सतत चालू होती. या दहा दिवसांतील माझा कार्यक्रम म्हणजे सकाळी उठावे, आणि गंगेवर आंघोळीला जावे. दशाश्वमेध घाटावर गंगेत तास दोन तास पोहावे. तेथून परत येताना विश्वनाथाचे दर्शन घ्यावे. तिकडून येताना वाटेत ताईबाई भेटत. ताईबाई नेहमी पांढऱ्या वस्त्रात असत. गौरवर्ण, गंभीर चेहरा, पांढरे स्वच्छ वस्त्र, भुवयामध्ये भस्म किंवा अंगारा, अशी त्यांची सोज्वळ मूर्ती माझ्या आठवणीत आहे, विश्वनाथाच्या गल्लीच्या तोंडाशी दहीविक्याचे दुकान होते. तेथे त्या दही विकत घेत. मग आम्ही बोलत

मी काहीच बोललो नाही.

अण्णासाहेबांच्याकडे त्यांचे जुने विद्यार्थी मधून मधून येत असत. ललिताप्रसाद सिन्हा हे कायस्थ गृहस्थ त्यांपैकीच एक होत. ते सेंट्रल हिंदू कॉलेजमधून पदवी घेऊन बाहेर पडल्यावर बनारसच्या क्षत्रिय इंटरमीजियेट कॉलेजमध्ये शिक्षक म्हणून लागले. हे जातीने कायस्थ असून अतिशय सज्जन असे गृहस्थ होते. त्यांची माझी ओळख झाली. त्यांचा पुतण्या प्रभाशंकर आणि पुतणी विमलाकुमारी यांना खासगी शिक्षक म्हणून त्यांनी मला नेमले. मला वाटते, त्यावेळी प्रभाशंकर हा सातआठ वर्षांचा असावा आणि विमलाकुमारी ही दहाबारा वर्षांची असावी. एक जुलै पासून मी ही शिकवणी पत्करली. मला महिन्याला पाच रुपये मिळू लागले. या निमित्ताने एका सज्जन कायस्थ कुटुंबाचा माझा परिचय झाला. काही महिन्यांनी ललिताप्रसादची बहीण माहेरी आली. अलाहाबादचे सुप्रसिद्ध वकील आणि पुढारी मुन्शी ईश्वरसरण यांच्या घराण्यात तिला दिली होती. तिला इंग्रजी आणि उर्दू शिकविण्याचे काम मला करावे लागे, त्याबाबत मला शिकविण्याची फी म्हणून आणखी पाच रुपये मिळत. वरूनही थोडेबहुत पैसे येऊ लागले होते. त्यातून कॉलेजप्रवेशाची सोय करावयाची होती.

एके दिवशी ताईबाई मला म्हणाल्या, "दुर्गाघाटावर फडणिसांच्या वाड्यात सुंदराबाई राहातात. त्यांना म्हणावे ताईबाईंनी बोलाविले आहे." मी त्याप्रमाणे फडणिसांच्या वाड्यात गेलो. तो एक तिशीतील विधवा (सकेशा) स्त्री माझ्या समोर आली. ती रूपाने सुरेख नव्हती. मध्यम बांधा, गौरवर्ण आणि चेहेऱ्यावर पावित्र्य आणि सौजन्य यांचा संगम. माझी सुंदराबाईच्या पहिल्या भेटीची आठवण अशी आहे. या बाईला जीवनात अतिशय कष्ट पडले आणि पडत असावेत असे तिला पाहिल्याबरोबर वाटे. मी तिला म्हटले, 'ताईबाईंनी तुम्हांला बोलाविले आहे.' ती म्हणाली 'तू कोण?' मी म्हटले 'माझे नाव सेतु माधव, मी हैदराबादेकडून शिकण्यासाठी म्हणून आलो आहे. अण्णासाहेबांच्या घरी राहिलो आहे.' पहिल्याच भेटीत आमच्यात भावाबहिणींच्याप्रमाणे जिव्हाळा निर्माण झाला. ती ताईबाईंना भेटण्यासाठी मधून मधून येत असे. सुंदराबाईची हकीकत मोठी विलक्षण होती. ती एका गरीब कुटुंबात जन्मली. मला वाटते तिचे वडील उज्जैन प्रांतात प्राथमिक शाळेचे शिक्षक असावेत. सुंदराबाईचे शिक्षण पाचसहा इयत्तांच्या पलीकडे झाले नाही. तिला ग्वाल्हेरच्या एका प्रतिष्ठित आणि सुखवस्तू कुटुंबात दिली होती. तिला दोन मुली झाल्या. त्या लहान होत्या त्यावेळी सुंदराबाईवर वैधव्याचा घाला पडला. तिच्या दिराने तिच्या नवऱ्यावर विषप्रयोग केला, असे तिच्या बोलण्यावरून मला समजले

कुटुंब अविभक्त असल्यामुळे तिच्या दिराने सगळी इस्टेट आपल्या ताब्यात घेतली, आणि सुंदराबाईला देशोधडीला लावले. सुंदराबाई आपल्या दोन लहान मुलींना घेऊन बाहेर पडली. नवऱ्याचे प्राव्हिडंट फंडाचे आणि ग्र्याच्युइटीचे तीनचार हजार रुपये तिने राखून ठेवले. मुली वयात आल्यावर तिने त्या पैशातून त्यांची लग्ने लावून दिली. तोपर्यंत तिचे वडील वारले. उज्जैनला सुंदराबाईंची अण्णासाहेब पाटणकरांच्या कुटुंबाशी ओळख झाली. तिच्या घरी आता कोणीच राहिले नसल्यामुळे ती अण्णासाहेबांच्या बरोबर बनारसला आली. तिला हिंदीही बऱ्यापैकी येत होते. तिला कायस्थांच्या बालिका पाठशालेत शिक्षिका म्हणून पंचवीस तीस रुपयांची नोकरी लागली. सुंदराबाईने दुर्गाघाटावर फडणिसांच्या वाड्यात एक दोन खोल्या घेतल्या आणि तेथे बिऱ्हाड केले. बालिका पाठशाला बनारसला क्सांपात, म्हणजे दुर्गाघाटापासून जवळ जवळ पाच मैल अंतरावर होती. सुंदराबाई जेवणखाण आटोपून आठच्या सुमारास घराबाहेर पडे. ती पाच मैल चालत जाई. संध्याकाळी पाचला शाळेतून निघून ती साडेसात आठच्या सुमारास घरी परत येई. शनिवारी तिची शाळा अर्ध्या दिवसाची असल्यामुळे चारपाच वाजण्याच्या सुमारास ती घरी येई. ताईबाईकडे ती मधून मधून येई. पण पाटणकरांच्याकडून तिने मदत घेतल्याचे मला आढळले नाही. आण्णासाहेब पाटणकर इंदूरला निघून गेल्यावर मी दर शनिवारी तिला भेटण्यास जात असे. तिला इतके कष्ट पडत, पण तिने कधीही त्यासंबंधी कुरकुर केली नाही. पंचवीस तीस रुपयांत ती आपली उपजीविका करी, यावरून तिच्या गरिबीची कल्पना येईल. माझ्यासाठी ती मधून मधून फराळाचे लाडू करून देई. यावरून मला एक घटना आठवते.

आण्णासाहेब इंदूरला गेल्यानंतरची गोष्ट. मी कॉलेजातून संध्याकाळी चार पाचच्या सुमारास यायचा. नंतर शिकवणीस जायचा. पण त्यावेळी भूक लागलेली असे. काही विकत घेऊन खावे तर हातात पैसे नसत. मी सुंदराबाईला म्हटले, अहो मला लाडू करून द्या. कॉलेजमधून आल्यावर मी रोज एक लाडू खात जाईन त्याप्रमाणे तिने मला बेसनाचे तीस लाडू तयार करून दिले आणि म्हटले, 'हे महिनाभर पुरवायचे बरे का.' मी हो म्हटले. ते तीस लाडू घेऊन मी घरी आलो. पहिले तीन चार दिवस मी रोज एक लाडू खात होतो. पण लाडू अतिशय चांगले झाले होते. मला मोह आवरेना. मग मी रोज दोन लाडू खाऊ लागलो. मी मनाशी म्हणे, 'आज दोन लाडू खाल्ले, उद्या खाऊ नये झाले.' पण दुसऱ्या दिवशी कॉलेजातून आलो की लाडू खाण्याचा मोह होत असे. असे करून तीस लाडू मी आठ दिवसांत संपवले. सुंदराबाईंनी मला एक

दिवस विचारले, ' सेतू, मी करून दिलेले लाडू तुला महिनाभर पुरले ना ? ' मी हसून म्हटले, ' पुरले तर. मी आठ दिवसांतच ते खाऊन टाकले. ' यावर ती मोकळेपणाने म्हणाली, ' अरे, मग उरलेले बावीस दिवस लाडवावाचून गेले म्हणायचे. आता पुन्हा कधी तरी तुला लाडू करून देईन. '

माझे शर्ट फाटून गेले होते. तिने मला एक नेहरू शर्ट घेऊन दिला. तो एकच शर्ट (आत बनियन वगैरे नाही) मला पुढे कित्येक दिवस उपयोगी पडला. रात्री झोपताना तो मी धुऊन वाळत घाली आणि दुसऱ्या दिवशी तो अंगावर चढवून कॉलेजात जाई. माझ्यापाशी पैसे असले की मी मधून मधून तिला त्यापैकी थोडेबहुत देत असे. चार वर्षे मी बनारसला होतो. तिची भाऊबीजेची ओवाळणी, कधी लुगडे तर कधी दहा पाच रुपये, मी कधी चुकविली नाही.

सुंदराबाईच्यामुळे मला दुर्गाघाटावरील गरीब आणि मध्यमवर्गीय अशा मराठी समाजाचा परिचय झाला. दुर्गाघाटावरील विठ्ठल मंदिरात, आणि बिंदु-माधवाच्या देवळात मी तिच्याबरोबर अनेक वेळा गेलो. शनिवारी रात्रीचे जेवण मला कित्येक वेळा तिच्यापाशी मिळत असे. ती काही दिवस किब्यांच्या वाड्यात तर काही दिवस आंग्र्यांच्या वाड्यात भाड्याच्या खोल्या घेऊन राहिली. तिच्या मुली माहेरपणाला म्हणून तिच्याकडे येत. ती आपल्या शक्तीप्रमाणे त्यांचे माहेरपण करी. तिच्या सोशिकपणाचे, कष्टाळूपणाचे आणि समाधानी वृत्तीचे मला कौतुक वाटे. उलट माझी शिक्षणाची धडपड पाहून तिला आनंद होई. परस्परांची सुखदुःखे सांगण्यात आम्ही गुंगून जात असू. सुंदराबाईकडे अनेक शेजारणी आणि इतर ओळखीच्या बायका येत. त्या बहुतेक कनिष्ठ मध्यम वर्गातील असत. त्यांपैकी काहींचे सासर अगर माहेर ब्रह्मावर्त, कानपूर, ग्वाल्हेर, झाशी, अयोध्या अशा ठिकाणी असे. त्यांच्याशी मला बोलण्याचे प्रसंग आल्यामुळे वरील स्थळांतून विखुरलेल्या महाराष्ट्रीय समाजाची मला बरीच कल्पना आली. यांपैकी कोणी पुजारी, पंडे, शास्त्री, पोस्टमास्तर, शिक्षक, दुकानदार, इत्यादी धंद्यांतून असत. बनारसला दुर्गाघाटावरील अनेकांच्या माझ्या ओळखी झाल्या. अर्थात् राजेश्वरशास्त्री द्रवीड वगैरेसारख्या विद्वान पंडितांशी माझा संबंध आला नाही. मला वाटते, आजचे मराठीतील सुप्रसिद्ध लेखक दि. के. बेडेकर यांना मी प्रथम दुर्गाघाटावर फडणिसांच्या वाड्यात पाहिले असावे; तेही त्यावेळी हिंदू युनिव्हर्सिटीत शिकत असावे.

१९३० मध्ये बी. ए. पास झाल्यावर मी अलाहाबादेस पुढील शिक्षणासाठी गेलो. त्या वेळी मला निरोप देताना सुंदराबाईच्या डोळ्यांत पाणी आले. अलाहाबादेस मी तीन वर्षे होतो. मधून मधून मी बनारसला गेलो की सुंदरा-

बाईंना भेटण्यास जात असे. अलाहाबादेस मला हाताने स्वयंपाक करून घ्यावा लागे. बनारसहून परत निघताना सुंदराबाई कधी पापड, सांडगे, मेतकूट, मसाल्याचे सामान बांधून बरोबर देई. तिचा एक जावई कलकत्याला होता. दुसरा माळव्यात होता. तिच्या मुली अक्का आणि दुर्गाताई यांना एक दोन मुले झाली होती. त्या मुली माहेरपणाला आल्या म्हणजे सुंदराबाईचे घर म्हणजे मला जिव्हाळ्याचे स्थळ वाटे. इ. स. १९३३ मध्ये मी अलाहाबाद सोडून हैदराबादेस परत आलो. त्यानंतर माझी आणि सुंदराबाईची पुन्हा गाठ पडली नाही. इ. स. १९३९ मध्ये मी बनारसला माझे श्वशुर प्राध्यापक श्रीकृष्ण वेंकटेश पुणतांबेकर यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळी मी सुंदराबाईची चौकशी केली. ती दुर्गाघाट सोडून गेली होती. माझा मुक्काम बनारसला फक्त एक आठवड्याचा असल्यामुळे मला अधिक चौकशी करणे जमले नाही. पण मी माझ्या पत्नीला सांगून ठेवले की, तुम्ही सुंदराबाईची चौकशी करून तिला अवश्य भेटा. ती माझी बहीण आहे. माझ्या सांगण्याप्रमाणे माझ्या पत्नीने सुंदराबाईचा पत्ता शोधून काढला. तिची पहिली नोकरी सुटली होती. तिला एका नवीन शाळेत कमी पगाराची नोकरी लागली होती, दुर्गाघाटाहून लांब कंपनी बागेजवळच्या गरीब वस्तीत ती राहत होती. माझी पत्नी आणि सासू तिला भेटण्यास गेल्या. तिने त्यांना जेवू घातले. पक्वान्न म्हणून तिने मसालेभात केला होता. जेवण झाल्यावर माझ्या पत्नीने तिला भेटीदाखल काही वस्तू दिल्या. सुंदराबाई तिला म्हणाली, ‘ सेतूला म्हणावे, भाऊबीजेची ओवाळणी म्हणून मला एखादे चांगलेसे लुगडे दे. ’

पुढे माझी पत्नीही लवकरच बनारसहून माझ्याकडे आली. तिने मला ही हकीगत सांगितली. मी बनारसला पुन्हा एकदा १९४५ मध्ये गेलो होतो. त्यावेळी मी सुंदराबाईची चौकशी केली. पण पत्ता लागला नाही. त्या गोष्टीला आज पंचवीस वर्षे झाली. आज सुंदराबाईला पाचशे रुपयांचा भरजरी शालू घेऊन देण्याची मला देवाने ऐपत दिली आहे. पण जिला द्यायची ती कुठे आहे, ती जिवंत आहे का वारली याचीही मला कल्पना नाही !

ओवाळणीच्या लुगड्याचे ते ओझे अद्याप माझ्या डोक्यावर आहे. ते ऋण कधी फिटेल परमेश्वर जाणे !

दोन ओंडक्याची होते सागरात भेट
एक लाट तोडी दोघा पुन्हा नाहि गाठ
क्षणिक तेवि आहे बाळा, मेळ माणसांचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा

होळकर वाड्यात मला जेवण मिळे ते फक्त दहा दिवसांसाठीच होते. दशहराचा उत्सव संपल्यानंतर खाण्यापिण्याची काय सोय करावी याची मला काळजी लागली. एक दिवस मी आणि ताईबाई घाटावरून येत असता वाटेत एक गृहस्थ भेटले. ताईबाईंनी त्यांना हटकून विचारले, 'अहो दामले, या मुलाची जेवणाखाण्याची काही सोय होऊ शकेल काय?' दामले म्हणाले, 'त्यात काय अवघड आहे? मी याला उद्याच नाट्टुकोट्टाच्या आणि त्रावणकोर महाराजांच्या अन्नछत्रात घेऊन जातो. त्या दोन्ही छत्रांच्या मॅनेजरांना सांगून याची जेवणाची सोय लावून देतो.'

दामल्यांचे वय पस्तीस चाळीसचे असावे. उंची सहा फुटांची. अंगापिंडाने मजबूत. हा कोणीतरी कसलेला पैलवान आहे, असेच त्याला पाहून वाटले असते. बनारस हे एक विलक्षण शहर आहे. सगळ्या मुलुखातील हरप्रकारचे परागंदा लोक येथे आढळून येतात. अनेक प्रकारचा कचरा पाण्यावरून वाहात वाहात एकत्र यावा तसे बनारसचे आहे. अशा मानवी गाळाला सॉमरसेट मॉमने फ्लोटसाम, जेटसाम, असे नाव दिले आहे. दामले हे त्यापैकीच एक होते. माझ्या माहितीप्रमाणे काही दिवस तरी ते पटवर्धनांच्या दुकानांत उदबत्त्या विकण्याचे काम करीत असावेत. मला ते सांगत, 'पुण्याला मी म्युनिसिपल मराठी शाळा नंबर चार मध्ये शिक्षक होतो. वरिष्ठांशी काही तात्त्विक मतभेद झाले. तत्त्वासाठी मी नोकरीवर लाथ मारून बनारसला निघून आलो.' ज्यांच्या पायी हा प्राणी बनारसच्या रस्त्यावर उदबत्त्या विकीत अन्नछत्रात जेवू लागला, ती कोणती गहन तत्त्वे होती याचा मला काही उलगडा झाला नाही.

राजे-महाराजे, श्रीमंत व्यक्ती आणि नामवंत संस्था यांनी बनारसला अनेक अन्नछत्रे चालविली आहेत. पंचद्राविड ब्राह्मणांसाठी चालविलेली अशी पाचपंचवीस तरी छत्रे असावीत. काही छत्रांतून रोज शेकडो ब्राह्मण जेवीत तर काही ठिकाणीं दहाबारांच्या वर माणसांना प्रवेश नसे. काही अन्नछत्रांत केवळ तंत्रपालन म्हणून दोनचार ब्राह्मणांना पंक्तीला घेत. अशा छत्रांचा उपयोग मर्यादित असे. माझा संबंध आला ती छत्र म्हणजे पंचगंगा घाटावरील बालाजी मंदिरातील शिंद्यांचे अन्नछत्र, तेथे मी एकच दिवस जेवलो. होळकर वाड्यात दहा दिवस जेवण मिळाले. पुन्हा मी तेथे गेलो नाही. विजयनगरच्या महाराजांचे अन्नछत्र तेथे मी एकच दिवस गेलो होतो. तेथे पाच सातच्यावर ब्राह्मणांना घेत नाहीत असे कळले. बनारसमधील सर्वात मोठे छत्र म्हणजे दक्षिण भारतातील चेट्टियर या सधन समाजाने चालविलेले नाट्टुकोट्टाई अन्नछत्र होय.

चेट्टियर समाजाची प्रचंड इमारत आमच्या घरापासून पाच मिनिटांच्या

अंतरावर होती. तेथून रोज सकाळी अकराच्या सुमारास काशीविश्वेश्वराच्या पूजेसाठी मिरवणूक निघे. इमारतीतून ती बाहेर पडताच, जेवणाच्या पत्रावळी मांडू लागत. रोजच्या जेवणाला तीनचारशे माणसे सहज असत. सकाळी नऊ वाजता नाटुकोट्टाईमध्ये जाऊन, मी आज जेवणास येत आहे असे सांगावे लागे. मग तेथे तांब्याचा एक बिल्ला, अकौंट्स ऑफिसमधील टोकनसारखा मिळे. अकरा वाजता तो बिल्ला दाखवून भोजनगृहात प्रवेश मिळवावा लागे. जेवण झाल्यानंतर बाहेर निघताना टोकन परत घेऊन एक एक पैसा दक्षिणा देत.

या अन्नछत्रात एक दिवस आंध्र, कर्नाटकी, तामिळ, केरळ या प्रांतातील ब्राह्मणांना आणि एक दिवस महाराष्ट्रीय ब्राह्मणांना जेवू घालीत. दामल्यांनी एक दिवस सोडून मला महाराष्ट्रपाळीच्या दिवशी जेवण मिळेल अशी व्यवस्था केली. अर्थात बिल्ला (टोकन) घेण्यासाठी मला सकाळी नऊ वाजता छत्रात जावे लागे. जेवण मात्र चांगले आणि भक्कम मिळे. मी पोटभर जेवी. म्हणजे रात्री झोपताना नुसते पाणी पिऊन झोपले की विशेष त्रास होत नसे.

एका दिवसाआड एक दिवस तर नाटुकोट्टाईमध्ये जेवणाची सोय झाली. पण दुसऱ्या दिवसाचे काय? या बाबतीतही दामले उपयोगी पडले. मी राहात होतो तेथून दोन मैलांवर केदार घाट होता. तेथे त्रावणकोरच्या महाराजांनी चालविलेले अन्नछत्र होते. दामल्यांनी मला तेथे एक दिवस नेले. अन्नछत्राचा वाडा लहानच होता. संस्थानचे एजंट एक सज्जन मल्ल्याळी गृहस्थ होते. ते वरच्या मजल्यावर राहात असत. रोजच्या ब्राह्मणभोजनाची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांनी एक मनुष्य ठेवला होता. त्याचे नाव रामण्णा. रामण्णा हा कर्नाटकी होता. मी आणि दामले एके दिवशी भल्या पहाटे केदार घाटावर गेलो. दामल्यांनी हाक मारली, 'अहो रामण्णा'! 'आलो आलो' म्हणत एक मध्यम वयाचा, मध्यम उंचीचा, स्थूल असा मनुष्य बाहेर आला. त्याने जाड अशी लंगोटी घातली होती. याशिवाय त्याच्या अंगावर काही कपडा नव्हता. रामण्णा नेहमी डोळ्यांना काजळ लावीत असे. दामल्यांनी माझी ओळख करून दिली. रामण्णाने मला सांगितले, 'एक दिवसाआड एक दिवस अशी तुझी जेवणाची येथे सोय होईल. येथे टोकन (बिल्ला) ची भानगड नाही. आम्ही दहा बाराच्यावर माणसे घेत नाही. म्हणून तू सकाळी साडेपाचपर्यंत येथे येऊन आपले फुलपात्रे येथे ठेवून जायचे. तुला उशीर झाला तर तुझे भांडे मी ठेवून घेणार नाही.' मी त्याच्या सूचना कबूल केल्या.

होळकर वाड्यातील दहा दिवस संपल्यानंतर मी नाटुकोट्टाइ आणि त्रावणकोर या दोन्ही अन्नछत्रांतून जाऊ लागलो. त्रावणकोर छत्राच्या पाळीच्या दिवशी

ताईबाई मला सकाळी साडेचारच्या सुमारास उठवीत. ‘ अरे सेतू, केदार घाटावर भांडे ठेवून यायची वेळ झाली. ’ असे त्यांनी म्हटले की मी खडबडून जागा होई आणि निर्मनुष्य अशा गल्लीबोळातून जवळ जवळ धावतच दोन मैल अंतर कापून केदार घाटावर जाई. ‘ आलास ? ये, तुझ्या आधीच दहा ब्राह्मणांची भांडी येऊन पडली आहेत. थोडा उशीर झाला असता तर तुला आज जेवायला मिळाले नसते ’ असे रामण्णाचे उद्‌गार ऐकले की जीव खाली पडायचा.

नाटुकोट्टाइ छत्रात जेवण सढळ हातांनी वाढीत. उलट रामण्णा ब्राह्मणांना पोटभर जेवू देत नसे. याबाबतीत त्याने काही तंत्रे स्वीकारली होती. जेवायला पत्रावळीत पहिला भात वाढला की, तो संपविण्याच्या आतच वाढपी पोळ्या घेऊन येत. नको म्हटले की पुन्हा पोळ्या नशिबी येत नसत. म्हणून जेवणारी माणसे भात बाजूला सारून घाईघाईने पोळ्या घेत. बरे, पोळ्या तरी किती ? एकच्या वर नाही. दीड पोळी घातली तर शिकस्त. आणि ती पोळी तरी कशी ? किती पातळ म्हणावी, पोळीतून पाहिले की पलीकडचे दिसे असे म्हटले तर अतिशयोक्ती वाटू नये. बरे ही पोळी संपते न संपते तोच मागचा भात आलाच. मला वाटते दहा मिनिटांत जेवणे आटोपीत असावेत. मी हू की चू न करता खाली मान घालून जेवून घेत असे. मी जितक्या घाईने जेवी तितके रामण्णाला भारी कौतुक वाटे. तो म्हणे ‘ पहा पहा हा विद्यार्थी. विद्येच्यापुढे याला जेवणाचे तरी भान आहे काय ? नाही तर तुम्ही लोक, तास तासभर पानावर रेंगाळता ’ शेवटी एक ब्राह्मण त्याला म्हणाला, ‘ काय या विद्यार्थ्यांचे कौतुक चालविले आहे. त्याला श्वास घ्यायलाही तुम्ही अवकाश देत नाही. त्याने किती घाईने जेवावे आणि किती कमी खावे म्हणजे तुमचे समाधान होईल ? ’ मी काहीच बोललो नाही. रामण्णाने डोळे मोठे करून त्याच्याकडे पाहिले. ब्राह्मणांपैकी जास्त कोण जेवतात, इकडे रामण्णाचे बारीक लक्ष असे. त्यांची खोड मोडण्यास त्याच्यापाशी एक जालिम उपाय होता. अशी मंडळी आपली भांडी ठेवण्यास आली की तो म्हणे, ‘ अरेरे, आताच आजची संख्या पूर्ण झाली. आज तुम्हांला येथे जेवण मिळायचे नाही. ’ यातील रहस्य, ओळखणारी मंडळी ओळखीत आणि चटकन् वठणीवर येत.

रामण्णाच्या छत्रात जेवण दहापर्यंत उरकले जात असे. उलट नाटुकोट्टाईमधे जेवणी आटोपण्यास साडेअकरा-बारा तरी वाजत. माझे कॉलेज सुरू झाले, तेव्हा जेवणाच्या बाबतीत तारांबळ उडू लागली. कारण मी राहात होतो तेथून हिंदु युनिव्हर्सिटी चार मैल अंतरावर होती. कॉलेज अकराला सुरू होई. आणि मी कॉलेजला पायी जात असे. नाटुकोट्टाईमधे जेवून कॉलेज वेळेवर गाठणे शक्य

होईना. मी रामण्णाला म्हटले, 'रामण्णा, तुझ्या छत्रात मला रोज जेवू दे, म्हणजे दहाला जेवण आटोपून कॉलेजला वेळेवर जाता येईल.' रामण्णाने ते कबूल केले. यानंतर मी त्याला म्हणालो, 'रामण्णा, मी आता रोज आणि न चुकता येथे येत जाणार. मग सकाळी पाच वाजता येऊन भांडे ठेवण्याची भानगड कशाला ? ज्या दिवशी मला यायचे नाही त्या दिवशी पहाटे येऊन तुम्हांला सांगून जाईन.' रामण्णा या गोष्टीलाही कबूल झाला. त्यावेळी कॉलेज सुरू झाल्यावर मी नाट्टुकोट्टाइ छत्रात जाणे सोडून दिले. जुलै १९२६ पासून मी फक्त त्रावणकोरछत्रात जाऊ लागलो. एखादे दिवशी मला उशीर झाला तर रामण्णा माझे पान झाकून ठेवीत असे. माझ्याशी त्याने चांगुलपणा दाखविला, याची फेड म्हणून मी त्याला रोजचा दक्षिणेचा पैसा देऊन टाकी. आणि तो इतर ब्राह्मणांना सांगे 'पाहा पाहा, विद्या हस्तगत करण्याच्या छंदात याला पैशाचाही मोह राहिला नाही.' एकंदरीने रामण्णा हा लोकांना पोटभर जेवू देत नसे. त्याला पाहून मला 'ऑलिव्हर ट्विस्ट' मधल्या अनाथालयाच्या व्यवस्थापकाची आठवण होई.

रामण्णा हा वर्तनाने बराच सैल असावा. त्याला बायकापोरे आहेत की नाहीत, हा कोण, कुठला राहणारा, याचा धंदा काय, या गोष्टींची मी कधीच चौकशी केली नाही. पण याच्या बोलण्यात बायकांच्या गोष्टी नेहमी असत. हा व्याजबट्ट्याचाही धंदा करीत असावा. दुर्गा घाटावर जिजाबाई टिळक नावाची एक विधवा म्हातारी राहात असे. तिच्याकडे याची ये-जा होती. त्याच्या हातात मी काही कर्जरोखे, खरेदीखतेही पाहात असे. कधी कधी मला तो विचारी 'युद्ध सुरू झाले काय ?' मी म्हणे 'तुम्हांला युद्धाची काय घाई झाली आहे ?' तो म्हणे, 'युद्ध सुरू झाले की सोन्याचा भाव वाढतो.'

जेवणीखाणी होईपर्यंत रामण्णा नुसती लंगोटी घालून फिरे. क्वचित तो पंचा नेसे. पण क्वचितच. जेवणीखाणी आटोपल्यावर तो धोतर, बाराबंदी असा पोषाख करी. डोक्याला मात्र पेशवेकालातील किंवा सध्याच्या काळात नाटकातील भटजींच्याप्रमाणे कानटोपी असे. रामण्णाचे ध्यान पाहिले की, 'रूप पाहता लोचनी' असे म्हणावेसे वाटे.

अन्नछत्रात तऱ्हेतऱ्हेचे लोक जेवायला येत. बहुसंख्य लोक सज्जन पण गरजु असत. पण खुशालचेंडू, व्यसनी आणि निरुद्योगी माणसेही काही कमी नसत. मी शक्य तितका अशांचा सहवास टाळीत असे. पण काही झाले तरी थोडाबहुत संबंध आल्याशिवाय राहिला नाही. यांपैकी बहुतेक माणसे भांग पीत. बनारसला भांगेचे विलक्षण प्रस्थ आहे. दुकानातून घोटलेल्या भांगेचे गोळे

विकत मिळत. हौशी मंडळी घरी भांग घोटीत. त्यानंतर त्यात खडीसाखर बदाम पिस्ते, बर्फ इत्यादि घालून भांग पीत. वरील मंडळींत ज्याला पाहावे तो भांगेच्या तारेत धुंद असायचा. दोनचार वेळेला मीही भांग घेतली. अगदी हवेंत तरंगतो असे वाटे. आपण काहीही बोलून गेलो तर ते स्वप्नात बोलतो असे वाटे. हसू आले तर आवरता आवरत नसे. क्षुल्लक गोष्टीवरून अनिवार हसू लोटत असे. मी लवकरच भांगेचा नाद सोडला. पतनाची ही लक्षणे होत हे ओळखून मी वेळींच सावध झालो. माझ्या भोजनभावांत गांजेकसही थोडे-थोडके नव्हते. त्यांचे डोळे नेहमी लाल असत. विड्यांचे चेनस्मोकर तर विचारूच नका. ही मंडळी मला विडी ओढण्याचा आग्रह करीत. मी हसून टाळीत असे. मग बिडीसाठी म्हणून ती माणसे माझा दक्षिणेचा पैसा लाटीत. मला ते नेहमी म्हणत, ' अरे, कसला अभ्यास घेऊन बसला आहेस. सोडून दे सगळे आणि आमच्यात ये. आज हे अन्नछत्र, तर उद्या दुसरे, असे करीत आम्ही बनारसमध्ये जन्म काढला आहे. आम्हांला येथील छत्रांचे तंत्र पूर्णपणे माहीत आहे. तुला एकही दिवस उपवास करावा लागणार नाही. ' मी त्यांचे बोलणे उडवून लावी. माझ्या पाहण्यात कितीतरी विद्यार्थी बनारसला येऊन भटकलेले असे होते. माझ्या भोजनभावांपैकी अनेक चेहरे आठवणीत राहिले आहेत. त्यांपैकी एक म्हणजे दैनिक ' आज 'चे प्रसिद्ध संपादक पराडकर यांचा भाऊ. हा दिसायला किरकोळ होता. याचे वजन एकशेदहा बारा पौंडांपेक्षा अधिक नसावे. हा सारख्या विड्या ओढी. मी त्याला विचारले, ' अहो तुमचे बंधू एका सुप्रसिद्ध हिंदी दैनिकाचे संपादक आणि तुम्ही अन्नछत्रात कसे ? ' पराडकर तोंडातून विडीचा धूर सोडीत म्हणाले, ' तत्त्वासाठी. ' मी म्हटले, ' ते कोणते तत्त्व ? ' पुन्हा एकदा धूर सोडीत ते म्हणाले, ' आमच्या बंधूंनी पुनर्विवाह केला, ही गोष्ट आम्हांला पटली नाही म्हणून आम्ही त्यांचा आश्रय सोडला आणि अन्नछत्रात येऊ लागलो. ' जवळचे एक ब्राह्मण म्हणाले, ' नशीब हेच की, इतक्यावरच भागले. एका सुधारकांनी तर तीन सुधारणा एकदमच घडवून आणल्या. ' ते म्हणाले, ' अहो त्यांनी एका अस्पृश्य विधवेशी, ती रजस्वला असताना, पुनर्विवाह केला. पुनर्विवाह, तोहि आंतर-जातीय, आणि तोही ती रजस्वला असताना. तीन सुधारणा एकदमच झाल्या की नाही ! ' यावर जमलेल्या मंडळीत हशा पिकला. मी पराडकरांना विचारले, ' का हो ? आपण काय उद्योग करता ? ' यावर ते धूर सोडीत म्हणाले, ' या सुधारणांच्यामुळे मी जगाला विटलो. आता अन्नछत्रांत जेवायचे आणि कालक्रमणा करायची एवढेच ठरविले आहे. '

ग्वाल्हेरचे एक ब्राह्मण मला आठवतात. गांजाच्या सेवनामुळे त्यांचे डोळे सदा लाल असत. मी त्यांना विचारले, ‘आपण येथे कसे?’ ते म्हणाले, ‘नोकरीत वरिष्ठाशी भांडण झाले म्हणून इकडे निघून आलो. नोकरी म्हणजे कितीही करा, न केल्यासारखी; नो करी.’ आपल्या या विनोदावर खुश होऊन ते खदखदा हसत.

आता दामलेच घ्या. सहा महिन्यांत भांग आणि गांजा याच्या अतिसेवनाने हा मनुष्य वेडा झाला. यानेच माझी जेवणाची सोय लावून दिली. पण पुढे कचरापेट्यापाशी अन्नाची शिते निवडताना मी त्याला पाहिले. मुले दगड घेऊन त्याच्या मागे धावू लागली. मला अतिशय वाईट वाटे. मी म्हणे ‘दामले, हे काय मांडले आहे? अहो, शुद्धीवर या’ पण तो माझ्याकडे पाहून नुसता हसे.

बनारसला वेदशास्त्रसंपन्न अशी अनेक महाराष्ट्रीय घराणी आहेत. दामले, सोहनी, साठे अशी प्रतिष्ठित कुटुंबेही अनेक आहेत. वैदिक पंडितांशी माझा विशेष संबंध आला नाही. पण त्यांची टिंगल उडवून आचरट विनोद करणारी मंडळी मात्र मला भेटली. या विनोदाचा एक मासला पाहा.

आपल्याला सगळा ऋग्वेद मुखोद्गत आहे असा एका पंडितांना मोठा गर्व होता. एका वस्ताद ब्राह्मणाने त्यांना बनविण्याचे ठरविले. त्याने आपल्या घरातून ऋग्वेदाची एक मुद्रित आणि कव्हर घातलेली प्रत आणली. आणि पंडितांना म्हटले, ‘या ग्रंथातील कोणताही उतारा तुम्ही कुठे आला आहे हे सांगू शकाल काय?’ ‘निस्संशय,’ शास्त्रीबुवा म्हणाले. तो ब्राह्मण म्हणाला : या समोर ठेवलेल्या ग्रंथात एक उतारा आहे,

‘तताळमि थेये त्यापे च्याजाबा मयनिमोरहा’ तो कुठे आढळतो तो तुम्ही सांगू शकाल काय? शास्त्रीबुवा चाट पडले. त्यांना सगळा ऋग्वेद येत होता. पण वरील उतारा त्यांना आठवता आठवेना. बरे, त्याचा अर्थही त्यांच्या लक्षात येईना. शेवटी ते शरण आले आणि ब्राह्मणाला म्हणाले, ‘महाराज, माझे आज गर्वहरण झाले. आपणच तो उतारा काढून दाखवावा.’ तो ब्राह्मण हसला आणि म्हणाला, ‘वृथा अहंकार करू नये.’ असे म्हणून त्याने पुस्तक उघडले. पहिल्याच पानावर एका शाळकरी मुलाने खरडले होते.

‘हारमोनियम बाजाच्या पेट्या येथे मिळतात.’ तेंच वाक्य उलट वाचले की, ‘तताळमि थेये त्यापे च्याजाबा मयनिमोरहा’ असे होते. शास्त्रीबुवा म्हणाले, ‘हा काय इरसालपणा! हा उतारा वेदांत कुठे आहे?’ तो ब्राह्मण म्हणाला, ‘जास्त बोलू नका. मी विचारले होते, या समोर ठेवलेल्या पुस्तकातून उतारा कुठे आहे तो सांगा.’ शास्त्रीबुवा खजील झाले आणि तो बिलंदर ब्राह्मण तेथून

हसत हसत निघून गेला. खरे पाहता गांजकेस आणि भंगड ब्राह्मणांच्या सहवासात मला घसरण्यास वेळ लागला नसता. असे झाले असते तर मी अद्यापपर्यंत बनारसच्या गल्लीबोळातून वेड्यासारखा भटकत राहिलो असतो. पण अण्णासाहेब पाटणकरांच्या गंभीर आणि शिस्तप्रिय नजरेने मला सरळ मार्गापासून ढळू दिले नाही.

बनारसमधील माझी चार वर्षे म्हणजे माझ्या आयुष्यातील विलक्षण अनुभवाची वर्षे होती. बनारसच्या दोनअडीचशे घाटांवरून दिसणारा गंगेचा देखावा अवर्णनीय आहे. अस्सीघाट (तुळसीदासाचे निवासस्थान), हरिश्चंद्र घाट (स्मशान), चेतसिंग घाट (येथून वॉरन हेस्टिंग्सकालीन चेतसिंग गंगेत उडी टाकून नदीपार झाला), केदार घाट (प्रामुख्याने मद्रासकडील ब्राह्मणांची वस्ती), अहिल्याबाई घाट, दरभंगा घाट, दशाश्वमेध घाट (बंगाल्यांची वस्ती), मुन्शी घाट, (नागपूरच्या मुन्शी घराण्याने बांधलेला घाट), पंचगंगा घाट आणि बिंदुमाधवांचे देऊळ (उठोनिया प्रातःकाळी, वदनी वदा चंद्रमौळी, श्री बिंदुमाधवाजवळी, स्नान करा गंगेचे), दुर्गाघाट (महाराष्ट्रियांची वस्ती, बनारसमध्ये महाराष्ट्रीयांना दक्षिणी म्हणतात) आणि राजघाट हे प्रमुख घाट आहेत. गंगेवरून नावेतून जाताना पहाटेच्या वेळी घाटावरचे दृश्य विसरणे अशक्य आहे. उत्तरेत म्हणच आहे, बनारसची पहाट, अयोध्याप्रांताची संध्या, आणि बुंदेलखंडातील रात्री, सुबह बनारस, शामे अवध, शबे बुंदेलखंड. दुसरीही एक गमतीची म्हण आहे, काशीत घाटाच्या पायऱ्या, ठिकठिकाणी आढळून येणारे बैल आणि जेथे पहावे तेथे संन्याशी, या तिघांच्या कचाट्यातून जो सुटला तो मुक्त समजावा. सांड, सीढी, संन्याशी, ये तीन जो पार करे तो मुक्त होवे काशी. बनारसचे रस्ते नेहमी गजबजलेले असत. अरुंद गल्ल्या आणि गल्ल्यांच्या दोन्ही बाजूंना पाच पाच सहा सहा मजली जुने वाडे शेकडोंनी आढळून येत. विश्वेश्वराची गल्ली, कचौरी गल्ली, ठठेहरी बाजार, बास का फाटक, कमच्छा. टाऊन हाल, कबीर चौराहा, दालमंडी (वेश्यावस्ती) दुर्गाकुंड, अशी किती स्थळे सांगावीत. आणि देवळे तरी किती, कंकर (खडा) कंकर शिवशंकर असे काशीचे वर्णन आहे. काशीविश्वनाथ, अन्नपूर्णा, धुंडीराज, बिंदुमाधव, काळभैरव, दुर्गा अशी प्रख्यात देवळे काशीला आहेत. या चार वर्षांत मी काशीचा कणन् कण आत्मसात केला. आणि गंगामाईवर तर चार वर्षे मीं (पावसाळा सोडला तर) रोज पोहायला जात असे. उन्हाळ्यात तर सकाळसंध्याकाळ असे दोनदा पोहत असे. केदार घाटावर गंगेत उडी घ्यावी आणि पोहतपोहत दशाश्वमेधाला लागावे, उन्हाळ्यात गंगा पार करावी

असे कित्येकदा तरी होई. घड्याळ लावून मी पाहिले आहे. मला गंगा पार करण्यास सतरा मिनिटे लागत. पोहण्याच्या वेळी सगळ्या चिंता, काळज्या नाहीशा होत. मनाला विलक्षण सुख वाटे, इतका मी गंगेशी तादात्म्य पावलो होतो. आज माझ्या अंगात रक्ताच्या ऐवजी नसानसातून गंगा वाहते आहे असे मी म्हटले तर ती केवळ काव्यकल्पना वाटू नये.

बनारसला पोहोचल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच मी अण्णासाहेब पाटण-करांच्या ग्रंथसंग्रहातील पुस्तके वाचण्याचा सपाटा सुरू केला. गीतारहस्य, लोकमान्यांचे आर्क्टिक होम इन दि वेदाज, चिपळूणकरांची निबंधमाला, राजवाड्यांचे ग्रंथ, चिंतामणराव वैद्यांचे महाभारत, रामायण यांवरील ग्रंथ, इंग्रजी ग्रंथ, महाभारत ए क्रिटिझिजम, दि रिडल ऑफ दि रामायण, एपिक इंडिया, असे ग्रंथ वाचलेले आठवतात. पाटणकरांना माझ्या व्यासंगाचे मोठे कौतुक वाटू लागले. पण हे सगळे वाचनाचे झाले. माझे मराठी लेखन अगदीच अशुद्ध होते. शाळेत मी मराठी कधीच शिकलो नाही. व्याकरण कशाशी खातात हे मला माहीत नव्हते. हैदराबादेत निजाम कॉलेजमध्ये मी मराठी हा विषय घेतला होता. पण सहामाहीत मला शंभरापैकी सत्तावीस मार्क्स पडल्यामुळे मी हादरून गेलो होतो. ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, जोडाक्षरे, काना-मात्रा या सर्वच बाबतीत मी अनभिज्ञ होतो, फार काय मराठी पुस्तकातील मुद्रणदोषही माझ्या तोंडात बसले होते. उदाहरणार्थ घर्मबिंदूला मी धर्मबिंदू म्हणे, कपाळ आणि कपोल या दोन्ही शब्दांतील फरक बरेच दिवस माझ्या लक्षात आला नाही, मुंगी साखरेचा रवा असा कोणी विनोद केला की मला खरेच वाटे की मुंगी आणि साखर मिळवून रवा तयार करतात, ‘ कुणी केली बाळा दुधाची उत्पत्ती वाढवी श्रीपती स्तने दोन्ही ’ हीच ओळ खरी असावी असे मी समजत होतो. एकसमयावच्छेदेकरून, सकृत्दर्शनी, प्रकृत स्थळी, उपरिनिर्दिष्ट, निम्नलिखित, अधोरेखित हे शब्द तर माझ्या डोक्यावरून जात. अमका शब्द पुल्लिंगी आहे का स्त्रीलिंगी आहे हे कळले नाही की मी सरळ नपुंसकलिंगी समजून वापरीत असे. उदाहरणार्थ ते खोली, ते पोपट. अनुस्वार कोठे द्यावेत आणि कोठे नाही हे मला मुळीच समजत नसे.

एकदा पाटणकरांच्याकडे भटांचा ‘ महाराष्ट्रधर्म ’ हा ग्रंथ अभिप्रायार्थ आला होता. माझे मराठी चांगले असेल या समजुतीने पाटणकरांनी मला आपला अभिप्राय उतरून घेण्यास सांगितले. मी मनातून चरकलो. पण नाइलाज म्हणून ते सांगत तसा अभिप्राय लिहू लागलो. लिहून झाल्यावर त्यांनी अभिप्राय वाचला. त्यातील शब्दाशब्दागणिक चुका पाहून ते अस्वस्थ झाले. ते काहीच बोलले

नाहीत. ते इतकेच म्हणाले, ' अरे, काय रे तुझे लेखन ? असेच का तू यापुढे लिहीत जाणार आहेस ? ' मला अगदीच ओशाळल्यासारखे झाले. बरे, मराठी नीट लिहिण्याला आणि बोलण्यास शिकवा असे कुणाला सांगावे ? हिंदु युनिव्हर्सिटीत इंटर आणि बी. ए. ला व्हर्नाक्युलर कंपोजिशन म्हणून एक भाषाविषय शंभर मार्कांचा ठेवीत. मराठी हा विषय अण्णासाहेब पाटणकर शिकवीत. एकदा मला वाटले की आपण उर्दू हा विषय घ्यावा. पण नंतर वाटले की कामापुरते तरी आपल्याला मराठी आले पाहिजे. साध्या पत्रातून शुद्धलेखनाच्या चुका होऊ लागल्या तर पुढे आपले हसे होईल. त्यापेक्षा कॉलेजमध्ये मराठी घेऊन कसेबसे पास होण्याच्या प्रयत्नाला लागावे.

औरंगजेबाने विश्वनाथाचे देऊळ पाडून त्या जागेवर प्रचंड मशीद बांधली. मशिदीजवळच मध्ये सात आठ फुटांचा बोळ सोडून, बनारसचे नगर वाचनालय आहे. त्याचे नाव कार्माइकेल लायब्ररी. हे वाचनालय समृद्ध आहे. चार वर्षेपर्यंत मी या वाचनालयाचा सभासद होतो. या ग्रंथालयातील शेकडो पुस्तके मी वाचून काढली आहेत. ग्रंथालयात कितीतरी वर्तमानपत्र आणि नियतकालिके येत. मी रोज रात्री साडेआठपर्यंत वाचनालयात बसून वर्तमानपत्रे, नियतकालिके वाचीत असे. लीडर, पायोनियर, स्टेटस्मन, फॉर्वर्ड, मॉडर्नरिव्ह्यू, श्रद्धानंदांचे लिबरेटर, यंग इंडिया, असे माझे सतत वाचन चालू असे.

कार्माईकेल लायब्ररीत पुण्याचा केसरी येत असे. आपले शुद्धलेखन सुधारण्यासाठी मी नेमाने केसरी वाचू लागलो. केसरीत जसे लिहिले जाते तसे आपण लिहावे. ते असे का याची चिकित्सा करण्याच्या भानगडीत पडू नये, असे मी ठरविले. ' कांहीं ' या शब्दात का आणि ही या दोन्ही अक्षरांवर अनुस्वार देतात. का देतात याचा विचार केला नाही. ' नाहीं ' मधील हीं वर अनुस्वार का, विचार करायचा नाही. आपणही असेच अनुस्वार द्यायचे. लौकिक, पारमार्थिक, आध्यात्मिक यांतील कि, र्थि, त्मि ही ऱ्हस्व का तर केसरीत आहेत म्हणून, उलट राजकीय मधे की दीर्घ का, तोही केसरीत आहे म्हणून. जास्त विचार न करता आपणही तसेच करावे. केसरीचा काळजीपूर्वक अभ्यास करून मी मराठी लिहिण्यास शिकलो असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे ठरू नये. कॉलेजमधील मराठी मित्रांच्यामुळे माझ्या तोंडातून ते खोली, ते पोपट, हे बघलेस काय असे शब्द येईनासे झाले. पुढील चार वर्षांत माझे मराठी लेखन बरेच सुधारले असले पाहिजे. बी. ए.च्या पदवी परीक्षेत मला मराठीत—आणि तेही परीक्षक श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर यांच्या हातून शंभरपैकी चौऱ्याऐंशी मार्क पडले, हे एक त्याचे प्रमाण म्हणता येईल.

घरून वडिलांनी प्रवेशफीसाठी व इतर खर्चासाठी थोडेबहुत पैसे पाठविले होते, मी ते पैसे जपून खर्च करीत असे. रात्रीच्या खाण्यासाठी मी विश्वनाथच्या गल्लीच्या तोंडाशी असलेल्या दुकानातून दोन आण्यांच्या चार पुऱ्या आणि भोपळ्याची भाजी घेऊन खात असे. एकादशीला अन्नछत्रे बंद असत अशा वेळी दुपारी घरी काही तरी करून खावे लागे. एक दिवस मी आणि ताईबाई असे दोघे बाजारात जाऊन शेगडी, भाताचे भांडे, ताट, पोळपाटलाटणे, चमचे, चिमटे, वाट्या इत्यादि जिन्नस घेऊन आलो. भात शिजविणे अवघड नव्हते. पण पोळ्या मला जमत नसत. माझे पोळ्याचे आकार पाहून अण्णासाहेब हसून म्हणत, ‘ अरे, तुझ्या पोळ्या म्हणजे निरनिराळ्या देशाचे भूगोल वाटतात. एक पोळी आस्ट्रेलिया, तर दुसरी पोळी हिंदुस्थान असा प्रकार दिसतो. ’ पाटणकरांच्याकडे मला जन्मभर पुरेल असे ज्ञानदान मिळाले. पण मला अन्न-दान मिळाले त्याचे पुण्य इतर महाभागांच्या खाती जमा झाले आहे. पाटणकर इंदूरला निघून गेल्यानंतर माझा स्वयंपाक करण्याचा कार्यक्रम चालू राहिला. या बाबतीत आमचे निरनिराळे प्रयोग चालू असत. शिरा करून खाणे चटकन जमले. चहाकॉफीही जमे. वरण कसबसे जमे. भाजी कधी नीट झाल्याचे मला आठवत नाही. सुंदराबाईंनी एकदा भजी करून दिली होती. रोज एक एक दोन दोन भजी खावी या हेतूने मी ती डब्यात बंद करून ठेवली. भजी खराब होतात हे मला माहीत नव्हते. दोन तीन दिवसांतच त्यांवर बुरा चढला, हे पाहून ती फेकून द्यावी लागली.

पाटणकर इंदूरला निघून गेल्यानंतर मी एकटाच होतो त्या वेळची गोष्ट. बरेच दिवस मला दिव्याचा कंदील विकत घेणे जमले नव्हते. त्यामुळे मी रात्रीचे वाचन करीत नसे. संध्याकाळीं कार्माइकेल लायब्ररीत जावे, साडेआठपर्यंत तेथे वाचन करावे. वाचनालय बंद झाल्यावरच तेथून निघावे. विश्वनाथाचे दर्शन घ्यावे आणि गल्लीच्या तोंडाशी असलेल्या फराळाच्या दुकानातून दोन आण्यांच्या पुऱ्या आणि भोपळ्याची भाजी घेऊन खावी. नंतर गंगेवर जाऊन दहा वाजेपर्यंत बसावे आणि घरी परत आल्यावर अंधारात चाचपडत आपल्या खोलीत शिरून झोपी जावे असा माझा कार्यक्रम होता. खोलीत दिवा नसेच. एकदा सुंदराबाईंनीं मला पंधरावीस पापड दिले होते. मधून मधून मी ते भाजून खात असे. उरलेले पापड मी झोपत होतो त्या जागेच्या वर असलेल्या कोनाड्यात ठेवीत असे.

एके रात्री मी झोपलो असता कोनाड्यात दोन उंदीर घुसले आणि पापडा-साठी भांडू लागले. मला जाग आली. खोलीत अंधार असल्यामुळे हे काय चालले आहे हे मला समजेना. इतक्यात ते दोन्ही उंदीर भांडत-भांडत पापडांसहित

माझ्या अंगावर कोसळले. मी घाबरून उठण्याच्या आत एका उंदराने माझ्या उजव्या कानाचा कडकडून चावा घेतला. उंदीर पळून गेले. आणि माझ्या अंगावर पापडाचे तुकडे विखुरले. पुढे दोन तीन दिवस उंदराच्या विषबाधेच्या भीतीने मी अस्वस्थ होतो. आज ह्या गोष्टीला चाळीस वर्षे झाली. पण उंदराने कानावर केलेला व्रण अद्याप आहे. आपल्या कष्टाच्या दिवसांची आठवण म्हणून तो व्रण मला कर्णकुंडलापेक्षाही अधिक मोलाचा वाटतो.

अण्णासाहेब पाटणकरांनी मला संस्कृत शिकविण्याचे ठरविले. काशीला तळवळकर नावाचे एक गृहस्थ संस्कृत पुस्तकांचे विक्रीचे दुकान चालवीत. अण्णासाहेब एक दिवस मला तेथे घेऊन गेले. रामचंद्रिका, अष्टाध्यायी, अमरकोश, आणि धातुपाठावलि ही पुस्तके आम्ही घेऊन आलो. अण्णासाहेब मला रोज सकाळी साडेचार पाचच्या सुमारास उठवीत. आणि तासभर मला संस्कृत शिकवीत. हा क्रम जवळजवळ पाच सहा महिने चालला. पुढे ते आजारी पडून, इंदूरला गेले आणि आमचे संस्कृतचे शिक्षण बंद पडले. अण्णासाहेबांनी मला जे काही संस्कृत शिकविले त्यापैकी फार थोडे माझ्यापाशी शिल्लक राहिले. रामः रामौ, रामाः घोकणे अवघड नव्हते. पण व्याकरणाचा मी धसकाच घेतला. आज चाळीस वर्षांनंतर गांकुटादिभ्यो यङ्णित हे एकच सूत्र माझ्या लक्षात राहिले आहे. ‘ येन धौता गिरीः पुंसा विमलैः शब्दवारिभिः ’ ही एक ओळ आठवते. बाकी सारे काही गंगेला जाऊन मिळाले. अण्णासाहेबांनी माझ्याकडून सगळे अध्यात्मरामायण वाचून घेतले. त्यांचे धर्मसंगति पाक्षिक संस्कृतमध्ये निघत असे. तेही मी नेमाने वाचीत असे.

माझे संस्कृतचे शिक्षण तुटपुंजे झाले तरी अण्णासाहेबांच्या सहवासाने मला संस्कृत साहित्याबद्दल विलक्षण गोडी निर्माण झाली, हा एक मोठाच लाभ मला झाला. निजामराज्यातील वातावरणात संस्कृतला काहीच स्थान नव्हते. सरकार दरबारी जेथे मराठी, तेलुगू कानडी या देशी भाषांना कोणी विचारीत नव्हते तेथे संस्कृतकडे कोण लक्ष देणार ? आम्ही तर संस्कृत म्हणजे पुराणिकांची भाषा असे समजत होतो. घरच्या वातावरणामुळे माझ्या कानावरून थोडेबहुत संस्कृत गेले असावे इतकेच म्हणता येईल. बाकी जिकडे पाहावे तिकडे उर्दू आणि फारशी या भाषांचा बोलबालाच जास्त.

पण आण्णासाहेबांच्या सहवासाने संस्कृत साहित्याचे महत्त्व मनावर बिंबले ते कायमचेच. अण्णासाहेब इंदूरला गेल्यानंतर पुढील तीन चार वर्षांत मी संस्कृत साहित्याची जितकी माहिती करून घेता येणे शक्य आहे तितकी ती करून घेतली. मॅक्डोनाल्ड, ए. बी. कीथ यांनी लिहिलेले संस्कृत साहित्याचे

इतिहास हे मी वाचून काढले. कालिदास, भवभूति, विशाखदत्त, भट्टनारायण, भास यांची नाटके, कालिदासाचे मेघदूत, ऋतुसंहार, माघाचे शिशुपालवध इत्यादि ग्रंथ काही मुळातून तर काही इंग्रजी, मराठी किंवा हिंदी अनुवादातून मी वाचून काढले. संस्कृत काव्याच्या नादमधुर रचनेने तर मी भारावून गेलो. मेघदूतातील कितीतरी श्लोक मला तोंडपाठ झाले होते. अजूनही. तन्वीश्यामा, उत्संगेवा मलिनवसने, त्वामारूढम्, मंदमंद नुदति पवनाश्चानुकूलो, इत्यादी श्लोक आपल्याशीच गुणगुणताना मला विलक्षण आनंद वाटतो. कितीतरी संस्कृत श्लोकाचे उतारे मी आपल्या वहीत टिपून ठेवले होते. मिराशींचा कालिदास हा तर माझा आवडता ग्रंथ होता. संस्कृत साहित्याचा व्यासंग हा माझ्या जीवनाचा एक भाग झाला आहे. माझ्या अत्यंत आवडीचे संस्कृत नाटक म्हणजे भवभूतीचे उत्तररामचरित्र हे होय. त्याची मी मुळातून बारापंधरा तरी पारायणे केली असतील. ऋग्वेदाचे मराठी भाषांतर (चित्रावकृत), उपाध्यायांचे इंडिया इन कालिदास, वाटव्यांचे संस्कृत काव्याचे पंचप्राण, जयदेवाचे गीतगोविंद, जगन्नाथपंडिताचा रसगंगाधर, डॉ. राघवन यांनी संपादलेली शृंगारमंजरी, असे एक की दोन कितीतरी ग्रंथ माझ्या वाचनात आले आहेत. संस्कृत साहित्यिकांची चरित्रे वाचणे, त्यांचे स्थळ काळ ठरविणे हा माझा एक आवडीचा छंद आहे. भारतातील प्रत्येक प्रांतातून अखिल भारतीय कीर्तीचे संस्कृत पंडित होऊन गेले. पाणिनी हा पेशावरचा, आनंदवर्धन, मम्मट, कल्हण, बिल्हण, सारंगधर हे काश्मीरचे, व्यासांचा आश्रम पंजाबात, वाल्मीकी, अश्वघोष, हर्षवर्धन, नैषधाचा कर्ता हर्ष, हे उत्तर प्रदेशाचे, बाणभट्ट, भास, विशाखदत्त हे बिहारचे, जयदेव आणि भट्ट नारायण हे बंगालचे, कालिदास हा मध्यभारताचा, ब्रह्मगुप्त राजस्थानचा, माघ गुजरातचा, भवभूति महाराष्ट्राचा, जगन्नाथ पंडित, निंबार्क, वल्लभाचार्य, आंध्राचे, जयतीर्थ, वादीराज हे कर्नाटकचे, दंडि आणि भारवि हे तामिळनाडचे, आर्यभट्ट आणि शंकराचार्य, हे केरळाचे, असा हा संस्कृतचा भरजरी पट विणलेला आहे. आता तर मुंबईला ब्राह्मणसभेची संस्कृत नाटके पाहून मी तृप्त झालो आहे. माझ्या या संस्कृतबद्दलच्या गोडीचे मूळ आण्णासाहेब पाटणकरांच्या सहवासात आहे. त्यांचा सहवास नसता तर आम्ही उर्दू आणि फारसीचे मौलवी झालो असतो आणि भारतीय संस्कृतीच्या एका उज्ज्वल आणि देदीप्यमान पैलूला कायमचे मुकलो असतो.

हिंदू युनिव्हर्सिटी नऊ जुलैला उघडत होती. त्यापूर्वी मी युनिव्हर्सिटीच्या आवारात जाऊन इमारती पाहून आलो. इतक्या सुंदर आणि भव्य इमारती मला इतरत्र कोठेच आढळल्या नाहीत. युनिव्हर्सिटीचे आवार सहा ते सात

चौरस मैलांचे आहे. आर्ट्स् कॉलेज, सायन्स कॉलेज, इंजिनियरिंग कॉलेज, वसतिगृहे, उद्याने, प्राध्यापकांचे बंगले अशा किती म्हणून इमारती सांगाव्या ? मात्र आम्ही राहात होतो तेथून युनिव्हर्सिटी पाच मैलांच्या अंतरावर होती. मला रोज दहा मैल चालावे लागत असे.

नऊ जुलै १९२६ हा आमच्या कॉलेजचा पहिला दिवस. प्रवेशफीपुरते पैसे माझ्यापाशी जमले होते. मी आर्ट्स कॉलेजात जाऊन फॉर्म घेतला. आणि फीचे पैसे भरले. माझ्याबरोबर एक मुलगा फॉर्म भरीत होता. त्याचा फॉर्म भरून झाल्यावर आम्ही दोघेही कॉलेजातून बाहेर पडलो. युनिव्हर्सिटीला लागूनच बनारसच्या शेवटच्या टोकावर एक मोहल्ला आहे. त्याला लंका म्हणतात. तेथे तो विद्यार्थी एक खोली घेऊन राहात होता. तो बिहार प्रांताचा होता. आपल्याला पुढील शिक्षणासाठी बिर्ला स्कॉलरशिप मिळेल अशी त्याची अपेक्षा होती. आम्ही बोलत बोलत त्याच्या आळीपाशी आलो. बनारसचा उन्हाळा अतिशय कडक. सकाळ झाली आणि सूर्योदय झाला की अंगावर उष्णतेने लहान लहान पुरळे उठल्याप्रमाणे होत. अंगावर दिवसरात्र घामाच्या धारा चालत. उन्हाळ्यात दुपारी रस्त्यावरून चालता चालता उन्हाची झळ लागून मेली अशी दोन चार माणसे मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली आहेत. मला अतिशय तहान लागली. मी त्या विद्यार्थ्याला म्हटले, 'अरे मला अतिशय तहान लागली आहे. चल तुझ्या खोलीवर जाऊन पाणी पिऊ. तो का कू करू लागला. तो म्हणाला, 'अरे माझी खोली लहान आहे. पाण्याला माझ्यापाशी तपेले नाहीं. मातीचे मडके आहे.' मी म्हटले, 'मला त्याच्याशी काय करायचे आहे. मला तहान लागली आहे. मला फक्त पाणी हवे आहे.' तो अस्वस्थ दिसला. आम्ही त्याच्या खोलीवर गेलो. खोली लहान होती. एक खाटले, आणि काही गाडगी-मडकी इतकेच सामान खोलीत होते. माझ्या हाती पाण्याचे भांडे देत तो विद्यार्थी म्हणाला, 'मला तुला फसवायचे नाही. तू ब्राह्मण आहेस; मी अस्पृश्य समाजाचा आहे. म्हणून मी का कू करीत होतो.' मी एक क्षणाचाही विचार न करता म्हटले, 'अरे, मला तो विचारही शिवला नाही. कसले स्पृश्य आणि अस्पृश्य' असे म्हणून मी पाणी प्यालो. त्या दिवसापासून माझी आणि त्या विद्यार्थ्याची मैत्री जमली. पुढे दोन वर्षे आम्ही एकाच बाकावर बसत होतो. इंटर झाल्यावर पुढील शिक्षणासाठी तो पाटण्याला गेला. त्यानंतर त्याची आणि माझी आजपर्यंत भेट झाली नाही. तो विद्यार्थी म्हणजे आजचे केंद्रीय अन्नमंत्री जगजीवनराम हे होत.

इंटरमध्ये मी इतिहास हा विषय घेतला होता. वर्ग मोठा असे. तेथेच

बिहारचा एक व्यायामपटू विद्यार्थी बसत असे. शिक्षणात त्याचे विशेष लक्ष नसे. पण व्यायामाचा त्याला मोठा शोक होता. जगजीवनरामशी माझी मैत्री झाली तशी आणि तितकी त्या विद्यर्थ्याशी झाली नाही. तरी पण जवळजवळ बसत असल्यामुळे आमची चांगलीच ओळख झाली होती. हा व्यायामटू विद्यार्थी पुढेपुढे सुप्रसिद्ध मल्ल, प्रोफेसर राममूर्ति यांच्या नादी लागला. हा माझा वर्गबंधू म्हणजे बिहारचे माजी मुख्य मंत्री महामाया प्रसादसिंह हे होत.

कॉलेजमध्ये प्रवेश मिळविल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मी पंडित मदनमोहन मालवीय यांना पाहिले. गौरवर्ण, पांढराशुभ्र अंगरखा, डोक्याला त्यांची विशिष्ट प्रकारची पगडी, गळ्याभोवती लांब उपरणे, कपाळाला गंध असे त्यांचे पवित्र, सौम्य आणि सोज्वळ व्यक्तित्व माझ्या मनावर कायमचे ठसले. मालवीयजींशी प्रत्यक्ष बोलण्याचा असा प्रसंग मला कधीच आला नाही. पण मी त्यांची धार्मिक प्रवचने ऐकली, गंगेच्या काठावर उघड्या अंगाने अस्पृश्यांना गुरूपदेश देताना पाहिले, विद्यापीठातील दीक्षान्त भाषणे ऐकली, आणि त्यांची अनेक व्याख्याने ऐकण्याचा योग मला लाभला. मालवीयजींचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न होते त्यांच्या चेहऱ्यावरचे पावित्र्य इतके विलोभनीय की त्यांच्याकडे सारखे पाहात राहावेसे वाटे. इंग्रजी, उर्दू आणि हिंदी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व असामान्य होते. एका दीक्षान्त समारंभात त्यांनी सतत सहा तासपर्यंत इंग्रजीत अस्खलित असे भाषण केले. त्यांचे हिंदी वक्तृत्वही असेच अमोघ असे. बनारसला ते भाषण करीत तेव्हा ते हिंदीत संस्कृत शब्दांची रेलचेल करीत. उलट अलाहाबादला भाषण करताना ते संस्कृतोद्भव आणि फारसीतून आलेले शब्द दोन्ही वापरीत. बनारसहून जो जो पश्चिमेकडे जावे तसे तसे अलाहाबाद, कानपूर, लखनौ, अलीगड, मीरठ, सहारणपूर, दिल्ली, या स्थळी लोकांच्या बोलण्यात फारसीतून आलेले शब्द अधिक प्रमाणात येऊ लागतात. मालवीयजी आपल्या समोरील श्रोते पाहून आपली भाषा वापरीत. उदाहरणार्थ, अलाहाबादच्या हिंदू मुस्लिम श्रोत्यांसमोर बोलताना ते म्हणत, ‘ जनाबसदर अध्यक्ष महोदय, हम भगवान के आभारी है, खुदा का शुक्रिया है, सदस्योंकी इस सभामें, अरकान की इस मजलिस में मैं, इस प्रस्ताव का समर्थन करता हूं, इस तहरीक की तायीद करता हूं. ’ बनारसच्या हिंदी भाषिकांना फारसी शब्द विशेष परिचित नाहींत. त्यामुळे मालवीयजी बनारसला अस्खलित हिंदीत बोलत आणि दिल्लीला अस्खलित उर्दूत बोलत.

माझा अभ्यास उर्दू फारसीत झाला होता. दीमध्ये काही साहित्य असेल असे मला तोपर्यंत वाटले नव्हते. फार तर हिंदीमध्ये बृज भाषेतील अगर

अवधी भाषेतील काव्ये असावीत असे मला कबीर, मीराबाई, तुळसीदास, सूरदास यांच्या रचना पाहून किंवा ऐकून वाटत असे. हैद्राबादकडे हिंदीची टिंगल उडवीत. भला हिंदी भी कोई जबान है–हिंदी ही काय भाषा आहे. अशा शब्दांत हिंदीची टर उडविण्यात येई. मला वाटे फारशी लिपीत लिहिली जाणारी उर्दू ही खरी भाषा. ती देवनागरीत लिहून तिला हिंदी हे नाव देणे यात काही राजकीय लबाडी आहे. उत्तर प्रदेशात एके काळी हिंदी उर्दू वादाने केवढे उग्र स्वरूप धारण केले होते याची मला कल्पना देखील नव्हती. उत्तर प्रदेशात सुरवातीला सुशिक्षित हिंदू-मुसलमान फारसी लिपी आणि उर्दू भाषा वापरीत. पण शिक्षणाचा प्रसार होऊ लागला तसा बहुसंख्य हिंदू समाज देवनागरीकडे वळला, सर सय्यद अहमदसारख्या मुसलमान पुढाऱ्यांनी अकांडतांडव केले की देवनागरीतून ही भाषा लिहाल तर जातीय वैमनस्य निर्माण होईल. पण हिंदी भाषिकांनी आपली चळवळ चालू ठेवली. हिंदीतील हजारो हस्तलिखितांचा संग्रह काशीच्या नागरी प्रचारिणी सभेत जमविला. हिंदी गद्य आणि पद्य यांची परंपरा उर्दूपेक्षाही किती प्राचीन आहे हे दाखवून दिले आणि शिक्षण प्रसाराबरोबरच देवनागरी लिपीचा वापर हा किती आवश्यक आहे हे दाखवून दिले. जुने हिंदी गद्य आणि पद्य ही अवधी, बृज, राजस्थानी इत्यादि बोलभाषांतून असत. आधुनिक हिंदी गद्य आणि पद्य या दोन्ही प्रकारांतून उर्दू शैलीप्रमाणे पण देवनागरीत लोक लिहू लागले. यालाच हिंदीमध्ये खडी बोली म्हणतात. म्हणजे उर्दूत फारसी शब्द अधिक तर हिंदीत संस्कृत अगर बोलभाषा यातील शब्द अधिक इतकाच फरक या दोन्ही भाषांत राहिला. पण हिंदीत फारसी आणि संस्कृतोद्भव अशा दोन्ही प्रकारच्या शब्दांचा सढळ वापर संमत असे. कोणी किती फारसी शब्द वापरावेत आणि किती संस्कृतोद्भव वापरावेत यावर निर्बंध नसे. लेखक कोणत्या वातावरणातून पुढे आला यावर ते अवलंबून असे. उदाहरणार्थ, राजेंद्रप्रसादांच्या आत्मचरित्रात किंवा मुन्शी प्रेमचंद यांच्या कादंबऱ्यात आपल्याला शेकडो फारसी शब्द आढळतात. उलट पुरुषोत्तमदास टंडन यांच्या लिखाणात हे प्रमाण अत्यल्प आहे.

मी बनारसला गेलो तेव्हा हिंदीचा प्रसार पाहून थक्क होऊन गेलो. काशी नागरी प्रचारिणी सभा या संस्थेतील हजारो हिंदी ग्रंथ पाहून तर माझे डोळे उघडले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीत हिंदी एम. ए. पर्यंत असे. पीएच. डीला हिंदी साहित्यावर प्रबंध लिहिले जात. इतकेच नव्हे तर उदू काव्य देवनागरीत छापून त्याचा अभ्यास एम.ए.त करण्यात येई. आता तर उर्दूला स्वतंत्र भाषा न समजता हिंदी की उर्दू शैली असे म्हणू लागले आहेत. कालाय तस्मै नमः।

मला हिंदी भाषेचा सराव अगदी अल्प काळात झाला. मालवीयजींच्या पद्धतीचा मी अंगीकार केला. फारसीऐवजी संस्कृत शब्द घातला की झाली हिंदी ! मुआफ कीजिये म्हटले की उर्दू. क्षमा कीजिये म्हटले की हिंदी. तकलीफ, कष्ट, सुहूलत, सुविधा, करारदाद, प्रस्ताव, ताईद, समर्थन, मजलिस, सभा, एतराज, आपत्ति, शुक्रिया, धन्यवाद असे हिंदी उर्दू शब्द वापरण्यात मी सराईत झालो. मला वाटते मालवीयजींचे वक्तृत्व पाहून मला त्या कलेचा ओढा लागला असावा.

युनिव्हर्सिटीचे प्रोव्हाइसचान्सेलर आनंदशंकर बापूभाई ध्रुव हे विद्वान गृहस्थ होते. त्यांचे संस्कृत, तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृती या विषयांवर विलक्षण प्रभुत्व होते. इंटरला मी इंग्रजी, इतिहास, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र आणि मराठी हे विषय घेतले होते; मराठी, पाटणकर शिकवीत. आम्हांला रागिणी कादंबरी अभ्यासाला लावली होती. मला ती कादंबरी अतिशय आवडे. उत्तरा आणि रागिणी या नायिकांचे चित्रण वामन मल्हारांनी फार बहारीचे केले आहे. मला तर नेहमी वाटे की आपल्याला बायको मिळावी ती रागिणीसारखी.

इंग्रजी विभागाचे प्रमुख शेषाद्री हे होते. हे इंग्रजीचे गाढे विद्वान समजले जात. ते काहीसे रंगेल होते असा त्यांच्याबद्दल गवगवा होता. आमचा आणि त्यांचा संबंध आला नाही. इंग्रजी प्राध्यापकांत याज्ञिक, श्यामनारायणलाल, व्यंकटेश नारायण तिवारी आणि सहानी हे होते. ही मंडळी मेहनतीने शिकवीत. श्यामनारायणलाल यांना देखणी पोरे आवडतात असा लौकिक होता. आमचा एक वर्गबंधू निगम याचे त्यांच्याकडे बरेच जाणे-येणे असे. यावरून आम्ही त्याची बरीच थट्टा करीत असू. तर्कशास्त्र डॉक्टर आत्रेय हे शिकवीत. डिडक्टिव लॉजिक ते छान शिकवीत. त्यामुळे माझा तो विषय सुधारला. पण इंडक्टिव लॉजिक ते मनःपूर्वक शिकवीत नसत. त्यामुळे माझा तो विषय कच्चा राहिला. अर्थशास्त्र शिकविण्याचे काम प्रोफेसर सिपाही मलानी सिंधी आणि मुजुमदार या गुजराती प्राध्यापकांकडे असे.

प्राचीन इतिहासाचे प्रमुख डॉक्टर अनंत सदाशिव आळतेकर हे होते, त्यांच्यामुळे भारताच्या प्राचीन इतिहासाची आणि संस्कृतीची मला गोडी लागली. इतिहास विभागाचे प्रमुख श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर हे होते. केदारनाथ भट्टाचार्य हे भारताचा आधुनिक इतिहास शिकवीत.

इंग्रजी पाठ्यक्रमात आम्हांला अव्हीबरीचे प्लेजर्स ऑफ लाइफ, कीटसचे इव्ह ऑफ सेंट एग्नस, मॅथ्यू अर्नाल्डचे सुहराब आणि रुस्तम, आणि पाल्ग्रेवच्या गोल्डन ट्रेझरीतील निवडक कविता अशी पुस्तके होती.

युनिव्हर्सिटीत काही मराठी भाषिक प्राध्यापक होते. आळतेकर, पुणतांबेकर. सायन्स विभागात डॉक्टर एन. एन. गोडबोले, इंग्रजीचे प्राध्यापक देसाई, इंजिनियरिंगमध्यें राणे, अशी मंडळी मला आठवतात. हिंदू युनिव्हर्सिटी म्हणजे भारतातील एक छोटेसे विश्वच म्हटले पाहिजे. प्राध्यापक काय आणि विद्यार्थी काय भारतातील सर्व प्रांतांतून आलेले आढळून येत. कॉलेजमध्ये जाऊ लागल्यानंतर माझी ज्यांच्याशी मैत्री झाली असे विद्यार्थी म्हणजे गौहाटीचे महेंद्रचंद्र भट्टाचार्य, चिटागांगचा जोगेशचंद्र मुजुमदार, बनारसचे ऋषिकुमार चटर्जी आणि वीरेंद्रकुमार विश्वास, बनारसचा (आता प्रसिद्ध वकील) सीताराम वर्मा, मॉरिशस बेटाचा उमाशंकर गिरिजानंद हे होत.

वऱ्हाड मध्यप्रांताची बरीच मुले त्या काळी पुढील शिक्षणासाठी बनारसला येत. गोळवलकर गुरुजी हे त्यावेळी बनारस युनिव्हर्सिटीत होते. त्यांचा प्रमुख सहाय्यक भय्या दाणी हा चार वर्षे माझ्या बरोबर होता. वऱ्हाडच्या मंडळीत गायनकर (वकील अकोट), कै. पाचोडे (अकोट), बापूराव गंगाराम पाटील (वरुद, भुगाव, अमरावती जिल्हा), तळोकार (सेवानिवृत्त एज्युकेशन इन्स्पेक्टर) कै. बुंदे हे आठवतात. बुंदे हा विनोदी स्वभावाचा होता. त्याचे इंग्रजीचे ज्ञान सामान्य होते. एकदा अर्थशास्त्राचे प्राध्यापक चेकच्या पद्धतीविषयी बोलत होते. मला बुंद्याने विचारले, ‘ हा काय म्हणतो आहे ? ’ मी म्हटले, ‘अरे चेक म्हणजे हुंडी.’ यावर बुंदे म्हणाला, ‘मग हुंडी म्हण की लेका. चिक चिक चिक चिक काय करतोय ? ’ या मंडळींच्या मुळे मला वऱ्हाडी बोलभाषेची ओळख झाली. जोगेशचंद्र मुजुमदार आणि ऋषिकुमार चटर्जी या मित्रांच्यामुळे मी बंगालीकडे वळलो आणि उमाशंकर गिरिजानंदामुळे मला फ्रेंच भाषेचे वेड लागले.

कॉलेज चालू असताना माझा दैनिक कार्यक्रम असा असे : सकाळी साडेचार पाच वाजता मला अण्णासाहेब उठवीत. साधारणपणे सहा वाजेपर्यंत मी संस्कृतचा अभ्यास करी. सातच्या सुमारास काही तरी खावेसे वाटे. आमच्या दारावरून रोज सकाळी एक लाडूविक्या जाई. ‘ रामदानेके लड्डूवा पैसे में चार ’ ही त्याची हाक मला अद्याप आठवते. मी एक पैशाचे रामदाण्याचे लाडू घेत असे. ते खाऊन आणि पाणी पिऊन मी गंगेवर जाई. आमच्या घरापासून गंगा अवघ्या दहा मिनिटांच्या अंतरावर होती, गगेत यथेच्छ पोहत मी नऊच्या सुमाराम परत येई. वाटेत ताईबाई देवदर्शनाहून परत येताना भेटत. आम्ही बोलत बोलत घरी परत येत असू. साडेनऊच्या सुमारास मी पुस्तके बरोबर घेऊन केदार घाटावरील त्रावणकोरच्या अन्नछत्रात जाई. तेथे जे वाढीत (दोन वेळा थोडा थोडा भात, एक पातळ पोळी आणि ताकाची एक वाटी) ते मान

खाली घालून आणि घाईघाईने जेवी. अन्नछत्रात जेवायचे आणि वर मिरपूड मागायची असा प्रकार इतर करीत. मी तसे केल्याचे मला आठवत नाही. जेवल्यानंतर मी घाईघाईने चार मैल अंतर कापून कॉलेजला जाई. माझी चप्पल तुटली होती. बरेच दिवस मी अनवाणी जात होतो. अस्सी घाटापुढे आडवाटेने शेतातून जाताना काटे बोचू नयेत, म्हणून मी काळजी घेत असल्याची मला अद्याप आठवण आहे. मी सुरवातीला बनारसला गेलो तेव्हा अंगात कोट होता. तो पुढे फाटल्यावर अंगात नुसता शर्ट राहिला. सहा वर्षेपर्यंत मी कोट वापरलाच नाही. थंडी जवळ आली तशी मी चार पाच रुपयाला एक शाल विकत घेतली. बंगाली लोकांप्रमाणे मी शर्टवर शाल पांघरून कॉलेजला जाई. माझे मित्र महेंद्रचंद्र भट्टाचार्य आणि गिरिजाकुमार भट्टाचार्य हे माझ्याप्रमाणेच गरीब होते. ते तर अनेक वेळा अंगात शर्ट नाही अशा स्थितीत नुसती शाल पांघरून कॉलेजमध्ये येत. रात्री धुऊन घातलेला शर्ट थंडीच्या दिवसांत पुरता न वाळल्यामुळे एकदा दोनदा मीही उघड्या अंगावर नुसती शाल पांघरून कॉलेजमध्ये गेल्याचे मला आठवते. सुदैवाने बनारस युनिव्हर्सिटीत गणवेषाची भानगड नव्हती. कपड्यालत्त्याकडे कोणी विशेष लक्ष देत नसे. अंगावरच्या शालीत सगळे झांकले जाई.

कॉलेजमध्ये माझा प्रत्येक क्षण अभ्यासात किंवा वाचनात जाई.

त्यावेळी (१९२६) ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत तयार झाली नव्हती. ग्रंथालय आर्टस् कॉलेजमध्ये होते. सुदैवाने ग्रंथालयाची कपाटे काचेची असत. त्यामुळे कपाटातील पुस्तके बाहेरून दिसत. मी कॅटलॉग पाहण्याच्या विशेष भानगडीत पडत नसे. मी सरळ कपाटाकडे जाई आणि पुस्तके निवडी. ग्रंथालयाचा नोकर किल्ल्यांचा जुडगा घेऊन कपाटाकडे जाई आणि आम्ही त्याच्या मागे मागे जात असू.

त्या वयात, (मला सतरावे वर्ष चालू होते) माझी वाचनाची भूक विलक्षण वाढली होती. बनारसमधील चार वर्षांत मी चारशे तरी इंग्रजी पुस्तके वाचून काढली असावीत. कार्माइकेल लायब्ररीतील, आणि पाटणकरांच्या ग्रंथालयातील पुस्तके वेगळीच. शेक्सपीयरची समग्र छत्तीस नाटके मी वाचून त्यांतील चांगले चांगले उतारे एका वहीत उतरून घेतले होते. बॉस्वेलकृत जान्सन चरित्र (सहा खंड), जान्सनचे रॅसेलस, कविचरित्रे, अलेक्झांडर डूमासच्या जवळजवळ वीस कादंबऱ्या, व्हिक्टर ह्यूगोचे ला मिजराब्ले, आणि नाइंटी थ्री, डिकन्सच्या आणि स्कॉटच्या कादंबऱ्या, इब्सेनची नाटके, बर्नार्ड शॉचे ॲपल कार्ट, कार्लाइलचे फ्रेंच रेव्होल्यूशन, सार्टर रेसार्टस, हीरो ॲंड हीरो वर्शिप, मिचलेटचे फ्रेंचवरील

इतिहास ग्रंथ, राइसचा जावा द्वीपाचा इतिहास, स्यामुअल स्माइल्सची ड्यूटी हीं पुस्तके, रुसोचे आत्मचरित्र, एमिल झोलाच्या कादंबऱ्या, टालस्टायचे वॉर अँड पीस (तीन खंड, दीड हजार पाने) एमिल लुडविगची बिस्मार्क, नेपोलियन, फ्रेडरिक यांची चरित्रे, रोमारोलांचे रामकृष्ण परमहंस चरित्र, सडरलँडचे इंडिया इन बांडेज, लाला लजपतरायचे अनहॅपी इंडिया, नार्व्हेजियन कादंबरीकार नुटह्यामसन याच्या एमिग्रंटस्, हंगर या कादंबऱ्या, स्वीडिश कादंबरीलेखिका सेल्मा लेंगरलॉफ हिच्या कादंबऱ्या, रशियन लेखक पुष्कीन, गोगोल, टूर्जेनेव्ह, डॉस्टोव्हस्की यांच्या कादंबऱ्या, मार्कट्वेनचे आत्मचरित्र, आणि इनोसेंटस, महात्मा गांधींचे ' सत्याचे प्रयोग ' आणि यंग इंडियांतील लेख, स्वामी श्रद्धानंदाचें आत्मचरित्र आणि लिबरेटरमधील लेख, रायडर ह्यागर्ड, हालकेन, सिंक्लेर लूईस, मेरी कोरेली आणि अप्टन सिंक्लेर यांच्या कादंबऱ्या, हिस्ट्री ऑफ नेन्शन्समधील जगातील सर्व राष्ट्रांच्या इतिहासावरील खंड, र्‍हिस डेव्हिसचे बुधिस्ट इंडिया, फणींद्रनाथांचे ग्रेटर इंडिया, किंग्डम ऑफ चंपा, अशी किती म्हणून पुस्तके सांगावी. पुढील पाच सहा वर्षांच्या कॉलेज जीवनात मी पुस्तकांवर सारखा चरत होतो.

मरेंगे हम किताबोंपर वरक (पाने) होंगे
कफन (प्रेतावरील वस्त्र) अपना

अशी माझी त्या काळात अवस्था झाली होती.

कार्लाइल्चे फ्रेंच रिव्होल्यूशन हे पुस्तक समजण्यास सोपे नाही. त्यांत कार्लाइलची भाषाशैली, खडक फोडून, पाण्याचा प्रवाह बाहेर पडावा तसा प्रकार आहे. मी फर्स्ट इयरमध्येच ते पुस्तक वाचून काढले. मी ते पुस्तक घेऊ लागलो तसे ग्रंथपाल म्हणाले, अरे, तू तर सोळा वर्षांचा, तुला रे या पुस्तकातले काय कळणार आहे ? जा, दुसरे कोणते तरी पुस्तक घे. ' मला राग आला. मला वाटले, ग्रंथालयाच्या कमंडलूत वर्तलेला हा शुक्राचार्य कोण ? मी तडक प्राध्यापकांच्या कॉमन रूममध्ये गेलो. तेथे प्राध्यापक पुणतांबेकर बसले होते. त्यांची माझी ओळख नव्हती. (पुढे ते माझे सासरे झाले). मी त्यांना घडलेली हकीकत सांगितली. त्यांनी ती ऐकून घेतली. त्यांनी तडक ग्रंथपालाच्या नावे एक चिठ्ठी लिहिली. तीत म्हटले होते, ' हा विद्यार्थी मागेल ते पुस्तक याला द्यावे. कटकटी करू नयेत. ' यानंतर मला ग्रंथालयातील पुस्तके मिळण्यात अडचण पडली नाही.

मी दुपारी साडेतीन चारच्या सुमारास निघून पाच मैल चालत घरी येई. त्यानंतर लागलीच निघून ललिताप्रसादची पुतणी विमलाकुमारी आणि पुतण्या

प्रभाशंकर यांना शिकविण्यासाठी जाई. विमलाकुमारीचा सहवास मला आवडू लागला होता. त्यामुळे शिकवणीची वेळ स्वागताई वाटे. ट्यूशन आटोपल्यावर मी कार्माइकेल लायब्ररीत जाई. तेथे झाडून सारी वर्तमानपत्रे आणि नियत-कालिके आरंभापासून शेवटपर्यंत वाचून काढी. केसरी मात्र अभ्यास म्हणून आणि माझे मराठी शुद्धलेखन व्यवस्थित व्हावे म्हणून वाची. केसरीची भाषा मला आवडे. अग्रलेखांचे त्याकाळचे मथळे मला अद्याप आठवतात 'वारू तुफान आणि राव नादान' (काश्मीरचे राजे हरिसिंग यांच्यावर) 'कपाळाला गंध आणि पोटात मंद' (बजेटवरील लेख) असे मथळे पाहून मला मोठी मौज वाटे. मॉडर्न रिव्ह्यूचा मी मोठा आस्थेवाईक वाचक होतो. रिव्ह्यूचे संपादक रामानंद चटर्जी यांचे एकदा आमच्या युनिव्हर्सिटीत व्याख्यान झालेले मला आठवते.

साडेआठला लायब्ररी बंद झाल्यावर मी तेथून निघे आणि विश्वनाथाचे दर्शन घेऊन पुरी भाजी खाऊन मी नऊ वाजेपर्यंत घरी परत येई.

अण्णासाहेबांना माझ्याबद्दल अतिशय जिव्हाळा आणि कौतुक असे. पण त्यांची वृत्ती गंभीर आणि विचारमग्न अशी असे. मला त्यांचा धाक वाटत असे. एकदा काय झाले, अलेक्झांडर ड्यूमासचा थ्री मस्केटीअर्स (तीन शिलेदार) हा चित्रपट लागला होता. ड्यूमास हा माझा आवडता लेखक आणि तीन शिलेदार म्हणजे इ. स. १६१३–३५ चा फ्रान्सचा इतिहास. कार्डिनल रिश्ल्यू, तेरावा लुई, राणी ॲन, माय लेडी, डार्टा, ॲथोस, पार्थोस, आरामीस, बकिंगहॅमचा ड्यूक अशी कितीतरी पात्रे त्या कादंबरीत आहेत. मला फ्रान्सचा इतिहास आवडू लागला तो ड्यूमासच्या कादंबरीच्यामुळेच. मला मोह न आवरून मी तो चित्रपट पहाण्यास गेलो. मला परत येण्यास साडेअकरा झाले असावेत. त्यावेळीं अण्णासाहेबांच्या बरोबर त्यांच्या पत्नी (त्यांना मी आई म्हणत असे) होत्या. ताईबाई इंदूरला गेल्या होत्या. अण्णासाहेबांनी माझ्या समोरच आपल्या पत्नीला म्हटले, 'सेतूला विचारावे, इतका वेळ तू कुठे गेला होतास?' आईने मला विचारले, 'हे विचारतात, तू इतका वेळ कुठे गेला होतास?' मी म्हटले, 'ड्यूमासचा चित्रपट थ्री मस्केटीअर्स लागला होता, तो पाहण्यास गेलो होतो. तो लेखक आणि त्याची ती कादंबरी मला अतिशय आवडतात म्हणून मी तो चित्रपट पाहायला गेलो होतो.'

आई अण्णासाहेबांना म्हणाल्या, 'सेतू म्हणतो, आपण सिनेमा पाहायला गेलो होतो. कोणती तरी कादंबरी त्याला आवडली म्हणे तिचा चित्रपट लागला होता.' मी तेथेच उभा. पण अण्णासाहेब माझ्याशी बोलेनात.

ते आपल्या पत्नीला म्हणाले, 'त्याला म्हणावे, यापुढे मला विचारून जात जावे. नाहीतर या घरातून जावे लागेल.' आईनी मला तसेच सांगितले. मी म्हटले, 'ठीक आहे. यापुढे विचारून जात जाईन.'

एकदा आमच्या कॉलेजमधे गोकुळअष्टमीच्या निमित्ताने नाटक करावे असे ठरले होते. मला स्त्री-पार्ट द्यावा असे ठरले. मीही मागचापुढचा विचार न करता हो म्हटले. मी अण्णासाहेबांना ही गोष्ट सांगितली. मी स्त्री-पार्ट करावा ही गोष्ट त्यांना आवडली नाही. ते गंभीरपणे माझ्याकडे पाहात इतकेच म्हणाले, 'आणि छातीवर तू काय पेले ठेवून फिरणार आहेस?' या एकाच वाक्याने माझा निकाल लागला. पुन्हा म्हणून मी त्या भानगडीत पडलो नाही.

अण्णासाहेबांच्यामुळे मला काही मोठी माणसे पाहावयास मिळाली. बनारसचे सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ बाबू भगवानदास. त्यांचे बंधू गोविंददास वारले. शोकसभेला मी अण्णासाहेबांच्या बरोबर गेलो होतो. तेथे बाबू भगवानदास (श्रीप्रकाश यांचे वडील) यांना मी प्रथम पाहिले.

माझ्या अभ्यासाचेही अण्णासाहेबांना मोठे कौतुक वाटे. एकदा मी लॉजिक-मधील सूत्रे घोकीत होतो.

बार्बारा, सिलारेंट, डेरिआइ, फेरियो
सिसेरे, सीमस्टेस, फेस्टिमो, बोरोको

अण्णासाहेबांना माझे घोकणे ऐकून स्वतःच्या विद्यार्थिदशेची आठवण झाली. ते म्हणाले, 'चाळीस पन्नास वर्षांपूर्वी मीही लॉजिकची सूत्रे अशीच घोकीत असे.'

अण्णासाहेबांनी प्रयत्न करून कॉलेजमधील माझी अर्धी फी माफ करवून घेतली. मला इंटरमध्ये महिन्याला तीन रुपये फी पडे. बी. ए. मध्ये चार रुपये द्यावे लागत. घरून महिन्याला दहा बारा रुपये येत. ट्यूशनवर कधी पाच तर कधी दहा रुपये मिळत. त्यावर मी आपला खर्च कसाबसा चालवी.

एकदा अण्णासाहेबांच्याकडे चिंतामणराव वैद्य आले होते. वैद्यांची पुस्तके मी वाचली होती. त्यामुळे त्यांच्याबद्दल मला आदर वाटे. अण्णासाहेबांनी मला हाक मारली 'सेतू, इकडे ये.' मी त्यांच्याजवळ गेलो. चिंतामणरावांनी विचारले, 'हा सेतू कोण' यावर अण्णासाहेब म्हणाले, 'हा माझा विद्यार्थी आहे. हा पुढे मोठा माणूस होणार आहे.' अण्णासाहेबांच्या या वाक्याने मला आतून भडभडून आले. त्यांचे हे वाक्य मी कधीच विसरलो नाही. आयुष्यात मी पुढे, मोठा झालो की नाही, हे मला सांगता येणार नाही. पण मी घसरलो नाही याला कारण अण्णासाहेबांचे आशीर्वाद होत अशी माझी श्रद्धा आहे.

अण्णासाहेब जितके विरक्त वृत्तीचे तितक्याच त्यांच्या पत्नी, आई, संसारात रमलेल्या असत. त्या आपल्या मुलांजवळ इंदूरला असत. अधून मधून त्या बनारसला येऊन राहात. आणि मग ताईबाई इंदूरला जात. आईची वागणूकही माझ्याशी प्रेमळपणाची असे. त्या कुटुंबात मी घर सोडून बाहेर पडलो आहे असे मला कधीच वाटले नाही. अण्णासाहेबांच्याकडून मला सतत अनेक गोष्टींची माहिती मिळत असे. इतिहाससंशोधक राजवाडे, मला वाटते, इ. स १९२६ मध्ये वारले- 'विसूभाऊ गेले' हा केसरीतील अग्रलेखाचा मथळा अद्याप आठवतो. या निमित्ताने अण्णासाहेबांनी मला राजवाड्यांसंबंधी कितीतरी गोष्टी सांगितल्या. अण्णासाहेब विजापूरकरही मला वाटते त्याच वर्षी वारले. त्यांच्या-संबंधीही बरीच माहिती मला ऐकण्यास मिळाली. असे त्यांच्या येथे सारखे ज्ञानसत्र चालू असे.

नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये अण्णासाहेबांना एकाएकी अर्धांगवायू झाला. मी तार करून त्यांच्या मुलाला इंदूरहून बोलावून घेतले. अण्णासाहेबांची वाचाच बंद झाली होती. अण्णासाहेबांची पत्नी आणि मुले इंदूरहून आली. कॉलेज-मधील इंदूरचे विद्यार्थी होते तेही आले. आणि अण्णासाहेबांना लॉरीमधून मोगलसराय जंक्शनपर्यंत नेण्यात आले. मी मोगलसरायपर्यंत गेलो होतो. अण्णासाहेब विकलांग स्थितीत पडले होते. त्यांच्याकडे पाहवत नव्हते, मोगल-सराईहून त्यांना गाडीने रवाना करून मी बनारसला परत आलो. अण्णासाहेब रहात होते त्या जागेतच मी एक लहानशी खोली भाड्याने घेतली. आत्याबाईने खोलीचे भाडे महिन्याला एक रुपाया असे ठरविले.

चार वर्षे रुग्णावस्थेत राहून अण्णासाहेब इ. स. १९३० च्या सुमारास इंदूरला मृत्यू पावले. बी. ए.ची परीक्षा पास झाल्यानंतर मी इंदूरला त्यांच्या घरी गेलो होतो. अण्णासाहेबांची पत्नी आई, आणि त्यांचा मुलगा तात्या यांची गाठ पडली. ताईबाई बाहेरगावी गेल्या होत्या. आईने माझे खूप कौतुक केले.

१९३० नंतर पुन्हा माझी आणि पाटणकर कुटुंबाची गाठ पडली नाही. चारपाच वर्षांपूर्वी ताईबाई कल्याणला आपली बहीण श्रीमती फाटक यांच्याकडे आल्या होत्या. 'येऊन भेटून जा' म्हणून त्यांचा मला निरोप आला होता. पण त्याच वेळी साहित्य-संस्कृति-मंडळाच्या महाबळेश्वर येथे भरणाऱ्या बैठकीला जाण्याच्या गडबडीत मी असल्यामुळे मला कल्याणला जाता आले नाही.

त्यापूर्वी माझा मुलगा अशोक व्यवसायाच्या निमित्ताने इंदूरला गेला असताना तो तात्या आणि ताईबाई यांना भेटून आला. ताईबाईंनी त्याला पाहिल्यावर अरे, 'तू अगदी सेतूसारखा दिसतोस' असे उद्गार काढले. आणि अशोकसाठी मला

आवडणाऱ्या पुरणपोळींचा बेत केला.

कल्याणहून परत गेल्यावर ताईबाई लवकरच वारल्या, असे मला सहा महिन्यांपूर्वीच मी कल्याणला गेलो असताना फाटकांच्याकडून कळले. ताईबाईंची गाठ पडू शकली नाही या गोष्टीची मला फार रुखरुख लागली. पण काही इलाज नव्हता.

अण्णासाहेबांचा सहवास मला लाभला तो फक्त पाच सहा महिन्यांचाच. पण त्या सहवासाने माझे आयुष्य बदलून गेले. बनारसला मला अण्णासाहेब भेटले नसते तर, मी पाचोळ्यासारखा उडून गेलो असतो. त्यांच्यामुळे माझे पाय जमिनीवर स्थिर झाले. आपत्तींशी झुंजण्याचा धीर आला, संस्कृतचा आणि संस्कृतीचा अभिमान निर्माण झाला, आणि आयुष्यात पुढे येण्याची जिद्द उत्पन्न झाली. हे त्यांचे देणे केवळ अमोल आहे. ते भाग्य मला लाभले ही मी परमेश्वराची कृपाच समजतो. त्या सज्जन साधु पुरुषाच्या स्मृतीला शतशः प्रणाम.

कॉलेजला रोजच्या जाण्यायेण्यात मला दहा मैल चालावे लागे. पोटात पुरेसे आणि सकस असे अन्न क्वचितच जाई. या रोजच्या दगदगीचा माझ्या शरीरावर परिणाम होऊ लागला. शेवटी मी वडिलांना पत्र लिहिले की मला सायकल घेता आली तर बरे होईल. रोजचे दहा मैल चालण्याचे अतिशय श्रम होऊ लागले आहेत. माझे पत्र जाताच वडिलांनी माझ्याकडे रुपये रवाना केले. पंचाहत्तर रुपयांना मी एक सायकल विकत घेतली. तो दिवस, सात जानेवारी एकोणीसशे सत्तावीस हा मला अद्याप आठवतो. कारण त्या दिवशी आमच्या कॉलेजमध्ये लाला लजपतराय यांचे व्याख्यान होते. त्या दिवशी सायकल घेण्याच्या नादात गुंतल्यामुळे मला व्याख्यानाला हजर राहता आले नाही. दुसऱ्या दिवशीच्या दीक्षान्त समारंभाला ते हजर होते. तेथे मी त्यांना पाहिले.

बनारसमध्ये सतत काही ना काही चळवळी चालू असत. भारतीय पुढारी नेहमी बनारसला भेटी देत. एकोणीसशे सव्वीस ते तीस या काळात मी अमका पुढारी पाहिला नाही असे झालेच नाही. इ. स. १९२६ च्या नोव्हेंबर महिन्यात बनारसला केंद्रीय विधानसभेसाठी निवडणुकी झाल्या. काँग्रेसतर्फे श्रीप्रकाश आणि मालवीयजींच्या नॅशनॅलिस्ट पार्टीतर्फे घनश्यामदास बिर्ला हे उभे होते. बिर्लांच्यातर्फे प्रचार करण्यासाठी म्हणून स्वामी श्रद्धानंद आले होते. त्यांची भव्य आणि गंभीर मूर्ती अद्याप माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे. ' जिस संस्कृति तथा सभ्यताने तुम्हे गये तीन चार हजार वर्ष बचाया है उसका संरक्षण करो ' हे त्यांचे उद्गार मला अद्याप आठवतात.

या सभेनंतर अवघ्या एक महिन्यातच स्वामी श्रद्धानंदांचा दिल्ली येथे खून

झाला. बनारसला शोकसभा भरली. तिला मी हजर होतो. सभेत मालवीयजींचे पुत्र गोविंद मालवीय यांचे हिंदीमध्ये अतिशय स्फूर्तिदायक असे भाषण झाले.

इ. स. १९२७ मध्ये देशभर सायमन बहिष्काराची लाट उसळली होती. बनारसलाही मोठी निदर्शने झाली. ज्या दिवशी सायमन कमिशनचे सभासद बनारसला येणार होते त्या दिवशी आम्ही हजारो विद्यार्थी निदर्शने करण्यासाठी म्हणून बनारसच्या मुख्य स्टेशनवर गेलो. बनारसचा कमिशनर व्ही. एन. मेहता आय. सी. एस. हा मोठा धूर्त मनुष्य. त्याने कमिशनच्या सभासदांना एक स्टेशन अलीकडे म्हणजे राजघाटावर उतरवून घेतले आणि त्यांना शहरात आणले. गाडीत त्यांच्या जागी सात इंग्रज शिपायांना उत्तम आणि उंची कपडे घालून बसविण्यात आले होते. त्यांना घेऊन गाडी बनारस स्टेशनवर आली. पोलिसांच्या कडक बंदोबस्तात कमिशनचे ते सोंगाडे सभासद उतरले. आम्हांला वाटले की ते खरेखुरे सभासद आहेत. आम्ही सारखे ओरडू लागलो 'सायमन गो ब्याक' ओरडून ओरडून आमचे घसे बसले. ते भोंदू सभासद दादर चढून जाताना आमच्याकडे वळून पाहात आणि हाताने टोपी उचलून, डोळे मिचकावीत आम्हांला मिस्किलपणे थँक यू म्हणत अभिवादन करीत. त्यांच्या निर्लज्जपणाची आम्हांला चीड येई आणि आम्ही पुन्हा मोठ्याने ओरडून सायमन गो बॅक असे म्हणत असू.

अर्धा पाऊण तास ओरडून ओरडून आम्ही थकून गेलो. ते सोंगाडे सभासद डोळे मिचकावीत आणि आमची टिंगल उडवीत निघून गेले. आम्ही परत फिरलो. घरी परतताना काशी विश्वनाथाचे दर्शन घ्यावे म्हणून मी देवळात गेलो. तो काय चमत्कार, सायमन कमिशनचे खरेखुरे सभासद देवळाबाहेर उभे होते आणि भारतीय अधिकारी त्यांना देवळाची हकीकत समजावून सांगत होते. कमिशनर मेहता यांचा धूर्तपणा (मुत्सद्देगिरी) आता कोठे माझ्या लक्षात आला. आम्हांला पूर्णपणे बनविण्यात आले होते. पण आता हात चोळून काय उपयोग होता ?

इ. स. १९२७ च्या सुरवातीला डॉ. आळतेकर हे आम्हां विद्यार्थ्यांना सारनाथ या स्थळी घेऊन गेले होते. सारनाथ येथे भगवान बुद्ध यांनी प्रथमच धर्मोपदेश केला होता. बनारसपासून पाच सहा मैलांवर हे स्थळ आहे. डॉक्टर आळतेकरांनी सारनाथातील प्रत्येक वस्तू मोठ्या कळकळीने आम्हांला समजावून सांगितली, तेथील विहार, अशोकस्तंभ, गुप्तकालीन शिल्प अशा एकेक गोष्टी आळतेकर सारखे सांगत जात. शेवटी एका जागेपाशी थांबून ते म्हणाले, 'या जागी गौतम बुद्धांनी प्रथम उपदेश केला. त्यांचे धर्मचक्रपरिवर्तन

प्रथमच येथे सुरू झाले.' त्यांच्या वर्णनाने मी भारावून गेलो. माझ्या डोळ्यांसमोर बुद्ध जीवनातील घटना उभ्या राहिल्या. घरी परत आल्यावर मी जातकातील कथा वाचून काढल्या. आणि व्हिस डेव्हिसचे बुधिस्ट इंडिया हे पुस्तक वाचले. कित्येक आठवडे मी बुद्धकालीन भारतात वावरत होतो.

अशा स्थितीत एकदा मी आमच्या राममंदिरातील खिडकीतून रस्त्याकडे पाहात असताना, रस्त्यावरून काही माणसे दशाश्वमेध घाटाकडे जात असताना दिसली. मी घराबाहेर आलो. तो कोणी म्हटले, 'ते पाहा महात्मा गांधी' त्यांना पाहण्याची ही माझी पहिलीच वेळ. महात्माजी एक पंचा नेसले होते. त्यांचे अंग उघडे होते. ते जलद जलद चालत होते. त्यांच्याबरोबर काही कार्यकर्ते होते. महात्माजींच्या व्यक्तिमत्त्वाने मी इतका प्रभावित झालो, की मी त्यांच्यामागे धावत दशाश्वमेध घाटापर्यंत गेलो. आज त्या गोष्टीला चाळीस वर्षे होत आली. पण त्यावेळी माझ्या मनात जो विचार आला तो मी अद्याप विसरलो नाही. त्यावेळी महात्माजींच्या मागे मागे जात असताना मला वाटले, 'अडीच हजार वर्षांपूर्वी गौतम बुद्धही याच वाटेवरून असेच गंगेकडे जात असतील आणि त्यांच्या मागे माझ्याप्रमाणेच माणसे वेडीपिशी होऊन धावत असतील.' महात्माजींचे पहिले दर्शन हे मी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत विसरणार नाही. संध्याकाळी टाऊन हॉलच्या बागेत त्यांचे भाषण झाले. त्या सभेला पन्नास साठ हजार माणसे तरी हजर असावीत. सभेत महात्माजी येईपर्यंत आरडाओरडा आणि गलका चालला होता; पण महात्माजी आले, त्यांनी फक्त एकदाच हात वर उचलून सर्वांना शांत राहण्याची खूण केली, तो लगेच सभेत इतकी शांतता पसरली की सुई पडली तरी तिचा आवाज यावा. दुसऱ्या दिवशी युनिव्हर्सिटीत त्यांचे भाषण झाले. दरिद्री नारायणाची सेवा, हे त्यांचे शब्द मला आठवतात.

युनिव्हर्सिटीत जी प्रमुख माणसे त्या चार वर्षांच्या काळात येऊन गेली आणि ज्यांची भाषणे मी ऐकली ती म्हणजे महात्माजी, जवाहरलाल नेहरू, डॉक्टर अन्सारी, जतींद्र मोहन सेनगुप्त, बिपिनचंद्र पाल, श्रीप्रकाश, ॲनी बेझंट, बिकानेरचे महाराज सर गंगासिंग, लॉर्ड इर्विन, जनरल बर्डवूड, फ्रेंच सेनापती जनरल गुरार्ड, लॉर्ड लिनलिथगो, गणेश दामोदर सावरकर (हे वसतिगृहात आले होते), त्रावणकोरचे महाराज, डॉक्टर सुब्बारायन. ॲनी बेझंटच्या भाषणाच्या वेळी सूर्यास्त होत होता. सूर्याचे किरण तिच्या अंगावर पडले होते. तिच्या शुभ्र अंगावर आणि शुभ्र वस्त्रावर किरण पसरले तेव्हा तिचे सर्वांग सोन्याचेच आहे की काय असा मला भास झाला. मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक रामानंद चटर्जी युनिव्हर्सिटीत आले तेव्हा बंगाली विद्यार्थिनींनी त्यांना ओवाळल्याचे आठवते.

शहरात ज्यांची व्याख्याने ऐकली त्यात विठ्ठलभाई पटेल, शिवप्रसाद गुप्त, आचार्य कृपलानी (यांचे भाषण काशी विद्यापीठात ऐकले), दरभंग्याचे महाराज, नेताजी सुभाषचंद्र बोस हे आठवतात. सुभाषचंद्रांची मुद्रा गंभीर आणि करारी दिसे. त्यांचे मोडके तोडके हिंदी भाषणही मला त्यांच्या उग्र चेहऱ्यामुळे प्रभावी वाटले.

बनारसला माझ्यावर बाह्य जगाचे सतत संस्कार होत होते. आर्यसमाजी पुढाऱ्यांची भाषणे ऐकायला मिळत. त्यावेळीं प्रभावी गाणी म्हटली जात.

क्या घडी थी शुभ वही जब वेदोंका प्रचार था

अशी आर्यांच्या सुवर्णयुगाची आठवण करीत.

अब बनारस की गलीमे नाचती हैं रंडिया

असे म्हणून ते गायक आपला खेद प्रकट करीत. एकदा आर्यसमाज मंदिरात एका मुसल्मानाच्या शुद्धीकरणाच्या समारंभाला मी हजर होतो. त्याचे नाव अब्दुल्शुकूर होते. तो सहारणपूरचा राहणारा होता. मंदिरात शुद्धीकरणाच्या निमित्ताने होमहवन झाले. त्या इसमाचे नाव ग्यानचंद ठेवण्यात आले. तो समारंभ पाहून मनात कुठे तरी समाधान वाटले.

अखिल भारतीय थिऑसॉफिस्टांचे एक संमेलन बनारसला भरले होते. तेथे मला कृष्णमूर्ती, जिनराजदास, अरुंडेल ही मंडळी पाहाण्यास मिळाली. कृष्ण-मूर्ती काय म्हणत हे समजले नाही. पण त्यांचा देखणेपणा मनात ठसल्याचे आठवते. संमेलनाला अनेक थिऑसॉफिस्ट जमले होते. ही सर्व मंडळी उच्च गंडाने पछाडल्यासारखी वागत होती. पांढरा शुभ्र नेहरू शर्ट, चुणीदार अगर सैल पायजामा, अंगावर एखादे उपरणे, डोळ्याला चष्मा, त्यातून जगाकडे काहीसे तुच्छतेने पाहणारे, भोवतालच्या लोकांशी पेट्रनाइजिंग पद्धतीने वागणारे, अशी काहीशी आठवण मनात या थिऑसॉफिस्टांच्याबद्दल राहिली आहे.

बनारसला रामलीलेचा उत्सव मोठ्या थाटाने होई. दहा दिवसपर्यंत जिकडे पाहावे तिकडे तुळसीदासांच्या रामायण-श्रवणात हजारो लोक गुंगून जात. रामा-यण गाणारे हार्मोनियम, तबला इत्यादींच्या साथीने खड्या सुरात, रामायणा-तील श्लोक म्हणत. पुष्कळदा श्रोते त्यांना साथ देत. अशा सभातून मीही यथेच्छ भाग घेतला,

वर्षाकाल मेघ नभ छाये
गरजत लागत परम सुहाये
दामिन दमकरही घनमाही
खल की भांति यथा थिर नाही

किंवा,

बन चले राम रघुराई
संग जानकी माई
लक्ष्मण जैसा भाई

या ओळी माझ्या तोंडात बरेच दिवस होत्या. आख्यान संपले की सगळे मोठ्याने ओरडत,

बोलो राजा रामचंद्र की जय
सियावर रामचंद्र की जय
पवनसुत हनुमान की जय

बनारसमध्ये रामलीलेतील प्रसंग नाट्यरूपाने दाखविताना ते प्रसंग ठरलेल्या स्थळी साजरे करीत. उदाहरणार्थ लंका नावाची एक आळी आहे. तेथे लंकेतील घटना दाखविल्या जात. राम आणि भरत यांची भेट जेथे होई त्या जागेला नाठी इमली म्हणत. भरत-भेटीच्या दिवशी रामनगरचे महाराज ईश्वरसिंह हत्तीवर बसून मिरवणुकीसहित तेथे येत. हत्तीवरून राम, लक्ष्मण आणि सीता यांचा वेष घेतलेली पोरे यांची मिरवणूक निघे.

ठरलेल्या स्थळी मिरवणूक पोहोचल्यावर राम-भरत भेटीचा हृद्य कार्यक्रम होई आणि बोलो राजा रामचंद्र की जय या जयघोषांनी वातावरण दुमदुमून जाई.

बनारस जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रामलीला मला पाहाण्यास मिळाली. माझा मित्र वामदेव उपाध्याय याच्याबरोबर मी त्याच्या खेडेगावी गेलो होतो. रामनगर राज्यातील ग्यानपूर या तालुक्यात त्याचे गाव होते. ग्यानपूर हे मोठे टुमदार गाव होते. तेथे मी रामलीलेचा उत्सव पाहिला. ग्यानपूर गावात एक पुष्करणी आहे. पुष्करणीच्या मधोमध एक लहान मंडप आहे. तेथे एक आंधळे साधू राहात असत. मी आणि वामदेव, साधूंच्या दर्शनासाठी गेलो.

ती वेळ सकाळची अकराची होती. आम्ही साधू महाराजांचे दर्शन घेतले. महाराज आंधळे होते. त्यांचे वय पस्तीस एक वर्षांचे असावे. महाराजांचे शरीर पिळदार होते. हा मनुष्य एके काळी नावाजलेला पहिलवान असावा असेच त्याला पाहून कुणालाही वाटले असते. मी महाराजांना विचारले, “ महाराज, आपले शरीर सुदृढ आणि अंगकांती सतेज आहे. आपण तपस्वी दिसता. आपल्या आयुष्यात मोहाचे क्षण आले असतीलच !”

“ हां, हां, क्यौं नहीं, ” महाराज स्मित हास्य करीत म्हणाले, “ मी कलकत्त्यात होतो त्यावेळची गोष्ट, शेकडो स्त्री-पुरुष माझ्या दर्शनासाठी येत. एकदा एक वेश्या माझ्याकडे आली. ती म्हणाली, ‘ आप बडे कसदार (पिळदार शरीराचे)

मालूम होते हैं. मैं आपकी सेवा करना चाहती हूँ. ' मी तिचा हेतू ओळखला. मी तिला चक्क नकार दिला. ''

ही गोष्ट सांगत असतांना साधू महाराजांनी दीर्घ निश्वास सोडला. आपण त्यावेळी वेश्येचे म्हणणे कबूल का केले नाही म्हणून त्यांना हुरहुर वाटत होती की काय ? कवी गालिबने म्हटले आहे,

' परमेश्वरा, आम्ही केलेल्या पापांची तू नोंद ठेवतोस पण जी पापे करावी म्हणून आम्हांला हुरहूर वाटली त्यांची पण नोंद तू का ठेवीत नाहीस ? ' साधू महाराजांच्या दीर्घनिश्वासामागील रहस्य हेच असावे.

इ. स. १९२७ मधे मी फर्स्ट ईयर पास होऊन इंटरच्या दुसऱ्या वर्षात गेलो. अर्थशास्त्राचे सिंधी प्राध्यापक सिपाहीमलानी हे माझे खूप कौतुक करीत. त्यांच्या दोन मुली हीरा आणि इंद्रा त्यावेळीं अगदी लहान होत्या. (आज हीरा बनारसच्या महिला कॉलेजमध्ये प्रोफेसर आहे). मी सिपाहीमलानींकडे नेहमी जात असे.

प्रो. निक्सन हा इंग्रज प्राध्यापक आम्हांला शेक्सपीयरचे नाटक हेन्री फिफ्थ हे शिकवीत असे. मी नाटकाचा आस्थेवाईकपणे अभ्यास करीत आहे हे पाहून तो माझ्याकडे विशेष लक्ष देऊ लागला. आमच्या कॉलेजच्या वार्षिक उत्सवात नाटकातील प्रवेश करण्यात येत. अभिनयस्पर्धेसाठी पारितोषिके ठेवण्यात येत. निक्सन यांनी हॅम्लेट नाटकातील ' टु बी ऑर नॉट टु बी ' हे प्रसिद्ध असे स्वगत भाषण माझ्याकडून तयार करवून घेतले. त्या वर्षीच्या स्पर्धेत मला दुसरे बक्षीस मिळाले. कॉलेजच्या वक्तृत्वसमारंभातूनही मी भाग घेऊ लागलो होतो आणि माझ्या इंग्रजी भाषणाचे कौतुक होऊ लागले होते. प्रोफेसर निक्सन यांना पुढे काय उपरती झाली कोणास ठाऊक ! त्यांनी नोकरी सोडून हिंदू धर्माचा स्वीकार केला. ते भगवी वस्त्रे वापरू लागले. त्यांचे नवीन नाव होते कृष्णप्रेम बैरागी, अशाच वेषात ते एकदा आमच्या कॉलेजात आले असता त्यांचा आम्हां विद्यार्थ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. त्यांनी पुढे अल्मोडा येथे एक आश्रम स्थापन केला. १९६६ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

आमच्या कॉलेजात अनेक उत्सव-समारंभ होत, मी शहरात राहात असल्यामुळे मधून मधून या समारंभांना हजर राहात असे. एकदा कॉलेजात संगीत मैफल झाली. अनेक नामांकित गवई त्या मैफिलीला आले होते. कार्यक्रम रात्री दोन वाजेपर्यंत चालला होता. ग्वाल्हेरचे एक नामांकित मुसलमान गवई गावयास बसले. त्यांच्या गायनावर सारी सभा नुसती डोलत होती. त्यांच्या शेवटच्या गाण्याने तर मी स्तिमितच झालो. खानसाहेब गाऊ लागले,

धीर समीरे तटिनी तीरे वसति वने वनमाली

मुसलमान गवई आणि जयदेवाचे गीत गोविंद ! मी तर गाणे ऐकण्यात तल्लीन होऊन गेलो. तो खानसाहेब घोळून घोळून म्हणू लागले.

गोपी पीन पयोधर मर्दन चंचल करयुगशाली

या ओळींचा अर्थ लक्षात आल्यावर मी थोडासा अस्वस्थ झालो. मला वाटले, खानसाहेबांनी पयोधरमर्दन इतके घोळून घोळून म्हणू नये. पुढच्या ओळी सुरू कराव्या. माझ्या शेजारी आमच्या हैद्राबादचा दत्ता जोशी (हा पुढे इंजिनियर होऊन अमेरिकेला गेला आणि तेथेच वारला) बसला होता. मी त्याला म्हटले, ' अरे दत्ता, कित्ती वेळ हा म्हणतो आहे रे हे शब्द, जणू काय याचेच हात वळवळत आहेत. ' दत्ता म्हणाला, ' अरे तुझे काय गेले ? ' मी म्हटले, ' अरे येथे इतक्या पोरी बसल्या आहेत. त्यांना काय वाटत असेल ? ' दत्ता शांतपणे म्हणाला, ' बरे वाटत असेल. दुसरे काय ! ' मी थक्क झालो. पण त्या दिवसापासून मला जयदेवाचे गीत गोविंद आवडू लागले. आजसुद्धा पंडितराज जगन्नाथमधील या गाण्याचा प्रसंग पाहिला की देहभान हरपल्यासारखे होते. गीत गोविंदातील ओळी म्हणजे हृदयावर रोखलेले भालेच वाटतात.

एकोणीशे सत्तावीसच्या ऑगस्ट महिन्यात मी लखनौ आणि अयोध्या ही स्थळे पाहून आलो. नऊ आणि दहा ऑगस्ट हे दोन दिवस मी लखनौमध्ये काढले. अकरा ऑगस्टला मी अयोध्येत आलो. तेथे मी दोन दिवस राहिलो. अयोध्येत मोठी मंदिरे अशी फार थोडी आहेत. जेथे रामजन्म झाला अशी आख्यायिका आहे तेथे इ. स. १५३० मध्ये मोगल बादशहा बाबर याने बांधलेली भव्य मशीद उभी आहे. ती पाहून मनाचा अतिशय क्षोभ झाला. काशी विश्वनाथाच्या देवळाच्या जागी औरंगजेबाने बांधलेली मशीद तर मी रोजच पाहात होतो. या दृश्यांनी माझ्या मनावर काय संस्कार होत असावेत हे न सांगताही समजण्यासारखे आहे. अयोध्येत मी अनेक देवळे पाहिली. तेथील दोन दिवस मी राममय बनलो होतो. रामजन्मापासून तो स्वर्गारोहणापर्यंतचे रामचरित्र माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले. पण माझे मन खऱ्या अर्थाने रमले ते शरयू नदीच्या काठावर. शरयूचे पात्र गंगेपेक्षाही विशाल आहे. मी नदीत उतरलो. अंघोळ करीत असता कासवाने माझा अंगठा घट्ट धरून ठेवला. तो सोडवून घेताना माझी अतिशय तारांबळ उडाली. संध्याकाळी शरयूच्या काठावर बसून मी नदीच्या पात्राकडे पाहात होतो. काठावरील माणसे तुळशीदासाचे रामायण म्हणत होती. कितीतरी वेळ मी रामाच्या दिव्य आणि भव्य चरित्राचे मनन करीत होतो. मला वेळेचेही भान राहिले नाही. घाटावर जवळच एक गोसावी

बसला होता. तो म्हणत होता,

रामान्नास्ति परायणम् परतरम् रामस्य दासोस्म्यहम्
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर

त्याचे शब्द ऐकून मी भानावर आलो. धन्य ती शरयू. रामचरित्रातील काय काय गोष्टी तिने आपल्या पोटात साठवून ठेवल्या असतील !

दोन दिवसांनी मी बनारसला परत आलो. एकोणीसशे सत्तावीसमध्ये मी मिर्जापूर, चुनारगडचा किल्ला (त्र्यंबकजी डेंगळे याला याच किल्ल्यात कैदेत ठेवले होते), गाजीपूर जिल्ह्यातील एक खेडे, गंगेवरील सयीदपुर हे गाव ही स्थळे पाहिल्याचे मला आठवते.

बनारसमधील माझ्या चार वर्षांच्या वास्तव्यात बंगाली जीवनाचा अतिशय जवळून असा मला परिचय झाला. ती चार वर्षे मला बंगालचे वेडच लागले होते म्हणाना ! बंगाली स्त्री-पुरुष, त्यांची राहणी, त्यांची भाषा, त्यांचे साहित्य इत्यादींनी मी अगदी भारावून गेलो होतो. कॉलेजमधील माझे जीवश्च कंठश्च मित्र म्हणजे जोगेशचंद्र मुजुमदार, ऋषिकुमार चटर्जी आणि बीरेंद्रकुमार विश्वास हे होते. हे सर्व शहरात राहात. त्यामुळे कॉलेजबाहेरही त्यांच्या नेहमी गाठी पडत.

मी राहात होतो ते घटाट्यांचे राममंदिर दशाश्वमेध घाटावरील बंगाल्यांच्या आळीला लागून आहे. त्या आळीला बंगाली टोला म्हणत. चार वर्षेपर्यंत माझ्या कानांवर बंगाली भाषेचा सारखा मारा होत होता. हैदराबादेस असताना टागोरांचे आत्मचरित्र, गोरा, नौकाडुबी या कादंबऱ्या, चित्रांगदा हे नाटक, गीतांजली हे काव्य आणि कथा हे साहित्य मी वाचले होते. स्वर्णलता देवीचे नाइट एरंट, कुचबिहारच्या राणीचे आत्मचरित्र, मराठी अनुवादातून दुर्गेश-नंदिनी, आनंदमठ, कपालकुंडला, कृष्णकांतेर विल, पौर्णिमेचा चंद्र इत्यादि कादंबऱ्या, बिहारीलाल गुप्ता, सुरेंद्रनाथ बानर्जी, चित्तरंजन दास इत्यादींची चरित्रे ही पुस्तके मी वाचली होती. त्यावरून बंगाली माणसे रोमँटिक आहेत अशी माझी समजत झाली होती. बंगाली नावेही अतिशय आकर्षक वाटत. चारुचंद्र, चित्तरंजन, अश्विनीकुमार, द्विजेंद्र, रवींद्र अगर लावण्यमयी, हिरण्यमयी, स्वर्णलता, पुष्पांगी, सुरसुंदरी अशा प्रकारची नावे ऐकूनच मला मोठा आनंद वाटे.

मी बनारसला होतो त्या काळात बनारसची लोकसंख्या तीन लाख असावी. हजारो बंगाली कुटुंबे बनारसमध्ये कायमची स्थायिक झाली होती. दशाश्वमेध-घाटावर सर्वांत जास्त वर्दळ असे ती बंगाल्यांची. दशाश्वमेध घाटावरील बंगाली

टोल्यांत तर हिंदी क्वचित कानावरच पडे. 'की मशाय, केमोन आचेन्', 'महाशय, कसे आहात.' 'भालो आचेन तो' बरे आहात ना ? 'ह्यां भालो आची' होय, मी खुशाल आहे. 'ओ मशाय' अहो महाशय, 'आग्ग्ये ह्या' बोला काय आज्ञा आहे, अशी वाक्ये रात्रंदिवस माझ्या कानावर पडू लागली. बंगाली भाषेत जितके संस्कृत शब्द आहेत तितके इतर कोणत्याही भारतीय भाषेत नसतील. पण त्यांचे उच्चार मात्र आपल्या कानाला कसेसेच लागतात. गंगेच्या घाटावर बंगाली पुरोहित मोठमोठ्याने भगवद्‌गीता वाचीत बसत तेव्हा त्यांचे उच्चार कसे असत ते पाहा.

जोदा जोदाहि धोर्मोश्य ग्लानिर्भोबति भारत
ओभ्युत्थानम् धोर्मोश्य तदातानम् शृज्याम्यहम्

बंगाली माणसे लक्ष्मण शब्दाचा उच्चार लोख्खण, आत्मीय (नातेवाईक) चा आतीय, महात्मा चा महाता असा करतात. महात्मातील म चा उच्चार करीत नाहीत. जवाहरलाल चा उच्चार जोहोरलाल, रणजितसिंह–रोणोजीतशिंघ, पेशावर–पेशवार, व्हायसराय–भारशराय, व्होट–भोट, शिवाजी–शिबाजी, संभाजी–शोंभाजी, कृष्ण–कृष्टो, कलकत्ता–कोल्काता, बर्दवान–बर्धमान, बनारस–बेनारस, गंगा–गोंगा, मैत्र–मोइत्र असे त्यांचे गंमतीचे उच्चार किती म्हणून सांगावेत

धोर्मोखेत्रे कुरुखेत्रे शोमोवेत युयुत्सवाः
मामकाः पांडवाश्चैब किमकुर्बत शंजय

ही बंगाली उच्चाराची ओळ माझ्या लक्षात राहिली आहे. माझ्या नावाचा उच्चार शेतुमाधोब असा करीत. बंगाली भाषेत जे संस्कृत शब्द वापरतात ते मराठी अनुवादात जसेच्या तसे ठेवले तर ही भाषा किती अतिशयोक्तीची आहे असे वाटेल. उदाहरणार्थ तिनी क्षुब्ध होईया उठिलेन याचा अनुवाद ते अस्वस्थ झाले असा होईल. ते क्षुब्ध झाले असा अतिशयोक्तीचा अनुवाद अभिप्रेत नाही. रात्रंदिवस माझ्या कानावर बंगाली पडू लागली. एक महिन्याच्या आत मी बंगाली वाचू लागलो. माझे बंगाली बोलणे पुस्तकी पद्धतीचे नव्हते. बंगाली जसे बोलत तसाच मीही बोलू लागलो. तसेच हेल, तसेच उच्चार, फार काय आग्ग्ये ह्यां (बोला, काय आहे) असे म्हणताना मीही बंगाली लोकांप्रमाणे धोतराचा सोगा एका हातात, आणि दुसऱ्या हाताने डोक्यावरील केस सावरीत बोलू लागलो. दशाश्वमेध घाटावर मी रोज सकाळी पोहण्यास आणि संध्याकाळी फिरण्यास जात असे. तेथे बंगाली स्त्री पुरुष हजारोंनी जमत. दुर्गापूजेच्या उत्सवाची गर्दी तर विचारूच नका. मला तर बंगाली लोकांचे असे वेड लागले

होते, की मला एखादी बंगाली बायको मिळावी असे मला वाटू लागले! बंगाली बायका तशा सुंदर म्हणता येणार नाहीत. पण सुंदर बंगाली तरुणी म्हणजे देहभान हरपण्यास लावणारी वस्तू आहे यात शंका नाही. लांब केस मोकळे सोडलेली, मोठ्या डोळ्यांची, भांगेत सिंधूर घातलेली, पायाला आळत्याचा रंग लावलेला, पदराला किल्ल्यांचा जुडा, हातात पूजेचे साहित्य घेऊन निघालेली बंगाली युवती म्हणजे मूर्तिमंत काव्यच होय किंवा हातात धरून हलकेच दाबले की अमृताच्या धारा बाहेर पडाव्या असा रसगुल्ला म्हणाना! बंगाली घरात मालकिणीला कर्ती म्हणतात, सूनबाईला बोऊमा (वधूमा), धाकट्या भावाला खूखा, बहिणीला खुखन, मोठ्या भावाला बोडोदा, घरच्या यजमानाला कोर्ता (कर्ता) असे म्हणतात.

एक दिवस मी केदार घाटावर पोहत होतो. वेळ संध्याकाळची होती. दिवस उन्हाळ्याचे होते. गंगेचे पात्र उन्हाळ्यात लहान होते. ते पोहून जाणे अवघड नाही. गंगा पार करण्यास मला सतरा मिनिटे लागत. त्या दिवशी पोहत पोहत मी लांब निघून गेलो. परत यायला थोडा उशीर लागला. घाटावर एक प्रतिष्ठित बंगाली गृहस्थ उभे राहून माझ्याकडे पाहात होते. त्यांच्याबरोबर त्यांची मुलगी होती. त्या गृहस्थांना वाटले मी पाण्यात गटंगळ्या खातो आहे. ते अस्वस्थ होऊन काठावर उभ्या असलेल्या माझ्या मित्रांना म्हणू लागले, 'अहो, त्याला वाचवा, तो बुडून जाईल.' मी हलके हलके घाटाकडे आलो. पाहातो तो ते गृहस्थ अस्वस्थ होऊन माझ्याकडे पाहात होते. त्यांच्याजवळ त्यांची मुलगी उभी होती. अहाहा, काय ते तिचे सौंदर्य! तिचे वय सोळा-सतराचे असावे. ती गोरीपान होती. तिची वस्त्रे पांढरी शुभ्र होती. तिने आपले केस मागे वळवून वर बांधले होते. तिचे डोळे मोठे आणि भावपूर्ण होते. आपल्या बापाप्रमाणेच तीही चिंतायुक्त होऊन माझ्याकडे पाहात होती. तिला पाहताच मी स्तिमित झालो. तिच्या डोळ्यांतील काळजीच्या छटा पाहून मी धन्य झालो. त्याक्षणी मला वाटले ही मुलगी माझ्याबद्दल काळजी करीत आहे. अशा सुंदर मुली आपल्याबद्दल आस्था दाखवू लागल्या तर मनुष्य जगण्याचीच धडपड करील. सुखासुखी मरण कशाला पत्करील?

मी घाटावर परत आल्यावर त्या गृहस्थांना समाधान झाल्यासारखे दिसले. ते आणि त्यांची मुलगी ही तेथून निघून गेली. आज त्या गोष्टीला चाळीस वर्षे झाली. पण त्या मुलीचा चेहरा काल पाहिल्यासारखा वाटतो आहे.

मी बंगाली लग्नसमारंभांत भाग घेतला, त्यांची भजने ऐकली, बंगाली मुले ओरिसातील पूरपीडितांसाठी वर्गणी गोळा करीत, गाणी म्हणत हिंडत, त्यांच्यात

सामील झालो. त्यांतील एक ओळ मला अद्याप आठवते.

बोख्खे हानीचे घोनो कोराघात, भावे
कोवे जावे जीबोनो ताहार

पूरपीडित वक्षस्थळे बडवून घेताहेत. आपला प्राण केव्हा जाईल असे त्यांना वाटत आहे. आम्ही भिक्षेची झोळी घेऊन मोठमोठ्याने गाणी म्हणत गल्ल्यातून हिंडत असू. पाच-पाच, सहा-सहा मजली घराच्या गच्चीवरून, बायका कपडे, पैसे फेकीत ती आम्ही साठवीत असू. बंगाली वैष्णवांचे भजनी मेळे निघत. एक वैष्णव विद्यार्थी मोहिनी रॉय हा माझा मित्र होता. तो भजनी मेळा घेऊन हिंडे. मुले पखवाज वाजवीत हरिबोलो, बोल हरी, किंवा चैतन्य महाप्रभू नित्यानंद असे म्हणत हिंडत. त्यांच्यांत मी सामील होत असे. कॉलेज सुरू झाल्यावर माझा पहिला मित्र झाला तो म्हणजे जोगेशचंद्र मुजुमदार हा होय.

जोगेशचंद्र मुजुमदार म्हणजे एक असाधारण व्यक्ती होती. हा चिटगांग जिल्ह्यातील एका खेड्याचा. मॅट्रिक पास झाल्यावर तो घरातून पळून गेला. ब्रह्मदेशात त्याला मोजणी खात्यात नोकरी लागली. त्या निमित्ताने तो मंडाले, मेम्यो, मोलमीन, रंगून इत्यादि ठिकाणी हिंडला. पुढे आपण बी. ए. व्हावे अशी त्याला इच्छा झाली. नोकरीला रामराम ठोकून तो बनारसला आला. नोकरीतून त्याने थोडेफार पैसे साठविले असावेत. बंगालीटोल्यात तो एका ब्राह्मण पुरोहिताच्या घरी राहात असे. तो रोज पायी कॉलेजला जाई. मीही पायी जात असल्यामुळे आमची लौकरच गट्टी जमली. आणि मग संध्याकाळी फिरायला म्हणून किंवा एकत्र अभ्यासासाठी म्हणून त्याच्या किंवा माझ्या घरी आम्ही भेटलो नाही असा एक दिवस जात नसे. मुजुमदार माझ्याकडे आला की मी रव्याचा हलवा करी. आणि खाणेपिणे झाल्यावर आम्ही फिरायला जात असू. त्याचे इंग्रजीचे ज्ञान यथातथाच होते. उच्चारही गमतीचे असत. तो आस्क या शब्दाऐवजी ॲक्स म्हणे. अमका माणूस चांगला आहे असे म्हणायचे तर ही इज ए फाइन फेलो असे म्हणे. महाराष्ट्रीय मुलींचे चेहरे अगदी गोल असतात असे त्याचे मत होते. त्यांना तो राउंड टेबल कान्फरन्स म्हणे. गोखले या शब्दाचा उच्चार तो नेहमी गोखेल असा करी. मी त्याच्याशी नेहमी बंगालीतच बोले. तो पूर्व बंगाली होता. पश्चिम बंगाली आणि पूर्व बंगाली या बोल भाषांतील फरक म्हणजे सावंतवाडीकडची मराठी आणि वऱ्हाडी बोली, यातील फरक इतकाच आहे. मुजुमदाराच्या सहवासामुळे मला पूर्व बंगालची भाषाही थोडी थोडी समजू लागली होती. त्याच्यामुळे मला अनेक बंगाली गाणी पाठ झाली. बंगालचे स्वदेशगीत तो मोठा भावनावश होऊन म्हणे. भावांचे

आणि मातांचे इतके प्रेम तुम्ही कोठेही गेलात तर तुम्हांला सापडेल काय ? हे माते, तुझे दोन्ही चरण मी माझ्या वक्षस्थळावर धारण करतो. असा देश तुम्ही कोठेही शोधलात तरी सापडायचा नाही. या देशातच जन्म यावा, या देशातच मरण यावे.

भायेर मायेर एतो स्नेहो, कोथाय गेले पावे केहो
ओमा तोमार चोरोण इटी, बोख्खे आमार घोरी
एई देशेते जोन्मीजेनो एई देशेते मोरी
एमोन देशटी कोथाउ खुजे पावेनाको तुमी
शेजे आमार जन्मभुमी

हे गाणे ऐकून माझे शरीर थरारून जाई. मुजुमदाराच्यामुळेच मी सायमन कमिशन बहिष्कारात भाग घेतला असावा. लाहोर राजबंदींपैकी जतीन दास साठ दिवस उपवास करून मरण पावला. त्याचा देह लाहोरहून कलकत्त्याला नेण्यात आला. मोगलसरायवरून गाडी गेली तेव्हा बनारसहून जतीनच्या देहाचे अंतिम दर्शन घेण्यास हजारो माणसे गेली होती. त्यांत मी आणि मुजुमदार होतो. जतीनचा देह बर्फात झाकला होता. मुजुमदार मला बंगाली क्रांतिकारकांच्या अनेक कथा ऐकवी. त्याच्यामुळे माणिकतोला बाँब प्रकरण, बारींद्रकुमार घोष, कन्हैयालाल दत्त, गोस्वामी, चितागांग शस्त्रागार हल्ल्यातील अनंतसिंह, राशबिहारी बोस इत्यादींच्याबद्दल मला बरीच माहिती मिळाली. मुजुमदाराला नाटकाचा नाद होता. युनिव्हर्सिटीत मी एखाददुसरे बंगाली नाटक पाहिले असावे ते त्याच्यामुळे. द्विजेंद्रलाल रायचे शिकंदर आणि चंद्रगुप्त मौर्य या नाटकात शिकंदरच्या बंडखोर ग्रीक शिपायांचे सांघिक गीत बरेच दिवस माझ्या तोंडात होते.

ज्यावेळी मेघांनी व्याप्त अशा गगनात गर्जना होते, धो धो पाऊस पडतो, भीतीने पृथ्वी आपले डोळे झाकून घेते, चंद्र आणि तारका लुप्त होतात त्यावेळी आम्हांला आमच्या झोपड्यांच्या राण्यांची, आमच्या हृदयाच्या स्वामिनींची आठवण येते.

जो खोनो शोधोनो गोगोन गोरोजे, बोरीशे कारोको धारा
शोभोये अबोनी आबोरी नोयोन लुप्त चोंद्र तारा
आमार हृदय रानि शेजेगो आमार कुटिरो रानी

मुजुमदाराच्यामुळे बंगाली पद्धतीचे जेवणही मला खाण्यास मिळाले. बंगाली लोक ताटात किंवा पत्रावळीत प्रथम भात वाढतात आणि मग भाज्या चटण्या वाढतात. आंबट पदार्थाला ते आम्ल आणि तिखट पदार्थाला ते झाल (जहाल)

म्हणतात. मासे आणि मांस हे पदार्थ त्यांच्या खाण्यात असतात.

माझे दोन बंगाली मित्र होते. एक महेंद्रचंद्र भट्टाचार्य आणि दुसरा गिरिजाकुमार भट्टाचार्य. तेही शहरात राहात आणि कॉलेजला पायी येत. ते हाताने स्वयंपाक करून खात. मी एकदा त्यांच्याकडे गेलो. त्यांनी मला जेवणाचा आग्रह केला. 'अरे काय काय करीत आहात' म्हणून मी त्यांना विचारले. गिरिजाकुमार (हा पुढील शिक्षणासाठी गौहाटीला गेला) भाजीला फोडणी देत होता. मी जवळ जाऊन पाहिले. भांड्यात मासे कापून टाकले होते. त्यांचे डोळे तसेच होते. मला वाटले ते डोळे विषण्णपणे माझ्याकडे सारखे टक लावून पाहात आहेत. माझ्या पोटात कालवाकालव झाली. मी भट्टाचार्याला म्हटले, 'अरे मला नको हे जेवण, ते मासे माझ्याकडे सारखे टक लावून बघत आहेत.' भट्टाचार्य मोठ्याने हसला. पण आजतागायत मासे खाण्याची मला हिंमत झाली नाही.

इ. स. १९२८ च्या ऑगस्ट महिन्यात आम्ही चौघेजण जोगेशचंद्र मुजुमदार, विजयचंद्र बानर्जी, गांगुली आणि मी असे—सायकलीवरून अलाहाबादला गेलो. अलाहाबाद हे बनारसहून चौऱ्यांशी मैल आहे. ग्रँड ट्रंकची उत्तम अशी सडक आहे. चांदणी रात्र होती. मला वाटते ती आषाढी एकादशी असावी. आम्ही रात्री एके ठिकाणी अर्धा पाऊण तास विश्रांती घ्यावी म्हणून थांबलो. आमच्या बरोबरचे फराळाचे डबे आम्ही काढले आणि परसस्परांचे अन्न काढून घेऊन सर्वांनी मिळून जेवणावर ताव मारला. जेवताना मला वरण आणि भाजी यात काही वासाचा पदार्थ असल्यासारखे वाटले. मला वाटले लसूण-बिसूण घातले असावे. मी सहज विचारले, "अरे जेवणात काय घातले आहे ?" मुजुमदार हसत म्हणाला "काही विशेष नाही. बकरीचे मांस घातले आहे" त्याचे हे बोलणे ऐकून माझ्या पोटात ढवळू लागले. शुक्राचार्यांचे पोट फाडून कच बाहेर आला तसे माझ्या पोटात गेलेली बकरी बाहेर येते की काय असे मला वाटू लागले. मी माझ्या मित्रांवर विलक्षण रागावलो. मी म्हटले, 'मूर्खांनो, मी ब्राह्मण, त्यातून वैष्णव, आणि आज आषाढी एकादशी. मला मांस खाऊ घातलेत. हे पाप कोठे फेडाल ?' माझे मित्र गप्प झाले. आपण काहीतरी पाप केले या जाणिवेने मी बराच वेळपर्यंत तळमळत होतो. आज त्या गोष्टीचे मला हसू येते. शाकाहारात काही विशेष पुण्य दडले आहे आणि मांस खाण्यात काही पाप आहे असे मला वाटत नाही. मी स्वतः त्या दिवसानंतर पुन्हा म्हणून मांस खाल्ले नाही. आम्ही सकाळी अलाहाबादेस पोहोचलो. एका बंगाली कुटुंबात आमचा मुक्काम होता. तेथील जेवणात आठवणीत राहण्यासारखी गोष्ट म्हणजे घरमालक जेवीत असता त्याची बायको त्याच्याजवळ

बसून पंखा ढाळीत होती. ते दृश्य मला मोठे मनोरम वाटले. दुसऱ्या दिवशी आम्ही संध्याकाळी अलाहाबाद सोडले आणि रात्रभर प्रवास करून सकाळी बनारसला पोहोचलो.

ऋषिकुमार चटर्जी हा माझा परमस्नेही. याच्यामुळे मला बंगाली साहित्याचा आणि युरोपियन भाषेतील साहित्याचा परिचय झाला. हा पूर्व बंगालमधील फरीदपूरचा राहणारा. त्याचे आईवडील अनेक वर्षांपासून बनारसला स्थायिक झाले होते. बनारसला त्यांचे स्वतःचे घर होते. ऋषिकुमाराचा भाऊ हा झांशीच्या मॅक्डोनल हायस्कूलचा हेडमास्तर होता. तो उन्हाळ्याच्या सुट्टीत बनारसला येत असे. ऋषिकुमार हा उत्तमपैकी चित्रकार होता. तो बासरी छान वाजवीत असे. पुष्कळदा आम्ही मिळूनच कॉलेजला जात असू. ऋषिकुमाराच्यामुळेच माझा कार्माइकेल लायब्ररीत प्रवेश झाला. त्याच्या नादाने मी युरोपियन भाषेतील बरेच साहित्य वाचून काढले. नार्वेजियन लेखक नुट ह्याम्सन, स्वीडनची लेखिका सेलमा लेगेरस्लॉफ, रशियाचे पुष्किन, गोगोल, डोस्टोव्हस्की, गॉर्की, चेकोव्ह, टूर्जीनेव्ह, फ्रान्सचे व्हिक्टर ह्यूगो आणि अलेक्झांडर डूमास अशा कितीतरी लेखकांच्या कादंबऱ्या मी वाचल्या त्या ऋषिकुमारच्या उत्तेजनानेच. ऋषिकुमारला बंगाली काव्याची आणि विनोदी लेखाची विशेष आवड होती. तो मला बंगाली पुस्तके आणि मासिके वाचण्यास देत असे. बंगाली भावगीते आणि रोमँटिक कविता या त्याच्या विशेष आवडीच्या. त्याने वाचून दाखविलेली मोहितलाल मुजुमदार या कवीची एक कविता चाळीस वर्षांनंतरही माझ्या आठवणीत राहिली आहे. विषय एकांतातील पतिपत्नीचा संवाद हा आहे.

डोळ्याला दिव्याचा त्रास होतो आहे. कमी कर ना. अरे दिवा विझूनच गेला काय ? वाहवा, दिवा बारीक करता येईना. काय तुझी हुशारी.

चोखे लागे आलो कोरे दावो कोम
ओह जा बाती गेलो निवे एक दोम
हावे नाको ज्वालते, वारे बहादूर
जाना गेचे बुद्धी जाय कोतों दूर

बरे हे सांग, मी मेल्यावर तू खूप रडशील ना. मग आपल्या बाहुपाशात तू कुणाला बरे घेशील ?

आमी मारा गेले तुमी खूब कांदिबे
तो खोन ये वाहडोरे कारे बांधिबे

अरे हे काय, तुझ्या डोळ्याला पाणी ! अरे, मी मरते कशाला ? तुझा उगीच छळ केला.

एकी एकी चोखे थेके पोडे केनो जोल
मोरे जावो केनो आमी मिछे कोरी छेल

बरे फुले देणार होतास ना. वेल फूल, चमेली जे तुला हवे ते दे. या गालाचे चुंबन घेतलेस, आता या गालाचे घे.

वेल फूल चामेली, जा खुशी ता दावो
ये गाल ते चुम्माखेले, हे गाले खावो

ऋषिकुमाराच्या विनोदी आणि क्वचित् अश्लील अशा गोष्टींनी आमचे हसता हसता पोट दुखू लागे. त्याने सांगितलेल्या काही गोष्टी अद्याप माझ्या लक्षात राहिल्या आहेत.

एक परीट आपले गाढव घेऊन एका शाळेवरून चालला होता. शाळेत मास्तर मुलांना दटावून म्हणत होता, ' अरे गाढवांनो, मी तुम्हांला माणूस केले आहे हे विसरू नका. ' परिटाने हे शब्द ऐकले. त्याला वाटले, आपल्या गाढवाचा माणूस बनवावा म्हणजे राबवायला तितकाच बरा. तो मास्तराकडे गेला आणि त्याला म्हणाला, ' मास्तर, हे माझे गाढव. याचा माणूस करून द्या, ही मुले गाढव होती. त्यांची तुम्ही माणसे केली असे तुमचे बोलणे ऐकून मी तुमच्याकडे आलो आहे. ' मास्तराने पाहिले की हे सावज भोळे आहे. तो परिटाला म्हणाला, ' ठीक आहे. तू हे गाढव माझ्याजवळ ठेवून जा. एक महिन्यात मी त्याचा माणूस बनवितो. ' त्याच्या सांगण्याप्रमाणे परिटाने ते गाढव तेथे ठेवले. आणि तो निघून गेला. इकडे मास्तराने ते गाढव विकले आणि त्यातून मिळालेल्या पैशावर चंगळ केली. एक महिन्यानंतर परीट मास्तरांकडे आला. मास्तरने सांगितले, ' काय भाग्यवान आहेस रे तू , तुझ्या गाढवाचा माणूस झाला, इतकेच नव्हे तर त्याची बुद्धिमत्ता पाहून सरकारने (त्यावेळी बंगालमधे मोगलांचा अंमल होता) त्याला हाजीपूरचा काजी (मॅजिस्ट्रेट) म्हणून नेमला आहे. जा, त्याला घेऊन जा. ' आपले गाढव हे मॅजिस्ट्रेट झाले आहे हे ऐकून परटाला मोठा आनंद झाला. तो तडक हाजीपूरला गेला. हाजीपूरचे काजीसाहेब हे कोर्टात खटले ऐकत बसले होते. तो त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिला. आणि त्यांच्याकडे दोर फेकून म्हणाला, ' अरे चोरा, तू इथे येऊन बसला आहेस काय. चल, मी तुला घरी घेऊन जायला आलो आहे. ' हा असा वेड्यासारखा का वागतो आहे हे काजीस कळेना. त्याने विचारले, ' काय भानगड आहे ? ' परीट म्हणाला, ' तू माझा गाढव. एक महिन्यापूर्वी तुझा माणूस करण्यासाठी म्हणून मी तुला मास्तराकडे दिला होता. त्याने तुला माणूस बनवून तुझा काजी केला. त्यानेच मला ही हकीकत सांगितली. आता मी तुला घ्यायला आलो आहे. हे

बघ तुला बांधून नेण्यासाठी मी दोर आणला आहे. ' काजीने परटाला आपल्या माणसाकरवी चांगलेच बदडून काढले. परीट रडू लागला. शेवटी काजीने चौकशी करून मास्तरला शिक्षा केली आणि गाढवाची किंमत परटाला द्यायला लावली.

ऋषिकुमारने सांगितलेली दुसरी गोष्ट थोडी विचित्र आहे. मी ती जपूनच सांगतो. एका बापाचे आपल्या मुलीवर अतिशय प्रेम होते. ती उपवर झाली तेव्हा बापाला काळजी पडली की कोणीही असो हिचा नवरा म्हटला की त्याच्याकडून हिला शारीरिक त्रास होणारच. त्यातल्या त्यात कमी त्रास देणारा नवरा मिळावा म्हणून त्याने नाजुकातला नाजुक असा नवरा हुडकून काढला. एकांतात त्याने आपल्या मुलीशी कसे वागावे याबद्दल त्या मुलाला काटेकोर सूचना दिल्या. लक्ष्मणरेषाच आखून दिली म्हणाना. इतके करूनही त्याचे समाधान झाले नाही. त्याने आपल्या जावयाच्या कमरेला (सुज्ञांनी ओळखावे) दोर बांधला. दोराचे एक टोक हातात धरून सासरा पलंगाखाली झोपून राहिला. आपल्या मुलीला त्रास होतो आहे असे वाटले की दोर ओढून जावयाला सावध करावा ही त्याची इच्छा. रात्री पतिपत्नींचा प्रणय रंगात आला. बायकोला आपला नवरा अर्धवटासारखा का वागतो हे समजेना. ती त्याला म्हणाली, ' आज केनो आधा शुधा, हा अर्धवट प्रकार काय आहे. ? ' नवरा म्हणाला, ' तोर बाबार शूतेर बांधा, तुझ्या बापाने दोर बांधला आहे ' आणि मग बापाचा भ्रमनिरास होऊन त्याने म्हटले, 'अरे होरे देरे भोरे' आणि हातातून दोर टाकून दिला.

नमुना म्हणून वरील दोन गोष्टी सांगितल्या. ऋषिकुमारच्या लग्नाला मी हजर होतो, बंगाली लोक लग्नात मुंडावळ बांधतात ती महाभारतकालीन राजे लोकांच्या मुकुटाप्रमाणे असते. लग्नानंतर नवऱ्या मुलाचे मित्र जमतात आणि मुलीला भेटी देतात. ती पदराने तोंड झाकून बसलेली असते. मित्रमंडळी तिला कुठे बाहुली, कुठे खेळणी अशा वस्तू देऊन थट्टामस्करी करीत असतात. मधून मधून नवरा मुलगा पत्नीचे अवगुंठन बाजूला सारून मित्रांना तिचे दर्शन घडवितो. एकंदरीत वातावरण मोठे खेळीमेळीचे असते. लग्नानंतर ऋषिकुमार मला महिनाभर भेटलाच नाही एकदा रस्त्यात त्याची अचानक गाठ पडली. तो मधुचंद्राच्या धुंदीत होता. मी त्याला हटकून म्हटले, ' अरे ऋषिकुमार, कुठे होतास इतके दिवस, कोथाई छिले भाई ? तुम्ही, आम्हांला विसरलात काय, आमाके भूले गेयेचो की ' ऋषिकुमार म्हणाला, ' अरे, मी मधुचंद्राच्या आनंदात बुडालो आहे. ' मी हसून म्हटले, ' अरे लेका, आम्हांला सांग की काय काय घडते ते. ' ऋषिकुमारने माझ्याकडे पाहिले आणि म्हटले, ' ना, भाइ ना,

आमी किचू बोलते पारीना, मी काही सांगू शकत नाही.' असे म्हणून त्याने आपल्या तोंडावर बोट ठेवले आणि तो इंग्रजीत म्हणाला, 'माय लिप्स आर सील्ड.'

माझा तिसरा परममित्र म्हणजे उमाशंकर गिरजानंद. याचे घराणे मूळचे बनारस जिल्ह्यातील. शंभर वर्षांपूर्वी त्याचे वाडवडील मॉरिशस बेटात स्थायिक झाले. तेथे गिरजानंदाचे उसाचे मळे होते. गिरजानंद हा एक सधन शेतकरी होता. मॉरिशसमध्ये फ्रेंच भाषा प्रमुख असल्यामुळे गिरिजानंद हा फ्रेंच आपल्या मातृभाषेप्रमाणे अस्खलित बोलत असे. त्याच्या मैत्रीतून मला फ्रेंच भाषेची आवड निर्माण झाली. एक दोन वर्षांत मला फ्रेंच पुस्तके वाचता येऊ लागली. अलेक्झांडर ड्यूमास यांची कादंबरी ब्लॅक टूलिप, टूलिप नोआ, ही मी मूळ फ्रेंच भाषेतून वाचून काढली. मोडकी तोडकी का होईना मी फ्रेंच बोलायला शिकलो. कोमासे–सुरू करा, उइ–हो, मर्सी–आभार, पार्ले वू फ्रांसाय–तुम्ही फ्रेंच बोलता काय, सिल वू प्ले–तुम्हांला आवडले तर, असे शब्द माझ्या तोंडात खेळू लागले. गिरजानंद हा वसतिगृहात राहात असे. त्याच्यापाशी इंग्रजी आणि फ्रेंच पुस्तकांचा चांगला संग्रह होता. तो हिंदी अडखळत बोले. त्यामुळे त्याच्याशी बोलताना मोठी मौज वाटे. मी आठवड्यातून दोनतीनदा तरी त्याच्या खोलीवर जाई. तोही शहरात आला की माझ्याकडे येत असे.

गिरजानंद हा गोरा असला तरी दिसायला साधारणच होता. त्याची उंची पाच फुटांहून अधिक नसावी. पण त्याचे शरीर अत्यंत पीळदार होते. त्याची मनगटे हातात मावत नसत. त्याच्याकडे पाहून गिरजानंद म्हणजे नुसते मसल्स आणि तेही सुदृढ आणि पीळदार, असे वाटे. त्याच्या पोटऱ्याही अशाच भरदार आणि टणक होत्या. भारतातील नाजुकपणा, (लहान मनगट, पातळ बोटे, किंवा भुलभुलीतपणा) त्याच्यात नव्हता. युरोपातील शेतकरी त्याच्यासारखे दिसत असावेत. आम्ही दोघे फिरायला निघालो की रस्त्यावरून जाणाऱ्या बायका मागे वळून त्याच्याकडे पाहात. एका स्थूल बंगाली प्राध्यापकाची अत्यंत देखणी बायको त्याच्यावर फिदा झाल्याचा त्यावेळी बराच गवगवा झाला होता. तिने एकदा त्याच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला; पण, 'आपण तिला सौम्य शब्दात नाही म्हटले' असे त्याने एकदा मोकळेपणे सांगितल्याचे मला आठवते.

एकदा गिरिजानंद माझ्या घरी आला होता. आम्ही घरातील राममंदिरात गेलो. तेथे आत्याबाई पूजा करीत होत्या. आम्हांला पाहून त्या बाहेर आल्या. मी त्यांची आणि गिरिजानंदाची ओळख करून दिली. त्याने विनयाने आत्याबाईंना नमस्ते म्हटले. पण आत्याबाईंनी त्याला पाहिले मात्र, त्यांनी चटकन

आपला पदर सावरला. त्या थोड्या लाजल्या असाव्यात असा मला भास झाला. बोलताना त्या तिरप्या नजरेने गिरिजानंदाकडे पाहात. मला त्यावेळी त्या वागणुकीचे विशेष काही वाटले नाही.

पुढे १९३९ मध्ये मी माझे सासरे प्राध्यापक पुणतांबेकर यांच्याकडे बनारसला गेलो होतो. माझी पत्नी आणि मुले यांना घेऊन मी आत्याबाईंच्याकडे गेलो. त्यावेळी त्या मुन्शी घाटावर फाळक्यांच्या वाड्यात राहात होत्या. इकडची तिकडची बोलणी झाल्यावर आत्याबाईंनी मला मध्येच विचारले, "अरे सेतू, मागे तुझा एक मित्र तुझ्याबरोबर आला होता, तो कुठे असतो रे ?" मला काय वाटले कोणास ठाऊक. मी विचारले, 'कोण गिरिजानंद का ?' आत्याबाई खुष होऊन म्हणाल्या, 'हो हो, गिरिजानंद, गिरिजानंद' ते नाव त्यांनी अगदी आवडीने उच्चारले, जणू काय त्या भगवान शंकराचेच नाव घेत होत्या. ही साठ वर्षांची म्हातारी आणि तिच्या स्मृतीत अजून माझा तरुण मित्र तरळतो आहे !

माझा चौथा मित्र म्हणजे सीताराम वर्मा. हा श्रीवास्तव कायस्थ. युनिव्हर्सिटीत आम्ही रोज सायकलीवरून मिळून येत असू. त्यामुळे आमची गट्टी जमली. सीताराम वर्माचे उर्दू चांगले होते. आम्ही कैक वेळा एकत्र फिरायला जात असू. आज सीताराम वर्मा एक नावाजलेला वकील आहे.

जुन्या डायऱ्या पाहात असता मला एकोणीसशे सत्तावीसमध्ये मी करून ठेवलेल्या काही नोंदी आढळल्या. डायऱ्यांतून सतत लिहीत जाणे मला जमले नाही. मध्ये दोन दोन वर्षे नोंदी अजीबात नाहीत. एकोणीसशे सत्तावीसच्या नोंदीवरून माझ्या दिनचर्येची, खाण्यापिण्याची, अभ्यासाची आणि वाचनाची कल्पना येईल.

त्याकाळी एकूण माझे खाण्यापिण्याचे हाल होत. दोन चार आणे हातात असले की दूध, जिलबी, शिरा किंवा मलई असे पदार्थ घेऊन मी खात असे. कपडेलत्ते फार थोडे होते. पण अभ्यास किंवा इतर पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादींचे माझे वाचन सतत चालू असे. आत्याबाईंचा भाचा विश्वनाथ घुले याच्या नादाने मी व्यायाम करू लागलो. शंभरपर्यंत दंड आणि दीडशेपर्यंत बैठका अशी मी मजल मारली. शीर्षासनाचाही अभ्यास मी केला. पण उपाशी किंवा अर्ध उपाशी पोटावर व्यायाम झेपेनासा झाला. त्यामुळे मी व्यायाम सोडला. पोहण्याचा व्यायाम हा माझा आवडता व्यायाम होता. पाण्यामध्ये तास तासभर डुंबण्यात मला विलक्षण आनंद वाटे. या व्यायामात घाम नाही, धापा नाहीत, भूकतहानेची विशेष आठवण राहात नाही. गंगेच्या घाटावरील दृश्ये पाहात

धारेबरोबर पोहत जाण्याची मजा काही आगळीच आहे.

आमच्या युनिव्हर्सिटीत यू. टी. सी. ची व्यवस्था होती. डॉक्टर आळतेकर, पुणतांबेकर इत्यादी प्राध्यापक, आणि देशपांडे, गायनकर इत्यादी माझे मित्र यू. टी. सीत होते. मला वाटले आपणही यू. टी. सीत दाखल व्हावे. काही दिवस मी परेडसाठी जात होतो. परेड संध्याकाळी असे. रविवारी सकाळी परेड आणि खेळ हे कार्यक्रम असत. मी कॉलेजमधून दुपारी घरी यावे. ट्यूशन आटपावे. पुन्हा पाच मैल सायकलीवर जावे. परेडमध्ये भाग घ्यावा. आणि सात साडेसातपर्यंत तेथून निघून पाऊसपाण्याच्या दिवसांत सायकलीवरून घरी परत यावे. निघण्यास फारच उशीर झाला तर मी वसतिगृहात बी. जी. पाटील याजकडे राहात असे. पण रोज तसे करता येईना. शिवाय एक दिवस रविवारी सकाळी परेडच्या वेळी आमचा एक अधिकारी दुर्गादास भानुभास्कर हा एका विद्यार्थ्यावर ओरडला. मला राहवेना. मी ओरडलो, ' धिस इज नॉट जंटलमन्ली ' त्याने मला मैदानातून बाहेर काढले आणि अर्धा तासपर्यंत मला परत घेतले नाही. तो म्हणाला ' देर इज नो जंटलमन इन दी आर्मी. '

एकदा मी परेड करून परत येत होतो. पावसाचे दिवस होते. युनिव्हर्सिटीच्या आवाराबाहेर पडल्यावर शहरात येताना गुप्ताघाटाच्या दिशेने जाऊन परत वळावे लागते. त्या भागाला लंका म्हणतात. हा रस्ता निर्जन होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी मोठमोठी झाडे आहेत. रस्त्यावर दिवे अजीबात नव्हते. मी रस्त्यावर यायला आणि पाऊस पडायला एकदमच सुरवात झाली. पाऊस धो धो पडत होता. मी एका झाडाखाली उभा राहिलो. तितक्यात सायकलचा दिवा विझला. दिवा पेटवावा तर काड्याची पेटी जवळ नाही. दिव्याशी खटपट करण्यात माझे हात काजळाने काळे झाले. पावसाने तोंड भिजले ते हातांनी पुसू लागलो तो तोंडावर काजळ फासले गेले. त्या गोष्टीची मला जाणीवच नव्हती. पाऊस थांबल्यावर मी सायकलवरून निघालो. शहरातून येताना मला दरोडेखोर समजून लोक संशयाच्या नजरेने माझ्याकडे पाहू लागले. ते माझ्याकडे असे का पाहतात हे मला समजेना. मी घरी आल्यावर आत्याबाईंनी माझ्याकडे पाहून म्हटले ' अरे, काय रे तुझी ही अवस्था ' त्या दिवसापासून मी यू. टी. सी. चा नाद सोडला.

बनारस हे शहर म्हणजे कधी न थांबणाऱ्या, समुद्रावरील लाटाच जणू! माझ्या मनावर क्षणोक्षणी शेकडो संस्कार होत होते, उत्सव, सभा, व्याख्याने, इत्यादींची सारखी गर्दी असे. कॉलेजमध्ये तर दर आठवड्याला कोणी ना कोणी व्याख्यान देत असे. सी. व्ही. रामन, मेघनाद सहा, राधाकुमुद मुकर्जी

इत्यादींची व्याख्याने मी कॉलेजमध्येच ऐकली. बनारसला चंद्रग्रहण, सूर्यग्रहण इत्यादि प्रसंगी गर्दीची व्यवस्था ठेवण्याच्या कामात स्वयंसेवक म्हणून मी काम केले. आमच्या घरापासून जवळच एक चर्च होते. तेथे खिस्ती मिशनरी प्रवचने देत. त्यांच्याशी मी वाद घालीत असे. दशाश्वमेध घाटावर खिस्त्यांचे एक रीडिंगरूम असे. तेथे मी नेहमी जाई. स्मिथचे 'इस्लाम इन मॉडर्न इंडिया' या विषयावरील बरेच लेख त्या रीडिंगरूममध्ये येणाऱ्या नियतकालिकांतून वाचलेले आठवतात. इस्लाममधील कादियानी (अहमदिया) पंथाची तपशीलवार माहिती मला प्रथम वाचावयास मिळाली ती रीडिंगरूममध्ये. रीडिंगरूमचा चालक बंगाली खिस्ती होता. त्याने हिंदू धर्माविषयी काही अनुदार उद्गार काढले. मी त्याच्याशी वाद घालू लागलो. शेवटी त्याने चिडून रीडिंगरूममध्ये येत जाऊ नका म्हणून मला बजावले.

बनारसकडे नाटकांची परंपरा नव्हती. बंगाली नाटके, आणि तीही कॉलेजमध्ये, अधूनमधून होत. पण बनारसमध्ये लोकांना गाण्याबजावण्याचा चांगलाच षौक असे. गाण्याच्या अनेक मैफिली मी पाहिल्या. एकदा मनोहर बर्वे यांचा कार्यक्रम झाला होता. टाऊन हॉलमध्ये त्यांनी म्हटलेल्या गाण्यापैकीं एक ओळ अद्याप माझ्या आठवणीत राहिली आहे.

अब तो बेडा पार कर दे नंद के दुलारे

दशाश्वमेध घाटावर प्रवचने, भजने, कीर्तने आणि व्याख्याने यांची नेहमी गर्दी चालू असे. बुढवा मंगल म्हणून एक उत्सव बनारसला होतो. म्हाताऱ्यांनी गंगेवर जमून नावांतून रात्रभर गाण्याबजावण्याचे कार्यक्रम करावे असा प्रघात आहे. त्या दिवशी रात्री गंगेत शेकडो नावा सोडण्यात येत. कलावंत आणि कलावंतिणी यांचे नृत्यगायनाचे कार्यक्रम चालू असत, नर्तकीच्या नाजुकपणाच्या आख्यायिका लोक सांगत. मला एकजण म्हणाला, 'समोर बतासे मांडलेले, नर्तकी त्यांवरून नाच करीत जाई, पण बतासे फुटायचे नाहीत.' दुसरा म्हणाला 'अहो हे काहीच नाही. एक नर्तकी नावेत नाच करीत होती. नाचता नाचता तिने नावेच्या बाहेर पाण्याच्या पृष्ठ भागावर थोडा वेळ नाच केला. नंतर ती परत नावेत येऊन नाच करू लागली.' अशा गप्पा चालत. या नाचगाण्यांना हजर राहणारी वृद्ध मंडळीही मोठी रंगेल असत. उत्कृष्ट अंगरखे, डोक्याला बेल-बुट्टेवाली पांढरी टोपी, गौरवर्ण, भरघोस मिशा, इत्यादींमुळे ही मंडळी मोठी रुबाबदार दिसत.

विश्वनाथाचे आणि अन्नपूर्णेचे दर्शन मी रोज घेत असे. पंचगंगा घाटावरील बदुमाधवाचे दर्शन महिन्या दोन महिन्यांतून मी एकदा घेत असे. मणिकर्णिका

घाटावरून अनेकदा जाण्याचा प्रसंग मला आला. तेथे प्रेतांचे दहन सारखे चाललेले असे. ते दृश्य पाहून मनावर मोठा गंभीर परिणाम होई. रामकृष्ण परमहंसांच्या चरित्रात मी कोठेतरी वाचले होते की रामकृष्ण परमहंस हे नावेत बसून मणिकर्णिका घाटावरून जात असता त्यांना असा भास झाला की मृतांच्या कानांत प्रत्यक्ष भगवान शंकर हे मंत्राचा उच्चार करीत आहेत. तो उतारा वाचल्यापासून तर मला मणिकर्णिका घाटाबद्दल गंभीर असे आकर्षण वाटू लागले.

अन्नपूर्णेच्या देवळात दर वर्षी अन्नकूटाचा उत्सव करीत. त्या दिवशी अन्नपूर्णा आणि विश्वनाथ या दोन्ही देवळांत शेकडो पक्वान्ने मांडून ठेवण्यात येत. ती पाहून मन थक्क होई. बनारसला त्या काळात खूपच स्वताई होती. दूध रुपयाला आठ शेर या भावाने मिळे, एकदा मी कणीक आणली, ती रुपयाला पंधरा शेराच्या भावाने. गरीबांचे स्वस्त अन्न म्हणजे सतूचे पीठ. ते मी साखर कालवून अनेकदा खाल्ले आहे.

इंटरमध्ये संस्कृतचा एक विषय असे. त्यात गीतेतील काही श्लोक, काही सुभाषिते असत. परीक्षेत त्यांचे अनुवाद करावे लागत. पाटणकर गेल्यानंतर आमच्या घरात रेव्याचे एक कुटुंब भाड्याने राहाण्यास आले. आई, वडील आणि वीस बावीस वर्षांचा एक आंधळा मुलगा वृजनंदन असे ते कुटुंब होते. तो मुलगा संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करी. सगळे व्याकरण तो तोंडपाठ म्हणत असे. बाप रोज त्याच्याकडून व्याकरण म्हणवून घेई. माझ्या कानावरून संस्कृत व्याकरण रोज जाई. पण डोक्यात कधी शिरले नाही. वृजनंदनाच्या आईमुळे बरीच हिंदी लोकगीते मात्र पाठ झाली होती. बनारसमध्ये काशी नागरी प्रचारिणी सभा म्हणून हिंदीची एक श्रेष्ठ संस्था आहे. तेथे हिंदी हस्त-लिखित आणि मुद्रित अशा हजारो ग्रंथांचा संग्रह आहे. तेथे मी मधून मधून जात असे. कॉलेजमध्ये हिंदीच्या प्राध्यापकांत भगवानदीन, श्यामसुंदरदास, अयोध्याप्रसाद अशी अखिल भारतीय कीर्तीची प्राध्यापक मंडळी होती. भगवान-दीनची, शीघ्रकवित्व आणि हजरजबाबीपणा याबद्दल विशेष ख्याती होती. वेश्या आणि मोटार यावर त्यांनी झटपट तयार केलेली एक ओळ अद्याप आठवते.

अति चपळ, अति चंचल, सदैव श्रीमंतांशीच व्यवहार, अनेकजण चढतात (वापरतात) आणि उतरतात अशा दोन वस्तू आहेत, एक वेश्या आणि दुसरी मोटार.

अति चपला, अति चंचला, धनिक संग व्योहार
उतरत चढत अनेक जन, गणिका मोटर कार

गिरिजानंद शहरात मधूनमधून येत असे. तो एका मुलीच्या प्रेमात सापडला होता. मुलगी शहरात राहात होती. माझ्या घराच्या तळावरून त्याचे प्रणयाराधन चालू असे. पुढे एम्. ए. झाल्यावर त्याचा त्या मुलीशी विवाह झाला आणि तिला घेऊन तो मॉरिशसला गेला.

त्याच्या प्रणयाराधनाची मला गंमत वाटे. तोपर्यंत मला अशी भानगड बाधली नव्हती. सुंदर मुली दिसल्या की त्यांच्याकडे निर्मळ कुतूहलाने बघावे, आणि असे सौंदर्य पाहण्यास मिळाले म्हणून धन्य मानावे, असा माझा प्रकार होता. माझ्या नजरेस बंगाली मुलीच पडत. पण कधी कधी इतर मुलींच्या सौंदर्याचा मनावर प्रभाव पडे. इ. स. १९२७ मध्ये मी आपल्या खोलीत अभ्यास करीत हिंडत होतो. खोलीच्या खिडक्या दाराएवढ्या मोठ्या असत. त्या मी उघड्या ठेवल्या होत्या. मी सहज खिडकीतून बाहेरच्या गल्लीकडे पाहिले. एक महाराष्ट्रीय मुलगी माझ्याकडे टक लावून पाहात उभी होती. ती भिंतीला टेकून उभी होती. तिचे सौंदर्य काय सांगू ? माझ्या हातातील पुस्तक गळून पडले. ती गोरीपान होती. उंच आणि सडपातळ बांधा, उभट चेहरा, पेशवाईत बायका घालीत तशी तिची वेणी होती. तिच्या अंगावर निळ्या रंगाचे नऊवारी लुगडे होते. त्यावर तिने शाल गुंडाळली होती. बनारसला तो पेशवाईतील प्रघात चालू होता. ‘काश्मीर गौर तनु लेवुनि रत्नकांची’ हे वर्णन तिला शोभले असते. आम्ही परस्परांकडे दोन तीन मिनिटे पाहिले असू. नंतर ती तेथून निघून गेली. दोनचार दिवस तरी मी हवेत तरंगत होतो. नंतर मला कळले की ती एका चांगल्या कुटुंबातील सून होती. आणि मग हळूहळू तिची आठवण नाहीशी होत गेली.

इ. स. १९२८ च्या एप्रिलमध्ये मी इंटरची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झालो. माझा तेरावा क्रमांक आला. पहिला वर्ग मिळेल अशी माझी अपेक्षा होती, माझे अर्थशास्त्राचे प्राध्यापक सिपाहीमलानी मला फार चाहात असत. त्यांच्यापाशी मी माझी रुखरुख व्यक्त केली. त्यांनी माझे पेपर मुद्दाम मागवून तपासले. ते मला म्हणाले, ‘तुझे वाचन दांडगे आहे. हे तुझ्या पेपरच्या पानापानावरून दिसून येते. पण परीक्षकांना विद्वत्तेचे प्रदर्शन नको असते. त्यांना विचारलेल्या प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे हवी असतात. त्यांना हजारो पेपर तपासायचे असतात. त्यांच्याही सहनशीलतेला सीमा असते. बी. ए. मध्ये मी सांगतो तसे तू कर. पेपरवर प्रथम प्रश्न लिही. त्याच्या खाली उत्तराचे मुद्दे, मुद्याला एक परिच्छेद अशा बेताने लिही. उत्तर दोन तीन पानांच्या वर असू नये. परीक्षेची वेळ संपण्यापूर्वी अर्धा तास पुन्हा उत्तरे तपासून पाहात जा.’ त्यांचा हा उपदेश मी

तंतोतंत पाळला.

माझे काही श्रीमंत मित्र परीक्षेला न बसताच निघून जात. फर्स्ट इयरच्या परीक्षेत माझा एक काश्मिरी मित्र सूरजनाथटक्करू असाच जाऊ लागला. मी कारण विचारले तर म्हणतो काय 'माझी बायको सोळा वर्षांची आहे. परीक्षा पुन्हा देऊ शकेन. पण स्वीट सिक्स्टीन विल नॉट कम अगेन.' धन्य ते षोडष वर्ष आणि धन्य ती षोडषी!

बी. ए. ला इंग्रजी आणि मराठी या आवश्यक विषयांना जोडून मी राज्यशास्त्र आणि इतिहास हे ऐच्छिक विषय घेतले. राज्यशास्त्रात राजनीतीची तत्त्वे (पोलिटिकल थिअरी), जगातील प्रमुख देशांच्या राज्यघटना आणि भारताचा राज्यघटनात्मक इतिहास हे विषय होते. इतिहासात इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास, यूरोपचा इतिहास, आणि भारताच्या इतिहासातील प्राचीन, मध्य-युगीन, अर्वाचीन यांपैकी कोणताही एक कालखंड असे विषय घ्यावे लागत.

भारताच्या इतिहासातील प्राचीन कालखंड हा विषय मी घेतला होता. माझा मित्र सुमाधव टागोर याने मध्ययुगीन भारत हा विषय घेतला. आमच्या प्राचीन इतिहासाच्या विभागात मिस जयस्वाल नावाची एक मुलगी होती. सावळा वर्ण, थोराड शरीर, निदान पावणे दोनशे पौंड वजन अशी ती मूर्ती होती. सुमाधव टागोर रंगेल वृत्तीचा होता. त्याच्या मध्ययुगीन इतिहासाच्या वर्गात एकही मुलगी नव्हती. मी त्याला म्हटले, 'अरे सुमाधव, आमच्या वर्गात एक सुंदर पाखरू आले आहे. तू मध्ययुगीन इतिहासाचा वर्ग सोडून दे. आमच्या वर्गात ये. अरे, तू देखणा आहेस, तुला पर्सॅनलिटी आहे. (हे ऐकून सुमाधवने आपला नेकटाय सावरला). दोन वर्षे तुझी चंगळ राहील.' त्या वेड्यापीराने तावडतोब प्राचीन भारताच्या वर्गात आपले नाव घातले. आमचे प्राध्यापक गंगाप्रसाद मेहता खुष झाले. तेही त्याला म्हणाले, 'देर इज ए लेडी इन दि क्लास' ज्या दिवशी सुमाधवला वर्गात बसावयाचे होते त्या दिवशी तो नवऱ्या-मुलासारखा सजून आला होता. वर्ग सुरू झाला तेव्हा मिस जयस्वाल हजर नव्हती. सुमाधवचे डोळे सारखे दाराकडे लागले होते. इतक्यात ती मुलगी आत आली. तिला सुमाधवने पाहिली मात्र, त्याचा चेहरा गोरामोरा झाला. त्याने माझ्याकडे इतक्या रागाने पाहिले की मी आतून काहीसा अस्वस्थ झालो. वर्ग सुटल्यावर त्याने मला धरले, तो संतापून मला म्हणाला, 'सेतुमाधव, तुला काय करू, न् काय नाही असे मला झाले आहे. अरे लेका, हे पाखरू काय? आणि याच्यासाठी तू मला मध्ययुगीन इतिहास सोडायला लावलेस. कोठे फेडशील हे पाप? मी म्हटले, 'जाऊ देरे, तुझ्याप्रमाणे मला सौंदर्यदृष्टी नाही, मला वाटले

मुलगी म्हटली की ती पाखरूच. तुझा चोखंदळपणा मला कोठून येणार ?’ सुमाधवचा माझ्यावरचा राग बरेच दिवस गेला नाही.

बनारस युनिव्हर्सिटीत महिलांचे कॉलेज असे. पण बी. ए. मध्ये अनेक मुली आमच्या कॉलेजमध्ये शिकण्यास येत. आमच्या इंग्रजीच्या वर्गात पाच सात मुली होत्या. रेणू रॉय, नीलिमा चालिहा (आसामी), या दोन मुली मला आठवतात. राज्यशास्त्राच्या वर्गात बी. ए. फायनलला मी असताना काही मुली होत्या. त्यांपैकी मोठ्या डोळ्यांची आणि सावळ्या वर्णाची इंदुमती बक्षी मला आठवते. तिच्यामुळेच माझा मित्र, वामनराव नातू (दिवंगत टेक्स्टाइल कमिशनर) याला एक वर्षासाठी कॉलेज सोडावे लागले. वास्तविक पाहता तीच त्याच्या मागे लागली होती. त्यावेळी मी सीनियर बी. ए. ला होतो. वामनराव ज्यूनियरला होते. पण आमचे राज्यशास्त्राचे वर्ग एकत्र घेत. त्यामुळे मी आणि वामनराव नातू वर्षभर एका बाकावर बसत असू. या प्रकरणात वामनरावाचे एक वर्ष फुकट गेले. वास्तविक तो १९३१ मध्ये बी. ए. व्हावयाचा. पण त्याला १९३२ मध्येच बी. ए. ला बसता आले. वामनराव नातू अतिशय बुद्धिमान होते. इ. स. १९२९ मध्ये बनारस युनिव्हर्सिटीचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक श्री. अधिकारी यांची मुलगी भक्ती ही पहिल्या वर्गात (बी. ए. ला) आली. १९३० च्या बी. ए. च्या परीक्षेत मी पहिल्या वर्गात पहिला आलो. १९३१ च्या परीक्षेत चंद्रबलि पांडे (सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक) हा पहिला आला आणि १९३२ च्या परीक्षेत वामनराव नातू हे पहिले आले.

भक्ती अधिकारी ही बंगाली मुलगी मोठी चुणचुणीत होती. लहानसा बांधा, डोळ्याला चष्मा पण चेहेऱ्यावर असामान्य बुद्धिमत्तेची झाक असलेली ती मुलगी होती. माझ्या बुद्धिमत्तेचा आणि अभ्यासू वृत्तीचा त्यावेळी कॉलेजात बराच गवगवा झाला होता. एकदा भक्तीने माझ्याबद्दल उद्गार काढले, “एतो बॉडो स्कालर कोतो सिंपल भावे थाके” ‘इतका मोठा स्कॉलर पण राहणी पहा किती किती साधी आहे’ तिला माझ्या आर्थिक स्थितीची कल्पना नसावी. माझ्या विषयीचे तिचे हे उद्गार माझा मित्र रणेंद्रविजय दास याने मला सांगितले. आनंदाने मी एक आठवडाभर तरी हवेत तरंगत होतो.

बी. ए. ला आम्हांला चांगले प्राध्यापक भेटले होते. इंग्रजीला प्राध्यापक अडवानी (इंग्रजी काव्य), शहानी (काव्य आणि निबंध), देसाई (निबंध) आणि इंग्रजीचे विभागप्रमुख डॉक्टर उपेंद्रचंद्र नाग (नाटक) हे होते. त्या वर्षी इंग्रजीला शेक्सपीयरचे ‘किंग लियर’ हे नाटक बी. ए. ला लावले होते. मी अनेक प्राध्यापक पाहिले आहेत. पण आपल्या विषयात रस घेऊन आवडीने

शिकविणारे डॉक्टर नागसारखे प्राध्यापक विरळा. माझी अभ्यासू वृत्ती पाहून डॉक्टर नाग यांना माझ्याबद्दल आस्था वाटू लागली. मी त्यांच्या घरी येऊ-जाऊ लागलो. डॉक्टर नागांच्यामुळे मला नाटके, नाट्यतंत्र, रंगभूमीची उत्क्रांती इत्यादि विषयांची गोडी निर्माण झाली. नागांच्या शिकविण्याचे एक वैशिष्ट्य होते. शेक्सपीयरकालीन रंगभूमीचा शेक्सपीयरच्या नाटकांवर काय परिणाम झाला याचे तपशीलवार विवेचन ते करीत. त्यांच्यामुळे मला इंग्रजी रंगभूमीच्या कितीतरी गंमती कळल्या.

डॉक्टर नाग यांच्या आकर्षक विवेचनशैलीने मी भारावून गेलो. नाटकांच्या अभ्यासाची नवीन दृष्टी मला लाभली. नागांनी इब्सेनची नाटके डॉल्स हाऊस, व्हाइकिंग, घोस्ट्स इत्यादि मला वाचण्यास दिली. आज मराठी नाटके, पाहताना मी नाटकांची अनेक दृष्टींनी छाननी करतो. कंपनीतील पात्रांकडे पाहून गाण्याचे आणि नाट्याचे प्रसंग नाटककाराने घातले काय, रंगभूमीचे तंत्र आणि नटसंच यामुळे नाटककाराच्या विषयनिवडीवर आणि नाटक हाताळण्यावर परिणाम झाला आहे काय, नाटककाराचा आशय नटांच्या अभिनयात व्यक्त होतो काय, मर्यादित वेळेमुळे नाट्यतंत्रावर काय परिणाम झाला इत्यादि गोष्टींकडे माझे बारीक लक्ष असते. मी जवळ जवळ दोनशे तरी इंग्रजी नाटके वाचली असतील, शेक्सपीयरची छत्तीस नाटके, बर्नार्ड शाची सेहेचाळीस नाटके, जानसिंज आणि शेरीडन, ऑस्कर वाइल्ड, बायरन, शेले यांची नाटके, गोल्डस्मिथ, इब्सेन, गटे यांची नाटके, अर्नाल्ड वेनेट, प्रिस्टले, आर्थर मिलर, गाल्स्वर्दी, इत्यादींची जवळ जवळ बत्तीस नाटके असा माझा इंग्रजीतून नाटकांचा अभ्यास झाला आहे. याशिवाय नाटकांसंबंधी विवेचनात्मक वाङ्मय मला वाचण्यास मिळाले. शेक्सपीयरवरच मी पाच पंचवीस पुस्तके वाचून काढली. डॉक्टर नाग यांनी माझ्या मनात नाटकांची आवड निर्माण केली तिचा हा परिणाम होय.

प्राध्यापक अडवानी, आणि शहानी यांच्यामुळे माझे इंग्रजी काव्यात मन रमू लागले. बायरन, कीटस, शेले, आणि रोझेटी हे माझे आवडते कवी होते. वाल्टर स्कॉटची कथानकप्रधान काव्ये मला फार आवडत. रॉबर्ट ब्राउनिंगच्या लास्ट राउंड टुगेदर या काव्याचा शहानी यांनी आम्हांला उत्कृष्ट परिचय करून दिला. पुढे आय. सी. एस. परीक्षेच्या निमित्ताने मी शेले, बायरन, कीटस, वर्डस्वर्थ, स्कॉट यांची ओळन ओळ वाचून काढली.

प्रा. अडवानी हे ऑक्सफर्डचे तरुण पदवीधर असून चांगले शिकवीत असत. पण ते अत्यंत उर्मट होते. मुले वेळेवर हजर राहात नसत. हजेरी घेतल्यानंतर चिठ्ठ्या पाठवून हजेरी लावीत, याचा त्यांना राग येऊन त्यांनी टेबलावरील

चिठ्ठ्या फेकून दिल्या आणि मुलांकडे पाहून म्हटले, "आय विल स्किन यू पीपल," "मी तुमची सालटी काढीन" मुले चिडली. त्यांनी अडवानीच्या वर्गावर बहिष्कार पुकारला. यात मी पुढाकार घेतला होता. माझा मित्र उमाशंकर गिरिजानंद हाच काय तो अडवानीच्या वर्गात बसत असे. त्यामुळे त्याचे आणि माझे बोलणे काही दिवस बंद झाले होते. या संपामुळे माझी युनिव्हर्सिटीभर प्रसिद्धी झाली. इंग्रजी विभागप्रमुख म्हणून डॉक्टर नाग यांनी आम्हां विद्यार्थ्यांना बोलणी करण्यासाठी म्हणून बोलाविले. विद्यार्थ्यांनी मला नेतृत्व दिले. शेवटी अडवानींनी दिलगिरी प्रदर्शित केली आणि संप मिटला.

इतिहासाचे प्राध्यापक म्हणून गंगाप्रसाद मेहता, सुरेंद्रनाथ मुकर्जी, मुकुट बिहारीलाल हे आम्हांला शिकवीत. माझे भावी सासरे प्राध्यापक पुणतांबेकर हे आम्हांला मधून मधून इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास शिकवीत. राज्यशास्त्र हा विषय गुरुमुख निहालसिंग (संट निहालसिंगांचे बंधू) हे शिकवीत. हे पुढे राजस्थानचे राज्यपाल झाले. डॉक्टर पिले हे ब्राइसचे मॉडर्न डिमॉक्रसीज शिकवीत.

बी. ए. मध्ये आम्हांला मराठीचा एक पेपर असे. चिपळूणकरांचे निवडक निबंध, गडकऱ्यांचे भावबंधन नाटक ही पुस्तके पाठ्यक्रमात असावीत. या वर्षी अण्णासाहेब खापर्डे हे आम्हांला प्राध्यापक म्हणून आले. अण्णासाहेबांचे वडील दादासाहेब खापर्डे, आणि वडील बंधू बाबासाहेब खापर्डे यांची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. अण्णासाहेबांचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार आणि आकर्षक होते. त्यांच्या बोलण्यात, चालण्यात आणि लिहिण्यात खानदानी डौल असे. मराठी नाटकांची चर्चा करताना त्यांनी मराठी रंगभूमीची उत्क्रांती, किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी इत्यादींची नाटके यासंबंधी भरपूर माहिती दिली. माझ्या मराठी नाटकाच्या व्यासंगाचे श्रेय अण्णासाहेबांना आहे. चिपळूणकरांचे निवडक निबंध त्यांनी शिकविले. त्यांची शिकविण्याची शैली मोठी आकर्षक असे. त्यामुळे मी सगळी निबंधमाला वाचून काढली. विष्णुशास्त्र्यांनी हाताळलेले भारदस्त विषय, त्यांची प्रभावी भाषा, त्यांचा दुर्दम्य भाषाभिमान आणि देशाभिमान यामुळे मी अगदी भारावून गेलो. मराठी साहित्यातील ज्या काही ग्रंथांचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला आहे त्यांत चिपळूणकरांची निबंधमाला हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. अण्णासाहेब हे स्वतः नावाजलेले कवी आहेत. त्यांचे काव्यकांतार हे एक काव्य एकेकाळी चांगलेच गाजले होते. त्यांच्याशी बोलताना आपण एका अतिशय सुसंस्कृत आणि खानदानी रसिकाशी बोलत आहोत असे वाटे. फाजील विनोद, चुटके, थिल्लरपणा ही त्यांच्या सहवासात

मनुष्य विसरून जाई. अण्णासाहेबांनी पुढे माझ्या लग्नासंबंधी खटपट करून मला मनासारखी पत्नी मिळवून दिली हे त्यांचे माझ्यावर अतिशय उपकार आहेत. त्यामुळे ते माझ्या घरच्या वडीलधाऱ्या मंडळींसारखे वाटतात. आज अमरावतीला हा ऋषितुल्य साहित्यिक सफल जीवनाचा अनुभव घेत शांतपणे आपले आयुष्य घालवीत आहे.

बनारस युनिव्हर्सिटीत विद्यार्थ्यांचे पार्लमेंट असे. महिन्यातून एकदा तरी त्याच्या सभा भरत. त्या निमित्ताने मला भाषणे करण्याची संधी मिळाली. वक्तृत्वाची कला तशी काही विशेष अवघड नाही. सुरवातीला भीती वाटते. पाण्यात उडी घेईपर्यंतच माणसाला नर्व्हस वाटते. पण एकदा का तो पाण्यात पडला की त्याची भीती पार निघून जाते. माझे पहिले इंग्रजी भाषण आशियातील राजकारणावर झाले. मुलांना ते आवडले याचे मला आश्चर्य वाटले. अशी दोन भाषणे झाल्यावर मला मंत्रिमंडळात घेण्यात आले. मी एकोणीसशे अठ्ठावीस एकोणतीसमध्ये युनिव्हर्सिटी पार्लमेंटचा शिक्षणमंत्री होतो. डॉक्टर नाग हे पार्लमेंटचे सभापती असत.

या वर्षी अलीगड विद्यापीठाने आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धा ठेवल्या होत्या. बनारसतर्फे मी आणि नानावटी नावाचा पार्शी मुलगा असे अलीगडला गेलो. नानावटी हा श्रीमंत आणि स्मार्ट होता. त्याचा सुटाबुटाचा पोषाक आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व ही कुणाच्याही नजरेत भरत. दारिद्र्यामुळे माझी कपड्यालत्त्याची हौस पार मारली गेली होती. शर्ट, धोतर आणि शाल याशिवाय माझ्यापाशी काहीच कपडा नव्हता. चांगल्या कपड्याची सवय अशी मला लागलीच नाही. जेथे महिनोमहिने चपला घालण्यास मिळत नसत तेथे बूट कुठून दिसणार? मी एका मित्राकडून सूटबूट मागून घेतले. टाय कशी बांधावी हे शिकून घेण्याचा प्रयत्न केला. ऐनवेळी टाय बांधणे न जमल्यामुळे मी ती काढून खिशात ठेवली आणि ओपन कॉलरवरच व्याख्यानाला उभा राहिलो. पायमोज्याच्या बाबतीत माझी समजत होती की ज्या पायाचा पायमोजा तो त्याच पायात घातला पाहिजे. भलत्याच पायात घातला तर पायाला इजा होईल. शिवाय हसे होईल ते निराळेच, बुटाचे बंद घट्ट बांधणे मला अद्याप जमले नाही. अलीगडला माझे व्याख्यान चांगलेच गाजले. अलीगडतर्फे ख्वाजा अहंमद अब्बास (मुंबईचा सुप्रसिद्ध उर्दू साहित्यिक) हा बोलला. मी हैद्राबादचा असल्यामुळे मला अलीगडचे वातावरण अपरिचित वाटले नाही. पण बनारस युनिव्हर्सिटीतील पोशाखातील आणि वागणुकीतील मोकळेपणा तेथे आढळला नाही. शेरवाणी आणि तुर्की टोपी हा सर्वांचा युनिफॉर्म. विद्यार्थ्यांची

राहणीही श्रीमंती थाटाची दिसली. युनिव्हर्सिटीत प्रत्येक प्रांतातील मुसल्मान विद्यार्थी आढळून येत. युनिव्हर्सिटीत काही हिंदू विद्यार्थी होते. पण ते संख्येने अगदीच कमी होते.

अलीगडहून येताना मी वाटेत कानपूरला उतरलो. आत्याबाईची मोठी बहीण कानपूरला असे. तिचा मुलगा बुंदेलखंडात पोस्टमास्तर होता. आत्याबाईंच्या बहिणीने माझे अगत्यपूर्वक स्वागत केले. मला पुरणाच्या पोळ्या आवडतात हे तिला माहीत होते. तिने मोठ्या हौसेने दुसऱ्या दिवशी स्वयंपाक केला. सकाळी मी गावात जरा फिरून येतो असे सांगून बाहेर पडलो. मला वाटले आपण गंगेवर जाऊन यावे. नदी जवळच असेल असे मी समजलो. लोकांनी नीट वाट दाखविली नाही. पाच मैल फिरत फिरत मी गंगेच्या काठावर असलेल्या सनातन धर्म कॉलेजात पोहोचलो. तेथून गंगा दिसत होती. पण ती एक फर्लांगच्या अंतरावर होती. तोपर्यंत अकरा वाजले असावेत. मी कॉलेजच्या वसतिगृहात पोहोचलो. तेथे काही महाराष्ट्रीय विद्यार्थी होते. त्यांची ओळख झाली. त्यापैकी बापट (खांडव्याचे) हे एक होते. ते पुढे गढमंडला जिल्ह्यात आदिवासींचे कार्यकर्ते म्हणून प्रसिद्धीस आले. माझी ओळख होताच त्यांनी मला जेवणाचा आग्रह केला. तो सुट्टीचा दिवस होता. मेसमध्ये जिलबीचा बेत होता. मला सपाटून भूक लागली होती. मी विचार केला आपण येथे जेवून घ्यावे. नंतर पायी चालत जावे. घरी जाईपर्यंत खाल्लेले पचेल. तेथे पुरणाच्या पोळ्या खाव्या. मेसमध्ये मी निःसंकोचपणे जेवलो. जेवण झाल्यावर मी माझ्या नवीन मित्रांचा निरोप घेतला. तुम्हांला फार उशीर झाला. आता तुम्ही रिक्षातून जा म्हणून त्यांनी लगलीच रिक्षा मागवून मला त्यात बसविले. मी अर्ध्या तासात घरी पोहोचलो, जिलबीच्या जेवणाने पोट फुगले होते. पण आत्याबाईंची बहीण, दुपारचे दोन वाजले तरी माझी वाट पाहात बसली होती. ' अरे सेतू , किती रे उशीर हा. ' मी म्हटले, ' मी काय करू, माझी वाट चुकली. गंगा पहायला गेलो आणि सनातन धर्म कॉलेज पाहून आलो. ' ' बरे चल, लवकर आंघोळ करून घे पाहू ' ती प्रेमळ बाई म्हणाली, ' तोपर्यंत मी तुझे पान मांडते. तू पानावर बसलास की तुला पुरणाच्या गरम गरम पोळ्या करून घालीन. ' तिचा प्रेमळपणा पाहून मला भडभडून आले. मी पोटभर जेवून आलो आहे हे तिला सांगण्याचा मला धीर झाला नाही. आंघोळ करून मी पानावर बसलो. ती बाई आग्रह करकरून पुरणाच्या पोळ्या वाढीत होती आणि मी मुकाट्याने जेवीत होतो. तरी एकदा ती म्हणाली, ' अरे, हळू हळू जेवीत आहेस. बाहेर कुठे जेवून तर आला नाहीस ना ? ' मी म्हटले, ' छे छे, असे कसे होईल ! ' फक्त

अर्ध्या तासाच्या अंतराने दोनदा पक्वान्नांचे जेवण आणि, तेही पोटभर, करण्याचा विक्रम त्या दिवशी मला करावा लागला. तो केवळ त्या वृद्ध आणि प्रेमळ बाईचे मन मोडू नये म्हणून. त्याच दिवशी मी कानपूर सोडले. पण दोन दिवस माझे पोट दुखत होते.

बनारसला अर्धपोटी राहण्याची मला सवयच झाली होती. पण एकादशी, आषाढी आणि श्रावणीच्या एकादश्या, गोकुळ अष्टमी अशा दिवशी मी उपास करीत नसे. उपास म्हणजे अगदी निराहार, तो मला कधीच जमला नाही. बनारसला एकदा मी गोकुळअष्टमीचा उपवास करण्याचे ठरविले. गोकुळ अष्टमी हा माझा वाढदिवस. श्रीकृष्ण चरित्र म्हणजे माझ्या आवडीचा आणि आदराचा विषय. मी ठरविले आपण आज काहीच खायचे नाही. दहा वाजेपर्यंत मी अगदी दृढनिश्चय करून होतो. मग मात्र निश्चय डळमळू लागला. बाराच्या पुढे भुकेने प्राण व्याकुळ होऊ लागले. चार वाजता चालताना आपण पडतो की काय असे वाटू लागले. शेवटी संध्याकाळी सात वाजता काही तरी खाऊन यावे म्हणून मी घराबाहेर पडलो. मी चार आण्यांची पुरी भाजी घेतली. पुरीवाल्याला मी एक रुपया दिला. त्याने मोड म्हणून बारा आणे परत दिले. मला वाटले मी आठ आण्याची पुरी घेतली. मी त्याला म्हटले, "अरे मला आठ आणे द्यायचे, ते बारा आणे काय देतोस?" त्याने माझ्याकडे पाहून म्हटले, "बाबूजी, तुम्हांला भ्रम झालेला दिसतो. तुम्ही आधी ती चार आंण्याची पुरी भाजी खाऊन घ्या." उपवासामुळे मला खरोखरीच भ्रम झाल्यासारखे झाले होते. त्या दिवसापासून मी उपास करण्याच्या नादी लागलो नाही. माझ्या घरात आई दोन दोन दिवस निर्जळी उपवास करते. आषाढी आणि कार्तिकी एकादशी घरातील बरेच करतात. पण मला या गोष्टी जमल्या नाहीत. अशा दिवशी साध्या फराळावरही माझे भागत नाही. वरण भात पोळी यांचे जेवण वेळेवर घेतल्याशिवाय माझे समाधान होत नाही. परमेश्वर क्षमाशील आहे. विद्यार्थीदशेत मला जे उपवास घडले आहेत ते तो जमेस धरील आणि आषाढी, कार्तिकी इत्यादींचे न केलेले उपवास लक्षात न घेता तो मला क्षमा करील याची मला खात्री आहे.

इ. स. १९२८ मध्ये मला एक शिकवणी मिळाली. माझा अभ्यास जोरात चालू होता. या वर्षी मला आणखी एक बंगाली मित्र भेटला.

सत्येन राय हा एक श्रीमंत जमीनदार. मला वाटते पश्चिम बंगालच्या जिल्ह्यात त्याची जमीनदारी होती. सत्येन राय हा वीस बावीस वर्षांचा अत्यंत देखणा असा मुलगा होता. युनिव्हर्सिटीपासून दहा मैल लांब बनारस कँटोन्मेंट-

मध्ये त्याने एक बंगला भाड्याने घेतला होता. मोटारीतून तो रोज युनिव्हर्सिटीला येत असे. सत्येन हा अतिशय बुद्धिमान असल्यामुळे त्याची आणि माझी लवकरच गट्टी जमली. मी त्याच्या बंगल्यावर नेहमी जात असे. अर्थात त्याच्या येथे खाण्यापिण्याची चंगळ असे. मला अंड्यांचे आम्लेट, स्क्रँबल्ड एग्ज, बॉइल्ड एग्ज, इत्यादींची सवय सत्येन रायमुळे लागली. सत्येनचा बंगाली साहित्याचा अभ्यास दांडगा होता. रवींद्रनाथ टागोर हा त्यांचा आवडता कवी. सत्येनच्या तोंडून मी टागोरांच्या काव्याच्या शेकडो ओळी ऐकल्या आहेत. उर्वशी ही टागोरांची प्रसिद्ध कविता. सत्येन कविता वाचताना खरा कलावंत वाटे. आवाजाचा चढउतार, मुद्रेवरील भाव. हातवारे, मध्येच उठून खोलीत येरझाऱ्या घालणे या त्याच्या लकबी काव्यवाचनाच्या वेळी अनुभवाला येत. त्याचा पोशाखही एखाद्या राजपुत्राला शोभेल असा होता. तलम धोतर, रेशमी शर्ट आणि त्यावर लाल मखमलीचा कोट असा त्याचा पोशाख असे.

मधे काही दिवस मी रात्रीच्या जेवणासाठी एका बंगाली खानावळीत जात असे. एक मध्यम वयाची विधवा ती खानावळ चालवीत होती. घरात तिने एक कारभारी ठेवला होता. त्याला लोक कोबिराज (वैद्य) म्हणत. त्या दोघांची आपसातील वागणूक पाहता त्यांचे संबंध बरेच घनिष्ठ असावेत. मी महिनाभर खानावळीत जात होतो. खानावळीणबाई चेहऱ्याने देखणी नव्हती. पण तिचा बांधा मोठा आकर्षक होता. पंक्तीतून ती वाढीत जाऊ लागली की तिच्याकडे पाहात राहावेसे वाटे.

एक दिवस मला रात्रीच्या जेवणास खानावळीत जेवायला जायचे नव्हते. खाडा सांगावा म्हणून मी संध्याकाळी खानावळीत गेलो. कविराज कोठे बाहेर गेला होता. घरात शुकशुकाट दिसला म्हणून मी हाक मारली. तो बाईने न्हाणी-घरातून उत्तर दिले ‘के, सेतुमाधवबाबू, आशून, भीतोरे आशून, कोण सेतुमाधव काय, या आत.’ मी आत गेलो. पाहातो तो बाई आंघोळ करीत होती. ओले वस्त्र तिच्या अंगाला चिकटले होते. त्यातून तिचा अवयवन् अवयव दिसत होता. माझे डोळेच फिरले. माझ्या घशाला कोरड पडली. ती मात्र प्रसन्न चेहऱ्याने माझ्याकडे पाहात होती. मी कसेबसे म्हटले, ‘आजके ब्रिक ल ब्यालाये आमी खेते आश्ते पारबोना, आज रात्री जेवायला मी येऊ शकत नाही, एइ बोल्बार जोन्ये आमी एशेचिलाम, आमी जाच्ची, हे सांगण्यासाठी मी आलो होतो. जातो मी.’ माझी धांदल पाहून तिला हसू आले. ते हसूही मिस्किल होते. हे वेडे काय घाबरले आहे असा तिचा भाव दिसला. मी मात्र तडक तेथून निघालो. थोड्याच दिवसांनी मी ती खानावळ सोडली.

वसतिगृहात राहणाऱ्या माझ्या वर्गबंधू मित्रात काही रंगेल वृत्तीचे होते. ते रात्री गावात येत आणि माझ्याकडे थोडा वेळ बसून वेश्यांकडे जात. रात्र संपण्यापूर्वी ते पुन्हा माझ्याकडे येत आणि चहा घेऊन युनिव्हर्सिटीकडे परत जात. तपेश्वरीसिंग नावाचा माझ्या ओळखीचा एक विद्यार्थी होता. तो बऱ्याच वेळ माझ्याकडे येई. इतकेच नव्हे तर आपण कोणत्या वेश्येकडे गेलो, आपल्याला काय फी द्यावी लागली आणि नंतर काय घडले हे तो मोकळेपणाने सांगे. एकदा तो सकाळी माझ्याकडे आला. बोलता बोलता तो मला म्हणाला, 'अरे काल रात्री मी बंगाली वेश्यांच्याकडे गेलो होतो.' बंगाली पोरगी म्हटले की माझा तोल जायचा. मी अधीरपणे विचारले, 'काय काय झाले ते सांग पाहू.' तो म्हणाला, 'अरे ती गोरीपान होती, टंच होती. आकर्षक होती. पण मी थोडा जरी धसमुसळेपणा केला की ती अस्वस्थ होई.' ती म्हणे 'प्रत्येक तरुण जर असे वागू लागला तर आमची वाट लागेल ना!' त्याचे हे बोलणे ऐकून मी सर्दच झालो.

माझ्या एका विदर्भी मित्रालाही (नाव सांगत नाही) अशीच सवय लागली होती. तो युनिव्हर्सिटीजवळच्या एका खेड्यात राहात असे. तो गावात माझ्याकडे येई. आणि रात्री माझा निरोप घेऊन जाई. कधी कधी तो सकाळीच उगवे. पण आपण रात्री कोठे गेलो होतो याचा तो थांग लागू देत नसे. पुढे एक मुलगी त्याच्या घरावर गेली तेव्हा कुठे त्याचे बिंग फुटले. उन्हाळ्याच्या सुट्टीत तो घरी जाऊन लग्न करून मोकळा झाला.

वास्तविक पाहता बनारसच्या जीवनात माझा पाय घसरणे ही काही अवघड गोष्ट नव्हती. बनारसची वेश्येची आळी दालमंडी ही चौकाला लागून म्हणजे मी राहात होतो तेथून अवघ्या वीस मिनिटांच्या अंतरावर होती. तेथला रात्रीचा झगमगाट पाहून डोळे दिपून जात. खाली कटलरीचा आणि काच सामानाचा बाजार आणि वर वेश्यांच्या माड्या असा प्रकार असे. पण मला तिकडे जाण्याचा कधी विचारच शिवला नाही. मी कुठेतरी उपदंशाच्या रोगाची माहिती वाचली होती. ती भयानक वर्णने वाचून अशा प्रकारच्या व्यवहाराची मला धास्ती बसली होती. दुसरे कारण म्हणजे लैंगिक संबंधाबद्दल असलेल्या विचित्र समजुती हे होय. इतिहासग्रंथातून मी महंमद तुघलक हा किती क्रूर शिक्षा देत असे हे वाचले होते. तो अपराध्याची कातडी सोलून काढी. ती वर्णने वाचून माझ्या अंगावर शहारे येत. मला वाटे आपण असे धंदे करू लागलो तर महंमद तुघलक देई तशा शिक्षेची आपत्ती यायची. ही कल्पना येताच मला विलक्षण नर्व्हस वाटे. माझ्या ब्रह्मचर्यपालनात अज्ञानाचा बराच मोठा वाटा होता.

माझे वाचन सतत चालू होते. मी कॉलेजचे तास कधीही बुडविले नाहीत. वर्गात मी समोरच्या बाकावर बसे. प्राध्यापकाच्या तोंडून निघालेला शब्द न् शब्द मी माझ्या वहीत उतरून घेई. प्राध्यापकाच्या प्रत्येक लेक्चरची तारीख मी वहीत मांडून ठेवी. एकेका विषयावर चार चार पाच पाच अशा भक्कम वह्या माझ्याजवळ जमल्या. माझ्या या पद्धतीमुळे कोण प्राध्यापक विषयविवेचनात कोणत्या मुद्द्यावर विशेष भर देतो, त्याची शिकविण्याची शैली काय इत्यादी गोष्टींचा मला अचूक अंदाज येऊ लागला. पाठ्यपुस्तकांच्या जोडीला त्याच विषयावरील इतर अनेक पुस्तकांचे मी वाचन करी. यामुळे त्या त्या विषयासंबंधी माझा आत्मविश्वास वाढत गेला. वर्तमानपत्रे आणि नियतकालिके मी वाचली नाहीत असा एकही दिवस गेला नसेल. पायोनियर, लिबर्टी, स्टेट्समन, फॉरवर्ड ही इंग्रजी दैनिके, लिबरेटर, यंग इंडिया, मॉडर्न रिव्ह्यू, इंडियन रिव्ह्यू, इत्यादी नियतकालिके नजरेखालून जात. भारतीय राजकारणाचा माझा अभ्यास बराच झाला होता. पुढारी तर नेहमीच युनिव्हर्सिटीत येत. डॉक्टर मुंजे एकदा युनिव्ह-र्सिटीत आले होते. पूर्वबंगालमधील मुसल्मानांच्या अत्याचाराचे त्यांनी केलेले वर्णन ऐकून माझ्या मनाचा अतिशय क्षोभ झाला. डॉक्टर मुंजे म्हणाले, ' आपण आपल्या शेजाऱ्याकडे जाऊन मीठ मिरची असे पदार्थ उसने मागतो तसे मुसल्मान बेधडकपणे हिंदू शेजाऱ्याकडे जाऊन मुली मागतात. त्यांनी एक उदाहरण दिले. स्त्रियांचे अपहरण हा माझ्या काळजाला भिडणारा विषय आहे. मुंज्यांचे भाषण झाले तो दिवस मी मोठ्या अस्वस्थतेत घालविला.

त्याच्या आदल्या वर्षी बंगालमध्ये मशिदीसमोरून सवाद्य मिरवणुकी घेऊन जाण्याच्या प्रश्नावरून पटुआखाली येथे सत्याग्रह झाला होता. दशाश्वमेध घाटा-वरील व्याख्याने ऐकून (मा काली तो माके डाकचे चालो पटुआखाली, काली माता तुम्हाला बोलावते, पटुआखालीला चला) स्वयंसेवकांत नाव नोंदविण्याचा मला अनिवार मोह झाला होता. सीमा प्रदेशातील बन्नू कोहाट येथील दंग्याच्या बातम्या ऐकून माझा असाच क्षोभ झाला होता. गौरी नावाच्या एका मुलीला एका पठाणाने पळविली आणि तिच्याशी जबरदस्तीने निका लाविला. कोर्टात ते प्रकरण गेले आणि मुलगी अल्पवयी, तिचे संमतीचे वय नव्हते, या सबबीवर कोर्टाने निका रद्द ठरवून तिच्या आईबापाकडे तिला पाठविली. या गोष्टीवर सीमा प्रदेशात पठाणांनी विलक्षण दंगे केले. त्याचा प्रक्षोभक मजकूर लाहोरच्या जमीनदार या उर्दू वर्तमानपत्रातून येत असे. जमीनदारचे संपादक जफर अली-खान यांचे विषारी लेख तर आगीत तेल ओतीत. मी उर्दू वर्तमानपत्रे नेमाने वाचीत असे. गेली चाळीस वर्षे भारतीय मुसल्मानांचा प्रश्न मी अभ्यासला

आहे. मुस्लिम राजनीतिशास्त्रावरील खुदाबक्ष यांचे पुस्तक तर आमच्या पाठ्य-क्रमात होते. यानंतरच्या काळात मी या विषयावरील अनेक पुस्तके वाचून काढली.

आमच्या युनिव्हर्सिटीत एकदा बाबासाहेब सावरकर आले होते. वसतिगृहात ते आम्हा विद्यार्थ्यांबरोबर बोलले. शुद्ध मराठी बोलण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे. सरहद्द प्रांत हा शब्द माझ्या तोंडून निघताच 'म्हणजे सीमाप्रांत ना' असे ते म्हणायचे. त्यांना विद्यार्थ्यांनी मेजवानी दिली. जेवणास जिलबीचा बेत होता. जेवणाच्या वेळी ते म्हणाले, 'आपण परदेशी साखर वापरणार नाही अशी शपथ घ्या पाहू' आम्हांला भुका लागलेल्या. आम्ही सारेजण बुचकळ्यात पडलो. इतक्यात प्राध्यापक पुणतांबेकर म्हणाले, 'विद्यार्थ्यांनो, परदेशी साखरेची ही तुमची शेवटची जिलबी बरें का!' यानंतर ते बाबासाहेब सावरकरांना म्हणाले, 'आपले म्हणणे विद्यार्थ्यांना पटले आहे. आता भोजनाला सुरवात करावी.' मग आमचे जेवण सुरू झाले.

माझ्या विवाहाच्या प्रसंगी (तीन डिसेंबर एकोणीसशे तेहतीस) बाबासाहेब सावरकरांनी हिंदू राष्ट्रमीमांसा हा ग्रंथ माझ्याकडे आठवणपूर्वक पाठविला. त्या काळात मी वाचून काढलेल्या अनेक पुस्तकांपैकी काहींचा ठसा अद्याप माझ्या मनावर आहे. कार्लाइलचें फ्रेंच रिव्होल्यूशन, मिचलेटचे फ्रेंच रिव्होल्यूशन, संडरलंडचे इंडिया इन बॉंडेज, लजपतरायांचे अनहॅपी इंडिया, महात्मा गांधी, रुसो, स्वामी श्रद्धानंद यांचे आत्मचरित्र, बॉस्वेलकृत जॉन्सन चरित्र इत्यादि पुस्तके मला प्रभावी वाटली. रुसोचे आत्मचरित्र तर मला अविस्मरणीय झाले आहे. रुसोचा मोकळेपणा, त्याचे प्रवास, निसर्गाची वर्णने ही वाचून मला अद्यापही प्रभातकाळच्या प्रसन्न वातावरणात फिरत असल्यासारखे वाटते. विद्वानांचा सहवास आम्हांला सारखा लाभत असे. एकच उदाहरण पाहा, डॉक्टर राखालदास बानर्जी हे प्रसिद्ध इतिहाससंशोधक होऊन गेले. गौतम-बुद्धाचे जन्मस्थळ त्यांनी शोधून काढले. मोहिंजोदारोच्या संशोधनात त्यांचा हात होता. त्यांचा 'ओरिसा प्रांताचा इतिहास' हा ग्रंथ सर्वमान्य झाला आहे. डॉक्टर राखालदास बानर्जी हे आमच्या युनिव्हर्सिटीत भारताच्या इतिहासाचे प्राध्यापक होते. त्यांच्या हाताखाली शिकण्याचा मला योग आला नाही. पण एकदा आम्ही विद्यार्थी त्यांच्या घरी गेलो. ते आमच्याशी तास दोन तास बोलत होते. त्यांनी शिवाजी महाराजांसंबंधी आम्हांला इतके तपशील सांगितले की आम्ही थक्क होऊन गेलो. राधाकुमुद मुकर्जी यांची अशोकावरील व्याख्याने अशीच उद्बोधक झाली. मेघनाद सहा यांचे इलेक्ट्रॉन-

प्रोटॉनवरचे सुबोध व्याख्यान मला अतिशय आकर्षक वाटले, प्राध्यापक पुणतांबेकर यांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची साठ वर्षे हा निबंध वाचला. अध्यक्षस्थानी प्राचार्य ध्रुव हे होते. त्या निबंधामुळे माझे मराठ्यांच्या इतिहासाच्या त्या दिव्य कालखंडाकडे लक्ष वेधले गेले. राजकीय चळवळीशीही मी त्यावेळी मनाने समरस झालो होतो. कायदेमंडळातील पुढाऱ्यांची भाषणे, सॉंडर्सचा खून, पब्लिक सेफ्टी बिलावरची चर्चा, भगतसिंग, राजगुरु इत्यादींची धरपकड—या घटनांचा मी बारकाईने अभ्यास करीत असे. त्यावेळच्या वातावरणात राजकारणाची वीज सतत खेळत होती. ज्या दिवशी महात्माजींनी मीठ सत्याग्रहासाठी दांडीकडे कूच केले त्या दिवशी बनारसच्या लोकांचा उत्साह अवर्णनीय होता. मी चौकात गेलो तेव्हा हजारो माणसे तेथे जमली होती. पोलिसांचे घोडेस्वार बेदरकारपणे गर्दीत घोडे घालीत होते. लोक तेवढ्यापुरते पांगत. इतक्यात एकाएकी मी उभा होतो त्या दिशेने दोनचार घोडेस्वार आले. मी हतबुद्ध होऊन उभा राहिलो, एका माणसाने मला धरून ओढले. काही इंचांवरच घोड्याची टाप पडली. मला ओढले नसते तर मी घोड्यांच्या टापाखाली सापडलो असतो. मग कदाचित हे आत्मचरित्र लिहिण्याची वेळ आली नसती.

माझे आईवडील १९२८ पासून पंढरपुरात स्थायिक झाले. माझे वडील अतिशय धार्मिक होते. सकाळी उठून ते स्नानसंध्यादि आन्हिके उरकून घेत. जेवल्यानंतर ते थोडा वेळ वामकुक्षी करीत. नंतर पुराण वाचीत. संध्याकाळी ते चंद्रभागेवर जात. तेथे सायंसंध्या आटोपून ते आणि आई ही दोघे पांडुरंगाच्या देवळात जात. तेथे रात्री नऊ वाजेपर्यंत ती दोघे भजन करीत, पंढरपूरहून ते मधून मधून हैदराबाद, गुलबर्गा, कारजोळ इत्यादि गावी जाऊन येत. पण पंढरपूरचा त्यांचा दैनिक कार्यक्रम हा असा होता. तो अठरा वर्षे म्हणजे १९४६ पर्यंत चालू होता. आयुष्यात माझे एकंदरीत चांगलेच झाले. हे सर्व त्यांच्या पुण्याईमुळे झाले, अशी माझी श्रद्धा आहे.

१९२९ मध्ये मी ज्यूनियर पास होऊन सीनियर बी. ए. च्या वर्गात गेलो.

इ. स. १९२९ च्या उन्हाळ्यात मला एक विलक्षण योग आला. साधू टी. एल. वास्वानी यांनी मसूरीजवळ राजपूर येथे शक्ती आश्रम नावाचा आश्रम उघडला होता. या आश्रमातर्फे उन्हाळ्याचे वर्ग भरणार होते. मी त्या वर्षीच्या उन्हाळ्यात डेहराडूनवरून राजपूरला गेलो. वाटेत एक दिवसासाठी मी मुरादाबादेला उतरलो होतो. माझा एक मित्र राजेंद्रनाथ हा मुरादाबादेला राहात होता. त्याला भेटून पुढे जावे असा माझा विचार होता. स्टेशनावरून माझे सामान टांग्यात भरून मी राजेंद्रनाथाच्या घरी गेलो. तो बाहेर गावी गेला होता. मी दार

ठोठावले. तशी वरच्या माडीतून एका तरुण मुलीने बाहेर डोकावून पाहिले. ती राजेंद्रनाथाची बहीण होती असे मला नंतर कळले. ती सोळा सतरा वर्षांची असावी. तिची चण लहान होती. बारीक बांधा, अत्यंत गौर असा वर्ण, गोल चेहरा, मोठे डोळे असे तिचे रूप अद्याप माझ्या डोळ्यांसमोर दिसत आहे. ती निळे लुगडे नेसली होती. तिच्या डोक्यावर पांढऱ्या मलमलची ओढणी होती. तिला पाहिली मात्र, माझा पाय तेथून निघेना. तिच्याशी बोलायला मिळावे म्हणून मी तिला विचारले, 'राजेंद्रनाथ है ?' तिचा आवाज तरी किती कोमल आणि मंजुळ. आमची अशी प्रश्नोत्तरे झाली : 'जी नहीं, वो तो गाव को गये हैं,' 'अरे मैं उनका बनारस का साथी हूं.' 'जी, वो आनेपर मैं उनसे कह दूंगी' आता अजून तेथे थांबायला निमित्त काय काढावे ? मी म्हटले, 'जरा कागज तो दीजिये. मैं उन्हें एक चिठी लिख दूँ.' तिने एक कागद आणला. मी तिला पेन्सिल आणायला लावली. पत्रलेखनात शक्य तितका जास्त वेळ घेतला. आणि शेवटी पुन्हा पुन्हा मागे वळून तिच्याकडे पाहात राजेंद्रनाथाला पत्र द्यायचे अं, देखिये भूलेगा नहीं असे तिला बजावीत मी मोठ्या नाखुशीने तेथून निघालो. एखादी गोड तान बराच कालपर्यंत कानात रेंगाळत राहावी तशी त्या पोरीची आठवण मला बरेच दिवसपर्यंत होत होती.

मी दुसऱ्या दिवशी राजपूरला पोहोचलो. राजपूर हे मोठे टुमदार गाव आहे. तेथूनच मसूरी या थंड हवेच्या ठिकाणाला जाण्याची वाट सुरू होते. त्या काळी मोटारी थेट मसूरीपर्यंत जात नसत. राजपूरच्यापुढे लोक पायी अगर घोड्यावरून जात. राजपूरला एक पंजाबी डॉक्टर होते. त्यांचे नाव डॉक्टर शास्त्री हे होते. ते हार्ट आणि टी. बी. या रोगांचे स्पेशलिस्ट होते. आसपासच्या भागात ते अतिशय लोकप्रिय होते. त्यांची बायको अमेरिकन होती. तिचे नाव सुवीरादेवी शास्त्री. तिची एक बहीण सुभद्रादेवी ही तिच्याजवळ राहात असे. राजपूरला त्यांचा प्रशस्त बंगला होता. बंगल्याचे आवार मोठे होते. आवारात मोठी बाग असून तीत विविध प्रकारची फुले फुलत. अनेक फळांची झाडे बागेत होती. शास्त्रींच्या वाड्यात आणि आवारात आश्रमाचे वर्ग चालत. मी राजपूरला गेलो त्यावेळी डॉक्टर शास्त्री नुकतेच वारले होते. त्या वर्षीच्या आश्रम वर्गात माझा वर्गबंधू उमाशंकर गिरिजानंद हा होता. आश्रमात एकंदरीत पन्नासपर्यंत तरी विद्यार्थी असावेत. आश्रमात प्रवचने, निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने, व्यायाम, आसने इत्यादि कार्यक्रम होत. राजपूर हे अतिशय रमणीय स्थळ आहे. भोवती डोंगर, झुळझुळ वाहणारे असंख्य झरे, फळबागा इत्यादींमुळे या गावाला अतिशय शोभा आली आहे.

साधू टी. एल. वास्वानी यांचा मला महिनाभर सहवास लाभला हे मी माझे परमभाग्य समजतो. वास्वानी म्हणजे खरोखरीच साधू पुरुष. त्यांच्या सहवासात अपवित्र विचार पार नाहीसे होत. ते दिवसातून एक तास इंग्रजीतून प्रवचन करीत. त्यांचे वाचन आणि अभ्यास ही विस्मित करून सोडणारी होती. नानक, कबीर, मिराबाई, दादू या साधुसंतांची वचने सदैव त्यांच्या तोंडात असत. त्यांच्या सहवासाने मी खरोखरीच धन्य झालो. त्यांचा पुण्याला मृत्यू झाल्याचे कळले त्यावेळी आपले एक दैवत नाहीसे झाले असे मला वाटले. वास्वानींनी धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अविस्मरणीय अशी कामगिरी केली आहे. खरा साधू, खरा महात्मा. त्यांना माझ्याबद्दल जिव्हाळा वाटत असे. ते माझी नेहमी आस्थापूर्वक चौकशी करीत.

मिसेस शास्त्री या अमेरिकन महिलेचा आणि माझा ऋणानुबंध पुढे तीनचार वर्षे टिकला. माझ्या आयुष्यातील ती एक संरक्षक देवता. मी आश्रमात गेल्यावर दोन दिवसांच्या आत आमचा असा काही स्नेह जडला की सांगता येत नाही. ती आणि तिची बहीण सुभद्रादेवी या माझ्याशी तासन् तास बोलत बसत. मीही आपली सुखदुःखे त्यांना सांगी. बी. ए. पास होऊन मी अलाहाबादेस गेलो. मला तेथे पैशाची अडचण पडू लागली. तेव्हा मिसेस शास्त्री मला दोन वर्षेपर्यंत दर महिन्याला पंधरा रुपये पाठवीत होत्या. नंतर मला रीसर्च स्कॉलरशिप मिळू लागली, तेव्हा त्यांचे सर्व पैसे फेडून टाकले. मी अलाहाबादेस होतो तोपर्यंत महिन्यातून एकदा तरी आमचा पत्रव्यवहार होत असे. त्यानंतर आमचा संबंध सुटला. आता मिसेस शास्त्री कुठे आहेत हे मला माहीत नाही. १९५२ मध्ये मी मसूरीला गेलो होतो. परत येताना मी मुद्दाम त्यांची चौकशी केली. पण बऱ्याच वर्षांपासून त्या राजपूरला नाहीत असे कळले. अशा लोकांचे निःस्वार्थी प्रेम मला लाभले यामुळेच माझा जीवनप्रवास सुकर झाला आहे. मनुष्याच्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे. माझ्या जीवनातील ती एक निष्ठा आहे. ती निष्ठा अशा सज्जन मंडळींच्या सहवासामुळे माझ्यात निर्माण झाली. आयुष्यात वाइटापेक्षा चांगलीच माणसे मला सारखी भेटत गेली हेही माझे भाग्यच होय.

राजपूरहून मी आणि गिरिजानंद एकदा मसूरीला जाऊन आलो. त्यावेळी बनारस युनिव्हर्सिटीतील विद्यार्थी शिणॉय (आता अहमदाबादेचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ) हे मसुरीला होते. मसूरीला त्यावेळी सर मोरोपंत जोशी हे संमति-वय समितीचे अध्यक्ष म्हणून आले होते. सर मोरोपंत, सर महंमद याकूब (समितीचे एक सभासद) यांना मी मसूरीला पाहिले. मंडी संस्थानच्या राणीला

मी तेथेच पाहिली. ती सौंदर्यसम्राज्ञी म्हणून प्रसिद्ध होती, तिचे हे वर्णन यथार्थ आहे असे तिला पाहून मला वाटले. आणखी एकदा मी एकटाच मसूरीला जाऊन आलो. त्यावेळी मी आर्यसमाज मंदिरात उतरलो होतो, दुरून का होईना, मला मसूरीहून बर्फाच्छादित डोंगर प्रथमच पाहण्यास मिळाले. मसूरीला हिलस्टेन्शनची राणी म्हणतात. हे वर्णन अगदी योग्य वाटते.

राजपूरला आम्हाला फिरण्याचा आणि पोहण्याचा व्यायाम चांगलाच होई. संध्याकाळी आम्ही शीर्षासन, धनुष्यासन इत्यादि आसने करीत असू.

आश्रमात सर्व काही मिळे. पण चहाचे नावसुद्धा काढण्यात येत नसे. मी आणि गिरिजानंद चहाचे मोठे भोक्ते. दहा बारा दिवस आम्ही चहावाचून मोठ्या तळमळीत काढले. शेवटी मला राहवेना. मी गिरिजानंदाला म्हटले, ' गिरिजानंद, आपण आज काय वाटेल ते झाले तरी कुठून तरी चहा पिऊन येऊ चल. ' ' बरे तर चल, ' गिरिजानंद म्हणाला. आम्ही संध्याकाळी चारच्या सुमारास आश्रमाबाहेर पडलो. गावातील सगळी उपाहारगृहे आणि फराळाची दुकाने आम्ही पालथी घातली. दूध, दुधाची लस्सी, दह्याची गोड लस्सी, खारट लस्सी हे पदार्थ सर्वत्र मिळत. पण चहा कुठेच मिळेना. मी रडकुंडीला आलो. एक पोलिसकॉन्स्टेबल वाहतूक नियंत्रण करीत होता. आम्ही त्याच्याजवळ गेलो आणि कळवळून म्हणालो, ' भाई, आम्ही दक्षिणेकडचे लोक आहोत. चहासाठी गावभर हिंडलो. पण कुठे म्हणून चहा मिळत नाही, तुम्ही आम्हांला चहाचे एखादे दुकान दाखवाल काय ? ' तो म्हणाला, ' इकडच्या भागात चहा कोणीच पीत नाही. मी तुमची तल्लफ ओळखू शकतो. मी साधा कॉस्टेबल आहे. तुमची हरकत नसेल तर मी तुम्हांला आपल्या घरी नेऊन चहा पाजीन. ' आम्हांला वाटले हा प्रत्यक्ष देवदूतच आम्हांला भेटला. आम्ही त्याच्या घरी गेलो. त्याच्या बायकोने आम्हांला मोठ्या अगत्याने चहा करून दिला. त्या दिवशी आम्ही प्रत्येकी तीनचार तरी मोठे ग्लास चहाचे रिकामे कले असावेत. चहा आमच्या घशाशी येत होता. पण आमचे मन तृप्त झाले होते. आम्ही त्या कॉन्स्टेबलचे आभार मानले. त्याने चहाचे पैसे घेतले नाहीत. आम्ही डुलत डुलत आश्रमात आलो. तेथे एक नवीनच आपत्ती वाढून ठेवली होती. आश्रमात आसनाचे वर्ग चालू होते. आम्हांला पाहताच कार्यकर्ते म्हणाले, ' अरे, कुठे गेला होता. चला शीर्षासन करू लागा पाहू. ' पोटात चार ग्लास चहा आणि त्यावर शीर्षासन ! मी कसाबसा प्रयत्न केला. पण डोके खाली आणि पाय वर करताच चहा तोंडातून बाहेर पडतो की काय असे मला वाटे. मग मी शवासन भुजंगासन अशी आसने करू लागलो. आमच्या चहापानाचा कार्यक्रम असा

बेमालूम पार पडला म्हणून मी आणि गिरिजानंद पोट धरधरून हसत होतो.

राजपूरला आश्रमात भजने चांगली म्हणत. त्यांतील दोन ओळी मला अद्याप आठवतात.

चरणोपर अर्पण है इसको चाहो तो स्वीकार करो
यह तो वस्तु तुम्हारी है ठुकरा दो चाहे प्यार करो

आश्रमाच्या कार्यकर्त्यांपैकी एक स्वामी आनंद (पंजाबी) आठवतात. मला वाटते ते प्राणायाम आणि आसने शिकवीत. दुसरे एक स्वामी प्रवचने शिकवीत. सकाळी पाच आणि सहाच्या दरम्यान आणि संध्याकाळी चारच्या सुमारास साधू वास्वानी प्रवचने करीत आणि प्रार्थना म्हणत. त्यावेळी वातावरण मोठे गंभीर असे.

एक महिन्यानंतर मी राजपूर सोडले. वाटेत मी हरिद्वार येथे उतरलो. हरी की पायरी जवळची गंगा पाहून मन प्रसन्न झाले. तेथूनच मी ऋषीकेश, आणि लक्ष्मण झूला ही स्थळे पाहून आलो. स्वामी श्रद्धानंदांचे कांगडी गुरुकुल हे नदीच्या मुख्य प्रवाहाच्या पलीकडे होते. घासलेट तेलाचे रिकामे डबे एकत्र जोडून त्याच्यावरून हरिद्वारला नदी पार करतात. हे वाहन पाहून मला गंमत वाटली. मी एक रात्र गुरूकुल कांगडीत राहिलो. विद्यापीठाचे माध्यम संस्कृत होते. भगवी वस्त्रे नेसलेले विद्यार्थी संस्कृतमधून आपापसात चर्चा करीत हिंडताना पाहून मला वैदिक काळातील आश्रमांची कल्पना आली. ते विद्यापीठ पाहून मला धन्य धन्य वाटले.

१९२९ म्हणजे माझे बी. ए. चे शेवटले वर्ष. यावर्षी कोप्पळचा रामकृष्ण नावाचा एक कर्नाटकी विद्यार्थी बनारसला आला. तो मॅट्रिकच्या वर्गात दाखल झाला. तो माझ्याजवळ राहू लागला. मी अन्नछत्रात जाणे सोडून दिले होते. रामकृष्ण हा नाट्टुकोट्टाइ छत्रातून अन्न घेऊन येत असे. रात्रीचे जेवण कधी घरी स्वयंपाक करून तर कधी बाहेर फराळाचे खाऊन मी भागवीत होतो.

माझ्या वक्तृत्वाचा युनिव्हर्सिटीत बराच गवगवा झाला होता. दिवाळीच्या सुट्टीनंतर युनिव्हर्सिटी पार्लमेंटच्या निवडणुकी झाल्या. त्यात विरोधी पक्षाचा पुढारी म्हणून मी निवडून आलो. बनारस युनिव्हर्सिटी पार्लमेंटमध्ये पंतप्रधानाला निवडीत नसत. विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याला निवडीत. तोच पुढच्या टर्ममध्ये आपोआप पंतप्रधान बने. म्हणजे १९३१ च्या जूनमध्ये मी युनिव्हर्सिटी पार्लमेंटचा पंतप्रधान बनलो असतो. पण एम. ए. साठी मी अलाहाबादला गेल्यामुळे तो योग हुकला. माझ्या वक्तृत्वामुळे मला लखनौ विद्यापीठाच्या वक्तृत्वस्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळाली. डिसेंबर १९२९ मध्ये लखनौ

विद्यापीठात माझे भाषण झाले. गोलमेज कान्फरन्सवर मी बोललो. माझे भाषण विद्यार्थ्यांना अतिशय प्रभावी वाटले. पण ते प्रक्षोभक होते असे वाटून परीक्षकांनी मला बक्षीस दिले नाही. पोलिस खात्याने माझ्यासंबंधी बनारस युनिव्हर्सिटीत चौकशी केली असे मला नंतर कळले.

एकोणीसशे एकोणतीसच्या नोव्हेंबरपासून मी डायरीतून पुन्हा थोडे थोडे लिहू लागलो. आज ती डायरी पाहून मोठी गंमत वाटते. काही नोंदी उर्दूत, काही मोडीत, पण बहुतेक इंग्रजीत असा प्रकार आहे. काही इंग्रजी वाक्यांतून मी फ्रेंच शब्द घातले आहेत. एकदोन नोंदी तर फ्रेंच भाषेत आहेत. ही फ्रेंच भाषेची हौस होती का नोंदी कुणाला समजू नयेत अशी इच्छा होती हे आता आठवत नाही. कदाचित दोन्ही कारणे असावीत. उदाहरणार्थ, एकतीस ऑक्टोबर १९२६ च्या नोंदीत मी इंग्रजीत लिहिले आहे, "आज सकाळी मारुतीचे दर्शन घेतले. मग गिरिजानंदकडे गेलो. त्याच्यापाशी साडेआठपर्यंत बसलो होतो. मग घरी येऊन जेवण केले. आज ब्राइसचे 'मॉडर्न डेमॉक्रसीज' वाचून काढले. संध्याकाळी मुजुमदार भेटण्यास आला. आम्ही फिरावयाला गेलो. त्याने सांगितले की, महेंद्रचंद्र भट्टाचार्य आणि सत्येना राय यांचे भांडण झाले. रात्री बाजारात प्राध्यापक मलानी यांची गाठ पडली. त्यांनी मला जेवायला बोलाविले. पण मी ते आमंत्रण नाकारले. कारण काय तर 'गार्नियर घोशिरे'.

या वरील फ्रेंच शब्दाचा अर्थ आहे फाटके कपडे. माझ्या अंगावरील कपडे धड नव्हते म्हणून मी मलानींचे जेवणाचे आमंत्रण नाकारले.

डायरीतील काही नोंदी देत आहे. त्यावरून माझ्या दिनचर्येची कल्पना येईल.

२५ ऑक्टोबर १९२९ :

दोनच महिन्यांनी परीक्षेची बावन्न रुपये फी द्यावी लागणार, ती कोठून द्यावी याचाच मी रात्रंदिवस विचार करीत असतो.

२६ ऑक्टोबर :

(ही नोंद मोडी लिपीत आणि उर्दू भाषेत आहे.)

आज व्यायाम केला. साठ दंड काढले आणि शंभर बैठका मारल्या. आज मॅरियटचे 'सेकंड चेंबर्स' हे पुस्तक वाचून काढले. राजेंद्रनाथ आला होता. त्याच्याबरोबर इब्नेजचा टारेंट हा चित्रपट पाहण्यास गेलो होतो.

२७ ऑक्टोबर :

आज लायब्ररीतून चार्ल्स डिकन्सचे चरित्र वाचण्यास आणले.

२८ ऑक्टोबर :

आज एकादशी. आज घरीच पोळ्या आणि वरण हा स्वयंपाक केला. लयाल-

कृत ' टेनिसन ' आणि वार्डकृत ' डिकन्स ' ही चरित्रे वाचून काढली. संध्याकाळी पाच वाजता सुंदराबाईकडे गेलो. (यापुढील नोंद फ्रेंच भाषेत आहे.) क्वीए कॉमा मा स्योर, ती मला माझ्या बहिणीप्रमाणे आहे. क्वांद ज्यू वे शे लुई, मॉन कूर ए प्लेनीर धो प्योसे नोबल. मी तिच्याकडे जातो तेव्हा माझे मन पवित्र विचारांनी भरलेले असते. ऑजूर्धी एल अॅनेआ दॉने यून क्लोदे पूर शर्ट. आज तिने मला शर्टसाठी कापड दिले.

२९ ऑक्टोबर :

आज मॅरियटचे ' सेकंड चेंबर्स ' वाचले. संध्याकाळी माझा मित्र सीताराम वर्मा याजबरोबर फिरावयास गेलो. आमच्या वर्गातील रेणू रायकडे त्याचे बरेच लक्ष आहे असे दिसते.

३० ऑक्टोबर :

आज डिकन्सचे चरित्र संपविले. सेकंड चेंबर्सही संपविले. काल मुजुमदारकडे गेलो होतो. तो नुक्ताच सायकलवरून अलाहाबादेस जाऊन आला होता. आज बातमी वाचली, की व्हाइसरायने भारताचे डोमिनियन स्टेटस व्हावे हा उद्देश आहे असे जाहीर केले. (यावर माझे भाष्य) ऑल बोगस.

३ नोव्हेंबर :

आज भाऊबीज. सुंदराबाईकडे गेलो होतो. तिने पक्वान्न केले होते. तिच्याकडे जमलेल्या मंडळींपैकी एकाने भुताच्या गोष्टी सांगितल्या.

बनारसचे पुष्कळसे विद्वान शास्त्री पंडित हे मेल्यावर भुते बनत. एक भूत आपल्या घरासमोरच्या ओटीवर बसलेले असे. काकडारती झाल्यावर प्रसाद बरोबर घेऊन विद्वान मंडळी आपल्या घरोघर जाऊ लागली की ते भूत त्यांना हटकी आणि म्हणे, " माझ्याशी वाद करा, नाहीतर प्रसाद येथे ठेवून चालते व्हा. " मंडळी तेथेच प्रसाद टाकून पळून जात. (बनारसला भुताचा बसण्याचा ओटा मला दाखविण्यात आला.)

बनारसला एक अत्यंत विद्वान असा शास्त्री राहात असे. तो वारला. त्याचे पिशाच स्वतःच्या वाड्यात नांदू लागले. बाहेर रस्त्यातून फिरणाऱ्यांना वाड्यातून वेदमंत्रांचे घोष ऐकू येत. तो वाडा रिकामाच होता. त्यात कोणी राहात नसे. भुताटकीचा वाडा म्हणून लोक त्याकडे ढुंकूनही पाहात नसत.

काही दिवस गेले. रेव्याहून दोन मुले वेदाभ्यासासाठी म्हणून बनारसला आली. ती एका चांगल्या गुरूच्या शोधात होती. कुणा खट्याळ माणसाने त्या मुलांना भुताटकीच्या वाड्यापुढे नेले आणि म्हटले, ' या घरात फार मोठे विद्वान राहतात. ते तुमचे शिक्षण उत्तम प्रकारे करतील. ' त्या मुलांना काय माहीत

आत भूत नांदते आहे म्हणून. ती मुले आत गेली. पाहतात तो सोप्यात शास्त्रीबुवा (त्यांचे पिशाच) बसलेले असून ग्रंथपारायणात निमग्न आहेत. मुलांनी शास्त्रीबुवांना अभिवादन केले आणि त्यांना सांगितले, की आम्हांला आपल्यापाशी विद्याध्ययन करावयाचे आहे. शास्त्रीबुवांनी ओळखले, या पोरांना कुणीतरी फसवून आपल्याकडे पाठविले आहे. आपण पिशाच्च आहोत हे मुलांना कळू न देता, त्यांना आपली विद्या दिली पाहिजे असे त्यांनी ठरविले. ते मुलांना म्हणाले, ' मी तुमचे शिक्षण उत्तम प्रकारे करीन. पण एक अट आहे. शिक्षण संपेपर्यंत तुम्ही या घराबाहेर पडावयाचे नाही, घरातल्या घरात मी तुमची सर्व सोय करीन. ' मुले या गोष्टीला कबूल झाली. त्यांचे शिक्षण सुरू झाले. दोनचार वर्षांत मुले संस्कृत विद्येत तरबेज झाली. या काळात ती घराबाहेर अशी पडलीच नाहीत.

योगायोग पाहा. मुलांना एक दिवस काय वाटले कोणास ठाऊक, संध्याकाळच्या सुमारास बाहेर पडून पाय मोकळे करून यावे या इच्छेने ती घराबाहेर पडली. ती रस्त्यात दिसल्यावर साहजिकच चारचौघांनी त्यांची चौकशी केली. ' आम्ही अमक्या अमक्या शास्त्रीबुवांपाशी विद्याध्ययन करीत आहोत ' असे ती मुले म्हणाली. ऐकणारी माणसे थक्क झाली. ती म्हणाली, ' मुलानो, ते शास्त्री मरून दहाबारा वर्षे झाली. ते तुम्हांला कसे शिकवतील ? ' हे ऐकून ती पोरे घाबरली. ती म्हणाली, ' अहो, हे कसे शक्य आहे ? ते तर आम्हांला रोज शिकवितात. ' यावर ती माणसे म्हणाली, पोरांनो, ते शास्त्रीबुवांचे पिशाच आहे. आज तुम्ही रात्री झोपेचे सोंग घेऊन पडा आणि पाहा काय होते ते. ' रात्री मुले घरात आली आणि जेवणीखाणी उरकून बिछान्यावर पडली. शास्त्रीबुवा जवळच झोपले. कोनाड्यातील दिवा मालवायचा राहिला होता. मुले जागी आहेत याची शास्त्रीबोवांच्या पिशाचाला कल्पना आली नाही. त्याने बिछान्यावर पडल्या पडल्याच आपला हात भलताच लांब करून कोनाड्यापर्यंत नेला आणि दिवा विझविला. मुलांनी ते दृश्य पाहिले मात्र, त्यांनी भीतीने किंकाळी फोडली. पिशाच्चाने ओळखले, की मुलांना आपले खरे स्वरूप कळले आहे. त्याने मुलांना म्हटले, " मुलांनो, घाबरू नका, मी तुम्हांला विद्या दिली आहे ती वाया जायची नाही. पण आतापासून तुमचे माझ्याजवळचे शिक्षण संपले. तुम्ही आता आपल्या गावाकडे परत जा. " असे म्हणून ते पिशाच्च अंतर्धान पावले. मुले दुसऱ्या दिवशी आपल्या गावाकडे निघून गेली.

मला बनारसमधील ते भुताटकीचे घर दाखविण्यात आले. मी ऐकलेल्या गोष्टीतील खरेखोटे एक परमेश्वर जाणे !

सुंदराबाईंच्याकडे मी चोराच्या गोष्टी पण ऐकल्या. त्यांपैकी एक मला आठवते. बनारसची गल्लयाबोळांतील घरे म्हणजे प्रचंडच म्हणावी लागतील. ही घरे म्हणजे एक प्रकारचा चक्रव्यूहच म्हणाना. एकदा एक चोर अशा घरात शिरला. रात्री घरातील लोकांची निजानीज झाल्यावर चोराने खोल्या-खोल्यातून वस्तू चोरल्या. शेवटी त्यांचे एक गाठोडे करून तो घराबाहेर पडण्याच्या तयारीला लागला. पण त्याला घराच्या मुख्य दरवाजाची वाट सापडेना. फिरून फिरून तो चोरी केली होती त्या खोल्यांसमोर येई. तास दोन तास असा क्रम चालला. शेवटी चोर थकून गेला आणि गाठोडे उशाशी घेऊन एके ठिकाणी तो झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी मंडळी जागी होऊन पाहतात तो काय, चोर गाढ झोपी गेलेला. त्याला त्यांनी अलगत पकडला. चोरानेही काही प्रतिकार केला नाही. तो म्हणाला, 'घराचा दरवाजा शोधता शोधता मी दमून गेलो. झोपही आवरेना. शेवटी मी ठरविले की उद्या आपल्याला पकडले तरी बेहत्तर. आज चांगली झोप काढून घ्यावी.'

४ नोव्हेंबर १९२९ :

आज ब्राइसचे 'मॉडर्न डेमॉक्रसीज' वाचून काढले.

१० नोव्हेंबर :

आज थिऑसॉफिकल सोसायटीत जे. कृष्णमूर्ती यांचे व्याख्यान ऐकण्यास गेलो. वातावरण चांगले होते. पण एकंदरीत दांभिकपणा बराच असावा असे वाटले.

१२ नोव्हेंबर :

युनिव्हर्सिटी पार्लमेंटमध्ये विरोधी पक्षाचा नेता म्हणून माझी दणदणीत बहुमताने निवड झाली.

१३ नोव्हेंबर :

आज सन्यत्सेनचे 'सानमिन चुइ' हे पुस्तक वाचून काढले.

१४ नोव्हेंबर :

राजा मणींद्र नंदी वारल्यामुळे आज आमच्या कॉलेजला सुट्टी होती. आज मॉडर्न रिव्ह्यूत जायस्वालांचा एक अप्रतिम लेख वाचला. गुप्त सम्राटांच्या इतिहासावर या लेखाने नवीन प्रकाश पडतो. वज्जिक नावाच्या नाटककाराने कौमोदकी उत्सव नावाचे नाटक लिहिले. राजा सुंदरवर्मन याचा मुलगा कल्याणवर्मन यांच्या दरबारात हे नाटक करून दाखविण्यात आले. नाटकाच्या कथानकात चंद्रसेनाने कल्याणसेनाची गादी बळकाविली असा एक भाग आला

आहे. हा चंद्रसेन म्हणजेच चंद्रगुप्त होय असे सिद्ध करण्याचा प्रयत्न जायस्वाल यांनी केला आहे.

चौदा नोव्हेंबरच्या रात्री मी दुर्गाघाटावर महाराष्ट्रीय मुक्की (बॉक्सिंगचा एक प्रकार) नावाचा खेळ खेळत तो पाहण्यास गेलो. त्यावर मराठीत माझी दोन पानांची नोंद आहे. माझ्या त्या वेळच्या लेखनशैलीची कल्पना या नोंदीवरून येईल. ती नोंद जशीच्या तशी पुढे देत आहे.

"आज सुमारे रात्री आठ वाजता मी आपल्या खोलीत बसलो असता मुरलीधर (आत्याबाईचा दूरचा आप्त) माझ्याकडे आला व मुक्की पाहण्यास चलाल काय असे विचारू लागला. या खेळाची वार्ता मी दोन-तीन दिवसांपूर्वी आमच्या अन्नछत्राचे मॅनेजर रामण्णा यांजकडून ऐकली होती. मुरलीधराच्या आग्रहाने तो खेळ पाहण्याची उत्पन्न झालेली इच्छा आणखी बळावली व तो खेळ पाहण्यास मी गेलो. या दिवसांतच हा खेळ रोज रात्री आठपासून दहा वाजेपर्यंत सुमारे पंधरा दिवस चालत असतो. जुन्या काळी आपल्या देशात मुष्टियुद्धाची जी चाल होती तिचाच अवशेषरूपाने राहिलेला हा खेळ होय. मी गेलो तेव्हा गंगेचा तो देखावा मोठा अप्रतिम होता. खेळ घाटावरच चालला होता. चोहोकडे पिठासारखे चांदणे पडले होते. रजनीनाथाच्या शीतल किरणांखाली वाडे, घाट, कार्तिक मासानिमित्त लावलेले उंच काठ्यावरचे दिवे इत्यादी फार खुलून दिसत होते. सगळ्यापेक्षा जास्त शोभा गंगा नदीमुळे आली होती. एका प्रौढेप्रमाणे गंभीर, शांत व मंदगतीने चालणारी ती नदी त्यावेळी फारच खुलून दिसत होती. दूर अंतरावर रेल्वे पुलावरचे दिवे चकाकत होते. अशा देखाव्यात कोणाचे चित्त रमणार नाही बरे! खेळ पाहण्यास बरीच गर्दी झाली होती. एका पक्षात सगळे ब्राह्मण व दुसऱ्या पक्षात अहीर इत्यादी ब्राह्मणेतर होते. रिंगणात इकडचा एक वीर व तिकडचा एक वीर उतरत असत व बुक्काबुक्की सुरू होत असे. अशी बुक्काबुक्की मी कधीच पाहिली नव्हती. खेळास फार रंग चढला होता. खेळ निकरास आला तर सोडविणारे मध्यस्थ होते. पण वेळेवर त्यांना कोणीच विचारीत नसे. दोघांनाच खेळू न देता (निकरास आल्यास) एका पक्षातील सगळे गुंड दुसऱ्या पक्षावर तुटून पडून त्यांची हवेलंडी उडवून देत. असाच काहीसा प्रकार झाला. अहीर वगैरे एक होऊन ब्राह्मणांवर तुटून पडले. ब्राह्मण मंडळी पायऱ्यांजवळ उभी होती. पहिला जोराचा मारा होताक्षणीच सगळे ब्राह्मण पायऱ्यांवरून उतरून आले. मीही तेथेच उभा असल्याकारणाने मलाही खाली यावे लागले. सुमारे दोन मिनिटे दोन्ही पक्षांत भयंकर बुक्काबुक्की झाली. ब्राह्मणांनीही जमावाने उलट मारा केला.

काही वेळपर्यंत मला असे वाटले की, दंगा होतो की काय. पण पुन्हा शांतता होऊन खेळाला फिरून सुरुवात झाली. बराच वेळपर्यंत हा खेळ पाहून मी आताच घरी आलो आहे.'

ही माझी त्या काळातली भाषा.

१६ नोव्हेंबर :

आज 'लेनीन ॲन्ड गांधी' हे पुस्तक वाचण्यास आणले.

१७ नोव्हेंबर :

आज जायस्वालचे 'हिंदु पॉलिटी' हे पुस्तक वाचून काढले.

१८ नोव्हेंबर :

आज रात्री जेवल्याशिवाय झोपावे लागत आहे. जवळ पैसे नसल्यामुळे उपवास घडत आहे. काल रात्री मिसेस सुवीरादेवी शास्त्री (राजपूर आश्रमाच्या) माझ्या स्वप्नात आल्या होत्या.

१९ नोव्हेंबर :

आज दरभंग्याच्या महाराजांनी युनिव्हर्सिटीला भेट देऊन एक लाखाची देणगी दिली. आजही रात्रीचे जेवण नाही.

२१ नोव्हेंबर :

रात्रीचे जेवण नाही.

२२ नोव्हेंबर :

रात्री उपाशी.

२३ नोव्हेंबर :

रात्रीचे जेवण नाही.

२४ नोव्हेंबर :

आज सकाळी उपमा करून खाल्ला.

२५ नोव्हेंबर :

आज सुंदराबाईकडे जेवलो.

२८ नोव्हेंबर :

नेपाळचे महाराज वारले.

१० डिसेंबर १९२९ :

आंतर विद्यापीठ वक्तृत्व स्पर्धेत लखनौला जाऊन आलो.

२६ डिसेंबर :

मिसेस शास्त्रीकडून आज दहा रुपये आले. लाहोरमध्ये कॉंग्रेस सप्ताह साजरा होत आहे.

(यानंतर दोन महिने काही नोंदी नाहीत.) नंतर

३ फेब्रुवारी १९३० :

परवा शिवरात्रीच्या पारण्यानिमित्त सुंदराताईंनी मला जेवायला बोलाविले होते. पुरणपोळीचा थाट होता. आमची परीक्षेच्या तयारीची सुट्टी झाली आहे. अभ्यास चालला आहे.

१ मार्च १९३० :

महात्मा गांधी असहकारिता सुरू करणार आहेत.

*   *   *

प्राध्यापक श्रीकृष्ण वेंकटेश पुणतांबेकर यांची मुलगी सुशीला हिला मी प्रथम एकोणीसशे एकोणतीसच्या हिवाळ्यात पाहिली असावी. त्या वेळी तिला सोळावे वर्ष चालू होते. (जन्म तीस ऑगस्ट १९१४) ती शहरातील थिऑसाफिकल हायस्कूलमध्ये शिकण्यास जात असे. कॉलेजच्या पदवीदान समारंभात, किंवा एखाद्या वार्षिकोत्सव प्रसंगी ती आपल्या वडिलांबरोबर येत असावी, मी सायकलवरून तिच्या घरासमोरून जाई तेव्हा ती आपल्या भावाबरोबर घराच्या आवारात खेळताना दिसे. एकदा दोनदा मी तिला हॉकी खेळताना पाहिली. पुणतांबेकरांच्या घराशेजारीच माझा मित्र त्रिलोचन पंत हा राहात असे. तो त्या वेळी सिनियर एम. ए. ला होता. मी त्याच्याकडे मधून मधून जात असे. त्याच्या खोलीच्या खिडकीतून ती मधून मधून दिसे. सुशीलेकडे पाहताच मी प्रेमात पडलो असे झाले नाही. तिच्या चेहऱ्यावर विलक्षण गोडवा होता. (तो अद्याप आहे). हळू हळू तिच्या संबंधी माझ्या डोक्यात विचार घोळू लागले. युनिव्हर्सिटीच्या जिम्नॅशियममध्ये एकदा प्राध्यापक पुणतांबेकरांचे इतिहासावर व्याख्यान झाले, या व्याख्यानाला सुशीला हजर होती. त्यावेळी तिचा गोड आणि निष्पाप चेहरा, आणि तिचे आकर्षक चालणे ही मनात भरलेली आठवतात. हळूहळू तिच्याकडे माझे मन ओढ घेऊ लागले. ती आपल्याला पाहण्यास मिळावी म्हणून मी प्रयत्न करू लागलो. ती रोज सकाळी शाळेच्या बसमधून थिऑसफिकल स्कूलला जात असे. ती बस भेलूपुऱ्याच्या चौकातून पुढे जाई. मी सकाळी सायकलीवरून भेलूपुऱ्याला जाऊन तेथे बसची वाट पाहात उभा राही. बस समोरून गेली आणि सुशीलेचा चेहरा एकदा दृष्टीस पडला की मला दिवसभर समाधान वाटे. सुशीलेचा भाऊ बापू हा इंटरला माझ्याबरोबर शिकत होता. पुढे इंजिनियरिंगला गेला. एकदा सहज त्याची रस्त्यात गाठ पडली असता मी हुशारीने त्याचे गोत्र विचारून घेतले. त्याचे गोत्र श्रीवत्स आणि माझे हरितस. गोत्र जुळते याचे मला समाधान

वाटल्याचे आठवते.

सुशीलेशी प्रत्यक्ष बोलण्याचा असा प्रसंग आलाच नाही. पुणतांबेकर हे स्वभावाने अति कडक. त्यामुळे मला त्या कुटुंबाच्या जवळ जाता येईना. मला वाटे की ही मंडळी म्हणजे ब्यारटस् ऑफ विंपल स्ट्रीट आहेत की काय ?

एकदा आमच्या कॉलेजच्या वार्षिक गॅदरिंगमध्ये मर्चंट ऑफ व्हेनिसमधील न्यायालयाचा प्रवेश करण्याचे ठरले. माझ्याकडे पोर्शियाचे काम देण्यात आले. नाटकातच मुळी पोर्शिया पुरुष वेषात असते त्यामुळे मला स्कर्ट घालण्याची जरूर पडली नाही. मिशा मात्र काढाव्या लागल्या. हे जरा अवघड वाटले. कारण माझे वडील हयात होते. पण माझ्या मित्रांनी (ते क्लीन शेव होते.) माझी समजूत घातली. पोर्शियाला वकिलाचा झगा लागतो. तो मात्र आम्हांला ऐनवेळी कुठेच मिळेना. आणि मग मला आठवण झाली. पुणतांबेकर हे बॅरिस्टर होते. त्यांच्याजवळ बॅरिस्टरचा गाऊन असला पाहिजे. त्यांना जाऊन विचारण्यास काय हरकत आहे. असा विचार करून मी आणि माझा एक मित्र असे दोघे मिळून त्यांच्या घरी गेलो. त्यावेळी रात्रीचे आठ साडेआठ वाजले असावेत. मी बाबासाहेबांना हाक मारली, तो सुशीला माडीच्या व्हरांड्यात आली. मी तिला म्हटले, "आम्हांला बाबासाहेबांचा गाऊन हवा आहे." तिने म्हटले, "थांबा हं, मी बाबासाहेबांना विचारते" ते पाचच शब्द, पण ते ऐकून त्यावेळी माझी काय अवस्था झाली ती वर्णन करणे अशक्य आहे. माझी छाती धडधडत होती. माझ्या घशाला कोरड पडली होती. मी हवेत तरंगत होतो. अर्थात तिला त्या गोष्टीची अजिबात कल्पना नव्हती. थोड्या वेळाने बाबासाहेब बाहेर आले. त्यांनी आमची अगत्याने चौकशी केली आणि आम्हांला आपला गाऊन दिला.

सुशीलेवरचे माझे प्रेम मी लपवून ठेवले. कुठे अन्नछत्रात जेवून अर्धपोटी राहून बी. ए. ची तयारी करणारा मी आणि कुठे बॅरिस्टरची मुलगी सुशीला. मी बी. ए. च्या अभ्यासासाठी जारीने तयारी चालविली.

इ. स. १९२६ च्या अखेरीस प्रा. वि. स. टिळक हे आम्हांला इंग्रजी निबंध शिकवू लागले. त्यांच्या पत्नी सुप्रसिद्ध लेखिका कमलाबाई टिळक याही युनिव्हर्सिटीच्या महिला कॉलेजात शिकवू लागल्या. प्राध्यापक टिळक हे पुढे ऑक्सफर्डला जाऊन पदवीधर झाले. ते बडोद्याच्या कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक होते. इ. स. १९४८ मध्ये त्यांनी ती नोकरी सोडली आणि ते आय. ए. एस. मध्ये दाखल झाले. त्यांची ओरिसा प्रांतात नेमणूक झाली. तेथे सचिवाच्या हुद्यापर्यंत चढून ते चारपाच वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. आता ते

चेंबूरला राहात असतात. गेली सदतीस वर्षे त्या कुटुंबाचा आणि आमचा स्नेह चालत आला आहे. प्राध्यापक टिळकांच्यामुळे मला जेरोम के जेरोम, मॅक्स बीरबोहम, टी. एस. इलियट, इत्यादी इंग्रजी निबंधकारांच्या कृतींचा परिचय झाला. त्या काळात मी अनेक इंग्रजी निबंधांचा अभ्यास केला. चार्ल्स लँब हा माझा आवडता निबंधकार होता.

साहित्यिक म्हणून माझा महाराष्ट्राला परिचय करून देण्याचे श्रेय कमलाबाई टिळक यांना आहे. इ. स. १९३८ मध्ये माझा 'उषा' हा पहिला लघुकथा-संग्रह बाहेर पडला. त्याचे विस्तृत परीक्षण कमळाबाईंनी ज्ञानप्रकाशातून केले. 'मराठवाड्यातील आधुनिक गद्य लेखक' या माझ्या पुस्तकावर कमलाबाईंच्या सांगण्यावरून ज्ञानप्रकाशचे संपादक कै. काकासाहेब लिमये यांनी ज्ञानप्रकाशात अग्रलेख लिहिला. त्या प्रोत्साहनाने माझा आत्मविश्वास कितीतरी वाढला. टिळक कुटुंबाचे हे ऋण विसरणे अशक्य आहे.

एकोणीसशे तीसच्या सुरवातीला मला एक स्वप्न पडले. मी गंगेत पोहत होतो. पोहता पोहता मी तळाशी गेलो. मी वर आलो तो माझ्या डोक्याला एक प्रेत लागले. मी चमकून पाहिले, प्रेतावर अतिशय शुभ्र अशी वस्त्रे होती. मी बाजूला होऊन प्रेताचा चेहरा पाहिला. ती माझी आजी होती.

मी झोपेतून खडबडून जागा झालो. मला अस्वस्थ वाटू लागले व पुढे बराच वेळपर्यंत मला झोप लागली नाही. दोन तीन दिवसांतच पंढरपुराहून वडिलांचे पत्र आले. त्यात माझी आजी वारल्याची हकीकत होती. ती पंचाऐंशी वर्षांची होऊन गेली. माझे स्वप्न आणि आजीचा मृत्यू हा योगायोग म्हणजे मला न उलगडलेले एक कोडे आहे.

इ. स. १९२७ मध्ये माझ्या आईला प्लेग झाला होता. त्यावेळीही बनारसला मला असेच स्वप्न पडले होते. स्वप्नात आई आजारी असून गडबडा लोळते आहे असे मला दिसले. त्यानंतर एका आठवड्यातच आईला प्लेग झाला होता. त्यातून ती मोठ्या कष्टाने बरी झाली असे वरून पत्र आले.

गरीब विद्यार्थ्यांच्या फंडातून मदत घेऊन मी परीक्षेची फी भरली. या परीक्षेची मी धास्तीच घेतली होती. काही झाले तरी पहिला वर्ग मिळवायचा अशी माझी जिद्द होती. परीक्षेच्या आदल्या दिवशी मी काशी विश्वनाथ, अन्नपूर्णा, काळभैरव, धुंडिराज, बिंदुमाधव इत्यादी देवतांची दर्शने घेतली. सकाळी कॉलेजास जाण्यापूर्वी आमच्या वाड्यातील रामाचे मी दर्शन घेतले. आत्याबाई रामाची मूर्ती सजवीत म्हणत होत्या.

दूध पियो मोरे गोविंदलाला, दूध पियो मोरे गोपाळलाला पाषाण की मूरत

दूध न पिवे, शिर पछाडत नामा रोवे.

कॉलेजावर मी प्रथम प्राध्यापक सिपाहीमलानीच्या घरावर गेलो. त्यांनी मला बजाविले, ' विचारलेल्या प्रश्नाची सुसूत्र पण थोडक्यात उत्तरे दे. फार पाल्हाळ लावून आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करू नकोस. परिक्षकही मनुष्यच आहे. पेपर वाचण्याचा त्याला कंटाळा येईल असे आपण काही करू नये. शांतपणे प्रश्न सोडवावे. उत्तरे तीन चार पानांहून अधिक असू नयेत. शक्य तोवर एकेका परिच्छेदात एकेक मुद्दा मांडावा. अर्धा तास आधी पेपर लिहिण्याचे काम संपवून उरलेला वेळ पेपरची तपासणी करावी. ' असे सांगून त्यांनी आपल्या हातातले घड्याळ काढून मला दिले. ' घड्याळाकडे लक्ष ठेवून उत्तरे लिही ' असे ते म्हणाले. मला मनगटावर घड्याळ नीट बांधता येईना. आयुष्यात मी कधी घड्याळ वापरले असेल तर ना ! मग सिपाहीमलानींनी हसून घड्याळ माझ्या मनगटावर बांधून दिले. परीक्षा चालू असताना पुणतांबेकरही एकदा-दोनदा येऊन चौकशी करून गेले.

माझी बी. ए. ची परीक्षा एकदाची संपली. पेपर बरे गेले होते. पण फर्स्ट क्लासची खात्री वाटेना. मन चिंती ते वैरी न चिंती. इ. स. १९४२ पर्यंत मला या परीक्षेची स्वप्ने पडत होती.

या उन्हाळ्यात मी घरी परत यावे अशी वडिलांची पत्रे आली. चार दिवस आपण घरी जाऊन यावे असे मलाही वाटू लागले. एकोणीसशे तीसच्या मे महिन्यात मी बनारस सोडले. माझे मेहुणे रामराव हे त्यावेळीं औरंगाबादेस कस्टम खात्यात होते. माझी आई त्यावेळी औरंगाबादेस आली होती. प्रथम मी औरंगाबादेस गेलो. तेथे आई, माझी बहीण सीताबाई (हिला नुकताच मुलगा झाला होता.) धाकटी बहीण सुशीला यांच्या गाठी पडल्या. मला पाहून माझ्या आईला जो आनंद झाला तो कल्पनेनेच अनुभविला पाहिजे, ' सीताक्का हा बघ सेतू आला आहे ' असे म्हणताना तिचा गळा भरून आला. माझीसुद्धा तीच अवस्था झाली.

औरंगाबादेहून निघून आम्ही हैदराबादेस आलो. तेथे वडील आले होते. त्यांची गाठ पडली. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव हे एकोणीसशे एकोणतीस-मध्ये बी. ए. झाले होते. पण गाणे बजावणे, नाटकात काम करणे इत्यादींचा त्यांना नाद लागल्यामुळे त्यांचे पुढील शिक्षणावरील लक्ष कमी होऊ लागले होते. एम. ए. आणि एलएल. बीच्या टर्म भरणे त्यांना जमले नाही. उर्दू हा विषय घेऊन ते एम. ए चा अभ्यास करीत होते. पण कॉलेजात वेळेवर हजर न राहण्याच्या सवयीमुळे त्यांचे वर्ष वाया गेले होते. या प्रकाराने माझे वडील

अस्वस्थ झाले होते.

हैदराबादेला मी महिना दीड महिना राहिलो. जूनच्या पहिल्या आठवड्यात माझा मित्र त्रिलोकचनपंत याचे बनारसहून पत्र आले.

मी बी. ए. च्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला आलो. अनेक पेपरमध्ये मला मिळालेले मार्क शंभरात सत्तर ते ऐशी होते. मला रायचंडीप्रसाद सुवर्ण पदक मिळाले. शिवाय एम्. ए. साठी साठ रुपयांची बिर्ला शिष्यवृत्ती मिळाली.

माझ्या आयुष्यातील तो एक अत्यंत आनंदाचा दिवस होता. एम्. ए. च्या शिक्षणासाठी मी अलाहाबादला जाण्याचे ठरविले.

जुलै १९३० मध्ये मी हैदराबादेहून निघालो.

बनारसला जाताना मी वाटेत इंदूर येथे उतरलो. आण्णासाहेब पाटणकर वारले होते. आई, पाटणकरांचा मुलगा तात्या यांची गाठ पडली. तात्याला इंदूरच्या कॉमर्स खात्यात नोकरी लागली होती. इंदूरला मी दोन दिवस होतो. आईनी माझे खूप कौतुक केले. ताईबाई त्यावेळी बाहेरगावी गेल्या होत्या. त्यामुळे त्यांची गाठ पडली नाही. आपले कौतुक करण्यास आज आण्णासाहेब हयात नाहीत याचे मला राहून राहून वाईट वाटत होते. तात्या आणि आई यांचा निरोप घेऊन मी बनारसला आलो.

मी सिपाहीमलानी यांना भेटलो. बी. ए. तील यशाबद्दल त्यांनी माझे अभिनंदन केले. ते म्हणाले, ‘ तू बनारसला राहून एम. ए. चा अभ्यास कर. तुला साठ रुपयांची स्कॉलरशिप मिळते आहे. मी या हॉस्टेलचा वार्डन आहे. मी तुला राहण्यासाठी एक खोली देईन. तू बरेच कष्ट सहन केले आहेस. आता तुला थोडी सुस्थिती लाभेल. ’ मी त्यांना म्हटले. ‘ मी राज्यशास्त्र हा विषय घेऊन अलाहाबादेहून एम. ए. ची पदवी घ्यावी असे ठरविले आहे. अलाहाबादला डॉक्टर बेणीप्रसाद आणि डॉक्टर ताराचंद यांच्यासारखे अखिल भारतीय कीर्तीचे प्राध्यापक आहेत. त्या मानाने बनारसची कीर्ती विशेष नाही. ’ सिपाहीमलानी म्हणाले, ‘ बरे तर, मी तुला आग्रह करीत नाही. पण मी एक ठरविले आहे. दोन वर्षेपर्यंत मी तुला दरमहा दहा रुपये पाठवीत जाईन. ’ सद्गदित होऊन मी त्यांचे आभार मानले.

तेथून मी प्राध्यापक पुणतांबेकर यांजकडे गेलो. अलाहाबाद विद्यापीठात त्यावेळी रानडे (गुरुदेव) हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. बाबासाहेबांच्याकडून मी त्यांच्या नावाने एक ओळखपत्र घेतले. तेथून निघून मी खापर्ड्यांच्याकडे गेलो. माझ्या यशाबद्दल त्यांनी माझे अभिनंदन केले. सुशिलेबद्दल आपण त्यांच्यापाशी गोष्ट काढावी की नाही याचा मी विचार करीत होतो.

शेवटी मनाचा हिय्या करून मी चाचरत म्हटले, ‘ अण्णासाहेब, पुणतांबे-करांची मुलगी सुशीला...’ मी वाक्य पुरे करण्याच्या आधीच अण्णासाहेबांनी माझ्याकडे रोखून पाहून अतिशय प्रेमळपणे म्हटले, ‘ डू यू लव हर ? ’ मी लाजेने मान खाली घातली. अण्णासाहेब म्हणाले, ‘ अहो त्यांत इतके लाजायला काय झाले ? ’ मी म्हटले, ‘ अण्णासाहेब, पण बाबासाहेबांना हे सांगावे कसे ? ते किती कडक आहेत हे आपल्याला माहीतच आहे. ’ अण्णासाहेब म्हणाले, ‘ सेतुमाधव, मला या गोष्टीची जाणीव आहे. प्रसंग पाहून मी तुमच्या संबंधी त्यांच्या जवळ बोलणे काढीन. तुम्ही काळजी करू नका. ’

अण्णासाहेबांच्या बोलण्याने मला कितीतरी धीर आला. अलाहाबादेस निघण्याच्या पूर्वी मी सुंदराबाईस भेटून आलो. तिने मला मनःपूर्वक आशीर्वाद दिला. ती म्हणाली, ‘ काही लागले सवरले तर मला कळवीत जा. ’ मी म्हटले, ‘ सुंदराताई, अलाहाबाद काही लांब नाही. सुट्टयांतून मी येत जाईनच. ’

आमच्या आत्याबाईचा भाचा विश्वनाथ घुले हा त्यावेळी इंटरमध्ये शिकत होता. तो देखणा आणि अतिशय सालस व सज्जन होता. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. बायको अगदी तरुण म्हणजे पंधरा सोळा वर्षांची होती. विश्वनाथाला मांडीला फोड झाल्याचे निमित्त होऊन आजार सुरू झाला. दुखणे वाढतच गेले. मी बनारस सोडले, तेव्हा तो आयुष्याच्या शेवटच्या घटका मोजीत होता. आत्याबाईच्या तोंडचे पाणी पळाले होते. विश्वनाथाच्या बायकोचे दुःख मला पाहवेना. मी आत्याबाईचा निरोप घेतला आणि सुट्टी मिळाली की मधे एकदा येऊन जाईन असे त्यांना सांगितले. या दिवशी संध्याकाळी मी दशाश्वमेध घाटावर गेलो. तेथे गंगेचे संथ वाहणारे पात्र मी कितीतरी वेळ पाहात बसलो होतो. याच गंगामाईच्या पात्रात मी गेली चार वर्षे डुंबत होतो. ते घाट, घाटावरची गर्दी, ती व्याख्याने, भजने, ते देवळातील घंटानाद, गंगेची विविध रूपे, कधी उग्र तर कधी शांत. मी प्रत्येक ऋतूत गंगा पाहिली आणि कधी ना कधी तिचे दिवसा काय आणि रात्री काय प्रत्येक तासाचे तिचे रूप पाहिले, याची आठवण होऊन मी अगदी गंगामय होऊन गेलो. माझे डोळे पुनः पुनः भरून येत. शेवटी कितीतरी वेळाने मी उठून घरी आलो.

आज त्या गोष्टीला चाळीस वर्षे झाली पण गंगेचा मनावरील प्रभाव अद्याप कमी झाला नाही. अनेकदा मनात येते आपल्या देहावरील अंत्यसंस्कार बनारसला गंगेच्या काठावर व्हावे आणि माझ्या अस्थी दशाश्वमेध घाटावर गंगेत सोडाव्या म्हणजे गंगेच्या सतत प्रवाहाने माझ्या अस्थींना, आणि कदाचित माझ्या आत्म्याला शांत वाटेल, सुख लाभेल, अनुपम आणि अवर्णनीय.

अठरा जुलै १९३० रोजी मी अलाहाबाद विद्यापीठात एम. ए. साठी दाखल झालो.

७

अलाहाबाद
१९३० ते १९३३

अलाहाबाद आणि बनारस ही दोन्ही शहरे एकमेकांपासून अवघ्या चौऱ्याऐंशी मैलांच्या अंतरावर आहेत. पण अलाहाबादचे वातावरण बनारसहून अगदी वेगळे आहे. बनारसची वस्ती गंगेच्या काठाकाठाने दाटीवाटीने पसरली आहे. उलट अलाहाबाद हे गंगा आणि यमुना या दोन्ही नद्यांच्या काठांवर वसले आहे. शहराची वस्ती पांगलेली आहे. शहराचा मध्यभाग गंगेपासून तीन मैलांवर आहे. गंगा आणि यमुना यांच्या काठावर अलाहाबादचा इतिहासप्रसिद्ध किल्ला आहे. गंगेच्या काठावर दारागंज हा मोहल्ला आहे. बनारसप्रमाणे गंगेला घाट नाहीत, मोठी देवळे नाहीत. गंगेला जाताना वाळवंट तुडवीत जावे लागते. माघ मेळा किंवा कुंभमेळा या वेळची यात्रेकरूंची गर्दी सोडली तर अलाहाबादमध्ये प्रांतोप्रांतीच्या लोकांची वर्दळ आढळत नाही. अलाहाबादेत संस्कृत विद्येची अगर पंडितांची परंपरा नाही. गंगेच्या काठावर असलेले दारागंज हे तर खेड्यासारखे वाटते.

अलाहाबादेत श्रीमंत जमीनदारांची वस्ती अधिक

प्रमाणात असे. अलाहाबादेस युनिव्हर्सिटी, हायकोर्ट इत्यादी असल्यामुळे वकील, डॉक्टर, सरकारी अधिकारी, प्राध्यापक इत्यादींचाच भरणा अधिक दिसून येई. एकंदरीत तेथील वातावरण श्रीमंत, शिष्ट आणि उच्चभ्रू लोकांचे होते. अलाहाबादला महाराष्ट्रीय संख्येने अगदी कमी. गंगेवर पुरोहित-कर्मे करणारी थोडी महाराष्ट्रीय कुटुंबे होती. त्यांच्यांत विद्वत्तेची परंपरा नव्हती. महाराष्ट्रीय संस्थानिकांचे वाडेही विशेष नव्हते. दारागंजात होळकरांचा वाडा आहे आणि अलाहाबादच्या मध्य भागात बायजाबाई शिंदे यांचा वाडा, देऊळ आणि बाग ही आहेत. तेथे रेल्वे आणि इतर ऑफिसांतून काम करणारी महाराष्ट्रीय कुटुंबे होती. युनिव्हर्सिटीत गुरुदेव रानडे आणि दोन तीन महाराष्ट्रीय प्राध्यापक होते. शहरात नरवणे हे नगरपालिकेचे एक्झिक्यूटिव ऑफिसर होते. बॅरिस्टर गंधे हे त्यावेळी अलाहाबादेस प्रॅक्टिस करीत. संगीत क्षेत्रात काही महाराष्ट्रीय कलावंत अलाहाबादेस होते. आपटे, ठकार इत्यादि गायनतज्ञांची नावे मला आठवतात.

बनारसशी समरस झालेला मी. अलाहाबादच्या उच्चभ्रू आणि अपरिचित अशा वातावरणाने मी मनातून अतिशय गोंधळून गेलो. बायजाबाईच्या बागेत मला एक खोली मिळाली. सुदैवाने कानपूरच्या सनातन धर्म कॉलेजात मला भेटलेला बापट हा मला सोबती मिळाला. तो अलाहाबादेस एलएल. बी. ची टर्म भरण्यास आला होता. आम्ही दोघे एकत्र राहात असू. हाताने स्वयंपाक करून घेत असू. बापट हा अतिशय सच्छील आणि सद्गुणी होता. त्याची राहणी अतिशय साधी असे. त्याने आपले पुढील सर्व आयुष्य गढमंडाल्याच्या आदिवासींच्या सेवेला वाहिले.

अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे वातावरण कनिष्ठ मध्यम आणि गरीब विद्यार्थ्यांना पसंत पडणारे नव्हते. श्रीमंत, जमीनदार, वरिष्ठ अधिकारी अगर इतर प्रतिष्ठित इसमांची मुले या युनिव्हर्सिटीत येत. प्रत्येकाची महत्त्वाकांक्षा आय. सी. एस. अगर पी. सी. एस. होण्याची असे. एम. ए. चे वर्ग लहान असल्यामुळे इतर वर्गातील मुलांशी किंवा प्राध्यापकांशी संबंध असा कमीच येई. युनिव्हर्सिटीत इंटरचे वर्ग नसत. त्यासाठी शहरात इंटरमीजिएट कॉलेजे असत. युनिव्हर्सिटीची वसतिगृहे होती. त्याबरोबर वरील इंटरमीजिएट कॉलेजे आपली वेगळी वसतिगृहे चालवीत. एकंदरीत वातावरण श्रीमंतीचे आणि शिष्टपणाचे होते.

असे असले तरी अलाहाबादेतील शिक्षणाची पातळी ही बनारसपेक्षा पुष्कळच चांगली होती. युनिव्हर्सिटीचा प्राध्यापक वर्ग नावाजलेला होता. युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु सुप्रसिद्ध संस्कृतज्ञ गंगानाथ झा हे होते. त्यांचे चिरंजीव अमरनाथ झा हे त्या वेळी इंग्रजी शाखेचे प्रमुख होते. तत्त्वज्ञानाच्या शाखेचे

प्रमुख गुरुदेव रानडे हे होते. त्यांची कीर्ती सगळ्या हिंदुस्थानात गाजत होती. इतिहास शिकविण्यास सर शफात अहमद खान आणि ईश्वरीप्रसाद हे असत. आमच्या राज्यशास्त्रासाठी तर डॉक्टर ताराचंद आणि डॉक्टर वेणीप्रसाद हे दोन दणदणीत विद्वान होते. अलाहाबाद विद्यापीठातील इतिहास आणि राज्यशास्त्र या विषयांचे शिक्षण बरेच उच्च दर्जाचे होते. त्यामुळे उत्तर प्रदेशातील लखनौ, बनारस, अलीगड, आग्रा येथील पहिल्या श्रेणीतील पदवीधर पुढील शिक्षणासाठी अलाहाबादेस येत, सायन्स विभागातही डॉक्टर नीलरतन धार आणि मेघनाथ सहा यांची नावे गाजत होती.

अलाहाबाद विद्यापीठाच्या ग्रंथालयासारखे मोकळे आणि सोयीचे ग्रंथालय मी आयुष्यात पाहिले नाही. ग्रंथालय सकाळी आठपासून संध्याकाळपर्यंत उघडे असे. पुस्तकांना कपाटे नाहीत. ती मोकळ्या शेल्फवर ठेवलेली. जागजागी खुर्च्या आणि टेबले मांडलेली. हवे ते पुस्तक उचलावे आणि हवा तितका वेळ वाचीत बसावे. चिठीचपाटीची भानगड नाही, लाकडी किंवा काचेच्या कपाटांचा अडथळा नाही, पुस्तके काढून दे म्हणून शिपायांच्या मागे मागे फिरणे नाही. मी तर या ग्रंथालयात तासन् तास घालविले आहेत. आणि शेकडो पुस्तके वाचून काढली आहेत. ग्रंथालयाच्या वरच्या मजल्यावर संशोधनाच्या विद्यार्थ्यांसाठी निवडक ग्रंथ ठेवलेले असत. अलाहाबाद विद्यापीठाचा विशेष हा, की अध्यापक विद्यार्थ्यांना 'मूळ' साधने वाचण्यास भाग पाडीत. त्यानंतरच वरील साधनांवर आधारलेले ग्रंथ वाचण्यास परवानगी मिळे. त्यामुळे कोणत्याही अभ्यास-विषयाची मूळ साधने तपासून घेण्याची मला सवय जडली. त्या विद्यापीठातील एकंदर वातावरणच चिकित्सक दृष्टी वाढविण्यासाठी मोठे पोषक होते. संशोधनात्मक कार्य करण्याची मला प्रेरणा मिळाली ती अलाहाबादमुळे होय.

युनिव्हर्सिटी सुरू झाली अठरा जुलैला. तेवीस जुलैला युनिव्हर्सिटीच्या यूनियनमध्ये माझे पहिले भाषण झाले, मुलांना ते अतिशय आवडले. त्या दिवशीच्या कार्यक्रमात माझ्या वर्गातील एक विद्यार्थी बोलला. त्याचे नाव श्यामकृष्ण भटनागर. तो दिल्लीजवळच्या सिकंद्रा गावचा. तो चांगल्या सधन कुटुंबातील असून वसतिगृहात राहात असे. आमची लवकरच विलक्षण गट्टी जमली. पुढील तीन वर्षे, त्याची गाठ पडली नाही असा एक दिवस जात नसे.

अलाहाबादेस बाईच्या बागेत, मी आणि बापट राहात होतो तेथे दहा पंधरा महाराष्ट्रीय कुटुंबे राहात होती, त्यांपैकी गोडबोले नावाचे एक गृहस्थ रेल्वेत काही कामावर होते. त्यांची माझी चांगलीच ओळख झाली. माणूस

मोठा अगत्यशील. काही ना काही कारण काढून मला त्यांनी अनेकदा जेवायला बोलाविले, पण महाराष्ट्राच्या बाहेर अनेक पिढ्यांपासून राहिलेली मंडळी महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांपासून दूरच राहिलेली दिसली. एक दिवस मी गोडबोल्यांच्या बरोबर महर्षी अण्णासाहेब कर्व्यांच्या कार्यासंबंधी बोलत होतो. तेव्हा गोडबोले म्हणाले, ' त्यांच्या कार्यासंबंधी काही सांगू नका. पुनर्विवाह हे खूळ आहे. कर्व्यांची बायको आनंदीबाई ही वर्गणी गोळा करण्यासाठी अलाहाबादला आली होती, आम्ही तिला थारा दिला नाही. ' हे उद्गार त्यांनी अभिमानाने काढले. मी थक्कच झालो.

नेहरु कुटुंबाचे आनंदभवन हे युनिव्हर्सिटीला लागून आहे. युनिव्हर्सिटीहून परतताना आनंदभवनच्या फाटकात मी कमला नेहरूंना कितीदा तरी पाहिले आहे. गौरवर्ण, सडपातळ शरीरयष्टी, सरळ नाक, मोठे डोळे, असे त्यांचे मोठे विलोभनीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या अंगावर तलम अशी लाल रंगाची शाल असे. त्यांच्या समोरून जाताना मी सायकलवरून उतरून पायी जात असे. त्यांना पाहून मनात आदराचे भरते येत असे. त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे असे वाटे.

आमची युनिव्हर्सिटी जुलैमध्ये सुरू झाली खरी, पण त्यावेळीं देशात राजकीय चळवळ जोरात चालू होती, अलाहाबाद तर राजकारणाचे केंद्र. विविध क्षेत्रांतील नामांकित माणसांचे माहेर. मोतीलाल आणि जवाहरलाल नेहरू, पुरुषोत्तमदास टंडन, सर तेजबहादुर सप्रू, हृदयनाथ कुंजरू, सी. वाय. चिंतामणी, गंगानाथ झा, डॉ. ताराचंद, मेजर बी. डी. बसू (राजई ऑफ दि ख्रिश्चन पॉवर इन इंडिया, स्टोरी ऑफ सातारा या ग्रंथांचे लेखक), डॉक्टर ईश्वरी प्रसाद, अशी कितीतरी माणसे त्यावेळी अलाहाबादेत होती. राजकीय चळवळींचा प्रभाव विद्यार्थ्यांवर झाल्याशिवाय कसा राहील ?

एक दिवस सकाळी दहाच्या सुमारास मी युनिव्हर्सिटीला गेलो. इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर काही मुली पिकेटिंग करीत होत्या. मी सायकलीवरून उतरताच फाटकाकडे पाठ करून आणि दोन्ही हात आडवे करून एका मुलीने मला अडविले. तिचे वय तेरा चौदा वर्षांचे असावे. ती सडपातळ बांध्याची, नाजूक आणि देखणी होती. तिने माझ्याकडे पाहून मान हलविली आणि आत जायचे नाही असे मला इशाऱ्याने सुचविले. मी सायकल धरून मागे वळलो आणि माझ्या मित्रांना विचारले, " कोण रे ही मुलगी ? " माझा मित्र म्हणाला, " जानते नही हो, पंडितजी की बेटी इंदिरा. " मी मुकाट्याने घराकडे परतलो. आपल्याला अडविणारी ही पोर पुढे १९६६ मध्ये भारताची पंतप्रधान होईल अशी मला त्यावेळी कल्पनाही आली नाही.

आमची युनिव्हर्सिटी दोन महिने बंद होती. युनिव्हर्सिटी बंद होताच बापट अलाहाबाद सोडून गेला. त्याने इंदूरच्या लॉ कॉलेजात प्रवेश घेतला. मला अलाहाबादेत एकटे वाटू लागले. बनारसची मला राहून राहून आठवण येई. त्यामुळे पंधरा ऑगस्टला मी बनारसला गेलो. तेथे एक आठवडा राहून आलो. मनाला तितकेच बरे वाटले.

पुणतांबेकरांच्या मुलीसंबंधी अण्णासाहेब खापर्डे यांनी मला सांगितले होते की मी बाबासाहेबांपाशी तुमच्यासंबंधी बोलेन. अलाहाबादेहून मी अण्णासाहेबांना पत्र पाठविले. अण्णासाहेबांनी मला कळविले की बाबासाहेबांशी प्रत्यक्षात बोलणे करणे मला जमेल असे वाटत नाही. तुम्हीच त्यांना पत्र लिहून मुलीला रास्त मागणी घालावी. पुणतांबेकरांच्या कडक आणि शिस्तीच्या स्वभावामुळे त्यांच्या बरोबरचे प्राध्यापक मित्रही त्यांच्याशी मोकळेपणाने बोलण्यास कचरत, अण्णासाहेबांनाही असेच वाटले असले पाहिजे. अण्णासाहेबांचे पत्र आल्यावर मी चार पाच दिवस विचार करीत होतो. शेवटी हिंमत करून बावीस ऑगस्ट १९३० रोजी मी पुणतांबेकरांना पुढील पत्र पाठविले. आज पंचेचाळीस वर्षांनंतरही ते पत्र लिहिताना माझ्या मनाची काय स्थिती झाली होती याची आठवण अगदी ताजी आहे :

गुरुवार, तारीख २२–८–३०

वडिलांसमान रा. रा. बाबासाहेब यांसी,

सेतूमाधवचा शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. माझे अनपेक्षितपणे आलेले हे पत्र पाहून कदाचित् आपणास फार आश्चर्य वाटणे साहजिकही आहे. परंतु हे पत्र आपणास वाटते त्यापेक्षा कितीतरी महत्त्वाचे आहे हे आपणांस ते वाचल्यानंतर सहज कळून येण्यासारखे आहे.

माझे पहिले कर्तव्य म्हणजे आपले मनःपूर्वक आभार मानणे होय. बनारसला मी जोपर्यंत होतो तोपर्यंत आपण मला अभ्यासामध्ये वेळोवेळी प्रोत्साहन देत गेला. माझ्या अभ्यासातल्या गतीकडे पाहून उत्तेजनपर शब्दांनी माझा गौरव करीत गेला व वेळोवेळी माझ्याविषयी आस्थेने व कळकळीने चौकशी करून आपल्या कॉलेजमधील आयुष्यक्रमाचे सकौतुक निरीक्षण कोणीतरी करीत आहे असे मला वाटावयास लाविले. या सर्व गोष्टींबद्दल मी आपले आभार न मानणे म्हणजे एक प्रकारचा कृतघ्नपणाच करणे होय.

आपले, प्रोफेसर मलानी व डॉक्टर नाग यांचे माझ्याविषयी चांगले मत झाले आहे असे मला वाटत असे व जेणेकरून आपणा सर्वांचे माझ्या विषयीचे मत कायम राहील असेच माझे वर्तन असे. माझ्याकडून अभ्यासात कोणतीच

हयगय घडली नाही. स्वतःस कलंकित करण्यासारखा कोणताही प्रमाद माझ्याकडून घडला नाही. स्वतःचे वर्तन कसे चांगले राखता येईल, समाजात मिळून मिसळून कसे वागता येईल इकडेच माझे लक्ष असे. माझ्या चरित्राला वळण लावण्याचे काम आपण सर्वांनी मिळून केले याबद्दल मला आपले आभार मानलेच पाहिजेत.

आज आपणास पत्र लिहिण्यास कारण फार महत्त्वाचे आहे. इतके दिवस मी माझ्या इच्छेवर दडपण घालीत आलो. शक्य तितके मनाचे संयमन केले. व माझ्या इच्छेची वाच्यता केली नाही. पण आता मनावर दडपण घालणे अशक्य झाले आहे. यापुढेही माझ्या इच्छेला आवरून धरणे म्हणजे शरीरावर व मनावर वाईट परिणाम करून घेणे होय. यामुळे नाइलाजाने मला माझी इच्छा आपल्यापुढे व्यक्त करावी लागत आहे.

हे पत्र वाचून आपणास राग येईल व कदाचित खेदही वाटेल. माझ्याविषयी कदाचित आपल्याला तिरस्कारही वाटू लागेल, पण हे सगळेही मी सहन करावयाला तयार आहे. माझे आपणास इतकेच लिहिणे आहे की कृपा करून आपण माझ्याविषयी गैरसमज होऊ देऊ नका. बाब महत्त्वाची आहे. तिचे महत्त्व मला अतिशय आहे. म्हणून हे पत्र शांतपणे विचारपूर्वक वाचावे असे माझे पुन्हा पुन्हा सांगणे आहे. अंतःकरण उघडे करीत आहे.

लिहिण्याचे कारण हे की मला आपल्या कन्येशी लग्न करावेसे वाटते. दोन वर्षांपूर्वी मी आपल्या मुलीला कॉन्व्होकेशनमध्ये पाहिले, तेव्हापासून मला असे फार वाटू लागले की लग्न व्हावे तर यांच्याशीच. परंतु मी मनात फार विचार केला की आपल्याजवळ असे काय आहे की ज्या योगाने आपल्या कन्येची मागणी करण्याचा मला अधिकार पोहोचेल. घरची आर्थिक स्थिती बरोबर नाही. घरून मदत नाही व जवळ नाव घेण्यासारखा एकही गुण नाही, अशा स्थितीत आपल्या मुलीकरिता मागणी घालणे म्हणजे धाडस करणे होय, असे मला वाटू लागले. सुदैवाने आपले माझ्याविषयीचे मत चांगले होते. यावरून मला असे वाटू लागले की जर आपण परीक्षेत पहिल्या वर्गात पास झालो तर आपले म्हणणे ऐकून घेण्यास पुणतांबेकर तयार होतील. या आशेने मी दुप्पट उत्साहाने अभ्यास केला व त्याचे फळ म्हणजेच मी आज पहिल्या वर्गात पास झालो.

कृपा करून गैरसमज करून घेऊ नये. कृपा करून राग मानू नये. आपण मला वडिलांसारखे. मी आपणासमोर एक छोकरू. आपणास सांगणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखे होईल. आपल्या मुलीविषयी सांगतो की,

त्यांच्याबरोबर आयुष्य कंठण्यात मला धन्यता वाटेल. या माझ्या भावना मी आतापर्यंत कोणासही कळविल्या नाहीत. सुशीलाबाईंना तर याविषयी काहीच माहीत नाही. या बाबतीत मी आपल्या आचरणाला दोषाचे वारेही लागू दिले नाही. माझे मन मी आपल्यालाच उघडे करून सांगत आहे.

मी वडिलांकडून आपणास पत्र लिहविले असते. पण ते पुराणमताभिमानी आहेत. सुधारलेल्या कुटुंबात मी लग्न करावे ही कल्पना त्यांना पसंत नाही. म्हणून नाइलाजाने मला सरळ आपल्याला पत्र लिहावे लागत आहे, मी आपल्याला समक्ष येऊन भेटणार होतो, पण आपल्या देशात व समाजात असे करणे म्हणजे सभ्यतेचे अतिक्रमण केल्यासारखे होते. म्हणून मी तसे केले नाही. आपल्याला पत्र लिहिण्यात मी अतिप्रसंग केला असे वाटत असेल तर माझ्या धृष्टतेची क्षमा करावी.

मनाचा क्षोभ अनावर झाला. भावनांना मी दाबू शकलो नाही. दाबून ठेवणे अशक्य झाले म्हणून आपल्याला कळवावे लागले.

माझे आपल्या मुलीशी लग्न आताच व्हावे अशी माझी इच्छा नाही. मला आश्वासन हवे. ते मिळाले तर कोणतेही कार्य करायला मला दुप्पट उत्साह येईल. माझी विनंती आपल्याला मान्य असल्यास माझ्या आनंदाला पारावार राहणार नाही. मान्य नसल्यास तसे कळवावे. वाईट वाटेल. वाटणे साहजिकच आहे. आयुष्यातील माझी इच्छा अपूर्ण राहिली असेच वाटेल. आपले कर्तव्य पालन करण्यास तयार होईन हे खरे; आयुष्याच्या लढ्यात भिऊन माघारी फिरण्याचा नामर्दपणा मी करणार नाही हे खरे. पण माझ्या कामात प्रेमाचा ओलावा राहणार नाही. जगाच्या रुक्ष वाळवंटातून प्रेमाचे, सहानुभूतीचे पाणी पाजण्यास कोणी सहधर्मचारिणी राहणार नाही. वाईट वाटेल. हे पत्र मला महत्त्वाचे आहे. माझ्या आयुष्याची दिशा आपल्या उत्तरावर अवलंबून आहे. हे जाणून व हृदय आटून तळमळणाऱ्या अंतःकरणाने हे पत्र लिहिले असे समजून या पत्राचे उत्तर द्यावे अशी आपल्या पायांजवळ नम्र प्रार्थना आहे.

पत्र लिहिण्यात मर्यादेचे अतिक्रमण झाले असल्यास क्षमा करावी.

आपला नम्र

सेतुमाधव पगडी

माझ्या वरील पत्राला एक क्षणाचाही विलंब न करता बाबासाहेबांनी मला उत्तर पाठविले; पत्रात दोन वाक्ये होती. 'माझ्या मुलीच्या लग्नाचे ठरले आहे. या बाबतीत तुम्ही इतःपर लिहिणे तुम्हांला श्रेयस्कर होणार नाही.'

या पत्राने मी अगदीच खचून गेलो. मी खापर्ड्यांना पत्र पाठविले, त्यांनी

कळविले, ' असे काहीतरी होणार अशी माझी कल्पना होती. पण तुम्ही खचू नका. आपल्या अभ्यासाला लागा, त्या यशातून पुढे तुम्हांला संधी मिळणार नाही कशावरून ? '

अण्णासाहेबांच्या पत्राने मला धीर आला. बाईच्या बागेत मात्र माझे मन लागेना. बापट निघून गेल्यापासून मला तेथे फार एकेकटे वाटू लागले होते. खर्चाचीही तारांबळ होती. मिसेस शास्त्री आणि प्राध्यापक मलानी यांच्याकडून मला दर महिन्यास पैसे येऊ लागले; त्यातून मी कसाबसा दिवस ढकलीत असे. स्वयंपाक हाताने करून घेई. त्या वेळच्या खर्चाच्या नोंदी माझ्या डायरीमध्ये टिपलेल्या आहेत. नमुना म्हणून ऑगस्ट आणि सप्टेंबरचा खर्च देत आहे. त्यावरून चाळीस वर्षांपूर्वीच्या अन्नधान्याच्या किमतींचीही कल्पना येईल.

बनारसचा प्रवास खर्च (१९ ऑगस्ट १९२३) तीन रुपये दहा आणे तीन पै, खादीची धोतरे चार रुपये १ आणा, वर्तमानपत्रे तीन आणे, चहापाणी चार आणे. लाडू दोन आणे, दंतमंजन चार आणे, चहा दोन आणे, नऊ पै रवा, तीन पै भाजी, चार आणे एक पै डाळ, सहा पै चहा, एक आणा दूध, दोन आणे चहा, पाच आणे चहा-सरबत, दोन आणे नऊ पै तेल, एक आणा तीन पै कोळसे, तीन पै काड्याची पेटी, एक रुपया पुऱ्या, एक रुपया सहा आणे सहा पै बालडी, शेगडी, साखर, खिळे, पाच आणे जबलपूरचा प्रवासखर्च

कार्ड पाकिटे नऊ आणे, सायकलचे मडगार्ड बदलले त्याचे एक रुपया दहा आणे, सायकल रिपेअर एक रुपया चौदा आणे, बशा विकत घेतल्या सात आणे तीन पै, परीट व साबण तीन आणे नऊ पै, घासलेट तेल चवदा आणे सहा पै, चहा, साखर, दूध अकरा आणे; फराळाचे जिलब्या व लाडू, जेवणाचे चार रुपये तेरा आणे सहा पै, तांदूळ तीन शेर (आणि आता ?) चार आणे; कणीक दोन शेर पाच आणे, तुरीची डाळ दोन शेर तीन आणे नऊ पै, मूगाची डाळ दोन शेर तीन आणे, नऊ पै तिखट मीठ, दहा आणे कोळसे, एक आणा न्हावी.

त्यावेळच्या माझ्या जीवनक्रमाची कल्पना यावी म्हणून मी वरील नोंदी दिल्या.

माझा बनारसचा मित्र जोगेशचंद्र मुजुमदार बी. ए. झाला. बनारसचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉक्टर प्राणनाथ यांनी त्याला प्रोत्साहन दिल्यामुळे तो ऑस्ट्रियाला गेला. तेथून त्याचे मला पत्र आले. आपण अर्थशास्त्राचा अभ्यास करीत आहोत असे त्याने कळविले होते. तेच त्याचे शेवटचे पत्र. यानंतर तो नाझी लोकांच्या तावडीत सापडला. जगणे असह्य होऊन त्याने

आमहत्या गेली. तो माझा जीवश्च कंठश्च स्नेही होता. बनारसच्या माझ्या कष्टाच्या जीवनात आमच्या स्नेहाने मला कितीतरी धीर येत असे. अद्याप त्याची आठवण झाली की क्षणभर श्वास अडकल्यासारखे होते आणि काही सुचेनासे होते.

बाईच्या बागेतून निघण्याचे मी ठरविले. मला दारागंजातील भागवत सुंगरे यांची आठवण झाली. बापटांच्या बरोबर मी होळकर वाड्यात गेलो असताना त्यांनी मला तेथे येऊन राहण्यासाठी सांगितले होते. ऑगस्ट १९३० च्या शेवटच्या आठवड्यात मी होळकर वाड्यात येऊन दाखल झालो. भागवत आणि सुंगरे हे वाड्यात होते. अभ्यंकर नंतर आले. होळकर वाड्यात मला पुन्हा गंगामाईचा सहवास लाभला. खिडकी उघडली की गंगेचे पात्र दिसावयाचे. तिच्या पात्राचा गंभीर आवाज रात्रंदिवस माझ्या कानावर पडे. रात्री-अपरात्री मी किती वेळ व्हरांड्यात बसून तासचे तास गंगेकडे पाहात बसे. तीन वर्षेपर्यंत अलाहाबादेत मला ते भाग्य लाभले, ' डोळ्यांत वाच माझ्या तू गीत जान्हवीचे ' अशीच माझी अवस्था झाली होती. माझ्या डायरीत नैसर्गिक दृश्यासंबंधी मी लिहिलेल्या काही नोंदी सापडतात. गंगेचे लाभलेले सान्निध्य ही माझ्या लेखनामागची एक प्रेरणा असावी असे मला वाटते. वीस सप्टेंबरची एक नोंद पुढीलप्रमाणे आहे : ' ही दुपारची वेळ आहे. गंगा अगदी शांत व सौम्य दिसते. हिच्या या सौम्य रूपाकडे पाहून पावसाळ्यात विचारापेक्षाही वेगाने वाहणारी व मार्गात येणाऱ्या प्रत्येक वस्तूचा नाश करणारी गंगाबाई हीच असेल असे मुळीच वाटत नाही. आता गंगेच्या स्निग्ध पात्रात सूर्याच्या तेजाने लखलखणारे नील आकाश फारच खुलून दिसते. असे वाटते की आभाळातून तेजोमय असा परमेश्वर पृथ्वीकडे डोकावून पाहात आहे. नदीवर नावा संथपणाने चालल्या आहेत. सगळीकडे शांततेचे साम्राज्य नांदत असून, पात्राच्या लहरींबरोबर वाहात येणारा हा थंड वारा आल्हाद देत आहे. या दृश्याने कोणाचे मन रमणार नाही बरे. '

आज वरील मजकूर वाचून हसू येते. कविता करण्याची पण मला मधून मधून हुक्की येई. पण कवितेचे तंत्र माहीत असेल तर ना. लघु, गुरू, यति, मात्रा, इत्यादींचा तर मला काडीचाही गंध नव्हता.

पण त्यांचे मला काय होय : एकदा बनारसला ताईबाईंनी गुळाच्या पोळ्या खाऊ घातल्या. मला वाटले, आपण एखादी कविता करावी. त्यावेळी मी वामन पंडिताच्या कविता चाळीत असावा, वंशी नाद नटी ! किंवा अही तोही पाहे अवसर डसायास हरिला, अशाच काही तरी ओळी डोक्यात घोळत असाव्या. मला वाटले, गुळपोळ्यावर कविता करणे काय अवघड आहे? पण प्रत्यक्षात

ओळी लिहिण्यास बसलो तो शब्द सुचेनात. तासानंतर मोठ्या कष्टाने आमच्या-कडून ही दिव्य ओळ बाहेर पडली !

'गुळाच्या त्या पोळ्या करूनि सगळ्या अर्पिन तुला धनासी देई तू—'

गेली चाळीस वर्षे ती ओळ काही मी पूर्ण करू शकलो नाही, आणि सगळ्या पोळ्या (यमक साधण्यासाठी) अर्पण करून राहणार काय ?

गंगेवर कविता करावी म्हणून मी बसलो, तेव्हाही मला हाच अनुभव आला. त्या दिवशी (वीस सप्टेंबर १९३०) मी ही ओळ लिहिली :

'गंगेच्या अतिशांत अंबुवरुनी येतो जो थंडवायु' बालकवीच्या 'रात्री शांत गभीर अंबुनिधीच्या आनील पृष्ठावरी' यावरून मी काही शब्द चोरले असावेत. पण 'थंड वायु' हे शब्द जुळेनात. त्याऐवजी 'हा मारुत' हे शब्द घातले. पण पुढची ओळ काय लिहावी ? तास दोन तास विचार करण्यातच मी घामाघूम झालो. शेवटी कशीबशी दोन ओळींची कविता तयार झाली :

'गंगेच्या अतिशांत अंबुवरूनि येतो जो हा मारुत
झालेली शरिरी त्रासदायक अशी ही उष्णता वारित'

मी वही बंद केली आणि मनाशी म्हटले, 'अरे वेड्या, कविता काय करीत बसला आहेस ? समोरची गंगा पाहा, परमेश्वराची ती दिव्य वाणी वाहते आहे. ती समजून घेण्याचा प्रयत्न कर.' आणि मी अनिमिष नेत्रांनी गंगेच्या धो धो वाहणाऱ्या पात्राकडे पाहात बसलो.

सुशील पुणतांबेकर हिच्यावर कविता करावी असा मी प्रयत्न केला. पण काही केल्या ओळीला ओळ जमविणे साधेना. शेवटी पुढील चार ओळी तोंडपाठ करून मधून मधून गुणगुणू लागलो—

'प्रीतीचा चटका जिवास पहिला जी बालिका लाविते
दिव्याचे निज लोचनात वसते साम्राज्य ती दाविते
पुण्याची पुतळीच ती दयित त्या लावण्यराशीपुढे
होई लीन अधीन, शब्द न फुटे मोह प्रवाही बुडे'

मी बनारसहून पहिल्या वर्गात बी. ए. झालो होतो. बनारस येथे मला मिळत असलेली साठ रुपयांची बिर्ला स्कॉलरशिप सोडून मी अलाहाबादेस आलो होतो. मला वाटले, येथे आपल्याला फ्री-शिप तरी मिळेल. एम. ए. ची फी पंधरा रुपये होती. प्राध्यापक मलानी मला दहा रुपये पाठवीत. मिसेस शास्त्रींकडून कधी पंधरा तर कधी वीस असे रुपये येत. मी फी-माफीचा अर्ज केला.

दोन महिन्यांच्या हरताळानंतर आमचे कॉलेज सुरू झाले. आमचे प्राध्यापक डॉक्टर ताराचंद हे आम्हांला पोलिटिकल सायन्स शिकवीत. मनुष्य कमालीचा

बुद्धिमान, पण भलताच शिष्ट. पोलिटिकल थिअरी शिकविण्यात ताराचंदांचा हातखंडा असे. तो अवघड विषय त्यांनी कमालीचा सोपा करून दाखविला. पण त्यांची एकंदरीत वागणूक उच्चभ्रू माणसांची. कोणत्याही गोष्टीकडे पाहताना, या क्षणिक, क्षुल्लक आहेत असे दाखविण्याचा त्यांचा आविर्भाव असे. विद्यार्थी-वर्गात ते फारसे मिसळत नसत. एकदा मी युनिव्हर्सिटीत गेलो. लायब्ररीच्या दाराशीच मला कुणी सांगितले की जवाहरलाल नेहरू पकडले गेले आहेत आणि आज वर्ग काही भरणार नाहीत. विशेष चौकशी न करता लायब्ररीत जाऊन पुस्तक वाचीत बसलो. तास दोन तासांनी माझा एक मित्र लायब्ररीत आला. मी त्याला विचारले, 'काय रे, आज वर्ग भरला नाही ना?' तो म्हणाला, 'अरे, डॉक्टर ताराचंद वर्गात आले. वर्गात जे जे हजर होते त्यांची नावे त्यांनी नोंदली. तू गैरहजर होतास याचीही नोंद झाली आहे.'

मला त्यावेळी या गोष्टीचे विशेष महत्त्व वाटले नाही. सुमारे दोन आठवड्यां-नंतर मला कळले की माझा फी-माफीचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. मी डॉक्टर बेनीप्रसाद यांच्याकडे गेलो. खोलीत ते आणि डॉक्टर ताराचंद हे बसले होते. मी बेनीप्रसादांना म्हटले, 'मी बी. ए. फर्स्ट क्लास फर्स्ट आहे. मला मिळणारी स्कॉलरशिप सोडून मी अलाहाबादला आलो. माझी फी सुद्धा माफ होऊ नये याचे काय कारण आहे?' डॉक्टर बेनीप्रसाद म्हणाले, 'तुम्ही क्षमा मागा म्हणजे तुमची फी माफ होईल.' मी म्हटले, 'क्षमा कशाची मागायची?' ते म्हणाले, 'नेहरूंना पकडले त्या दिवशी तुम्ही वर्गात हजर राहिला नाहीत.' मी म्हटले, 'त्या दिवशी मी युनिव्हर्सिटीत दाखल होताच, मला सांगण्यात आले की नेहरूंना पकडण्यात आले असून, आज वर्ग भरणार नाहीत. म्हणून मी तडक लायब्ररीत जाऊन संध्याकाळपर्यंत तेथे वाचीत बसलो. मुद्दाम वर्ग बुडवीन हे कसे शक्य आहे?' डॉक्टर बेनीप्रसाद म्हणाले, 'ते काही नाही. तुम्ही क्षमा मागितलीत तर फी माफ होईल.' मी म्हटले, 'मी खरे ते सांगितले. ते आपल्याला पटत नसेल तर मी काही माफी मागणार नाही.' असे म्हणून मी बाहेर निघून आलो. माझा अर्ज फेटाळला गेला आणि दोन वर्षेपर्यंत दर महिन्याला पंधरा रुपये फीचे म्हणून भरणे मला भाग पडले.

पण ते पैसे आणायचे कुठून याचा विचार करीत मी एक दिवस यूइंग क्रिश्चन कॉलेजात गेलो. दास नावाचे एक बंगाली क्रिश्चन इंग्रजी शाखेचे प्रमुख होते. मी त्यांना म्हटले, 'मला काम द्या, मला पैशाची अडचण आहे.' त्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले. ते म्हणाले, 'तुम्हांला देण्यायोग्य अशी नोकरी माझ्यापाशी नाही. पण मी एक काम करू शकेन. मला दर आठवड्यास इंग्रजी

निबंधाच्या वह्या तपासाव्या लागतात. आणि विद्यार्थ्यांना मार्क द्यावे लागतात. तुम्ही निबंध तपासावे, दुरुस्त्या कराव्या आणि मार्क द्यावे. सह्या मात्र मी करीत जाईन. याबद्दल मी तुम्हांला महिन्याला पंधरा रुपये देत जाईन.' मी त्यांचे म्हणणे कबूल केले आणि दर आठवड्यास निबंधाचे गठ्ठे आणून तपाशीत बसू लागलो. पण फी-पुरती तरी माझी काळजी दूर झाली.

कॉलेज सुरू झाल्यावर मी, प्राध्यापक पुणतांबेकरांनी दिलेले पत्र घेऊनच गुरुदेव रानड्यांच्याकडे गेलो ते तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. गाढे विद्वान म्हणून त्यांची कीर्ती चहूकडे दुमदुमत होती. मिस्टिसिजम इन महाराष्ट्र हा त्यांचा ग्रंथ सर्वमान्य झाला होता. आणि डॉक्टर बेलवलकर यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहून काढण्याची प्रचंड योजना हाती घेतली होती. मी त्यांच्या घरी गेलो. मी हाक मारली. पण बाहेर कोणी आले नाही म्हणून मी घराला वळसा घेत काचेच्या तावदानातून आत पाहिले. एका लहानशा खोलीत एका आसनावर रानडे पडले होते. अंगावर फक्त पंचा होता. मला पाहून ते बाहेर आले. आम्ही अर्धा पाऊण तास बोलत होतो. रानड्यांची शरीरयष्टी अगदीच किडकिडीत होती. पण त्यांचे निरागस व्यक्तिमत्त्व, त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे तपस्याचे तेज आणि त्यांचा साधेपणा ही पाहून मला रामकृष्ण परमहंसांच्या चरित्राची आठवण झाली. रानडे हे परमेश्वरध्यानात सदैव मग्न असल्यासारखे वाटत. त्यांना पाहून मी अक्षरशः मंत्रमुग्ध झालो. मला त्यांच्याकडे काही मागावयाचे नव्हते. त्यांनी माझी आस्थेने चौकशी केली आणि अधूनमधून भेटण्यास मला सांगितले. कॉलेजमध्ये येत तेव्हा त्यांच्या अंगावर कपडे अगदी साधे असत. थंडीच्या दिवसांत तर ते कपड्यावर घोंगडी (पांढरी) लपेटून येत. मला वाटते त्यांना रोज गंगेचे पाणी लागे; एक दिवस मी युनिव्हर्सिटीला पायी चाललो असताना त्यांनी मोटार थांबविली आणि मला आत घेतले. मोटारीत गंगेच्या पाण्याची घागर होती. गुरुदेव घोंगडी पांघरून बसले होते. मोटारीतही त्यांनी छत्री उघडली होती. ते मला म्हणाले, 'मोटारीत वारे लागते म्हणून मी छत्री उघडली आणि गंगेचे पाणी मोठे मधुर आणि पाचक आहे; म्हणून मी ते बरोबर आणले आहे.' गुरुदेवांनी मला युनिव्हर्सिटीत सोडले आणि ते आपल्या घराकडे निघून गेले. मी त्यांच्याकडे मधून मधून जात असे. प्रत्येक वेळेस त्या थोर पुरुषाच्या पवित्र व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर परिणाम होत असे. त्यांचा जो थोडाबहुत सहवास मला लाभला त्यामुळे मी धन्य झालो, कृतार्थ झालो.

'राईज ऑफ दि क्रिश्चन पावर इन इंडिया या ग्रंथाचे लेखक, 'स्टोरी ऑफ

सातारा ' या आपल्या ग्रंथामुळे महाराष्ट्राला परिचित असलेले मेजर बी. डी. बसू हे त्यावेळी अलाहाबादेस राहात असत. त्यांच्याकडे जाण्याचा मला एकदा योग आला. बसू हे व्यवसायाने डॉक्टर. सरकारी नोकरीच्या निमित्ताने त्यांची महाराष्ट्रात अनेक वर्षे गेली होती. साताऱ्याचे प्रतापसिंह महाराज आणि प्रख्यात मुत्सद्दी रंगो बापूजी यांच्यावरील त्यांचा ' स्टोरी ऑफ सातारा ' हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. बसू आमच्याशी बराच वेळ बोलत होते. त्यांचा स्वभाव विनोदी आणि खेळकर दिसला.

त्यांनी सांगितलेली एक गोष्ट मला अद्याप आठवते. एका इंग्रज अधिकाऱ्याला हिंदी अजिबात येत नसे. तो आपल्या जिल्ह्यात एकदा दौऱ्यावर निघाला. त्याच्याबरोबर त्याची बायको आणि एक लहान मुलगाही होता. दौऱ्यात मुलगा आजारी पडला. कुणीतरी त्याला सांगितले की मुलाला गाढवीचे दूध पाजा म्हणजे तो बरा होईल. साहेबाने गावच्या प्रमुखाला बोलवून घेतले. आम्हांला गाढवीचे दूध पाहिजे हे त्याला सांगावयाचे होते. पण त्याला जमेना. शेवटी त्याने स्वतः गाढवासारखे ओरडून दाखविले, आणि आपल्या बायकोकडे बोट दाखवून हाताने दूध काढण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. आता कोठे गाव-प्रमुखाला उलगडा झाला. तो म्हणाला, ' अब आया समझमें. तुम गधा साब, और ये गधा मेमसाब. '

बसूंच्या तोंडून ही गोष्ट ऐकून माझी हसून हसून मुरकुंडी वळली.

या गोष्टीला एखादा महिना झाला असेल नसेल तोच मेजर बसू वारले. तेवीस सप्टेंबर १९३० रोजी मी सायकलवरून युनिव्हर्सिटीला चाललो होतो. तो समोरून प्रेतयात्रा येत होती. मी चौकशी केली तेव्हा कळले मेजर बसू वारले. मोठा विद्वान आणि व्यासंगी माणूस.

माझा जन्म सत्तावीस ऑगस्ट १९१० चा. पण मॅट्रिकच्या परीक्षेला मी अवघा साडेतेरा वर्षांचा होतो म्हणून मी वडिलांना सांगून माझे वय वाढवून घेतले होते. मॅट्रिकच्या सर्टिफिकेटप्रमाणे माझी जन्मतारीख तीन सप्टेंबर १९०८ ही होती. म्हणजे मला बाविसावे वर्ष चालू होते. आय. सी. एस ला फक्त वीस आणि एकवीस या वयाच्या विद्यार्थ्यांना बसण्याची परवानगी असे. मला त्या परीक्षेला बसता येणार नाही असे मला वाटले.

पण योगायोग पाहा. सप्टेंबरच्या सुरवातीला मी युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत वाचीत बसलो असताना माझ्या ओळखीचा एक काश्मीरी मुलगा जवळ येऊन मासिके चाळू लागला. तो आय. सी. एस. ची तयारी करीत होता. त्या-संबंधी त्याच्यापाशी मी सहज चौकशी करू लागलो. मी त्याला म्हटले, ' मला

आता बाविसावे वर्ष चालू आहे. मी काही आय. सी. एस. ला बसू शकत नाही.' तो म्हणाला, 'कमाल आहे तुझी! अरे तुझा जन्म सप्टेंबर १९०८ चा ना? पण तू १९३१ च्या परीक्षेला बसू शकतोस. इंग्रजीत एकवीस पूर्ण याचा अर्थ सप्टेंबर १९३१ पर्यंतचा काळ आहे. तुझे वय एकवीस आहे. बाविसावे चालू म्हणजे तू बावीस वर्षांचा नाहीस.'

त्याच्या त्या एका वाक्याने माझ्या शरीरातून एक वीज निघून गेल्यासारखे झाले. आपणही आय. सी. एस. ला बसायचे असा मी निश्चय केला. मी तावडतोब अर्जाचे फार्म आणले आणि तो भरण्याच्या तयारीला लागलो. पण परीक्षेच्या फीचे पैसे आणायचे कुठून? मला वाटते परीक्षेची फी शंभर रुपये असावी. मी वडिलांना पत्र लिहिले. परीक्षेच्या फीसाठी आईने पाटल्या विकून एकशे पंचाहत्तर रुपये पाठविले. माझ्या अंतःकरणाची विलक्षण घालमेल झाली. आईपाशी आता गळ्यातील मंगळसूत्राशिवाय दुसरे काही शिल्लक राहिले नव्हते. माझ्या लहानपणी आई नखशिखान्त दागिन्यांनी मढलेली असे. ती आज अगदी लंकेची पार्वती बनली होती!

सकाळी उठल्यावर मी भागवत आणि मुंगरे स्वयंपाकाला लागत असू. मुंगरे इंदूरकडच्या बाट्या फार छान करीत. वरण शिजविणे, भाजी तयार करणे, इत्यादी कामे मी करी. भागवत पोळ्या लाटीत. कधी कधी पक्वान्ने करण्याची मला हुक्की येई. दोन ऑक्टोबर १९३० ला दसरा होता. माझ्या दैनंदिनीत त्या तारखेची नोंद अशी आहे: 'आज मी स्वतः हाताने पुरणाच्या पोळ्या व कडबू बनविले होते. पोळ्या काही इतक्या बऱ्या झाल्या नाहीत. पण कडबू तर माझ्याही अपेक्षेबाहेर चांगले झाले होते. अहाहा, स्वतः हाताने बनवून खाण्यात किती मजा येते बरे. विशेषतः स्वतः पक्वान्न बनविण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होय.'

आता ती वाक्ये वाचताना हसू येते. पण त्यावेळी आम्ही सगळे मिळून स्वयंपाक करून खात असू. त्याची मजा काही वेगळीच असे.

जेवणे झाल्यावर मी सायकलीवरून कॉलेजात जाई. अभ्यासाचे वर्ग दोन अडीच तासांवर नसत. तास संपल्यावर मी लायब्ररीत जाऊन वाचन करीत बसे, तो संध्याकाळी सहा वाजेपर्यंत. त्यानंतर मी कधी पायी तर कधी सायकलवरून रमत गमत घरी येई. नंतर पुन्हा स्वयंपाक, जेवण, विद्यार्थ्यांच्या निबंधाच्या वह्या तपासायच्या, पुन्हा अभ्यास, अर्धा पाऊण तास गंगेकडे पाहात बसणे, नंतर झोप.

असा माझा कार्यक्रम होता.

परीक्षेचा अर्ज मी भरला. पण परीक्षेस बसण्याची परवानगी मिळण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी आवश्यक असे. त्यासाठी आम्हांला लखनौच्या बलरामपूर हॉस्पिटलमधे बोलावण्यात आले. एकोणीस आक्टोबर १९३० रोजी मी लखनौला गेलो. हॉस्पिटलमधे तपासणीसाठी जवळ जवळ सत्तर ऐंशी उमेदवार जमले होते. पहिल्या दिवशी चाळीस उमेदवारांना तपासण्यात आले. तोपर्यंत दुपारचे दोन वाजले. आम्हांला दुसऱ्या दिवशी येण्यासाठी सांगण्यात आले. वैद्यकीय तपासणीसाठी दोनच दिवस राखून ठेवण्यात आले होते. माझ्या वाट्याला दुसरा म्हणजे शेवटचा दिवस आला.

लखनौमधे मी छेदीलाल धर्मशाळेत उतरलो होतो. आजही आपल्याला परत येण्यास दुपारचे दोन वाजतील या कल्पनेने मी सकाळी भक्कम नाश्ता केला. लखनौला गोड पदार्थ फार चांगले मिळतात. मी मागेपुढे विचार न करता शिरा, जिलब्या, गुलाबजाम, बासुंदी, बंगाली मिठाई इत्यादींच्यावर सपाटून हात मारला. माझे पोट म्हणजे मिठाईघर बनले. यानंतर मी डुलत डुलत बलरामपूर हॉस्पिटलमध्ये गेलो, उमेदवारांची तपासणी चालू झाली होती. मी आपली पाळी येण्याची वाट पाहात असताना माझे लक्ष जवळच बसलेल्या एका उमेदवाराकडे गेले. त्याला मी आदल्या दिवशी पाहिला होता. त्याने आज पुन्हा येण्याचे काय कारण घडले असावे मला समजेना. मी त्याला विचारले, ‘का हो, तुम्ही काल आला होता. तुमची वैद्यकीय तपासणी काल झाली ना—’

‘झाली तर’ तो म्हणाला. मी विचारले, ‘मग तुम्ही आज येथे कसे?’ तो म्हणाला, ‘अहो, तपासणीत काल माझ्या लघवीत साखर निघाली. डॉक्टरांनी मला विचारले, ‘तुम्हांला डायबेटीस तर नाही?’ मी म्हटले ‘मुळीच नाही’ डॉक्टर म्हणाले, ‘मग तुम्ही आज गोडबीड खाल्ले की काय?’ मी म्हटले, ‘होय,’ डॉक्टर म्हणाले, ‘तरीच तुमच्या लघवीत साखर दिसते. तुम्ही पुन्हा उद्या या. मात्र गोडबीड खाऊ नका.’ म्हणून मी आज आलो आहे. नशीब माझे. आजही वैद्यकीय तपासणीचा दिवस होता. म्हणून डॉक्टरांनी मला पुन्हा येण्याची परवानगी दिली.

त्याचे हे बोलणे ऐकून मी घाबरून गेलो. मी म्हटले, ‘अहो, मी पण आज जिलब्या, गुलाबजाम वगैरे खाऊन आलो आहे. मग माझ्या लघवीत साखर येणार की काय?’ ‘येणारच,’ तो म्हणाला, ‘आणि आज तपासणीचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे तुमच्या आजच्या तपासणीवरूनच डॉक्टर ठरविणार, तुम्हांला परीक्षेला बसू द्यावे किंवा नाही ते!’ मी त्याला म्हटले, ‘माझ्या लघवीत आज साखर येऊ नये म्हणून काय करावे?’ तो म्हणाला,

'एकच उपाय आहे. भरपूर सोडा प्या—'

मी घाईघाईने हॉस्पिटलच्या बाहेर आलो. समोरच एक उपाहारगृह होते. तेथे जाऊन मी सोड्याच्या चार पाच बाटल्या प्यालो. मी मनातून परमेश्वराचा धावा करीत होतो, 'देवा, माझ्या पोटातील जिलब्या, बासुंदी, हलवा, गुलाबजाम ही सर्व पचवून जाऊ दे.'

मी हॉस्पिटलमध्ये येतो न येतो तोच मला डॉक्टरांनी आत बोलाविले. माझी पाचावर धारण बसली. डॉक्टरांनी माझी तपासणी केली. शेवटी त्यांनी काचेचा पेला पुढे करून मला म्हटले, 'आता लघवी करा.' मी पेला समोर धरला. पण मनातील भीतीमुळे मला लघवीच होईना. मला वाटे लघवी सुरू झाली आणि तीतून जिलबी, गुलाबजामनची साखर वाहू लागली तर कसले आय. सी. एस. आणि कसले काय. चार पाच मिनिटे मी ग्लास घेऊन नुसताच उभा होतो. डॉक्टर म्हणाले, 'काय हो, लघवी होत नाही काय?' मी म्हटले, 'बाहेरून आताच लघवी करून आलो म्हणून होत नसावी.' ते म्हणाले, 'मग असे करा, बाहेर जाऊन गार पाणी पिऊन घ्या. दोनच्या सुमारास मी तुम्हांला तपाशीन.' मी बाहेर जाऊन आलो. आता मला काळजी लागली की लघवी कशी व्हावी? अर्धा एक तासपर्यंत मी सारखा नळाचे गार पाणी पीत होतो. त्याचा परिणाम म्हणून मला जोराची लघवी लागली. पण ती तपासणीसाठी राखून ठेवायची होती. शेवटी दुपारी एकच्या सुमारास डॉक्टरांनी बोलाविले. सर्व उमेदवारांची तपासणी संपली होती. डॉक्टर रिपोर्टांची आवराआवर करीत होते. मला पाहताच त्यांनी एक ग्लास माझ्याकडे सरकविला आणि ते आपल्या कामात गढून गेले. मी लघवी सुरू केली. हा हा म्हणता सगळा ग्लास भरून गेला, तरी लघवी थांबेना. मी डॉक्टरांच्याकडे दुसरा ग्लास मागितला. पण त्यांचे माझ्याकडे लक्ष नव्हते. मी मागेपुढे न पाहता टेबलावरील दोन लहान ग्लास उचलले आणि ते थोड्याच वेळात भरून काढले. तोच डॉक्टरांचे माझ्याकडे लक्ष गेले. ते मला ओरडून म्हणाले, 'व्हाट आर यू डुइंग, माझे पेले खराब करता की काय?' मी खजील झालो. मी म्हटले, 'मला माफ करा. मला आवरले नाही. पण कृपा करून सांगा, माझ्या लघवीत साखर आहे काय?' डॉक्टर काहीशा रुक्ष स्वरात म्हणाले, 'यात कसली मातीची साखर असणार आहे!' पडत्या फळाची आज्ञा समजून मी तेथून निसटलो.

डॉक्टरांना त्रास देणारे विद्यार्थीही काही कमी नसत. मी वैद्यकीय तपासणीसाठी गेलो त्याच्या आदल्या वर्षीची गोष्ट.

आय. सी. एस. परीक्षेचा एक उमेदवार विद्यार्थी वैद्यकीय तपासणीसाठी

म्हणून बलरामपूर हॉस्पिटलमध्ये गेला. डॉक्टरांनी त्याला कपडे काढण्यास सांगितले. वैद्यकीय तपासणीत डॉक्टर भलभलत्या जागी हात लावतात. त्या उमेदवाराला डॉक्टरांनी नाजुक ठिकाणी हात लावला मात्र. तो एकदम उत्तेजित झाला. आणि ओरडला, ' डॉक्टर, हात मागे घ्या. मला काही सुधरेनासे झाले आहे. डॉक्टर थोडा वेळ थांबले, पुन्हा त्यांनी हात पुढे केला, की पुन्हा तोच प्रकार. शेवटी डॉक्टर म्हणाले, ' आप ठंडे क्यौं नहीं हो जाइये, थंड व्हा. ' आणि घाईघाईने त्यांनी आपली तपासणी संपविली.

हॉस्पिटलमधून परत येताना माझी आणखी एका कारणाने तारांबळ उडाली. बनारसला गेल्यापासून माझे कपडे म्हणजे धोतर आणि शर्ट हेच असत. आय. सी. एस. च्या परीक्षेला बसायचे तर अंगावर सूटपँट तर हवी. त्याच्यासाठी माझ्यापाशी पैसे कुठे होते ? पण लखनौला वैद्यकीय तपासणीसाठी जायचे तर निदान पायजामा तरी हवा म्हणून मी अलाहाबादी पद्धतीचा रुंद असा पायजामा शिवून घेतला. तोच घालून मी हॉस्पिटलमधून परत येत असता पायजम्याची नाडीची दोरी तुटली. दोरीला समोर नेहमीसाठी गाठ मारून ठेवावी हे मला माहीत नव्हते, दोरी गेली पायजाम्यात. बोट घालून ती बाहेर काढावी तर ती आत आत जायला लागली. शेवटी मी सगळी दोरी बाहेर ओढून काढली आणि बेल्टसारखी पायजाम्यावरून बांधली. आज मी हवे ते आणि हवे तितके कपडे शिवून घेऊ शकतो. पण विद्यार्थीदशेतील गरिबीमुळे ती हौस पार मारली गेली आहे. कपड्याच्या बाबतीत मला चोखंदळपणा आयुष्यभर साधला नाही.

अलाहाबादला परत आल्यानंतर मी आय. सी. एस. च्या अभ्यासाला जारीने सुरवात केली. त्या वर्षी अलाहाबादेत अनेक विद्यार्थी आय. सी. एसला बसले. त्यांपैकी जे उत्तीर्ण झाले त्यांत व्ही. शंकर, भारत सरकारचे दळणवळण खात्याचे सचिव, आणि राजेश्वर दयाळ परदेशातील आपले राजदूत हे मला आठवतात. हे माझ्याबरोबर एम. ए. च्या वर्गात होते. सतराशे मार्कांचे पेपर होते. इतिहास, राज्यशास्त्र, इंग्रजी साहित्य, सायन्स असे काही विषय होते. इंग्रजीसाठी मी रोमँटिक पीरियड (१७९० ते १८३०) निवडला होता. या कालखंडातील कवी म्हणजे वर्डस्वर्थ, शेले, कीटस आणि बायरन हे होत. परीक्षेसाठी म्हणून मी या कवींची ओळ न ओळ वाचून काढली. ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर हे तीन महिने मी रात्रंदिवस वाचन करीत होतो. राज्यशास्त्र, इतिहास, इंग्रजी साहित्य या विषयांवर मी असंख्य पुस्तके वाचून काढली. सायन्सवर थॉम्सनच्या आउटलाइन्स ऑफ

सायन्स या ग्रंथाचे दोन खंड प्रत्येकी हजार हजार पानांचे, मी वाचून काढले. शास्त्रज्ञांची चरित्रे, त्यांनी लावलेले शोध, भौतिक, रसायन, वनस्पती, भूगर्भ, खगोल, प्राणी इत्यादि शास्त्रांचे असंख्य तपशील मी मनात साठवून ठेवले. एक्स रे, इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, इत्यादि परिभाषेने माझे डोके गरगर फिरू लागले, फ्याराडे, रुदरफिल्ड, बोहर, मार्कोनी, रिंटझन, फिशर, पाश्चर, हार्वे, कोपरनिकस, फ्रँकलिन, एमर्सन, असे एक की दोन कितीतरी शास्त्रज्ञ माझ्या जिभेवर नाचत होते. अर्थात् इतके सगळे वाचूनही तांत्रिक ज्ञानाच्या बाबतीत आम्ही कोरडे पाषाणच राहिलो ही गोष्ट वेगळी.

पण वर्डस्वर्थ, शेले, कीट्स, बायरन इत्यादी कवींच्या समग्र काव्याच्या अभ्यासाचा आगळा आनंद मला आय. सी. एस. परीक्षेच्या निमित्ताने लाभला. वरील कवींच्या काव्याच्या आस्वादात मी तीन महिने अगदी हवेत तरंगत होतों. राज्यशास्त्रात अरिस्टॉटल प्लेटोपासून लास्कीपर्यंत सगळे तत्त्वज्ञ मी वाचून काढले. रुसो हा माझा आवडता लेखक. त्याचे आत्मचरित्र वाचून मला नेहमी सुंदर हिरवळीवर प्रभातकाळच्या सूर्याची सोनेरी किरणे पसरलेली पाहिल्याचा अनुभव येई. त्याच्या राजनैतिक तत्त्वांचा यावेळी मी सखोल अभ्यास केला. इतिहासावर तर माझे वाचन पुष्कळच झाले. जगाचा इतिहास, निरनिराळ्या राष्ट्रांचे इतिहास, भारताच्या निरनिराळ्या कालखंडांचे इतिहास मी वाचून काढले.

पण दिल्लीला जाण्यासाठी माझ्याजवळ फार थोडे पैसे होते. नऊ नोव्हेंबर १९३० तारखेची माझ्या डायरीतली नोंद अशी आहे :

'सकाळी उठल्यावर अगोदर स्वयंपाकाच्या तयारीला लागावे लागते. मुष्किलीने एखादा तास अभ्यासाला मिळतो. कॉलेजमध्ये बरा अभ्यास होतो. लायब्ररीत कमीत कमी तीन तास अभ्यासाला मिळतात, संध्याकाळी एक तास.

घरून पावणे दोनशे आले. त्यांपैकी फीत व लखनौच्या प्रवासखर्चात पाऊणशे रुपये खर्च झाले. आय. सी. एस.च्या फीकरिता म्हणून शंभर रुपये राखून ठेवले आहेत. प्रो. मलानींकडून काही दिवसांपूर्वी वीस रुपये आले. उद्या कॉलेजची फी देऊन माझ्या जवळ फक्त तीन रुपये शिल्लक राहतील. या महिन्याच्या शेवटी कदाचित् क्रिश्चन कॉलेजमधून दहा रुपये मिळतील. मलानीकडून दहा रुपये येतील पण पुढच्या महिन्याची फी कुठून द्यावी ? दिल्लीचा प्रवासखर्च कुठून आणायचा ?'

सुदैवाने एकोणीस डिसेंबरला (परीक्षेच्या पंधरा दिवस आधी) मिसेस शास्त्रींनी पस्तीस रुपये पाठविले. त्यामुळे दिल्लीच्या माझ्या प्रवासाची सोय

झाली. आय. सी. एस. च्या परीक्षेला बसायचे तर अंगात सूट हवा. दिल्लीची थंडी पाहता स्वेटर आणि इतर गरम कपडे हवेत, ते कुठून आणावे, शेवटी आमच्या मित्रांपैकी कानपूरचा रस्तोगी म्हणून होता, त्याचा सूट मी उसना मागून घेतला. टाय कशी बांधायची हे शिकून घेतले. माझ्या पायाला येतील असे बूट माझ्या मित्रापाशी मिळाले नाहीत. मी शेवटी सव्वा रुपायाचे कॅन्व्हासचे बूट विकत घेतले. अशा रीतीने उधार पैसे, उसने कपडे, स्वयंपाकपाणी सांभाळून केलेला अभ्यास यांनी युक्त असे आम्ही आय. सी. एस. साठी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात दिल्लीस जाण्यास निघालो.

दिल्लीत त्यावेळी बर्नबॅस्टियन रोडवर महाराष्ट्र निवासाची इमारत होती. मी तेथे जाऊन उतरलो. निवासात उतरण्याची आणि जेवणाखाण्याची चांगली सोय होती. तळमजल्यावर खाणावळ आणि वरच्या मजल्यावर राहण्यासाठी खोल्या अशी सोय असे. महाराष्ट्र निवासात त्यावेळी दांडेकर नावाचे गृहस्थ राहात होते. मला वाटते ते विद्यार्थ्यांचे वर्ग चालवीत असावेत कारण निवासातील वरच्या मजल्यावरील खोल्यांतून काही विद्यार्थी राहात होते. त्यांपैकी महाजन नावाच्या मुलाशी माझी चांगलीच मैत्री जमली. तो अकोल्याचा असून कोणत्यातरी कॉलेजात शिकत होता. त्याची आठवण राहण्याचे कारण म्हणजे त्याला चहा पिण्याची विलक्षण सवय होती हे होय. रात्र असो की दिवस असो, संधी सापडली की महाजनने चहासाठी स्टोव्ह पेटविलाच असे समजावे.

आय. सी. एस. ची परीक्षा त्या वेळी काश्मीरी गेटच्या बाहेर, यमुनेच्या काठावर मेटकाफ हाऊसमधे होत असे. आमची परीक्षा जवळ जवळ महिनाभर चालली होती. माझे सगळे पेपर एकंदरीत बरे गेले. तोंडी परीक्षेच्या इंटरव्ह्यूला श्री. वर्मा आणि सर रजाअली (अप्रतिम अशा आमालनामा या उर्दू आत्मचरित्राचे लेखक) हे होते. त्यांच्यासमोर पुस्तकांचे ढिगारे होते. काव्याचा एखादा उतारा त्यांनी वाचावा आणि हा कोण कवी आहे असे विचारावे ! तेथे माझ्या स्मरणशक्तीची खरी कसोटी लागली. मी अचूकपणे वर्ड्स्वर्थ, शेले, कीट्स्, बायरन इत्यादींच्या काव्यातील उतारे भराभर ओळखीत गेलो. या गोष्टीचा परीक्षकांच्या मनावर परिणाम झालेला दिसला. मला शंभरपैकी साठ मार्क पडले.

पण सायन्सच्या पेपरमधे माझा पुरताच फज्जा उडाला. मला सायन्सच्या विषयात काहीच गोडी नव्हती. तरी पण मोठमोठे शास्त्रज्ञ आणि सायन्समधले महत्त्वाचे शोध यांची सगळी माहिती मी डोक्यात साठवून गेलो होतो. मला वाटले, इलेक्ट्रॉन, प्रोटॉनसंबंधी प्रश्न विचारतील. पण भलतेच अगदी साधे प्रश्न

विचारण्यात आले होते. आगपेटीच्या काड्यांतून (मॅच बॉक्स) काय काय वस्तू वापरल्या जातात? तुमच्या जिल्ह्यातून कॉलऱ्याची साथ पसरली तर तुम्ही काय उपाय योजाल? अशाच प्रकारचे प्रश्न होते. मी सर्द झालो. इलेक्ट्रान प्रोटानच्या नादात मी आगपेटीच्या काड्या विसरून गेलो. वैद्यकीय शास्त्राची उत्क्रांती कशी झाली याची मी पूर्ण माहिती करून घेतली होती. कॉलरा आटोक्यात आणण्यासाठी काय करावे हे मी शिकलो नव्हतो. प्रश्नाची उत्तरे तर दिली. आगपेटीच्या काड्यात गंधक आणि इतर बऱ्याच वस्तू घालतात. पण मुख्य काळजी घ्यायची ती एका गोष्टीची आणि ती म्हणजे काडी ओढली की ती पेटली पाहिजे. कॉलऱ्यासंबंधी मी लिहिले की कॉलरा आवरण्याचा मुख्य उपाय म्हणजे तो होऊ देऊ नये हाच होय. त्यासाठी पाणी उकळून प्यावे. मला जितके माहीत होते, तितके मी लिहिले. माझी उत्तरे वाचून परीक्षकाला हसू कोसळले असले पाहिजे. सायन्समधे मला शंभरापैकी अवघे नऊ मार्क मिळाले. राज्यशास्त्र, इतिहास, इंग्रजी साहित्य (रोमँटिक पिरियड), तोंडी परीक्षा यात मला शेकडा साठ किंवा त्याहून अधिक मार्क पडले. इंग्रजी साहित्यात तर माझ्या इतके मार्क कुणालाच पडले नाहीत. पण सायन्समुळे माझा क्रमांक बराच खाली (एकशेचौऱ्याऐंशी उमेदवारांत एकतिसावा) गेला.

भारतातील आय. सी एस. परीक्षेत आणि विलायतेतील परीक्षेत बराच फरक होता. विलायतेतील आय. सी. एस. ला बावीस वर्षे ज्यांची झाली असतील, त्यांनाही परीक्षेला बसण्याची परवानगी असे. हिंदुस्थानात एकवीस वर्षांची अट होती. विलायतेतील परीक्षा काहीशी सोपी असे. भारतातील परीक्षेतून दरवर्षी चार पाचच्यावर विद्यार्थी निवडत नसत. उलट विलायतेतील परीक्षातून तीसतीस चाळीस चाळीस उमेदवार निवडत. हिंदुस्थानातील परीक्षा जानेवारीत तर विलायतेतील परीक्षा जूनमधे, त्यामुळे हिंदुस्थानातील परीक्षा दिल्यावर श्रीमंत विद्यार्थी लागलीच विलायतेला जाऊन जूनच्या परीक्षेला बसत. माझ्या बरोबर परीक्षेला बसलेल्या उमेदवारांत एकाचा क्रमांक सदतिसावा आला. (माझा एकतिसावा) तो विलायतेला गेला आणि तेथील परीक्षेत बसून पास झाला. निवडल्या जाणाऱ्या चाळीस उमेदवारांत त्याला येणे सहज शक्य झाले. त्यावेळीं मला कोणी दहा पाच हजारांची मदत केली असती तर मी विलायतेला जाऊन सहज आय. सी. एस. होऊ शकलो असतो याची मला खात्री वाटते. पण स्वयंपाकपाणी करून, शिकवण्या करून, कपडे उसने घेऊन, अवघे पंचेचाळीस रुपये घेऊन दिल्लीला आय. सी. एस. परीक्षेला बसण्यासाठी आलेली माणसे आम्ही! आम्हांला दहा हजार रुपये देऊन विलायतेला कोण पाठविणार?

गुणसमुच्चयात एखादा दोष झाकून जातो आणि शोभून दिसतो. चंद्रावरचा डाग नाही का ? पण कवीचे हे विधान खरे नाही. दारिद्र्य हा एक दोष असा आहे की त्यामुळे सगळ्याच गुणांचा नाश होतो !

दिल्लीच्या एक महिन्याच्या मुक्कामात मी शहरातील प्रेक्षणीय स्थळे पाहून घेतली. लालकिल्ला, जुम्मा मशीद, कुतुबमीनार, कुदसिया बेगमचा महाल, चांदणी चौक, गुरुद्वार, शीस गंज, नवी दिल्ली, ही स्थळे पाहून झाली. लाल किल्ल्यातील दीवाणे खास आणि दीवाणे आम या इमारती पाहून मी भारावून गेलो, दिवाणे खासवर शहाजहानने हे वाक्य कोरले आहे :

गर फिरदोस बर सरे जमीन अस्त
हमीनस्तो, हमीनस्तो, हमीनस्त

पृथ्वीवर कोठे नंदनवन असेल तर ते हेच, ते हेच, ते हेच होय.

दिल्लीहून परतताना मी वाटेत मथुरेला उतरलो. श्रीकृष्णाचा जन्म झाला त्या जागेला केशवजी का कठडा म्हणतात. त्या ठिकाणी औरंगजेबाने भव्य मशीद उभी केली आहे. रामजन्माच्या ठिकाणी बाबरने बांधलेली मशीद, आणि काशी व मथुरा येथील औरंगजेबाच्या मशिदी पाहून माझे मन अतिशय व्यथित होत आले आहे. मथुरेत यमुनेच्या काठावरील द्वारकाधीशाचे भव्य असे देऊळ पाहून मला मोठे समाधान वाटले. पण माझे मन रमले वृंदावनात. मथुरेहून वृंदावनाला जाण्यासाठी मी दुपारी एक्क्यातून (घोडा जोडलेले वाहन) निघालो. माझ्या स्वभावातील स्वप्नाळूपणा एकदम उचंबळून आला. माझे मन श्रीकृष्ण-कालीन वातावरणात जाऊन पोहोचले. गोपी याच वाटेने मथुरेला जात असतील. राधाकृष्णाच्या क्रीडा येथेच घडल्या असतील, माझ्या डोळ्यासमोर ' गीत गोविंदा 'तील ओवी नाचू लागल्या :

मेघांनी भरले विशाल नभ हे ताली वन श्यामल
रात्री भीत हरी तयासह घरी तू राधिके गे चल
ऐसा नंदनिदेश ऐकुन निघे ती माधवासंगती
कुंजांती यमुनातटी मधुर तल्लीला असो धन्य ती

किंवा

काश्मीर गौर तनु लेवुनि रत्नकांची
रेखेसमान दिसते अभिसारिकांची
अंधार हाचि निकषोपल भासला गे
त्यांचे जणू प्रणय हेम कसास लागे

वृंदावनच्या वाटेवर मी पूर्णपणे श्रीकृष्णमय होऊन गेलो. कानात बासरीचे सूर

घुमताहेत असे वाटू लागले. गोपींची शोकगीते अंतःकरणाचा ठाव घेऊ लागली

निशिदिन बरसात नैन हमारे
सदा रहत पावस ऋतु हम पे
जबसे श्याम सिधारे

माझा जन्म गोकुळ अष्टमीचा (रोहिणी नक्षत्राच्या अगदी जवळ, कृत्तिका नक्षत्र चतुर्थ चरण) लहानपणी भागवत सारखे कानावर पडे. काय कारण असेल ते असो. श्रीकृष्ण चरित्राच्या मननाने माझे देहभान हरपते. वृत्ती तल्लीन होऊन जाते. गोकुळातील गोप-गोपींच्यात रमणारा, कंसाबरोबर झुंजणारा, द्वारका स्थापन करणारा, पांडवांचा सखा, गीतेचा उपदेश करणारा युगंधर श्रीकृष्ण हा भारताचा आत्मा आहे. वृंदावनात त्याच्या पायांनी पुनीत झालेल्या धुळीत, यमुनेच्या वाळवंटात मी फिरत होतो. मला त्यावेळी वाटले, मला कुणाच्याही भाग्याचा हेवा करण्याची काय जरूर आहे. वृंदावनात मी काही काळ घालविला हे माझे भाग्य काय कमी आहे? वृंदावनाला पोहोचल्यावर प्रथम मी केशी घाटावर गेलो, तेथून मी कालिया डोह आणि कदंबवृक्ष पाहायला गेलो. कदंबवृक्ष लहान वाटला. कालिया डोहात पाणी नव्हते. वाळू भरली होती. यमुनेचे पाय लांब गेले होते. तेथे पोहोचण्यास वाळवंट तुडवीत जावे लागे. माझे डोळे समोरचे दृश्य पाहात होते. पण माझे मन कृष्णकालीन डोहाकडे धाव घेत होते.

अही तोही पाहे अवसर डसायास हरिला
परंतु श्रीकृष्णे भ्रमण करिता गर्व हरिला
शरीरी फासोळ्या बहु खुळखुळ्या होउनि ढिल्या
गती तत्प्राणाच्या सकळहि गळ्यामाजि चढल्या

वाळू तुडवीत मी यमुनेच्या पात्रापर्यंत पोहोचलो. पाणी घाटापासून बऱ्याच लांब अंतरावर वाहात होते. मी पाण्यापाशी पोहोचलो तेव्हा एक पंडा तेथे उभा होता. तो मला म्हणाला, ‘धन्य हो. तुम्ही नदीत जेथे पाय ठेवला आहे तेथेच भगवान श्रीकृष्णांनी कालियावर उडी घेतली.’ मी म्हटले, ‘कमाल आहे. अहो, तो कदंबवृक्ष राहिला काठावर. डोह तेथेच आहे. नदीचे पात्र लहान झाले आहे आणि घाटापासून लांब अंतरावर वाहात आहे. आणि तुम्ही म्हणता श्रीकृष्णांनी या ठिकाणी उडी घेतली. येथून कदंबवृक्ष कमीत कमी एक फर्लांग दूर आहे.’ तोंडावरची सुरकुती न हलविता तो पंडा म्हणाला, ‘भगवान की लीला अगाध है.’

वृंदावनात मोठमोठी देवळे आहेत. वल्लभ सांप्रदायाचे श्रीरंग मंदिर, मान

सिंहाचे गोविंद मंदिर अशी किती तरी मंदिरे आहेत. कृष्णचरित्रात गाजलेले कुंजवन आता अगदी लहान झाले आहे. एक लहानशी बाग म्हणा ना. आत राधाकृष्णाचे एक लहानसे मंदिर आहे. पण आमच्या भावनेने बघणाऱ्यांना कुंजवनाचे आकर्षण काही आगळेच वाटते.

दुसऱ्या दिवशी मी वृंदावन सोडले आणि आग्र्याचा ताजमहाल, (शहाजहान बादशहाच्या नेत्रातील हा अश्रुबिंदू अमरत्व पावला आहे असे कोणीसे वर्णन केले आहे.) पाहून अलाहाबादेस परत आलो.

एम. ए. प्रीव्हियस चा अभ्यास मी जारीने सुरू केला. होळकरवाड्यात (त्याला कच्चा वाडाही म्हणत), त्या वर्षी आम्ही तिघे जण होतो. भागवत, मुंगरे, आणि मी.

भागवतसारखी उमदी माणसे मला आयुष्यात फार कमी भेटली आहेत. इतरांकरिता मनःपूर्वक झटणे, त्यांच्या उपयोगी पडणे, अंगावर घेतलेले काम न कंटाळता करणे या गोष्टी भागवताच्या स्वभावात होत्या. भागवत आणि मुंगरे या दोघांनाही मराठी काव्याची अतिशय गोडी होती. आतापर्यंत माझा विशेष अभ्यास झाला तो इंग्रजी साहित्याचा. पण भागवत आणि मुंगरे यांच्यामुळे मी मराठी साहित्याकडे ओढला गेलो, केव्हाही पाहा, ते दोघे यशवंत, बालकवी, तांबे यांच्या कविता गुणगुणत असत. त्यांच्यामुळे मला यशवंतांच्या कितीतरी कविता तोंडपाठ झाल्या.

चाले सरिद्वान त्या हंसलीला
तुझी अंगकांति तया भूषण,

किंवा

' पडू दे माउली खाली तुझ्या वेणींतला गजरा, '

अशा कितीतरी ओळी मीही गुणगुणत फिरू लागलो. बालकवीची कविता

मेघांचे करि भूर्जपत्र धरुनी अस्ताचली प्रत्यही
प्रेमाचे नवलेख कुंकुमरसे ती सांध्यदेवी लिही

मी त्यावेळी डायरीत उतरून घेतलेली अद्याप माझ्याजवळ आहे. माधव ज्यूलियनचे ' सुधारक ' काव्य हे मी त्याच वेळी वाचून काढले. भागवतांना तांब्यांच्या कविता विशेष आवडत. डोळे हे जुल्मि गडे, नव-वधू प्रिया मी बावरते, मधु घटचि रिकामे आज परी, डुमडुमत डमरु ये, इत्यादि कविता माझ्या रोमँटिक स्वभावाला अनुकूल असल्यामुळे मलाही आवडल्या. भागवतांना लिहिण्याची चांगलीच सवय होती. केसरीत त्यांनी ' रसायन शास्त्रातील महर्षी ' ही लेखमाला चालू केली होती. तांब्यांच्या ' रुद्रास आवाहन ' या कवितेची त्यांनी मोठी

सुंदर छाननी करून त्या विषयावर एक सुंदर लेख लिहिला होता. भागवतांच्या- मुळे मला काव्यपरीक्षणाची गोडी लागली. पुढे हैदराबादेस असताना मर्म मराठवाड्यातील कवींच्या काव्याचे परीक्षण करून 'मराठवाड्यातील आधुनिक कविता' हे पुस्तक लिहिले, त्या लेखनामागे भागवतांचे लेखन ही प्रमुख प्रेरणा होती. अलाहाबादेतील माझी तीन वर्षे म्हणजे माझ्या पुढील साहित्यसेवेची पूर्वतयारीची वर्षे झाली याचे श्रेय माझ्या वरील मित्रांना आहे.

आमच्या होळकरवाड्यात अनेक मंडळी येऊन जात. धुळ्याचे शंकरराव देव (समर्थभक्त) यांना मी प्रथम होळकर वाड्यात पाहिले. 'फादर इंडिया' या प्रसिद्ध ग्रंथाचा लेखक रंगा अय्यर हा होळकर वाड्यात आला होता. नेहरू कुटुंबियांबद्दल त्याने अनुदार काढले ते मला आवडले नाहीत. त्यावरून त्याचा आणि माझा खटका उडाला. इंदूरचे माधवराव किबे, सरदार विंचूरकरांच्या घरातली मंडळी, इंदूरचे चॅरिटी खात्याचे मणूरकर, आणि इतर अधिकारी वाड्यात आल्याचे आठवते. अलाहाबादच्या महाराष्ट्र मंडळात रँग्लर परांजपे, डाक्टर मुंजे, लोकनायक अणे, भारत सेवक समाजाचे गोपाळराव देवधर, कानपूरचे प्रिन्सिपाल दामले (गोव्याचे माजी राज्यपाल दामले यांचे वडील) यांची व्याख्याने मी ऐकली. दारागंजात पौरोहित्य कामे करणारी काही जुनी महाराष्ट्रीय कुटुंबे आहेत. त्यांपैकी भागवत, पित्रे, कंठाळे ही मंडळी आठवतात. बनारसच्या विद्वान महाराष्ट्रीयांची परंपरा अलाहाबादेस अजिबात नव्हती. बनारसला द्रविड, शुक्ल, इत्यादि महाराष्ट्रीय घराण्यांनी संस्कृत विद्येत केवढीतरी कीर्ती मिळविली. सोहनी, नेने, दामले या जुन्या घराण्यांनीही निरनिराळ्या क्षेत्रांत नाव कमावले. बनारसचे लेले हे उत्तर प्रदेशात उद्योगपती म्हणून प्रसिद्ध आहेत. पण अलाहाबादेस तसे काहीच नव्हते. काही जुनी मंडळी कुठे शिक्षक म्हणून तर कुठे छापखान्यात नोकर म्हणून काम करीत. त्यांपैकी महादाणे, आगाशे ही शिक्षक मंडळी मला आठवतात. रानड्यांचा मराठी कोश मी प्रथम आगाश्यांच्याकडे पाहिला. पुढे १९६२ मध्ये मी मॅकियावेलीच्या 'प्रिन्स'चे भाषांतर करण्याचे काम हाती घेतले, तेव्हा मला त्यांच्या या कोशाचा चांगलाच उपयोग झाला. महादाणे मास्तर हे अगदी साधे आणि सालस गृहस्थ. प्राथमिक शाळेत ते शिक्षक होते. त्यांना बरीच मुले असावीत. पण आपला गरिबीचा संसार ते मोठ्या धीराने आणि हसतमुखाने चालवीत. त्यांना ज्योतिषाचा नाद होता. त्यामुळे ते आमच्यात सहजपणे मिसळत गेले.

अलाहाबादेस जुनी आणि खानदानीची चारपाच महाराष्ट्रीय घराणी होती. त्यांत गोखले आणि गोरे हे आठवतात. गोखल्यांच्या कुटुंबात एक विवाह-

समारंभ होता. त्याला मी हजर होतो. जेवणाच्या पंक्ती आणि चोख व्यवस्था पाहून पला पेशवेकालीन समारंभाची कल्पना आली.

अलाहाबादेच्या महाराष्ट्र मंडळात प्रामुख्याने सरकारी नोकर, वकील, प्राध्यापक, विद्यार्थी हे असत. माझ्या वेळी महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष पोस्ट खात्यातील बडे अधिकारी श्री. काळे हे होते. मंडळात मधून मधून व्याख्याने होत. वार्षिक स्नेहसमारंभ होत. त्यांना सर्वजण मोठ्या अगत्याने हजर राहात. या कार्यक्रमांत अलाहाबाद नगरपालिकेचे अधिकारी नरवणे, बॅरिस्टर गंधे आणि त्यांच्या पत्नी कुंदाबाई, श्री. काळे वगैरे प्रतिष्ठित माणसे मोठ्या आस्थेने काम करीत. मंडळाच्या कार्यक्रमात काही मौजेचे प्रसंगही घडत.

मला वाटते ती दारागंजातील मंडळाची शाखा असावी. काही माणसे गात होती. त्यापैकी एकाचे एक गाणे मला अद्याप आठवते.

‘ हौसेने पति म्या केला, बाई अंमलबाज निघाला. ’

एक डिसेंबर १९३० तारखेची एक गंमतीची नोंद माझ्या डायरीत आढळली :

‘ गेल्या आठवड्यात आमच्या वाड्यात महाराष्ट्र मंडळाची वार्षिक बैठक झाली. कार्यक्रम यथास्थितपणे पार पडला. फक्त दुसऱ्या दिवशीचे उरलेले सामान काजू, अक्रोड, वड्या, शंकरपाळे, चिवडा नापत्ता झाले होते. कोठे गेले कोण जाणे ! ’

आज ती नोंद वाचून हसू येते. मी त्यावेळी ती टिपून ठेवली नसती तर मला त्या प्रसंगाची आठवणही झाली नसती.

अलाहाबादेत काही विविध व्यक्तीही मला आढळल्या. खांडेकर नावाचे एक गृहस्थ त्यावेळी अलाहाबादेत वावरत होते. ते आपल्याला वि. स. खांडेकर यांचे बंधू म्हणवीत. अगदी किरकोळ शरीर, डोळ्याला जाड भिंगाचा चष्मा, अंगावरील कपडे अत्यंत अस्वच्छ असा त्यांचा अवतार असे. मनुष्य खूप बडबड्या, पण स्वभावाने चिडखोर असे. तो वृत्तपत्र व्यवसायात असावा. त्याच्या ओळखी अगदी सी. वाय. चिंतामणींपासून सामान्य बातमीदारापर्यंत असत. आपल्याला एखादी शिकवणी मिळेल या आशेने मी त्याच्या नादी लागलो. मला वाटते खांडेकरांनीच रंगा अय्यरला आमच्या वाड्यात आणला होता. मेजर बी. डी. बसू यांची आणि माझी भेट त्यांच्यामुळेच झाली. म्हैसूरचे दिवाण सर आर. रघुनाथराव यांचा नातू अलाहाबादेत होता. तो कोणत्यातरी वर्तमानपत्राचा उपसंपादक होता. खांडेकरांनी माझी त्याची ओळख करून दिली. उपसंपादकाची बायको ही अल्मोड्याकडची ख्रिश्चन असून तिने

हिंदुधर्माचा स्वीकार केला होता. तिचे नाव ग्यान कुमारी ठेवण्यात आले होते. त्या कुटुंबाची आणि माझी चांगलीच ओळख झाली होती. खांडेकराला सर्वजण एक उपद्व्यापी वल्ली समजत. मनुष्य मोठा बहुश्रुत होता. तो काय धंदा करीत असे आणि कसा जगत असे हे मला समजले नाही. काही दिवसांनी तो अलाहाबाद सोडून गेला.

महाराष्ट्रीयांच्या संगीतप्रेमाचा सगळ्या उत्तर भारतात मोठा लौकिक पसरला आहे. भातखंडे, पलुसकर, रातंजनकर, वझेबुवा इत्यादींची नावे तिकडे आबाल-वृद्धांस माहीत आहेत. बनारस, अलाहाबाद, लखनौ, दिल्ली इत्यादि शहरांतून कितीतरी महाराष्ट्रीय संगीत शिक्षक आढळून येत. अलाहाबादेस ठकार आणि आपटे यांचे कार्यक्रम आम्हांला अधून मधून ऐकण्यास मिळत. एका बैठकीत ठकारांनी 'तुमबिन मेरी कौन खबर ले, गोवर्धन गिरिधारी' आणि 'चाकर राखोजी' ही गाणी म्हटली. ठकारांच्या आवाजात विलक्षण गोडवा होता. त्यांच्या गायनाने आम्ही मुग्ध होऊन गेलो. गाणे संपल्यानंतर महादाणे मास्तर त्यांना म्हणाले, 'ठकार, तुमच्या गळ्याला साखरेची पिशवी बांधली आहे काय?'' त्यांचे हे अचूक वर्णन मला अतिशय आवडले. मराठी माणूस म्हटला की तो संगीताचा दर्दी असलाच पाहिजे असा लौकिक वरील व्यासंगी कलावंतांच्यामुळेच उत्तर भारतात झाला आहे.

इ. स. १९३१ च्या सुरवातीला पंडित मोतीलाल नेहरू निधन पावले. गंगेच्या वाळवंटात त्यांचे दहन झाले. त्या प्रसंगी मी तेथे होतो. तेथे जमलेला जनसमुदाय निदान एक लाख तरी असावा. दहा दिवसांनंतर वाळवंटात विराट सभा भरली. पुढाऱ्यांची भाषणे झाली. त्या सभेत मी प्रथमच विजयालक्ष्मी पंडित यांना पाहिले. मोतीलालांच्या आजाराच्या निमित्ताने भारतीय कीर्तीचे अनेक पुढारी अलाहाबादेस जमले होते. त्यांपैकी अबुल्कलाम आजाद, राजगोपालाचारी आणि पट्टाभि सीतारामय्या यांना पाहिल्याचे आठवते.

अलाहाबादेतील तीन वर्षांच्या वास्तव्यात कितीतरी पुढाऱ्यांची व्याख्याने ऐकण्याचा मला योग आला. सर तेज बहादुर सप्रू, सी. वाय. चिंतामणी, रँग्लर परांजपे (हे त्यावेळी लखनौ युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर होते) महंमदअली जिना, 'भारत में अंग्रेजी राज' या प्रक्षोभक ग्रंथाचे लेखक सुंदरलाल, उत्तर प्रदेशचे गव्हर्नर सर माल्कम हेले इत्यादींची भाषणे युनिव्हर्सिटीत झालेली आठवतात. शहरात पुरुषोत्तमदास टंडन, कमलादेवी चटोपाध्याय इत्यादींची भाषणे ऐकण्याचा मला योग आला. महाराष्ट्र मंडळाच्या एका कार्यक्रमात रँग्लर परांजप्यांची आणि माझी ओळख करून देण्यात आली.

‘तुम्हांला पर्शियन येते का’ असा प्रश्न त्यांनी विचारलेला मला अद्याप आठवतो. परांजपे हे लखनौला विद्यार्थीवर्गात बरेच लोकप्रिय होते. कुर्तुल ऐन या उर्दू लेखिकेच्या कादंबऱ्यातून ग्लेमरस व्हायसचान्सॅलर और उनकी ग्लेमरस बेटी शकुंतला असे उल्लेख आले आहेत. आणखी एका कादंबरीत तिने लखनौच्या हिंदुस्तानी स्कूल ऑफ म्युझिकचे प्राचार्य रातंजणकर यांचा उल्लेख केला आहे.

तो काळ किती खळबळीचा होता हे आज कल्पनेनेच समजून घ्यावे लागते.

चंद्रशेखर आजाद हा भगतसिंगाचा सहकारी. प्रसिद्ध असा क्रांतिकारक. मला वाटते तो १९३१ चा फेब्रुवारी अगर मार्च महिना असावा. परीक्षेच्या तयारीला वेळ मिळावा म्हणून मी एक दोन महिने जैन हॉस्टेलच्या मेसमध्ये जेवायला जात असे. सकाळी दहाचा सुमार असावा. मी पब्लिक पार्कच्या जवळून चाललो होतो. इतक्यात बागेतून बंदुकीचे बार होत असलेले माझ्या कानावर आले. मी बागेकडे पाहिले तो एक पोलीस ऑफिसर एका उंच झाडाच्या मागे उभा राहून कुणावर तरी नेम धरीत होता. काही पोलिस इतर झाडांच्या मागे लपले होते. पोलिस कुणावर नेम धरतात म्हणून वळून पाहिले. एक काळसर, जाडेला, इसम झाडाआड्न गोळीबार करीत होता. तो बंगाली पद्धतीचे धोतर नेसला होता. त्याच्या अंगात लांब शर्ट होता. मला त्या प्रसंगाचे महत्त्व उमगले नाही. मी तसाच पुढे गेलो आणि जैन हॉस्टेलमध्ये जेवण करून कॉलेजात गेलो. डॉक्टर ताराचंद आमचा वर्ग घेत होते. इतक्यात आमच्या वर्गातील चळवळ्या विद्यार्थी रामेश्वर गुर्टू हा वर्गात घुसला आणि ओरडून म्हणू लागला, ‘कम आऊट ऑफ दि क्लास, वर्गातून बाहेर निघा, चंद्रशेखर आजाद हा पब्लिक पार्कमध्ये मारला गेला आहे.’ डॉक्टर ताराचंद हे सुन्न होऊन बसले होते. गुर्टूच्या मागोमाग दोन तीन विद्यार्थी वर्गाबाहेर निघून गेले. बाकीचे वर्गात बसून राहिले. थोडा वेळ शिकवून ताराचंदांनी वर्ग संपविला.

चंद्रशेखर आजाद हा पंधरा वर्षांचा असताना वंदे मातरम् म्हटल्याबद्दल अधिकाऱ्यांनी त्याला रक्तबंबाळ होईपर्यंत मारले होते. तेव्हापासून तो क्रांतिकारक बनला होता. भगतसिंगाभोवती जमलेल्या मंडळींपैकी तो एक होता. रामप्रसाद बिसमिलच्या पुढील ओळी नेहमी त्याच्या तोंडात असत. तळहातावर शिर घेऊन आज आम्ही निघालो आहोत. आमच्या वधकांच्या बाहूत शक्ती तरी किती आहे ते आज बघू या.

सर फरोशी की तमन्ना आज हमारे दिल में है, देखना अब कितनी कुवत

बाजूये कातिल में है ।

धन्य, धन्य, ही माणसे !

आमच्या युनिव्हर्सिटीच्या यूनियनमध्ये आणि इतर वाङ्मय-मंडळांतून माझी भाषणे होत. उर्दू हॉस्टेलमध्ये माझ्या एका भाषणाला शामकुमारी नेहरू (जवाहरलालांची चुलतबहीण) या अध्यक्ष होत्या. त्या काळात त्या ॲडव्होकेट असून अलाहाबाद हायकोर्टात प्रॅक्टिस करीत असत. शामकुमारी काहीशा स्थूल असल्या तरी कमालीच्या देखण्या होत्या. ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त मिनिटे मी बोलू लागलो तशी त्यांनी मला सौम्य सूचना दिली. त्यावेळचा त्यांचा आविर्भाव, आणि नजरेची लाडिक चाळवाचाळव मला इतकी आकर्षक वाटली की मी एक शब्द न बोलता खाली बसलो. स्त्रियांच्या नेत्रांतील जादू म्हणजे काय चीज आहे याचा मला त्यावेळी बोध झाला.

माझी एम. ए. प्रीव्हियसची परीक्षा अठरा एप्रिल १९३१ रोजी संपली. मी पहिल्या वर्गात पास झालो. उन्हाळ्याच्या सुट्टीत मी बनारसला गेलो. ही सुट्टी मी मोठ्या आनंदात घालविली. माझा मित्र त्रिलोचनपंत हा प्राध्यापक पुणतांबेकरांच्या घराशेजारी राहात असे. मी काहीतरी निमित्त काढून त्याच्याकडे जाई आणि सुशीलाकडे पाहात बसे. १९३१ मध्ये ती मॅट्रिकला बसली. त्यावेळी तिला सतरावे वर्ष लागले होते. पुणतांबेकरांच्या पत्रामुळे मी तिच्या बाबतीत निराशच झालो होतो. फक्त अण्णासाहेब खापर्डे मला मधून मधून धीर देत असत.

१९३१ ची उन्हाळ्याची सुट्टी मी वाचन आणि गंगेत पोहण्यात घालविली, सुंदराबाईकडे मी नेहमी जात असे. दोन जून १९३१ तारखेची माझ्या डायरीतील नोंद अशी आहे :

‘ काल संध्याकाळी सुंदराबाईकडे गेलो होतो. बिचारी फार दुःखात आहे. आठ महिन्यांपासून तिला पगार मिळाला नाही. जवळ पैसे नाहीत. काय करणार ? बिचारी रडायला लागली. माझ्या पोटात भडभडून आले. मी तरी काय करणार ? माझ्याजवळ पैसे नाहीत. पण ईश्वरा, मला चार पैसे मिळू लागल्यावर मी जर तिला मदत केली नाही तर मी तुझ्या दरबारी कायमचा दोषी ठरला जाईन. ’

माझ्या आयुष्यात अनेक मुली डोकावून गेल्या. काहींची आठवण अद्याप येते. पण काहींना मी पार विसरून गेलो. अकरा जुलै १९३१ ची एक नोंद अशी आहे :

‘ परवा सुंदराबाईच्या येथे सदू परांजप्यांची धाकटी बहीण पाहिली. किती

सुंदर आहे आणि कशी खानदानीच्या घराण्यातली दिसत होती.' आज प्रयत्न करूनही सदू परांजपे कोण आणि त्याची बहीण कशी दिसत होती याची कल्पना येत नाही!

उन्हाळ्याच्या सुट्टीतही माझ्या वाचनात खंड पडला नाही. कार्माइकेल लायब्ररी मी एक दिवस चुकविली नाही. या सुट्टीत मी कितीतरी इंग्रजी नाटके, कादंबऱ्या आणि इतर विषयांवरील पुस्तके वाचून काढली. नाटके पुढीलप्रमाणे होती.

अर्नोल्ड बेनेट, माइलस्टोन्स, रॉबर्टसन, कास्ट, विंग पिनेरो, ट्रिलॉनी ऑफ दि व्यल्स, हेन्री आर्थर जोन्स, दि लायर्स, विलिमय गिल्बर्ट, पिग्म्यालियन ॲण्ड गेलेटा, रुडोल्फ वेसियर, व्हर्जिन गॉडेस, जॉर्ज ॲडॅम, जार्जे क्लामान्सो, आल्फ्रेड सुट्रो, दि वॉल्स आफ जेरिको, हॅराल्ड ब्रिगहाउस, हॉब्सन्स चॉइस, सेंट जॉन, रिटर्न ऑफ दि प्राडिगल, हॅराल्ड चाप्लिन, दि न्यू मोरॅलिटी, सॉमरसेट माम, दि सर्कल, क्रीमन्स डेन, ए बिल ऑफ हायव्होर्समेन्ट, नोएल कॉवर्ड, दि यंग आयडिया, गाल्सवर्दी, स्ट्राईफ, हेन्रिक इब्सेन कृत डॉल्स हाऊस, वाइल्ड डक, दि लेडी, फ्राम दि सी. ही काही नाटकांची नावे दिली आहेत. इतर पुस्तकांत डेन्मार्कच्या उत्कृष्ट गोष्टी, लुड्‌विगकृत सन ऑफ मॅन, रोमां रोलांकृत रामकृष्ण परमहंस चरित्र, होल्म्सचे क्रीड ऑफ बुद्ध, अप्टन सिंक्लेरची कादंबरी माउंटेन सिटी. मुसोलिनीचे कार्डिनल्स मिस्ट्रेस इत्यादि पुस्तके वाचली. त्या दोन महिन्यांच्या सुट्टीत मी पंचावन्न इंग्रजी पुस्तके वाचून काढली. मराठी पुस्तकाचे वाचन त्या मानाने अगदी कमी होई.

एकोणीसशे एकतीसच्या जुलै महिन्याच्या शेवटी मी अलाहाबादेस परत आलो. हे एम. ए. चे शेवटचे वर्ष होते. एम. ए. प्रीव्हियसला आम्हांला राज्यशास्त्राचे चार विषय होते. प्राचीन राजनीतिशास्त्र, आधुनिक राजनीतिशास्त्र, प्राचीन आणि मध्ययुगीन (ग्रीक आणि इटालियन) राज्यसंस्था, आणि आधुनिक प्रजासत्ताक राज्ये, एम. ए. फायनलला आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय कायदा आणि ज्यूरिसप्रूडन्स हे विषय होते. डॉक्टर वेणीप्रसाद आंतरराष्ट्रीय संबंधांचा वर्ग घेत. डॉक्टर जंग नावाचे मुसलमान प्राध्यापक आंतरराष्ट्रीय कायदा शिकवीत आणि प्राध्यापक चौधरी हे ज्यूरिसप्रूडन्स शिकवीत. डॉक्टर बेनीप्रसाद यांचा व्यासंग अतिशय दांडगा होता. जहांगीर चरित्र, प्राचीन भारतातील राजनीती आणि प्राचीन भारतातील राज्यसंस्था हे त्यांचे सर्वमान्य ग्रंथ आहेत. त्यांचा चेहरा उग्र दिसे आणि वर्ग घेताना ते दातओठ खाल्ल्यासारखे बोलत त्यामुळे त्यांच्याबद्दल बोलताना कॅस्टर ऑइल फेस आणि कॉन्स्टिपेटिव

डिलिव्हरी असे म्हणून विद्यार्थी विनोद करीत.

डॉक्टर महमदुल्ला जंग हा अतिशय सज्जन माणूस. पण त्याचे आपल्या विषयाचे ज्ञान वेताचेच होते. ऑक्सफर्डला शिकत असताना त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्यावर जी टिपणे घेतली होती तीच ते वर्गात वाचीत असत. एक दिवस मी त्यांच्या वर्गात हजर नव्हतो. दुसऱ्या दिवशी मी त्यांच्याकडे गेलो आणि त्यांना म्हटले, 'काल मी आपल्या वर्गाला हजर राहू शकलो नाही. कालचे आपले लेक्चर वहीत उतरून घेण्यासाठी मला नोट्स हव्या आहेत.' डॉक्टर जंग यांनी नोट्स दिल्या. मात्र दुसऱ्या दिवशी न चुकता वर्गात घेऊन या असे त्यांनी मला बजाविले. मी मुद्दामच दोन दिवस कॉलेजात गेलो नाही. नोट्स हाताशी नसल्यामुळे डॉक्टर जंग यांची तारांबळ उडाली. त्यांनी मला निरोप पाठविला, की 'हवे असल्यास वर्गाला येऊ नका पण माझ्या नोटस तरी पाठवाल की नाही?' ही प्राध्यापकांची योग्यता! माझे ग्रंथालयातील वाचन सतत चालू असे. घरी स्वयंपाक आणि ईव्हिंग क्रिश्चन कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या वह्या तपासण्याचे काम असे. आदल्या वर्षी मी, भागवत, मुंगरे आणि नारायण केशव देशपांडे हे होळकर वाडा ऊर्फ कच्चा वाडा यात राहात होतो. नारायण केशव देशपांडे हे मूळचे मराठवाड्यातील. पण ते बुलढाण्यात स्थायिक झाले होते. १९३० मध्ये एलएल. बी. च्या अभ्यासासाठी अलादाबादला आले. चौघे एकत्र राहात होतो. ती एक स्वयंपूर्ण वसाहतच होती म्हणाना. भागवत आणि मुंगरे यांच्यामुळे आमच्या वाड्यात काव्यशास्त्रविनोदाची मैफिल भरल्यासारखी वाटे. आमचा कंपू सगळा ब्रह्मचाऱ्यांचा. तेथे स्त्रियांचा प्रवेश कुठून होणार? तरी पण मधून मधून करमणुकीचे प्रसंग उद्भवत.

आमचे कपडे धुण्यासाठी दर आठवड्याला एक परटीण येत असे. ती वर्णाने सावळी असली तरी दिसायला खूपच देखणी होती. सरळ नाक, मोठे डोळे, गोड जिव्हणी, आणि एकंदरीत शरीरसौष्ठव आकर्षक; अशी ती परटीण होती ती कपडे न्यायला आली की आम्हां सर्वांची तारांबळ उडे. माझे सोबती कपडे मोजून घेणे, जुने कपडे परटिणीच्या समोर टाकणे ही कामे करण्यास मला सांगत. अर्थात् त्या निमित्ताने तिच्याकडे भरपूर पाहून घेण्याची हौस मी फेडून घेत असे.

अशाच एका परटिणीने एका हिंदी कवीच्या जीवनात क्रांती घडवून आणली होती. एक कवी कविता रचण्यास बसला त्याने पहिली ओळ रचली.

कनक छबीसी कामिनी. काहेको कटि छीन–ही कामिनी म्हणजे सोन्याची मूसच. पण हिची कंबर बारीक कशी? कवि महाशयांना पुढची ओळ काय लिहावी हे सुचेना. पुढे केव्हातरी ती ओळ पूर्ण करता येईल; असा विचार

करून त्यांनी पहिली ओळ आपल्या फेट्यावर लिहून ठेवली. एक दोन दिवसांनी त्यांची परटीण त्यांचे कपडे धुण्यास म्हणून घेऊन गेली. तिचे लक्ष सहजगत्या कवीच्या फेट्याकडे गेले. पाहाते तो कवितेची एक ओळ फेट्यावर लिहिलेली. परटीण मोठी रसिक असली पाहिजे. तिने दुसरी ओळ रचून फेट्यावर लिहून काढली. या कामिनीची कंबर बारीक का, तर परमेश्वराने कंबर बारीक करून उरलेला भाग वक्षस्थळावर ठेवला म्हणून.

कनक छबीसी कामिनी काहेको कटि छीन.
कटिको विधिने काटिके कुचनमध्य धरदीन

कपडे धुऊन आले. कवी आपला फेटा हातात धरून पाहातात तो त्यांचे लक्ष वरील ओळीकडे गेले. परटिणीचा रसिकपणा पाहून ते तिच्यावर लुब्ध झाले. त्यांनी सरळ तिच्याशी विवाह केला.

१९३१ मध्ये इंदूरचा आणखी एक विद्यार्थी आमच्याबरोबर राहण्यास आला. त्याचे नाव फुलचंद गंगराडे. हा अतिशय हुशार, सज्जन पण अबोल असा मुलगा होता. त्याने आपल्याबरोबर आपला एक नातेवाईक आणला होता. त्याला तो मामा म्हणे. मामा स्वयंपाकपाणी करी. मामा म्हणजे एक विचित्र वल्ली होती. आम्ही सगळे त्याच्याशी खूप थट्टामस्करी करीत असू. कोणतीही गोष्ट सांगताना मामा म्हणायचा, अमकी वस्तू ना ती मी पाहिली आहे, इतरांनी कुणीच पाहिली नाही. वो चीज हमने देखी है और किसीने नहीं देखी; वह सिर्फ एक जगह पर मिलती है और कहीं नहीं मिलती. वह सिर्फ एक नुक्कड (कोपरा) पर मिलती है और कहीं नहीं मिलती; मामाचे असले बोलणे ऐकून आमचे हसून हसून पोट दुखू लागे. फूलचंद गंगराडे आता इंदरच्या होळकर कॉलेजमध्ये भौतिक शास्त्राचे प्राध्यापक आहेत. नारायण केशव देशपांडे हे आता मराठवाड्यात पब्लिक प्रॉसिक्यूटर आहेत. होळकर वाड्यांत मुंगरे आणि भागवत त्यांच्याकडे येणाऱ्या अनेक मित्रांच्या व माझ्या ओळखी झाल्या. प्राध्यापक पाल्धीकर, हे अलाहाबादचे विद्यार्थी, त्यावेळी ते कराची कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. ते एकदा अलाहाबादला काही कामासाठी म्हणून येऊन गेले. पुढे प्राध्यापक पुणतांबेकरांच्या पुतणीशी त्यांचा विवाह झाला. त्यामुळे त्यांचा आणि माझा आप्तसंबंध झाला. पांचोली नावाचा एक विद्यार्थी आमच्या वाड्यात नेहमी येई. तो मोठा रसिक आणि मोकळ्या मनाचा होता.

कॉलेजमधील मित्रांत माझा अगदी निकटचा मित्र म्हणजे माझा वर्गबंधू श्यामकृष्ण भटनागर हा होता. मला त्याचे वेडच लागल्यासारखे झाले होते.

माझ्या डायरीत त्याच्याबद्दल कितीतरी नोंदी आहेत. श्यामकृष्ण हा पुढे अलीगड आणि नंतर जम्मू येथे एम्प्लॉयमेंट ऑफिसर झाला. तो आता सेवानिवृत्त होऊन जयपूरला स्थायिक झाला आहे.

माझा दुसरा मित्र म्हणजे अमलानंद घोष. तो १९३१ मध्ये इतिहास हा विषय घेऊन एम. ए. ची परीक्षा पास झाला. १९३१ मध्ये तो त्याच विषयात रिसर्च स्कॉलर म्हणून काम करीत होता. आता तो भारत सरकारमध्ये डायरेक्टर जनरल आर्कियालाजी म्हणून काम करीत आहे. या विषयात त्याने खूपच नाव कमावले आहे. कॉलेजमधील महाराष्ट्रीय मित्रांत अमरावतीचा रामचंद्र नर्मदा-पंत याची आणि माझी चांगलीच मैत्री जमली होती. पंत हा रसिक आणि दिलदार स्वभावाचा होता. हॉस्टेलमधील त्याची खोली म्हणजे रसिक मित्रांचा अड्डाच बनला होता. आदरातिथ्य आणि पाहुणचार करावा तर पंतानेच !

एकोणतीस ऑक्टोबर १९३१ तारखेची माझ्या डायरीत पुढील नोंद आहे :

' काल संध्याकाळीं महाराष्ट्र मंडळात पंतांनी यवतमाळचे पी. पी. देशमुख यांच्या सन्मानार्थ कार्यक्रम ठरविला होता. शिरा वगैरे खाल्ल्यानंतर रात्री दहा वाजता आम्ही बोटिंगकरिता गेलो होतो. यमुनेच्या नैनीच्या पुलापासून तो संगमापर्यंत आम्ही नावेतून गेलो. पिठासारखे चांदणे पडले होते. सगळीकडे निःस्तब्धता होती. लाटांच्या व वल्ह्याच्या हलण्याशिवाय कोणताच आवाज ऐकू येत नव्हता. आम्ही किल्ल्याच्या जवळून गेलो त्यावेळी ते मोठमोठाले बुरुज, आणि ते अजस्त्र तट पाहून मला विस्मय वाटला . अशोक आणि अकबर यांची आठवण झाली. तटावर दोन इंग्रज शिपाई पहारा करीत होते. आम्ही संगमावर पोहोचलो त्या वेळीं गंगा आणि यमुना यांची पात्रे पाहून कालिदासाची आठवण झाली. एकंदरीत हा काल मी अत्यानंदाचा अनुभव घेतला. '

कॉलेजमध्ये पुढाऱ्यांची व्याख्याने होत. नऊ ऑगस्ट १९३१ रोजी मी प्रथमच महंमद अली जिना यांचे व्याख्यान ऐकले. त्यावेळची नोंद अशी :

' जिनाच्या बोलण्यांत गोडी फार, पण मला तो कावेबाज दिसला. '

राजकीय चळवळींचा माझा अभ्यास गेली पाच वर्षे सतत चालू होता. चळवळीत प्रत्यक्ष भाग घेणे मला अशक्य होते. दारिद्र्य, अभ्यासाची ओढ आणि पहिल्या वर्गात पास होण्याची धडपड या गोष्टींमुळे माझ्या इच्छेला मर्यादा पडल्या होत्या. पण डायरीतील नोंदींत माझा क्षोभ व्यक्त होत होता. दोन चार नोंदी पुढीलप्रमाणे आढळून आल्या :

एक मार्च १९३०—महात्मा गांधी असहकारिता सुरू करणार आहेत. बघू या काय होते ते.

सत्तावीस जुलै १९३०—व्हि. जे. पटेल पकडले गेले. आता मालवीयजींची पाळी येईल असे वाटते.

दोन ऑक्टोबर १९३०—आज दसरा. विजयादशमीचा मंगल मुहूर्त किती आनंदाचा व उत्साहाचा असायला पाहिजे. पण पाहतो तो येथे फारच थोडा उत्साह दिसून येत आहे. सध्या जी राजकीय चळवळ चालली आहे तीत स्वातंत्र्यसंपादनाचा हेतू असल्यामुळे जोपर्यंत आपले दुर्दैवी राष्ट्र पारतंत्र्याच्या गर्तेतून मुक्त होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारचा उत्सवदिन साजरा न करण्याची जी प्रवृत्ती आजकाल दिसून येत आहे तिचेच हे एक गमक नसेल ना ?

अकरा ऑक्टोबर १९३०—आज जवाहरलाल सुटले. आता काँग्रेसचा काय प्रोग्राम राहतो पाहावे.

एकवीस ऑक्टोबर १९३०—आजपासून दिवाळी. काल जवाहरलाल पकडले गेले. त्या घराण्याने फार स्वार्थत्याग केला आहे.

अपनी कुरबानीसे मशहूर है नेहरू खान्दान
शमे महिफल देख ले ये घर का धर परवाना है

सहा नोव्हेंबर १९३०—काल आमच्या कॉलेजात इमारतीववर झेंडा चढविण्याचा अत्यंत स्फूर्तिदायक समारंभ झाला.

पंधरा ऑगस्ट १९३१—एकूण महात्मा गांधी विलायतेस जाणार नाहीत. पण मला तर असे वाटते की एका आठवड्यात ते जातील.

चार जानेवारी १९३२—आज महात्माजी व वल्लभभाई यांना पकडले. आपल्या देशाचे पुढे काय होणार या विचाराने माझे मन अत्यंत उदास झाले आहे.

चवदा जानेवारी १९३२—कालच स्वराज्य भवनावर पोलिसांनी युनियन जॅकचे निशाण लावले. वाईट वाटले. आम्ही इतके हतवीर्य झालो आहो की हात चोळण्यापलीकडे काहीच करीत नाही. हाय !

माझा अभ्यास जोरात चालू होता. माझ्या वक्तृत्वाची सर्वत्र स्तुती होऊ लागली होती. अकरा सप्टेंबर १९३१ ला न्यूझीलंडहून तीन विद्यार्थि-वक्त्यांचे एक मंडळ आले होते. स्पर्धेसाठी आमच्या युनिव्हर्सिटीतून आम्हां तिघांची निवड झाली. मी, आदित्यनाथ झा (आय. सी. एस. आता लेफ्टनंट गव्हर्नर दिल्ली) आणि ओमप्रकाश भटनागर (आता इतिहासाचे प्राध्यापक, अलाहाबाद विद्यापीठ). माझ्या भाषणाची सगळीकडे वाहवा झाली.

एकोणीसशे एकतीसची दिवाळी मी अलाहाबादलाच घालविली. एम. ए.

फायनलचा अभ्यास असल्यामुळे मी बनारसला जाऊ शकलो नाही. बनारसहून सुंदराताईंनी फराळाचे धाडले होते, मी पण त्यांना ओवाळणीचे म्हणून पाच रुपये पाठवून दिले.

सहा डिसेंबर १९३१ ला लखनौ विद्यापीठात अखिल भारतीय वक्तृत्वस्पर्धा झाल्या. अलाहाबाद विद्यापीठातर्फे वक्ते म्हणून मी आणि विश्वनाथ शर्मा हे निवडले गेलो. विश्वनाथ शर्मा हा त्यावेळीं इंग्रजी विषय घेऊन एम. ए. करीत होता. त्याच्या भावाची सासुरवाडी लखनौला होती. त्याच्या आग्रहावरून मी लखनौला वसतिगृहात न उतरता त्याच्या आप्तांच्या येथे उतरलो. वक्तृत्वस्पर्धेत माझे भाषण चांगलेच गाजले. मला एक चांदीचे पदक आणि तीन पुस्तके बक्षीस म्हणून मिळाली. हॉल केनची कादंबरी दि प्रॉडिगल सन, सी. एफ्. ॲन्ड्र्यूजचे पुस्तक गांधीजीची स्टोरी आणि जवाहरलाल नेहरूंचे सोव्हियट रशिया ही पुस्तके मला देण्यात आली.

कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही घरी परत आलो. योगायोग पाहा. त्याच रात्री मी मलेरियाने आजारी पडलो. दुसऱ्या दिवशी मला उठून बसण्याची शक्ती राहिली नाही. विश्वनाथ शर्माला अलाहाबादेस जाण्याची घाई होती. मी म्हटले, मी पण येतो. एकदा गाडीत चढवून दिलेत की झाले. पण घरची मंडळी म्हणू लागली, ' अंगात इतका ताप आणि अलाहाबादला जाण्याच्या काय गोष्टी बोलता ? आम्ही काय परके आहोत की काय ? विश्वनाथ शर्मा जातो आहे तर त्याला जाऊ द्या. ' मला काही बोलता येईना. विश्वनाथ शर्माच्या भावाची ती सासुरवाडी, सासरे इरिगेशन खात्यात इंजिनियर असून महिन्यातून बरेच दिवस ते फिरतीवर असत. त्यांचा मुलगा विद्याभूषण हा कायद्याचा अभ्यास करीत होता. त्यांची मुलगी चंद्रा सोळा सतरा वर्षांची होती.

त्या कुटुंबाने चार सहा दिवस माझी जी आस्थापूर्वक शुश्रूषा केली, त्याने मी थक्क होऊन गेलो. लखनौचा पाहुणचार आणि तोही जिव्हाळ्याचा असला तर किती गोड असतो याची मला त्यावेळीं पूर्ण कल्पना आली. चंद्रा तर सतत माझ्या दिमतीला असे. तिचा गोडवा मी काय सांगू ! सिनेमानटी वीणा राय हिच्यासारखा उभट चेहरा, सरळ नाक, मोठे डोळे, गौर वर्ण आणि आकर्षक असे शरीरसौष्ठव अशी ती चंद्रा माझ्याजवळ बसून मला काय हवे नको याची चौकशी करी, तेव्हा मला वाटेल की आपले दुखणे लांबत का नाही ! चंद्राचे बोलणेही मोठे मधुर असे. त्यात लखनौची विशिष्ट लकब असे. तिला माझ्याबद्दलची सगळी माहिती मी सांगितली. ती पण लखनौच्या अनेक गंमती सांगे. मी होतो त्या काळात तिचे वडील फक्त एका दिवसासाठीच लखनौला येऊन

गेले. विद्याभूषण तर संध्याकाळपर्यंत कॉलेजमध्ये असावयाचा. त्यामुळे माझा सर्व वेळ चंद्राच्या सहवासात जात असे. ते गोड दिवस मी अद्याप आठवणीत साठवून ठेवले आहेत.

कोणत्याही गोष्टीला शेवट हा असतोच. माझा ताप उतरला. तरी केवळ चंद्राच्या सहवासासाठी म्हणून मी अशक्ततेचे निमित्त करून एक दिवस जास्त काढला. मला त्यावेळी उर्दू कवितेच्या ओळी आठवल्या.

उनके आनेसे आती है जो चेहरे पे रौनक ।
वो समजते हैं के बिमार का हालअच्छा है.

मी लखनौहून निघालो तो काहीशा जड मनानेच. मी घरातून बाहेर पडताना चंद्रा दाराआडून पाहात होती. तिचे डोळे माझ्यावर रोखले होते. ' सतेज सुंदर टपोर डोळे, भाव चंद्रिका जयांत खेळे उचंबळे हृत्सिंधु जीमुळे, विसरेल कसा तो आत्मगुणा, ' अशी त्यावेळी माझी अवस्था झाली होती.

मी अलाहाबादेस परत आलो. माझा मित्र देशपांडे म्हणाला, ' काय राव, (मला सगळेजण राव म्हणत) आम्हांला वाटले तुम्हांला कोणी तरी किडनॅप (पळविले) केले. आम्ही जाहिरात देणार होतो. ' मी त्याला म्हटले, ' वेळ तशी आली होती खरी. ' आज त्या गोष्टीला छत्तीस वर्षे झाली; पण अद्यापही चंद्राची आठवण झाली की मनाला सुखद अशा संवेदना होतात. लखनौ सोडल्यावर चंद्रा पुन्हा काही माझ्या दृष्टीस पडली नाही.

हैदराबादची बरीच मुले अलिगडला शिकावयाला असत. त्यात माझा एक मित्र हणमंतराव कुलकर्णी हा होता. नाताळच्या सुट्टीत तो आपल्या मित्रांना घेऊन आला. हे मित्र माझ्याकडेच उतरले होते. पंचवीस डिसेंबर १९३१ रोजी मी त्यांना सगळे शहर दाखविले. आम्ही शहरभर सारखे भटकत होतो. खुसरौबाग, आनंदभवन, अलाहाबादचा किल्ला, सिव्हिल लाइन, इत्यादी स्थळे आम्ही पाहिली. सव्वीस रोजी आम्ही सकाळी यमुनेतून नावेने सहल करण्याचे ठरविले. नैनीच्या पुलापासून निघावे आणि किल्ल्याच्या खालून जाऊन गंगा-यमुनेच्या संगमावर पोहोचावे. तेथे पोहून एक दोन वाजता घरी परतावे असा आमचा कार्यक्रम होता. नावेतून जाताना आमच्या गप्पागोष्टींना ऊत आला होता. आम्ही गाणी म्हणत होतो, नदीचे पाणी एकमेकांच्या अंगावर उडवीत होतो. थट्टा-मस्करी करीत होतो. आमची नाव मोठ्या डौलाने यमुनेवरून तरंगत चालली होती. अकरा साडेअकराच्या सुमारास आम्ही संगमावर जाऊन पोहोचलो. तेथे वाळूचे एक लहानसे बेट बनले होते. बेटावर लाकडाचे एक प्लॅटफार्म होते. त्यावर एक पंडा गंध उगाळीत बसला होता. आम्ही अंगावरचे कपडे काढून

त्याच्यापाशी ठेवले. आणि पाण्यात उड्या घेतल्या. आमच्या बरोबर असलेल्या श्रीनिवासनला पोहता येत नव्हते, हे कुणालाच माहीत नव्हते. मी प्लॅटफॉर्मच्या एका बाजूने पोहत होतो. श्रीनिवास, कोठारी वगैरे दुसऱ्या बाजूस होते. श्रीनिवास हा प्लॅटफार्मच्या पुढे पाच दहा पावले गेला असेल नसेल. तेथे पाणी खोल होते. श्रीनिवासन पाण्यात बुडू लागला. त्याने जवळच उभ्या असलेल्या कोठारीला पकडण्याचा प्रयत्न केला. कोठारीलाही पोहता येत नव्हते. त्याला वाटले, श्रीनिवासन आपल्याला पाण्यात ओढू पाहात आहे. त्याने त्याला झटकून म्हटले, ' अरे मला पोहता येत नाही. मला ओढू नकोस. ' यानंतर श्रीनिवासन हळूहळू पाण्याखाली जाऊ लागला. सगळे ओरडून म्हणू लागले, ' अरे तो पाहा, श्रीनिवासन बुडतो आहे. ' मी वळून पाहिले तो मला श्रीनिवासनचा हात तेवढा पाण्याखाली नाहीसा होत असलेला दिसला. एका क्षणात तोही दिसेनासा झाला. मी लागलीच पोहत पोहत त्या ठिकाणी गेलो. आणि मागचापुढचा विचार न करता, मी पाण्यात बुडी घेतली. मला वाटले श्रीनिवासन तेथेच तळापाशी असला तर मी त्याला वर ओढून काढीन. मी तळापर्यंत गेलो. पण श्रीनिवासनचा पत्ता लागला नाही. पाण्याच्या प्रवाहाने तो लांब कुठेतरी ओढला गेला असला पाहिजे. मी तळाशी त्याला शोधीत होतो तोच प्रवाहाने मीही ओढला जात आहे याची मला जाणीव झाली. पाण्यात माझे डोके खाली आणि पाय वर झाले. मला वर येण्याचे जमेना. यमुनेच्या पाण्याला विलक्षण ओढ होती. एकदा पाय वर तर एकदा डोके वर अशा स्थितीत मी तीव्र वेगाने वाहात चाललो आहे असे मला वाटू लागले. श्रीनिवासनची जी गत झाली तीच आपलीही होणार ही कल्पना त्या वेळी मनात आल्याचे मला आठवते. मृत्यूचे पाश आपल्या भोवती आवळले जात आहेत, तेही यमुनेच्या अथांग पाण्यात. पिंजऱ्यात अडकलेला उंदीर बाहेर निघण्याची धडपड करीत असावा तसे मला झाले. त्या क्षणी एकच विचार माझ्या मनात होता. मी जगावे. मला मरण येऊ नये. यमुनेच्या काळ्या प्रवाहाचा आवाज कानात घुमत होता. तो त्यावेळी मला किती निर्दय आणि क्रूर वाटला ! पाण्यातून वाहत जात असताना मी वर येण्याची सारखी धडपड करीत होतो. मी वर कसा आलो, परमेश्वराला ठाऊक ! जगण्याच्या जिद्दीतूनच मला बळ आले असावे. त्रिवेणी संगमासारख्या तीर्थात बुडून जरी मृत्यू आला तरी अशा मृत्यूला जीवनाची सर येईल काय !

उर्दू कवींनी म्हटले आहे, " मौत कितनीही शानदार सही, जिंदगी का मगर जबाब नही " मी वर आलो. पाहातो तो समोरचे लहानसे बेट झपाट्याने माझ्या समोरून सरकत होते. काही मिनिटे उशीर झाला असता तर मला काठ

हाती लागला नसता आणि मी पाण्याबरोबर वाहात गेलो असतो. माझ्या मित्रांचे ओरडणे मला लांबून ऐकू आले, 'अरे तूही मरशील' मी कसाबसा हात मारीत वेटाच्या अगदी टोकाला लागलो. आणि काठावर बेशुद्ध होऊन पडलो. थोड्या वेळाने मी शुद्धीवर आलो. माझे मित्र माझ्याभोवती गोळा झाले होते. आम्ही सगळे हतबुद्ध होऊन गेलो. हा हा म्हणता श्रीनिवासन नाहीसा झाला होता. मी मित्रांना म्हटले, 'आपण पोलीस स्टेशनवर जाऊन अपघाताची वर्दी देऊ या.' उपाशीतापाशी असे आम्ही दारागंजच्या पोलीस स्टेशनवर गेलो. इन्स्पेक्टरसमोर आम्ही जबान्या दिल्या. त्याच दिवशी आम्ही श्रीनिवासनच्या वडिलांना तार केली. दुपारी आम्ही पोलीस खात्याचे मोठे जाळे घेऊन संगमावर गेलो. नदीच्या पात्रात आम्ही दोन्ही काठांवरून जाळे टाकले. जाळ्यात एकदा एक कासव अडकून वर आले. एकदा एक लहान मुलाचे प्रेत आले. पण दुपारपर्यंत प्रयत्न करूनही श्रीनिवासचे प्रेत काही हाती लागले नाही.

त्या दिवशी माझा काळ आला होता. पण वेळ आली नव्हती! मृत्यूला मी अगदी जवळून पाहिले ते त्या दिवशी. सव्वीस डिसेंबर १९३१ हा माझ्या मनावर कायमचा कोरला गेला आहे. पुढील आयुष्यात मी दिल्लीला अनेक वेळा गेलो. तेथे यमुना पाहिली की अद्याप मनाचा थरकाप होतो.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या मित्रांना बनारसला घेऊन गेलो. एकोणतीस डिसेंबरला मी अलाहाबादेस परत आलो. राजपूरहून मिसेस सुवीरादेवी शास्त्री यांच्याकडून दहा रुपये आणि क्रिसमस ग्रीटिंगचे कार्ड ही आली. प्राध्यापक मलानीपण न चुकता दर महिन्याला मला रुपये पाठवीत.

१९३३ च्या जानेवारीत अभ्यंकरला अकोल्याची नोकरी मिळाल्यामुळे तो अलाहाबाद सोडून गेला. होळकरवाड्यात मी, मुंगरे, भागवत, देशपांडे आणि फूलचंद गंगराडे हे राहिले. माझी परीक्षा तीन महिन्यांवर आली होती. एखादी चांगली नोकरी मिळविण्यासाठी म्हणून तरी एम. ए. पहिला वर्ग काढणे भाग होते. मी सतत अभ्यास करीत होतो. एम. ए. नंतर काय करावे हा विचार मला भेडसावीत होता.

याच सुमारास मला प्राध्यापक कोसांबी यांचे पत्र आले. कोसांबी हे काही दिवस बनारसला गणिताचे प्राध्यापक होते. त्यावेळी मी त्यांना एक दोनदा पाहिले होते. पुढे कोसांबी हे अलीगडला गणिताचे प्राध्यापक झाले. त्यांचे सर्व शिक्षण अमेरिकेत झाले असल्यामुळे त्यांना अनेक विषयांत गोडी होती. मध्ययुगीन यूरोपचा सुप्रसिद्ध राजनीतिज्ञ इटालीचा माकियावेली याचा ग्रंथ 'प्रिन्स'

हा फार गाजलेला आहे. हा मूळ ग्रंथ इटालियन भाषेत आहे. त्याची इंग्रजीतील भाषांतरे उपलब्ध आहेत. कोसांबीची इच्छा प्रिन्सचे मराठी भाषांतर व्हावे अशी होती. या कामासाठी कोणी विद्यार्थी मिळू शकेल काय म्हणून कोसांबींनी प्राध्यापक पुणतांबेकर यांच्याकडे चौकशी केली. त्यांनी माझे नाव सुचविले. कोसांबींनी मला पत्र लिहून हे काम पत्करण्यास तयार आहात काय असे मला विचारले. मी त्याना कळविले की माझी एम. ए ची परीक्षा आटोपली की मी अलीगडला येईन. आणि भाषांतराचे काम हाती घेईन. यानंतर कोसांबी एकदा अलाहाबादेस आले असताना मी त्यांची भेट घेतली आणि एप्रिल १९३२ मध्ये माझी परीक्षा आटोपली की मी अलीगडला त्यांच्याकडे जावे असे ठरले. मला या गोष्टीचे मोठे समाधान वाटले. परीक्षा संपल्याबरोबर काय करावे हा प्रश्न एक दोन महिन्यांसाठी का होईना, सुटला. त्या काळच्या डायरीतील नोंदी अशा :

बारा नोव्हेंबर १९३१—मणूरकरांनी (हे इंदूरच्या चॅरिटी कमिशनरच्या ऑफिसमधे होते) आपल्या मुलीबद्दल (पद्मा मणूरकर, ही बनारसला संस्कृत घेऊन एम. ए. करीत होती.) मला ऑफर केला आहे. मी नाकारीन.

एक जानेवारी १९३२ शुक्रवार—काल कानपूरचे श्रीनिवास गोविंद निगुसकर यांचे पत्र आले. त्यांनी आपल्या भाचीकरिता ऑफर केला आहे. पण पोटा-पाण्याची सोय लागल्याशिवाय काही करता येणार नाही.

चवदा मार्च १९३२—काल आम्ही परत कच्च्या वाड्यात (होळकर वाडा) आलो. गोखल्यांच्या येथे लग्न होते. म्हणून आम्हांला हा वाडा रिकामा करून द्यावा लागला. गेले काही दिवस आम्ही ज्या घरी राहात होतो तेथे सुशीला नावाची एक मुलगी होती. तिच्याशी माझे चांगलेच सूत जमले होते. ती मला आवडू लागली होती. आम्हांला कर्नाटकी सार, चटणी, लोणचे मिळाले, मला होम्ली वाटू लागले होते. इतक्यातच आम्हा सर्वांना येथे येणे भाग पडले. मला वाईट वाटले. त्या मुलीलाही फार वाईट वाटलेसे दिसले. मला वाईट वाटण्या-बरोबरच मनात व्हेनिटीची एक झुळुक येऊन गेली. " हर मेमरी विल हॉंट मी! फॉर ए लॉंग टाइम "

मन हे मोठे चमत्कारिक आहे. त्या मुलीला मी कधीच विसरून गेलो होतो. डायरीतील नोंदीवरून तिची आठवण झाली. मला माझ्या स्मरणशक्तीची गंमत वाटते. चाळीस पन्नास वर्षांपूर्वी पाहिलेल्या व्यक्ती अगर घडलेले प्रसंग अगदी काल पाहिल्यासारख्या, अगर आज घडलेले वाटतात. १९२३ मधे मी पुण्यात असताना बुधवारातून चाललो होतो. रस्त्यावरून एक वरात येत होती.

वरातीत मला पंचवीस वर्षांची एक तरुणी दिसली. तिच्या रूपाचे काय वर्णन करावे! ती उंच होती, सडपातळ होती, गोरीपान होती, तिचा चेहरा उभट होता. नाक सरळ होते. कपाळ उंच होते. डोळे मोठे होते. तिने केसांची पेशवेकालीन पद्धतीची वेणी घातली होती. पांढरे शुभ्र पातळ नेसली होती. नी मंद मंद पावले टाकीत चालली होती. माझे वय त्यावेळी तेरा वर्षांचे होते. पण तिच्या रूपाने मी इतका भारावून गेलो की केवळ तिला पाहण्यासाठी म्हणून मी वरातीबरोबर बुधवार चौकापर्यंत गेलो.

‘ पथि चालता पडती तुझी किती संथ पाउले,
जन मागुनी पुढुनी तुला मुरडोनी पाहत राहिले. ’

अशी माझी अवस्था झाली.

बनारसला मी घरून चार पाच मैल चालत युनिव्हर्सिटीला जात असे. मी त्यावेळीं इंटर फर्स्ट ईअरला होतो. अस्सी घाटाजवळच्या रस्त्यावर मी आलो की जवळच्या खेड्यातून बायका गवताचे किंवा लाकडाचे भारे डोक्यावर घेऊन शहरात येताना दिसत. त्यात एक सोळा सतरा वर्षांची मुलगी असे. ती उंचीने लहान होती. पण धष्टपुष्ट होती. नाक काहीसे बसकेच होते. पण ती अतिशय गोरी होती. तिचे डोळे घारे होते. तिच्या अंगात चोळी नसे. आपल्या अंगावरून ती पदर घट्ट बांधून घेत असे. दोन्ही हातांनी लाकडाचा भारा सांभाळीत ती समोरून झपझप चालत येऊ लागली की माझे तिच्याकडे हमखास लक्ष जाई. दोनचारदा असे झाल्यावर मी रोज घरून निघताना नेमक्या वेळी अस्सी घाटाच्या रस्त्यावर पोहोचण्याचा प्रयत्न करू लागलो. तिला एकदा पाहून घेतली की मनाला बरे वाटे. पुढे मी सायकल विकत घेतल्यानंतर मला पायी चालण्याची आवश्यकता राहिली नाही आणि मी त्या मुलीला विसरूनही गेलो. पण पुण्यात पाहिलेली तरुणी काय, किंवा बनारसची भारेवाली काय! आज चाळीस वर्षांनंतरही त्यांना हजार जणींतून मी ओळखून काढू शकेन याची मला खात्री वाटते. पण काहींची आठवण डायरीवरूनच मला व्हावी याचे मला आश्चर्य वाटते. कित्येक अनावश्यक आणि निरर्थक अशा गोष्टी माझ्या स्मरणात राहिल्या आहेत. एकच उदाहरण सांगतो. १९२२ मध्ये पुण्याहून मी दिवाळीच्या सुट्टीसाठी म्हणून घरी जाण्यास निघालो. मी घेतलेल्या रेल्वे तिकिटाचा नंबर बाराशे पासष्ट होता. किती क्षुल्लक बाब. पण गेली सत्तेचाळीस वर्षे ती आठवणीत का राहावी? उलट बरीच वर्षे सहवासात असलेली माणसे मला पुन्हा अचानक भेटली तर मी त्यांना हमखास ओळखतोच असे होत नाही. इतिहासातील शेकडो तारखा आठवतात. पण काल भाजी

कोणती खाली हे चटकन आठवायचे नाही अशी ही स्मरणशक्तीची मौज आहे.

माझा अभ्यास चालू होता. बनारसहून सुंदराताईची मधून मधून पत्रे येत. दोन फेब्रुवारी १९३२ ला त्यांनी माझ्यासाठी मुद्दाम फराळाचे करून पाठविले.

एक एप्रिल १९३२ ला माझी एम. ए. फायनलची परीक्षा सुरू झाली. माझे पेपर बरे गेले. तोंडी परीक्षेला डॉक्टर वेनीप्रसाद आणि लखनौचे डॉक्टर व्ही. एस. राम हे होते. परीक्षा आटोपल्यावर दोन तीन आठवड्यांतच निकाल कळणार होता. म्हणून निकाल ऐकण्यासाठी मी अलाहाबादलाच राहिलो. मी पास होणार याची मला खात्री होती. पण वर्ग कोणता मिळणार याबद्दल मला धाकधूक होती. कारण त्यावरच माझे भवितव्य अवलंबून होते.

एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात निकाल लागला. मी पहिल्या वर्गात पहिला आलो. त्यावेळचा माझा आनंद अवर्णनीय होता. मी सायकलवरून घरी परत येत होतो. नेहरूंच्या आनंदभवनसमोरच माझे मित्र मुंगरे मला भेटले. त्यांना मी ही बातमी सांगितली. माझ्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू उभे राहिले. मुंगऱ्यांच्या डोळ्यांतही पाणी आले. मी पहिला आलो याचा अर्थ असा की पुढील एक वर्षासाठी माझी मासिक पन्नास रुपयांची रीसर्च स्कॉलरशिप निश्चित झाली. नोकरीचा प्रयत्न करीत असावे, नोकरी मिळाली की, स्कॉलरशिप सोडून द्यावी. नाहीतर एक वर्षभर तरी स्कॉलर म्हणून राहता येईल. तेवढ्या अवधीत कुठे ना कुठे तरी नोकरी लागेलच. या विचाराने माझा जीव खाली पडला. सर्टिफिकेटे गोळा करण्यासाठी मी दोन दिवसांसाठी बनारसला जाऊन आलो.

सत्तावीस एप्रिल १९३२ रोजी मी अलाहाबाद सोडले. दुसऱ्या दिवशी अलीगडला पोहोचलो. प्राध्यापक कोसांबी यांनी माझे मोकळेपणाने स्वागत केले. त्यांची पत्नी त्यावेळी माहेरी गेली होती. ते आपल्या बंगल्यात एकटेच राहात होते. मी त्यांच्या बरोबर राहू लागलो. माझ्या जेवणाची सोय त्यांनी युनिव्हर्सिटी हॉस्टेलमध्ये केली.

मी माकियावेलीच्या जीवनाचा अभ्यास केला होता. त्याची राजनैतिक तत्त्वे वर्गात चागली शिकविण्यात आली होती. मी ' प्रिन्स 'च्या मराठी भाषांतराच्या कामाला लागलो. पण तीन चार दिवसांतच माझ्यात आणि कोसांबीत मतभेद निर्माण झाले. कोसांबी हे अतिशय बुद्धिमान, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे आणि स्वभावाने मोठे उदार होते. त्यांचे स्वतःचे ग्रंथालय, त्यांचे विस्तृत वाचन, त्यांचा खोल व्यासंग, त्यांचे अनेक भाषांचे ज्ञान, विविध विषयांबद्दलचे त्यांचे कुतूहल या गोष्टींनी मी थक्कच झालो. परमेश्वराने हे सर्व गुण त्यांना मुक्तहस्ताने बहाल केले होते. पण त्याची लीला अगाध आहे. या सर्व गुणांबरोबर त्याने कोसांबींना

विनय हा गुणही दिला असता तर त्याचे काय बिघडले असते ? पण त्याने तसे केले नाही. राजनीती किंवा युरोपीय इतिहास यासंबंधी त्यांनी काही सांगावे आणि माझ्या अभ्यासावर विसंबून मी त्यांच्याशी वाद करावा असे होऊ लागले. त्यांना रशियाचे आणि कम्यूनिझमचे बरेच आकर्षण असावे. मीही त्या विषयावर काही कमी पुस्तके वाचली नव्हती. सिडॅनी वेबचे पुस्तक सोव्हियट कम्यूनिजम, ए न्यू सिव्हिलिजेशन हे सुमारे दीड हजार पानांचे पुस्तक आहे. त्या प्रचंड पुस्तकाची ओळ न् ओळ मी वाचून काढली होती. कम्यूनिजमचा विषय हा तर आमच्या अभ्यासक्रमात होता. एकदा कोसांबी म्हणाले, 'मी रशियन थोडेफार शिकलो आहे.' मी म्हटले 'अस्से, मग कम्यूनिजमच्या अभ्यासात हे थोडेफार रशियन, आपल्याला कितपत उपयोगी पडले बरे ?' ते काही बोलले नाहीत, यूरोपच्या इतिहाससंबंधीही असेच झाले. यूरोपच्या इतिहासावर मी डझनांनी पुस्तके वाचून काढली होती. बी. ए. ला यूरोपचा इतिहास आणि एम्. ए. ला. आंतरराष्ट्रीय संबंध हे विषय माझ्या अभ्यासात होते. आणि कोसांबींना वाटले मला यूरोपचा इतिहास अवगत नाही.

आमच्या मतभेदाचा माकियावेलीच्या भाषांतराशी काही संबंध नाही अशी माझी समजूत होती. पण कोसांबींचे मन त्या कामावरून उडाले. गणितशास्त्रात त्यांनी फार मोठे नाव कमावले असे म्हणतात. मला त्या विषयात काहीच गम्य नाही. माझे एक मित्र मुंबई विद्यापीठात मोठे पदाधिकारी होते. ते एकदा मला म्हणाले, "मी कोसांबींना एकदा विचारले, 'जगात सुप्रसिद्ध असे गणिती कोण आहेत ?' कोसांबी म्हणाले, 'जगात तीनच गणिती प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी हा एक मी तुमच्यासमोर उभा आहे.' त्यांचे हे बोलणे ऐकून मी थक्कच झालो."

कोसांबींचे मन एकाच वेळी अनेक विषयांत रमत असे. ते कधी इतिहासात आवड दाखवीत, तर कधी संस्कृत साहित्यात. मी प्रसन्न मनाने माकियावेलीच्या भाषांतरात गुंतलो होतो. चार आठ दिवसांतच कोसांबींनी ठरविले असावे की माकियावेलीचे भाषांतर तूर्त थांबवावे. पण ते मला काहीच बोलले नाहीत. एक दिवस ते मला म्हणू लागले, 'दासोपंतांचे वाङ्मय प्रकाशित करावे असे मला वाटू लागले आहे.' मी त्यांना म्हटले, 'दासोपंत हा मराठवाड्यातील आंबेजोगाईचा. तेथे त्याचे वाङ्मय आहे. पण ते तुम्हांला मिळावे कसे ?' 'त्यात काय ?' कोसांबी म्हणाले, 'माझे चुलत सासरे सर गोविंद माडगावकर यांच्याकडून सर अकबर हैदरी (हैदराबाद राज्याचे अर्थमंत्री) यांना मी पत्र लिहिण्यास लावीन आणि दासोपंतांचे वाङ्मय हाती आले की त्याच्या संपादनाचे काम आपण हाती घेऊ.' मी काहीच बोललो नाही. पण कुठे माकियावेली

आणि कुठे दासोपंत, असा विचार माझ्या मनात आल्याशिवाय राहिला नाही. यानंतर एक दोन दिवसांतच कोसांबी मला म्हणाले, 'मला एका मित्राचे आमंत्रण आले आहे. मी आज नेपाळच्या तराईत जात आहे. मला परत यायला दहा बारा दिवस लागतील. तुम्ही निश्चितपणे येथे राहा. माझी लायब्ररी आहे. हवे तितके लेखन वाचन करा.' त्याच दिवशी संध्याकाळी ते तराईकडे निघून गेले. माझा अलीगडमधे कार्यक्रम ठरला होता. सकाळचे चहापाणी, आंघोळ वगैरे झाल्यावर माकियावेलीचे भाषांतर, आणि इतर पुस्तकांचे वाचन ही कामे मी करी. दुपारचे जेवण हॉस्टेलात होत असे. हॉस्टेलमधे कुळकर्णी, कोप्पर, कामत अशी जुनी मित्रमंडळी होती. त्यांच्याबरोबर गप्पा मारण्यात थोडा वेळ जाई. तेथून परत आल्यावर मी थोडा वेळ विश्रांती घेई. संध्याकाळी मी लांब फिरून येत असे. तर कधी अलीगडच्या प्राध्यापकांना भेटत असे. रात्रीची जेवणी हॉस्टेलमध्ये होत. तेथून परत आल्यावर दोन तीन तास वाचन अगर लेखन करून मी झोपी जाई.

कोसांबींचे ग्रंथालय मोठे होते. निरनिराळ्या विषयांवर असलेली शेकडो पुस्तके मला ग्रंथालयात आढळली. कोसांबीसारखी व्यासंगी माणसे मला आयुष्यात क्वचितच आढळली.

अलीगडचे प्राध्यापक हबीब हे इतिहासाचे मोठे संशोधक आहेत. अमीर खुस्रोचे चरित्र, भारतातील मध्ययुगीन राजनीतिशास्त्र, नसीरुद्दीन चिरागचे चरित्र, खुस्रोकृत अल्लाउद्दीन खिल्जीच्या मोहिमांचे वर्णन (अनुवाद), इलियट डॉसनच्या ग्रंथांचे संपादन, अशी त्यांची गाजलेली पुस्तके आहेत. प्राध्यापक हबीब हे उपराष्ट्रपतिपदासाठी उमेदवार म्हणून उभे राहिले होते, हे सर्वांना माहीत आहे. मी अलीगडला असताना प्राध्यापक हबीब त्यांच्याकडे नेहमी जात असे. त्यांच्या विद्वत्तेचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. खरा व्यासंगी माणूस. भारतीय इतिहासाची फारसी भाषेत अनेक साधने आहेत. हबीब यांनी मला अनेक ग्रंथांची माहिती दिली. त्यांच्या सहवासात वेळ कसा जाई हे कळत नसे. माझ्या माकियावेलीवरील कामासंबंधी ते आस्थापूर्वक चौकशी करीत.

अलीगड विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉक्टर रास मसूद (सर सय्यद अहमद यांचे नातू) यांनाही मी एकदा भेटून आलो. माझा मित्र श्यामकृष्ण भटनागर हा अलीगडला आपल्या एका नातेवाइकाकडे आला होता. तो मला भेटायला आला. त्याच्या सहवासात माझे दोनचार दिवस मोठ्या आनंदाचे गेले. तो दिल्लीजवळील सिकंद्रा गावचा. अलीगडहून निघताना त्याने मला आपल्या गावी येण्याचे आमंत्रण दिले. अलीगड गावातही मी अनेकदा जात असे. इ. स.

१८०३ च्या इंग्रज मराठा युद्धापर्यंत अलीगड हे मराठ्यांच्या ताब्यात होते. अलीगडच्या किल्ल्याचे अवशेष मी पाहून आलो.

अलीगड गावात मला दिघे नावाचे गृहस्थ भेटले. ते कोणत्यातरी बँकेत नोकर असावेत. ते मला अगत्याने आपल्या घरी घेऊन गेले चहापाणी झाल्यावर आमच्या गप्पा झाल्या. काही वर्षे ते हैदराबादेत होते. त्यामुळे त्यांनी हैदराबादच्या आपल्या जुन्या आठवणी सांगितल्या. सहज बोलत असता ते म्हणाले, 'आम्ही सी. के. पी.' मला या अक्षरांचा बोध होईना. मी त्यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले 'अहो, सी. के. पी. म्हणजे चांद्रसेनीय कायस्थ प्रभू.' मी आश्चर्याने म्हटले, 'म्हणजे मुरारबाजी, बाजी प्रभू, गडकरी इत्यादींचा मुंबईकडे सी. के. पी. या इंग्रजी अक्षरांनी उल्लेख करतात की काय?' हैदराबादच्या बहुभाषी आणि बहुरंगी जीवनात आमच्या मनावर जातीय संस्कार असे झालेच नव्हते. कोकणस्थ हा शब्दप्रयोग मी पुण्याला आल्यावर माझ्या कानावर पडू लागला, कऱ्हाडे हा शब्द समजू लागला तेव्हा मी नोकरीला लागलो होतो. सारस्वत म्हणजे कोण हे मुंबईला आल्यानंतरच समजू लागले. साहजिकच सी. के. पी. या अक्षरांनी मी त्यावेळी गोंधळून गेलो.

कोसांबी हे वीस मे १९३२ रोजी आपली शिकार आटपून परत येणार होते. त्यांच्या घरात मी एकटाच राहात असल्यामुळे ते परत येण्याची वाट मी पाहात होतो. ते परत येण्याच्या एक दोन दिवस आधी मी त्यांच्या लायब्ररीतील पुस्तके चाळीत होतो. तो त्यांच्या टेबलाकडे माझे सहज लक्ष गेले. टेबलावर त्यांची एंगेजमेंटची वही ठेवली होती. ते नक्की कधी परत येणार हे समजते काय म्हणून मी ती वही उघडली. आपण अमक्या अमक्या तारखेला शिकारीसाठी जातो असे त्यांनी लिहिले होते. त्यापुढील वाक्याने मी थक्कच होऊन गेलो. कोसांबींनी लिहिले होते, 'मी परत येईपर्यंत पगडी निघून जातील अशी माझी अपेक्षा आहे.—आय एक्सपेक्ट पगडी टु क्लीयर आउट' हे त्यांचे शब्द होते.

माझा क्षोभ किती अनावर झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी! माकियावेलीच्या भाषांतरासाठी कोसांबींनी मला बोलाविले होते. मी आपण होऊन त्यांच्याकडे गेलो नव्हतो. आणि आता ते परत येण्याचीच मी वाट पाहात होतो. त्यांच्या वरील शब्दांनी मनात कोठेतरी खोल जखम झाली. कोसांबींना माकियावेलीचे भाषांतर नको असेल तर ते काम मी स्वतः तडीस नेईन अशी मला जिद्द निर्माण झाली. एक दोन दिवसांनी कोसांबी परत आले. मी त्यांना काहीच बोललो नाही. मी फक्त इतकेच म्हटले, 'मला आता घरी लवकर परत गेले पाहिजे. मी आज संध्याकाळच्या गाडीने जाईन म्हणतो' त्यांनीही काही आढेवेढे घेतले

नाहीत. त्यांनी मला हैदराबादपर्यंतचा प्रवासखर्च दिला. शिवाय इतर खर्चासाठी त्यांनी पाचपंचवीस रुपये दिले.

यानंतर कोसांबींची आणि माझी आयुष्यात फक्त एकदाच गाठ पडली. पुण्याला डेक्कन जिमखान्यावर माझे श्वशुर प्राध्यापक पुणतांबेकर यांनी एक बंगला बांधला. एकोणीसशे चव्वेचाळीस पंचेचाळीसच्या सुमारास मी पुण्याला गेलो असताना पुणतांबेकरांचा बंगला पाहण्यास गेलो. तो कोसांबींनी पण शेजारीच बंगला बांधला आहे असे मला कळले. मी कोसांबींच्याकडे गेलो.

मी धर्मानंद कोसांबीचे आत्मचरित्र वाचले होते. बौद्ध तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यासक धर्मानंद कोसांबींसारखा दुसरा कोणीही आपल्या देशात झाला नाही. सिलोन, ब्रह्मदेश इत्यादी देशांतून त्यांनी बौद्ध धर्माचा खोल अभ्यास केला. पाली भाषेवर त्यांनी विलक्षण प्रभुत्व मिळविले. कलकत्ता, हारवर्ड इत्यादि विद्यापीठांतून त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम केले. अनेक बौद्ध धर्मग्रंथांचे त्यांनी संपादन केले. त्यांचा भगवान बुद्ध हा चरित्रग्रंथ सर्वमान्य झाला आहे. मी कोसांबींच्याकडे गेलो त्यावेळी धर्मानंद कोसांबी तेथे होते. त्यांच्या चेहऱ्यावर अद्वितीय असे तेज असे. त्यांना पाहून हा प्राचीन काळच कोणी महर्षी आला आहे की काय असे मला वाटले. धर्मानंद कोसांबी हे सोफ्यावर बसले होते. मी पुढे झालो. आणि त्यांच्या पायावर हात ठेवून मी त्यांना नमस्कार केला. त्यांनी माझी मोठी अगत्यपूर्वक चौकशी केली. त्यांच्या सहवासात मी दहा पंधरा मिनिटेच असेन. पण त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव माझ्या संबंध आयुष्यावर पडला आहे. त्यांची ज्ञानोपासना, आणि त्यांचे ऋषितुल्य जीवन ही मी आदर्श मानीत आलो आहे. थोडा वेळ का होईना, धर्मानंदांच्या संगतीत काही क्षण मला लाभले हे मी माझे भाग्य समजतो. धर्मानंदांचा मृत्यू, १९४७ च्या सुमारास झाला असावा. त्यावेळी मी तेलंगणात आसफाबाद येथे डेप्युटी कलेक्टर होतो. त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकून मला अतिशय वाईट वाटले. मी प्राध्यापक कोसांबींना दुखवट्याचे पत्र लिहिले.

प्राध्यापक कोसांबींची आणि माझी पुन्हा गाठ पडली नाही. त्यांचे ग्रंथ इंट्रोडक्शन टु इंडियन हिस्टरी, मिथ्स ॲण्ड रियालिटी, एक्सास्परेटिंग एसेज मी वाचून काढले. त्यांतून त्यांनी पाश्चात्त्य आणि पौर्वात्य इतिहाससंशोधकांचा आणि साहित्यिकांचा मार्क्सवादी दृष्टिकोनातून खरपूस समाचार घेतला आहे कालिदास, मॅक्समुलर या व्यक्तीही त्यांच्या तावडीतून सुटल्या नाहीत. मग. इतरांची काय कथा!

पाच सहा वर्षांपूर्वी कावसजी जहांगीर हॉलमध्ये कसलीशी सभा होती.

मी आपल्या ऑफिसातून (जुने सचिवालय) परत चाललो होतो. कोसांबी व्हरांड्यात उभे राहून कुणाशी तरी बोलत होते. एक क्षणभर मला वाटले आपण त्यांना भेटावे म्हणून. पण पाय काही त्या दिशेने वळले नाहीत. मी सरळ घराकडे चालू लागलो. न बोलविता, मग तो मृत्यूही का असेना, कुणाच्या दारात उभी राहणारी माणसे आम्ही नाहीत असे एका उर्दू कवीने म्हटले आहे. त्याची मला त्यावेळी आठवण झाली. 'हम मौत के घर भी बिनबुलाये न जायेंगे'

एकतीस मे १९३२ रोजी मी अलिगड सोडले. दिल्लीपासून बत्तीस मैलांवर सिकंद्रा हे गाव आहे. माझा मित्र श्यामकृष्ण भटनागर तेथे राहात होता. मी त्याच्याकडे गेलो. श्यामकृष्णाचे घर एका प्रतिष्ठित जमीनदाराचे होते. श्यामकृष्णाच्या वडिलांना राजा ही पदवी असावी. त्याचे वडील वारले होते. श्यामकृष्ण आणि त्याचे मोठे भाऊ यांचा गावात कुंवरसाहेब म्हणून उल्लेख करीत. सिकंद्र्याला मी तीन चार दिवस मोठ्या आनंदात घालविले. सिकंद्र्याला श्यामकृष्णाकडे उर्दू वर्तमानपत्रे येत. मला वाटते त्याच सुमारास मौलाना शौकत अली यांनी मिसरायन नावाच्या एका अँग्लो इंडियन पोरीशी लग्न लावले होते. याबद्दल शौकतअलीची टिंगल उडविणारे लेख प्रसिद्ध होत होते. एकाने तर या लग्नावर सेहरा (मुंडावळ काव्य, मंगलाष्टके म्हणाना) रचला होता. त्यातील दोन ओळी मला अद्याप आठवतात. रायनच्यामुळे शौकतअलींना आनंदाचे भरते का बरे येणार नाही? बुडत्या नावेला तोच एक काडीचा आधार.

फूले न समाये क्यौं रायन की बदौलत शौकत
डूबती नैया को तिनके का सहारा सेहरा

अलिगडला असताना मी नोकरीसाठी फर्ग्यूसन कॉलेज, सर परशुरामभाऊ कॉलेज इत्यादि ठिकाणी अर्ज केले होते. हैदराबादेस जाताना आपण पुण्यास उतरून जावे-चौकशी करावी असा मी बेत केला. मी श्यामकृष्णाचा निरोप घेतला आणि पंचवीस मे १९३२ रोजी दिल्लीला आलो. त्याच दिवशी दिल्लीहून निघून सत्तावीस तारखेला मी पुण्यात पोहोचलो.

पुण्याला मी माझा शाळेतील मित्र एस. ए. बाम याजकडे उतरलो. नोकरीच्या निमित्ताने मी फर्ग्यूसनचे प्राध्यापक लिमये (अर्थशास्त्रज्ञ), प्राध्यापक नाईक इत्यादींची गाठ घेतली. पण फर्ग्युसनला जागा नसल्याचे कळले. संध्याकाळी मी आणि बाम असे दोघे डॉक्टर धनंजयराव गाडगीळ यांच्याकडे गेलो. त्यांच्या गोखले स्कूल ऑफ एकनामिक्समधे काम मिळणे शक्य आहे काय म्हणून मी चौकशी केली. डॉक्टर गाडगीळ म्हणाले, "आमची संस्था एकनॉमिक्सवर

काम करीत आहे. तुमची पदवी पोलिटिकल सायन्समध्ये आहे. अजून आमच्या संस्थेची वाढ व्हावयाची आहे. सध्या तरी तुमच्यायोग्य काही काम नाही. ”

दुसऱ्या दिवशी आम्ही सदाशिव पेठेतून जात असताना समोरून प्राध्यापक पुणतांबेकर येत असलेले मला दिसले. आपण त्यांच्या मुलीला मागणी घातली आहे याची मला जाणीव होती. त्यांना टाळताही येईना. त्यांना नमस्कार करून मी त्यांना म्हटले, ‘ मी एम्. ए. त पहिल्या वर्गात पहिला आलो आहे. फर्ग्यूसन-मध्ये नोकरीची खटपट करीत आहे ’ पुणतांबेकर काहीच बोलले नाहीत. सुशीला मला लाभणार नाही या गोष्टीची मला फार खंत वाटू लागली.

पुण्याहून निघून मी हैदराबादेस आलो. माझे आईवडील तेथेच होते. माझे बंधू बिंदुमाधवराव यांनी एम्. ए. आणि लॉ या दोन्हींचा अभ्यास सोडून दिला होता. नाटकात कामे करण्याचा, विशेषतः स्त्रीपार्ट करण्याचा त्यांना नाद लागला होता. तबला वाजविण्याचे शिक्षण त्यांनी शास्तुरकर बुवाकडून घेतले होते. या कलेत त्यांनी चांगलीच प्रगती केली होती. ऑल सेंट्स स्कूल या मिशन शाळेत ते पार्ट टाईम शिक्षक म्हणून काम करू लागले होते. रात्री बेरात्री जागणे, गाणीबजावणी, नाटकातील कामे यांच्यातच त्यांचा वेळ जाऊ लागला होता. माझ्या वडिलांना या गोष्टींचे फार दुःख होई. माझ्या बंधूंचा अभ्यास सुरळितपणे चालावा म्हणून ते मुद्दाम पंढरपूर सोडून हैदराबादेस आले आणि राजा इंद्रकर्ण या जहागिरदारापाशी त्यांनी नोकरी पत्करली. पण माझ्या बंधूंना गाण्या-बजावण्याचा नाद लागल्यामुळे त्यांचा अभ्यास सुटला.

आमच्या घराची स्थिती अगदीच खालावली होती. तीत आणखी एका गोष्टीची भर पडली. गुलबर्ग्याला माझ्या वडिलांनी घर घेतले होते. घराचा एक भाग आम्ही भाड्याने दिला होता. माझे वडील व्यवहारात दक्ष असत. पण या सुमारास त्यांनी एक चूक केली. आम्हापैकी कुणालाच न कळविता ते चिन्मक्की रामराव नावाच्या मित्राला पाच हजारांसाठी म्हणून जामीन राहिले. जमानतीत त्यांनी आमचे घर लिहून दिले. रामरावाचे स्वतःचेही घर जमानतीत गुंतले होते. ठरल्यावेळी रामराव कोर्टात हजर झाले नाहीत. त्यांची जमानत जप्त झाली आणि कोर्टाचा निकाल त्यांच्याविरुद्ध लागला. आणि पाच हजार रुपये भरणे रामरावांना अशक्य झाल्यामुळे आमचे आणि त्यांचे अशी दोन घरे लिलावात निघाली. त्यावेळीं आई गुलबर्ग्याला होती. घरात माझी बहीण सीताबाई हिचे बाळंतपण होते. वडील त्यावेळी पंढरपूरला गेले होते. एकाएकी कोर्टाचे बेलिफ आणि इतर माणसे घरावर आली आणि आमच्या घराचा लिलाव पुकारू लागली. माझी आई हतबुद्ध झाली. हा काय प्रकार आहे याचा तिला

बोध होईना. ती बाहेरील ओट्यावर येऊन त्रागा करू लागली. घरात पुरुष मनुष्य कोणी नव्हते. आमचे घर लिलावात निघावे याचे गावातील लोकांना मोठे आश्चर्य वाटले. गावातील प्रतिष्ठित माणसे आमच्या घरी आली. त्यांनी कोर्टाच्या अधिकाऱ्यांशी चौकशी केली, तेव्हा त्यांना जमानतीच्या प्रकरणाचा उलगडा झाला. माझ्या वडिलांचे मित्र गोपाळराव बोरगावकर हे गुलबर्ग्याच्या सरस्वती बँकेचे डायरेक्टर होते. त्यांनी पाच हजार रुपये भरून आमचे आणि चिन्मकी रामराव यांचे अशी दोन्ही घरे आपल्या ताब्यात घेतली. दोन दिवसांनी माझे वडील पंढरपुराहून परत आले. गोपाळराव त्यांना म्हणाले, 'श्रीनिवासरावजी, तुम्ही काही काळजी करू नका. तुमच्यासाठीच ही दोन्ही घरे आम्ही आमच्या ताब्यात घेतली आहेत. तुम्ही तुमचे स्वतःचे घर खाजगीमध्ये विकून आमच्या बँकेचे पाच हजार रुपये देऊन टाका. आम्ही दोन्ही घरांवरील ताबा सोडून देतो. म्हणजे तुम्हांला रामरावाचे घर मिळेल." वडिलांनी गोपाळरावांच्या सांगण्याप्रमाणे केले. आमचे स्वतःचे टुमदार आणि प्रशस्त घर हातचे गेले. रामरावांचे घर लहान आणि गल्लीत होते. म्हणूनच पाच हजारांची भरती करण्यासाठी आम्हांला आमचे घर विकावे लागले. आमचे दुसरे घर (रामरावचे घेतलेले) लहान होते. ते आम्ही भाड्याने दिले. ते घरही चार पाच वर्षांपूर्वी आम्ही विकून टाकले. आता गुलबर्ग्यात आमचे काही नाही. फक्त गुलबर्ग्यापासून तीन मैलांवर बबलाद गावी आमचा एक मळा आहे.

माझी बहीण सीताबाई हिचे बाळंतपण आटोपून माझी आई हैदराबादेस आली. वडीलही हैदराबादेस आले. मला आमच्या घराबद्दलच्या भानगडी समजल्या. माझे वडील बंधू एम. ए. अगर लॉ पास करतील अशी वडिलांना काही आशा राहिली नाही. माझे धाकटे भाऊ गुरुमध्व, राघवेंद्र आणि बहीण सुशीला यांच्या शिक्षणाचे मलाच करणे भाग होते. माझ्या वडिलांची सारी भिस्त आता माझ्यावर होती. ते फार बोलत नसत. पण ते दुःखीकष्टी दिसू लागले.

हैदराबादेत एखाद्या कॉलेजात अगर उस्मानिया विद्यापीठात नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. उस्मानिया विद्यापीठाचे उपकुलगुरु रँग्लर काजी महंमद हुसेन यांना मी भेटलो. ते स्वतः पंजाबी होते. 'येथे जागा नाही. हिंदुस्थानात मिळेल. तेथे नोकरी करा' असा पोक्त सल्ला त्यांनी दिला. शिक्षण खात्याचे संचालक खान फदल महंमदखान (हेही पंजाबी होते.) यांना मी भेटण्यास गेलो. १९५३ मध्ये मी हैदराबादच्या शिक्षणखात्याचा संचालक होऊन त्यांच्या खुर्चीवर बसेन, अशी १९३२ मध्ये कल्पनाही नव्हती. त्यांनी

मला सांगितले, ' तुमच्या योग्यतेची जागा आमच्या खात्यात नाही. फार तर एकशे दहा रुपये पगाराची शिक्षकाची नोकरी मी तुम्हांला देऊ शकेन.' अर्थात ती पत्करणे मला शक्य नव्हते.

अलाहाबादेस मला एक वर्षासाठी रीसर्च स्कॉलरशिप निश्चितपणे मिळणार होती. मी जुलाइ महिन्यात हैदराबाद सोडले.

अलाहाबादेस जाताना मी वाटेत नागपूरला उतरलो. माझा मित्र अभ्यंकर हा त्यावेळी तेथे कोणत्या तरी शाळेत शिक्षक होता. नागपूरच्या सिटी कॉलेजात लेक्चररची जागा मिळते काय म्हणून मी चौकशी केली. पण सेन नावाच्या गृहस्थाची तेथे नेमणूक झाली असल्याचे मला कळले. तात्यासाहेब वझलवार यांचा सिटी कॉलेजशी संबंध असावा. कारण मी सिटी कॉलेजात गेलो असताना त्यांनी माझी चौकशी केली. दुपारचे जेवण मी त्यांच्याबरोबर घेतले. संध्याकाळी मी अभ्यंकराकडे उतरलो. त्याचे लग्न झाले होते. हे कसे काय जुळले म्हणून मी त्याला विचारले. तो अगदी सरळ आणि साधा, त्याने मला म्हटले ' आय यूज्ड टु थ्रो लाँग ग्लान्सस ॲट हर ' त्याचे हे उत्तर मला अद्याप आठवते.

दुसऱ्या दिवशी मी नागपूर सोडले. मी अलाहाबादेस परत होळकर वाड्यात दाखल झालो. युनिव्हर्सिटी सुरू झाल्याबरोबर मी रीसर्च स्कॉलरशिपसाठी अर्ज केला. तो मान्य होऊन मला दरमहा पन्नास रुपयांची स्कॉलरशिप सुरू झाली. संशोधनाला मी विषय घेतला होता ' हैदराबादची राज्यघटना आणि राज्य-व्यवस्था यांचा इतिहास-ॲडमिनिस्ट्रेटिव्ह आणि कॉन्स्टिट्युशनल हिस्टरी ऑफ हैदराबाद ' डॉक्टर बेनीप्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली माझे संशोधन सुरू झाले.

होळकर वाड्यात मी आणि मुंग्रे होतो. देशपांडे हे लॉच्या शेवटच्या वर्षा-साठी आले. त्यांचे लग्न झाले होते. येताना ते आपल्या पत्नीला घेऊन आले. होळकर वाड्याची इमारत मोठी होती. वाड्यातच त्यांनी आपले बिऱ्हाड थाटले. भागवतांना आग्र्याला नोकरी लागल्यामुळे ते तिकडे निघून गेले. अभ्यंकर आपली नागपूरची नोकरी सोडून पुन्हा रीसर्च स्कालर म्हणून अलाहा-बादेस आला. मुंग्रे हे एलएल बी.चा अभ्यास करू लागले.

हैदराबादच्या इतिहासाचे माझे संशोधन सुरू झाले. यानिमित्ताने मी अनेक इंग्रजी, उर्दू आणि फारसी ग्रंथ वाचून काढले. फावल्या वेळात मी माकिया-वेलीच्या प्रिन्सचे मराठी भाषांतर करू लागलो. कोसांबींच्या संबंधी आलेल्या अनुभवाने माझ्या मनात मोठीच जिद्द निर्माण झाली होती. त्यावर्षी मी माकिया-वेलीच्या वीस पंचवीस प्रकरणांचा मराठी अनुवाद केला. तो अनुवाद मी प्रकाशित करू शकलो नाही. पण मराठी अनुवाद करण्याची सवय मला त्या वेळे-

पासून लागली. त्यापूर्वी मराठीत मी लेखन केले नव्हते. पुढे मुंबईला आल्यानंतर गालिबचे समग्र उर्दू काव्य, फिर्दोसीच्या शहानाम्याच्या बारा हजार फारशी ओळी, तारीख दिल्कुशा, तहमासनामा इत्यादि अनेक फारशी-उर्दू ग्रंथांचे मराठी अगर इंग्रजी अनुवाद केले. तो मजकूर कमीत कमी पाच हजार पाने तरी भरेल. या माझ्या व्यासंगाचा पाया म्हणजे माकियावेलीच्या प्रिन्सचे भाषांतर मी सुरू केले तेव्हा घातला गेला असे म्हणता येईल. मराठी अनुवादाच्या या प्रयत्नामुळे मराठी लेखनासंबंधी माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

इ. स. १९३२ मध्ये माझा एका अतिशय बुद्धिमान विद्यार्थ्याशी परिचय झाला. गर्दे (आतां डॉक्टर गर्दे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ) हे नागपूरचे. १९३२ मध्ये बी. ए. होऊन ते राज्यशास्त्रात एम. ए. करण्यासाठी म्हणून अलाहाबादला आले. माझ्या आयुष्यात मला अनेक माणसे भेटली आहेत. पण गर्द्यांसारखी बुद्धिमान माणसे मला आढळली नाहीत. नागपूरला त्यांनी बी. ए. त पहिला वर्ग मिळविला होता. संस्कृत वाङ्मयावर त्यांचे चांगलेच प्रभुत्व होते. त्यांच्यामुळे संस्कृत नाटके आणि काव्ये यांच्याबद्दल मला चांगलीच माहिती मिळाली. त्या सुमारास त्यांनी संस्कृत नाटकातील विदुषक या विषयावर इंग्रजीत एक लेख लिहून प्रसिद्ध केला होता. त्या निबंधाची सर्वत्र वाहवा झाली. झाली. राजनीतिशास्त्रात त्यांनी लिहिलेला बेसिस ऑफ ओबीडियन्स हा निबंधही असाच चांगला उतरला होता. तो मला अद्याप आठवतो. गर्द्यांच्या बरोबर दोनचार तास म्हणजे काव्यशास्त्र-विनोद याची सतत झडणारी मैफिलच. त्यांनी पुढे राज्यशास्त्र आणि इंग्रजी या विषयात एम. ए. च्या पदव्या मिळविल्या. डॉक्टरेट (डिलिट). मिळविली आता ते पुणे विद्यापीठात राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत. गर्द्यांच्यामुळे मला नागपूरकडच्या अनेक साहित्यिकांविषयी बारीकसारीक अशी माहिती मिळाली. नेने, भवाळकर, ना. के. बेहरे, माडखोलकर, अप्रबुद्ध, य. खु. देशपांडे अशा अनेक साहित्यिकांची माहिती ते देत. डॉक्टर कोलते यांचे नाव मी प्रथम त्यांच्याकडूनच ऐकले.

गर्दे हॉस्टेलमध्ये राहत. पण अभ्यंकर आमच्या बरोबर होळकर वाड्यात राहू लागला. आर्थिक दृष्टीने माझी हलाखी संपली होती. स्कॉलरशिपचे पैसे येऊ लागताच मी मिसेस सुवीरादेवी शास्त्री यांचे पैसे फेडून टाकले. प्राध्यापक सिपाहीमलानी यांचे पैसे मी परत करू लागलो. तसे ते म्हणाले, ‘ मला पैसे नकोत. मी तुला मदत केली. तू समाजात कुणातरी होतकरू मुलांना पुढे आण म्हणजे माझे पैसे फिटले. ’ पुढे आयुष्यात मी तीन मुलांना माझ्या घरी जेवूखाऊ घालून त्यांच्या अभ्यासात मदत केली. त्यांपैकी एक एम. बी. बी. एस.

होऊन आर्मीत मेजर झाला आहे. दुसरा बी. कॉम. होऊन गुलबर्ग्याला नोकरी करीत आहे. आणि तिसरा डिप्लोमा मिळवून घाना देशात नोकरी करीत आहे. प्राध्यापक सिपाहीमलानींचे तीनशे रुपये मी अशा रीतीने फेडले.

‘ हॅव यू हॅड ए काइंडनेस शोन पास इट ऑन
इट वाज नॉट इंटेंडेड फॉर यू अलोन पास इट ऑन
लेट इट गो ट्रॅव्हलिंग डाउन दि ईयर्स
टु वाइप अवे अनदर्स टीयर्स
अंटिल इन हेवन दि डीड अपीयर्स
पास इट ऑन, पास इट ऑन ’

१९३२ ची दिवाळी मी अलाहाबादलाच घालविली.

मला वाटते, हिंदू मुस्लिम ऐक्याचा विचार करण्यासाठी अलाहाबादेस कान्फरन्स भरली ती याच सुमारास होय. प्रतिनिधींच्या बैठकी डॉक्टर कैलासनाथ काटजूंच्या घरी भरत. त्या प्रसंगी मी व्हालंटीयर म्हणून काम करीत होतो. या निमित्ताने आम्ही काटजूंच्या घरात मोकळेपणाने वावरत होतो. तेथे अनेक पुढारी आम्हांला जवळून पाहण्यास मिळाले. त्यांपैकी एकजण मला ओळखू आला नाही. सैल आणि आखूड धोतर, अंगात साधा शर्ट, डोक्याला पांढरी टोपी, खांद्यावर एक घोंगडी असा वेष पाहून मी माझ्याजवळ उभ्या असलेल्या एका मित्राला विचारले, ‘ कोण रे हा गबाळा गृहस्थ ? ’ माझा मित्र म्हणाला, ‘ अरे असे म्हणू नकोस, हे राजेंद्र प्रसाद आहेत. ’ मला अगदी ओशाळल्यासारखे झाले. १९५१ मधे मी औरंगाबादेस कलेक्टर असताना राष्ट्रपती म्हणून राजेंद्रप्रसाद औरंगाबादेस आले होते. दोन तीन दिवस मी त्यांच्या बरोबर होतो. औरंगजेबाचा दर्गा, पवनचक्की, वेरुळ, अजंठा ही स्थळे आम्ही त्यांना दाखविली. मला राहून राहून त्यांना अलाहाबादेस प्रथम पाहिले त्या प्रसंगाची आठवण येई.

यूनिटी कान्फरन्सचे उद्‌घाटन टाऊन हॉलमधे झाले. त्यानिमित्ताने मला किती तरी पाहण्यास मिळाले. अबुल्कलाम आजाद, मदन मोहन मालवीय, शौकत अली, जफर अलीखान, राजा नरेंद्रनाथ, भाई परमानंद, राजेंद्रप्रसाद, शेख अब्दुल्मजीद सिंधी, सीमाप्रांताचे मंत्री अताउल्ला, अरुणा आसफ अली, मिस्टर आसफअली, विजयराघवाचारियर, मुंजे, अणे, ही मंडळी पाहिल्याचे मला आठवते. समारोपाच्या भाषणात अबुल्कलाम आजादांचे उर्दू भाषण, मालवीयजींचे हिंदी भाषण, ही प्रभावी वाटली. अरुणा आसफअली उर्दूतून बोलल्या. त्यांची बहीण पौर्णिमा बॅनर्जी ही अलाहाबादेस राहात असे. ती नावाप्रमाणेच सुंदर

होती. पौर्णिमेचा चंद्रच जणू. तिला मी या कान्फरन्सच्या निमित्ताने प्रथमच पाहिली.

१९३२ डिसेंबरमधे बनारस युनिव्हर्सिटीत वक्तृत्वाच्या स्पर्धा झाल्या. अलाहाबादतर्फे मला पाठविण्यात आले. स्पर्धेसाठी अलीगडहून खोजा अहमद अब्बास (मुंबईतील सुप्रसिद्ध चित्रपट लेखक आणि उर्दू साहित्यिक) आल्याचे आठवते. बनारसच्या महिला कॉलेजातून माझी भावी पत्नी सुशीला पुणतांबेकर ही आली होती. तिचे इंग्रजी भाषण सर्वांना आवडले. या स्पर्धेत तिला एक सुवर्णपदक मिळाले. माझ्या भाषणाची वाहवा झाली. पण पदक बिदक मिळाले नाही. सुशीला त्या वर्षी इंटरला बसली होती. संध्याकाळच्या ॲटहोमला आम्ही हॉलमध्ये एकत्र बसलो होतो. पण तिच्याशी बोलण्याची मला संधी मिळाली नाही. बाबासाहेब पुणतांबेकर हे हॉलमध्ये आपल्या मुलीवर सारखे लक्ष ठेवीत फिरत. मला राहून राहून बॅरेट्स ऑफ विंपोल स्ट्रीटची आठवण येई. वक्तृत्वस्पर्धेत सरला देसाई, (आता इंग्रजीचे प्राध्यापक बानर्जी, मुंबई यांच्या पत्नी) यांनी भाग घेतल्याचे आठवते.

कार्यक्रमानंतर मी अलाहाबादेस परत आलो. नोकरी मिळविण्याची माझी खटपट चालू होती. वाल्टेरच्या आंध्र युनिव्हर्सिटीत राज्यशास्त्राच्या लेक्चररची जागा भरावयाची आहे म्हणून जाहिरात आली. मी तेथे अर्ज केला. हैदराबादेतील तहसीलदारी (मामलेदार) या जागेसाठी मी अर्ज पाठवून दिला. पुण्याला एस. पी. कॉलेज आणि फर्ग्यूसन कॉलेज येथेही मी अर्ज केले.

होळकरवाड्यातील आमचे जीवन नेहमीप्रमाणेच चालू होते. एकदा मी आणि अभ्यंकर हे पायी सहल करण्यास निघालो. ग्रँड ट्रंक रोडने आम्ही अकरा मैल गेलो. परत येण्यास रात्रीचे दहा वाजले. त्या दिवशी बावीस मैल चालणे झाले.

युनिव्हर्सिटीत सेमिनार होत. गद्र्यांनी आपला ‘ बेसिस ऑफ ओबीडियन्स ’ या विषयावरीस निबंध सेमिनारमधे वाचला. बारा जानेवारी १९३३ रोजी रामचंद्रपंत याने ‘ पॉलिटिक्स इन फार ईस्ट ’ हा निबंध वाचला. मी माकियावेलीवर निबंध तयार केला. तो फेब्रुवारी महिन्याच्या बैठकीत वाचावा असे ठरले. पण त्यापूर्वीच मी तीन फेब्रुवारी १९३३ रोजी अलाहाबाद सोडून हैदराबादची वाट धरली होती.

गेली पस्तीस वर्षे माझा माकियावेलीवरील निबंध माझ्या कागदपत्रांच्या पेटीत पडून आहे. तो निबंध वाचला गेला नाही आणि प्रकाशितही झाला नाही.

जैन हॉस्टेलच्या मॅगझिनमधे मात्र भारतीय संस्थानावरचा इंग्रजी लेख

फेब्रुवारी १९३३ मधे प्रसिद्ध झाला. माझ्या आयुष्यात प्रसिद्ध झालेला तो माझा पहिला लेख होय.

मी तहसीलदारीच्या जागेसाठी हैदराबाद राज्यात अर्ज केला होता. अर्जाचे मुद्रित फॉर्म्स माझ्या बंधूनी माझ्याकडे पाठविले होते. उर्दूचे ज्ञान असल्याचे पत्र, मेडिकल सर्टिफिकेट, व्हाईस चॅन्सेलरचे सर्टिफिकेट, असे अनेक कागद मला पूर्ण करावे लागले. गंगानाथ झा हे त्यावेळीं व्हाइस चॅन्सेलरच्या पदावरून निवृत्त झाले होते. त्यांच्या जागी इक्बाल नारायण गुर्टू हे व्हाइस चॅन्सेलर होऊन आले. त्यांनी मला सर्टिफिकेट दिले. पण ते मला म्हणाले, 'सेतु-माधवराव, तुमची करीअर इतकी चांगली. तुम्ही देशी संस्थानात नोकरी पत्करावी हे मला आवडत नाही.' मला तरी कुठे आवडत होते? काय करणार? मी गप्प झालो. मेडिकल सर्टिफिकेट घेण्यासाठी मी सिव्हिल सर्जनकडे गेलो. तो यूरोपियन होता. मला वाटले, तो माझी कसून चौकशी करील. पण कसचे काय, त्याने मला विचारले, 'फीचे पैसे आणले आहेत ना?' मी त्याच्या समोर पंधरा रुपये ठेवले. आणि म्हटले, 'मी हैदराबाद राज्यात नोकरीसाठी अर्ज केला आहे. त्यासाठी मला मेडिकल सर्टिफिकेट हवे आहे.' तो म्हणाला, 'ए नेटिव्ह स्टेट, मग तुम्हांला तपासायची जरूर काय? तुम्ही बरे आहात ना?' मला वाटले माझी खुशाली विचारीत आहे. मी म्हटले, 'मी खुशाल आहे.' तो म्हणाला, 'त्या अर्थाने नाही मी विचारीत. काही आजारबिजार? मी म्हटले काही नाही. मी धडधाकट आहे.' त्याने अधिक चौकशी न करता मला सर्टिफिकेट दिले.

मी हैदराबादेला अर्ज पाठवून दिला आणि इंटर्व्यूची काय तारीख ठरणार याची वाट पाहात बसलो. योगायोगाने माझे प्राध्यापक डॉक्टर बेनीप्रसाद मला म्हणाले, 'तुम्ही हैदराबादच्या इतिहासाचे संशोधन करीत आहात. एकदा हैदराबादला जाऊन या. तेथील दप्तरखान्यात जुनी साधने काय मिळतात ती पाहा.' मी म्हटले 'ठीक आहे. लौकरच मी हैदराबादला जातो. तेथे एक दोन महिने काम करीन.' मी डॉक्टर बेनीप्रसाद आणि व्हाइस चॅन्सलर यांच्याकडून उस्मानिया विद्यापीठाचे उपकुलगुरू, स्टेट लायब्ररीचे संचालक, दप्तरखान्याचे संचालक, यांच्या नावे पत्रे घेतली. फेब्रुवारी महिन्यातच हैदराबादला इंटर्व्यूची तारीख ठरली होती.

तीन फेब्रुवारी १९३३ रोजी सकाळी मी अलाहाबाद सोडले. स्टेशनवर गर्दे, मुंग्रे, अभ्यंकर, देशपांडे हे [मला निरोप देण्यासाठी आले होते. अलाहाबाद सोडताना मला अतिशय वाईट वाटले. आपले विद्यार्थीजीवन संपत आले, याची

मनाला मोठी खुरखुर लागली.

त्यानंतर गेल्या पस्तीस वर्षांत मला अलाहाबादेस जाणे झाले नाही. माझ्या मित्रांपैकी भागवत हे इंदूरच्या होळकर कॉलेजमध्ये प्राध्यापक आणि नंतर प्राचार्य झाले. आता ते उज्जयिनी विद्यापीठात रसायन संशोधन केंद्राचे प्रमुख आहेत. मुंग्रे ग्वाल्हेरला वकिली करतात. भागवतांची एकदोन वेळा गाठ पडली. मुंग्रे गेल्या वर्षी मुंबईला आले तेव्हा भेटून गेले. देशपांडे मराठवाड्यात पब्लिक प्रॉसिक्यूटर आहेत. अभ्यंकर प्रथम नागपूरला आर. के. पाटील यांच्यापाशी होते. तेथून ते दिल्लीच्या सचिवालयात गेले. टोकियो आणि जाकार्ता येथील भारतीय वकिलातीत त्यांनी काही दिवस काम केले. अभ्यंकरांची मुलगी गर्द्यांच्या मुलाला दिली असून मुंबईला तिचे लग्न झाले. त्या प्रसंगी मी, गर्दे आणि अभ्यंकर हे तिघे एकत्र आलो. जुन्या आठवणी ताज्या झाल्या. अभ्यंकरांचा जावई इंजीनियर असून मुलगी आय. ए. एस. झाली आहे. ती सध्या दिल्लीला ग्याझेटीयरची एक्झीक्यूटिव एडिटर म्हणून काम करीत आहे. अशी कर्तबगार मुले-मुली, आणि तीही आपल्या मित्राची पाहून मोठे कौतुक वाटले. अभ्यंकर हे दिल्लीला डेप्युटी सेक्रेटरी म्हणून काम करीत असताना चार पाच वर्षांपूर्वी वारले. मला एकदा ते म्हणाले होते, 'सेतुमाधवराव, रिटायर झाल्यावर पेण किंवा पनवेल येथे घर बांधून निवांतपणे राहावे असा बेत आहे' ती इच्छा पूर्ण होण्याच्या आधीच त्यांना देवाघरचे बोलावणे आले.

या मित्रांच्या सहवासाने माझे जीवन समृद्ध झाले.

८

वरंगल आणि रायचूर
१९३३ ते १९३४

अलाहाबादहून निघून मी दुसऱ्या दिवशी नागपूरला दिवसभर गद्यांच्या वडिलांकडे होतो. ते न्यायखात्यात अधिकारी होते. काही वर्षांपूर्वी सेवानिवृत्त होऊन ते नागपुरास राहात होते. संध्याकाळच्या गाडीने नागपुराहून निघून मी दुसऱ्या दिवशी हैदराबादेस आलो.

फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यात आमचा इंटर्व्ह्यू झाला. १९३३ मध्ये हैदराबादेत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागांवर युरोपियन अधिकारी बसविण्यात आले होते. कर्नल ट्रेंच हे महसूल मंत्री, टास्टकर आय. सी. एस. हे महसूल खात्याचे सचिव होते. प्रधान मंत्री (त्यांना कार्यकारी मंडळाचे–एक्झीक्युटिव कौन्सिल–अध्यक्ष म्हणत) महाराजा सर किशन प्रसाद हे पंधरा लाखांचे जहागिरदार होते. सर अकबर हैदरी हे वित्तमंत्री होते. पोलीस खात्याचा प्रमुख आर्मस्ट्रांग हा युरोपियन होता.

हैदराबाद राज्यातील नोकर वर्गात मुसलमान बहुसंख्य असत. राज्यातील शिपायापासून पंतप्रधानापर्यंतच्या एक लाख चाळीस हजार जागांपैकी मुसलमान नोकरांची संख्या

एक लाख चोवीस हजार होती. हिंदूंच्या वाट्याला फक्त सोळा हजार जागा होत्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांत हिंदू क्वचितच दिसून येत. या अन्यायाबद्दल केशवराव कोरटकर, काशिनाथराव वैद्य, धर्मवीर वामनराव नाईक इत्यादी पुढाऱ्यांनी ओरड सुरू केली. हैदराबाद सिव्हिल सर्विसमधून निवडलेल्यांना डेप्युटी कलेक्टरच्या जागेपासून सुरू करीत. सिव्हिल सर्वीसच्या परीक्षांना सर्वांना बसू देत. नसत. परीक्षेला बसण्यास पात्र अशा उमेदवारांची निवड करीत. मगच त्यांना परीक्षेला बसता येई. एका रिकाम्या जागेसाठी पाच उमेदवारांना परीक्षेला बसू देत. उमेदवारांत मुसलमानांची वर्णी लावण्यात येई. त्यामुळे हैदराबाद सिव्हिल सर्व्हिस डेप्युटी कलेक्टर, कलेक्टर इत्यादी जागांतून मुसलमान अधिकारी शंभर तर हिंदू अधिकारी दहा असे प्रमाण असे. डेप्युटी कलेक्टरच्या खालची सनदी नोकराची जागा म्हणजे तहसीलदाराची (मामलेदार, पगार दोनशे ते चारशे) असे. हैदराबाद राज्यातील खेडोपाड्यांतील हजारो कुळकर्णी, पाटील इत्यादि वतनदारांना सरकारी नोकर म्हणून जमेत धरून हैदराबाद राज्यातील हिंदू नोकरवर्गाची संख्या काही कमी नाही असे भासविण्याचा सरकारने प्रयत्न केला. पण त्यात यश आले नाही. इंग्रजांनी जोर धरला की काही प्रमाणात का होईना हिंदूंचे समाधान झाले पाहिजे. हैदराबाद राज्यातील कित्येक मामलेदारांना आणि काही कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर यांना इंग्रजी अजीबात समजत नसे. त्यामुळे तहसीलदारीच्या जागांसाठी पदवीधरांच्या रास्त नेमणुका करण्याचे सरकारने ठरविले. त्यातसुद्धा चार मुसलमान तर एक हिंदू असे प्रमाण ठरविण्यात आले. आमचा इंटरव्ह्यू झाला. मी नेमला जाईन अशी मला अगदी आशा नव्हती. तसा मी विशेष उत्सुकही नव्हतो. मी आपले संशोधनाचे काम चालू ठेवले.

मी सरकारी दवाखान्याचे संचालक खुर्शीद अली यांना भेटलो. हैद्राबादच्या गतेतिहासाचे मी संशोधन करीत आहे हे पाहून त्यांनी चौथाई आणि सरदेशमुखी या प्रश्नासंबंधी मला छेडले. या बाबींना ते ब्लॅकमेल म्हणू लागले. अर्थातच माझा आणि त्यांचा वाद झाला. आपल्याला त्यांच्या दप्तरखान्यांत संशोधनाच्या सवलती मिळतील की नाही याबद्दल मला शंका वाटू लागली.

माझा अभ्यास चालूच होता. इतक्यात मार्च १९३३ च्या पहिल्या आठवड्यात तहसीलदारीसाठी माझी निवड झाल्याचे मला कळविण्यात आले.

या प्रसंगाने मला विलक्षण धक्का बसला. माझे संशोधन, माझे पहिल्या वर्गाचे यश, प्राध्यापकाच्या जागेची इच्छा याचा एका दमात निकाल लागला. पण माझ्या नेमणुकीने माझ्या आई-वडिलांना अतिशय आनंद झाला. वडिलांना अनेकदा हंगामी मामलेदारीची संधी मिळाली होती. पण कायम मामलेदार असे

ते कधीच झाले नाहीत. आपल्या घराण्यातील हा पहिला सनदी नोकर म्हणून त्यांना माझ्याविषयी कोण कौतुक वाटले. आईचा आनंद तर गगनात मावेना. माझे भाऊ आणि बहीण फाटके कपडे घालून शाळेत जात. त्यांना अंथरुणे पांघरुणे नव्हती. त्यांच्या खाण्यापिण्याची आबाळ होई. आता आमचे वाईट दिवस संपले असे सर्वांना वाटले.

माझी आई म्हणते, ' मला एका रात्री स्वप्न पडले. आमच्या घरात एक आठ वर्षांची गोरीपान आणि देखणी पोरगी आली. ती दागिन्यांनी मढून निघाली होती. मला पाहून ती म्हणाली, 'आता मी तुमच्या घरात राहण्यास आले आहे.' मला जाग आली. मी ओळखले की लक्ष्मीनें पुन्हा आपल्या घरात प्रवेश केला आहे. '

नऊ मार्च १९३३ रोजी मी कामावर रुजू झालो. कामावर रुजू झाल्यावर आणखी एक दुःख देणारी घोष्ट घडून आली. नेमक्या आठ दिवसांनी वाल्टेरच्या आंध्र युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर डॉक्टर राधाकृष्णन यांची तार आली. तीत म्हटले होते ' राज्यशास्त्रात लेक्चरर म्हणून तुमची या युनिव्हर्सिटीत नेमणूक झाली आहे. तेवीस जूनपर्यंत तुम्ही रुजू व्हावे. ' हीच तार आठ दिवसांपूर्वी आली असती तर माझे सगळे जीवन बदलून गेले असते. पण बनारस अलाहाबादमध्ये सात वर्षे काढून, इतिहास आणि राज्यशास्त्र यांत पहिल्या वर्गात पहिला येऊन, राष्ट्रीय चळवळीचे जवळून अनुभव घेऊन, इतिहास, राज्यशास्त्र, साहित्य यांवर इंग्रजीत सुमारे सहाशे पुस्तके आणि मराठीत तीनशे पुस्तके वाचून हैद्राबादसारख्या जातीय, सरंजामी आणि बुरसलेल्या संस्थानात मामलेदार म्हणून येऊन पडायचे माझ्या नशिबी होते. ललाटावरील रेषा दगडासारखी, ती कोण मिटवू शकेल ?

पाषाणरेखा समविधि मेट सकता कौन है ? ।

मी तहसीलदार झाल्याबरोबर चांगल्या आणि प्रतिष्ठित घराण्यातील मुली सांगून येऊ लागल्या. त्यांपैकी काही सुंदर आणि देखण्या होत्या. पण मला ओढ लागली होती सुशीला पुणतांबेकरची. ती इंटर पास झाली होती. मी अण्णासाहेब खापर्ड्यांना पत्र लिहिले की, आपण आता पुणतांबेकरांना सांगून शेवटचा प्रयत्न करावा. येथे मुली सांगून येऊ लागल्या आहेत. आई-वडिलांचे प्रेशर मी फार काळ थोपवून धरू शकणार नाही. पुणतांबेकरांचा या खेपेसही नकार आला तर सुशीला आपल्या नशिबी नाही असे समजेन. '

मोजणीच्या फील्डट्रेनिंगसाठी मला सर्व्हे पार्टीबरोबर वरंगलजवळच्या एका खेड्यात पाठविण्यात आले. असिस्टंट कमिशनर बागलकोट गोविंदराव हे

आमच्या पार्टीचे मुख्य होते. हैदराबाद राज्यात प्रथम सुधारणा घडवून आणल्या त्या सालारजंग (१८५३–१८८३) या पंतप्रधानाने. त्याने जिल्ह्यांची पुनर्रचना केली. नवीन नवीन खाती स्थापन केली. परप्रांतांतून त्याने शेकडो माणसे हैदराबाद राज्यात आणली. या कारणाने हैदराबादच्या सर्व्हे सेटलमेंट खात्यात मुंबई प्रांतातून शेकडो माणसे कामाला लागली. त्यामुळे अनेक मराठी शब्द त्या खात्याच्या उर्दू पत्रव्यवहारात वापरण्यात येऊ लागले.

ट्रेनिंग घेत असतानाही माझे वाचनाचे व्यसन सुटले नाही. खेड्यावर जाताना मी नटेसन यांनी प्रकाशित केलेला गोपाळ कृष्ण गोखले यांच्या व्याख्यानांचा संग्रह बरोबर घेऊन गेलो. अकराशे पानांचा तो ग्रंथ आहे. त्याची ओळ न ओळ मी वाचून काढली. तेव्हापासून गोखल्यांच्या व्यक्तित्वाचा खोल ठसा माझ्या मनावर उमटला आहे.

आंध्र प्रांतात खम्मम हे महत्त्वाचे ठिकाण आहे. त्याच्या जवळच इर्लापुडी नावाचे जहागीर गाव आहे. त्या गावची मोजणी करण्यासाठी आम्ही गेलो. गावाचा एक जहागिरदार त्यात भागीदार. त्याचे उत्पन्न किती असणार! पण जहागिरदार आणि त्याचे भागीदार हे आपल्या बरोबर माणसे घेऊन येत आणि ओळख करून देत. हे आमचे मोतेमद (सेक्रेटरी), हे आमचे मोहतमीम जंगलात (फॉरेस्ट सुपरिटेंडेंट). मला मोठी गंमत वाटली. मी फॉरेस्ट सुपरिंटेंडेंटना विचारले, ' काय हो तुम्हांला पगार काय मिळतो? ' ते म्हणाले, ' वर्षाला पन्नास रुपये आणि जळणाची लाकडे फुकट! '

जहागिरदार महबूब अलीखान यांनी आमच्यासाठी शिकारीचा कार्यक्रम ठरविला होता. एप्रिल (१९३३). माझ्या डायरीत नोंद अशी आहे :

' या गावाच्या आसपास जंगल फार आहे. आल्याच्या दुसऱ्या दिवशी आम्ही शिकारीला गेलो होतो. जंगलात दोन ठिकाणी व्यवस्था करण्यात आली होती. जेथे वाघ येईल या आशेने आम्ही माचवा बांधला होता तेथे आम्ही जाऊ शकलो नाही. पण हरिणांची किंवा अस्वलांची शिकार करण्याकरिता चांगली व्यवस्था करण्यात आली होती...हाके लोकांनी हाका मारून जंगल उठविले. वातावरण इतके शांत होते की माझी छाती धडधड उडत असलेली मला स्पष्टपणे ऐकू येत होती. मधे आम्हांला नकळत एक दोन श्वापदे निसटून गेली. काही वेळाने तीन चार हरिणे थबकत थबकत आली. ' एक काळवीट मोठ्या डौलाने चालला होता. दोनचार हरिणे (माद्या) त्याच्या मागे मागे होत्या. त्या काळविटाचे काय वर्णन करावे! काळवीट आणि हरिणी पाहून मला कांचनमृगाची आठवण झाली. मी बंदूक उचलली. आम्ही झाडाआड लपलो

होतो. तें हरीण कुटुंब आमच्या दिशेनें पाहात होतें. माझ्याबरोबरचा शिकारी म्हणाला, 'साब गोली चलाइये' मी नेम धरला. हरिणांचे भोळे आणि निष्पाप डोळे माझ्याकडे लागले होतें. एकाएकी मला पोटात भडभडून आले. या काळविटांची आणि त्यांच्याबरोबर बागडणाऱ्या हरिणींची हत्या मी का करावी ? प्रेमीजनांची ताटातूट करण्याचा मला काय अधिकार होता. नियतीनें अशीच शिक्षा आपल्याला केली तर. कल्पांतापर्यंत तुला समाधान न लाभो असा हरिणांनी शाप दिला तर. मी बंदूक खाली ठेवली. पुढे नोकरीत असताना मी बंदूक उडविण्याची प्रॅक्टीस नेहमी करी. पण आयुष्यात मी पुन्हा म्हणून शिकारीच्या वाटेला गेलो नाही.

१९३३ च्या मे महिन्यात मी हैदराबादेस परत आलो. तो काय आश्चर्य, अण्णासाहेब खापर्ड्यांचे पत्र आले होतें. तुमच्या पत्रानें माझे अंतःकरण पिळवटून गेलें असे त्यांनी लिहिले. त्यांनी पुणतांबेकरांपाशी माझ्याबद्दल अतिशय गळ घातली. माझ्याबद्दल विचार करण्यास पुणतांबेकर कबूल झाले. अण्णासाहेबांनी मला माझी पत्रिका पाठवून देण्यासाठी सांगितले.

मला मंगळ आहे. सुशीलाला मंगळ नसेल तर लग्न जुळणार नव्हतें. माझ्यापाशी दोन पत्रिका होत्या. एक निलंग्याला माझ्या जन्माच्या वेळी तयार केलेली. ती पत्रिका चुकीची होती. पण तीत मला मंगळ नव्हता. यानंतर मी खरी पत्रिका तयार करवून घेतली होती. तीत मंगळ होता. मी मुद्दामच चुकीची आणि मंगळ नसलेली पत्रिका पाठवून दिली. आठ दिवसांतच बाबासाहेब पुणतांबेकरांचे पत्र आले की आमच्या मुलीला मंगळ आहे आणि तुम्हांला तर मंगळ नाही. मी ताबडतोब उत्तर पाठविलें की 'माझा जन्म १९१० मध्ये सत्तावीस ऑगष्ट रोजी दुपारी तीन वाजून पंचावन्न मिनिटांनी झाला आहे, मी पाठविलेली पत्रिका खेड्यात तयार झाली. ती चुकीची असू शकतें. आपण पुण्याला पत्रिका तयार करवून घ्यावी.' खऱ्या पत्रिकेत मंगळ होताच आणि तें मला माहीत होतें. पत्रिका जुळतें म्हटल्याबरोबर बाबासाहेब पुणतांबेकर हैदराबादेस आले. आणि एका बैठकीतच लग्नाचा बेत कायम झाला.

पंधरा जून १९३३ ची माझ्या डायरीतील अशी नोंद आहे :

'अत्यंत आनंदाची आणि आश्चर्याची गोष्ट आहे. हे लग्न जुळून आले आहे. साखरपुडा या पंधरवड्यात होईल. सुशीला आता माझी. आय ॲम इन हेवन नौ.'

माझ्या मनासारखी पत्नी मला लाभल्यामुळे माझे जीवन बदलून गेले. मनासारखी नोकरी नाही म्हणून जी खंत होती तिचा मला विसर पडला. लग्न

तीन डिसेंबर १९३३ रोजी पंढरपूर मुक्कामी करण्याचे ठरले. त्या दिवसाची चातकाप्रमाणे वाट पाहात मी सर्व्हे सेटलमेंटच्या ट्रेनिंगमधे पुन्हा खेड्यावर निघून गेलो.

इकडे माझे लग्न ठरले, त्याच सुमारास माझा पहिला मराठी लेख प्रसिद्ध झाला. माझ्या पत्रिकेत सप्तमस्थानी शुक्र आहे. नवमस्थानी बुध आणि गुरु आहेत. बायको चांगली मिळेल. तिच्यामुळे तुम्ही साहित्यसेवेकडे वळाल असे भविष्य आमच्या ज्योतिष्यांनी सांगितले. गेल्या पस्तीस वर्षांत माझी साहित्यसेवा अखंड चालू आहे. चोवीस मराठी आणि आठ इंग्रजी पुस्तके मी लिहिली आहेत. ही सगळी स्फूर्ती मला माझ्या पत्नीकडून मिळाली अशी माझी श्रद्धा आहे. निजामी राजवटीतील पंधरा वर्षांचे कष्टमय जीवन मी धीराने सहन केले ते केवळ तिच्यामुळे होय.

१९३३ च्या नऊ मार्च रोजी माझी तहसीलदार (मामलेदार) म्हणून नेमणूक झाल्यावर मोजणी खात्याचे ट्रेनिंग घेण्यासाठी मला वरंगल जिल्ह्यातील खेड्यापाड्यांतून हिंडावे लागले. जहागिरीच्या खेड्यांतून मोजणीचे आणि धाराबंदीचे काम सुरू होते. मोजणीदाराला क्लासर म्हणत. खेड्यांत राहून आम्हांला मोजणीदाराच्या हाताखाली काम शिकावे लागे. जमिनीची मोजणीची पद्धत, जमीन कोणत्या प्रतीची आहे याची शहानिशा, जमिनीवर सारा किती आकारण्यात यावा यासंबंधीचे नियम इत्यादी गोष्टींचे आम्हांला चांगले ट्रेनिंग मिळाले. मला ट्रेनिंग देणारा क्लासर, अनंत रामचंद्र हा एक सज्जन माणूस होता. तो आपल्या बायकोला घेऊन खेड्यात राहिला होता. मंडळी मोठी अगत्यशील होती. सकाळी उठून मी क्लासरबरोबर शेतावर जाई. मोजणीचे काम बारा एक वाजेपर्यंत चालू असे. तेथून परत आल्यावर जेवण, थोडी विश्रांती आणि नंतर गोखल्यांच्या भाषणांचा (कलेक्टेड स्पीचेस ऑफ गोखले) अभ्यास, असा माझा कार्यक्रम असे. खेड्यातील बौद्धिक जीवन ते काय असणार? आठ आठ दिवस मला वर्तमानपत्रे पाहायला मिळत नसत. वरंगलला जावे तो कुठे 'हिंदू' या दैनिकाचा एखादा अंक हाती लागावयाचा. माझ्या वर्तमानपत्राच्या वेडाचे आमच्या क्लासरला मोठे कौतुक वाटे. एकदा तो वरंगलला जाऊन आला. तेथून आल्यावर तो मला म्हणाला 'साहेब, गोलमेज परिषद सुरू झाली. वर्तमानपत्रात मी पाहिले.' मी म्हटले, 'अनंत रामचंद्र, गोलमेज परिषद तीन वर्षांपूर्वी भरली. आता ती कशी सुरू होणार?' तो म्हणाला 'हे वर्तमानपत्र पाहा' मी तो कागद हातात घेऊन पाहिला. तो दोन वर्षांपूर्वीचा जुना अंक होता. मी म्हटले, 'अहो हा तर जुना अंक आहे. हा तुम्हांला कुठे

मिळाला ? ' तो म्हणाला, ' मी वरंगलला कापड खरेदी केले. ते या वर्तमानपत्रात गुंडाळून मला दुकानदाराने दिले. मी म्हटले चला, आपल्या साहेबांना वर्तमानपत्राची आवड आहे त्यांना नेऊन द्यावे. अंक जुना असला म्हणून काय झाले. वर्तमानपत्र तर आहे ना ' यावर मी काय उत्तर देणार ? मी कपाळावर हात मारून घेतला.

अनंत रामचंद्र हा माझ्याप्रमाणेच माध्वसंप्रदायी वैष्णव होता. वैष्णवांच्या मते विष्णू हा परमात्मा. त्याचे दोन निष्ठावान सेवक म्हणजे वायू आणि ब्रह्म. वायूनेंच पुढे मारुती, भीम आणि मध्वाचार्य असे अवतार धारण केले. अनंत रामचंद्र ही गोष्ट समजावून देताना मला म्हणाला, ' साहेब, आपला विष्णू म्हणजे कसा, आपले नाजिम बंदोबस्त (मोजणी खात्याचे संचालक) जहांगीरजी बोमनजी मेहता आहेत तसा आणि वायू आणि ब्रह्म हे कसे, तर आपले नायब नाजिम (उपसंचालक) मुइनुद्दीन आणि गुलाम महंमद आहेत ना तसे. ' ह्या उपमा ऐकून मी थक्क झालो.

ट्रेनिंग आटोपण्यापूर्वीच माझे लग्न ठरले. जूनच्या अखेरीस मी मोजणी-खात्याच्या ऑफिस ट्रेनिंगसाठी हैद्राबादेस परत आलो. हैद्राबादेस माझे बंधू बिंदू माधवराव आणि माझी वहिनी सुभद्राबाई हे राहात होते. तीन महिनेपर्यंत ते घर चालविण्याची पूर्ण जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. मला प्रोबेशनर अलाउन्स म्हणून महिन्याला शंभर रुपये मिळत. तेवढ्यात मला सगळा खर्च भागवावा लागे. या सुमारास माझे आईवडील पुण्याला जाऊन साखरपुडा करून आले. त्याचा नव्वद रुपये खर्च आला. ते कर्ज मी तीस तीस रुपये असे तीन हप्त्यांनी फेडले.

मोजणी खात्याचे ऑफिस ट्रेनिंग जूनपासून सप्टेंबर अखेरपर्यंत चालले. या ट्रेनिंगसाठी पंचवीस तीस अधिकारी आले होते. त्यांत दोन डेप्युटी कलेक्टर (त्यांना दुय्यम तालुकदार म्हणत), दहाबारा तहसीलदार (मामलेदार) आणि बंदोबस्त (मोजणी) खात्यातील काही अधिकारी असत. वरील अधिकाऱ्यांत बरेचजण ग्रॅज्युएट होते. पण काहींना इंग्रजी अजिबात येत नसे. आम्हांला सर्व्हे-सेटलमेंट इत्यादी निरनिराळ्या विषयांवर मोजणी खात्यातील अधिकारी मंडळी लेक्चर्स देत. क्याडस्ट्रल सर्व्हेवरील लेक्चर्समध्ये इंग्रजी शब्द बरेच येत. डेप्युटी कलेक्टर वलीहसन यांना इंग्रजी मुळीच येत नसे. ही गोष्ट मला माहीत नव्हती. वली हसन र्‍यांग्लर परांजप्यांप्रमाणे आकडेदार मिशा राखीत. ते गोरेपान, उंच आणि धिप्पाड होते. सर्व्हेवरील लेक्चर्स ऐकून ते अध्यापकाला गंभीरपणे म्हणाले, " अच्छा ये तो बताइये. एंगल (कोन) किसको कहते है ? " म्हणजे रामायण

ऐकून सीता रामाची कोण असे विचारण्यासारखे झाले. आम्ही थक्कच झालो.

लेक्चर्सच्या आधी आणि लेक्चर्स संपल्यानंतर आम्हा मंडळींच्या गप्पा चालत. सनाउल्ला हा अलीगडचा पदवीधर आमच्या बरोबर तहसीलदार म्हणून लागला होता. तो मोठा विनोदी होता. त्याच्या गप्पांमुळे मैफिलीला मोठा रंग भरत असे. सनाउल्ला हा पुढे मोठा शिकारी म्हणून प्रसिद्धी पावला. आपल्या आयुष्यात त्याने बावीस वाघ मारले. मोठा धाडसी शिकारी. आमच्या त्या बैठकीतील कित्येक अधिकारी अद्याप आठवतात. वली हसन हा पुढे कलेक्टर होऊन सेवानिवृत्त झाला. सज्जन माणूस म्हणून त्याने कीर्ती मिळविली. दुसरे डेप्युटी कलेक्टर हे पोलीस ॲक्शनच्या वेळी एका विभागाचे कमिशनर (त्यांना सुभेदार म्हणत) होते. रजाकार चळवळीशी ते पूर्णपणे समरस झाले होते. होमगार्डच्या नावाखाली त्यांनी फक्त मुसलमान स्वयंसेवकाचे पथक उभारले आणि हाताखालचा कलेक्टर आपल्या म्हणण्यासारखे वागत नाही म्हणून त्यांनी पंतप्रधान लायक अली याला सांगून त्या कलेक्टरची उचलबांगडी करविली. भारतीय फौजा शहरावर चाल करून येत आहेत हे पाहून या कमिशनरांनी काय केले असावे ? दिवसभर ते मुसलमान संतांच्या कबरीवर जाऊन करुणा भाकीत. पण ती पुण्याई त्यांच्या उपयोगी पडली नाही. भारतीय फौजांनी शहराचा ताबा घेतला आणि कमिशनरांनी शहर सोडून हैदराबादची वाट धरली. पुढे त्यांच्या चौकशीचे धिंडवडे निघून मोठ्या मुष्किलीने त्यांना पेन्शनीवर सेवानिवृत्त करण्यात आले.

आमच्या बरोबर अब्बास अश्रफ सईद नावाच्या पदवीधराची तहसीलदार म्हणून निवड झाली होती.

त्याने आपले ट्रेनिंग कसेबसे संपविले आणि तो कामावर रुजू झाला. पण तहसीलदारीचे काम त्याला झेपेना. तो रजा न घेताच आपल्या तालुक्याच्या ठिकाणाहून हैदराबादेस पळून आला. नंतर त्याने आपल्या जागेचा राजीनामा दिला. आणि पुढील शिक्षणासाठी तो इंग्लंडला निघून गेला. तेथे त्याने लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्समधून पदवी घेतली. हिंदुस्थानात परत आल्यावर त्याला दिल्लीच्या केंद्रीय सरकारात नोकरी मिळाली. तेथे तो १९४७ पर्यंत होता. देशाची वाटणी झाल्यानंतर तो पाकिस्तानात गेला. तेथे त्याची मोठ्या हुद्यावर नेमणूक झाली. पण लाचलुचपतीचे गंभीर आरोप त्याच्यावर ठेवण्यात आले आणि आयूबखानांनी त्याला घरी बसविले. अब्बास अश्रफने कराचीला अनेक घरे बांधली आणि सपाटून पैसा कमविला. सरकारी चौकशीत या सर्व गोष्टी बाहेर पडल्या. आज तो रंक होऊन पाकिस्तानात निस्तेज जिणे जगत आहे.

आणखी एक तहसीलदार अब्दुल गफूर नावाचा होता. पोलीस ॲक्शन नंतर त्याच्यावर लाचलुचपत घेतल्याचा आरोप आला आणि त्यालाही घरी बसविण्यात आले. आमच्याबरोबर ट्रेनिंग घेणाऱ्या मंडळीपैकी निम्मे तरी पुढे लाचलुचपतीला किंवा रजाकारांशी समरस होण्याच्या मोहाला बळी पडले.

ट्रेनिंगमध्ये असताना लाचखाऊपणाच्या अनेक गोष्टी माझ्या कानावर पडत. एक गोष्ट ऐकून तर मी थक्कच झालो. एक तहसीलदार महबूबनगर जिल्ह्यातील एका तालुक्यावर होते. ते सपाटून पैसे खात. याबद्दलच्या तक्रारी वेळोवेळी वरिष्ठांकडे जात याची जाणीव तहसीलदारांना झाली. एकदा त्यांच्या मुलीचे लग्न निघाले त्यासाठी त्यांनी लोकांपाशी पैशाची मागणी केली. पण पैसे आणून देणाऱ्यांना त्यांनी सांगितले की अमक्या अमक्या दिवशी गावाबाहेरच्या मारुतीच्या देवळात येऊन तुम्ही मारुतीसमोर पैसे ठेवा. मी ते गोळा करीन. नेमलेल्या दिवशी तहसीलदार साहेब देवळात जाऊन मारुतीच्यासमोर बसले. त्यांनी आपल्या अंगावरचे कपडे काढून टाकले होते. ते पूर्णपणे नग्न बनले होते. लोक रुपयांची पिशवी घेऊन देवळात जात. नागव्या तहसीलदारांना पाहून संकोचून जात आणि पिशवी तेथेच टाकून लगबगीने बाहेर निघून येत. तहसीलदारांनी अशा रीतीने हजारो रुपये गोळा केले आणि आपल्या मुलीचे लग्न मोठ्या थाटाने केले.

तहसीलदारांच्या विरुद्ध वरिष्ठाकडे तक्रारी गेल्या. चौकशी सुरू झाली. तहसीलदारांनी चौकशीच्या उत्तरात लिहिले, " माझ्यावरील लाचलुचपतीचा आरोप साफ खोटा आहे. माझ्या वाइटावर असलेल्यांनी माझ्यावर घाणेरडे आरोप केले आहेत. मी मुसलमान मनुष्य. पैसे खायचेच होते तर मी सरळच घेतले असते. मारुतीच्या देवळात जाण्याचे मला काय कारण ? बरे, तेथे गेलो तरी तेथे नागवा होऊन बसण्याचे मला कारण काय ? मला काय लाजलज्जा नाही ? माझे विरोधक हेच नंगे आणि लुच्चे आहेत. " या उत्तराचा वरिष्ठांच्या मनावर परिणाम झाला. वरिष्ठ म्हणाले, " हा शरीफ (सभ्य) मुसलमान अधिकारी अंगावरचे कपडे काढून ठेवून आणि नागवा होऊन मारुतीच्या देवळात जाऊन पैसे घेईल हे कसे शक्य आहे ? तक्रार करणारेच नंगे आहेत ! " असा शेरा मारून वरिष्ठांनी तहसीलदारांना आरोपातून मुक्त केले आणि हे प्रकरण निकालात काढले.

आमचे ट्रेनिंग जूनपासून सप्टेंबर अखेरपर्यंत चालले होते. रोज दोन तीन तासांहून अधिक काम नसे. लेक्चर्स ऐकल्यावर मी घरी परत येई.

माझे बंधू बिंदुमाधवराव यांनी एम्. ए. आणि लॉ या दोन्हींचा अभ्यास

सोडून दिला होता. गाणे-बजावणे, नाटकात कामे करणे या गोष्टींत त्यांचे मन रमले होते. ऑल सेंट्स स्कूल या मिशन शाळेत त्यांनी नोकरी पत्करली होती. तेथे ते इंग्रजी आणि उर्दू शिकवीत. घरात माझी वहिनी होती. माझ्या बंधूंना तबला वाजविण्याची कला चांगलीच हस्तगत झाली होती. त्यावेळी हैदराबादेत शास्तुरकर हे प्रख्यात तबला वाजविणारे होते. माझ्या बंधूंनी त्यांचा गंडा बांधला होता. वेळ मिळेल तेव्हा ते घरात तबल्यावर अभ्यास करीत. चाळीस चाळीस मिनिटे त्यांची बोटे सतत तबल्यावरून फिरत. त्यांचे कौशल्य पाहून मी थक्क होत असे. माझ्या बंधूंच्यामुळे अनेक कलावंतांशी माझ्या ओळखी झाल्या. गवई, वाद्यवादक, नर्तक इत्यादींची आमच्या घरात सारखी वर्दळ असे. रंगनाथबुवा देगलूरकर हे पट्टीचे तबला वाजविणारे. शांता आपटेबरोबर ते लाहोरपर्यंत जाऊन आले होते. त्यांचा मुक्काम आमच्याकडे आठवडेच्या आठवडे असे. त्यांचे तबलावादन ऐकून मनाला अत्यानंद होत असे. अंबाप्रसाद हार्मो-नियमवादक हे तर आमचे निकटचे स्नेही. सवाई गंधर्वांचे गाणे याच वेळी मला ऐकण्यास मिळाले. हैदराबादेत त्यावेळी डॉक्टर पांडुरंग पतकी (आता सेवानिवृत्त डॉक्टर, गुलबर्गा) यांचे नाव उत्तम गायक म्हणून पुढे येऊ लागले होते. प्रल्हाद जोशी कुंदगोळकर (आता पुण्यात स्थायिक) हा तरुण हैदरा-बादेस आमच्याचकडे येऊन राहात असे. माझ्या बंधूंच्यामुळे सवाई गंधर्व, प्रल्हाद जोशी, डॉक्टर पतकी, लहानू मास्तर, ओंकारबुवा, पाटणकर, रत्नाकर-बुवा, शास्तूरकर, दाऊद हे तबलावादक, रंगनाथ देगलूरकर (आता नांदेडला स्थायिक) इत्यादी कलावंतांचा मला सहवास लाभला. गाण्याच्या मैफिलीत मी अनेक रात्री घालवल्या. मला गायनकला आवडू लागली; पण तंत्र काही समजले नाही. अनेक राग कानावरून गेले. पण माझे बंधू जसे गायनवादनाचे दर्दी बनले तसे होणे मला जमले नाही. अंतरा, अस्ताई, द्रुत, विलंबित, मुखडा, मात्रा, मुरका, खयाल, धृपद असे कितीतरी शब्द कानावरून जात; पण त्या शास्त्राच्या खोलात मला जाता आले नाही. फक्त रागांची नावे पाठ झाली आणि काही राग ओळखू येऊ लागले. त्यातसुद्धा मी युक्तीनेच काम केई. काही लोकप्रिय गाण्यांचे राग कोणते हे मी विचारून ठेवले होते. बैठकीच्या सुरुवातीला यमन गातात. शेवट भैरवीवर होतो. मालकंस हा वैभवशाली राग आहे. पिलूमधे आर्तता आहे. अडाणा हा वीररसाला बरा, तिलक कामोद हा हळुवार वाटतो; असे काही ठोकताळे मी मनाशी बांधून ठेवले होते. म्हणजे गाण्याचे तंत्र माहीत म्हणून नाही तर गाणी ऐकून मी राग ओळखू लागलो.

त्या दोन-चार महिन्यांत गाण्याच्या कितीतरी मैफिली मला पाहावयास

मिळाल्या. गाण्याचे तंत्र मला समजले नाही. पण जन्मभर पुरणारी गायनाची आवड मात्र निर्माण झाली. पुढे नोकरीनिमित्त हैदराबादच्या बाहेर असताना माझ्या मुसलमान अधिकारी मित्रांत मी तज्ज्ञ म्हणून ओळखला जाऊ लागलो. त्यांना राग-रागिण्यांचे काही समजत नसे. ते गजलकव्वालीचे भोक्ते. करीमनगर आणि आदिलाबाद येथे काम करीत असताना तेथील अधिकाऱ्यांनी कलावंतिणीची गाणी करविली; त्यावेळी मी निरनिराळ्या रागांची फर्माईश करून कलावंतिणींना चकित आणि अधिकाऱ्यांना थक्क करून सोडले. अधिकाऱ्यांत मला गाण्याचे दर्दी असे क्वचितच आढळले. बहुतेक कलावंतिणींच्या गाण्याऐवजी त्यांच्या शरीरावर लुब्ध होत. करीमनगरला तर एका गायिकेने माझ्या एका अधिकारी मित्राला विचारले, ' और क्या फर्माईश है, ' त्याने चटकन उत्तर दिले. ' आज रात को मेरे साथ सोना ' गायिका ही तेथील एका जमीनदाराची ठेवलेली होती. मला वाटते तिला दिवस गेलेले असावेत. तिने हजरजबाबीपणे उत्तर दिले, ' जागा आधीच रिझर्व झाली आहे. '

गुलबर्गा जिल्ह्यातील सुरपुर (बेडरांचे सुरापुर) म्हणजे हैदराबादचे कलेचे माहेर होते. इ. स. १८५७ पर्यंत तेथे संस्थान होते. सुरपुरचे संस्थानिक हे व्यंकटेशाचे भक्त होते. सुरपुरला गोपालस्वामी, व्यंकटेश इत्यादींची देवळे आहेत. यामुळे सुरपुरला कलावंत आणि कलावंतिणी यांची नेहमी वर्दळ असे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात सुरपुर संस्थान खालसा झाले. संस्थानिकांच्या वंशजांना सात आठ गावांची जहागिरी शिल्लक ठेवण्यात आली. सुरपुरच्या कलावंतांची परंपरा चालू राहिली. पण तेथील अनेक कलावंतिणी हैदराबादेस येऊन राहिल्या. कर्नाटकात कलावंतिणींना पात्र किंवा सानी (स्वामिनीचा अपभ्रंश) म्हणतात. त्यांपैकी काहींनी गायिका म्हणून हैदराबादेत चांगलेच नाव कमावले. त्यांपैकी बऱ्याचजणी पुढे नबाबांच्या किंवा जहागिरदारांच्या रखेल्या बनल्या. मी हैदराबादेत होतो त्यावेळी विमला सानी आणि कमळा सानी या बहिणींची नावे गाजत होती. त्यांपैकी विमला सानी ही नबाब मलिक यारजंग (यांचे वडील अकबरजंग हे एकेकाळी हैदराबाद शहराचे कोतवाल म्हणून गाजले होते.) या संगीतप्रिय कलेक्टरांच्या पाशी जाऊन राहिली. मलिक यार जंग हे कलेक्टर म्हणण्यापेक्षा संगीतज्ञ म्हणून प्रख्यात होते. सतार आणि तबला या दोन वाद्यांवर त्यांचे प्रभुत्व होते. विमला सानीची बहीण कमला सानी ही त्यावेळी आमच्या घरापासून जवळच जामबागेत घर घेऊन राहात होती. गायन आणि सतारवादन यांत तिची चांगलीच ख्याती होती. माझ्या बंधूंच्या बरोबर मी दोन-तीनदा तिच्या घरी गेलो आणि तिचे गाणे ऐकले.

तिच्या घरच्या एका बैठकीस मी, माझे बंधू आणि आमच्या घरी उतरणारा एक तरुण गायक (नाव सांगत नाही. आज तो प्रसिद्ध गायक आहे आणि त्याला बायकापोरे आहेत.) आणि इतर काही मंडळी जमली होती. कमला सानी सतार वाजवीत होती. इतक्यात तिची बहीण माणिक सानी ही बाहेर आली. तिचे वय वीस एक वर्षांचे असावे. दिसण्यात ती विशेष गोरी नव्हती. पण सुरेख बांधा, पुष्ट अवयव आणि मादक डोळे यांच्या जोडीला तिचे उतू जाणारे यौवन, यामुळे तिला पाहताच आमचा गायक मित्र अगदी सपाट झाला. ते सौंदर्य आणि ते यौवन पाहून त्याची जी भ्रांत अवस्था त्या बैठकीत झाली ती मला अद्याप आठवते.

रंभा आली कुण्या शुकाचा पाहावया अंत
गोते खाती गालावरच्या भोवऱ्यात संत
मदन दहन दर्पास हरवु ये रतिच मूर्तिमंत
पद्मवदन पाहोनि वदावे शिवेहि हा हंत.

बैठक कशीबशी संपवून आम्ही घरी परत आलो. आमचा मित्र विरहज्वराने पोळू लागला. ‘ माणिक सानीची आणि माझी भेट घडवून आण ’ म्हणून तो माझ्या बंधूंची सारखी विनवणी करू लागला. मी म्हटले, ‘ बुवा, इतके बेताल होण्यासारखे तिच्यात काय आहे बरे ’ तो विव्हळ होऊन म्हणाला, ‘ सेतुराव, काय आहे म्हणण्यापेक्षा काय नाही हे विचारा. अहो, तिची वक्षस्थळे पाहिलीत का. कठीण असे नारळच जणू. माझ्या अंगावर त्यांचा सारखा मारा होतो आहे असे मला वाटते ! ’ मला हसू आवरेना. शेवटी माझ्या बंधूंनी ती भेट घडवून आणली, पण प्रत्यक्षात एकमेकांना विडे देण्याघेण्यापलीकडे काही घडले नाही असे मला कळले. कलावंतांचे धैर्य अपुरे पडले असावे.

रागदाऱ्यांच्या बरोबरीने गजलांच्या मैफिली ऐकण्याचीही संधी मला लाभली. कवी जेव्हा आपल्या गजला गात तेव्हा गजला स्पष्ट म्हणण्याची काळजी घेत. पण गायक हे अवधान सांभाळीत नसत. त्यामुळे पुष्कळदा मोठा अनवस्था प्रसंग ओढवे. एका गायकाने गजल सुरू केली ‘ तुम झुको, मैं डालता हू , तू वांक, मी घालतो, ’ या ओळीपुढे तो सरकेना. मी अस्वस्थ झालो. बऱ्याच वेळाने तो म्हणाला, ‘ कुछ नहीं हार है अय सनम, हे प्रिये, तू वाक, मी हा हार घालतो, ’ तेव्हा कुठे माझा जीव खाली पडला. एका मराठी नाटकातील पद ‘ करिन मी तिची बहुत आर्जवे, ’ म्हणताना एक प्रसिद्ध गायक नट, करिन मी तिची, या शब्दापुढे सरकेनात तेव्हाही मी असाच अवस्थ झालो होतो.

हैदराबादेत बाहेरच्या कंपन्या विशेष येत नसत आणि आल्या तरी फार

दिवस टिकत नसत. शहरातील गुलहौशी नबाब देखण्या नटीच्या मागे लागत. दोन तीन महिन्यांतच या नटी बेपत्ता होऊन कुणाच्या तरी जनानखान्यात जाऊन बसत आणि कंपन्यांचे दिवाळे निघे. हैदराबादेत ऊर्दू नाटक कंपन्या काढण्याचे प्रयत्न झाले. त्यात स्त्रीपार्ट करणाऱ्या या धंदेवाईक वारांगना असत. या कंपन्याही दोनचार महिन्यांत नाहीशा होत. कॉलेजचे विद्यार्थी मात्र उर्दू नाटके करीत. प्राध्यापक मंडळी ही नाटके लिहून देत. या उपक्रमामुळे फजलु-रहमानसारखे बरेच नाटककार पुढे आले. कन्नड, मराठी आणि तेलगू नाटके ही सुद्धा अशीच हौशी मंडळींच्या मार्फत होत. माझ्या बंधूंना नाटकातून स्त्री-पार्ट करण्याची मोठी हौस असे. त्यांनी बऱ्याच कन्नड आणि मराठी नाटकांतून कामे केली. खडाष्टक या मराठी नाटकात त्यांनी काम केले. एका कन्नड ऐतिहासिक नाटकातही त्यांनी काम केल्याचे आठवते. या निमित्ताने माझा कन्नड साहित्यिकांशी परिचय झाला. धारवाडच्या मनोहर ग्रंथमाला आणि मिंचिन बळ्ळी (बीजवेस) चे संचालक भीमाचार्य जोशी, कवी बेंडगेरी, हैदराबादचा आमचा मित्र आणि प्रसिद्ध नाटककार राघवेंद्र मनसबदार इत्यादी साहित्यिकांशी मला निकटचा सहवास लाभला. राघवेंद्र मनसबदारचे 'अदेने इरली' (ते काहीही असो) हे सामाजिक नाटक अतिशय गाजले.

माझे आजोळ मराठवाड्यातील केज तालुक्यातील (बीड जिल्हा) वडगाव. माझी मावशी आंबेजोगाईजवळच्या ढिगूळ गावच्या देसायांकडे दिली होती. या सुमारास माझा मावसभाऊ नाना हा नोकरीच्या निमित्ताने हैदराबादेस राहण्यास आला. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. निजामाच्या खाजगीकडच्या खात्यात त्याला नोकरी लागली होती. त्याचे शिक्षण मॅट्रिकपर्यंतही झाले नव्हते. नाना हैदराबादला आल्यावर आमची राहणीसाहणी पाहून बदलू लागला. घरात तरुण बायको. तिचे तो अपार कौतुक करी. तिला बरोबर घेऊन जाई, तिला रोज गजरे आणून देई. त्याचे वडील मला म्हणत, 'पाहिलेत, नाना आता पिशावाणी करायला लागला आहे.' मी म्हणे, काका तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका. शहरी राहणीचा थोडाबहुत परिणाम त्याच्यावर होणारच.

नानाची मिळकत पाचपन्नास रुपयांपेक्षा अधिक नव्हती. पण तो मनाने मोठा उदार होता. आपल्याला पुरेसे शिक्षण मिळाले नाही याची त्याला मोठी खंत वाटे. आम्हा भावांशी निकटचे संबंध यावेत अशी त्याची धडपड असे. माझी आणि त्याची चांगलीच गट्टी जमली होती. तहसीलदारीच्या इंटरव्ह्यूला जाण्यासाठी माझ्यापाशी कपडे नव्हते. नानाने मला छप्पन्न रुपये दिले. त्या पैशातून मी सूट शिवून घेतला.

दुर्दैवाने नानाला आयुष्य लाभले नाही. १९३३ च्या आषाढी एकादशीच्या दिवशी तो एका नातेवाइकाबरोबर गंगाखेड (परभणी जिल्हा) येथे गोदावरीत आंघोळ करायला गेला. तो नदीत अपघाताने बुडून मरण पावला. या बातमीने माझी मावशी वेशुद्धच पडली. त्यावेळचा तिचा आकांत मला अद्याप आठवतो. यानंतर गावी गेल्यावर तिने अंथरूण धरले. त्या दुखण्यातच ती थोड्याच दिवसांनी मरण पावली. नानाच्या तरुण बायकोचे दुःख काय सांगावे ? अवघ्या काही महिन्यांतच तिचा संसार पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. आज ती हैदराबादेत शिक्षिका म्हणून कशीबशी जगत आहे. भारतीय स्त्रिये, तुझ्या कष्टाला अंत नाही !

ट्रेनिंगच्या काळातही माझे इंग्रजी, मराठी ग्रंथांचे वाचन चालू होते. वाल्टर स्कॉटच्या समग्र इंग्रजी कविता यावेळी मी वाचून काढल्या. गिल्बर्ट मरे याचे ग्रीक व्ह्यू ऑफ लाइफ या पुस्तकाचा अभ्यास मी याच सुमारास केला. एडगर ॲलन पो याच्या लघुकथा याच वेळी माझ्या वाचनात आल्या. मराठी पुस्तकांत दोन अप्रतिम पुस्तकांच्या अभ्यासाची संधी मला मिळाली. ती पुस्तके म्हणजे द. के. केळकर यांची ‘संस्कृति-संगम’ आणि ‘काव्यालोचन’ ही होत. या दोन्ही ग्रंथांचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला आहे. काव्याचे परीक्षण करण्याची एक नवीनच दृष्टी मला या ग्रंथांमुळे लाभली. कवी, काव्यात त्याने विषय कोणते घेतले आहेत, कोणत्या कल्पना खुलविल्या, तो कोणत्या उपमा वापरतो, त्याच्या काव्यात निसर्गाचे चित्रण आले आहे काय, कविता आत्मनिष्ठ की वस्तुनिष्ठ इत्यादी अनेक दृष्टींनी काव्याचे परीक्षण करावेसे मला वाटू लागले. इंग्रजीही काव्यशास्त्र मी वाचले होते. शेले, कीट्स, बायरन, वर्ड्सवर्थ, सदे, बर्नस, टेनिसन इत्यादी अनेक इंग्रज कवींच्या काव्यांची मी पारायणे केली होती. त्यांच्या परीक्षणाचे तंत्र मी अभ्यासले होते. काव्यालोचन या ग्रंथामुळे मी मराठी काव्याच्या परीक्षणाकडे वळलो. पण अद्याप लेखनाचा योग आला नव्हता. बनारसला असताना मी एक मराठी लघुकथा लिहून काढली होती. ती तारीख होती पाच जुलै १९२७. बनारसला त्यावेळी मी विमलाकुमारीला शिकवीत असे. तिच्यावरच मी एक गोष्ट लिहून काढली. कथेची नायिका होती विमलाकुमारी. गोष्टीचा नायक होता अर्थातच ‘मी.’ त्यांचे एकमेकावर प्रेम होते. पण ते भिन्न जातींचे असल्यामुळे लग्न होऊ शकले नाही. त्यामुळे ‘मी’ने गंगेत उडी मारून आत्महत्या केली. विमलाकुमारीचे पुढे कुणाशीतरी लग्न झाले. एक दिवस ती आपल्या पतीबरोबर गंगेच्या घाटावर फिरायला गेली असता, ‘मी’ने ज्या ठिकाणी जीव दिला होता तेथे तिला त्याची आठवण झाली.

लागलीच तिने त्या ठिकाणी गंगेत उडी मारून जीव दिला. गोष्टीच्या शेवटी मी गंभीरपणे लिहिले होते, 'वाचकहो, अद्याप त्या ठिकाणी तुम्हांला शब्द ऐकू येतील, परमेश्वरा, या देशातून जातिभेद केव्हा नष्ट होणार ?'

पाच जुलै एकोणीसशे सत्तावीस रोजी माझा मित्र तळोकार (आता सेवा-निवृत्त एज्युकेशन इन्स्पेक्टर, वऱ्हाड) हा वसतिगृहातून माझ्याकडे राहायला आला होता. सहा जुलैला सकाळी सहा वाजता मी ही गोष्ट त्याला वाचून दाखविली. गोष्ट ऐकून तळोकार हसू लागला. तो विनोदानें म्हणाला, 'अरे हे तुझे आत्मचरित्र आहे काय ? सांभाळ अं. विमलाकुमारीचा फार ध्यास घेऊ नकोस.' त्यानंतर मी मराठीत लेखन असे केले नाही. माकियावेलीच्या 'प्रिन्स'चे मात्र मी भाषांतर करीत होतो. मराठी लेखनासंबंधी मला आत्म-विश्वास नव्हता. पण १९३३ च्या जुलैमधे माझ्यावर मराठीत एक लेख लिहिण्याची पाळी आली.

एक दिवस माझ्याकडे एक गृहस्थ आले. ते म्हणाले, 'माझे नाव बेदरकर. मी येथील कॉलेजात मराठीचा शिक्षक आहे. माझे कवितेतील टोपण नाव आहे कवि मुकुंद. (हैदराबादच्या मराठी साहित्य संमेलनात मी नाही डरणार, मी बेदरकार असा यांचा उल्लेख झाला होता. कारण त्यांनी वेळेवर आपले काव्यवाचन संपविण्याचे नाकारले होते असे म्हणतात.) मी प्रेमांजली नावाचे काव्य लिहिले आहे. त्याचे तुम्ही परीक्षण करावे अशी माझी इच्छा आहे.'

मी गोंधळात पडलो. मराठी लेखन आपल्याला जमेल की नाही याची मला शंका होती. पण बेदरकर ऐकेनात. शेवटी मि तुमच्या पुस्तकाचे परीक्षण करतो, असे मला कबूल करावे लागले. लेख लिहून झाला. पण तो छापायचा कुठे ? त्यावेळी हैदराबादेत एकच मराठी साप्ताहिक चालत असे. त्याचे नाव 'निजामविजय'. लक्ष्मणराव फाटक हे निजामविजयचे संपादक होते. मी आणि माझा मित्र राघवेंद्र जहागिरदार असे दोघे निजामविजयच्या ऑफिसमध्ये फाटकांना भेटण्यास गेलो. तीच माझी त्यांची पहिली ओळख. त्यांनी लेखावरून एक नजर टाकली आणि म्हणाले, 'हा लेख आम्ही घेऊ.'

फाटक मला म्हणाले 'अहो' तुम्ही टोपण नावानें लिहा.' मी म्हटले 'तुम्हीच सुचवा नाव.' ते म्हणाले 'भृंग' हे नाव कसे वाटते ?' मला ते विशेष आवडले नाही. मला सहज कल्पना आली. माझ्या आईचे नाव कृष्णाबाई. आपण कृष्णाकुमार हे नाव लावावे. लक्ष्मणराव फाटक यांना ती कल्पना आवडली. त्यावेळेपासून १९४८ च्या पोलीस अॅक्शनपर्यंत मी कृष्णाकुमार हेच टोपण नाव वापरीत असे.

लेख दोन आठवड्यांनंतर छापून आला. मला लेखनाच्या बाबतीत काडीचाही आत्मविश्वास नव्हता. त्यामुळे संपादकांनी तो लेख घेतलाच कसा, याचेच मला नवल वाटत होते. त्यामुळे लेख दिल्याच्या पहिल्या आठवड्यात तो छापून आला नाही, तेव्हा मी खचलो. मला वाटले, लेखन हे आपल्या आवाक्याच्या बाहेरचे काम आहे. मी फाटकांना भेटलो. ते म्हणाले, 'या आठवड्यात छापणे जमले नाही. पुढच्या आठवड्यात लेख नक्की छापून येईल.' असे म्हणून त्यांनी लेखाची प्रुफे दाखविली. लेख छापून आला, त्या दिवशीचा माझा आनंद अवर्णनीय होता. कवि मुकुंद बेदरकर हे संध्याकाळी माझ्याकडे आले. आम्ही संध्याकाळी लांब फिरायला गेलो. बेदरकर म्हणाले, 'तुमचा लेख सर्वांना आवडला. कित्येकांची समजूत अशी आहे की हा लेख दिवाकर कृष्ण केळकर यांनी लिहिला असावा.' हे त्यांचे बोलणे ऐकून मला मोठा अभिमान वाटला. दिवाकर कृष्ण केळकर हे हैदराबादेतील नावाजलेले साहित्यिक. त्यांच्या 'समाधि आणि इतर लघुकथा' या संग्रहाने मराठी लघुकथा क्षेत्रात एक नवीन वातावरण निर्माण केले. त्यांची कादंबरी 'किशोरीचे हृदय' आणि लघुकथा संग्रह 'रूपगर्विता आणि इतर लघुकथा' ही पुस्तकेही पुढे चांगलीच गाजली. माझा लेख दिवाकर कृष्णांचा वाटावा या गोष्टीने मला आपल्या लेखनाबद्दल आत्मविश्वास वाटू लागला. लक्ष्मणराव फाटक यांनीही माझ्या लेखाचे मोकळेपणाने कौतुक केले आणि निजामविजयात लिहीत चला म्हणून मला आवर्जून सांगितले.

हैदराबाद राज्यातील वातावरण मराठी, कानडी आणि तेलगू या भाषांना अगदी प्रतिकूल होते. उर्दूचा सर्वत्र बोलबाला होता. चौथीच्या पुढे शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. पाचवी ते सातवी, मराठी हा एक विषय म्हणून घेता येई. इंग्रजी माध्यमाच्या काही शाळा पूर्वीपासून चालत आल्या होत्या तेवढ्याच. बाकीच्या सर्व शाळा उर्दू माध्यमाच्या. आठवी, नववी, दहावी या वर्गातून मराठी हा विषय घेता येई. पण उच्च गणित किंवा मराठी अशी सांगड घालण्यात आली होती. उच्च गणित घेणारेच पुढे कॉलेजांत सायन्स हा विषय घेऊन इंजिनियरिंग अगर मेडिकल या कॉलेजात जाऊ शकत. या एका कारणामुळे शेकडो मुले सातवीच्या पुढे मराठीच्या ऐवजी उच्च गणित हा विषय घेऊ लागली आणि मराठी माध्यम तर सोडाच, साध्या मराठीच्या अभ्यासाला ती मुकू लागली. जो प्रकार मराठीचा तोच तेलगू आणि कानडी या भाषांचा होता. मुलींच्या शिक्षणाचीही हीच तऱ्हा होती. सातवीपर्यंत मुलींच्या शिक्षणाचे माध्यम मराठी असे. पण पाचवीपासून मुलींना उर्दू हा एक विषय म्हणून शिकण्याची सक्ती करण्यात येई. सातवीच्या पुढचे माध्यम मुलींसाठीही उर्दूच

असे. त्यामुळे शिकायचे तर उर्दू शिका, नाही तर घरी बसा, अशी मुलींची स्थिती झाली. कॉलेजचे शिक्षण फक्त हैदराबाद शहरातच मिळे. जिल्ह्यातून कॉलेजे नसत. १९२७ मध्ये औरंगाबाद, वरंगल, आणि गुलबर्गा येथे इंटरमीजिएट कॉलेजे उघडण्यात आली. त्यांचे माध्यम उर्दू असे. औरंगाबाद इंटरमीजिएट कॉलेजात मराठी हा एक विषय म्हणून शिकविण्यात येई. हैदराबादेत उस्मानिया विद्यापीठ, निजाम कॉलेज, सिटी कॉलेज या संस्थांतून मराठी शिकविण्याची सोय होती. त्यामुळे हैदराबाद आणि औरंगाबाद येथे मराठीचे प्राध्यापक आढळून येऊ लागले. निजाम कॉलेजात प्राध्यापक क्षीरसागर आणि नंतर प्राध्यापक माढेकर, उस्मानिया विद्यापीठात प्राध्यापक जोशी, औरंगाबादेत प्राध्यापक नांदापूरकर ही मंडळी साहित्यात भरीव काम करू लागली होती. महाराष्ट्रीयांनी चालविलेल्या हैदराबादेतील संस्था म्हणजे विवेकवर्धिनी हायस्कूल, कन्याशाळा, मराठी ग्रंथसंग्रहालय या होत्या. वर्तमानपत्रांनाही पोषक असे वातावरण हैदराबादेत नव्हते. एक ‘ निजामविजय ’ हे मराठी साप्ताहिक कसेबसे चालत असे. लक्ष्मणराव फाटक मोठ्या हुशारीनें ते चालवीत. संस्थानातील बातम्या ते ‘ स्वराज्यात ’ या शीर्षकाखाली देत. बाहेरच्या बातम्यांना ते ‘ मुलुखगिरी ’ हा मथळा देत. माझे वर्गबंधू आणि हिंदूमहासभेचे पुढारी यशवंतराव जोशी यांनी काही दिवस राजहंस हे मासिक चालविले. पण त्यांच्यावर सरकारची वक्रदृष्टी झाल्यामुळे ते लवकरच बंद पडले.

अशाही परिस्थितीत सार्वजनिक कार्यकर्ते हैदराबाद राज्यात चळवळींना तोंड फोडीत होते. वामनराव नाईक, न्यायमूर्ती केशवराव कोरटकर, ब्यारिस्टर रामचंद्र नाईक, काशिनाथराव वैद्य, स्वामी रामानंद तीर्थ, औरंगाबादेत डॉक्टर सीमंत, गोविंदराव नानल इत्यादि मंडळींच्या कार्यामुळे हैदराबाद राज्यात जागृती होऊ लागली होती. मराठीतच लिहावे अशी जिद्द साहित्यिकांत निर्माण होऊ लागली होती. दिवाकर कृष्ण केळकर, रघुनाथ मुरलीधर जोशी, डॉक्टर वामनराव गाडगीळ, कवी यशवंतराव कोरेकल, नांदेडचे कवी देवीदास लक्ष्मण महाजन, हैदराबादचे श्रीकृष्ण गाडगीळ, नांदेडचे वा. रा. कांत, पार्थिव, गोळेगावकर, मनाठकर, औरंगाबादचे पद्माकर, नारायणराव नांदापूरकर असे अनेक लेखक मराठीतून लेखन करू लागले. यशवंतराव कोरेकल हे उर्दू भाषेत उत्तमपैकी काव्य करीत. उर्दूत त्यांचा दीवान (कवितासंग्रह) प्रसिद्ध होता. तेही मराठीकडे वळले.

‘ कोणी पोहति संस्कृतार्णवि, कुणी हिंदी नदीमाजिही
बंगाली मधु, रम्यशी उपवने जी रंजवीती तिही

भाषा आंध्रहि कोणि गुर्जर, गणी कर्नाटकी सोज्वळा
सर्वाधिक्य अशी गमे भुवनि ही माझी मराठी मला '

असे उद्‌गार त्यांनी काढले आहेत. कवी महाजन म्हणतात,

" अमृतास जी पैजा जिंकी
कांजीहुनि ती आज का फिकी
म्हणवील कोण तरि पुत्र जन्मुनी
तिजला ' माता धन्या ' "

१९३३ च्या सप्टेंबर अखेरपर्यंत हैदराबादेतील अनेक साहित्यिकांशी माझ्या ओळखी झाल्या. रघुनाथ मुरलीधर जोशी, दिवाकर कृष्ण केळकर, कवी बेदरकर, कवी मनाठकर, आणि कवी कांत यांचा माझा परिचय झाला. आज वा. रा. कांत हे प्रसिद्ध कवी म्हणून मुंबईत गाजत आहेत. हैदराबादेत ते त्या काळात शेतकी खात्यात काम करीत असावेत. १९३३ च्या आक्टोबर महिन्यात त्यांचा-माझा परिचय झाला. त्यांनी आपला ' फटल्कार ' हा कवितासंग्रह मला भेट म्हणून दिला. ' माझे नवपरिचित पण जुनेपणाच्या सलगीनें वागणारे रसिक मित्र कृष्णाकुमार, एस. ए. यांस सप्रेम भेट. ' असे त्यांनी मला दिलेल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. तारीख आठ आजुर तेराशे त्रेचाळीस फसली म्हणजे आक्टोबर १९३३ ही आहे.

वा. रा. कांत यांच्या काव्यगुणांनी मी भारावून गेलो. भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व आहे. नादमधुर रचना करावी तर त्यांनीच. तरल आणि मधुर कल्पनाविलास त्यांच्या कवितें-कवितेत आढळून येतो. उर्दू फारसी कल्पना त्यांनी मराठीत आणल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या काव्याची लज्जत काही औरच वाटते.

सांडु दे फेस ! घे भरी भराभर बाले
बस ठेवु नको तू आज रिकामे प्याले
मधुराणी, कर पाजुनी जिवाला धुंद
बुडविले इष्क प्याल्यात लौकिकी छंद

किंवा,

सहज मृदुल तव पाउल पडते
तरुण हृदय त्या तिथे चिरडते
रक्त तेच तव पदी लागते
ही कशास मेंदी मग वरुनी
रंगवू नको निजपद रमणी

कांतांच्या कवितेतील रोमॅंटिसिजमचा माझ्या लेखनावर, आणि विचार-

सरणीवर मोठा प्रभाव पडला आहे. मराठीची गळचेपी हैदराबादेत सर्वांनाच जाणवत होती. कांत म्हणतात,

माते तुझ्या गोड दुग्धामृताची सवै आमुची तोडल्यापासुनी ।
तूझ्याच दुग्धावरि मायभाषे आम्ही वाढलो पोसलो आननी ॥

राज्यकर्त्यांच्या मराठी आणि इतर स्थानिक भाषांच्यावरील गळचेपीबद्दल ते म्हणतात,

बंदी अशा गायनाते करोनी गळे आमुचे कापिले हे जरी ।
गातील गाणी अमुची कबंधे मराठी खुल्या माळरानावरी ॥

त्यांच्या पुढील ओळी म्हणजे निजामी राज्यकर्त्यांना एक आव्हानच होते :

फडफडाट पंखांचे होती
अंगि धुंदिच्या लहरी उठती
निखाऱ्यांत मम पंख करपती
तरीहि फुलवितो गान !
घेउन रुतला बाण स्वांती
धुळीत पडता पडता अंती
एक तान फेकीन तुला ती
खचित करिल बेभान,
पारध्या सूं सूं सुटु दे बाण

मराठवाड्यात मराठी साहित्याचा उदयकाळ जवळ आला आहे हे सूचित करताना कांतांची भाषा किती गोड आणि हळवी बनते पाहा :

तेज दिशांना चढे न अजुनी, सहस्रकर नच नभात ग
निळ्या डोंगरी तेज फिकटते परि झुळझुळ ये वाहात ग
पहाटतारा डुलत फुलत ये विरल कृष्णघन तमात ग
सूर्यदूत पाहून हासते रात कौतुके घनात ग.

'निजाम–विजया'त माझे लेख प्रसिद्ध होऊ लागले. महिन्यातून एक दोन लेख तरी प्रसिद्ध होत. त्यात काही लघुकथा तर काही निबंध, असे माझ्या लेखांचे स्वरूप होते. या निमित्ताने माझे मराठीचे वाचनही बरेच होऊ लागले.

मला प्रोबेशनर तहसीलदार म्हणून महिन्याला शंभर रुपये मिळत. यातूनच मी हैदराबादच्या घराचा खर्च चालवीत होतो. घरात माझे वडील बंधू, वहिनी, धाकटा भाऊ राघवेंद्र आणि बहीण सुशीला ही मंडळी होती.

या सुमारास माझा ललित नावाच्या एका ज्योतिष्याशी परिचय झाला. माझे दूरचे आप्त व्यंकटराव कल्याणकर हे हिशेबखात्यात नोकरीला होते.

त्यांच्याकडे मी एकदा जेवायला गेलो असताना माझी आणि ललित, यांची ओळख झाली. ते कोल्हापूरकडचे होते असे कळले. गृहस्थ मोठा विनोदी आणि खेळकर वृत्तीचा होता. त्याने थाप ठोकली 'मी पुण्याला डेक्कन कॉलेजात होतो.' मी आश्चर्यचकित झालो. मी विचारले 'कधी ?' ते म्हणाले 'गेल्या वर्षी.' मी म्हटले 'मग ... ?' यावर ललित म्हणाले, 'गेल्या वर्षी एका ओळखीच्या मित्राबरोबर डेक्कन कॉलेजात गेलो होतो. तेथे एक दोन वेळ मी मेसमध्ये जेवलो. हे आमचे डेक्कन कालेजातील वास्तव्य.' मला हसू आवरेना.

माझ्या आग्रहावरून ललितने माझी पत्रिका पाहिली. माझा हात पाहिला आणि माझे भविष्य लिहून दिले. तो जवळ जवळ पंधरा पानांचा मजकूर आहे. त्यांपैकी काही गोष्टी खऱ्या झाल्या आहेत. बऱ्याच गोष्टी घडल्याच नाहीत. ललितच्या भविष्यकथनात एक ओळ होती 'तुम्हांला द्विभार्यायोग आहे.' ते वाक्य वाचून मला जबर धक्का बसला. अजून माझे लग्न व्हावयाचे होते. त्याच्या आधीच या गृहस्थाने माझ्या वैवाहिक जीवनाचा निकाल लावला होता. मी ती वही लपवून ठेवली. पुढे लग्नानंतर ती एकदा माझ्या पत्नीच्या हातात पडली. आणि मग तिची समजूत घालता घालता माझी पुरे वाट झाली. ललितचे भविष्य चुकले हे सांगावयाला नको. पण बरेच दिवस माझ्या मनाला एक प्रकारची धास्ती वाटत होती.

हैदराबादेत आम्ही राहात होतो, त्या जागेला मुरलीधर बाग म्हणत. राजा मुरलीधर या जहागीरदाराने ती इ. स. १८६० च्या सुमारास विकत घेऊन तेथे देवीचे एक प्रेक्षणीय देऊळ बांधले होते. आम्ही राहात होतो त्यावेळी राजा मुरलीधरचे वंशज कन्हय्याप्रसाद हे मुरलीधर बागेत राहात. बागेचे आवार बरेच मोठे होते. देवळाच्या बाहेर दहा पंधरा बंगले होते. देवळाच्या आतील आवारात ओवऱ्या होत्या. त्याच्या खोल्या बांधण्यात येऊन त्या भाड्याने देण्यात आल्या होत्या. माझे बंधू तेथेच दोन खोल्या घेऊन राहात होते. या ओवऱ्या म्हणजे चाळीतील खोल्यांप्रमाणे असत. ओवऱ्यांतून दहा पाच कुटुंबे होती. ती सगळी कनिष्ठ मध्यम वर्गीयांची होती. देवळाचे पुजारी, कस्टमखात्यातील कारकून, काही विद्यार्थी अशीही बिऱ्हाडे होती. ओवऱ्यांवर प्रशस्त गच्ची असे. ओवऱ्यांच्या मागील भिंतींना काही आडोसे लावून लहानलहान खोल्या तयार करण्यात आल्या होत्या. गच्चीवरून त्या खोल्यांत काय चालले आहे हे सहज दिसत असे.

मुरलीधर बागेचा राजा कन्हय्याप्रसाद हा मोठा रसिक आणि विलासी माणूस होता. त्यावेळी हैदराबादेत एक आंध्र नाटक मंडळी आली होती.

मंडळींने आपले बिऱ्हाड मुरलीधर बागेत ठेवले होते. देवळाच्या बाहेरील आवारात त्यांची सोय करण्यात आली होती.

एके दिवशी सकाळी माझे चुलतबंधू व्यंकोबराव हे गच्चीवरून खाली आले. ते बरेच गोंधळलेले दिसले. ते मला म्हणाले, " अरे सेतू , जरा गच्चीवर जाऊन पाहा काय दिसते. "

मी पाहिले तो काय, कन्हैयाप्रसादची एक आंध्र नटी उभी होती. मी तेथून पळून खाली आलो. माझी छाती धड धड करीत होती. मला पाहून माझे चुलत बंधू हसायला लागले. मी म्हटले, ' अरे व्यंकोबा, तुझ्या थट्टेला काही सुमार. अरे, ती नटी आता जाऊन राजा कन्हैयाप्रसादला ही हकीकत सांगेल ना. आणि तो चौकशी करीत आपल्या खोलीवर आला तर. ' ' अरे, खरेच की, ' व्यंकोबराव म्हणाले. आम्ही खोलीची दारे लावून घेऊन आत बसून राहिलो. मी म्हटल्याप्रमाणेच झाले. थोड्या वेळाने आम्ही दाराच्या फटीतून पाहिले. राजा कन्हैयाप्रसाद हा गच्चीवरून येरझाऱ्या घालीत सर्वांच्याकडे न्याहाळून पाहात होता. अर्थात आम्ही काही त्याला सापडलो नाही.

माझे चुलत बंधू प. वा व्यंकोबराव यांचा स्वभाव साधा आणि सरळ होता. त्यावेळी आमचे मित्र कन्नड आणि मराठी नाटके करीत. त्यांत माझ्या बंधूंचा स्त्री-पार्ट ठरलेला असे. एकदा माझ्या चुलत बंधूंनीही नाटकात काम करण्याची इच्छा दाखविली. नाटकात त्यांना एका सैनिकाचे काम देण्यात आले होते. नाटकातील नायकावर सैनिक हल्ला करतात. पण नायक त्यांचा प्रतिकार करतो आणि सैनिक जखमी होऊन पळून जातात असा तो प्रवेश होता. मी विंगमध्ये उभा राहून प्रवेश पाहात होतो. सैनिकांनी नायकावर हल्ला केला. त्यांत व्यंकोबराव होते. जखमी झाल्याचे दाखवून बाकीचे सर्व सैनिक पळून आले. पण व्यंकोबराव मात्र मृत झाल्याचे दाखवून रंगमंचावर पडून राहिले. नायकही निघून गेला होता. मी विंगमधून व्यंकोबला हळूच म्हटले, ' अरे, तू तेथे काय म्हणून पडून राहिला आहेस ? ' व्यंकोब म्हणाला, ' अरे, मला वाटले मी मरायला पाहिजे. मी येथे मरून पडलो आहे. आता आत कसा येऊ ? '

समोर बसलेल्या प्रेक्षकांना हे शब्द ऐकू आले. नाट्यगृहात एकच हशा पिकला. आणि त्या गोंधळात व्यंकोब उठून धावत धावत विंगमध्ये आला. आमची तर हसून हसून मुरकुंडी वळली. त्यावेळचे आमचे मित्रमंडळ बहुरंगी होते. त्यात लेखक, कवी, नाटककार, नट, गवई, बजवय्ये असे एकत्र आले होते. नाटके करणे, क्यारम खेळणे, मध्यरात्रीच्या सुमारास हॉटेलात जाऊन

चहा घेणे, गाण्याच्या बैठकी करणे असे आमच्या मित्रांचे उद्योग असत. शंकर शेर नावाचे एक हॉटेल असे. तेथे मिळणारा चहा अप्रतिम असतो अशी सर्वांची समजूत असे. रात्री बारा वाजता ही मंडळी तेथे जाऊन चहा पिऊन येत. राजकारणाच्या भानगडीत ही मंडळी पडत नसत. आमच्या हैदराबादच्या रुपयाला एके बाजूला चारमिनार कोरलेले असे. ती मशीद समजून ही मंडळी आपापसात म्हणत, आज हॉटेलात जाऊन एक मशीद मोडायची का. म्हणजे रुपया खर्च करायचा का. इतपतच त्यांची राजकारणात मजल गेली होती.

आयुष्यातील योगायोग पाहा, हैदराबादचे निजाम मीर उस्मान अलीखान यांना तीसच्या वर मुले होती. पण पट्टराणीपासून त्यांना दोन मुले झाली. मोठा मुलगा म्हणजे मीर हिमायत अली आज्जमजहा हा प्रिन्स ऑफ बेरार, धाकटा मुलगा मीर शुजाअतअली मुअज्जम जहा—आज्जमजहा हे युवराज होते. पण मुअज्जम जहावर निजामाची विशेष मर्जी आहे असा लौकिक होता. या दोन्ही बंधूंना तुर्कस्थानच्या राजघराण्यातील मुलींचा दुर्रेशहरवर दुर्दाना बेगम (आज्जमजहाची पत्नी) आणि नीलोफर (मुअज्जम जहाची पत्नी) यांचा लाभ झाला होता. निजामाने या दोन्ही बंधूना स्वतंत्र वाडे देऊन त्यांना हजारो रुपयांचा भत्ता चालू केला होता. निजामाची ही दोन मुले, आपल्या बापाच्या चिक्कू स्वभावामुळे अगदी ओढग्रस्तीच्या स्थितीत वाढली होती. लग्नें झाल्यानंतर त्यांना स्वतंत्र सरंजाम मिळाला आणि त्यांच्या हातात हजारो रुपये खेळू लागले, तशी त्यांची विलासी वृत्ती उचंबळून आली. युवराज आज्जमजहा यांचा वाडा बेला विस्टा, आणि मुअज्जम जहा यांचा वाडा हिलफोर्ट ही म्हणजे हैदराबादेतील विलासी जीवनाची मोठी केंद्रे बनली. कलावंत, कलावंतिणी, गवई, बजवय्ये, सुंदर तरुणी, रंगेल आणि देखणे तरुण, कवी, लेखक इत्यादींची तेथे गर्दी होऊ लागली. या दोघा बंधूंच्या मैफिलीत अख्तर बेगम गायिका, फानी बदायूनी, जोश मलिहाबादी, अफंदी हे कवी, सिदक जायसी हे साहित्यिक, रऊफ, मुइजुद्दीन हे गवई, लच्छू महाराज नर्तक इत्यादींची वर्दळ असे. मुअज्जम जहा यांचा दरबार रात्री भरे. डिनरचा थाट तर अवर्णनीय असे. डिनरनंतर गाणी, बजावणी, काव्यगायन इत्यादि कार्यक्रम होत. ते सकाळी पाच वाजेपर्यंत चालत.

एकदा मुअज्जम जहा हे एका सांस्कृतिक कार्यक्रमाला हजर होते. मला वाटते क्वेटा भूकंपाच्या पीडितांच्या मदतीसाठी तो कार्यक्रम कोणी तरी आयोजित केला असावा. कार्यक्रमात गायन, नर्तन इत्यादींचा समावेश होता. कार्यक्रम सुरू होण्याची वेळ झाली; पण वाद्यवादकांत तबलजी गैरहजर राहिला. कार्य-

कार्यांनी शोधाशोध सुरू केली. पण आयत्या वेळी तबलजी आणायचा कोठून ? माझे बंधू बिंदुमाधवराव हे प्रेक्षकांत बसले होते. त्यांच्याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष गेले. त्यांनी माझ्या बंधूंना विनंती करून त्यांना तबल्यावर बसविले. कार्यक्रम सुरू झाला. माझ्या बंधूंच्या तबलावादनाची सारखी वाहवा होऊ लागली. मुअज्जम जहांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. कार्यक्रम संपल्यानंतर मुअज्जम जहांनी आपल्या ए. डो. सींना सांगून माझ्या बंधूंना दुसऱ्या दिवशी हिलफोर्टवर येण्याची आज्ञा केली.

माझे बंधू उर्दू फारसीचे विद्वान, हजरजबाबी आणि दरबारी शिष्टाचारात मुरलेले होते. मुअज्जम जहांनी त्यांची नेमणूक आपल्या दरबारात केली. ही पगारी नोकरी नसे. आपापले व्यवसाय सांभाळून रात्री राजपुत्राच्या दरबारात जमायचे आणि संभाषण, काव्यवाचन, वाद्यवादन इत्यादींच्या द्वारे त्यांचे मनोरंजन करावयाचे. अशा मंडळींना मुसाहिब म्हणजे कंप्यानियन म्हणत. त्यांना पगार मिळत नसे. राजपुत्रांना लहर लागेल तेव्हा ते खर्चासाठी म्हणून रुपये देत. मुसाहिबांना राजपुत्रांबरोबर डिनरच्या पंक्तीचा लाभ होई. जाण्या-येण्यासाठी सरकारी मोटारीची सोय होई. मुअज्जमजहा हे बंगळूर, उटकमंड, सिमला इत्यादी ठिकाणी गेले तर अशा निवडक मुसाहिबांना बरोबर नेत. नेमणूक झाल्यावर माझ्या बंधूंना बाराशे रुपयांची शेरवाणी, हैदराबादी पगडी (तिला दस्तार म्हणत), आणि जरतारी कमरपट्टा (त्याला बगलूस म्हणत) हा गणवेश मिळाला. कमरपट्ट्याच्या मधोमध चांदीची एक पट्टी असे. तिच्यावर मुअज्जमजहाच्या नावाचे आद्याक्षर एम हे कोरलेले असे.

रोज रात्री आठ-नऊच्या सुमारास माझ्या बंधूंना नेण्यासाठी हिलफोर्टवरून मोटार येत असे. ते सकाळी पाचच्या सुमारास घरी येत. ते दरबारच्या अनेक गमती आम्हांला सांगत. त्या लिहून काढाव्या किंवा नाही याबद्दल मला नेहमी विचार पडे. सुदैवाने माझ्या बंधूंचे सहकारी आणि साहित्यिक सिदक जायसी यांनी दर्बारे दुरबार (मोत्यांनी भरलेला दरबार) या नावाचा ग्रंथ उर्दूत लिहिला असून त्यात मुअज्जम जहाच्या दरबाराचे वर्णन केले आहे. मी त्याचा समग्र अनुवाद मराठीत केला आहे. त्यावरून या राजपुत्राच्या जीवनाविषयी पूर्ण कल्पना येऊ शकते. माझे बंधू पाचसहा वर्षेपर्यंत मुअज्जमजहाच्या सहवासात होते. यातूनच त्यांना मोठ्या पगाराची नोकरी मिळेल असे आम्हांला वाटत होते. पण तसे काही घडले नाही. उलट माझ्या बंधूंना मदिरापानाचे व्यसन जडले. ही त्यांच्या जीवनाची शोकान्तिका ! माझे वडील धर्माचरणात इतके कडक, पण त्यांना हे सगळे आपल्या डोळ्यांनी पाहावे लागले. सुदैवाने माझ्या

बंधूंनी उत्तमपैकी शिक्षक म्हणून लौकिक कमावला. ते नुकतेच ऑल सेंट्स स्कूलमधून शिक्षक म्हणून काम करून निवृत्त झाले आहेत.

सप्टेंबर १९३३ च्या अखेरीस आमचे सर्व्हे सेटलमेन्ट खात्यातील शिक्षण संपून आमची परीक्षा घेण्यात आली. पुढील सहा महिने आम्हांला रेव्हेन्यू म्हणजे महसूल खात्याचे शिक्षण देण्यात येणार होते. या कामासाठी माझी नेमणूक रायचूर जिल्ह्याच्या कलेक्टरकडे करण्यात आली. वीस आक्टोबर १९३३ रोजी मी रायचूरला पोहोचलो. निजाम कॉलेजातील माझे वर्गबंधू डी. माणिकराव हे रायचूरचे. त्यांचे वडील बाळाजीराव आणि माझे वडील हे निकटचे मित्र होते माणिकरावांचे वडील वारले होते. ते स्वतः रायचुरात वकिली करीत. मी त्यांच्याकडे दीड एक महिना होतो. रायचूर हे कर्नाटकातील एक महत्त्वाचे शहर आहे. कृष्णा आणि तुंगभद्रा या दोन नद्यांच्या मधील दुआब म्हणजे रायचूर जिल्हा: या जिल्ह्याशी आमचा तीन पिढ्यांचा संबंध होता. माझे आजोबा विजापूर जिल्ह्यातून नोकरीनिमित्ताने रायचूर जिल्ह्यात आले ते इ. स. १८५७ मधे. रायचूरलाच त्यांचा इ. स. १८९६ मधे मृत्यू झाला. ते चिपळूणकरी पगडी वापरीत. त्यामुळे रायचुरात त्यांना पगडी शेषगीरराव म्हणू लागले. तेव्हापासून आमचे जकाते हे आडनाव जाऊन पगडी झाले. माझे वडील रायचूरला १८८८ पासून १९०५ पर्यंत जिल्हाकचेरीत गोषवारानवीस म्हणून काम करीत होते. पुढे १९२० मधे ते याच जिल्ह्यातील सिंधनूर आणि गंगावती या तालुक्यांत अव्वल कारकून (त्यांना पेषकार म्हणत) होते. खुद्द रायचूरला आमचे काही नातेवाईक होते. रायचूरला आम्हा वैष्णव ब्राह्मणांची बरीच घरे होती, यामुळे मला ते शहर अपरिचित नव्हते.

मी रायचूरला गेल्यावर जिल्हाधिकाऱ्यांकडे रुजू झालो. मीर अहमद अलीखान हे त्यावेळी रायचूरला कलेक्टर (कलेक्टरना अव्वल तालुकदार म्हणत) होते. त्यांचे वय पन्नासच्या पुढे असावे. कुशल, कणखर आणि कार्यक्षम असा त्यांचा लौकिक होता. परभणीला ते कलेक्टर असताना हिंदूंच्या दिंडीच्या मिरवणुकीवरून हिंदुमुसलमानांचा दंगा होण्याची वेळ आली होती. पण अहमदअलीखानांनी गुंडांना एका मशिदीत कोंडून ठेवले. आणि स्वतः हातात पिस्तूल घेऊन ते उभे राहिले. मिरवणूक सुखरूपपणे पार पडली. या त्यांच्या प्रसंगावधानाने ते परभणीला मोठे लोकप्रिय झाले. भारतीय मुसलमानांपैकी शेकडा नव्वद माणसे सुन्नी पंथाची आहेत. शेकडा दहा माणसे शिया पंथीय आहेत. गोवळकोंडा, विजापूर, अहमदनगर, लखनौ, रायचूर येथील मुसलमान राज्ये शियापंथी. हैदराबादेत सालारजंग, मिर्झा इस्माइल हे प्रमुख जहागिरदार शिया पंथी.

आगाखान, अलीइमाम, हुसेन इमाम, न्यायमूर्ती वजीर हसन, गुजरातचे माजी राज्यपाल मेहदी नवाज जंग, अलीगडचे उपकुलगुरू अलीयावर जंग ही मंडळी शिया होत. शिया आणि सुन्नी यांच्यांतील मतभेद अतिशय तीव्र आहेत. पण बिगर मुस्लिमांना ते सहज दिसून येत नाहीत. अहमद अलीखान कलेक्टर हे शिया होते. हैदराबादचे निजाम घराणे हे सुन्नी पंथाचे. पण शिया पंथाचे अनेक अधिकारी, जमीनदार, जहागीरदार हे हैदराबादेत होते. सालारजंग घराण्याचे वार्षिक उत्पन्न तेवीस लाखांचे होते. फखरुल्मुल्क यांचे उत्पन्न पाच लाख, खान-खानानचे चार लाख, शौकतजंगचे दोन लाख अशी ही महत्त्वाची शिया घराणी होती. सालारजंगांच्या घराण्यात तर सहा पिढ्यांपैकी प्रत्येक पिढीला कोणी ना कोणी सालारजंग हा हैदराबादचा पंतप्रधान होता. मीर अहमद अलीखान यांनी मला ट्रेनिंगसाठी आपले रेव्हेन्यू असिस्टंट बजीहुद्दीन यांच्याकडे पाठविले.

रेव्हेन्यू खात्याच्या ट्रेनिंगसाठी माझ्याबरोबर अनागोंदी संस्थानचे राजे कृष्णदेवराय हे होते. पूर्वीच्या विजयनगर सम्राटांचे हे वंशज. विजयनगर शहर हे तुंगभद्रेच्या उभय तीरांवर वसले होते. उत्तर तीरावरील उपनगराला आनी-गोंदी (हत्ती बांधण्याची जागा) म्हणत. हा भाग रायचूर जिल्ह्यात होता. नदीच्या दक्षिणेकडचा भाग (हंपीचे अवशेष) हा मद्रासच्या बळ्ळारी जिल्ह्यात होता. अनागोंदीचे राजे हे खालावलेल्या स्थितीत होते. त्यांचे जहागिरीचे उत्पन्न साठसत्तर हजारांच्यावर नसावे. पण अनागोंदी हे संस्थान समजले जाई. जहागीर नव्हे. निजाम घराण्याच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या हिंदू जमीनदारांना संस्थानिक म्हणत. अशी संस्थाने हैदराबादेत, विशेषतः कर्नाटक आणि तेलंगण भागात होती. कर्नाटकात अनागोंदी, सुरपूर, गुरगुंटा; तेलंगणात गद्वाल, वनपर्ती, गोपाळपेठ, दोमकोंडा, सिरनापल्ली, जटप्रोल, अश्वारावपेठ ही प्रमुख संस्थाने होती. संस्थानिक, जहागिरदार इत्यादींच्या मुलांचे शिक्षण पब्लिक स्कूल (जहा-गिरदार कॉलेज) मधे होई. नंतर त्यांना शासनव्यवहाराचे शिक्षण देण्यासाठी निरनिराळ्या खात्यांत पाठवीत. कृष्णदेवराय हा माझ्याबरोबर रायचूर कलेक्टर कचेरीत काम शिकण्यासाठी आला होता. आम्हांला निरनिराळ्या खात्यांचे कारकून येऊन काम शिकवीत.

आमचे शिक्षण व्यवस्थित असे झालेच नाही. कृष्णदेवराय हा तर संस्थानिकच होता. माझेही लग्न जवळ आले होते. मी अगदी दिवस मोजीत होतो. ऑफिसमधे दोन तीन तास आम्ही बसत असू. संध्याकाळी मी माणिकरावाबरोबर लांब फिरायला जात असे. ऑफिसमधे आम्हांला एक वस्ताद कारकून भेटला. त्याचे

नाव मल्लाप्पा. रोज सकाळी तो ऑफिसमधे येणारे टपाल आमच्यासमोर ठेवी. तालुक्यातून किंवा वरिष्ठ कचेऱ्यांतून आलेली पत्रे टपालात असत. आम्ही विचारले, ' मल्लाप्पा महाराज, आम्ही ही पत्रे वाचली. आता आम्ही यांच्यावर काय लिहावे ? ' मल्लाप्पा म्हणाले, ' साहेब, पत्रावर आपण मिसल (पुट अप फाइल) असे लिहीत चला. आणि हे शब्द लिहिण्याचा कंटाळा आला की 'बा कैफियत' (पुट अप नोट) असे लिहीत चला. ' टपालात मधूनमधून आडव्या तिडव्या रेघा आणि आकडे असलेले कागद येत. ते पावसाचे मान दाखविणारे अगर बाजारभावाचे तक्ते असत. आम्ही विचारले, ' मल्लाप्पा महाराज, अशा कागदावर आम्ही काय लिहावे ' ते म्हणाले, ' बाद तनक्की (आफ्टर स्क्रूटिनी) असे लिहा. '

चार सहा दिवस आम्ही टपालावर वरीलप्रमाणे लिहीत जात होतो. नंतर एके दिवशी मी सहज विचारले, ' मल्लाप्पा महाराज, आम्ही बा मिसल, बा कैफियत असे लिहितो. त्या कागदांचे काय होते. कागद पुन्हा आमच्या दृष्टीस पडत नाहीत. हा काय प्रकार आहे ? ' मल्लाप्पा पोक्तपणे हसून म्हणाले, ' रावसाहेब, त्यांची आपण काळजी का करता ? ते ऑफिसमधे फायलींना चिकटले असतील. त्या फायली आपल्याकडे येतील तेव्हा येतील. असेच बा मिसल आणि बा कैफियत असे शेरे मारीत मारीत अनेक अधिकारी नोकरीच्या भव-सागरातून तरून गेले आहेत. परमेश्वरकृपेने आपणही असेच तरून जाल. ' त्याचे हे उद्‌गार ऐकून मी थक्क झालो.

या काळात मला महसूलखात्याची साधारणपणे कल्पना आली. तालुक्यावर तहसीलदार, प्रांतावर दुय्यम तालुकदार, (डेप्युटी कलेक्टर), जिल्ह्यावर अव्वल तालुकदार (कलेक्टर), रेव्हेन्यू खात्याच्या अधिकाऱ्याचे दौरे, खेड्यां-तील शेतकऱ्यांची दरवर्षी होणारी निश्चिती (जमाबंदी), खरीप, रबी, ही कोरडवाहू , आणि आबी आणि तावी ही भाताची पिके इत्यादी गोष्टींची मला सामान्यपणे कल्पना आली. पण दप्तराचे प्रोसीजर नीट समजले नाही.

एकोणीसशे तेहतीसमधे माझे वाचन विशेष झाले नाही. गोखल्यांची व्याख्याने आणि लेख, व्हाल्टर स्कॉटची ऐतिहासिक काव्ये, गिल्बर्ट मरेचे ग्रीक व्ह्यू ऑफ लाइफ, गोल्डस्मिथचे समग्र ग्रंथ, डिकन्सचे ख्रिसमस टेल्स ही पुस्तके या वर्षी माझ्या वाचनात आली. रायचूरला मराठी पुस्तके मिळणे अशक्य. पण माझ्या डायरीत रत्नगडची रंभा, वणव्यातले फूल, राजकुमारी, प्राध्यापक विजापूरकर यांचे चरित्र, गणेशमिल ही मराठी पुस्तके, रेनॉल्डस यंग डचेस,हे इंग्रजी पुस्तक, आणि परदेसकी बातें हे उर्दू पुस्तक वाचल्याची नोंद आहे.

रायचुरात वैष्णव ब्राह्मणांची वस्ती बरीच आहे. आम्हा वैष्णवांत सोवळ्या-ओवळ्याचे प्रस्थ बरेच असते. पूजा, नैवद्य, वैश्वदेव, व्रते, वैकल्ये, आराधना, पुण्यतिथ्या, भागवतसप्ताह, भजने इत्यादींचा फार प्रभाव असे. उपासतापासांत वैष्णव स्त्रियांची बरोबरी फारच थोडे समाज करू शकतील. पण बालविवाह, विधवांचे केशवपन इत्यादी चाली परवापरवापर्यंत आमच्या समाजात होत्या. स्त्रीशिक्षणाचीही उपेक्षा असे. समाजात बालविधवांची संख्याही बरीच असे. त्यामुळे भ्रूणहत्या वगैरेंचे प्रकार घडत. मी रायचूरला गेलो त्याच्या काही महिने पूर्वी रायचूरमधे भ्रूणहत्येचा एक खळबळजनक खटला जिल्हा कोर्टाच्या समोर आला होता. आरोपी विधवेची स्थिती मोठी शोचनीय झाली होती. कोर्टाच्या आवारात ती एका झाडाखाली बसून राहात असे. आणि भक्ष्याच्या भोवती कावळे जमावेत तसे लोक तिच्या भोवती गोळा होत. लोकांना तो एक तमाशाचा विषय झाला. मोठ्या खटपटीनंतर तिला संशयाचा फायदा देऊन सोडून देण्यात आले. रायचूरला मी गेल्यानंतर मला ही हकीकत कळली. मला जो क्षोभ झाला त्यामुळे मला रात्रभर झोप आली नाही. मी तळमळत बिछान्यावर पडलो होतो. शेवटी मी उठून बसलो आणि एक लघुकथा लिहून काढली. ‘ माधवी ’ त्या कथेचे नाव. साप्ताहिक निजाम–विजयात ती प्रसिद्ध झाली. माझा पहिला लघुकथासंग्रह ‘ उषा ’ हा एकोणीसशे अडतीसमधे प्रसिद्ध झाला. त्यात ती कथा आली आहे.

हैदराबाद राज्यातील त्या वेळच्या जातीय आणि सरंजामी वातावरणात, अशा गुन्ह्यांचे सामाजिक परिणामही भयानक होत. हैदराबादच्या पोलीसखात्यात मुसलमानांचे प्रमाण शेकडा नव्वदपर्यंत असे. हेच प्रमाण इतर खात्यांतूनही असे. कॉन्स्टेबल सबइन्स्पेक्टर, सर्कल इन्स्पेक्टर, पोलिस प्रॉसिक्यूटर असे हे सर्व मुसलमान असत. एखाद्या गुन्ह्याच्या आरोपावरून कोणी तरुणी पोलिस लॉकअपमधे गेली की ती धडपणे सुटून बाहेर येईल याची निश्चिती नसे. ती दिसायला बरी असली आणि तिला बाहेरच्या नातेवाइकांचा पाठिंबा नसला की तिचा धर्म आणि शील यांच्यावर केव्हा गदा येईल याचा नेम नसे. अशा स्त्रियांना पोलिस सबइन्स्पेक्टर, किंवा पोलिस प्रॉसिक्यूटर उघडउघडपणे सुचवीत की तुम्ही धर्मांतर करून आमच्याशी निका लावाल तर आम्ही तुम्हांला सोडवण्याची खटपट करू. अशा सूचनांचा परिणाम झाल्याशिवाय राहात नसे. ही अट या बाईला कबूल आहे असा इशारा वर देण्यात आला की चौकशीचे स्वरूप बदलून जाई आणि खटला काढून घेण्यात येई. आणि मग एखाद्या गुन्ह्याखाली एखादी चंद्रभागा पोलिस लॉकअपमधे गेली की ती चांदबिबी

बनून बाहेर येई आणि सरळ एखाद्या पोलिस अधिकाऱ्याशी निका लावून त्याच्या जनानखान्यात जाऊन बसे. मी रायचूरला असताना अशी दोन उदाहरणे तरी माझ्या कानावर आली. मानवी तालुक्याच्या पोलीस फौजदाराने असाच एक निका लावला होता. रायचूरच्या कलेक्टर ऑफिसमधे तो कधी कधी दिसत असे. आपली ही धर्मांतरित बायको, पूर्वी एकादश्यांचे उपवास करी आता ती तितक्याच निष्ठेने रमजानचे उपवास करते, बडी पाबंद (नेमनिष्ठ) औरत है, असे तो अभिमानाने सांगत फिरे.

आणखी एक उदाहरण बिंदाचार्य नावाच्या धर्मनिष्ठ पुराणिकाचे होते. त्याच्या मुलीवर, आपल्या नवऱ्याला विषप्रयोग करण्याचा आरोप लादण्यात आला. तिच्यावर खटला भरण्यात आला. पोलिस प्रॉसिक्यूटरने तिला सांगितले की तू माझ्याशी निका लावण्यास तयार हो. मी तुझी सुटका करीन. कोठे कळ फिरली कोण जाणे, आरोपीची सुटका झाली आणि ती पोलीस अधिकाऱ्याच्या जनानखान्यात जाऊन बसली. हा अधिकारी, ' मैं बिंदाचारीसाहब का दामाद (जावई) हूँ ' असे मिशीला पीळ देत सांगत फिरत असे.

निजामी राजवटीत असताना अशा बातम्या माझ्या कानावर आल्या की क्षोभाने मी अक्षरशः होरपळून निघत असे. आपल्या समाजात आपल्या बायकांचे रक्षण करण्याचीही शक्ती नाहीशी झाली होती.

हैदराबाद राज्यात प्रजेच्या चळवळींना सुरुवात खाजगी शिक्षण संस्थांतून झाली. हैदराबादेत विवेकवर्धिनी हायस्कूल, कन्याशाळा, धर्मवंत हायस्कूल, आंध्र हायस्कूल इत्यादि खासगी शिक्षणसंस्था होत्या. जिल्ह्याजिल्ह्यांतूनही खाजगी शाळा निघू लागल्या. औरंगाबादचे सरस्वती भवन हायस्कूल, आंबेजोगाईचे योगेश्वरी हायस्कूल, हिप्परग्याची शाळा, परभणीचे मिडल स्कूल, नांदेडचे प्रतिभानिकेतन, गुलबर्ग्याचे नूतन विद्यालय इत्यादि शाळांतूनच हैदराबादच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे कार्यकर्ते बाहेर पडले. हैदराबादच्या कर्नाटक विभागाचे पुढारी पंडित तारानाथ यांनी रायचूरला हमदर्द हायस्कूल सुरू केले. पंडित तारानाथ हे मूळचे मंगळूरकडचे. वैद्यकीय शिक्षणाच्या निमित्ताने ते हैदराबादेस आले. तेथे विद्यार्थी वर्गात त्यांनी चळवळीस सुरुवात केली. काही दिवस ते शिक्षणखात्यात होते. पोलिसांचा त्यांच्या मागे ससेमिरा लागला, तसे ते रायचूरला आले. त्यांच्या प्रयत्नाने रायचूरला हमदर्द हायस्कूल ही शिक्षणसंस्था निघाली. पंडित तारानाथांना कैद करावे असा सरकारचा हेतू होता. ही कुणकुण लागताच ते रायचूर सोडून निघाले. रायचूरपासून पंधरावीस मैलांवर दक्षिणेला तुंगभद्रा नदी आहे. नदीच्या

दक्षिणेला मद्रास प्रांताचा बल्लारी जिल्हा होता. तुंगभद्रा हे रेल्वे स्टेशनही आहे. तथूनच बारा मैलांवर आम्हा वैष्णवांचे यात्रास्थान राघवेंद्र स्वामींचे मंत्रालय हे गाव आहे. तारानाथांनी रेल्वे स्टेशनच्या जवळ एक आश्रम उघडला. आता तेथे भव्य दवाखाना आहे.

मी आणि माझे मित्र माणिकराव हे एके दिवशी रायचूरहून आगगाडीने तुंगभद्रेला गेलो. रायचूरच्या पुढचे ते दुसरेच स्टेशन. आम्ही तारानाथांची भेट घेतली, गौरवर्ण, उंच बांधा, रेखीव चेहरा असे तारानाथांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व होतें. तारानाथ हे उत्कृष्ट लघुकथालेखक, आणि समीक्षक म्हणून कन्नड साहित्यिकांत प्रसिद्ध होते. आम्ही दोन एक तास त्यांच्या सहवासात होतो. तारानाथांनी एक लघुकथा नुकतीच लिहून संपविली होती. ती त्यांनी आम्हांला वाचून दाखविली. त्यांनी आम्हांला एकोणीसशे वीसच्या हैदराबादेतील चळवळींसंबंधी बरीच माहिती सांगितली. तारानाथ हे ' प्रेम ' नावाचे इंग्रजी नियतकालिक चालवीत असत. सुमारे दहा वर्षांपूर्वी त्यांचा मृत्यू झाला.

रायचुरातील ब्राह्मण समाज हा कट्टर सनातनी होता. शिवाय त्यांच्यात उत्तराधिमठ आणि राघवेंद्र मठ असे तट पडलेले होते. आम्ही उत्तराधि मठाचे. आमच्या पंथाचे संस्थापक मध्वाचार्य आनंदतीर्थ यांनी तेराव्या शतकात प्रचार-कार्यासाठी म्हणून मठ स्थापन केले. त्यांपैकी सर्वांत मोठा म्हणजे उत्तराधि मठ. सोळाव्या शतकात या मठाची आणखी एक शाखा झाली. त्या शाखेत राघवेंद्र स्वामी हे महान् संत होऊन गेले (मृत्यू इ. स. १६७०). म्हणून त्या मठाला राघवेंद्र स्वामीचा मठ म्हणू लागले, मंत्रालय गावी राघवेंद्र स्वामींची समाधी आहे. ती सर्व वैष्णवांना सारखीच आदरणीय आहे.

या मठात राघवेंद्र मठातील मंडळींनी उत्तराधि मठातील रामाची मूर्ती नेली होती. तिला ते मूलराम म्हणत. उत्तराधि मठाच्या शिष्यांना चिडविण्यासाठी राघवेंद्र मठाचे शिष्य मूलरामो विजयते अशा घोषणा करीत.

एके दिवशी मी ऑफिसला चाललो असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या घरांच्या ओट्यावर बरीच ब्राह्मणमंडळी बसली होती. मला पाहून एका ओट्यावरच्या मंडळींनी म्हटले ' या रावसाहेब, मूलरामो विजयते ' मला या शब्दाचा संदर्भ काही कळला नाही. मी हसून पाच मिनिटे त्या मंडळीत जाऊन बसलो. तो समोरच्या ओट्यावरील मंडळीत खळबळ उडालेली मला दिसली. मला या गोष्टीचे कारण कळेना. थोड्या वेळाने मी उठून ऑफिसकडे जाण्यास निघालो. तशी समोरच्या ओट्यावरची मंडळी माझ्या मागोमाग आली. त्यांपैकी एकाने म्हटले, ' हे काय रावसाहेब, आपल्याला राघवेंद्र मठाच्या

लोकांनी पळविले की काय' मी म्हटले 'काय झाले काय?' ते म्हणाले, 'अहो, तुम्ही उत्तराधि मठाचे, तुमचे घराणे किती प्रतिष्ठित आणि तुम्ही त्या मंडळींत जाऊन बसलात. त्यांच्या मूलरामो विजयते या घोषणेची तुम्हांला चीड आली नाही काय?' तो काय म्हणतो याची मला काहीच कल्पना येईना, मूलरामो विजयते म्हटल्याने मला चीड का यावी? मी हसून पुढे चालू लागलो. असा होता हा समाज.

त्यावेळी मानवी तालुक्याचे मामलेदार शेषराव पीलखाने हे हंगामी डेप्युटी कलेक्टर म्हणून रायचूरला बदलून आले होते. पीलखान्यांचे घराणे हैदराबादेत प्रसिद्ध होते. हैदराबादेतील सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय जहागिरदार राजेरायान यांचे पीलखाने घराणे हे सल्लागार. शेषराव पीलखाने हे फर्ग्युसन कॉलेजचे पदवीधर. त्यांना साहित्याची आवड असे. मला वाटते भाटेबुवांच्या नाटकमंडळीसाठी त्यांनी ताजे वफा नावाचे एक हिंदी नाटक लिहून दिले होते. मी त्यांना भेटलो. तसे ते मला म्हणाले, 'अहो, आम्ही या संस्थानी राजवटीत खितपत पडलो आहोत ते पुरे नाही का? तुम्ही कशाला या नोकरीत आला आहात?' मी फक्त कपाळावरून बोट फिरवीत इतकेच म्हटले, 'ललाटरेषा, दुसरे काय!' शेषराव मला म्हणाले, 'या राज्यातील अन्यायाची इतकी चीड येते की काम करताना येथे डोक्यावर बर्फ ठेवावा लागतो. तुम्हांलाही तसेच करावे लागेल.' त्या वेळी मला शेषरावांच्या उद्गारांचा बोध झाला नाही. पण पुढील पंधरा वर्षांच्या निजामी राजवटीच्या अनुभवानंतर त्यांचे बोल किती यथार्थ होते याचा मला पुरेपूर अनुभव आला. शेषरावांची पुढे चारपांच वर्षांनी डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमणूक झाली. पण कामाचा चार्ज घेण्यापूर्वीच ते वारले. त्यांचा मुलगा विष्णू शेषराव (आता सेवानिवृत्त मामलेदार) याच्याशी माझे अद्यापपर्यंत स्नेहसंबंध टिकून आहेत.

माझे लग्न तीन डिसेंबर १९३३ रोजी पंढरपूरला होणार होते. मी अगदी दिवस मोजीत होतो. लग्नासाठी लागणाऱ्या पैशाची जमवाजमव वडिलांनी चालविली होती. आमच्या शेतीवाडीवरून खंडाचे काही पैसे जमले, काही कर्ज काढले, मीही काही पैसे जमविले होते. ते किती असणार? साखरपुड्याचे नव्वद रुपये मी तीन हप्त्यांत फेडले. लग्नाचे बाराशे रुपये कर्ज मी तीन वर्षे फेडीत होतो. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मी दहा दिवसांची रजा मागितली. मी कलेक्टरच्या बंगल्यावर गेलो. ते पट्टीचे पिणारे म्हणून त्यांचा लौकिक होता. मी गेलो त्यावेळी त्यांनी थोडी अधिकच घेतली असावी. त्यांचे डोळे लाल दिसत होते. मी काय सांगतो हे नीट लक्षात न येताच त्यांनी 'ऑल

राइट, यू क्यान गो ' म्हणून मला परवानगी दिली. मीही पडत्या फळाची आज्ञा म्हणून तेथून निघालो. आपण आजच्या भेटीत मला तोंडी परवानगी दिली. तीस अनुसरून मी दहा दिवसांच्या रजेवर जात आहे असे मी त्यांना लेखी कळविले.

पुणतांबेकरांचे घराणे हे मूळ पुणतांब्याचे. इ. स. १८०२ च्या होळकर गर्दीत ते पुण्याला येऊन स्थायिक झाले. माझे श्वशुर प्राध्यापक बाबासाहेब यांचे वडील नानासाहेब पुणतांबेकर हे मामलेदार होते. न्यायमूर्ती रानडे, वामन आबाजी मोडक, चिं. गं. भानू, लोकमान्य इत्यादींशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. नानासाहेब हे १९११ मधे वारले. बाबासाहेब हे इंग्लंडला जाऊन ऑक्सफोर्डचे एम. ए. आणि बॅरिस्टर झाले. त्यांनी काही दिवस उमरावतीला प्रॅक्टिस केली. तेथे त्यांचे खापर्डे आणि शेवडे या कुटुंबांशी घरोब्याचे संबंध जडले. सुरतेलाही ते काही काळ प्राध्यापक होते. १९२३–२४ च्या सुमारास ते मुंबईच्या नॅशनल कॉलेजचे प्राचार्य झाले. १९२६ मध्ये ते बनारसला इतिहास शाखेचे प्रमुख होऊन गेले.

पुणतांबेकर हे सात भाऊ. त्यांचे कुटुंब मोठे आणि नातीगोतीही महाराष्ट्रात सर्वत्र पसरलेली. त्यामुळे आमच्या लग्नाला उभय पक्षांची बरीच मंडळी जमली होती. तीन डिसेंबरचा दिवस हा माझ्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा असे मी समजतो. सुशीला मला मिळावी म्हणून मी पाच वर्षे धडपड करीत होतो. आय. सी. एस. झालो तर तिचा लाभ होईल या आशेने मी त्या परीक्षेलाही बसलो. ती आज माझी झाली. हे स्वप्न आहे की काय असे मला सारखे वाटे. लग्नानंतर होमहवन सुरू झाले. पुरोहितांनी थोडे भस्म माझ्या हातात देऊन मला म्हटले, ' यांच्या कपाळाला लावा. ' मी सुशीलेच्या दोन्ही गालांवर बोटे ठेवून तर्जनीने तिच्या कपाळावर भस्म लाविले तो पहिला स्पर्श. माझे अंग थरारून गेले. कुमारसंभवात शंकराने पार्वतीला विवाहप्रसंगी प्रथम स्पर्श केला तेव्हा त्याचे अंग थरारून गेले. जमलेल्या स्त्रीपुरुषांच्या लक्षात आपली स्थिती आली असावी या कल्पनेने शंकर गोंधळला. आपला गोंधळ लपविण्यासाठी शंकर म्हणतो काय, ' येथे हिमालयावर थंडी बरीच आहे नाही ? ' तो असे म्हणाला तरी चतुर बायका काय समजायचे ते समजल्या. माझीही अशीच काहीशी स्थिती झाली.

लग्नाचा ऐन आनंदाचा क्षण. माझ्या वडिलांचे अनेक साधु–संत मित्र होते. त्यांपैकी एकजण मौन पाळून असत. ऐन लग्नाच्या वेळी मला संदेश देण्याची त्यांना हुक्की आली. पाटीवर त्यांनी एक संदेश लिहून माझ्यासमोर धरला.

त्यांना म्हणायचे होते ' यावेळी रामाचे स्मरण करा. ' पण लिहिताना ते काय तंद्रीत होते कोणास ठाऊक. त्यांनी लिहिले होते, ' आता राम म्हणा ' मी सुखाच्या हिमालयीन शिखरावरून धाडकन खाली जमिनीवर आलो. संतांची लीला अगाध आहे हेच खरे.

बाबासाहेबांनी तुटक पत्र लिहून माझी बोळवण केली होती ही रुखरुख माझ्या मनात होती. ' होता मामलेदारीचा वशिला म्हणून मिळाली सुशीला ' असा उखाणा घेऊन मी ती रुखरुख काढून टाकली. पण आमचे श्वशुर ' मला टोचून बोलतो काय ' असे म्हणून माझ्यावर बरेच रुष्ट झाले होते.

हे लग्न म्हणजे माझ्या आयुष्यातील उषःकालच होता. म्हणून मी सुशीलेचे नाव उषा ठेवले. लग्नानंतर आम्ही दोघांनी मिळून पांडुरंगाची महापूजा बांधली. संध्याकाळी आम्ही चंद्रभागेत नावेतून सहल केली. तेथे वाळवंटावर बसून आम्ही तीनचार तास मोठ्या आनंदाने घालविले. आम्ही काय बोलत होतो हे रहस्य एक आकाशात पसरलेल्या तारकांना माहीत किंवा आमच्या पायाशी वाहणाऱ्या चंद्रभागेला माहीत.

रजा संपल्यानंतर मी रायचूरला परत आलो. उषा पुण्याला गेली. जानेवारी महिन्यात ती रायचूरला येणार होती. मोठ्या उत्कंठेने मी त्या दिवसाची वाट पाहू लागलो.

पाच जानेवारी १९३४ रोजी मी पुण्याला गेलो. त्याच दिवशी संध्याकाळच्या गाडीने मी माझ्या पत्नीला घेऊन रायचूरला परत आलो. १९३४ चा जानेवारी महिना हा आमच्या मधुचंद्राचा काळ होता. या काळात मी अक्षरशः हवेत तरंगत होतो. माझ्या सुखात कशाचीही कमतरता नव्हती. मीलनाची रात्र, चांदणे सर्वत्र पसरलेले, जवळ प्रेयसी. एका शब्दात सांगायचे तर परमेश्वराची माझ्यावर पूर्ण कृपा होती.

शबे वस्ल थी, चांदनीका समा था
बगल में सनम था, खुदा मेहरबां था

उर्दू कवी अतिश याने वर्णने केले आहे तशी माझी स्थिती झाली होती. आपल्याला कविता करता येत नाही याची मला नेहमी रुखरुख असे. ती उणीव मी शेकडो मराठी कविता पाठ करून भरून काढली होती. इ. स. १९४३ पर्यंत तरी माझा मराठी काव्याचा अभ्यास सतत चालू होता. त्यानंतर मी इतिहासाकडे वळलो. आमच्या कौटुंबिक सुखाच्या अनेक प्रसंगांवर समर्पक अशा मराठी ओळी सारख्या माझ्या तोंडात असत. उषाला या गोष्टीची खूप गंमत वाटे. आज छत्तीस वर्षांनंतरही त्या वेळी माझ्या तोंडी खेळणाऱ्या

कितीतरी कविता अद्यापि आठवतात. त्यातील दोन चार कवितांनी मी त्यावेळी किती आनंदात होतो याची कल्पना यावी. श्रीकृष्ण गाडगिळांची लाजाळूचे झाड ही कविता

तुझ्या अंगा थोडा जरिहि ! घडला स्पर्श परका
क्षणार्धी तू घेशी शरमुनि बहू गोड मुरका
कला संकोचाची तव उचलली गे युवतिंनी
वसे त्यांच्या अंगी अमित रमणीयत्व म्हणुनी

किंवा

नेत्र कटाक्षा फेकोनी,
कोण हासते तेथोनी ?
शीतल किरणे हास्याची,
कोण उधळितें ती साची
मनिच्या चिंता इवल्याशा
होउनि जाती त्या कैशा
धवल वस्त्र ल्याली रमणी,
सांग कुणाची ही राणी
मोद पसरला चोहिकडे,
कुणामुळे तो सांग गडे

किंवा

मोत्यांचे सर की जणू विलसती ती शुभ्र दंतावली
चिंचोळी हनु कोवळी तिजवरी ती गोजिरीशी खळी,

पत्नीशी काव्यशास्त्रविनोद करताना मी झाडून सारे मराठी कवी वेठीस धरले होते. तांबे, गोविंदाग्रज, बालकवी माधव ज्यूलियन, गिरीश, रेव्हरंड टिळक, इत्यादि प्रसिद्ध कवी तर झालेच. पण द. भ. रणदिवे यांच्यासारखेही काहीसे अज्ञात असे कवीही माझ्या वाचनातून सुटले नाहीत. एकदा उषाने माझे डोळे झाकले. तोच आमचे पाठांतर उसळून बाहेर आले. आणि रण-दिव्यांच्या ओळी तोंडातून बाहेर पडल्या.

सुरललना ज्या सुमकलिका।
अभिनवशिरी धरिती रसिका
दैवे तेथुनि त्या गळुनी,
ठेल्या का या मम नयनी

स्पर्श सुधेचा हा अथवा,
चंद्रखंड गळले किंवा
सुखसिंधूच्या बा लहरी
अवचित चढल्या येथवरी
भान मला माझेच नसे,.
ते सुख मग मी वर्णु कसे
जिकडे तिकडे आनंद,
जग म्हणजे ब्रह्मानंद
याहुनि हतविधि, कसला साधी,
अन्य समाधि
सेवुनि योगी वनवास,
नच जेथे ललनावास

माझ्या आयुष्यात उषा आल्यामुळे आमच्या देशस्थी राहणीत झटपट बदल होऊ लागला. स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा ही जिकडे तिकडे दिसू लागली. आमच्या संथ जीवनावरून चोखंदळपणाचा आणि रसिकतेचा हात फिरू लागला. माझे जीवन बदलू लागले.

आमचा हा मधुचंद्र फार दिवस टिकला नाही. १९३४ च्या फेब्रुवारीत मला महसूलखात्याच्या तपशीलवार ट्रेनिंगसाठी आलमपूर तालुक्यावर जावे लागले. रायचूरला प्लेग सुरू झाल्यामुळे माझे आईवडील उषाला घेऊन मंत्रालयाला गेले. लहानपणी मला अनुष्ठानासाठी जेथे जावे लागले ते तुंगभद्राकाठचे राघवेंद्र स्वामींचे मंत्रालय ते हेच.

फेब्रुवारीच्या सुरवातीला मी आलमपूरला पोहोचलो. कृष्णा आणि तुंगभद्रा या नद्यांचा संगम याच तालुक्यात होतो. रेणुका, एकवीरा यांना तेलगूमधे यल्लम्मा म्हणतात. त्यावरून या गावाला यल्लम्मापूर हे नाव पडले. मुसलमानी अमदानीत त्याचे आलमपूर झाले. रायचूर जिल्हा हा कानडी भाषिक आहे. पण त्या जिल्ह्यातील हा एकच तालुका तेलगू भाषिक होता. आल्मपूर हे तुंगभद्रेच्या काठावर वसले असून, नदीलगतच्या किल्ल्यावरून समोरचा देखावा मोठा रमणीय वाटतो. आलमपूर हे शैवांच्या पाशुपत पंथाचे मोठे केंद्र होते. तेथील धार्मिक विद्यापीठाची कीर्ती हिंदुस्थानभर पसरली होती. आलमपूरच्या मठात विद्यापीठांच्या कुलगुरूंचे पुतळे अद्याप आढळतात. ही गोष्ट मला इतरत्र कोठेच दिसली नाही. मी गेलो त्यावेळी आलमपूरची कीर्ती तेथील उत्कृष्ट खरबुजांच्यामुळे सर्वत्र गाजत होती.

माझे आजोबा हे इ. स. १८८० मधे आलमपूरच्या मामलेदार कचेरीत अव्वल कारकून होते. त्या वेळीं माझ्या वडिलांचे वय दहा वर्षांचे होते. विजापूर जिल्ह्यातील कारजोळ गावी आमच्या इनाम जमिनी होत्या. तेथील देशपांडे घराण्याशी आमचे दोनतीन पिढ्यांपासून नात्याचे संबंध होते. वेंकटराव देशपांडे कारजोळकर यांना माझी सख्खी आत्या दिली होती. वेंकटराव हे इ. स. १८८० मधे आलमपूर जवळच्या एका खेड्यात कस्टम खात्यात कारकून होते. त्यांची बहीण आपल्या धाकट्या मुलाला (माझे वडील) करून घ्यावी असा माझ्या आजोबांचा बेत होता. पण मुलीच्या वडिलांची (राजारामपंत देशपांडे) इच्छा आपली मुलगी माझे थोरले चुलते अप्पासाहेब यांना द्यावी अशी होती. माझ्या वडिलांना ते भोळसर समजत. माझ्या आजोबांनी राजारामपंत आणि त्यांची पत्नी यांना आलमपूरला बोलावून घेतले. मुलगी त्यांच्याबरोबर होती. आजोबांच्या मागणीला त्यांनी साफ नकार दिला व रात्रीच्या वेळीं ते आलमपूर सोडून पळाले. दुसऱ्या दिवशी सकाळीं माझ्या आजोबांना ही बातमी कळली. त्यांनी मामलेदारांना सांगून त्यांच्या पाठलागावर तालुका कचेरीच्या खजिन्यावरील अरब पहारेकरी पाठविले. राजारामपंत, त्यांची पत्नी आणि मुलगी (माझी सावत्र आई बहिणाबाई) यांना पकडून आलमपूरला आणण्यात आले. अरब शिपायांच्या पहाऱ्यात माझ्या वडिलांचे आणि बहिणाबाईचे लग्न लावण्यात आले. राजारामपंत आणि त्यांची बायको ही खेड्यातील माणसे या मोगलाई दंडेलीपुढे घाबरून गेली. पण बहिणाबाईच्या आईचा तळतळाट झाला. मंगलाष्टकाच्या अक्षता जोडप्यावर टाकण्यास तिला सांगण्यात आले. तेव्हा तिने मूठभर माती त्यांच्यावर उधळली. लग्न पार पडले. ही माझी सावत्र आई इ. स. १९०५ मधे प्लेगने वारल्यावर माझ्या वडिलांनी कळंब (उस्मानाबाद जिल्हा, मराठवाडा) येथे दुसरे लग्न केले. माझी सावत्र बहीण यमनाक्का हिचे माझ्यावर जिवापाड प्रेम होते. ती १९२० मधे वारली.

माझ्या वडिलांच्या पहिल्या लग्नाची हकीकत इ. स. १८८० मधे आलमपूरला घडली. मी १९३४ मधे आलमपूरला गेलो तेव्हा माझ्या वडिलांच्या लग्नात हजर असलेले दिंडोरी शेषाचार्य हे पुरोहित हयात होते. त्यांच्या तोंडून लग्नाची हकीकत ऐकून मला मोठी गंमत वाटली.

आलमपूर हा हैदराबाद राज्यातील सर्वांत लहान तालुका. अवघ्या सहेचाळीस खेड्यांचा हा तालुका. कृष्णा आणि तुंगभद्रा या नद्यांच्या काठावरच्या जमिनी या कोरडवाहू होत्या तरी सुपीक होत्या. भुईमूग, तंबाखू इत्यादींची पैदास चांगली होई. त्यामुळे शेतसाऱ्याच्या वसुलीसाठी मामलेदाराला (तहसीलदार)

कधीच त्रास पडत नसे. मामलेदाराचा दौरा म्हणजे नदीकाठचे पिकनिकच म्हणाना ! कचेरीत खटलेही क्वचितच येत. गावात अववे दोनच वकील होते. त्यांपैकी एकजण काही कामासाठी हैदराबादेस गेला की, खटल्याची तारीख लांबणीवर पडे. कचेरीचे काम दोन तीन तासांहून अधिक वेळ चालत नसे. तालुक्याच्या मुन्सफ कोर्टाचीही हीच तऱ्हा होती. आमचे तहसीलदार इब्राहीम अलीखान म्हणजे भला माणूस. त्याचें वय साठाच्या जवळपास असावे. त्या काळात आपली वये कमी दाखवून नोकरी करणाऱ्यांची संख्या बरीच होती. त्यांपैकी तो एक असावा. महसूल खात्याचे काम शिकण्यासाठी माझी नेमणूक त्याच्याकडे झाली होती. तो मला म्हणे, ' माधवराव, काम शिकण्याचा तुम्हांला इतका सोस काय म्हणून ? अहो तहसीलदार म्हणून काम करू लागलात की खुर्ची स्वतः शिकवील, कुर्सी खुद सिखाती है. आलमपूरला आहात तोपर्यंत इथल्या खरबुजांचा स्वाद घ्या. संध्याकाळी क्लबात चला. तुंगभद्रेचा देखावा पाहा. काम काय आपोआप होत राहते. '

इब्राहीम अलीखानाची बायकामुले हैदराबादेत असत. ते स्वतः आलमपूरला एकटेच राहात. मी सकाळी दहाच्या सुमारास त्यांच्याकडे जाई. नंतर ते ऑफिस-कडे येण्यास निघत. पुढे दोन शिपाई, मागे दोन शिपाई; त्यांपैकी एकजण कलम-दान (ऑफिसची पेटी) वाहून नेत आहे, एकाने त्यांच्यावर छत्री धरली आहे, अशा थाटात ते ऑफिसला जात. ऑफिसमध्ये ते मला जवळ बसवून गप्पा मारीत आणि त्यातून वेळ निघाला तर कामाची माहिती देत. त्यांच्यामुळे मला महसूलखात्यात रूढ असलेले उर्दू शब्द पाठ झाले.

हैदराबाद राज्यातील मुसल्मानांना उर्दू बोलताना विनाकारण अवघड फार्सी शब्द वापरण्याची सवय असे. अशा माणसाचे विद्वान म्हणून कौतुक होई. सुदैवाने माझा फारसीचा अभ्यास असल्यामुळे मला तसे बोलणे जड गेले नाही. पण अलाहजुल कयास (याप्रमाणे), चुनांचे (म्हणून) बादीउन्नजर (सकृद्दर्शनी), जुंबेदारी (मन हेलकावे खाणे), मिकियासुल्मितर (पाऊस मोजण्याचे यंत्र), इत्यादि शब्द तोंडात बसण्यास साहजिकच वेळ लागला.

इब्राहीम अलीखान ऑफिसमधे बारा साडेबारापर्यंत बसत. एखादा खटला सुनावणीला निघे आणि वकील हजर नसल्यामुळे लांबणीवर पडे. जिल्ह्याचे आणि इतर कचेऱ्यातून आलेले टपाल पाहून होण्यास फक्त दहा पंधरा मिनिटे लागत. आलमपूर हे रेल्वे स्टेशनपासून पाच मैलांवर होते. त्यामुळे रायचूरहून येणारा कोणीही वरिष्ठ अधिकारी आधी कळविल्याशिवाय आलमपूरला येण्यास धजत नसे. बरे, हैदराबादेहून येणाऱ्या आणि हैदराबादला जाणाऱ्या गाड्यांचे

क्रॉसिंग आलमपूर रोड स्टेशनला होई. त्या दोन्ही गाड्या पाहून दुपारी साडेबाराच्या सुमारास स्टेशनहून गावात येणारी बस सुटे. ती एकच्या सुमारास गावात येई. बस स्टँडवर आमच्या कचेरीचा शिपाई बसलेला असे, बसमधील उतारूंना पाहून तो धावत धावत कचेरीत येई आणि इब्राहीम अलीखानाला म्हणे, 'सरकार, आज रायचूर का कोई ओहदेदार बस पेसे नहीं उतरा. आज रायचूरहून कोणी अधिकारी बसमधून उतरला नाही.' हे ऐकताच इब्राहीम अलीखान आपल्या जागेवरून उठत आणि मला म्हणत, 'चलिये माधवराव, अब कचेरी बंद, चला माधवराव, आता ऑफिस बंद. उद्या दुपारी एक वाजेपर्यंत कोणी वरिष्ठ अधिकारी आलमपूरला येईल याची काळजी नाही.'

आम्ही ऑफिस सोडीत असू. इब्राहीम अलीखान घरी जाऊन झोप काढीत. मीही माझ्या बिऱ्हाडावर येऊन विश्रांती घेई. संध्याकाळी आम्ही तुंगभद्राकाठच्या क्लबात जात असू. तेथे गप्पागोष्टी, टेनिस, कॅरम, पत्ते हे खेळ आणि खर्बुजे खाण्याचे कार्यक्रम हे नियमितपणे पार पडत. मला वाटे काय सुखाची नोकरी आहे ही! आमच्या मामलेदारीची ग्रेड म्हणजे दोनशेपासून चढत चढत चारशेला संपावयाची. हिंदू अधिकाऱ्यांना हैदराबाद राज्यात बढतीची आशा नसे. मग ते कितीही काम करोत. मुसलमान अधिकाऱ्यांना बढती ही मिळायचीच. मग ते काम करोत अगर न करोत! यामुळे हिंदू काय, मुसल्मान काय, काम करणारे अधिकारी क्वचितच आढळून येत. मला वाटे, बढती आपल्या नशिबी नाही तर आलमपूरसारखा लहान तालुका आपल्याला मिळावा म्हणजे कामाचे श्रम विशेष पडणार नाहीत आणि काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्, या उक्तीप्रमाणे आपला काळ घालवीत निजामी नोकरीच्या भवसागरातून पार होऊ. आलमपूर हा पाच हजार वस्तीचा गाव. गावात एक माध्यमिक शाळा होती. सुशिक्षित माणसे अगदी कमी होती. पण याच आलमपूरमधे उर्दूचा एक प्रख्यात हिंदू कवी राहात असे. राघवेंद्रराव हे आलमपूरला वकील होते. त्यांच्या उर्दू कविता सगळ्या हिंदुस्थानभर गाजल्या होत्या. त्यांचे कवितेतील नाव जज्ब (आकर्षण) असे होते. सर्वत्र त्यांना जुज्ब राघवेंद्रराव या नावानेच ओळखत. त्यांच्या माझ्या नेहमी गाठीभेटी होत. पुढे कित्येक वर्षांनी त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. या कामात त्यांना अबुल्कलाम आजाद यांनी साहाय्य केले होते.

याच म्हणजे फेब्रुवारी महिन्यात रायचूरचे दुय्यम तालुकदार (डेप्युटी कलेक्टर) अब्दुल्लाखान हे आलमपूरला फिरतीवर आले. जमाबंदीच्या कामासाठी मी त्यांच्याबरोबर खेड्यापाड्यांतून हिंडलो. अब्दुल्लाखान हे कामात वाकबगार असून तडफदार होते. १९४८ मधे ते गुलबर्ग्यास सुभेदार (कमिशनर)

असताना पोलिस ॲक्शनपूर्वी गुलबर्ग्यात दारुगोळा साठवून ठेवल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन त्यांना प्रथम सस्पेंड आणि नंतर सेवानिवृत्त करण्यात आले. अब्दुल्लाखानांना शिकारीचा बराच नाद असे. त्यांना इंग्रजीचे ज्ञान नव्हते. पण ही उणीव ते भासू देत नसत.

मी दौऱ्यावर असताना होळीचे दिवस जवळ आले. उषा माझ्या आईवडिलांबरोबर मंत्रालयाला राहात होती. तिकडे जाण्याची मला सारखी ओढ लागली होती.

डेप्युटी कलेक्टरांनी मला तीन दिवसांची रजा दिली. मला त्याच दिवशी मंत्रालयाला पोहोचायचे होते. मी दुपारी बारा वाजता आलमपूरहून घोड्याच्या टांग्यात बसून निघालो तो दुपारी तीनच्या सुमारास कर्नूलला लागून वाहात असलेल्या तुंगभद्रेच्या काठावर पोहोचलो. तेथे मी नावेतून नदी ओलांडली आणि कर्नूल गावात आलो. तेथे मला अधोनीला जाणारी बस मिळाली. बसने सत्तर मैलांचा प्रवास करून मी संध्याकाळी सहा वाजता अधोनीला पोहोचलो. लगेच मला मद्रासहून मुंबईकडे जाणारी मेल मिळाली. सात वाजेपर्यंत मी तुंगभद्रा स्टेशनला पोहोचलो. आणि पुढील बारा मैलांचा प्रवास बैलगाडीने करून मी रात्री बाराच्या सुमारास घरी पोहोचलो. त्या एका दिवसात घोडागाडी, नाव, बस, आगगाडी आणि बैलगाडी अशा सर्व वाहनांचा वापर करून मी बारा तासांत मंत्रालय गाठले.

तुळशीदासाने आपल्या बायकोला भेटण्यासाठी अशीच धडपड केली. इतके करून तो आपल्या पत्नीला भेटला तेव्हा त्या मूर्ख बाईने त्याला काय म्हणावे 'अशीच ओढ तुम्ही भगवंताबद्दल दाखविली असती तर!' या एका वाक्याने तुळशीदासाचा संत तुळशीदास झाला. त्याच्या बायकोला मात्र जन्मभर त्याचा विरह सहन करावा लागला. म्हातारपणी तुळशीदासाची गाठ पडल्यावर तिने तळतळाटाने उद्‌गार काढले, 'भगवान को भक्त मिला, लोगोंको महात्मा मिला, मुझे क्या मिला?' सुदैवाने मला हा अनुभव आला नाही. जो आला तो निराळाच. मंत्रालय हे नदीकाठचे खेडे, तीर्थक्षेत्र. घरे सुमार आणि जुनी. मंत्रालयाला घराघरातून विंचू फार निघत. मी खोलीत जाऊन दार लावून घेतले. पुढील सुखाच्या कल्पनेची मला धुंदी चढली होती. इतक्यात उषा ओरडली, 'अहो, तो पहा विंचू.' मी ताडकन शुद्धीवर आलो. पाहतो तो कोपऱ्यात एक मोठा विंचू डौलाने नांगी वर करून चालला होता. मी जागेवरून न हलताच जवळ असलेली चप्पल उचलली आणि विंचवावर मारली. त्याच क्षणी त्याचा निकाल लागला.

'स्ट्रीटकार नेम्ड् डिजायर' या प्रसिद्ध नाटकात एक गमतीदार प्रसंग वर्णिला आहे. नायकाची बायको आपल्या बहिणीला लग्नाच्या पहिल्या रात्रीचा अनुभव सांगताना म्हणते, 'त्या रात्री खोलीतील दिवे विझता विझेनात. शेवटी माझ्या नवऱ्याने चप्पल घेऊन एकेक दिवा फोडून टाकला.'

'काय म्हणतेस ?' तिची बहीण विचारते, 'तुझ्या नवऱ्याची ही पाशवी वागणूक तुला सहन झाली तरी कशी ?'

'सहन ?' बहीण म्हणाली, 'ते दृश्य पाहून कौतुकाने माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. आय वॉज सिंप्ली थ्रिल्ड.'

मी विंचू मारल्यावर माझ्या पत्नीच्या बाबतीत हाच अनुभव मला आला.

मंत्रालयाला राघवेंद्र स्वामींचें देऊळ मोठे आहे. देवळाचे आवार मोठे आणि प्रशस्त आहे. तुंगभद्रेचा हा परिसर अतिशय रमणीय आहे. नदीवर सकाळ-संध्याकाळ स्नान करणाऱ्यांची गर्दी असे. धर्मनिष्ठ वैष्णव स्त्री-पुरुषांच्या व्रतवैकल्यांना, उपासतापासांना अंत नसतो. देवळातही भाविकांची, अनुष्ठाने करणाऱ्यांची सारखी गर्दी असे. या खेपेस उषा माझ्याजवळ असल्यामुळे मी मंत्रालयाला मोठ्या प्रसन्न मनःस्थितीत होतो. राघवेंद्र देवळात रोज संध्याकाळी आम्ही प्रसन्न मनाने जात असू. याच देवळात मी लहानपणी अनुष्ठाने केली, उपास केले आणि राघवेंद्र स्वामी, या अनुष्ठानातून मला सोडवा अशी करुणा भाकली होती. आता त्या गोष्टी जुन्या झाल्या होत्या. आता देवळातील पूजा, आराधना, मंगलारती आणि हरघडीचे उत्सव हे पाहण्यात आम्ही रमून गेलो. सकाळ-संध्याकाळ आम्ही तुंगभद्रेच्या काठावर बसून भविष्याची चित्रे रंगवीत असू.

१

जोगीपेठ–हुजूरनगर
१९३४ ते १९३५

माझा धाकटा भाऊ गुरुमध्व हा माझ्या आईवडिलांबरोबर मंत्रालयात राहात होता. लहानपणी आमचे खासगी शिक्षक कर्दनकाळ विनायकराव यांच्याकडून मिळत असलेल्या बेदम मारामुळे असो किंवा १९२३ मध्ये तिरुपतीजवळच्या गोविंदराज पट्टणमधील गोविंदराजाच्या मंदिरात दिव्याच्या खांबाला डोके आपटून मार लागल्यामुळे असो, गुरुमध्वाला अपस्माराचा रोग जडला होता. फेफरे येऊन तो कोठे बेशुद्ध पडेल याचा नेम नसे. मी आलमपूरला होतो त्या वेळची गोष्ट. उषा आणि गुरुमध्व ही तुंगभद्रेवर गेली होती. गुरुमध्व पाण्यात उतरला. उषा काठावर कपडे धुण्यात गुंतली होती. इतक्यात गुरुमध्वाला फीट आली आणि तो पाण्यात पडला. त्याचे डोके पाण्याखाली गेले. उषाने एक क्षणाचाही विलंब लावला नाही. ती धावत धावत पाण्यात गेली आणि ति गुरुमध्वाचे डोके उचलून पाण्यावर धरून ठेवले. चार पाच मिनिटांनी तो अर्धवट शुद्धीवर आला तसे तिने त्याला ओढून काठावर आणून टाकले. मी मंत्रालयाला गेल्यावर मला ही हकीकत कळली.

उषाने दाखविलेल्या प्रसंगावधानाबद्दल तिचे किती कौतुक झाले असेल याची कल्पना केलेली बरी.

रजा संपल्यावर मी आलमपूरला परत आलो. एक दोन आठवड्यांतच माझे ट्रेनिंग संपून माझी नेमणूक तेलंगणात मेदक जिल्ह्यातील जोगीपेठ या तालुक्यावर मामलेदार म्हणून झाली. दहा एप्रिल १९३४ ला मी जोगीपेठ तालुक्याच्या कामाचा चार्ज घेतला. थोड्याच दिवसांनी मी मंत्रालयाला परत गेलो. १९३४ च्या रामनवमीच्या दिवशी मी उषाला बरोबर घेऊन मंत्रालय सोडले आणि दोन दिवसांत जोगीपेठला पोहोचलो. माझे आईवडील पंढरपूरला परत गेले.

अलाहाबाद सोडून मला एक वर्ष झाले होते. या एका वर्षात माझ्या जीवनात किती बदल झाला होता! नोकरी मिळाली, घरच्या मंडळींना मदत करण्याची संधी मिळाली. लग्न होऊन मनासारखी पत्नी लाभली. अभ्यास आणि वाचन हे मात्र कमी झाले. गेल्या एक वर्षात मी पाच-पंचवीसच्या वर पुस्तके वाचली नसावीत. फेब्रुवारी १९३३ मध्ये मी अलाहाबाद सोडले तोपर्यंत मी वाचून काढलेल्या इंग्रजी पुस्तकांची नोंद माझ्या डायरीत आहे. माझ्या वयाच्या तेविसाव्या वर्षापर्यंत मी वाचलेल्या इंग्रजी पुस्तकांची संख्या चारशे चाळीस होती. या यादीत मी शेक्सपीयर, वर्डस्वर्थ, बायरन, कीट्स, शेले, शेरिडन इत्यादींच्या समग्र वाङ्मयाला एक एकच ग्रंथ म्हणून धरले आहे. ती पुस्तके वेगळी केली तर ग्रंथांची यादी सहाशेपर्यंत सहज जाईल. मराठी पुस्तके दोनशेच्यावर गेली नसावीत. उर्दू, हिंदी फारसी मिळून शंभरपर्यंत पुस्तके वाचून झाली. कॉलेज-जीवन संपेपर्यंत एकंदरीत नऊशे पुस्तके मी वाचून काढली होती. १९२५ ते १९३३ पर्यंत माझी वर्षाला शंभर पुस्तके वाचून होत.

पण नोकरीला लागल्यानंतर वाचनाचे प्रमाण कमी होऊ लागले. १९३३ पासून १९५६ च्या अखेरीस मी मुंबईला येईपर्यंत म्हणजे तेवीस वर्षांच्या काळात तीनशेच्याऐंशी इंग्रजी पुस्तके वाचून झाली. याच काळात मी वाचलेल्या मराठी पुस्तकांची संख्या सहाशेवर गेली. कॉलेजमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. ती आवड हीच मला कॉलेजमधून मिळालेली मोठी देणगी असे मी समजतो.

मी जोगीपेठला जाऊन कामावर रुजू झालो.

हैदराबाद राज्य हे त्रिभाषिक होते. राज्याच्या सतरा जिल्ह्यांपैकी नऊ तेलगू भाषिक, तीन कानडी भाषिक जिल्हे आणि पाच मराठी भाषिक जिल्हे अशी विभागणी होती. उर्दू ही राजभाषा होती. जोगीपेठ हे गाव हैदराबादपासून चौपन्न मैलांवर असून मेदक या तेलगू भाषिक जिल्ह्यात होते.

आमचे कलेक्टर (त्यांना अव्वल तालुकदार म्हणत) जहीर यार जंग यांना इंग्रजी मुळीच येत नसे. मी प्रथम त्यांना भेटण्यास गेलो तेव्हा मला ही गोष्ट माहीत नव्हती. मी त्यांच्याशी इंग्रजीतून बोलू लागलो. ते नुसते मान डोलावून मधून मधून यस नो करीत, प्रथम मला त्याचे काहीच वाटले नाही. पण भलत्या ठिकाणी यस आणि नो ते म्हणू लागले तेव्हा मी थोडा गोंधळलो. त्यांना भेटून मी बाहेर आलो. त्यांच्या कारकुनाने मला सांगितले, ' साहब, आपने बडा गजब किया, तालुकदारसाब को अंग्रेजी बिलकुल नहीं आती. ' मग मला नबाब जहीर यार जंगांच्या यस नो चा उलगडा झाला !

जहीर यार जंग यांचे आणि माझे विशेष पटले नाही. हैदराबादेतील जुन्या वळणातील अधिकाऱ्यांना शिष्टाचाराचे विलक्षण महत्त्व वाटे. शिक्षणासाठी म्हणून माझी सात वर्षे हैदराबाद राज्याच्या बाहेर गेली असल्यामुळे मी दरबारी शिष्टाचारात विशेष मुरलो नव्हतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वागताना पाळण्याचे काही विशेष संकेत असत. डोक्यावरची टोपी कधी काढायची नाही. पायावर पाय ठेवून बसायचे नाही. अधिकारी उठला तर आपण उठून उभे राहावे, त्यांना उद्देशून बोलताना जनाबेवाला; वाला जनाब, आली जनाब, असे शब्द वापरावे. अधिकारी काही बोलला की बजा इर्शाद (योग्य आज्ञा), काही विनंती करायची असली तर अर्जे खिदमत है, सेवेशी विनंती आहे, किंवा मारुजा है, विनंती आहे, आता परवानगी द्यावी म्हणायचे तर हाजिर होता हूँ, किंवा इजाजत है असे किती तरी संकेत पाळावे लागत. हे आणि असे शिष्टाचार शिकण्यास मला थोडा वेळ लागला. जहीर यार जंगांना माझी मोकळी वागणूक आवडली नसावी. त्यांना उद्देशून बोलताना मी त्यांना नवाबसाहेब म्हणून संबोधले. मी जनाबेवाला म्हणायला हवे होते. त्यांच्यासमोर बसल्यावर मी डोक्यावरची टोपी काढून मांडीवर ठेवली ही गोष्ट त्यांना आवडली नाही. अशा लहानसहान चुका माझ्या हातून घडल्या, त्या त्यांनी मनात ठेवल्या. माधवरावको आदाबे मजलिससे अभी वाकफियत नहीं है, माधवरावांना बैठकीतील शिष्टाचारांचा अद्याप परिचय झालेला दिसत नाही, असे उद्गार त्यांनी काढल्याचे माझ्या कानांवर आले.

उत्तर भारतात उर्दू बोलणारे हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजांतील लोक आहेत. आपले धार्मिक आणि सांस्कृतिक संस्कार व्यक्त करताना मुसलमान फारशी किंवा अरबी शब्द वापरतात आणि हिंदू संस्कृत किंवा हिंदी शब्द वापरतात. उर्दू साहित्यातही असेच संकेत रूढ आहेत. याची हवी तितकी उदाहरणे मुन्शी प्रेमचंदाच्या उर्दू कादंबऱ्यातून आपल्याला आढळून येतात.

हैदराबादेत असे शब्द कमी वापरले जात. सर्वसाधारण समजत अशी की, उर्दूत बोलतो आहोत ना—मग अल्लाह, खुदा इत्यादि शब्द येणे अपरिहार्य आहे. हिंदू माणसेही उर्दू बोलताना असे शब्द वापरणे हा उर्दूचा प्रकृतिधर्मच आहे असे समजत. फार काय जुन्या पिढीतील हिंदू माणसे उर्दूतून पत्रे लिहिताना शीर्षकाच्या श्री किंवा ओमूच्या ऐवजी ७८६ हा आंकडा लिहीत. उर्दू; फारसी; अरबी या भाषांतून प्रत्येक अक्षराला एक आकडा दिलेला असतो वर दिलेल्या आकड्यांतून या रसल (हे पैगंबरा) हा शब्द तयार होतो. वास्तविक पाहता असा दंडक कोणी घातलेला नव्हता, पण अशा प्रकारच्या उर्दू लेखनाची हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सवय झाली होती.

याचा अनुभव मला लवकरच आला. हैदराबाद राज्यात वर्षातून दोनदा शेतसारा वसूल करीत. एक खरीप पिकाच्या हंगामानंतर, दुसरे रबीच्या हंगामानंतर. वसुलीच्या तारखा ठरलेल्या. तारखेवर शेतसारा वसूल झाला की आम्हांला कलेक्टराकडे रिपोर्ट करावा लागे. रिपोर्ट लिहिताना परमेश्वराच्या कृपेने आणि सरकारच्या भाग्याने तालुक्याचा शेतसारा रुपये आणेपैसुद्धा संपूर्णपणे वसूल झाला असे उर्दूतून लिहावे लागे. 'अल्लाहके फजलसे और सरकार के इक्बालसे मालगुजारी रुपिये, आने, पैसे बेबाक वसूल हुयी.' रिपोर्टाचा मसुदा मला पटला नाही. अल्लाह, फजल आणि इकबाल हे शब्द मी काढून टाकले व त्याऐवजी भगवान की कृपासे, और सरकार के आशीर्वाद से हे शब्द वापरले.

या माझ्या शब्दप्रयोगाचा आमचे कलेक्टर, नबाब जहीर यार जंग यांना कोण संताप आला. एकदा मी जिल्हा कचेरीत गेलो असताना ते मला म्हणाले, 'माधवराव, ही काय उर्दू भाषा झाली! अल्लाच्याऐवजी भगवान, फजलच्या ऐवजी कृपा हा काय शब्दप्रयोग आहे? ही काय उर्दू आहे?' मी म्हटले, 'साहेब, आपापल्या धर्माप्रमाणे लोक उर्दू भाषेत अशा शब्दांचा वापर करतात. अलाहाबाद लखनौकडे अशी भाषा सर्रास वापरतात.'

'असेल असेल,' नवाब जहीर यार जंग म्हणाले, 'लेकिन आपको यह जानना चाहिये के यहां की दफ्तरी जबान उर्दू है.'

मी गप्प बसलो.

ट्रेनिंगच्या काळांत मी महसूलखात्याची माहिती करून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण तो जुजबी स्वरूपाचा होता. त्यामुळे त्या खात्यात रूढ असलेली परिभाषा हस्तगत करताना सुरवातीला माझी तारांबळ उडाली. सरकारी फळ-झाडांचा वार्षिक लिलाव करताना त्या त्या वर्षी त्या झाडाला किती रुपयांची

फळे येण्याचा संभव आहे याचा अंदाज करीत. त्याला महसूल खात्याच्या परिभाषेत अंचना म्हणत. आमच्या काव्यप्रकृतीला तेवढाच विषय मिळाला. मला वाटे अंचना म्हणजे अंचल (पक्ष) आंब्याच्या झाडाचा पदर, चिंचेच्या झाडाचा पदर. सीताफळांच्या झाडांचे अंचल. अहाहा क्या बात है! तेलंगणात तीस हजारांच्यावर तलाव होते. त्यांच्या खाली दहा लाख एकर जमिनीत तरी भात पिकत असावा. जिकडे पहावे तिकडे हिरवी गर्द भातशेते आणि रम्य तलाव. सगळे तेलंगण म्हणजे अजस्र जलाशयावर काढलेली हिरव्या शेतांची रांगोळीच म्हणाना. प्रत्येक तलावाखाली होणाऱ्या भातशेताचे क्षेत्रफळ ठरलेले असे. या क्षेत्रफळाला तेलंगणांत आयाकट म्हणत. मला वाटे आयाकट म्हणजे अनीकट (पूल). तलावाच्या बांधाची लांबी रुंदी याला अनीकटच्या ऐवजी आयाकट म्हणत असावेत. आमचे सुभेदार (रेव्हेन्यू कमिशनर) दाराब जंग दाराबजी चिनाय हे पारशी होते. गृहस्थ अतिशय सज्जन. ते फिरतीवर म्हणून जोगपेठला आले. त्यांनी मला विचारले, ' माधवराव, अंदोलच्या तलावाचा आयाकट (तलावाखालील भातशेताचे क्षेत्रफळ) काय आहे ? ' मी म्हणणारच होतो, ' इतके इतके फर्लांग. ' तोच माझे पेश्कार (अव्वल कारकून) युसूफ हुसेन खान यांनी माझ्या कानात म्हटले ' इतके एकर आणि इतके गुंठे ' मी सुभेदारांना ती माहिती दिली. फजितीची वेळ आली होती. पण थोडक्यात निभावले. आमचे सुभेदार मोठे चाणाक्ष आणि अनुभवी. एकदा ते तपासणीस आले असताना आमचे अज्ञान उघडे पडले. जूनच्या पावसानंतर ज्वारी पिकवतात. ती खरिपाची ज्वारी. तिला पिवळी ज्वारी म्हणतात. हिवाळ्यातील पिकाला रबी म्हणतात. त्या मोसमातील ज्वारी म्हणजे पांढरी ज्वारी होय. मला हा भेद माहीत नव्हता. सुभेदारांनी विचारले, ' काय माधवराव, तुमच्या तालुक्यात पांढरी ज्वारी जास्त का पिवळी ज्वारी जास्त ? ' मी गोंधळलो. मी मोघमपणे म्हटले, ' दोन्ही जवळ जवळ सारखेच. ' मग त्यांनी विचारले, ' प्रथम कोणती होते ? ' या वेळीही मी गडबडलो आणि म्हटले, ' कधी पांढरी तर कधी पिवळी ' यावर ते खूप हसले आणि म्हणाले, ' माधवराव, अहो पिवळी ज्वारी हे जूननंतरचे पीक. पांढरी ज्वारी हे हिवाळ्याचे पीक. ' मलाही आपल्या अज्ञानाचे हसू आले.

आमचा पेश्कार युसूफ हुसेन हा शियापंथी मुसल्मान. त्याला इंग्रजी अजिबात येत नव्हते. त्याचे शिक्षण सातवीआठवीपर्यंत झाले असावे. पण तो आपल्या कामामध्ये अतिशय तरबेज होता. पण माझी करमणूक होई त्याच्या गप्पिष्टपणाने. वाटेल तशा गप्पा मारणारा असा मला दुसरा मनुष्य भेटला नाही. त्यामुळे

माझे भरपूर मनोरंजन होई. युसूफ हुसेनच्या गप्पांचे नमुने पाहा :

एकदा तो म्हणाला ' साहेब, आम्ही एकदा इराणमधील पवित्र स्थळांची यात्रा करण्यास गेलो. तेहरानच्या रस्त्यांतून हिंडत असताना आम्ही वाट चुकलो. आपल्या मुक्कामाला कसे पोहोचावे हे आम्हांला कळेना. इतक्यात आमच्यामागे एक मोटार आली. आमच्याजवळ येऊन ती थांबली. मोटारीतल्या गृहस्थाने आम्हांला विचारले, ' तुम्ही कोण आहात ? ' आम्ही म्हटले, ' आम्ही हिंदुस्थानातून आलो आहोत. आमची मुक्कामाची वाट चुकली आहे. ' त्याने म्हटले, ' बसा माझ्या गाडीत. ' आम्ही गाडीत बसलो. आम्हांला समजेना की हा कोण मनुष्य आहे, थोड्या वेळाने गाडी राजवाड्यावर आली. यांना आपल्या मुक्कामावर पोहोचवा असे सांगून तो आत निघून गेला. आम्ही ड्रायव्हरला विचारले, हे कोण गृहस्थ होते. ' तो म्हणाला, ' हिज इंपीरियल मॅजेस्टी रीझा शहा पहलवी, इराणचे सम्राट. '

कोणतीही गोष्ट सांगताना युसूफ हुसेनखान म्हणे ' उस वक्त मैं वही था, त्यावेळी मी तेथेच होतो.' एकदा त्याने सांगितले, ' आपले सरकार (निजामसाहेब) हे हैदराबादेहून नांदेडला चालले होते त्यावेळची गोष्ट. सकाळच्या वेळी त्यांची गाडी निजामाबाद स्टेशनवर आली. त्यांच्या स्वागतासाठी मोठमोठे अधिकारी स्टेशनावर हजर होते. गाडी थांबल्यावर आला हजरत (निजामसाहेब) खाली उतरले. त्यांनी आपल्या खिशातून औषधाची एक पुडी काढली. ते म्हणाले, ' मुझे दूध चाहिये. ' ताबडतोब गाईच्या आणि म्हशीच्या दुधाची भांडी आणण्यात आली. निजाम सरकार म्हणाले, नहीं नहीं मुझे बकरीका दूध चाहिये. ' आता त्या घटकेला शेळीचे दूध कोठून आणावे ? मी प्लॅटफार्मवरून धावत सुटलो. स्टेशनच्या लगत काही शेळ्या चरत होत्या. मी चटकन एक शेळी धरली. माझ्यापाशी पेला होता. मी भराभर दूध काढले आणि तो पेला आलाहजरतांना पेश केला. मैं वही था–मी तेथेच होतो. माझ्या प्रसंगावधानाचे खूप कौतुक झाले. '

युसूफ हुसेनखान म्हणाले, ' हैदराबादच्या सार्वजनिक उद्यानात एकदा एका भारतीय कीर्तीच्या उस्तादाचे गायन चालले होते. आला हजरत (निजाम साहेब) हे मैफलीला हजर होते. त्यांच्या अंतःपुरातील बायकाही चिलमनीच्या पडद्याआड बसल्या होत्या. मैफलीला बडीबडी अधिकारी मंडळी जमली होती-गाणे चालू असताना निजामसाहेबांनी सहज मागे वळून पाहिले, तो टपाल खात्याचे संचालक नवाब सरदार नवाजजंग बहादुर, हे मिशांना पीळ भरीत बायका बसल्या होत्या त्या दिशेने पाहत आहेत असे त्यांना दिसून आले.

आला हजरतांचा क्रोध अनावर झाला. ते सारखे ओरडू लागले 'निकाल, निकाल, काढा याला.' चोपदारांनी नवाबसाहेबांना धक्के मारीत बागेतून बाहेर काढले. निजाम सरकारचा राग शांत होईना. शेवटी पंतप्रधान महाराज सर किशन प्रसाद बहादुर हे पुढे झाले. त्यांनी आपल्या डोक्यावरची पगडी काढून निजामांच्या पायावर ठेवली. तेव्हा कुठे सरकार शांत झाले.' ही गोष्ट सांगून युसूफ हुसेनखान म्हणाले, 'मैं वही था, मी तेथेच होतो.'

अशा किती म्हणून त्यांच्या गप्पा सांगाव्या बरे, एक गप्प सांगताना आपण मागे हीच गोष्ट दुसऱ्या पद्धतीने सांगितली होती याची त्यांना आठवण राहत नसे. फार्सीत म्हण आहे 'दरोग गोरा हाफिजा न बाशद.' खोटे बोलणाऱ्यांना स्मरणशक्ती नसते. या म्हणीचे प्रत्यंतर युसूफ हुसेनच्या गप्पातून दिसून येई.

हळूहळू मला कामकाजातील बारकावे कळू लागले. माझ्यासमोर महसूल-खात्याचे खटले येत. वकील मंडळींच्या तोंडी असणारी परिभाषा माझ्या अंगवळणी पडू लागली. शब्दांचा वापर करण्यात मी तरबेज झालो. वकील मंडळींत हसनखान नावाचे गृहस्थ होते. पोलिस ॲक्शननंतर ते पाकिस्तानला पळून गेले. त्यांना इंग्रजी मुळींच येत नसे. पण बोलताना इंग्रजी शब्द वापरण्याची त्यांची हौस मात्र दांडगी होती. कधी कधी त्यांच्या हातून हास्यास्पद चुका होत. टेक्निकल शब्दाला ते टेस्टिकल म्हणत, कॉन्फरन्सला ते कानफरनस म्हणत. उर्दूमधे कॉन्फरन्स हा शब्द लिहिला तर तो कानफरनस असाहि वाचला जाऊ शकतो. त्याचा हा परिणाम असावा.

तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेतलेले असे दोनच अधिकारी आढळत. एक मुन्सफ आणि दुसरे डॉक्टर. जोगीपेठला उस्मान जाफर-हैदराबाद, सिव्हिल-सर्व्हिस अधिकारी हे मुन्सफ होते. मोठा सज्जन माणूस. डॉक्टर चिंतामणराव प्रभुणे यांचा मला जोगीपेठला सहवास लाभला. ते मूळचे जेजुरीचे. आता ते सेवानिवृत्त होऊन औरंगाबाद जिल्ह्यात वैजापूर येथे स्थायिक झाले आहेत. डॉक्टर प्रभुण्यांना साहित्याचा बराच नाद असे. त्यांच्यामुळे मला जोगीपेठला बरीच मराठी पुस्तके वाचायला मिळाली. मी हैदराबादेस गेलो, की मराठी पुस्तके विकत घेत असे. जोगीपेठला असताना हिंदोळ्यावर, कळ्यांचे निश्वास, सुगी हा कवितासंग्रह, फडक्यांच्या काही कादंबऱ्या, माकियावेलीचे चरित्र (ते वेड अद्याप गेले नव्हते) ही पुस्तके वाचल्याचे मला स्मरते.

उषालाही पुस्तके वाचण्याचा बराच नाद होता. तिला कविताही बऱ्याच पाठ येत. बालकवी, तांबे, यशवंत, गिरीश, गोविंदाग्रज इत्यादि कवींचे काव्य आम्ही नेहमी वाचीत असू. त्यावेळी आमच्या तोंडात ज्या कविता होत्या

त्यांपैकी काही मला अद्याप आठवतात. कोणता मानू चंद्रमा, रानारानात गेली बाई शीळ, गोकुळिचा कान्हा माझा, रामा मन गेले तुझ्यावर जडून, डोळे हे जुल्मि गडे, नववधू प्रिया मी बावरते इत्यादि कविता आठवतात. अन्यांचा संग्रह झेंडूची फुले. यातील काही कवितांची ओळख उषामुळेच झाली. परिटा येशिल कधि परतून, हा कोण इथे पडलेला कादरखा काबुलवाला, आम्ही कोण म्हणून काय पुसता—या कविता प्रथम मी तिच्याकडूनच ऐकल्या.

जोगीपेठला आम्ही क्लबच्या इमारतीत राहत होतो. त्यामुळे आम्हां दोघांनाही टेनिस खेळण्याचा नाद लागला. पत्ते खेळणे मात्र मला कधीच जमले नाही. माझे मित्र डॉक्टर प्रभुणे आणि मुन्सफ उस्मान जाफर यांनी मला ब्रिज शिकविण्यासाठी जंगजंग पछाडले. पण मला आजपर्यंत पत्ते खेळणे साधले नाही. पत्ते हातात धरले की डोक्यात काव्य, नाही तर इतिहास याचे विचार चालू होत, आणि मग समोरचे इस्पिक, चौकट, किल्वर, बदाम हे नाहीसे झाल्यासारखे होत. आपल्या हातातील पत्त्यांचा उपयोग कसा करावा हे मला समजेना. दुसऱ्यांच्या हातात कोणते पत्ते असावेत हे हेरण्याचे कसबही मला जमले नाही.

जोगीपेठ हे नाव जोगीनाथ नावाच्या साधूवरून पडले आहे. देऊळ आमच्या क्लबच्या इमारतीमागेच होते. उषाला दिवस गेले तेव्हा आम्ही जोगीनाथाचे दर्शन घेऊन प्रार्थना केली की, मुलगा झाला की आम्ही त्याला आणून तुझ्या पायावर घालू. मुलगा झाला. पण नवस फेडण्याचा योग पुढे वीस वर्षांनी आला. १९५४ मध्ये शिक्षणखात्याचा संचालक म्हणून जोगीपेठला गेलो. बरोबर आमचा मुलगा अरुण होता. आम्ही जोगीनाथाचे दर्शन घेऊन नवस फेडला.

मे १९३४ च्या अखेरीस उषा पुण्याला गेली. जून महिना मी अक्षरशः विरहाने तळमळत होतो. उषाला पत्रे लिहिताना आपणही कविता करून का पाठवू नये ? असे मला वाटले. शेकडो कविता मला पाठ होत्या. पण कविता करणे मला जमत नव्हते. शेकडो वृत्ते हाताळणारे कवी आणि त्यांची थट्टा करणारी कोरेकलांची पुढील कविता यांची मला माहिती होती.

‘ वृत्तांचे व्रत आठ आठ दिवशी एकेक जो आचरी
एका आठवड्यात जेवि हरिणी, दूज्यात पृथ्वी धरी
केव्हा चामर मालती, ललित वा मंदारमाला कदा
हंसी, तोटक, भद्रिका शिखरिणी, मत्ता उमा कामदा ’
असेच, ‘ आसे एक पत्र लिहुनी याच्याकडे धाडिले
काही वृत्त अलीकडे न अपुले काहीच आम्हां कळे
चिंता लागलि फार ऐकुनि अम्हा रोगे तुम्ही पीडित

त्याचे उत्तर हा लगेच कळवी, शार्दूलविक्रीडित '

मीहि पत्नीवर कविता करण्यास बसलो. शार्दूलविक्रीडित हे ऐसपैस वृत्त आहे. शब्दांची फार ओढाताण करावी लागत नाही. सांत अनंत आत्मा, अन्, नीरव, निस्तब्ध इत्यादि शब्दप्रयोगही कवितावाचनामुळे मला परिचित झाले होते. प्रयत्न तर करून पाहूया म्हणून मी कविता करण्याच्या उद्योगाला लागलो. पाच जून १९३४ रोजी माझ्या पुढील दोन कविता तयार झाल्या.

रात्री शांत पहा कशी पसरली वा भूनभोमंडळीं
स्वर्गीच्या नव बालका निजवुनी रजनी पहा झोपली ।।
दैवी तेज खुले भुले, जग डुले चित्तवृत्ती ही हरपली
तेव्हा मी तुज वाहिली अयि सखे ती प्रेमपुष्पांजली ।।
गेला जीव शिवी विरोनि मग तो सांतीं अनंतात ही
दिव्याच्या मधु प्रेमरंग कवनी गेली विरोनी मही ।।
काही शब्द नुरे, विचार न उरे वाहोनि गेले पुरे
द्वैताचे अवशेष जे फिरोनि उरले ते नष्ट झाले चुरे ।।
लाभे भाग्य मला पहा मम प्रिये त्वत्संगती सद्गती
सारे विश्व पडे जरी मजवरी नाही तयाची क्षिती ।।
त्या दिव्य क्षणि वाटले डवरल्या प्रेमोत्पला कल्पना
तूझ्या स्निग्ध प्रशांत संगतिमधे त्या मूक हो भावना ।।
आता पुण्यपुरी तुवा बसुनिया सर्वांस संतोषिणे
अन् मी बैसुनि विन्मनस्क स्थितिते घटिका पळे मोजणे ।।
अन् तू वाचित बैसता निशिदिनी कादंबरी ' दौलत '
मी येऊन कसे तुला विनविले ' नाही मला करमत ' ।।
तो आली भरुनी क्षणात सरिता नयनी दिसो लागली
सारी पुस्तक बाजूला रमविण्या माझी सखी धावली ।।
माझ्या दृष्टिसि दृष्टि तू भिडविता स्नेहातुरा प्रेमला
उद्गारी मज प्रेमपूर्ण वचने ' का रे सख्या कोपला ? ' ।।
आलिंगोनि मला पुन्हा विनविता कोपाच्यिया भावना
गेल्या पार विरोनि पूर्ति मग ये प्रेमास माझ्या मना ।।
होतो वाचित बैसलो सहज मी ' रत्नाकराची ' कथा
तो येऊन मला हळूच पुसशी कसले सदा वाचता ।।
प्रेमाने मग सारिलि मयि तदा ती पुस्तके मासिके
अन् तू ओतिली प्रेममंजु कवने कर्णात हे गायिके ।।

आता वाचित बैसलो किति जरी ना बोलणे चालणे
काहीहि करणे, कुठेहि पडणे ते शुष्क मी हासणे

अकरा जून १९३४ च्या पत्रात मी पुढील दोन कविता लिहून पाठविल्या :

चंद्राने निजस्निग्ध शांत किरणे आलिंगिले भूमिला
त्याच्या स्पर्शसुखे पहा विकसली श्वेतांबरा कोमला ॥
प्रेमोन्मीलन पाहण्यासि जमले सारे नभःप्रांगणी
अन् देवे वरुनी मुदे विखुरली, मोत्ये, हिरे, तन्मणी ॥
ऐशा मंगल सौख्यपूर्ण समयी चौबाजुच्या देवता
होत्या वर्षत सारख्या परि न हो घट अमृताचा रिता ॥
खाली भूमिवरी पहा बहरल्या कल्पद्रुमाच्या लता
वाटे मूर्तीमती इथे अवतरे ती स्निग्धता चारुता ॥
त्या समयी अमुच्या सुशोभित तथा शृंगारिल्या खोलीत
माझी प्रेममयी उषा शुभमुखी ती प्रेमचिन्हांकित ॥
माझ्या अंकि सुखे असे पहुडली, ती स्वस्थतेने अहा
प्रेमाची जरि मूर्ति पाहिलि नसे ती येथ तुम्ही पहा ॥
त्यावेळीं मधु पूर्ण सौरभ मुदे आला तिथे गुंगत
अन् श्वासोच्छ्वास पहा हळूच सखये होता तुझा चालत ॥
मुद्रा मी सखिची पुरी निरखिली ती हासरी साजिरी
अन् माझ्या पुढुनी त्वरे सरकल्या गतकालिच्या तस्बिरी ॥
नाचे दृष्टिपुढे मनोरम अहा भागीरथीचा तट
अन् माझे प्रिय हिंदुशिक्षण स्थळ, विद्यार्थि यांचे गट ॥
होते त्या दिवशी असे ठरविले कॉलेज-सम्मीलन
सर्वांच्या चेहऱ्यावरी सुखकळा संतुष्ट सारे जण ॥
माध्यान्ही त्वरे पातले मग तिथे विद्यार्थि-विद्यार्थिनी
अन् चमके, करि दीप्त मंडळ पहा सौंदर्य सौदामिनी ॥
वेणी पाठिवरी रुळे अहिपरी ते हासरे लोचन
मारी झाक शरीरसौष्ठव तिचे भुलवी तसे आनन ॥
चाले हंसगती, सदास्मितमुखी, श्यामा किशोरी सखी
पाही गौरसुवर्णवर्ण वनिता, अन् लाजली केतकी ॥
मी गेलो विसरूनि तत्क्षणि जगत् दृष्टी तिच्या आननी
रोखूनी मग मग्न मी बघितली, आकाशिची चांदणी ॥
कळता निर्धन मी सधन ती थोरांचि ती कोमला

पडला पीळ गमे भरूनि नयन लाभेल का ही मला ।।

यानंतर माझ्या कवित्वशक्तीला विराम मिळाला तो अद्यापपर्यंत टिकून आहे. काव्याचा मात्र माझा अभ्यास सतत चालू आहे. विद्यार्थिदशेत इंग्रजी काव्य, हैदराबादेत असताना मराठी काव्य आणि आता मुंबईत उर्दू आणि फारसी काव्य असे माझे आयुष्य काव्य आणि नाटके यांनी भरून गेले आहे. कॉलेज-मध्ये शेले, बायरन, कीटस, वर्डस्वर्थ झाले; हैदराबादेत तांबे, बालकवी, टिळक, केशवसुत, गोविंदाग्रज, कुसुमाग्रज, यशवंत, अनिल हे झाले आणि मुंबईत गालिब, मीर, इक्बाल, फिर्दोसी इत्यादींचा अभ्यास चालू आहे. या कवींच्या-बद्दलची माझी ओढ पाहिली की, ‘ जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ’ असे म्हणावेसे वाटते. परमेश्वराला कवी कल्पून महाजनांनी पुढील भव्य कल्पना मांडली आहे : ऐसे अनाद्यंत जे काव्य ते त्वां ‘ महाकाल ’ वृत्तामध्ये गोविले

तसेच :

त्वा योजिले ‘ कल्प ’ विश्रांति घ्याया तसे ‘ पाद ’ त्याच्यात मन्वंतरे
दीक्षा ‘ यती ’ची दिली मृत्युलागी तसे ‘ अद्र ’ ही ऱ्हस्व दीर्घाक्षरे

माझे गद्य लेखन चालूच होते. माझ्या लघुकथांतून जोगीपेठची दृश्ये उतरली आहेत. डॉक्टर चिंतामणराव प्रभुणे अत्यंत रसिक माणूस. त्यांच्या सहवासाने जोगीपेठसारख्या गावात मला मराठी साहित्याचा अभ्यास चालू ठेवता आला.

सरकारी कामात मनाला धक्के देणारे अनुभव हळूहळू येऊ लागले. जोगी-पेठला एक वाणी [तेलंगणात वाण्याला कोमटी म्हणतात] मुसलमान झाला. पुढे तो मेला तर त्याचे दफन की दहन असा वाद उपस्थित होऊ नये म्हणून त्याला मुसलमान झाल्याबद्दलचे सर्टिफिकेट हवे होते. सहीसाठी म्हणून सर्टि-फिकेटचा मसुदा माझ्यासमोर ठेवण्यात आला, त्यातील एक वाक्य पुढील-प्रमाणे होते.

‘ तसदीक की जाती है के (प्रमाणित केले जात आहे की) नारायण कोमठी मुश्रफ व इस्लाम हुवा (इस्लामग्रहणानें पुनीत झाला). ’ इस्लामग्रहणाने पूनीत ! आणि त्याच्याखाली सेतुमाधवराव ही सही ! मला विलक्षण क्षोभ झाला. पण मान खाली घालून मुकाट्याने सही करावी लागली. धर्मान्तर आणि स्त्रियांचे अपहरण या दोन घटना कानांवर आल्या, की मला रात्ररात्र झोप येत नसे. या घटना ऐकून मला जितके दुःख होते तितके इतर कशानेही होत नाही. हैदराबादेत मला या प्रश्नांचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळाली.

तेलंगण हा समृद्ध प्रांत. पण तेथे मध्यमवर्ग असा नव्हताच. एक अतिशय श्रीमंत असा जमीनदार वर्ग आणि दुसरा अगदी गरीब अशा जनतेचा.

तेलंगणातील जमीनदार म्हणजे उत्तर प्रदेश, बिहार आणि बंगाल येथील जमीनदारांप्रमाणे रयतेकडून सारा वसूल करून सरकारात भरणारे मध्यस्थ नसत. तेलंगणात रड्डी ही प्रमुख जमात आहे. यांना देशमुखी, पाटिलकी अशी वतने असत. त्याच्या जोरावर ते खेड्यातील गरीबगुरिबांना अक्षरशः पिळून काढीत. त्यांच्या मालकीची शेतेही पाच ते दहा दहा हजार एकरांची असत. शेतीवर राबणाऱ्या हजारो शेतकऱ्यांच्या मालकीचे असे एक एकरही शेत नसे. या रड्डी देशमुखांच्या समोर लहान शेतकऱ्यांचे किंवा गरीब जनतेचे काही चालत नसे. त्यांचे जीवन गुलामांच्या जीवनाप्रमाणे असे. मराठवाड्यात हजारो एकर बाळगणारे जमीनमालक नव्हते. दोनतीनशे एकर म्हणजे शिकस्त झाली. दोनचार एकर का होईना, बाळगणारे हजारो शेतकरी मराठवाड्यात आढळून येत. तेलंगणात तसे नव्हते. पुढे तेलंगणात कम्युनिस्टांचा जो उठाव झाला त्यामागे ही आर्थिक आणि सामाजिक विषमता होती. १९३४ मध्ये तेलंगणात कोणत्याच प्रकारची चळवळ नव्हती. नाही म्हणण्यास तरुण मंडळी ठिक-ठिकाणी वाचनालये अगर खासगी शाळा उघडून हळूहळू संघटित होऊ लागली होती. हैदराबाद सरकार आणि जहागिरदार, वतनदार इत्यादींच्या युतीमुळे संस्थानचे स्वरूप जातीय म्हणण्यापेक्षा सरंजामी होते असेच म्हणणे योग्य होईल. पण हैदराबादचा मुसलमान समाज आपण राज्यकर्ते आहोत या भावनेने सतत पछाडलेला असे. हिंदूंच्याविरुद्ध काही तक्रार असली की तिला धार्मिक स्वरूप देऊन अर्ज गुदरला की सरकारची चक्रे तातडीने हलू लागत. त्यामुळे हिंदू अधिकारी दबूनच वागत. बरेच हिंदू अधिकारी हे मुसल्मानांना खुश करण्यासाठी त्यांच्यासारखा पोशाख करीत. चुडीदार पायजमा, शेरवाणी, काळ्या गोंड्याची लाल टोपी (याला फेज, टर्किश अगर रुमी टोपी म्हणत) असा ते पोशाख करीत. हिंदुधर्माबद्दल ते मुद्दामच उदासीनता दाखवीत, आपल्याला मराठी, कानडी, किंवा तेलुगू या देशी भाषा नीट येत नाहीत हे ते अभिमानाने सांगत. मला हे जमले नाही. जोगीपेठला असताना मी बरोबरच्या अधि-काऱ्यांना गोकुळअष्टमीची मोठी पार्टी दिली. मुसल्मान अधिकाऱ्यांत याबद्दल कुजबुज सुरू झाली. एका हिंदू उमेदवाराची माझ्या ऑफिसमध्ये मी दप्तरी म्हणून नेमणूक केली. यामुळे कलेक्टरांचा आमच्यावर रोष झाला. एका खटल्यात तर मला विलक्षण अनुभव आला. त्याची हकीकत अशी :

हैदराबाद सरकारने निजामाबाद जिल्ह्यात वांजरा नदीवर मोठे धरण बांधून सुमारे सत्तर हजार एकर जमिनीला पाणी मिळवून देण्याची सोय केली. धरणाखाली जोगीपेठ तालुक्यातील काही गावे बुडाली. त्यांच्याऐवजी

सरकारने गावे वसविण्यासाठी गावकऱ्यांना नवीन जागा दाखविली. पूर्वीच्या गावात देवळे, मशिदी होत्या त्या तशाच बांधण्यासाठी योग्य जागांची निवड केली. इतकेच नव्हे तर घरे बांधण्यासाठी लोकांना पैशाची मदत केली. अशाच एका गावात चीकोड गावच्या देशमुखिणीने मारुतीचे देऊळ पुन्हा उभे केले. जोगीपेठला एक मुसलमान कंत्राटदार असे. तो मागे बडतर्फ झालेला कंपौंडर असून जोगीपेठला डॉक्टर म्हणून त्याने प्रॅक्टिस सुरू केली होती. फावल्या वेळात तो सरकारी कामाची कंत्राटे (कंत्राटाला हैदराबादकडे गुता आणि कंत्राटदाराला गुतेदार म्हणत) घेत असे. जिल्हा बोर्डाकडून त्याला काही खेड्यांतून सरकारी विहिरी खणण्याचे कंत्राट मिळाले. त्याने काही विहिरी खणल्याच नाहीत, पण त्या तयार झाल्या आहेत, अशा अर्थाचे सर्टिफिकेट द्या म्हणून तो स्थानिक लोकांच्या मागे लागला. चीकोड गावच्या देशमुखिणीने सर्टिफिकेट देण्याचे नाकारले. तिला शह देण्यासाठी म्हणून त्याने एक अर्ज कलेक्टरपाशी दिला. त्यात म्हटले होते, 'देशमुखिणीने परवानगीवाचून मारुतीचे देऊळ बांधले आहे.'

झाले, कलेक्टरांनी ताबडतोब चौकशीचा हुकूम दिला. हैदराबादचे मुसलमान अधिकारी समाजकल्याणाच्या कामाकडे लाख दुर्लक्ष करोत, पण हिंदूंनी देवळे बांधली किंवा त्यांचा जीर्णोद्धार केला, किंवा एखादा धार्मिक उत्सव करण्याचे ठरविले, की ते डोळ्यात तेल घालून या प्रकरणांची चौकशी करीत. जणू काय हैदराबाद राज्य कोसळून पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माझ्या पूर्वीच्या तहसीलदारांनी या प्रकरणाची चौकशी केली आणि रिपोर्ट केला की, देऊळ परवानगीवाचून बांधले गेले आहे; या गुन्ह्याबद्दल देशमुखिणीची वतने जप्त करण्यात यावीत. तोपर्यंत मी कामाचा चार्ज घेतला होता. कलेक्टरांनी फेरचौकशीचा हुकूम दिला. कारण वतने जप्त करणे म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. मी चौकशी केली तेव्हा मला खरा प्रकार समजला. मी आपल्या रिपोर्टमध्ये माझ्या पूर्वीचे तहसीलदार आगा मीर यांच्यावर टीका केली. मी आपल्या रिपोर्टात म्हटले होते, 'ही अन्यायाची सीमा झाली. सरकारने नवीन गावासाठी जागा दाखविली. घरे, देवळे, मशिदी ही बांधली जावीत म्हणून पैशाची मदत केली. धरणाच्या पाण्याखाली मारुतीची मूर्ति बुडते म्हणून देशमुखिणीने ती उचलून काठावरच्या पारावर ठेवली तर परवानगीवाचून देऊळ बांधले असा आरोप तिच्यावर ठेवून तिची वतने जप्त करावी म्हणणे हे हास्यास्पद आहे.' या अर्जाच्या मागे कोण आहे हेही मी विशद करून सांगितले. माझ्या या रिपोर्टमुळे कलेक्टरांना खटला काढून घ्यावा म्हणून हुकूम द्यावा लागला. पण

माझ्या निःपक्षपाती धोरणावरून मी हिंदुत्वनिष्ठ असल्याचा त्यांना संशय येऊ लागला. मुसलमानांची चूक असल्यास क्षमाशील दृष्टी ठेवावी. हिंदूंची चूक असल्यास त्यांना धारेवर धरावे अशा धोरणास अनुसरून एकंदरीत मुसलमान अधिकाऱ्यांची वागणूक असे. याला अपवाद असत. पण असे न्यायनिष्ठुर आणि निःपक्षपाती मुसल्मान अधिकारी फार थोडे होते. अर्थात मी या गोष्टीची पर्वा केली नाही. आपली वागणूक सरळ ठेवली की वरिष्ठ अधिकाऱ्यांना आक्षेप घेण्यास जागा राहणार नाही अशी माझी भूमिका होती.

हा खटला काढून घेण्यात आल्यानंतर अल्लादुर्गचे देशमुख यांनी माझी भेट घेतली. ते म्हणाले, 'साहेब, आपण चीकोंडच्या देशमुखिणीवरचे मोठे संकट दूर केलेत. आमच्याकडून योग्य ती सेवा घ्यावी, हमारे लायक कोयी खिदमत हो तो फर्माइये.' मला हजार बाराशेपर्यंत लाच देण्याची त्यांची तयारी होती. मला त्यांच्या बोलण्याचे हसू आले. मी उषाला हाक मारून म्हटले, 'अहो ऐकलेत काय. आमच्याकडून काही सेवा घ्या असे देशमुखसाहेब म्हणतात.'

उषा म्हणाली, 'अहो, ते कधी हैदराबादला गेले तर त्यांना म्हणावे, कर्नाटकी पद्धतीचे सार करतो, त्यात बंगलोरी मसाला घालतो तो घेऊन या.'

उषाला मसाला घातलेले कर्नाटकी सार आवडे. देशमुखांना हा निरोप ऐकून आश्चर्य वाटले. खरे, त्यांनाही हा बंगलोरी मसाला म्हणजे काय प्रकार आहे हे समजेना. ते हैदराबादेला गेले तेव्हा त्यांनी काही खोबरे, जिरे, दालचिनी, असे चार आण्यांचे सामान आणून दिले. मी त्यांचे चार आणे परत केले. माझे मित्र डॉक्टर प्रभुणे मला म्हणाले, 'माधवरावजी, अहो तो तुम्हांला हजार बाराशे रुपये देऊ करीत होता.' मी त्यांना म्हटले, 'डॉक्टर, आम्ही काव्यात रमणारी माणसे. आम्हांला पैसे काय करायचे ?'

त्या काळात माझा काव्याचा अभ्यास सतत चालू असावा. उषाला लिहिलेली पत्रे मी आज पाहतो तो पत्रागणिक कवितांचे उतारे आढळून येतात. कधी काळी मासिकात वाचलेली एखादी ओळ वर्षानुवर्षे माझ्या आठवणीत राहत आली आहे. उषाला लिहिलेल्या एका पत्रातील पुढील कविता कोणत्या तरी मासिकातून मी उचलली होती. मासिकाचे नाव आठवत नाही. बहुधा मनोरंजन असावे. पण ओळी मात्र आज चाळीस वर्षांनंतरही आठवतात.

'चारुनेत्रे, चारुगात्रे, चारुशीले ही अशी,
चिंतनाची, काळजीची, काजळी नेत्री कशी,
मोतनाची माळ बाले जाहली मैत्रीण का,
जाइना एकांत का हा काळ एकावीण का'

अत्र्यांच्या ओळी

> ' चंद्राची चढती कळा बघुनिया नाचे इथे सागर,
> का माझा न परंतु चंद्र उगवे अद्याप चेतोहर '

त्यावेळी मी गुणगुणत असल्याचे अद्याप आठवते. एका पत्रात तर अनिल कवीची ' दूर निळ्या आकाशात व्योमधरेचें मीलन, तुझे माझे आलिंगन, ' ही कविता मी समग्र उतरून पाठविली होती. पुढील दहा बारा वर्षे आम्ही अनिल कवीच्या काव्यांत अगदी रममाण होऊन गेलो होतो.

आमच्या घरात झाडून सर्वांना अनिलच्या कवितांनी अक्षरशः वेड लावले होते. मराठीतील आणखी एक कविता माझी अतिशय आवडती होती. ती म्हणजे गुणवंत हनुमंत देशपांडे यांचा ' कोणता मानू चंद्रमा ' ही होय. आणि मराठी गाण्यांत ' चंद्रिका ही जणू ' हिला तर मी अप्रतिम समजतो.

उषा स्वभावाने रसिक आणि हौशी होती. टेनिस, सायकलिंग, वाचन, कला-कुसरीची कामे इत्यादींची तिला आवड होती. तिळसंक्रांतीला तिने हलव्याचा हार केला. आमच्या घरात असा हार करतात हे कुणालाच माहीत नव्हते. तिचे कोण कौतुक ! तसेच तिने एकदा मालपुवा करून आम्हांला खाऊ घातला. पुरणाच्या पोळ्या आणि कडबू यांच्यापुढे आम्ही कधी सरकलोच नव्हतो. मालपुवा हा शब्द कधीतरी कानांवरून गेला असावा इतकेच. जोगीपेठला आम्ही आलो. आईवडील पंढरपूरला गेले. त्यामुळे आम्हांला नव्याने संसार थाटावा लागला. आम्हांला स्वयंपाकी न मिळाल्यामुळे उषाला स्वतःच सगळे काही करावे लागे. प्रथम प्रथम तिची तारांबळ उडे.

एकदा मी तिला म्हटले, ' आपल्याला डाळ, तांदूळ इत्यादि जे काही लागेल ते वाण्याकडून घे पाहू. ' तिने यादी करून वाण्याकडे पाठविली. मी संध्याकाळी ऑफिसमधून आलो तेव्हा ती सचिंत होऊन बसली होती. मी विचारले, ' काय ग, काय झाले ? ' यावर ती म्हणाली, ' अहो, मी एक एक दोन दोन रुपयांचे प्रत्येक सामान मागविले. दोन रुपयांचे तांदूळ, दोन रुपयांची डाळ, पण मी मीठ पण दोन रुपयांचे मागविले. मला काय बाई माहीत इतके मीठ येईल म्हणून. सगळ्या बरण्या बवा मिठाने भरून गेल्या आहेत. दुसरे सामान ठेवायला भांडे शिल्लक नाही. ' असे म्हणून तिने मिठाच्या पाच सहा बरण्या माझ्यासमोर आणून ठेवल्या. मला खूप हसू आले. आजही ते दिवस आठवले की मोठी गंमत वाटते.

सहा जुलै १९३४ ला उषा पुण्याहून परत आली. सप्टेंबर १९३४ ला माझी

बदली तेलंगणात नलगोंडा जिल्ह्यातील हुजूरनगर या तालुक्यावर मामलेदार म्हणून झाली. जोगीपेठला मला मामलेदार म्हणून स्वतंत्र चार्ज असला तरी पगार मात्र प्रोबेशनराचा एकशे दहा मिळत असे. हुजूरनगरपासून तो दोनशे झाला. सतरा सप्टेंबरला आम्ही जोगीपेठ सोडले.

हुजूरनगर तालुका आंध्र प्रांताच्या विजवाडा आणि गुंटूर या दोन जिल्ह्यांच्या सरहद्दीवर होता. येथील लोकांची तेलगु ही अधिक शुद्ध, आणि गोड असे. लोकांचे हितसंबंध बिजवाडा आणि गुंटूर या भागाशी विशेष असत. हा तालुका जोगीपेठच्या मानाने अधिक सुपीक आणि समृद्ध होता. तालुक्याच्या एका हद्दीवरून कृष्णानदी वाहात होती. कृष्णा आणि मूसा (हैदराबाद शहर हे मूसा नदीच्या काठावर वसले आहे) यांचा संगम हुजूरनगरच्या जवळच झालेला आहे. तालुका सुपीक असला तरी तेलंगणातील देशमुख, जमीनदार इत्यादींच्या पिळवणुकीमुळे जनतेत विलक्षण दारिद्य आढळून येई. पुढे १९४८ च्या नंतर नलगुंडा जिल्हा हा कम्युनिस्टांचा बालेकिल्ला बनला तो याच कारणामुळे होय.

नलगोंड्याचे कलेक्टर (अव्वल तालुकदार) नवाब मालिक यार जंग हे होते. हैदराबादेतील सगळे जंग आणि बहादुर या पदव्या धारण करणारे हे पिढीजाद सरंजामदार अगर जहागिरदार असत असे कोणी समजू नये. किंवा प्रत्येक जहागिरदाराला पदव्या असतच असेही नाही. मध्यमवर्गीय माणसे मोठ्या पदावर चढली की त्यांना जंग ही पदवी देण्यात येई. ही पदवी लावणाऱ्याला नवाब म्हणून घेता येत असे. उदाहरणार्थ अलीगड विद्यापीठाचे उपकुलगुरू नवाब अली यावर जंग बहादुर, किंवा गुजरातचे मरहूम राज्यपाल नवाब मेहदी नवाज जंग बहादुर ही मंडळी मध्यमवर्गातून पुढे आलेली होती. हैदराबाद राज्य स्वतंत्र होते तेव्हा सरदार-सरंजामदारांना अतिशय महत्त्व असे. पण इ. स. १८०० मधे निजामाने इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारल्यावर सरदार वर्गाचे महत्त्व कमी होऊ लागले. इ. स. १८६४ च्या नंतर दिवाण सालारजंग याच्या कारकिर्दीपासून उत्तरप्रदेश, बिहार, पंजाब इत्यादि प्रांतांतून सुशिक्षित मंडळी हैदराबादेत मोठ्या पदावर चढली. तीत बहुसंख्य मुसलमान होते. मलिक यार जंग यांचे वडील अकबरजंग हे हैदराबाद शहराचे कोतवाल (पोलीस कमिशनर) होते. निजाम महबूब अलीखान (मृत्यू १९११) यांच्या कारकीर्दीत त्यांनी हैदराबादचे इंग्रज रेसिडेंट यांच्या पाठिंब्याने हैदराबादचे एक पंतप्रधान सर विकारुल उमरा यांची उचलबांगडी घडवून आणण्याची करामत करून दाखविली होती. नलगोंड्याचे कलेक्टर मलिक यार जंग हे अकबरजंग कोतवाल यांचे चिरंजीव. ते इंग्रजी फर्डे लिहीत. कामही मोठ्या तडफेने करीत. पण ते

अतिशय विलासी आणि रंगेल होते. त्यांना गाण्याबजावण्याचा अतिशय नाद होता. ते तबला उत्कृष्ट वाजवीत. सुरपूरच्या तीन प्रसिद्ध गायिका कमला सानी, विमला सानी आणि माणिक सानी या तिघी बहिणींची नावे त्या काळीं हैदराबादेत फार गाजत होती. त्यांपैकी विमला सानी हिला नवाब मलिक यार जंग यांनी आपल्यापाशी बाळगिली होती. मलिक यार जंगांना पिण्याचाही बराच नाद असावा. सरकारी कामानिमित्त मी जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी म्हणजे नलगोंड्याला गेलो की त्यांची गाठ पडत असे.

हुजूरनगरला रेल्वेस्टेशन नाही. हे गाव हैदराबादच्या पूर्वेस एकशे सव्वीस मैलांवर आहे. रेल्वेने जाणाऱ्यांसाठी हैदराबाद-बिजवाडा लाइनवर खम्मम या स्टेशनवरून तीस मैल मोटारीने जावे लागते. हा तालुका एकाकी पडलेला वाटत असला तरी या तालुक्याचे सृष्टिसौंदर्य मोठे आकर्षक असे.

मी होतो त्या काळात तालुक्यात कोणत्याच प्रकारची चळवळ नव्हती. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या चळवळींमुळे काही गावांतून ख्रिस्ती आढळून येत. बिजवाडा, गुंटूर येथे जाऊन शिक्षण घेऊन आलेली मंडळी तुरळक आढळत. हैदराबाद राज्यात वर्तमानपत्रे फार थोडी निघत. तेलगूचे एखाददुसरे वर्तमान-पत्र असे. मराठीत निजामविजय हे एकच साप्ताहिक असे. कानडीत तर एकही नियतकालिक नव्हते. उर्दूमध्ये दोन प्रमुख दैनिके असत. एक श्री. वासुदेवराव औरंगाबादकर यांनी चालविलेले मुशीरे दकन (दक्षिणचा सल्लागार) आणि दुसरे रहबर (मार्गदर्शक). रहबर हे मुस्लिम जातीय प्रसाराचे दैनिक असे. मी ज्ञानप्रकाश, आणि फ्रीप्रेस मागवीत असे. ज्ञानप्रकाशाचे काव्यशास्त्र-विनोद हे सदर मी आवडीने वाचीत असे. ज्ञानप्रकाशमुळे मला पुण्याकडच्या साहित्यिक चळवळींची माहिती होत असे. केसरीला हैदराबाद राज्यात बंदी होती.

उषा हुजूरनगरला एखादा महिना राहिली. त्यानंतर ती बाळंतपणासाठी पुण्याला गेली. तालुक्याच्या ठिकाणचे जीवन नाही म्हटले तरी कंटाळवाणेच. एक मुन्सफ आणि दुसरा डॉक्टर हेच काय ते सुशिक्षित म्हणण्यासारखे अधिकारी असत. हुजूरनगरला त्या वेळी मुहसिन रिजवी हे मुन्सफ होते. हे उत्तर प्रदेशातील अमरोहा या गावचे. अलीगडचे पदवीधर. उत्तरप्रदेशातील सुशिक्षित मंडळी अलीगडहून पदवी परीक्षा पास झाली की नोकरीसाठी हैदरा बादची वाट धरीत. हैदराबाद राज्यात अशा प्रकारे शेकडो परप्रांतीय मुसल-मानांचा भरणा झाला होता. त्यांच्यांतही गट असत. एक गट दिल्ली आणि दिल्लीच्या परिसरातील खानदानी लोकांचा. दुसरा गट उत्तरप्रदेश आणि बिहार येथील. मद्रासकडील प्रमुख मुसलमान घराण्यात दीनयार जंगांचे (पोलिस-

ॲक्शनपूर्वी निजामाचे एक प्रमुख सल्लागार) घराणे प्रमुख होते. उत्तर भारतीय मुसलमान आणि मद्रासकडून आलेले मुसलमान यांच्यांत नेहमी स्पर्धा चालू असे. पुढे उस्मानिया विद्यापीठातून हैदराबादचे तरुण पदव्या घेऊन बाहेर पडू लागले आणि नोकऱ्या मागू लागले तेव्हा हैदराबादेत मुल्की, गैरमुल्की ही चळवळ सुरू झाली.

आमच्या काळात बरेच पदवीधर तहसीलदार म्हणून लागले होते. पण त्यांपैकी फारच थोडे मिळविलेल्या ज्ञानात भर घालणारे असत. शिकार, पिकनिक, पत्ते खेळणे यांतच त्यांचा वेळ जाई. स्त्रियांच्या बाबतीत सैल व्यवहार ठेवणारे अधिकारी काही कमी नसत.

मुसलमान समाज हा प्रामुख्याने नागरी समाज होता. हैदराबाद शहर हे त्याचे केंद्र होते. हैदराबादचा उल्लेख ते बल्दा (शहर) असाच करीत. बायका-मुले हैदराबादेस राहात असल्यामुळे मुसलमान अधिकाऱ्यांना जिल्ह्यांतून एकाकी जीवन घालवावे लागे. यामुळे नैतिक बाबतीत अनेकांची वागणूक सैल बनत असल्यास नवल नाही.

माझ्या पूर्वीचे तहसीलदार वरील नियमाला अपवाद नव्हते. त्यांनी कुठून तरी एक बाई पैदा केली होती. त्यांच्या हाताखालचे शिपाई रोज रात्री पाच सहा मैलांवरील एका खेड्यातून त्या बाईला घेऊन येत. गावात सामसूम होईपर्यंत ते त्या बाईला एका धर्मशाळेत ठेवीत. नंतर ते तिला तहसीलदार साहेबांकडे घेऊन येत. सकाळी उजाडण्यापूर्वी ते तिला आपल्या गावी नेऊन सोडीत. असा प्रकार काही दिवस चालला. पुढे तहसीलदारांचे पोलीस खात्याशी काही भांडण झाले असावे. त्यामुळे पोलीसच्या सबइन्स्पेक्टरनी या प्रकारावर लक्ष ठेवण्यास सुरवात केली. एकदा ती बाई धर्मशाळेत उतरली असताना, काही पोलीस शिपाई धर्मशाळेत आले आणि कोण कोण माणसे येथे उतरली आहेत, म्हणून चौकशी करू लागले. ही गडबड पाहून तहसीलदाराच्या शिपायाने ताबडतोब त्या बाईला पुरुषवेष दिला आणि तिला धर्मशाळेबाहेर काढली. त्यानंतर त्याने तिला सायकलवर आपल्या समोर बसवून तिला आपल्या गावी नेऊन सोडली.

मला ही गोष्ट कळली नसती. मी तालुक्याचा चार्ज घेतल्यानंतर आमच्या शिपायाने मला सांगितले की पूर्वीच्या साहेबांच्या वेळी अशी अशी भानगड झाली आहे. तर या प्रकरणात पोलीस सबइन्स्पेक्टर (त्यांना मुंतजिम किंवा अमीन म्हणत.) यांनी विशेष चौकशी करू नये अशी आपण त्यांना विनंती करावी. अर्थात् मी त्या गोष्टीत मुळीच लक्ष घातले नाही. एक तर पोलीस सबइन्स्पेक्टर हा तहशीलदारपेक्षा हुद्याने लहान. दुसरे अशा गोष्टीत लक्ष घालणे

हास्यास्पद ठरले असते.

तेलंगणात तिखट फार खातात आणि त्यामुळे प्रकृतीला अपाय होतो अशी माझी समजूत होती. त्यामुळे हुजूरनगरला बदलून आल्यावर मी जेवणात तिखट अजिबात टाकून दिले. त्याच्याऐवजी वरण, भाजी इत्यादीत मिरे वापरीत चला असे मी स्वयंपाक्याला सांगून ठेवले होते. स्वयंपाकी हा निर्बुद्ध होता. तो प्रत्येक खाद्यपदार्थात भरमसाट मिरे वापरू लागला. त्याचा परिणाम असा झाला की माझ्या अंगात उष्णता वाढली. पुढे पुढे तर मला रक्त पडू लागले. उषा पुण्याला गेली होती. मी औषधोपचार करू लागलो, पण दिवसेंदिवस अशक्तता वाढू लागली. प्रथम प्रथम मी घोड्यावरून किंवा बैलगाडीतून फिरतीवर जात असे. अशक्ततेमुळे एकदा दोनदा मला मेण्यातून प्रवास करावा लागला.

माझ्या आजाराचा माझ्या हाताखालच्या शिपायांनी भलताच अर्थ लावला. त्यांना वाटले, साहेब एकटेच आहेत. बाईसाहेब माहेरी गेल्या आहेत. म्हणून साहेबांच्या अंगात उष्णता वाढली आहे. माझा शिपाई गोपाळू हा एक दिवस माझे पाय चेपता चेपता मला म्हणाला, ' साहेब, अतिउष्णतेमुळे आपली प्रकृती खराब होत चालली आहे. आपण म्हणत असाल तर एक सुंदर मुलगी आपल्यासाठी घेऊन येतो. ' मी त्याला म्हटले, ' अरे, सगळेच तहसीलदार असे असतात असे तू समजतोस की काय ? खबरदार पुन्हा अशा गोष्टी बोलशील तर. '

या वर्षीचा एक अपूर्व योगायोग म्हणजे मला हैदराबादेत रवींद्रनाथ टागोर पाहायला मिळाले हा होय. पुण्याहून परत येताना मी हैदराबादेस उतरलो होतो. तो १९३४ चा नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिना असावा. रवींद्रनाथ टागोर हे हैदराबादेस आले होते. त्यांच्या सन्मानार्थ हैदराबादच्या टाऊन हॉलमध्ये मोठी सभा भरली होती. सभेचे अध्यक्ष हैदराबादचे पंतप्रधान महाराजा सर किशनप्रसाद हे होते. रवींद्रनाथ टागोर यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व पाहून मला मोठा आनंद झाला. त्यांचे गीतांजली, गोरा, नौका डूबी, हंग्री स्टोन्स, चित्रांगदा, आत्मचरित्र हे ग्रंथ मी वाचले होते. त्यांच्या उर्वशी या काव्याचा मी बंगाली-मधून आस्वाद घेतला होता. टागोर हे एखाद्या राजयोग्याप्रमाणे दिसत.

१९६५ च्या डिसेंबरमधे मी आणि उषा कलकत्त्याला गेलो होतो, त्यावेळी आम्ही टागोरांच्या जोरासंको येथील वाड्यात जाऊन त्यांच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहिली.

किशनप्रसाद यांचे घराणे मूळचे पंजाबातील. ते खत्री जातीचे. कपूर, टंडन, मेहरा, चड्डा, सरल, आनंद, भसीन, खन्ना इत्यादि पंजाबी खत्रींची आडनावे आपल्याला माहीत आहेत. किशनप्रसादच्या आईचे वडील राजा

नरेंद्रबहादुर, नरेंद्रबहादुरचे वडील राजाधिराज बालप्रसाद, आणि बालप्रसादचे वडील सुप्रसिद्ध महाराजा चंदूलाल. चंदूलाल हे इ. स. १८०८ पासून १८४३ पर्यंत हैदराबादचे संपूर्ण अधिकारी होते. मुनीरुल्मुल्क (सालारजंगाचे आजे) हे १८०८ पासून १८३२ पर्यंत हैदराबादचे पंतप्रधान होते; पण फक्त नावाचे. सर्व सत्ता चंदूलालकडे होती. चंदूलालच्या वेळेपासून त्यांच्या घराण्याकडे हैदराबाद राज्याचे पेश्कार (मुख्य सचिव) हे पद चालू झाले. याबद्दल त्यांना जहागिरी मिळाल्या. त्यांचे वार्षिक उत्पन्न सुमारे सतरा लाखांचे होते. महाराजा किशनप्रसाद हे आपल्या आजोबाला दत्तक गेले होते. इ. स. १९०० पासून १९१२ पर्यंत ते हैदराबादचे पंतप्रधान होते. १९२६ मध्ये इंग्रजांच्या सल्ल्यावरून आणि हिंदू प्रजेचे समाधान करण्यासाठी म्हणून निजामाने त्यांना पुन्हा पंतप्रधानपद दिले. या पदावर ते १९३७ पर्यंत होते. पण खरी सत्ता मंत्रिमंडळातील इंग्रज अधिकारी आणि अर्थमंत्री सर अकबर हैदरी यांच्याकडे होती.

सुसंस्कृत, उदार आणि धोरणी जहागिरदार म्हणून किशनप्रसाद यांची प्रसिद्धी होती. मोगलकालीन संस्कृतीत ते पूर्णपणे मुरलेले होते. त्यांना पाहून राजा मानसिंग, राजा तोडरमल, मिर्जा राजा जयसिंग हे मोगलकालीन अधिकारी कसे दिसत आणि वागत असतील याची पूर्ण कल्पना येई. उर्दू आणि फार्सी या दोन्ही भाषांवर किशनप्रसादांचे मोठे प्रभुत्व होते. या भाषांतून ते कविता रचीत. त्यांचे अनेक उर्दू ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांचा जनानखानाही मोठा होता. तीन हिंदू आणि चार मुसलमान असा त्यांच्या बायकांचा परिवार होता. मुसलमान बायकांच्याकडून झालेली मुले मुसलमान राहिली, मुली मुसलमान उमरावांच्या घरी पडल्या. हिंदू स्त्रियांपासून झालेली संतती हिंदू राहिली, आणि त्यांची जहागीर हिंदू मुलांच्या नावे करण्यात आली. किशनप्रसाद हे मोठे गुणग्राहक होते. त्यांच्या दरबारात कवी, गवई, कलावंत, विद्वान इत्यादींची गर्दी असे. कवी अमीर मीनाई, उर्दू कादंबरीकार पंडित रतननाथ सरशार, कवी फानी बदायूनी इत्यादींना त्यांचा आश्रय मिळाला. कवी इक्बाल यांच्याबरोबर त्यांचे स्नेहाचे संबंध होते. त्यांची राहणी विलासी पण राजयोग्याप्रमाणे असे. धार्मिक विचारांत त्यांच्यावर सूफी मतांचा प्रभाव असावा. अजमीरच्या दर्ग्याची ते वारंवार यात्रा करीत. पण आपल्या हिंदुत्वाचा त्यांना अभिमान होता. असा हा उदार, रसिक, आणि अनुभवी मुत्सद्दी तीन मे १९४० रोजी मरण पावला. (जन्म अठ्ठावीस जानेवारी १८६४) तेव्हा हैदराबादेत लहानपासून थोरापर्यंत हजारो माणसांना दुःख झाले. 'मोगल संस्कृतिपटावरील हा शेवटचा मोहरा नाहीसा झाला' असे उद्गार निजाम

उस्मान अलीखान यांनी या प्रसंगी काढले. गद्य आणि पद्य मिळून महाराजा किशनप्रसाद यांच्या उर्दू फारसी ग्रंथांची संख्या पन्नासच्या वर जाते.

आक्टोबर १९३४ मधे उषा पुण्यास जाण्याची तयारी करीत होती त्या वेळची गोष्ट. मी ऑफिसमधून परत आलो तो उषा रडत बसलेली मला दिसली. मी अस्वस्थ झालो. मी तिला रडण्याचे कारण विचारले. मला वाटले माहेराहून तिला काही पत्रबित्र आले असावे. ती स्फुंदून स्फुंदून रडत होती. शेवटी मी कवितेच्या (अर्थात दुसऱ्या कवीच्या! आम्हांला काव्याची देणगी मिळालीच नव्हती) पुढील ओळी म्हटल्या,

ही नयनी झाली गर्दी का अश्रूंची ?
का हिरे–माणके उगीच उधळायाची ?

यावर ती हसून म्हणाली, 'अहो तुम्हांला कविता सुचते तरी कशी! हा बघा माझ्या हातून थर्मास फुटला आहे. तुम्ही माझ्यावर रागवाल म्हणून मला धास्ती बसली आहे.' मला हसू आवरेना. मी म्हटले, 'हात्तिच्या, एक थर्मास फुटला म्हणून इतका आकांत! आधी अश्रू पुसून टाक पाहू. अग, आपल्याला देवाने काय कमी केले आहे? एका थर्मासचे महत्त्व ते काय!' यावर ती म्हणाली, 'आमच्या माहेरच्या शिस्तीची तुम्हांला कल्पना नाही.' मी म्हटले, 'नसेना का! आपले घर म्हणजे मेघदूतातील अलकापुरी आहे. येथे अश्रू उधळायचे तर आनंदाचे, दुःखाचे नाहीत. येथे राग नको अनुराग पाहिजे. अशा मोड-तोडीची तू काही काळजी करू नकोस' मी तो प्रसंग विसरून गेलो. पण तिला मात्र त्याची बरेच दिवस आठवण होत होती.

चवदा डिसेंबर १९३४ ला माझा मुलगा अरुण (तो आता मुलुंडच्या शक्ती स्प्रिंग्सचा भागीदार आणि संचालक आहे) याचा जन्म झाला. पुण्याहून तार आली, तेव्हा भावनेच्या आवेगाने माझे हात थरथर कापू लागले. मी तडक पुण्याला गेलो. मुलाला पाहून मनात वात्सल्याचे वादळ उठले. माझ्या डायरीत या प्रसंगी मी 'बाळा तू बोल, ते बोल, आज मनी जे खोल वदलो जे नादी, संवादी, तुझिया जन्मा आधी' या ओळी लिहून काढलेल्या मला आढळल्या. हा मानवसमाज चालत आला आहे. या सातत्याचे मूळ काय याचा अनेकांनी विचार केला. कोणतीच मूल्ये शाश्वत स्वरूपाची असतील असे आढळून येत नाही. फक्त एक सत्य मात्र चिरंतन वाटते. एका पिढीला पुढे येणाऱ्या पिढीबद्दल वाटणारा जिव्हाळा आणि वात्सल्य हे ते सत्य होय. जग यामुळे पुढे चालले आहे, आणि याचमुळे चालू राहील.

हैदराबाद राज्यात उमूरे मजहबी म्हणजे धार्मिक बाबीचे एक खाते असे.

हैदराबाद राज्यात शेकडो देवळे, मशिदी, दर्गे, मठ, इत्यादि संस्था होत्या. त्यांना इनाम जमिनी किंवा वर्षासने असत. त्यांची व्यवस्था बरोबर होते की नाही हे पाहण्याचे काम मामलेदार (तहसीलदार) यांचे असे. त्याप्रमाणे मी आपल्या मशिदी, दर्गे, देवळे इत्यादींना भेटी देऊन त्यांच्या व्यवस्थेसंबंधी चौकशी करीत असे. हुजूरनगर तालुक्यात कृष्णाकाठावर भव्य आणि रमणीय अशी राममंदिरे होती. एक हिंदू तहसीलदार रामदर्शनाला येत आहे, म्हटल्यावर साहजिकच गावच्या मंडळींना आनंद होई. आणि ते या गोष्टीचा मोठा समारंभ करीत. यावरून मी हिंदुत्वनिष्ठ आहे असा गवगवा होऊ लागला. दिवाळीच्या प्रसंगाने मी हुजूरनगरच्या स्थानिक अधिकाऱ्यांना एक जंगी पार्टी दिली आणि त्या प्रसंगी मी दिवाळीचे काय महत्त्व आहे यासंबंधी बोललो. माझ्याकडे तेलुगू आणि संस्कृत या भाषांचे विद्वान शास्त्री, पंडित येत. त्यांच्या सहवासाने मी तेलुगूत बोलू लागलो होतो. मला वाटते या गोष्टी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अप्रिय वाटत असाव्यात.

जानेवारी १९३५ मध्ये माझी बदली तेलंगणातून मराठवाड्यात करण्यात त्याली. सतरा जानेवारीला उषा मुलाला घेऊन बनारसला आपल्या वडिलांकडे गेली. हुजूरनगर तालुक्याचा चार्ज देऊन मी हैदराबादेस आलो. तेलंगणचे कमिशनर दोराबजी दाराबजंग चिनाय यांना मी भेटलो.

हैदराबादचा पंतप्रधान सालारजंग (१८५३ ते १८८३) याने राज्य सुधारणेसाठी निरनिराळ्या प्रांतांतून कर्तबगार माणसे हैदराबादेस बोलाविली होती. या निमित्ताने राज्याबाहेरची अनेक कुटुंबे हैदराबादेत नोकरीला लागली. यात बहुसंख्य मुसलमान होते; पण हिंदू आणि इतर जमातींचीही बरीच माणसे हैदराबादेत नोकरीच्या निमित्ताने स्थायिक झाली होती. हैदराबादचे कायदेमंत्री दिवाणबहादुर आरुवामुदु आयंगार, कायदेमंडळाचे सभापती काशीनाथराव वैद्य, इंजीनियर गाडगीळ, उद्योगखात्याचे संचालक करमरकर (इरावतीबाई कर्वे यांचे वडील), डॉक्टर किर्लोस्कर, पंडित सातवळेकर, अघोरनाथ चट्टोपाध्याय (सरोजिनी नायडूंचे वडील) इत्यादि मंडळी मूळची हैदराबादच्या बाहेरची. पण त्यांच्यामुळेच हैदराबाद राज्यात हळूहळू जागृती होऊ लागली. मुंबईची काही प्रमुख पारशी कुटुंबेही हैदराबाद राज्यात मोठ्या नोकरीवर चढली. फरीदूनजी फरीदून मुल्क हे तर काही दिवस हैदराबादचे पंतप्रधान होते. कस्टम कमिशनर रुस्तुमजी, रेव्हेन्यू कमिशनर दोराबजी चिनाय, महसूल खात्याचे नायब सचिव ईरजशहा चिनाय (महाराष्ट्राचे सध्याचे मुख्य सचिव श्री. पेमास्टर यांचे सासरे) अशी मंडळी मोठमोठ्या हुद्यावर होती.

मी दोराबजी चिनाय यांना भेटलो, माझी बदली मराठवाड्यात झाली आहे, मी आपला निरोप घेण्यास आलो आहे असे मी त्यांना सांगितले. भेटीच्या वेळी आम्ही दोघेच होतो. दोराबजी मला म्हणाले, 'माधवराव तुमच्याबद्दल काही तक्रारी आल्या आहेत. त्या मी निराधार समजतो. शिवाय तुमची बदली मराठवाड्यात होत आहे. त्यामुळे या तक्रारींची चौकशी करण्याचे कारण नाही.' इतके म्हणून ते थांबले आणि आपण दोघेच आहोत याची खात्री करून घेऊन म्हणाले, 'माधवराव, माझा सल्ला ऐका. ही नोकरी सोडून तुम्ही वकिलीचा अभ्यास करा आणि तो पेशा पत्करा.' माझ्या चेहेऱ्यावरील आश्चर्य त्यांच्या लक्षात आले असावे. ते पुढे म्हणाले, 'माधवराव, जातीय भावनांचा समुद्र पसरला आहे. देर इज ए सी ऑफ कम्यूनल फीलिंग. तो तुम्ही कसा पार कराल हे मला कळत नाही, आय डू नॉट नो हाउ यू विल क्रॉस इट.' हे त्यांचे शब्द होते. दोराबजींच्या या उद्गारांनी मी अत्यंत अस्वस्थ झालो. पण नोकरीपेशा टाकून देण्याची वेळ निघून गेली होती, समोर येऊ घातलेल्या प्रसंगांना तोंड देणे प्राप्त होते.

मराठवाड्यात माझी बदली नक्की कोणत्या तालुक्यावर झाली आहे हे मला औरंगाबादच्या सुभेदारां(कमिशनर)कडून कळणार होते. म्हणून मी फेब्रुवारी १९३५ मध्ये प्रथम ओरंगाबादेस गेलो.

हैदराबाद राज्यातील प्रमुख अशी जहागिरदार घराणी बारा होती. पायग्याचे अमीर हे सुन्नी मुसलमान. यांच्या तीन शाखांचे मिळून वार्षिक उत्पन्न एक कोटी रुपयांचे होते. सालारजंग, शिया पंथी मुसलमान, वार्षिक उत्पन्न तेवीस लाख; महाराजा किशनप्रसाद खत्री, उत्पन्न सतरा लाख; राजा शिवराजबहादुर माथुर, कायस्थ, पाच लाख; फखरुल्मुक, शिया मुसलमान, पाच लाख; खान-खानान, शिया मुसलमान, पाच लाख; राजे शामराज रायरायान, महाराष्ट्रीय आडनाव भालेराव, वार्षिक उत्पन्न चार लाख; शौकतजंग शिया मुसलमान, उत्पन्न दोन लाख अशी ही प्रमुख घराणी होती. तसे हैदराबाद राज्यात लहान-मोठे, अगदी हजार दोन हजारचे उत्पन्न असणारे धरून, अठराशे जहागीरदार होते. पण प्रमुख घराणी वरीलप्रमाणे होती. औरंगाबादचे सुभेदार फखरजंग हे फखरुल्मुल्कच्या घराण्यातील होते. गृहस्थ अतिशय शांत आणि सज्जन. माझी बदली परभणी जिल्ह्यात कळमनूरी या तालुक्यावर झाली असे मला त्यांच्या-कडून कळले. ही जहागिरदार मंडळी कामात विशेष वाकबगार नसत. पण ती उदार, सुसंस्कृत आणि जातीय भावनेपासून अलिप्त असत. त्या काळातील हिंदू आणि मुसलमान सरंजामदारांचा मिळून असा एक वेगळा वर्गच बनला होता.

पुढे पुढे मात्र या वर्गाला जातीय भावनेमुळे तडे जाऊ लागले. याला प्रमुख कारण म्हणजे इत्तिहादुल्मुसलमीन आणि रजाकार या संस्थांचे पुढारीपण बहादुरखान नबाब बहादुर यार जंग या पठाण जहागिरदाराकडे आले हे होय.

औरंगाबाद हे मराठवाड्याचे प्रमुख शहर. सरस्वती भवन, बळवंत वाचनालय, अशा काही संस्था तेथे चालू झाल्या होत्या. त्यावेळी औरंगाबादेत प्रमुख पुढारी म्हणजे डॉक्टर सीमंत हे सुप्रसिद्ध समाजसुधारक होते. मी वेळात वेळ काढून त्यांची गाठ घेतली आणि सामाजिक चळवळींसंबंधी त्यांच्याशी चर्चा केली.

औरंगाबादेहून निघून मी चवदा फेब्रुवारी १९३५ रोजी कळमनूरीस आलो. मी हुजूरनगर सोडले तेव्हा तेलंगणातील वातावरण अगदी शांत होते. राजकीय जागृती नाही, मध्यमवर्ग नाही, जमीनदारांची पकड मोठी, सामाजिक चळवळ प्रथमावस्थेत. अशा या तेलंगणात इ. स. १९४८ नंतर प्रचंड चळवळ उद्भवून हलकल्लोळ उडेल अशी १९३५ मधे कुणालाही कल्पना करता येणे शक्य नव्हते.

१०

कळमनूरी
१९३५ ते १९३८

कळमनूरी तालुका हा वऱ्हाडच्या सरहद्दीवर आहे. पेणगंगा ही या तालुक्याच्या सरहद्दीवरून वाहात जाते. नदीच्या पलीकडे वऱ्हाडमधील यवतमाळ जिल्ह्याचा पुसद तालुका आहे. वास्तविक पाहता गंगाखेड आणि परतूर हे दोन तालुके सोडून दिले तर सगळा परभणी जिल्हा हा वऱ्हाडच्या सुभ्यात मोडत असे. इ. स. १८५३ मध्ये इंग्रजांनी निजामकडून वऱ्हाडचा बव्हंश भाग घेतला. जो भाग त्यांनी सोडून दिला त्यांतून परभणी हा एक संपूर्ण जिल्हा बनविण्यात आला. कळमनूरी हा परभणी जिल्ह्यात असल्यामुळे तालुक्यातील समाजजीवन हे वऱ्हाडी वळणावर गेले होते. लोकांची बोलभाषा वऱ्हाडी बोलभाषेला जुळणारी असे. बाळाजीच्याऐवजी बायाजी, गुळाच्या ऐवजी गुय, नुकसानीच्या ऐवजी लुसकानी, माझेच्या ऐवजी मोहाचे, मी ऐवजी म्या, शेताच्या ऐवजी वावर, विहिरी ऐवजी बारव, तुला मला च्या ऐवजी तुले मले असे कितीतरी शब्द कळमनूरी तालुक्याच्या बोलभाषेत आढळून येत. परभणी जिल्हा हा निजाम राज्यात

राहिल्यामुळे बोलभाषेत अनेक उर्दू शब्द घुसले होते. अर्थातच मला हे वातावरण अपरिचित नव्हते.

मराठवाड्यातील माणसे ही साध्या राहणीची, स्वाभिमानी, पण प्रेमळ आहेत. तेलंगणातील जमीनदारांप्रमाणे येथे हजारो एकर जमिनी बाळगणारी माणसे नाहीत. किंवा एकीकडे मोठी श्रीमंती तर दुसरीकडे भयंकर दारिद्र्य आणि यामुळे झालेला स्वाभिमानाचा लोप असे प्रकार मराठवाड्यात आढळून येत नसत. लोकांच्या वागणुकीत फाजील अजीजी किंवा दरबारी डौल नसे. मराठवाड्यात तलाव नाहीत. भातशेती अगदीच कमी. पावसावर शेती अवलंबून असल्यामुळे कोरडवाहू जमीन जास्त. ज्वारी, गहू, कापूस, भुईमूग, चणे, तुरी इत्यादी पिकांचे प्रमाण अधिक. विहिरीखाली बागायत करीत. तीत संत्री, मोसंबी, केळी, मिरची, लसूण, कांदे, हळद इत्यादींची पिके काढण्यात येत. हुरड्याच्या हंगामात लोक हौसेने शेतात हुर्ड्याच्या पार्ट्या देत. संत्र्यांच्या मोसमात मळ्यांतून जमून संत्री खात. शेतांत मोठमोठ्या विहिरी असत. तेथे पोहायला जाण्याचे कार्यक्रम होत. या अस्सल मराठी वातावरणात मी चटकन् समरस झालो. दादा देशमुख आणि त्यांचे बंधू, शंकरराव देशमुख वकील, दिगंबरराव देशमुख, केशवराव नांदापूरकर वकील इत्यादींशी त्यावेळी जडलेले माझे जिव्हाळ्याचे संबंध अद्याप टिकून आहेत. कळमनूरी गावाची लोकसंख्या पाच हजार असावी. तालुक्यात सामाजिक अगर राजकीय अशी कोणतीही चळवळ नव्हती. गावात एक वासुदेवानंद वाचनालय नावाचे वाचनालय. हौशी मंडळी गणेशोत्सव साजरा करीत हेच काय ते सामाजिक जीवन. शिक्षणाच्या दृष्टीनेही तालुक्यात प्रगती झालेली नव्हती. गावात एक मिडल स्कूल असे. माझ्या वेळी गावात पदवीधर अशी मंडळी नव्हतीच. इंग्रजी जाणणारी वकील मंडळीही आढळून येत नसत. पण या तालुक्यातील काही मुले औरंगाबाद इत्यादी ठिकाणी शिक्षण घेऊ लागली होती. मराठवाड्यातील सुप्रसिद्ध साहित्यिक कैलासवासी नारायणराव नांदापूरकर हे याच तालुक्यातील. ते त्यावेळी औरंगाबादच्या इंटरमीजियेट कॉलेजमधे मराठीचे प्राध्यापक होते. मराठीच्या उदयोन्मुख लेखकांना त्यांचा मोठा आधार वाटे.

मी कळमनूरीला जाऊन चार्ज घेतल्यावर लवकरच उषा बनारसहून आली. माझे आईवडील तीर्थयात्रेला गेले होते. ते काही दिवसांसाठी राहण्यास माझ्याकडे आले. नातू पाहण्यास मिळाला म्हणून त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. माझ्या आयुष्याला स्थिरता येऊ लागली होती.

मी कळमनूरीला गेलो त्यावेळी परभणी जिल्ह्याचे अव्वल तालुकदार

(कलेक्टर) अबुल्हसन रिजवी हे होते. हे शियापंथी मुसलमान. त्यांची मातृभाषा फार्सी असावी. त्यांचे घराणे इराणमधून अलीकडेच आले असावे. कारण त्यांचे जवळचे नातेवाईक अद्याप त्या देशात होते. अबुल्हसन हे बॅरिस्टर होते. पण तो पेशा सोडून त्यांनी सरकारी नोकरी पत्करली होती. इंग्रजी, उर्दू आणि फार्सी या तिन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचे वाचनही चांगलेच झाले असावे. त्यांच्याइतका शांत आणि सज्जन माणूस माझ्या पाहण्यात नाही.

विसरभोळेपणा हा अबुल्हसनच्या स्वभावाचा एक विशेष म्हणून सांगता येईल. कोणतीही गोष्ट ते लागलीच विसरून जात. याचा एक चांगला परिणाम झाला. परभणीला गणेशोत्सव, दिंड्या, मिरवणुकी इत्यादींच्या निमित्ताने हिंदु-मुस्लिम जमातीत तेढ असे. तेलंगणात धार्मिक कारणावरून तंटे सहसा होत नसत. पण मराठवाड्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची पद्धत सुरू झाल्यावर अशा उत्सवांना मुसल्मानांकडून अडथळे होऊ लागले आणि त्यामुळे दंगली होऊ लागल्या. मराठवाड्यातील हिंदूंच्या जागृतीची ही पूर्व चिन्हे होती. अबुल्हसननी परभणीचे कलेक्टर म्हणून चार्ज घेतला. मुसल्मानांना वाटले की आपल्याला पाठिंबा मिळेल. ते एक शिष्टमंडळ घेऊन अबुल्हसनकडे गेले आणि त्यांनी हिंदूंच्या विरुद्ध अनेक गाऱ्हाणी मांडली. अबुल्हसननी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्यांना सांगितले ' अच्छा, मैं देखुंगा, बरे, मी पाहीन, ' यानंतर काही दिवसांनी हिंदूंचे शिष्टमंडळ अबुल्हसनकडे गेले. त्यांनीही मुसल्मानांच्या विरुद्ध तक्रारी मांडल्या. अबुल्हसननी त्यांनाही तसेच आश्वासन दिले. यानंतर ते सगळे प्रकरण विसरून गेले. दोन तीन वेळा हिंदूमुसलमानांनी त्यांची गाठ घेऊन आपापल्या गाऱ्हाण्यांचा पुनरुच्चार केला. प्रत्येक वेळेस त्यांना ' अच्छा देखुंगा ' म्हणून आश्वासने मिळत. पण प्रत्यक्षात अबुल्हसननी त्यांच्या प्रकरणांचा विचारच केला नाही. या गोष्टी ते कधीच विसरून गेले होते. शेवटी हिंदू आणि मुसल्मान या उभय जमातीच्या पुढाऱ्यांनी ठरविले की अव्वल तालुकदार (कलेक्टर) अबुल्हसन हा एक नंबरचा मूर्ख माणूस आहे. हा आपल्या प्रकरणात मुळीच लक्ष घालीत नाही. याच्या काळात आपण आपसात भांडणे शहाणपणाचे होणार नाही. शांतता पाळावी हेच बरे. परभणीत लोक भिंतीवर बलाचे चित्र काढून अव्वल तालुकदार म्हणून खाली लिहीत; पण अबुल्हसन त्याची पर्वा करीत नसत. याचा परिणाम असा झाला की त्यांच्या काळात परभणी जिल्ह्यात हिंदू-मुसलमानांचे दंगे असे उद्भवलेच नाहीत. काहीही न करता प्रकरणे निकालात काढण्याचे अबुल्हसनचे कसब काही औरच होते.

आमचे कलेक्टर अबुल्हसन साहेब यांचा मला एकदा मोठा गमतीदार अनुभव आला. एकदा ते कळमनूरी तालुक्यात जमाबंदीच्या फिरतीवर आले. शेतसारा किती वसूल करावयाचा, सूट किती, सारातहकुबी किती, माफी किती किंवा नवीन लागवडीमुळे नव्याने सारा किती बसवायचा आणि त्या त्या वर्षी तालुक्यातून एकंदर किती सारा वसूल करावयाचा हे ठरविण्याचे काम मामलेदाराचे असते. यासाठी त्याला खेड्यापाड्यांतून हिंडावे लागते. त्याने निश्चित केलेल्या रकमेची चाचणी करण्यासाठी दुय्यम तालुकदार (डेप्युटी कलेक्टर) अगर अव्वल तालुकदार (कलेक्टर) हे तालुक्यात फिरतीवर येत आणि काही खेड्यांची चाचणी करून तालुक्याची रक्कम निश्चित करीत. या प्रकाराला जमाबंदी म्हणतात. अबुल्हसन साहेब जमाबंदीसाठी कळमनूरीला आले. हिंगोली ते नांदेड हा सहासष्ट मैलांचा मोटाररस्ता कळमनूरीवरून जातो. कळमनूरीहून नांदेड हे चौपन्न मैल आहे. वाटेत कळमनूरी तालुक्याची अनेक खेडी आहेत. कारकुनाची इच्छा की अबुल्हसनसाहेबांनी एकदा तरी मोटारीतून दहापाच मैल फिरून यावे. म्हणजे त्यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतांची पाहणी केली, अशी त्यांच्या दौरारोजनिशीत नोंद तरी करता येईल. तेवढे तंत्रपालन (याला उर्दूत तकमीले जाब्ता, फॉर्मालिटी म्हणत) तरी आवश्यक होते. पण कलेक्टर साहेब जागेवरून हलण्याचे नाव घेईनात. दिवसभर विश्रांती, चिरूट ओढणे आणि माझ्याशी विविध विषयांवर गप्पा मारणे हाच त्यांचा कार्यक्रम असे. शेवटी कलेक्टरांना जागेवरून हलविण्याची एक युक्ती कारकुनांनी केली. त्यांनी अबुल्हसनना खोटेच सांगितले की अखाडा बाळापूर (कळमनूरीपासून एकोणीस मैलांवर मोटार रस्त्याने) या ठिकाणी मार्केट बांधण्याचे एक प्रकरण आहे. तहसीलदार साहेबांना याबाबतीत आपले मार्गदर्शन हवे आहे. तर आज आपण आणि सेतुमाधवराव यांनी संध्याकाळी अखाडा बाळापूरला जाऊन यावे. अबुल्हसन या गोष्टीला कबूल झाले. बरे, कारकुनांनी मला ही गोष्ट सांगावी की नाही. ती ते सांगण्यास विसरले किंवा त्यांना तशी संधी सापडली नाही. संध्याकाळी चार वाजता मी अबुल्हसनकडे गेलो. ते तयार होते. मला पाहताच ते म्हणाले ' चला माधवराव. ' मी त्यांच्या मोटारीत बसलो. आमची मोटार नांदेडच्या रस्त्याने भरधाव चालू लागली. अबुल्हसनना कोठे जाण्याची इच्छा आहे याची मला कल्पना नव्हती. त्यांची समजूत अशी की मी त्यांना इन्स्पेक्शन (तपासणी) साठी अखाडा बाळापूरला घेऊन जात आहे. बरे, तुम्ही कोठे चालला आहात हे त्यांना विचारणे शिष्टाचाराच्या विरुद्ध झाले असते. हैदराबाद राज्यात शिष्टाचाराचे

फार महत्त्व असे. शेवटी आम्ही बाळापूरला जाऊन पोहोचलो. मोटारीतून उतरताच अबुल्हसननी मला विचारले, 'माधवराव, येथे आपल्याला काय पाहावयाचे आहे?' या प्रश्नाने मी चाट पडलो. मी म्हणणारच होतो की 'आपण येथे काय पाहण्यासाठी आला आहात?' पण मी स्वतःला सावरले. काही तरी काम काढावे म्हणून मी त्यांना म्हटले, 'साहेब, येथील मंडळींनी आठवड्याच्या बाजारासाठी चौथरे बांधून हवेत, म्हणून मागणी केली आहे. पण त्यांनी सुचविलेली जागा ही ओढ्याच्या काठी आहे. ओढ्याला पूर आला तर चौथरे पाण्याखाली बुडून जातील. म्हणून दुसरी जागा शोधावी असे माझे मत आहे. हे इकडे पोलिस स्टेशन आहे. याच्या जवळपासची जागा उंचावर आहे. आपल्याला पसंत असेल तर मी तसा निर्णय घेतो.'

'बहोत मुनासिब–योग्य, योग्य' अबुल्हसन म्हणाले. मीही त्यांच्या निर्णयाने समाधान झाल्यासारखे दाखविले. आम्ही परत आलो. त्यांना मुक्कामावर सोडून मी बाहेर आलो. मी त्यांच्या पर्सनल–क्लार्कला विचारले, 'काय हो, मी कुठे म्हटले होते तालुकदारसाहेबांना अखाडा बाळापूरला मार्केटची जागा दाखवायला न्यायचे आहे म्हणून? बरे, तुम्ही मला आधी सांगून तरी ठेवायचे. ही काय भानगड आहे?' पर्सनल–क्लार्क म्हणाला, 'साहेब, क्षमा करा. तालुकदार-साहेबांनी जमाबंदीच्या निमित्ताने इतकी शेते पाहिली हे आम्हांला सरकारी दौराडायरीत नोंदायचे होते. तालुकदारसाहेब तर जागचे हलेनात; मग आम्हांला ही युक्ती योजावी लागली. आपल्याला सांगावे म्हटले तर आपण मोटारीत जाऊन बसला, त्यामुळे सांगणे जमले नाही.'

जमाबंदीचे काम आटोपल्यावर मी अबुल्हसन साहेबांना निरोप देण्यासाठी हिंगोलीला गेलो. कळमनूरीला रेल्वेस्टेशन नाही. तेथून बारा मैलांवर हिंगोली हे रेल्वेस्टेशन आहे. गाडी निघण्यास अवकाश होता. मी अबुल्हसनना म्हटले, 'साहेब, मला कामासंबंधी काही सूचना करावयाच्या असतील तर कराव्या.' अबुल्हसन कोणत्या नादात होते कोण जाणे! आम्ही फलाटावर फिरत होतो. ते एकदम थांबले. त्यांनी आपले मनगटावरील घड्याळ मला दाखविले. ते मला म्हणाले, 'घड्याळात किती वाजले आहेत?' मी म्हटले, 'दुपारचे बारा'. ते म्हणाले, 'बाराचा आकडा आहे तेथे सहा वाजले, किंवा घड्याळ उलटे करून पाहिले तर किती वाजलेले दिसतील?' मी म्हटले, 'साडेसहा' ते म्हणाले, 'बरोबर, यावेळी इंग्लंडमध्ये साडेसहा वाजले आहेत. यापुढे इंग्लंडमध्ये काय टाइम आहे हे पाहावयाचे असल्यास तुम्ही आपले घड्याळ उफराटे करून पाहात चला. या माहितीचा तुम्हांला उपयोग होईल.' मी म्हटले, 'साहेब, ही

अमूल्य माहिती दिल्याबद्दल मी आपला फार आभारी आहे.' पण या माहितीचा माझ्या रेव्हेन्यूखात्याच्या कामकाजामध्ये काय उपयोग होणार होता ते कोडे मला अद्याप उलगडले नाही.

अबुल्हसन हे एकदा सहा महिन्यांच्या रजेवर गेले होते. रजेवरून परत आल्यावर त्यांना पुन्हा परभणीला पाठवण्यात आले. मी त्यांना भेटलो तेव्हा ते मला म्हणाले, 'लाईक ए ब्याड कॉईन आय ह्याव टर्न्ड् अप. खोटे नाणे' बाजारात सारखे फिरत असते तसा मी पुन्हा येथे परत आलो.'

असा हा शांत आणि सज्जन माणूस. हैदराबादच्या अधिकारी वर्गात अशी माणसे अधिक असती तर हिंदू-मुसलमान प्रश्नाला उग्र स्वरूप कधीच आले नसते.

हैदराबादेतील इतर भागांप्रमाणेच परभणी जिल्ह्यातही जवळ जवळ सगळेच अधिकारी मुसल्मान होते. दोन तीन जुने अधिकारी सोडून दिले तर सगळे इंग्रजी शिक्षण घेतलेले पदवीधर होते. परभणीचा ट्रेजरी ऑफिसर महंमद बाकर हा विलक्षण लाचखाऊ होता. सनदी नोकरांचे प्रवास भत्ते मंजूर करताना त्यांच्याकडून लाच मागण्यापर्यंत त्याची मजल गेली होती. शेवटी परभणीचे पोलीस प्रमुख आणि हंगामी कलेक्टर यांनी त्याच्या ऑफिसवर धाड घालून त्याची उचलबांगडी केली. परभणीचे हंगामी कलेक्टर आणि तेथील डेप्युटी कलेक्टर (दुय्यम तालुकदार) यांच्यातील वाद विकोपाला जाऊन एकाने दुसऱ्यावर विपरीत व्यसनाचा आरोप केला. या वादातून डेप्युटी कलेक्टरला शेवटी परभणीतून बदलावे लागले. हिंगोलीचे एक डेप्युटी कलेक्टर नबाब खुर्शीद अलीखान हे महाराज सर किशनप्रसाद यांचे जावई होते. आपले कनिष्ठ अधिकारी आपल्यावर सारखी पाळत ठेवीत असतात या संशयाने ते सतत पछाडलेले असत. माझ्या शेजारच्या हिंगोली तालुक्याचा तहसीलदार हस्नुद्दीन याला इंग्रजी अजिबात येत नसे. त्याचे वडील इमादगंज हे एकेकाळी हैदराबादचे पोलीस कमिशनर (कोतवाल) होते. त्या गर्वावर तो जगत असे. आपल्याला अतिशय काम पडते, कामाच्या ढिगाऱ्याखाली आपले हाडन् हाड दुखू लागले आहे (मेरी हड्डी हड्डी दुख रही है) असे तो म्हणत फिरत असे. परभणीचे कलेक्टरचे असिस्टंट (मददगार माल) हे तर कागदावर एक सही केली की स्वतःचे हात दाबून दीर्घ निश्वास सोडीत म्हणत 'कितना काम है, कितना काम है! किती काम पडते, किती काम पडते!' लोकांनी आपली स्तुती करीत राहावे असे त्यांना सारखे वाटे. समोर आलेल्या प्रत्येक माणसाला ते विचारीत, 'लोग मेरे मुताल्लिक क्या कहते हैं? लोक माझ्यासंबंधी काय म्हणतात?' आणि मग समोरची माणसे त्यांना सांगत 'लोग कहते हैं कि आपके जैसे मददगार माल परभणी को मिला

ही नहीं. लोक म्हणतात की, आपल्यासारखा कलेक्टरचा असिस्टंट परभणीला अद्याप लाभलाच नाही ' या उद्गारावर ते खुश होते.

आपले काम मनःपूर्वक करणारे अधिकारी नव्हते असे नाही. पण त्यांची संख्या कमी असे. पण मुसलमान अधिकारी पदवीधर असोत की इंग्रजी शिक्षण न घेतलेले असोत; इतिहास, राजकारण याचा अभ्यास केलेला, किंवा हैदराबादचे भवितव्य काय आहे याचा विचार करणारा, भारतीय राजकारणाचे हैदराबादवर किती दीर्घ परिणाम होतील याचा अभ्यास करणारा, किंवा जनतेत जागृती झाली तर काय होईल याची काळजी करणारा एकही अधिकारी मला भेटला नाही. त्यांना हैदराबादचा इतिहासही नीट माहीत नव्हता. निजामाचे राज्य स्थापन झाल्यापासून मराठ्यांनी त्याचे पराजयावर पराजय केले, त्याचे अर्धे राज्य हिसकावून घेतले, मराठ्यांचे पराक्रम अटकेपर्यंत पसरले होते इत्यादी ऐतिहासिक गोष्टींची त्यांना कल्पनाही नसे. मुसलमानांचे वर्चस्व अटळ आहे, हिंदू हे नेहमी जितच राहातील, निजामचे राज्य हे चिरकाल टिकणारे (रियासते अबदेमुद्दत) आहे, निजाम हा अतिशय शहाणा आणि धूर्त आहे, इंग्रजसुद्धा त्याच्या बुद्धिमत्तेला वचकून असतात अशा मूर्ख आणि भोळसट कल्पना या अधिकारी वर्गात आढळून येत.

वऱ्हाड हा निजामाला परत मिळालाच पाहिजे, सालार जंग दिवाण असताना त्याने इंग्रजांना वऱ्हाडच्या बाबतीत कायदेशीर पेचात पकडले म्हणून इंग्रजांनी त्याच्यावर विषप्रयोग केला. अशी या मंडळींची समजूत असे. मी निजाम घराण्याचा खरा इतिहास सांगू लागलो, राक्षसभवन, उदगीर, पालखेड, भोपाळ, खर्डे या लढायांतील निजामाच्या पराजयाच्या गोष्टी सांगू लागलो की ही मंडळी अस्वस्थ होत. त्यांचा या गोष्टीवर विश्वासच बसत नसे. प्रातिनिधिक राज्यव्यवस्था, कायदेमंडळे इत्यादींचा विचारही या लोकांच्या मनात येत नसे. इ. स. १९३६ मध्ये निजामाच्या राज्यारोहणाचा रौप्यमहोत्सव झाला. या महोत्सवाला म्हैसूरचे युवराज आणि दतियाचे राजे सोडले तर कोणी संस्थानिक हजर नव्हते. यावर आमचे अब्दुस्सलाम मुन्सफ मला म्हणतात काय ' अहो, इंग्रजांनीच संस्थानिकांना येऊ दिले नाही. त्यांना माहीत की निजाम हा अलौकिक प्रतिभावान मनुष्य आहे. तो संस्थानिकांना असे काही समजावून देईल की, त्यामुळे इंग्रजांना मोठा पेच निर्माण होईल. ' मला हसू आवरेना. इंग्रजांच्या संगिनींच्या बळावर जगणारा हा निजाम, हा संस्थानिकांना काय सल्ला देणार होता ? पण या मूर्ख लोकांशी वाद करावयाचा कोणी ? असा हा अधिकारी वर्ग.

अवघ्या बारा वर्षांत हैदराबाद राज्याचे तुकडे तुकडे उडून जातील याची

तिळमात्र कल्पना या लोकांना नव्हती.

१९३५ नंतर हैदराबाद राज्यात हळुहळू जागृती होऊ लागली. भारतातील राजकीय चळवळींची माहिती राज्यात पसरू लागली. मराठवाड्यात खासगी शिक्षणसंस्था, आणि वाचनालये ही स्थापन होऊ लागली. दिगंबरराव बिंदू-(नांदेड), मुकुंदराव पेडगावकर, गोविंदराव नानल (परभणी), डॉक्टर सीमंत, गोविंददास श्रॉफ, माणिकचंद पहाडे, वैशंपायन, नेवासकर, दिगंबरदास चौधरी, (औरंगाबाद), स्वामी रामानंदतीर्थ, बाबासाहेब परांजपे, फूलचंद गांधी (उस्मानाबाद आणि बीड) इत्यादी मंडळीं सार्वजनिक चळवळीं चालवू लागली.

पण हे लोण तालुक्यापर्यंत पोहोचले नव्हते. तालुक्यातील बहुतेक वकील मंडळींना इंग्रजीचा गंध नसे. बाहेरची वर्तमानपत्रे अशी क्वचितच वाचली जात. वास्तविक पाहता दोन दृष्टींनी या मंडळींना सनदशीर काम करता आले असते. एक, सरकारी कायदे कानून हे विशिष्ट क्षेत्रांत जनतेला किती जाचक होत आहेत हे दाखवून देणे; दुसरे चालू असलेले नियम सरकारी अधिकारी कसे धाब्यावर बसवीत आहेत हे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेला आणून देणे. पण या गोष्टी करण्यास लागणारी धमक या मंडळीत नसे. जिल्ह्यातील आणि तालुक्यातील मुसलमान वकील, कंत्राटदार, व्यापारी इत्यादींचे मुसलमान अधिकाऱ्यांशी सूत असे. मुसलमान गुंड कंत्राटे घेत, व इतर अनेक धंदे करीत. त्यांना मुसलमान वकिलांचा आश्रय असे. आणि सरकारी अधिकारी त्यांच्या अनिर्बंध वागणुकीकडे काणाडोळा करीत. त्यांना कोणी आळा घालण्याचा प्रयत्न केला की लगेच त्या प्रश्नाला जातीय स्वरूप देण्यात येत असे. हिंदू पुढाऱ्यांवर हल्ले, मारामाऱ्या, हे सर्रास चालत. यामुळे मुसलमान गुंडांच्या वाटेला सहसा कोणी जात नसत. आपले काम भले की आपण भले अशी या प्रतिष्ठित मंडळींची वागणूक असे. जनतेमध्ये कायदेकानूनचे विलक्षण अज्ञान होते. त्यामुळे अधिकाऱ्यांची दंडेली ही नियमाला धरूनच असली पाहिजे अशी सर्वसामान्य समजूत असे. मराठवाड्यातील माणसे दणकट होती. तेलंगणातील गरीब वर्गाप्रमाणे दबणारी अगर श्रीमंत वर्गाप्रमाणे हांजी हांजी करणारी नव्हती. याची जाणीव अधिकारी वर्गाला असे, पण कायद्याचे अज्ञान, शिक्षणाचा कमी प्रसार आणि नेतृत्वाचा अभाव यामुळे जनतेत क्षोभ निर्माण होईल अशी चळवळ होण्याची शक्यता नव्हती.

उषाला मर्दानी खेळांची आणि सार्वजनिक उत्सव-समारंभांत भाग घेण्याची हौस असे. कॉलेजमधे असताना ती हॉकी, बॅडमिंटन इत्यादी खेळांत भाग

घेत असे. सायकलिंग हा तिचा आवडता छंद होता. गायन आणि अभिनय यांचाही तिचा अभ्यास होता. माझ्या उत्तेजनाने तिचे मराठी वाचन वाढले, ती लघुकथा लिहू लागली. त्या निजाम-विजयात प्रसिद्ध होऊ लागल्या. कळमनूरीत तिने तीन वर्षे गणेशोत्सव साजरा करण्यात मोठे कष्ट घेतले. या प्रसंगी तिने तीन वर्षे स्वतः नाटकांतून कामे केली, होतकरू मुलामुलींना बक्षिसे दिली आणि अशा उत्सव-समारंभांतून काम करणारी माणसे तयार केली. आमचे घर म्हणजे स्त्रियांचे कायमचे संमेलनच बनले होते. उषाला घोड्याच्या स्वारीची मोठी हौस असे. तिच्यासाठी मी घोडे विकत घेतले, रोज सकाळी आम्ही पाच सहा मैल घोड्यावरून रपेट करून येत असू. संध्याकाळी मी तिला शेक्सपीयरची नाटके वाचून समजावून देत असे. ॲज यू लाईक इट, रोमियो ज्यूलिएट, मर्चन्ट ऑफ व्हेनिस इत्यादी नाटके आम्ही मिळून वाचल्याचे मला आठवते.

माझे आईवडील १९३५ मध्ये माझ्याकडे आले. या खेपेस ते पाच सहा महिने आमच्याकडे होते. मी एक गोष्ट ठरविली होती. माझे वडील १९२५ मध्ये सेवानिवृत्त झाले. तोपर्यंत त्यांचे जीवन मोठ्या वैभवात गेले होते. व्रते, वैकल्ये, सणवार अनुष्ठाने, पुराणश्रवण, भोजने, पंक्तीला ब्राह्मण, नातेवाईकांची वर्दळ, मुलींची माहेरपणे, अशी एकच गर्दी आमच्या घरात असे. पण ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना कष्टाचे दिवस आले, त्यांच्या हातात पैसा खेळेनासा झाला. त्यांचे पेन्शन पन्नास साठ रुपयांचे होते. आमच्या कारजोळ मुळवाड या गावच्या शेताचे वर्षाकाठी हजार एक रुपये मिळत. माझे वडील पंढरपूरला स्थायिक झाले होते. तेथे ते चंद्रभागा घाटावरील सुरनिसांच्या वाड्यात राहात. भजन पूजन, पूजा, आराधना, पुराणवाचन असा त्यांचा कार्यक्रम असे. रोज संध्याकाळी ते पांडुरंगापाशी गरुड खांबाजवळ बसून दोन तीन तास भजन करीत. १९२५ ते १९३३ ही आठ वर्षे त्यांनी अतिशय गरिबीत काढली. ते माझ्याकडे आले तेव्हा त्यांना जास्तीत जास्त समाधान लाभावे अशी मी व्यवस्था केली. घरात स्वयंपाकी होता. दूधदुभत्यासाठी मी गाई आणि म्हशी ठेवल्या. सणवार, पूजाअर्चा, सोवळेओवळे, नैवेद्य वैश्वदेव इत्यादी गोष्टी अगदी वडिलांच्या मनासारख्या चालत. ते म्हणतील तसे अन्नदान घडत असे. आमच्या घरी आलेले अतिथिअभ्यागत रिक्तहस्ताने कधीच परत जात नसत. मी उषाला सांगून ठेवले होते की घरातील सगळी व्यवस्था आईवडिलांच्या मनासारखी चालली पाहिजे. उलट माझे आईवडील आमच्या सहली, सफरी, घोड्यावरच्या रपेटी, उषाचे सामाजिक कार्यक्रम इत्यादींत कधीच ढवळाढवळ करीत नसत. त्यामुळे घरात कधीच असमाधानाला थारा मिळत नसे. कळमनूरीच्या आमच्या तीन वर्षांच्या

वास्तव्यात पाहुणे, नातेवाईक इत्यादींनी घर गजबजलेले असे. आईवडील मधून मधून पंढरपूरला जाऊन येऊन असत.

इ. स. १९३६ च्या दहा सप्टेंबरला माझा दुसरा मुलगा अशोक याचा पंढरपूर येथे जन्म झाला. माझी बहीण सीताबाई हिची मुलगी श्यामला हिचा जन्म आमच्या येथे कळमनूरीला झाला. माझा मामा अप्पाराव आणि त्याची बायको ही सुद्धा आमच्याकडे येऊन काही दिवस राहून गेली.

आपण पूर्वी जे जीवन जगलो तसेच आपल्याला अनुभवावयास मिळत आहे याचे माझ्या वडिलांना अतिशय समाधान वाटे. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव यांच्या जीवनाला व्यसनामुळे अनिष्ट वळण लागले याचे माझ्या वडिलांना ब्रह्मांडदुःख होत असे. पण त्यांना सुखी ठेवण्याची माझी सततची धडपड पाहून त्यांना फार समाधान होई. माझा धाकटा भाऊ राघवेंद्र हा त्यांचा लाडका. त्याचे पुढे कसे होईल याची त्यांना काळजी असे. इ. स. १९३६ मध्ये तो मॅट्रिक पास होऊन हैदराबादच्या निजाम कॉलेजमधे दाखल झाला. त्या वेळीं ' आता तो मॅट्रिक पास झाला आहे. त्याला आता कोठेही पोट भरण्याइतके कमावता येईल ' असे उद्गार माझ्या वडिलांनी काढले. सारांश वडिलांच्या मनाप्रमाणे आमचे घर गोकुळाप्रमाणे गजबजलेले असे.

मी बनारसला माझे श्वशुर प्रा. पुणतांबेकर यांना पत्र लिहून काही इंग्रजी पुस्तके पाठविण्याची विनंती केली. त्यांच्याकडून मधून मधून इंग्रजी पुस्तके येत. काही इंग्रजी पुस्तके मी विकत घेतली. १९३५ ते १९३८ या तीन वर्षांच्या काळात मी पुढील इंग्रजी पुस्तके वाचली. राधाकृष्णांचे कल्की, आल्डस हक्स्लेचे एडस् अँण्ड मीन्स, एच. जी. वेल्स, नेहरू आणि चेस्टर्टन यांची आत्मचरित्रे, अनातोल फ्रांस याचे गार्डन ऑफ एपीक्यूरस, वेल्सचे शेप ऑफ थिंग्ज टु कम, गाल्सवर्दीचे फार्साइट सागा, पी. जी. वुडहाउसचे सेंच्युरी ऑफ ह्यूमर, आइन्स्टाइनचे आय लुक ॲट दि वर्ल्ड, पिरांडेलोच्या लघुकथा, अमीर अलीचे हिस्ट्री ऑफ दी सारासेन्स, डाटर ऑफ दि सामुराइ ही जपानी जीवनावरील कादंबरी, पी. आर. लेले यांचे इंडियन फेडरेशन, नेहरूंचे ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री, युसुफ हुसेन खान कृत निजामुल्मुल्काचे चरित्र, आर. वी. बानर्जीकृत हिंदू इंडिया, बर्नार्ड शॉची नऊ नाटके. कॉलेज जीवनात वर्षाला शंभर इंग्रजी पुस्तके असे माझे वाचनाचे प्रमाण होते ते एकदम कमी झाले.

पण माझे मराठी पुस्तकांचे वाचन मात्र सपाटून होऊ लागले. मी स्वतः शेदोनशे पुस्तके विकत घेतली. स्थानिक वाचनालयातून पुस्तके येत ती मी वाचून काढी. मराठवाड्यातील कवींच्यावर निजाम-विजयात माझी लेखमाला सुरू

झाली त्या निमित्ताने माझ्यापाशी अनेक कवितासंग्रह जमले. मराठवाड्यातील त्यावेळचे प्रमुख कवी कोरेकल, नांदापूरकर, महाजन, गाडगीळ, पद्माकर, कांत, मनाठकर, पोहनेरकर, गोळेगावकर, पार्थिव, इत्यादींच्या काव्यांवर मी परीक्षणात्मक लेख लिहिले. लघुकथाही प्रसिद्ध होत होत्या. १९३५ ते १९३८ च्या काळात मी तीनशेच्यावर मराठी पुस्तके वाचून काढली. वरेरकर, फडके, माडखोलकर, खांडेकर, राजरत्न जोशी, पु. य. देशपांडे इत्यादींच्या कादंबऱ्या, अनेक लघुकथासंग्रह, चित्रावकृत ऋग्वेदाचे भाषांतर, काशीकरांचे ऋग्वेदकालीन संस्कृती, केळकरकृत टिळकचरित्र, सहस्रबुद्धे यांचे माधवराव पेशवे चरित्र, भाव्यांचे पेशवेकालीन महाराष्ट्र, सरदेसायांचे पेशवे दप्तराचे खंड, खानोलकरकृत आधुनिक मराठी वाङ्मय-सेवक इत्यादि पुस्तके वाचल्याची नोंद माझ्या डायरीत आहे. मी वाचलेले काही कवितासंग्रह म्हणजे गजलांजलि, बंदीशाला, यशोधन, जयमंगल, यशोविलास, फटत्कार, पहाटतारा, महाजनांची कविता, दत्त किंकरांची कविता, विचार वैभव, सुमनसौरभ, पाणपोई, प्रफुल्ल पद्माकर, माझी फुले, कवी माधव यांची कविता, जानकी काव्य, उमरखय्यामच्या रुबाया, फुलवात, शरयू, बागशाही, काव्यकुसुमकलिका, महाराष्ट्र गीतांजली, कॉलेजबिश्व, देशिफ लीलामृत, सुंदर दीपिका, भावमंथन, आंबराई, फळभार, बालकवीची कविता, केशवसुतांची कविता असे किती म्हणून कवितासंग्रह सांगावे! त्या मानाने नाटकांचे वाचन कमी झाले.

निजाम राज्याचा इतिहास हा माझा आवडीचा विषय होता. निजाम राज्यकारभारावर मी बरीच उर्दू पुस्तके वाचून काढली. यावर उघड लेख लिहिण्याची सोय नव्हती. मार्च १९३७ मधे महाराजा किशनप्रसाद हे पंतप्रधानपदावरून निवृत्त झाले. त्यांच्या जागी सर अकबर हैदरी यांची नेमणूक झाली. या सुमारास माझ्या हाती एक इंग्रजी पुस्तक लागले. एम. फत्तेउल्लाखान याचे 'हैदराबादेतील राजकीय सुधारणांचा इतिहास.' या ग्रंथाच्या निमित्ताने मी हैदराबादचा इतिहास आणि राज्यकारभाराची उत्क्रांती या विषयावर निजामविजयमधे पांचसात लेख लिहिले. माझे टोपण नाव कृष्णाकुमार, एम्. ए. हे माझ्या लेखात मी वापरीत असल्यामुळे सरकारचे माझ्याकडे लक्ष गेले नाही. डॉक्टर युसुफ हुसेन खानकृत निजामुल्मुल्काचे चरित्र या ग्रंथाच्या परीक्षणाच्या निमित्ताने मी एक लेखमाला निजामविजयात प्रसिद्ध केली. निजामाचे दिवाण रामदास (१७५२) याचा खून झाला, आणि विठ्ठल सुंदर (हा इ. स. १७६३ मध्ये राक्षसभवनच्या लढाईत मराठ्यांच्या हातून मारला गेला) यांच्यावरही माझे लेख प्रसिद्ध झाले. हे लेखन मला काळजीपूर्वक करावे लागले. निजामाच्या राज्य-

कारभारावर टीका करण्याची सोय नव्हती. वास्तविक पाहता सरदार-जमीनदारांचे लष्करी महत्त्व निजाम इंग्रजांचा मांडलिक झाल्याबरोबर संपले होते. (इ. स. १८००). अंतर्गत व्यवहारात ते इ. स. १८५३ पर्यंत राहिले. सालारजंग दिवाण झाल्यावर (१८५३) परप्रांतातील सुशिक्षित मुसलमानांचा मध्यम वर्ग हैदराबाद राज्यात प्रविष्ट झाला. याच वर्गाचे निजामराज्यात वर्चस्व होते. हैदराबाद राज्य हे मुसलमानांचे राखीव कुरण आहे, ही समजूत याच वर्गाने पसरविली. राज्यात हिंदू हे बहुसंख्य असल्यामुळे प्रातिनिधिक पद्धतीच्या राज्य-कारभाराकडे राज्याची वाटचाल होऊ देणे या वर्गाला इष्ट वाटत नव्हते. हैदराबादेतील मूळचा (मुल्की) मध्यम वर्ग हा सुशिक्षित होऊन परप्रांतीय मुसलमानांशी स्पर्धा करू लागला आणि दुसरीकडे हिंदूंना हक्क मिळू नये म्हणून प्रयत्न करू लागला. साहजिकच हिंदूंच्यांत प्रतिक्रिया निर्माण झाली. इ. स. १९३७ मध्ये सर अकबर हैदरी हे पंतप्रधान झाले. या वर्षापासून राज्यातील हिंदू-मुसलमानांच्या चळवळींना तीव्र स्वरूप येऊ लागले. माझ्या लेखातून मी शक्य तितके सौम्यपणे निजाम राज्याच्या उत्क्रांतीचे विवेचन केले होते.

नांदेड हे कळमनूरीहून चौपन्न मैलांवर आहे. गोदावरीच्या काठावरील हे शहर. औरंगाबादच्या बरोबरीने या शहराला मराठवाड्यात सांस्कृतिक महत्त्व असे. मराठवाड्यातील कवी द. ल. महाजन, वा. रा. कांत, पार्थिव, दत्तकिंकर, गोळेगावकर, इतिहाससंशोधक विश्वेश्वर अंबादास कानोले गोदावरी प्रेसचे मालक आणि रसिक साहित्यिक गणपतराव आंबेकर ही मंडळी नांदेडचीच होत. मी नेहमी नांदेडला जात असे. त्यामुळे वरील मंडळींचा माझा चांगला परिचय झाला. महाजन हे उत्तम कीर्तनकार होते. त्यांची रसाळ कीर्तने ऐकण्याचा मला कळमनूरीला योग आला. संत दासगणू यांचीही कीर्तने मला कळमनूरीला ऐकण्यास मिळाली.

परभणी हे गाव तर आमच्या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण होते. माझ्या श्वशुरांचे आतेभाऊ भाऊसाहेब अष्टपुत्रे हे परभणीला वामन नाइकांच्या अनंतविजय फॅक्टरीत नोकरीला होते. मी परभणीला गेलो की त्यांच्याकडे उतरत असे. भाऊसाहेबांच्या दिलदार मित्रांची नेहमी बैठक असे. परभणीचे सुप्रसिद्ध वकील रामचंद्रराव ऊर्फ अण्णासाहेब पांचपोर हे भाऊसाहेबांचे निकटचे मित्र. त्यांचा माझा परिचय झाला. अण्णासाहेब पांचपोरांचा स्वभाव मोठा विनोदी आणि खेळकर होता. कोर्टातील आपले अनुभव ते हावभाव करून, असे काही गमतीदार पद्धतीने वर्णन करीत की ऐकणाऱ्याची हसून हसून मुरकुंडी वळे.

एक दिवस अण्णासाहेब कोर्टातून सरळ भाऊसाहेबांकडे आले. आमची

बैठक जमली. बैठकीत मी, भाऊसाहेब, शेतकी खात्यातील माधवराव जोशी (आता सेवानिवृत्त आणि गोरेगाव उपनगरात वास्तव्य) अशी मंडळी जमली. अण्णासाहेब सांगू लागले. ' अहो, आज कोर्टात मोठी गंमत झाली. मी गेलो तेव्हा कळले की न्यायमूर्ती (नाजिमे अदालत डिस्ट्रिक्ट जज्ज) अफजलसाहेब हे आपल्या चेंबरमधे होते, त्यांनी मला बोलावू पाठविले. मी त्यांच्या खोलीत गेलो, न्यायमूर्तींनी हातरुमालाने आपले ओठ झाकून घेतले होते. मी म्हटले, ' सरकार खैरियत तो है, कुशल आहे ना ' ते खिन्न आवाजात म्हणाले ' रामचंद्रराव, कहां की खैरियत पूछते हो, कसले कुशल विचारता आहात- आज मी कोर्टात बसावे की नाही याचा विचार करीत आहे ' मी घाबरून म्हटले, ' अहो तुमची तब्येत बरी का नाही ? ' ते म्हणाले ' आज माझ्या मिशा जळाल्या ' त्यांचे हे उद्गार ऐकून मी चाट पडलो. मी म्हटले, ' काय जळाले ? ' ते म्हणाले, ' अहो मिशा जळाल्या. मिशा पांढऱ्या झाल्या म्हणून मी कलप लावीत असतो. आज चुकून मी भलतेच काही तरी लावून बसलो. काय झाले कुणास ठाऊक, माझ्या मिशा जळून भरभर खाली पडल्या. हाय हाय, आता बिन मिशाचा मी कोर्टाचे काम कसे करणार ? ' न्यायमूर्तींनी हात-रुमाल बाजूला सारला. त्यांचे ओठ पोळलेले आणि सुजलेले दिसले. मी त्यांचे कसेबसे समाधान केले आणि त्यांचा निरोप घेतला. ते म्हणाले, ' ही गोष्ट कुणाला सांगू नका ' मी कुठेच बोललो नाही. पण ही बातमी पसरल्याशिवाय कशी राहील ? न्यायमूर्तींनी एक दिवसाची रजा घेतली. जो तो म्हणू लागला, ' नाजिम साहब की मूछें जल गयी इसलिये एक दिन की रुखसत सी है '

असे होते अण्णासाहेब. मोठा दिलदार माणूस त्याच्यापाशी अशा गंमतीदार गोष्टींचा मोठा साठा होता. हैदराबादेस त्यांच्या एका निकटच्या नातेवाइकाकडे लग्न ठरले होते. लग्नाला त्यांना हजर राहता आले नाही. अण्णासाहेबांच्या कुटुंबियांपैकी एकाने तार पाठविली ' अम्मा (अण्णासाहेबांची आई), दादा (अण्णासाहेब) नॉट कमिंग ' हैदराबादेस त्या तारेचे पुढील वाचन झाले. ' अम्मा डेड (अम्मा वारली), नॉट कमिंग ' अण्णासाहेबांच्या नातेवाइकाचे त्यांना दुखवट्याचे पत्र आले. ' अम्मा वारल्या याचे मोठे दुःख झाले. आपल्या-वर हा मोठा आघातच झाला आहे. पण जगरहाटीकडे पाहून आपण विवेक करावा. ' अण्णासाहेब हे पत्र वाचून बुचकळ्यात पडले. त्यांनी उलट पत्र लिहून विचारले की हा काय प्रकार आहे ? माझ्या मातोश्री अम्मा खुशाल आहेत. नंतर तारेच्या चुकीच्या वाचनाचा खुलासा झाला.

अण्णासाहेबांना जाऊन वीस पंचवीस वर्षे झाली. त्यांची धिप्पाड शरीरयष्टी,

त्यांचे सात मजली हास्य, त्यांची निळी पुणेरी पगडी (ते कोर्टात पुणेरी पगडी वापरीत, निजामी दस्तार (पगडी) त्यांनी कधीच घातली नाही. या सर्व गोष्टी अगदी काल पाहिल्याप्रमाणे आठवतात.

परभणीला पुढे राजकारणात प्रसिद्धीला आलेले मुकुंदराव पेडगावकर, पंडितराव चौधरी वकील, इत्यादींचा माझा परिचय झाला. परभणीहून जवळच असलेल्या दुधना नदीच्या काठची आमची हुर्डापार्टी दिवसभर रंगली होती. तिचे वर्णन मी माझ्या 'अशोकाची पाने' या पुस्तकात केले आहे. अनंत विजय फॅक्टरीत होळीचा उत्सव झाला. त्यावेळी भज्यात भांग घालून सर्वांना खाऊ घातल्यामुळे दिवसभर मी तरंगत होतो. पण परभणीत माझा एका प्रतिभावान साहित्यिकाशी परिचय झाला तो म्हणजे भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ बी. रघुनाथ यांच्याशी होय. कवी आणि लघुकथालेखक म्हणून बी. रघुनाथ यांचे स्थान मराठवाड्याच्या साहित्यिकांत वैशिष्ट्यपूर्ण होते. त्यांचा साकी हा लघुकथासंग्रह म्हणजे त्या काळच्या मराठवाड्याचे जिवंत चित्रण होय. त्या काळच्या राजकीय परिस्थितीत मराठवाड्याच्या समाजजीवनाचे वर्णन करू पाहणे म्हणजे सुळावरची पोळी होती. भयानक मुसलमानी राजवटीचे ते एक विश्लेषणच होत होते. धर्मांतर, पळवापळवी, खालच्या थराच्या जमातींची पिळवणूक हे सगळे प्रकार त्यात येत होते. आम्हा लेखकांना त्यावेळी उपरोध, रूपके इत्यादींचाच वापर करून आपल्या कथा सजवाव्या लागत. माझे लघुकथासंग्रह 'उषा,' 'अलकनंदा,' 'अशोकाची पाने,' 'त्रिलिंग देशातील दैनंदिनी' डॉक्टर वामनराव गाडगीळ उर्फ फिरस्ता यांचा 'फिरस्त्याचे निवडक लेख' हा निबंधसंग्रह आणि 'विचित्र संसार' ही कादंबरी, माझी पत्नी उषा हिचे, 'कल्पना,' 'अंजली' हे लघुकथासंग्रह आणि 'सुवर्णमध्य' ही कादंबरी इत्यादी साहित्यातून त्या काळच्या हैदराबाद राज्यातील सामान्य जीवनाचे प्रतिबिंब पडलेले आढळून येईल. पण बी. रघुनाथ यांचा 'साकी' हा लघुकथा संग्रह या सर्व साहित्यांत उठून दिसतो. रस्ते झाडणारी म्युनिसिपालिटीची महारीण पुढे सॅनिटरी इन्स्पेक्टरची बिब्बी बनली तेव्हा ती आपल्याला छळणाऱ्या अधिकाऱ्यावर कशी थुंकली, खानसाहेबांनी पळवून आणलेल्या बाईचा जीव कसा गुदमरून गेला, चौकशीसाठी पोलीस कोठडीत आणून ठेवलेल्या पोरीवर कॉन्स्टेबलने कसा अत्याचार केला, आपले काम काढून घेण्यासाठी खालचे नोकर वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आपल्या बायका कशा पोहोचवीत, इत्यादींचे वर्णन बी. रघुनाथ यांच्या जळजळीत लेखणीतून बाहेर पडले आहे ते वाचून आजही माझ्या मनाचा तोल जातो, इतके ते लिखाण क्षोभकारी आहे. बी.

रघुनाथाच्या कविताही अशाच गाजल्या. पूर्वी ते फुलारी या नावाने कविता लिहीत. त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. बी. रघुनाथला परमेश्वराने भरपूर आयुष्य दिले नाही. आर्थिक परिस्थितीही समाधानकारक नव्हती. हा प्रतिभावान साहित्यिक परभणीला बांधकाम खात्यात कारकुनीचे काम करीत होता. अशा परिस्थितीतही त्याने आपल्या लेखनाने त्या काळचा समाज हलवून सोडला.

माझी आणि बी. रघुनाथची ओळख परभणीला अनंत विजय फॅक्टरीत झाली. त्यांचा स्वभाव काहीसा बुजरा होता. पण स्नेह जडल्यावर त्याचा बुजरेपणा नाहीसा होई. बी. रघुनाथचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे. माझ्या लघुकथा निजामविजयातून प्रसिद्ध होत होत्या. बी. रघुनाथने मला सुचविले, 'त्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध का करीत नाही ?' मी म्हटले, 'मला त्या संबंधी काहीच माहीत नाही. पुस्तक छापणार कोण, प्रकाशित कोण करणार' त्याने सांगितले, 'नांदेडला गोदावरी प्रेसचे गणपतराव आंबेकर आहेत. त्यांना विचारून पाहा' बी. रघुनाथच्या सूचनेमुळेच माझा आणि आंबेकरांचा संबंध आला आणि माझा 'उषा' हा लघुकथा संग्रह प्रसिद्ध झाला. ते माझे पहिले पुस्तक होय.

बी. रघुनाथची साहित्यसाधना पाहिली की मला बालकवी किंवा कीट्स यांची आठवण होते. परभणीकरांनी परभणीत बी. रघुनाथ स्मारक हॉल बांधून या साहित्यिकाची स्मृती जागृत ठेवली आहे.

उषाला गाण्याबजावण्याची आवड होती. तिने दिलरुबा विकत घेतला. त्या काळी आमच्या घरात रेडियोचा प्रसार झाला नव्हता. पण घरात हार्मोनियम, तबला, दिलरुबा ही वाद्ये होती. माझी बहीण सीताबाई ही शांत आणि सोशिक स्वभावाची. पण ती कळमनूरीला आमच्याकडे आली की तिचा खेळकरपणा आणि विनोदी वृत्ती यांना भरती येई. आमच्या नादाने तिने फडके यांच्या दौलत, कलंकशोभा, खांडेकर यांचे दोन ध्रुव, उल्का, इत्यादी कादंबऱ्या वाचून काढल्या. आमच्या घरी ग्रामोफोन होता. चांगल्या चांगल्या गाण्याच्या रेकार्डस आमच्याकडे सारख्या चालू असत. तीस वर्षांपूर्वीची ती गाणी आठवली की अद्याप मनात गोड हुरहूर निर्माण होते. 'रमला कुठे ग कान्हा, आंबेवनात जाऊ या दूर, लोटु नको मज दूर कन्हैया, मधुमती तुजशी म्हणती, गोड तुझा सहवास सखे ग, राधेकृष्ण बोल मुखसे तेरा क्या लगेगा मोल, एकत्र गुंफोनी जीवित-धागे प्रीतीचे नर्तन नाचलो मागे, पियाबिन नहीं आवत चैन, चंद्रिका ही जणु, कन्हय्या बजाव मुरली,' इत्यादी गाणी आजही कानात घुमत आहेत असे

वाटते. कळमनूरी हे खेडेगाव असल्यामुळे गाण्याच्या मैफलीचा योग क्वचितच यायचा. परभणीला मात्र मराठवाड्यातील सुप्रसिद्ध गवई आणि नट रंगराव देशपांडे (यांनी हिराबाई बडोदेकरांच्या बरोबर नाटकातून कामे केली होती.) यांच्या गाण्याच्या मैफलीतून हजर राहण्याचा योग आला. नाटके आणि सिनेमे तर महिनोमहिने न्हायला मिळत नसत. ही उणीव आम्ही काव्यवाचन, गाण्याचे रेकॉर्डस इत्यादींनी भरून काढीत असू.

१९३७ मध्ये माझा धाकटा भाऊ राघवेंद्र हा निजाम कॉलेजच्या फर्स्ट ईयरला नापास झाला. उस्मानिया विद्यापीठातून शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. तिकडे जाण्यास तो कबूल होईना, शेवटी मी त्याला उत्तर प्रदेशात कानपूरला कॉमर्स कॉलेजात पाठविले. माझी बहीण सुशिला ही त्या वर्षी पंढरपूर येथून व्हर्नाक्युलर फायनल पास झाली होती. त्यावेळी तिला पंधरावे वर्ष चालू होते. माझी इच्छा तिने निदान मॅट्रिकपर्यंत शिकावे अशी होती. मी वडिलांना सुचविले, ' राघवेंद्राच्या कानपूर येथील शिक्षणावर मला महिन्याला पन्नास रुपये खर्च येतो. तुम्ही सुशिलेला पंढरपूरच्या आपटे हायस्कुलात घाला. तिच्या फीची व्यवस्था मी करीन. ' पण वडील या गोष्टीला कबूल होईनात. ते म्हणाले, ' मुलांच्या शाळेत तिला घालण्याची माझी तयारी नाही. एक तर तिच्या लग्नाची व्यवस्था कर, नाही तर तिच्या पुढच्या शिक्षणाची सगळी जबाबदारी घे. ' वडिलांच्या या हट्टामुळे मला सुशीलाला पुण्याच्या सेवासदनमध्ये ठेवण्याचा निर्णय घ्याव लागला. आमच्या घरात स्त्रीशिक्षणाचे प्रमाण अगदी कमी होते. माझी आजी, आत्या, मावशी, भावजय, या सर्व निरक्षर होत्या. माझी आई लिहिण्या-वाचण्यास शिकली ती माझे वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर. माझी बहीण सीता-बाई ही मराठी चौथीपर्यंतच शिकली. तिचे लग्न तिच्या दहाव्या वर्षी झाले. म्हणून सुशीलाचे तरी चांगले शिक्षण करावे अशी माझी इच्छा होती. जून १९३७ मध्ये मी तिला पुण्याला घेऊन गेलो. त्यावेळी माझे श्वशुर बाबासाहेब पुणतांबेकर हे बनारसहून उन्हाळ्याच्या सुट्टीत पुण्याला आले होते. मी पुण्याला गेलो त्यावेळी गोखले सभागृहातील शारदोपासक संमेलनाला हजर राहण्याचा योग आला. संमेलनात मला लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचे व्याख्यान ऐकण्यास मिळाले. त्यांची खांदे उडविण्याची लकब मला मोठी गंमतीची वाटली. त्यांचे मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोरोपंतांचे चरित्र, आत्मचरित्र हे ग्रंथ मी वाचले होते. पांगारकरांचे मोरोपंत चरित्र मला अतिशय आवडले. पंतांच्या बारामती येथील कौटुंबिक जीवनाचे वर्णन पांगारकरांनी रसाळपणे केले आहे. त्याची आठवण मला अद्याप आहे. याच संमेलनात मी अत्र्यांचे व्याख्यान प्रथमच

ऐकले. माधवराव पटवर्धन यांची मी संमेलनात गाठ घेऊन जुनी ओळख ताजी करून घेतली. मला वाटते या संमेलनातच मी जयकृष्ण केशव उपाध्ये यांच्या तोंडून गीतेवरची विडंबनात्मक कविता ऐकली ' कृष्ण म्हणे गा अर्जुना, तू बेट्या मूळचाच ढिला ' इत्यादी ओळी ऐकून मला विलक्षण हसू लोटले. पुण्याहून मी बाबासाहेबांच्या बरोबर वाईला गेलो. वाईचे रामडोह आळीतील पिटक्यांचे घराणे हे माझ्या पत्नीचे आजोळ. वाई हे आमचेही मूळ गाव. कृष्णाकाठी गर्द झाडीत वसलेले आणि देवळांनी समृद्ध असलेले हे गाव पाहून मला मोठे समाधान वाटले. विजापूर जिल्ह्यातील कारजोळ गावी इनाम जमिनी मिळवी-पर्यंत आमचे आडनाव वाईकर होते. कारजोळला आमचे आडनाव जकाते झाले, आणि हैदराबाद राज्यात पगडी म्हणून लोक आम्हांला ओळखू लागले. वाईला आता हरितस गोत्री वैष्णव मंडळी राहिली नाहीत. आमच्याप्रमाणेच ती पांगलेली आहेत.

वाईहून एक दिवसासाठी मी महाबळेश्वरला जाऊन आलो. ती तारीख चार जून १९३७ माझ्या आठवणीत आहे. महाबळेश्वरला माझे वडील गेले असता तेथे त्यांनी न्यायमूर्ती रानडे यांना पाहिले, असे ते आम्हांला सांगत. महाबळेश्वरला माझ्याबरोबर माझ्या सासूबाईंचे बंधू लक्ष्मण बळवंत ऊर्फ नाना पिटके हे होते. गणेशपंत पिटके हे १८१७ मधे बाजीराव पेशव्याकडून इंदूरचे मल्हारराव होळकर यांचेकडे इंग्रजविरोधी वाटाघाटी करण्यास गेले होते. लक्ष्मण बळवंत, बळवंत अनंत, आणि अनंत गणेश अशी ही पीठिका आहे.

महाबळेश्वरला माझा दिवस मोठ्या आनंदात गेला. प्रतापगडचे दुरून का होईना, मला दर्शन घडले, आणि शिवचरित्रातील अफजल वधप्रसंगाची आठवण होऊन हृदय उचंबळून आले, कृष्णामाईच्या देवळातही मी रमून गेलो. हैदराबादच्या राजवटीत मनाचा कोंडमारा होत असे. राज्याबाहेरचे असे प्रवास म्हणजे आम्हांला मोठे स्फूर्तिदायक वाटत.

सुशीलाला मी पुण्याला सेवासदन वसतिगृहात ठेवली. माझ्या दोनशे रुपये पगारातून मला राघवेंद्र आणि सुशीला यांच्या शिक्षणावर मासिक ऐंशी रुपये खर्च करावे लागत. कुटुंब मोठे, पाहुण्यांची आणि आप्तेष्टांची वर्दळ; पण कळमनूरी हे लहान आणि आडवळणाचे गाव, त्या काळी आजच्या मानाने सुबत्ताही बरीच होती त्यामुळे आमचे आयुष्य समाधानाचे होते. मी आणि उषा वाचनलेखन, सहली, घोड्यावरच्या रपेटी इत्यादीत आनंदाने दिवस घालवीत होतो. इतके मोठे कुटुंब, आई-वडील, भाऊ, बहिणी, नातेवाईक यांनी भरलेले पण उषाने सर्वांचे अगत्य केले. कुणालाही कशाची म्हणून उणीव

भासू दिली नाही. रेव्हरंड टिळकांच्या शब्दांत

तिच्या अल्पास्वल्पा कृति, लघु तिची चाटु गदिते
तिची प्रेमस्वप्ने मनि, नयनि वाणीत उदिते
तिच्या दीनासाठी, अविरत दयेच्या लघुकृती
तिचे ते हेतू जे सहज हळु बाहेर पडती

निजामी राजवटीत हिंदूंच्या सांस्कृतिक जीवनावर अवकळा पसरली होती. सरकारी शाळातून पाचवीपासून पुढे मराठी, तेलगू, कानडी या देशी भाषांच्या माध्यमातून शिक्षण घेण्यास बंदी होती. संस्कृत शिक्षणाला तर कोणीच विचारीत नसे. संस्कृत शिकून तयार झालेल्या धर्मशास्त्रज्ञांची परंपरा खंडित झाली होती. नांदेड, उदगीर, येथील संस्कृत पाठशाला कशाबशा चालत. हैदराबादच्या जामेनिजमिया या अरबी धर्मशिक्षण केंद्राला सरकार वर्षाला वीस हजार रुपयांची ग्रँट देत असे. उलट सीतारामबाग संस्कृत पाठशाळेला महिन्याला ३० रु. ग्रँट मिळे. मुसलमानांचे बकरीद, रमझान हे सण सरकारी लवाजम्यानिशी थाटाने साजरे करण्यात येत. उलट दसरा दिवाळी हे सण हिंदूंना सुतकी चेहऱ्यांनी उरकून घ्यावे लागत. गणेशोत्सवाच्या मिरवणुकींना केव्हा कोठे आडकाठी होईल आणि केव्हा दंगल होईल याचा नेम नसे. राज्यात कोणत्याही प्रकारची चळवळ होऊ द्यायची नाही असा सरकारचा निर्धार असे. बाहेरून हैदराबाद राज्यात येणाऱ्या माणसांवर सरकार कडक नजर ठेवी.

बकरीद रमजानचे सण हे मुसलमानांचे प्रमुख सण होत. रमजानच्या उपवासाचा एक महिना झाला की चंद्रदर्शनाबरोबर उपवास सुटत असे. प्रतिपदेचा चंद्र दिसला की पाहणाऱ्याची साक्ष नोंदण्याचे काम तहसीलदाराला करावे लागे. चंद्रदर्शन झाले की दुसऱ्या दिवशी मुसलमान मोठ्या संख्येने गावाबाहेरच्या ईदग्यात नमाज पढण्यासाठी मिरवणुकीने जात. मिरवणुकीबरोबर स्थानिक सरकारी अधिकारी पोलीस, तहसील कचेरीचे अरब पहारेकरी असत. आम्हा हिंदू अधिकाऱ्यांना मिरवणुकीबरोबर जावे लागे. नमाज पार पडेपर्यंत आम्ही दरग्याजवळ ठोकलेल्या तंबूत बसून राहात असू. नमाज संपली की परस्परांना भेटून ईद मुबारक असे सर्वजण म्हणत. त्यानंतर मिरवणूक गावात येई. वाटेत पोलीस आणि अरब बार काढीत. या बंदुकी तरी चांगल्या स्थितीत असत असे नाही. कधी कधी बंदुकीत दारू भरावी आणि बंदूक उडता उडू नये. ती शे दीडशे पावले चालून गेल्यावर उडावी असा प्रकार होई. अशा वेळी पोलीस सबइन्स्पेक्टर 'इब्राहीम, बारुद (दारू) ठोसा, ठोसो (भरा)' असे ओरडे. अरबांच्या बंदुका तर गेल्या शतकातल्या

जुन्या मजल लोडर्स असत. ते बंदुकीच्या दारूची कुपी जवळ बाळगीत. पेटलेला दोर जवळ ठेवीत बंदुकीच्या नळीत दारू भरून त्यावर कागदाचे बोळे दाबून बसवीत आणि मग आपले अरबी वीर गीत म्हणत बंदुकी उडवीत. शिपाईगिरीचे नुसते सोंग शिल्लक राहिले होते. पण लोकांना चांगलाच तमाशा पाहायला सापडे. मिरवणूक गावात आल्यावर तहसीलदारच्या घरी बैठक भरे. कचेरीतील कारकून तहसीलदाराला नजर देत. हातरुमालावर एक रुपया ठेवून तो तहसीलदारासमोर धरायचा. तहसीलदारने रुपयाला नुसता स्पर्श करावयाचा, असा हा नजर देण्याचा प्रकार असे. यानंतर अत्तर, विडे इत्यादी जमलेल्या मंडळींना दिल्यावर बैठक बरखास्त होई. संध्याकाळी आणि दुसऱ्या दिवशी लोक ईद मुलाकात भेट आणि प्रतिभेट यासाठी परस्परांकडे जात. मला हे सगळे करावे लागे. मुसलमानांच्या अरबी हिजरी शकाचे मोहरम, सफर, रबिउलावल, रबिउलाखर, जमादिलावल, जमादिलाखर, रजब, शाबान, रमजान, शव्वाल, जिल्काद, आणि जिल्हेज हे महिने आम्हांला तोंडपाठ झाले होते. या अरबी तारखांचा वापर निजामाची फर्माने, सरकारचे महत्त्वाचे हुकूम इत्यादीत होत असे. बाकीच्या सरकारी कारभारातून फसली सन वापरीत. आजुर, दय, बहमन, इस्फिंदार, फरवर्दी, अर्दीबेश्त, खुर्दाद, तीर, अमरदाद, शहरवर, मेहर, आबान हे फसली सनाचे बारा महिने. कचेरीतील खजिन्याचे हिशेब अरबी आकड्यांतून ठेवीत. इंग्रजी सनाचा उपयोग क्वचितच होई. मग आमचे शालिवाहन शक आणि चैत्र वैशाखादि महिन्यांच्या उल्लेखाचे विचारायलाच नको.

हैदराबाद सरकारच्या धार्मिक धोरणासंबंधी वेळोवेळी जी फर्माने, आज्ञापत्रे हुकूम, सर्क्युलर इत्यादी निघत, त्यांचा एक संग्रह प्रसिद्ध करण्यात आला होता. त्याला अहकामे उमूरे मजहबी-धार्मिक खात्याचे हुकूम म्हणत. हे हुकूम किती जाचक असत याची उदाहरणे पाहा.

मशिदींच्या शेजारी हिंदूंची घरे असली तर मशिदीतील रोज होणाऱ्या पाच वेळच्या नमाजाच्या वेळी शेजारच्या घरातून बाजा वाजविणे, भजने मोठ्याने करणे, शंख, घंटा, झांज इत्यादींचा आवाज करणे, फार काय मोठ्याने टाळ्या वाजविणे, किंवा मोठ्याने जयजयकार करणे या गोष्टींना बंदी होती. मुसलमान दिवसातून पाच वेळा नमाज पढतात. एक पहाटेपूर्वी, एक पहाटे, एक दुपारी, एक संध्याकाळी आणि रात्री. त्यांना फजर, जहूर, इशा इत्यादी नावे आहेत. त्यावेळी शेजारील हिंदूंची त्यांच्या घरांतील धर्मकर्मे बंद पडत. कारण आमच्या नमाजाला तुम्ही अडथळे करता असे निमित्त करून मुसलमान केव्हा दंडेली करतील याचा नेम नसे. हिंदूंच्या आळीत जर का मशीद असली की मग त्यांचे

हाल विचारायला नको. ती मशीद म्हणजे त्यांच्या डोक्यावरची लटकती तलवारच होय. कळमनूरीला मी राहात होतो त्या वाड्याला लागूनच एक मशीद होती. सुदैवाने ती पडकी असून वापरात नव्हती. आमच्या घरात धर्मकृत्ये नेहमीच चालत. पूजा अर्चा, भजन पूजन, इत्यादींनी आमचे घर नेहमी भरलेले असे. सरकारी हुकुमाची मी कधीच पर्वा केली नाही. पण सामान्य लोकांची मोठी कुचंबणूक होई.

कोणत्याही नवीन धार्मिक उत्सवाला अगर मिरवणुकीला सरकार सहसा परवानगी देत नसे. १८९६–९७ च्या पुढे मराठवाड्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रथा सुरू झाली. मुसलमानांच्या अडवणुकीमुळे मराठवाड्यात दंगेधोपे होऊ लागले. त्यावर सरकारने चौकशी करून पूर्वापार चालत आलेल्या ठिकाणी गणेशोत्सव करण्याची परवानगी चालू ठेवली. मिरवणुकीचे मार्ग आखून दिले. अशा उत्सवांना दरवर्षी परवानगी घ्यावी लागे. मग अधिकारी विचारीत "तुमचा गणपती जदीद (नवीन) आहे का कदीम (जुना)" परभणी जिल्ह्यातील कुरुंदे या गावी सरकारने शेवटपर्यंत गणेशोत्सवाला परवानगी दिली नाही. म्हणून तेथे नवरात्रीच्या उत्सवाची परंपरा चालू झाली. गणेशोत्सवात सार्वजनिक वाचनालयासारख्या संस्थेत गणपतीची प्रतिष्ठापना करू देत नसत. मी कळमनूरीला जाण्यापूर्वी तेथील मंडळींनी वासुदेवानंद वाचनालयात गणपती बसवून उत्सव केला. त्यामुळे मुसलमानांनी चिडून हिंदूंवर हल्ला केला. शंकरराव ऊर्फ बाबासाहेब वकील या प्रतिष्ठित माणसाला मारहाण केली.

मुसलमान अधिकाऱ्यांना हिंदूंचे धार्मिक उत्सव, सणवार इत्यादींची काहीच माहिती नसे. दिंडीला ते दंडी म्हणत. हवन या शब्दाचा उच्चार ते होन असा करीत. काही अज्ञान आणि बराचसा द्वेष यांमुळे हिंदूंना सारखा त्रास सोसावा लागे. उत्सवाला परवानगी घेण्यासाठी महिन्यापूर्वी अर्ज करावे लागत. उत्सव नवीन आहे का जुना, किती दिवस चालेल, किती माणसे जमतील, मिरवणुकीच्या मार्गाचा नकाशा दाखल करा. मिरवणुकीत तुम्ही घोष करणार ते शब्द कोणते, उत्सवाचे संचालक कोण इत्यादी प्रश्नांचा भडीमार केल्याशिवाय परवानगी मिळत नसे. समजा, गेल्या वर्षी बाबुराव नावाच्या इसमाने अर्ज दिला. या वर्षीच्या अर्जात त्याने सही करताना चुकून बाबूरावच्या ऐवजी बापूराव लिहिले (उर्दूमध्ये बशीचा आकार काढून खाली एक टिंब दिले तर प होतो) तर तेवढ्याच कारणासाठी उत्सवाला परवानगी नाकारण्यात येई. औंढानागनाथ येथे दिंडीची मिरवणूक निघाली. मिरवणुकीची परवानगी काढण्यात आली होती. दिंडीत घोष कशाचा राहील या प्रश्नाला "हर हर असा घोष राहील" असे

कळविण्यात आले होते. दिंडीबरोबर पोलीस फौजदार वगैरे होते. मिरवणूक चालू झाल्यावर लोक हरहर महादेव अशा घोषणा करू लागले. पोलिसांनी लगेच दिंडी थांबविली. ते म्हणाले, 'तुम्हांला मिळालेल्या परवानगीत फक्त हरहर हा शब्द आहे, हरहर महादेव असे कुठे आहे. फक्त हरहर म्हणा. महादेव म्हणायचे नाही.' लोकांनी पुष्कळ समजावून सांगितले की हरहर के नारे (घोष) यात हरहर महादेव आलाच. पण पोलिसांनी दिंडी जाऊ दिली नाही. हैदराबादेत महसूल, न्याय आणि पोलीस या खात्यातून मुसलमान नोकर शेकडा नव्वद होते. अज्ञान, उपेक्षा आणि तिरस्कार अशी त्यांची हिंदूंशी वागणूक असे.

आमच्या घरी आम्ही गणेशोत्सव मोठ्या थाटात करीत असू. सार्वजनिक गणेशोत्सवात तर मी आणि उषा उत्साहाने भाग घेत असू. लहान सहान नाटके, किंवा नाटकातील प्रवेश, गाण्याचे कार्यक्रम, कीर्तन इत्यादींना उत्तेजन देत असू. मला वाटते, स्वर्गावरील स्वारी या नाटिकेत उषाने विष्णूचे काम केले होते. कळमनूरीच्या हिंदूंना आमचे वास्तव्य म्हणजे मोठा आधार वाटू लागला. भाषणे करण्याचे प्रसंग फार येत नसत. पण जे काही येत तेव्हा मी मराठीत भाषण करी. उर्दू वर्तमानपत्रातून माझ्यावर आडून हल्ले होऊ लागले. मराठी जनतेशी समरस होणारा अधिकारी त्यांना नकोसा वाटू लागला. उर्दू वर्तमानपत्रात माझ्या-संबंधी एक वाक्य आले होते, 'एक गौरतलब बात ये है के तहसीलदार साहब की सब तकरीरें मरहटी में हुवा करती हैं. तहसीलदारसाहेबांची सगळी भाषणे मराठीत होत असतात, ही एक विचार करण्याची बाब आहे. तहसीलदार साहेब खुद्द एक आदाकार है, तहसीलदार साहेब स्वतः नट आहेत. उनके महल में भी अदाकारी की काफी मश्क है, त्यांच्या अंतःपुरातही (माझी पत्नी) अभिनयाचा बराच अभ्यास दिसतो. अशा प्रकारची टीका माझ्यावर होऊ लागली. मुसलमान अधिकारी, मुसलमान पुढारी आणि समाजकंटक यांची जी युती असे त्यातील एक दुवा माझ्यामुळे राहिला नव्हता. हा अधिकारी आपला नाही. हा मराठी माणसांत समरस होतो. या गोष्टीचे मुसलमानांना वैषम्य वाटे. आमच्या शेजारच्या हिंगोली तालुक्याचा तहसीलदार हसनुद्दीन (उर्दू सातवी पास) याने तर वावडी उडविली की सेतुमाधवराव हे सकाळी दहा वाजेपर्यंत मुसलमानाचे तोंड पाहात नाहीत. धार्मिक बाबतीत ते फार कट्टर आहेत. माझे काम चोख असे. महसूल खात्यातील कामाच्या निमित्ताने खेड्यापाड्यांतून दौरे, सरकारी रकमांची वेळच्या-वेळी वसुली, खटल्यांचे न्यायनिवाडे इत्यादी काम मी व्यवस्थितपणे पार पाडीत असे. माझ्या कामात चूक काढण्याची सोय नव्हती. त्यामुळे मी धार्मिक बाबतीत कट्टर आहे, असा प्रचार माझ्या विरुद्ध करण्यात येऊ लागला.

एका गणेशोत्सवाचा प्रसंग, आमच्या घरी गणपती बसवायचा होता. बाजारातून गणपती आणण्यासाठी मी घरचे गडी पाठविले. माझा मोठा मुलगा अरुण हा त्या वेळी तीन चार वर्षांचा होता. गणपती आणायला मीही जातो म्हणून त्याने हट्ट धरला. गड्यांनी त्याला बाबा गाडीत बसवून बाजारात नेले. परत येताना अरुणने गणपतीला आपल्या जवळ बाबागाडीत ठेवले. ब्राह्मण आळीतील आमच्या घरोब्याच्या कुटुंबांतील काही मुली अरुणच्या गाडीबरोबर आमच्या घरी आल्या. यानंतर काही दिवस गेले. पोलिसच्या गुप्त खात्याने माझ्या विरुद्ध रिपोर्ट केला की, तहसीलदार साहेबांनी परवानगीवाचून गणपतीची मिरवणूक काढली. याची चौकशी व्हावी. ते कागदपत्र कळमनूरीच्या पोलिस सबइन्स्पेक्टरकडे पाठविण्यात आले. तो बिचारा घाबरला. मी आमच्या घरच्या गणपतीची मिरवणूक काढली असेल अशी बातमीही त्याच्या कानी गेली नव्हती. माझ्यापाशी उघडपणे चौकशी करण्याची त्याला हिंमत होईना. शेवटी त्याने मेडिकल ऑफिसर बोधराव सिद्धापूरकर यांना या बाबतीत विचारले. त्यांनी ही गोष्ट माझ्या कानावर घातली. मी डॉक्टरना सांगितले, ' इन्स्पेक्टरचे डोके फिरलेले असावे. बाजारातून माझ्या मुलाने बाबागाडीत गणपती बसवून आणला तर मिरवणूक झाली काय ? इन्स्पेक्टरला हवे असल्यास त्याने खुशाल चौकशी करावी. मला विचारण्यात येईल तेव्हा मी उत्तर देण्यास समर्थ आहे. ' पुढे वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपणच हास्यास्पद ठरू, अशी शंका आल्यामुळे त्यांनीच ते प्रकरण निकालात काढले. हिंदू अधिकाऱ्यांवर सरकारची कशी नजर असे याचे हे एक उदाहरण म्हणून माझा अनुभव दिला आहे.

देवळांची बांधणूक आणि डागडुजी, त्यांना तामीर तरमीम म्हणतात. याच्या संबंधीचे नियमही मोठे चमत्कारिक असत. परवानगीवाचून देवळे बांधणे अगर त्यांची डागडुजी करणे शक्य नसे. सरकारी हुकुमात हा नियम मशिदींनाही लागू असे. पण प्रत्यक्षात मुसलमानांनी मशिदी उभारल्या किंवा त्यांची डागडुजी केली, आणि ती सुद्धा परवानगीवाचून, तरी त्यांना कोणी काही म्हणत नसे. कारण जवळजवळ सर्व अधिकारी मुसलमान असत. हिंदूंच्या बाबतीत मात्र या नियमांची अंमलबजावणी मोठ्या कडकपणे करण्यात येई. देवळांची तरमीम म्हणजे डागडुजी या सदराखाली पडलेली भिंत बांधणे, छत गळत असल्यास भोके बुजविणे, निखळलेली फरशी पुन्हा बसविणे इत्यादि क्षुल्लक गोष्टींचा अंतर्भाव होत असे. अशा प्रकारच्या दुरुस्तीलाही परवानगी घ्यावी लागे. हिंदूंच्यावर खासगी भांडणाचा सूड उगवायचा असला की, एखाद्या धार्मिक नियमाचा भंग हिंदूंनी केला अशी तक्रार करणे हा मुसलमानांचा आवडता

छंद असे. आणि अशी तक्रार आली की, मुसलमान अधिकारी मोठ्या हिरिरीने अशा प्रकरणात लक्ष घालीत.

कळमनूरीपासून वीस मैलांवर एक खेडेगाव आहे. तेथून कुणीतरी रिपोर्ट पाठविला की, अमक्या-अमक्या इसमाने परवानगीवाचून देवळाची डागडुजी केली आहे, त्याला शिक्षा करण्यात यावी. मी चौकशीसाठी रेव्हेन्यू इन्स्पेक्टरला (त्यांना गिर्दावर म्हणत) पाठविले. त्याने पंचनामा केला. पंचांनी रिपोर्ट केला की, डागडुजी झाली नाही. मी ते प्रकरण संपविले. पुन्हा कोणीतरी डेप्युटी कलेक्टर (प्रांतसाहेब, त्यांना दुय्यम तालुकदार म्हणत) कडे तक्रार केली की पंचांच्या जबान्या खोट्या आहेत. ही बातमी पंचांना लागताच ते आणि आरोपी हे वऱ्हाडात पळून गेले. मी आणि दुय्यम तालुकदार हे चौकशीसाठी त्या गावी गेलो. गावाबाहेर मरीआईचे एक देऊळ होते. मातीच्या भिंतीच्या आत उघड्यावर मरीआईची मूर्ती होती. पावसाने एकीकडची भिंत थोडीशी ढासळली. बकऱ्या आत शिरतील म्हणून एका धनगराने चिखलमाती लावून ढासळलेला भाग उभा केला. गावात मुसलमानांची घरे किंवा मशीद नव्हती. चिखलमातीने भिंत उभी केल्याने कुणाच्या हक्कावर गदा येणार होती असाही प्रकार नव्हता. पण हिंदूंना धारेवर धरण्याचेच धोरण खालचे अधिकारी अंमलात आणीत. मी अब्दुलकादर दुय्यम तालुकदार यांना सांगितले, "साहेब असा कुणाला त्रास देण्याला काही मर्यादा हवी. हे मरीआईचे देऊळ काय, त्याच्या मातीच्या भिंती पहा. बकऱ्या आत घुसतील म्हणून पडक्या भिंतीवर चिखल थोपटण्यात आला आहे. याचे एवढे प्रकरण व्हावे आणि शिक्षेच्या भीतीने माणसांना वऱ्हाडात पळून जाण्याची वेळ यावी!" अब्दुलकादर हा भला माणूस. त्याने माझ्या बोलण्यातील खोच ओळखली आणि ते प्रकरण निकालात काढले.

आणखी एक विलक्षण प्रकरण पाहा. एका शेतकऱ्याने आपल्या शेतात एक दगड बसवून त्याची पूजा सुरू केली. आपल्या शेताला कुणाची तरी दृष्ट लागली असा त्याचा समज झाला होता. झाले, रेव्हेन्यू इन्स्पेक्टरच्या रिपोर्टावर चौकशी सुरू झाली. रानात शेत आहे. तेथे दगड मांडून पूजा केल्याने कुणाचे काही बिघडत नाही असा निर्णय देऊन मी ते प्रकरण निकालात काढले, निर्णयाचे रिपोर्ट जिल्हा कचेरीत पाठवावे लागत. कलेक्टरांनी हुकूम दिला की शेतकऱ्याला मूर्ती हलविण्यास सांगावे. मी त्याला बोलावणे पाठवले आणि त्याला सरकारचा हुकूम सुनावला. त्या अडाण्या शेतकऱ्याने दिलेले उत्तर मला अद्याप आठवते. तो म्हणाला, "गावाबाहेर, रानात, माझ्या मालकीच्या शेतात,

शेताची शांती व्हावी म्हणून मी दगड बसवून पूजा सुरू केल्याने हे निजामराज्य उलथून पडेल असे वाटत असेल तर मूर्ती खुशाल हलवा. पण मी आपल्या हाताने ती हलविणार नाही." त्याचे हे शब्द मी जसेच्या तसे कलेक्टरसाहेबांकडे लिहून पाठविले. माझ्या रिपोर्टाने जिल्हाधिकारी अस्वस्थ झाले. शेवटी त्यांनी डेप्युटी कलेक्टरला योग्य तो निर्णय घेण्याचा हुकूम देऊन पाठविले. त्याने ती मूर्ती हलवून गावच्या पारावर आणून ठेवली आणि ते प्रकरण मिटविले. खालच्या अधिकाऱ्यांची अशा बाबतीतील वागणूक म्हणजे हिंदूंच्या भावनांबद्दल कमालीची अनास्थाच म्हणावी लागेल. हिंदू समाजात संघटना नव्हती, जागरूक पुढारी पण नव्हते. अशा प्रकरणांनी सर्वत्र क्षोभ होण्याची शक्यता नव्हती. यामुळे हे अधिकारी अशा रीतीने वागत. निजाम सरकार असले धोरण हेतुपूर्वक चालवी असेही फारसे नव्हते. पण बहुसंख्य असलेल्या हिंदूंच्या भावनांसंबंधी त्याचे असलेले अज्ञान आणि उपेक्षा हीच या धोरणामागे असत.

ज्या जुन्या देवळांना, अगर मठांना निजाम सरकारकडून जहागिरी, इनामे अगर वर्षासने चालू असत तेथेसुद्धा मुसलमान अधिकारी क्षुल्लक कारणावरून कटकटी निर्माण करीत. डोंगरगावला गोसाव्यांचा एक मठ आहे. तेथे गोसाव्यांनी दत्ताची मूर्ती बसविली. प्रतिष्ठापनेचा भंडारा त्यांनी केला. गावकऱ्यांना त्यांनी जेवण घातले. त्यावेळी पोलीस सबइन्स्पेक्टरने त्यांच्याकडून लाच मागितली. गोसाव्यांनी त्याला पैसे देण्याचे नाकारले. त्याने वरिष्ठांकडे रिपोर्ट केला की, गोसाव्यांनी परवानगी न घेता मठात दत्ताची मूर्ती स्थापन केली आहे. अशा बेकायदा कृत्याबद्दल मठाला चालू असलेली इनामे जप्त करण्यात येऊन गोसाव्यांना कडक शिक्षा करण्यात यावी. चौकशी करण्याचा मला हुकूम झाला. मी डोंगरगावाला गेलो. मठात जाऊन मी दत्ताचे दर्शन घेतले. दत्ताचा प्रसाद म्हणून गोसाव्यांनी मला बदाम, खडीसाखर, खारका या वस्तू कपड्यांत बांधून दिल्या. यावर निनावी अर्ज पाठविण्यात आले की, सेतुमाधवरावांनी गोसाव्याकडून लाच घेतली आहे. चौकशीत गोसावी म्हणाले की, पूर्वीची मूर्ती भंगली होती. तिची पूजा-अर्चा चालू ठेवणे धर्मशास्त्राला विरुद्ध होते. घाईघाईने आम्हांला दुसरी मूर्ती स्थापन करावी लागली. नाही तर पूजा बंद पडली असती. आम्ही जबाबदार माणसे आहोत. मठासाठी निजाम सरकारने पूर्वीपासून आम्हांला जहागिरी आणि इनामे चालू ठेवली आहेत. सरकारने या गोष्टी लक्षात घेऊन हे प्रकरण निकालात काढावे. मी आपल्या अहवालात गोसाव्यांचे म्हणणे उचलून धरले. पण जिल्हाधिकाऱ्याचे समाधान झाले नाही. त्याने डेप्युटी कलेक्टरला चौकशीचा हुकूम दिला. मी आणि अब्दुलकादर (डेप्युटी कलेक्टर, दुय्यम तालुकदार) हे

डोंगरगावला गेलो. गोसाव्यांनी अब्दुल्कादरला दत्ताचा प्रसाद म्हणून बदाम खडीसाखर यांची पुरचुंडी दिली. अब्दुल्कादरने मला विचारले, "इसमें क्या है?" मी हसून म्हटले, "दत्ताचा प्रसाद-बदाम आणि खडीसाखर. हाच प्रसाद मला मिळाला. आणि मी गोसाव्याकडून लाच घेतली असे निनावी अर्ज पाठविण्यात आले." अब्दुल्कादर हसला. तो म्हणाला, "इतके काय मनाला लावून घेता. तुमच्याबद्दल कोणी संशय तरी घेणार आहे का?"

पुढे हे प्रकरण मंत्रिमंडळापर्यंत गेले. मुद्दा काय, "पूजेची मूर्ती भंगली तर दुसरी मूर्ती बसविण्यासाठी प्रथम परवानगी घ्यावी आणि नंतरच मूर्ती बसवावी काय?" या गंभीर प्रश्नावर खल होऊन मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की, पूजा थांबून राहते असे वाटले तर दुसरी मूर्ती बसविण्याची टेंपररी परवानगी घ्यावी आणि मूर्ती बसवावी. नंतर परवानगी पक्की करून घ्यावी. साध्या धार्मिक गोष्टींनाही किती मोठे स्वरूप प्राप्त होई आणि त्यापायी लोक किती हवालदिल होत याचे हे उदाहरण आहे. अशा बाबतीत माहू या तालुक्यातील मुसलमान अधिनियम सोडून वागत. त्यावेळी त्यांची हजेरी घेण्यास मी मागेपुढे पाहत नसे. असाच एक विलक्षण अनुभव मला आला.

कळमनूरी तालुक्यात एक गाव आहे. तेथे प्रामुख्याने हटकर जमातीची वस्ती आहे. गावात एका मुसलमान फकिराचा दर्गा आहे. काय कारणाने असेल ते असो, मुसलमानांच्या संसर्गाने गावच्या हटकर लोकांत लोकविलक्षण रूढी शिरल्या होत्या. या जमातीतला कोणी मनुष्य मेला की एखाद्या काजीला बोलावण्यात येई. तो प्रेतावर विड्याचे पान आणि अडकित्ता धरून अडकित्त्याने पानाचे देठ तोडी. प्रेताची सुंता झाली असा त्याचा अर्थ होई. यानंतर प्रेताला दरग्याच्या आवारात नेऊन पुरत असत.

निजाम सरकारच्या धार्मिक खात्यातर्फे मुसलमानांत धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी पगारी प्रचारक नेमलेले असत. त्यांना वाहूज म्हणत [वाज म्हणजे प्रवचन, वाहूज म्हणजे प्रवचनकार]. ते खेडोपाडी फिरत आणि मुसलमानांना नमाज पढणे, रोजे ठेवणे, कुराण वाचणे इत्यादींची शिकवण देत. हिंदूसमाजाशी त्यांचा संबंध नसे. वाहूज लोकांचे फिरतीचे अहवाल तपासणीसाठी माझ्याकडे येत. आमच्या तालुक्यातील वाहूज असाच फिरत फिरत वरील खेड्यात गेला. प्रेताच्या सुंतेची तेथे रूढ असलेली पद्धत पाहून त्याला आश्चर्य वाटले. वास्तविक पाहता तो समाज हिंदूंचा होता. वाहूजला त्यांना उद्देशून प्रवचन करण्याचे काही कारण नव्हते, पण त्याला राहवले नाही. तो हटकरांना म्हणाला "अगर तुमको इस्लाम प्यारा है तो मुसलमान हो जाव, नहीं तो ये मज्मूम [निंद्य] रसम

[परंपरा] छोड दो. " त्याने आपल्या फिरतीची दैनंदिनी माझ्याकडे पाठविली. तीत असलेल्या वरील वाक्याने माझा क्षोभ अनावर झाला. मी जिल्हाधिकाऱ्याकडे रिपोर्ट पाठवून लिहिले की, वाहूजचे काम केवळ मुसलमानांत सुधारणा घडवून आणण्याचे आहे. इतर जमातींत लुडबुड करण्याचे त्याला काय कारण आहे. तुम्ही धर्मांतर करून मुसलमान व्हा असे याने हिंदूंना सांगण्याचे कारण काय ? त्याला योग्य ती तंबी देण्यात यावी.

माझ्या रिपोर्टाने परभणीच्या जिल्हा कचेरीत खळबळ उडाली. वाहूजला तंबी देण्यात आली की, तुम्ही आपल्या प्रचाराचे काम मुसल्मानांपुरते मर्यादित ठेवा. दुसऱ्या जमातीशी तुम्हांला काही कर्तव्य नाही. येवढ्यावर हे प्रकरण निकालात काढण्यात आले. याच्या उलट एखाद्या हिंदू प्रचारकाने मुसल्मानांना धर्मांतर करण्याचा उपदेश केला असता तर सरकारने आकाशपाताळ एक केले असते.

हटकर जमातींतील त्या विचित्र परंपरेची हकीकत ऐकून मला फार अस्वस्थ वाटू लागले. त्यांना ही पद्धत सोडायला लावण्यासाठी मी एक उपाय योजला. या गावापासून जवळच येहलेगाव तुकाराम नावाचे एक गाव आहे. त्या गावी सुमारे शंभर वर्षांपूर्वी तुकाराम नावाचे एक साधुपुरुष होऊन गेले. त्यांची समाधी त्या गावी होती. दरवर्षी समाधीपाशी उत्सव होई. हजारोची यात्रा जमत असे. येहलेगाव तुकाराम गावी दर पंधरवड्याला तुकारामाच्या देवळात कीर्तने होत. कीर्तनकार एक सज्जन मनुष्य होता. हटकर जमातीच्या लोकांची त्याच्यावर श्रद्धा असे. मी कीर्तनकाराला सांगून पाठविले की, वरील गावची हटकर मंडळी येतील तेव्हा त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्यातील ही निंद्य रूढी काढून टाकायला लावा. तो या गोष्टीला कबूल झाला. कीर्तनात त्या गावची हटकर मंडळी हजर झाली. त्याने मोठ्या धोरणाने प्रचार करून त्यांच्यातील प्रेताची सुंता करण्याची पद्धत बंद करविली.

नशिबाच्या फेऱ्यात माणसे कुठल्याकुठे वाहत जातात हे मला ताराबाईच्या विलक्षण हकीकतीवरून अनुभवाला आले. ताराबाई ही अखिल भारतीय कीर्तीचा सँडो प्रोफेसर राममूर्ती याची भाची. तीही उत्तम प्रकारची पहिलवान होती. एके काळीं ताराबाईची सर्कस देशभर गाजत होती. तिने मिळविलेली पारितोषिके आणि सुवर्णपदके यांना गणती नव्हती. मीही लहानपणी तिची सर्कस पाहिली होती.

कळमनूरीला असताना एक दिवस आमच्या शिपायाने निरोप आणला की, बाहेर एक बाई आली असून ती आपल्याला भेटू इच्छित आहे. मी बाहेर आलो, त्या बाईने सलाम केला. मी तिला बसवून तिची हकीकत विचारली. ती

म्हणाली, “ माझे नाव ताराबाई, मी प्रोफेसर राममूर्तींची भाची, माझी सर्कस एकेकाळी गाजली होती. आता माझी फार दुर्दशा झाली आहे. माझा एखादा खेळ करवून आपण मला चार पैसे मिळवून दिलेत तर मी आपली फार आभारी होईन. ” ताराबाईची हकीकत विलक्षण होती.

तिने आपल्या सर्कसवर बरेच पैसे मिळविले. तिने कुस्त्यांचे अनेक फड जिंकले. भल्या भल्या पुरुषांना तिने कुस्त्यातून हरविले. तिला आपल्या मल्लविद्येचा मोठा गर्व चढला. ती ज्या गावी जाई तेथील मल्लांना आव्हान देई. आणि त्यांना जिंकल्यानंतर त्यांची विटंबना करी. असेच फिरत फिरत ती सोलापूरला आली. तेथे एक मुसलमान पहिलवान राहत होता. त्याच्याशी तिची कुस्ती ठरली. अट अशी की त्याने जिंकली तर ताराबाईने त्याची दासी होऊन राहावे. उलट तिने जिंकले तर त्याने तिचा गुलाम व्हावे. ताराबाईचे दुर्दैव पहा. कुस्तीत ती हरली. ठरलेल्या अटीप्रमाणे ती त्याची दासी बनली. त्याने तिला मशिदीत नेऊन मुसलमान केली. ताराबाईची जैनाबबी झाली. पहिलवानाने निका लावला आणि तिला आपल्या जनानखान्यात बसवली. हे जोडपे हैदराबाद राज्यातील रायचूर या गावी राहू लागले. ताराबाईची सर्कस संपुष्टात आली. नवऱ्याने तिला घराबाहेर पडण्याचीही बंदी केली होती. ताराबाईला दोन तीन मुले झाली. पुढे पाच सात वर्षांनी तिचा नवरा मरण पावला. त्याचे स्वतःचे उत्पन्न असे फारसे नव्हतेच. ताराबाईवर उपासमारीची पाळी आली. मुलाबाळांना घेऊन ती हैदराबादेस आली. तिला मिळालेली सोन्याचांदीची पदके विकून ती आपली गुजराण करीत असे. तो साठाही संपला आणि मग ती उतार वयात गावोगाव भटकत आपले मल्ल-विद्येचे खेळ करून दाखवू लागली. ही ताराबाईची हकीकत. ती ऐकत असताना माझी मनस्थिती काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. मी तिचे खेळ करवून तिला पैसे मिळवून दिले आणि तिला वाटेला लावली.

इ. स. १९४०–४१ च्या सुमारास मी या विषयावर एक लघुकथा लिहिली. संदर्भ लक्षात येऊ नये म्हणून भारताच्या प्राचीन काळात ही कथा घातली. मल्लस्त्री आंध्र देशांतील, (ताराबाई नायडू ही आंध्र होती). ती आपले कौशल्य दाखवीत सीमा प्रदेशातील पुरुषपूरला (पेशावर) जाते. तेथे एका शक मल्लाला ती कुस्तीचे आव्हान देते. कुस्तीच्या ऐन दंगलीत शकमल्लाच्या डोळ्यांतील पौरुषाची चमक पाहून तिचे स्त्रीत्व जागे होते. तिच्या क्षणिक गोंधळाचा फायदा घेऊन मल्ल तिला हरवतो आणि तीही आनंदाने त्याला वश होते.

अशी कथा मी सजविली होती. ती मी निजामविजयकडे पाठविली. पोलिसांनी ती मधोमध पळविली. त्या कथेचा मला पुढे पत्ताही लागला नाही. लेखाच्या

प्रती करून ठेवण्याची माझी सवय नसल्यामुळे मी ती गोष्ट पुन्हा लिहिण्याचा कंटाळा केला. यानंतर माझे लघुकथा-लेखन सुटले ते सुटलेच.

हिंदूंच्या विस्कळितपणामुळे जाचक असे धार्मिक नियम करूनही ते क्षुब्धा होत नाहीत याची सरकारला खात्री होती. पण आर्यसमाजाच्या चळवळींमुळे सरकार अस्वस्थ होऊ लागले. नांदेडच्या शिखांनी इ. स. १९३६–३७ मध्ये प्रचंड चळवळ करून निजाम सरकारला माघार घेण्यास लावली. नांदेड हे गुरु गोविंदसिंगाचे समाधिस्थान. दरवर्षी हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतून हजारो शीख नांदेडला येतात. तेथे शिखांच्या मालकीच्या एका टेकडीवर मुसलमानांनी एक प्रेत पुरले आणि ही जागा आमची म्हणून दावा मांडला. टेकडी ताब्यात घेण्यासाठी शिखांनी अभूतपूर्व अशी चळवळ केली. पंजाबहून शिखांचे जथ्ये नांदेडला येऊ लागले. या प्रकाराने निजाम सरकार घाबरून गेले. शेवटी सरकारने एका युरोपियन जज्जाची नेमणूक करून या प्रकरणाचा निकाल देण्याचे काम त्याच्याकडे सोपविले. त्याने मुसलमानांच्या विरुद्ध निकाल दिला आणि मुसलमानांना टेकडीवरून प्रेत हलवावे लागले.

प्रखर चळवळीने सरकार दबू शकते, हा धडा आर्यसमाजाच्या नजरेतून निसटला नाही. आपल्या धार्मिक हक्कांसाठी, ते न भिता सरकारशी झगडू लागले. सनातनींच्याप्रमाणे ते गप्प बसून राहात नसत. हैदराबाद शहरात त्यांची मोठी संस्था होती. न्यायमूर्ती केशवराव कोरटकर, त्यांचे चिरंजीव विनायकराव, पंडित नरेंद्र सक्सेना अशी मंडळी आर्यसमाजात असत. जिल्ह्यातून आर्यसमाजाच्या शाखा सर्वत्र पसरल्या होत्या. उदगीरचे श्यामलाल आणि बन्सीलाल हे त्याचे प्रमुख कार्यकर्ते होते. सरकारने एखाद्या प्रकरणात आर्यसमाजाला गोवण्याचा प्रयत्न केला, की ते कोर्टकचेऱ्यातून प्रकरणे धसाला तर लावीतच; शिवाय वर्तमानपत्रांतून हिंदुस्थानभर निजाम सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध प्रचार करीत. मुसल्मानांनी काही ठिकाणी मारामाऱ्या करून पाहिल्या. पण आर्यसमाजी त्यांना दबले नाहीत. यांतूनच १९३८ चा आर्यसमाजाचा सत्याग्रह हैदराबाद ' राज्यात ' सुरू झाला.

सामान्य मुसलमानांना हा आर्यसमाज काय आहे हे कळत नसे. आर्यसमाजी हा कोणीतरी चळवळ्या मनुष्य असतो, इतपत त्यांची माहिती. कोणाही चळवळ्या माणसाला ते " वो आर्या है " असे म्हणू लागले. मुसलमान अधिकारी आपल्या रिपोर्टांत " वो सरगरम आर्यसमाजी हैं और गणेशोत्सव में हिस्सा लेते हैं, " (ते एक उत्साही आर्यसमाजी असून गणेशोत्सवात भाग घेत असतात) अशी परस्परविरोधी वाक्ये लिहू लागले. मुसल्मान अधिकारी मला

सनातनी समजत. आमच्या घरातील सोवळेओवळे, गणेशोत्सवादी धार्मिक उत्सव, कपाळावरील गंध इत्यादींमुळे त्यांना वाटे की, मला आर्यसमाजाविषयी यत्किंचितही सहानुभूती नसावी. मीही मुद्दाम वेड घेऊन पेडगावाला जाण्याचे सोंग करी. मुसलमान अधिकाऱ्यांचे मला हसू येई, एकाला मी विचारले, "अहो, हा आर्यसमाजी कसा ओळखावा ?" त्याने सांगितले, "जो मिशा काढतो आणि गांधी टोपी घालतो तो आर्यसमाजी." मला हसू आवरेना. औरंगाबादचे एक मुसलमान व्हेटरिनरी डॉक्टर कळमनूरीला दौऱ्यावर आले होते. ते मला म्हणाले, "तुम्हा सनातनी लोकांना आर्यसमाजामुळे किती त्रास होतो याची आम्हांला कल्पना आहे. पण काळजी करू नका. आपले निजाम किंग कोठीत (राजवाड्याचे नाव). बसून रात्रंदिवस हीच विवंचना करीत आहेत. "वो कुछ न कुछ रास्ता निकालही लेंगे" (ते काही ना काही मार्ग काढतीलच) मीही दुःखीकष्टी झाल्याचे सोंग आणले. आर्य समाजाच्या चळवळीने सरकार अस्वस्थ झाले होते यात शंका नाही. पण नेमक्या याच गोष्टीमुळे हिंदूंना आतल्या आत आनंद वाटत होता, हे सरकारी अधिकाऱ्यांना मुळींच उमगले नाही.

आपल्या लघुकथांचा संग्रह प्रसिद्ध व्हावा याची मला तळमळ लागली होती. बी. रघुनाथ यांनी मला नांदेडच्या गोदावरी प्रेसचे गणपतराव आंबेकर यांचे नाव सुचविले होते. मी त्यांना कळमनूरीला येऊन जाण्याविषयीचा निरोप पाठविला. १९३७ मध्ये ते माझ्याकडे आले. आंबेकरांचे सौजन्य आणि उपयोगी पडण्याची वृत्ती पाहून मला मोठा आनंद झाला. गेली तीस वर्षे माझा आणि त्यांचा अखंड स्नेह आहे. ते मला म्हणाले, "मी काही प्रकाशक नाही. फक्त मुद्रक आहे." मी म्हटले, "मी काही प्रकाशक होऊ शकत नाही. लेखनसुद्धा मी 'कृष्णाकुमार' या टोपण नावाने करीत असतो. प्रकाशनाची वीणा मी तुमच्या गळ्यात बांधतो. तुमची जबाबदारी फक्त मुद्रणाची राहील." छपाईखर्चाची आम्ही चर्चा केली. तो दीडशे प्रतींना एकशे अठ्ठावन्न रुपये खर्च येईल असे त्यांनी सांगितले. मी त्यांना म्हटले, "आंबेकर, तुम्ही पुस्तक छापायला घ्या. एकशे अठ्ठावन्न रुपये म्हणजे काहीच नाहीत. मला सिग्रेटचे व्यसन नाही, कपड्यालत्त्याचा षौक नाही, या खेडेगावात नाटके आणि सिनेमे नाहीत. रजा घेऊन प्रवासाला जावे आणि प्रेक्षणीय स्थळे पाहावी असे वाटले तरी कुटुंब मोठे. ते कुठे ठेवून जावे हा प्रश्न येतोच. यामुळे प्रवासही जमत नाहीत माझे हे लेखनवाचनाचे एक व्यसन आहे. एका वर्षात एकशे अठ्ठावन्न म्हणजे महिन्याचे तेरा रुपये पडले. माझ्या व्यसनापायी ते खर्ची पडले असे मी समजेन." लघुकथा-

संग्रहाचे नांव मी माझ्या पत्नीवरून ' उषा ' असे ठेवले. १९३८ च्या जूनमध्ये माझे पुस्तक छापून आले. त्यावेळीं मला जो आनंद झाला तो शब्दांनी वर्णन करणे अशक्य आहे. दिवसभर पुस्तक हातात घेऊन मी वेड्यासारखा नाचत होतो. गेल्या तीस वर्षांत माझी बत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. पण पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा आनंद अवर्णनीय होता. पुस्तकाच्या प्रती मी मित्र, आप्तेष्ट, मासिके, दैनिके इत्यादींच्याकडे पाठविल्या. माधव ज्यूलियन यांनी पत्र लिहून माझे कौतुक केले. ते मला लाख मोलाचे वाटले. सुप्रसिद्ध लेखिका कमळाबाई टिळक यांनी ज्ञानप्रकाशातून माझ्या पुस्तकाचे विस्तृत परीक्षण केले. या उत्तेजनामुळे मला आपले लेखन चालू ठेवण्याची अनिवार अशी जिद्द निर्माण झाली.

मराठवाड्यातील लोक कणखर आहेत. पण त्यांना कोणी नेता नसल्यामुळे त्यांच्यांत चळवळ अशी नव्हतीच. कायदेकानून याविषयी त्यांच्यात विलक्षण अज्ञान होते. त्यामुळे ते सरकारी अधिकाऱ्यांना बिचकून असत. मी सरकारी अधिकारी पडलो. सार्वजनिक कार्यकर्त्यांसारखे मला वागता येईना. पण न्यायमूर्ती रानडे यांचे चरित्र मी वाचले होते. त्यांच्या आणि गोखल्यांच्या चरित्राचा माझ्या मनावर परिणाम झाला. लहान लहान गोष्टींसंबंधी प्रजेच्या तक्रारी काय आहेत हे पाहून त्यांना सरकारी नियमांची माहिती करून द्यावी असे मी ठरविले.

निजामराज्यात शेतसारा हा प्रमुख कर असे. पण याशिवाय पूर्वापार चालत आलेले अनेक लहानमोठे कर असत. ते वसूल करण्याचा अधिकार दरवर्षी लिलावाने ठरविण्यात येई. उदाहरणार्थ काही गावातील बाभूळवने सरकारी समजली गेली. बाभूळवनातून गावची मेंढरे चरू लागली तर त्यांच्या मालकापासून काही रक्कम कर म्हणून वसूल करावी असा नियम असे. हा कर सरकार प्रत्यक्ष वसूल करीत नसे. दरवर्षी या कराचा लिलाव होई. हे कंत्राट घेणारे मुसलमान असत. एकदा त्यांच्या नावाने हुकूम दिला गेला की ते तालुक्याच्या गावागावातून हिंडत, त्यांच्याबरोबर सशस्त्र माणसे असत. गावात घुसल्यावर ते लोकांची गुरेढोरे अडकवून ठेवीत. मग गावकरी एकत्र जमत.

पाटील-कुळकर्ण्यांच्या मध्यस्थीने गावात वर्गणी जमा करण्यात येई आणि कंत्राटदारांना ती देण्यात येऊन त्यांना वाटेला लावण्यात येई. त्या गावात कर वसूल करण्याचा कंत्राटदाराला अधिकार तरी आहे का, असल्यास ज्याची शेळी-मेंढरे बाभुळवनात चरत त्यांच्याचकडून कर वसूल झाला आहे काय, झाला असल्यास वसुलीच्या रशिदी दिल्या आहेत काय, या गोष्टीची कोणी चौकशी

करीत नसे. गावकऱ्यांना वाटे हा सरकारी नियम आहे. वर्गणी देणे आपले कर्तव्य आहे. शस्त्रधारी कंत्राटदारांना मुसलमान वकिलांची फूस असे आणि त्यांच्या कारवायांकडे अधिकारी काणाडोळा करीत.

यासंबंधी मी सरकारी नियम काढून पाहिले. तो मला आढळून आले की, कळमनूरी तालुक्यातील दोनशेअठरा खेड्यांपैकी फक्त साठसत्तर खेड्यांतूनच सरकारी बाभूळवन होते आणि कंत्राटदार तर एकूणएक खेड्यात घुसून दंडेली करीत, मी कंत्राटदारांना सांगितले की, तुम्ही साठसत्तर खेडी सोडून इतर खेड्यांतून जाऊन लोकांवर जुलूमजबरदस्ती केली तर तुमच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल. जेथे कर वसूल करण्याचा अधिकार आहे तेथे वसूल केलेल्या रकमांच्या रशिदी तुम्ही दिल्या पाहिजेत. माझ्या दौऱ्यात मी गावकऱ्यांना सांगू लागलो की, ही माणसे तुमच्या गावात आली तर तुम्ही त्यांना थारा देऊ नका. त्यांनी दंडेली केली तर माझ्याकडे या. मी त्यांचा बंदोबस्त करीन.

तालुक्याच्या असंख्य शेतांतून गुलमोहराची झाडे पसरलेली असत. गुलमोहरापासून दारू करण्यात येत असे. या झाडाखाली शेळ्या-मेंढरे चरतात म्हणून शेताच्या मालकांकडून कंत्राटदार कर वसूल करीत. त्याची पावतीही देत नसत. हा करही रयतेकडून वसूल करीत.

हैदराबाद राज्यात त्याकाळी नगरपालिका फार कमी होत्या. जिल्हा लोकल बोर्डेही नसत. पण लोकल फंड नावाचे एक खाते असे. त्यातून प्रमुख गावातील साफसफाई आणि लहानसहान बांधणुकीची कामे पार पाडण्यात येत. शेतसाऱ्याबरोबर रुपायामागे एक आणा वसूल करण्यात येई. हेच लोकलफंडाचे मुख्य उत्पन्न. बाकीचे कर कंत्राटदारांच्या मार्फत वसूल करीत. त्यांपैकी एक कर म्हणजे पावसाळ्यात नद्या नाले ओलांडण्यात कंत्राटदाराने मदत म्हणून माणसे ठेवावीत, भोपळे बांधून लोकांना नदीपार करण्यासाठी भोपळे तयार ठेवावे. आणि याच्या मोबदल्यात लोकांकडून दर डोई एक आण्याचा कर घ्यावा आणि त्याची पावती द्यावी. प्रत्यक्षात हा कर म्हणजे गुंड कंत्राटदारांना जुलूमजबरदस्तीचे साधन बनले. पाऊस पडो न पडो, नदीनाल्यांना पूर येवोत अगर न येवोत. कंत्राटदाराने माणसांची अगर भोपळ्यांची सोय केली असो अगर नसो, कंत्राटदार सशस्त्र गुंडांना नदीकाठावर उभे करून जाणाऱ्या येणाऱ्यांच्या कडून चापून कर वसूल करीत आणि लोकही तो मुकाट्याने देत.

माझी इच्छा ही की, लोकांनी नियमांची माहिती करून घ्यावी आणि कंत्राटदारांना त्याप्रमाणे वागण्यास भाग पडावे. जागृतीचे हे पहिले पाऊल होते. मी कंत्राटदारांना तंबी देऊन या प्रकाराला आळा घातला आणि दौऱ्यावर असताना

लोकांना बजावीत गेलो की, तुमच्या गावच्या नदीला पूर आला आणि कंत्राट-दाराच्या मदतीने तुम्हांला नदी ओलांडावी लागली तरच तुम्ही पावती घेऊन कर द्यावा. एरव्ही नाही.

या गोष्टी क्षुल्लक वाटतात. पण यावरून निजाम राज्यातील लोकांत किती अज्ञान आणि उदासीनता पसरली होती याची कल्पना येईल. दुर्दैवाने कंत्राटदार आणि त्यांचे सशस्त्र गुंड हे मुसलमान असल्यामुळे माझ्या या धडपडीला जातीय स्वरूप देण्यात येऊ लागले. कळमनुरीतील खसलत हुसेन वकील म्हणजे सर्व गुंडांचा आधार. तो पुढे पाकिस्तानला पळून गेला. शेतकऱ्यांच्या तक्रारी दूर करण्याकडेही मी लक्ष पुरविले. पाटील, कुळकर्णी शेतसाऱ्याची पोच देत नसत. पावती वह्या चार आण्याला एक या हिशेबाने आणून त्या एकेक रुपयाला शेतकऱ्यांना विकत. मराठवाड्यांत त्यावेळीं रेकार्ड ऑफ राइटस, हक्कनोंदणीची पद्धत नव्हती. जमीनमालक मेला तर पाटील महिनोमहिने वारसाची नोंद करीत नसत. जमीन मालकाला पट्टेदार म्हणत. पण पोट-पट्टेदार, यांना शिकमीदार म्हणत, त्यांच्या नोंदी होत नसत. यांतून जमिनीची भांडणे निर्माण होत. महिन्यातून वीस वीस दिवस दौरे करून मी लोकांना सरकारी नियमांची माहिती करून देऊ लागलो. पावतीवह्या चार आण्याला एक या हिशेबाने मी हजारोंनी शेतकऱ्यांत वाटल्या. सरकार अशा बाबतीत उदासीन असे. कधी सुधारणा घडवून आणण्याचे सोंग करण्यात येत असे.

याचे एकच उदाहरण पाहण्यासारखे आहे. सरकारने एक खाते स्थापन केले. नशाबंदीचे. त्याला महकमे तर्के मिसक्करात म्हणत. याचे मुख्य हे न्यायखात्याचे मंत्री होते. लोकांनी दारू पिऊ नये म्हणून प्रचार करण्याचे काम या खात्याकडे होते. वर्षातून एक दिवस दारूबंदीचा म्हणून साजरा करण्यात यावा अशी आम्हांला आज्ञा करण्यात आली. गावात एक मिरवणूक काढावी आणि नंतर एक सभा घ्यावी असे मी ठरविले. आदल्या दिवशी अबकारी खात्याच्या कमिशनरकडून आम्हांला गुप्तपणे लिहून आले की, दारू पिऊ नका म्हणून तुम्ही हवा तितका प्रचार करा; पण जे अजिबात दारू पीत नाहीत त्यांनाच तुम्ही दारू पिऊ नका असे सांगावे ! जे पीत असतील त्यांच्या वाट्याला जाऊ नये. दारूच्या अड्ड्याजवळ मिरवणूक नेऊ नये. सभा भरवायची ती दारू न पिणाऱ्यांच्या आळीत भरवावी. सारांश, सरकारचे अबकारीचे उत्पन्न बुडेल किंवा कमी होईल असे काही करू नये.

आम्ही आज्ञेचे पालन केले आणि दारूबंदी दिवस अत्यंत यशस्वीपणे साजरा झाला म्हणून सरकारकडे रिपोर्ट केला.

प्रजेची लहानसहान गाऱ्हाणी दूर करून त्यांना सरकारी कायदेकानूनची माहिती करून देण्याची मी धडपड करीत होतो. पण माझी एक चूक झाली. मी एक लहानसे मराठी पत्रक काढले. त्यात लोकांना उद्देशून साध्या सूचना होत्या. उदाहरणार्थ (१) शेतसाऱ्याची नोंद पावतीवहीवर करून घ्यावी. (२) पावतीवही आपल्याजवळ ठेवावी. (३) तुमच्या स्वतःच्या घराच्या दुरुस्तीसाठी परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. (४) तुमच्या गावात बाभुळवन नसेल तर तो कर देण्याची आवश्यकता नाही. (५) नदीनाले तुम्ही कुणाची मदत न घेता ओलांडून गेलात तर कुणाला कर देण्याची जरूर नाही.

हे पत्रक मी छापून घेतले आणि त्याच्या शेकडो प्रती लोकांत वाटल्या. ही सरकारी अधिकारी या नात्याने माझी चूक होती. जिल्हाधिकाऱ्यांनी माझा जाब मागितला की, तुम्हांला अधिकार नसताना तुम्ही हे सर्क्युलर का काढले? मी उत्तर दिले की, मी काढले ते सर्क्युलर नाही. सरकारी नियम आहेत. पण त्यांची नीट अंमलबजावणी होत नाही आणि लोकांनाही हे नियम नीट माहीत नाहीत त्यामुळे समाजकंटकांचे फावते. ह्यामुळे आपल्या दयाळू सरकारची निष्कारण बदनामी होते. पत्रकात मी दिलेल्या सूचना या सरकारच्या नियमांस अनुसरून आहेत.

माझ्या उत्तरातील खोच कलेक्टरांनी ओळखली. त्यांनी सरकारकडे रिपोर्ट केला की, सेतु माधवरावांच्या वागणुकीचा अर्थ वेगळा आहे. (ये जरासीम यहां फैलनेका अंदेशा है.) त्यांनी सोडलेले जंतू येथे पसरतील अशी शंका आहे. यांची एक क्षणाचाही विलंब न करता बदली करण्यात यावी.

जून १९३८ मध्ये माझी बदली कळमनूरीहून उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा या तालुक्यावर करण्यात आली. रिलीव्हरची वाट न पाहता, अव्वल कारकुनाला चार्ज देऊन तुम्ही ताबडतोब रवाना व्हा, असा हुकूम माझ्यावर बजावण्यात आला. उषा त्यावेळी पुण्याला गेली होती. मी लॉरीत सामान भरले आणि कळमनूरीहून निघून नांदेड, लातूर आणि बार्शी या मार्गे तेवीस जून १९३८ रोजी परंड्यास पोहोचलो. कळमनूरीच्या वातावरणात मी मराठीपणा आणला. लोकांचे लक्ष स्वतःच्या गाऱ्हाण्यांकडे वेधले आणि त्यांच्या पाठीचा कणा अधिक ताठ होण्यास मदत केली. ठिणगी पुढे पडली पण ती पेट घेण्यासाठी लागणारे सुके गवत आणि लाकूडफाटा गोळा करण्याचे काम मी कळमनूरीला करू शकलो याचे मला समाधान आहे.

११

परंडा
१९३८ ते ४०

तेवीस जून १९३८ रोजी मी परंड्याच्या मामलेदारीचा चार्ज घेतला. परंडा हे गाव मला पूर्णपणे परिचित होते. इ. स. १९२३ पासून एप्रिल १९२५ पर्यंत माझे वडील परंड्याच्या मामलेदार कचेरीत अव्वल कारकून (पेष्कार) होते. माझे लहानपण त्या गावात गेले होते. कळमनूरी तालुका वऱ्हाडला लागून होता. परंडा तालुका सोलापूर जिल्ह्याला लागून होता. परंडा हे गाव कुर्डुवाडी जंक्शन-पासून आणि बार्शीपासून सतरा मैलांवर आहे. परंड्याचा किल्ला इतिहासप्रसिद्ध असून मोठा प्रेक्षणीय आहे. मराठ-वाड्यातील प्रसिद्ध मराठा सरदार रावरंभा निंबाळकर यांचे जहागीर गाव भूम हे परंड्यापासून एकोणीस मैलांवर आहे.

परंडा हा उस्मानाबाद जिल्ह्यातील एक तालुका होता. मी होतो त्यावेळी उस्मानाबाद जिल्ह्याचे अव्वल तालुकदार (कलेक्टर) अमीर अलीखान हे होते. हे याह्या जमातीचे पठाण. अमीर अलीखानांचे शिक्षण इंटरपर्यंत झाले होते. त्यानंतर ते हैदराबाद सीव्हिल सर्विसमध्ये लागले. आयुष्यात माझा अनेक माणसांशी संबंध आला. पण

अमीर अलींसारखा धूर्त आणि चतुर मनुष्य मी अद्याप पाहिला नाही.

इ. स. १९३८ हे वर्ष हैदराबादच्या इतिहासात क्रांतिकारक ठरले. निजाम सरकारने या वर्षी कायदेमंडळात सुधारणा सुचविण्यासाठी एक समिती नेमली. समितीचे अध्यक्ष हैदराबादचे कायदेमंत्री दिवाण बहादुर आरवामुदु अय्यंगार हे होते. प्रातिनिधिक आणि जबाबदार पद्धतीची राज्यव्यवस्था सुचविणे हे समितीच्या कक्षेबाहेर होते. निजामाची भूमिका अशी की, हे राज्य मला परमेश्वराकडून मिळाले आहे. मी जिल्लुला म्हणजे परमेश्वराची छाया आहे. हैदराबादच्या प्रजेला जबाबदार राज्यपद्धती देणे शक्य नाही. माझे मंत्री कायदेमंडळाला जबाबदार राहू शकत नाहीत. ते मलाच जबाबदार राहिले पाहिजेत. आयंगार समितीने सुचवायचे ते हे की हैदराबादच्या प्रजेच्या गरजा काय आहेत हे सरकारला माहीत व्हावे. यासाठी कायदेमंडळातील सभासदांची संख्या किती वाढवावी आणि मंडळात हिंदू-मुसलमान या जमातींना कोणत्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे. समितीने आपले कार्य सुरू केले. मुसलमानांना आपल्या हितसंबंधांना बाध येतो असे वाटले. त्यांनी या सुधारणांना कसून विरोध करण्यास सुरुवात केली. यातूनच मुसलमानांच्या इतहादुल मुसलमीन आणि रजाकार या चळवळी सुरू झाल्या. यांचे नेतृत्व बहादुरखान उर्फ बहादुर यार जंग या पठाण जहागिरदाराकडे होते. बहादुर यार जंगाला उत्कृष्ट वक्तृत्वाची देणगी मिळाली होती. त्यांनी राज्यभर दौरे काढून अल्पावधीत हजारो मुसलमानांना आपल्या संघटनेत ओढले.

याच सुमारास आर्यसमाज आणि हिंदुमहासभा यांनी निजाम सरकारच्या जाचक अशा धार्मिक धोरणाविरुद्ध सत्याग्रह सुरू केला. स्वामी रामानंदतीर्थ, मेलकोटे, गोविंदराव नानल, कृष्णाचार्य जोशी, रामकृष्णराव, वेंकट रंगा रेड्डी, दिगंबरराव बिंदू इत्यादींनी राज्यात कॉंग्रेस स्थापन करावी म्हणून प्रयत्न केला. सरकारला अखिल भारतीय कॉंग्रेसशी संलग्न असलेली आणि राष्ट्रीय भावनांवर आधारलेली कॉंग्रेस नको होती. त्यांनी कॉंग्रेसला विरोध केला. त्यातूनच १९३८ मधे निवडक कॉंग्रेसजनांनी सत्याग्रह केला. मी परंड्याला पोहोचलो त्यावेळी लातूरला निजाम महाराष्ट्राची परिषद नुकतीच होऊन गेली होती. आर्यसमाजाचे सत्याग्रही हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतून हैदराबाद राज्यात घुसू लागले होते. एके सकाळी पन्नास आर्यसमाजी सत्याग्रही परंड्याला येऊन थडकले.

हैदराबाद राज्यात १९२२ पासूनच अंमलबजावणी खाते आणि न्याय खाते यांची फारकत झाली होती. तालुक्यातील मामलेदारांना फौजदारी खटले चालविण्याचे अधिकार नव्हते. पण हा प्रकार सर्वच तालुक्यातून होता असे नाही.

त्याचे कारण असे, हैदराबाद राज्यांत निजामाच्या खासगीची अशी एकोणीसशे खेडी होती. त्यांचे उत्पन्न वर्षाला दोन कोटी रुपयांचे होते. ही खेडी निरनिराळ्या तालुक्यांतून आणि जिल्ह्यांतून विभागली गेली होती. निजामाच्या या खासगीच्या इलाख्याला सर्फेखास (खास खर्च) असे म्हणत. हैदराबाद शहराच्या भोवती असलेला सर्फेखासचा जिल्हा हा निजामाच्या खाजगीच्या अधिकाऱ्यांकडे असे. पण काही तालुके हैदराबाद शहरापासून बऱ्याच अंतरावर होते. सर्फेखास आणि जहागिरी यांची सुमारे सहा हजार खेडी होती. ही सोडून उरलेली सतरा हजार खेडी, सुमारे एकशेतीस तालुके आणि सतरा जिल्हे असलेल्या इलाख्याला दिवाणी म्हणत. दिवाणी म्हणजे दिवाण याच्या म्हणजे गव्हर्मेंटच्या ताब्यात असलेला इलाखा. निजामाचे सर्फेखासचे लांब विखुरलेले तालुके हे राज्यकारभाराच्या सोयीसाठी दिवाणी जिल्ह्यांना जोडण्यात आले होते. या तालुक्यांवर दिवाणीतील म्हणजे गव्हर्नमेंट अधिकाऱ्यांच्या नेमणुका होत. पण अशा तालुक्यांचे उत्पन्न निजामाच्या खाजगी खजिन्यात भरण्यात येई. सर्फेखास तालुक्यात मामलेदारांना फौजदारीचे काही अधिकार देण्यात आले होते. याशिवाय तालुक्यांच्या तुरुंगाची व्यवस्थाही त्यांच्याकडे असे. परंडा हा सर्फेखासचा तालुका होता. त्यामुळे तेथील जेलची व्यवस्था माझ्याकडे होती.

परंड्यात आर्यसमाजी सत्याग्रही आले तेव्हा त्यांना ताबडतोब अटक करण्यात आली. पुढील चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना कच्च्या तुरुंगात ठेवण्याचा हुकूम मुन्सफने दिला. त्या पन्नास आरोपींना माझ्याकडे पाठविण्यात आले. आता परंडा हा मागासलेला तालुका. गावाची वस्ती पाच हजारांच्यावर नव्हती. तालुक्याचा तुरुंग म्हणजे माझ्या ऑफिसच्या इमारतीतील दोन लहान खोल्या. एक पुरुष कैद्यांसाठी आणि दुसरी स्त्रियांसाठी. या खोल्याही अगदी लहान. त्यातून एखादा कैदी कसाबसा राहू शके. मी पन्नास आरोपींच्या राहण्याची व्यवस्था काय करणार ? मी त्यांच्या पुढाऱ्याला आपल्या चेंबरमधे बोलावून घेतले. तो पंजाबी होता. मी त्याला म्हटले, " महाशय, मी तुमच्याप्रमाणेच हिंदू आहे. तुम्ही मंडळी सत्याग्रहाच्या उद्देशाने येथे आला आहात. तुम्ही पळून जाणार नाहीत याची मला खात्री आहे. तुमची रवानगी जिल्ह्याच्या ठिकाणी उस्मानाबादला करावी, असे मी कलेक्टरना लिहीत आहे. येथे तुम्हांला ठेवण्यासाठी पुरेशा खोल्या नाहीत. मी माझ्या ऑफिसमधला कारकुनांचा हॉल मोकळा करून देतो. तुमच्यावर कसलेच बंधन राहणार नाही. तुम्ही समोरच्या विहिरीवर जाऊन आंघोळ करू शकता, कपडे धुऊ शकता. हवे असल्यास स्वयंपाकपाणी करू शकता. पण कचेरीचे पहारेकरी मुसलमान आणि तेही सशस्त्र अरब आहेत.

त्यांना मारामारीची संधी मिळेल असे काही करू नका."

आर्यसमाजी पुढाऱ्यांनी माझे म्हणणे मान्य केले. मी ऑफिसचा हॉल रिकामा करून दिला. सत्याग्रही हॉलमध्ये राहू लागले. माझे घर ऑफिसला अगदी लागून होते. मध्ये एक भिंतच आड होती. आम्ही संध्याकाळी आपल्या घराच्या अंगणात खुर्च्या टाकून बसत असू. तेव्हा सत्याग्रह्यांची भजने आम्हांला एकू येत. मधून मधून ते 'जय दयानंद', 'जय श्रद्धानंद' अशा घोषणा करीत. मला हे पाहून पोटातून आनंदाच्या गुदगुल्या होत. बरी निजाम सरकारची खोड मोडते आहे, असे मला वाटे. सत्याग्रह्यांना स्वयंपाकपाण्याचे जमेना. तेव्हा मी माझा स्वयंपाकी अंबादासराव याला सांगून सत्याग्रह्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करविली. आमच्या घरात पन्नास पन्नास माणसांसाठी रोज भात शिजू लागला.

हा प्रकार पाहून गावातील मुसलमानांची तळपायाची आग मस्तकाला गेली. तहसीलदार साहेबांनी सत्याग्रह्यांचे लाड पुरवावेत हे त्यांना सहन होईना. त्यांनी कलेक्टरकडे माझ्या विरुद्ध अर्ज पाठविला की, "तहसीलदार साहेब मुल्जिमोंको (आरोपी) दूध मलाई खिला रहे हैं." मला विचारणा करण्यात आली. मी कलेक्टरना कळविले की, "आरोपींना ठेवण्यासाठी माझ्यापाशी जागा नाही. त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी बोलावून घ्या, असे मी तुम्हांला कळविले आहे. त्यांना खाऊपिऊ घालण्याचे कंत्राट कोणी घेत नाही. त्यामुळे ती व्यवस्था मलाच करावी लागत आहे. एरव्ही मला अशा गोष्टीची हौस नाही."

सत्याग्रह्यांनी दोनचार दिवसांतच एक मोठा नाजुक असा पेचप्रसंग निर्माण केला.

एखादा आरोपी कैदखान्यात दाखल झाला की त्याने आत्मघात करून घेऊ नये म्हणून त्याच्याजवळ असलेले चाकू, वस्तऱ्याचे ब्लेड, उपरणे, डोक्याचे रुमाल (गळफास घेऊ नये म्हणून) काढून घेण्यात येत असत. आरोपीजवळ दोर असला तर तोही वरील कारणासाठी काढून घेण्यात येई. पोलिसांनी या नियमास अनुसरून काही आर्यसमाजियांच्या गळ्यांतील जानवी काढून घेतली. दुसऱ्या दिवशी आरोपींनी अन्नसत्याग्रह केला. मी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ते ऐकेनात. ते म्हणाले, आम्हांला नवीन जानवी आणून द्या. विधिपूर्वक होम-हवन करूनच आम्ही पुन्हा यज्ञोपवीत धारण करू. तोपर्यंत आम्ही अन्नग्रहण करणार नाही."

मी दोन तीन दिवसांपूर्वीच कलेक्टरांना परंड्याला भेट देण्यासाठी लिहिले होते. कुणीकडून तरी आर्यसमाजी माझ्या तालुक्यातून निघून जावे ही माझी

इच्छा. तितक्यात हा पेचप्रसंग उद्‌भवला. त्याला अनिष्ट वळण लागू नये म्हणून मी गावातून जानव्यांचे जोड मागवून घेतले. सत्याग्रही म्हणाले, " आम्ही होमहवन करणार. " आमच्या ऑफिसच्या अंगणात मी त्याचीही तयारी करून दिली.मग त्यांनी हट्ट धरला, " आम्हांला चंदनाची लाकडे पाहिजेत. " परंडा हे खेडेगाव. तेथे चंदन कोठून मिळणार. हे मी त्यांना सांगितले. यावर ते म्हणाले, " इतर लाकूड आम्ही वापरू. पण शास्त्रासाठी म्हणून थोडे तरी चंदन हवेच." मी आमच्या घरचे चंदनाचे खोड आणून त्यांच्या हवाली केले. ऑफिसच्या अंगणात होम सुरू झाला. सत्याग्रही वेदमंत्र म्हणू लागले. आमचे ऑफिसच्या खजिन्यावरचे अरब पहारेकरी या चाललेल्या प्रकाराकडे द्वेषाने आणि तिरस्काराने पाहात होते. काही वेडावाकडा प्रकार होऊ नये म्हणून मी सत्याग्रहींच्या समोर खुर्ची टाकून बसलो. इतक्यात उस्मानाबादचे कलेक्टर अमीर अलीखान आणि पोलीस सुपरिंटेंडेंट मिर्जा महंमद अलीबेग उस्मानाबादेहून मोटारींनी आमच्या ऑफिसमध्ये येऊन दाखल झाले. पाहतात तो ऑफिस वेदघोषांनी भरून गेलेले. त्या दोघा अधिकाऱ्यांच्या कपाळाला आठ्या पडल्या. मी त्यांना बाजूला नेऊन सगळी परिस्थिती समजावून सांगितली आणि त्यांना विनंती केली की, " या लोकांना तुम्ही उस्मानाबादला पाठवा. या पाचपन्नास लोकांना मी कुठल्या तुरुंगात ठेवू ? ऑफिसमध्ये यांना उघड्यावर फिरू द्यावे लागते. यांच्या खाण्यापिण्याची सोय केली की आपल्याकडे माझ्या विरुद्ध निनावी अर्ज येतात." माझे म्हणणे कलेक्टरांना पटले. पुढे एक आठवड्याच्या आत आर्यसमाजियांना परंड्याहून हलविण्यात आले आणि मी निश्चिंत झालो.

या लढ्यात हैदराबाद राज्यभर आर्यसमाजियांनी जो निकराचा आणि निर्धाराचा संग्राम केला त्याला तोड नाही किती तरी सत्याग्रह्यांवर तुरुंगात भीषण हल्ले झाले. उस्मानाबादच्या तुरुंगात असा प्रकार घडला. इतर गुन्हेगार कैद्यांकडून आर्यसमाजियांना मारहाण करविण्यात आली. काय कारण तर म्हणे आर्यसमाजियांच्या घोषणांमुळे इतर कैद्यांचा क्षोभ झाला. मारहाण संपल्यानंतर कलेक्टर अमीर अली तुरुंगात जाऊन सत्याग्रह्यांबद्दल सहानुभूती दाखवू लागले. परंडा तालुक्यात घुसू पाहणाऱ्या सत्याग्रह्यांच्या एका जथ्थ्यावर असाच निर्घृण हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात अनेक लोक जखमी झाले. निजाम सरकारने या सत्याग्रहासंबंधी बरेच उसने अवसान आणले होते. पण ते आतून हादरून गेले होते ह्यात शंका नाही. आर्यसमाजियांच्या धाडसाच्या अनेक गोष्टींना पुढे अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टींचे स्वरूप प्राप्त झाले. इतके लोकांना त्यांचे कौतुक वाटू लागले. पुढे दिलेली गोष्ट अशाच प्रकारची आहे.

उदगीरचे एक सुप्रसिद्ध आर्यसमाजी भीदरच्या तुरुंगात होते. तेथे ते अतिशय आजारी पडले. त्यातच त्यांचा अंत झाला. जनतेत संशय असा की त्यांच्यावर विषप्रयोग झाला. जेलचे अधिकारी पुढाऱ्याचे प्रेत नातेवाइकांच्या ताब्यात देण्यास नाखूष होते. प्रेत मिळविण्यासाठी आर्यसमाजियांनी एक युक्ती केली. एक आर्यसमाजाचा कार्यकर्ता वेष बदलून आणि मौलवी बनून भीदरच्या जुम्मा मशिदीत राहात होता. कित्येक महिने भीदरच्या मुसलमानांना त्याचा संशय आला नाही. आपला पुढारी तुरुंगात मरण पावला हे कळताच तो भीदर सोडून निघाला. तेथून १५–२० मैलांवर असलेल्या एका गावी पोहोचून त्याने तेथून भीदरचे कलेक्टर राजा धर्मकर्ण बहाद्दूर यांच्या नावाने तार पाठविली की पुढाऱ्याचे प्रेत नातेवाइकांच्या हवाली करण्यात यावे. तार पाठविणारे हैदराबाद राज्याचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस आहेत असे भासविण्यात आले. राजा धर्मकर्ण यांचे इंग्रजीचे ज्ञान यथातथाच होते. निदान ही तार कोठून आली आणि कोणी पाठविली याची तरी त्यांनी चौकशी करावी. त्यांनी घाईघाईने हुकूम दिला की प्रेत नातेवाइकांना देण्यात यावे. आर्यसमाजी तुरुंगात बाहेर जमलेच होते. त्यांनी प्रेत ताब्यात घेतले. आणि ते मोटारीत घालून लगेच सोलापूरची वाट धरली. तिकडे कलेक्टरनी हैदराबादला तार पाठवून इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांना कळविले की आपल्या आज्ञेप्रमाणे प्रेत नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आम्ही अशी तार पाठविलीच नव्हती असा खुलासा पोलीसखात्याकडून आला. कलेक्टर घाबरले. त्यांनी लगेच आर्यसमाजियांच्या पाठलागावर पोलीस जीप पाठविली. भीदर ते सोलापूरपर्यंत निजाम सरकारचे पोलीस आर्यसमाजियांची गाडी पकडण्याची धडपड करीत होते. पण त्यांना यश आले नाही. पुढाऱ्याचे प्रेत सोलापूरला आणण्यात आले. तेथे वैद्यकीय तपासणी (पोस्ट मार्टम) झाली. डॉक्टरांनी आपले मत दिले की, मृत्यू विषप्रयोगाने ओढवला असावा. दुसऱ्या दिवशी हिंदुस्थानभरच्या वर्तमानपत्रांत आर्यसमाजियांनी बातमी प्रसिद्ध केली की निजामसरकारने आर्यसमाजी पुढाऱ्यावर विषप्रयोग करून त्याला ठार मारले. वस्तुस्थिती काय होती हे परमेश्वर जाणे. पण ह्या बातमीने निजाम सरकारची देशभर नालस्ती झाली. या बातमीचा इन्कार करण्याची निजाम सरकारने शिकस्त केली पण तीत त्यांना यश आले नाही.

आर्यसमाजियांच्या निजामविरोधी प्रचाराचे आणखी एक उदाहरण देण्यासारखे आहे. इस्लाम धर्मामधील पद्धत अशी की परधर्मीय माणसाशी (ज्यू आणि ख्रिस्ती सोडून कारण त्यांना अहले किताब म्हणजे अपौरुषेय अशा ग्रंथांवर विश्वास ठेवणारे व मुसलमानांना जवळ असे मानण्यात येते) मुसलमानांनी

लग्न लावायचे ठरविले तर त्या पुरुषाला अगर स्त्रीला प्रथम इस्लाम धर्माची दीक्षा घ्यावी लागते. त्याशिवाय लग्न कायदेशीर झाले असे समजत नाहीत. समजा, एका विवाहित हिंदू स्त्रीला एका मुसलमानाने पळविली आणि तिचे धर्मांतर न करता तिच्याशी निका लावला तर ते लग्न कोर्टात कायदेशीर ठरत नाही. यासाठी उपाय असा की विवाहित स्त्रीकडून तिच्या हिंदू नवऱ्याला नोटीस पाठविण्यात येते ती अशा प्रकारची– “ मी स्वखुशीने इस्लाम धर्माची दीक्षा घेतली आहे. आपले पती-पत्नी हे संबंध चालू राहावे असे तुम्हांला वाटत असेल तर तुम्हीही मुसलमान व्हावे. ठराविक मुदतीत तुम्ही ह्या गोष्टीला कबूल न झाल्यास तुमचे माझे पति-पत्नीचे संबंध राहणार नाहीत. आणि मी कुणाशीही निका लावण्यास मोकळी आहे. ” अशा प्रकारच्या नोटिसा काजीही पाठवू शकत. शंभर वर्षांपूर्वी काजी हे सरकारी नोकर असून, त्यांच्याकडे न्यायनिवाड्याचे काम असे. पुढे हे काम त्यांच्याकडून काढून घेण्यात आले. त्यांना पूर्वीची वतने आणि वृत्ती ह्या चालू ठेवण्यात आल्या. मुसलमानांतील लग्नाची नोंदणी करणे एवढेच काम त्यांच्याकडे राहिले. पण त्यांना कोणी सरकारी नोकर समजत नसत. त्यांनी केलेल्या लग्नाच्या नोंदण्या मात्र अधिकृत समजण्यात येत.

अहमदपूर (उस्मानाबाद जिल्हा) तालुक्यात एका विवाहित हिंदू स्त्रीने कुण्या मुसलमानाच्या नादी लागून इस्लाम धर्माची दीक्षा घेतली त्याच्याशी निका लावावा म्हणून तिला काजीसमोर नेण्यात आले. विवाहित हिंदू पतीला काजीने नोटीस पाठविण्यास हवी होती ती अशी– “ अमक्या अमक्या बाईने इस्लाम धर्माची दीक्षा घेतली असून तिला अमक्या अमक्या मुसलमान माणसाशी विवाह करावयाचा आहे. तुम्ही तिचे पूर्वाश्रमीचे हिंदू पती आहात ते जुने पतिपत्नीचे असे तुमचे संबंध चालू ठेवावयाचे असल्यास तुम्ही अमक्या अमक्या मुदतीत इस्लाम धर्माचा स्वीकार करावा. तसे करणे नसल्यास तुमचे पतिपत्नीचे संबंध संपले असे समजण्यात येऊन त्या बाईचा निका तिने ठरविलेल्या माणसाबरोबर लावण्यात येईल. ” असे न करता त्या मूर्ख काजीने नोटीस पाठविली की, “ अमक्या अमक्या मुदतीच्या आत तुम्ही मुसलमान व्हा नाहीतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. ” काजीचा शिक्का असलेली ही नोटीस आर्यसमाजियांच्या हाती लागली. त्यांनी नोटिशीच्या फोटोप्रती काढून घेतल्या. दुसऱ्या दिवशी अनेक वर्तमानपत्रातून नोटिशीच्या प्रतीसहित बातम्या प्रसिद्ध झाल्या की, “ निजाम सरकार धर्मांतराबद्दल हिंदू प्रजेवर जबरदस्ती करीत आहे. वास्तविक पाहता निजाम सरकारच्या धोरणात धर्मांतराची मोहीम कधीच नव्हती; पण नोटिशीच्या वर्तमानपत्रांतील प्रसारामुळे निजामसरकारची भयंकर

नाचक्की झाली.

काही तडजोड होऊन आर्यसमाजाचा लढा संपला. पण या लढ्यानंतर हिंदूंच्या मनावरचा भीतीचा पगडा हळू हळू कमी होऊ लागला. त्या दृष्टीने १९३८ हे वर्ष हैदराबादच्या इतिहासात निर्णायक असे म्हणता येईल.

१९३९ च्या एकोणीस आक्टोबरला माझी मुलगी अलकनंदा हिचा जन्म झाला. माझा 'उषा' हा लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर मला आपली आणखी काही पुस्तके प्रसिद्ध व्हावी असे वाटू लागले. मराठवाड्यातील कवींच्या काव्य-ग्रंथांचे परीक्षण मी निजामविजयात करीत होतो. ती लेखमाला पुस्तकरूपाने छापून काढण्याची विनंती मी आंबेकरांना केली. १९३९ च्या एप्रिल महिन्यात माझे दुसरे पुस्तक "मराठवाड्यातील आधुनिक कविता" हे बाहेर आले. या पुस्तकात मी मराठवाड्यातील कोरेकल, दत्तकिंकर, पद्माकर, महाजन, गाडगीळ, दीक्षित, नांदापूरकर, मनाठकर, मुकुंद, पार्थिव, पोहनेरकर, कृष्णकुमार आणि कांत या तेरा कवींच्या काव्याचे परीक्षण केले आहे. माझ्या या पुस्तकामुळे मराठवाड्यातील काव्याचा पश्चिम महाराष्ट्राला प्रथम परिचय झाला. या पुस्त-काच्या मी दीडशे प्रती काढल्या. त्याचा खर्च दीडएकशे रुपये आला असावा. माझ्या पुस्तकावर साहित्यपत्रिका, ज्ञानप्रकाश आणि इतर काही नियतकालिकांतून चांगले अभिप्राय आले.

परंड्यात वाङ्मयप्रेमी मंडळी बरीच होती. मराठवाड्यातील सुप्रसिद्ध कवी दुर्गादयाळ चंडीप्रसाद दीक्षित हे परंड्याचे. राष्ट्रभक्तिपर अशा त्यांच्या कविता मराठवाड्यात लोकप्रिय झाल्या होत्या.

"प्रिय हिंदभूसुत केसरी रदनावली नखहीन ते
बघुनी तया डिवचू नको सटवे अगे परतंत्रते
नरसिंह जागृत जाहले नवचेतना स्फुरली मनी
सविता दिसे अरुणाच ी विलया निशातम जाउनी"

किंवा 'आडरानांतील फुलांची मागणी' या कवितेत

"स्वायत्तता प्राप्त व्हाया स्वदेशा असे यत्न ज्याचा सदासर्वदा
पायी पडो शृंखला फास लागो गळ्याते तरी जो न भीतो कदा
कारागृहातून येता सुटोनी मला टाक मार्गावरी नेउनी
त्याच्या पदींच्या रजस्पर्शनाने मला प्राप्त होईल मुक्ती क्षणी"

किंवा

"विजयिनी दशमीदिनि येतसे
भगवती तव स्वागत राजसे

सुयश भेरि निनादित हा ध्वनी
पडतसे श्रवणी मम येउनी
अभिजये, विजये, जयदायिनी
द्रुतविलंबित ये रणरागिणी "

दीक्षित, त्यांचे बंधू केरूमहाराज इत्यादींशी माझा परिचय झाला. माझे मित्र गोपीनाथपंत माढेकर वकील, लक्ष्मणराव मुगावकर वकील, हातोळेकर वकील, भाऊसाहेब जकातदार, मोतीचंद, बापूसाहेब आणि नानासाहेब देशमुख इत्यादी मंडळी माझ्या लहानपणापासून मला परिचित होती. त्यांच्या सहकार्याने मी परंड्याला एक वाचनालय सुरू केले. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध संत हंसराजस्वामी यांची समाधी परंडा येथे आहे. स्वामींचा वार्षिक उत्सव मोठ्या थाटाने होत असतो. त्यांचे नाव मी वाचनालयाला दिले. हंस वाचनालयाला मी बरीच पुस्तके मिळवून दिली. या निमित्ताने माझे मराठी वाचन बरेच झाले.

त्या मानाने माझे इंग्रजी वाचन बरेच कमी झाले. बर्नार्ड शॉची समग्र नाटके मी वाचून काढली. ती डिसेंबर १९३९ मध्ये. स्विनर्टनचे ब्लड ऑफ डफलिंग्स, ग्यांबर्सचे आयडियल म्यारेज, लाइट ऑन मॉस्को, मोसोररचे जर्मनी, एडगर वालेसचे स्ट्रेंज कौंटेस, सुप्रसिद्ध नर्तकी इसादोरा डंकन हिचे आत्मचरित्र अशी पुस्तके वाचल्याचे आठवते.

हंसराज स्वामींच्या मठात पुण्यतिथीचा वार्षिक उत्सव होत असे. हंसराज स्वामींनी अनेक धर्मग्रंथ लिहिले आहेत. वेदेश्वरी, सदाचार, लघुवाक्यवृत्ति, वेद नावाची पदे, ईशोपनिषदावरील टीका, आगम सार हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मी हंस मंडळ ही संस्था स्थापन करून हंसराजांचे काही ग्रंथ छापण्याची व्यवस्था करविली. त्याप्रमाणे स्वामींचे दोन तीन ग्रंथ हंसमंळडाने प्रसिद्ध केले.

परंड्याला नाथभुजंग या कवीची समाधी आहे. हा एकशे चाळीस वर्षांपूर्वी होऊन गेला. त्याने अनेक पदे लिहिली आहेत. त्याची एक कविता "तोम तनन वाजवि वेणू" ही महाराष्ट्रात चांगलीच प्रसिद्ध आहे. हैदराबादेतील अमीरउमरावांना जंग, दौला, मुल्क इत्यादी पदव्या असत. यावर टिंगल उडविताना नाथभुजंगाने म्हटले आहे,

मुजफ्फर जंग, सलाबत जंग, हश्मत जंग,
सबके उपर बैठा है यम टोलेजंग

मी नाथभुजंगाच्या अनेक कविता गोळा केल्या. पण या ना त्या कारणामुळे त्यांच्या प्रसिद्धीचा योग झाला नाही.

माझ्या या चळवळी स्थानिक मुसलमानांना पसंत पडेनात. मराठी वाचनालय

हे त्यांना कसे सहन व्हावे ! मी वाचनालयाचा चांगला बोर्ड तयार करून घेतला होता. पण रोज रात्री त्याच्यावर दगडफेक होऊ लागली. पोलिसांना गुन्हेगार सापडेनात. थोड्याच दिवसांत बोर्डाचे तुकडे तुकडे झाले. स्थानिक पोलिसांचा माझ्यावर राग होता. त्यांच्याच चिथावणीने या गोष्टी होत. १९४० मध्ये परंड्याहून माझी बदली झाल्यावर पोलिसांनी वाचनालयाची वासलात लावली. पोलिस सब–इन्स्पेक्टरने वाचनालयाच्या इमारतीत घोडे बांधले. वाचनालयाच्या इमारतीचे घोड्याच्या तबेल्यात रूपांतर. पण त्या काळच्या हैद्राबाद राज्यात या गोष्टी सर्रास घडत.

मी परंड्याला आल्यावर घरकामासाठी एक स्वयंपाकी ठेवला. त्याचे नाव अंबादासराव. हा उस्मानाबादच्या देशपांडे घराण्यापैकी होता. त्याची हकीकत विलक्षण होती. अंबादासराव हा परंडा तालुक्यात मशिदीचे चिंचपूर येथे शाळा-मास्तर होता. तेथे काम करीत असताना त्या गावची एक विधवा ब्राह्मणबाई द्वारकाबाई हिच्याशी त्याचा संबंध आला. या गोष्टीचा त्या गावात बभ्रा होऊन अंबादासराव आणि द्वारकाबाई यांना गाव सोडावे लागले. अंबादासरावची नोकरी गेली. द्वारकाबाईला दिवस गेले होते. तिच्या मालकीची काही जमीन होती. ती विकून तिच्या पैशाने संसार चालवावा असे त्या जोडप्याने ठरविले. गावच्या पाटलाने दोन हजार रुपयाला ती जमीन विकत घेण्याची तयारी दाखविली. जमीनविक्रीची रजिष्टरी करण्यासाठी अंबादासराव, द्वारकाबाई आणि गावचा पाटील असे तिघेजण परंड्याला आले. रजिस्ट्रारच्या समोर पाटलाने दोन हजार रुपये द्वारकाबाईच्या हवाली केले. जमिनीची रजिस्टरी पाटलाच्या नावाने झाली. ऑफिसमधून बाहेर निघाल्यावर पाटलाने द्वारकाबाईला म्हटले, "हे दोन हजार रुपये कसे सांभाळणार. ते माझ्याजवळ द्या." गावी गेल्यावर ते मी तुम्हांला परत करीन. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून द्वारकाबाईने दोन हजार रुपये त्याच्या हवाली केले. चिंचपूरला पोहोचल्यावर तिने आपले रुपये परत मागितले. तसा तो पाटील तिच्यावर उलटला. तो अंबादासराव आणि द्वारकाबाई यांना म्हणाला, "कसले पैसे ? चला; निघा. या गावातून व्यभिचार करून गावात गोंधळ माजविता काय, आणि याद राखा. पुन्हा या गावात पाय ठेवला तर तंगडी तोडून टाकीन." असे म्हणून त्याने त्या दोघांना गावाबाहेर हाकलून लावले. या जोडप्याला आकाश फाटल्यासारखे झाले. द्वारकाबाईच्या बाळंत-पणाचे दिवस जवळ आले होते. ते कुठे करावे हे त्यांना समजेना. त्यांना कोठेच थारा मिळेना. शेवटी एका धनगराच्या झोपडीत द्वारकाबाई बाळंतीण होऊन तिला मुलगा झाला. त्याचे नाव राम ठेवण्यात आले.

माझ्या पूर्वीचे परंड्याचे तहसीलदार गोविंदराव कायमखाने यांच्याकडे अंबादासराव स्वयंपाकी म्हणून लागला. त्यांची बदली झाल्यावर तो माझ्याकडे राहिला. गावात त्याने एक खोली घेतली होती. द्वारकाबाईला पुन्हा दिवस गेले होते. पण अंबादासरावला काळजी ही की, द्वारकाबाई ही एक दुराचारी स्त्री समजून तिच्याशी संबंध वाढविण्याचा प्रयत्न गावातील काही रंगेल लोक करू पाहात होते. ही सगळी परिस्थिती लक्षात येताच मी उषाचा सल्ला घेतला आणि दोघांना आमच्या घरी ठेवून घेतले. लग्नाशिवाय ते नांदत होते. पुढे मुलांना समाजात स्थान राहणार नाही या कल्पनेने मी विव्हल झालो. मी विचार केला, त्यांचा रीतसर पुनर्विवाह लावून द्यावा. हैदराबादचे प्रसिद्ध पुढारी न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांच्या प्रयत्नाने हैदराबाद राज्यात पुनर्विवाहाचा कायदा पास झाला होता. पण असे विवाह घडवून आणणाऱ्या संस्था जिल्ह्यातून स्थापन झाल्या नव्हत्या. पुण्याच्या पुनर्विवाह मंडळातर्फे हा विवाह घडवून आणावा म्हणून मी मंडळाशी पत्रव्यवहार केला. तिकडून अनुकूल उत्तर आल्यानंतर मी उषाला पुण्याला पाठविले. डेक्कन जिमखान्यावर पुनर्विवाह मंडळाचे ऑफिस होते. तेथे अंबादासराव आणि द्वारकाबाई यांचा पुनर्विवाह साजरा झाला. पुढे दोन महिन्यांनी त्यांची मुलगी प्रियंवदा उर्फ पमा हिचा जन्म झाला. ते कुटुंब पुढे सातआठ वर्षे आमच्या नोकरीत होते. अंबादासराव आणि द्वारकाबाई काही वर्षांपूर्वी वारली. त्यांचा मुलगा राम हा हैदराबादला पोलीस खात्यात नोकर असून त्याचे लग्न झाले आहे. प्रियंवदा उर्फ पमा हिचे लग्न विजापूर जिल्ह्यात झाले असून तीही सुखाने संसार करीत आहे.

तुळजापूरची अंबाबाई आणि तिरुपतीचा व्यंकटेश ही आमची कुलदैवते. लग्नानंतर त्यांचे दर्शन घेण्याची आमच्या घराण्यात परंपरा आहे. तुळजापूर तालुका हा परंडा तालुक्याला लागून आहे. माझी मुलगी अलकनंदा तीनचार महिन्यांची असताना आम्हांला तुळजापूरला जाण्याचा योग आला. बरोबर आईवडील होते. आम्ही सगळा प्रवास बैलगाडीने केला. तुळजापूरला मी यापूर्वी अनेक वेळा गेलो होतो. माझा धाकटा भाऊ गुरुमध्व याची मुंज तुळजापूरलाच झाली होती. या खेपेस तुळजापूरचे साहित्यिक दत्तात्रय माधव कुलकर्णी (तुळजापूर वर्णन या ग्रंथाचे लेखक) आणि पेशवे वकील (तामीळ वेद आणि कुसलकाव्य या ग्रंथांचे अनुवादक) यांचा परिचय झाला. तुळजापूरला आमचे उपाध्ये यांच्या येथे माझे आजोबा शेषगीरराव यांचे हस्ताक्षर मला पाहण्यास मिळाले. यात्रा आटोपून मी पंधरा फेब्रुवारी १९३९ ला परंड्याला परत आलो.

परंड्याचे प्रतिष्ठित गृहस्थ बापूसाहेब देशमुख यांचे चिरंजीव अप्पासाहेब आणि नानासाहेब हे माझे लहानपणापासून परिचयाचे. नानासाहेब हे पट्टीचे गवई होते. त्यांचे वडील बापूसाहेब यांना तबला वाजविण्याचा नाद होता. परंड्याचे मेडिकल ऑफिसर दामोदर बाळकृष्ण कुलकर्णी हे कोल्हापूरचे. तेही मोठे रसिक होते. नानासाहेबांच्या गाण्याच्या मैफिली मी दहा–बारा वेळा तरी ऐकल्या असतील. त्यांच्यामुळे निरनिराळ्या रागदाऱ्यांची मला चांगलीच माहिती झाली. त्यांनी म्हटलेली अनेक गाणी पुढे मी परंड्याहून गेल्यावरही माझ्या आठवणीत तरंगत राहिली. त्यांनी गायिलेले एक भावगीत ‘ ही नार रूपसुंदरी, सदा हासरी, लाजरी नजर, होईल कुणाची हिला पाहता नजर ’ आज इतकी वर्षे झाली तरी माझ्या आठवणीत आहे.

निजाम राज्यात मुसलमानांच्या दंडेलीची अनेक उदाहरणे घडत. ती अनुभवून किंवा ऐकून माझी मनःस्थिती क्षुब्ध होत असे. परंड्याला माझ्या ताब्यात असलेल्या तुरुंगात पोलिसांनी एक जोडपे आणले. पुरुष होता मुसलमान आणि स्त्री होती मराठी. मुगाव नावाच्या गावची राहणारी. तिला एका मुसलमानाने फूस लावून गावातून पळविली. तिच्या अंगावर दागिनेही बरेच असावे. पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली. दोन-तीन महिन्यांनी त्यांना पकडण्यात आले. परंड्याच्या मुन्सफसमोर खटला चालू झाला. तुरुंगाची देखरेख माझ्याकडे असे. एका खोलीत ती आणि दुसऱ्या खोलीत तो गुंड असे त्यांना ठेवण्यात आले.

मुलीचे वय सतरापेक्षा अधिक नसावे. ती दिसायला देखणी आणि नाजूक होती. पण ती नेहमी भेदरल्यासारखी वाटे. तो गुंड मात्र बेदरकार दिसत असे. त्या पोरीला पाहून माझ्या पोटात भडभडून आले. त्या गुंडाच्या तावडीतून तिची सुटका झालीच पाहिजे असे मला वाटू लागले.

अशा प्रकरणात स्त्रियांची स्थिती मोठी शोचनीय असे. अशा स्त्रियांनी आपल्या नातेवाइकांना सोडून मुसलमानाच्या आश्रयाला जावे असा प्रयत्न पोलीस आणि न्याय या खात्यांचा खालचा नोकरवर्ग करीत असे. मुलीचे नातेवाईक गुंडांच्या भीतीमुळे तिच्या साहाय्यार्थ जाण्यास धजत नसत. यामुळे ती हताश होऊन आपल्याला पळविणाऱ्या गुंडाच्या घरी तुरुंगात जाऊन पडे.

तुरुंगात असलेल्या या मुलीचे असेच होणार या कल्पनेने मी विव्हल होऊन गेलो. मुलीची आई आणि मामा ही गावात असून मुलीला जामीन होण्यास भीत आहेत असे माझ्या कानावर आले. तुझे नातेवाईक तुला मदत करण्यास तयार नाहीत अशा स्थितीत तू आरोपीबरोबर निका लावून टाक, असे तिला पोलीस खात्यातील माणसे सांगू लागली. या बातम्या माझ्या कानावर आल्या. माझ्या

तळपायाची आग मस्तकाला गेली. मी तुरुंगाचा अधिकारी. माझ्या परवानगी-शिवाय कैद्याशी कोणी बोलू शकत नसे. माझ्या ऑफिसमधले अरब पहारेकरी आणि इतर शिपाई त्या पोरीशी केव्हा बोलू पाहतील याचा नेम नसे.

एक दिवस संध्याकाळी डॉक्टर कुळकर्णी माझ्याकडे आले. थोडा वेळ गप्पा-गोष्टी झाल्यावर आम्ही दोघे फिरायला म्हणून बाहेर पडलो. माझे घर ऑफिसला अगदी लागून होते. आम्ही ऑफिसच्या अंगणात आलो. मी पाहिले तो एक मनुष्य त्या पोरीशी बोलत उभा होता. मी त्याला विचारले, "तू कोण आहेस?" तो म्हणाला, "मी कॉन्स्टेबल आहे." मी म्हटले, "तुझ्या अंगावर युनिफॉर्म का नाही?" तो म्हणाला, "मी यावेळी ड्यूटीवर नाही." मी म्हटले, "मग तू येथे या पोरीशी बोलत का उभा आहेस? माझी परवानगी घेतली होतीस?" तो म्हणाला, "नाही, सहज बोलत उभा होतो." मी चवताळून त्याला म्हटले, "तू ताबडतोब येथून निघून जा." तो मान खाली घालून निघून गेला. मी त्या मुलीला म्हटले, "बाळ, तू माझ्या मुलीसारखी आहेस. तू मुळीच घाबरू नकोस. या माणसाबरोबर तू बोलत जाऊ नकोस." नंतर मी आणि डॉक्टर कुळकर्णी फिरायला गेलो. मी डॉक्टरना म्हटले, "डॉक्टर, मी या हरामखोरांना धडा शिकवीन. पोलीस झाले म्हणून काय झाले."

योगायोग पाहा. त्याच रात्री त्या पोरीला विंचू चावला. मध्यरात्री तिचे रडणे मला ऐकू आले. मी उषाला उठविले. आमच्यापाशी विंचवाचे औषध होते. ते मी त्या मुलीला दिले. ती रडत होती. तिचे समाधान करून मी परत आपल्या खोलीत आलो. माझी लाडकी मुलगी अलकनंदा त्यावेळी चारपाच महिन्यांची होती. ती शांतपणे झोपली होती. मला विचार आला. आज ती मराठा मुलगी आपत्तीत आहे. उद्या माझ्या मुलीवर असाच प्रसंग आला तर? या कल्पनेनेच मी व्याकूळ होऊन गेलो.

दुसऱ्या दिवशी मी पोलीस सब इन्स्पेक्टरला पत्र लिहून कॉन्स्टेबलला कडक शिक्षा करण्याची मागणी केली. मी जिल्ह्याच्या पोलीस सुपरिंटेंडेंटलाही पत्र लिहून झालेली हकीकत कळविली. कलेक्टरलाही मी रिपोर्ट केला. माझ्या या तडकाफडकीच्या कारवाईने पोलीसखाते हादरून गेले. जिल्ह्याचे पोलीस सुपरिंटेंडेंट मिर्जा महंमदअली बेग हे परंड्याला आले. माझ्यासमोरच त्यांनी त्या कॉन्स्टे-बलचा युनिफॉर्म काढून घेतला. त्याला सेवानिवृत्त करण्यात आले.

आमच्या ऑफिसचा एक मुसलमान शिपाई त्या मुलीशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतो असे मला कळले. मी सर्वांना माझ्यासमोर बोलावून घेतले. माझा क्षोभ अनावर झाला होता. ज्याच्यावर माझा संशय होता त्या शिपायाला मी

गर्जून म्हटले, "याद रखो, अगर कोई शख्स (मनुष्य) उस लडकी से बात करनेकी कोशिश (प्रयत्न) किया तो मैं उसकी खाल खींच डालूंगा", ("मी त्याचे चामडे सोलून काढीन") यावर तो शिपाई म्हणतो काय, "शौकसे (आनंदाने)" मी म्हटले "करके बताउंगा."

माझ्या त्वेषामुळे ऑफिसमधले अरब पहारेकरी आणि कारकून शिपाई सगळे हबकून गेले. पुन्हा कोणी त्या पोरीच्या वाटेला गेले नाही.

पुढे एक दोन दिवसांत मी एक दोघा प्रतिष्ठित वकिलांना बोलावून घेतले. मी त्यांना म्हणालो, "ही मुलगी या गुंडाच्या पदरी पडावी असे मला मुळीच वाटत नाही. तुम्ही कसेही करून तिला जामिनावर सोडवा आणि परंड्याहून बाहेर काढा." माझ्या सांगण्यामुळे सर्वांनाच धीर आला. मुलीच्या नातेवाइकांनी जामीन अर्ज दिला. मुलीला जामिनावर सोडण्यात आले. त्याच रात्री तिला परंड्यापासून एकोणीस मैलांवर असलेल्या निंबाळकरांच्या भूम या जहागीर गावी हलविण्यात आले. पोलिसांच्या हातून सावज निसटले. पुढे पुरेसा पुरावा नाही या सबबीवर खटला काढून टाकण्यात आला. त्या मुलीचे लग्न पुढे तिच्या जातीच्याच एका तरुणाशी झाले.

माझ्या सडेसोट वागणुकीमुळे पोलीस, रेव्हेन्यू खात्याचे वरिष्ठ अधिकारी माझ्यावर रुष्ट झाले होते. मीही त्यांची पर्वा करीत नव्हतो. मी आपले काम चोख करीत होतो. मला स्वाभिमान सोडून वागण्याची किंवा मुसलमान अधिकाऱ्यांना भिऊन वागण्याची मुळीच गरज नव्हती.

हैदराबाद राज्यात हिंदूंच्या धार्मिक उत्सवावर अवकळा पसरलेली असे. परवानगीला कटकटी, मुसलमानांकडून उत्सवाला हरकत येईल की काय याबद्दल धास्ती. असे एकंदरीत निरुत्साहाचे वातावरण असे. सरकारच्या धार्मिक खात्याचे हुकूमही मुसलमानांचा पक्षपात करण्याचे असत. असे आचरट हुकूम किती सांगावेत?

समजा, दसऱ्याच्या दिवशी मुसलमानांचा मोहरम आला. मोहरमचे दहा दिवस म्हणजे मुसलमानांचे शोकाचे दिवस. सबब या दिवसांत दसरा आला की हिंदूंनी आपला सण उत्साहाने साजरा करता कामा नये. त्यांनी सोने लुटण्यासाठी मिरवणुकीने जाऊ नये, आणि वाद्ये वाजविणे, घोषणा करणे इत्यादी प्रकार करू नयेत, एक के पीछे एक खामोशीसे जाना, (एकामागून एक असे आवाज न करता जावे.) या हुकुमावरचा साळसूदपणा असा की, हिंदू आपल्या घरात दसऱ्याचा उत्सव करीत असतील तर मुसलमानांनी त्यांच्या वाटेला मुळीच जाता कामा नये. जणू काय हिंदूंना मोठा हक्कच बहाल करण्यात आला होता. सर-

कारच्या हुकुमाची अंमलबजावणी करणारे भेदरट किंवा खुशामतखोर हिंदू अधिकारी थोडेथोडके नव्हते. मागे एकदा राजा इंद्रकर्ण हे गुलबर्ग्याला सुभेदार (रेव्हेन्यू कमिशनर) असताना दसरा मोहरमच्या शेवटच्या दिवशी आला. सुभेदारांनी ठरविले की, त्या वर्षाचा दसरा एकादशीच्या दिवशी साजरा करावा. ठरल्याप्रमाणे सुभेदारांनी दसरा सुतक्याप्रमाणे पाळला आणि एकादशीच्या दिवशी दसऱ्याची मिरवणूक काढली. मुसलमानांनी त्यांची वाहवा करून म्हटले की, राजा इंद्रकर्ण हा खरा धर्मसहिष्णू. एकादशीला दसरा करून त्याने आमच्या भावनांचा आदर केला. हिंदूमुसलमानांच्या प्रेमातून निर्माण झालेली हीच ती आमच्या राज्यातील उदार संस्कृती.

कुणाला आश्चर्य वाटेल. मोहरमनंतर चाळीस दिवस (त्याला चहलम) रस्त्यावरून वाद्ये वाजवीत जाणे बेकायदेशीर असे. प्रत्यक्षात या हुकुमाची अंमलबजावणी खेड्यापाड्यातून क्वचितच होई. पण हिंदूंना त्रास देण्याचे मुसलमानांनी मनात आणले तर असे हुकूम त्यांना फार उपयोगी पडत.

याउलट मुसलमानांचा एखादा सण किंवा एखाद्या फकीराच्या दर्ग्याचा उरूस असला की सगळा सरकारी लवाजमा त्यात गुंतविण्यात येई. सगळे सरकारी अधिकारी मिरवणुकीत भाग घेत. गावात उत्साहाचे वातावरण पसरलेले असे.

परंड्याला दसरा उत्साहाने साजरा व्हावा ही माझी इच्छा. पण गावातील मंडळी पुढाकार घेण्यास मागेपुढे पाहात. त्यामुळे नेहमीप्रमाणे दोन दोन चार चार अशा गटाने लोक दसऱ्याचे सोने लुटण्यासाठी शमी वृक्षाकडे जाऊन आले. मुसलमानांत सणाच्या दुसऱ्या दिवशी परस्परांच्या भेटी-परतभेटीची चाल आहे. तिला ईद मुलाकात म्हणतात. तशी पद्धत आपणही सुरू करावी म्हणून मी एकादशीच्या दिवशी प्रतिष्ठित लोकांच्या भेटीला गेलो. मी बनारसचा दसरा पाहिला होता. उत्तर प्रदेशातील खेड्यांतील दसऱ्याचे उत्सव पाहिले होते. म्हैसूर, बडोदा, ग्वाल्हेर इत्यादी ठिकाणच्या दसऱ्याच्या उत्सवाची वर्णने ऐकली होती. पण हैदराबाद राज्यातील सुतकी दसऱ्याने मी कष्टी झालो.

पायी बेडी, तीवर गावे नाचून
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण
दिवस उगवुनी तेज न दिसले सुमने फुलली न
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण

पुढे लवकरच परंड्याच्या ताजुद्दीनच्या दर्ग्याचा उरूस आला. परंड्याला या उरुसाच्या वेळी दर्ग्याजवळ बाजार भरतो. दर्ग्याला सरकारी इनामे आहेत. मध्ययुगीन महाराष्ट्रात सूफी, संत, अवलिया, धर्मप्रसारक, मुल्ला, मौलवी यांनी

जो धुमाकूळ घातला त्यांपैकीच ताजुद्दीन हे एक होते. धर्मप्रसारार्थ ते परंड्याला आले आणि तेथील काफरांशी लढताना मारले गेले. महाराष्ट्रात त्या काळात अशा अनेक झटापटी झाल्या. पुष्कळ देवळांचे मशिदीत आणि दर्ग्यात रूपांतर झाले. पैठणचे रेणुकादेवीचे मंदिर (आता मौलाना साहेबाचा दर्गा), नांदेड जिल्ह्यातील कंधार येथील शिवमंदिर (आता सुलतान सांगडेचा दर्गा), पुण्याचा शेखसल्लयाचा दर्गा अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. धर्मप्रसाराच्या कामात दंडेली करणारे अनेक मुल्लामौलवी मारले गेले, ते शहीद झाले असे समजण्यात येई. ताजुद्दीनच्या दर्ग्याच्या उरुसाची व्यवस्था निजाम सरकारतर्फे होत असे. उरुसातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कबरीला गंधाचा लेप लावून तिच्यावर गलाफ चढविणे हे होय. त्यापूर्वी गंधाच्या पेटीची मिरवणूक काढण्यात येते. ती तहसीलदाराच्या घरापासून निघे. तहशीलदाराने पेटी डोक्यावर घेऊन दहा पावले चालावे असा शिरस्ता असे.

मी उरुसासंबंधी सरकारतर्फे जी काही व्यवस्था करावयाची ती केली. दर्ग्याच्या ठिकाणी मी तंबू पाठविले, आमच्या स्टाफला, शिपायांना, अरब पहारेकऱ्यांना मिरवणुकीत सामील होण्याची, बंदुका उडविण्याची, दारूकामाची परवानगी दिली. उरुसात साफसफाई ठेवण्यासाठी मी आमचा स्थानिक स्वच्छता स्टाफ पाठविला. पण चंदनाची पेटी डोक्यावर वाहण्याचे मी नाकारले. मी म्हटले, " मी हिंदू मनुष्य, हा मुसलमानांचा धार्मिक उत्सव. पेटी वाहण्याचे काम माझा मुसलमान अव्वल कारकून करील त्याला माझी परवानगी आहे. "

मिरवणुकीच्या दिवशी मुसलमान मंडळी माझ्या घरासमोर जमली. त्यांची इच्छा ही की, मी निदान पेटीला हात लावावा आणि तिच्याबरोबर दहा पावले चालावे. मी घरात होतो. बाहेरच्या मंडळींनी आत निरोप पाठविला. माझ्या सांगण्यावरून शिपायाने बाहेर कळविले की, साहेब आराम करीत आहेत. मिरवणूक चालू द्या असा त्यांनी निरोप सांगितला आहे. निरुपाय होऊन मिरवणूक दर्ग्याकडे निघून गेली.

त्यावेळी माझे वडील माझ्याजवळच होते. ते माझ्या आईला म्हणाले, " अशाने सेतु एक दिवस नोकरी गमावून बसेल. पाण्यात राहून माशांशी वैर कसे करता येईल. " मी त्यांना म्हटले, " हा प्रश्न मुसलमानांनी स्वतःला विचारण्याची वेळ केव्हा ना केव्हातरी येणार आहे. उरुसाची व्यवस्था सरकारतर्फे व्हावी इतकाच हुकूम आहे. अधिकारी हिंदू असला तर उरुसातील धार्मिक कामे तो आपल्या मुसलमान मदतनिसांच्याकडून करून घेईल. हिंदू तहसीलदाराने ताजुद्दीनची पेटी आपल्या डोक्यावर मिरवावी असा कुठे हुकूम नाही. वरिष्ठ

अधिकारी नाराज होतील. ते तर मला सारखे पाण्यात पाहत आहेत." माझे उत्तर ऐकून वडील गप्प झाले. माझ्या वागणुकीचा गवगवा कलेक्टरपर्यंत पोहोचला. पण कायद्याने त्याला काहीच करता येईना. तो गप्प बसला.

तालुक्यात सार्वजनिक कार्यकर्ते नाहीत, पुढारीपण नाही, त्यामुळे वैयक्तिक पातळीवरून मी प्रत्येक लहानमोठी गोष्ट धसास लावू लागलो.

मराठवाड्यात निजाम राजवटीत कोर्ट-कचेऱ्यांतून मराठी अर्ज स्वीकारीत नसत. अर्ज करायचा तो उर्दूतूनच करावा लागे. अर्जदारांचे अर्ज उर्दूतून लिहून देणारा एक वर्ग असे. ते अर्जामागे आठ आणे ते एक रुपया घेऊन उर्दूतून अर्ज लिहून देत. मराठी माणसाला मराठीतून अर्ज करण्यास बंदी असावी ही गोष्ट मला खटकली. यावर मी एक युक्ती केली. परंडा तालुक्याच्या तीन बाजूंनी इंग्रजी इलाखा होता. दक्षिणेकडे बार्शी तालुका. पश्चिमेकडे करमाळा तालुका आणि उत्तरेकडे नगर जिल्ह्याचा जामखेड तालुका, असा इंग्रजी इलाखा होता. परंडा तालुक्यातील बरेच जमीनमालक या तालुक्यांतून राहात. तगाई, शेत-साऱ्याची तहकुबी इत्यादीसंबंधाने त्यांना माझ्याकडे अर्ज करावे लागत. ते असे अर्ज पोस्टाने पाठवीत. मी कलेक्टरना विचारले, "अर्ज पोस्टातून आला आणि तो मराठीत असला तर काय करावे. अर्ज मराठीत आहे म्हणून नाकारावा तर अर्जातील मजकूर शेतसारा, तगाई, वारसा इत्यादी त्यांत असल्यामुळे त्याची दखल घेणे भाग आहे. तर असे अर्ज स्वीकारण्याची परवानगी असावी." माझा खरा हेतू मराठीला तालुका कचेऱ्यांतून प्रवेश मिळवावा हा होता. तो कलेक्टरच्या लक्षात आला नाही. त्याने पोस्टातून आलेले मराठी अर्ज स्वीकारण्याची परवानगी दिली. मात्र त्याबरोबरच एक सूचना केली की, मराठी अर्ज घ्यावा पण त्याचा उर्दू अनुवादही फायलीत लावून ठेवावा. मला ते पत्र म्हणजे पडत्या फळाची आज्ञा वाटली. अर्जदारांना मी सांगू लागलो– "तुम्ही माझ्या टेबलावर अर्ज आणून देता. त्याऐवजी अर्ज मराठीत लिहा आणि ऑफिसच्या समोर पोस्टाचा डबा आहे त्यात टाकून द्या." माझ्या सांगण्याचा हळूहळू परिणाम होऊ लागला आणि काही दिवसांनी माझ्याकडे मराठीतून अर्ज येऊ लागले. एखादा चौकस आणि सावध सार्वजनिक कार्यकर्ता असता तर अशा लहानसहान गोष्टींचा अभ्यास करून जनतेत जागृती निर्माण करू शकला असता.

एकदा मला मनिऑर्डर करावयाची होती. मी मराठीत मनिऑर्डर फार्म लिहिला आणि पोस्टात पाठविला. पोस्टमास्तरांनी सांगून पाठविले की, आपण फॉर्म उर्दूतून लिहून पाठविलेत तर बरे होईल. मी पोस्टल गाईड [त्याला

रहनुमाय टप्पाखाना म्हणत] मागविले. त्यात लिहिले होते, ' मनिऑर्डरींचा फॉर्म इंग्रजी, उर्दू अगर त्या प्रदेशातील प्रचलित भाषेतून लिहून पाठविता येईल.' परंडा तालुका मराठवाड्यात असल्यामुळे तेथील भाषा मराठी होती. मी पोस्ट-मास्तरना कळविले–" मी मराठीतून केलेली मनिऑर्डर तुम्ही नियमाप्रमाणे स्वीकारायला हवी. तुमचा काही आक्षेप असेल तर लेखी कळवावे म्हणजे मी तुमच्या वरिष्ठांपाशी कारवाई करीन." पोस्टमास्तरांनी मुकाट्याने मनिऑर्डर घेतली.

परंड्याचा किल्ला ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. काही काळ परंडा हे अहमदनगरच्या निजामशहाचे राजधानीचे गाव होते. मोगल काळात परंडा हे सरकार म्हणजे जिल्ह्याचे ठिकाण होते. किल्ला उत्तम स्थितीत असून आत चांगल्या इमारती आहेत.

परंडा तालुक्यात जुन्या मूर्ती आणि इतर प्रेक्षणीय वस्तू आढळत. मी त्यांना किल्ल्यात हलवून एक पदार्थसंग्रहालय स्थापन केले, किल्ल्याचा इतिहास मराठी आणि उर्दू या भाषांतून लिहून त्याचा एक मोठा फलक मी किल्ल्यातील एका द्वाराजवळ लावला. मराठी मजकूर वर आणि उर्दू मजकूर खाली होता. माझ्याविरुद्ध मुसलमानांनी ओरड काय करावी. तहसीलदारसाहेबांनी किल्ल्यातील मशिदीच्या मागे एक मंदिर उभे (पदार्थसंग्रहालय) केले आहे. फलकावरचा मराठी मजकूर वरच्या ठिकाणी आणि उर्दू मजकूर त्यांनी खाली लावला आहे. हा उर्दूचा अपमान आहे. मी कलेक्टरांना पदार्थसंग्रहालय दाखवून त्यांची खात्री करून दिली. फलकावरील मराठी मजकुरासंबंधी मी त्यांना म्हटले, " अहो, मराठी मजकूर मी वर दाखवला आहे, तो वाचण्यासाठी मान उंच करावी लागते. उलट उर्दू मजकूर खाली लिहिल्यामुळे तो सहज वाचता येतो."

हैदराबाद राज्यात केसरीला बंदी होती. मी १९३४ पासून ज्ञानप्रकाशचा वर्गणीदार होतो. बंदी करण्यात आलेल्या पुस्तकांची आणि नियतकालिकांची यादी सरकारतर्फे कस्टम खात्याला (त्याला करोडगिरी म्हणत) आणि पोलीस खात्याला देण्यात येई. बंदी उठविली असल्यास या दोन्ही खात्यांतील खालच्या अधिकाऱ्यांना तशा अर्थाचे सर्क्युलर पाठविण्यात येत असे. ज्ञानप्रकाशवर इ. स. १९३० च्या सुमारास बंदी घालण्यात आली होती. न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांच्या प्रयत्नाने सहा महिन्यांतच ती उठविण्यात आली. पण तशा अर्थाचे सर्क्युलर कस्टम खात्याकडे पाठविण्यात आले नाही. त्यामुळे कस्टम खात्याकडे असलेल्या यादीत ज्ञानप्रकाशचे नाव बंदी केलेले दैनिक म्हणून चालू राहिले.

परंड्याचे कस्टमचे सबइन्स्पेक्टर नारायणराव हे माझे बालपणाचे स्नेही.

त्यांनी मला कळविले की, तुम्ही ज्ञानप्रकाश मागविता. त्याला बंदी आहे हे तुम्हांला माहीत नाही काय ? मी त्यांना सांगितले, " काँग्रेस पुढारी काशिनाथराव वैद्य (हे पुढे हैदराबाद कायदेमंडळाचे सभापती झाले) यांनी न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांचे चरित्र लिहिले आहे. त्यात बंदी उठविल्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. तुमच्या खात्याकडून अशा अर्थाचे सर्क्युलर (सर्क्युलरला उर्दूत गश्ती, गस्त करणारे म्हणत) निघायला हवे होते. तुम्ही चौकशी करा. मीही चौकशी करतो."

मी काशिनाथराव वैद्यांना पत्र लिहून विचारले की, केशवरावजींच्या चरित्रात तुम्ही ज्ञानप्रकाशवरील बंदी उठविल्याचा उल्लेख केला आहे. त्याचा काही तपशील देऊ शकत असला तर मला हवा आहे. त्यांनी काहीच उत्तर पाठविले नाही. मी ज्ञानप्रकाशकडे चौकशी केली. आमच्यापाशी यासंबंधी काही माहिती नाही असे संपादकांकडून कळविण्यात आले. मी कलेक्टरांना लिहिले, त्यांच्याकडून उत्तर आले की, तुम्ही अशा संशयास्पद वर्तमानपत्राशी संबंध ठेवणे हेच मुळी गैर आहे. तुम्ही इतःपर या भानगडीत पडू नये. अशा पत्राने मी थोडाच गप्प बसणार. पोलीस खात्यातर्फे स्वतंत्र असे आठवड्याचे गॅझेट निघत असे. त्यात बंदी काढून घेतल्याचा हुकूम सापडावा अशी माझी अटकळ होती. मी खाजगी रीतीने पोलीसच्या जिल्हा ऑफिसचे जुने दप्तर तपासायला लावले. ग्याझेटचे जुने अंक चाळता चाळता ज्ञानप्रकाशवरील बंदी उठल्याचा हुकूम मला सापडला. मी त्याची प्रत तयार करून घेऊन कस्टम खात्याला कळविले की १९३० मध्ये ज्ञानप्रकाशवरील बंदी उठली असताना तुमच्या खात्यातील अधिकारी माझ्याकडे येणारा ज्ञानप्रकाश मला मिळू देत नाहीत हा काय प्रकार आहे ? माझ्या पत्राने कस्टमखाते खडबडून जागे झाले. त्यांनी सरकारी हुकूम शोधून काढला आणि त्याप्रमाणे आपल्या खालच्या अधिकाऱ्यांकडे सर्क्युलर पाठविले. मध्यंतरी पोस्टमास्तरांनी माझ्याकडे येणारे ज्ञानप्रकाशचे अंक आपल्याकडे थांबवून ठेवले होते. मी चौकशी केली तेव्हा त्यांनी सांगितले की, आमच्याकडे ज्ञानप्रकाश आलाच नाही. नंतर त्यांनी दहाबारा अंक एकदम माझ्याकडे पाठवून दिले. त्यांच्यावर पोस्टाचे दोन दोन छाप पडले होते. त्यांवरील तारखांत एक एक आठवड्याचे अंतर होते. माझे टपाल पोस्टखात्याने अडकवून ठेवले होते हे त्यावरून सिद्ध झाले. मी लगेच पोस्टखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ज्ञानप्रकाशच्या पोस्टाचे कव्हर्स पाठवून पोस्टमास्तर विरुद्ध तक्रार केली. तिची चौकशी होऊन पोस्टमास्तरला चांगल्या कानपिचक्या बसल्या.

पोस्ट आणि पोलीस ही दोन खाती माझ्याविरुद्ध झाली होती. पोलीसची

माणसे तर माझ्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवून असत. सत्याग्रह्यांनी मला पत्र लिहून माझ्याकडे मदतीची याचना केली असे दाखविण्यासाठी त्यांनी एक बना-वट पत्र माझ्याकडे पाठविले. अर्थात ते मीं ताबडतोब परत केले. उषाने गावा-तील महिलांना जमवून हळदीकुंकवाचा समारंभ केला. त्याचाही रिपोर्ट पोलीसखात्याने केला. नेहमीप्रमाणे मी आमच्या घरी गणेशोत्सव मोठ्या थाटाने करी. उषाने गावातील मुलींना हाताशी धरून त्या वर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. त्यात तिने स्वतः भिकारिणीची भूमिका केली होती. कार्यक्रमाला मी फक्त हिंदूंना बोलाविले होते. घराबाहेर बरेच मुसलमान जमले होते. मी त्यांना आत येऊ दिले नाही. हा आमच्या घरातला खाजगी कार्यक्रम होता. पण या गोष्टीचा गवगवा बराच झाला. पोलिसांनी या गोष्टीचाही रिपोर्ट केला. कलेक्टर अमीर अलीखान हाही परंड्याला येऊन गेला. पण माझ्या घरच्या गणेशोत्सवाबद्दल मला उघड विचारण्याचे त्याला धैर्य झाले नाही.

पोलीसखाते आपल्या पाइटावर आहे याची मला जाणीव होती. मीही सावध-पणे वागत होतो. एकदा मिर्जा महंमद अलीबेग सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस याने मला बोलण्यात पेचात धरण्याचा प्रयत्न केला. सत्याग्रहासंबंधी आमचे बोलणे चालले होते. त्यावेळी मिर्जा महंमद अलीबेग धूर्तपणे काय म्हणतो, हे सत्याग्रही असे सरकारविरोधी. पण कुणी सांगावे आपण नोकरीत नसतो तर आपणही तसेच वागलो असतो. नाही का ? मी त्याच्या बोलण्याचा रोख ओळखला. मी म्हटले, " हे पहा मिर्जासाहेब, मी या जर–तरच्या गोष्टी जाणत नाही. मी निजाम सरकारचे मीठ खात आहे. मी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावीत आहे. मला इतर गोष्टींशी काय कर्तव्य आहे ? " सुपरिंटेंडेंट गप्प झाला. सामान्य नागरिकांना सतावण्याची एकही संधी हे पोलीस दवडीत नसत. सत्याग्रह आणि एकंदरीत निजामविरोधी वातावरण यांमुळे बाहेरून येणाऱ्या लोकांवर पोलिसांची कडक नजर असे, पण त्यांचा जाबसाल करताना ते ताळतंत्र सोडीत. परंड्याचे प्रतिष्ठित नागरिक रोडे देशमुख यांचा आमचा परिचय माझ्या लहानपणापासूनचा. त्यांची मुलगी माई ही लातूरला दिली होती. तिचे यजमान हे काँग्रेसचे कार्यकर्ते होते. माई एकदा परंड्याला माहेरी आली असताना पोलिसांनी तिला ठाण्यावर तास अर्धातास अडकवून ठेवून तिचा अपमान केला होता.

पंढरपूरचे थोर विद्वान प्रद्युम्नाचार्य वरखेडकर यांचे बाळाचार्य हे चिरंजीव. ते एकदा परंड्याला माझ्याकडे आले. पोलिसांनी त्यांना बराच त्रास दिला. मी तहसीलदारसाहेबांकडे पाहुणा म्हणून जात आहे असे ते सांगत असताही त्यांनी

त्यांच्या सामानाची तपासणी केली. ते नको नको म्हणत असताही त्यांच्या पूजा-पेटीतील देव, शाळीग्राम आणि पूजेचे इतर सामान त्यांनी काढून जमिनीवर टाकून दिले. तासाभरानें त्यांची सुटका झाली. ते माझ्याकडे आले तेव्हा ते कष्टी झालेले दिसले. त्यांनी घडलेली हकीकत मला सांगितली. माझ्या क्षोभाला सीमा राहिली नाही. मी लगेच कलेक्टर, सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस (त्याला मोहतमीम म्हणत,) यांना लिहून कळविले की, माझ्याकडे पाहुणा म्हणून येणाऱ्या माणसाची विटंबना होते आणि त्याच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात तर सामान्य माणसाचे काय हाल होत असतील याची कल्पनाच केलेली बरी. या प्रकाराची चौकशी झालीच पाहिजे. माझ्या हट्टामुळे पोलीस खात्याला चौकशी करावी लागून सब इन्स्पेक्टरला तंबी द्यावी लागली.

निजाम राज्यातील मुसलमान सरकारी नोकर, विशेषतः कनिष्ठ दर्जाचे, प्रजेशी अगदी मग्रुरीने वागत. आपल्याविषयी लोकांच्या भावना कशा क्षुब्ध होत आहेत याची त्यांनी शेवटपर्यंत पर्वा केली नाही याचा मला मोठा विलक्षण अनुभव आला.

मानेगाव हे परंडा तालुक्यातील एक गाव. सोलापूर जिल्ह्याच्या सरहद्दीला लागून हे गाव असल्यामुळे गावात पोलिसांची एक चौकी असे. चौकीत दोन तीन कॉन्स्टेबल असत. चौकीसाठी सरकारी इमारत नव्हती. कॉन्स्टेबल गावच्या चावडीतच राहात. गावकऱ्यांनी मागणी केली की, चावडी पोलिसांच्या ताब्यात गेल्यामुळे आमची गावची कामे बंद पडली आहेत. सरकारने वेगळी जागा निवडून तेथे चौकी बांधून द्यावी. सरकारने गावकऱ्यांचे म्हणणे मान्य केले. मानेगावात योग्य जागा निवडण्यासाठी म्हणून कलेक्टर अमीर अलीखान आणि पोलीस सुपरिंटेंडेंट महंमद अलीबेग हे परंड्यास आले. आम्ही तिघे मिळून मोटारीतून मानेगावाकडे निघालो. वाटेत सत्याग्रहासंबंधी बोलणे निघाले. अमीर अलीखान म्हणाले, "माधवराव, मुंबई-पुण्याची वर्तमानपत्रे हैदराबाद राज्याची नेहमी नालस्ती करतात. तिला काही आधार तरी असावा. आता हेच पाहा. काय तर म्हणे मुसलमान अधिकारी फिरतीच्या वेळी खेड्यापाड्यातून जातात तेव्हा ते देवळातून मुक्काम करतात आणि मांसमच्छर खातात. लोकांच्या धार्मिक भावना मुळीच लक्षात घेत नाहीत. आता तुम्हीच सांगा. असे कुठे होते काय ? विनाकारण अशी टीका करावी म्हणजे काय ?" मी काहीच बोललो नाही. खालच्या थराचे मुसलमान सरकारी नोकर, रेव्हेन्यू इन्स्पेक्टर, पोलीस सब-इन्स्पेक्टर इत्यादी माणसे फिरतीच्या वेळी पुष्कळदा गावातील देवळात मुक्काम करीत. ते गावकऱ्यांना आवडत नसे. ही गोष्ट खरी होती. आमचे बोलणे चालू

असतानाच आमची मोटार मानेगावात शिरली. तो दिवस कार्तिकी एकादशीचा होता. मानेगावात पांडुरंगाचे देऊळ होते. देवळासमोर आमची मोटार थांबली.

देवळाला जायला पायऱ्या होत्या. नंतर चौथरा, पुढे सभामंडप आणि पुढे देवाचा गाभारा अशी देवळाची बांधणी होती. आमचे लक्ष देवळाकडे गेले. आम्ही पाहतो तो काय ? सभामंडपात दोन मुसलमान कॉन्स्टेबल देवाकडे पाय करून झोपले होते. आम्हांला पाहाताच ते खडबडून जागे झाले आणि आपले युनिफॉर्म सावरीत आमच्या मोटारीजवळ आले. हे दृश्य मी, अमीर अली आणि मिर्झा महंमद अलीबेग असे तिघे पाहात होतो. ते दोघे गंभीर झाले. मी माझा क्षोभ गिळून त्या दोघांना म्हटले, " साहेब, मुसलमान सरकारी नोकर फिरतीच्या वेळी देवळात उतरतात, त्यामुळे हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात असा प्रचार पुण्या-मुंबईकडील वर्तमानपत्रे करतात यात अतिशयोक्ती असते. क्वचित असे प्रसंग घडत असावेत. आता हेच आपल्या समोरचे उदाहरण घ्या. आज कार्तिकी एकादशी. आज पंढरपूरला लाखोंनी यात्रा जमली आहे. महाराष्ट्रात असंख्य माणसे आज एकादशीचा उपवास करतात. गावातील विठ्ठल मंदिरात जातात. पांडुरंगाचे दर्शन घेतात. अशा या महत्त्वाच्या दिवशी येथे मानेगावच्या विठ्ठल मंदिरात देवाकडे पाय करून हे दोन कॉन्स्टेबल झोपले होते. त्यामुळे विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी येणारी बायकामुले बिचकत होती हे आपण पाहिले. म्हणून का वर्तमानपत्रांनी आपल्या सरकारला इतके धारेवर धरायचे ! " माझ्या स्वरातील क्षोभाने आणि उपरोधाने अमीर अलीखान आणि मिर्जा महंमद अलीबेग हे हादरून गेले. आम्ही मोटारीतून खाली उतरलो. महंमद अली बेगनी कान्स्टेबलांची खरडपट्टी काढली. अमीर अलीखानांनी मला बाजूला नेले आणि माझे समाधान करण्याच्या उद्देशाने म्हटले, " आइ टेल यू माधवराव, दीज पोलीस पीपल ह्याव नो कल्चर, " (माधवराव, या पोलीसच्या लोकांना संस्कृती अशी नाही बघा.) मी म्हटले " जाऊ द्या साहेब, आपण कशाला इतके मनाला लावून घेता. " आम्ही परत आलो. वाटेत ते दोघे अगदी गप्प होते. पुण्यामुंबईकडच्या वर्तमानपत्रातील प्रचाराचा विषय त्यांनी पुन्हा म्हणून काढला नाही.

अमीरअलीखानाचे शिक्षण फक्त इंटर फर्स्ट ईयरपर्यंत झाले होते. त्याला आपल्या पठाण जातकुळीचा मोठा अभिमान होता. तो याह्या जमातीचा पठाण होता. गोड बोलण्यात त्याचा हात कोणी धरला नसता. माझ्याशी बोलताना तो मला छेडण्याचा प्रयत्न करी. मीही शब्दाशब्दातून त्याला टोला लगावण्यास मागेपुढे करीत नसे. एकदा परंड्याच्या रेस्ट हाउसमध्ये आम्ही बोलत बसलो

असताना कलेक्टर अमीरअलीखान म्हणाले, " माधवराव, एक गोष्ट माझ्या लक्षात येत नाही. हैदराबाद राज्यात सत्याग्रह झाला. या प्रसंगानें राज्यातील सर्व जातीजमातींनी सभा भरवून आपण निजामसरकारशी एकनिष्ठ आहोत अशा अर्थाचे ठराव पास केले. पण ब्राह्मण समाजानें अशा प्रकारची एकही सभा घेतल्याचे माझ्या ऐकिवात नाही. सर्वांनी राजनिष्ठा व्यक्त करावी आणि ब्राह्मणांनी तेवढी करू नये ही आश्चर्याची गोष्ट आहे."

मी अमीरअली खानाच्या बोलण्याचा रोख ओळखला. मी म्हटले, " साहेब, ब्राह्मण समाज राजनिष्ठ आहे. त्याने सभा भरवूनच आपली राजनिष्ठा व्यक्त केली पाहिजे असे नाही. केवळ यामुळेच राज्यकर्त्यांनी या समाजाबद्दल संशय घ्यावा असे नाही. युसुफ हुसेन खान यांनी निजाम घराण्याचे संस्थापक निजामुल्मुल्क यांचे चरित्र लिहून तें नुकतेच प्रसिद्ध केले आहे. ते आपल्या वाचनात आले आहे काय ? "

अमीर अलीखान म्हणाले, " नाही. त्यात काय आहे ? " मी म्हटले, " निजामुल्मुल्काने आपल्या मृत्युशय्येवरून आपला मुलगा नासिरजंग याला उपदेश केला आहे. या उपदेशात सतरा कलमे आहेत. माझ्या मागून या गादीवर येणाऱ्या माझ्या वंशजांनी माझ्या उपदेशाप्रमाणे वागावे असे निजामुल्मुल्कानें आवर्जून सांगितले आहे."

अमीर अलीखानांनी विचारले, " काय उपदेश आहे ? "

मी म्हटले, त्यातील सतरा कलमांपैकी तेरावे कलम असे आहे, " दक्षिणेतील ब्राह्मण यांच्या गर्दनी कापणे (वध करणे) हे योग्य होईल. (जुन्नारदाराने दकन काबिले गर्दन जदनी अंद) औरंगजेबाचेही असेच मत होते. "

निजामाच्या गादीवर येणाऱ्या सर्वांनी हा उपदेश पाळावा असे निजामुल्मुकांनी म्हटले आहे. अर्थात ब्राह्मण समाजाच्या राजनिष्ठेवर वरील उपदेशाने काही परिणाम झाला आहे असे मी म्हणणार नाही. पण या संदर्भात मला ती गोष्ट आठवली इतकेच. "

अमीर अलीखानांनी माझ्याकडे भेदक दृष्टीने पाहिले. त्यांच्या डोळ्यांतील द्वेष मी ओळखला. ते म्हणाले, " माधवराव, आप बहोत हुशियार है, " (तुम्ही फार बुद्धिमान आहात). मीही अमीर अलीखानाच्या डोळ्याला डोळा भिडवीत म्हटले, " आपके नक्शे कदमपर चल रहा हूँ " (आपल्या पावलावर पाऊल टाकीत चाललो आहे.)

एकदा अमीर अलीखान म्हणाले, " माधवराव, आर्यसमाजाने काय गोंधळ उडविला आहे पाहिलेत ना. ब्राह्मणांच्या वर्चस्वाला आर्यसमाजामुळे किती

धोका आहे हे ब्राह्मणांच्या लक्षात कसे येत नाही ? " मी वेड पांघरून म्हटले, "साहेब, मी या विषयाचा अभ्यास केला नाही. पण एक गोष्ट मला खटकते आर्यसमाजाची स्थापना एका ब्राह्मणानेच, दयानंद सरस्वतीने केली. या चमत्काराचा काही उलगडा होत नाही. " माझ्या बोलण्यातील खोच लक्षात येऊन अमीर अलीखान गप्प झाले.

आर्यसमाजाचा विषय निघाला की मी भोळेपणाचा आव आणीत असे. सोलापूरला आर्यसमाजाची कॉन्फरन्स भरली होती. उस्मानाबादचे डेप्युटी कलेक्टर शाह अली नेहरी यांना मराठी समजत असे. ते वेष पालटून या कॉन्फरन्सला हजर राहिले होते. तिकडून ते परत आल्यावर माझी व त्यांची गाठ पडली. मी त्यांना सहज विचारले, "काय हो, मी तर सनातनी आहे. हे आर्यसमाजी आहेत तरी कोण ? " नेहरीने म्हटले, "माधवराव, खोडकर मुलगा रागावला की भोवतालच्या वस्तूंची मोडतोड करू लागतो ना, तसा हा आर्यसमाज आहे. " या उपमेची मला मोठी गंमत वाटली.

इक्बालुद्दीन हे उस्मानाबाद जिल्ह्याचे मुख्य इंजीनियर होते. परंडा तालुक्यात खासापूर गावाजवळ एक धरण बांधायचे घाटत होते. जागेची पाहणी करण्यासाठी कलेक्टर अमीरअलीखान आणि इंजीनियर इक्बालुद्दीन हे परंड्याला आले. म्हैसूरच्या टिपू सुलतानाच्या विरुद्ध त्याचा सेनापती कमरुद्दीन हा इंग्रजांना मिळाला. या फितुरीबद्दल इंग्रजांकडून त्याला दोन लाखांची गुरमकोंड्याची जहागीर मिळाली. इक्बालुद्दीन हे कमरुद्दीनचे वंशज. मला हे माहीत होते. पण माहीत होते याची कल्पना इक्बालुद्दीनला नव्हती. आम्ही तिघे परंड्याच्या रेस्ट हाउसमधे बसलो असताना बोलण्यातून बोलणे निघत गेले. इक्बालुद्दीन म्हणाले, "टिपू सुल्तान हा मूर्ख मनुष्य उगीच इंग्रजांशी भांडला. नाही तर म्हैसूरमधे मुसलमानांचे राज्य आजपर्यंत चालू राहिले असते. निजामाने किती शहाणपणा केला पाहा. त्यामुळे हे राज्य टिकून आहे. "

मला राहवेना. मी म्हटले, "माफ करा. टिपूबद्दल आपण असे उद्‌गार काढावे हे समजण्यासारखे आहे. "

इक्बालुद्दीन म्हणाले, "ते कसे काय ? "

मी म्हटले, "त्याचे असे आहे; आपले पूर्वज मीर रेझा हे हैदरअलीचे मेहुणे. हे हैदरअलीला फितूर होऊन माधवराव पेशव्यांना मिळाले. मीर रेझाचा मुलगा कमरुद्दीन हा टिपूचा आतेभाऊ. हा इंग्रजांना फितूर झाला. टिपूचा पराजय झाल्यानंतर इंग्रजांनी त्याला जहागीर दिली. तीही कालांतराने नाहीशी झाली. कमरुद्दीनचा मुलगा टिपू सुलतान अली खान हे म्हैसूरच्या महाराजांचे

ए. डी. सी. झाले. कमरुद्दीनचे चिरंजीव टिपू सुलतान अलीखान हे आपले आजोबा. आपल्या पूर्वजांनी केलेल्या फितुरीमुळे टिपूचे राज्य गेले ही रुखरुख आपल्या मनाला असावी हे साहजिक आहे. ती झाकण्यासाठी आपण टिपूच्या मूर्खपणाचा उल्लेख केला असावा." इक्बालुद्दीनच्या तोंडून शब्द निघेना. हा मनुष्य मोठा व्यसनी असल्याचा मोठा गवगवा होता. तो परंड्याला आला की दलालांनी पैदा केलेल्या सैल स्त्रियांची रीघ रेस्ट हाउसकडे लागायची. इक्बालुद्दीनला अनेक रोग असावेत. बाथटबमधे पाणी भरवून त्यात तो तासन्तास बसून राही. त्याच्या अंगात शक्ती अशी काय असणार? राजश्री टॉर्चलाइटच्या साहाय्याने सौंदर्यनिरीक्षण करण्यात आपली हौस भागवून घेत असे, असा बभ्रा होता. मी अधिक तपशील सांगत नाही. गालिबने म्हटले आहे,

अरे, माझ्या हातात चलनवलनाची शक्ती राहिली नाही म्हणून काय झाले! माझ्या डोळ्यांत तर अद्याप शक्ती आहे ना! मग मदिरेची सुरई आणि पेला ही माझ्यासमोर राहू द्या बरे.

गो हाथ को जुंबिश नहीं आँखों में तो दम है
रहने दो अभी सागरो मीना मेरे आगे

याच बैठकीत अमीरअलीखान म्हणाले, "एकदा खर्ड्याला जाऊन यावे म्हणतो. तेथे आमच्या पूर्वजांनी आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या आत्म्यासाठी फातिहा (प्रार्थना) करून येईन." खर्डे हे गाव आमच्या परंडा तालुक्याच्या सरहद्दीवर पण नगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यात होते. मी नुकताच खर्डे, तेथील गढी आणि रणमैदान पाहून आलो होतो. खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांनी निजामाला सपाटून मार दिला होता. यासंबंधीच्या पुढील ओळी अद्याप लोकांच्या आठवणीत आहेत.

केला हल्ला सवाई निजप्रभुने भाउने मार दिल्हा
किल्ला परांडा जवळहि असता जाहला दूर पल्ला
ना गल्ला न पाणी यवन तळमळी या नबी यार अल्ला
बोले सल्ला करोजी गनिम को चाहेसो देव जिल्हा

मी अमीर अलीखानांना म्हटले—"पण आपल्या पूर्वजांच्या शौर्याचा काही उपयोग झाला नाही. निजाम सरकारचा मराठ्यांच्या हातून पराजय झाला आणि आपले दिवाण मुशीरुल्मुल्क यांना मराठ्यांनी नेऊन पुण्याला कैदेत ठेवले."

अमीर अलीखान गप्प झाले. मुसलमान अधिकाऱ्यांच्यात मराठ्यांच्या इतिहासाबद्दल गाढ अज्ञान असे. त्याला ते अपवाद कसे असू शकतील?

परंड्याच्या ताजुद्दीन दर्ग्यात एक म्हातारा पठाण राहात असे. तो एकदा

अमीर अलीखानाला भेटण्यास आला. मीही तेथेच होतो. अमीर अलीखानाला पठाणांचा अतिशय अभिमान. त्यांनी त्याला विचारले, "खानसाहेब, तुम्ही इतकी वर्षे हिंदुस्थानात राहिला आहात. अफगाण आणि हिंदुस्थानी यांत तुम्हांला फरक काय आढळला?" खानसाहेब म्हणतात काय–"साहेब, अफगाण हा इमानाला जागणारा पण हिंदुस्थानी हा बेमान असतो." अमीर अलीखान खुश होऊन मला म्हणाले, "पाहिलेत माधवराव हा काय म्हणतो ते?" मी म्हटले "साहेब, हा मनुष्य जातिवंत अफगाण दिसत नाही." अमीर अलीखानाच्या कपाळाला आठ्या पडल्या. त्यांनी विचारले–"का?" मी म्हटले "त्याचे असे आहे. हा मनुष्य गेली कित्येक वर्षे हिंदुस्थानचे अन्न खात आहे तरी तो हिंदुस्थान्यांना बेमान म्हणतो. जातिवंत अफगाण खाल्ल्या अन्नाला जागेल. तो अन्नदात्याला तरी बेमान म्हणणार नाही."

हैदराबाद राज्याचे कायदेमंडळ म्हणजे एक थट्टाच होती. हे कायदेमंडळ अवघ्या बारा सभासदांचे असे. त्यांत दहा सरकारनियुक्त आणि दोन वकील-वर्गाने निवडलेले असत. कायदेमंडळाची बैठक वर्षातून एकदा होई. ती जास्तीत जास्त तीन दिवस टिके. या तीन दिवसांतही रोजची बैठक दोन तासांच्यावर चालत नसे. खुद्द पंतप्रधान सर अकबर हैदरी यांनी ॲन अन-सॅटिस्‌फॅक्टरी स्टेट ऑफ अफेअर्स' या शब्दांत कायदेमंडळाची स्थिती वर्णिली होती. अमीर अलीखान म्हणाले, "पाहा पाहा, हे कायदेमंडळ १८९२ मधे स्थापन झाले. कोणत्याही देशी संस्थानात इतके जुने कायदेमंडळ आढळून येईल काय?" मी नुसता हसलो. ही गोष्टही अमीर अलीखानाला आवडली नाही. एकोणीस जुलै १९३९ रोजी हैदराबाद सरकारने नेमलेल्या राजकीय सुधारणा समितीचा (तिला अयंगार कमिटी म्हणत) रिपोर्ट बाहेर पडला. कायदेमंडळात हिंदू (शेकडा अठ्याऐंशी) आणि मुसलमान (शेकडा दहा) सभासदांची संख्या समसमान ठेवण्यात आली होती. पदवीवर, मर्चंटस चेंबर, असे बरेच मतदार संघ पाडण्यात आले होते. हिंदूंचे सभासदत्व दुबळे आणि निस्तेज करण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात आला होता. मंत्रिमंडळ हे फक्त निजामाला जबाबदार राहणार होते. का तर राज्य निजामाचे आणि त्याला ते मिळाले परमेश्वराकडून. तो म्हणजे जिल्लुलाह, परमेश्वराची छाया. तो किंवा त्याचे सरकार ही लोकांना कशी जबाबदार राहातील!

या सुधारणांना बहादूर यारजंगाच्या नेतृत्वाखाली मुसलमानांनी कसून विरोध करण्यास सुरुवात केली. त्यांना सुधारणा नकोच होत्या. बहादुर यारजंग हे मुसलमानांना संघटित करण्यासाठी तुफानी दौरे काढू लागले. मुसलमानांचा

मध्यमवर्ग हा त्यांच्या मागे उभा राहिला. आपले हितसंबंध पूर्वीप्रमाणे सुरक्षित राहणार नाहीत याची त्याला जाणीव झाली. यामुळे मुसलमान समाज आतून हादरला होता. बहादुर यार जंग हे परंड्याचाही दौरा करून गेले. स्थानिक मुसलमानांनी माझ्या विरुद्ध त्यांच्यापाशी तक्रार केली. मला त्याची काय पर्वा होती ? मी त्यांना भेटावे अशी त्यांची अपेक्षा होती. अर्थात मी त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. पुढे लवकरच सप्टेंबर १९३९ मधे दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली आणि सुधारणांची अंमलबजावणी सहा वर्षे स्थगित झाली.

खाजगी शाळांवर सरकारची मोठी कडक नजर असे. खेड्यापाड्यांतून गावठी शाळा असत. सरकारने हुकूम काढला की, अशा गावठी शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या पंधराच्या पुढे गेली की त्यांनी सरकारात अर्ज करून शाळेला मान्यता मिळवून घ्यावी. अर्जाबरोबर जे फॉर्म असत त्यांत मास्तरसंबंधी तपशील द्यावा लागे. मुख्यतः मास्तर हा मुलकी (हैदराबाद राज्यातील) आहे का गैरमुलकी (बाहेरचा) हे पाहात असत. खेड्यापाड्यातील गावठी शाळांनी वेळेवर अर्ज भरले नाहीत. त्यांना हे हुकूम मिळाले आणि समजले तर ना ते अर्ज भरतील ! आणि मग घाईघाईने सरकार या शाळा बंद पाडण्याचा हुकूम काढी. जगात साक्षरतेचा प्रसार चालू असता निजाम सरकारने मात्र शेकडो शाळा बंद पाडण्याचा हुकूम सुनावला. ही धाड परंडा तालुक्यातील पंधरावीस शाळांवरही आली.

मी तालुक्याच्या दौऱ्यावर असताना सवड मिळेल तेव्हा प्राथमिक शाळांची तपासणी करीत असे. सरकारी प्राथमिक शाळांच्या मास्तरांनाही महिनोमहिने पगार मिळत नसे. परंडा हा सर्फेखास (निजामाच्या खाजगीचा) चा तालुका. त्यात काही शाळा सरकारी खर्चातून तर काही लोकल फंड (त्यावेळी परंड्याला नगरपालिका किंवा उस्मानाबादला जिल्हा बोर्ड नव्हते) मधून चालत. तांदूळवाडीच्या शाळामास्तराने तर माझे पाय धरले. तो म्हणाला, " साहेब, मी शिक्षणखात्यात शिपाई होतो. अता मास्तर झालो. मला परत शिपाई म्हणून पाठवा—शिपाई म्हणून मला चिरीमिरी मिळत असे तीही आता मिळत नाही. " असे या लोकांचे हाल होत.

मुसलमानांसंबंधी सरकार फाजील आस्था दाखवी. त्यामुळे कधी कधी तो समाज अडचणीत सापडे. देऊळ असो की मशीद असो, त्याची बांधणी अगर डागडुजी करणे असल्यास परवानगी घ्यावी लागे. अर्जासोबत नकाशा जोडावा लागे. वास्तविक पाहता नकाशा अर्जदाराने तयार करून दाखल करायला हवा. पण मुसलमानांचे अर्ज आले आणि अर्जाबरोबर नकाशा नसला की कलेक्टरकडून

ओव्हरसीयरना (लोकल फंड खात्याच्या) हुकूम सुटत की, तुम्ही मशिदीच्या बांधणीचा अगर दुरुस्तीचा नकाशा तयार करा आणि वरील कामासाठी काय आणि किती खर्च येईल याचे एस्टिमेट तयार करा. ओव्हरसीयर हे नकाशे आणि एस्टिमेट तयार करीत. समजा, स्थानिक मुसलमानांनी मशिदीच्या दुरुस्तीसाठी चार पाचशे रुपये गोळा केलेले असले तर हे ओव्हरसीयर तेवढ्याचे एस्टिमेट बनवीत नसत. ते बनवीत हजार बाराशेंचे. बरे, सरकार या कामासाठी आर्थिक साहाय्य करीत नसे. सरकारकडून अर्जदारांच्या मागे भुणभुण सुरू होई की, तुम्ही वर्गणी करून चारपाचशे रुपये गोळा केले आहेत. पण तेवढ्यात दुरुस्तीचे काम होत नाही तर तुम्ही हजारबाराशे रुपये गोळा करा. स्थानिक मुसलमान गरीब, त्यांच्याने अधिक वर्गणी गोळा होणे अशक्य होई. ते ओरडत की, आम्ही जी काही रक्कम गोळा केली आहे तितक्यात आम्हांला दुरुस्तीचे काम करून घेऊ द्या. तुम्ही फक्त परवानगी द्या. पण सरकार म्हणे–' तुम्ही अधिक वर्गणी गोळा करा. ' या भानगडीत महिनेचे महिने निघून जात. मला राग येई तो एका गोष्टीचा. मुसलमानांनी मशिदीच्या बांधणीचा अगर दुरुस्तीचा अर्ज केला की, सरकारी ओव्हरसीयरकडून नकाशा तयार करवून घेण्याचे कारण काय, असा नियम कोठेच नव्हता. मुसलमान कलेक्टर दडपून ओव्हरसीयरना हुकूम देत. ही पद्धत बदलून घेण्याची मला एक चांगली संधी मिळाली.

इ. स. १९२५ मध्ये माझे वडील परंड्याला हंगामी मामलेदार होते. त्या वेळी निजामुद्दीन अष्टी या गावच्या मुसलमानांनी गावातील मशिदीच्या दुरुस्तीसाठी पाचशे रुपयांची वर्गणी गोळा केली, आणि दुरुस्तीला परवानगी मिळावी म्हणून सरकारात अर्ज केला. आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे जिल्हा कचेरीतून सरकारी खर्चाने दुरुस्तीचे एस्टिमेट तयार करण्यात आले. ते हजार दीडहजारावर गेले. सरकारने गावच्या मुसलमानांच्या मागे भुणभुण लावली की, तुम्ही दीड हजार रुपयांची वर्गणी गोळा करा. मुसलमान म्हणत–आमच्यापाशी इतकी वर्गणी गोळा करण्याची शक्ती नाही. आम्ही जी रक्कम जमविली आहे तितक्यातच आम्ही मशिदीची दुरुस्ती करू. आपण फक्त परवानगी द्या. पण सरकार या गोष्टीला कबूल होईना. तेरा वर्षांनी मी परंड्याला मामलेदार म्हणून चार्ज घेतला. तेव्हा १९२५ मध्ये माझ्या वडिलांच्या वेळी चालू झालेले हे मशीद दुरुस्तीचे प्रकरण अद्याप रेंगाळत पडले होते. तांदुळवाडीच्या मशिदीच्या दुरुस्तीचा अर्जही याच कारणामुळे वर्ष दीड वर्षापासून धूळ खात पडला होता.

मी कलेक्टरना लिहून कळविले की, देऊळ किंवा मशीद यांच्या बांधणुकी

अगर दुरुस्ती याबाबत अर्ज केला तर सरकारी खर्चाने नकाशे आणि एस्टिमेट तयार करण्याचे कारण काय ? तसे काही हुकूम असल्यास कळवावे. (असे हुकूम नव्हतेच हे मला माहीत होते. सरकारला मशिदीचा पुळका होता हे खरे कारण) आणि गरीब मुसलमानांनी अधिक वर्गणी गोळा करावी म्हणून सरकारने सक्ती का करावी ? यामुळे मशिदींची दुरुस्ती वर्षानुवर्षे बंद पडली आहे. (मुसलमानांना डुक्कर हा प्राणी निषिद्ध आणि घाणेरडा वाटतो.) मी पत्रात शेवटी लिहिले की, सरकारच्या या धोरणामुळेच मशिदीच्या उरल्यासुरल्या भिंती ढासळत चाललेल्या आहेत. और खानाये खुदामे बद जनावर घुस रहे हैं. परमेश्वराच्या घरात (मशिदीत) घाणेरडी जनावरे (डुक्कर) घुसत आहेत.

माझी मात्रा बरोबर लागू पडली. जिल्ह्याचे अधिकारी म्हणाले, "तोबा तोबा, मशिदीत डुकरे !" कलेक्टरने मला कळविले की, दुरुस्तीची परवानगी ताबडतोब देण्यात यावी. मुसलमानांच्यावर वर्गणी जमविण्याची सक्ती करण्यात येऊ नये. आणि मशिदी काय आणि देवळे काय, नकाशे आणि एस्टिमेट सरकार-तर्फे तयार करण्याची जरूर नाही. पण माझ्या पत्रातील खोच आमचे कलेक्टर अमीर अलीखान यांच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाही.

इ. स. १९३९ पर्यंत माझी दोन पुस्तके, उषा आणि मराठवाड्यातील आधुनिक कविता ही प्रसिद्ध झाली होती. १९३९ मध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक आणि माझे मित्र डॉक्टर वामनराव गाडगीळ यांनी पुस्तक-प्रकाशनाची एक योजना तयार केली. त्यांनी वर्गणीदारांकडून प्रत्येकी दहा दहा रुपये गोळा करून त्याच्या मोबदल्यात स्वस्त दरात पुस्तके देण्याचे योजले. मालेचे पहिले प्रकाशन म्हणून त्यांनी माझ्याकडे एका पुस्तकाची मागणी केली. तोपर्यंत माझ्या आणखी काही लघुकथा प्रसिद्ध झाल्या होत्या. तो संग्रह मी त्यांच्याकडे पाठवून दिला.

अलकनंदा हे माझ्या मोठ्या मुलीचे नाव. माझ्या नवीन संग्रहाला मी तेच नाव दिले. माझा अलकनंदा हा लघुकथा संग्रह १९४० च्या सुरुवातीला छापून आला. हे माझे तिसरे पुस्तक.

एकोणीसशे चाळीसच्या मे महिन्यात रत्नागिरीला मराठी साहित्य संमेलन भरले. ना. सी. फडके हे संमेलनाचे अध्यक्ष होते. मी एक आठवड्याची रजा घेतली आणि संमेलनासाठी रत्नागिरीला गेलो. तेथे संमेलनात मामा वरेरकर यांनी माझा लघुकथासंग्रह प्रकाशित झाल्याचे जाहीर केले तेव्हा मला धन्यता वाटली.

रत्नागिरीच्या संमेलनाच्या निमित्ताने माझा कोकणच्या मनोरम अशा सृष्टि-

सौंदर्याशी प्रथमच परिचय झाला. अनेक साहित्यिकांची मी नुसती नावे ऐकत असे. ते मला प्रथमच पाहण्यास मिळाले. ना. सी. फडके, कमल दीक्षित, मामा वरेरकर, अनंत काणेकर, पु. मं. लाड, कवि अनिल, के. नारायण काळे, लोककवि मनमोहन, माधव मनोहर, वि. पां. दांडेकर इत्यादींना संमेलनात पाहिल्याचे मला आठवते. त्यांची ओळख करून घेण्याची संधी मला लाभली नाही. ही बडी माणसे संमेलनभर आपल्याच नादात वावरत होती. मराठ-वाड्यातून आलेल्या प्रतिनिधींची चौकशी करण्यास त्यांना वेळ होता कुठे !

कोकणचे वातावरण मला अगदीच अपरिचित होते. माडाची झाडे, नारळी-पोफळीच्या बागा, ठिकठिकाणी आढळून येणाऱ्या रहाटगाडग्याच्या विहिरी, रत्नागिरीचे बंदर आणि तेथून दिसणारा समुद्राचा देखावा, इत्यादीमुळे मी भारावून गेलो. माधव काटदऱ्यांची कोकणवर्णनपर कविता मी वाचली होती. त्यामुळे तर कोकणचे सृष्टिसौंदर्य माझ्या मनात अधिक ठसले.

रत्नागिरीच्या संमेलनात मला कोकणातील दशावतारी नाटके पाहण्यास मिळाली. कळसूत्री बाहुल्यांचे खेळही मी पाहिले. संमेलनातील काही गमतीदार अनुभव मला अद्याप आठवतात. संमेलनात मी मास्टर विनायक यांना प्रथमच पाहिले. संध्याकाळी मी आमच्या निवासस्थानातून संमेलनाच्या मंडपाकडे जात होतो. अंगात सैल सदरा आणि रुंद पायजामा होता. मला पाहून काहीजणांना वाटले की, हे मास्टर विनायक आहेत. काही मुले " मास्टर विनायक, आम्हांला स्वाक्षरी द्या " म्हणत माझ्यामागे लागली. मुले मला मास्टर विनायक समजली या कल्पनेने मला कोण धन्यता वाटली.

रत्नागिरीची आणखी एक गोड आठवण म्हणजे हापूसचा आंब्रस. शेव-टच्या दिवशीच्या जेवणात पाचसातशे माणसांना आंब्रसाचे जेवण देण्यात आले होते. रस वाढण्यात शांता आपटे यांनी थोडा वेळ भाग घेतला होता. हापूसचा रस आणि वाढणाऱ्या शांता आपटे ! कित्येक महिनेपर्यंत त्या मधुर रसाची आठवण मनात तरंगत होती.

जहाजात बसण्याचा योग मला आयुष्यात कधीच आला नव्हता. रत्नागिरीहून जहाजाने मुंबईला यायचे मी ठरविले. बोट बंदरापासून एक मैल लांब असावी. आम्ही संध्याकाळी मचव्यात बसून बोटीकडे जाण्यास निघालो. लाटांच्यामुळे मचवा खालीवर होऊ लागला की माझ्या पोटात धडकी भरे. बोटीवर पोहोचल्यावर माझा जीव खाली पडला.

मला माझ्या स्मृतीची मोठी गंमत वाटते. चाळीस पन्नास वर्षांपूर्वीच्या मह-त्त्वाच्या आणि बिनमहत्त्वाच्या घटना अगदी काल घडल्यासारख्या आठवतात.

उलट नेहमी पाहिलेली माणसे वेगळा पोषाख करून आली की त्यांना ओळखता ओळखता तारांबळ उडते. इतिहासातील शेकडो तारखा मला तोंडपाठ आहेत. पण कालच्या जेवणात भ.जी कोणती होती असे कोणी विचारले तर मला पाच मिनिटे तरी विचार करावा लागतो.

बोटीवर मी पोहोचलो तेव्हा अनेक साहित्यिक तेथे जमले होते. साहित्यिकांच्या घोळक्यात मला माधव मनोहर दिसले. बोटीवर उतारूंचे सामान येऊन पडत होते, त्यात आपले सामान आहे काय याचा ही मंडळी तपास काढीत होती. इतक्यात एक होल्डआल येऊन पडले. ते लोककवी मनमोहन नातू यांचे असावे. कारण ते पाहून माधव मनोहर "ग्रॅन्डसन (नातू)" असे म्हणाले आणि आपण कशी कोटी केली असे समजून मोठ्याने हसले. मला वाटते त्याच सुमारास माधव मनोहरची एक कादंबरी प्रसिद्ध झाली होती. म्हणून त्यांच्याबद्दल मला कुतूहल वाटले असावे. अर्थात मी पुढे होऊन या बड्या मंडळींची ओळख करून घेण्याचा प्रश्नच नव्हता.

बोटीवर मला रात्री गाढ झोप लागली. मी सकाळी जागा झालो तेव्हा आम्ही मुंबईच्याजवळ आलो होतो. मी कठड्यापाशी उभा राहून समुद्राची मौज पाहात होतो. नागपूरचे पांढरीपांडे यांची माझी त्यावेळी ओळख झाली. आणखी एक गृहस्थ जवळच उभे होते. समुद्रातील लाटांच्याकडे बोट दाखवीत ते मला म्हणाले "सी हाउ दि फिश आर डान्सिंग." आज त्या गोष्टीला अठ्ठावीस वर्षे झाली तरी त्यांचे वाक्य नुकतेच ऐकल्यासारखे मला आठवते. ते गृहस्थ मला म्हणाले, "मी मुंबईला वकिली करतो. माझे घर प्रार्थना-समाजाच्या जवळ आहे. माझे नाव गोखले. जमल्यास माझ्याकडे या." पुढे मुंबई हायकोर्टात न्यायमूर्ती झालेले गोखले ते हेच.

मुंबईला न थांबता मी लगेच पुण्याची गाडी पकडली. गाडीत माझ्याबरोबर लोककवी नातू होते. त्यांना पाहताच मला चेहरा ओळखीचा वाटला. मी त्यांना विचारले, "का हो, तुम्ही लहानपणी अंबरनाथला होता का?" त्यांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "माझे लहानपण अंबरनाथला गेले हे फार थोड्यांना माहीत आहे. तुम्हांला हे कसे कळले?" मी म्हटले, "पुण्याला, न्यू इंग्लिश स्कूलमधे शिकत असताना आपण गद्रे वाड्याच्या वसतिगृहात एकत्र राहात होतो. त्यावेळी तुम्ही अंबरनाथचा उल्लेख केला होता." ती १९२४ ची हकीकत मला १९४० मध्ये एकदम आठवली. नातूंची एक कादंबरी 'कुतुबमिनार' त्या सुमारास प्रसिद्ध झाली होती. कादंबरीतील भडक वर्णनाचा त्यावेळी बराच गवगवा झाला होता. त्या प्रकरणात मामा वरेरकरांनी आपल्याला सहानुभूतिपूर्ण

मदत केली असे नातूनी सांगितले.

मी लोणावळ्याला उतरलो. त्या दिवशी मी कुवलयानंदांचा आश्रम पाहिला. संध्याकाळच्या गाडीनें मी पुण्याला गेलो. दुसऱ्या दिवशी मी परंड्यास पोहोचलो.

परंड्यास असताना मी मुंबईच्या ज्योत्स्ना मासिकासाठी 'मराठवाड्याची वाङ्मयसेवा' हा लेख लिहून पाठविला, तो छापून आला. यानंतर 'मराठवाड्यावर एक धावती नजर' असा सव्वीस पानी लेख मी ज्योत्स्नाकडे पाठविला. ते मासिक बंद पडले हे मला माहीत नव्हते. त्या लेखात प्रामुख्याने साहित्य आणि साहित्यिक यांची चर्चा होती.

माझ्या या लेखाच्या शेवटी मी म्हटले होते—"राजकीय दृष्टीनें मराठवाड्याची जनता निजाम सरकारशी एकनिष्ठ राहील. पण साहित्य आणि समाजकारण या बाबतीत मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांतील संबंध दिवसेंदिवस घनिष्ठ होत जातील."

हा माझा लेख पोस्टात टाकल्यावर पोलिसांनी पळविला. सरकारात या लेखाची छाननी झाली. कलेक्टरनी मला बोलावून चौकशी केली. तोपर्यंत कृष्णाकुमार, एम्. ए. हे टोपण नाव मी वापरीत असे, ही गोष्ट सरकारला कळली. माझ्या लेखाचे उर्दूत भाषांतर करण्यात आले. माझ्या लेखाचा भलताच विपर्यास करण्यात आला. महसूल खात्याचे नायब सचिव महबूब अलीखान यांनी माझ्याबद्दल लिहिले, "वेळ येईल तेव्हा सेतु माधवराव हे या सरकारविरुद्ध चळवळ केल्याशिवाय राहणार नाहीत याची मला खात्री आहे. त्यांना डिग्रेड केले पाहिजे. (आय ॲम कन्व्हिन्स्ड दॅट व्हेन दि टाइम कम्स सेतु माधवराव विल नॉट फेल टु वर्क अगेन्स्ट धिस गव्हर्नमेंट. ही शुड बी डिग्रेडेड.)

मला मामलेदारीवरून अव्वल कारकुनीवर आणण्याची सूचना या शहाण्यांनी केली. सुदैवाने वरच्या युरोपियन अधिकाऱ्यांनी दुसराच निर्णय घेतला. तुम्ही जातीय व राजकीय स्वरूपाचे लिखाण करता कामा नये (आप फिरके बारी और सियासी किस्म के मजामीन न लिखा करे।) या शब्दांत मला तंबी देण्यात आली.

त्यानंतर मी निजामविजय साप्ताहिकाकडे एक दोन वेळा लेख पाठविले. ते गुप्तपोलिसांनी मधल्या मधे गडप केले. १९४० ते १९४८ अखेरपर्यंत माझा एकही मराठी लेख प्रसिद्ध झाला नाही. माझे लेखन मी चालू ठेवले. ते पुढील तीनचार वर्षांत पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले.

मुसलमान समाजाविषयी हिंदूंचे अज्ञान विलक्षण आहे. दर्गा, मशीद, खानका, आशूरखाना, छल्ला यांतील भेद त्यांना कळत नाहीत. वाद्ये वाजविण्यासंबंधी

ज्या तक्रारी उद्भवत त्या मशिदीसमोरून वाद्ये वाजवीत जाण्यावरून होत. दर्गा, खानका, आशूरखाना इत्यादींजवळ वाद्ये वाजविण्यास हरकत असण्याचा प्रश्नच नसे. मशीद ही प्रार्थनेची जागा. दर्गा म्हणजे एखाद्या फकिराची किंवा औलियाची कबर असलेले स्थान, छल्ला म्हणजे त्याच कबरीतील थोडी माती दुसऱ्या एका रिकाम्या कबरीत घालून उभा केलेला दर्गा. एकनाथांनी वर्णन केलेले दावल मलिकाचे दर्गे अशाच प्रकारे बनले. खानका म्हणजे मठ, आशूरखाना म्हणजे मोहरममध्ये झेंडे बसविण्याच्या जागा.

मशिदीची खूण म्हणजे ती नेहमी पश्चिमेच्या म्हणजे मक्केच्या दिशेने बांधली जाते. मशिदीच्या गाभाऱ्यात एक कमान (मिहराब महिरपी) आणि मेंबर (तीन पायऱ्यांचे प्रवचन पीठ) ही असतात. मुख्य गोष्ट म्हणजे मशिदीच्या मागच्या भिंतीला टेकू देण्यासाठी एक दुसरी अरुंद आणि निमुळती भिंत उभी करतात. तिला शमला (आपल्या डोक्यावरील फेट्यांचा सोगा म्हणा ना) म्हणतात. हिंदूंना हे बारकावे माहीत नसल्यामुळे मुसलमान हे दर्गा असो की मशीद असो की आशूरखाना असो, कोठेही सवाद्य मिरवणुकींना हरकत घेत किंवा सरकारात गाऱ्हाणी मांडीत आणि निव्वळ अज्ञानामुळे हिंदू गप्प बसत.

मराठवाड्यात शेतमालकांना पट्टेदार म्हणत. त्यांचीच नोंद खेड्याच्या कागदपत्रातून असे. समजा, पट्टेदार मेला आणि त्याला दोन मुले असली तर मोठ्या मुलाचे नाव शिकमीदार (भागीदार) म्हणून नोंदले जाई. शिकमीदार मेला तर त्याच्या वारसाची कारवाई करण्याकडे पाटील-कुलकर्णी दुर्लक्ष करीत. त्यामुळे जमिनीवर ताबा पण हक्कांची नोंदणी कागदोपत्री नाही, असा प्रकार हजारो शेतकऱ्यांच्या बाबतीत घडू लागला. आपण जमिनीचे कायदेशीर शिकमीदार आहोत हे सिद्ध करण्याचे दोन मार्ग असत. एक तर पट्टेदाराने ही गोष्ट कबूल करावी किंवा शिकमीदाराने दिवाणी कोर्टातून आपला हक्क शाबीत करून घ्यावा. हा दुसरा मार्ग मोठ्या खर्चाचा असे. इंग्रजी इलाख्यात हक्कनोंदणीचा कायदा चालू असल्यामुळे जमिनीच्या कब्जेदारांची नावे आपोआप नोंदली जात. हैदराबाद राज्यात रेकॉर्ड ऑफ राइट (हक्क नोंदणी) ला अद्याप सुरुवात झाली नव्हती. यातून मी एक मार्ग काढला. परंडा तालुक्याच्या खेड्यापाड्यांतून मी सतत दौरा केला आणि हजारो शेतमालकांना (पट्टेदार) एकत्र जमवून त्यांच्या शेतातील कब्जेदार आणि भागीदार कोण आहेत यांची चौकशी केली. गावकऱ्यांच्या समोर पट्टेदारांना भागीदारांचे हक्क नाकारता येईनात. ते कबूल झाले की रजिस्टरमधे त्यांची सही घेऊन मी शिकमीदारांना त्यांच्या हक्कांचे प्रमाणपत्र देऊ लागलो. अशा रीतीने हजारो हक्कदारांचे हक्क नोंदले

गेले आणि दिवाणी कोर्टातून आपले हक्क शाबीत करायच्या खर्चिक व्यापातून त्यांची सुटका झाली.

या कामात दौऱ्यावर असताना मी प्रत्येक खेड्यातील देवळे, मशिदी इत्यादींची पाहणी केली. हिंदूंचा एखादा शेंदूर लावलेला दगड एखाद्या झाडाखाली मांडलेला आढळला की परवानगीवाचून देऊळ बांधण्यात आले आहे अशी तक्रार गावातला मुसलमान केव्हा करील याचा नेम नसे. आणि अशी तक्रार आली की, हैदराबाद सरकार चवताळून हिंदूंच्या मागे लागत असे. ही आपत्ती टाळण्यासाठी मी प्रत्येक खेड्यातील एकूणएक देवळांची नोंद सरकारी रजिष्टरात केली. त्यातून मी पारावरचे शेंदूर लावलेले देवसुद्धा वगळले नाहीत. मुसलमानांच्या मशिदी, दर्गे इत्यादींचीही मी नोंदणी केली आणि त्यावर गावच्या प्रमुख मुसलमानांच्या सह्या घेतल्या. गावात एकच मशीद असली की, आमच्या गावात एकच मशीद आहे, अशा अर्थाचे कबुलीजबाब मी घेऊन ठेवीत असे. यामुळे आज आशूरखाना, त्याचा उद्या दर्गा आणि परवा मशीद यांत रूपांतर होऊन हिंदूंशी सवाद्य मिरवणुकीबाबत होणाऱ्या तंट्यांना खंड पडला.

हिंदूंच्या अज्ञानाचा आणि भित्रेपणाचा फायदा घेऊन मुसलमान आपले हातपाय कसे पसरवीत असत याचे भयानक उदाहरण म्हणजे परंड्याचे तोरणबावली मशिदीचे प्रकरण होते. त्याची हकीकत अशी :

परंड्याच्या ब्राह्मण आळीत एक जुनी विहीर आहे. तिचे नाव तोरणबावली. तिला लागूनच एका ओट्यावर मुसलमान मोहरममध्ये आपले झेंडे बसवीत. मोहरमचे दहा दिवस वाद्यांचा जल्लोश स्वतः मुसलमान करीत. काही दिवसांनी एक सेवानिवृत्त मुसलमान कॉन्स्टेबल त्या जागेवर ठाण मांडून बसला. मोहरमचे पीर बसविण्याची ती जागा म्हणजे आशूरखाना. ती मशीद नव्हे. कॉन्स्टेबलने तेथे परवानगी घेतल्यावाचून लहानशी मशीद बांधली आणि मुसलमानांचे मन वळवून त्या ठिकाणी मोहरमचे पीर बसविणे त्याने बंद करविले. वास्तविक परवानगीवाचून मशीद बांधल्याबद्दल मामलेदारांनी त्याला धारेवर धरायला हवे होते. ब्राह्मणआळीत मशीद बांधल्याबद्दल लोकांनी तक्रारी केल्या. यावर कलेक्टरांनी काय हुकूम द्यावा !

“कॉन्स्टेबलला बजावा की त्याने परवानगीचा रीतसर अर्ज दाखल करावा !” तू परवानगी न घेता ब्राह्मण आळीत मशीद बांधली कशी, ही मशीदच नव्हे, हा आशूरखाना आहे, असे त्याला बजावण्यास हवे होते. पण राज्य निजामाचे. प्रत्येक फाटक्या मुसलमानाला वाटे की, राज्यसरकार माझ्या पाठीशी उभे आहे. माझे कोण काय करणार. कॉन्स्टेबलने अर्ज केला की मला मशीद

बांधण्याची परवानगी मिळावी. अर्जाला त्याने स्टॅंप तिकीट लावले नव्हते. अर्ज घेण्यात आला आणि स्टॅंप दाखल करण्याविषयी त्याला नोटीस देण्यात आली. स्टॅंपचे आठ आणे त्या कॉन्स्टेबलने भरले नाहीत. शेवटी माझ्या पूर्वीच्या मामलेदारांनी अर्जाबरोबर स्टॅंप न लावल्यामुळे अर्ज विचारात घेता येत नाही, असा हुकूम काढून अर्ज निकालात काढला आणि प्रकरण संपविले. पण परवानगीवाचून मशीद बांधलीच कशी हे विचारण्याचे धैर्य माझ्या पूर्वीच्या हिंदू मामलेदाराला झाले नाही. कॉन्स्टेबलला तरी अर्जाची पर्वा करण्याचे काय कारण होते. त्याची मशीद तर उभी राहिली होती. मुसलमान अधिकारी धूर्तपणाने गप्प, हिंदू अधिकारी भित्रेपणामुळे गप्प. यामुळे कॉन्स्टेबलने आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली. हिंदूंच्या लग्नादी प्रसंगांच्या मिरवणुकी समोरून जाऊ लागल्या की तो प्रथम त्यांना अजीजीने म्हणे, "आमची नमाजाची वेळ आहे. कृपा करून वाद्ये वाजवू नका." हळू हळू या आर्जवाचे रूपांतर धमकीत होऊ लागले.

मी परंड्याला मामलेदार म्हणून चार्ज घेतला त्यावेळी ही परिस्थिती होती. मशीद होती ब्राह्मण आळीत. ज्या रस्त्याच्या तोंडावर ही मशीद होती तो रस्ता बाजारपेठेतील होता. त्या रस्त्यावरून हिंदूंच्या रंगपंचमी, दसरा, इत्यादि उत्सवाच्या मिरवणुकी निघत. यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकनाथमहाराजांची पालखी पैठणहून पंढरपूरला जाताना परंड्यातून जात असे, ती याच रस्त्यावरून जाई. या सर्व मिरवणुकींनी मशिदीसमोर वाद्ये बंद करावीत, असा हट्ट मुसलमान धरतील असा रंग दिसू लागला. या कल्पनेने मी अस्वस्थ झालो.

मशिदी आणि वाद्ये यासंबंधीचे हैदराबाद राज्यातील नियम अतिशय जाचक असत. दिवसातून नमाजाच्या पाच वेळा असत. त्यावेळी मशिदीमोरून मिरवणुकी सवाद्य जाता कामा नयेत; इतकेच नव्हे तर या वेळात शेजारच्या हिंदूंच्या घरात मोठ्याने भजने म्हणणे, जयजयकार करणे, टाळ्या वाजविणे, वाद्ये वाजविणे, (शंख, झांज, हार्मोनियम इत्यादि) बाजा बजाना, जय के नारे लगाना, इत्यादी प्रकारांना बंदी असे. हिंदूंच्या आळीत जबरदस्तीने मशीद उभी केल्यावर हिंदूंना तिचे अस्तित्व किती जाचक होणार होते याची कल्पनाच केलेली बरी. सुदैवाने निजामाच्या फर्मानात एक पळवाट होती. एखाद्या मशिदीसमोरून सवाद्य मिरवणुकी जाण्याची पूर्वापार वहिवाट असल्यास त्यांना फर्मानातील नियम लागू नसत. तोरणबावलीची मशीदच मुळी परवानगीवाचून उभी केलेली. पूर्वी तेथे आशूरखाना होता. मोहरममध्ये मुसलमान स्वतः दहा

दिवसपर्यंत ताशे, वाजंत्री इत्यादी वाद्ये वाजवीत, ही गोष्ट माझ्या पथ्यावर पडली.

पुढे लवकरच रंगपंचमीचा सण जवळ आला. हिंदूंनी सालाबादप्रमाणे मिरवणुकीची परवानगी मागितली. मुसलमानांनी हरकत घेतली की, मशिदी-समोरून मिरवणूक जाताना वाद्ये बंद ठेवली जावीत. मी याच संधीची वाट पाहात होतो. गावातील प्रतिष्ठित मुसलमानांच्या मी जबान्या घेतल्या. प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे असत.

प्रश्न : तुम्ही म्हणता त्या तोरणबावली मशिदीच्या जागी तिला लागून आशूरखाना होता की नाही ?

उत्तर : हो, होता.

प्रश्न : आशूरखान्यात मोहरमचे दहा दिवस मुसलमान स्वतः बाजे वाजवीत की नाही ?

उत्तर : हो.

प्रश्न : मग हिंन्दूच्या सवाद्य मिरवणुकीला तुम्ही हरकत घेण्याचे काय कारण ?

उत्तर : आम्ही आशूरखान्यात वाद्ये वाजविण्याचे स्वतः बंद केले आहे. त्यामुळे हिंन्दूनीही मशिदीसमोर वाद्ये वाजवू नयेत, अशी आमची इच्छा आहे.

मी जबान्या घेतल्यानंतर निर्णय दिला की, मुसलमानांच्या हरकतीत काही अर्थ नाही, ते स्वतः वाद्ये वाजवीत तर हिंदूंना हरकत घेण्याचे त्यांना काही कारण नाही. हिंदूंची सवाद्य मिरवणुकी काढण्याची वहिवाट पूर्वापार आहे. सरकारी फर्मानातील वाद्यबंदीचे नियम त्यांना लागू नाहीत. सबब रंगपंचमीची मिरवणूक मशिदीसमोरून वाद्यासहित जाईल.

माझ्या निर्णयाने परंड्याच्या मुसलमानांत भयंकर खळबळ उडाली. मी इतकेच करून थांबलो नाही. मी कलेक्टरना कळविले की, रंगपंचमीच्या मिरवणुकीत मुसलमान दंगल करतील अशी मला शंका आहे. तर त्याप्रसंगी हत्यारबंद पोलिसांचा बंदोबस्त करण्यात यावा. माझ्या रिपोर्टने कलेक्टर अमीरअलीखान हे गडगडले. ते आणि पोलिस सुपरिटेंडेंट मिर्जा महंमदअली बेग हे तावडतोब परंड्याला आले. संध्याकाळी त्यांनी गावातील प्रतिष्ठित हिंदू–मुसलमानांना बोलाविले; मशिदीच्या जागेत मुसलमान स्वतः वाद्ये वाजवीत हे त्यांना नाकारता येईना. मुसलमानांना हिंन्दूच्या सवाद्य मिरवणुकीला हरकत घेण्याचे काही कारण नाही हे अमीरअलीखान कलेक्टर यांना आढळून आले. मुसलमान समाजातर्फे कंत्राटदार नस्रुल्लाखान बोलत होता. अमीरअलीखानांनी त्याला विचारले,

" तुम्ही स्वतः जेथे वाद्ये वाजवीत होता तेथे हिंदूंना कशी हरकत घेता ? " नसरुल्लाखान म्हणाला, " आम्ही स्वतः वाद्ये बंद केली. हिंदूंनीही तसेच करावे अशी आमची इच्छा आहे. " कलेक्टरनी विचारले, " हिंदूंनी वाद्ये वाजवू नयेत असे तुम्ही का म्हणता ? "

यावर त्या मूर्खाने उत्तर दिले, " आमचा इस्लाम धर्म हा हिंदू धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे म्हणून. " असे म्हणून नसरुल्लाखानाने माझ्याकडे पाहिले.

त्याचे हे उद्धटपणाचे उत्तर ऐकून माझा क्षोभ अनावर झाला. माझा चेहरा रागाने लाल झाला होता. मी अमीर अलीखानांना म्हटले (" आपका इहतिराम है के मैं खामूश हूं वर्ना–) केवळ आपल्याबद्दल आदर म्हणून मी गप्प आहे, नाही तर— "

अमीरअलीखानांनी माझा क्षोभ ओळखला. ते कडाडून नसरुल्लाखानाला म्हणाले, " खानसाहेब, पुन्हा असे शब्द माझ्या समोर उच्चाराल तर या समोरच्या लिंबाच्या झाडाला तुम्हांला उलटा टांगून ठेवीन; (बारेदिगर अगर ये अल्फाज आप कहें तो सामने के नीम के झाडको आपको उलटा टांग दूंगा.")

हिंदूंनी तडजोड करावी ही अमीरअलीखानांची इच्छा. पण जेथे मशिदीच्या अस्तित्वाबद्दलच हिंदूंचा दावा होता, तेथे ते वाद्ये वाजविण्याचे कसे थांबवतील ? शेवटी मिरवणुकीला पोलीस संरक्षण देण्याचे अमीरअलीखान आणि मिर्जा महंमद अलीबेग यांना मान्य करावे लागले. ते दोघे माझ्यावर मनातून दातओठ खात होते. पण खुद्द मुसलमानांनीच दिलेल्या जबान्यांमुळे नाइलाज झाला. रंगपंचमीचा सण जवळ येऊ लागला तशी मला खुनाच्या धमकीची पत्रे येऊ लागली. पत्रात मजकूर असे : ' सावध राहा. तुमचा निकाल लावण्याचा माल-मसाला तयार आहे. ' पत्राच्या खाली " आहनी पंजा " म्हणजे पोलादी मूठ असे शब्द आणि मुठीचे चित्र ही असत. मी ती पत्रे ऑफिसमध्ये हजर असलेल्या मुसलमानांना दाखविली आणि म्हटले, " अशा धमक्यांनी घाबरून जाणारा माणूस मी नव्हे. निनावी पत्रे लिहिणाऱ्यांचे अवसान काय आहे हे मला कळून आले आहे, " मी कलेक्टरना लिहिले, " ही पत्रे मी आपल्याकडे पाठवीत आहे. भीतीमुळे मी असे करीत आहे असे आपण समजू नये. भीती हा माझा स्वभावधर्म नाही. परंड्याच्या मुसलमानांची अविचारी वागणूक आपल्या नजरेला आणून देणे एवढाच माझा हेतू आहे. "

मी एक गुप्ती जवळ बाळगली होती. फिरायला जाताना मी ती बरोबर ठेवीत असे. माझा विश्वासू मुसलमान चपराशी सय्यद अहमद हा नेहमी माझ्या-बरोबर असे. माझे वडील १९२३-२५ मध्ये परंड्याला असताना सय्यद

अहमदचा बाप महंमद माझ्या दिमतीला असे. सय्यद अहमद हा माझ्या लहानपणापासून माझ्या ओळखीचा मोठा इमानी माणूस.

मला इस्लामबद्दल कटू भावना असण्याचे कारण नव्हते. मला चीड येई हैदराबाद राज्यातील शेफारलेल्या आणि धर्मद्वेषी अविचारी मुसलमानांची. निजामाच्या सत्तेच्या बळावर मुसलमान हिंदूंना अतिशय तुच्छ लेखीत, याचा मला त्वेष येई.

रंगपंचमीच्या दिवशी उस्मानाबादहून सुमारे शंभर हत्यारबंद पोलीस परंड्यास येऊन दाखल झाले. रंगपंचमीची मिरवणूक माशिदीच्या जवळ येत आहे हे पाहून बरेच मुसलमान मशिदीत गोळा झाले होते. पोलिसांनी मशिदीत घुसून मुसलमानांना लाथा मारून मशिदीबाहेर काढले. जवळपासच्या घरांच्या छतावर पोलीस बंदुकी घेऊन उभे राहिले. मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली.

पण इतक्यावर हे प्रकरण भागणार नव्हते. एकनाथांची पालखी पैठणहून निघून पंढरपूरला जाई ती परंड्यातून आणि नेमकी या रस्त्यावरून जाई. त्यावेळी काय करायचे हा प्रश्न अधिकाऱ्यांना पडला. गुलबर्गा प्रांताचे कमिशनर नबाब गौस यार जंग हे उस्मानाबादेस येणार होते. हैदराबादचे पंतप्रधान सर अकबर हैदरी हे तुळजापूरचा पाणीपुरवठा आणि वीजकेंद्र यांचे उद्‌घाटन करण्यासाठी येणार होते.

महाराजा सर किशनप्रसाद हे पंतप्रधानपदावरून इ. स. १९३६ मध्ये निवृत्त झाले. सर अकबर हैदरी हे अर्थखात्याचे मंत्री होते. पंतप्रधान म्हणून त्यांची नेमणूक झाली. वऱ्हाडच्या प्रश्नावर निजामाने आपटी खाल्ली होती. पण १९३५ च्या सुधारणा अंमलात आणण्यासाठी वऱ्हाडबाबत निजामाची संमती घेणे आवश्यक होते. त्याचा फायदा घेऊन सर अकबर हैदरींनी वऱ्हाडचा करार घडवून आणला. निजामाचा एक एजंट नागपूरमध्ये असावा, निजामाच्या मोठ्या मुलाला प्रिन्स ऑफ बेरार हा किताब असावा, वऱ्हाडमधील सरकारी इमारतींवर वर्षातून एक दिवस निजामाचा झेंडा लागावा, वऱ्हाडची भाडेपट्टी म्हणून निजामाला वार्षिक तीस लाख रुपयांची रक्कम चालू राहावी, असा हा करार होता. निजामला जे मिळाले तेच अनपेक्षित होते. या करारामुळे वऱ्हाडवर ताबा मिळावा हे निजामाचे स्वप्न स्वप्नच ठरले. पण सर अकबर हैदरी हे अत्यंत धूर्त आणि कुटिल वत्तीचे होते. ते बाहेर आपण राष्ट्रीय वृत्तीचे असल्याचा डांगोरा पिटीत. पण त्यांचे राजकारण हे पूर्णपणे जातीयवादी होते. स्टेट कॉंग्रसच्या स्थापनेला त्यांनी शेवटपर्यंत मान्यता दिली नाही. का तर म्हणे स्टेट कॉंग्रेस ही जातीय संस्था आहे. आर्यसमाज, कॉंग्रेस आणि हिंदुमहासभा यांचे

सत्याग्रह त्यांच्याच काळात झाले. सर अकबर हैदरींचे धोरण मुसलमानांना पूर्णपणे अनुकूल नाही म्हणून रजाकारांचे पुढारी बहादूर यार जंग त्यांच्यावर नाराज असत. अनेकांनी ते इंग्रजधार्जिणे असल्याचा त्यांच्यावर आरोप केला. ही गोष्ट बऱ्याच अंशी खरी होती. इंग्रजांचे सहकार्य घेऊनच ते जातीय राजकारण खेळत होते.

सर अकबर हैदरींचे बोलणे मोठे गोड असे. ते तुळजापूरला आले तेव्हा आम्ही सर्व अधिकारी हजर होतो. तुळजाभवानीच्या देवळाला जाण्याचा रस्ता रुंद करण्यात आला होता. त्याचेही उद्घाटन त्यांनी केले. त्या वेळी त्यांनी उर्दूत भाषण केले. पण येथे मराठीत भाषणे होतील, याची कल्पना असती तर आपणही मराठीत बोललो असतो, असे ते म्हणाले. हैदराबादच्या पंतप्रधानाने असे उद्गार काढणे हा हैदराबादच्या इतिहासात नवीन प्रकार होता. या उद्गारानेच लोक खूष झाले.

सर अकबर हैदरी हे हैदराबादेस परतल्यानंतर कमिशनर [सुभेदार] गौस यार जंग हे परंड्याच्या दौऱ्यावर आले. कलेक्टर अमीरअलीखान हे त्यांच्याबरोबर होते. तोरणबावली मशीद प्रकरणात मुसलमानांची बाजू अगदीच लंगडी होती. हिंदूंनी तडजोड करावी असा आग्रह गौस यार जंग यांनी धरला. गौस यार जंग हा धूर्त मनुष्य. पैसे खाण्यात त्याची बरोबरी फार थोडे अधिकारी करू शकले असते. पण जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणात पाणीपुरवठा, वीज, शहरसफाई, नगरपुनर्रचना इत्यादी कामे त्याने चांगली केली. तडफदार पण धोरणी आणि दरबारी रीतिरिवाजात मुरलेला म्हणून त्याची ख्याती असे. त्याने हैदराबादेत स्वतःसाठी वाडा बांधला. त्यावर दीडदोन लाख रुपये तरी खर्च झाले असतील. दोन हजार रुपये पगार मिळविणाऱ्या कमिशनरने दीडदोन लाख रुपये कसे मिळविले असतील हे मात्र कुणीच विचारू नये.

गौस यार जंगचे बोलणेही मोठे गोड असे. त्याने हिंदू वकील मंडळींना सांगितले की, या प्रकरणावर मी एक तोड सुचवितो. मशिदीजवळ मिरवणूक आली की शंभर पावलांवर ती थांबावी. काही बाजेवाल्यांनी पुढे जावे आणि शंभर पावले पलीकडे जाऊन तेथे वाद्ये वाजवीत राहावे आणि मग मिरवणुकीने पुढे सरकावे. म्हणजे ठरलेल्या जागेत वाद्ये वाजणार नाहीत पण त्याच्या पलीकडे वाद्ये वाजत राहातील.

गौस यार जंगचे वागणे खानदानी असे. अंगात तलम कुडता, चुणीदार पायजामा, हातात हुक्का आणि डोळे मिचकावीत मृदू शब्दांत बोलणे असा त्याचा थाट असे. पण हिंदू वकिलांवर त्याच्या बोलण्याचा प्रभाव पडला

नाही. ते म्हणाले, याचा अर्थ म्हणजे वाद्ये बंद करावी हाच होतो. उद्या आमच्या घरातून भजने, जयजयकार करणे, मोठ्याने टाळ्या वाजवणे यालासुद्धा बंदी होणार. आमच्या घरातील लग्ने, मुंजी इत्यादी कार्यांवर नियंत्रण बसणार. ते असह्य होईल. आमचे म्हणणे असे की, ही मशीद नुकतीच आमच्या ब्राह्मण आळीत उभी करण्यात आली आहे. तिचे अस्तित्वच आम्ही मान्य करीत नाही. जेथे मुसलमान स्वतः बाजे वाजवीत तेथे आम्हांला वाद्ये वाजविण्याची बंदी व्हावी हा प्रकार विलक्षणच म्हटला पाहिजे. मुसलमानांची बाजू मुळातच लंगडी आहे म्हणून हा तडजोडीचा बूट आहे.

या बैठकीला मी हजर होतो. मी एक शब्दही बोललो नाही. तडजोडीची बोलणी फिस्कटली.

परंड्याच्या हिंदू वकिलांनी नाजिमे मूर मजहबी (धार्मिक खात्याचे संचालक) यांच्याकडे मशीद प्रकरणाचे गाऱ्हाणे नेले. त्यामुळे सुभेदार गौस यार जंग हे अतिशय चिडले. मीच परंड्याच्या हिंदूंना चिथावीत आहे अशी त्यांची पक्की खात्री झाली. त्यांनी वरपर्यंत प्रयत्न करून एकनाथांच्या पालखीचा रस्ता गावाबाहेरून नेमून घेतला. हिंदूंनी हा प्रश्न शेवटपर्यंत धसाला लावावा अशी माझी इच्छा होती. पण परंड्याच्या प्रतिष्ठित मंडळींनी हातपाय गाळले. या प्रकरणात सरकार माझ्यावर चिडले. माझी बदली महसूल खात्यातून स्थानिक स्वराज्य खात्यात करण्यात आली आणि तेलंगणातील करीमनगर नगरपालिका आणि जिल्हाबोर्ड यांचा सचीव म्हणून मला नेमण्यात आले.

सुप्रसिद्ध लेखिका कमळाबाई टिळक यांच्या हाताखाली उषाचे, बनारसला शिक्षण झाले. कमळाबाईंचे यजमान प्रा. व्ही. एस. टिळक हे बनारसला बी. ए. मध्ये शिकत असताना आम्हांला इंग्रजी शिकवीत. पुढे ते ऑक्सफर्डला जाऊन बी. ए. ऑनर्स झाले. १९४० मध्ये ते बडोदा कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक होते. १९३९ च्या उन्हाळ्यात कमळाबाई आणि त्यांचे यजमान हे परंड्याला आमच्याकडे येऊन आठ दिवस राहून गेले. टिळकांचे (आम्ही त्यांना काका म्हणत असू) इंग्रजी साहित्यावर विलक्षण प्रभुत्व होते. त्यांचा सहवास म्हणजे इंग्रजी साहित्यावरील लेक्चर्सची आम्हांला चमचमीत मेजवानी होय. कमळाबाईंनी आमच्या साहित्यसेवेचे खूपच कौतुक केले. त्या दोघांच्या सहवासात घालविलेला आठवडा मला अद्याप आठवतो. त्याच वर्षी म्हणजे १९३९ मध्ये मी बनारसला जाऊन आलो. उषा आणि मुले तेथेच होती. बनारसला माझे जुने प्राध्यापक मलानी, याज्ञिक, साहनी, खापर्डे इत्यादींच्या मी भेटी घेतल्या. उषाला मी राहात असलेली खोली दाखविली. पुन्हा एकदा दशाश्वमेध घाटावर बसून मी

गंगामाईकडे पाहात स्वतःला विसरून गेलो.

जून १९४० मधे मी परंडा सोडले आणि करीमनगरची, तेलंगणची वाट धरली. माझे मित्र सेडम व्यंकोबराव हे माझ्याप्रमाणेच मामलेदार होते. त्यांच्या मार्फतीने गौस यार जंग सुभेदार हे लाच खात असत, त्यामुळे व्यंकोबरावांवर त्यांची मर्जी होती. व्यंकोबराव यांना मधुमेहाचे दुखणे होते. ते विकोपाला जाऊन पुढे त्यातच त्यांचा अंत झाला. त्यांच्या आजारात गौस यार जंग हे त्यांच्याकडे प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी जात असत. मीही एकदा व्यंकोबरावांकडे गेलो होतो. त्यांनी गौस यार जंगांची एक आठवण सांगितली. ते म्हणाले, ‘ सेतुमाधवराव, गौस यार जंग हे माझ्याकडे आले असताना मी त्यांना म्हटले, ‘ नबाबसाहेब, सेतुमाधवरावांवर आपली इतराजी व्हावी ही एक दुर्दैवी घटना आहे. मी आणि ते लहानपणापासून एकत्र वाढलो आहोत. विलक्षण बुद्धिमान माणूस. आपण त्यांचा उपयोग करून घ्यायला हवा होता. ’ यावर गौस यार जंग म्हणाले, ‘ व्यंकोबराव, सेतुमाधवरावाची बुद्धिमत्ता मला पटते, (मैं उसके आला दिमागका काइल हूं.) पण त्याची बुद्धिमत्ता ही सैतानाची बुद्धिमत्ता आहे. (बडा शैतान दिमाग लडका है.) परंड्यात त्याने हिंदूमुसलमानांत भांडणे लावली, (परंडे में उसने हिंदू मुसलमानोंको आपस में लडा दिया. ’)

हे हैदराबादच्या मुसलमान अधिकाऱ्यांचे विचार !

त्यानंतर १९५१ मधे औरंगाबादचा कलेक्टर होईपर्यंत माझा मराठवाड्याशी संबंध आला नाही. १९४८ मधे पोलीस कारवाई झाली त्या वेळी परंड्याच्या लोकांनीही उठाव केला आणि तोरणबावलीची मशीद पायासकट खणून काढली. माझ्या ऐकण्यात तर असे आले की, ज्यांनी ती मशीद बांधली होती त्यांच्याच हातून ती खणून काढण्यात आली. कालाय तस्मै नमः ! करीमनगरला मी सप्टेंबर १९४३ पर्यंत होतो. या तीन वर्षांच्या काळात माझा एकही लेख प्रसिद्ध झाला नाही. पण पूर्वी प्रसिद्ध झालेले लेख आणि करीमनगरला मी लिहिलेले आणि प्रसिद्ध न झालेले लेख यांचे संग्रह पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. ‘ मराठवाड्यातील आधुनिक कविता ’ या माझ्या पुस्तकात मी मराठवाड्यातील कवींचा परामर्ष घेतला होता. यानंतर मी मराठवाड्यातील गद्यलेखकांकडे वळलो. यशवंतराव कोरेकल, वामनराव गाडगीळ, दिवाकर कृष्ण केळकर हे त्यावेळी मराठवाड्यातील प्रमुख गद्यलेखक होते. दिवाकर कृष्णांचे ‘ किशोरीचे हृदय ’ ही कादंबरी, समाधि व इतर सहा लघुकथा, रूपगर्विता आणि इतर कथा, पंडितराज जगन्नाथ याजवरील नाटक हे ग्रंथ महाराष्ट्रात मान्यता पावले आहेत. वामनराव गाडगीळ यांचे फिरस्त्याचे निवडक लेख आणि ‘ विचित्र संसार ’ ही कादंबरी हे

दोन्ही ग्रंथ प्रसिद्ध आहेत, काँग्रेस नेते काशिनाथराव वैद्य यांनी हैदराबादचे प्रसिद्ध पुढारी न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांचे लहानसे चरित्र लिहिले आहे. मराठवाड्यातील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक विश्वेश्वर अंबादास कानोले यांनी गुरू गोविंदसिंग यांचे चरित्र लिहिले आहे. मी या सर्व गद्य लेखकांवर लेख लिहिले. याशिवाय मराठी कथावाङ्मयात मराठवाड्यासंबंधी काय उल्लेख येतात यांचाही अभ्यास करून मी एक स्वतंत्र लेख लिहिला. हैद्राबादच्या वाग्विलास मंडळाने माझे हे पुस्तक छापण्यास घेतले. ‘ मराठवाड्यातील गद्य वाङ्मय ’ हे पुस्तक एकवीस सप्टेंबर १९४० रोजी प्रसिद्ध झाले. आपल्या एप्रिल १९४१ च्या अंकात महाराष्ट्र साहित्यपत्रिकेने “ श्री. कृष्णाकुमार यांच्या ‘ मराठवाड्यातील गद्य वाङ्मय ’ या लहानशा पुस्तकामुळे मराठी वाङ्मयेतिहासात्मक ग्रंथांत उत्कृष्ट भर पडली आहे. ” अशा शब्दांत माझ्या या पुस्तकाचा उल्लेख केला.

१२

करीमनगर
१९४० ते १९४३

माझ्या नादाने उषालाही लघुकथालेखनाची सवय लागली होती. तिच्या बऱ्याच लघुकथा 'निजामविजया'तून प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांचा संग्रह छापण्यास मी माझे मित्र ग. न. आंबेकर यांना सांगितले. उषाच्या लघुकथा-संग्रहाचे नाव मी 'कल्पना' असे ठेवले. हे पुस्तक एकतीस सप्टेंबर १९४० रोजी प्रसिद्ध झाले.

उषाने माझ्याप्रमाणेच हिंदू-मुस्लिम प्रश्नाचा अभ्यास केला होता. मुसलमानांची दरबारी वागणूक, त्यांच्या उर्दू भाषेतील ऐट, सरकारी नोकरीत त्यांना मिळत असलेले हुद्दे यामुळे काही सुशिक्षित हिंदू तरुणी मुसलमान तरुणांवर भाळल्या. काही लग्नेही घडून आली. त्यांपैकी एक गाजलेले उदाहरण म्हणजे वरंगळचे कमिशनर (सुभेदार) बद्रुद्दीन यांचा मुलगा अब्दुल कादर याचे होय. तो हैदराबाद सिव्हिल सर्व्हिसमध्ये निवडून आला. डेप्युटी कलेक्टर म्हणून त्याची नेमणूक झाली. सध्या तो आंध्र राज्यात महसूल खात्याचा सचिव आहे. सरोजिनी नायडूंच्या घराण्यातील एक मुलगी रेणुका चट्टोपाध्याय

ही एम्. बी. बी. एस. होऊन हैदराबादेत लेडी डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करीत होती. अबदुल कादर आणि रेणुका चट्टोपाध्याय यांचे लग्न हैदराबादेत बरेच गाजले. हैदराबादच्या विशिष्ट परिस्थितीत सुशिक्षित हिंदू तरुणींनी फॉरवर्ड होणे धोक्याचे आहे. आंतरधार्मिक विवाह सुखी ठरत नाहीत. स्त्रियांना काही कायदेशीर हक्क मिळाले पाहिजेत. पण खऱ्या प्रेमात आपल्या हक्कावर कोणी भर देत नाही. ही भूमिका घेऊन उषाने एक कादंबरी लिहून काढली. कादंबरीचे नाव तिने ' सुवर्णमध्य ' हे ठेवले.

सतरा फेब्रुवारी १९४३ रोजी ही कादंबरी प्रसिद्ध झाली. तिचे परीक्षण करताना प्रा. विष्णु बापूजी आंबेकर (ज्ञानप्रकाशचे संपादक बापूसाहेब आंबेकर यांचे हे चिरंजीव) यांनी ' ज्ञानप्रकाश 'च्या सोळा एप्रिल १९४३ च्या अंकात म्हटले--

" ही एक शिक्षित स्त्रीच्या जीवनाची कथा आहे. पुरुषांची तावेदारी सर्वस्वी झुगारून देऊन स्त्री-स्वातंत्र्याचा निर्भेळ पुरस्कार करणाऱ्या रजनी नावाच्या एका पदवीधर स्त्रीला पुरुषाच्या पाशवी शक्तीपुढे प्रसंगविशेषी नमण्याचा प्रसंग कसा येतो, याचा दाखला आलेला या कादंबरीत दाखविला आहे. उडाणटप्पू लोकांनी अशा स्त्रीवर संकट आणले तर त्या ठिकाणी स्त्रीस्वातंत्र्याच्या कल्पनेचे काही चालत नाही, असे एका प्रसंगाद्वारे या कादंबरीत निदर्शित केले आहे. प्रणयभंग झाला तर स्त्रीवर सूड घेणारा, प्रणयभंग झाला तरी बंधुभाव राखणारा आणि प्रणयभंग व्हावा अशी विरोधी मने असूनही प्रणयसाफल्य करणारा, असे निरनिराळ्या मनोवृत्तींचे पुरुष या कादंबरीत रंगविले आहेत. आत्यंतिक स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी शिक्षित स्त्री आणि पुरुषी कर्तबगारीच्या अहंकाराने भारावून स्त्रियांना काही अंशी तुच्छ लेखणारा पुरुष यांचा समन्वय रजनी-सुरेश या जोडीच्या मध्यस्थीने लेखिकेने दाखविला आहे. पुस्तकातील भाषा सफाईदार असून काही वर्णने लेखिकेने रसिकपणे केली आहेत. मराठवाड्यातील एका शिक्षित स्त्रीने लिहिलेल्या या कथेला प्रांतदृष्ट्या महत्त्व असून, स्त्रीजीवनाची कल्पना एका स्त्रीने विशद केली म्हणून ही कथा संग्राहक ठरेल. "

माझा ' अशोकाची पाने ' हा लेखसंग्रह सत्तावीस सप्टेंबर १९४१ रोजी प्रसिद्ध झाला. हे माझे पाचवे पुस्तक. या पुस्तकाचे चांगलेच स्वागत झाले. कवि गिरीश यांनी या पुस्तकाचे परीक्षण करताना लिहिले :

" या पुस्तकातील शब्दचित्रेही अत्यंत परिणामकारक आहेत. उर्वशीशी जिची तुलना करता येईल अशी आधुनिक युगातील कंचनी इसाडोरा हिचे भाव-

कोमल शब्दचित्र व मधून मधून तिच्या तोंडचे दिलेले कलात्मक उद्गार हे आपले मन वेधून घेतात. खोलीत समोर टांगलेल्या शंकराच्या चित्रावरून लेखकाला सुचलेले विचारतरंग पाहिले म्हणजे त्याच्या हळुवार मनाची, पल्लेदार कल्पना-शक्तीची व सूक्ष्म निरीक्षणाची कल्पना येते. या पुस्तकातील दैनंदिनीवजा कथा 'अशोकाची पाने' सर्कशीत काम करणारी तरुणी 'अंबुज अम्माळ', 'कुंदकळ्या' 'फेरीवाला' 'जाबाली', 'इरजिग' वगैरे सर्वच गोष्टी सरस व सुरस आहेत. अनेकांनी हाताळलेले तेच तेच विषय रेखाटण्यापेक्षा श्री. कृष्णाकुमार यांच्यासारखे भोवतालच्या सृष्टीचे नीट निरीक्षण केल्यास किती सुंदर विषय सापडतात हे या गोष्टींवरून दिसून येते. श्रीमंतापासून तो गरीबापर्यंत सर्वांच्या परिस्थितीचे सम्यक्‌दर्शन या गोष्टीतील पत्रांच्या चित्रणात होते. विशेषतः अंबुज अम्माळ, जाबाली व फेरीवाला या गोष्टींची गणना मराठीतील अव्वल दर्जाच्या गोष्टींत होईल. श्री. कृष्णाकुमार यांची लेखणी भावपूर्ण असून, त्यांचे चित्रण मनोवेधक व भेदक असते. त्यांच्या लिखाणांत जिवंतपणा वाटतो व तेच त्यांचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल."

एका प्रथितयश साहित्यिकाकडून निघालेले आमच्या संबंधीचे उद्गार पाहून आम्हांला किती धन्य वाटले असेल याची कल्पनाच केलेली बरी.

सुदैवाने मला करीमनगर आणि वरंगळ या दोन्ही जिल्ह्यांतून खूप फिरण्याची संधी लाभली. देवगिरीच्या यादवांचे समकालीन आणि प्रबळ असे काकतीय राजघराणे बाराव्या आणि तेराव्या शतकात वरंगळला होऊन गेले. काकतीय राजांनी बांधलेले किल्ले, देवळे आणि इतर इमारती आजही उत्तम स्थितीत आहेत. वरंगळ येथील हजार खांबांचे रुद्रेश्वराचे देऊळ काकतीय राजा पहिला प्रतापरुद्र (इ. स. ११५८ ते ११९८) याने बांधले. ते शिल्पकलेच्या दृष्टीने अप्रतिम आहे. हे देऊळ इ. स. ११६२ मध्ये बांधले गेले. त्या काळचा सुप्रसिद्ध विद्वान अचिंत्येंद्र याने देवळात लेख लिहिला आहे तो बहारीचा आहे. प्रतापरुद्राच्या राजधानीचे वर्णन करताना तो म्हणतो—

"ही राजधानी मन्मथनगरीप्रमाणे रतिशृंगार भावाने युक्त आहे. इंद्रनगरी-प्रमाणे जिष्णुविष्णुसहित केळ्याच्या बागांनी शोभायमान आहे. तेथील ब्राह्मणांच्या घरातील पोपट नको असतानाही बटूंबरोबर सांग वेदांची चर्चा करतात. वेश्यागृहातील सारिका सुरतोत्सवात निर्माण झालेल्या गोष्टींची वर्णने करून वीरांची मने रमवितात. विष्णुमूर्तिनिवास म्हणून आकाशाला व गोरूपिणी म्हणून भूमीला रुद्रदेवाचे (प्रतापरुद्राचे) घोडे शिवत नाहीत." वरंगळपासून चाळीस मैलांवर मुलुग तालुक्यात रामप्पा या गावी महादेवाचे प्रेक्षणीय

देवालय आहे. काकतीयांनी बांधलेली देवालये सगळ्या आंध्रप्रांतात विखुरली आहेत. त्यांनी बांधलेले शेकडो तलाव आजही हजारो एकर जमिनीला पाणी-पुरवठा करीत आहेत.

तेलंगणच्या ऐतिहासिक वास्तूप्रमाणेच मी तेथील निसर्गसौंदर्याने लुब्ध झालो. तेलंगणात तलाव, ताडाची झाडे, आंबराया, भाताची शेते इत्यादि मनोवेधक दृश्यांनी मला भुरळ घातली आणि सहजच माझ्या लेखणीतून लेख भराभर निघू लागले आणि पुढील वर्णने बाहेर पडू लागली :

" या तरुणीचे नाव त्रिलिंग भूमी. सेंदीच्या झाडासारखा हिचा ठेंगणा आणि टुसका बाधा. इकडील कृष्णमेघासारखा हिचा केशसंभार, इकडील तलावासारखे गहिरे डोळे, तरवड्याच्या पिवळ्या फुलासारखी हिचे उन्नत वक्षस्थळ झाकणारी कंचुकी, हिरव्या भातपिकाच्या खाचरासारखे हिचे हरितवस्त्र, मंदसमीरणाने हलणाऱ्या ताडवृक्षासारखी हिची मस्त हालचाल, या तरुणीला पाहून कुणाचे मन रमणार नाही ? "

" त्रिलिंग देशातील या सुंदर तलावाच्या काठावर बसून मनात विचारांची जी गर्दी उसळली आहे त्यांना उपमा द्यावयाची तर माझ्यासमोर जलाच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या व पुन्हा क्षणार्धात विलीन होणाऱ्या असंख्य लाटांची. घनगर्द झाडी ज्याच्या काठाशी उभी आहे, ज्याच्याखाली जीवनरसांचा अक्षय साठा होत असल्यामुळे भाताची पिके हिरव्या मखमालीचा गालीचा अजून गडद करण्यात गुंतली आहेत व ज्याच्या तळात आकाशाच्या प्रत्यही बदलत्या रूपाचे प्रतिबिंब वाटेल तेव्हा पाहून घ्यावे, अशा तलावाच्या दृश्यासारखी नेत्रास आल्हाद देणारी गोष्ट कोणती असू शकेल ? त्रिलिंग देशात लहानमोठी मिळून, नाही तरी, वीस पंचवीस हजार तळी असतील. भातशेतीला अखंड पोसणाऱ्या या तळ्यांना पाहून आपल्या स्नेहार्द्र दृष्टीने बालकांना तृप्त करणाऱ्या आईचीच आठवण होते. तेलंगणाच्या संस्कृतीला तडाग-संस्कृती म्हणण्याचा मोह होतो. निवळ पाण्यावरच तरंगणाऱ्या व कृष्णा-गोदाच्या विशाल पात्रावर अवलंबून असलेल्या त्रिलिंग देशाची संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. तलावातून काल्व्यात वाहणारे पाणी आणि तिच्यावरून वाऱ्याच्या झुळुकीबरोबर येणारा भाताचा मादक वास येथे जाणवतो. हिरव्यागार भातशेतात काम करणाऱ्या तरुणी पाहिल्या तर हिरव्या मखमालीला तांबडी निळी फुले कशिद्याने शिवली आहेत असे वाटते. वातावरणात जे काही रमणीय असू शकेल ते मनाला जाणण्याची शक्ती गर्द राईच्यामध्ये वसलेल्या तलावात आहे. खास संस्कृत काव्यात वर्णिलेल्या पुष्करणीत आणि तेलंगणातील तलावात, नागकन्येत व उफाळ्याच्या नि मनोहारी

नागकन्येइतकाच फरक आहे. संस्कृत कवींनी वर्णिलेली सरोवरे कलाप्रिय रसिकांच्या जीवनाशी निगडित झाली आहेत, पण तलावांचे तसे नाही. राष्ट्राच्या जीवनात त्यांचा फार मोठा भाग आहे. तलावाच्या रमणीयतेचा स्वाद घेताना माझी दृष्टी त्याच्या भोवती पसरलेल्या रम्य वनश्रीकडे तर असेच, पण त्यापूर्वी प्रथम तलावाखाली पिकणाऱ्या भाताकडे व त्याच्या मादक गंधाकडे असे. त्यांच्या कालव्याचे पाणी झुळझुळ वाहात असता मनाला आनंद तर देतेच; पण त्यापेक्षा जास्त आनंददायक भावना त्या पाण्यातून जीवन मिळविणाऱ्या पिकाकडे पाहून उत्पन्न होतात. या तलावांनी तेलंगणातील संस्कृती आपल्यावर तरंगत ठेवली आहे. सकाळीं तलावाचे पाणी नेण्यास आलेल्या युवती पाहा, दुपारी पाणी पिण्यास येणारी जनावरे पाहा. संध्याकाळी तलावाचे पाणी कालव्यात सोडणारा नीरडी पाहा. त्रिलिंग देशातील जीवन तलावातील पाण्याच्या लहरींवर हेलकावे खात असते. याच्या काठावरची गर्द झाडी, बेफाम फुलणारी निरनिराळी फुले, माधवीसारख्या लतांनी ज्यांना शोभा आणली आहे, असे ठिकठिकाणी पसरलेले शिलाखंड, ताडीच्या झाडांचे मंडप हे पाहून कुणाचे मन भुलणार नाही ? ”

“ मी जेव्हा जेव्हा तलावाच्या काठावर जाऊन बसतो तेव्हा माझे मन विचित्र प्रकारे ओढले जाते. रात्री शांत वेळी तारकांच्या समवेत चंद्र वरचेवर आपले रूप न्याहाळीत जललहरींबरोबर नाचतो. सकाळीं बालार्काने प्रदीप्त होऊन तेजाच्या लहरींवर लहरी निर्माण होतात. श्रीरामकृष्णांच्या मनश्चक्षूसमोरून साकार दुर्गेचे रूप एकदम ओढले जाऊन त्या जागी निराकार परमेश्वराचे रूप, ज्ञानसागराच्या अथांग लहरींच्या रूपात दृगोचर झाले त्यावेळी त्यावर असेच तेज पसरले असेल काय ? दुपारच्या प्रशांत वेळीं आकाशातील शुभ्र ढग पाण्यात प्रतिबिंबित होतात त्या वेळीं, किंवा संध्याकाळच्या वेळीं जेव्हा निष्पाप मुलीच्या मुखासारखे तलावाचे रूप सारखे हासरे असते अशा वेळीं, केव्हाही पाहा, तलावाची गूढ रम्यता मनात विचित्र हुरहूर निर्माण करते. तलावातील जल नि त्यात बिंबलेल्या वनराया व तारांगणे पाहतो त्यावेळी कोणाच्या तरी विशाल व मनोज्ञ नेत्रात निरखून पाहिल्यासारखे वाटते व काहीतरी रम्य पण गूढ अशा जाणिवेने माझे मन भरून जाते. ”

करीमनगरला लागून मानेर नदी (मन्यवरा) वाहाते. तिला पाहून सुचलेले विचार : “ भातशेताच्या पलीकडे ताडांची उंच झाडे अंतराळाला टेकून उभी असल्यासारखी दिसत होती. पश्चिमेकडे सूर्य मावळण्याच्या बेताला आला होता. तरी पूर्वेकडे आकाशात ढग अजून लालतांबडे दिसत होते.

ताडांच्या निसर्गनिर्मित मंडपाच्या मागून मान्यवरा वहात होती. तिच्या पांढऱ्या शुभ्र पाण्यावरून कुणीही कल्पना केली असती की, ही काही साधी नदी नव्हे; तर शिवाला भुरळ घालण्यासाठी अवतीर्ण झालेली श्वेतांबरा मोहिनीच जणू खांबाच्या आडून लपवाछपवीचा खेळ करीत आहे.

माझ्या तोंडून उत्तर रामचरितातील ओळ निघाली :

‘ एते ते कुहरेषु गद्गद नदद्गोदावरी वारयो ’

“ एक रमणीय सृष्टी माझ्या डोळ्यांसमोरून झटकन् निघून गेली. समोरच्या दृश्यासारखेच ते दृश्य होते. पण भवभूतीच्या सृष्टीत निव्वळ श्रांत शेते व मान्यवरेच्या काठची ताडाची झाडे नव्हती. गोदावरीच्या पात्रात आपले रूप न्याहाळून पाहाणारे वृक्ष, नदीच्या बाजूने गेलेल्या आणि फुलभाराने वाकलेल्या लतावेली, जानकीच्या कोमल हातांनी वाढविलेले कदंबवृक्ष व त्यावर नाचणारे गिरिमयूर, माधवी लतामंडपातील शिलास्थाने, नीप, कुरवक, कुटज, लोध्रा इत्यादि फुलांनी बहरलेले वन, मधूनच डोके वर काढून गंभीर मुद्रेने बसलेले प्रस्त्रवणासारखे छोटे पर्वत, ही सर्व दृश्ये माझ्या डोळ्यांसमोरून गेली. पण मान्यवरेच्या काठावरची दृश्ये गीत गोविंदातील वर्णनाशी जुळत असावीत असे मला वाटले. समोरची ताडाची झाडे, आकाशात हळुहळू जमत असलेले मेघ, लांबच लांब पसरलेली भाताची शेते, मधूनच पुसट होत गेलेली पायवाट, ताडांपलीकडे पण नदीला लागूनच वसलेले सुबक खेडे, गीत गोविंदाच्या पाना-पानावर ही दृश्ये ललित भाषेतून अमर झालेली दिसतात. ”

तेलंगणच्या निसर्गसौंदर्याची अशी कितीतरी वर्णने मी लिहून काढली.

मला तेलगू लिहितावाचता येत नसे. थोडेफार बोलता येत असे आणि कोणी बोललेले चांगले समजत असे. तेलगूतील चांगली पुस्तके वाचून काढावी आणि तेलगू जीवन आणि साहित्य यावर मराठीतून पुस्तके लिहावी, असे मला वाटू लागले. पण हे जमायचे कसे ? सुदैवाने मला याच वेळी एक रसिक मित्र भेटला. त्याचे नाव जे. लक्ष्मारेड्डी. हा करीमनगर नगरपालिकेत असिस्टंट इंजिनियर होता. तो रोज माझ्याकडे येई आणि तेलगू पुस्तके वाचून दाखवी. आधुनिक तेलगू साहित्यातील प्रवृत्ती (नव्यांध्र साहित्य वीधुलु) हा आठशे पानांचा ग्रंथ माझ्या हाती पडला. लक्ष्मा रेड्डीकडून मी त्याचे पान न् पान वाचून घेतले आणि त्यावर शेपन्नास पानांच्या नोटस काढल्या. वरंगळच्या काकतीय राजघराण्याच्या इतिहासावर तेलुगूत उत्तम पुस्तके आहेत. सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक चिलकूरि वीरभद्रराव यांचे आंध्र राज्यघराण्याचे इतिहास; वरद कवि यांचे काकतीय साम्राज्यम्, काकतीयांच्या घराण्यास जाऊन इ. स. १९२६

मधे सहाशे वर्षे झाली त्यानिमित्ताने बाहेर पडलेला काकतीय स्मारक ग्रंथ, काकतीय संचिका, तेलुगू लोकसाहित्य, तेलुगू कविता, तेलुगू नाटके असे अनेक प्रकारचे ग्रंथ रेड्डीने मला वाचून दाखविले. तो म्हणजे मला भेटलेला आदर्श रीडरच होता. 'वरंगळचे काकतीय राजे' हा माझा इतिहासावरील ग्रंथ मी लक्ष्मारेड्डीला अर्पण केला आहे. तेलुगूतील काही नाटके आणि ललिते (तेलुगूत बुज्या कथा म्हणतात.) करीमनगरला माझ्या पाहण्यात आली.

तेलुगू लिहिण्याचा मी अभ्यास केला. माझी पद्धती किचकट पण परिणामकारक ठरली. मुद्रित पुस्तकातील शब्द मी रेड्डीकडून समजून घेऊन ड्राइंगप्रमाणे लिहून काढीत असे. अशा रीतीने मी शे-दोनशे पाने तरी लिहून काढली असतील. त्यामुळे मला कोणतेही तेलुगू पुस्तक उत्तमप्रकारे वाचता येऊ लागले.

तेलुगू ही खरोखरच मधुर अशी भाषा आहे. त्या भाषेतील गाणी आणि कविता ऐकत असता ऐकणाऱ्यांची तंद्री लागते. तेलुगूतील संस्कृत शब्दांची रेलचेल पाहून मनाला विस्मय वाटतो. मराठीत शिरलेले फारसी शब्द शेकडोंनी आहेत. उलट 'नव्यांध्र साहित्यवीधुलु' या आठशे पानांच्या ग्रंथात मला अवघे पंधरा फारसी शब्द सापडले. ग्रंथातील भाषेला तेलुगूत ग्रंथिकम, आणि व्यवहारातील भाषेला व्यावहारिकम्‌ म्हणतात. तेलुगूत वापरण्यात येणाऱ्या अनेक संस्कृत शब्दांचे अर्थ मराठीतील त्याच शब्दांच्या अर्थाहून वेगळे बनले आहेत. जातीय हा शब्द तेलुगूत राष्ट्रीय या अर्थाने वापरतात. जातीयला ते कौलिक म्हणतात. जातीय दंग्यांना तेलुगूत मतकलहालु असे म्हणतात. इतिहासाला ते चरित्र म्हणतात. सरकारी या शब्दाला ते राजकीय असे म्हणतात. गव्हर्नमेंट हायस्कूलचे भाषांतर ते प्रभुत्वोन्नत पाठशाळा, असे करतात. शिक्षणक्षेत्र याला तेलुगूत विद्यारंगमु, पंचवार्षिक योजना म्हणजे पंचवार्षिक प्रणालिका, शिक्षक म्हणजे उपाध्याय, शेतीला व्यवसाय, दुष्काळाला क्षामकालम्, गव्हाला गोधूम, असे किती म्हणून शब्द सांगावेत.

तेलुगू वाङ्मयात ग्रंथलेखनाला सुरवात इ. स. १०५० पासून झाली. वेंगीचे पूर्वचालुक्य राजराज नरेंद्र याच्या काळात म्हणजे इ. स. १०५० च्या आसपास तेलुगूतील आद्यकवी व व्याकरणकार नन्नयभट्ट याने तेलुगू महाभारताच्या रचनेला सुरवात केली. चालुक्यांची राजवट जवळ जवळ ११५० पर्यंत टिकली. इ. स. ११५० पासून काकतीयांचे राजघराणे वरंगळ येथे उदयास आले. आंध्रांचे हे साम्राज्य इ. स. १३२६ पर्यंत टिकले. इ. स. १३३६ मध्ये विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना झाली. हा काळ इ. स. १५६५ पर्यंत टिकला. त्यानंतर तंजावरच्या नायकराजांनी तेलुगू वाङ्मयाला उत्तेजन दिले.

महाराष्ट्र हा इ. स. १३१७ पासून इ. स. १६५० पर्यंत मुसलमानी अमलाखाली होता. यामुळे मराठीला राजश्रय असा लाभलाच नाही. याच्या उलट वेंगी, वरंगल, विजयनगर येथील सम्राट आणि इतर मांडलिक राजांचा तेलुगू पंडितांना भक्कम आश्रय लाभला.

इ. स. १३२६ पासून १६३० पर्यंत आंध्रप्रांताचा फक्त एकतृतीयांश भाग मुसलमानी अमलाखाली होता. उरलेल्या दोन तृतीयांश भागात तीनशे वर्षे हिंदू राजवट नांदत होती. राजे लोकांच्या आश्रयामुळे तेलुगू साहित्य कथाप्रधान, संस्कृतप्रचुर आणि शैलीदार बनले. आपला सर्वमान्य ग्रंथ ज्ञानेश्वरी तर तेलुगूतील सर्वश्रेष्ठ ग्रंथ म्हणजे तेलुगू महाभारत होय. नन्नय भट्ट, तिक्कण सोमयाजी, यऱ्ह प्रगड प्रबंध परमेश्वर या कवींनी निरनिराळ्या काळात तेलुगू महाभारताची निरनिराळी पर्वे लिहून काढली. पोतन कवीचे भागवत तर आंध्रात घरोघर गायिले जाते. रामायणाचे तर तेलुगूत नऊ अनुवाद झाले आहेत. सुप्रसिद्ध कवी आणि रामभक्त त्यागराज हा तेलुगू भाषिक होता. श्रीनाथ कवीने तेलुगूत नैषधम लिहिले आहे. विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय (१५०९ ते १५२९) याचा काळ म्हणजे तेलुगू वाङ्मयाचा अत्युत्कर्षाचा काळ होय. स्वतः कृष्ण देवराय याने रचलेले अमुक्तामाल्यदया हे तेलुगूतील पंचमहाकाव्यांपैकी एक समजले जाते. तेलुगूतील पंचमहाकाव्ये म्हणजे (१) श्रीकृष्ण देवरायाचे 'अमुक्तामाल्यदया' (२) त्याचा प्रधान आणि राजकवी पेद्दणामात्य याचे 'मनुचरित्र' (३) भट्टमूर्तीचे 'वसुचरित्र' (४) पिंगल सूरणाचे 'राघव पांडवीय' आणि (५) श्रीनाथाचे 'नैषधीय' ही होत. सम्राट श्रीकृष्ण देवराय याच्या रसिकपणाची एक आख्यायिका आहे. तो हत्तीवर बसून चालला असताना समोरून कवी पेद्दणामात्य हा पालखीत बसून येताना त्याला दिसला. त्याला पाहताच कृष्णदेवराय हत्तीवरून खाली उतरला, पालखीजवळ येऊन त्याने पालखीला खांदा दिला. पेद्दणामात्याला हे पाहून फार अवघड वाटले. यावर कृष्ण देवराय म्हणाला, 'असू द्या. एका कविसम्राटाच्या पालखीला कृष्णदेवरायाने खांदा दिला म्हणून तरी माझी आठवण लोकांना राहू द्या.' धन्य ते कवी आणि धन्य ते सम्राट!

तेलुगूतील आधुनिक काळाला सुरवात, मराठीप्रमाणेच एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून झाली. इ. स. १८२७ मध्ये तेलुगूत पहिला छापखाना निघाला. ब्राउन या इंग्रज गृहस्थाने तेलुगू कोश रचला. शब्दरत्नाकर कोश इ. स. १८५० पूर्वी सीतारामाचार्य यांनी लिहून काढला. आंध्रप्रांत हा बंगाल आणि मद्रास यांच्या मध्यावर आहे. शिक्षणाच्या सुरवातीबरोबर आंध्रात

ब्रह्मसमाजाचा प्रसार झाला. त्याबरोबरच समाजसुधारणेच्या चळवळी सुरू झाल्या. या काळात प्रख्यात साहित्यिक आणि समाजसुधारक वीरेशलिंगम पंतलू, यांनी प्रचंड वाङ्मय निर्माण केले. इ. १८७० ते १९०० या काळाला तेलुगू साहित्यात वीरेशलिंगम्चे युग म्हणतात. कथा, कादंबऱ्या, नाटके, प्रहसने, निबंध, काव्य, शास्त्रीय ग्रंथ, आत्मचरित्र, आंध्र कवींचा इतिहास इत्यादि विविध प्रांतांतून वीरेशलिंगम्ची लेखणी सतत संचार करीत होती. त्यांच्या साहित्याचे वीस खंड प्रसिद्ध झाले आहेत. 'विकार ऑफ वेकफिल्ड'च्या धर्तीवर राजशेखर चरित्र, गुलिव्हर्स ट्रॅव्हल्सचा अनुवाद सत्यराजपूर्व यात्रालू, चार्लस लॅंबच्या शेक्सपियर कथांचा अनुवाद, शाकुंतलचे तेलुगू भाषांतर असे त्यांचे काही ग्रंथ आहेत. समाजसुधारणेला वाहिलेले मासिक ते चालवीत असत. परभाषेतील अनेक ग्रंथांची भाषांतरे याच काळात झाली. सत्यार्थप्रकाशाचे तेलुगू भाषांतर आदिपूडि सोमनाथराव यांनी केले. तेलुगूतील दुसरे प्रख्यात साहित्यिक म्हणजे चिलकमूर्ति लक्ष्मीनरसिंहम हे होत. यांना तेलुगूचे वाल्टर स्कॉट म्हणतात. टॉडच्या ॲनल्स ऑफ राजस्थानचे त्यांनी भाषांतर केले. राणी अहिल्याबाई, सौंदर्यतिलक, रामचंद्रविजय, या कादंबऱ्या, प्रसन्न यादव, प्रचंड यादव, पारिजातापहरणम, नरकासुरवध, गयोपाख्यान इत्यादि नाटके असे लक्ष्मीनरसिंहमचे साहित्य आहे.

निबंधकार म्हणून पाणघंटी लक्ष्मी नरसिंहराव याचे नाव प्रसिद्ध आहे. त्यांचे समग्र वाङ्मय आठ खंडांत प्रसिद्ध झाले आहे.

इ. स. १८२७ पर्यंत तेलुगू काव्य जुन्या धर्तीवर चालले होते. १९०६ पर्यंत अनेक संस्कृत काव्यांची तेलुगू कवितांतून भाषांतरे झाली. श्रीपाद कृष्णमूर्तीचे तेलुगू महाभारत, शेषाद्रि शर्माचे ब्रह्मांड पुराणाचे भाषांतर, वेदम वेंकटराय शास्त्री यांनी केलेली कालिदास, हर्ष यांच्या नाटकांची भाषांतरे, त्यांचेच कथासरित्सागराचे भाषांतर, सुब्बाराव यांचे तेलुगू वाल्मिकी रामायण इत्यादि ग्रंथ याच काळातील होत. १९०९ नंतर काव्यात आधुनिक युगाला सुरवात झाली. निसर्गवर्णने, सामाजिक आणि राजकीय प्रश्न हे हाताळले जाऊ लागले. रायप्रोळ सुब्बाराव, दुव्वूरि रामरेड्डी, गुडिजाल अप्पाराव, निट्टूरि सुब्बाराव, बसवराज अप्पाराव, विश्वनाथ सत्यनारायण इत्यादि कवींची नावे आंध्रात गाजली आहेत कादंबरीकार म्हणूनही विश्वनाथ सत्यनारायण प्रसिद्ध आहेत. त्यांची वुइपडगलू (सहस्रफणा) ही कादंबरी अतिशय लोकप्रिय झाली.

आंध्रात पूर्वी ललिते होत. त्यांना भागवतम् अगर यक्षगान अगर विधिनाटकम (रस्त्यावरील खेळ असे म्हणत). पण १९०० पासून चांगले नाटककार

निर्माण होऊ लागले. आपल्याकडील सौभद्र, संशयकल्लोळ, शारदा, मानापमान, स्वयंवर, एकच प्याला इत्यादि नाटकांप्रमाणे तेलुगूतील काही लोकप्रिय नाटकांची नावे अशी आहेत :

(१) कृष्णम्माचार्यकृत चित्रनळीयम (२) वीरेशलिंगम् पंतलूंचे शाकुंतल (३) वेल्जेपल्ली लक्ष्मीकांतमचे हरिश्चंद्र (४) तिरुपति वेंकटेश्वर कवींचे पांडवविजयम (५) वेदम वेंकटराय शास्त्रींचे ऐतिहासिक नाटक प्रतापरुद्रीयम (६) पाणघंटि लक्ष्मी नरसिंहराव यांचे राधाकृष्ण (७) चिलकमर्ति लक्ष्मीनरसिंहम यांचे गयोपाख्यान (८) गुडिजाल अप्पाराव यांचे हुंड्यावरील सामाजिक नाटक व्यवहारशुल्कम (९) वड्डादि सुब्बाराय यांचे वेणीसंहारम आणि (१०) श्रीपादकृष्ण मूर्ति यांचे बोब्बिली युद्ध नाटकम हे ऐतिहासिक नाटक.

अलीकडील तेलुगू नाटके पौराणिक कथा सोडून सामाजिक विषय हाताळू लागली आहेत. तेलुगू साहित्याचा विस्तार पाहून आपले मन स्तिमित होते. महाराष्ट्राच्या इतिहासातील अनेक विषय तेलुगू नाटक, कथा आणि कादंबऱ्या यातून हाताळले गेले आहेत. राजा शिवाजी, राणी अहिल्याबाई, पेशवा नारायणराव इत्यादि नाटके तेलुगूत चांगलीच लोकप्रिय झाली. काही मराठी ग्रंथांचीही तेलुगूत भाषांतरे झाली आहेत. ज्ञानेश्वरी, दासबोध, केकावलि, गीता-रहस्य यांची भाषांतरे मी पाहिली आहेत. गडकऱ्यांच्या एकच प्याल्याचे वोक्का पेग (एक पेग) हे तेलुगू नाटक भाषांतर आहे. अगदी अलीकडे, पण लक्षात कोण घेतो आणि उषःकाल यांची तेलुगू भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. त्या मानाने मराठीत तेलुगू साहित्य फारच थोडे उतरले आहे.

तसे पाहिले तर आंध्र आणि महाराष्ट्र यांचा घनिष्ठ संबंध आहे. गुरुचरित्राचे नायक श्रीपाद सरस्वती हे आंध्र होते. गोवळकोंड्याचे प्रधान अकण्णा आणि मादण्णा यांनी शिवाजी महाराजांच्या दक्षिण-दिग्विजयात मदत केली. महाराजांनी दर्शन घेतलेला शैल्यमल्लिकार्जुन हा आंध्रात आहे. तेथे नदीला महाराजांनी घाट बांधला तो अद्याप चांगल्या स्थितीत आहे. तिरुपतीचा वेंकटेश याला महाराष्ट्रात लाखो माणसे आपले कुलदैवत मानतात. नागपूरकर भोसल्यांनी दीड दोन लाख रुपये किंमतीचा मुकुट तिरुपतीच्या बालाजीला अर्पण केला आहे. गेल्या दोन-तीनशे वर्षांत अनेक गुणी माणसे आंध्रातून येऊन महाराष्ट्रात स्थायिक झाली. डाक्टर हेडगेवार, बाळशास्त्री हरदास, लोकनायक अणे, श्री. भवानीशंकर नियोगी, कन्नमवार, सीलम, रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण (नागपूरचे) यांची घराणी मूळची आंध्र प्रांतातील होत.

डॉक्टर राधाकृष्णन्, राष्ट्रपती गिरी, शास्त्रज्ञ डॉक्टर भगवंतम, क्रिकेटपटू नायडू इत्यादि अनेक आंध्रीयांनी विश्वव्यापी कीर्ती मिळविली आहे.

जे. लक्ष्मी रेड्डीच्या सहवासात मला तेलुगू जीवनाचे जवळून दर्शन घडले. तेलुगू साहित्याशी माझा परिचय झाला तो त्यांच्याचमुळे. रोजचे वाचन संपल्यावर मी, रेड्डी आणि पंजाबी कांट्राक्टर जगजीतसिंग हे फिरायला जात असू. जगजीतसिंगमुळे मला हीररांजा, शशीपोन्न, सोनूमहिवाल इत्यादि पंजाबी लोककथांची माहिती झाली.

करीमनगरला आम्हांला गावाच्या कडेला बंगलीवजा घर मिळाले होते. ऑफिसचे काम दहा ते पाच असे. परंडा किंवा कळमनूरी येथे दौरे करावे लागत. तेथे घोड्याच्या स्वारीचे सुख मी पूर्णपणे अनुभविले होते. करीमनगरला घोड्यांच्या ऐवजी सायकल आली. याच सुमारास आम्ही घरात रेडियो विकत घेतला. त्याचे आम्हांला कोण कौतुक. माझ्या वडिलांना तर रेडियोचे विलक्षण आश्चर्य वाटे. ते तासन् तास रेडियोचे कार्यक्रम ऐकत बसत. माझी मुले अरुण आणि अशोक आणि मुलगी अलकनंदा यांच्यामुळे घर कसे भरल्यासारखे वाटे. अलकनंदा तर एक जागी ठरत नसे. ती कोठे आहे हे पाहण्यासाठी घरभर शोधाशोध होई. उषाने तिच्या पायांत घुंगरु बांधून ठेवले. नंदाच्या घुंगुरूच्या आवाजाने ती कुठे असावी हे आम्ही ओळखू लागलो. दिवसभर तिच्या घुंगरूचा छुमछुम आवाज घरात घुमत असे. आमचे घर म्हणजे नृत्यशाळा बनल्याचा भास होई.

माझे लेखन चालूच होते. पण नियतकालिकांतून त्याला प्रसिद्धी मिळत नव्हती. तेलुगू जीवनाच्या अभ्यासात माझी दोन पुस्तके बाहेर पडली. 'त्रिलिंग देशातील दैनंदिनी' हा निबंधसंग्रह सप्टेंबर १९४३ मधे प्रसिद्ध झाला. या पुस्तकावर साहित्य-पत्रिकेत सुप्रसिद्ध साहित्यिक रा. श्री. जोग यांचा उत्कृष्ट अभिप्राय आला. वरंगळचे काकतीय राजे, हा माझा इतिहासग्रंथ १९४६ मधे प्रसिद्ध झाला.

या तीन वर्षात माझे इंग्रजी आणि मराठी वाचन विशेष झाले नाही. फ्रँक स्विनर्टनची कादंबरी ब्रूड ऑफ डकलिंग्स, गॅब्रसँचे ऐडियल म्यारेज, लाइट ऑन मॉस्को, मौररचे जर्मनी, एडगर वालेसची कादंबरी स्ट्रेंज कॉंटेस, लाइट ऑन स्पेन हे राजकीय पुस्तक, जदुनाथ सरकारांचे डिक्लाइन अॅण्ड फॉल आफ दि मोगल एम्पायरचे तिन्ही खंड, ड्यूईचे हौ टु मेक फ्रेंडस, हिटलरचे आत्मचरित्र मीन कैंफ, सुप्रसिद्ध कादंबरी गॉन विथ दि विंड, नर्तकी इसाडोरा डंकनचे चरित्र, वर्ल्ड फेमस बुक्स इन औटलाइन, अमीर अलीचे स्पिरिट ऑफ

इस्लाम ॲट क्रॉस रोडस, प्रिस्टलेचे नाटक टाइम ॲण्ड दि कॉन्वेज, आणि गार्डनिंग इन इंडिया, आयंगार कृतही इंग्रजी पुस्तके या काळात वाचलेली मला आठवतात, यांपैकी हिटलरचे आत्मचरित्र, गॉन विथ दि विंड ही कादंबरी आणि जे. बी. प्रिस्ट्ले याचे नाटक टाइम ॲण्ड दि कॉन्वेज या पुस्तकांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला.

माझे मराठी पुस्तकांचे वाचनही बरेच कमी झाले. माझ्या डायरीत त्या काळात फार थोडी मराठी पुस्तके नोंदली गेली आहेत. एकतीस आक्टोबर १९४० रोजी मी लक्ष्मीबाई टिळक यांची स्मृतिचित्रे वाचल्याची नोंद आहे. त्या पुस्तकावर मराठीतील अत्युत्कृष्ट पुस्तकांपैकी एक असा माझा इंग्रजीत शेरा आहे. उर्दू पुस्तकांत इकरामचे गालीब चरित्र गालिबनामा, आणि युसूफ़ हुसेनचे इक्बाल ही पुस्तके वाचण्यात आली. त्यावेळेपासून मला गालिब आणि इक्बाल यांच्या काव्याची ओढ लागली. पण पुढे १९५८ मधे गालिबच्या उर्दू काव्याचा मराठी अनुवाद आणि पंचवीस उर्दू कवींचा परिचय करून देणारा उर्दू काव्याचा परिचय, हे माझे ग्रंथ मुंबईला बाहेर पडतील, असे त्यावेळी मला स्वप्नातही वाटले नव्हते.

माझा धाकटा भाऊ गुरुमध्व हा अपस्माराचा कायमचा दुखणेकरी झाला होता. त्याला झटके तर येतच, पण त्याचबरोबर क्षुब्ध मनःस्थितीत तो वेडेवाकडे चाळे करू लागला. लोकांच्या अंगावर धावून जाणे, मारहाण करणे इत्यादि प्रकार त्याच्या हातून होऊ लागले. जालन्याच्या मेंटल हास्पिटलमध्ये त्याला काही दिवस ठेवून बघावे म्हणून मी त्याला जालन्याला (औरंगाबादेजवळ) घेऊन गेलो. जालन्याला त्यावेळी माझी बहीण सीताबाई आणि मेहुणे रामराव देशपांडे ही नोकरीच्या निमित्ताने राहात होती. जालन्याच्या स्टेशनवर माझे अलाहाबादचे मित्र नारायण केशव देशपांडे हे भेटले. वऱ्हाडमधील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक यादव माधव काळे यांच्याबरोबर एका खटल्याच्या निमित्ताने ते हैदराबादेस गेले होते. देशपांड्यांनी माझी आणि काळ्यांची ओळख करून दिली आणि मला एक दिवसासाठी बुलढाण्याला चलण्याचा आग्रह केला. माझ्या तोंडाला पाणी सुटले. हैदराबादच्या वातावरणात माझा जीव गुदमरून जात असे. निजामराज्याच्या बाहेर चारदोन दिवस जाण्याची संधी मिळाली तर मी ती सोडीत नसे. काळे आणि देशपांडे यांच्याबरोबर मी बुलढाण्याला गेलो. वाटेत देउळगाव राजा येथे मी व्यंकटेशाचे दर्शन घेतले. बुलढाण्याच्या थंड हवेत एक दिवस का होईना मी हैदराबाद विसरून गेलो. यादव माधव काळे हे थोर इतिहाससंशोधक होते. त्यांचे वऱ्हाडचा इतिहास, आणि नागपूर प्रांताचा

इतिहास हे ग्रंथ गाजलेले आहेत. त्यांच्या सहवासात माझा वेळ फार मजेत गेला. सात नोव्हेंबर १९४१ रोजी त्यांनी मला नागपूर प्रांताचा इतिहास हे पुस्तक भेट म्हणून दिले. ते मी अद्याप जपून ठेवले आहे.

या वर्षी माझी मुले अरुण आणि अशोक यांच्या मुंजी मोठ्या थाटाने झाल्या; व माझ्या वडिलांनी माझ्या मुलांच्या बरोबरीने तीन ब्राह्मण मुलांच्या मुंजी आमच्या घरात करविल्या. अर्थात् खर्चही बराच आला. पण वडिलांचे समाधान ही मला आणि उषाला लाख मोलाची गोष्ट वाटत होती. आपल्या मनासारखे होत आहे याचे समाधान त्यांच्या चेहेऱ्यावर पाहिले की आमचा आनंद गगनात मावत नसे.

यानंतर माझे आई-वडिल पंढरपूरला गेले. अरुण, अशोकच्या शिक्षणाची काय व्यवस्था करावी हा आम्हांला प्रश्न पडला.

काही दिवसांनी वडिलांनी पंढरपूरहून मला पत्र धाडले. मुलांचे शिक्षण करीमनगरला होऊ शकणार नाही. कारण तेथील शाळांचे माध्यम तेलुगू आहे. सबब मुलांना पंढरपूरला पाठवावे म्हणजे येथील मराठी शाळेत त्यांना घालता येईल, असे त्यांनी कळविले होते. त्याप्रमाणे मी मुलांना घेऊन पंढरपूरला जाण्यास निघालो. उषा करीमनगरला राहिली. शहाबादवाडीच्या स्टेशनवर माझ्या ओळखीचे गुलबर्ग्याचे एक गृहस्थ भेटले. त्यांनी मला विचारले—‘ का हो, कुठे चाललात ’ मी त्यांना म्हटले—“ मुलांना वडिलांपाशी सोडण्यास पंढरपूरला चाललो आहे. ” माझे उत्तर ऐकून आणि मुलांकडे पाहून ते गृहस्थ गप्प झाले. त्यानंतर मीही काही बोललो नाही. ते गृहस्थ गुलबर्गा स्टेशनवर उतरले. मी पंढरपूरला पोहोचून मुलांना वडिलांच्यापाशी सोडले. परत येताना मी वाटेत गुलबर्ग्याला उतरलो. गुलबर्ग्याला आमचे मालकीचे घर होते. मी ब्रह्मपुर आळीतील आमच्या घरी गेलो. तेथून जवळच हरिपंत वळसंगकर राहात होते. त्यांचा आमचा फार जुना घरोबा. मी परंड्याला मामलेदार असताना ते माझ्या हाताखाली पेश्कार म्हणजे अव्वल कारकून होते. आता ते सेवानिवृत्त होऊन गुलबर्ग्याला राहात असत. मी त्यांच्याकडे गेलो तेव्हा त्यांच्यापाशी दोनचार माणसे बसली होती. माझे स्वागत करून ते तेथे जमलेल्या मंडळींना म्हणाले, “ मी परंड्याला रावसाहेबांच्या हाताखाली काम केले आहे. सेतु माधवराव साहेब आणि त्यांची पत्नी ही फार अगत्यशील. तो जोडा बेनजीर होता. (ते जोडपे अप्रतिम होते.) ” त्या हरिपंतांच्या वाक्यातील ‘ होते ’ या शब्दाने माझ्या पोटात धस्स झाले. म्हणजे माझी लाडकी पत्नी मरण पावली की काय ? मी घाईघाईने त्यांना म्हटले, ‘ हरिपंत, तुम्ही काही

ऐकले की काय,' यावर हरिपंत म्हणतात–"होय हो. खरेच, तुमची पत्नी म्हणजे लाखात एक होती." त्यांचे वाक्य ऐकताच माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली. मी कसेबसे म्हटले, "हरिपंत, मी आठ दिवसांपूर्वी करीमनगरहून निघालो त्यावेळी माझ्या पत्नीला काही झाले नव्हते. या आठ दिवसांत तुमच्या कानावर काही आले की काय?" हरिपंत गडगडले, ते म्हणाले, "रावसाहेब, तुम्ही आपल्या मुलांना वडिलांकडे सोडायला म्हणून गेला होता ना?" मी म्हटले "अहो, करीमनगरला मराठी शिक्षणाची सोय नाही म्हणून त्यांना पंढरपूरला ठेवले. माझ्या पत्नीचे बरे-वाईट झाले म्हणून नव्हे." "अरेरे," हरिपंत म्हणाले, "समजुतीचा घोटाळा झाला म्हणायचा. तुम्ही मुलांना घेऊन चालला होता हे पाहून अमक्या अमक्या गृहस्थाने ती बातमी आम्हांला सांगितली. आम्हांला काही भलतेच घडले असे वाटले. बरे झाले. हा गैरसमज दूर झाला. परमेश्वर तुम्हा दोघांना उदंड आयुष्य देवो." मी हरिपंतांचा निरोप घेतला. माझ्या घराकडे मी परतलो तेव्हा माझे पाय लटपटत होते. क्षणभर माझ्या मनात विचार आला. संसाराचा सारिपाट उधळून माझी पत्नी मध्येच उठून गेली तर माझे कसे होईल. माझे जीवन शुष्क बनेल. माझे लेखन, वाचन, साहित्यसेवा ही सर्व बंद पडतील. जातीय वृत्तीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झगडत मी नोकरी बजावीत होतो. माझे मनोधैर्य खचून जाईल. कारण माझ्या पत्रिके-प्रमाणे पत्नीस्थानावर, सप्तमस्थानी शुक्र असल्यामुळेच मला साहित्यसेवेची स्फूर्ती मिळाली. पत्नीचे कौतुक लाभल्यामुळेच मला साहित्यसेवेची स्फूर्ती मिळाली. पत्नीचे कौतुक लाभल्यामुळेच मी जिद्दीने लेखनाकडे वळलो होतो. ती नाहीशी होणे म्हणजे माझी प्रतिभाच नष्ट होण्यासारखे होते. असे कितीतरी विचार त्या घटकेला माझ्या मनात येऊन गेले.

१९४२ मध्ये माझी बहीण सुशीला ही पुण्याच्या सेवासदन संस्थेतून मॅट्रिकची परीक्षा पास झाली. १९३७ मधे पंढरपूरहून ती व्हर्नॅक्युलर फायनल पास झाल्यावर पुढील शिक्षणासाठी मी तिला पुण्याला ठेवली होती. आमच्या घरातील एक मुलगी तरी मॅट्रिक झाली याचे मला कोण समाधान वाटे. तिची इच्छा पुढे शिकण्याची होती. पण एक तर तिला विसावे वर्ष चालू होते. (जन्म तेवीस नोव्हेंबर १९२२) आमच्या घरात मुलींची आणि मुलांची लग्ने लहान वयात झाली होती. माझी आई लग्नात बारा वर्षांची होती. माझी वहिनी सात वर्षांची, माझी चुलत बहीण पद्मावती अकरा वर्षांची. माझी बहीण सुशीला ही विसाव्या वर्षापर्यंत अविवाहित राहावी हे वडिलांना अगदी आवडत नसे. पण तिच्या शिक्षणाची जबाबदारी मी पत्करली असल्यामुळे त्यांना

काही बोलता येईना. पण यापुढे तिचे लग्न लांबणीवर टाकणे योग्य झाले नसते. दुसरे कारण म्हणजे माझ्या अडीचशे रुपये पगारातून माझे दर महिन्यास शंभर रुपये तरी भावाबहिणींच्या शिक्षणात खर्च होत. उरलेल्या दीडशे रुपयांत मला माझा संसार चालवावा लागे. सुशीलेचे कॉलेजचे शिक्षण आपल्याला झेपणार नाही असे मला दिसू लागले.

सुशीलेला पुण्याहून आणण्यापूर्वी मी तिला अनुरूप अशा वराची चौकशी चालविली होती. औरंगाबाद रेडियोवर माझ्या काही श्रुतिका घेण्यात आल्या होत्या. त्या निमित्ताने रेडियो स्टेशनचे सहाय्यक संचालक श्री. ताम्हणे यांचा आणि माझा परिचय झाला. ताम्हणे मोठा दिलदार माणूस. ते आता महाराष्ट्र विधान सभेच्या सचिवालयात सहाय्यक सचिव आहेत. औरंगाबाद रेडिओत माधव बळवंत जतकर (पुणें विद्यापीठाचे डॉक्टर जतकर, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ, यांचे पुतणे) हे त्यावेळी टेक्निकल असिस्टंट होते. ताम्हण्यांनी त्यांचे स्थळ मला सुचविले. एप्रिलमध्ये पुण्याहून परत येताना मी आणि सुशीला औरंगाबादेस उतरलो. वाटेत मनमाडपासून औरंगाबादेपर्यंत कवि अनिल आणि कुसुमावती-बाई ही बरोबर होती. त्या दोघांची माझी प्रथमच ओळख झाली ती या प्रवासात होय. कुसुमावतीबाईंच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने मी दिपून गेलो. आमच्या डब्यातील मुसलमान प्रवासी मला विचारू लागले—'ये कोई सिनेमा स्टार है क्या?' (ही त्यांची अभिरुची!)

संध्याकाळ रेडियो केंद्रावर मराठी कवींचे काव्यवाचन झाले. त्याला मी श्रोता म्हणून हजर होतो. भाग घेणाऱ्यांत गिरीश, मायदेव, संजीवनी मराठे, अनिल ही मंडळी होती. वा. रा. कांतही असावेत. त्याच दिवशी रात्री काव्यगायनाचा जाहीर कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी ताम्हण्यांच्या येथे माधवराव जतकरांनी सुशीलेला पाहिली. मुलगी त्यांना पसंत पडली. लग्नाची बोलणी पक्की करून आम्ही करीमनगरला परत आलो.

तेवीस मे १९४२ रोजी माझा मुलगा अभिमन्यू याचा जन्म झाला. पुढे तो काविळींने अठ्ठावीस जून १९४४ रोजी पुण्यास मरण पावला.

अकरा जुलै १९४२ रोजी माझी बहीण सुशीला हिचा विवाह पंढरपूर येथे पार पडला. माझे मेव्हणे माधवराव जतकर हे राजाराम कॉलेज कोल्हापूर येथून बी. एससी. झाले. काही दिवस ते हैदराबादच्या विवेकवर्धिनी शाळेत शिक्षक होते. त्यानंतर ते बेंगळूरला रेडियोचे शिक्षण घेण्यास गेले. एक वर्षानंतर त्यांची नेमणूक औरंगाबादच्या रेडिओ केंद्रावर झाली. माधवरावांचे संस्कृतवर चांगलेच प्रभुत्व आहे. त्यांच्याच नादाने मी करीमनगरला असताना भव-

भूतीच्या उत्तर रामचरिताची अनेक पारायणे केली.

सुशीलेच्या लग्नामुळे मी अंगावर घेतलेली एक मोठी जबाबदारी पार पडली. माझे वडील सेवानिवृत्त झाले तेव्हा सुशीला अवघी अडीच वर्षांची होती. माझा भाऊ राघवेंद्र हा पाच वर्षांचा होता. त्याचेही शिक्षण संपत आले होते. मॅट्रिक झाल्यावर बी. कॉम. होण्यासाठी त्याला सहा वर्षे लागली. शेवटी १९४३ च्या मे महिन्यात तो लखनौहून बी. कॉम. होऊन आला. जूनमधे मी त्याला इलेक्ट्रिसिटी खात्याच्या अकौंटस शाखेत नोकरी मिळवून दिली. ही दोन्ही कार्ये पार पडल्याबद्दल माझ्या वडिलांना अतिशय समाधान वाटले. आपण सेवानिवृत्त झालो त्यावेळी मुले लहान होती. आपली आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे आपले घर मोडकळीस येऊ पहात आहे, या गोष्टीची त्यांना फार खंत वाटत असे. माझे शिक्षण संपून मला नोकरी लागेपर्यंतची सात वर्षे त्यांना फार कष्टाची गेली. पण सुशिलेचा विवाह आणि राघवेंद्राचे शिक्षण ही पार पडली. माझे वडील आपल्या पिढीच्या जबाबदारीतून मुक्त झाले. त्यांचे समाधान पाहून मला मी आतापर्यंत केलेल्या खर्चाचे सार्थक झाले असे वाटले.

लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी सुशीला माहेरी आली. माझे आणि उषाचे लेखन पाहून तिलाही लेख लिहावे असे वाटू लागले. तिने आपल्या शालेय जीवनात मैत्रिणींच्या आणि इतर परिचित स्त्रियांच्या जीवनावर आधारलेल्या चवदा पंधरा लघुकथा लिहून काढल्या. त्या मी माझे मित्र आणि प्रकाशक ग. ना. आंबेकर यांच्याकडे नांदेडला पाठविल्या. कथासंग्रह गुपचुपपणे छापावा. संग्रहाचे नाव 'निराधार लता' (सुशीलेचे सासरचे नाव चारुलता होते.) ठेवावे आणि छापील प्रती दिवाळीपर्यंत पाठवाव्या अशी विनंती मी आंबेकरांना केली. त्याप्रमाणे हा सुशीलेचा कथासंग्रह ऐन दिवाळीच्या सुमारास प्रसिद्ध होऊन आला. ऐन भाऊबीजेच्या दिवशी मी तो संग्रह तिला ओवाळणी म्हणून दिला. आपण लिहिलेला हा संग्रह आहे या गोष्टीवर तिचा प्रथम विश्वास बसेना. नंतर ती आनंदाने घरभर वेड्यासारखी नाचू लागली. तिचा आनंद पाहून मला अवर्णनीय असे समाधान वाटले.

इ. स. १९४२ च्या हिवाळ्यात मी हैदराबादेस गेलो असता नारायण अय्यर नावाच्या एका गृहस्थाची माझी गाठ पडली. मला वाटते ते अर्थखात्यात नोकरीला असावेत. हस्तसामुद्रिक आणि ज्योतिष यात ते पारंगत होते. हैदराबादचे पंतप्रधान सर अकबर हैदरी यांचा त्यांच्यावर विशेष लोभ होता, असे नारायण अय्यरनीच सांगितले. सर अकबर हैदरी यांची नेमणूक हिंदुस्थान सरकारचे प्रसिद्धी आणि नभोवाणी केंद्र यांचे मंत्री म्हणून इ. स. १९४२ मधे

झाली. त्यांच्या जागी छतारीचे नबाब हे हैदराबादचे पंतप्रधान होऊन आले. सर अकबर हैदरी हे हिंदुस्थान सरकारांत मंत्रिपदावर जातील, असे भविष्य आपण वर्तविले होते असे नारायण अय्यर सांगत. साहजिकच मलाही आपले भविष्य जाणून घेण्याची इच्छा झाली. नारायण अय्यर यांनी माझे आणि माझ्या पत्नीचे हाताचे ठसे घेतले. आमच्या पत्रिकाही त्यांनी पाहिल्या. एका आठवड्यानंतर त्यांनी मला माझ्या भविष्याचा दहाबारा पानांचा रिपोर्ट दिला. तो वाचून मला मोठी गंमत वाटली. अय्यर म्हणाले, " माधवराव, तुमचा हात एका राजयोग्याचा हात आहे (म्हणजे काय ?) बृहस्पतीच्या उंचवट्यावर त्रिकोण आहे. धार्मिक कुटुंबात तुमचा जन्म झाला तो याचमुळे. याचमुळे तुम्हांला बायको मनासारखी मिळाली. तुमच्या हातात सॉलोमनरिंग आहे. अनेक भाषांचे ज्ञान आणि ललित कलांची आवड यांचे हे द्योतक आहे. बृहस्पतीच्या उंचवट्यावर चौकोन आहेत. कुटुंबसौख्य, मनमिळाऊ वृत्ती आणि एकांतवासाची आवड ही यामुळे दिसून येतात. शनीच्या स्थानावर त्रिकोण आहे. पिढीजाद इस्टेट फारशी नाही. प्रकृतीही साधारण राहील. बुद्धिरेषा बोटाच्या तळापर्यंत गेली आहे. हे चिन्ह फार चांगले आहे. तुमच्या हातातील " मत्स्यरेखेमुळे तुम्ही मध्यम वयात उच्चपदाला चढाल. शेवटी वैराग्याकडे वळाल. सूर्याची रेषा तुमचे उच्च पद आणि प्रतिष्ठा ही दर्शविते. भाग्यरेषाही चांगली आहे. "

नारायण अय्यरचे बोलणे ऐकून मला हसू आले. मी म्हटले, " मिस्टर अय्यर, अहो दोनशे ते चारशेच्या ग्रेडमधे असलेला मी साधा तहसीलदार! गेली दहा वर्षे मी त्याच जागेवर रखडतो आहे. त्यातून मला स्थानिक स्वराज्य खात्यात करीमनगरपालिका आणि जिल्हा बोर्ड यांचा सचिव म्हणून मुद्दाम ढकलण्यात आले आहे. या राजवटीत आम्हांला काय बढती मिळणार हे दिसतच आहे. आम्ही आपले चारशे रुपये पगारावर सेवानिवृत्त होणार." नारायण अय्यर म्हणाले, " तसे नाही माधवराव, तुमचा भाग्योदय होणार हे निश्चित. पण तो कसा होईल ते मी सांगू शकत नाही."

अवघ्या पाच वर्षांत पोलिस ॲक्शन होऊन निजामी राजवट कोलमडून पडेल आणि माझ्याप्रमाणे हजारो लाखो हिंदूंच्या आयुष्यात क्रांती होऊन त्यांना नवजीवन लाभेल याची मला काय आणि नारायण अय्यरला काय स्वप्नेही पडत नव्हती. दहा बारा वर्षांत मी हैदराबाद राज्याच्या गृहखात्याचा आणि शिक्षणखात्याचा सचिव होईन, असे मला कोणी सांगितले असते तर मी त्याला वेड्यात काढले असते. पण १९४२ मध्ये मी होतो लोकलफंड (स्थानिक

स्वराज्य खाते) मधील एक लहान अधिकारी. माझ्याबरोबरीचे अधिकारी मित्र विनोदाने लोकलफंडाला पोकळफंड म्हणत. आमच्या विपन्न स्थितीत आमच्या-जवळ काही नाही. रिकाम्या हातावर फक्त काही भाग्याच्या रेषा आहेत. (पास कुछ नहीं खस्ता हाली में ! चंदलकीर है दस्ते खाली में) आतापर्यंतची माझी नोकरी तालुक्यातून झाली होती. त्यामुळे जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांशी माझा विशेष संबंध येत नसे. पण करीमनगरला जिल्ह्याच्या ठिकाणीच बदली झाल्यामुळे मला तेथील अधिकाऱ्यांचे जवळून निरीक्षण करता आले. करीम-नगरला निरनिराळ्या खात्यांचे मिळून पंचवीसच्या वर अधिकारी होते. त्यांपैकी दोनतीन अधिकारी काय ते हिंदू होते. बाकीचे सगळे मुसलमान होते. सिव्हिल सर्जन, बांधकाम खात्याचे इंजिनियर, फॉरेस्ट खात्याचे अधिकारी ही मंडळी इंग्लंड किंवा अमेरिका येथील डिग्र्या संपादलेली असत. रेव्हेन्यू खात्यात मात्र अशांचे प्रमाण कमी असे.

करीमनगरला मी तीन वर्षे होतो. त्या अवधीत कायम आणि हंगामी मिळून पाचसहा कलेक्टर येऊन गेले. त्यांची माहिती दिली तर हैदराबादचा अधिकारी वर्ग कसा होता याची कल्पना येईल : (१) कलेक्टर हबीब मुहंमद हे अरब जमातीचे. बी. ए. होऊन हैदराबाद सिव्हिल सर्व्हिसमध्ये लागले. त्यांनी पुढे दाढी वाढविली. माझा भाऊ राघवेंद्र त्यांचा उल्लेख रासतफारी (इथियो-पियाचे सरदार) म्हणून करी. मी पक्का जातीयवादी आहे असा त्यांचा ग्रह होता. पोलिस ॲक्शनच्या वेळी ते वरंगळला सुभेदार (कमिशनर) होते. करीमनगर जिल्ह्यात गोळीबार होऊन त्यांत सात आठ माणसे मारली गेली. ती यांच्याच चिथावणीने असा समज होऊन लोक क्षुब्ध झाले होते. हबीब मुहंमदना आगगाडीतून ओढून काढण्यात येऊन त्यांना मारहाण करण्यात आली. त्यांच्यावर सरकारने खटला भरला होता. हा खटला करीमनगरला चालला. जेथे ते एकेकाळी कलेक्टर होते तेथेच त्यांना आरोपी म्हणून उभे राहावे लागले. रस्त्यावरून त्यांना लॉकअपकडे पायी चालविण्यात आले. हायकोर्टात ते आरोपातून सुटले. आता सेवानिवृत्त होऊन हैदराबादेत राहात असतात.

राजा एकनाथ प्रसाद, ब्रह्मक्षत्रिय जमातीचे. यांचे इंग्रजीचे ज्ञान इंग्रजी पाचवी-पर्यंतचे. यांना मधुमेहाचा आजार असल्यामुळे यांचा स्वभाव चिडखोर असे. कोणत्या गोष्टीवरून ते कुणावर रागावतील याचा नेम नसे. माझ्याशी त्यांची वागणूक विचित्र असे. चारचौघांसमोर ते माझ्यावर रागवत, पण मी एकटाच हिंदू अधिकारी म्हणून इंग्रजी रिपोर्ट करण्यासाठी मला सांगत. त्यावेळी हैदराबादेत रेव्हेन्यू आणि पोलिस खात्यातील वरिष्ठ अधिकारी इंग्रज होते. दर

पंधरवाड्याला त्यांच्याकडे जिल्ह्यातील युद्धफंडाची वसुली, अन्नधान्यपरिस्थिती इत्यादीसंबंधी इंग्रजीतून रिपोर्ट पाठवावे लागत. एकनाथ प्रसाद यांचे इंग्रजीचे ज्ञान अगाध होते. वाक्यरचना अशुद्ध असे. शुद्धलेखनाच्या असंख्य चुका होत.

व्यवस्थित रिपोर्ट लिहिण्यासाठी एकनाथ प्रसाद मला बोलावीत. कमिटी हा शब्द त्यांनी लिहिला की मी म्हणे 'साहेब, दोन एम् पाहिजेत.' एकनाथ प्रसाद रागावल्याचे नाटक करून म्हणत, 'माधवराव, तुम्हांला काही समजत नाही. तुम्ही उगीच प्रत्येक गोष्टीचा कीस काढता, बरे घ्या दोन एम्. आता झाले एकदाचे समाधान.' मला हसू आवरत नसे. मी म्हणे, साहेब दोन टी पाहिजेत.' एकनाथप्रसाद रागाने उसळून म्हणत, 'तोबा तोबा, काय तमाशा मांडला आहे तुम्ही' असे म्हणत म्हणत ते दुरुस्ती करीत. मी नंतर म्हणे 'साहेब, दोन ई पाहिजेत.' यावर ते फायलींची आदळआपट करीत पण मी सांगितलेली दुरुस्ती करीत. हे सर्व करीत असताना खोलीत आम्हा दोघांना सोडून तिसरा कोणी येऊ नये याची ते काळजी घेत. कनिष्ठांवर रागावताना त्यांच्या शिव्याही शेलक्या आणि गंमतीच्या असत. त्यांचा टायपिस्ट दिगंबरराव काळे हा परभणी जिल्ह्यातील जिंतूरचा राहणारा. त्याला रागावताना ते त्याला जयराम पेशा (गुन्हेगार जमातीचा), जिलावतन (निर्वासित) अशी विशेषणे बहाल करीत. एकदा ते रजेवर असताना त्यांचे टपाल हैदराबादच्या पत्त्यावर पाठविण्यात आले. त्यांचा पत्ता लिहिताना कारकुनाने "राजा एकनाथप्रसाद मरहूम" असे शब्द वापरले. त्याला वाटले मरहूम ही एखादी पदवी असावी. वास्तविक पाहता मरहूम म्हणजे परमेश्वराची कृपा झालेला म्हणजे कैलासवासी या अर्थाने तो शब्द वापरण्यात येतो. या चुकीवर एकनाथप्रसादांनी केलेले अकांडतांडव विलक्षण होते. मला त्यांचा प्रथम प्रथम राग यायचा, पण नंतर त्यांची कीव वाटू लागली.

एकनाथप्रसादानंतर जमील हुसेन हे कलेक्टर होऊन आले. यांचे घराणे दिल्लीचे. इकडे बी. ए. होऊन ते नोकरीला लागले. यांची बायको उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेली. तेव्हा हेही तिच्याबरोबर गेले. तेथे ऑक्सफर्डला त्यांनी रुरल एकॉनॉमीचा दहा महिन्यांचा कोर्स पुरा करून डिप्लोमा मिळविला. या गोष्टीचा त्यांना कोण अभिमान वाटे. आपल्या नावापुढे ते नेहमी एम. ए. डिप्लोमा इन रुरल एकॉनॉमी (ऑक्सफर्ड) असे लिहीत. मनुष्य दिसायला देखणा. त्या देखणेपणाचा त्याला कोण अहंकार. नोकरीवर असताना जमील हुसेनने सपाटून पैसे खाल्ले. पोलिस ॲक्शननंतर ते पाकिस्तानात पळून गेले. तेथे त्यांना नोकरी मिळाली पण लाचलुचपतीची त्यांची सवय जाईना. त्यांना

नोकरीवरून काढून टाकण्यात आले. हालअपेष्टेत त्यांचा मृत्यू झाला असे ऐकिवात आले.

रशीद नबाब हे खानदानी जहागिरदार. मनुष्य अतिशय सज्जन आणि भोळसर. यांना इंग्रजी अजिबात येत नसे. यांच्यात जातीय भावना मुळींच नव्हती. त्यांचा ज्योतिषावर बराच विश्वास असे. कलीमुल्ला काद्री हे हंगामी कलेक्टर म्हणून आले होते. हे कामात चोख, न्यायी आणि अतिशय धार्मिक होते. तरुण वयाचे असूनही यांनी लांब दाढी राखली होती. त्यांच्या धार्मिकपणाचे एक उदाहरण म्हणजे यांनी आपला फोटो कधीच काढू दिला नाही. इस्लाम धर्माला चित्रे, फोटो इत्यादि निषिद्ध आहेत असे त्यांचे मत होते.

बांधकाम खात्याचे इंजिनियर हे कामात वाकबगार पण चारित्र्याचे सैल होते. त्यांच्या रोमान्सचा बराच बोभाटा होता. सिव्हिल सर्जन हमीदुद्दीन हा अतिशय सज्जन होता. डिस्ट्रिक्ट जज्ज हे सर मिर्जा इस्माईल यांचे नातेवाईक आहेत अशी बोलवा होती. मनुष्य बुद्धिमान, त्यांचे वाचन चांगले होते. पण वागणूक अमीरउमरावाची. ते ऑफिसला चालले म्हणजे चपराशी त्यांच्यावर छत्री धरून बरोबर चालत. इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स हे उत्तर प्रदेशातील. यांचे वडील विकारुल्मुल्क हे एके काळी हैदराबादचे महसूल सचिव होते. पुढे ते अलीगडला सर सय्यद अहमद यांना जाऊन मिळाले. अबकारीचे सहाय्यक अधिकारी सरदार अलीखान यांना आपल्या पूर्वजांचा मोठा अभिमान असे. त्यांच्या वाडवडिलांना म्हणे निजामासमोर खुर्चीवर बसण्याचा मान होता. ही गोष्ट ते आवर्जून सांगत असत. रेव्हेन्यू असिस्टंट यांना तर इंग्रजी अजिबात येत नसे. पण त्यांच्या गप्पा पाहिल्या तर कुणाला वाटावे की हे राजनीतिशास्त्राचे प्राध्यापक आहेत. त्यावेळी दुसरे महायुद्ध जोरात चालू होते. आमच्या मददगार माल (रेव्हेन्यू असिस्टंट) च्या मते जगात फक्त तीनच जमाती शूर होत. एक जर्मन, दुसरी अरब आणि तिसरी तुर्क.

सरकारी ऑफिसरांचा एक क्लब असे. तेथे मी आठवड्यातून एकदा दोनदा तरी जाई. तेथे ही अधिकारी मंडळीं, अलौकिक रत्ने म्हणाना, एकत्र येत. हैदराबादच्या भविष्यात काय लिहून ठेवले आहे याचा कोणीही विचार करीत नसे. पत्ते, रेडियो, बिलियर्ड, टेनिस, टेबलटेनिस, यांचे कार्यक्रम नेहमी चालू असत पत्ते खेळण्याचा तर अधिकाऱ्यांना विलक्षण सोस असे. हैदराबाद राज्यात आठवड्याची सुटी शुक्रवारी असे. ही मंडळीं गुरुवारी रात्री पत्ते खेळण्यास बसत ती शनिवारी सकाळी उठत. कधी कधी उर्दू कवितेच्या भेंड्या लावण्याचे कार्यक्रम होत. त्यांना बैतूबाजी म्हणत. गाण्याच्या मैफिली होत. मुसलमान

अधिकाऱ्यांना शास्त्रोक्त गायनात रस नसे. त्यांना हव्या असत गजला आणि त्याही बायकांच्या तोंडून. क्लबात एका गायिकेची बैठक झाली. गायिकेच्या गजलांवर तर ते लोक खुष झालेच. पण त्याहूनही अधिक आकर्षण त्या गायिकेचे त्यांना वाटू लागले. डी. वाय. एस. पी. जैदी (हे पुढे पाकिस्तानला पळून गेले) हे या बाबतीत बरेच पुढे पुढे करीत. जैदीच्या तोंडी नेहमी अश्लील गोष्टी असत. पोलीस अधिकाऱ्यांचे आणि माझे कधीच पटले नाही. त्यांच्या मते मी कोणीतरी भयंकर क्रांतिकारक होतो. माझ्या हालचालीवर सक्त देखरेख ठेवण्यात येत असे.

माझे अलाहाबादचे वर्गबंधू एन. कोंदड रामराव हे हैदराबादेस वकिली करीत. ते सार्वजनिक चळवळीत भाग घेत. एक खटला लढविण्यासाठी म्हणून ते करीमनगरला आले. संध्याकाळी ते मला भेटण्यास आले. कॉलेजकाळच्या आमच्या गप्पा झाल्या. त्यानंतर ते जेवण करून आपल्या मुक्कामाला गेले. दुसऱ्या दिवशी कलेक्टरांनी माझा जाब विचारला. मी त्यांना कळविले की कोदंड रामराव हे माझे वर्गबंधू आहेत. आमचे बोलणे कॉलेजजीवनातील गंमतीसंबंधी होते. गृहस्थधर्मास अनुसरून मी त्यांना जेवू घातले. कलेक्टरांनी लेखी तंबी दिली. "(ऐसे मुश्तबा अशखास से आप दूर रहिये) अशा संशयास्पद व्यक्तींच्यापासून दूर राहा."

अधिकाऱ्यांच्या आपापसात मेजवान्या होत. मीही एक दोन वेळा मेजवान्या दिल्या. आमच्या पाटपाण्याची रांगोळीची मुसलमान अधिकाऱ्यांना गंमत वाटे. माझ्या बंधूंचा एक मित्र उत्तम गवई होता. त्यांचे गाणे मी माझ्या येथे करविले. अनेक अधिकारी बैठकीला हजर होते. गवयाने शास्त्रोक्त गाणी म्हटली. पण अधिकारी म्हणत 'गजल सुनाइये'. त्याने गजला म्हटल्या. त्याच्या शेवटच्या "बनावो कोहेको बंतिया, वही जावो जहां रहे सारी रतियां" या रागदारी गाण्याने सगळे मुग्ध होऊन गेले. राग समजून नव्हे, गाण्याच्या अर्थामुळे.

करीमनगरहून बारा पंधरा मैलांवर पेद्दापल्ली हे गाव आहे. पेद्दापल्लीला मद्रास दिल्ली ग्रँड ट्रंक लाइनवर रेल्वेस्टेशन आहे. हे गाव राजा धर्मकर्ण माथुर (हे घराणे मूळचे तेलंगणच्या महसूल मंत्र्यांचे होय) यांच्या जहागिरीत होते. गावच्या देशमुखांच्या लग्नसमारंभाला आम्ही गेलो होतो. मुलगा सतरा अठरा वर्षांचा असावा. या घराण्याची मला एक विलक्षण हकीकत कळली. पेद्दापल्लीचे देशमुख हे जातीने ब्राह्मण. सदाशिव देशमुख यांच्या शिक्षणाची व्यवस्था मुसलमान शिक्षकाकडे सोपविण्यात आली. त्यामुळे त्यांच्यावर मुसलमानी धर्माचा प्रभाव पडला. आपण मुसलमान व्हावे अशी त्यांना इच्छा झाली. त्यांना

एक मुलगा होता. धर्मांतराला त्यांच्या कुटुंबातील मंडळी तयार होईनात.

योगायोग पाहा. इंग्रजी इलाख्यात १८५३ च्या कायद्याप्रमाणे धर्मांतराने इस्टेटीवरचा हक्क नाहीसा होत नसे. पण इंग्रज सरकारचे कायदे आपोआप हैदराबाद राज्यात लागू होत नसत. निजाम सरकार आपले स्वतंत्र कायदे करी. ते बहुतेक इंग्रजी इलाख्यातील कायद्याप्रमाणे असत. पण स्वतंत्र असत. इंग्रजी इलाख्यातील धर्मांतराच्या कायद्याकडे निजामसरकारचे लक्ष गेले नसावे. त्यामुळे तसा कायदा हैदराबादेत झाला नाही. नाहीतर राजकर्त्यांच्या प्रभावाने किती तरी लोकांनी धर्मांतर केले असते. पिढीजाद इस्टेटीत आपली मुले हक्कदार आहेत, आपण धर्मांतर केले तर मुले आपल्याशी भांडून इस्टेट घेतील, इस्टेटीवरील आपला हक्क नाहीसा होईल या भीतीने निजामराज्यात अनेक प्रमुख व्यक्तींचे धर्मांतर टळले. नाहीतर कहर उडाला असता. हा कायदा हैदराबाद राज्यातही असावा, अशी चळवळ मुसलमानांनी सुरू केली पण वेळ निघून गेली होती. संमतिवयात वाढ करावी अशी मागणी हिंदूंनी केली. तिला मुसलमानांनी विरोध केला. त्या काळच्या हास्यास्पद अशा कायदेमंडळात मुसलमानांनी बारा वर्षांची एक मुलगी आणून उभी केली. आणि म्हटले, " कोण म्हणतो हिला चांगले-वाईट कळत नाही म्हणून. "

एकूण, इस्टेटीच्या अडचणीमुळे सदाशिवराव देशमुखांचे धर्मांतर लांबणीवर पडले. मुलगा मोठा झाल्यावर इस्टेट त्याच्या हवाली करावी आणि मग धर्मांतर करावे असा त्यांनी विचार केला. पण विधिघटना निराळीच होती. त्यांचा मुलगा मोठा झाला. त्याला एक मुलगा झाला. पण सदाशिवरावांच्या दुर्दैवाने त्यांचा मुलगा तरुणपणीच वारला. आता दोन वर्षांचा नातू राहिला. त्याला सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. त्यामुळे त्यांचे धर्मांतर थांबले. नातू मोठा होण्यापूर्वीच सदाशिवरावांचा मृत्यू झाला. ते हैदराबाद येथे मरण पावले. मरताना आपण यापूर्वीच गुप्तपणे मुसलमान झालो असे ते म्हणाले. त्यांच्या हिंदू नातेवाइकांनी त्यांचे दहन करण्याची तयारी केली तोच मुसलमानांनी प्रेत ताब्यात घेऊन ते दफन केले. परमेश्वर पैगंबरवासी सदाशिवरावांच्या आत्म्याला शांती देवो !

सदाशिवरावांच्या नातवाच्या लग्नाला आम्ही गेलो होतो. लग्नानंतर गायनाची मैफिल झाली. कलावंतिणीचे गाणे चांगले झाले. पण ती दिसायला साधारणच होती. आमचे अधिकारी मित्र बरेच नाराज झाले. ते म्हणाले, " पेद्दापल्लीचे आंबे आणि सुरेख कलावंतिणी या दोन गोष्टी प्रसिद्ध होत्या. (पेद्दापल्ली गावाभोंवती आंब्याची तीस हजार झाडे होती.) पण आंबे सगळे हैदराबादला

जातात आणि इकडे राहतात फक्त झाडे, तसेच सुरेख कलावंतिणी गेल्या हैदराबादला आणि आमच्या नशिबाला आल्या आहेत या म्हाताऱ्या. हे उद्गार लँडरेकॉर्डचे असिस्टंट अन्वरुद्दीन अहमद यांचे होते.

आमच्या शेजारी नजीरुद्दीन तहसीलदार राहात असत. यांना इंग्रजी येत नसे. शिक्षण उर्दू सातवीपर्यंत झाले असावे. हे निजामाचे नातेवाईक होते. मला वाटते, यांची आत्या निजामाच्या जनानखान्यात होती. नजीरुद्दीनचा लाचलुचपत खाण्याचा बराच बोभाटा होता. पण त्यांचे निजामाशी असलेले आप्तसंबंध लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकारी कानाडोळा करीत. आपण फार देखणे आहोत असे यांना वाटे. मला ते एकदा म्हणू लागले, " माधवराव, माझ्या बायकोला सारखे वाटत असते की मी देखणा असल्यामुळे बायका माझ्यावर भाळतील. ही गोष्ट खरी आहे. पण त्याला मी तरी काय करू ? मी देखणा झालो हा काय माझा गुन्हा झाला ? " या मूर्खाला काय म्हणावे हे मला समजेना.

नजीरुद्दीनच्या नंतर अहमदुल्लाखान नावाचे तहसीलदार आले. हे कविता करीत. यांनी आपले कवितेतील नाव मन्सूर असे ठेवले होते. सरकारी पत्र-व्यवहारातूनही हे स्वतःचा उल्लेख मन्सूर म्हणून करीत. यांच्या कविता दुय्यम दर्जाच्या असत. पण आपण अलौकिक असे साहित्यिक आहोत, आपल्या दिव्य प्रतिभेची जगाला कदर नाही, असे त्यांना सारखे वाटे. इतर अधिकारी त्यांची टिंगल करीत. कुणाची बदली झाली की मग तो कारकून असो की अधिकारी, त्या प्रसंगी मन्सूरसाहेब एखादी कविता रचून म्हणायचेच.

असे होते हे अधिकारी मंडळ. भविष्याबद्दल बेफिकीर आणि वर्तमानाच्या वैभवाच्या धुंदीत असलेले. अधिकाऱ्यांपैकी बहुतेक माणसे अलीगड विद्यापीठाची पदवीधर होती. त्यांना हिंदू संस्कृती आणि संस्कृत, मराठी, तेलगू, कन्नड या साहित्याचा गंधही नव्हता. आपल्या देशाचा इतिहास त्यांना माहीत नव्हता. मी कालिदास, भवभूती इत्यादींच्याबद्दल बोलू लागलो तर हे अधिकारी मला विचारीत (ये कोन उल्लू के पठ्ठे) हे कोण मूर्ख होते ? उलट मी गालिब आणि इक्बालबद्दल बोलू लागलो की ते म्हणायचे, " माधवराव काय विद्वान आहेत बुवा " मुस्लिमलीगबद्दल त्यांना अतिशय आपलेपणा वाटे. बहादूर यारजंगच्या रजाकारी चळवळीबद्दल त्यांना आतून सहानुभूती वाटे. पाकिस्तान केव्हा होणार याची त्यांना सारखी तळमळ लागलेली असे. पण त्याचा परिणाम हैदराबादवर काय होणार, याची त्यांना कल्पनाही नसे.

करीमनगर तसे पाहिले तर जिल्ह्याचे ठिकाण. पण लोकांत जागृती मुळीच नव्हती म्हटली तरी चालेल. गावातील वकीलवर्ग आपल्या व्यवसायापलीकडे

काही पाहात नसे. मुसलमान वकिलांचे अधिकाऱ्यांशी मेतकूट असे; जाफरहुसेन वकील हा अधिकाऱ्यांच्या पुढेपुढे करी. मी करीमनगर सोडल्यावर जाफर हुसेनचा खून झाल्याचे माझ्या ऐकण्यात आले. जिल्ह्यात दहा दहा वीस वीस हजार एकर जमीन बाळगणारे अनेक हिंदू देशमुख असत. पण राजकारण ते कसोशीने टाळीत. सामान्य खेडुतांची स्थिती अगदी शोचनीय असे. देश सुपीक आणि समृद्ध. पण मूठभर श्रीमंत आणि लाखो माणसे दरिद्री, असा हा देखावा होता.

करीमनगरला अबकारी, बांधकाम, फॉरेस्ट इत्यादींचे कंत्राटदार यांचे बरेच वजन पडत असे. यापैकी बहुतेक लोक मुसलमान असत. ही मंडळी अधिकाऱ्यांच्या मर्जीतील असत. गावात शेरखान नावाच्या अरबाचे प्रस्थ असे. जमीनजुमला, कंत्राटे, व्यापार, सावकारी असे सगळे धंदे करून त्याने अपार पैसा मिळविला होता. गुंडगिरीत त्याचा हात धरणारा कोणी नसे. गावातील सगळे लोक त्याला वचकून असत. पुढे त्याचाही खून झाला. सिराजु-रहमान वकील हेही पुढे पाकिस्तानात पळून गेले.

गावात एकही वाचनालय नव्हते. सभा-संमेलने याचे नावही कोणी काढीत नसे. सारांश चळवळींच्या दृष्टीने हा जिल्हा अतिशय मागासलेला होता.

इ. स. १९४३ मध्ये माझी बहीण सुशीला ही बाळंतपणासाठी करीमनगरला आली. माझे आईवडीलही पंढरपुराहून आले. सतरा जुलै १९४३ रोजी सुशीला प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचे नाव हर्षवर्धन ठेवले. तो आता आर्किटेक्टची पदवी घेऊन मुंबईत नोकरी करीत आहे.

सन १९३३ मध्ये नोकरी लागल्यापासून मी रजा अशी घेतलीच नव्हती. १९३६ मध्ये टॉयफाइडने मी आजारी पडलो होतो. तेव्हाच काय तो तीन महिने रजेवर होतो. आता कुठेतरी लांब जाऊन यावे असे मला वाटू लागले. पाटील-कुलकर्ण्यांच्या परीक्षेला मी परीक्षक होतो. त्याचे चारशे रुपये मानधन मला मिळाले होते. एकाएकी माझ्या मनात विचार आला की मी आणि उषा काश्मीरला जाऊन येण्यास काय हरकत आहे? माझा बेत मी घरात कुणालाच सांगितला नाही. घरी कुणालाच माझे जाणे आवडले नसते. उषालाही मी थांग लागू दिला नाही. पेद्दापल्ली स्टेशनच्या वाटेवर सुल्तानाबाद तालुका आहे. तेथे माझे मित्र विष्णू शेषराव पीलखाने हे पेश्कार (अव्वल कारकून) होते. त्यांना भेटायला जायचे आहे असे मी उषाला सांगितले. ऑफिसमधून मी दहा दिवसांची रजा काढली.

२६ ऑगष्ट १९४३ ला आम्ही करीमनगरहून निघालो. त्याच रात्री आम्ही पेद्दापल्ली स्टेशनवर दिल्लीची गाडी पकडली. अठ्ठावीस आगष्टला सकाळी

सव्वादहा वाजता आम्ही दिल्लीला पोहोचलो. पुढचा प्रवास मला अपरिचित होता. मी सरळ दिल्लीहून लाहोरचे तिकीट काढले. लाहोर जम्मू-मार्गे श्रीनगरला जावे असा आमचा बेत होता. लाहोरला आम्ही अठ्ठावीस ऑगष्टच्या रात्री पोहोचलो. तेथे चौकशी करता कळले की जम्मू-श्रीनगर मार्गावर अडथळे निर्माण झाले असून (दरडी कोसळल्यामुळे), त्या मार्गाने सध्या वाहतूक बंद आहे. रावळपिंडीकडचा मार्ग मात्र मोकळा आहे; मी लगेच रावळपिंडीचे तिकीट काढले.

वाटेत वजीराबाद, गुजरात, जेहलम ही स्टेशने लागली. जेहलमला स्टेशनच्या जवळच आर्य समाजाचे मोठे मंदिर होते. त्यावर ॐचा झेंडा फडकत होता. तो पाहून मनाला समाधान वाटले. हा वैदिक आर्यांचा प्रदेश, या भागात आर्य समाजाने शर्थीने आपल्या संस्था चालविल्या होत्या. आम्ही रावळपिंडीला संध्याकाळी चारच्या सुमारास पोहोचलो. स्टेशनजवळच्या एका हॉटेलमध्ये आम्ही उतरलो. पण ते हॉटेल म्हणजे गुंडांचे अगर आहे असे कळल्यावर आम्ही तातडीने तेथून सामान हलविले आणि नंदा बस सर्व्हिसच्या कचेरीत नेऊन टाकले. तेथेच आमची रात्री राहण्याची सोय झाली. संध्याकाळी आम्ही रावळपिंडीच्या प्रसिद्ध कंपनीबागेत फिरावयाला गेलो. दुसऱ्या दिवशी (तीस ऑगस्ट १९४३, उषाचा वाढदिवस, तिला तिसावे वर्ष लागले) आम्ही रावळपिंडी सोडली. वाटेत आम्हांला मरीचे हिलस्टेशन लागले. श्रीनगरच्या वाटेवरचे निसर्गसौंदर्य पाहून मी भारावून गेलो. जेहलमचे विस्तीर्ण पात्र पुन्हा पुन्हा आम्हांला भेटे. डोंगरावरून वाहात येणारे झरे, खोल दऱ्या, लहान-मोठ्या नद्या काय काय म्हणून पाहावे. बारामुल्लाच्या अलीकडे आम्ही जेहलम ओलांडली. बारामुल्लापासून काश्मीरचे खोरे सुरू होते. रस्ता सरळ आणि सपाट असा तीस मैलपर्यंत श्रीनगरला जाऊन भिडला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना चिनार आणि पॉप्लरची झाडे उभी होती. आम्ही संध्याकाळी श्रीनगरला पोहोचलो. बामजाई नावाच्या गृहस्थाच्या हॉटेलमध्ये उतरलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही एक शिकारा ठरविला. जेहलमच्या कालव्यातून आम्हीही दाललेकमध्ये पोहोचलो. दाललेकचा विस्तार तीनचार चौरस मैलांचा तरी असला पाहिजे. तलावात आम्हांला मधून मधून लहान बेटे आढळली. काठावर जिकडे तिकडे चिनार-पॉप्लरची झाडे दिसत होती. भोवतालचे डोंगर, आकाशातून वावरणारे पांढरे आणि तुरळक ढग, आणि तलावाच्या पृष्ठभागा-वरून संथपणे चाललेला आमचा शिकारा. ते सुरेख दृश्य अवर्णनीय होते. हैदराबादची ती जातीय आणि सरंजामी राजवट, तो माझा मनःक्षोभ मी पार

विसरून गेलो. मी उषाला म्हटले–" काल तुझा वाढदिवस होता. ही पाहा तुला घातलेली दाल तलावावरच्या विहाराची ओवाळणी. हाच आपला मधुचंद्र!"

दालतलावाच्या कडेला शालिमार बाग, निशात बाग, चश्मेशाही, महाराजांचा पांढरा राजवाडा, बोटॅनिकल गार्डन, ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. शालिमार आणि निशातमध्ये तर फळांची आणि फुलांची लयलूट होती. फळे तरी किती स्वस्त. नासपाती आणि बबूशाही ही एक रुपयात इतकी आली की ती खाता खाता आमची पुरेवाट झाली. काश्मीरचे लोक प्रचंड भातखाऊ आहेत. भाताचा ढिगारा आणि त्यावर थोडीशी भाजी हे त्यांचे अन्न. त्यावेळी काश्मीरमध्ये जाडा-भरडा तांदूळ रुपयाला तेवीस शेरांच्या भावाने मिळत असे. दुसऱ्या दिवशी (एक सप्टेंबर) आम्ही शंकराचार्यांची टेकडी, प्रदर्शन आणि पदार्थसंग्रहालय ही स्थळे पाहिली. दोन तारखेला संध्याकाळी आम्ही श्रीनगर सोडले आणि जम्मूच्या बसमध्ये बसलो. आम्हांला प्रवासात दोन रात्री मुक्कामास घालवाव्या लागल्या. एक रात्र बटोत आणि दुसरी रात्र उधमपूरच्या रेस्ट हाऊसमध्ये आम्ही राहिलो. प्रवासात मेजर कृष्णासिंग या लष्करी अधिकाऱ्याची आमची ओळख झाली. त्याचे वडील ठाकुर ध्रुवसिंग हे त्यावेळी लद्दाखचे गव्हर्नर होते. कृष्णासिंगनी आम्हांला जम्मूच्या एका उत्तम हॉटेलमध्ये भाताची मेजवानी दिली. जम्मूला आम्ही रघुनाथ मंदिर आणि अमरसिंह क्लब ही स्थळे पाहिली. आणि कृष्णासिंगचा निरोप घेऊन लाहोरच्या गाडीत बसलो. वाटेत आम्हांला सियालकोट (कविश्रेष्ठ इक्बाल यांचे गाव) लागले. आम्ही लाहोरला सकाळी पोहोचलो. मॉडेल टाऊनमध्ये माझे करीमनगरचे मित्र जगजीतसिंह चड्ढा यांचे साडू नजीरीलाल भसीन राहात होते. त्यांनी आम्हांला केशरीभाताचे जेवण दिले. वॉकर टाऊनमध्ये रेल्वे वर्कशॉप होते. ते त्यांनी आम्हांला दाखविले. तेथून निघून आम्ही जहांगीरचा मकबरा पाहिला आणि मोगलपुऱ्यात श्री. गांधी (बनारसचे प्राध्यापक एम्. पी. गांधी यांचा मुलगा) यांची गाठ घेऊन संध्याकाळी आम्ही लाहोर स्टेशनवर आलो. लाहोर शहराचे सौंदर्य काय वर्णावे! त्या सर्व प्रदेशाला भारत मुकला या कल्पनेने अद्यापही मनाची कालवाकालव होते.

लाहोरहून परत येताना आम्ही एक दिवसासाठी आग्र्याला उतरलो. ताजमहाल पुन्हा एकदा नजरेखालून घालून आम्ही आठ सप्टेंबरला करीमनगरला परत आलो. आमचा काश्मीरचा प्रवास तेरा दिवसांचा झाला आणि खर्च चारशेसाठ रुपये आला. माझ्या आयुष्यात आत्यंतिक आनंदाचे असे जे दिवस मला लाभले आहेत, त्यांत काश्मीरच्या प्रवासाचे दिवस माझ्या कायमच्या

आठवणीत राहिले आहेत.

काश्मीरच्या सफरीवरून मी परत आलो तो माझ्या बदलीचा हुकूम माझ्या हातात पडला. त्यावेळीं माझे आईवडील माझ्यापाशी होते. माझी बदली कर्नाटकात रायचूर जिल्ह्याच्या सिंधनूर तालुक्यावर झाली होती. करीमनगरला मी तीन वर्षे तीन महिने होतो. करीमनगर आणि शेजारील वरंगल या जिल्ह्यांतील ऐतिहासिक स्थळे, आणि प्रेक्षणीय देवळे मी पाहिली. या तीन वर्षांत आंध्रांचा इतिहास, त्यांची भाषा, त्यांचे साहित्य, त्यांचा स्वभाव इत्यादींची मला चांगलीच ओळख झाली. वरंगलचे काकतीय राजे, हा इतिहासावरील आणि त्रिलिंग देशातील दैनंदिनी, हे तेलगू जीवनावरील असे दोन ग्रंथ मी लिहून काढले. उर्दू साहित्यात गालिब आणि इक्बाल यांच्या काव्याचा अभ्यास करण्याची संधी मला मिळाली.

सोळा सप्टेंबर १९४३ गुरुवारी सकाळी अकरा वाजता मी करीमनगर सोडले.

१३

सिंधनूर आणि लिंगसगूर
१९४३ ते १९४४

पंचवीस सप्टेंबर १९४३ शनिवारी मी रायचूर जिल्ह्याच्या सिंधनूर या तालुक्याच्या ठिकाणी पोहोचलो. सत्तावीस सप्टेंबरला मी आपल्या मामलेदारीचा चार्ज घेतला. हैदराबाद राज्यात बेदर (काही तालुके), गुलबर्गा (कोडंगल हा तेलुगू भाषिक तालुका सोडून) आणि रायचूर (आलमपूर हा तालुका सोडून) हे कानडी भाषिक जिल्हे होते. रायचूर जिल्हा हा कृष्णा आणि तुंगभद्रा या दोन नद्यांच्या मधील प्रदेश. रायचूर हे मुंबई-मद्रास मार्गावर मोठे स्टेशन आहे. पण जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी एकाही तालुक्याला रेल्वेलाइन नव्हती; सिंधनूर हे रायचूरपासून चौपन्न मैलांवर आहे. खासगी बस सर्व्हिस असे.

रायचूर जिल्हा हा मला अपरिचित नव्हता. माझे आजोबा इ. स. १८५७ मधे प्रथम रायचूर जिल्ह्यातच नोकरीला लागले. इ. स. १८९६ मधे ते रायचूर येथे वारले. माझे वडील १८८९ मधे रायचूर कलेक्टरमधे कामाला लागले ते १९०५ पर्यंत रायचूरला होते.

१९२० मधे ते सिंधनूर आणि गंगावती या तालुक्यांवर अव्वल कारकून (पेश्कार) म्हणून काम करीत होते. मी स्वतः १९३३ मधे रायचूर आणि अमलपूर येथे तहसीलदारीचे ट्रेनिंग घेतले होते. या कारणामुळे रायचूर जिल्हा म्हणजे मला आपला स्वतःचा जिल्हा असे वाटत असे. वास्तविक पाहता या जिल्ह्यातून कृष्णा आणि तुंगभद्रा या दोन मोठ्या नद्या वाहात. पण त्यांच्यावर धरणे बांधण्याची कुणालाच घाई नव्हती. यामुळे रायचूर हा दुष्काळी जिल्हा म्हणून प्रसिद्ध झाला होता. पावसाचे प्रमाण जेमतेम पंधरा ते वीस इंचांचे असे. ज्वारी, गहू, कापूस इत्यादि पिके जिल्ह्यात होत. पण दर दोन तीन वर्षांनी दुष्काळ हा ठरलेला असे. अलीकडे तुंगभद्रेवर मोठे धरण बांधून कालवे काढण्यात आल्यामुळे जिल्ह्याचे स्वरूप पार बदलून गेले आहे.

सिंधनूर हे गाव लहान आहे. गावाची वस्ती जेमतेम चारपाच हजारांची. स्थानिक अधिकाऱ्यांत मुन्सफ (शम्सुद्दीन), आणि मेडिकल ऑफिसर, डॉक्टर वादींद्रराव देसाई, अबकारीचे इन्स्पेक्टर जगन्नाथराव हुनगुंद अशी मंडळी होती. शेतकी खात्याचे चिटणीस नावाचे गृहस्थ आठवतात. या आठवणीचे कारणही गमतीचे आहे. चिटणीसांची नोकरी फिरती असे. सिंधनूरपासून चवदा मैलांवर तुंगभद्रा नदी वाहते. तिच्या काठावर घडेसगूर म्हणून गाव आहे. तेथे सरकारचे शेती संशोधन केंद्र होते. चिटणीसांना महिन्यातून काही दिवस तरी घडेसगूरला राहावे लागे. ते सिंधनूरला येत तेव्हा मला भेटल्याशिवाय राहात नसत. मनुष्य मोठा मोकळ्या स्वभावाचा. त्यांना ज्योतिषाचा बराच नाद असे. मुलांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी त्यांनी आपली बायकामुले धारवाडला ठेवली होती. एकदा मी चिटणीसांना म्हटले, "काय हो तुम्ही, धारवाडला मधून मधून जात असाल." ते म्हणाले, "अहो, रजा मिळत नाही, पण नाताळच्या सुट्टीत एक महिन्याची रजा मी कशी तरी मिळवितो आणि धारवाडला जाऊन येतो." मी म्हटले, "तुम्ही मोठे ज्योतिषी, तुमच्या मुलांच्या पत्रिका तुम्ही पाहिल्या असतील." ते म्हणाले, "हो तर. मुलांच्या पत्रिकांच्या बाबतीत मला फार सोपे गेले. अहो माझ्या सगळ्या मुलामुलींचे जन्म सप्टेंबर महिन्यातीलच आहेत." मी आश्चर्याने विचारले, "हा योगायोगच म्हणायचा. हे कसे काय घडले बुवा ?" ते म्हणाले, "याचे कारण सहज समजण्यासारखे आहे. अहो, दर वर्षी मला रजा मिळायची ती डिसेंबरमध्येच. त्यामुळेच माझ्या मुलामुलींचे जन्म सगळे सप्टेंबरमध्येच झाले. हे प्लॅनिंग आमचे नाही. सरकारचे म्हणावे लागेल." त्यांचे उद्गार ऐकून माझी हसता हसता पुरेवाट झाली.

जिल्ह्याचे कलेक्टर हे मोठे तडफदार. त्यांचे इंग्रजीचे ज्ञान बेताचेच होते. त्यांच्या स्वभावातील घाई आणि तापटपणा ही चटकन् आढळून येत. मनुष्य कोणत्या वेळी चिडेल याचा नेम नसे. खुशामतखोरांचा त्यांच्या भोवती सदैव घोळका असे. आत्मस्तुती सतत चालू असे. बोलत असताना ते सहज म्हणून जात, " मला कलेक्टर म्हणून आपल्या प्रांतात घेण्यास चारी प्रांतांचे सुभेदार (कमिशनर) तयार होते. त्यांची आपापसात भांडणे लागली. शेवटी मला त्यांना म्हणावे लागले, ' साहेबो, मी एकटाच, मी चार ठिकाणी कलेक्टर म्हणून कसा काम करणार. आता एकच उपाय आहे. माझा एक हात एका जिल्ह्यात, दुसरा हात दुसऱ्या जिल्ह्यात टाका आणि एक पाय तिसऱ्या जिल्ह्यात टाका म्हणजे तुम्हा सर्वांचे समाधान होईल. ' आणि मग जवळच्या मंडळींनी म्हणावे की नबाबसाहेबांचा केवढा लौकिक पसरला आहे. कलेक्टरांना काही विशेष व्यसने होती असा बोभाटा साऱ्या जिल्ह्यात झाला होता. असाच बोभाटा आमचे लिंगसगूर प्रांताचे डेप्युटी कलेक्टर, आणि जवळील गंगावती तालुक्याचे मामलेदार यांच्याबद्दलही होता. यामुळे लोक या अधिकाऱ्यांच्या संबंधी त्यांच्यामागे हेटाळणीचे उद्गार काढीत.

सिंधनूरला मी सप्टेंबर १९४३ पासून ऑगस्ट १९४४ पर्यंत होतो. या काळात माझे इंग्रजी आणि मराठी वाचन बरेच कमी झाले. चारपाच पुस्तकेच वाचली. मराठी पुस्तके एकदोन वाचली असावीत. पण या काळात काही कानडी आणि उर्दू पुस्तके वाचण्याची संधी मिळाली. सिंधनूरला वाचनालय नव्हते. शाळा होती तीही सातवीपर्यंतच. माझे आईवडील पंढरपुराहून आले होते. माझी मुले माझ्या जवळच होती. मी त्यांना सिंधनूरच्या प्राथमिक शाळेत घातले. शाळेचे मास्तर दत्तोपंत हे कानडी साहित्याचे भोक्ते होते. त्यांच्यासाठी मी कानडी पुस्तके मागवून दिली. दत्तोपंतांनी संध्याकाळी माझ्याकडे यावे आणि नवीन आलेली कथाकाव्याची पुस्तके वाचून दाखवावी असे नेहमी घडे. त्यांच्यामुळे मला बेंद्रे आदि कानडी–कन्नड कवींच्या काव्याचा परिचय झाला. गावातील मुसलमानांना सांगून मी त्यांच्यासाठी उर्दू पुस्तके मागविली. अर्थात् तीही मला वाचण्यास मिळाली.

साहेबजादा मैकश या हैदराबादच्या कवीच्या कविता, प्राध्यापक अब्दुलमजीद सिद्दीकी यांचे तारीखे गोळकोंडा ही पुस्तके मी सिंधनूरला असताना वाचलेली आठवतात.

सिंधनूरच्या मुक्कामात मला काही कन्नड नाटके पाहण्यास मिळाली. सिंधनूरहून जवळच देवीचे एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. तेथे दरवर्षी मोठी यात्रा भरते.

यात्रेच्या प्रसंगी कन्नड नाटक-कंपन्या तेथे येऊन नाटके करतात. तेथे यचम नाईक, शिवपार्वती, इत्यादी नाटके पाहिल्याचे मला आठवते. यापूर्वी जवळच्या कुष्टगी या तालुक्याच्या ठिकाणी मी रणरागिणी या मराठी नाटकाचे कन्नड रूपांतर पाहिले होते.

एक दोन वर्षांपासून सरकारने अन्नधान्याचा साठा करून ठेवण्यासाठी धान्य-वसुलीची मोहीम सुरू केली होती. सिंधनूर तालुक्यात धान्य वसूल करण्यासाठी मला सारखे फिरतीवर असावे लागे. तालुका दुष्काळी झाल्यामुळे धान्याची वसुली कष्टाने होई. रायचूरला कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली अधिकाऱ्यांच्या वारंवार बैठकी होत. कलेक्टरांची वागणूक नाट्यमय होत असे. ते अधिकाऱ्यांना दमदाटी करून त्यांच्याकडून इतके इतके धान्य वसूल करून देऊ अशा प्रकारची आश्वासने जबरदस्तीने घेत. धान्यवसुली होई पण ती कष्टाने. कलेक्टरांच्या मर्जीविरुद्ध झाले की ते अधिकाऱ्यांना अद्वातद्वा बोलत. या त्यांच्या वागणुकीने एका मामले-दाराचा हार्टफेलने मृत्यू झाला. काही अधिकारी, लोकांच्या घरांत घुसून बायकांशी अतिप्रसंग करीत. एका अधिकाऱ्याला एक तरुण शेतकरी बाई म्हणाली, "अंगावरचे काही विकून तुमच्या धान्याची भरती करून द्यावी म्हटले तर माझ्यापाशी दागिनेही नाहीत." यावर त्या अधिकाऱ्याने काय करावे, आपल्या छडीने तिच्या वक्षस्थळाला स्पर्श करून तो म्हणाला, (ये जेवर है ना) "हा दागिना आहे ना!" एक दोन ठिकाणी लोकांनी पोलीस सबइन्स्पेक्टर-वर सुरीने हल्ला केला. एक बाई मध्ये पडली म्हणून सबइन्स्पेक्टर वाचला. आरोपींना कडक शिक्षा करण्यात आल्या. आणि त्या बाईचा चांदबिबीचा नवा अवतार म्हणून गौरव करण्यात आला.

या धुमाकुळीत हिंदू अधिकारी निस्तेज जीवन जगत होते. मग ते कितीही मोठ्या पदावर असोत. रायचूर जिल्हा हा गुलबर्गा सुभ्यात (प्रांत) मोडत असे. त्यावेळी गुलबर्गा प्रांताचे कमिशनर (सुभेदार) बरकतराय नावाचे एक खत्री गृहस्थ होते.

मोठमोठे हिंदू अधिकारी आपल्या खालच्या मुसलमान अधिकाऱ्यांना वचकून असत. मग बरकतराय त्याला अपवाद कसे ठरतील? लेव्हीची धान्यवसुली बरोबर होत आहे की नाही हे पाहण्यासाठी त्यांनी रायचूर जिल्ह्याचा दौरा काढला. दहा दिवसांचा कार्यक्रम होता, पण आमच्या कलेक्टरांची धांदल अशी की, त्यांनी सुभेदारांना आपला दौरा तीन दिवसांत आटोपण्यास लावले. सुभेदारांना ते एके ठिकाणी थांबून धडपणे नाश्ता करू देईनात. ज्या दिवशी बरकतराय आणि कलेक्टर सिंधनूरला येणार होते त्याच्या आदल्या दिवशी

मला निरोप आला की, ते दोघे गंगावतीहून निघून संध्याकाळी सिंधनूरला पोहोचणार आहेत. हा निरोप मला सकाळी मिळाला. मी त्यांच्या स्वागताची तयारी करीत होतो तोच ते दोघे सकाळी अकरा वाजता सिंधनूरला येऊन थडकले. मी घाईघाईने ऑफिसमध्ये गेलो. बरकतराय यांनी घाईघाईने धान्यवसुलीचे हिशेब तपासले. मी त्यांना विनंती केली की, आपण जेवून जावे. कलेक्टर म्हणाले, " नको नको, आम्ही मानवी [जवळचा तालुका] ला जाऊन जेवणार आहोत. " मी म्हटले, ' निदान चहा फराळ तरी करावा. ' कलेक्टर म्हणाले— " तेही नको. " बरकतराय जरा हताश झालेले दिसले. कलेक्टरांच्यापुढे त्यांचे काही चालेना.

बरकतराय सुभेदार यांना क्षणक्षणाला मान वेळावण्याची विलक्षण सवय होती. ती पाहून कुणालाही हसू दाबणे मुष्किल होई. आमचा धांदरट कलेक्टर त्यांना येताजाता माय डियर राजा, माय चार्मिंग राजा म्हणे. माझ्या ऑफिसची तपासणी अर्ध्या–पाऊण तासात संपली. त्यावेळी दुपारचे बारा वाजले होते. कलेक्टरने बरकतरायना चहासुद्धा घेऊ न देता ऑफिसमधून उठविले. त्यानंतर आम्ही लेव्ही धान्याच्या गोडाउनमधे गेलो. तेथे पंधरा मिनिटे आम्ही थांबलो असू. तेथून बाहेर पडताना बरकतराय भुकेने व्याकूळ झालेले दिसले. बाहेर ऊन्ह पडले होते. ते म्हणाले, " काय भयंकर ऊन्ह आहे बुवा. " आमच्या धांदरट कलेक्टरना तेवढेच निमित्त सापडले. त्यांनी बरकतरायना म्हटले, " माय डियर राजा, माय चार्मिंग राजा अशा वेळी आपल्या डोक्यावर कांदा ठेवायला पाहिजे. " (युई मस्ट पुट ओनियन ऑन यूअर हेड) इतके बोलून ते थांबले नाहीत. त्यांनी कांदा मागविला आणि तो चिरून बरकतरायांच्या टक्कल पडलेल्या डोक्यावर ठेवला. तरी बरकतराय नको नको म्हणत होते. पण त्यांचे ऐकतो कोण. बरकतराय सुटाबुटांत होते. डोक्यावर कांदा धारण केलेले त्यांचे ध्यान काही औरच होते.

साडेबाराच्या सुमारास बरकतराय आणि कलेक्टर सिंधनूर सोडून निघाले. अठ्ठावीस मैलांवर मानवी हे गाव आहे. तेथे सज्जाद हुसेन नावाचे तहसीलदार होते. ते शिया पंथी. मनुष्य मोठा रंगेल. पण त्यावेळी त्याला मुहरमचे सुतक होते. त्याने या लोकांची खाण्यापिण्याची काही सोय केली नाही. मानवीच्या रेस्ट हाऊसमधे सिव्हिल सप्लायचे असिस्टंट सहकुटुंब उतरले होते. त्याने आयत्या वेळेस चटणी-भाकर पुढे केली. तीही कलेक्टरने सुभेदारांना खाऊ दिली नाही. आता रायचूरला जाऊन जेवण करता येईल असे सांगून त्यांनी सुभेदारांना संध्याकाळी चारच्या सुमारास रायचूरला पोहोचविले. दिवसभराची दगदग,

उन्हातान्हातून भटकणे आणि पोटात काही नाही. यामुळे बरकतरायांचे डोके दुखू लागले. त्यांनी दवाखान्यातून औषध मागविण्यासाठी कलेक्टरांना सांगितले. पण आमचे धांदरट कलेक्टर म्हणतात काय–" माय डियर राजा, माय चार्मिंग राजा, डोकेदुखीवर दवाखान्याचे औषध काय कामाचे ? येथील सुप्रसिद्ध वकील मध्वराव (हे माझे आतेभाऊ होते) हे उत्तमपैकी मांत्रिक आहेत. ते तुमच्यावर मंत्र घालून तुमची डोकेदुखी बरी करतील." असे म्हणून कलेक्टरने मध्वरावांना बोलावू पाठविले. रेस्ट हाऊसमधे कमिशनरांवर (बरकतराय) मंत्रप्रयोग होत आहे आणि कलेक्टर त्या प्रकाराची आस्थापूर्वक चौकशी करीत आहेत असा विलक्षण देखावा त्यांना भेटण्यास येणाऱ्या मंडळींना दिसला. रात्री दहाच्या मेलने कलेक्टरांनी सुभेदारांना गुलबर्ग्याला पाठवून दिले.

असे होते हे हिंदू अधिकारी. आमच्या कलेक्टराच्या उतावीळ स्वभावाचे असेच आणखी एक उदाहरण घडले.

त्या काळात फजलनवाज जंग हे सप्लाय खात्याचे सेक्रेटरी होते. ते पुढे लायक अलीच्या रजाकार मंत्रिमंडळात मंत्री झाले. फजलनवाज जंग आणि आमचे कलेक्टर हे दोघे लेव्ही धान्यवसुलीच्या तपासणीसाठी म्हणून दौरा करीत सिंधनूरला आले. मी ऑफिसमध्ये काम करीत बसलो होतो. अनपेक्षितपणे ते दोघे आलेले पाहताच माझी तारांबळ उडाली. माझ्या टेबलापाशी दोनच खुर्च्या होत्या. एक मी बसलो होतो ती आणि दुसरी एक. माझ्या समोरच्या हॉलमध्ये वकील मंडळीसाठी लांब टेबल आणि पाचसात खुर्च्या होत्या. माझ्या जवळच भिंतीला टेकून दोन पायांची खुर्ची ठेवली होती. ती दोन पायांची कशी याचा एक इतिहास होता. आमच्या तहसील ऑफिसची इमारत नवीन आणि सरकारी होती. यापूर्वी ऑफिस एका जुन्या इमारतीत होते. तिचे छत्र एकाएकी कोसळले. माझ्या पूर्वीच्या तहसीलदारांची बसण्याची खुर्ची तीन पायांची होती. तिचा एक पाय तुटून ती दोन पायांची झाली. पुढे ऑफिस नवीन इमारतीत आले. तेव्हा ती खुर्चीही बरोबर आली. बसण्यासाठी तिचा काही उपयोग होणार नव्हता. मी ती भिंतीला टेकवून तिच्यावर कायद्याची पुस्तके ठेवली होती. मी त्या खुर्चीचे अस्तित्वही विसरून गेलो होतो. फजलनवाज जंग आणि आमचे कलेक्टर हे एकाएकी माझ्या ऑफिसमध्ये आलेले पाहाताच मी उठून उभा राहिलो. एका खुर्चीवर फजलनवाजजंग बसले. दुसरी म्हणजे माझी खुर्ची मी कलेक्टरांच्या पुढे केली आणि तिसरी खुर्ची शिपायांनी आणावी म्हणून मी बेल वाजविली. कलेक्टर माझ्या खुर्चीवर बसले नाहीत. माझे लक्ष बेल वाजविण्यात गुंतले होते. इतक्यात कलेक्टरांनी भिंतीला टेकविलेली दोन पायांची

खुर्ची [ती धड असेल असे समजून] ओढली आणि तिच्यावर ते बसले. एका क्षणात खुर्ची खाली कोसळली आणि तिच्याबरोबरच कलेक्टरसाहेबही खाली पडले. फजलनवाज जंग मला मोठ्याने म्हणाले, " हेल्प हिम, हेल्प हिम. " मी आणि फजलनवाजजंग दोघेही घाबरलो. खुर्ची होती लहान आणि कलेक्टरांचे शरीर होते मोठे. गोलाकार. खुर्चीत ते अडकून पडले. त्यांचे दोन्ही पाय वर आणि डोके खाली असा प्रकार झाला. मी आणि फजलनवाजजंग यांनी त्यांच्या शरीराखाली हात घालून मोठ्या कष्टाने त्यांना मोकळे केले. मला हसू आवरत नव्हते, पण कलेक्टरांचा क्षोभ पाहून मी गप्प बसलो.

उतावीळ स्वभावामुळे कलेक्टरांच्यावर अनेकदा ठपका आला. एका खटल्या-बद्दल ते विनाकारण मुन्सफला दमदाटी करू लागले. त्याने सरळ सगळी हकीगत हायकोर्टाला कळविली. हायकोर्टाने तुमच्यावर कोर्टाची बेअदबी [कंटेम्प्ट ऑफ कोर्ट]चा खटला का भरू नये याचा जाब द्या म्हणून त्यांच्यावर नोटीस बजाविली. कलेक्टर हैदराबादेस गेले आणि त्यांनी हायकोर्टात सपशेल माफी मागितली तेव्हा कोठे हे प्रकरण मिटले.

आमचे डेप्युटी कलेक्टर म्हणजे एक वल्ली होती. यांचे घराणे मूळचे उत्तर प्रदेशचे. यांचे वडील एक नामांकित कलेक्टर होऊन गेले. डेप्युटी कलेक्टर हे पदवीधर होते. ते उर्दूमध्ये उत्तम कविता करीत. पण आपण सुंदर आहोत असा त्यांना भ्रम होता. ते डोळ्यात काजळ घालीत. एकदा दीर्घ निःश्वास सोडून मला ते म्हणाले, ' माधवराव, आता मी थोडा फुगलो आहे, पण एके काळी मी सुंदर दिसत होतो. ' त्यांच्याही विशेष आणि न सांगण्याजोगा व्यसनांचा बोभाटा झाला होता. लैंगिक गोष्टीबद्दल ते बोलत तेव्हा ते म्हणत, " सर्वांत पौरुषयुक्त जमात म्हणजे अरबांची होय. पठाणाची शरीरयष्टीच नुसती पाहून घ्यावी. " मी अधिक तपशील देत नाही. सुज्ञांनी ओळखावे. आमचे डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस हे दिल्लीच्या प्रतिष्ठित आणि खानदानी घराण्याचे होते. एकदा मी त्यांना म्हटले, " आमच्या डेप्युटी कलेक्टरच्या मते अरब हे खरे पौरुषयुक्त. पठाण हे नुसते धिप्पाड शरीराचे. " यावर ते माझ्याकडे सूचकपणे पाहात आणि स्मित करीत म्हणाले, " प्रयोगाअंतीच त्यांनी आपले हे मत बनविले असावे. " असे असले तरी डेप्युटी कलेक्टरांना इस्लामचा मोठा अभिमान. येता-जाता मुसलमानांचा गौरव आणि हिंदूंची गर्भित हेटाळणी ते आपल्या बोलण्यात आणीत. अर्थात त्यांना उत्तरे देण्यात मीही मागेपुढे करीत नसे. एरव्ही मनुष्य शिष्टाचाराला चांगला.

अली अहमद हा माझ्या ऑफिसमधील एक कारकून. सप्टेंबर १९४३ मधे

मी सिंधनूरला जाऊन कामाचा चार्ज घेतल्यानंतर दोन-चार दिवसांतील गोष्ट. माझ्याकडे एक निनावी अर्ज आला. त्यांत म्हटले होते, " अली अहमदचा या गावातील एका प्रतिष्ठित घरातील विधवेशी अनैतिक संबंध चालू आहे. ही गोष्ट गर्हणीय आहे. त्याची बदली येथून ताबडतोब करण्यात यावी. " अशाच प्रकारचा एक अर्ज कलेक्टरांच्याकडे गेला असावा. कारण त्यांनी डेप्युटी कलेक्टरांना या प्रकरणाची चौकशी करण्याचा हुकूम दिला. मी गावात याबद्दल बारकाईने चौकशी केली. गावात ब्राह्मण आळीत रंगम्मा नावाची एक मध्यम वयाची विधवा राहात असे. तिला वीस वर्षांचा एक मुलगा होता. तो मुद्गल गावात शिक्षक म्हणून काम करीत असे. रंगम्माचे वय पस्तीसचे असावे. तिला सतरा अठरा वर्षांची एक मुलगी होती. मुलीचे लग्न झाले होते आणि या लग्नापासून तिला एक मुलगी झाली होती. अलीअहमदचे घर ब्राह्मण आळीला लागून होते. अली अहमदचे वय तीसपर्यंत असावे. त्याची लग्नाची बायको होती. असे असूनही त्याचे रंगम्माशी संघटण वाढू लागले. सिंधनूरच्या हिंदू-मुसलमानांत या प्रकरणाचा गवगवा होऊ लागला. या बातमीने मला किती क्षोभ वाटला असेल याची कल्पनाच केलेली बरी. मी ठरविले की, अली-अहमदची सिंधनूरहून उचलबांगडी करावी. दहा-पंधरा दिवसांत डेप्युटी कलेक्टर चौकशीसाठी आले. त्यांनी माझे मत विचारले. मी म्हटले, " हा जरी खासगी प्रश्न असला तरी एका सरकारी नोकराच्या कृत्याने गावच्या लोकांत असंतोष निर्माण होणे हे राज्याच्या दृष्टीने हितावह होणार नाही. माझ्या मते अली-अहमदची येथून बदली होणेच इष्ट आहे. "

डेप्युटी कलेक्टरांना माझे म्हणणे पटले, अलीअहमदची बदली लिंगसगूरला डेप्युटी कलेक्टरच्या ऑफिसमध्ये करण्यात आली. आपली बदली थांबविण्यात यावी म्हणून अलीअहमदने पुष्कळ प्रयत्न केला. एकदा कलेक्टर सिंधनूरच्या दौऱ्यावर आले असताना त्याने माझ्या समक्ष त्यांना याबद्दल विनंती केली. कलेक्टर माझ्याकडे वळले. मी इंग्रजीत त्यांना सांगितले, " आपण दिलेला हुकूम अंमलात आलेला बरा. " कलेक्टर काय समजायचे ते समजले. तुला लिंगसगूरला जावे लागेल असे त्यांनी शेवटी अलीअहमदला बजाविले. शेवटी अलीअहमदला सिंधनूर सोडून लिंगसगूर (सिंधनूरपासून तीस मैलांवर) ला जावे लागले. तिकडे रुजू झाल्यानंतर तो कॅजुअल लीव घेऊन आपले सामान-सुमान हलविण्यासाठी म्हणून सिंधनूरला आला.

मी त्यावेळी लेव्ही धान्याच्या वसुलीसाठी खेड्यापाड्यांतून दौरा करीत होतो.

ज्या दिवशी अलीअहमद सिंधनूरहून निघणार होता त्या दिवसाची हकीकत.

अलीअहमदने रंगम्माला आपल्याबरोबर चलण्यास सांगितले. ती बाई संध्याकाळच्या सुमारास आपल्या घरातून उठून सरळ अलीअहमदच्या घरात जाऊन बसली. त्या दिवशी सिंधनूरचे मेडिकल ऑफिसर डॉक्टर वादींद्रराव देसाई यांच्याकडे पोस्ट मार्टमची एक केस आली होती. सिंधनूरच्या सरकारी दवाखान्यात पोस्ट मार्टमसाठी वेगळी सोय नव्हती. झाडाखाली अगर नदीच्या वाळवंटात पोस्ट मार्टम करीत असत. डॉक्टर देसायांना दिवसभर उन्हात उभे राहून पोस्ट मार्टमचे काम करावे लागले. काम आटोपून घरी परत आल्यावर डॉक्टरांना ताप भरला. संध्याकाळी माझी पत्नी उषा ही बैलगाडीत बसून डॉक्टरांच्या समाचाराला गेली. डॉक्टरांचे घर ब्राह्मण आळीत होते. उषा डॉक्टरांच्या घरापाशी पोहोचली तोच तिच्या कानावर बंदुकीचे बार झाल्याचा आवाज आला. काय झाले असावे याची तिला कल्पना येईना. कल्पना येणार कशी ? कारण, त्याच क्षणी अलीअहमदने रंगम्माच्या जावयाचा खून केला होता.

रंगम्मा अलीअहमदच्या घरात जाऊन बसली. ही गोष्ट बाहेर पसरताच सिंधनूरमध्ये एकच खळबळ उडाली. रंगम्माचा जावई गावातच होता. तो पाच-पंचवीस माणसांना बरोबर घेऊन अलीअहमदच्या घरावर गेला. लोकांनी घराचे दार ठोठावले. अलीअहमदने दार उघडले. त्याच्या हातात भरलेली बंदूक होती. त्याला पाहाताच लोक म्हणाले, “ आमच्या घरची बाई तुमच्या घरात आली आहे तिला घेऊन जाण्यासाठी आम्ही आलो आहोत. ” हे त्यांचे शब्द ऐकताच अलीअहमद भडकला. रंगम्माचा जावई समोरच उभा होता. त्याच्यावर अलीअहमदने बंदूक चालविली. गोळी त्या माणसाच्या छातीतून निघून गेली. मेलो मेलो असे म्हणत तो जमिनीवर धाडकन कोसळला. त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या. चारपाच मिनिटांतच तो मरण पावला. रंगम्माच्या मुलीला कळले की, आपला नवरा मारला गेला आहे. तिने मागेपुढे न पाहता आपल्या सहा महिन्यांच्या मुलीला घेऊन विहिरीत उडी घेतली आणि जीव दिला. अवघ्या अर्ध्या तासात तीन माणसे मृत्युमुखी पडली. अलीअहमदच्या घरा-समोर जमलेली माणसे रंगम्माच्या जावयाचे प्रेत घेऊन परत गेली. पोलिसांनी अलीअहमदला आपल्या ताब्यात घेतले. मला ही बातमी मी जवळगिरा या खेड्यात असताना लागली. मी दुसऱ्या दिवशी सिंधनूरला परत आलो.

मेलेल्यांचे पोस्ट मार्टम सिंधनूरला करावे तर डॉक्टर देसाई तापाने आजारी त्यामुळे तिन्ही प्रेते बैलगाडीतून अठ्ठावीस मैलांवर मानवी या गावी पाठविण्यात आली. प्रेते सडू नयेत म्हणून त्यांच्यावर लिंबाचा पाला घालण्यात आला.

पोलिसांनी अलीअहमदवर खटला भरला. त्याबरोबरच पाचपंचवीस हिंदूंचीही धरपकड करण्याचा पोलीसने प्रयत्न केला. याचा सुगावा लागताच बरीच माणसे जवळच असलेल्या इंग्रजी इलाख्यातील विजापूर जिल्ह्यात पळून गेली.

खटला सिंधनूरच्या मुन्सफसमोर चालावयाला हवा होता. पण याच वेळी सिंधनूरचे मुसलमान मुन्सफ शम्सुद्दीन हे रजेवर गेले होते. हे गृहस्थही मोठे गमतीदार होते. हे दिसायला तळीरामासारखे किडकिडीत होते. पण येता-जाता मिशीला पीळ देत हम अहले सैफ, आम्ही शस्त्रधारी जमातीचे लोक, असा स्वतःचा उल्लेख करीत. मुसलमान अधिकाऱ्यांच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी आपली बायकामुले हैदराबादेत ठेवली होती, सिंधनूरला ते एकटेच राहात, सुरपुरच्या एका नर्तकीवर त्यांचे प्रेम असावे; कारण सिंधनूरला आपल्या घरात त्यांनी तिचे चित्र लावले होते. चित्राशी ते तासनतास स्वगत भाषण करीत. चित्राला उद्देशून ते म्हणत [" आप मुझसे गुफ्तगूं क्यों नहीं करते,] तुम्ही माझ्याशी बोलत का नाही, [क्या आप मुझपर खपा है], आपण माझ्यावर रागावलात काय ? " सिंधनूरच्या लोकांना तो एक थट्टेचा विषय होऊन बसला होता.

शम्सुद्दीनच्या जागी राजेश्वरराव जहागिरदार हे हंगामी मुन्सफ होऊन आले. सुप्रसिद्ध कवी आणि संत मध्वमुनीश्वर (' तू माझा यजमान रामा ' ही कविता मध्व–मुनीश्वराची) यांचे ते वंशज. अलीअहमदने अर्ज केला की, सिंधनूरच्या कोर्टात मला न्याय मिळेल अशी आशा नाही. तर माझा खटला गंगावतीच्या मुन्सफकडे वर्ग करावा. सरकारी अधिकारी त्याची सोय पाहण्यासाठी तयारच होते. गंगावतीच्या कोर्टात चौकशी सुरू झाली. अलीअहमदने कोर्टात सांगितले की, स्वसंरक्षणार्थ मला गोळी चालवावी लागली पोलिस प्रॉसिक्यूटरनेही या गोष्टीचा इन्कार केला नाही. अलीअहमदची सुटका करण्यात आली. रंगम्माचे धर्मांतर करण्यात येऊन गंगावतीतून तिची मिरवणूक काढण्यात आली. यानंतर तिचा अलीअहमदशी निका लावण्यात आला. लवकरच अलीअहमदची जिल्हा कचेरीत बदली करण्यात आली. रंगम्माला राशनिंग ऑफिसमध्ये काम देण्यात आले.

पोलिसांनी सिंधनूरच्या प्रतिष्ठित हिंदूंच्यावर खटला भरला. जमाव करून ते अलीअहमदच्या घरावर चालून गेले आणि त्याचा जीव त्यांनी धोक्यात आणला असा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. आम्हा हिंदू अधिकाऱ्यांनाही त्यांनी या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न केला. मी घटनेच्या दिवशी दौऱ्यावर होतो. डॉक्टर देसाई यांनी ताप असल्याचे सोंग केले, अबकारीचे इन्स्पेक्टर जगन्नाथ-राव दौऱ्यावर होते, बांधकाम खात्याचे ओव्हरसीयर दत्तात्रयराव हेही दौऱ्यावर

होते. हे सर्व पूर्वनियोजित होते असे भासविण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. पण हे सर्व हास्यास्पद आहे असे ठरवून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तिकडे लक्ष दिले नाही. जिल्हा कोर्टाने हिंदूंच्यावरील आरोप फेटाळून लावून त्यांच्या सुटकेचा हुकूम दिला. डिस्ट्रिक्ट जज्ज हा अतिशय भला माणूस. त्याने पोलिसांना म्हटले, " किती जुलूम कराल आणि सरकारला किती बदनाम कराल. या गोष्टीला काही मर्यादा. या घटनेमुळे सगळा हिंदू समाज दुःखात आहे. त्यावर डागण्या देण्यासाठी म्हणून त्यांच्यावर तुम्ही खटले भरता काय ? भवितव्याचा थोडा तरी विचार करा. " पोलीस ॲक्शननंतर अली अहमदसंबंधी माझ्या कानावर आले ते हे की, कुणी तरी त्याच्यावर हल्ला करून त्याचे हातपाय तोडून टाकले. या प्रकरणाचा असा भीषण शेवट झाला.

माझा धाकटा भाऊ राघवेंद्र हा नोकरीला लागला होता. १९४३ च्या अखेरीस त्याचे लग्न झाले. माझी चुलत बहीण पद्मावती उर्फ पद्माक्का हिची मुलगी रजनी हिच्याशी त्याचा विवाह झाला. माझ्या वडिलांच्या सगळ्या जबाबदाऱ्या आता संपल्या.

इ. स. १९४४ मधे रजाकारांचे पुढारी बहादुर यार जंग वारले. गेल्या सात-आठ वर्षांत त्यांनी इत्तेहादुलमुसलमीन ही मुसलमानांची जातीय संस्था हातात घेऊन तिच्यात प्रचंड शक्ती निर्माण केली. रजाकार हे या संस्थेचे लढाऊ अंग. सरकारलाही बहादुरयार जंगाचा वचक वाटू लागला. आम्ही मुसल्मान हे दक्षिणचे राजे आहोत, अनल् मलिक, निजामाच्या सार्वभौमत्वात आम्ही सगळे मुसलमान सहभागी आहोत, निजाम हा आमच्या हितसंबंधांचा ट्रस्टी आहे, ट्रस्ट व्यवस्थितपणे न चालविल्यास त्याला ट्रस्टीपदावरून काढण्याचा आम्हांला अधिकार आहे. अशी घोषणा करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. त्यांच्या मृत्यूनंतर रजाकार चळवळीची सूत्रे त्यांच्यापेक्षाही कट्टर अशा कासिम रजवीच्या हातात गेली, आणि हैदराबादचे वातावरण विषारी जातीयवादाने भरून गेले.

हैदराबाद राज्य काँग्रेसची स्थापना करण्याचे अनेक प्रयत्न झाले, पण सरकार काँग्रेसच्या स्थापनेला परवानगी देईना. लोकांनी शेवटी मराठवाडा, तेलंगण, आणि कर्नाटक या तिन्ही भागात परिषदा स्थापना केल्या. परिषदांची वार्षिक अधिवेशने होऊ लागली.

१९४४ च्या मे महिन्यात रायचूर येथे कर्नाटक परिषदेचे अधिवेशन भरले. माझा मुलगा अभिमन्यु हा काविळेने अतिशय आजारी झाला. त्याला औषधोपचार व्हावा म्हणून त्याला पुण्याला पाठविण्याचे मी ठरविले. पंचवीस मे १९४४ रोजी मी, उषा, आणि माझी मुले मिळून रायचूरला गेलो; माझे मित्र

वासुदेवराय हे रायचूरला सिव्हिल सप्लायचे असिस्टंट होते. त्यांचे घर स्टेशन-पासून जवळ होते. आम्ही त्यांच्याकडे उतरलो. मद्रासहून येणारी मुंबई मेल रायचूरला रात्री दहाच्या सुमारास येई. संध्याकाळी मी कलेक्टरना भेटून आलो. आमचे पूर्वीचे कलेक्टर बदलून त्यांच्या जागी जैनुल आबिदीन नावाचे कलेक्टर आले होते. माझा मुलगा काविळीने आजारी असल्यामुळे मी बायकापोरांना आज रात्रीच्या गाडीने पुण्याला पाठवीत आहे. उद्या सकाळी मी सिंधनूरला परत जाईन, असे मी जैनुल अबिदीनना सांगितले. वासुदेवरावाकडे जेवणीखाणी झाली. उषा आणि मुले पुण्याला गेली. रात्री झोपण्यासाठी म्हणून मी माझे वर्गबंधू माणिकराव वकील यांच्या घरी गेलो. त्यांच्या घराला कुलूप होते. कर्नाटक कॉन्फरन्सचे अधिवेशन चालू होते त्याला ते गेले आहेत असे मला कळले. मी माणिकरावांकडे निरोप पाठवला. मी तिकडे गेलो. बाहेर रस्त्यावर गाडी उभी केली आणि ड्रायव्हरबरोबर मी मोटारीतून खाली उतरलोही नाही. अधिवेशनाच्या मंडपापासून मी एक फर्लांग दूर असावा. पण पोलिसांनी माझ्यासंबंधी चौकशी केली आणि वरिष्ठांकडे रिपोर्ट पाठविला की, सेतु—माधवरावांनी कर्नाटक कॉन्फरन्समध्ये भाग घेतला. मला या गोष्टीचा पत्ताही नव्हता. थोड्या वेळाने माणिकराव आले आणि मग आम्ही दोघे मिळून त्यांच्या घरी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मी सिंधनूरला गेलो.

माझा मुलगा अभिमन्यू हा पुढील महिन्यात अठ्ठावीस जूनला पुण्याला वारला. त्याच्या मृत्यूची बातमी मला पत्राने मिळाली. बातमीने माझे मन खिन्न झाले. माझे मित्र राजेश्वरराव मुन्सफ हे स्वभावाने मोठे रसिक आणि विनोदी. ते माझे सांत्वन करण्यास आले. पण त्यांचा विनोदी स्वभाव जाईल कुठे ? ते मला म्हणाले, “अहो असे खिन्न काय होता ? तुम्हांला आणखी मुले होतील. तुमचे आडनाव पगडी आहे. शीर सलामत तो पगडी पचास” त्या स्थितीतही मला त्यांच्या कोटीचे हसू आले.

यानंतर दोनतीन दिवसांतच कलेक्टरनी माझा जाब मागितला. तुम्ही कर्नाटक कॉन्फरन्समध्ये भाग घेतला असा रिपोर्ट मिळाला आहे. यावर तुमचे काय म्हणणे आहे असे त्यांनी विचारले होते. मी घडलेली सर्व हकीकत त्यांना लिहून कळविली. पत्राच्या शेवटी मी लिहिले होते, “सरकारी नोकरांची कर्तव्ये मी ओळखतो. राजकीय परिषदेत मी भाग घेतला अशी आपली समजूत व्हावी ही आश्चर्याची गोष्ट आहे” माझ्या उत्तराने जैनुल आबिदीनचे समाधान झाले नाही. पोलिसांच्या खोट्या रिपोर्टमुळे निजाम राज्यातील अनेक हिंदू अधिकाऱ्यांना विलक्षण त्रास सोसावा लागला. माझे मित्र जगन्नाथराव मुन्सफ हे एका कीर्तनाला

गेले होते. कथेकरी बुवांनी भक्त प्रल्हादचे आख्यान लावले होते. पोलिसांनी रिपोर्ट केला की, कथेकऱ्याचा हेतु हिरण्यकश्यपू म्हणजे निजामी राजवट असे दाखविण्याचा होता. नाहीतर हे आख्यान त्याने लावलेच नसते. राजकीय प्रचाराच्या कीर्तनाला मुन्सफांनी हजर राहावे ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. या रिपोर्टामुळे जगन्नाथरावांची बढती कित्येक वर्षे थांबवून ठेवण्यात आली. आर्यसमाजी हे कट्टर आणि धर्मवेडे, त्यामानाने सनातनी हे सात्त्विक आणि सोज्वळ असा अधिकाऱ्यांचा समज असे. त्यामुळे तडफदार हिंदू अधिकाऱ्यांना ते पहिला प्रश्न हाच करीत. माझे मित्र कुमरय्या (आता आंध्र हायकोर्टाचे न्यायमूर्ती) हे त्यावेळी रायचूर जिल्ह्यात मुन्सफ होते. डिस्ट्रिक्ट जजांनी त्यांना गुप्त पत्र लिहून विचारले, " आप किस मजहब के हैं, आप आर्या हैं या सनातनी " माझे मित्र बळवंतराव घाटे [सेवानिवृत्त सेशनजज्ज औरंगाबाद] यांच्या पाठीमागे तर पोलिस हात धुऊन लागलेले असत. ते कळंबला मुन्सफ असताना आर्य–समाजाचे अधिवेशन तेथे भरले होते. त्यासाठी सरकारची रीतसर परवानगी मिळविण्यात आली होती. अधिवेशनाच्या वेळीं मुसलमानांचा जमाव झाला. त्यात सरकारी नोकर, फार काय मुन्सफ कचेरीचे कारकून, शिपाई हे सामील होते. बळवंतरावांच्या प्रसंगावधानाने दंगल टळली, पण पोलिसांनी खोटे रिपोर्ट पाठवून या प्रकरणात मुन्सफसाहेबांची फूस आहे असे भासविले. मुसलमानांनी हैदराबादला तारा पाठवून यहां की हालत बहोत खतरनाक है असे कळविले. त्यावरून हायकोर्टाने इन्स्पेक्टिंग ऑफिसर गाजीजंग यांना कळंबला पाठवून चौकशी करविली. तो सगळा बनावट प्रकार त्यांच्या लक्षात आला. बळवंतराव पैठणला मुन्सफ असताना तेथे प्रभातफेऱ्यांची अडवणूक होऊ लागली व शांतता कायम राहावी म्हणून पोलिसांनी गावातून मोठ्या संख्येने मार्च केला. पोलिस अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून बळवंतरावांनी त्या प्रसंगी समयोचित भाषण केले. पोलिसांनी वर रिपोर्ट पाठविला त्यात म्हटले होते की बळवंतरावांनी त्या प्रसंगाच्या भाषणात पोलीस खात्याची टिंगल उडविली. माझे मित्र दुर्गय्या (ते सेक्रेटरीच्या हुद्यापर्यंत पोहोचून सेवानिवृत्त झाले), मामलेदार असताना त्यांनी एका स्त्रीशी अतिप्रसंग केला असा त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांना सस्पेंड करण्यात आले. चौकशीअंती ती स्त्रीच अस्तित्वात नव्हती असे सिद्ध झाले आणि दुर्गय्याला विनाकारण त्रास दिल्याबद्दल कलेक्टर अलीअसगर बिलग्रामी आणि डेप्युटी कलेक्टर ताहिर सिद्दीकी यांच्यावर ठपका आला. अशी किती म्हणून उदहरणे सांगावीत.

ऑगष्ट १९४४ मध्ये माझी बदली रायचूर जिल्ह्यातच लिंगसगूर या तालुक्यावर करण्यात आली. सिंधनूर हे तुंगभद्रेच्या पश्चिमेस चवदा मैलांवर आहे

उलट लिंगसगूर हे गाव कृष्णेच्या दक्षिणेस चौदा मैलांवर आहे. सिंधनूरपासून लिंगसगूर तीस मैलांवर आहे. सिंधनूर, कुष्टगी, गंगावती आणि लिंगसगूर हे तालुके लिंगसगूरच्या डेप्युटी कलेक्टरच्या अमलाखाली असत. लिंगसगूरला पोलिसचा डेप्युटी सुपरिंटेंडेंटही राहात असे. माझ्यावर नजर ठेवणे अधिक सोयीचे जावे म्हणूनही माझी बदली लिंगसगूरला करण्यात आली असावी.

इ. स. १८५३ मध्ये इंग्रजांनी निजामाकडून वऱ्हाड घेतला. त्याच वेळेला त्यांनी निजामचे रायचूर आणि उस्मानाबाद हे जिल्हे ताब्यात घेतले. रायचूर जिल्ह्यात त्यांनी लिंगसगूरला आपले मुख्य ठाणे ठेवले. सुप्रसिद्ध कादंबरीकार आणि इतिहासकार कर्नल मेडोज टेलर हा काही दिवस लिंगसगूरला होता. तेथे त्याच्या बायकोचे थडगे आहे. थडग्यावर शब्द कोरले आहेत (नॉट लॉस्ट बट गॉन बिफोर) नाहीशी झाली नाही, फक्त माझ्याआधी गेली आहे. त्या शब्दांनी माझ्या मनात विलक्षण कालवाकालव झाली. माझी उषा अशीच माझ्या आधी गेली तर ! छे मग आपणही तिच्याबरोबरच जावे. असा विचार त्यावेळी माझ्या मनात आल्याचे मला आठवते.

इंग्रजांनी इ. स. १८६१ मध्ये रायचूर आणि उस्मानाबाद हे जिल्हे परत दिले. त्यांच्या काळात बांधलेल्या काही इमारती अद्याप आहेत. लिंगसगूरची वस्ती पाचसहा हजारांच्यावर नाही. पण गाव मोठे टुमदार आहे. गावाला लागूनच एक मोठा तलाव आहे. तलावाच्या काठावर क्लबाची आकर्षक इमारत उभी आहे. आठवड्यातून दोनचार वेळा तरी मी क्लबाला जात असे.

क्लबात जुन्या इंग्रजी पुस्तकांची एक लायब्ररी होती. इंग्रजी पुस्तकांसाठी मी हपापलो होतो. जुनी का होईना, इंग्रजी पुस्तके आहेत ना या विचाराने मी लायब्ररीतील बरीच पुस्तके वाचून काढली. आगस्ट १९४४ पासून १९४५ च्या मार्च अखेरपर्यंत मी लिंगसगूरला होतो. लिंगसगूरला मी आणखी एक उपक्रम केला. गोविंदराव कायमखाने हे नुकतेच लिंगसगूरला डेप्युटी कलेक्टर होऊन आले होते. त्यांच्या पूर्वीचा डेप्युटी कलेक्टर गद्वाल संस्थानचा व्यवस्थापक म्हणून बदलून गेला होता. इतर हिंदू अधिकाऱ्यांमध्ये मुन्सफ बागात श्रीनिवासराव, मेडिकल ऑफिसर डॉक्टर चिंचोळीकर, बांधकाम खात्याचे इंजिनियर, अमीनगड ही मंडळी होती. गावातील प्रतिष्ठित मंडळींचे मी मन वळविले. माझी योजना अशी होती :

वरील मंडळींपैकी प्रत्येकाने आपल्याला कोणता विषय आवडतो हे सुचवावे. मग पुस्तके कोणत्याही भाषेतील असोत. मी पुस्तकांची निवड करून ती मागवून घेई. ती पुस्तके ज्याच्या नावावर मागविली तो त्यांचा मालक. इतर सभासद ती

पुस्तके वाचून त्याला परत करीत. यामुळे माझ्या लिंगसगूरच्या मुक्कामात प्रत्येकाने आवडीची आठ दहा पुस्तके तरी मागविली. अशा रीतीने शे दीडशे पुस्तके लिंगसगूरमधे उपलब्ध झाली.

या काळात माझे मराठी लेखन थांबले होते. वरंगळचे काकतीय राजे या माझ्या ग्रंथाचे हस्तलिखित मी ग. ना. अंबेकर यांना ते लिंगसगूरला मला भेटण्यास आले असताना दिले, ते पुढे १९४६ मधे प्रसिद्ध झाले.

लिंगसगूर तालुक्यात बरीच इतिहासप्रसिद्ध स्थळे आहेत. हट्टी येथील सोन्याच्या खाणी लिंगसगूर तालुक्यात आहेत. सम्राट अशोक याची दक्षिण प्रांताची राजधानी सुवर्णगिरीला होती. ती लिंगसगूरच्या जवळपास असावी असा इतिहासज्ञांचा तर्क आहे. लिंगसगूर तालुक्यात म्हस्की (बौद्धांच्या महासंघ या शब्दावरून) हे गाव जगप्रसिद्ध आहे. सम्राट अशोकाचे शिलालेख भारतात ठिकठिकाणी आढळून येतात, पण आदेशावर अशोक हे नाव आढळून येत नाही. त्याची बिरुदे देवानामप्रिय, प्रियदर्शन हीच लेखात आढळतात. पण ही बिरुदे धारण करणाराच अशोक होय अशी इतिहाससंशोधकांस खात्री वाटेना. सुदैवाने १९१४ मधे म्हस्की येथे जवळच्या डोंगरात एक कोरीव लेख आढळला. त्यांत देवांना प्रिय प्रियदर्शन अशोक महाराज असे शब्द आढळले. त्यामुळे इतिहाससंशोधकांचा संशय दूर झाला. या दृष्टीने म्हस्कीच्या लेखाला जगभर प्रसिद्धी मिळाली. आपल्या दौऱ्यात मी म्हस्कीला अनेक वेळा गेलो. त्या लेखाचा मला बारकाईने अभ्यास करता आला हे मी माझे भाग्य समजतो.

लिंगसगूर हे गाव एके काळीं महाराष्ट्राच्या यादव घराण्याच्या ताब्यात होते. गावाला लागून एक पडका असा डोंगरी किल्ला आहे. त्याला भिल्लमरायाचा डोंगर असे म्हणतात. लिंगसगूर तालुक्यातील दुसरे महत्त्वाचे स्थळ म्हणजे मुद्गलचा इतिहासप्रसिद्ध किल्ला हे होय.

कृष्णा तुंगभद्रेच्या मधला दुआबाचा हा रायचूर जिल्हा इतिहासात गाजलेला आहे. बहमनी आणि नंतरचे विजापूरचे सुल्तान यांच्यात आणि विजयनगर साम्राज्यात सारखे संघर्ष होत. इ. स. १३४७ पासून १५६५ पर्यंतच्या काळात रायचूर दुआबाचा ताबा कधी विजयनगरकडे तर कधी सुल्तानांच्याकडे असे. असे कमीत कमी दहा-बारा वेळा तरी घडले. या सतत युद्धामुळे रायचूर जिल्हा उद्ध्वस्त होऊन गेला. जंगलझाडी कुठेच दिसत नाही. पावसाचे मान पंधरा ते सतरा इंचांवर आले. गोड पाण्याच्या विहिरी क्वचितच आढळत. दोन-तीन वर्षांनी दुष्काळ हा ठेवलेला. तुंगभद्रेचे धरण बांधून होईपर्यंत या जिल्ह्याची स्थिती हलाखीची होती.

तालीकोटची सुप्रसिद्ध लढाई (इ. स. १५६५) लिंगसगूर तालुक्यात झाली. लिंगसगूरहून चाळीस मैलांवर तालीकोट हे गाव आहे. तेथे विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा येथील सुलतान एकत्र झाले आणि तेथून त्यांनी विजयनगरविरुद्ध कूच केले. म्हणून या लढाईला तालीकोटची लढाई असे नाव देण्यात आले. पुढे या लढाईला राक्षसतागडीची लढाई म्हणू लागले. रक्कसगी, तंगडगी अशी दोन गावे नदीच्या दोन्ही काठांवर वसली आहेत. तेथे युद्ध झाले असावे अशी समजूत होती. म्हणून राक्षसतागडीचे युद्ध झाले असे समजण्यात आले. तत्कालीन वर्णने आणि नकाशे यांच्या आधारे मी उभय दळांच्या हालचाली कोठे आणि कशा झाल्या हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. सुलतानांची सैन्ये इंगळगीजवळ कृष्णापार झाली. ते स्थळ मी पाहून आलो. एकंदरीत अभ्यास करून माझी खात्री झाली की, ही निर्णायक लढाई कृष्णेच्या दक्षिणेस आणि मुद्गल किल्ल्याच्या वाटेवर बय्यापूर आणि भोगापूर या खेड्यांच्या मधे झाली. या विषयावर मी एक लेख लिहून प्रसिद्ध केला.

लिंगसगूरला डेप्युटी कलेक्टर गोविंदराव कायमखाने हे तडफदार गृहस्थ होते. बागात श्रीनिवासराव मुन्सफ हे सज्जन आणि सुस्वभावी होते. डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस हे दिल्लीच्या प्रतिष्ठित घराण्याचे होते. मनुष्य अतिशय चांगला. त्यांना हकीमी उपचार उत्तम करता येत. दिल्लीला त्यांच्या घराण्यात उत्तम असा युनानी दवाखाना चालविण्यात येत होता. माझ्याकडे दिल्लीच्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या कार्यकर्त्या श्रीमती राजन नेहरू यांचे नियतकालिक रोशनी हे येत असे. एकदा डेप्युटी सुपरिंटेंडेंट मला म्हणाले, ' माधवरावजी, हैदराबाद राज्यांत ' रोशनी 'ला परवानगी नाही हे आपल्याला माहीत नसावे. ' मी म्हटले—' माहीत नव्हते हे खरेच. आता मी संपादिकेला कळवितो की, यापुढे माझ्याकडे तुमचे नियतकालिक पाठवू नका. कारण हैदराबाद राज्यात रोशनी (प्रकाश)ला बंदी आहे. ' मी रोशनी या शब्दाचा उच्चार करताना डोळे मिचकावले. हैदराबाद राज्यात अंधाराचे साम्राज्य आहे. तेथे प्रकाशाची काय गरज आहे हे मला सूचित करावयाचे होते. डेप्युटी सुपरिंटेंडेंट हसून म्हणाले, " माधवराव, तुमच्या स्वभावाला औषध नाही हेच खरे. "

अबकारीचे इन्स्पेक्टर एक मुसलमान गृहस्थ होते. ते मधून मधून राजकीय गोष्टींवर बोलत. एकदा ते खिन्नपणे म्हणाले, " आपले निजाम (उस्मान अलीखान) हे प्रजेसाठी रात्रंदिवस झटत आहेत. युवराज आज्जमजहा कामाकडे लक्ष देऊन आपले ओझे थोडे तरी हलके करतील अशी त्यांना आशा होती,

पण त्यांची घोर निराशा झाली. आपले निजाम मोठे कष्ट करणारे आणि सुधारणावादी आहेत. तसे ते एकपत्नीव्रतीच झाले असते. पण त्यांच्या तारुण्याचा काळ होता. म्हणून त्यांना मोठा जनानखाना बाळगावा लागला." मला हसू आवरेना. कुणाच्या जुलमी राजवटीबद्दल सारवासारव करावयाची असल्यास उर्दूत म्हणत, 'राजा चांगला, प्रजाही चांगली पण काळच वाईट होता. लेकिन जमाना बुरा था' तशातला हा प्रकार झाला.

मी सिंधनूरला बदलून गेलो होतो त्यावेळचे कलेक्टर जाऊन नवीन कलेक्टर जैनुलाब्दिन हे आले होते. त्यांनीच माझी सिंधनूरहून लिंगसगूरला उचलबांगडी केली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मला सतत पाण्यात पाहावे आणि मला त्रास द्यावा याचा मला उद्वेग आला होता. मी मनातून निराश झालो होतो. जैनुलाब्दिन एकदा दौऱ्यावर आले होते. मी त्यांना म्हणालो, "मला होत असलेला त्रास पाहाता हे राज्य सोडून दुसरीकडे जावे असे वाटू लागले आहे. कोणत्या वाईट मुहूर्तावर मी येथील नोकरीत शिरलो कोण जाणे!" जैनुलाब्दिनच्या मनावर माझ्या बोलण्याचा परिणाम झालेला दिसला. ते म्हणाले—"तुम्ही असे काही विचार मनात आणू नका. मुझे तालीम याफ्ता लोगों के साथ काम करने में खुशी होती है. सुशिक्षित माणसांबरोबर काम करण्यात मला आनंदच वाटतो." अर्थात अशा शब्दांनी माझे समाधान थोडेच होणार होते.

जैनुलाब्दिन हे पोलीस ॲक्शनच्या वेळी रायचूरला होते. इंडियन युनियनच्या फौजा येताहेत हे ऐकल्याबरोबर ते रायचूर सोडून हैदराबादेस पळून गेले. पंतप्रधान लायकअली यांनी त्यांना अद्वातद्वा बोलून परत रायचूरला पिटाळले. ते अर्ध्या वाटेवर असतानाच युनियनच्या फौजांनी रायचूर ताब्यात घेतले होते. पोलिस ॲक्शननंतर त्यांना सेवानिवृत्त करण्यात आले. १९५३–५४ मधे मी शिक्षणखात्याचा संचालक असताना ते आपल्या भाचीची (ती शिक्षिका होती) बदली हैदराबादेस करा म्हणून सांगण्यासाठी माझ्याकडे आले होते. मी त्यांचे काम करून दिले. त्यावेळी त्यांना खूप बोलावे असे मला वाटले. पण मी एक शब्दही बोललो नाही. मेलेल्यांना मारण्यात कोणता पुरुषार्थ आहे?

हैदराबाद राज्यात अरबांचे बरेच प्रस्थ असे. ते तालुक्यातालुक्यातून पसरले होते. सावकारी, सरकारी कंत्राटे घेणे, हरउपायांनी जमीनजुमला संपादन करणे, जुलूमजबरदस्ती आणि दंडेली करणे आणि वर सरकारदरबारी मानसन्मानाने राहणे हा त्यांचा खाक्या असे. करीमनगरला शेरवान अरब, तसे लिंगसगूरला अहमद चाऊस ही एक बडी आसामी होती. धर्मांतराच्या कामात वरील प्रकारची मंडळी पुढे पुढे असत. पोलीस ॲक्शननंतर अहमद अरबाच्या नशिबी बरीच

वर्षे तुरुंगात खडी फोडण्याचे काम आले होते.

लिंगसगूरच्या माझ्या मुक्कामात माझी बहीण सीताबाई ही बाळंतपणासाठी आमच्याकडे आली होती. काही दिवसांनी माझी दुसरी बहीण सुशीला आणि मेहुणे माधवराव ही दोघे काही दिवसांसाठी आमच्याकडे आली. लिंगसगूरहून पंधरा मैलांवर कृष्णेच्या उत्तर तीरावर छाया भगवती देवीचे रमणीय स्थान आहे. तेथे मी, उषा, सुशीला, माधवराव आणि एक दोघे असे पिकनिकला म्हणून गेलो. कृष्णेचा त्या ठिकाणी मोठा डोह आहे. कृष्णेच्या गार पाण्यात आम्ही तास दोन तास यथेच्छ पोहत होतो. पोहता पोहता मी आणि माझी बहीण सुशीला ही दोघे पुढे निघून गेलो. पलीकडच्या काठाजवळ आम्ही पोहोचलो. काठापाशी चिखल बराच साठला असावा. आम्ही पाऊल पुढे टाकावे म्हटले तर पाय चिखलात रुतू लागला. हा हा म्हणता चिखल गुडघ्यापर्यंत आला. अशीच हालचाल करीत राहिलो तर तेथेच चिखलात आम्ही बुडून जाऊ ही कल्पना येताच मी कमालीचा अस्वस्थ झालो. सुशीलेचे तोंड उतरले. अशा स्थितीत दोनतीन मिनिटे गेली असावीत. इतक्यात समोरच्या डोंगरातून एक बेडर जमातीचा शिकारी झपझप पावले टाकीत काठापाशी आला. त्याच्यापाशी बंदूक होती. आम्हांला हताशपणे उभे असलेले पाहून तो म्हणाला, " अरेरे! तुम्ही चिखलात फसलात होय. हे पहा डावीकडे चिखल मुळीच नाही. तुम्ही एकमेकांचा हात धरून मी सांगतो तसेतसे हळूहळू या." त्याच्या सांगण्याप्रमाणे आम्ही हळूहळू डावीकडे सरकू लागलो. तो आम्हांला खालील जमीन घट्ट लागू लागली. थोड्याच वेळात आम्ही काठाला येऊन लागलो. बेडर शिकाऱ्याचे आभार मानावे म्हणून आम्ही त्याच्याकडे वळलो तो झपझप पावले टाकीत अवघ्या चारपाच मिनिटांतच डोंगराच्या पलीकडे तो नाहीसा झाला. आम्ही छाया भगवतीच्या देवळात चौकशी केली, पण त्या इसमाचा पत्ता लागला नाही. ही गोष्ट मी वडिलांना सांगितली तेव्हा ते म्हणाले, " प्रत्यक्ष परमेश्वरच बेडर शिकाऱ्याच्या रूपाने आला आणि त्याने तुमची सोडवणूक केली." यावर मला काही उत्तर सुचले नाही.

माझा धाकटा भाऊ गुरुमध्व याला त्याच्या वयाच्या दहाव्या वर्षापासून अपस्माराचा रोग जडला होता. तो दिवसेंदिवस वाढतच गेला. आम्ही सर्व प्रकारचे इलाज करून पाहिले. मंत्र, तंत्र अनुष्ठाने हीही झाली; पण काही गुण आला नाही. पुढे पुढे तर त्याला दिवसांतून पंधरा वीस वेळा तरी फेफरे येऊ लागले; त्यावेळी त्याचे हाल पाहवत नसत. आम्ही सगळे हवालदिल होऊन गेलो. पंचवीस डिसेंबर १९४४ रोजी तर त्याला एकवीस वेळा फिट्स आल्या. त्याच

दिवशी (सोमवार) रात्री दोन वाजता त्याला मरण आले. दुखण्यातून त्याची कायमची मुक्तता झाली.

आमच्या वडिलांना आता आम्ही तीन मुले आणि दोन मुली राहिलो. आमच्या दोन्ही बहिणी लग्न होऊन सुखाने संसार करीत होत्या. माझे बंधू बिंदुमाधवराव हे हैदराबादच्या ऑल सेंटस स्कूलमध्ये शिक्षक होते आणि माझा धाकटा भाऊ राघवेंद्र हा औरंगाबादच्या इलेक्ट्रिसिटी खात्यात काम करीत होता.

गुरुमध्वाच्या श्राद्धासाठी आम्ही कृष्णाकाठच्या चितापूर या गावी गेलो. तेथे कृष्णेचा देखावा भव्य आहे. कृष्णेच्या पात्राकडे पाहात मी तासन् तास घालविले. काही दिवसांनी मी जवळच असलेले वीरशैव मठस्थापक श्री बसवेश्वर यांचे समाधिस्थान कूडल संगम हे पाहून आलो.

त्या काळात रायचूर जिल्ह्यातून शेजारच्या विजापूर आणि धारवाड या जिल्ह्यांत धान्याची चोरटी आयात होत असे. ती थांबविण्यासाठी निजाम सरकारने लिंगसगूरला लष्कराची एक तुकडी नेमली. तुकडीचे लेफ्टनंट मुइनुद्दीन हे लिंगसगूरच्या रेस्ट हाऊसमध्ये राहू लागले. शिष्टाचार म्हणून मी त्यांना भेटून आलो. त्यांनी परत-भेट दिली नाही. अर्थात मला त्यांच्याकडे पुन्हा जाण्याचे कारण नव्हते. तुकडीतील शिपायांकडून गावच्या लोकांना उपद्रव होऊ लागला. लोकांना काही म्हणता येईना. पण एका साध्या प्रसंगाने पोलीस आणि लष्कराचे शिपाई यांच्यात मारामारी झाली. तो प्रसंग असा :

देवदुर्ग तालुक्यातील एक पोलीस कॉन्स्टेबल काही सरकारी कामानिमित्त लिंगसगूरला आला होता. काम आटोपल्यावर तो पीठ दळून आणण्यासाठी म्हणून गावातील पिठाच्या गिरणीवर गेला. तेथे लष्करातील एक शिपाई आला होता. दळणावरून त्या दोघांची बाचाबाची झाली. लष्कराचा शिपाई परत गेला आणि आपल्याबरोबर दहाबारा शिपायांना घेऊन आला. त्यांनी पोलीस कॉन्स्टेबलला यथेच्छ बडवून काढले. कॉन्स्टेबलला गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. साहजिकच पोलीस खात्याला या प्रकरणात लक्ष घालावे लागले. पोलीस आणि लष्कर यांच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली. चौकशीत लष्कराच्या शिपायांची दंडेली शाबीत झाली आणि शिपायांना थोड्याबहुत शिक्षा झाल्या.

बोलून चालून अपराध शिपायांचा होता. पोलीसच्यासमोर त्यांचे कांही चालले नाही. आता सूड उगवायचा तो कुणावर? त्यांनी मला गोत्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्याची हकीकत अशी —

लिंगसगूर हे खेडेगावातच जमा म्हटले पाहिजे. गावचे स्त्रीपुरुष बहिर्दिशेसाठी गावाबाहेर जात आणि रस्त्याच्या कडेकडेने बसत. लष्कराचा लेफ्टनंट

मुइनुद्दीन याने गावच्या पाटलला बोलावून सांगितले की, रेस्ट हाऊसच्या समोरील रस्त्यावर बायका शौचाला बसतात. हे ओंगळ दृश्य रोज मला पाहावे लागते. तुम्ही याचा काही बंदोबस्त करा. रेस्ट हाऊसच्या समोरचा रस्ता शर्जापूर नावाच्या गावाकडे जात होता. रायचूरला जाण्याचा तोच रस्ता होता. पाटलाने कानडीमध्ये दवंडी दिली ती अशी : “ हेणमक्कळू तंबिगी तगोंडु शर्जापूर हादि म्याले होगबारदू ” (बायकांनी तांब्या घेऊन शर्जापूरच्या रस्त्यावर जाऊ नये.) कानडीत शौचाला जाणे, बहिर्दिशेला जाणे किंवा परसाकडे जाणे याला तांब्या घेऊन जाणे असे म्हणतात. पाटलाने दवंडी दिल्याचा रिपोर्ट त्याच दिवशी केला. दवंडीच्या शब्दात मला काही वावगे वाटले नाही. त्याच दिवशी माझा भाऊ गुरुमध्व वारला होता. त्या दुःखात मी होतो.

लष्करचे शिपाई गावात वेळी अवेळी हिंडत. वेश्यांची घरे शोधीत फिरत. क्वचित प्रसंगी चुकून सभ्य स्त्रियांच्या मागे लागत. या उपद्रवामुळे आठवड्याच्या बाजाराला आसपासच्या खेड्यांतील बायका खरेदीसाठी येत त्यांची संख्या कमी होऊ लागली. अर्थात् या गोष्टीचा दवंडीशी काहीच संबंध नव्हता. पण लष्करी अधिकाऱ्यांना तेवढेच निमित्त फावले. त्यांनी माझ्याविरुद्ध काय रिपोर्ट करावा ? “ तहसीलदारसाहेबांनी लष्करी अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवला नाही. त्यांनी दवंडी देऊन बायकांना रस्त्यावरून हिंडण्याफिरण्याची मनाई केली आहे. लष्कराबद्दल जनतेत क्षोभ निर्माण करण्याचा हा डाव आहे. ज्या निजामी सैन्याला वऱ्हाडचे राजपुत्र (प्रिन्स ऑफ बेरार) यांच्या सेनाधिपत्याचा मान प्राप्त झाला आहे त्या सैन्याच्या चारित्र्याबद्दल संशय व्यक्त करणे हा त्या सैन्याचा उघड उघड अपमान आहे ! ”

असा तो रिपोर्ट होता. मला या गोष्टीची काहीच कल्पना नव्हती. मार्च १९४५ च्या सुरवातीस मी म्हस्की गावाच्या दौऱ्यावर गेलो होतो. तेथे सरकारी कामे आटोपून रेस्ट हाउसला परत आलो. संध्याकाळी मला कलेक्टर जैनुलाबिदीन यांचा एक लखोटा मिळाला, त्यात खालील गोष्टीसंबंधी माझा जाब मागितला होता :

(१) तुम्ही लष्करचे लेफ्टनंट मुइनुद्दीन यांना का भेटला नाहीत ?

(२) तुम्ही दवंडी द्यायला लावलीत काय ? त्यामुळे लष्करच्या लोकांची मने दुखावली गेली आहेत. याबद्दल तुम्ही लेफ्टनंटची माफी मागितली किंवा नाही ? मागितली नसल्यास तिचे कारण काय ?

त्या पत्राचे मी ताबडतोब उत्तर पाठविले. पत्रात मी म्हटले होते, “ लेफ्टनंट मुइनुद्दीन लिंगसगूरला आल्याबरोबर मी त्यांना भेटण्यास गेलो. त्यानंतर ते

मला भेटण्यास आले नाहीत. त्यामुळे मी त्यांच्याकडे पुन्हा भेटण्यास जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ”

दवंडी देण्यात आली ती लेफ्टनंटच्या सांगण्यावरून. दवंडीच्या मजकुरात आक्षेपार्ह असे काहीच नव्हते. स्त्रियांनी शर्जापूरच्या रस्त्यावर तांब्या घेऊन जाऊ नये, असा मजकूर होता. आपल्याकडे आलेल्या लष्करच्या रिपोर्टात ‘ शर्जापूर ’ आणि ‘ तांब्या घेऊन ’ हे शब्द गाळण्यात आले आहेत. आणि खोडसाळ रिपोर्ट करण्यात आला आहे. मी माफी कशाची आणि कशाबद्दल मागायची ? उलट लेफ्टनंटनी दिलगिरी व्यक्त करावयास हवी.

मी लिंगसगूरला परत आलो. कलेक्टरनी वरिष्ठांकडे काय रिपोर्ट केला कोण जाणे ! मार्च १९४५ च्या मध्यात माझ्या बदलीचा हुकूम हातात पडला. आश्चर्याची गोष्ट अशी की, माझी बदली पुन्हा कळमनूरीला करण्यात आली होती. लिंगसगूरला मी अवघे आठ महिने होतो. लिंगसगूरच्या कामाचा चार्ज देऊन मी निघालो. रायचूरहून मी माझे बरेचसे सामान गुडसने कळमनूरी रोड स्टेशन [नांदापूर] कडे पाठवून दिले. सर्वांना घेऊन मी हैदराबादला आलो.

कळमनूरीला निघण्यापूर्वी मी एक दिवस महसूल खात्याच्या सचिवालयात (त्याला मोतिमदी मालगुजारी म्हणत) गेलो होतो. महसूल खात्याचे डेप्युटी सेक्रेटरी (त्यांना नायब मोतेमद म्हणत) राय रामलाल यांना मी भेटलो. मी त्यांना म्हटले, “ मी पूर्वी कळमनूरीला तीन वर्षे होतो. माझी बदली पुन्हा तेथे करण्यात आली आहे. हा काय प्रकार आहे ? ” रामलाल आश्चर्याने म्हणाले, “ काय म्हणता, तुम्ही पूर्वी कळमनूरीला होता ! मग मला या गोष्टीची चौकशी केली पाहिजे. तुम्ही दोन–चार दिवसांनी मला भेटा आणि आताच कळमनूरीला जाण्याची घाई करू नका. ”


इकडे परभणीला एक अतिशय लाचखाऊ तालुकदार (कलेक्टर) होते. त्याचे आणि कळमनूरीचा तहसीलदार याचे अंतस्थ सूत्र होते. तालुकदारांनी रिपोर्ट केला की, सेतुमाधवराव कळमनूरीला यापूर्वी राहून गेले आहेत. पुन्हा त्यांना तेथे आणणे हे योग्य ठरणार नाही. मला या गोष्टीची काहीच कल्पना नव्हती. चार पाच दिवसांनंतर मी महसूल खात्याच्या सचिवालयात गेलो. रामलाल यांची गाठ पडली तसे ते म्हणाले, “ माधवराव चुकून तुमची बदली कळमनूरीला करण्यात आली होती. सरकारने आपला निर्णय बदलला आहे. तुमची बदली आदिलाबाद जिल्ह्यात उटनूर येथे करण्यात आली आहे. ”

उटनूर हे नाव ऐकताच मला धक्का बसला. आदिलाबाद जिल्हा हा गोदावरी आणि पेणगंगा यांच्यामधील प्रदेश. चांदा आणि यवतमाळ या जिल्ह्यांच्या

दक्षिणेकडील इलाखा. डोंगराळ आणि अरण्याने भरलेला. वाहतुकीची साधने फारच थोडी. त्यांतून उटनूर तालुका म्हणजे हैदराबादचे काळे पाणी म्हणाना. तहसीलदार म्हणून माझी बारा वर्षांची नोकरी झाली होती. मला ज्यूनिअर असलेले दहा मुसलमान तहसीलदार बढती मिळून दुय्यम तालुकदार झाले होते. बढतीची आशा मी सोडलीच होती. पण उटनूरसारख्या तालुक्यावर माझी बदली म्हणजे एक क्रूर शिक्षाच होती. मला डिसमिस तर करता येत नव्हते, मग सर्वांत वाईट अशा तालुक्यावर मला बदलणे हाच एक मार्ग होता.

मी फार खिन्न झालो. सचिवालयात माझे एक मित्र हणमंतराव प्रभुणे होते. मी त्यांच्याजवळ बोलत बसलो होतो. माझी मनःस्थिती पाहून प्रभुणे म्हणाले, ' सरकारने तुम्हांला उटनूर दाखवावे हे मोठे अजब आहे. ही एक मोठी शिक्षाच म्हटली पाहिजे. बरे तुमची पत्रिका तुम्हांला आठवते काय ? '

मला ज्योतिष काही कळत नाही. पण माझ्या पत्रिकेतील आकडे मला तोंडपाठ आहेत. मी प्रभुण्यांच्या समोरचा कागद ओढला आणि त्यावर माझी पत्रिका मांडली.



प्रभुण्यांनी पत्रिका पाहिली. त्यांनी काय हिशेब केला कोण जाणे. थोड्या वेळाने ते मला म्हणाले, " माधवराव, तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा. तुमचे वाईट दिवस संपत आले आहेत. पाच नोव्हेंबर १९४५ रोजी तुमची बढतीची सूत्रे हलू लागतील. हा बदल कसा घडून येईल हे सांगणे मात्र कठीण आहे. "

अर्थात त्यांच्या या शब्दांनी माझे समाधान होणे अशक्य होते. पण त्यांनी सांगितलेली पाच नोव्हेंबर १९४५ ही तारीख मात्र माझ्या मनात पक्की बसली. प्रभुण्यांच्या शब्दांचा पडताळा मात्र मला पाच नोव्हेंबर रोजी पूर्णपणे आला.

उषाचे बाळंतपणाचे दिवस जवळ आले होते. तिला आणि मुलांना मी हैदराबादेत ठेवले. माझे आईवडील पंढरपूरला गेले. मी एकटाच उटनूरला रवाना झालो. हैदराबादच्या उत्तरेस शंभर मैलांवर निजामाबाद आहे. रेल्वेने मी निजामाबादेला गेलो. तेथून मी बस घेतली. निजामाबादहून चाळीस मैलांवर मी गोदावरी ओलांडून आदिलाबाद जिल्ह्यात दाखल झालो. तेथून निर्मलचा इतिहासप्रसिद्ध गाव जवळ आहे. निर्मलच्या पुढे घाट चढावा लागतो. गुडी हतनूर या गावी मी बस सोडली. तेथून उटनूर तेवीस मैलांवर आहे. रस्ताबांधणीचे काम चालू होते. पण दहापांच ओढ्यावरचे पूल अद्याप तयार झाले नव्हते.

सहा एप्रिल १९४५ रोजी मी उटनूरला पोहोचून तालुक्याच्या कामाचा चार्ज घेतला.

१४

उटनूर–आसफाबाद

१९४५–४८

उटनूर हा अगदी लहान गाव. गावाची लोकसंख्या फक्त चवदाशे. गावातील घरे म्हणजे झोपड्या. मामलेदाराची कचेरीच काय ती पक्की इमारत. मामले दाराला राहायला घर नव्हते. कचेरीच्या इमारतीतच मला राहावे लागे. कचेरीला लागून मागे मोकळी जागा होती. तेथे दोनतीन झोपड्या बांधण्यात आल्या होत्या. स्वयंपाकघर, न्हाणीघर, म्हणून मी झोपड्यांचा उपयोग करी. उटनूर तालुक्यात जंगलाचे प्रमाण दर शंभर चौरस मैलांमागे साठ चौरस मैल असे होते. या तालुक्यात पावसाचे प्रमाणही साठपासष्ट इंच होते. तालुक्यात मलेरियासारखे आजार चालू असत. गावात एक प्राथमिक शाळा होती. आदिलाबाद जिल्ह्यातून आदिवासींची लोकसंख्या लाख दीड लाख होती. आदिवासींतील बहुसंख्य जमात म्हणजे गोंड हे होत. बाकीच्या आदिवासींत कोलाम, थुट्टी, नायकपोड, वझा आणि प्रधान या जमातींचा समावेश होई. उटनूर तालुक्याची लोकसंख्या एकंदरीत चोवीस हजार होती. त्यापैकी आदिवासी हे सोळा हजार होते. त्यांतही बहुसंख्य गोंड होते.

हैदराबाद राज्यात इंग्रज अधिकाऱ्यांचा शिरकाव कित्येक वर्षांपासून होत होता. पण मध्यप्रदेशाचे इंग्रज आय. सी. एस. अधिकारी ग्रिग्सन हे हैदराबादेस महसूल मंत्री होऊन आले, त्या वेळेपासून आदिवासींच्या प्रश्नाकडे निजाम सरकारचे लक्ष जाऊ लागले. ग्रिग्सन हे स्वतः आदिवासींच्या प्रश्नावर तज्ज्ञ समजले जात. बस्तर संस्थानातील मडावी गोंड हा त्यांचा ग्रंथ सर्वमान्य झाला आहे. मध्यप्रदेश आणि वऱ्हाड यांतील आदिवासींचा प्रश्न हा त्यांचा दुसरा ग्रंथ. सहा-सातशे पानांच्या या ग्रंथात त्यांनी आदिवासींच्या प्रश्नाची सखोल अशी चर्चा केली आहे. हैदराबादेस आल्यावर त्यांनी या प्रश्नात लक्ष घातले. आदिवासी कल्याण खाते नावाचे खाते सुरू करण्यात आले. या कामात त्यांना एका आंतर-राष्ट्रीय कीर्तीच्या मानवशास्त्रज्ञाचे साहाय्य मिळाले. ते मानवशास्त्रज्ञ (अंथ्रा-पॉलाजिस्ट) म्हणजे बॅरन क्रिस्टाफ फान फ्यूहरर हायमन्डार्फ हे ऑस्ट्रियन गृहस्थ होत. लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्समध्ये ते मानवशास्त्राचे प्राध्यापक होते. आदिवासींच्या बाबतीत निजामसरकारचे सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. उटनूरपासून नऊ मैलांवर मार्लवाई नावाचे एक आदिवासी खेडे आहे. हे गाव समुद्रसपाटीपासून बावीसशे फूट उंचावर वसले आहे. आदिवासींना शेतीसाठी जमिनी मिळवून देणे, जंगलखात्याकडून त्यांना सवलती मिळवून देणे, सावकारांच्या जाचातून त्यांची मुक्तता करणे, आदिवासी भागात सहकारी पतपेढ्या स्थापन करणे, आदिवासी खेड्यांतून शाळा स्थापन करणे इत्यादि कामे आदिवासी कल्याण खात्यामार्फत होऊ लागली. आदिवासी शिक्षक तयार करण्यासाठी मार्लवाई येथे एक शाळा चालू करण्यात आली होती. शाळेचे मुख्याध्यापक सांताबिसाहू जोगुलकर हे महाराष्ट्रीय खिस्ती गृहस्थ होते. आदिलाबाद जिल्ह्यासाठी आदिवासींचे स्पेशल ऑफिसर म्हणून हैदराबादच्या फखरुल्मुल्क या सुप्रसिद्ध सरदार घराण्यातील मुअज्जम हुसेन या तरुण आणि तडफदार अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. पावसाळ्याचे चार महिने ते हैदराबादला राहात. बाकीचे आठ महिने ते जिल्ह्यातून दौरा करीत. उटनूर तालुक्यापुरते त्यांना डेप्युटी कलेक्टरचे अधिकार असत.

हायमंडार्फ यांचे वास्तव्य हैदराबादेस असे, पण ते महिन्या दोन महिन्यांतून एकदा मार्लवाईस येऊन आठ दहा दिवस राहात. मी उटनूरला गेलो त्यावेळी हायमंडार्फ आणि त्यांच्या पत्नी हे आसाममधील नागाजमातीचा अभ्यास करण्यास गेली होती. उटनूरला जाण्यापूर्वी मी इतिहासभूगोलाच्या पुस्तकांतून गोंड जमातीचा उल्लेख पाहिला होता. पण उटनूर तालुक्यातील बहुसंख्य अशी गोंड जमात पाहून माझे कुतूहल जागृत झाले. उटनूरला कामाचा चार्ज घेतल्या-

नंतर एका आठवड्याच्या आत मी मार्लेवाईला गेलो. तेथील गोंड शाळेचे मुख्याध्यापक जोगुलकर यांची मी गाठ घेतली. अतिशय सज्जन आणि उत्साही गृहस्थ. गोंडी भाषा ते आपल्या मातृभाषेसारखी बोलत. त्यांनी गोंडी भाषेची क्रमिक पुस्तके लिहिली होती. ती सरकारतर्फे छापण्यात आली. मी शाळेची तपासणी केली त्यावेळीं तीच पुस्तके शिकविण्यात येत होती. गोंडी भाषेला स्वतःची अशी लिपी नव्हती. देवनागरी लिपीतूनच पुस्तके छापण्यात आली होती. ही गोष्ट लक्षात येताच मी गोंडी भाषेचा अभ्यास करण्याचे ठरविले. गोंडांच्या संबंधी पुस्तके गोळा करण्यास मी सुरुवात केली.

रायचूरहून मी माझे सगळे सामान गुडस मार्गाने कळमनूरी रोड स्टेशनकडे पाठविले होते. माझी बदली उटनूरला झाली आणि सामान मात्र कळमनूरी स्टेशनवर पडून राहिले. ते परत आणण्यासाठी मी कळमनूरीला गेलो. नांदापूर-(कळमनूरी रोड स्टेशन) ला मराठवाड्यातील सुप्रसिद्ध साहित्यिक नारायणराव नांदापूरकर यांची गाठ पडली. त्यांच्या सहवासात वेळ मजेत गेला. कळमनूरीला जाऊन मी जुन्या आठवणी ताज्या करून घेतल्या. मी पुन्हा एकदा विहिरीत पोहलो. दादा देशमुखांच्या मळ्यातील संत्री खाल्ली आणि प्रेमळ कळमनूरीकरांचा पाहुणचार घेतला. माझे सामान कळमनूरी रोड स्टेशनवर पावसापाण्यात भिजत पडले होते. माझी पुस्तके मी पोत्यातून बांधून ठेवली होती. मी पोत्यातून ती बाहेर काढू लागलो तशी ती बरीच पुस्तके तुटलेली, फाटलेली अशी अर्धी अर्धीच हाती लागली. चित्राव शास्त्र्यांचे ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, पेशवे दप्तरचे दहा-बारा खंड आणि इतर अनेक पुस्तके यांचा नुसता चुथडा झाला होता. माझ्या आवडत्या पुस्तकांची अशी दुर्दशा झालेली पाहून मला मरणांतिक दुःख झाले. पण त्याला इलाज नव्हता. मी सगळे सामान गुडसने हैदराबादला रवाना केले आणि हैदराबादला निघून आलो.

हैदराबाद विद्यापीठातून मी रुसेल आणि हिरालाल यांचे कास्ट्स ॲण्ड ट्राइब्स ऑफ सी. पी. ॲण्ड बेरार हे पुस्तक घेऊन ते वाचून काढले. त्या पुस्तकात गोंडांवर शंभर पानांचा लेख आहे. त्यावरून मला गोंड जमात, तिचे मूलस्थान, जमातीच्या दंतकथा, मध्य युगातील गोंड राज्ये इत्यादीसंबंधी बरीच कल्पना आली. उटनूरला परत आल्यावर मी या विषयावर इतर बरीच पुस्तके वाचली. १९४५ मध्ये माझे इंग्रजी पुस्तकांचे वाचन बरेच झाले.

मी उटनूरला गेल्यावर एकदोन महिन्यांनी हायमेंडार्फ आणि त्यांची पत्नी हे मार्लेवाईला आले. मी त्यांना भेटण्यास मार्लेवाईला गेलो. तोपर्यंत मी गोंड समाज-जीवनाचा बराच अभ्यास केला होता. विशेषतः इतिहासात आढळणारे

गोंडांविषयींचे उल्लेख मी पाहून ठेवले होते. गोंडांच्या दंतकथा, पुराणे इत्यादि ग्रंथांतून कोणत्या गावांचे उल्लेख आढळतात आणि त्यावरून काय निष्कर्ष काढता येतात याबद्दल मी काही आडाखे बसविले होते. त्या एक दोन महिन्यांत मी गोंडी भाषा बोलायला शिकलो होतो. हायमंडार्फशी माझे तास दोन तास बोलणे झाले. हायमंडार्फ हा तरुण, देखणा आणि अतिशय सुस्वभावी असा विद्वान होता. त्याला प्रथम वाटले की, मला इंग्रजी येत नसावे. त्याने माझ्याशी मोडकी-तोडकी उर्दू बोलण्यास सुरुवात केली. हैदराबादेतील अनेक तहसीलदारांना इंग्रजी येत नसे हे त्याला माहीत होते. मला हसू आले. मी त्याच्याशी इंग्रजी बोलण्यास सुरुवात केली. वांशिक दृष्टीने गोंड जमात भारताच्या बाहेरून आली असावी काय, त्यांच्यात नीग्रो समाजाची भेसळ झाली असावी काय, गोंडी ही द्राविडी भाषा, पण कोणत्या द्राविडी भाषेशी तिचे अधिक साम्य आहे, गोंडांवर हिंदू संस्कृतीचे कोणते परिणाम झाले आणि ते किती दीर्घ आहेत असे अनेक विषय माझ्या चर्चेत आले. हायमंडार्फच्या चेहऱ्यावरील आश्चर्याचा भाव माझ्या नजरेतून सुटला नाही. त्यांनी विचारले, ‘ आश्चर्य आहे, तुही कोण, कुठले, हैदराबादच्या अधिकाऱ्यांत अंथ्रोपॉलॉजीचा अभ्यास केलेला मला तरी कोणी दिसला नव्हता. ’ माझ्याबद्दलची सगळी माहिती मी त्यांना दिली. हायमंडार्फ म्हणाले, “ माधवराव, तुम्ही या भागात आला हे फार बरे झाले. आदिवासींच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यात मला तुमची फार मदत होईल. गोंडी भाषा तुम्ही इतक्या लवकर हस्तगत केली ह्याचे मला आश्चर्य वाटते. गोंडी जीवनावर तुम्ही दहापाच निबंध लिहून मला द्या. ”

मी एक दोन महिन्यांतच निबंध लिहून देतो असे त्यांना सांगितले. माझे सरकारी काम दोन तीन तासांत संपत असे. बाकीचा वेळ मी गोंड संस्कृतीच्या अभ्यासात घालवू लागलो. आदिलाबादेतील गोंडांची राजवट, गोंडांची घराणी, गोंडांच्यांत प्रचलित असलेली नावे, गोंडांची पुराणे आणि दंतकथा, आदिला-बादेतील आदीवासींचा जमिनीचा प्रश्न, आदिवासी कोलाम जमात, आदिवासी प्रधान जमात, अशा अनेक विषयांवर निबंध लिहून मी ते हायमंडार्फकडे पाठवून दिले.

उषा आणि मुले हैदराबादलाच होती. सत्तावीस मे १९४५ ला उषा प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. आम्ही तिचे नाव अंजली ठेवले. आता म्हैसूरचे कॉफी मळेवाले श्री. अरविंद गुर्जर यांच्याशी तिचा विवाह झाला असून ती सुखाने संसार करीत आहे. उषा आणि मुले यांना उटनूरला घेऊन येणे शक्य नव्हते. कारण उटनूरला घर नाही आणि मुले पाचवीत आणि सहावीत शिकत

होती. त्यांच्यासाठी मिडलस्कूल नाही अशी स्थिती होती. माझा धाकटा भाऊ राघवेंद्र हा औरंगाबादला नोकरीवर होता. माझी मुले अरुण आणि अशोक यांना मी औरंगाबादेस राघवेंद्राकडे पाठविले. तेथील सरस्वती भवन शाळेत ती शिकू लागली. सात जुलै १९४५ ला उषाही अलकनंदा आणि अंजली यांना घेऊन पुण्याला गेली. पुढे बनारसला ती दहा महिने होती.

मी नोकरीत इतकी वर्षे काढली होती. पण माझ्या कुटुंबाची अशी पांगापांग कधीच झाली नव्हती. पत्नी बनारसला, मुले औरंगाबादला आणि मी उटनूरला अशी आमची स्थिती होती. उटनूर हा जंगलझाडीचा प्रदेश. वाघ, चित्ते हे गावाच्या कडेपर्यंत येत. पाऊसही जबर. त्या एका वर्षात मी सात आठ वेळा तरी मलेरियाने आजारी पडलो असेन. उटनूरच्या दमट हवेत मला गौटचा विकार जडला. हा हा म्हणता पायाचा अंगठा सुजून यायचा आणि माझे चालणे फिरणे बंद व्हावयाचे.

खिन्न अशा मनःस्थितीत मी दिवस कंठीत होतो. उटनूरहून बदली व्हावी, असे मला वाटत होते, पण ते जमायचे कसे ? योगायोगाने वरंगळ प्रांताचे कमिशनर (सुभेदार) हबीब मुहंमद हे आदिलाबादच्या दौऱ्यावर आले. आदिलाबादचे डिस्ट्रिक्ट जज्ज आणि माझे मित्र श्री. कुमरय्या यांनी मला पत्र लिहिले, ' तुम्ही आदिलाबादला या आणि हबीब मुहमंदला भेटून बदलीची विनंती करा. ते करीमनगरला तालुकदार (कलेक्टर) असताना तुम्ही तेथे होता. तुमची विनंती ते नाकारणार नाहीत. '

त्यांचे पत्र आल्याबरोबर मी उटनूरहून निघालो. बैलगाडीतून रात्रभर प्रवास करून मी सकाळीं आदिलाबादेस पोहोचलो. कुमरय्याची मी गाठ घेतली. सुभेदारांना भेटणे रास्त नव्हे. त्यासाठी तालुकदारां-(कलेक्टर) ची अगोदर परवानगी घ्यावी म्हणून मी कमरुद्दीन कलेक्टर यांच्याकडे गेलो. कमरुद्दीन हे सध्या महाराष्ट्र राज्यात सर्व्हे आणि सेटलमेंटचे कमिशनर आहेत. मी त्यांना म्हटले, " आपली परवानगी असेल तर मी माझ्या बदलीसंबंधी हबीब मुहंमदांना विनंती करीन. " कमरुद्दीन म्हणाले, " माझी काही हरकत नाही. तुम्ही सुभेदारांना भेटू शकता. मी स्वतःच त्यांच्याकडे चाललो आहे. " असे म्हणून त्यांनी आपली मोटार मागविली. ते मोटारीत बसणार तोच पोलिस सुपरिंटेंडेंट जैदी (मी करीमनगरला असताना जैदी तेथे डेप्युटी सुपरिंटेंडेंट होते. ते आदिलाबादेस सुपरिंटेंडेंट म्हणून बदलून आले होते.) हे आपली मोटार घेऊन आले. कमरुद्दीन जैदीच्या मोटारीत बसले आणि ते दोघे सुभेदार हबीब मुहंमद यांच्या मुक्कामाकडे निघून गेले. पाठोपाठ कमरुद्दीनची रिकामी मोटारही गेली. मला

मात्र चार फर्लांग पायी चालत हबीब मुहंमद उतरले होते तेथे जावे लागले. गोष्ट लहानशीच खरी पण गेली चोवीस वर्षे मी ती विसरू शकलो नाही.

हबीब मुहंमदना मी भेटलो. मी त्यांना म्हटले, "आपण मला ज्युनिअर असलेले महबूब रहमान यांना आदिलाबादचे हंगामी डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमलेत. मला त्याविषयी काही तक्रार करावयाची नाही. उटनूरला मुलांची प्राथमिक शाळा आहे. माझी मुले पाचवी सहावीत शिकत आहेत. ज्या तालुक्याला मिडल स्कूल आहे तेथे मला आपण बदलावे. मग तालुका वाईट हवापाण्याचा असला तरी मी तक्रार करणार नाही." यावर माझ्याकडे एक तिरस्काराचा कटाक्ष टाकून हबीब मुहंमद म्हणाले "आप उटनूरपर है, आपको वहीं रहना होगा." (तुम्ही उटनूरला आहात. तुम्हांला तेथेच राहावे लागेल.)

यावर मी काहीच बोललो नाही. मी सुभेदारांचा निरोप घेऊन परत आलो. माझे मन फार विषण्ण झाले. आपण ही नोकरी सोडावी असे मला वाटू लागले. माझे वर्गबंधू वामनराव नातू (हे पुढे मुंबईला टेक्स्टाइल कमिशनर होऊन चारपाच वर्षांपूर्वी वारले) त्यावेळी हिंदुस्थान सरकारच्या सचिवालयात होते. मी त्यांना पत्र लिहून त्यांच्या शिफारशीने कुठे तरी तीनचारशेची नोकरी मिळू शकेल काय म्हणून विचारले. माझ्या पत्राने त्यांना वाईट वाटले. आपल्या उत्तरात वामनराव नातू यांनी लिहिले—'तुम्ही नोकरी सोडू इच्छीत आहात हे ऐकून मला वाईट वाटले. पण बारा वर्षे नोकरी केल्यावर ती तुम्ही सोडावी हे मनाला पटत नाही. हे दिवस असेच राहतील असे नाही. निरुत्साही होऊ नये.' अर्थात अशा पत्राने माझे समाधान होणे शक्य नव्हते. पण सहन करण्याशिवाय काही गत्यंतर नव्हते.

मराठी, कानडी, हिंदी, इंग्रजी, बंगाली, उर्दू, पर्शियन, तेलगू या भाषा मला येतात, फ्रेंचही थोडीबहुत समजते. मी आता गोंडी भाषेच्या अभ्यासाकडे वळलो. गोंडांची पुराणे आणि दंतकथा यांची बाळबोधात लिहिलेली एक वही मी घेतली. सृष्टीची उत्पत्ती यावरील ते गोंडी पुराण होते. वहीत मजकुराची सेहेचाळीस पाने होती. मी मराठी येणाऱ्या एका गोंडाला बरोबर घेतले. मदत करायला गोंडी शाळेचे मुख्याध्यापक जोगुलकर हे होते. पहिल्या पानावरील प्रत्येक शब्द आणि त्याचे मराठी भाषांतर मी माझ्या वहीत टिपून घेतले. सेहेचाळीस पानांतील सगळे उतरून घेतलेले शब्द एक हजार भरले. गोंडीत मराठी शब्द पुष्कळच आहेत. पण ही भाषा मूळची द्रविडच.

क्रियापदात आपण जाणे, उठणे, बसणे असे म्हणतो. गोंडीत जाणे–सोंदाना,

उठणे—नीलाना, बसणे–उदाना, करणे–कियाना, असणे–राहाणे–मंदाना असे म्हणतात.

मी गोंडी क्रियापदांचा अभ्यास केला. गोंडी आणि कन्नड या भाषांत विलक्षण साम्य आहे. कानडी आणि मराठी या दोन्ही माझ्या मातृभाषाच असे मी समजतो. कर्नाटकात आमच्या तब्बल पाच पिढ्या गेल्या होत्या. घरात लहानपणी मोडी कित्ते गिरविणे, आणि मराठीतून महाभारत-रामायण वाचून काढणे, हे संस्कार झाले नसते तर मी कदाचित् कन्नड साहित्यिक बनलो असतो.

माझ्या कानडीच्या अभ्यासामुळे गोंडी भाषा मला पंधरा दिवसांत येऊ लागली. एकदोन महिन्यांत मी तास तासभर गोंडीत बोलू लागलो. व्याख्याने देऊ लागलो.

हिंदुस्थानात गोंडांची संख्या तीस लाखांपर्यंत आहे. ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्र या चार प्रांतांत ते पसरले आहेत. ओरिसात त्यांना खोंड म्हणतात. इतरत्र गोंड स्वतःला कोईतुर अगर कोया म्हणवितात. चांदा, नागपूर आणि मध्यप्रदेश येथील गोंडांनी राज्ये स्थापन केली. त्यांच्यावर हिंदू संस्कृतीचे संस्कार झाले, चांद्याकडे ते देवीचे उपासक बनले. दसरा, दिवाळी हे सण पाळू लागले. दसऱ्याच्या प्रसंगी शस्त्रास्त्रांची पूजा करू लागले. हे क्षात्रवृत्तीचे गोंड स्वतःला राजगोंड म्हणवून घेऊ लागले. या राजगोंडांचे भाट असतात. त्यांना प्रधान म्हणतात. गोंडांची उत्पत्ती कशी झाली यासंबंधी पुढील कथा त्यांच्यात प्रचलित आहे.

एक होते जंगल, त्याच्या तिन्ही बाजूंनी समुद्र एका बाजूला जमीन आणि मध्ये जंगल. त्यात एक गुरू राहात होते. त्यांना एक सुंदर मुलगी होती. तिचे नाव कंकालकाली. दररोज ती सकाळी आंघोळीला समुद्रावर जायची. ती आंघोळ करून परत आली की तिचा बाप तिला तराजूत घालून तिचे वजन करायचा. हेतू हा की, तिच्यावर कोणाची पापी नजर गेलेली नाही ना हे तपासून घ्यावे–तराजूवरून हा तपास लावावा. कंकालकाली इतकी नाजूक होती की, तिचे वजन गुलाबाच्या सात फुलांच्या एवढेच भरावे.

एक दिवशी काय झाले ? कंकालकाली ही नेहमीप्रमाणे आंघोळीला म्हणून समुद्रावर गेली. तेथे तपेगुरु होते, त्यांची नजरानजर झाली. तोच कंकालकालीला जड वाटू लागले. तशीच ती आपल्या घरी आली नेहमीप्रमाणे तिच्या बापाने तिचे वजन केले. पाहतो तो तिचे वजन नेहमीपेक्षा जास्त भरले. बाप तिला म्हणाला, ‘ तुझे शील बिघडले आहे. तू घरातून चालती हो. ’ कंकालकाली रानोमाळ भटकू लागली. तिच्या पोटातील गर्भ वाढत होता. नाइलाजाने ती

एका उंबराच्या झाडाला टेकून बसली. तेथेच ती बाळंतीण झाली. तिला तीन प्रकारची मुले झाली. तेलगू देव, मराठी देव आणि गोंड देव. गोंड देवांची संख्या बावीस होती.

मुले जन्मल्यानंतर कंकालकालीने त्यांना आपल्या अंगावरील अर्ध्या वस्त्रात गुंडाळले आणि उंबराच्या झाडाच्या पायथ्याशी ठेवून दिले. शिवाय झाडातून रस गळेल व नेमका मुलांच्या तोंडांत तो पडेल अशीही सोय करून ठेवली. नंतर ती आपल्या बापाकडे परत गेली. पण त्याने तिला घरात घेतली नाही. निरुपाय होऊन ती झिंगूबाईच्या आश्रयाला गेली.

इकडे शंभू महादेव आणि पार्वतीबाई नंदीवर बसून भ्रमण करीत होती. फिरत फिरत ते उंबराच्या झाडापाशी आले तो पार्वतीच्या कानावर पाखरांच्या-सारखी किलबिल आली. तिने शंभूमहादेवाला म्हटले, ‘ देवा, तेथे कसला आवाज येतो बघावे. ’ पार्वतीने तिकडे जाऊ नये म्हणून महादेवाने खूप प्रयत्न केला. पण तिने ते ऐकले नाही. काही तरी निमित्त काढून ती नंदीवरून खाली उतरली आणि उंबराच्या झाडाजवळ आली. तेथे पाहाते तो आवाज पाखरांचा नसून फडक्यात गुंडाळलेल्या लहान मुलांचा होता. मुलांना पाहून पार्वतीला दया आली. तिने त्यांचा सांभाळ केला. तिने मुलांना आपल्या कुशीत पाजायला घेतले. एका बाजूने गोंडदेव आणि दुसऱ्या बाजूने तेलगू व मराठी देव पिऊ लागले. मराठी व तेलगू देवांनी पोटभर दूध पिऊन घेतले. पण गोंडदेवांनी मात्र दूध संपले तरी शोषण करण्याचा सपाटा लावला. त्यामुळे पार्वती सुकत चालली.

शंकराला हे समजले. त्याकारणाने गोंडदेवांना आईचे दूध बंद करण्याची त्याने एक युक्ती काढली. तो त्यांना म्हणाला–‘ आईचे दूध आता पुरे. मी तुमच्या जेवणाची सोय करतो. तोपर्यंत तुम्ही सर्वजण स्नान करून या. ’ गोंडांना ही सूचना आवडली. ते सर्वजण आंघोळीला निघून गेले. तिकडून परत येताना त्यांना तहान लागली. तो ते एका झाडाखाली विसावले. ते झाड होते गुल-मोहाचे. झाडाच्या पानावरून रस गळत होता. तो चाखून त्यांना आनंद वाटला. तेव्हापासून गोंडांना मोहाच्या दारूची चटक लागली.

इकडे महादेव बैराग्याचा वेष घेऊन गोंडांच्याकडे गेला. मला भोजन द्या, असे तो त्यांना म्हणाला. यावर ‘ अरे गोसावड्या, चल नीघ येथून ’ असे गोंड त्याला म्हणाले. महादेव म्हणाला, ‘ हे गोंड फार मस्त झाले आहेत. त्यांना शिक्षा झाली पाहिजे. ’ त्याने खार तयार केली आणि ती गोंडांच्याजवळ सोडली. खार बघून गोंडांना आनंद झाला. ते पुढे धावले. खार पुढे पुढे पळू लागली. गोंड तिच्या मागे लागले. पळत पळत खारीने एका विहिरीत उडी टाकली.

गोंडांनीही तिच्या मागोमाग विहिरीत उड्या घेतल्या. शंकराने विहिरीच्या तोंडावर भला मोठा दगड बसविला. जवळच्या झाडावर त्याने रुकेसूर नावाच्या पक्ष्याचे जोडपे देखरेखीसाठी ठेवून दिले. ही हकीकत कंकालकालीला समजली. ती विव्हळ झाली. त्या काळीं एक परमभक्त गोंड राहात होता. तो महादेवाचा भक्त होता. त्याच्या अंगभर शिवलिंगे होती. म्हणून त्याला पाडीकूपार लिंगो म्हणत. कंकालकालीच्या विनंतीवरून त्याने उग्र तप आरंभिले. त्या तपाने महादेवाचे आसन डळमळू लागले. तो प्रकट होऊन लिंगोला म्हणाला, 'तुला काय हवे आहे ?' लिंगो म्हणाला–'गोंडांना विहिरीतून सोडव.' महादेवाने लिंगोचे म्हणणे कबूल केले. मग झिंगुबाईच्या मदतीने लिंगोने गोंडांना विहिरीतून बाहेर काढले.

विहिरीतून बावीस गोंड बाहेर पडले. ते चार, पाच, सहा आणि सात असे चार गट करून बाहेर आले. त्यावरून नाल्वेनसगा (चारांचा गट), सीवेनसगा (पाचांचा गट), सारबेनसगा (सहांचा गट) आणि एडवेनसगा (सातांचा गट), अशी चार गोत्रे गोंडांत निर्माण झाली. यानंतर वसाहतीसाठी गोंड बाहेर पडले. फिरत फिरत ते एका नदीच्या काठावर आले. तेथे एका मगरीने त्यांना आपल्या पाठीवर वाहून नेण्याचे कबूल केले. पण अर्ध्या वाटेत ती त्यांना बुडवू लागली. तसे त्यांनी तिच्या थोबाडीत मारले. पुढे एका कासवाने त्यांना न्यायचे कबूल केले. त्यानेही काही अंतरावर त्यांना दगा दिला. त्यांनी कासवाला खूप बदडले. तेव्हापासून कासवाचे पाय त्याच्या पोटात जाऊ लागले.

हे दृश्य काठावरच्या झाडावर बसून एक वानर पाहात होता. तो गोंडांना म्हणाला–'मी तुम्हांला मदत करतो.' असे म्हणून त्याने झाडाच्या फांद्या तोडून त्यांच्याकडे फेकल्या. त्यांना धरून गोंड नदीपार झाले. वानराने आपल्यावर उपकार केले म्हणून गोंडांनी ठरविले की, वानराचे तोंड काळे आहे ते लाल केले पाहिजे. मग प्रत्येक गोंड पान खाऊन वानराच्या अंगावर आणि तोंडावर पानाच्या रसाची पिचकारी सोडू लागला. तेव्हापासून लाल तोंडांची वानरे अस्तित्वात आली.

गोंडांनी ठिकठिकाणी वसाहती केल्या. पुढे त्यांच्या वंशांचा विस्तार होऊन शेकडो पाडी म्हणजे घराणी निर्माण झाली. घराण्यांची नावे झाडांवरून आणि जनावरांवरून घेण्यात आली आहेत. काही पाड्यांची नावे पहा : सोयाम, मेसराम कुमरा, आतराम, टेकाम, मडावी, सेलमाकी, कोडपाक, जुगनाक, धुर्वा, गोडाम, कोवा इत्यादी. कोवा हा शब्द घ्या. कोवा म्हणजे वानर, गोंड. नदी उतरून जात असता एका वानराने झाडाची फांदी तोडून त्यांच्याकडे फेकली. त्यामुळे

गोंडांना नदी ओलांडता आली. या उपकाराची आठवण म्हणून एका गोंड घराण्याने कोवा हे नाव धारण केले. कोवा घराण्याच्या लोकांना गोंड हे आपले धाकटे भाऊ समजतात. त्यांना कोणत्याही प्रकारचा उपसर्ग देऊ नये असा गोंड समाजात दंडक आहे.

उटनूरला मी कसेबसे दिवस काढीत होतो. दौऱ्यात पावसाचा मारा आला की तीन तीन दिवस खेड्याच्या चावडीत अडकून पडावे लागे. तालुक्यातील जंगल झाडी विलक्षण होती. श्वापदांची भीती सतत मनात राही. गोंडांना त्यांचे काही वाटत नसे. वाघाला तर ते आपले दैवत समजत. उटनूर येथे आणि भोवती तालुक्याच्या खेड्यापाड्याच्या दौऱ्यात बोलायलाही माणसे मिळणे मुष्कील होई. मी आपला वेळ वाचनात घालवीत असे. इंद्रवेळी या खेड्यात मी तीन दिवस अडकून पडलो. त्यावेळी मॅकालेचे एसेज वाचून काढल्याचे मला आठवते.

माझ्या संशोधनकार्याबद्दल हायमंडार्फ यांनी महसूलमंत्री ग्रिग्सन आणि महसूल सचिव सॅवेज यांना सांगितले असावे. ग्रिग्सन हे दोन महिन्यांच्या रजेवर गेले तेव्हा सॅवेज हे आय. सी. एस. अधिकारी हंगामी महसूलमंत्री म्हणून काम पाहू लागले. सेतु माधवरावांच्या बढतीच्या प्रकरणाकडे आम्ही सहानुभूतीनें पाहू असे उद्‌गार त्यांनी काढले असावेत. आणि ही बातमी आमचे कलेक्टर कमिशनर यांच्या कानावर गेली असावी.

प्रजेशी किंवा हिंदू अधिकाऱ्यांशी वागताना मुसलमान अधिकारी मग्रूरीनें वागत. पण युरोपियनांच्या समोर नांग्या टाकीत. माझ्या बढतीचे दिवस आता टळू शकत नाहीत असे वाटताच त्यांची माझ्यासंबंधीची वागणूक बदलू लागली.

आमचे कलेक्टर कमरुद्दीन आणि कमिशनर (सुभेदार) हबीब मुहंमद यांचे आपापसात बरे नव्हते. आणि हबीब मुहंमद हे माझ्या विरुद्ध होते. सॅवेज उटनूरच्या दौऱ्यावर येणार हे पाहून कमरुद्दीन एक दिवस आधी उटनूरला आले. ते मला म्हणाले,

" माधवराव, तुम्ही सॅवेजकडे आपल्या बढतीसाठी अर्ज का करीत नाही ? " मी म्हणालो, " थ्रू प्रॉपर चॅनेल पाहिजे ना. सुभेदारसाहेब काय म्हणतील ! " ते म्हणाले, " अहो, तर्के तवस्सुत (थ्रू प्रॉपर चॅनेल) ने न जाण्याची काय भीती बाळगता ! सॅवेज दौऱ्यावर येताहेत. त्यांच्यापाशी अर्ज द्यायला काय हरकत आहे ? "

मला तेच हवे होते. आमचे डेप्युटी कलेक्टर आणि आदिवासींचे विशेष अधिकारी मुअज्जम हुसेन हे त्यावेळी हैदराबादेस होते. त्यांचा इंग्रजी टाइपरायटर उटनूरच्या रेस्ट हाऊसमधे होता. मी त्यावर इंग्रजीतून एक अर्ज टाइप केला

आणि तो देण्यासाठी योग्य संधीची वाट पाहू लागलो.

पाच नोव्हेंबर १९४५ ला, हंगामी महसूल मंत्री सॅवेज, सुभेदार (कमिशनर) हबीब मुहंमद आणि कलेक्टर कमरुद्दीन हे उटनूरला आले. उटनूर आणि मार्लवाई येथील दौरा आटोपून ते परत जाण्यास निघाले त्यावेळी सुभेदारांची नजर चुकवून मी आपला अर्ज सॅवेजच्या हाती दिला. माझा मित्र हणमंतराव प्रभुणे याने मला सांगितले होते, की पाच नोव्हेंबरपासून माझे ग्रह बदलू लागतील. आणि पाच नोव्हेंबरलाच मी माझ्या बढतीचा अर्ज केला.

अर्थात यातून काही निष्पन्न होईल याची मला खात्री नव्हती. तीन डिसेंबरला मी रजा काढून बनारसला गेलो. तेथे मी एक आठवडाभर होतो बनारसला माझे जुने प्राध्यापक, खापर्डे, मलानी, साहनी, डॉक्टर नाग, सुरेंद्रनाथ भट्टाचार्य इत्यादींच्या गाठी पडल्या. मी पुन्हा एकदा दशाश्वमेध घाटावर बसून गंगामाईचे पोटभर दर्शन घेतले. बनारसचे जुने दिवस आठवून मला भडभडून आले. माझे जुने मित्र पांगले होते. जोगेशचंद्र मुजुमदाराने व्हिएन्नात नाझी छळाला कंटाळून आत्महत्या केली होती. उमाशंकर गिरिजानंद मॉरिशसला निघून गेला होता. ऋषिकुमार चटर्जी झाशीला शिक्षक झाला होता. सीताराम वर्मा बनारसला वकिली करीत होता. आत्याबाई रेवा संस्थानात आपल्या नातेवाइकाकडे गेल्या होत्या. सुंदराबाईचा पत्ता नव्हता. बनारसचे जुने दिवस आठवत मी किती तरी तास बनारसच्या गल्लीबोळांतून भटकत होतो. पण काळ मोठा निर्दय आहे. तो कुणासाठीही थांबत नाही. फक्त पुढे जाता जाता तो आठवणीच मात्र मागे ठेवीत जातो.

मी प्राध्यापक सिपाहीमलानी यांना भेटण्यास गेलो. त्यांनी माझे खूप अगत्य केले. मिसेस मलानींनी मला विचारले—" तुम्ही आता कोणत्या हुद्द्यावर आहात ? " मी म्हटले, " मी तहसीलदार आहे. " मिसेस मलानी म्हणाल्या, " हा काय हुद्दा आहे ? " यावर प्राध्यापक मलानींनी सिंध प्रांतातील तहसीलदारां-संबंधी एक विनोदी गोष्ट सांगितली. ते म्हणाले, " सिंधमध्ये एक अतिशय लाचखाऊ असा तहसीलदार होता. त्याने व्यापाऱ्यांना छळून त्यांच्याकडून हजारो रुपये उकळले होते. सिंधमध्ये मुलींच्या लग्नाला हजारोंनी हुण्डा द्यावा लागतो. यामुळे तहसीलदारापाशी शेवटच्या दिवसांत काहीच शिल्लक राहिले नव्हते. अजून एक दोन मुली लग्नाच्या होत्या. त्यासाठी निदान पन्नास साठ हजार रुपये लागले असते. तहसीलदाराने एक युक्ती केली. त्याने आपल्या बायकोला काही सूचना केल्या. यानंतर थोड्याच वेळाने तो मरण पावला. त्याच्या बायकोने ताबडतोब गावातील प्रमुख व्यापाऱ्यांना बोलावून घेतले. ती

बोलत घरी येत असू. दुपारी जेवणासाठी मी होळकर वाड्यात जाई. तेथे जेवणी आटोपून घरी येई. तास दोन तास झोप काढून अण्णासाहेबांच्या जवळची पुस्तके घेऊन वाचीत बसे. संध्याकाळी गंगेचा देखावा पाहात मी रात्री आठ वाजेपर्यंत घाटावर हिंडत असे. तेथून घरी आल्यावर तास दोन तास वाचन करून मी झोपी जाई.

बनारसला गेल्यावर पाचसहा दिवसांतीलच प्रकार असावा. होळकरवाड्यात जेवण करून मी बाहेर पडलो. हातात दक्षिणेचा एक पैसा होता. मी पान-वाल्याच्या दुकानावर गेलो. चांगला मसालेदार विडा घेऊन तो तोंडात धरून मी दुकानासमोर उभा होतो. तेथेच एक गलेलठ्ठ माणूस उभा होता. तोही पान खात होता. धोतर, अंगावर उपरणे, कपाळाला भक्कम गंध, लाल डोळे अशा थाटात हे राजश्री उभे होते. मला पाहून ते मराठीत बोलले, "आपण बनारसला नवीन दिसता." बोलण्यावरून बोलणे निघाले. मी त्याला आपली हकीकत सांगितली. तो विद्वान पंडित होता. घनपाठी म्हणाना. मी त्याला मंत्रजागराच्या वेळी, आणि इतरत्र ब्राह्मणांच्या मेळाव्यात वेदमंत्र म्हणताना पाहिला होता. तो म्हणाला, 'मी जवळच राहातो, आपण थोडा वेळ बोलत बसू.' मी मनात म्हटले, हा मनुष्य संस्कृतचा पंडित दिसतो. गप्पा झाल्या तरी विद्वत्तेच्याच होतील, मी त्याच्याबरोबर त्याच्या घरात गेलो. घरातील ओसरीवर बिछाईत केली होती. तेथे लोडाशी आम्ही लवंडलो. बनारसला उन्हाळा कडक असे. दोराने ओढण्याचे पंखे घरोघर असत. माणसे झोपल्या झोपल्या फिरकीतून खाली आलेला दोर ओढीत आणि वारा घेत. पंखा ओढण्यास वेगळा मनुष्य लागत नसे. आम्ही लवंडलो होतो. शास्त्रीबुवा पंखा ओढीत होते. बोलता बोलता मला डुलकी लागली असावी.

मला एकदम जाग आली ती कोणीतरी माझ्या धोतराच्या सोग्याला हात घालून ओढीत आहे या जाणिवेने. मी डोळे उघडून पाहतो तो काय, अडीचशे पाऊंड वजनाचे शास्त्रीबुवा माझ्या धोतराच्या सोग्याशी खटपट करीत आहेत. मी ताडकन् उठून उभा राहिलो. माझ्या कपाळाला आठ्या पडलेल्या पाहून शास्त्रीबुवांनी धोतराने अंग (उर्दूत म्हणतात तसे किस्सा मुख्तसर था, कथा संक्षिप्त होती. सुज्ञांनी ओळखावे) झाकून घेतले. ते मला म्हणाले, 'आपण रागावलेत काय?' मी म्हटले, 'राग, अहो किळस म्हणा, वेदाध्ययनातून आपण हेच पुण्य संपादन केलेले दिसते!' असे म्हणून मी घरातून बाहेर पडलो. घरी आल्यावर मी अण्णासाहेबांना ही हकीकत सांगितली. ते किंचित हसून गंभीरपणे म्हणाले, 'त्याने तुझ्यावर प्रयोग करण्याचा प्रयत्न केला काय?'

यांना म्हणाली, " माझ्या पतींनी तुम्हांला फार छळले. मरताना याचा त्यांना पश्चात्ताप झाला. ते म्हणाले, ' मी मेल्यावर तू व्यापाऱ्यांना बोलावून माझ्या प्रेताला काठ्यांनी यथेच्छ झोडपून काढण्यास सांग. आपण तहसीलदाराला बदडून काढले याचे त्यांना समाधान लाभेल आणि माझ्या आत्म्यालाही थोडी तरी शांती मिळेल.' तिच्या म्हणण्याप्रमाणे व्यापाऱ्यांनी तहसीलदाराचे प्रेत काठ्यांनी बेदम झोडपून काढले. तहसीलदाराला मरून एक तासही झाला नव्हता. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या झोडपण्यामुळे प्रेतावर वळ उठले. यानंतर व्यापारी परत जाऊ लागले. तोच तहसीलदाराच्या पत्नीनें त्यांना अडविले. ती म्हणाली, " तुम्ही माझ्या नवऱ्याला काठ्यांनी झोडपून ठार मारलेत. आता कुठे चालला ! थांबा, मी पोलिसांना बोलाविते." हे ऐकून व्यापाऱ्यांची पाचावर धारण बसली. ते म्हणाले, " अहो तहसीलदारसाहेब आधीच मेले होते. आम्ही फक्त प्रेताला काठ्या मारल्या." यावर ती म्हणाली–" तुमच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवील. प्रेताला कोण कशाला मारील. ते काही नाही. आताच्या आता एक लाख रुपये मोजा तरच तुमची सुटका होईल. नाहीतर पोलिस येऊन तुमचे धिंडवडे काढतील." व्यापाऱ्यांनी मुकाट्यानें एक लाख रुपये भरले आणि आपली सुटका करून घेतली. तहसीलदाराच्या पत्नीनें आपल्या दोन्ही मुलींचे विवाह समारंभ मोठ्या थाटात घडवून आणले. त्या दिवसापासून सिंधच्या व्यापाऱ्यांत म्हण पडून गेली की, तहसीदार मेला असला तरी त्याच्या प्रेतापासून कैक मैल दूर राहा. नाहीतर नाहक संपत्तीला मुकाल."

मलानींनी ही गोष्ट सांगितली. आम्ही पोट धरधरून हसलो...

बनारसला उषा, माझ्या दोन मुली अलकनंदा आणि अंजली या होत्या. अलकनंदा बनारसच्या प्राथमिक शाळेत जाऊ लागली होती. माझे श्वशुर बाबासाहेब यांच्या खासगी ग्रंथालयात पाच हजार पुस्तके होती. बाबासाहेबांशी अनेक विषयांवर चर्चा होत. त्यांचा व्यासंग जबरदस्त होता. एक आठवड्याचा मुक्काम संपला तेव्हा बनारस सोडणे जिवावर आले. पण त्याला काही इलाज नव्हता. १९४५ च्या वीस डिसेंबरला मी बनारस सोडले. त्यानंतर मला पुन्हा बनारसला जाणे झाले नाही.

मी सॅवेजला दिलेल्या अर्जावर अनुकूल विचार झाला असावा. कारण महसूल खात्याचे डेप्युटी सेक्रेटरी जहीर अहंमद (हे आता यूनेस्कोत आहेत) यांनी मला हैदराबादेस बोलाविले. माझ्यावर रुबाब जमविण्यासाठी म्हणून त्यांनी मला पाहताच म्हटले, " पहा, पहा, तुमचे वरिष्ठ अधिकारी तुमच्याविषयी काय म्हणतात ते. सेतुमाधवराव जातीयवादी आहेत. ते मुसलमानांचा

द्वेष करतात, ते राजकीय चळवळींत भाग घेतात. वेळ येईल तेव्हा या सरकार-विरुद्ध चळवळ करण्यास ते मागेपुढे पाहणार नाहीत. त्यांना बढती देऊ नये, इतकेच नव्हे तर त्यांना डिग्रेड करण्यात यावे.' ते ऐकून मी त्यांना म्हटले, "इंग्रजीत एक म्हण आहे. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांच्या घरावर दगडफेक करू नये. हा सगळा प्रकार पाहून राजीनामा देऊन निघून जावे असे वाटते." यावर जहीर अहमद उसळून म्हणाले, "हू प्रिव्हेन्टस यू फ्रॉम रिजाइनिंग—? तुमचा हात कोणी धरला आहे?" नंतर सौम्य होऊन ते म्हणाले, "हे पहा माधवराव, मी तुम्हांला सचिवालयात घ्यायला तयार आहे, पण तुम्ही व्यवस्थित वागला तर, प्रोव्हाइडेड यू बिहेव..." मी म्हटले, "वरच्या अधि-काऱ्यांनी माझ्याविरुद्ध जे लिहिले आहे ते आपल्याला खरे वाटते तर!" "नाही, नाही." ते म्हणाले, "मी त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाही. ते काही असो, मी लिहिणार आहे की तुमची वृत्ती वैफल्याची झाली आहे. तुम्हांला बढती देण्यात यावी." "थँक यू" म्हणून मी तेथून निघून आलो.

इंग्रज म्हटला की मुसलमान अधिकाऱ्यांच्या नांग्या ढिल्या होत. जहीर अहमदनी वरकरणी कितीही आव आणला तरी मला बढती दिल्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांना कळून चुकले होते.

हीच गोष्ट सुभेदार हबीब मुहंमद यांनाही कळली होती. माझी आणि हाय-मंडार्फची जोडी तुटली की मला बढती देण्याची आवश्यकता राहणार नाही, असा विचार त्यांनी केला. लगेच त्यांची माझ्याशी वागणूक बदलली. तोपर्यंत ग्रिग्सन हे रजा संपवून महसूल मंत्र्याच्या जागेवर रुजू झाले होते. जानेवारी १९४६ च्या सुरुवातीला ते, हबीब मुहंमद, आणि जमील हुसेन (सहकारी खात्याचे संचालक. मी करीमनगरला असताना ते तेथे कलेक्टर होते.) हे उटनूर आणि मार्लवाई येथील दौऱ्यावर आले. दौरा आटोपून ग्रिग्सन परत निघून गेले. हबीब मुहंमद आणि जमील हुसेन यांच्यासाठी मी उटनूरला चहा फरा-ळाची व्यवस्था केली होती. जमील हुसेननी चहा घेतला पण हबीब मुहंमद काही केल्या पिईनात. मी त्यांना म्हटले, "जनाबेवाला (महाराज), आपला माझ्यावर रोष आहे हे मला माहीत आहे, पण माझ्या घरचा चहा घेऊन आपण आपला रोष दूर करावा, असे मी कधीही म्हणणार नाही याची आपण खात्री बाळगावी." मी असे म्हटल्यानंतर हबीब मुहंमदनी चहा घेतला. ते मला म्हणतात काय—"माधवराव, तुमची उटनूरहून बदली करावी म्हणून महसूल सचिवांना सांगितले, पण ते ऐकत नाहीत त्याला काय करावे?" अवघ्या पाच सहा महिन्यांपूर्वी यांनीच "आपको उटनूरमेंही रहना पडेगा." असे मला

ठणकावून बजावले होते. आता त्यांना माझा पुळका आला होता तो केवळ माझी आणि हायमंडार्फची जोडी फोडावी म्हणून. मी काहीच बोललो नाही.

जानेवारी महिन्यात उटनूर तालुक्यात केसलापूर येथे गोंडांची जत्रा भरते. त्याला ग्रिग्सन, हायमंड्राफ, जहीर अहमद इत्यादि अधिकारी आले होते. जत्रेच्या निमित्ताने गोंडांची सभा घेण्यात येते. सभेत माझे अस्खलित गोंडीत अर्धा तास भाषण झाले. भाषण ऐकून ग्रिग्सन खूष झाले. संध्याकाळी त्यांनी गोंडी व्याकरणाबद्दल माझ्याशी पाऊण तास चर्चा केली.

जत्रा संपल्यावर मी उटनूरला परत आलो. उषा आणि मुली बनारसला होत्या. मुले माझा भाऊ राघवेंद्र याच्याकडे औरंगाबादला होती. राघवेंद्राला औरंगाबादची नोकरी आवडली नाही. त्याने ती नोकरी सोडली आणि तो हैदराबादेस आला. माझी मुले अरुण आणि अशोक ही हैदराबादच्या आंध्र हायस्कूलमध्ये प्रविष्ट झाली. राघवेंद्राने काही दिवस सहकारी खात्यात ट्रेनिंग घेतले. पुढे ते खाते त्याने सोडले. मी खटपट करून त्याला स्टेट बँक ऑफ हैदराबादमध्ये नोकरी लावून दिली. तेव्हापासून तो बँकेत आहे आणि आज ऑफिसर झाला आहे.

फाल्गुनाचा महिना होता. सकाळची वेळ होती. मी आपल्या ऑफिसच्या (तेच माझे घर) व्हरांड्यात आरामखुर्चीवर बसून मद्रासचे इंग्रजी दैनिक हिंदू वाचीत होतो. समोरच्या झोपडीत माझा स्वयंपाकी अंबादास राव चहा करीत होता. इतक्यात अंबादास ओरडला–"साहेब, साहेब." हा असा का ओरडतो म्हणून मी डोळ्यांसमोरचा पेपर बाजूला सारून समोर पाहिले तो माझ्यापासून पाचसहा पावलांवर एक चित्ता उभा राहून माझ्याकडे पाहात होता. मी आपल्या जागेवर खिळून राहिलो. इतक्यात माझ्या स्वयंपाक्याच्या ओरड्याने चित्ता घाबरला. तो माझ्या रोखाने दोन तीन पावले पुढे आला. नंतर त्याला काय वाटले कोणास ठाऊक, तो उजवीकडे वळला. अंगणात एक लिंबाचे झाड होते. त्याच्या खाली थोडा वेळ उभा राहून त्याने जवळील कुंपणावरून उडी मारली आणि माझे पेश्कार (अव्वल कारकून) यांच्या स्वयंपाकघराच्या झोपडीत तो घुसून बसला. शेवटी काही माणसे झाडावर चढली आणि त्यापैकी एकाने गोळी घालून चित्त्याला ठार केले. चित्त्याचे कातडे पुढे बरेच दिवस माझ्याकडे होते.

असे अनेक प्रसंग माझ्यावर आले. मार्लवाईला मी आणि जोगुलकर झोपडीत गप्पा मारीत बसलो असताना छतातून माझ्या डोक्यावर साप पडला. आमची काय तारांबळ उडाली असेल याची कल्पना केलेली बरी! इंद्रवेळीच्या चावडीत मी झोपलो असताना रात्री झोपडीतील पणतीतील तेल पिण्यासाठी उंदीर आले अ ाणि उंदरांना खाण्यासाठी साप आला. झोपडीत अंधार झाला तसा मी जागा

झालो. पाहतो तो उंदराचे ओरडणे आणि सापाचा फूत्कारही माझ्या कानावर पडला. एकदा दौऱ्यावर असताना बैलगाडीत मी बसल्या बसल्या डुलकी घेत होतो. मला सापाचे स्वप्न पडत होते. मी जागा झालो. पाहातो तो गाडीच्या तट्ट्यातून एक साप आपले डोके बाहेर काढून माझ्याकडे पाहात होता. मला प्रथम वाटले—आपल्याला स्वप्न पडत आहे म्हणून. पण नंतर लक्षात आले की, माझ्याकडे पाहात असलेला साप खराच आहे. मी हळूच गाडीतून उतरलो आणि काठीने सापाला ओढून काढून त्याला मारले.

असे ते जीवन होते. मलेरिया आणि गौट ही दुखणी तर सारखी माझ्या मागे लागली होती. उटनूरला मेडिकल ऑफिसर फार दिवस टिकत नसत. दोनतीन महिन्यांत बदलून जात. करवंदे, किशनराव मानवीकर, डॉक्टर दाचा इत्यादि डॉक्टर मंडळी मला आठवतात. सरकारी दवाखाना एका झोपडीत होता. ही मंडळीही झोपड्यांतून राहात. माझ्या ऑफिसचा हॉल तेवढा दगड-विटांचा होता. त्यामुळे मानवीकर आणि इतर डॉक्टर मित्रांचे उठणेबसणे माझ्याकडेच असे.

एप्रिल महिन्यात आदिलाबादचे कलेक्टर कमरुद्दीन हे तीन महिन्यांच्या रजेवर गेले. आसफाबादचे डेप्युटी कलेक्टर अब्दुलकादर हे हंगामी कलेक्टर झाले आणि मला डेप्युटी कलेक्टर म्हणून आसफाबादवर नेमण्यात आले. आसफाबाद हे उटनूरहून तीस पस्तीस मैलांवर होते. सहा एप्रिल १९४६ रोजी मी उटनूरहून निघालो. अकरा एप्रिलला मी डेप्युटी कलेक्टर म्हणून कामाचा चार्ज घेतला. आदिलाबाद जिल्हा हा पेणगंगा आणि गोदावरी यांच्या दुआबात आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे सात हजार चौरस मैलांचे होते. पेणगंगेच्या काठाकाठाने किन्वट, बोथ, आदिलाबाद, सिरपूर आणि राजुरा हे तालुके होते. गोदावरीच्या काठावर निर्मल, लक्षटीपेठ आणि चिन्नूर हे तालुके होते. जिल्ह्याच्या मध्यात उटनूर तालुका तर पूर्वेकडे आसफाबाद तालुका होता. जिल्ह्याच्या कलेक्टरच्या हाताखाली आदिलाबाद, आसफाबाद आणि उटनूर येथे डेप्युटी कलेक्टर (दुय्यम तालुकदार) असत. उटनूरचा डेप्युटी कलेक्टर हा जिल्ह्याच्या सर्व आदिवासींचा विशेष अधिकारी होता. राज्यपुनर्रचनेनंतर आदिलाबाद जिल्ह्याचे किन्वट (आता नांदेड जिल्ह्यात) आणि राजुरा (चांदा जिल्ह्यात) आणि बोथ तालुक्यातील सहस्त्रकुंड इत्यादी खेडी ही महाराष्ट्रात आली आहेत.

आसफाबादला माझ्या हाताखाली आसफाबाद, राजुरा, सिरपूर आणि चिन्नूर हे तालुके होते. या भागात मंचरियाल येथे सिमेंटचा कारखाना, शिरपूरला कागदाचा कारखाना, बेलमपल्ली येथे कोळशाच्या खाणी हे उद्योगधंदे होते. सिरपूर भागात घनघोर अरण्य असून तेथे वाघांच्या शिकारीसाठी मोठमोठे

शिकारी जात. मद्रास-दिल्ली ही ग्रँड ट्रंक गाडी मंचरियाल, आसफाबाद रोड, शिरपूर आणि राजुरा ही स्टेशने घेत पुढे चांदा-बल्लारशाकडे जाते.

आसफाबाद हा गाव पाचसात हजार वस्तीचा होता. पण तेथे काही दिवस जिल्ह्याची मुख्य कचेरी होती. त्यामुळे तेथे गावाबाहेर चांगले बंगले बांधण्यात आले होते. मला एक चांगला बंगला राहण्यास मिळाला.

गावात काही प्रतिष्ठित मराठी कुटुंबे होती. रामचंद्रराव पैकाजी वकील हे तेथील नामांकित आणि तडफदार वकील होते. आसफाबादेस मिडलस्कूल होते. त्यामुळे मी मुलांना हैदराबादेहून बोलावून घेतले आणि आसफाबादच्या शाळेत घातले. उषा आणि मुली यांनाही मी बनारसहून बोलावून घेतले. मला आता पाचशे रुपये पगार मिळू लागला होता.

जमाबंदी (शेतसाऱ्याचा वार्षिक ठराव)च्या निमित्ताने मी चारही तालुक्यांतील खेडी न् खेडी पाहिली. सिरपूर जमाबंदीच्या निमित्ताने माझा मुक्काम सिरपूरच्या रेस्ट हाऊसमधे होता. तेथे पायगा सरदारांचे भाऊबंदांपैकी एक ‘ जहागिरदार ’ उतरले होते. त्यांचे नाव फकीर पाशा. ते वाघाच्या शिकारीसाठी आले होते. त्यांच्या बरोबर त्यांची एक प्रेयसी होती. जेव्हा तेव्हा ते शिकारीच्या गोष्टी बोलत. त्यांनी आयुष्यात अनेक वाघ मारले होते. शिकारीला जाताना ते आपल्या प्रेयसीला बरोबर नेत. झाडाच्या मचाणावर बसून वाघाची चाहूल घेत घेत प्रेयसीच्या सहवासा(!)चे सुख अनुभविण्यात त्यांना धुंद लज्जत मिळत असावी.

पायगा सरदारांच्या तीन शाखांचे उत्पन्न वर्षाला एक कोटी रुपये होते. त्यात भागीदार म्हणून फकीर पाशाला वर्षाला लाख दोन लाख रुपये तरी मिळत असावेत. मनुष्य तसा बोलून चालून मोकळा. मला तो म्हणाला, “ माधवरावजी, मी साधासुधा शिपाई गडी. एकदा मला सांगण्यात आले की, अमक्या जंगलात तुम्ही शिकार करायची नाही. मी चिडलो आणि हट्टाला पेटून रात्री टॉर्चच्या आणि मोटारीच्या हेडलाइटच्या उजेडात मी अर्ध्या तासात एकवीस हरीण मारले. सरकारची काय हिंमत होते माझ्या मागे लागण्याची. ” त्यांचे हे बोलणे ऐकून मी थक्क झालो. अवघ्या दोन वर्षांत हैदराबाद राज्याच्या चिंधड्या उडणार आहेत याची या गृहस्थाला काही कल्पनाही नव्हती. राजुर, माणिकगड हा मराठी भाषिक तालुका, चिन्नूर हा तेलगु भाषिक, आसफाबाद आणि सिरपूर या तालुक्यांतील काही खेडी मराठी भाषिक; बाकीची तेलगू. गोंडांची वस्ती मात्र सगळीकडे आढळून येई.

१९४६ च्या जुलै महिन्यात उटनूरचा डेप्युटी कलेक्टर आणि आदिलाबाद

जिल्ह्यातील आदिवासींचा विशेष अधिकारी म्हणून माझी नेमणूक झाली. मात्र मला उटनूरला राहण्याच्या ऐवजी आसफाबादेस राहण्याची परवानगी मिळाली.

सर अकबर हैदरी हे हैदराबादच्या पंतप्रधानपदावरून १९४२ मधे निवाले. त्यांच्या जागी उत्तर प्रदेशातील छतारीचे नबाब यांची नेमणूक झाली. १९४६ मधे रजाकारांची चळवळ वाढू लागली होती. चळवळीची सूत्रे कासम रिजवीकडे आली होती. मुसलमान समाज क्षुब्ध होऊ लागला होता. निजामाबाद जिल्ह्यात डिचपल्ली येथील एका मशिदीच्या प्रकरणावरून मुसलमान समाज प्रक्षुब्ध झाला. एका ख्रिस्ती मिशनऱ्याच्या चुकीतून हे प्रकरण उद्‌भवले. हैदराबादेतील मुसलमान छतारीचे नबाब आणि ग्रिग्सन यांच्यावर चिडले. जुलै महिन्यात हजारो मुसलमानांचा जमाव पंतप्रधानांच्या निवासस्थानावर (त्याला शहा मंजिल म्हणत) चाल करून गेला. त्यांनी इमारतीची नासधूस केली. नबाब छतारी जमावाची समजूत घालण्यास आले, जमावाने त्यांची विटंबना केली आणि त्यांच्या आकडेदार मिशा उपटल्या. यानंतर तो क्षुब्ध जमाव ग्रिग्सनच्या बंगल्याकडे गेला. बंगल्याचा काही भाग जाळण्यात आला. महसूलमंत्री मिस्टर ग्रिग्सन आय. सी. एस. हे बाथरूममधे लपून बसले, म्हणून वाचले. नाहीतर त्यांची फटफजीती झाली असती.

या भयंकर प्रकारामुळे निजामाने नबाब छत्तारीकडून राजीनाम्याची मागणी केली. नबाब छत्तारींनी राजीनामा दिला. पण मुदत संपण्यापूर्वी त्यांना जावे लागल्यामुळे निजाम सरकारने पुढील पगाराबाबत म्हणून त्यांना दीड लाख रुपये दिले. नासधूस झालेल्या इमारतीच्या दुरुस्तीवर पाऊण लाख रुपये खर्च आला. यानंतर ऑगष्ट १९४६ मधे सर मिर्झा इस्माईल हे पंतप्रधान झाले!

आदिवासींचा विशेष अधिकारी म्हणून मला आदिलाबाद जिल्ह्यातील खेडे न् खेडे हिंडून आदिवासींच्या प्रश्नाचा अभ्यास करता आला. पुढील दोन वर्षांत मी प्रत्येक महिन्यास तीन आठवडे फिरतीवर राहात असे. बहुतेक प्रवास बैलगाडीतून होई. गाडीत दोन वेळचे जेवण असलेला टिफीन कॅरिअर आणि बिछाना ही नेहमी बाळगावी लागत. उन्हातान्हातून, पाऊसपाण्यातून मी दोन वर्षे सारखा भटकत होतो. या आदिवासींना जमिनी मिळवून देणे, त्यांना बी-बियाणे, बैल, नांगर इत्यादींसाठी तगाई देणे, त्यांच्यासाठी प्राथमिक शाळा काढणे आणि असलेल्या शाळा तपासणे, त्यांच्यात सहकारी पतपेढ्या स्थापन करणे इत्यादि कामे मला करावी लागत. आदिलाबाद जिल्ह्यात आदिवासींची एकंदर तेवीस हजार कुटुंबे होती. माझ्या काळात त्यांच्यापैकी दहा हजार कुटुंबांना एक लाख साठ हजार एकर जमिनीवर मालकी हक्क देण्यात

येऊन त्यांना जमिनी देण्यात आल्या. शहात्तर शाळा स्थापन झाल्या. त्यांवर ब्याऐंशी आदिवासी शिक्षक काम करीत. या शाळांतून गोंड, कोलाम इत्यादी आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या सोळाशेवर गेली. मार्लवाईच्या ट्रेनिंग स्कूलमधे आदिवासी विद्यार्थ्यांना सातवीपर्यंत शिक्षण देऊन नवीन शाळांवर शिक्षक म्हणून नेमीत. सहकारी संस्थांपैकी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्स, रूरल बँका, मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायट्या, आणि ग्रेन बँका यांची स्थापना करण्यात आली. लहानसहान तंटे निकालात काढण्यासाठी अकरा पंचायती स्थापन करण्यात आल्या. १९४५ ते १९४८ ही तीन वर्षे आदिवासींची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले, याचे मला अत्यंत समाधान वाटते. ही सेवा ऑफिसमधे पंख्याखाली बसून झाली नाही तर उन्हातान्हात, पाऊसपाण्यात, डोंगरदऱ्या तुडवीत, घनदाट अरण्यातून मार्ग काढीत, घडलेली आहे. या काळात मी आदिवासींच्या बरोबर उठलो, बसलो, त्यांच्यांत जेवलो, त्यांची सुखदुःखे ऐकली, त्यांची गाऱ्हाणी दूर केली, त्यांच्या समाजरचनेचा, भाषांचा, त्यांच्या पुराणांचा, दंतकथांचा अभ्यास केला, सारांश मी सर्व प्रकारे आदिवासींच्या प्रश्नांशी समरस होऊन गेलो होतो. हे सर्वोदयी जीवन मी तीन वर्षे पुरेपूर जगलो याचे मला अवर्णनीय समाधान वाटते. या काळात मलेरिया आणि गौट यांनी माझा पिच्छा पुरविला. अंगात रक्त राहिले नाही, चालता चालता सहज ठेच लागली तरी मी कोलमडून पडत असे. पण मी करीत असलेल्या विधायक कामापुढे मी सहन केलेले त्रास मला सुसह्य वाटत. आदिवासींच्या सेवेत माझे जीवन सफल झाले–समृद्ध झाले.

किन्वट तालुक्यात मी दौरा करीत असताना माहूरच्या रेणुकादेवीचे मी दर्शन घेतले. देवीचे देऊळ उंच डोंगरावर आहे. डोंगराच्या पायथ्यापाशी साध्या खड्याची मला ठेच लागली, मलेरियामुळे माझ्या अंगात इतकी अशक्तता आली होती की, मी जमिनीवर साष्टांग नमस्कार घातला. बरोबरच्या लोकांनी मला उठवून उभे केले. मी त्यांना हसून म्हटले, “रेणुकादेवी डोंगराच्या पायथ्याशी आलो की साष्टांग नमस्कार घालावा, असा आमच्या घराण्यातच कुलाचार आहे.”

आदिवासींच्यासाठी मी काय काम केले याची फील्डवर्कची मी इंग्रजी डायरी ठेवीत असे. ती पुढे मी ‘ट्रायबल वेल्फअर’ या नावाने प्रसिद्ध केली.

गोंडी भाषा मी हस्तगत केली होती. कोलाम ही आदिवासी जमात गोंडांहून-ही अधिक अशी मागासलेली आहे. आपल्या देशात गोंडांची संख्या तीस लाख आहे; पण कोलामांची संख्या तीस पस्तीस हजारांवर नाही. आदिलाबाद

जिल्ह्यात त्यांची संख्या पाच हजार आहे. बाकीचे कोलाम चांदा, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांतून आढळून येतात. त्यांच्या दारिद्र्याचे काय आणि कसे वर्णन करावे ! नांगराने जमीन नांगरण्याची पद्धत त्यांना माहीत नव्हती. कुदळीने जमिनीत भोके पाडून तीत ते बिया घालीत. एकदीड एकरपेक्षा अधिक जमिनीत अशा पद्धतीने बी पडत नसे. मक्याचे पीक येई त्याच्यावर महिना दीड महिना त्यांची गुजराण होई. उरलेले वर्ष ते कंदमुळे खाऊन जगत. काही मुळे विषारी असावीत. कारण ती टोपलीत ठेवून टोपली चोवीस तासपर्यंत वाहत्या पाण्यात ठेवण्यात येई. त्यानंतर ती शिजविण्यात येत. तरी ती खाल्ल्या-वर कोलाम लोक दोन दोन दिवस गुंगीत असल्यासारखे वागत.

मी कोलामांची भाषा शिकलो. या भाषेचे तामीळ आणि प्राचीन कन्नड यांच्याशी बरेच साम्य आहे. या भाषेची शब्दसंपत्ती अगदी मोजकी आहे. शब्दांची संख्या हजार बाराशेवर नाही. यासंबंधी कोलामांत एक मनोरंजक दंतकथा आहे. परमेश्वराने जगात सर्व जमातींना बोलावून त्यांच्यांपैकी प्रत्येक जमातीला एकेक भाषा दिली. कोलामांना परमेश्वरापाशी पोहोचण्यास उशीर झाला. तोपर्यंत सर्व भाषा वाटून झाल्या होत्या. परमेश्वराने कोलामांना सांगितले, " तुम्ही येण्यास उशीर लावला. माझ्यापाशी भाषा शिल्लक नाही. निरनिराळ्या भाषांचे दोन दोन चार चार शब्द घेऊन तुम्ही काम चालवा. " कोलामी भाषेत बोलण्याइतपत माझी प्रगती झाली. पुढे त्या भाषेचे व्याकरण मी लिहून काढले.

१९४६ च्या हिवाळ्यात माझे आई-वडील माझ्याकडे राहण्यासाठी आले. त्यांना तीर्थयात्रा करण्याची फार हौस असे. धारवाडकडे आम्हा वैष्णवांचे प्रसिद्ध स्वामी वादिराज यांची समाधी स्वादि या गावी आहे. तिकडची यात्रा आटोपून वडील परत आले ते मलेरियाने आजारी पडले. त्यांना फार पूर्वीपासून संधि-वाताचा विकार होता. तोही या सुमारास बळावला. या आजारातून ते उठत नाहीत असे मला वाटू लागले होते. पण ते इतक्या लवकर जातील याची मला कल्पना नव्हती.

जानेवारी १९४७ मधे उटनूर तालुक्यात केसलापूर येथे गोंडांची जत्रा भरणार होती. नेहमीप्रमाणे जत्रेला ग्रिग्सन, हायमंडार्फ ही मंडळी हजर राहणार होती. जत्रेला जोडून प्रदर्शन आणि गोंडांचे वार्षिक संमेलनही भरणार होते. आदिवासींचा विशेष अधिकारी म्हणून मला केसलापूरला जाणे भाग होते.

सोळा जानेवारी १९४७ रोजी सकाळी मी त्यांचा निरोप घेतला. ते मला म्हणाले, " तुझी वागणूक पाहून मला मोठे समाधान वाटते. आपल्याकडे आप्त-इष्ट येतात, पाहुणे येतात. सर्वांचे योग्य आदरातिथ्य होते. आपले हात उष्टे

केल्याशिवाय कोणी परत जात नाही. हैदराबादच्या अस्थिर परिस्थितीमुळे भाऊ, बहिणी, भाचे, मेहुणे सगळे येतात. कित्येक दिवस आनंदात घालवून जातात. आपले घर म्हणजे पांथस्थांना, थकल्याभागलेल्यांना विश्रांतीचे स्थान आहे. धर्मकर्मे नेमाने पार पडतात. गृहस्थाश्रमाचे साफल्य याहून अधिक काय पाहिजे ? माझी मुले उद्योगाला लागली, मुली सुस्थळी पडल्या, माझे जीवन परमेश्वराच्या आराधनेत कंठण्यास मला मिळाले याचे मला समाधान आहे. फक्त एकच गोष्ट, तुझ्या आईचा स्वभाव तीक्ष्ण आहे. तिला सांभाळून घे. ”

वडिलांचे हे उद्गार ऐकून माझा गळा दाटून आला. मी कसेबसे म्हटले– “ अप्पा, तुम्ही काही काळजी करू नका. मी सगळ्यांचे व्यवस्थित करीन. कुणाचे म्हणून कमी पडू देणार नाही. ”

पण ही त्यांची निरवानिरवीची भाषा असावी असे मला वाटले नाही. मी सकाळी साडेसात वाजता बसने निघालो. केसलापूर हे आसफाबादेहून दीडशे मैलांच्या वर आहे. मी प्रवासात होतो तो इकडे वडिलांची स्थिती अगदीच खालावली. आमच्या शेजारी साठे इंजीनियर राहात होते. उषाने त्यांना बोलावून घेतले. वडिलांच्या जवळ उषा भगवद्गीता वाचीत बसली. माझी आई त्यांच्या पायापाशी बसून होती. दुपारी बारा वाजून पंचेचाळीस मिनिटांनी माझ्या वडिलांनी इहलोक सोडला. त्यांच्याजवळ बसून माझी बहीण सुशिला, उषा, अरुण, अशोक ही मुले शेवटपर्यंत गीता वाचीत होती. ही बातमी कळताच गावातील प्रतिष्ठित वकील रामचंद्रराव पैकाजी हे तातडीने आमच्या घरी आले. वडिलांच्या शेवटच्या क्षणी आम्ही तिन्ही भावंडे त्यांच्याजवळ नव्हतो. माझे वडील बंधू बिंदुमाधवराव हे हैदराबादला होते. धाकटा भाऊ राघवेंद्र हा गुलबर्ग्याला बँकेत नोकरीवर होता आणि मी होतो केसलापूरला. पैकाजींनी मला घेऊन येण्यासाठी मोटार पाठविली.

केसलापूरला मी संध्याकाळी पोहोचलो. रात्री जेवून मी झोपी गेलो. माझा नुकताच डोळा लागला होता. इतक्यात आसफाबादहून निघालेली मोटार येऊन पोहोचली. पैकाजींच्या माणसाने मला उठवून सांगितले–“ आपले वालिदसाबका इंतिकाल हुवा है, ” (आपले वडील वारले आहेत.) माझे मन सुन्न झाले. मी तावडतोब मोटारीत बसलो. सुमारे अकरा वाजता मी आसफाबादेस पोहोचलो. घरात एकच आकांत झाला. वडिलांचा निर्जीव देह पाहून मला भडभडून आले. माझी आई माझ्या गळ्यात पडून मोठमोठ्याने आकांत करू लागली. पुन्हा पुन्हा ती एकच वाक्य उच्चारी, “ सेतू, मला धीर दे. ” त्या दिवशी वडिलांचे अंत्यसंस्कार आटोपून दुसऱ्या दिवशी मी केसलापूरला जाण्यास निघालो. माझ्या

भावांना आणि बहिणींना मी आसफाबादेस येण्याबद्दल कळविले.

माझे वडील वारले त्यावेळी त्यांना सत्याहत्तरावे वर्ष चालू होते. ते खऱ्या अर्थाने कर्मयोगी होते. परमेश्वरावर त्यांची असीम श्रद्धा होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांच्यावर कुटुंबाचा भार पडला. घरात पाच पंचवीस माणसे नेहमी असत. पण त्यांनी कुणाचे कमी पडू दिले नाही. यात्रा, व्रतवैकल्ये, आराधना, अनुष्ठाने, पूजाअर्चा ही त्यांची नेहमी चालू असत. मला रामायण, महाभारत, भागवत यांची गोडी त्यांच्यामुळे लागली. संसारात सर्व लहान थोर कुटुंबियांना सांभाळून नेणे हे मी त्यांच्यापासून शिकलो. माझ्या वडिलांचा सर्वांत मोठा गुण हा की, ते कोणत्याही परिस्थितीत निराश होत नसत. त्यांच्यावर अनेक संकटे आली, पण त्यांना निराश होऊन बसलेले मी कधी पाहिले नाही. परमेश्वरकृपेने सर्व काही चांगले होईल, अशी त्यांची श्रद्धा असे. मलासुद्धा आपल्या आयुष्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, पण मी सर्व काही धैर्याने सहन केले. ते वडिलांचे उदाहरण डोळ्यांसमोर होते म्हणून. माझ्या वडिलांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे. पितृदेवो भव.

केसलापूरची जत्रा यशस्वीपणे पार पडली. आदिवासींच्या संमेलनात मी कोलामी भाषेत भाषण केले. ग्रिग्सन त्यामुळे अतिशय खूष झाले. जत्रा आटोपल्यावर मी आठ दिवसांची रजा काढून वडिलांच्या अस्थिविसर्जनासाठी रायचूरजवळ कृष्णानदीच्या काठी गेलो. माझ्या कुटुंबातील सर्वजण तेथे जमले होते. सगळे संस्कार आटोपून आम्ही आसफाबादेला परत आलो. १९४७ मध्ये मी हैदराबादच्या मराठी साहित्य संमेलनाला गेलो होतो. प्रा. न. र. फाटक यांना मी तेथे प्रथमच पाहिले.

आसफाबादेत डिस्ट्रिक्ट जज्ज राहात असे. त्याचे नाव हबीबुर्रहमान. मनुष्य भयंकर लाचखाऊ होता. तसा तो बोलण्यावागण्यात सज्जन होता. माझी आणि त्याची नेहमी गाठ पडे. पोलीस ॲक्शननंतर मी महसूल खात्याचा डेप्युटी सेक्रेटरी झालो तेव्हा त्याला माझी आठवण झाली. स्वतःची नोकरी टिकविण्यासाठी त्याला माझ्याकडून चांगल्या वागणुकीचे सर्टिफिकेट हवे होते. तो माझ्याकडे आला आणि मला म्हणाला, “ माधवरावजी, आपण मला एक चांगलेसे सर्टिफिकेट द्याल तर त्याचा मला उपयोग होईल. ” मी म्हटले— “ नाजिमसाहब, आपण माझ्या बरोबरीचे. मी आपल्याला सर्टिफिकेट काय देणार. ” यावर ते म्हणतात काय—“ आपण मला मागच्या तारखेचे एक पत्र लिहिल्यासारखे करा. त्यात काही निमित्ताने माझी खूप स्तुती करा. पुढेमागे कोणीतरी माझ्या वर्तणुकीसंबंधी संशय व्यक्त केला तर मला आपले पत्र

दाखविता येईल. " मी म्हटले– " पत्रात मी काय काय लिहावे ? " हबीबुर्रहमान म्हणाले, " आपण असे लिहा–' नाजिमसाहेब, आपल्या सहवासात आसफाबादला माझा काळ गेला तो मोठा आनंदाचा होता. आपले सौजन्य, आपली शुद्ध वागणूक, आपले निर्मळ चारित्र्य, आपली सचोटी, आपला प्रामाणिकपणा इत्यादींचा माझ्या मनावर मोठा प्रभाव पडला आहे. "

मला हसू आवरेना. मी त्यांना म्हटले, " आपण असे करा. त्या सर्व पत्राचा एक मसुदा तयार करा. त्यात स्वतःची खूप स्तुती करा. तो मसुदा माझ्याकडे आणा. मी त्याच्यावर सही करीन. " हबीबुर्रहमानना लाजल्यासारखे झाले. पुन्हा म्हणून ते माझ्याकडे आले नाहीत.

त्यांचा भाऊ सिराजुर्रहमान हा, मी करीमनगरला असताना तेथे वकिली करीत होता. रजाकारांच्या चळवळीत त्याने पुढाकार घेतला. पोलीस ॲक्शन सुरू झाली तेव्हा चांद्याहून येणारा रेल्वेमार्ग उद्ध्वस्त करावा म्हणून तो सिरपूर स्टेशनपर्यंत गेला. सिरपूरजवळच्या एका स्टेशनवर उतरून तेथील सगळ्या स्टाफला गोळ्या घालून ठार मारण्याचा त्याने हुकूम दिला. त्या लोकांना भिंतीपाशी उभे करण्यात आले. आता गोळ्या झाडणार इतक्यात एक गाडी चांद्याकडून येताना दिसली. युनियनच्या फौजा तीत असतील असे समजून सिराजुर्रहमान आणि त्याचे सहकारी पळाले आणि स्टेशन स्टाफची सुटका झाली. सिराजुर्रहमान आता पूर्व–पाकिस्तानात आहे.

डेप्युटी कलेक्टर मुहंमद अब्बास याचे आणि माझे कधीच पटले नाही. हा माझा उल्लेख नेहमी लाल बिच्चू, तांबडा विंचू म्हणून करी. हा पुढे वरंगळ जिल्ह्यात बदलून गेला. तेथील मजूर पुढारी शेषराव यांच्या खुनामागे त्याचा हात होता, असा त्या वेळी गवगवा झाला होता. भद्राचलम येथे रामाचे प्रसिद्ध देऊळ आहे. ते गोदावरीच्या पलीकडच्या काठावर मद्रास इलाख्यात होते. गोदेच्या अलीकडच्या काठावर उभे राहून अब्बासने उद्गार काढले होते, " तबीयत चाहती है के इस देवलकी ईटसे ईट बजादू. " त्या देवळाची वीट न् वीट उद्ध्वस्त करून टाकावी असे वाटते. पोलीस ॲक्शननंतर हे मला भेटले. त्यांच्या डोक्यावर गांधी टोपी होती. मला पाहताच जयहिंद असे म्हणून त्यांनी माझ्याशी हस्तांदोलन केले. अब्बास आणि त्यांचा भाऊ असगरअली तहसीलदार हे पाकिस्तानात आहेत.

आदिवासींच्यासाठी मी काम करीत असता मला पुष्कळच गमतीचे अनुभव आले. गोंड शेतकऱ्यांना बैल, खते आणि बी–बियाणे यांसाठी सरकार तगाई देत असे. रोख रकमेच्याऐवजी त्यांना शेतीसाठी बैल पुरविण्याचे ठरले. कलेक्टर

कमरुद्दीन यांनी आदिलाबादेहून काही बैलांच्या जोड्या उटनूरला पाठविल्या. माझ्याबरोबर गुरांचे डॉक्टर दास हे होते. बैलांची तपासणी करून त्यांनी मला सांगितले की, यापैकी बहुतेक बैल म्हातारे असून त्यांचे दात पडले आहेत. मी हायमेंड्रॉफना तशा अर्थाचे पत्र लिहिले. पत्रात मी म्हटले की, अशा बिन-दातांच्या म्हाताऱ्या बैलांचा गोंडांना काही उपयोग नाही. 'आय ॲम् अफ्रेड सच टूथलेस ओल्ड बुलक्स वुड सिंप्ली नॉट डू.' कलेक्टर कमरुद्दीनकडे हे पत्र जाताच ते माझ्यावर चिडले. ते मला म्हणाले–"मी शेतकरी आहे. गोंडांना काय हवे नको ते मला कळते. तुम्हांला शेतीचे काय कळते. तुम्हांला शक्य असेल तर बैलांच्या चांगल्या जोड्या आणवून घ्या पाहू." मी म्हटले "ठीक आहे. मी ती व्यवस्था करतो." कमरुद्दीननी मला दहा हजार रुपये दिले. आदिला-बादच्या पश्चिम भागात किन्वट तालुक्यात वंजारा समाजाची बरीच वस्ती आहे. शेतीबरोबर पशुपालन हा त्यांचा व्यवसाय आहे. किन्वट तालुक्यातील मांडवी गावचे बळीराम पाटील (महाराष्ट्रातील आमदार उत्तम राठोड यांचे वडील आणि आपले मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांचे जवळचे आप्त) हे मोठे उत्साही शेतकरी आणि समाजसेवक आहेत. मांडवीचे त्यांनी आदर्श खेडे बनविले आहे. मी त्यांच्याकडे आठ दिवस होतो. त्यांनी मला उत्तमपैकी बैलांच्या दीडशे जोड्या मिळवून दिल्या. त्यांना पुढे घालून मी आदिलाबादला आलो. बैलांच्यामुळे रस्त्यात धुळीचे लोट उठत होते. आमची ही एकप्रकारे घोषयात्राच होती. खेड्यातील लोक ठिकठिकाणी गर्दी करून आमची मिरवणूक पाहात. आदिलाबाद गावातही अशीच गर्दी झाली. आदिलाबादच्या ऑफिसर्स क्लबमध्ये माझ्या दीडशे बैलांच्या जोड्यांचा गवगवा झाला. मलाही या गोष्टीची मोठी गंमत वाटली.

गोंड शेतकऱ्यांना पूर्वी स्वतःची मालकीची शेते नव्हती. जंगल साफ करून चारपाच एकर जमीन कसावी. जंगलातील पानपाचोळ्याच्या खतामुळे दोन तीन वर्षे पिके यावी. पीक कमी होते असे पाहिले की, गोंड दुसरीकडे निघून जात आणि जंगल साफ करून शेती करू लागत. जमिनीच्या मालकी हक्काची त्यांना कल्पनाही नसे. त्यामुळे त्यांनी सोडून दिलेल्या जमिनी पडीत म्हणून सरकारकडून दुसऱ्यांच्या नावे करून दिल्या जात. जंगलखात्याचे कायदे गोंडांना जाचक होऊ लागले. जंगलात त्यांना अनिर्बंध संचार करता येईना. यामुळे गोंडांच्या हातच्या जमिनी इतरांच्या हाती गेल्या आणि निव्वळ कष्ट त्यांच्या नशिबी आले. 'बलाक पक्षी ओरडून पेरणीचा काळ नजीक आला असे सूचित करू लागले; पण त्यांच्या आवाजाने माझे मन व्यथित झाले. कारण शेती करण्यास माझ्यापाशी जमीन

राहिली नाही. माझ्या सुपीक जमिनी इतरांच्या ताब्यात गेल्या आहेत, ' अशी एक इंग्रजी कविता आहे.

आय हर्ड द क्रेन क्राय अण्टु मेन हिज ग्रीटिंग
टु टेल देम इट वाज टाइम टु ड्राइव्ह दि प्लौ
आः फ्रेंड, ही सेट माय सॉरी हार्ट अबीटिंग
फॉर अदर्स हॅव माय फर्टाइल एकर्स नौ

कठीण जमिनीत तो बी पेरीत आहे. त्याचा नांगर मोडतो आहे. तो त्याला नव्याने करावा लागत आहे. तो नांगर चालवून बी पसरून देत आहे. पण त्याच्या कष्टाचे त्याला फळ मिळत नाही.

ही इज सोइंग सीड इन ए हार्ड लॅंड
व्हेर द प्लौ ब्रेक्स ॲण्ड हॅज टु मेक इट न्यू
ही ड्राइव्ज दि प्लौ ॲण्ड स्कॅटर्स सीड
बट देर इज नो हार्वेस्ट ऑफ हिज टॉईल.

इ. स. १९४७ मध्ये उटनूर तालुक्यात पाऊस चांगला पडला. पिकेही चांगली आली. मार्लवाईला मी आपल्या रेस्टहाउसच्या समोर उभा राहून खोऱ्यात फोफावलेली पिके पाहात होतो. गोंड शेतकरी एकमेकांना हाका मारीत होते. काहीजण मचाणावर उभे राहून पक्ष्यांना उडवून लावीत होते. बायका शेतीची कामे करण्यात गुंतल्या होत्या. मार्लवाईच्या चहू बाजूंस लहानमोठे डोंगर पिवळ्या उन्हात मोठे आकर्षक दिसत होते. वातावरण कसे सर्वत्र प्रसन्न वाटत होते. गोंडांच्यावर अन्नदेवता, अन्नाराणी प्रसन्न झालेली दिसत होती. त्यावेळी मला गोंडी कथांतील अन्नाराणीची गोष्ट आठवली.

शंभूमहादेवाने सृष्टी निर्माण केली. पण माणसे कंदमूळ, चारोळ्या, चिंच, गुलमहुवाची फुले, बेलफळ इत्यादींवर गुजराण करू लागली. शंभूमहादेवाने विचार केला. माणसे निव्वळ रानफळे आणि जमिनीतील मुळी खाऊन जगतील हे कसे शक्य आहे. त्यांना अन्नाराणी पाहिजे. पण तिचा शोध लावला पाहिजे. असा विचार करून त्याने उदूद्वीपात राहाणारा मायागुरूचा मुलगा राज विक्रम याला बोलावून घेतले. आणि अन्नाराणीला घेऊन येण्याच्या कामगिरीवर त्याने त्याची योजना केली. राजा विक्रम प्रवासाला निघाला. सहा महिने त्याचा प्रवास चालू होता. एके दिवशी तो एका झाडाखाली थांबला. झाडावर गुरुलपंग (गरुड ?) पक्ष्याचे घरटे होते. घरट्यात पिल्ले होती. त्यांचे आईबाप भक्ष्य आणण्यास गेले होते. पिल्लांच्या सांगण्यावरून राजाने घरटे नष्ट करू पाहणाऱ्या सापाला मारले.

पिल्लांचे आईबाप परत आल्यावर राजाने केलेल्या उपकाराची फेड म्हणून त्यांनी त्याला वाहून नेले. अथांग समुद्रावरून ते पक्षी जात असता एके ठिकाणी खाली सळसळ असा आवाज आला. राजाने पाहिले तो एक कणीस पाण्याच्या वर डोकावत होते. तीच अन्नाराणी. पक्षी समुद्राच्या पृष्ठभागावर आले. राजाने आपल्या तलवारीने ज्वारीचे कणीस कापून घेतले. ते घेऊन तो आपल्या राजधानीपाशी आला. त्याने कणीस उघडून पाहिले तो त्यात एक लहान बालिका होती. राजा तिला म्हणाला, " अन्नाराणी, तू येथेच थांब, मी गावात जाऊन तुला मानसन्मानाने, वाजत गाजत आणि मिरवीत नेण्याची व्यवस्था करीन. "

राजा गावात गेला. हत्ती, घोडे, पालखी इत्यादींची तयारी होऊ लागली. राजाची एक कुटिल दासी होती. तिचे नाव लाली. ती गुपचूपपणे गावाबाहेर गेली. तो तेथे उंची वस्त्रे आणि अलंकार घातलेली अन्नाराणी दिसली. तिला पाहून लाली तिला म्हणते काय–" काय छान वस्त्रालंकार आहेत ग तुझे. मी थोडा वेळ ते घालून पाहू का. " अन्नाराणी या गोष्टीला कबूल झाली. लालीने तिला आपली जाडीभरडी वस्त्रे दिली. तिने स्वतः अन्नाराणीचे वस्त्रालंकार आपल्या अंगावर घातले. यानंतर ती अन्नाराणीला म्हणाली–" चल ग, आपण विहिरीत डोकावून पाहू. मी कशी दिसते ते मला पाहाता येईल. " त्या दोघीजणी विहिरीपाशी गेल्या. तेथे लालीने अन्नाराणीला विहिरीत ढकलली. इतक्यात राजा मोठी मिरवणूक घेऊन तेथे आला. लालीलाच अन्नाराणी समजून त्याने तिला मिरवीत नेले. आपल्या वाड्यात तिची झोपाळ्यावर स्थापना केली. तिला झोके देण्यासाठी दहा दासींना नेमण्यात आले.

इकडे अन्नाराणीचे सुंदर असे लाल गुलाबाचे फूल बनले. दुसऱ्या दिवशी सकाळी माळी बागेत आला. त्याला ते फूल दृष्टीस पडले. फुलाचा सुगंध दशदिशांतून पसरला होता. माळ्याने पाण्यातून फूल उचलून बागेत ठेवले. बागेत रातराणी, शेवंती, मल्लिका इत्यादि फुले फुलू लागली. अन्नाराणीने यानंतर चंदनाच्या झाडाचे रूप घेतले.

रोज रात्री अन्नाराणी मुलीचे रूप घेऊन राजाच्या बागेत जाऊन फुगडी खेळे. कोंबडा आरवायची वेळ झाली की ती म्हणे–" राजा, किती मूर्ख आहेस तू. तुझ्या दासीने मला विहिरीत की रे ढकलली. " असे म्हणून ती बागेत आपल्या जागी जाई.

असे दोन आठवडे चालले. एके रात्री लालीने अन्नाराणीचा खेळ पाहिला. ती अन्नाराणीला म्हणाली, " कुठे असतेस ग तू आताशी ? " अन्नाराणी म्हणाली, " मी आता चंदनाचे झाड झाले आहे. " हे ऐकून लालीने राजाला

सांगितले की, चंदनाचे झाड अशुभ आहे. ते कापून टाकावे. दुसऱ्या दिवशी झाड कापण्यात आले. पण चंदनाचा एक तुकडा उडून एकीकडे पडला. त्यातून रताळीं निर्माण झाली. लालीने तीही उपटून टाकली. मग त्यातून भाजी निर्माण झाली. तीतून अंजिराची झाडे निघाली. अन्नाराणी रोज रात्री राजवाड्याच्या आवारात येऊन आक्रोश करायची. शेवटी एक दिवस राजाच्या कानी तिचा आक्रोश पडला. लालीची लबाडी त्याला कळून चुकली. त्याने लालीला ठार मारली.

अन्नाराणीच्या कृपेने राजाचे कोठार धान्याने भरून गेले. ज्वारी, बाजरी, डाळीं इत्यादींना साठविण्यास जागा राहिली नाही. आता राजाला गर्व चढला. त्याने अन्नाराणीला घरातून हाकलून लावली. शंभूमहादेवाने राजाला शिक्षा म्हणून लाखो तांबड्या काळ्या मुंग्या निर्माण केल्या. त्यांनी राजाचे धान्य खाऊन टाकले. अन्नाराणीला एका मांगाने आश्रय दिला. राजा विक्रमाला आता पश्चात्ताप झाला होता. आपले रिकामे झालेले धान्यकोठार पाहून तो रडू लागला. पण आता रडून काय उपयोग होता?

असे काही दिवस गेले. भुईलक्ष्मीचा मुलगा अनेसिरार आणि दुर्गा भवानीचा मुलगा परशुराम यांचे भांडण झाले. अनेसिरार अनसादेवीला जिंकून घेऊन आला. यानंतर आईच्या सांगण्यावरून अनेसिरारने जंगलातील जमीन लागवडीसाठी साफ केली. त्याने सावकाराकडून बैलाची जोडी मागून घेतली. विसाबम ऊर्फ रेवागुरूने आपल्या मुलाच्या शरीरातून ऐरण, भट्टी, हातोडा ही निर्माण केली. त्यानंतर त्याने नांगर, खुरपे इत्यादि अवजारे तयार केली; मग अनेसिरारने सापांचा दोर केला आणि नांगराला बैल जुंपवून त्याने जमीन पेरणीयोग्य केली. पण बी–बियाण्याचे काय?

मग शंभूच्या सांगण्यावरून अनेसिरार आणि अनसादेवी ही हरमान मांगाकडे गेली. तो म्हणाला—तुम्ही सूर्य आणि चन्द्र यांची परवानगी आणली पाहिजे. मग भीम उंच झाला. त्याने चन्द्रसूर्याची गती अडवून त्यांची परवानगी घेतली. हरमानने दिलेली ज्वारी दुपटीने परत केली पाहिजे या अटीवर चन्द्रसूर्यांनी परवानगी दिली. गोंडांची शेते आता अमाप धान्य देऊ लागली. पण गोंड मांगांना धान्य परत करीनात. शेवटी हरमानने चन्द्र-सूर्यापाशी तक्रार केली. चन्द्र सूर्य काळे ठिक्कर पडले. (ग्रहण). तेव्हा घाबरून जाऊन गोंड मांगांना ग्रहणाच्या वेळी धान्य देऊ लागले.

अशी आहे अन्नाराणीची मनोरंजक गोष्ट. गोंडांची धान्याची कोठारे पाहून मला वाटले, कित्येक वर्षांनी या जमातीवर अन्नाराणीची कृपा झाली..

१९४७ च्या पंधरा ऑगस्टला आम्ही गोडधोड करून स्वातंत्र्यदिन साजरा केला. मेच्या सुमारास मिर्जा इस्माइल हे पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन निघून गेले होते. त्यांच्या जागी नबाब छतारी हे पुन्हा आले होते. ऑगस्ट पंधराला ग्रिग्सन, सॅवेज इत्यादी इंग्रज अधिकारी हैदराबादेतून निघून गेले. त्याबरोबर हायमेंडार्फची स्थिती केविलवाणी होऊ लागली. तो हाडाचा प्रोफेसर, ग्रिग्सनच्या सूर्यतेजाने हा चंद्रमा प्रकाशित होत होता. त्याला आता कोण विचारणार ! रजाकार मंत्रिमंडळाच्या धोरणाप्रमाणे वागून त्याने आपले स्थान टिकविण्याचा प्रयत्न केला. इकडे हैदराबादेत कॉंग्रेसची चळवळ जोरात सुरू होती. रामानंदतीर्थ, डॉक्टर मेलकोटे, दिगंबरराव बिंदू, कृष्णाचार्य जोशी, माडपाटी हणमंतराव, जनार्दनराव देसाई, बी. रामकृष्णराव इत्यादि मंडळी चळवळीचे नेतृत्व करीत होती. हैदराबादने भारतीय संघराज्यात सामील व्हावे ही मागणी कॉंग्रेसची होती. राज्यात सर्वत्र शेकडो निदर्शने झाली. अवध्या दोनतीन महिन्यांत एकवीस हजारांच्यावर सत्याग्रह्यांनी तुरुंगवास पत्करला. एकोणतीस नोव्हेंबर १९४७ रोजी भारतीय संघराज्य आणि हैदराबाद यांत एक वर्षाचा जैसे थे करार झाला. तोपर्यंत नबाब छतारी पंतप्रधानपद सोडून गेले होते. त्यांच्या जागी लायक अलीचे रजाकार मंत्रिमंडळ स्थानापन्न झाले होते.

नोव्हेंबर १९४७ मध्ये मुंबईला सोशल सर्विस कॉन्फरन्स भरली होती. हैदराबादच्या आदिवासी कल्याणखात्यातर्फे मी, जोगुलकर, अब्दुल गफूर (आता संचालक स्टेट ट्रान्सपोर्ट महाराष्ट्र राज्य), हणमंतराव मानवीकर (आता कलेक्टर औरंगाबाद) हे प्रतिनिधी म्हणून मुंबईला आलो होतो. चार नोव्हेंबरला मी आसफाबाद सोडले. सिकंदराबादच्या उपनगरात सीताफलमंडी येथे रजाकारांच्या अत्याचारामुळे उपनगरातील घरे पेटलेली मी पाहिली. मला कमालीचे अस्वस्थ वाटू लागले. मुंबईची कॉन्फरन्स सहा नोव्हेंबरपासून नऊ तारखेपर्यंत चालली. कॉन्फरन्सचे अध्यक्ष कराचीचे जमशेद मेहता होते. आमची राहण्याची सोय सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये करण्यात आली होती. कॉन्फरन्समध्ये मी श्री. अमृतलाल ठक्कर, लेडी रामाराव, टाटा सोशल इन्स्टिट्यूटचे प्रिन्सिपाल वाडिया, सुप्रसिद्ध समाजसेवक बलसारा, उत्तर भारतातून आलेले भारत स्काउटसचे वाजपेयी यांना प्रथमच पाहिले. कॉन्फरन्समध्ये माझा अलाहाबादचा मित्र बापट आला होता. मध्यप्रदेशात मंडला जिल्ह्यातील आदिवासींच्या सेवेला त्याने स्वतःला वाहून घेतले होते. कॉन्फरन्समध्ये मी आदिलाबादेतील आदिवासींचे जमिनीविषयक प्रश्न या विषयावर इंग्रजीत निबंध वाचला. अध्यक्ष अमृतलाल ठक्कर होते. त्यांनी माझ्या निबंधाचे कौतुक केले तेव्हा मला कोण

धन्यता वाटली. कॉन्फरन्सच्या सांस्कृतिक कार्यक्रमात वजीफदार सिस्टर्सचा नृत्याचा कार्यक्रम मला पाहण्यास मिळाला. त्यांचे नृत्यकौशल्य पाहून मी मुग्ध होऊन गेलो. नऊ नोव्हेंबरला मी मुंबई सोडली. १९५७ च्या पुढील सगळे आयुष्य मुंबईतच जाईल, याची मला त्यावेळी चुकूनही कल्पना आली नाही.

१९४७ च्या एप्रिलमध्ये माझा मोठा मुलगा अरुण हा सातवी पास झाला. आसफाबादेस सातवीपर्यंतच शिक्षणाची सोय होती. त्याला मी गुलबर्ग्याला माझ्या धाकट्या भावाकडे, राघवेंद्राकडे पाठविले. गुलबर्ग्याला अरुण नूतन विद्यालयात (माझी लहानपणची शाळा) दाखल झाला. नोव्हेंबर मध्ये मी मुंबईहून आसफाबादेस परत आलो.

माझ्याकडे जमिनीचे एक प्रकरण आले. गोंडांची ती जमीन होती. पण त्या भागातील वेलेमा जातीच्या एका श्रीमंत जमीनदाराने त्या जमिनीवर दावा सांगितला. रामचंद्रराव पैकाजी हे त्याचे वकील. ते एके दिवशी माझ्याकडे आले. ते मला म्हणाले, "हा प्रश्न जमिनीच्या एका तुकड्याचा नाही. हा जमीनदारांच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. आपण गोंडांचा दावा काढून टाकला तर आपली सेवा म्हणून हे सातशे रुपये आणले आहेत." असे म्हणून त्यांनी सातशेच्या नोटा माझ्यासमोर धरल्या. मी त्यांना हसून म्हटले–'पैकाजीसाहेब, या क्षेत्रातले आम्ही मर्द नव्हेत, [इस मैदान के हम मर्दही नहीं हैं] आपण कशाला कष्ट घेता. यावर पैकाजी म्हणाले, "पैसे घेण्यात आपणाला संकोच वाटत असेल तर बाईसाहेबांसाठी मी दहा तोळ्यांचा चन्द्रहार पाठवितो." मी म्हटले, "तेही नको. आमच्या बाईसाहेबांना दागिन्यांची अजिबात हौस नाही." थोड्या वेळाने पैकाजी उठून गेले. आयुष्यात असे मोहाचे प्रसंग निर्धारानेच टाळावे लागतात. माझ्या नोकरीत मुसलमान राज्यकर्त्यांशी मी नेहमी ताठ्याने वागत आलो. त्याबरोबरच माझ्यात प्रामाणिकपणा नसता तर त्यांनी माझी नोकरी एक दिवसही टिकू दिली नसती. आयुष्यात पैशाचे महत्त्व नाही असे नाही. पण त्यापेक्षाही महत्त्वाच्या अनेक गोष्टी आहेत.

रजाकारांचे उच्छाद दिवसेंदिवस वाढत होते. लोक आपापल्या बायकामुलांना हैदराबाद राज्याच्या बाहेर पाठवू लागले. माझे मेहुणे माधवराव जतकर हे औरंगाबादच्या रेडियो केंद्रावर होते. त्यांनी माझ्या बहिणीला, सुशीलेला, जतेला पाठविली. उषाचे भाऊ, माझे मेहुणे डॉक्टर अरविंद पुणतांबेकर यांनी आपल्या पत्नीची, प्रतिभा वहिनींची रवानगी त्यांच्या माहेरला, विजापूरला केली. माझे चुलत सासरे डॉक्टर रामभाऊ पुणतांबेकर सिकंदराबादला प्रॅक्टिस करीत. ते निर्वासित म्हणून पुण्यास येऊन बसले. माझी दुसरी बहीण सीताबाई काही

दिवसांसाठी आसफाबादेस येऊन राहिली.

उषाचे प्रसूतीचे दिवस जवळ आले होते. तिला हैदराबाद राज्याबाहेर हलवावे असा मी विचार केला. माझे श्वशुर बाबासाहेब पुणतांबेकर हे १९४६ मधे बनारस सोडून नागपूरला आले होते. नागपूर विद्यापीठात राज्यशास्त्र शाखेचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. सतरा नोव्हेंबर रोजी मी उषाला नागपूरला पाठविली. माझ्या मुली अलकनंदा आणि अंजली या तिच्याबरोबर गेल्या. अरुण गुलबर्ग्याला होता. माझा दुसरा मुलगा अशोक हा आसफाबादेत सातवीत शिकत होता.

याच सुमारास लायकअली मंत्रिमंडळातील सु (कु) प्रसिद्ध मुईन नवाब जंग हे आदिलाबादच्या दौऱ्यावर आले. कलेक्टर कमरुद्दीन यांनी निर्मलच्या डाक बंगल्यात त्यांना थाटाचा खाना दिला. मी त्याला हजर होतो. खान्याच्या वेळी मुईन नवाब जंग हे भारतीय पुढाऱ्यांवर सतत टीका करीत होते. मुसलमान अधिकारी ती टीका आनंदाने ऐकत होते. हेच मुईन नवाब जंग १९४८ च्या तेरा सप्टेंबरला हैदराबादच्या खजिन्यातून जवळ जवळ तीन कोटी रुपये घेऊन पाकिस्तानला पळून गेले.

आदिलाबादच्या मुसलमान अधिकाऱ्यांच्या गप्पा काय काय म्हणून सांगाव्यात. आदिलाबादेहून अवघ्या बारा मैलांवर पेणगंगेच्या पलीकडे वऱ्हाडचा वणी तालुका आहे. काही अधिकारी सरहद्दीच्या पलीकडे जाऊन आले. तेथून परत आल्यावर ते म्हणू लागले– 'असे वाटले की तेथे निजामाचा झेंडा लावून यावे.' आमचे ट्रेझरी ऑफिसर मला म्हणाले– "इंडियन युनियनची ही काय लबाडी आहे. अरे, स्वातंत्र्याचे दूध तुम्हांला मिळत आहे. त्यावरची थोडी मलई तुम्ही आम्हांला दिली तर बिघडले कोठे?" आसफाबादेचे सरकारी डॉक्टर तर इंडियन युनियनच्या काश्मीरमधील फजीतीची, अधिकाऱ्यांच्या भित्रेपणाची वर्णने करून पोट धरधरून हसत. पोलीस ॲक्शननंतर लोकांनी त्यांना बेदम झोडपून काढले. पोलीसचे डी. वाय. एस. पी. म्हणत– "कुछ नहीं तो आखिर हमारा वतन पाकिस्तान तो है." सारांश जवळ जवळ सर्वच मुसलमान अधिकाऱ्यांची डोकी फिरली होती.

आदिलाबादचे कलेक्टर कमरुद्दीन यांची बदली झाली. त्यांच्या जागी नज्मुद्दीन अन्सारी हे कलेक्टर होऊन आले. हे गृहस्थ रजाकारी मनोवृत्तीचे होते. (हे आता पाकिस्तानात दूध–विक्रीचा धंदा करीत असतात.) हायमंडार्फ आदिलाबादला आले. पूर्वी त्यांच्या मुक्कामावर त्यांना भेटण्यासाठी लोकांच्या मोटारींच्या रांगा लागत. आता त्यांना कोण विचारतो. मी भेटायला येतो म्हणून

त्यांनी नज्मुद्दीनकडे निरोप पाठविला. आता वेळ नाही, पुन्हा केव्हातरी भेटा असे त्यांना उत्तर मिळाले.

जानेवारीच्या अखेरीस केसलापूरच्या जत्रेला जाण्यासाठी म्हणून मी उटनूरला थांबलो. १९४८ च्या जानेवारी एकतीसला मार्लवाईहून जोगुलकर आले. त्यांनी सांगितले, "महात्मा गांधींना काल कोणीतरी गोळी घालून ठार मारले." बातमी ऐकताच माझ्या मस्तकावर वज्राघात झाल्याप्रमाणे मला वाटले. ती सर्व रात्र मी झोपेवाचून तळमळत काढल्याचे मला आठवते.

केसलापूरच्या जत्रेला लायकअली मंत्रिमंडळातील बी. एस. वेंकटराव आणि श्यामसुंदर हे हरिजन पुढारी आले होते. मुसलमान अधिकारी उघड उघड गोंडांच्या विरुद्ध झाले होते. त्यामुळे जत्रेत उत्साह असा दिसला नाही.

भारताच्या इतर भागांतून मुसलमानांचा लोंढा हैदराबादकडे वाहू लागला. त्यांना नोकऱ्या देणे, जमिनी उपलब्ध करून देणे इत्यादि गोष्टी लायकअली मंत्रिमंडळ करू लागले. आदिलाबाद जिल्ह्यात त्यांना जमिनी देण्यात येऊ लागल्या.

चार मार्च १९४८ रोजी उषा नागपूरला प्रसूत होऊन तिला जुळ्या मुली झाल्या. मोठी अचला ही पुढे पंधरा फेब्रुवारी १९५० रोजी वारली. धाकटी अनुराधा. तिचे नुकतेच ऑक्टोबर १९६९ मध्ये लग्न झाले.

इंग्रज अधिकारी निघून गेल्यावर वरंगळचे सुभेदार हबीब मुहंमद यांना माझ्या विरुद्ध कारवाई करण्यास मोकळीक मिळाली. लायक अली मंत्रिमंडळातील महसूल मंत्री फजल नवाज जंग (हे पोलीस कारवाईनंतर स्थानबद्ध झाले.) यांचे हबीब मुहंमदनी कान भरले. गोंडांच्यात माझे वजन बरेच असून मी त्यांना बंड करण्यास प्रोत्साहन देण्याची शक्यता आहे असे त्यांनी फजल नवाज जंगांना भासविले. हायमंडार्फची आणि माझी जोडी फोडलीच पाहिजे असे त्यांनी महसूल मंत्र्यांना सांगितले. मला या गोष्टीची काहीच कल्पना नव्हती. आसफाबादेस माझे मित्र श्रीकृष्ण गदाधर भोगले हे फारेस्ट ऑफिसर होते. त्यांनाही त्यांचे वरिष्ठ अधिकारी असेच छळीत. भोगले आता महाराष्ट्र राज्यात फॉरेस्ट खात्याचे ॲडिशनल चीफ कान्झर्वेटर आहेत. मनुष्य मोठा तडफदार आणि उत्साही, त्यांच्या सहवासात माझा वेळ मोठ्या मजेत जाई.

माझ्या बदलीच्या सूचनेसमोर हायमंडार्फने पड खाल्ली. लायकअलीच्या मंत्रिमंडळाशी विरोध करून त्यांना आपले आसन टिकविता आले नसते. माझी बदली सर्व्हे सेटलमेंट खात्यात असिस्टंट कमिशनर म्हणून करण्यात आली. तीन वर्षे मला आदिवासींचा सहवास घडला होता. त्यांची भाषा, संस्कृती, समाजरचना यांच्या अभ्यासात मी रमून गेलो होतो. गोंडवन सोडणे माझ्या जिवावर

आले. मी हायमंडार्फची आर्जवे केली. मला आदिवासींच्या भागात काम करू द्या म्हणून त्यांना पुष्कळ सांगितले. पण काही उपयोग झाला नाही. अकरा एप्रिल १९४८ रोजी मी आसफाबाद सोडले आणि एकोणीस तारखेला मी हैदराबाद येथे असिस्टंट कमिशनर सर्व्हे सेटलमेंट, मदतगार नाजिमे बंदोबस्त, म्हणून कामाचा चार्ज घेतला.

१५

हैदराबाद पोलीस ॲक्शन १९४८

एप्रिल १९४८ मध्ये मी हैदराबादेस पोहोचलो आणि एकोणीस तारखेस आपल्या कामावर रुजू झालो. मला प्रथम फील्ड वर्कसाठी करीमनगर जिल्ह्यात पाठविण्यात येणार होते. मी हायमंडार्फना म्हटले—“मला हैदराबादेत राहू द्या. गोंडी आणि कोलामी या भाषांचे व्याकरण मी लिहून काढीत आहे. गोंडांच्या समाजरचनेवरील माझे पुस्तक तयार होत आहे. याशिवाय आदिवासीतील माझ्या कामाच्या दैनंदिन्या मी संपादीत आहे. मी हैदराबादेत राहिलो तर या कामासाठी मला थोडीतरी स्वस्थता लाभेल.” हायमंड्राफने महसूल सचिव अब्दुलहमीदखान यांना माझ्याबद्दल सांगितले असावे. मी अब्दुलहमीदखान यांना भेटण्यास गेलो तेव्हा त्यांनी माझ्यासमोरच सर्वे सेटलमेंटचे कमिशनर मसूद रझवी यांना फोन करून सांगितले की—“चंद मसालेह के तहत (काही धोरणामुळे) सेतुमाधवराव का मुस्तकिर (हेडक्वार्टर) पर रहना जरुरी है” माझे मित्र श्री. भुजंगराव कुळकर्णी (पुणे महानगरपालिकेचे माजी कमिशनर) हे त्यावेळी रजेवर

होते. त्यांच्या जागी मला असिस्टंट कमिशनर म्हणून नेमण्यात आले. ते रजेवरून परत आल्यानंतर त्यांना फील्डवर्कवर पाठविण्यात आले.

हैदराबादेत मी काचीगुडा स्टेशनपासून जवळच एक घर भाड्याने घेतले. घर हमरस्त्यावर होते. त्याचे नाव ओंकार भवन. घरचा मालक एक खत्री तरुण होता. तो कम्युनिस्ट कार्यकर्ता असावा. महिन्यातून एक दोन वेळा रात्रीबेरात्री येऊन तो घरच्या तळघरातील खोलीत राहात असे. मी त्याला एकदोन वेळाच पाहिले. मे महिन्यात मी उषाला नागपूरहून बोलावून घेतले. माझा मोठा मुलगा अरुण हा चादरघाट हायस्कूलमध्ये नववीत दाखल झाला. धाकटा अशोक आमच्या घराजवळ असलेल्या नृपतुंग हायस्कुलात सातवीच्या वर्गात बसला. माझी मुलगी अलकनंदा विवेकवर्धिनी कन्याशाळेत जाऊ लागली. मी हैदराबादेस पोहोचलो त्यावेळीं रजाकारांची संघटना प्रचंड झाली होती. कासिम रजवीच्या नेतृत्वाखाली रजाकारांनी सर्व राज्यभर अंदाधुंदी माजविली होती. मुसलमान सरकारी नोकरवर्गात नव्वद टक्के माणसे रजाकारी मनोवृत्तीची बनली होती. सर मिर्जा इस्माइल राजीनामा देऊन गेल्यानंतर नबाब छतारींना पुन्हा पंतप्रधान म्हणून बोलावण्यात आले होते. १९४७ च्या पंधरा ऑगस्टनंतर रजाकार निजामाचा उल्लेख जलालत मा आबम (हिज मॅजेस्टी) असा करू लागले. भारत सरकार बरोबर जैसे थे करार (स्टँड स्टिल ॲग्रीमेंट) संबंधी बोलणी सुरू झाली. कासिम रजवीला हवे होते इस्लामी हैदराबादचे पूर्ण स्वातंत्र्य. निजाम सरकारचे शिष्टमंडळ निजामाला संमत असलेला करार घेऊन हैदराबादेहून दिल्लीला निघणार तोच सत्तावीस आक्टोबर १९४७ रोजी पंचवीस तीस हजार मुसलमानांच्या जमावाने वाल्टर मॉक्टन (निजामाचे कायद्याचे सल्लागार), सर सुलतान अहमद इत्यादींच्या निवासस्थानांना घेराव घातला आणि त्यांना दिल्लीला जाऊ दिले नाही. या निदर्शनामागे हैदराबादचे इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस दीन यार जंग यांचा हात होता असे म्हणतात. यानंतर शिष्टमंडळाने राजीनामा दिला. नबाब छतारी हैदराबाद सोडून निघून गेले. उपपंतप्रधान मेहदी यार जंग (मेहदी हसन बिल्ग्रामी) हे दोन तीन आठवडेच हंगामी पंतप्रधान म्हणून राहिले. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात निजामाने कासिम रजवीच्या समोर शरणागती पत्करली.

कासिम रजवीने निवडलेले लायकअली मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. या मंत्रिमंडळात लायक अली पंतप्रधान, मुईननवाज जंग (लायक अलीचे मेहुणे) परराष्ट्रमंत्री, अब्दुर्रहीम, यामीन जुबेरी, इक्रामुल्ला हे रजाकार मंत्री होते. फजलनवाज जंग हे सहकारी खात्याचे सचिव होते. त्यांना महसूल खात्याचे मंत्री

बनविण्यात आले. हिंदू मंत्र्यांमध्ये पिंगल वेंकटरामा रेड्डी (प्रमुख जमीनदार) हे उपपंतप्रधान झाले. जी. रामाचार्य या काँग्रेस पुढाऱ्यांचे मन वळवून त्यांना मंत्रिपद देण्यात आले. हरिजन पुढारी वेंकटराव, मल्लिकार्जुनप्पा, जोशी (गुजराती कारखानदार), राजमोहन लाल हे इतर हिंदू मंत्री होते. पण ते मंत्रिमंडळात असून नसल्यासारखे होते. राजकारणाच्या समोर कुणाचेच काहीच चालेनासे झाले. काँग्रेसचे रामाचार्य यांनी अवघ्या चाळीस दिवसांनंतर आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. निजामाबाद शहराच्या तुरुंगात अनेक सत्याग्रह्यांना डांबून ठेवण्यात आले होते. तुरुंगाच्या मुसलमान अधिकाऱ्यांनी बाहेरचे गुंड आणवून सत्याग्रह्यांना बेदम मारहाण करविली. या हल्ल्यात एकशेतीस सत्याग्रह्याना जबर जखमा झाल्या. यापूर्वी हैदराबादजवळच्या बीबीनगर या गावी रजाकारांनी दंगली करून आगी लावणे, मालमत्ता लुटणे इत्यादी प्रकार केले होते. रजाकारांची वाढती गुंडगिरी पाहून रामाचार्यांनी राजीनामा दिला.

कासिम रजवीने निवडलेले शिष्टमंडळ नोव्हेंबरमधे दिल्लीला गेले. पण सरदार पटेलांच्या कणखर धोरणापुढे त्याचे काही चालले नाही. एकोणतीस नोव्हेंबर १९४७ ला निजामाने जैसे थे करारावर सह्या केल्या. कराराप्रमाणे भारत सरकारचे एजंट म्हणून के. एम्. मुन्शी यांची नेमणूक करण्यात आली. १९४८ च्या पाच जानेवारीला ते हैदराबादेत येऊन दाखल झाले. हैदराबादबरोबर कायमचा करार घडवून आणावा म्हणून त्यांनी अनेक प्रयत्न केले. पण रजाकारांच्या धोरणामुळे यांचे काही चालले नाही. पुढे पुढे स्वतः निजाम हा रजाकारांचा जवळ जवळ कैदीच बनला होता.

रजाकारांच्या गुंडगिरीचे काय वर्णन करावे! १९४८ फेब्रुवारीपासून मे अखेरपर्यंतच्या काळात एका बीदर जिल्ह्यात त्यांनी एकशे एकुणतीस खेडी लुटली, जवळ जवळ एक हजार घरे जाळली, लक्षावधी रुपयांचा माल पळविला, आणि शेकडो माणसे ठार मारली. बीदर जिल्ह्यातील गोरटा या एका गावात दहा मे १९४८ रोजी रजाकारांनी जवळ जवळ तीनशे घरे जाळली. सत्तर लाख रुपयांवर किंमतीचा माल लुटला आणि दोनशेच्या वर माणसे ठार मारली. असा प्रकार कमीअधिक प्रमाणात राज्यभर चालू होता. हैदराबादच्या पूर्व भागात कम्युनिस्टांनीही भयंकर धामधूम चालविली होती. हिंदू प्रजेत दहशत निर्माण करावी हा रजाकारांचा उद्देश होता. त्यांच्या अत्याचारामुळे हजारो हिंदू कुटुंबे देशोधडीला लागली. मद्रास, मुंबई आणि मध्यप्रदेश यात यावेळी पसरलेल्या हैदराबादच्या हिंदू निर्वासितांची संख्या पाच ते सात लाखांपर्यंत गेली होती.

कासिम रजवीची समजूत अशी की, भारत सरकार दुबळे आहे, त्याच्यात

लढण्याची शक्ती नाही. काश्मीर प्रकरणात त्याची फजिती झाली आहे. आपण जोर धरला तर पाकिस्तान आपल्या मदतीला येईल. जगातील मुसलमान राष्ट्रे भारतावर दडपण आणतील. त्यामुळे भारत आपले काही करू शकणार नाही. हैदराबाद हे स्वतंत्र आहे आणि इस्लामी राष्ट्र आहे. त्याचे इस्लामी स्वरूप अबाधित राहिले पाहिजे. यासाठी भारतातील मुसलमान हैदराबाद राज्यात जितक्या संख्येने येतील तितके चांगले.

रजाकारांच्या प्रचारामुळे भारताच्या निरनिराळ्या भागातून हजारो मुसलमान हदराबाद राज्यात आले. मी हैदराबादेस पोहोचलो तेव्हा हैदराबाद स्टेशनच्या समोरचे मैदान या मुसलमानांनी भरून गेले होते. हैदराबाद स्टेट लायब्ररीच्या समोरचे मैदान, गोशामहाल, युनिव्हर्सिटी जवळचे अड्डिगमेट मैदान, जेथे पाहावे तेथे बाहेरचे मुसलमान दिसत. रजाकार मंत्रिमंडळाने प्रचार केला की, भारतातील अस्थिर परिस्थितीमुळे मुसलमान आपली घरेदारे सोडून हैदराबाद राज्यात येत आहेत. त्यांना वसविणे आपले कर्तव्य आहे. या तथाकथित मुसलमान राज्यभर पाचपन्नास कँप उघडले. प्रत्येक कँपसाठी सुरवातीचा खर्च म्हणून तीन लाख रुपये मंजूर करण्यात आले. हैदराबाद शहरापासून सहा मैलांवर यर्रागड्डा या गावी १९४८ च्या मे महिन्यात भारतातून आणि भारताबाहेरचे असे अठ्ठावन्न हजार मुसलमान जमले होते. त्यात बलुचिस्तान, ब्रह्मदेश, अफगाणिस्तान, इत्यादी भागांतील मुसलमानही होते. अर्थातच ते निर्वासित असणे शक्य नव्हते. काही दिवस कँपमधे घालविल्यानंतर मुसलमानांना शेती, लहानसहान उद्योगधंदे अगर शेतीवाडी याची सोय सरकार करून देई. या निर्वासितांना महाजरीन (देश सोडून आलेले) असे म्हणत. कँपातून अन्नाचा पुरवठा करण्याठी हैदराबादेतील सईदिया आणि इतर मुस्लीम हाटेलांना हजारो रुपयांची कंत्राटे देण्यात आली. हैदराबाद राज्याच्या सरहद्दीवरील खेड्यांतून हिंदूंची वस्ती उठवून लावावी आणि त्यांच्या जागी मुसलमानांना वसवावे म्हणजे निजाम राज्याभोवती संरक्षणाचे एक लोखंडी कडे (आयर्न रिंग) तयार होईल अशी योजना लायक अली मंत्रिमंडळाने विचारात घेतली होती.

या बाहेरच्या मुसलमानांमुळे शहरात आणि राज्यात मोठे तणातणीचे वातावरण निर्माण झाले होते. आगगाड्यांतून मारामाऱ्या होऊ लागल्या. कँपांच्या भोवतालच्या हिंदूंना मुसलमानांचा उपसर्ग होऊ लागला, आणि त्यामुळे घबराटीचे वातावरण निर्माण होऊ लागले.

मौज अशी की, हैदराबादचे मुसलमान या बाहेरच्या मुसलमानांना लुबाडू लागले. अनेक सुंदर मुसलमान पोरी हैदराबादच्या रस्त्यातून बेपत्ता झाल्या. काही

मोठमोठ्या रजाकारी अधिकाऱ्यांनी या पोरींना आपल्या जनानखान्यात ओढले असा त्यावेळी गवगवा झाला. एका खात्याचे सचिव (हे पुढे पाकिस्तानात पळून गेले) तर ऑफिसच्या वेळात आपल्या चेंबरमधे तरुण निर्वासित पोरींशी प्रणय खेळत असत. स्टेट लायब्ररीच्या समोरच्या मैदानात जमलेल्या मुसलमान निर्वासितांना अन्न देण्यात येई. त्यांना कबाब वाटण्यात आले. या कबाबांना जिना कबाब असे नाव देण्यात आले. जिनांचे नाव ऐकताच लोकांनी मोठ्या आवडीने कबाब खाल्ले. नंतर कळले की ते कबाब म्हणजे गाढवाच्या मांसाचे तळलेले तुकडे होते. यावरून वर्तमानपत्रांतून बरीच ओरड झाली. बाहेरच्या मुसलमानांचा लोंढा हैदराबादकडे वाहात आहे हे पाहून रजाकारांना कोण आनंद! लोकसंख्येच्या अदलाबदलीची गोष्ट ते उघड उघड बोलू लागले. अब्दुल्लतीफ या गृहस्थांनी (हे आता हैदराबादेतील विद्वान आणि प्रतिष्ठित नागरिकांत मोडतात) तर या अदलाबदलीचा मोठा जोरदार पुरस्कार केला.

मुसल्मान निर्वासितांच्या एका कॅंपचे उद्‌घाटन करताना कासिम रजवीने पुढीलप्रमाणे भाषण केले, "आज दख्खनच्या लोकसंख्येत सात लाखांची (निर्वासित, महाजरीन) भर पडली आहे. गेली दोनशे वर्षे दख्खनमधे माझे वाडवडील राहात आले आहेत. अल्लाच्या कृपेने हा दख्खन देश माझ्या सात लाख बांधवांचाही देश बनला आहे. आपण परदेशी आहोत हा विचार तुम्ही आपल्या डोक्यांतून काढून टाका. मुसल्मानांचा स्वतःचा असा कोणताच देश नाही. जेथे अल्लाच्या नावाचा वरचष्मा असेल तोच मुसल्मानांचा देश होय. आज हैदराबाद म्हणजे माझा, माझ्या वडिलांचा आणि तुमचा देश होय. उद्या दिल्लीही आपला देश होण्याची शक्यता आहे. तुम्ही आजपर्यंत महाजिर (निर्वासित) होता. पण आता तुम्ही स्वतःला महाजिर म्हणवून घेऊ नका. तुम्ही आता हैदराबादी आहात. रामपुरी, नागपुरी, देहलवी, कानपुरी हे भेद आपण आता संपविले पाहिजेत. जेथे आपल्याला इस्लामचे नाव उंच करावयाचे आहे तोच आपला देश आहे असे आपण समजायला हवे. हैदराबादेवर संकटे येण्याची शक्यता आहे. अशा वेळी तुम्ही हैदराबादी माणसांच्या मागे रेंगाळला असे होऊ नये. आमच्या शेजारी नांदणारी सत्ता आमच्याशी युद्ध करील. तो दिवस फार लांब नाही. आमच्या शेजाऱ्यांनी (भारतसरकार) आमच्यावर हल्ला चढविला तर आपल्या संरक्षणासाठी आपले सर्वस्व कुर्बान करण्याचा आम्ही दृढनिश्चय केला आहे. ही मोठी कठीण परीक्षा आहे. या परीक्षेत तुम्हांला आपल्या जुन्या देशबांधवांच्या खांद्याशी खांदा लावून चालावे लागेल. अल्ला न करो, आपले हैदराबाद स्वातंत्र्याला मुकले आणि हिंदू युनियनचे घटक

राज्य बनले तर भारताच्या मुसलमानांना कोणते आश्रयस्थान राहील हे तुम्हीच सांगा. पाकिस्तानात आता जागा राहिली नाही. आम्ही त्याला दोष देऊ शकत नाही. जितक्या मुसलमानांना वसविता येणे शक्य होते त्याहूनही अधिक पीडित मुसल्मानांना पाकिस्तानने आपल्या देशात वसविले आहे. आता तेथे जमीन शिल्लक राहिली नाही."

भारत सरकारबरोबर लायकअली मंत्रिमंडळाची कायम स्वरूपाच्या कराराची बोलणी चालली होती अणि इकडे कासिम रजवी, त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आणि इतर रजाकार यांच्या धमक्या चालू होत्या. नऊ जून १९४८ रोजी कासिम रजवीने म्हटले, "राष्ट्राची भवितव्ये लेखणीच्या टोकांनी नव्हे तर तल्वारीच्या टोकांनी घडत असतात. बोल ठेवण्यास जागा राहू नये म्हणून तडजोडीचा शेवटचा प्रयत्न चालला आहे. हैदराबादने आपले सगळे मुद्दे मांडले. या देशाचे (हैदराबाद) भवितव्य राजकारणी माणसे काय घडविणार ? ते घडविणारे आहेत रजाकार शिपाई. हैदराबादच्या स्वातंत्र्याचा करारनामा रक्ताने लिहिला जाईल. मी बादशहाचे (निजाम) अभिनंदन करतो. सात पिढ्यांपूर्वी त्यांचे पूर्वज दिल्लीहून हैदराबादेस आले आणि येथे येऊन त्यांनी एका इस्लामी राज्याची स्थापना केली. आता त्यांचे परत दिल्लीला जाणे मला स्पष्टपणे दिसत आहे. आसफजाही घराण्याचा झेंडा आम्ही दिल्लीच्या लाल किल्ल्यावर लावू. मूसानदी (हैदराबाद शहरातून वाहणारी नदी) चा काठ यमुनेच्या काठाशी फिरून एकदा जोडण्याची आवश्यकता आहे. मोगल राजघराण्याची ज्योत पुन्हा हैदराबादेहून पेटविली जाईल. गझनी आणि आलमगीर या शक्तींच्या योगे इतिहासाची पुनरावृत्ती होणार आहे. आम्ही पानिपतच्या लढाया जिंकलेल्या आहेत. मी आपल्या मस्तकाला प्रेतवस्त्र (कफन) गुंडाळून घेतले आहे. आज मुसल्मानांनी मनात आणले तर एका हिंदूचेही डोके शिल्लक राहणार नाही. हैदराबादच्या स्वातंत्र्याचा निर्णय यमुनेच्या काठी लाल किल्ल्यात होणार नाही. तो या मुसा नदीच्या काठी गोवळकोंड्याच्या किल्ल्यात होईल."

१९४८ च्या जून महिन्यात माउंटबॅटनच्या आग्रहामुळे आणि हैदराबादचे कायद्याचे सल्लागार सर वाल्टर मॉक्टन यांच्या धूर्तपणाला बळी पडून कायम कराराचा मसुदा भारत सरकारने मान्य केला. निजामाने या अटी मान्य केल्या असत्या तर तो निजामाचा अभूतपूर्व विजय झाला असता. त्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

(१) भारतीय पार्लमेंटला संरक्षण, परराष्ट्रीय धोरण आणि वाहतुकीचे

मार्ग यासंबंधी हैदराबादच्या कायद्यांना बाजूला सारणारे कायदे करण्याचा अधिकार राहील.

(२) रजाकारांची संघटना बरखास्त करण्यात यावी.

(३) हैदराबादच्या सैन्याची संख्या वीस हजारांहून अधिक असता कामा नये.

(४) परराष्ट्रांशी आर्थिक आणि व्यापरी संबंध स्थापन करण्याची निजाम सरकारला परवानगी राहील, पण हे सर्व भारताबाहेरील राजदूतांच्या देखरेखी-खाली राहील.

(५) हैदराबादेत कामचलाऊ [इंटरिम] मंत्रिमंडळ स्थापन व्हावे. त्यात कमीत कमी निम्मे मंत्री बिगर मुस्लिम असतील.

(६) १९४९ च्या एक जानेवारीपर्यंत एक घटना-निर्माण सभा बोलावण्यात यावी. त्यात बिगर मुसलमानांचे प्रमाण शेकडा साठ असावे.

(७) घटना-निर्माण सभा बोलावताच सभेला जबाबदार असलेले मंत्रिमंडळ स्थापन व्हावे. मंत्रिमंडळात बिगर मुस्लिमांचे प्रमाण शेकडा साठ राहील.

(८) घटना-निर्माण सभेने मुसलमानांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक हक्कांचे संरक्षण होईल अशी तरतूद करावी. ही तरतूद दहा वर्षे रहावी.

(९) सरकारी नोकऱ्यांतील बिगर मुस्लिमांचे प्रमाण शेकडा साठ असावे. जानेवारी १९५४ पर्यंत हे प्रमाण संपूर्ण झाले पाहिजे.

(१०) भारतीय संघराज्यास मिळण्याचा प्रश्न सार्वमताने सोडविण्यात यावा.

(११) आणीबाणीच्या प्रसंगी हैदराबाद राज्यात आपले सैन्य तैनात करण्याचा संघराज्यास अधिकार राहील.

या अटी पाहिल्या तर भारत सरकारच्या औदार्याची हद्द झाली असेच म्हणावे लागेल. पण इतक्यानेही रजाकारांचे समाधान झाले नाही. त्यांनी निजामा-कडून पुढील मागण्या करविल्या :

(१) घटना-निर्माण सभा आणि कामचलाऊ मंत्रिमंडळ या दोन्ही बाबी निजामावरच सोपविण्यात याव्या.

(२) हैदराबादचे सैन्य वीस हजारांच्या ऐवजी अठ्ठावीस हजारांचे असावे.

(३) रजाकार संघटना ताबडतोब बरखास्त न करता तीन महिन्यांनी बरखास्त करण्यात यावी.

(४) अत्यंत आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय भारत सरकारने हैदराबादेत सैन्य तैनात करू नये.

भारत सरकारने या गोष्टींनाही कबुली दिली.

हा करार निजामाने मान्य केला असता तर हैदराबादच्या हिंदूंची धडगत नव्हती. रजाकारांचे बळ अमर्याद झाले असते. भारत सरकारला हैदराबादच्या राज्यव्यवस्थेत ढवळाढवळ करणे अशक्य होऊन गेले असते. कै. सरदार पटेल यांनी म्हटल्याप्रमाणे भारताच्या पोटातील हा कॅन्सर वाढीला लागला असता.

पण हैदराबादच्या जनतेचे दुःखाचे दिवस संपत आले होते. रजाकारांना तडजोड नकोच होती. त्यांनी आणखी एक अट वाढविली. कसलीही आणी-बाणीची परिस्थिती असो, भारत सरकारने आपले सैन्य हैदराबादेत कधीच तैनात करता कामा नये. निजामने भारत सरकारने तयार केलेला करार एकोणीस जून १९४८ रोजी फेटाळून लावला. के. एम. मुन्शींनी म्हटले आहे— " भारतावर येऊ घातलेले फार मोठे संकट टळले. परमेश्वराने ही कृपाच केली. "

लॉर्ड माऊंटबॅटन हे एकवीस जूनला हिंदुस्थान सोडून गेले. याच सुमारास सर वॉल्टर मॉक्टनही हैदराबाद सोडून गेले. सरदार पटेलनी आता कोणत्याही प्रकारची बोलणी करायची नाहीत असे ठरविले. " भारतसरकारने मान्य केलेली तडजोड माऊंटबॅटनबरोबर इंग्लंडला गेली " असे त्यांनी मुन्शींना सांगितले.

यानंतर भारत सरकारने हैदराबादची आर्थिक नाकेबंदी अधिक कडक करण्यास सुरवात केली. एकोणीस जूनला कासिम रजवीने पुढील प्रक्षोभक भाषण केले :

आतापर्यंत आम्ही दिङ्मूढ होतो. ती परिस्थिती आता संपली. आमची संदेहावस्था आता नाहीशी झाली. दिल्ली रेडियोने जाहीर केले आहे की, दिल्ली आणि हैदराबाद यांमधील बोलणी संपली आहेत. मी परमेश्वराचे आभार मानतो. स्थगित अवस्था संपली. आम्हांला दुसऱ्याच्या समोर मान वाकविण्याची सवय नाही. परमेश्वराने जन्माला घातले त्या वेळेपासूनच आम्ही ही सवय टाकून दिली. भारत सरकारने पुन्हा एकवार ऐकून घ्यावे. आम्हांला हौस नाही. पण पंडित नेहरूंना युद्धच हवे असेल तर आम्ही ते आव्हान स्वीकारतो. भारत सरकारच्या डोळ्यांवर पडदे पडले आहेत. भारतीय राष्ट्र सर्वनाशाकडे चालले आहे. रजाकारांची संघटना मी आताच संपवितो. पण एकदा रजाकारांचा पूर वाहू लागला की सगळे हिंदुस्थान त्यात वाहून जाईल. तेव्हा तुम्ही (भारत-सरकार) म्हणाल की, रजवी, हा ओघ थांबवा. पण तसे करणे मला अशक्य होईल. आज रजाकारात संघटन आणि शिस्त ही आहेत. उद्या ही रजाकारांची फौज चंगीजखान आणि हुलाकू यांची फौज बनेल. हे लोक उद्या पेंढारी आणि ठग बनतील. मग त्यांना कोणी आवरू शकणार नाही. यावेळी माझ्यापाशी पाच लाख रजाकार आहेत. त्यांची ट्रेनिंग संपून हे बाहेर पडले की हे कम्युनिस्ट

होतील. क्षमा करा. पण मग हे लोक केवळ गोवळकोंड्याच्या किल्ल्यावरच संतुष्ट राहणार नाहीत. या (रजाकार) संघटनेला कल्पांतापर्यंत आटोपता येणार नाही. एक परमेश्वर सोडून रजाकारांच्या वाढत्या बळाला कोणी आळा घालू शकणार नाही. जगातील आक्रमणप्रिय राष्ट्रे राहोत अगर न राहोत, रजाकार मात्र शिल्लक राहातील. हैदराबादला जितके दबणे [माघार घेणे] शक्य होते तितके ते दबले. हे केवळ त्यांचा [भारत सरकारचा] खोटेपणा सिद्ध करण्यासाठी. आता आम्ही आपल्या सीमेच्या आत बसलो आहोत. आता तुमचा एक शिपाई जरी आमची सीमा ओलांडून आत आला. त्याने एक पाऊल जरी आत टाकले तर मी माझे पाच लाख रजाकार काय करतील आणि काय न करतील याची जबाबदारी घेऊ शकणार नाही. ''

१९४८ च्या मे महिन्यात कासीम रजवीने म्हटले—'' हैदराबाद काय लहानसे संस्थान आहे की साध्या धमक्यांनी दबून जाईल. आमचा बादशहा [निजाम] काय सहजपणे राजप्रमुख होण्यास कबूल होणाऱ्या महाराजांप्रमाणे आहे? शत्रूंना जेरीस आणून, त्यांचे कुटिल बेत हाणून पाडण्याचा हैदराबादेतील स्त्री, पुरुष, आणि बालके यांपैकी प्रत्येकाने दृढ निश्चय केला आहे. जगातील सर्व शक्ती एकवटल्या तरी त्या दृढनिश्चयाने युक्त असलेल्या राष्ट्राच्या नैतिक बळाला धक्का लावू शकणार नाहीत. त्यांच्या (भारत सरकारच्या) धमक्यांनी या राज्यातील रहिवाश्यांची प्रतिकारशक्ती अधिक वाढीला लागेल. हैदराबादच्या शत्रूंचा गैरसमज झाला आहे. त्यांना वाटते की, तेथील 'लोक' गेल्या दोनशे वर्षांपासून चैनी बनले आहेत. त्यांना 'धमक्या दिल्या' की ते दबून जातील; पण त्यांनी एक गोष्ट विसरू नये. वाघ झोपला असला तरी तो वाघच, 'सोता हुवा शेर शेर ही होता है.' '' रजाकारांचे भूत निजामानेच उभे केले होते, पण तो आता त्यांना घाबरू लागला होता. भारत सरकारबरोबर तडजोडीची बोलणी चालू असताना तडजोडीतील एक कलम असे होते की, घटना-निर्माण सभा बोलाविल्यानंतर काम—चलाऊ सरकारने राजीनामा द्यावा आणि घटना परिषदेला जबाबदार असलेले मंत्रिमंडळ अस्तित्वात यावे. यासंबधी निजामाचा विश्वासू दरबारी आणि बांधकाम खात्याचा माझी सचिव होश बिलग्रामी याच्यापाशी निजामाने पुढील उद्‌गार काढले,

'' मी लायक अली (पंतप्रधान) यांना सांगितले आहे की, घटना परिषद स्थापन होताच त्यांना आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागेल. या लोकांनी सगळी व्यवस्था बिघडवून टाकली आहे. लायक अलीच्या दुबळेपणामुळे त्यांचा स्वतःच्या पक्षावर प्रभाव पडत नाही. पण मी या मंत्रिमंडळाला

बडतर्फ केले तर हे लोक उच्छाद तर मांडणार नाहीत ना. (हंगामा तो बर्पा नहीं हो जाएगा) हे लोक म्हणतात की. रजाकारांची संघटना संपविण्यास बराच अवधी लागेल. इ. स. १९३९ मधे मी हिंदू आणि मुसलमान यांच्यात समानता आणि अविभक्त मतदार संघ ही हवी म्हणून घोषणा केली होती. पण आता या लोकांनी माझ्याकडून विभक्त मतदार संघ आणि सगळे बिगर मुस्लिम आणि मुस्लिम यांच्यात समता स्थापन झाली पाहिजे, अशा अर्थाची घोषणा करविली आहे. पण ही घोषणा कोण मान्य करणार ? ”

बारा मे १९४८ रोजी कासिम रजवीने म्हटले होते—“ आपण सत्ताधिष्ठित म्हणूनच जिवंत राहू, असा मुसलमानांनी दृढ निश्चय केला आहे. पाहणाऱ्यांना दिसून आले की, अनेक शतके झोपलेला हा वाघ जागा होऊन कार्यास उद्युक्त झाला आहे. हा वाघ खऱ्या अर्थाने जंगलाचा राजा आहे आणि तो राजाच राहील. इस्लामी समाजाच्या लढवय्यांचे आज हैदराबाद हे गुल्जार असे उपवन बनले आहे; या उपवनावर कधीही हिवाळा येणार नाही. पवित्र खुदाने दख्खनच्या मुस्लिम जमातीचे पालनपोषण केले, आमच्यात जगण्याचा निश्चय निर्माण केला, आमच्या हृदयात आकांक्षा उत्पन्न केल्या, आमच्या बुद्धीला ध्येये दाखविली, आमच्या समोर खुदाने जीवनाचे असे भव्य चित्र उभे केले आहे की, त्यासाठी लढून मरावे असा निर्धार सगळ्या जमातीत निर्माण झाला आहे. दख्खनचे पस्तीस लाख मुसल्मान हे लढवय्ये आहेत याची मला खात्री आहे. रजाकार बनण्यास कोणी काकू करीत असेल तर त्याच्यावर आर्थिक आणि सामाजिक बहिष्कार घालणे हे तुमचे कर्तव्य आहे. ”

सतरा मे १९४८ च्या भाषणात कासिम रजवी म्हणाला, “ हैदराबाद राज्य हे भयानक संकटाच्या काळातून वाट काढीत चालले आहे, ही गोष्ट कुणापासूनही लपलेली नाही. हजरत पीरो मुर्शद (निजाम) यांच्या कुशल राजकारणपटुत्वामुळे आजपर्यंत या राज्याला धक्का लागला नाही. जगातल्या सर्व शक्ती एक होऊन हैदराबादच्या विरुद्ध उभ्या राहोत. मी तुम्हांला खात्री देतो की, आम्ही एक क्षणभरही आमच्या पापण्या झाकून घेण्यास तयार नाही. संकटात मुसलमान हा अधिकच मुसलमान बनतो. तुम्ही दख्खनची लाज राखली. तुमचे उच्च ध्येय आणि तुमचा आत्मविश्वास यामुळे तुमचे यश निश्चित आहे. जगातील कोणतीही शक्ती तुमचे नुकसान करू शकणार नाही. तुमच्या स्वातंत्र्यप्रियतेला कोणतीच शक्ती दावू शकणार नाही. ”

एकोणीस मे ला रजाकारांच्या कार्यकारिणीचे एक सदस्य बशीर अहमद म्हणतात, “ धमक्यांनी आमचे पाय डळमळणार नाहीत. आमचा निर्धार कमी

होणार नाही. हैदराबादचे स्वातंत्र्य आणि मुसलमानांची सत्ता यासाठी आम्ही सर्वस्वाची बाजी लावू. आमच्या रक्ताचा शेवटचा थेंब आम्ही सांडू. पण कोणत्याही परकीय शक्तीपुढे मान म्हणून वाकविणार नाही."

सरदार पटेल यांनी म्हटले होते—"बरेच जण मला विचारतात की, हैदराबादेत काय होणार आहे. त्यांना माझ्या एका भाषणाचा विसर पडला आहे. जुनागड येथे भाषण करताना मी स्पष्टपणे म्हटले होते की, हैदराबादने आपली वागणूक चांगली ठेवली नाही तर जुनागडचे जे झाले तेच हैदराबादचे होईल. ते माझे शब्द अद्याप कायम आहेत" यावर कासिम रजवीने सत्तावीस जुलैला परभणीत भाषण करताना म्हटले,

"सहा महिन्यांपासून सतत सांगण्यात येत आहे की, हैदराबादेवर हल्ला होणार. अशी कितीतरी सहा सहा शतके निघून जातील. भारत सरकार काही हैदराबादेवर हल्ला करू शकणार नाही. त्यांनी हैदराबादवर हल्ला केला तर त्या संघराज्याचा सर्वनाश होईल. या हिंदू युनियनने हैदराबादची आर्थिक नाकेबंदी केली आहे. यावर मी काही करणार नाही. पण जर या पवित्र भूमीवर (हैदराबाद) त्यांचे एक पाऊल पडले तर मी लाल किल्ल्याच्या सुरक्षिततेची खात्री देऊ शकणार नाही. हा वणवा सगळ्या देशभर पसरेल."

अठ्ठावीस जुलैला परळी येथे भाषण करताना कासिम रजवी म्हणाला—
"हिंदुस्थानने हैदराबादची खोडी काढली तर हिंदुस्थानचा सर्वनाश होईल. वल्लभभाई पटेल यांनी भारतीय सैन्याच्या बळावर जुनागडसारख्या लहान राज्याचा नाश केला. या गोष्टीवर ते खुश आहेत. हैदराबादचा निकाल जुनागड-प्रमाणेच लागेल असे ते म्हणतात. हे लक्षात ठेवले पाहिजे की, जर हैदराबादचा निकाल जुनागडप्रमाणे होणार असेल तर लाल किल्ल्याचा निकाल त्याहूनही भयानक होईल."

रजाकारांना पाठिंबा न देणारे अगर त्यांच्याबद्दल सहानुभूती न बाळगणारे मुसलमान त्या काळी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच सापडले असते. हैदराबादचा इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस दीनयार जंग हा रजाकारांचा अत्यंत चाहता. हैदराबादचा सेनापती जनरल इद्रूस हा तर म्हणत फिरे की, भारतीय सैन्य हे वाणी लोकांचे सैन्य आहे. हैदराबाद निदान सहा महिने तरी भारतीय फौजेला टक्कर देऊ शकेल. तडजोडीची बोलणी फिसकटल्यावर रजाकार मंत्रि-मंडळाने बाहेरून शस्त्रास्त्रे मिळविण्याची मोहीमच चालू केली. सिडने कॉटन नावाच्या माणसाने विमानांच्या फेऱ्या करून बाहेरून हजारो रुपयांची शस्त्रे आणली. पोलीस ॲक्शनच्या वेळी रजाकारांच्या जवळ सहा ते सात हजार

रायफली असाव्यात. हैदराबादचे सैन्य वीस बावीस हजारांचे होते. रजाकारांना या सैन्याचा पूर्ण पाठिंबा होता. रजाकारांना लष्करी ट्रेनिंग देण्यासाठी सैन्यातील काही अधिकारी तैनात करण्यात आले होते. आमच्या महसूल खात्यातील मुहंमद इसहाक हा डेप्युटी कलेक्टर दुसऱ्या महायुद्धात लष्करात भरती होऊन गेला होता. रजाकारांना ट्रेनिंग देण्याच्या कामावर त्याची नेमणूक करण्यात आली. हैदराबादेत रजाकारांचे मुख्य ठाणे दारुस्सलाम नावाच्या इमारतीत असे. इमारतीसमोरच्या मैदानात रजाकारांच्या कवायती चालत. महिन्यातून दोनतीन वेळा तरी शहराच्या निरनिराळ्या भागांतून रजाकारांच्या परेडी निघत. तीत भाग घेणाऱ्या रजाकारांची संख्या कधी कधी पन्नास हजारांपर्यंत जाई. कासिम रजवी हा रजाकारांची मानवंदना स्वीकारी. या परेडची मौज अशी की दहा-पाच हजार रजाकारांपाशी उत्तम युनिफार्म आणि बंदुका असत. बाकीचे रजाकार भरमार बंदुका, तल्वारी, जंबिये, अगर निवळ काठ्या घेतलेले असत. दहाबारा वर्षांच्या मुलांचीही एक रजाकार संघटना असे. ही पोरे लष्करी गणवेष घालून रस्त्यातून—

हम घाके मुसलमानी दुनिया में बिठा देंगे
काफर की हुकूमत को ठोकर से मिटा देंगे

असे म्हणत फिरत.

भारत सरकारने हैदराबादची आर्थिक नाकेबंदी केली. आज ना उद्या भारतीय संघराज्याशी सामना द्यावा लागणार हे सर्वांना समजून चुकले. हैदराबादचे सेनापती इद्रूस यांची तारांबळ उडू लागली. आपण चार-आठ दिवस टिकाव धरू शकू अशीही त्यांना खात्री वाटेना. त्याउलट रजाकारांना अधिकाधिक चेव येऊ लागला. प्रत्येक जिल्ह्यात त्यांची राजकीय संघटना, इत्तेहादुल मुसलमीन आणि लष्करी संघटना रजाकार, अशा दोन्ही संस्था मिळून काम करीत. गावावर हल्ले, घरादारांना आगी लावणे, हजारोचा माल लुटून नेणे' लोकांना ठार मारणे, स्त्रियांवर बलात्कार करणे हे प्रकार चालू झाले. रजाकारांच्या या अत्याचारात बीदर, उस्मानाबाद, परभणी, नांदेड, गुलबर्गा इत्यादि जिल्हे होरपळून निघाले. याच्याहीपुढे जाऊन रजाकार आगगाड्यांवर हल्ले करू लागले. मद्रासहून मुंबईला जाणाऱ्या गाडीला त्यांनी गाणगापूर स्टेशनाजवळ अडविले आणि उतारूंना खाली ओढून त्यांना मारहाण केली.

यापेक्षाही भयंकर प्रकार सोलापूर-बार्शी रस्त्यावरील नानज या गावी घडला. नानज हे गाव हैदराबाद राज्यातल्या हद्दीत होते. सोलापूर ते बार्शी रस्ता या गावावरून जात असे. हैदराबादच्या सरहद्दीवर भारत सरकारने लष्करी बंदोबस्त

केला होता. सोलापूर—बार्शी रस्त्यावर सैनिक तुकड्यांची गस्त चालू असे. ती साहजिकच नानज गावातून जाई. जुलै महिन्यात रजाकार आणि त्यांचे पठाण सहाय्यक नानज गावात दबा धरून बसले. सैनिकांची तुकडी गावातून जाऊ लागताच रजाकारांनी तिच्यावर गोळीबार केला. झालेल्या गोळीबारात सहा इसम ठार आणि सहा जखमी झाले. भारतीय सैन्याने गावावर हल्ला चढवून गाव आपल्या ताब्यात घेतले. ही हकीकत १९४८ च्या चोवीस जुलै रोजी घडली. सत्तावीस जुलै रोजी दोनशे रजाकारांनी नानजवर हल्ला करून ते फिरून ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पण भारतीय सैन्याने त्यांच्यावर हल्ला करून सर्वांना कैद केले. या दोनतीन दिवसांच्या मारामारीत सात रजाकार ठार झाले. कासिम रजवीने त्यांना शहीद म्हटले. हैदराबादेत नानज दिवस साजरा करण्यात आला. जमर्रूद महाल सिनेमागृहात त्या दिवशी कासिम रजवीचे अत्यंत प्रक्षोभक असे भाषण झाले. त्या भाषणाला मी हजर होतो. आयुष्यात मी अनेक वक्ते पाहिले आहेत, पण जनतेत क्षोभ निर्माण करण्याची विलक्षण शक्ती रजवीत होती. रजवीच्या भोवती शस्त्रधारी ए. डी. सींचा घोळका होता. प्रत्येकाच्या कमरेला पिस्तूल आणि खांद्याभोवती काडतुसांच्या रांगा असा भार होता. एकोणीस ऑगष्टच्या कासिम रजवीच्या भाषणातील पुढील काही वाक्ये पाहा :

“ हैदराबादने आपले प्रकरण राष्ट्रसंघात (युनाइटेड नेशन) नेले तर भारताने काश्मीर प्रकरणात जसे केले तसेच ते हैदराबादबद्दल करील, राष्ट्रसंघात काश्मीरचे प्रकरण चालू आहे तरी सुद्धा ते शस्त्रबळावर निकालात काढण्याचा भारत प्रयत्न करीत आहे. हैदराबादसंबंधी भारताचे हेच धोरण राहील. हैदराबादने आपले प्रकरण राष्ट्रसंघात नेण्याचाच अवकाश, हिंदुस्थानची सैन्ये हैदराबादच्या सरहद्दीत दाखल झाल्याशिवाय राहणार नाहीत. खुदा करो आणि तो दिवस लवकर उगवो. हा संघर्ष तरी संपेल. एक आमचा तरी निकाल लागेल नाही तर त्यांचा तरी सर्वनाश होईल. मी तुम्हांला घाबरवून सोडीत नाही. मी तुम्हांला फक्त आपल्यावरील संकटाची जाणीव करून देत आहे. हे संकट अगदी नजीक येऊन ठेपले आहे. हैदराबादचा पूर्णपणे निकाल लावण्यासाठी हिंदुस्थानने तयारी केली आहे. तुम्ही निकालात निघण्यास तयार आहात काय ? तुम्ही हात-पाय हलविण्यास तयार नाही काय ? तुमचे रक्त सळसळले पाहिजे, तुम्हांला अधिक क्रियाशील बनले पाहिजे, मुसल्मानांना मी हा शेवटचा सावधगिरीचा इषारा देत आहे. मला माहीत आहे की, मुसलमान स्वतंत्र राहू इच्छितो; पण त्यासाठी प्राण अर्पण करण्यास तो अद्याप तयार नाही. तो मरायला तयार होत नसेल तर तो मरणावाचून मारला जाईल (बे मौत मारा जायेगा). या युद्धाचा

काय परिणाम होईल याचा हिंदुस्थानने पूर्ण विचार करावा. हैदराबाद स्वतः खतम होण्यापूर्वी हिंदुस्थानचा सर्वनाश करून जाईल. हैदराबादमुळे केवळ हिंदुस्थानावरच नव्हे तर साऱ्या जगावर संकट ओढवेल. हिंदुस्थानच्या डोळ्यांवर पडदे पडले आहेत. हैदराबादचा प्रश्न हा साऱ्या जगाचा प्रश्न आहे. हैदराबादेत जो डायनामाइट तयार होत आहे आणि हैदराबादच्या भूमीत दारूचे जे कोठार आहे त्याच्या भडक्याने अमेरिकेलाही त्राहि माम् म्हणण्याची पाळी येईल. आता हैदराबादचे एक भयानक केंद्र बनविणे अगर जगाचे एक शांति-केंद्र बनविणे हे इंग्लंड आणि अमेरिका यांच्या हाती आहे.

यापूर्वी सव्वीस जुलैला, (भारतीय फौजांनी नानज घेतल्यानंतर दोनच दिवसांनी) उस्मानाबादमध्ये भाषण करताना कासिम रजवीने म्हटले होते.

"हिंदुस्थानने काश्मीरच्या मुसलमानांचा अनुभव घेतला. काश्मीरमधे हिंदुस्थानचे सगळे प्रयत्न अयशस्वी झाले हे तुम्ही पाहिलेच आहे. काश्मीरच्या डोंगराशी टक्कर घेण्यात हिंदुस्थानच्या शक्तीचा चक्काचूर झाला आहे. इंडियन यूनियन तुमच्याशी लढू पाहील तर काश्मीरमधे झाले तसेच हैदराबादेतही यूनियनचा चक्काचूर होईल. आता कालचीच गोष्ट घ्या. नानजला आमच्या सात माणसांच्या वर यूनियनच्या फौजा चालून येतात. यूनियनच्या एक हजार सैनिकांवर आमचे सात लढवय्ये चालून जातात आणि त्यांच्याशी लढून त्यांची हबेलंडी उडवून देतात. आमची सात माणसे शहीद झाली. त्यांना चिरजीवन लाभले. या सात माणसांनी शहीद होऊन यूनियनला दाखवून दिले की, सात माणसे अशी कामे करू शकतात तर पस्तीस लाख (दख्खनचे मुसलमान) काय करू शकणार नाहीत. आम्हांला हैदराबाद राज्यातली अशांतता पत्करली; पण हिंदुस्थानची शांतता आम्हांला नको. एक गोष्ट लक्षात ठेवा. हिंदुस्थानचा एक शिपाई जरी हैदराबादच्या सीमेच्या आत आला तर भयंकर अशा ज्वालामुखीचा स्फोट होईल. हा ज्वालामुखी सगळ्या हिंदुस्थानची राखरांगोळी करून सोडील."

एक ऑगस्ट १९४८ च्या भाषणात रजवी म्हणाला, "इंडियन यूनियनचा रेडियो आणि यूनियनची वर्तमानपत्रे यांना वेड लागले आहे. ते आता रजाकारांना घाबरले आहेत. या संघटनेची ते आता बदनामी करू लागले आहेत. रजाकरांनो, आता देश आणि जमात यासाठी प्राण अर्पण करण्याची वेळ आली आहे. दख्खनच्या इस्लामी समाजाला निकालात काढण्याचा इंडियन यूनियनने निश्चय केला आहे. आता रणांगणावरच मुसलमानांचे जीवित अवलंबून आहे. आज मुसलमान निष्क्रिय होऊन एका कोपऱ्यात बसून राहिला तर हैदराबाद राज्याच्या सीमा लहान होत होत, हैदराबाद शहराला येऊन भिडतील आणि

त्यानंतर हैदराबाद शहराचा गळा दाबण्यात येऊन त्याचा निकाल लावण्यात येईल. मी आपल्या समाजाच्या सर्व अधिकारी व्यक्तींना आवाहन करतो की, त्यांनी रजाकार बनून देश आणि समाज यांचे संरक्षण करावे आणि त्यासाठी रणांगणात उडी घ्यावी किंवा आपली शस्त्रे मजलिस इतेहादुल्मुसलमीन याजपाशी द्यावी. ही शस्त्रे त्यांच्या मुलांत वाटली जातील. त्यामुळे ही मुले आपले प्राण अर्पण करून समाजाच्या अब्रूचे रक्षण करू शकतील. आज हैदराबादची भूमी तरुणांना हाक मारीत आहे. आणि तुमचा तरुण मुलगा शस्त्र पाहिजे म्हणून तळमळू लागला आहे. ”

निजाम आणि त्याचे रजाकार सल्लागार यांना वाटले होते की हिंदुस्थान सरकार त्यांच्या सर्व मागण्या मान्य करील. पण माउंटबॅटन निघून गेल्यानंतर हिंदुस्थान सरकारने हैदराबाद राज्याची आर्थिक नाकेबंदी कडक केली. राज्यातील विचारवंत मुसलमान हैदराबादच्या भवितव्याबद्दल साशंक होऊ लागले. निजामही घाबरला. त्याने सर मिर्झा इस्माइल यांना दिल्लीला पाठविले. मिर्झा इस्माइलांनी दिल्लीतील एकंदर परिस्थिती पाहिली. त्यांनी निजामाला सल्ला दिला की, त्याने जूनच्या करारावर मुकाट्याने सही करावी. याचा उघड अर्थ असा की, रजाकारांची संघटना बरखास्त व्हावी आणि लायक अलीचे मंत्रिमंडळ संपविण्यात यावे. रजाकारांना हे नको होते. त्यांनी आपल्या परचम या नियतकालिकातून निजामावर उघड उघड हल्ला चढविला. लायक अली मंत्रिमंडळाला बाजूला सारून मिर्झा इस्माईल आणि जैन यार जंग यांच्या मध्यस्थीने हिंदुस्थान सरकारशी निजामाने बोलणी करण्याचे कारण काय असा सवाल रजाकारांनी केला. लायक अलीने राजीनाम्याची धमकी दिली. निजामाला म्हणावे लागले की, मिर्झा इस्माइलच्या शिष्टाईसंबंधी हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल राजगोपाळाचारी यांनी निजामाला लिहिले होते (३१ ऑगस्ट), आपल्या प्रोत्साहनाने आपल्या तर्फे सर मिर्झा इस्माइल हे आले आहेत. त्यांनी काही सूचना केल्या आहेत. मी त्या सूचनांना पाठिंबा देतो. सर मिर्झा इस्माइल हे अत्यंत अनुभवी असून समतोल वृत्तीचे मुत्सद्दी आहेत. हैदराबादसंबंधीच्या प्रश्नासंबंधी त्यांना खोल माहिती आहे. याशिवाय त्यांना तुमच्या हितसंबंधाबद्दल काळजी आहे. या देशाच्या (हैदराबाद धरून) सामान्य जनतेबद्दल त्यांना कळकळ आहे. तुम्ही रजाकार संघटनेला मनाई करावी. आणि भारतीय फौजांना पुरेशा संख्येने सिकंदराबादेस परत येण्याचे आमंत्रण द्यावे. यामुळे हैदराबाद राज्यात आणि इतरत्र जीवित आणि वित्त यांच्या सुरक्षिततेसंबंधी लोकांच्या मनात ज्या शंकाकुशंका निर्माण झाल्या आहेत त्या दूर होतील. यामुळे मैत्रीचा

पाया कायम होईल."

रजाकार मंत्र्यांनी या पत्राला निजामाकडून पुढील उत्तर लिहविले (पाच सप्टेंबर) "सर मिर्झा माझे जुने स्नेही आहेत, पण हैदराबादच्या मूलभूत प्रश्नांशी त्यांचा परिचय नाही. ते हैदराबादेत एक वर्षभरसुद्धा राहिले नाहीत. याशिवाय ते येथून गेल्यानंतर ज्या घटना झाल्या त्यांची त्यांना माहिती नाही. यामुळे त्यांनी केलेल्या सूचनांवरून काही करता येणे अशक्य आहे."

या प्रकरणात हैदराबादचे दिल्लीतील एजंट जैनयारजंग यांना राजीनामा द्यावा लागला. निजाम हा पूर्णपणे रजाकारांच्या तावडीत सापडला होता. लायकअली मंत्रिमंडळाने राष्ट्रसंघांत (युनायटेड नेशन) हैदराबादचा प्रश्न उपस्थित करण्याची तयारी केली. आणि त्यासाठी शिष्टमंडळाची निवड केली.

हैदराबादेतील काँग्रेस कार्यकर्तेही स्वस्थ नव्हते. हैदराबाद राज्याच्या सीमेवर चारपाच लाख निराश्रितांसाठी सोलापूर, बेजवाडा, चांदा, वाशीम इत्यादी ठिकाणी कँप उघडण्यात आले होते. राज्याच्या आत स्वामी रामानंदतीर्थ आदि हजारो कार्यकर्ते तुरुंगात पडले होते. कायदेमंडळातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी कायदे-मंडळावर बहिष्कार पुकारला होता, राज्यातील सार्वजनिक कार्यकर्त्यांवर निर्घृण असे अत्याचार होत होते. हुतात्मा पानसरेप्रमाणे अनेक कार्यकर्ते मारले गेले. तुरुंगात कार्यकर्त्यांना मारहाण होत होती, रजाकारांचे जाळपोळ, लुटालूट, बलात्कार इत्यादींचे सत्र चालू होते. त्यांना अनेक अधिकाऱ्यांनी साथ दिली. नांदेड भागात जैदीसारख्या पोलीस अधिकाऱ्यांनी थैमान घातले होते. विचारवंत अधिकाऱ्यांना असे धर्मवेडे अधिकारी अनावर झाले. माझे मित्र अब्दुल्ला (हे महाराष्ट्र राज्यात सेटलमेंट कमिशनरच्या जागेवरून अलीकडे निवृत्त झाले) हे त्यावेळी औरंगाबादेस कलेक्टर होते. मनुष्य अतिशय सज्जन. जुलूम आणि अत्याचार यांना विटलेला. सरकारने औरंगाबादेहून त्याची उचलबांगडी केली. तीच गत बुऱ्हाणुद्दीन या सज्जन पोलीस सुपरिंटेंडेंटची झाली. अनेक हिंदू अधिकारी नोकऱ्या सोडून घरी बसले. माझे मित्र चंद्रकांतराव गोडसे (सध्या मुंबईत चॅरिटी कमिशनर) हे करीमनगरला डिस्ट्रिक्ट जज्ज होते, ते नोकरी सोडून बीडला आपल्या गावी येऊन राहिले. सगळे हैदराबाद संस्थान रजा-कारांच्या अत्याचारांनी होरपळून निघाले. राज्याबाहेरच्या कार्यकर्त्यांनीही अनेक धाडसाची कामे केली. नांदेड जिल्ह्यातील उमरी या गावच्या सरकारी बँकेवर दरोडा घालण्यात येऊन लाखो रुपये लुटण्यात आले. अशी एकच धुमश्चक्री चालू झाली होती.

ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांत रजाकारांच्या आणि रजाकार

मंत्र्यांच्या सतत गर्जना चालू होत्या.

एक रजाकार मंत्री यामीन जुबेरी एकोणतीस जुलैला वैजापूर येथील भाषणात म्हणाले,

" हिंदू यूनियन आमच्याशी युद्ध करू इच्छीत आहे. यूनियनने युद्धाला तोंड दिले पाहिजे. हैदराबादपाशी सैन्य आणि शस्त्रे ही पुरेशी आहेत. हिंदू यूनियनला आम्ही चांगला धडा शिकवण्यास तयार आहोत. पोलिसांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखावे. त्यांच्यांत स्वतः निर्णय घेण्याची शक्ती निर्माण झाली पाहिजे. त्यांनी अव्वल तालुकेदार (कलेक्टर) किंवा मुहतमीम (पोलीस सुपरिंटेंडेंट), यांच्या हुकुमाची वाट पाहू नये. कोणी गुंड दिसला की त्याला त्यांनी गोळी घालून ठार मारावे. मी बंडखोरांचे अस्तित्व, मग ते बाहेरून आलेले असोत की या राज्यातील असोत, सहन करू शकत नाही. बंडखोर आणि बाहेरून हल्ले करणारे यांच्याशी आम्ही आतापर्यंत नरमाईने वागलो, पण यापुढे आम्ही त्यांचा सत्कार बंदुकीच्या गोळ्यांनी करू. "

नांदेडमधे भाषण करताना पंतप्रधान लायक अली एक जुलै रोजी म्हणाले, " संकटांचे तुफान कोसळले आहे. पण हैदराबाद राज्य खडकाप्रमाणे उभे आहे. हैदराबादला ही शक्ती कशामुळे प्राप्त झाली असे लोक विचारतात. याला माझे उत्तर हेच आहे. उच्च नीतिमत्ता आणि आध्यात्मिक बळ हीच ती शक्ती होय. हेच आमचे वैशिष्ट्य आहे. हे बळ नाहीसे झाले तर आमचे सर्वस्व गेलें. आमच्या शेजारच्या देशाने (भारताने) आमची परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. आम्हीही त्याचा प्रभावी प्रतिकार करण्याचा दृढनिश्चय केला आहे. "

तीन जुलैला परभणी येथे भाषण करताना ते म्हणाले, " आमची प्रतिष्ठा आणि आमची अब्रू यासाठी आम्ही आमची सर्व सुखे हसत हसत कुर्बान करण्यास तयार आहोत. आम्हांला सीमेवरील संघर्षाची भीती नाही. आम्ही कोणत्याच गोष्टीला भीत नाही. आम्ही वाटेल त्या परिस्थितीशी झुंज घ्यायला तयार आहोत. "

जालना येथे केलेले भाषण–

" हैदराबादचे स्वातंत्र्य कायम राखण्याच्या निश्चयामागे लाखो माणसांची शक्ती आहे. आपण स्वतंत्र म्हणून राहावे आणि स्वतंत्र म्हणून मरावे असा त्यांनी दृढ निश्चय केला आहे. "

अकरा ऑगस्टला अमेरिकन वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत लायक अली म्हणाले,

" हैदराबाद हे हिंदुस्थानात कधीच विलीन होणार नाही. हिंदुस्थान

आमच्यावर जितके दडपण आणू पाहील तितकाच आमच्या प्रतिकाराचा निर्धार वाढत चालला आहे. आमचे सैन्य लढण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. हिंदुस्थानने शस्त्रबळाचा वापर केला आणि हैदराबादवर लष्करी अधिपत्य स्थापन केले तर हिंदुस्थानात ठिकठिकाणी जातीय दंगली उसळतील. त्या कमीत कमी पाच वर्षे तरी चालू राहातील."

दळणवळणाचे मंत्री अब्दुलरहीम आपल्या बारा ऑगस्टच्या भाषणात म्हणाले,

"यूनियन जर हैदराबाद राज्याच्या कोणत्याही भागावर ताबा घेण्याचा प्रयत्न करील तर युनियनच्या प्रत्येक प्रयत्नाचा प्रतिकार करण्यास हैदराबाद तयार आहे. पंडित नेहरूंनी म्हटले आहे की, हैदराबादची शांतता आणि सुव्यवस्था ही धोक्यात आहेत. हा धोका दूर करण्यासाठी म्हणून ते सिकंदराबादेस आपले सैन्य आणून ठेवू इच्छितात. हे त्यांचे म्हणणे हास्यास्पद आहे. हैदराबाद राज्यात हिंदुस्थानी फौजांना तैनात करणे ही गोष्ट हैदराबाद राज्याला कधीही सहन होणार नाही. इंडियन यूनियनच्या पुढाऱ्यांच्या वृत्तीचा मला खेद वाटतो. त्यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ केली. पण आम्ही स्वतंत्र राहू पाहातो ही गोष्ट त्यांना आवडत नाही. आम्हांला ताबेदार बनविण्याचा त्यांचा हेतू आहे. पण आमचा जीव आहे तोपर्यंत आम्ही कुणालाही गुलाम होऊ देणार नाही. आता प्रसंग बाका आला आहे. म्हणून मी स्पष्ट बोलत आहे."

दुसरे एक मंत्री यामीन जुबेरी म्हणतात, "आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्याची जबाबदारी हैदराबादने स्वीकारली आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी आम्ही प्रत्येक संकट सहन करू, कोणताही त्याग करण्याची आमची तयारी आहे. आमचे विलासोपभोगाचे जीवन आम्ही सोडून देऊ. जे पवित्र उद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून आम्ही निर्धार केला आहे तो निर्धार अविचलित राहील."

आणखी एक मंत्री अब्दुल हमीद हे पंधरा ऑगस्ट रोजी म्हणाले, "हैदराबाद सरकार वाटेल त्या प्रसंगाला तोंड देण्यास तयार आहे. सरकारचा स्वतःवर आणि जनतेवर विश्वास आहे."

याच सभेत मंत्री अब्दु–रौफ म्हणाले, "हैदराबादच्या जनतेने स्वतंत्र राहण्याचा निश्चय केला आहे."

तेवीस ऑगस्टला अब्दु–रौफनी भाषण करताना म्हटले, "युद्धे सैन्ये आणि शस्त्रे यांच्या बळावर जिंकली जात नसतात. जिंकण्यास लागतात निर्धार आणि

निश्चय. ती बरोबर बाळगून पाऊल पुढे टाका. विजय आपल्या टप्प्यात आहे. आम्ही स्वातंत्र्याची घोषणा केली आहे. ते स्वातंत्र्य सांभाळण्यासाठी आम्हांला आपले सर्वस्व कुरबान करावे लागेल. प्रत्येक संकटाला आणि कसोटीच्या प्रत्येक प्रसंगाला दृढनिश्चयाने तोंड द्यावे लागेल. आता आपले सर्वस्व कुर्बान करण्याची वेळ आली आहे. यासाठी आपण सगळे एक व्हा. तुम्हांला माहीत आहे की, हैदराबादला मोठमोठ्या राष्ट्रांचे साहाय्य लाभलेले आहे. आम्हांला कुणाचीच भीती नाही. हैदराबाद स्वतंत्र आहे आणि स्वतंत्र राहील. इन्शाल्ला (परमेश्वर करील तर) याच वैभवाने हैदराबाद जिवंत राहील. ”

चार सप्टेंबरला पंतप्रधान लायकअली हे कायदेमंडळात बोलताना म्हणाले, “ कितीतरी प्रसंग आमच्यावर आले. आमच्या अत्यंत निकटच्या मित्रांना वाटले की, आम्ही ते ओझे आता वाहू शकणार नाही. आमचे हितशत्रू तर आम्ही केव्हा मटकन् खाली बसू याची वाटच पाहात होते. आमच्यावरील कसोटीचे प्रसंग संपले असे मला म्हणायचे नाही. खरी कसोटी अजून पुढेच असण्याचा संभव आहे. पण कठीण प्रसंग आमच्यावर येऊनही आज परमेश्वर-कृपेने (खुदा के फजल से) आम्हांला पूर्वीहून अधिक आशा वाटते, आमचा आत्मविश्वास दृढ आहे. आमचे नैतिक बळ भक्कम आहे. आमची तयारीही चांगली आहे. आम्ही पूर्वीहूनही अधिक उत्साहाने आपल्या भविष्याची वाट पाहात आहोत. ”

पंधरा जूनला लायक अली म्हणाले होते,

“ पंधरा ऑगस्टनंतर हिंदुस्थान आणि हैदराबाद यांच्यावरील इंग्रजांचे सार्वभौमत्व संपले. हिंदुस्थान आणि हैदराबाद हे दोन्ही स्वतंत्र झाले. हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना आपले स्वातंत्र्य टिकविण्याचा जो अधिकार आहे तोच अधिकार हैदराबादला आहे. हैदराबादची आर्थिक नाकेबंदी होत आहे; पण तिचा हैदराबादवर काही परिणाम होणार नाही. आपण हैदराबादची तुलना साऱ्या जगाशी करून पाहा. प्रत्येक गोष्टीत हैदराबादचे वैशिष्ट्य आपल्याला दिसून येईल. हैदराबादच्या परंपरा एक दिवस सगळ्या जगात चालू होतील. हैदराबादला सगळ्या जगाचा पाठिंबा आहे. एक इंडियन यूनियन तेवढे विरुद्ध आहे. हैदराबादला तऱ्हेतऱ्हेच्या धमक्या देण्यात येत आहेत. पण त्यांना हैदराबाद भीक घालणार नाही. आज आमच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्थाही आहेत. ही गोष्ट हिंदुस्थान आणि पाकिस्तान या देशातून आढळून येत नाही. ”

चोवीस जूनला कासिम रजवी म्हणाला होता—

" इंडियन यूनियन किंवा यूनियनच्या वजनदार माणसांनी यूनियनच्या हुकूमशाहीपुढे मी मान तुकवावी अशी खटपट केली आहे. ते मला भीती दाखवीत आहेत. या मुसल्मानांपैकी काहीजण अगदी असहाय आहेत. पण काहीजण समाजद्रोही आहेत. असहाय मुसलमानांबद्दल मला सहानुभूती आहे. मी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. पण समाजद्रोही मुसलमानांबद्दल मला भयंकर चीड आहे. पण समाजद्रोही असोत की असहाय असोत दोघांनाही मी बजावून सांगतो, आम्हांला आमचे प्रश्न चांगलेच माहीत आहेत. परमेश्वराने ते प्रश्न सोडविण्याची आम्हांला पात्रता दिली आहे. आम्हांला कुणाच्या सल्लामसलतीची आवश्यकता नाही, कुणाकडूनही मार्गदर्शन आम्हांला नको आहे. फुकटचा सल्ला आम्हांला देऊ नका. मला त्रास देऊ नका. "

पोलीस ॲक्शनचे दिवस जवळ येऊ लागले. रजाकारांच्या गर्जना वाढू लागल्या. रजाकारांचे सचिव अबुल्खैर सिद्दीकी अकरा सप्टेंबरला म्हणाले,

" आमच्या देशाच्या संरक्षणासाठी परमेश्वरकृपेने आम्ही पूर्णपणे तयार आहोत. आक्रमणाचा आमचा हेतू नाही. पण आमच्यावर कुणी हात टाकला तर आम्ही त्याला मुंहतोड जवाब देऊ. लोक म्हणतील की, हिंदुस्थानच्या असाधारण शक्तीचा तुम्ही प्रतिकार कसा करू शकाल. त्याला माझे उत्तर आहे की, हिंदुस्थानची शक्ती असामान्य अशी कुठे राहिली आहे ? आम्ही स्टालिनग्राडप्रमाणे निकराचा लढा लढू. आमचा पराजय होणेच शक्य नाही. हिंदुस्थानची शक्ती काश्मीरमध्ये कधीच दफन होऊन गेली आहे. "

त्याच दिवशी याच इत्तेहादुल्मुसलमीन संघटनेचे संयुक्त सचिव मीर मखदूम अलिखान म्हणाले,

" पंडित नेहरूंच्या धमक्यांनी हैदराबादचे रहिवासी घाबरणार नाहीत. हैदराबादच्या प्रत्येक माणसाला नेहरूंच्या भरमसाट गप्पांची आणि धमक्यांची माहिती आहे. पंडितजींनी अशा गप्पा पूर्वीही पुष्कळ केल्या आहेत. पण त्यांच्या निष्क्रियतेने आणि पदोपदी त्यांना मिळालेल्या प्रचंड अपयशामुळे त्यांची फजीती झाली आहे. काश्मीरबद्दल ते म्हणाले होते की, आम्ही काश्मीरच्या मुजाहिदांचा (स्वातंत्र्यशिपायांचा) सहा दिवसांत निकाल लावू. हैदराबादबद्दल ते अनेकदा म्हणाले की, हैदराबादवर लष्करी हल्ला चढविणे काही कठीण नाही. हैदराबादचा सार्वजनिक कार्यकर्ता या नात्याने मी पंडितजींना एक इशारा देऊन ठेवतो हैदराबादच्या जनतेने वाटेल ती किंमत देऊन आपले स्वातंत्र्य राखण्याचा दृढ निश्चय केला आहे. त्याचे स्वातंत्र्य अटळ आहे. त्यांना जीवनापेक्षा अब्रूने येणारा मृत्यू अधिक प्रिय आहे. नेहरूंनी गप्पा मारून आपल्या आंतर-राष्ट्रीय कीर्तीला बदनाम

करू नये. जगात त्यांची आतापर्यंत चांगलीच फजीती झाली आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय आरशात आपले रूप पाहावे आणि आता तरी शुद्धीवर यावे. त्यांनी जर चुकीचे धोरण स्वीकारले तर त्यांचा निकाल लागेल आणि हिंदुस्थान बरबाद होऊन जाईल."

बाहेरच्या देशात भारतविरोधी प्रचार करण्यासाठी हैदराबाद सरकारने लाखो रुपये खर्च केले. अमेरिका आणि इंग्लंड या दोन्ही देशांतून हैदराबादच्या पैशाने, भारताच्या विरुद्ध विलक्षण प्रचार करण्यात आला. अरब वर्तमानपत्रातील बातम्या हैदराबादच्या उर्दू वर्तमानपत्रातून देण्यात येत. पाकिस्तानच्या पुढाऱ्यांची काही खरी आणि काही काल्पनिक अशी वक्तव्ये हैदराबादच्या वर्तमानपत्रातून सतत येत. हैदराबादच्या रजाकारांची खात्री होती की, जगातील सगळे मुसलमान आपल्या मदतीसाठी धावून येतील. बाहेरच्या प्रचाराचा इतका विलक्षण प्रभाव त्यांच्या मनावर पडला होता. माझ्या वाचनात उर्दू वर्तमानपत्रे येत. तीतून देण्यात येत असलेल्या परदेशातील भारतविरोधी प्रचाराने मी कमालीचा अस्वस्थ होत असे, या प्रचाराचे स्वरूप पुढील काही उताऱ्यावरून दिसून येईल.

सोळा जून १९४७ च्या बगदादच्या "अखबारुल्कदर" या नियतकालिकातील अग्रलेखाचा सारांश, मुस्लिम वर्ल्ड न्यूज या संस्थेने हैदराबादच्या रहबर दैनिकाला पाठविला.

"हैदराबादवर काही संकट आले तर इराकचे लोक स्वस्थ बसणार नाहीत. या वेळी आपल्या हैदराबादी बंधूंना मदत करणे हे इराकचेच नव्हे तर सर्व मुस्लिम राष्ट्रांचे कर्तव्य आहे. जगातील सर्व सरकारांनी हिंदुस्थानच्या या धर्मवेड्या धोरणाबद्दल आपली नापसंती व्यक्त केली पाहिजे. हिंदुस्थानने हैदराबादवर हल्ला चढविला तर इराकचे लोक हिंदुस्थानविरुद्ध जिहाद सुरू करतील."

सतरा जून १९४७ च्या रहबर मध्ये कैरोची पुढील बातमी देण्यात आली :

"अरब युनियन पार्टीच्या अध्यक्षांनी एक संदेश पाठविला आहे. त्यात त्यांनी इंडियन यूनियनला इषारा दिला आहे. ते म्हणतात—'इंडियन यूनियनने हैदराबादच्या विरुद्ध हिंसात्मक कारवाई करू नये. मी यूनियनसरकारला तंबी देतो. त्याने हैदराबाद सरकारच्या विरुद्ध काही कारवाई केली तर इस्लामी जगात हलकल्लोळ माजेल. हिंदुस्थान हे आशियातील राष्ट्र आहे. इतर राष्ट्रांच्या भावनांचा आदर बाळगला नाही तर जगात शांतता नांदणे अशक्य आहे हे त्याला चांगलेच माहीत आहे. न्याय आणि समता यांच्या आधारावर हैदराबाद

स्वतंत्र राहू इच्छीत आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. ”

दहा सप्टेंबर १९४७ च्या रहबर दैनिकातील ही बातमी,

कैरोची तार,

“ इजिप्तचे राजे फारुक यांनी हैदराबादच्या इस्लामी राज्याला आश्वासन दिले आहे. ते म्हणतात, हैदराबादला पाठिंबा देण्यासाठी मध्यपूर्वेतील सर्व राष्ट्रे हर प्रकारचे प्रयत्न करतील. हैदराबाद एकटा नाही. सगळे इस्लामी जग त्याच्या पाठीशी आहे. हैदराबाद हे मुस्लिम राज्य आहे हे आमच्या पाठिंब्याचे एकच कारण नाही. यावेळी हैदराबाद स्वातंत्र्याच्या संघर्षात आहे. प्रतिष्ठित जीवन जगण्यासाठी ते धडपडत आहे. ते काहीही असो, आम्हा मुस्लिम राष्ट्रांची आपल्याला पूर्ण सहानुभूती आहे. याचा हैदराबादने विश्वास बाळगावा. ”

बारा मे १९४८ ची बातमी. अफगाण अंजुमनचे चिटणीस म्हणतात, “ आम्ही जाहीर करू इच्छितो की, लाखो रजाकारांच्या बरोबरीने चाळीस हजार अफगाण हिज मॅजेस्टी निजाम यांच्यासाठी आपले प्राण कुर्बान करण्यासाठी तयार आहेत. ”

मध्यपूर्वेचे कोणी पुढारी महंमद अली अल्वियापाशा यांची पुढील घोषणा तेरा जून १९४८ च्या उर्दू दैनिकात आली.

“ मी हिंदुस्थान सरकारला तंबी देतो की, हैदराबाद राज्याला धक्का लावाल तर जगातील मुसलमानांच्या भावना भडकतील. हैदराबाद हे स्वतंत्र राज्य आहे आणि ते नेहमी स्वतंत्र राहील. हैदराबाद हे जगाच्या मुसलमानांना अतिशय महत्त्वाचे वाटते. हैदराबाद हे नेहमीसाठी पूर्णपणे स्वतंत्र राहावे हीच त्यांची इच्छा आहे. ”

मोरोक्कोत फ्रेंचांच्या विरुद्ध लढणारा गाजी अब्दुल करीम याला कासिम रजवीने पत्र लिहून त्याचा आशीर्वाद मागितला. गाजी साहेबांनी रजवीला पुढील पत्र पाठविले—“ आम्ही हैदराबाद हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे असे समजतो. इंडियन यूनियनने जर हैदराबादच्या परराष्ट्रीय अगर अंतर्गत व्यवहारात ढवळाढवळ केली तर अरब राष्ट्रांच्या भावना भडकतील. ”

मुस्लिम वर्ल्ड न्यूज या संस्थेला मुलाखत देताना गाजी म्हणाले—“ हैदराबाद हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे. सर्व अरब हैदराबादचे अखंडत्व टिकावे याबद्दल आतुर आहेत. आम्ही हिंदू यूनियनला इषारा देतो की, त्याने हैदराबादकडे वाकडा डोळा करून पाहण्याचे धाडसही करू नये. दख्खनच्या

मुसलमानांबद्दल आम्हांला पूर्ण सहानुभूती आहे. त्यांच्या प्रश्नाकडे आम्ही अत्यंत आस्थेने पाहात आहोत."

ही बातमी तेरा जून १९४८ च्या रहबरमधे छापून आली होती.

पाकिस्तानचे एक पुढारी आणि सिंधचे मुख्य मंत्री पीर इलाहीबख्श हे बोलते झाले (रहबर एकवीस जून),

"तुम्ही स्वतंत्र रहा नाहीतर इज्जतीचा मृत्यू पत्करा. पंडित नेहरू आणि त्यांचे सहकारी अधिक शहाणपणाने वागतील अशी मी आशा धरतो. पण पंडित नेहरूंनी शहाणपणाचा मार्ग सोडला तर हिटलर आणि टोजो यांचा काय शेवट झाला हे त्यांनी विसरू नये."

सव्वीस जूनच्या उर्दू वर्तमानपत्रात कराचीची म्हणून पुढील बातमी देण्यात आली होती : "कराचीतील जनतेचे मत आहे की, हैदराबाद हे एक प्रबल राज्य आहे. हिंदुस्थान या राज्याचा कधीच पाडाव करू शकणार नाही. हैदराबादशी तो लढू शकेल हे अशक्य आहे. हैदराबादच्या चहूबाजूला हिंदुस्थानचा इलाखा आहे. असे असूनही हैदराबाद प्रतिकार करू शकेल. प्रत्येक आघाडीवर हैदराबाद हिंदुस्थानचा पराजय करू शकेल."

मुस्लिम लीग पाकिस्तानचे एक प्रतिष्ठित सभासद मुस्लिम वर्ल्ड न्यूजच्या प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले, "हैदराबाद सरकार आणि निजाम यांनी तावडतोब पाकिस्तान आणि इस्लामी राष्ट्रे यांच्याशी बोलणी करून त्यांच्याशी आपले संबंध स्थापन करावे. आणि त्या राष्ट्रांकडून आपले स्वातंत्र्य मान्य करवून घ्यावे. पॅलेस्टाईनमध्ये ज्यू हे अल्पसंख्य आहेत असे असूनही ते स्वतःचे राज्य स्थापन करण्याची घोषणा करीत आहेत. हैदराबादेत निजामचे घराणे अनेक शतकांपासून राज्य करीत आहे. मग त्यांनी आपले स्वातंत्र्य टिकवून का ठेवू नये?"

जेरुसेलमचे मुफ्त यांचे नाव अरबांचे पुढारी म्हणून गाजलेले आहे. त्यांनीही मुस्लिम वर्ल्ड न्यूजच्या प्रतिनिधीशी बोलताना पुढील उद्गार काढल्याचे सव्वीस जूनच्या उर्दू दैनिकांत प्रसिद्ध झाले होते :

"मुस्लिम जगात हैदराबादला मोठे महत्त्व आहे. या राज्याविरुद्ध कोणी जबरदस्ती केली तर जगातील मुसलमान ते कधीच सहन करणार नाहीत. मुफ्तींनी हिंदुस्थानला सल्ला दिला की, त्याने हैदराबादचे स्वातंत्र्य मान्य करावे. असे केल्याने त्याचे पूर्वेकडील राष्ट्रांशी संबंध तेढीचे राहणार नाहीत."

कैरोचे दैनिक 'अल्जमान' याने या विषयावर एक अग्रलेख लिहिला. हैदराबादच्या रहबरदकन या उर्दू दैनिकात (सतरा जुलै १९४८) हा अग्रलेख

छापण्यात आला. तो पुढीलप्रमाणें होता :

" हिंदुस्थान आणि हैदराबाद यांत जे मतभेद निर्माण झाले आहेत ते ताबडतोब मिटले पाहिजेत नाही तर हे मतभेद भयंकर स्वरूप धारण करतील आणि आशियाची शांतता धुळीस मिळेल. अरब राष्ट्रे एक होऊन साम्राज्यवाद्यांना हाकलून लावण्यात गुंतली आहेत. हिंदुस्थानने हैदराबादच्या सहकार्याने अमेरिका आणि इतर पाश्चात्त्य राष्ट्रे यांच्या वर्चस्वातून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा, पण जर का हिंदुस्थान आणि हैदराबाद यांच्यात युद्ध सुरू झाले तर हिंदुस्थान हे आक्रमक शक्तीचे क्रीडास्थान बनेल, आणि पुढील कित्येक वर्षेपर्यंत हिंदुस्थानचे स्वातंत्र्य धोक्यात येईल. हिंदुस्थानने हैदराबादची नाकेबंदी केली आहे. हैदराबादचा प्रश्न हा सगळ्या जगाचा प्रश्न बनला आहे. हिंदुस्थानने हैदराबाद-विरुद्ध युद्ध पुकारले तर अरब राष्ट्रे हिंदुस्थानचे पश्चिमेशी असलेले संबंध तोडून टाकतील. "

सव्वीस जुलैच्या उर्दू दैनिकातील बातमी : " दहा लाख बहादुर पठाणांनी हैदराबादच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपल्या प्राणाची बाजी लावण्याचा निश्चय केला आहे. ते म्हणतात, हैदराबादशी युद्ध म्हणजे आमच्याशी युद्ध करणे होय, हिंदुस्थानने हैदराबादशी युद्ध पुकारले तर आम्ही पाकिस्तानातून हिंदुस्थानात पोहोचू आणि हैदराबादच्या मुस्लिम राजवटीला सहाय्य करू. "

हिंदुस्थान सरकारला धमकावण्या देण्याचे काम हैदराबादची उर्दू वर्तमान-पत्रे शेवटपर्यंत करीत होती. अकरा सप्टेंबर म्हणजे पोलीस ॲक्शनच्या दोनच दिवस आधी उर्दू दैनिक सहीफा यात पश्चिम पंजाब कायदेमंडळाचे सभापती सर फैज महंमद यांची मुलाखत प्रसिद्ध झाली. सर फैज महंमद म्हणाले,

" पंडित नेहरूंच्या भाषणावरून एक गोष्ट दिसून आली. हैदराबादचे स्वातंत्र्य एक क्षणभरही त्यांना पाहवत नाही. हाच त्यांचा विचार असेल तर आम्हांलाही हिंदुस्थान सरकारचे अस्तित्व क्षणभरही सहन होणार नाही. हिंदुस्थानने हैदराबादशी अयोग्य वर्तन करावे किंवा अपशब्द वापरावे या गोष्टी आमच्या सहनशक्तीच्या बाहेर आहेत. हिंदुस्थानने हैदराबादवर सैन्य पाठवावे इतकाही अवकाश आम्ही हिंदुस्थानला देणार नाही. त्यापूर्वीच आम्ही लाल किल्ल्याचा ताबा घेऊन दाखवून देऊ की, हिंदुस्थानच्या लोकात सत्ता सांभाळण्याची पात्रता नाही. "

हैदराबादच्या उर्दू वर्तमानपत्रांतून आणि रेडियोतून वरीलप्रमाणे सारखा प्रचार चालू होता. वर्तमानपत्रे वाचून आणि रेडियोवरील बातम्या ऐकून आम्ही कमालीचे अस्वस्थ होऊ लागलो. रस्त्यावर भारतविरोधी पत्रके

ठिकठिकाणी आढळून येत. आबिद (मुख्य राजमार्ग) रोडवर जनरल पोस्ट ऑफिसजवळ एक मोठे चित्र लावण्यात आले होते. चित्रात हैदराबाद राज्याचा नकाशा दाखविला होता. नेहरूंच्या चेहरेपट्टीचा एक खादीधारी इसम हैदराबाद राज्यावर चालून येत आहे. एक रझाकार शिपाई त्या इसमाच्या जबड्यावर ठोसा लगावीत आहे आणि त्यामुळे त्याच्या तोंडातून भळभळा रक्त वाहात आहे असे ते दृश्य होते. चित्राखाली 'दुश्मन का अंजाम' शत्रूचा शेवट, असे शब्द लिहिले होते. अशा अर्थाचे पोस्टर पाहण्याचा आम्हांला सरावच झाला होता.

आमचे सर्व्हे सेटलमेंट ऑफिस हे महसूल खात्याच्या सचिवालयाला लागून होते. मला सचिवालयात सरकारी कामासाठी नेहमी जावे लागे. जुनी आठवण म्हणून मी हायमंडार्फला मधून मधून भेटत असे. ग्रिग्सन, सॅवेज इत्यादि इंग्रज अधिकारी हैदराबादेतून निघून गेल्यामुळे हायमंडार्फला आता सरकारचे तितकेसे पाठबळ राहिले नव्हते. तो हाडाचा स्कॉलर मनुष्य. राजकारण हा त्याचा विषय नव्हे; पण रजाकार मंत्रिमंडळाची आपल्यावर वक्रदृष्टी होऊ नये म्हणून हायमंडार्फने आर्जवी वृत्ती धारण केली. माझ्याशी तो मोकळेपणाने बोलेनासा झाला. मी दोनतीन वेळा त्याला भेटलो तेव्हा त्याचा असिस्टंट महबूब हुसेन त्याच्याजवळ बसला होता. महबूब हुसेनने म्हटले—"इंडियन यूनियनमधे जीवन कसे असुरक्षित झाले आहे. त्यापेक्षा मंगोलियासारख्या मुलुखात सुरक्षितता असेल." यावर हायमंडार्फ म्हणतात काय—"अहो, इतकेच असते तर हरकत नव्हती. पण युनियनच्या अधिकाऱ्यांनी लबाडी करून आपल्याला गोवण्याचा प्रयत्न केला तर?" मी विचारले—"ते कसे काय—" हायमंडार्फ म्हणाले, "समजा, आपण मुंबईला गेलो आणि आपले सामान तपासण्याच्या निमित्ताने अधिकाऱ्यांनी आपल्या होल्डऑलमध्ये पिस्तुल ठेवून दिले आणि वर आपल्यावरच बिगर परवाना पिस्तुल बाळगण्याचा आरोप केला तर काय करावे?" मी काही बोललो नाही. पण इतका विद्वान मनुष्य, त्यानेही सामान्य माणसासारखे बोलावे याचे मला वाईट वाटले. पण यावरून हायमंडार्फ किती लाचार झाले याची मला कल्पना आली. पोलीस ॲक्शनच्या एक दोन महिने आधी हायमंडार्फ रजा घेऊन विलायतेला गेले. ॲंथ्रॉपालाजी (मानवशास्त्र) वर त्यांची इंग्लंडमध्ये व्याख्याने झाली. व्याख्यानांच्या निमित्ताने त्यांनी विलायतेत हैदराबाद सरकारच्या तर्फे खूप प्रचार केला, असा त्यावेळी हैदराबादेत बराच गवगवा झाला होता. आणि या गोष्टीची झळ पोलीस ॲक्शननंतर हायमंडार्फना लागल्याशिवाय राहिली

नाही. पोलीस ॲक्शननंतर एक वर्षाच्या आत त्यांना हैदराबाद सोडावे लागले. त्यांनी हैदराबाद सरकारतर्फे विलायतेत प्रचार केला अशी जी अफवा पसरली होती ती कितपत खरी होती हे सांगणे कठीण आहे.

त्या काळात अनेक मुसलमान अधिकारी आणि सरकारी नोकर आपल्याजवळ शस्त्रे बाळगू लागले होते. हायमंडार्फचा असिस्टंट महबूब हुसेन आणि ऑफिस सुपरिंटेंडेंट काजिमअली हे आफिसमधे रिवाल्वर हाताळीत असलेले मी पाहिले. मी त्यांना विचारले, "आफिसमधे याची जरूर काय?" यावर "कोणी सांगावे केव्हा याची आवश्यकता भासेल ती" असे म्हणून त्यांनी तो विषय टाळला.

सर्व्हे सेटलमेंट खात्यामध्ये मी असिस्टंट कमिशनर होतो. आमचे कमिशनर मसूद रजवी हे होते. माझ्याबद्दल त्यांना काय सांगण्यात आले होते कोण जाणे! ते माझ्याशी फटकूनच वागत. मीही आपल्या कामात मग्न असे. आमच्या ऑफिसमधे दोनतीन डेप्युटी कमिशनर आणि सातआठ असिस्टंट कमिशनर होते. आफिसमधला नोकरवर्ग पूर्णपणे रजाकारी मनोवृत्तीचा बनला होता. कित्येक कारकून आणि पट्टेवाले सशस्त्र होऊन ऑफिसमधे निर्भीडपणे फिरत. त्यांना कोणी काहीच म्हणत नसे. माझ्या हाताखालचा सुपरिंटेंडेंट हा कासिम रजवीच्या सल्लागार मंडळात असून तो रजाकारांच्या तर्फे निघणाऱ्या मासिकाचा उपसंपादक होता. तो हवे तेव्हा ऑफिसात येई आणि हवे तेव्हा जाई. त्याला काही बोलण्याची कुणालाच हिम्मत होत नसे. कधी कधी त्याला लहर लागलीच तर तो तात्पुरत्या रजेचा अर्ज माझ्यासमोर ठेवी, आणि सूचक शब्दात मला बजावी की, रजवीच्या सल्लागार मंडळाच्या बैठकीला मला हजर राहावयाचे आहे. परवानगी हवी. अर्थात त्याच्या अर्जावर मंजूर याशिवाय दुसरे काही लिहिणे शक्य नव्हते. माझा पट्टेवाला तर नेहमी कमरेला एक तलवार आणि पोटापाशी खंजीर ठेवून फिरे. कधी कधी त्याच्या पाठीवर बंदूक असावयाची. तो साध्या कामाकरिता जरी आत आला तरी आमची गाळण उडत असे. विशेषतः आमच्या सुपरिंटेंडेंटने जिहादवर एक प्रक्षोभक लेख लिहून मला दाखविला. त्यावेळेपासून आपण ऑफिसमधून रोज धडपणे बाहेर पडतो की नाही याची मला सतत काळजी लागलेली असे.

माझ्या हाताखाली एक कारकून होता. त्याचे वय पन्नाशीच्या आसपास असावे. ठेंगणा, सडपातळ, लहानशी बोकडदाढी, सव्वा इंचाची छाती असे त्याचे स्वरूप असे. पण त्याच्या गप्पा ऐकताना हा कोणी फील्डमार्शल आहे की काय असे वाटे. तो राजकारणातल्या अनेक गोष्टी मला सांगत असे. मीही भोळे-

पणाचा आव आणून त्याला छेडीत असे. तो म्हणे, "साब ये बम्मन बनियोंसे हुकमत हो नहीं सकती, (ब्राह्मण बनिये यांच्याने राज्य चालू शकत नाही. राज्य आम्ही मुसलमानांनी करावे.)"

मी म्हणालो, "खानसाहेब, राज्याच्या या आणीबाणीच्या प्रसंगी आमच्यासारख्यांनी काय करावे. हत्यार तर आम्ही कधीच हातात धरले नाही. तुमचे ते काय स्टेनगन का कायसे म्हणतात तेही आम्ही डोळ्यांनी पाहिले नाही. आणि लढाई म्हणजे काहीतरी भयंकर प्रकार असणार. आम्ही फार तर सरकारचे अभीष्टचिंतन करीत बसू."

'तर काय,' खानसाहेब म्हणाले, "तुम्हा ब्राह्मणांनी सरकारला दुवा देत बसावे झाले. आम्ही लढू," असे म्हणताना खानसाहेबांची सव्वा इंचाची छाती फुगली होती. ते पुढे म्हणाले, "तुम्ही लोक राज्य करणे काय जाणता. आताच पाहा. आमची कडेकोट तयारी झाली आहे. एक हल्ला आम्ही मनमाडवर केला की, आम्ही दिल्ली गाठलीच आणि नागपूरमार्गे आम्ही मद्रास घेणार. मग सोलापूर-मार्गे कलकत्ता मोकळेच आहे."

खानसाहेबांचे भौगोलिक ज्ञान पाहून मी थक्क झालो. मी दबकत दबकत म्हटले, 'पण खानसाहेब, सोलापूर कुठे आणि कलकत्ता कुठे?'

"ते काहीही असो" खानसाहेब म्हणाले, "आमच्या कर्तबगारीने आम्ही सोलापूरहून कलकत्त्याला, मनमाडहून दिल्लीला आणि नागपूरहून मद्रासला जाणार. आम्हांला काय अशक्य आहे?"

एक दिवस आमच्या कमिशनरनी आमच्या सहीसाठी एक फॉर्म पाठविला. त्यात पुढील मजकूर होता :

"मी करार करतो की, आपल्या देशासाठी आणि राजासाठी (मुल्क और मालिक के लिये) मी आपल्या रक्ताचा शेवटचा बिंदू अर्पण करण्यास तयार आहे. (मैं अपने खून का आखिरी कतरा बहानेको तयार हूँ)

या करारावर आम्हांला सही करावी लागली. आमच्या ऑफिसमधील मित्राने मला या बाबतीत विचारले. तेव्हा मी म्हटले की, करारात आखिरी कतरा म्हणजे शेवटचा बिंदू म्हटले आहे. तेवढाच मुल्क आणि मालिककरिता राखून ठेवण्याचा; पण केव्हा? त्याच्या आधी शरीरातील रक्ताचे लाखो बिंदू संपल्यानंतर. त्याचा तर काही संभव दिसत नाही." जिल्ह्यातून रजाकारांच्या आणि जनतेच्या चकमकी झाल्याच्या बातम्या नेहमी कानावर येत. जून महिन्याच्या शेवटी माझ्या बहिणीचा भाचा (तिच्या नणंदेचा मुलगा) व्यंकट हा हैदराबादेपासून पूर्वेकडे अडुसष्ट मैलांवर असलेल्या नलगुंडा या गावी नोकरीवर म्हणून गेला. पंधरा

दिवसांनी तो परत आला तो अगदी आजारी पडल्यासारखा दिसत होता. त्याने सांगितलेली हकीकत अशी :—

" मी तुमचा निरोप घेऊन बसमधे बसून निघालो. गुंड्रामपल्ली या गावापाशी जसजशी बस येऊ लागली तसे लोक एकेक करीत बसमधून उतरू लागले. आमची बस गुंड्रामपल्ली येथे पोहोचली त्यावेळीं मी एकटाच राहिलो. तेथे झाडाखाली आमची बस बराच वेळ थांबली. मी तपास काढला तेव्हा ड्रायव्हर म्हणाला की, " गावात काल गडबड उडाली. एक दोन माणसे जखमी झाली. त्यांचा सूड घेण्याकरिता गावावर हल्ला चालू आहे. " मी सुन्न होऊन बसलो. इतक्यात कोणीतरी धावत येऊन म्हणाले की लोकांना एका सांदीत कोंडण्यात आले असून त्यांच्यावर सांदीच्या दोन्हीकडून गोळीबार करण्यात येत आहे. तो सांगत होता तोच गोळ्यांचे आवाज ऐकू येऊ लागले. त्याबरोबर लोकांच्या किंकाळ्या कानावर पडू लागल्या. असे काही वेळ चालले. यानंतर भयानक स्तब्धता पसरली. थोड्या वेळाने चार माणसे एका जखमी माणसाला घेऊन आली. त्यांनी त्याला बसमधे निजविले. त्याच्या अंगातून रक्त वाहत होते. ते मला म्हणाले, ' मौलवीसाहेब, (माझ्या अंगात काळीं शेरवाणी आणि पायांत रुंद पायजमा असल्यामुळे मी कोणत्या जातीचा आहे, हे ते ओळखू शकले नाहीत.) काल येथील लोकांनी हल्ला केला त्यात आमचा हा भाई जखमी झाला आहे. त्याला नलगोंड्याच्या दवाखान्यात दाखल करा. आज पाहा गावात आमचे लोक गावकऱ्यांचा सूड घेत आहेत. '

व्यंकट म्हणाला, " त्यांचे हे उद्गार ऐकून मी अगदी सर्द झालो. मी कोण आहे हे त्यांनी ओळखले तर माझी हाडेही शिल्लक राहणार नव्हती. मी म्हटले, ' बहोत खूब, आप कोई फिक्र मत कीजिये. दीन (इस्लाम धर्म) की खिदमत करना तो हमारा फर्ज है. ' असे म्हणून मी त्या जखमी माणसाचे अंग झाकण्याकरिता त्याच्यावर आपला रेनकोट घातला. नंतर आमची बस हलली. नलगोंड्याला पोहोचून मी त्या जखमी माणसाला दवाखान्यात पोहोचते केले. आपल्या बिऱ्हाडी परत आल्यावर मी भयंकर आजारी पडलो. तो अद्यापि पूर्ण बरा झालो नाही. "

त्याची हकीकत ऐकून आम्ही त्याला सांगितले की, तू काही दिवस रजा घेऊन येथेच राहा कसा. काय व्हायचे ते सर्वांचे एकेच ठिकाणी होऊ दे.

ऑगस्ट महिन्याच्या सुरवातीला रजाकारांनी आमच्या घरच्या शीख पहारेकऱ्याचा निर्दयपणे खून केला. त्याची मुलगी आजारी होती. म्हणून तो तिच्यासाठी औषध आणण्याकरिता मुअज्जमजाही मार्केटकडे गेला होता. ती

वेळ सकाळी दहा अकराची असावी. त्या एका माणसावर तीन-चारशे रजाकार गुंड तुटून पडले आणि त्यांनी कुऱ्हाडींनी त्याला ठार मारले. त्या शिखाची जीभ बरीच लांब तोंडावाटे लोंबकळत होती. त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे उडाले होते. ऑफिसातून संध्याकाळी परत आलो. तो आमच्या पहारेकऱ्याचा पत्ता नाही. मी सगळीकडे चौकशी करविली. पहारेकऱ्याची आठ वर्षांची मुलगी रडू लागली. तिचे आम्ही कसेबसे समाधान करीत होतो. इतक्यात रेडियोवर आम्ही बातमी ऐकिली की, मुअज्जमजाही मार्केटजवळ आज सकाळी एक शीख मारला गेला आहे. चौकशी करता तो आमचा पहारेकरी निघाला. या अत्याचाराने आम्ही हादरून गेलो. आमचे घर ओंकार भुवन हे मुख्य रस्त्यावर होते. घराचा व्हरांडा अगदी रस्त्यावर होता. गणवेष घातलेले रजाकार रस्त्यावरून सारखे ये-जा करीत. आमच्या घरात ते सहज घुसू शकले असते, इतके आमचे घर रस्त्याच्या तोंडाशी होते. शीख पहारेकऱ्याच्या खुनानंतर आम्ही घर बदलले. त्याच रस्त्यावर हैदराबाद कर्नाटकचे पुढारी कृष्णाचार्य जोशी (काँग्रेस पुढारी आणि लायक अली मंत्रिमंडळातील एकेकाळचे मंत्री रामाचार्य यांचे बंधू) यांचे घर होते. कृष्णाचार्य हे त्यावेळी बाहेरून चळवळ करण्यासाठी म्हणून विजयनगरजवळील होसपेट या गावी जाऊन राहिले होते. आम्ही त्यांचे घर भाड्याने घेतले. घर रस्त्यावर असले तरी त्याचे आंगण फार मोठे होते. याशिवाय तेथून पोलीस स्टेशनही जवळ होते. रजाकारांची वर्दळ घरात विशेष ऐकू येत नसे. तेच थोडेबहुत समाधान होते.

ऑफिसच्या कामाबाहेरच्या वेळात मी गोंडी आणि कोलामी या भाषांचे व्याकरण आणि गोंड समाजावरील प्रबंध हे ग्रंथ लिहीत होतो. गोंडी आणि कोलामी या दोन्ही भाषा द्राविडी भाषाकुलातील आहेत. त्यांचे व्याकरण लिहीत असताना मी उस्मानिया विद्यापीठातील तेलगूचे प्राध्यापक लक्ष्मी रंजनम्, कन्नडचे प्राध्यापक दिदगी भीमसेनराव आणि निजाम कॉलेजातील तामीळचे प्राध्यापक मीनाक्षी सुंदरम् यांच्याशी द्राविडी भाषांच्या व्याकरणासंबंधी चर्चा केल्या. एका मित्राचा टाइपरायटर मी घरी आणून ठेवला होता. मी माझे गोंडावरील इंग्रजी ग्रंथ स्वतः टाइप करीत होतो. राजकारणात आम्ही काय भाग घेणार! ते दिव्य तप हजारो कार्यकर्ते आचरीत होते. स्वामी रामानंद तीर्थ तर स्वातंत्र्याच्या चळवळीचे प्राणच होते. पण शेकडो हजारो कार्यकर्ते राजकारणाच्या अत्याचाराला निर्धाराने तोंड देत होते. भालेराव, श्राफ, माणिकचंद पहाडे, वैशंपायन, परांजपे, जोशी, चव्हाण, पेडगावकर, बिंदू, कोरटकर, मेरु, कोटे, रंगा रड्डी, देसाई अशी किती म्हणून नावे सांगावीत.

अनेक कार्यकर्ते प्राणाला मुकले. पण कार्य चालू राहिले. या अभूतपूर्व लढ्याचा समग्र इतिहास लिहिला जाणे आवश्यक आहे.

एकदा कासिम रजवीने उद्गार काढले की, सातशे वर्षे दख्खनवर आमचे स्वामित्व चालत आलेले आहे. माझा मित्र राघू जहागिरदार हा कलकत्त्याच्या एका इंग्रजी दैनिकाचा बातमीदार होता. त्याला मी म्हटले, "अरे राघू, हा कासिम रजवी काय थापा मारतो आहे रे! कुठची सातशे वर्षे! आणि त्यातही सगळे अठरावे शतक मराठ्यांशी लढण्यात निजाम निष्प्रभ होऊन गेले होते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून निजाम तर इंग्रजांचे मांडलिक बनले. त्यांचे स्वामित्व काय शिल्लक राहिले? घरच्या म्हातारीचे काळ हे" यावर राघू म्हणाला, "अरे एखादा इंग्रजी लेख लिहून दे ना या विषयावर. मी तो कलकत्त्याच्या वर्तमानपत्रात छापतो. अर्थात मी तुझे नाव देणार नाही." मी एक लेख लिहून दिला. त्यात मी दाखविले होते की, सातशे वर्षे मुसलमानांची राजवट सगळ्या दख्खनवर चालू आहे हे म्हणणे चुकीचे आहे. तेलंगणच्या दहा जिल्ह्यांत इ. स. १३४७ पासून १५४६ पर्यंत बहमनी आणि गोवळकोंड्याचे कुतुबशहा यांना सतत लढाया कराव्या लागल्या तेव्हा कोठे तो भाग त्यांच्या ताब्यात आला. आंध्र लोकांचा स्वातंत्र्यसंग्राम तीनशे वर्षे चालू होता. तेलंगणातील मुसलमानी राजवट चार साडेचारशे वर्षांची म्हणावी लागेल. कर्नाटकातील बेदर आणि गुलबर्गा हे जिल्हे १३४७ नंतर बहमनींच्या कायमचे ताब्यात गेले. पण रायचूर जिल्हा विजापूरच्या अदिलशहाच्या ताब्यात कायमचा जाण्यास इ. स. १५६५ उजाडावे लागले. मराठवाड्यात औरंगाबाद जिल्ह्याच्या अकरा तालुक्यांपैकी जालना, गंगापूर, भोकरदन, जाफराबाद हे शिंद्याकडे, अंबड, वेरूळ होळकरांकडे आणि कन्नड, वैजापूर हे पेशव्यांकडे होते. पैठण तालुका हा वीस वर्षे पेशव्यांकडे होता. दौलताबाद किल्ला हाही वीस वर्षे पेशव्यांकडे होता. मराठवाड्यात मराठ्यांचा चौथाईचा अंमल सर्रास चालू होता. पालखेड, उद्गीर, राक्षसभवन, खर्डे इत्यादि लढायांतून मराठ्यांनी निजामाची दाणादाण उडविली होती. इंग्रज मध्ये पडले नसते तर मराठ्यांनी निजामाला शिल्लक ठेवले नसते. या गोष्टीचा कासिम रजवीला विसर पडला आहे.

माझा हा लेख कलकत्त्याच्या इंग्रजी दैनिकात प्रसिद्ध झाला. अर्थात पिसाळलेल्या रजाकारांचे लक्ष जाण्याचे कारणच नव्हते. त्यांचे अत्याचार दिवसेंदिवस वाढतच होते. हिंदुस्थान सरकार हैदराबादवर आक्रमण केल्याशिवाय राहाणार नाही याची मला खात्री वाटू लागली. पण तो दिवस केव्हा

उजाडेल याची मला कल्पना येईना. पण एकदा आक्रमण सुरू झाले की हा लढा चार दिवसांच्यावर लांबणार नाही असे मला वाटू लागले.

माझे मित्र डॉक्टर लक्ष्मणराव, डिस्ट्रिक्ट जज्ज आणि राजे धुंडीराज रायरायान जहागिरदार आणि मी असे एकदा एकत्र बसून या विषयावर बोलत होतो. डॉक्टर लक्ष्मणराव म्हणाले, "निजामाचे सैन्य सहा महिने लढेल. त्या काळात हैदराबादेत असंख्य लोकांच्या कत्तली होतील." मी म्हटले, "चार दिवसांत हैदराबाद शरण येईल. हिंदुस्थान सरकारच्या फौजा दहा मार्गांनी निजाम राज्यात घुसू शकतील. त्या कोणत्या मार्गांनी येतील हे निजाम सरकारला कळणार नाही. फुटबॉल खेळातील गोलकीपरसारखी त्याची स्थिती होईल. संपूर्ण सरहद्दीचे रक्षण होऊ शकेल इतके सैन्यबळ निजामापाशी नाही. आणि तसे करण्यासाठी सैन्य पसरावे लागले तर ते कोठेच टिकाव धरू शकणार नाही. जास्तीत जास्त हे होईल की, निजामसरकार हैदराबाद शहराच्या रक्षणाचा प्रयत्न करील. पण हिंदुस्थानच्या सैन्याच्या बळापुढे निजामाचे फार काळ चालू शकेल असे वाटत नाही. कत्तली होण्याची शक्यता आहे, पण चारपाच दिवसांत ही मोहीम संपल्यास कत्तली घडवून आणण्यास लागणारा अवधी रजाकारांस मिळू शकेल असे वाटत नाही."

डॉक्टर लक्ष्मणरावांचा माझ्या म्हणण्यावर विश्वास बसला नाही. ते म्हणाले 'पैज लावा.' मी म्हटले 'जरूर.' आम्ही पैज लावली. पुढे पोलीस ॲक्शन-नंतर लक्ष्मणरावांची गाठ पडली तेव्हा ते म्हणाले, "माधवराव, तुम्ही पैज जिंकलीत." मी म्हटले, "त्यापेक्षा अधिक समाधान हजारो लोकांच्या कत्तली टळल्या म्हणून मला होत आहे."

रजाकारांचे अत्याचार पसंत नसलेले बरेच मुसलमान हैदराबादेत होते. एकदा तर मंजूर जंग (सेवानिवृत्त कलेक्टर), फरीद मिर्झा (डेप्युटी कलेक्टर) अशा सात गृहस्थांनी वर्तमानपत्रातून रजाकारांचा जाहीरपणे निषेध केला. त्यावर रजाकारांनी विलक्षण आकांडतांडव केले. हे लोक इस्लामाचे द्रोही (गद्दार) आहेत असा प्रचार करण्यात आला. इम्रोज या उर्दू दैनिकाचा संपादक शुइबुल्ला-खान हा पक्का राष्ट्रीय वृत्तीचा होता. तो कासिम रजवीवर निर्भीडपणे टीका करी. रजवी त्याच्यावर जळफळत असे. एकदा रजवीने गर्जून म्हटले होते–"इस्लाम-विरुद्ध ज्यांचे हात उठतील ते छाटले जातील." अशा चिथावणीचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. शुइबुल्लाखान आमच्या घरापासून जवळच राहात होता. एकवीस ऑगस्टच्या रात्री तो आणि त्याचा मेहुणा हे सिनेमा पाहून घरी परत आले. तो रात्री बाराचा सुमार असावा. ते दोघे आपल्या घरासमोर उभे राहून

दार उघडण्याची वाट पाहात होते. इतक्यात त्यांच्यावर काही इसमांनी हल्ला केला. शुइबुल्लाखानाचे हात छाटण्यात आले आणि त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. त्याच्या मेहुण्याला जबर जखमा झाल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी शुइबुल्लांचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी लोकांची रीघ लागली होती. माझी मुले अरुण आणि अशोक ही दोघे शुइबुल्लाला पाहून आली. या अत्याचारामुळे सामान्य जनतेत मोठी घबराट पसरली. भारताचे दूत के एम. मुन्शी यांच्यावर उर्दू वर्तमानपत्रांतून होत असलेली हीन टीका वाचवत नसे. त्यांचा खून करण्याचे कारस्थानही शिजले होते.

सप्टेंबर महिना सुरू झाला. कासिम रजवीच्या गर्जना चालू होत्या. या सुमारास तेलंगणच्या सरहद्दीवर एक घटना घडली. हुजूरनगर तालुक्यात (१९३४ मध्ये मी तेथे मामलेदार होतो.) कोहाड हे गाव आहे. तेथून विजयवाडा जिल्ह्यातील काही खेडी अगदी जवळ आहेत. हैदराबाद सैन्याची एक तुकडी कोहाडला ठेवण्यात आली होती. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात या तुकडीने यूनियनच्या काही शिपायांना पकडले. हैदराबादेत या गोष्टीचा रजाकारांनी काय प्रॉपोगंडा केला. हैदराबादची अजिंक्य फौज, पळपुटे इंडियन यूनियन अशा प्रकारच्या वल्गना करीत ते हिंडू लागले. आठ सप्टेंबरला दुसऱ्याच दिवशी इंडियन यूनियनच्या फौजांनी ऐन पहाटे कोहाडवर अचानक छापा घातला. आणि एका दमात पाच अधिकारी आणि नव्वद शिपाई याना पकडले. या बातमीमुळे हैदराबादेत कोण खळबळ माजली. रजाकारांनी प्रचार केला की, निजामी सैनिक तुकडीचा अधिकारी हा अँग्लो इंडियन होता. तो यूनियनकडे फितूर झाला. आणि त्यानेच आपल्या तुकडीला गैरसावध ठेवून धरपकड करविली.

मी दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये गेलो तो माझा कारकून खानसाहेब माझ्या खोलीत आला. तो मला तावातावाने म्हणू लागला—

" साहेब, आमच्या शत्रूच्या हलकटपणाची सीमा झाली. " मी म्हटले, " खानसाहेब, काय झाले ? आपला शत्रू न लढता पळून गेला की काय ? "

" छे हो, " खानसाहेब म्हणाले, " कोहाडची हकीकत ऐकलीत ना ? "

मी म्हटले, " थोडीबहुत ऐकली. शत्रूंनी छापा घालून आपले शिपाई धरले म्हणे. "

" तेच तर, " खानसाहेब क्षुब्ध होऊन बोलू लागले, " आमचा अधिकारी शत्रूला सामील झाला. तो रोज रात्री सरहद्दीच्या पलीकडे जाऊन शत्रूच्या अधिकाऱ्यांबरोबर पत्ते खेळत असे. त्यानेच शत्रूला फूस दिली असली पाहिजे. अहो, आमचे शिपाई साध्या हापपँट आणि बनियनमधे लेफ्टराइट करीत

असता शत्रूने एकाएकी छापा घालून त्यांना पकडून नेले. छे, हलकटपणाची कमाल झाली. आमचे लोक तयार असते तर त्यांची काय छाती झाली असती ? आमचे सैन्य आफ्रिकेत जर्मनांच्या मगरमिठीतून सुटून आले, (जर्मनों के नगेंसे निकल आई) ते काय त्यांना दाद देईल ? पण नुसत्या हाफपँट आणि बनियनमधे कवाईत करीत असताना पकडावे म्हणजे काय ? छे, छे, जगात नीती शिल्लक राहिलीच नाही.

" पण, " खानसाहेब, पुढे म्हणाले, " आमच्या दगाबाज अधिकाऱ्यांना आम्ही सोडले नाही. आमच्या सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला करून त्याला पकडला. त्याला हैदराबादेस आणण्यात आले आहे. त्याला कुठे ठेवण्यात आले आहे माहीत आहे ? "

मी म्हटले, " नाही बुवा. "

" अहो, " खानसाहेब म्हणाले, " आपल्या ऑफिसच्या शेजारी चर्चमधे. " असे म्हणून त्यांनी खिडकीमधून मला जवळचे चर्च दाखविले. खानसाहेबांचे अगाध वर्णन ऐकून मी थक्क झालो पण काही म्हणण्याची सोय नव्हती. ' विश्वासघातक्यांना बरी अद्दल घडली ' असे मी पुटपुटलो.

आमच्या सर्व्हे सेटलमेंट खात्याचे नाजिम म्हणजे कमिशनर मसूद रजवी हे महसूल खात्याच्या सचिवालयात भरलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीला हजर होते. तेथून परत आल्यावर त्यांनी आमच्या ऑफिसमधे सर्व अधिकाऱ्यांची एक सभा घेतली. त्या दिवशी मसूद रजवी यांचे अतिशय आवेशपूर्ण भाषण झाले. ते आम्हांला म्हणाले, " आमची राज्यव्यवस्था, आमची न्यायबुद्धी, आमचा निःपक्षपातीपणा ही साऱ्या जगात मशहूर आहेत. आमच्यावर आक्रमण होत आहे; पण आमची पाळेमुळे इतकी खोल गेली आहेत की, ती इतक्या सहजासहजी उपटली जाणे शक्य नाही. हे सगळ्या जगाला दिसून येईल. आता यापुढे तुम्ही निर्धाराने वागले पाहिजे (मी मनाशी म्हटले-' म्हणजे काय ? ') तुमच्या वागण्यात, बोलण्याचालण्यात शिपाई बाणा दिसून आला पाहिजे. तुम्ही यापुढे खाकी गणवेष घालून ऑफिसमधे आले पाहिजे. " ती सप्टेंबरची सात किंवा आठ तारीख असावी. सभा संपल्यानंतर आम्ही कमिशनरसाहेब किती सुंदर बोलले याचे परस्परांत कौतुक करीत परत आलो. त्याच दिवशी आम्हांला कळविण्यात आले की, फत्तेमैदानात कवायतीचे शिक्षण दिले जाणार असून रोज सकाळी सर्वांनी तेथे जमत जावे. हे आपल्याला कसे काय जमेल याचा मनाशी विचार करीतच मी त्या दिवशी घरी परतलो.

आमच्या घरापासून फत्तेमैदान हे चार मैल दूर होते. भल्या पहाटे उठून

मी तेथे गेलो. तो काय सांगावे ? सगळे मैदान, मंत्री, सचिव आणि निरनिराळ्या खात्यांच्या अधिकाऱ्यांनी आणि कारकून मंडळींनी फुगून गेले होते. अटेन्शन, अबौट्टर्न, क्विक् मार्च, लेफ्ट, इत्यादि शब्दांनी वातावरण दुमदुमून गेले होते. मंत्रिमंडळातील दोनतीन मंत्री, काही सचिव, बरेचसे उपसचिव आणि साहाय्यक तेथे परेड करीत असताना मला दिसले. बरेच लोक लठ्ठपणामुळे परेड करताना जिकिरीला आले होते. पण स्वदेश, स्वधर्म आणि स्वसंस्कृती रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे असा आविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

हे श्रम आपल्याला कसे करवतील, या काळजीनेच माझ्या पोटात गोळा उठला. पण करता काय ? डॉक्टरांनी आमच्याकडे नुसता दृष्टिक्षेप करून आम्हांला ' पास ' म्हटले. आम्ही परेड मैदानावर जाऊन उभे राहिलो. आमचा अधिकारी आम्हांला रांगेत उभे राहण्यास सांगत होता. इतक्यात मला एक कल्पना सुचली. मी रांगेतून निघून डॉक्टरकडे गेलो. तो आपल्या समोरचे कागद गोळा करीत होता. मी त्याला म्हटले, " डॉक्टरसाहेब, आजाद हैदराबादसाठी मी आपल्या रक्ताचा शेवटचा बिंदू देईन, अशी प्रतिज्ञापत्रकावर मी सही केली आहे. आमचे मुल्क आणि मालक यांच्याबद्दल माझी वफादारी (निष्ठा) गैरमुतजल्जल (अविचलित) आहे. आपल्या रियासतीची तरक्की (उन्नती) दिन दुगनी और रात चौगनी (दिवसा दुप्पट आणि रात्री चौपट) व्हावी अशी मी नेहमी प्रार्थना करीत असतो. आमचे मालकांची उमरदराज (दीर्घायू) होवो. तुम जिंदा रहो हजार बरस, हर बरस के दिन हो पचास हजार (हे भूपते, तुला एक हजार वर्षांचे आयुष्य लाभो आणि त्यातील प्रत्येक वर्षाचे दिवस तीनशे चौसष्ट न राहता पन्नास हजार असोत) अशा प्रार्थना मी समारंभातून केल्या आहेत. भाग्यशाली राजपुत्रांचे (शाहाजादगाने बलंद इक्बाल), आणि सुचरित्रशाली राजकन्यांचे (शहाजादियाने नेकफाल) भाग्य दिवसेंदिवस अधिक उजळ होत जावे, असे आम्ही चिंतिले आहे.

" पण युद्धात मी काय करणार ? हे माझे वय चाळिशीचे आहे. आदिवासी इलाख्यात मी तीन वर्षे काम केले. त्यात मला सात आठ वेळा मलेरिया झाला. अंगात रक्त कमी झाले आहे. चालता चालता रस्त्यात ठेचा लागतात. शिवाय शरीर जड आहे. तेच आवरत नाही, तर मी शत्रूला काय आवरणार ? मी कवायत शिकणार केव्हा ? शस्त्रे हातात धरण्यास लायक केव्हा होणार, आणि लोक तर म्हणतात की, युद्धाची निकर जवळ आली आहे. कृपा करून माझी या कवायतीतून सुटका करा. "

तो धूर्त डॉक्टर माझ्याकडे पाहून हसला. " बरे, बरे, " तो म्हणाला, मी

तुम्हांला गाळतो, पण वेळ आल्यास–” त्याचे वाक्य पूर्ण होण्याच्या आधीच मी म्हटले, “ आपल्या रक्ताचा शेवटला बिंदू मी मालकाकरिता वाहणार. तुम्ही निःशंक असा. ” असे म्हणून मी फत्ते मैदानातून बाहेर पडलो.

याच सुमारास रजाकार मंत्रिमंडळाने युनायटेड नेशन्सच्या समितीत हैदराबादचे प्रकरण न्यावयाचे ठरविले. दहा तारखेच्या रात्री हैदराबादचे परराष्ट्रमंत्री मुईननवाजजंग यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ पॅरिसकडे रवाना झाले. ही रवानगी सिडने कॉटनच्या विमानातून झाली. तो हैदराबादसाठी शस्त्रास्त्रांचा पुरवठा करीत असे. या व्यवहारात त्याने हजारो रुपये कमावले. मुईननवाज जंग हे हैदराबाद सोडताना सरकारी खजिन्यातून दोन तीन कोटी रुपये घेऊन गेले असे म्हणतात.

दहा सप्टेंबरला हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल राजगोपालाचारी यांनी निजामाला पुन्हा एकदा पत्र लिहून हिंदुस्थान सरकारच्या अटी मान्य करण्याची त्याला सूचना केली. रजाकारांची संघटना ताबडतोब बरखास्त करावी, हिंदुस्थान सरकारच्या फौजा सिकंदराबादेत पुन्हा तैनात व्हाव्या आणि सध्याचे मंत्रिमंडळ काढून जबाबदार राज्यपद्धती अमलात आणावी या त्या सूचना होत्या. पण लायकअली मंत्रिमंडळाने या सूचना फेटाळून लावल्या.

बारा सप्टेंबरला जिनांचा मृत्यू झाला. हैदराबाद शहरात रजाकारांनी जबरदस्तीने दुकाने बंद करण्यास लावली. तेरा तारखेला सकाळी माझ्या बहिणीचा मुलगा व्यंकट धावत धावत आला. मी त्यावेळी स्नान करीत होतो. तो म्हणाला, “ मामा, जिना मेला आणि आज सकाळी यूनियनच्या फौजा चहूकडून हैदराबाद राज्यात घुसल्या आहेत. ”

या वाक्याने माझ्या अंगांत वीज संचरल्यासारखे झाले. बाहेर रस्त्यावरून गणवेषधारी रजाकारांनी भरलेल्या गाड्या सतत चालल्या होत्या. काय तर म्हणे त्या फ्रंटकडे चालल्या आहेत. त्या दिवशी मी ऑफिसमधे गेलो. ऑफिसमध्ये एकच गडबड उडाली होती. मी मुकाट्याने आपल्या खोलीत जाऊन बसलो. थोड्या वेळाने आमचे कारकून खानसाहेब एका शिपायाला बरोबर घेऊन खोलीत आले. शिपायाने तांबडे–निळे कागद आणले होते. ते तो खिडक्यांना चिकटवू लागला. मी खानसाहेबांना म्हटले, “ खानसाहेब, हा काय प्रकार आहे ? ”

खानसाहेब म्हणाले, “ साहेब, एअररेड होणार आहे. म्हणून खिडक्यांना तांबडे–निळे कागद लावीत आहे. ”

मी विचारले, “ खानसाहेब, दिवसाउजेडी तुम्ही हे कागद चिकटविलेत तर

आम्हांला फायली कशा वाचता येतील ? आणि असल्या कागदी पडद्यांनी एअर रेडला अडवणूक कशी होईल ? ''

" ते तुमच्या लक्षात येणार नाही. " खानसाहेब म्हणाले, " तुम्हांला युद्ध-कलाच माहीत नाही. ती आम्ही जाणतो. आणि फायलींच्याकडे आता कोणाचे लक्ष आहे ? आजाद हैदराबाद आपल्या स्वसंरक्षणाकरिता आपले प्राण पणाला लावीत आहे. "

असे म्हणून खानसाहेब दुसऱ्या खोल्यातून कागदाचे पडदे लावण्याकरिता निघून गेले. आमच्या समोरच्या बिल्डिंगमधे रेडक्रीसेंट (रेडक्रॉसप्रमाणे) चे ऑफिस उघडण्यात आले होते. तेथून हैदराबाद रेडियोवरून चाललेला प्रचार दिवसभर ऐकू येत होता. त्यातील काही शब्द अद्याप कानात घुमत असल्या-सारखे वाटतात. " दख्खनके नौजवानों, मुल्कको तुम्हारे गरम खून की जरूरत है, आमच्या कायदे आजम (जिना) च्या इंतिफाले पुरमलाल (दुःखदायक मृत्यू) ला काही तासही लोटले नाहीत तोच हलकट शत्रूने उत्तर, पूर्व, पश्चिम आणि दक्षिण या सर्व बाजूंनी आमच्यावर हल्ला केला आहे. उठा, दख्खनच्या नौजवानांनो, तयार व्हा, ही वेळ आणीबाणीची आहे. "

मी मान खाली घालून ऑफिसचे काम करीत होतो. दुपारी आमचा पट्टेवाला आत आला. त्याने धारण केलेली शस्त्रे पाहून मला लहानपणी वाचलेल्या अमीर-अली ठगाची गोष्ट आठवली. पट्टेवाल्याच्या पाठीला बंदूक होती. कमरेला काडतुसांचा भरलेला पट्टा होता. कमरेत एक कट्यार खोवली होती. कमरेच्या दोन्ही बाजूंना दोन तलवारी होत्या. त्याला पाहताच मी सर्द झालो. नारायणराव पेशवे आणि त्याचे गारदी मारेकरी यांची मला आठवण झाली. पट्टेवाला माझ्याजवळ आला. अजीजीने त्याने आपले हात माझ्या हातात दिले. तो मला म्हणाला " साहेब, मी आपला निरोप घ्यायला आलो आहे. मी फ्रंटवर लढण्यास चाललो आहे. माझ्याकरिता आपण दुवा (प्रार्थना) करा. आजाद हैदराबाद जिंदाबाद, पायिंदा बाद (कायम राहो) " मीही क्षीणपणे हसून त्याला म्हटले, " खुदा हाफिज, " तो निघून गेला तेव्हा कोठे माझ्या जिवात जीव आला.

हैदराबाद रेडियोच्या विलक्षण प्रचारामुळे आम्ही मोठे अस्वस्थ होऊन गेलो. त्या बातम्यांवरून असे वाटे की, इंडियन युनियनच्या फौजा पळत सुटल्या आहेत आणी हैदराबादच्या फौजांची सर्वत्र फत्ते होत आहे. दुश्मन भाग निकला है. हिंगोलीके महाज (आघाडी) पर दुश्मन बक्तरबंद गाडियां (चिलखती रणगाडे) लाने पर मजबूर हो गया है.) शत्रूला चिलखती रणगाडे आणणे भाग पडत आहे. आमच्या सेटलमेंट ऑफिसमधील डेप्युटी कमिशनर अलीहसन

हे आपण लष्करी तज्ञ असल्याप्रमाणे बोलत. ते मला म्हणू लागले, "आपले लोक युनियनच्या फौजांना अडवीत आहेत. अब फ्रंट स्टॅबिलाइज हो गया. आता सरहद्दीवरच लढाई होत राहील. शत्रू आत येणार नाही.

कासिम रजवीच्या दारेस्सलाम वाड्यातील ऑफिसचे काय सांगावे ? कासिम रजवी तर स्वतःला फील्ड मार्शल म्हणवून घेऊ लागला. अगदी चर्चिलच्या थाटात हैदराबाद राज्याचा नकाशा टेबलावर पसरून तो बसलेला असे. त्याचे सहकारी त्याच्या भोवती गोळा झालेले असत. मंत्र्यांचाही घोळका त्याच्या भोवती असे. नकाशाकडे पाहात फील्ड मार्शल कासिम रजवी म्हणे, "ती पाहा, या मार्गाने इंडियन आर्मी हैदराबाद राज्यात घुसली. आपले सैन्य त्यांचा प्रतिकार करू लागले. या रणमैदानावर इंडियन सैनिकांच्या प्रेतांचे ढिगारे पडले आहेत. या मैदानावरून इंडियन आर्मी धूम पळत सुटली आहे." असे म्हणत कासिम रजवी कुराणाचे भक्तिभावाने पुन्हा पुन्हा चुंबन घेई. आणि त्यांचे सहकारी कासिम रजवीच्या युद्ध-कौशल्याचे कौतुक करीत ओरडत, "मरहबा (धन्य), सुभानल्ला, (धन्य परमेश्वराची)." ॲक्शन सुरू झाल्याबरोबर रजवीने सल्ला दिला की, हैदराबाद राज्याला जोडणारे पूल उडवून टाका, रेल्वे मार्ग तोडा, कें एम. मुन्शींना नजरकैदेत ठेवा. प्रत्यक्षात पूल उडविण्यास इंडियन यूनियनच्या फौजेने अवधीच दिला नाही.

पहिले दोन दिवस रजाकार आणि त्यांचे सोबती यांचा उत्साह अवर्णनीय होता. शेकडो रजाकार बसमधून हैदराबादच्या बाहेर रवाना झाले. त्यांना 'खुदा हाफिज' म्हणण्यास हजारो माणसे गोळा होत. हायकोर्टाचे एक न्यायमूर्ती हातात तलवार घेऊन नाट्यपूर्ण रीतीने लढण्यास म्हणून बाहेर पडले. त्यांचे कोण कौतुक. पण कुठे जावे याचा ते विचार करीपर्यंत हैदराबादने शरणागती पत्करली होती. त्यामुळे न्यायमूर्ती आपल्या घरात दडून बसले ते कित्येक दिवस बाहेर आलेच नाहीत.

पहिले एक दोन दिवस आमचे मुसलमान सहकारी आमच्याशी तुटकपणे वागू लागले होते. रस्त्यावरून एकदा मी जात असता माझा मित्र अब्दुस्सलाम (हा मी कळमनूरीला असताना तेथे मुन्सफ होता) मला भेटला. मी म्हटले, "अब्दुस्सलामसाहब, आदाब अर्ज करता हूं, कहिये खैरियत से तो है." त्यावेळची त्याची तुटक वागणूक मी अद्याप विसरलो नाही. असा अनुभव मला अनेकांच्या बाबतीत आला.

चौदा सप्टेंबरला आमच्या कमिशनर साहेबांनी आम्हांला आपल्या ऑफिसमधे बोलाविले. दोन गणवेषधारी अधिकारी त्यांच्याजवळ बसले होते.

कमिशनरनी मला म्हटले—"फ्रंटला आपले लोक लढत आहेत. त्यांना फळफळावळ, कपडेलत्ते, अन्नधान्ये वगैरे लागेल. तुम्ही काय वर्गणी देता बोला."

मी म्हटले, "शंभर रुपये देतो. पण सध्या माझ्याजवळ काही नाही. पगारातून वजा करून घ्या." पण पुढील महिन्याचा पगार मिळण्यापूर्वीच निजामी राजवट बदलून गेली. त्यामुळे ती वर्गणी भरण्याचा प्रसंग आला नाही.

यूनियनच्या फौजा हैदराबादच्या हद्दीत किती लांब चालून आल्या आहेत याची आम्हांला कल्पना येईना. सोलापूरमार्गे नळदुर्ग, मनमाडकडून औरंगाबाद, वऱ्हाडकडून जालना, हिंगोली, चांदा मार्गे आदिलाबाद, बेजवाडा मार्गे वरंगल आणि नलगोंडा, अथोनी मार्गे रायचूर आणि होसपेट मार्गे तुंगभद्रा अशा प्रकारे चहूबाजूंनी फौजा घुसल्या होत्या. चौदा तारखेला संध्याकाळी आम्ही सहज म्हणून औरंगाबाद रेडियो स्टेशन लावले. तेथे माझे मेहुणे माधवराव जतकर हे टेक्निकल असिस्टंट होते. तो काय आश्चर्य, औरंगाबाद रेडियोवर जनगणमन हे आपले राष्ट्रगीत लागले होते. औरंगाबाद आपल्या भारतीय फौजांनी ताब्यात घेतले तर! त्यावेळी आम्हांला कोण आनंद झाला. आम्ही अगदी गुंग होऊन राष्ट्रगीत ऐकत होतो. माधवराव जतकरांनी मला हकीगत सांगितली ती अशी, शेवटचे एक दोन महिने त्यांना रेडियो स्टेशनवर अतिशय काळजीचे गेले. त्यांनी आपल्या बायकामुलांना जतेला पाठवून दिले होते. मनमाडला स्वातंत्र्यलढ्याचे कार्यकर्ते आपले ट्रान्समीटर्स दुरुस्तीसाठी म्हणून त्यांच्याकडे गुप्तपणे पाठवीत असत. ते काम करून दिल्याबद्दल त्यांनी माधवरावांना एक पिस्तूलही दिले होते, ते, ते नेहमी आपल्याजवळ बाळगीत असत. चौदा सप्टेंबरला भारतीय फौजांनी औरंगाबाद घेतले. रेडियो स्टेशनवर त्यांनी पाहारे बसविले. स्टेशन डायरेक्टर मीरहसन हा हैदराबादेस पळून जात होता. त्याला पकडण्यात आले. सेनापती ब्रार आणि ल. ग. राजवाडे आय. सी. एस. (आता गृहसचिव महाराष्ट्र राज्य) हे रेडियो स्टेशनवर आले. माधवरावांनी स्टेशन चालू केले आणि पहिली रेकॉर्ड लावली ती राष्ट्रगीताची!

सोळा सप्टेंबर रोजी माझी नेमणूक शेतकी खात्याच्या मंत्र्याचा पर्सनल असिस्टंट म्हणून झाली. लायक अली मंत्रिमंडळात काही हिंदू मंत्री असत. हे नाटक जगाला दाखविण्यासाठी असे, पण यांपैकी काही मंत्र्यांना रजाकारांचे अत्याचार असह्य वाटून त्यांनी आपल्या जागांचे राजीनामे दिले. रामाचार्य, जी. व्ही. जोशी, इत्यादि मंत्री मंत्रिमंडळ सोडून गेले. सप्टेंबर महिन्यात दोन हिंदू मंत्र्यांच्या नेमणुका झाल्या. त्यांपैकी शेतकी खात्याच्या मंत्र्यांनी आपले

पर्सनल असिस्टंट म्हणून माझी निवड केली. महसूल मंत्री फजल नवाज जंग यांनी माझ्या नेमणुकीला कसून विरोध केला. पण शेतकी मंत्र्यांच्या हट्टापुढे त्यांचे काही चालले नाही. मला सोळा सप्टेंबरला बदलीचा हुकूम मिळाला. त्याच दिवशी मी सेटलमेंट खात्यातील आपल्या कामाचा चार्ज दिला. मी सेटलमेंट कमिशनर मसूद रजवी यांचा निरोप घेतला. क्षीणपणे हसून त्यांनी मला निरोप दिला. एरव्ही माझ्याशी बोलताना ते नेहमी गंभीर असत. पण या वेळच्या त्यांच्या हास्यात मला त्यांच्या लाचारीची जाणीव झाली. आपल्या भवितव्याबद्दल ते साशंक झाले असावेत (पोलीस ॲक्शननंतर त्यांना सेवानिवृत्त करण्यात आले.)

वास्तविक पाहता मी सोळा सप्टेंबर गुरुवारी दुपारच्या बारा वाजण्याच्या पूर्वी कामाचा चार्ज दिला होता. मी त्याच दिवशी शेतकी मंत्र्याकडे रुजू होण्यास हवे होते. पण त्या दिवशी दुपारी मला माजी मंत्री जी. रामाचार्य यांचे जेवणाचे आमंत्रण आले. रामाचार्य आणि कृष्णाचार्य जोशी हे बंधू कॉंग्रेसचे पुढारी. गुलबर्गा जिल्ह्यातील चिंचोळी या गावचे. माझे लहानपण चिंचोळी गावी गेले होते. त्यामुळे त्यांचा आणि आमचा घरोबा होता. रामाचार्य हे कॉंग्रेसपक्षातील मवाळ पुढारी म्हटले पाहिजेत. कॉंग्रेसचे खरे नेते स्वामी रामानंद-तीर्थ इत्यादींनी स्वातंत्र्यसंग्रामात अपार कष्ट सहन केले. त्या मानाने रामाचार्य हे कुठेच बसत नव्हते. ते लायकअली मंत्रिमंडळात सामील झाले. त्यामुळे कॉंग्रेसच्या लढ्याला थोडासा तडा गेला. पण रजाकारांच्या अत्याचारांना विटून त्यांनी अवघ्या चाळीस दिवसांत राजीनामा दिला. पण असे असूनही ते लायक अलीशी संपर्क ठेवून असत. रामाचार्यांनी दुष्ट ग्रहाच्या शांतीसाठी अनुष्ठान केले होते. मी त्यांना याबाबतीत विचारले तेव्हा ते मला म्हणाले, "माझे आणि निजामाचे ग्रह वाईट आहेत. अरिष्टनिवारणार्थ मी अनुष्ठान केले आहे." गुरुवारी अनुष्ठानाची सांगता होती. मी कामाचा चार्ज दिल्यावर दुपारी दोनच्या सुमारास रामाचार्यांच्या घरी गेलो. भोजनाचा थाट अप्रतिम असा होता. पुरणपोळी आणि बुन्दीचे लाडू ही पक्वान्ने होती. भोजनाला दोन अडीचशे माणसे हजर होती. रामाचार्यांनी लायकअलींनाही जेवणाचे आमंत्रण दिले होते. पण 'मी अतिशय कामात आहे. येऊ शकत नाही. दिलगीर आहे' असा त्यांचा निरोप आला. के. एम. मुन्शींना लेक व्ह्यू गेस्ट हाऊसमध्ये हलविण्यात आले होते. तेथे ते लॉनकडे जात असता निजामी सैन्याच्या एका लष्करी अधिकाऱ्याने त्यांच्यावर स्टेनगन रोखून त्यांना आत जाण्यास सांगितले. मुन्शींनी मागे फिरण्यास नकार दिला. दहा मिनिटेपर्यंत तो अधिकारी त्यांच्यावर स्टेनगन

रोखून होता. यानंतर त्याचा वरिष्ठ अधिकारी आला आणि त्याने मुन्शींची माफी मागितली. ही हकीकत पंधरा सप्टेंबरला घडली. रामाचार्यांच्या येथे मी सोळा तारखेला गेलो असताना या घटनेचीच चर्चा चालू होती.

रामाचार्यांच्या येथील भोजन समारंभ आटोपण्यास संध्याकाळचे पाच वाजले. शेतकी खात्याच्या मंत्र्यांच्याकडे मी त्याच दिवशी म्हणजे गुरुवारीच जाण्यास हवे होते. पण रामाचार्यांच्या येथून परतण्यास उशीर झाल्यामुळे मी घरी परत आलो. दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता. हैदराबाद राज्यात आठवड्याची सुट्टी रविवारच्या ऐवजी शुक्रवारी असे. मंत्र्यांच्या येथे आपण शनिवारी जावे असा माझा बेत होता. सत्रा सप्टेंबरला अनंत चतुर्दशी होती. यूनियनच्या फौजा तीस मैलांवर येऊन ठेपल्या. सकाळी दुकाने उघडली. पण ती अर्ध्या-पाऊण तासात बंद झाली. आज शहरात काही तरी भयंकर प्रकार घडणार, अशा वार्ता पसरल्या. युनियनच्या फौजा हैदराबाद शहरात प्रवेश करण्यापूर्वी रजाकार हे शहरातील हिंदूंची कत्तल करणार, अशा बातम्या पसरल्या होत्या. आमच्या घरासमोरून बाहेरगावाहून आलेल्या बसेस चालल्या होत्या. यूनियन फौजांच्या हातचा मार खाऊन जखमी झालेले रजाकार आपल्या घरी परतत होते. काही बसेसवर रक्ताचे डाग पडलेले आम्ही पाहिले. जखमी रजाकारांच्यामुळे कासिम रजवीचा क्षोभ भडकून त्याने हैदराबाद शहर नष्ट करण्याचा आणि हिंदूंची कत्तल करण्याचा निश्चय केला असता तर, रजाकारांच्या हातात नुसत्या रायफलीच सहा हजार होत्या. भाले, तलवारी आणि कट्यारी यांची तर गणतीच नाही. यूनियनच्या फौजा अवघ्या चार दिवसांत हैदराबादेत आल्या नसत्या तर रजाकारांनी आमची कत्तल करण्यास मागेपुढे पाहिले नसते याची मला तिळमात्र शंका नाही.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी सकाळी फॉरेस्ट ऑफिसर दौलतराय हे माझ्याकडे येऊन थोडा वेळ बसून गेले. त्यांचे घर शहरात मुस्लिम वस्तीत होते. ते बरेच सचिंत दिसले. आठच्या सुमारास ते निघून गेले. रस्त्यावर भयाण शांतता होती. आमच्या तोंडचे पाणी पळाले होते. काही अनुचित प्रकार घडला तर प्रतिकार करण्यासाठी हत्यारे तरी आमच्यापाशी कुठे होती ? दसऱ्यात पूजेसाठी म्हणून मी कित्येक वर्षांमागे एक लहानसा खंजीर घेतला होता. त्याशिवाय आमच्या घरात शस्त्राचे नाव नव्हते. आम्ही गच्चीवर दगडधोंडे इत्यादी जमवून ठेविले. कुणाचा हल्ला आला तर आम्ही यंव करू त्यंव करू असे बोलून आम्ही परस्परांचे समाधान करीत होतो. त्यावेळी एक विचार माझ्या मनात येऊन गेल्याचे मला अद्याप आठवते. घरावर रजाकार चालून आले आणि

घरच्या बायकांवर अत्याचार होतील असे वाटले तर त्यापूर्वीच आपणच आपल्या बायकामुलांची हत्या करून टाकावी आणि मग आपणही मरून जावे; माझी पत्नी आणि लहान मुले, माझी मुलगी अंजली ही तीन वर्षांची आणि अचल आणि अनुराधा या पाच महिन्यांच्या, यांना पाहून माझ्या पोटात विलक्षण कालवाकालव झाली.

त्या दिवशी अनंत चतुर्दशी म्हणून घरात पुरणपोळ्यांचा स्वयंपाक झाला होता. आम्ही भकास चेहरे करून जेवावयास बसलो. पण काळजीमुळे दोन घासही घशाखाली उतरेनात. काही विपरीत घडले तर आमच्यापैकी कितीजण जिवंत राहतील, कितीजणांची ताटातूट होईल. कुणाकुणाच्या नशिबी काय काय वाढून ठेवले आहे या कल्पनेने आम्ही हवालदिल झालो आणि मग मात्र यक्षिणीच्या कांडीसारखे सर्व काही फिरले. हैदराबादच्या फौजांनी शरणागती पत्करावी असा जनरल राजेंद्रसिंगजींचा संदेश आम्ही रेडियोवरून ऐकिला. लगेच दुपारी लायकअलीने रेडियोवरून आपल्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्याची घोषणा केली. सोळा तारखेला हैदराबादचे सेनापती इद्रूस यांनी निजामाला सांगितले की यापुढे युनियन फौजांचा प्रतिकार करणे शक्य होणार नाही. यावर निजामाने लायकअलीला राजीनामा देण्यास सांगितले. लायकअलीने ते कबूल केले नाही. पण सतरा तारखेला लायकअलीने राजीनामा दिला. त्यानंतर रेडियो-वर कासीम रजवीचे भाषण झाले. आमचा पराजय झाला आहे. (हमारी शिकस्त हो चुकी है) लोकांनी शांत राहावे. हे त्याचे उद्गार मला अद्याप आठवतात. लायकअलीने रेडियोवर सांगितले होते की, निजामाने युद्ध बंद करण्याची आज्ञा केली आहे. यूनियनच्या फौजा पूर्वीप्रमाणे सिकंद्राबादच्या छावणीत पुन्हा तैनात होतील. रजाकारांची संघटना बरखास्त होईल.

संध्याकाळी निजामानेही अशाच अर्थाचे भाषण रेडियोवरून केले. त्यानंतर स्वामी रामानंदतीर्थ यांनी कानडी, तेलगू, मराठी आणि उर्दू या चारही भाषांतून लोकांना शांत राहण्याचा उपदेश केला.

यानंतर मी बाहेर गेलो, बाहेरचे सगळेच वातावरण बदलून गेले होते. सडकेवर दोनतीन मैलपर्यंत लाखो माणसे एकत्र झाली होती. गुलाल आणि बुक्का सारखी उधळत होती. माणसे एकमेकांना कवटाळून हसत होती, नाचत होती. जेथे पाहावे तेथे माणसेच माणसे, त्यात आम्हीही मिसळलो. आनंदाने नाचत सुटलो. हर्षाने बेभान होऊन गेलो.

१६

हैदराबाद-पोलीस ॲक्शननंतर
१९४८–५१

गोवळकोंड्याचा किल्ला वरंगळच्या राजाकडून इ. स. १३६९ मधे ब्रहामनींनी घेतला. किल्ल्याभोवती हैदराबाद शहर इ. स. १५९५ मधे वसले. इ. स. १६७७ मधे शिवाजीमहाराजांचे पाय हैदराबादेस लागले. इ. स. १७६३ मधे थोरले माधवराव पेशवे हे हैरदाबादेवर हल्ला करून गेले. इ. स. १९४८ मधे सतरा सप्टेंबरच्या दुपारपासून आम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून वावरू लागलो. दुरितांचें तिमिर दूर झाले. भीतीचे आवरण नाहीसे झाले. मुक्तीकरणाचा निर्भेळ आनंद आम्ही अनुभवीत होतो. सतरा तारखेस काळ आला होता. पण आमच्या नशिबात स्वतंत्र भारतात नांदायचे लिहिले होते म्हणून आम्ही सुरक्षितपणे बचावलो. पण विपरीत घडले असते तर ? या कल्पनेनें आज इतक्या वर्षांनंतरही अंगावर काटा आल्याशिवाय राहात नाही.

सतरा सप्टेंबर १९४८ रोजी निजामाच्या सैन्याने युनियनच्या फौजांसमोर शरणागती पत्करली. निजामाच्या लायकअली मंत्रिमंडळाने राजीनामा दिला होता. तो

शुक्रवारचा दिवस होता. हैदराबाद राज्यात शुक्रवार हा आठवड्याचा सुट्टीचा दिवस असे. सोळा सप्टेंबर रोजी माझी नेमणूक शेतकी खात्याच्या मंत्र्याचा पर्सनल असिस्टंट म्हणून झाली होती. पण त्या दिवशी म्हणजे गुरुवारी मला मंत्र्यांच्याकडे जाणे झाले नाही. शनिवारी जाऊन त्यांच्यापाशी रुजू व्हावे असा मी बेत केला होता. पण शुक्रवारीच लायकअली मंत्रिमंडळ बरखास्त झाले. माझी काळजी ही की, मी आता पर्सनल असिस्टंट कुणाचा? शेवटी काही झाले तरी आपण शनिवारी मंत्र्यांच्याकडे जायचेच असे मी ठरविले. त्याप्रमाणे शनिवारी सकाळी रिक्षा करून मी आपल्या घराबाहेर पडलो. मंत्र्यांचा बंगला बेगमपेठ उपनगरात म्हणजे माझ्या घरापासून सहा मैलांवर होता.

त्या सुप्रभाती आमच्या हैदराबाद शहराने काही औरच वेष धारण केला होता. सारे वातावरण कसे प्रसन्न होते. आमचा रिक्शा नामपल्ली स्टेशनाजवळून गेला. स्टेशनच्या भिंतीवर 'आजाद हैदराबाद, पायिंदा बाद', 'स्वतंत्र हैदराबाद कायम राहो' अशी वाक्ये अद्याप जशीच्या तशीच होती.

मी सकाळी आठच्या सुमारास मंत्र्यांच्या बंगल्यावर पोहोचलो. त्यांची आणि माझी पूर्वीपासून थोडीशी ओळख होती. मीच पर्सनल असिस्टंट म्हणून पाहिजे असे त्यांनी मंत्रिमंडळात ठासून सांगितले होते. मला पाहताच ते प्रसन्नपणे हसले आणि म्हणाले, "या माधवराव, पण काल संध्याकाळपासून आमचे मंत्रिमंडळ बरखास्त झाले आहे. आता मी मंत्री राहिलो नाही."

मलाही तो प्रश्न पडला होता. पण आमच्या हैदराबादी पद्धतीप्रमाणे मी नम्रपणे त्यांना म्हटले, "आपण हे काय म्हणता? मंत्रिमंडळ बरखास्त झाले असले तरी आपण मंत्री ते मंत्रीच आणि मी आपला पर्सनल असिस्टंट. कोणीतरी येऊन आपल्या खात्याचा चार्ज घेईपर्यंत तरी आपल्याला लोकहिताची कामे करीत राहणे प्राप्तच आहे ना."

'बरे बरे' असे म्हणून मंत्र्यांनी कलमदान (ऑफिसच्या फायली ठेवण्याची पेटी) मागविले आणि मला ते देत म्हटले, 'हे तुमचे कलमदान आणि ही त्याची किल्ली.'

इतक्यात आमच्या खात्याच्या सचिवांचा फोन आला. मी तो घेतला. सचीव म्हणत होते–'माधवराव, तुम्ही आता चार्ज घेतला ना. साहेबांच्याकडून काही प्रकरणांचा निकाल करवून घ्या ना.'

मी म्हटले, 'साहेब, मंत्री हे मंत्री राहिले नाहीत. ते प्रकरणे निकालात कशी काढू शकतील?'

सचीव म्हणाले, 'ते मला माहीत आहे. पण अमक्या अमक्याची नेमणूक

व्हावयाची आहे. अमक्या अमक्या प्रकरणात असे निकाल द्यावेत असे सुचविले आहे. ते सगळे साहेबांच्याकडून करवून घ्या पाहू. तुम्हांला तशीच जरुरी वाटल्यास प्रकरणावर कालच्या तारखा नोंदवून घ्या. साहेबांनी दिलेले निकाल, येणारे मंत्री थोडेच बदलणार आहेत."

मी म्हटले "मी प्रयत्न करतो. पण मला हे सगळे कसेसेच वाटते." सचीव म्हणाले–"अहो, असे वाटण्याचे कारण नाही. मी सांगितल्याप्रमाणे करा पाहू. मंत्री काय आज आहेत उद्या नाहीत. तुम्ही आणि आम्ही सनदी नोकर आहोत. आपले संबंध पुढेही राहणार आहेत हे विसरू नका."

'काय करता येईल ते मी पाहतो अं' असे म्हणून मी टेलिफोन खाली ठेवला.

माझे अंतःकरण जड झाले होते. मी मंत्र्यांकडे गेलो. ते विचारमग्न होते. मला पाहून ते म्हणाले–"माधवराव, आता आपण काय करावे? माझी परिस्थिती फार विचित्र झाली आहे."

मी म्हटले, 'साहेब, आपण का काळजी करता? आपल्याला काय त्रास होणार आहे? यूनियनच्या फौजा म्हणजे आपलीच माणसे आहेत ना?'

मंत्री म्हणाले, 'ते सगळे खरे, पण मी लायकअली मंत्रिमंडळातील ना? आमच्यावर यूनियनची वक्रदृष्टी फिरली तर? मी खरे सांगतो माधवराव, मला मंत्री होण्याची मुळीच इच्छा नव्हती. लायकअलींनी मला अतिशयच गळ घातली. ते मला म्हणाले, "तुमचा आम्हांला फार आधार राहील. बाहेर आमच्या विरुद्ध गैरसमज पसरविण्यात आले आहेत. रामाचारीसारखे मंत्री आमच्याशी भांडून निघून गेले. तुम्ही तसे काही करणार नाही याची मला खात्री आहे." लायकअलींच्या विनंतीवरून मी मंत्रीपद स्वीकारले. पोलीस कारवाई होणार हे मला माहीत असते तर मी कशाला मंत्री बनलो असतो. आता मी राष्ट्रीय वृत्तीचा आहे असे म्हटले तरी कोणी माझ्यावर विश्वास ठेवणार नाही."

मी म्हटले, "साहेब, धीर धरा, आपण आता काय करायचे हे लायकअली साहेबांनाच विचारू."

मंत्री हो म्हणाले. मी लायकअलींना फोन केला. फोनवर शब्द आले, "मैं लायकअली बात कर रहा हूं." मी म्हटले, "मैं आदाब अर्ज करता हूं. सदरुल्महाम बहादूर (मंत्री) विचारतात की आता आही काय करावे?"

यावर लायकअली म्हणाले, "मैं कुछ नहीं जानता. उनसे कहिये वो जो मुतासिब समझें वो करें." (त्यांना योग्य वाटेल ते त्यांनी करावे.) मैं आला-

हजरत बंदगाने आली (निजाम) से मिलनेके लिये किंग कोठी (राजवाडा) जा रहा हूं. ” असे म्हणून लायकअलींनी टेलिफोन खाली ठेवला.

मी झालेले संभाषण मंत्र्यांना सांगितले. ते अतिशय निराश झाले. थोड्या वेळाने मी हळूच म्हटले, ‘ साहेब, मी जेवायला घरी जाऊ का ? बायका–मुले वाट पाहात असतील. ’

मंत्री म्हणाले, “ नको नको, मी येथे एकटाच आहे. माझी बायकामुले गावी आहेत. तुम्ही येथेच जेवून घ्या. ”

आमची जेवणे झाली. नंतर मंत्री मला म्हणाले, ‘ युनियनचे अधिकारी आले तर काय करावे ? ’

मला एक कल्पना सुचली. मी म्हटले–“ साहेब, आपल्यापाशी काही शस्त्र-बिस्त्र आहे काय ? असल्यास जवळच्या पोलीस ठाण्यावरील इन्स्पेक्टरला बोलावून ते त्याच्या हवाली करू या. ”

“ हो बरी आठवण केलीत, ” मंत्री म्हणाले, “ आमच्यापाशी एक स्टेनगन आहे. प्रत्येक मंत्र्याला ती पुरविण्यात आली होती, ती मी वर माझ्या खोलीत ठेवली आहे. ती पोलिसांच्या हवाली केलेली बरी. नाही तर उद्या काहीतरी भानगड व्हावयाची ! ”

मी पंजागुट्टा पोलीस नाक्यावर फोन केला आणि इन्स्पेक्टरला बोलावून घेतले. मंत्र्यांनी तिजोरीतून स्टेनगन काढली. ती पाहून मी अस्वस्थ झालो.

मंत्री म्हणाले–“ माधवराव, असे भिता काय ? ही भरलेली नाही. ” असे म्हणून त्यांनी ती गन मला दिली. मी भीतभीतच ती हाती घेतली.

मंत्री हसून म्हणाले, “ माधवराव, ती गन तुम्ही उलटी धरली आहे. ”

इतक्यात पोलीस अधिकारी आला. त्याने पोच देऊन गन आपल्या ताब्यात घेतली आणि तो निघून गेला.

यानंतर मी आणि मंत्री बराच वेळ हैदराबादच्या राज्यक्रांतीविषयी बोलत बसलो होतो. वर आकाश निरभ्र होते. सारे काही इतके शांत होते की, बाहेर एक युग नष्ट झाले असून नवीन युगाला सुरुवात झाली याची कल्पनाही कुणाला आली नसती.

दुपारी तीनच्या सुमारास मंत्री म्हणाले, “ आपण उपपंतप्रधान पिंगल वेंकट रामा रेड्डी यांच्याकडे जाऊ या. ते काय सल्ला देतात पाहू. ”

आम्ही रेड्डींच्या घरी गेलो. रेड्डी हा धिप्पाड माणूस. हैदराबादेतील सधन जमीनदारांपैकी तो एक होता. आम्ही त्यांच्याकडे गेलो तेव्हा ते सोफ्यावर पसरले असून गुडघ्याला तेलाने मालीश करवून घेत होते. मी त्यांना म्हटले–

" राजेसाहेब, आमचे मंत्री आपला सल्ला घेण्यास आले आहेत."

पिंगल वेंकटरामा रेड्डी म्हणाले, " अरे आमचा सल्ला काय, आम्ही तर गतवर्षीच्या कॅलेंडरप्रमाणे दप्तरी दाखल झालो आहोत."

आमच्या मंत्र्यांनी गावी जाण्याबद्दल त्यांचा सल्ला विचारला. तेव्हा ते म्हणाले, " आपण काही झाले तरी हैदराबाद सोडून आपल्या गावी जाऊ नका."

यानंतर आम्ही मंत्र्यांच्या बंगल्यावर परत आलो. मला आपल्या घरी परत जायचे होते. त्याच दिवशी हैदराबादचे मिलिटरी गव्हर्नर जनरल चौधरी यांनी हैदराबाद राज्याचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी एक सल्लागार मंडळ नेमले होते. त्यात कॅांग्रेस पुढारी आणि माजी मंत्री रामाचार्य, पन्नालाल पित्ति इत्यादि होते. मी मंत्र्यांना सुचविले—" आपण रामाचार्यांच्याकडे जाऊन त्यांचे अभिनंदन करू या." त्यांना माझी सूचना पटली. आम्ही मोटारीतून रामाचार्यांच्या घरी गेलो. तेव्हा ते उर्दू वक्त या वर्तमानपत्राचे संपादक अब्दु रहमान रईस यांच्याकडे गेले होते असे कळले. ते येण्याची वाट पाहात मंत्री रामाचार्यांच्या वाड्यात बसून राहिले. मी त्यांचा निरोप घेऊन घरी आलो. त्याच दिवशी रात्री रेडिओवर जाहीर करण्यात आले की, लायकअली मंत्रिमंडळातील सगळ्या मंत्र्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले असून कुणी त्यांना भेटता कामा नये.

माझ्यापाशी पर्सनल असिस्टंटच्या ऑफिस पेटीची किल्ली होती. तिचा आता मला काही उपयोग नव्हता. ती किल्ली पाहून उषाने मला विचारले, " तिचे काय करणार आहात ?" मी तिला म्हटले, " हा हैदराबादचा भूतकाळ आहे. ती अडगळीत फेकून देतो." असे म्हणून मी ती किल्ली अडगळीच्या खोलीत फेकून दिली.

दुसऱ्या दिवशी मी आमच्या खात्याच्या सचिवांकडे गेलो. ते म्हणाले, " हे वादळ शांत होऊन सगळे स्थिरस्थावर होईपर्यंत तुम्ही माझ्या ऑफिसमधे येऊन बसत चला.

पुढील दोन तीन आठवडे मला काम असे काहीच नव्हते. मी आमच्या खात्याच्या सचिवाकडे जाऊन बसत असे. हैदराबादचे जीवन झपाट्याने बदलू लागले होते. अनेक मुसलमान अधिकारी पाकिस्तानला पळून गेले. आदिलाबादचा कलेक्टर नज्मुद्दीन अन्सारी, आसिफाबादचा डेप्युटी कलेक्टर अब्बास, निजामाबादचा कलेक्टर फारुक बेग, फॉरेस्ट खात्याचा संचालक अब्दुल्वाहिद, पोलीस सुपरिटेंडेंट जैदी, नभोवाणीचा संचालक हबीबुद्दीन, तहसीलदार असगरअली, आदिलाबादचा सिव्हिल सर्जन, अशा माझ्या ओळखीच्या अनेक अधिकाऱ्यांनी पाकिस्तानची वाट धरली. कित्येक अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्यात

येऊन त्यांच्यावर खटले भरण्यात आले. त्यात वरंगळचे सुभेदार हबीब मुहंमद, मेदक प्रांताचे सुभेदार जमील हुसेन, माझ्यापूर्वी आदिवासींचा स्पेशल अधिकारी म्हणून काम करणारा मुअज्जम हुसेन, बेदरचा कलेक्टर ताहिर सिद्दीकी इत्यादि अधिकारी होते. हबीब मुहंमदला सेवानिवृत्त करण्यात आले. जमील हुसेन आणि ताहिरसिद्दीकी हे पाकिस्तानला पळून गेले. मुअज्जम हुसेन हा जहागिरदार घराण्याचा. तो पुढे यूनेस्कोत कामाला लागला. सर्वांच्यावर आरोप होते ते जुलूमजबरदस्ती, बेकायदेशीर वागणूक, रजाकारी मनोवृत्ती याबद्दल. काही मंडळी खटल्यातून निर्दोष ठरून सुटली. त्यांपैकी काहीजण पुढे आय. ए. एस. (इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस) मधे निवडले गेले आणि मोठ्या अधिकारावर चढले. जहीर अहंमद हे पोलीस कारवाईच्या वेळीं लंडनला होते. कारवाई संपताच ते लंडनचे भारतीय हायकमिशनर कृष्ण मेनन यांच्याकडे गेले. हैदराबाद प्रकरणात त्यांनी मेननशी पूर्ण सहकार्य केले. ते आय. ए. एस. मधे आले. गुलाम हैदर हा अतिशय सज्जन माणूस. रजाकारांच्या वेडाचाराशी त्याचा काही संबंध नव्हता. तोही आय. ए. एस. मधे आला. त्याच्याबद्दल सर्वांना आदर वाटे. तो रेव्हेन्यू बोर्डचा मेंबर होऊन रिटायर झाला. माझा मित्र अब्दुल्ला याच्यावर रजाकारांची वक्रदृष्टी होती. अतिशय धर्मनिष्ठ, सरळ आणि न्यायी मनुष्य. तोही आय. ए. एस. मधे आला. पोलीस ॲक्शनमुळे सज्जन मुसलमान अधिकाऱ्यांना काही उपसर्ग झाला नाही, इतरांची मात्र कसून चौकशी झाली.

पोलिस ॲक्शनच्या वेळीं हैदराबाद राज्याचे आदिवासी कल्याणखात्याचे प्रमुख हायमंडार्फ हे रजेवर विलायतेला गेले होते. तेथे त्यांची आदिवासींच्या प्रश्नांवर व्याख्याने झाली. कदाचित काही व्याख्यानांतून त्यांनी निजामी राजवटीची बाजू मांडली असावी. पोलीस कारवाई झाल्याबरोबर त्यांना आपल्या भवितव्याची चिंता वाटू लागली. ते मुकाट्याने रजा संपवून हैदराबादेस परत आले आणि आपल्या जागेवर रुजू झाले. पोलीस ॲक्शनपूर्वी मी त्यांची विनवणी केली होती की, मला आदिलाबादमधे आदिवासींचा स्पेशल अधिकारी (तो दर्जा डेप्युटी कलेक्टरचा होता) म्हणून राहू द्या. मला आदिवासींच्या संशोधनाचे काम करू द्या. पण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भीतीने ते मला जवळ करण्यास तयार होईनात. मला माझे संशोधन काम आटोपून सर्व्हे सेटलमेंट खात्यात रुजू व्हावे लागले.

पोलीस ॲक्शननंतर वरिष्ठ जागा अडवून बसलेली मुसलमान अधिकारी मंडळी गडगडत खाली आली. जनरल चौधरी हे मिलिटरी गव्हर्नर होते. बखले हे मुख्य मुलकी प्रशासक, चीफ सिव्हिल ॲडमिनिस्ट्रेटर झाले. डी. आर. प्रधान

(आता महाराष्ट्र राज्याचे सेवानिवृत्त मुख्य सचिव) हे महसूल मंत्री झाले. अर्थखाते आणि सिव्हिल सप्लाय खाते यांच्यावर म्हैसूरचे अधिकारी आले. निवडणुकीची व्यवस्था करण्यासाठी म्हैसूरचे शेषाद्रि या अनुभवी अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले. एकदोन खात्यांवर हैदराबादचे प्रतिष्ठित अधिकारी नेमण्यात आले. राजे राय रायान या महाराष्ट्रीय घराण्यातील धुंडिराजबहादुर या सुविद्य आणि सुसंस्कृत गृहस्थांना शिक्षण आणि पुनर्वसन ही खाती देण्यात आली. नवाब जैन "यार" जंग हे राष्ट्रीय वृत्तीचे. त्यांना बांधकाम खाते देण्यात आले. सचिवांच्या जागांवर अनेक हिंदू अधिकाऱ्यांना बढत्या मिळाल्या. प्रत्येक जिल्ह्यावर मद्रास, मुंबई, मध्यप्रदेश इकडून आलेले अधिकारी प्रशासक म्हणून काम करू लागले. या निमित्ताने ल. ग. राजवाडे, घाटगे, ईश्वरन्, पिंपुटकर, शिवेश्वरकर, ही आय. सी. एस. मंडळी आणि माधव राजवाडे आय. ए. एस. इत्यादींची नावे आमच्या परिचयाची झाली. मद्रास आणि मध्यप्रदेश येथूनही अशी बरीच मंडळी आली. हां हां म्हणता राज्यकारभाराचे सगळे रूपच पालटून गेले.

मलाही कलेक्टरच्या जागेवर बढती मिळणार, अशी कुणकुण मला लागली होती. एक दिवस मी सहज हायमंडार्फकडे गेलो. मला पाहाताच त्यांनी माझे मोठ्या अगत्याने स्वागत केले. अवघ्या दोन चार महिन्यांपूर्वीची त्यांची तुटक वागणूक आणि आताची वागणूक यात जमीन-अस्मानाचा फरक पडला होता. मला ते म्हणाले, "माधवराव, तुम्ही आलात ते बरे झाले. तुम्हांला परत आसिफाबादेला आदिवासींचा स्पेशल अधिकारी म्हणून पाठवावे असे मी लिहिणार आहे. आता तरी तुमच्या मनासारखे झाले ना."

मी आश्चर्याने विचारले, "अहो तो दर्जा डेप्युटी कलेक्टरचा, मी त्या जागेवर कसा जाईन ?"

"का, त्यात काय झाले ?" हायमंडार्फ म्हणाले, "मध्ये काही दिवस तुम्हांला दुसऱ्या खात्यात काम करावे लागले. पण आता काळ पालटला आहे. तुम्ही निश्चिंतपणे काम करू शकता."

मी शांतपणे म्हटले, "डॉक्टर हायमंडार्फ, हा काळ पालटण्याचीच आम्ही गेली सहाशे वर्षे वाट पाहात होतो. या सहाशे वर्षांत खिल्जी, तुघलक, बहामनी पातशाह्या, मोगल आणि निजाम या राजवटी होऊन गेल्या. निजामी राजवटही संपली. या राज्यातील शेकडा नव्वद जागांवर मुसलमान अधिकारी होते. मुसलमानांची लोकसंख्या फक्त शेकडा दहा होती. आमची कुचंबणूक आपल्याला दिसली नसेल असे नाही. आता मी आदिलाबादेस जाईन तर कलेक्टर

म्हणूनच जाईन."

माझे बोलणे ऐकून हायमंडार्फ एकदम गप्प झाले. पुन्हा त्यांनी तो विषय काढला नाही.

नवीन राजवटीने हायमंडार्फची जवळ जवळ उचलबांगडीच केली. जुन्या राजवटीत त्यांना आदिवासी कल्याणखात्याचे सल्लागार, हैदराबाद सिव्हिल सर्व्हिस हॉस्टेलचे सुपरिटेंडेंट आणि उस्मानिया विद्यापीठातील मानवशास्त्राचे अध्यापक या तीन जागांचे मिळून महिना दोन अडीच हजार रुपये मिळत. सरकारने एकेका जागेवरून त्यांना काढून टाकण्यास सुरुवात केली. हायमंडार्फ हे वाजवीपेक्षा अधिक प्रमाणात जुन्या राजवटीशी समरस झाले असावेत, असा नवीन सरकारला संशय आला असावा.

हायमंडार्फना कळून चुकले की, आपण सरकारला नकोसे झालो आहोत. त्यांनी मुख्य सचिवाकडे तक्रार केली आणि त्यांना म्हटले, मला लाथ मारून या राज्यातून काढून टाकण्यासारखे आहे. मुख्य सचिव शांतपणे म्हणाले, "आपण काहीही समजू शकता, पण हे शब्द मी उच्चारले नाहीत हे विसरू नका."

हायमंडार्फ पुढे लवकरच राजीनामा देऊन विलायतेला निघून गेले. सध्या ते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधे मानवशास्त्राचे प्राध्यापक आहेत. खरा विद्वान संशोधक. रजाकारी राजवटीची फळे त्याला भोगावी लागली. हायमंडार्फचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे. त्यांच्यामुळे मला आदिवासींची सेवा करण्याचे भाग्य लाभले. त्यांच्या भाषा, समाज, दंतकथा, पुराणे इत्यादींच्या संशोधनाकडे मी वळलो आणि माझी त्या विषयावर चार पुस्तके प्रसिद्ध झाली. हायमंडार्फ म्हणजे माझ्या आयुष्यात मला भेटलेला देवदूतच म्हणावा लागेल.

लायकअली मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. त्यात मी ज्यांचा पर्सनल असिस्टंट होतो, ते मंत्रीही होते. मनुष्य अतिशय सज्जन आणि शांत स्वभावाचा. पण म्हणतात ना सुक्याबरोबर ओलेही जळते. तसाच प्रकार झाला. मला त्यांच्याबद्दल हळहळ वाटे. पण मला काही करता येणे शक्य नव्हते. आक्टोबर महिन्यात त्यांनी माझ्याकडे एक पत्र पाठविले. अर्थातच ते स्थानबद्ध असल्यामुळे पत्र गुप्तपणे एका विश्वासू माणसाच्या हस्ते पाठविण्यात आले. ते पत्र मोठे उद्बोधक आहे. मजकूर पुढीलप्रमाणे आहे :

जयहिंद

रविवार

श्री. रा. रा. पगडी सेतुमाधवराव यांसी,

सप्रेम नमस्कार. वि. वि. आमची सदरुल्महामी (मंत्रीपद) किती थाटाची झाली हे मी आपल्यास कळवावे असे मुळींच राहिले नाही. मला त्रास असा काहीच नाही. तथापि आपणां सर्वांबरोबर बरेच दिवसांपासून सतत वाट पाहात असलेल्या आनंदमहोत्सवाचा आपल्या देशाला लाभ झाला असूनही मला त्यात भाग घेता आला नाही ही काही कमी खेदाची गोष्ट नव्हे. याला म्हणतात दुर्दैव. सगळे देशबांधव आज आनंदसागरात बाहेर आनंदाने उड्या मारीत आहेत व मी मात्र नुसता दुरूनच त्या आनंदाचा स्वाद घेत आहे झाले. असो.

माझ्या पावलाने मी इकडे आलो म्हणण्यापेक्षा दैवानेंच मला इकडे ओढून आणले असे म्हटले तर वावगे होणार नाही. ही जागा कबूल केली नसती तरी त्रासाची भीती होतीच व त्रास झाला असताच. परिस्थिती तेव्हा तशीच होती. असेंब्लीतून नाव काढून घ्यावे किंवा राजीनामा द्यावा असे बरेच वेळा मनात आले, परंतु मिनिस्टरी ही जबरदस्तीने कबूल करावी लागली. माझा लायक-अलीच्या मिनिस्टरीशी तिळमात्र संबंध आला नाही. हे सर्व आपण पूर्ण जाणून आहा. असो.

आपलाच

नोट—पत्र जपून वाचणे व जपून ठेवणे.

* * *

वरील पत्रावरून मंत्र्यांच्या मनस्थितीची कल्पना येईल. त्यांच्या पत्रासंबंधी मी आमच्या खात्याच्या सचिवांचा सल्ला घेतला. ते मला म्हणाले, “ माधवराव, गप्प बसा. भलत्यासलत्या भानगडीत पडू नका. ” अर्थात मंत्र्यांनी मला त्यांची खरी हकीकत इतर मंडळींना कळवावी इतकेच लिहिले होते. मी रामाचार्य या कॉंग्रेस पुढाऱ्यांना मंत्र्यांबद्दल सांगितले. यापलीकडे मी काही करू शकलो नाही.

सुदैवाने दोन तीन महिन्यांतच त्यांची सुटका झाली. एक दोन वर्षांनी मी हैदराबाद शहरात मोटारीतून हिंडत असता मला हाक ऐकू आली, ‘ माधवराव ’ मी वळून पाहिले. तो आमचे मंत्री फूटपाथवर उभे होते. मी चटकन खाली उतरलो आणि त्यांना नम्रपणे नमस्कार केला. ते आपल्या गावी वकिली करीत होते. त्यांनी मोठ्या आस्थेने माझी चौकशी केली. त्यानंतर माझी आणि त्यांची

गाठ पडली नाही. सज्जन माणूस.

आक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मला बढती मिळाली. मी डेप्युटी कलेक्टर होतो, तो आता कलेक्टरचा दर्जा मला मिळाला. सचिवालयात पुनर्वसनाचे खाते होते. (रिहॅबिलिटेशन डिपार्टमेंट). त्या खात्यात नायबसचिव म्हणून माझी नेमणूक झाली. मी नऊशे ते बाराशेच्या ग्रेडमधे आलो. दोन महिन्यांपूर्वी ही गोष्ट माझ्या स्वप्नातही आली नसती.

आमच्या खात्याचे मंत्री राजे धुंडिराजबहादुर हे होते. खात्याचा सचिव माझा जुना आणि तडफदार मित्र नगेंद्र बहादुर हा होता. तो उत्तर प्रदेशाचा राहणारा. पण त्याच्या आईचे वडील आणि चुलते हे हैदराबादेत प्रतिष्ठित अधिकारी होते, राजा मुरलीधर हे हैदराबादेत महसूल मंत्री, आणि निजामाचे खासगीकडील कारभारी होऊन गेले. त्यामुळे नगेंद्र बहादुर हा हैदराबाद सिविल सर्व्हिसमधे आला. नगेंद्रबहादुरची पत्नी आणि उषा या बनारसला थिऑसॉफिकल स्कूलमधे एका वर्गात होत्या. त्यामुळे आमचा आणि नगेंद्रबहादुरचा घरोबा होता. तो अत्यंत तडफदार आणि कुशाग्र बुद्धीचा. अवघ्या दोनतीन महिन्यांत त्याने पुनर्वसनखात्याचे स्वरूप पार पालटून टाकले.

निजामी राजवटीत पुनर्वसन खात्याचे काम म्हणजे निजाम राज्याच्या बाहेरून अधिकाधिक संख्येने मुसलमानांना आणून त्यांना हैदराबाद राज्यात वसविणे हे होते. भारतात अंदाधुंदी माजली आहे. तेथे मुसलमानांचे जीवन अस्थिर झाले आहे. हैदराबादेत सर्वांना आश्रय मिळू शकेल अशा रजाकार सरकारच्या सतत प्रचारामुळे हजारो मुसलमान बाहेरून हैदराबाद राज्यात आले. या निमित्ताने हैदराबाद राज्यात मुसलमानांच्या संख्येत भर पडत आहे याचे रजाकारांना मोठे समाधान वाटे. रजाकार सरकारने या तथाकथित मुसलमान निर्वासितांसाठी पाचपन्नास कँप उघडले. त्यांच्या खाण्यापिण्याची सोय केली. त्यांना जमिनी दिल्या आणि कित्येकांना नोकऱ्या लावून दिल्या. या कामावर निजाम सरकारने लाखो रुपये खर्च केले. बाहेरून आलेल्या मुसलमानांची संख्या कमीत कमी पाच लाख तरी असावी. पोलीस ॲक्शनपूर्वी हैदराबाद शहरात बाहेरचे मुसलमान हजारोंच्या संख्येने दिसत. रजाकार त्यांचे कोण अगत्य करीत. पण हिंदू जनतेत त्यामुळे अतिशय अस्वस्थता निर्माण झाली होती. हे तथाकथित निर्वासित रजाकारांच्या बरोबर मिळून दंगेधोपेही करू लागले होते. यज्रागड्डा येथील निर्वासितांच्या कँपमध्ये १९४८ च्या मे महिन्यात अठ्ठावन्न हजार मुसलमान होते. असे अनेक कँप अनेक जिल्ह्यांतून अस्तित्वात आले होते. प्रत्येक कँपसाठी सरकारने तीन लाख रुपये खर्चाची तजवीज केली होती. हैदराबादच्या प्रमुख

मुस्लिम हॉटेलांना कॅम्पमध्ये अन्न पुरविण्यासाठी लाखो रुपयांची कंत्राटे देण्यात आली होती. या अंदाधुंदीत कितीजणांचे तरी फावले. या वाहत्या गंगेत अनेकांनी हात धुऊन घेतले. लाखो रुपयांचा चुराडा उडाला. पोलीस ॲक्शनपूर्वी पुनर्वसन खात्यातील सरकारी नोकरांची संख्या चार हजार होती. त्यात तीन हजार नऊशे अठ्याण्णव मुसलमान नोकर होते एवढे सांगितले म्हणजे या खात्याची कल्पना यावी. उरलेले दोन हिंदू नोकर म्हणजे एक माळी आणि एक माळण.

बाहेरून पाच लाख मुसलमान हैदराबाद राज्यात आले आणि सात लाख हिंदू राज्य सोडून बाहेर निघून गेले. रजाकारांनी असंख्य घरांची जाळपोळ केली होती. कत्तली, खून, दरोडे इत्यादींना ऊत आला होता. त्यामुळे हजारो कुटुंबे देशोधडीला लागली होती. पोलीस ॲक्शननंतर मुसलमानांच्या विरुद्ध संतापाची लाट उसळली. यूनियन अधिकाऱ्यांच्या दक्षतेमुळे हैदराबाद शहर सुरक्षित राहिले. तेथे मुसलमानांच्या केसालाही धक्का लागला नाही. सप्टेंबर आणि त्यापुढील दोन तीन महिने हैदराबाद राज्याच्या मध्यवर्ती आणि पश्चिम भागातील जिल्ह्यांत अनेक मुसलमानांना प्रचंड जनक्षोभाची झळ लागली. पण नोव्हेंबरपर्यंत परिस्थिती पूर्ण आटोक्यात आली होती.

पुनर्वसन खात्यात मी डेप्युटी सेक्रेटरी म्हणून चार्ज घेतला. खात्यातील अनेक मुसलमान नोकरांना त्यांच्या मूळच्या खात्यात परत करण्यात आले. कँपांच्या व्यवस्थेसाठी अनेक मुसलमानांच्या नेमणुका झाल्या होत्या. त्या कायम स्वरूपाच्या नसल्यामुळे तो नोकरवर्ग कमी करण्यात आला. पोलीस ॲक्शननंतर तथाकथित मुसलमान निर्वासित घाबरून गेले. त्यांना पाठिंबा देणारे आणि त्यांचे लाड पुरविणारे सरकार नाहीसे झाले होते. त्यांतील बहुसंख्य लोक परप्रांतांतील अपापल्या गावी परत जाण्यास धडपडू लागले. सरकारने भराभर कँपा बरखास्त केल्या आणि हजारो मुसलमानांना आपापल्या प्रांतांत परत जाण्यास प्रवासखर्च, अलौन्स, स्पेशल गाड्या इत्यादींच्या सोयी करून दिल्या. अवघ्या दोनतीन महिन्यांत हैदराबादच्या बाहेरून आलेल्या मुसलमानांपैकी ऐंशी टक्के लोक परत गेले. याच मुसलमानांना हैदराबाद राज्याच्या सीमेच्या खेड्यांत वसवावे आणि राज्याभोवती एक संरक्षणाचे कडे उभे करावे, असा बेत रजाकार सरकारने केला होता. पण घटना इतक्या झपाट्याने घडत गेल्या की रजाकारांना ती योजना अंमलात आणणे जमले नाही.

पोलीस ॲक्शननंतर राज्याच्या बाहेर निघून गेलेले लाखो हिंदू आपापल्या घरांना परत येऊ लागले. त्यांपैकी कित्येकजणांची घरेदारे उद्ध्वस्त झाली होती.

त्यांच्या मदतीसाठी सरकारने लाखो रुपये खर्च केले. लोकांना घरे पुन्हा बांधण्यासाठी आर्थिक मदत सढळ हाताने देण्यात आली.

रजाकारांच्या अत्याचारांत जे प्राणाला मुकले होते त्यांच्या कुटुंबियांना पेन्शनी चालू करण्यात आल्या.

पोलीस ॲक्शननंतरच्या हिंदूंच्या प्रतिक्रियेची झळ बऱ्याच जिल्ह्यांतील मुसलमानांना लागली होती. त्यांना मदत करण्याचे काम सरकारने हाती घेतले. त्यात घरेदारे उभी करण्यास लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा, निराश्रित स्त्रियांसाठी लहानसहान धंदे, विधवांना पेन्शनी, मुलांना शिष्यवृत्त्या इत्यादींचा समावेश होता. सरकारने हिंदू–मुसलमान या दोन्ही जमातींतील पीडितांना मुक्त हस्ताने मदत केली.

पोलीस ॲक्शननंतर हैदराबाद राज्यातील मुसलमान अतिशय घाबरले होते. अनेक रजाकार तर दाढ्या काढून खादीची वस्त्रे घालून फिरू लागले. आम्ही रजाकारी वृत्तीचे कधीच नव्हतो, हे माझे ओळखीचे मुसलमान अधिकारी मित्र मला जेव्हा आवर्जून सांगत तेव्हा मला हसू येई. अशी किती तरी उदाहरणे मला अद्याप आठवतात. आमच्या सर्व्हे सेटलमेंट खात्यातील माझ्या हाताखालचा सुपरिंटेंडेंट हा कासिम रजवीच्या कार्यकारी मंडळात होता. आपल्या संघटनेच्या नियतकालिकात त्याने जिहादवर एक प्रक्षोभक लेख लिहिला होता. तो माझ्याकडे येऊन माझी नोकरी टिकेल असे करा असे मला विनवू लागला. मी म्हटले, ‘ काय हो मौलवीसाहेब, तुमच्या जिहादवरच्या लेखामुळे तुमच्यावर संकट ओढवलेले दिसते. ’ “ हो, साहेब, वरिष्ठांचा विनाकारण गैरसमज झाला आहे. जिहाद म्हणजे हिंदूंच्या विरुद्ध धर्मयुद्ध असे मी म्हटले नाही. माझ्या मते जिहाद म्हणजे आपल्यात वास करीत असलेले काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी षड्रिपूंच्याविरुद्ध करावा लागणारा संघर्ष होय. तो लेख आध्यात्मिक होता. माझा आणि कासिम रजवीचा संबंध काय ! ”

दुसरे एक अधिकारी अबकारी खात्यात होते. ते म्हणाले, “ माधवराव, मी वरंगळचे सुभेदार हबीब मुहंमद यांना म्हटले की, तुम्ही वरंगळ शहर ओपन सिटी म्हणून जाहीर करा. पण त्यांनी माझे ऐकले नाही. आडमुठे लोक. अहो, आपणा ब्राह्मणांचे थोडेतरी ऐकले असते तर ! ” मी आश्चर्याने म्हटले, “ सय्यद लियाकत हुसेन, आपण ब्राह्मण कसे ? ” यावर ते म्हणतात काय, “ अहो आम्ही सय्यद म्हणजे पैगंबरांच्या मुलीचे वंशज आहोत. आम्ही मुसलमानातील ब्राह्मणच ना ! ” यावर मी काय बोलणार! मी मनात म्हटले, हे द्विजोत्तमा, तुझी धन्य आहे !


एका खात्याचे संचालक (यांच्यावर पुढे खटला भरण्यात आला. मोठ्या मुष्किलीने त्यांची सुटका झाली.) मला म्हणू लागले–" अहो महात्मा गांधी वारले त्यावेळी लायक अलींना मी म्हटले, " शेजारील राष्ट्राचा एक मोठा मनुष्य गेला आहे. तुम्ही जाहीर सभा घेऊन दुःख व्यक्त करायला हवे. पण लायक अलींनी ऐकले नाही. "


माझा मित्र अब्दुस्सलाम मुन्सफ हा पोलीस ॲक्शनपूर्वी माझ्याशी बोलायलाही तयार नव्हता. नंतर भेटल्यावर तो मला म्हणतो काय–" अहो, मी कोडंगलला मुनसफ असताना माझे आणि कासिम रजवीचे सडकून भांडण झाले. तो म्हणाला, 'तुम्ही अमक्या अमक्या खटल्यात हिंदूंना शिक्षा का दिली नाही?' मी म्हटले, 'कायद्याप्रमाणे मला तसे करता येईना.' यावर तो रागावला. पहा माधवराव, रजाकारांनी आम्हांला कसे छळले ते!"

पोलिस ॲक्शनपूर्वी एक शियापंथी (मुसलमानांतील शिया पंथी हे पैगंबराचे जावई अली, पैगंबराची मुलगी फातिमा आणि नातू यांचे अनन्यभक्त) सांगत फिरत होते की, हजरतअली हे स्वतः हैदराबाद शहराच्या रक्षणासाठी (हैदर हे अलीचे एक नाव) आकाशातून खाली उतरले असून, अमक्या अमक्या मंदिरालयाजवळ त्यांचा मुक्काम आहे. हैदराबादच्या रक्षणाचे काम प्रत्यक्ष परमेश्वरानेच हाती घेतले आहे. पोलीस ॲक्शननंतर हेच गृहस्थ तोंड चुकवीत फिरत होते. माझे शियापंथी अधिकारी मित्र मला सांगत, अहो, हा कासिम रजवी कट्टर सुन्नी, आम्हां शियांचा द्वेष करीत होता. तुमच्याप्रमाणे आम्हीही जखमखुर्दा (जखमी, व्यथित) आहोत.


उर्दूच्या पायी स्थानिक भाषांची (तेलगू, मराठी, कानडी) विलक्षण गळचेपी झालेल्या या राज्यातील एक अधिकारी पोलीस ॲक्शननंतर मला म्हणाले–" अहो, उर्दू ही आमची धार्मिक भाषाच नाही. अरबी ही आमची धर्माची भाषा. आमचा उर्दूचा अट्टाहास अनाठायी आहे. " अब्दुस्सलाम मुन्सफ सूचना करू लागले–" उर्दू ही देवनागरीत लिहून चालू करावी. " आसफाबादचे डिस्ट्रिक्ट जज्ज यांनी रजाकार शब्दाची नवीनच व्याख्या सांगितली. ते म्हणाले–रजाकार (खरा अर्थ स्वयंसेवक) म्हणजे जो दुसऱ्यावर जबरदस्ती करीत नाही; राजीखुषीने जो काम करवून घेतो तो रजाकार. स्वतःची कातडी बचावण्यासाठी अनेक अधिकारी एकमेकांवर रजाकारी मनोवृत्तीचे आरोप करू लागले. जमील हुसेन आणि मुअज्जम हुसेन हे एकमेकाचे घनिष्ठ मित्र; पण, जमीन हुसेननी खटल्याचे वेळी मुअज्जम हुसेनवर 'ही रेन्ड बुलेट्स' (त्यांनी गोळ्यांचा वर्षाव केला,) असा आरोप केला. पळून गेलेल्या रजाकारी मंत्र्यांचे

मिसेस रुझ्वेल्ट यांचे स्वागत करतांना, औरंगाबाद १९५१.





पंडित नेहरू आणि श्रीमती विजयालक्ष्मी यांचे बरोबर, औरंगाबाद १९५१.



आमचे कुटुंब १९६३

खुर्चीवर डावीकडून : व्याही अण्णासाहेब, मी, उषा, वहिनी, सून वासंती नातू प्रियदर्शनला घेऊन, सून कल्याणी.
उभे : जांवई दिवाकरराव, मुली अलकनंदा, अंजली, अनुराधा, मुले अरुण, अशोक.
जमिनीवर : मुलगा अनिल, अलकनंदाची मुले नितीन, नवीन, नीरज.

नातेवाईक अधिकारी आपली नाती लपवू लागले. काही अधिकारी राज्याबाहेरील राष्ट्रीय मुसलमानांची नाती दाखवू लागले. कुणाला आपली घरेदारे मद्रास, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश इत्यादी ठिकाणी असल्याचा साक्षात्कार झाला. कोणी म्हणू लागले, "या सगळ्या अनर्थाचे मूळ हैदराबादबाहेरून आलेले मुसलमान होत. आम्हा मुल्की म्हणजे दक्षिणी मुसलमानांचा रजाकारांशी काय संबंध ?"

कोणी म्हणाले, "आम्ही बाहेरच्या मुसलमानांनीच हे राज्य इतके दिवस वाचविले. पण लायकअलीसारख्या दक्षिणी मुसलमानाच्या हाती सूत्रे जाताच राज्याचा सर्वनाश झाला." बहुसंख्य मुसलमान आतून निजामाला शिव्या देत. "याने स्वतःची संपत्ती वाचविली पण आमचा नाश घडवून आणला. याने मनात आणले असते तर रजाकारांची चळवळ आवरणे याला अशक्य होते काय ?" असे हे लोक म्हणू लागले. आमचे सुभेदार हबीब महंमद एक ग्राम्य शब्द वापरून म्हणाले, "अपने ××× में दम नहीं था तो लढे कायकू." माझे उस्मानाबाद वेळचे कलेक्टर अमीरअलीखान मला म्हणू लागले, "माधव राव, उस्मानाबादचा पोलीस सुपरिंटेंडेंट मिर्जा मुहमद बेग तुमचा पक्का द्वेष्टा होता. त्यावेळी मी तुमचे शर्थीने रक्षण केले. आपले स्वातंत्र्ययुद्ध तेव्हापासून सुरू झाले नाही का !" मी सर्व्हे सेटलमेंट खात्यात असिस्टंट कमिशनर असताना मला उपदेश करणारा कारकून खानसाहेब हा मला पाहताच तोंड लपवून फिरू लागला. कित्येक हिंदू अधिकारी काळ्या गोंड्यांची लाल तुर्की टोपी (यालाच रूमी टोपी अगर फेजकॅप म्हणत) घालून फिरत. त्या त्यांनी टाकून दिल्या. कित्येक मुसलमानही गांधी टोप्या घालून फिरू लागले.

मानवी मन खरोखरीच अतर्क्य आहे. आपण रजाकारी मनोवृत्तीचे नव्हतो हे दाखविण्याची या लोकांची केविलवाणी धडपड मला मोठी उद्बोधक वाटे. पेशवाई गेली, मोगल साम्राज्य गेले, त्या वेळी एके काळचा समृद्ध आणि संपन्न समाज एकदम खालावला, मोठमोठी घराणी लयाला गेली, या गोष्टी मी इतिहासातून वाचल्या होत्या. पण निजामी राजवटीची उचलबांगडी मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली. कालचे अधिकारी आज पाकिस्तानला पळून गेलेले, बडतर्फ झालेले अगर सेवानिवृत्त झालेले पाहिले. मोठमोठ्या अधिकाऱ्यांची मुले कारकुनी मिळविण्यासाठी ऑफिसांचे उंबरठे झिजवताना पाहिले, जहागीरदार सरंजामदारांना घरच्या संगमरवरी फरशा विकून पोटे भरताना पाहिले, अधिकाऱ्यांना अंगावरचे कपडे विकताना, आणि रिक्शांतून हिंडताना पाहिले, पडदापद्धती मोडून त्यांच्या बायकामुलींना रस्त्यातून हिंडताना पाहिले. या सर्व गोष्टींचा माझ्या

मनावर फार परिणाम झाला. सगळे दिवस सारखे नसतात. अधिकार दोन दिवसांचा. त्याच्या जोरावर कुणी कुणाला तुच्छ लेखू नये हे मी या काळात शिकलो. खालावलेल्या परिस्थितीत माझे जुने अधिकारी मित्र दिसले की सौजन्य, शिष्टाचार, सहानुभूती ही मी कसोशीने दाखवीत असे. जगात कुणी कुणाला तुच्छ लेखू नये हेच खरे.

काही अधिकारी आपला ताठा बाळगण्याचे प्रयत्न करीत. एका अधिकाऱ्याशी मी घडलेल्या राज्यक्रांतीबद्दल बोलत होतो तेव्हा ते म्हणाले, "जास्त काय बोलावे. आम्ही पराजित झालो हेच खरे, वी आर डिफीटेड."

पुनर्वसन खात्यात मी असतानाच १९४८ साल संपले. हे वर्ष मला विलक्षणच गेले. १९४८ च्या एप्रिलपर्यंत मी आसफाबादेस डेप्युटी कलेक्टर आणि आदिवासींचा अधिकारी होतो. सोळा सप्टेंबरपर्यंत सर्वे सेटलमेंट खात्यात असिस्टंट कमिशनर होतो. ऑक्टोबर अखेरपर्यंत मंत्र्यांचा आणि नंतर सचीवांचा पर्सनल असिस्टंट होतो. नंतर बढती मिळून डेप्युटी सेक्रेटरी झालो आणि पगार दरमहा नऊशे चालू झाला.

हे वर्ष माझ्या आदिवासींवरील चार पुस्तकांच्या लेखनात गेले. मराठी लेखन पाच सहा वर्षे थांबले होते. वाचनात फक्त सहा इंग्रजी पुस्तके आली. थोडी मराठी पुस्तकेही वाचण्यात आली.

इ. स. १९४९ च्या एप्रिल महिन्यात माझी नेमणूक रेव्हेन्यू खात्यात डेप्युटी सेक्रेटरी म्हणून झाली.

आमचे रेव्हेन्यू मंत्री शेषाद्रि हे म्हैसूरचे होते. त्यांचे वय साठीच्या जवळपास होते. पण इतका तडफदार, अनुभवी आणि सतत काम करणारा मनुष्य मला क्वचितच भेटला असेल. मनुष्य रेव्हेन्यू खात्यात मुरलेला. पण त्याला उर्दू भाषेचा अजिबात गंध नव्हता. हैदराबादचा सर्व व्यवहार उर्दूतून चालत असे. त्याचे पदोपदी अड्ड लागले. त्यामुळे हैदराबादचा इतिहास, संस्कृती, प्रमुख सरदार घराण्यांची माहिती, हैदराबादच्या अधिकाऱ्यांची नातीगोती, हैदराबादचे कायदेकानून, हैदराबादेत प्रचलित असलेल्या सर्व भाषांचा परिचय असणारा माहितगार मनुष्य त्यांना हवा होता. हैदराबादच्या इतिहासाचा मी गेल्या वीस वर्षांपासून अभ्यासक होतो. अलाहाबादला रिसर्च स्कॉलर असताना डॉक्टरेटसाठी मी हैदराबाद राज्याचा घटनात्मक आणि राज्यकारभारविषयक इतिहास हाच विषय निवडला होता. हैदराबादच्या प्रमुख घराण्यांची मला खडान्खडा माहिती होती. हैदराबादच्या महसूल खात्यात माझी पंधरा वर्षे गेली होती. हैदराबाद राज्यात प्रचलित असलेल्या मराठी, तेलगू, कन्नड, उर्दू, हिंदी आणि इंग्रजी या भाषा मला

अवगत होत्या. याशिवाय फारसी आणि आदिवासींच्या दोन भाषा यांचा माझा अभ्यास होता. शेषाद्रींची भाषा कन्नड, ती तर जन्मापासून आम्ही बोलत आलो होतो. त्यामुळे शेषाद्रींचे आणि माझे हां हां म्हणता जमले. दोन दोन तास मी त्यांना हैदराबादचा इतिहास, आणि प्रमुख घराणी यांच्यावर माहिती देत जावी आणि त्यांनी तल्लीन होऊन ऐकावी असे अनेकदा घडले. महसूल (रेव्हेन्यू) खात्यातील कायदे, कानून, हुकूम, गश्त्या (सर्क्युलर) इत्यादींबद्दल शेषाद्रींना सारखी माहिती लागे. फाईलमधे एखादी सूचना मी केली आणि आतापर्यंत या प्रकरणासारख्या बाबतीत असे हुकूम होते असे मी लिहिले की, शेषाद्रि फोनवर मला विचारीत "क्वो वारंटो" म्हणजे याला आधार काय? मग त्या विषयावरचे सत्तर ऐंशी वर्षांपासून वेळोवेळी निघत आलेले हुकूम, सर्क्युलर, कायदे हे मी इंग्रजीत अनुवाद करून त्यांच्यासमोर ठेवी. अमकी गोष्ट मला माहीत नाही असे त्यांच्यासमोर म्हणण्याची सोयच नव्हती. मग ती महत्त्वाची असो अगर बिनमहत्त्वाची असो. जहागीर, सरंजाम, तनखा जहागीर, संस्थान, मक्ते, बिल्मक्ता, उमळी, जोडी इनाम, मन्सब, सालियाना (वर्षासन), गुजारा, पनमक्ता, मददमाश (उपजीविकेसाठी दिलेले इनाम), सुल्ससुल्सान (उत्पन्नाचा एक तृतीयांश उपजीविकेसाठी, एक तृतीयांश देवस्थानासाठी, एक तृतीयांश गंगाजळी), दस्तगर्दान (हंगामी जप्ती), हके मालकाना (सरकारचा मालकी हक्क), एकोनीम आना (सरकारने वसुली करून दिली तर जहागिरदाराकडून वसूल करण्यात येणारे रुपयाला दीड आण्याचे कमिशन), हिस्सेदाराने (जहागिरीचे भागीदार), रुसुम (देशमुख-देशपांड्यांना शेतसाऱ्याच्या वसुलीवर मिळणारे कमिशन), स्केल (पाटील कुलकर्ण्यांना मुशाहिरा), उमराए उझ्जाम (प्रमुख सरदार), सर्फेखास (निजामाच्या खाजगीचे जिल्हे), असे किती म्हणून प्रकार सांगावे. त्या दोन वर्षांत माझी पूर्वीच्या वीस वर्षांची ज्ञानोपासना मला अतिशय उपयोगी पडली. त्याबरोबरच माझ्यावर कामाचा विलक्षण ताण पडला. रात्री नऊ वाजेपर्यंत मी ऑफिसमध्ये बसून काम करीत असे. यापूर्वी मला सुपारीचेही व्यसन नव्हते, पण या दोन वर्षांत मला पान-तंबाखूचे व्यसन लागले ते आजपर्यंत सुटले नाही.

शेषाद्रींना उर्दूचे काहीच ज्ञान नसल्यामुळे त्यांच्याकडून कधी कधी हास्यास्पद चुका होत, हके मालकाना म्हणजे सरकारचा मालकी हक्क, याचा उच्चार ते हक्के मालकान असा करीत. त्यांचा समज असा की, हके मालखान नावाचा कोणी मनुष्य असावा. मला त्यांनी विचारले, "काय हो सेतु माधवराव, तुम्ही पुन्हा पुन्हा त्याचा उल्लेख करता. हा हकेमालखान कोण मनुष्य आहे." मला

हसू आवरेना. मी म्हटले, "स्वामी, (कानडीत साहेब या अर्थाने) तो मनुष्य नाही. एखाद्या वतनावर सरकारचा मालकी हक्क असला तर त्याला हके मालकाना म्हणतात."

म्हैसूरकडे लोक कानडी मृदू आणि हेल काढून बोलतात. आमच्या गुलबर्ग्याकडील कानडी काहीशी कडक आणि मराठी व उर्दूमिश्रित असते, पण मला अनुकरण करण्याची (आणि अभिनयाचीही) सवय असल्यामुळे मी आठपंधरा दिवसांतच शेषाद्रींच्यासारखे कानडी बोलू लागलो. आपण अरेरे, अरे देवा, हरे राम म्हणतो त्या अर्थानें शेषाद्रि अय्यो रामा, अय्यो वेंकटरमणा, अय्यो स्वामी असे उद्‌गार काढीत. मला त्याची मोठी गंमत वाटे. पण मीही त्यांच्याप्रमाणे असेच उद्‌गार काढू लागलो. शेषाद्रींना माझ्याबद्दल पुत्रवत् जिव्हाळा निर्माण झाला. शेषाद्रि कामाचा डोंगर पाडीत. त्यांची शिस्तही मोठी कडक असे. मी आणि भुजंगराव कुलकर्णी (पुणे महानगरपालिकेचे माजी प्रशासक) यांचे शेषाद्रींना मोठे कौतुक वाटे; मला भेटलेल्यांत ही दोनच माणसे होतकरू असे ते म्हणत. मला तर ते रेव्हेन्यू खात्याचा तज्ज्ञ, महापंडित ऑफ मालगुजारी असे म्हणत.

शेषाद्रींनी महसूलखात्याची आमूलाग्र सुधारणा घडवून आणली. रेव्हेन्यू कारभारात कोणकोणते दोष आहेत, आणि कोणत्या सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत, यासंबंधी मी एक पंचवीस पानांचा इंग्रजी अहवाल त्यांना तयार करून दिला. हैदराबाद राज्यात अठराशे जहागिरदार होते आणि त्यांना लावून दिलेल्या खेड्यांची संख्या सहा हजार होती. हैदराबादेत मोजणी [सर्व्हे सेटलमेंट] खाते सुरू होऊन ऐंशी वर्षे झाली होती. तरी सातशेच्यावर जहागीर खेड्यांची मोजणीही झाली नव्हती. या खेड्यांतून शेतसाऱ्याचे दर अव्वाच्यासव्वा आकारण्यात येत. शेषाद्रींनी एकदोन वर्षांत जहागिरी खेड्यांच्या मोजण्या पूर्ण करून टाकल्या. हैदराबाद राज्यात सतरा जिल्हे आणि चार प्रांत [हैदराबाद, वरंगल, गुलबर्गा, औरंगाबाद] होते. प्रत्येक प्रांतावर एक सुभेदार (कमिशनर) असे. शेषाद्रींनी सुभेदारांच्या जागा काढून टाकल्या आणि त्यांच्याऐवजी हैदराबादेत रेव्हेन्यू बोर्ड कायम केले. या प्रकरणात हैदराबाद राज्यातील सुभेदारांचा हुद्दा आणि त्यात गेल्या दोनशे वर्षांत झालेली स्थित्यंतरे या विषयावर मी मंत्रिमंडळाच्या माहितीसाठी एक विस्तृत निवेदन तयार करून दिले.

रेव्हेन्यू खात्याचा डेप्युटी सेक्रेटरी म्हणून मी काम करू लागल्यावर अनेक अधिकाऱ्यांशी माझा संबंध येऊ लागला. त्यात माझ्याशी पूर्वी ताठ्याने वागत

असलेले मुसलमान अधिकारीही होते. त्यांच्या वागणुकीतील आताची अजीजी पाहून मला आत कोठे तरी अस्वस्थ वाटे. पण काहींची वागणूक पाहून हसू येई. पोलीस ॲक्शनपूर्वी मुसलमान सरकारी नोकरांचे प्रमाण शेकडा नव्वद होते. ॲक्शनमुळे त्यांची संख्या कमी झाली तरी त्यांचे प्रमाण शेकडा पंचाहत्तर राहिले होते. १९४८ च्या सुरुवातीपर्यंत निजामी राजवटीने इतक्या मुसलमानांच्या नेमणुका केल्या होत्या की, सनदी नोकरांतील त्यांचे प्रमाण त्यांच्या लोकसंख्ये-प्रमाणे शेकडा दहापर्यंत येण्यास एकोणीसशे ऐंशी साल उजडावे लागले असते

माझा मित्र अन्वरुद्दीन हा करीमनगरला असताना लँडरेकॉर्ड खात्यात असिस्टंट डायरेक्टर (मामलेदारीच्या बरोबरीचा हुद्दा) होता. तो पुढे डेप्युटी कलेक्टर झाला आणि आपल्या पूर्वीच्या सर्व्हे सेटलमेंट खात्यात असिस्टंट कमिशनर म्हणून लागला. पोलीस ॲक्शननंतर तो सेटलमेंटचे नवीन कमिशनर बहरामजी चिनॉय यांना वाटेल तसे टाकून बोलला आणि नोकरी सोडून इतरांच्याप्रमाणे पाकिस्तानला निघून गेला. साधा पदवीधर तो. त्याला तेथे कोण विचारणार. पंधरा दिवसांत त्याचे डोळे पांढरे झाले आणि तो गुपचूपपणे हैदराबादेस परत आला. त्याला परत नोकरी हवी होती. तो माझ्याकडे आला. आपण पाकिस्तानात गेलो होतो ही गोष्ट त्याने माझ्यापासून लपवून ठेवली. तो मला म्हणाला, " मी मूर्खपणा करून नोकरी सोडून घरी बसलो. आता काही तरी करून मला नोकरीवर घ्या. " त्याची स्थिती पाहून मला वाईट वाटले. मी कमिशनर चिनॉय यांना फोन केला आणि त्यांना म्हटले, " त्याला परत नोकरीवर घ्या. " ते म्हणाले, " त्याने मला वाटेल तशा शिव्या हासडल्या. मी त्याला परत कसा घेऊ ? " मी म्हटले, " त्याने जुन्या राजवटीची पोटातली मळमळ काढून टाकली. आता तो अगदी शरसिंधा झाला आहे. " अन्वरुद्दीनने अर्ज केला की, मी आपल्याला भेटलो त्यावेळी मला अंगात फार ताप होता. मी काय बोलून गेलो याची मला कल्पना नाही. मला क्षमा करावी. त्याला परत कामावर घेण्यात आले. मात्र तो हंगामी डेप्युटी कलेक्टरच्या हुद्द्यावर होता त्याऐवजी त्याला मामलेदारीच्या बरोबरीची असिस्टंट लँडरेकार्ड आफिसरची जागा देण्यात आली.

आपल्या जागेवर रुजू झाल्यावर अन्वरुद्दीन माझ्याकडे आला. माझे आभार मानून तो म्हणाला—" आपने दोस्ती का हक अदा कर दिया. " (तुम्ही आपले मित्रकर्तव्य पार पाडले.)

मी त्याला म्हटले—" आपल्या डोळ्यादेखत हा केवढा बदल घडून येत आहे नाही. " यावर तो म्हणाला—" खरेच आहे. तुम्ही लोक वर आलात—

आम्हांला खाली जाणे भाग होते. " मी शांतपणे त्याला म्हटले, " अन्वरुद्दीन, मी तुम्हां लोकांपेक्षा कोणत्याही दृष्टीनें कमी नसताना मला काय म्हणून पंधरा वर्षे खालच्या दर्जावर खितपत ठेवण्यात आले. आणि मला ज्यूनियर असलेले तुमच्यासारखे दहाबारा जण मला बाजूला सारून डेप्युटी कलेक्टर झाले. हबीब मुहंमद, गौसयार जंगसारख्या अधिकाऱ्यांनी मला इस्लामद्वेष्टा, शैतान दिमाग असे का म्हणावे, महबूबअली जॉइंट सेक्रेटरी यांनी सेतुमाधवराव हे वेळ आल्यास हैदराबाद राज्याविरुद्ध कारवाई करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत, त्यांना डिग्रेड केले पाहिजे असे का म्हणावे ? एक उर्दू सोडून तुम्हांला येथील भाषा दिसत नव्हत्या. येथील बहुसंख्य लोकांना समजून घेण्याची तुम्हांला जरूर वाटली नाही. बाहेर भारतात काय चालले आहे आणि त्याचा हैदराबादेवर काय परिणाम होणार याची तुम्हांला कल्पनाही आली नाही. रजाकारांच्या वल्गना तुम्हांला खऱ्या वाटल्या आणि आज त्याचे परिणाम तुम्हांला जाणवत आहेत. " मला बढती मिळाली याचा मला साहजिकच आनंद झाला. पण, मी काहीशा उपरोधाने म्हटले, " मी सामान्य माणूस, माझ्या एकाच्या बढतीसाठी वल्लभभाई पटेलांना हैदराबाद विरुद्ध पोलीस ॲक्शन करण्याची वेळ यावी हे मात्र जरा विचित्र वाटते. "

अन्वरुद्दीनने विषय बदलला. यानंतर काही वेळ गप्पागोष्टी करून तो निघून गेला. सुंभ जळला तरी पीळ जात नाही हेच खरे.

एकोणीसशे एकूणपन्नासमधे मी रेव्हेन्यू खात्यात डेप्युटी सेक्रेटरी झाल्यावर माझा खर्चही वाढू लागला. पोलीस ॲक्शननंतर मी घर बदलले, पण मी घेतलेले घर लहान पडू लागले. त्यामुळे एकशेपंचावन्न रुपये भाड्याचे घर मला घ्यावे लागले. पाच हजारचे सरकारकडून कर्ज घेऊन मोटार घ्यावी लागली. माझ्या पोषाखातही बदल झाला. पोलीस ॲक्शनपूर्वीचा माझा पोषाख म्हणजे रुंद पायजमा, शेरवाणी आणि सालारजंग कॅप (मी तुर्की टोपी कधीच वापरली नाही) असा असे. आता मला आफिसमधे रोज सुटाबुटात जावे लागे. नेकटाय बांधण्याची मला कधीच सवय नव्हती. त्यामुळे टाय बांधताना माझी नेहमी तारांबळ होई. ती बांधून देण्याचे काम उषाकडे असे. पुढे जोधपूर कोट रूढ झाले तेव्हा टायच्या गळफासातून मी सुटलो.

१९४९ मधे माझे इंग्रजी पुस्तकांचे वाचन पुन्हा सुरू झाले. या वर्षी सोळा इंग्रजी पुस्तके माझ्या वाचनात आली. त्यांत इतिहास, मानवशास्त्र आणि राजकारण यांवरील पुस्तके होती.

१९४९ मध्ये शेषाद्रींनी जहागिरींच्या विलीनीकरणाचा प्रश्न धसास लावला.

हैदराबादच्या तेवीस हजार खेड्यांपैकी सहा हजार खेडी जहागिरींनी व्यापिली होती. खुद्द निजामाच्या ताब्यात त्याच्या खाजगीची दोन हजार खेडी होती. निजामाच्या खासगी सरंजामाला सर्फेखास म्हणत. निजामाचे खासगीचे उत्पन्न दोन कोटी रुपयांचे होते. हैदराबादेतील प्रमुख अशा दहा जहागिरदारांचे [पायगा नबाबांच्या तीन शाखा (४) सालारजंग (५) फख्रुल्मुल्क (६) खानखानान (७) किशनप्रसाद, (पिढीजाद मुख्य सचिव) (८) राजे रायरायान (९) राजा धर्मकर्ण (१०) शौकत जंग,] उत्पन्न मिळून दोन कोटींच्यावर होते. लहानमोठे मिळून एकंदरीत जहागिरदार अठराशे होते. याशिवाय (१) वनपर्ती (२) जटप्रोळ (३) गोपाळ पेठ (४) सिरनापल्ली (५) दोमकोंडा (६) गद्वाल (७) गुरगुंटा (८) अश्वाराव पेठ (९) अनागोंदी (१०) सुरपूर इत्यादि हिंदू संस्थानें होती. निजामाच्या खाजगी जहागिरीचे, इतर जहागिरीचे आणि हिंदू राज्याच्या संस्थानांचे तडाखून विलीनीकरण करण्यात आले. विलीन जहागिरीबद्दल जहागिरदारांना वाजवी मोबदला देण्यात आला.

१९४९ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल हैदराबादेस आले. खरा पोलादी पुरुष. त्यांचे व्याख्यान निर्भीड आणि खणखणीत असे झाले. केवळ त्यांच्यामुळेच हैदराबादचा प्रश्न तडाखून सुटला असे म्हणावे लागेल.

हैदराबादच्या जीवनात रोज अक्षरशः क्रांती होत होती. सरकारदरबारातील उर्दूचे वर्चस्व एकदम खाली आले. उस्मानिया विद्यापीठ म्हणजे उर्दूचा बालेकिल्ला. तेथील माध्यम इंग्रजी करण्यात आले. मॅट्रिकपर्यंत शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. तेलगू, मराठी, कानडी या भाषांना काहीच स्थान नव्हते. पण नवीन सरकारने तिन्ही भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून ठरविल्या. त्यामुळे शिक्षणाचे स्वरूपच पालटले. पूर्वी मॅट्रिक परीक्षेला पाऊण लाखपर्यंत मुले उर्दू माध्यमातून बसत. कारण दुसऱ्या माध्यमांना परवानगी नव्हती. पण अवघ्या दोन वर्षांत उर्दू माध्यमातून परीक्षेला बसणाऱ्यांची संख्या पंधरा हजारांवर आली. पोलीस ॲक्शनच्या पूर्वी हैदराबाद शहराबाहेर एकही डिग्री कॉलेज नव्हते. औरंगाबाद, गुलबर्गा आणि वरंगळ येथे इंटरमीजिएट कॉलेजे असत. आता भराभर डिग्री कॉलेजे अस्तित्वात येऊ लागली. औरंगाबाद येथे डॉक्टर आंबेडकरांच्या प्रयत्नाने मिलिंद महाविद्यालय उघडण्यात आले. सरकारकडून त्या संस्थेला चांगली देणगी मिळाली. तिचा उल्लेख निजामाकडून येणाऱ्या चौथाईची वसुली असा डॉक्टरसाहेब विनोदाने करीत.

संस्कृत, मराठी, तेलगू, कन्नड आणि हिंदी या भाषांतून काम करणाऱ्या संस्थांना आता भक्कम सरकारी अनुदान मिळू लागले. अरबी आणि फारसी-

तून इस्लामी धर्मशास्त्रांचे शिक्षण देणारी मदरसे निजामिया ही संस्था होती. तिला महिन्याला अठरा हजारांचे अनुदान मिळे. सीताराम बागेतील संस्कृत पाठशाळेला महिन्याला अवघे सेहेचाळीस रुपये मिळत. ही परिस्थिती पालटली. सीतारामबागेच्या संस्कृत पाठशाळेला कॉलेजचा दर्जा मिळाला आणि तिच्या परीक्षांना विद्यापीठाची मान्यता मिळू लागली. मुल्की प्रशासक श्री. बखले यांच्या प्रोत्साहनाने हैदराबादेत संस्कृत संमेलन भरले. त्यातील संस्कृतमधील भाषणे मी ऐकली. त्याच सुमारास मध्यम व्यायोग या भासकवीच्या नाटकाचा एक प्रयोग विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी केला. हैदराबादेत गेल्या तीनशे वर्षांत संस्कृत संमेलने किंवा नाटके झाली नव्हती. ती ऐकून,आणि पाहून अत्यानंदाने माझ्या डोळ्यांत पाणी आले.

१९४९ च्या डिसेंबर महिन्यात जनरल चौधरींची लष्करी राजवट संपली. वेलोडी आय. सी. एस. हे मुख्य मंत्री झाले.

इ. स. १९५० च्या तीन मार्चला माजी पंतप्रधान लायकअली हे गुपचूपपणे पाकिस्तानला पळून गेले. त्यांच्या या कृत्याने हैदराबादेत खूप खळबळ उडाली. जुन्या राजवटीतील अनेक मुसलमान अधिकारी आणि रजाकारांना पैसे पुरविणारे भांडवलदार यांच्यावर कडक नजर ठेवण्यात आली. १९५० च्या जूनमधे वेलोडींच्या मंत्रिमंडळात काँग्रेसपक्षीय मंत्री घेण्यात आले. बी. रामकृष्णराव हे महसूल मंत्री झाले. याच वर्षी दिल्लीहून फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशन हैदराबादेस आले. हैदराबादच्या निवडक अधिकाऱ्यांना इंडियन ॲडमिनि-स्ट्रेटिव्ह सर्व्हिस (आय. ए. एस.) मधे घेण्यासाठी हे कमिशन आले होते. पहिल्याच इंटरव्ह्यूत हैद्राबादचे जे तेरा अधिकारी आय. ए. एस. साठी निवडण्यात आले त्यांत मी होतो. आठशे ते अठराशे या ग्रेडमधे माझी नेमणूक झाली.

पंधरा फेब्रुवारी १९५० रोजी माझी लहान मुलगी अचला देवाघरी गेली. तिला दोन वर्षेही झाली नव्हती. मी राहत्या घराचे दरमहा एकशे पंचावन्न रुपये भाडे भरत होतो. मामलेदार असताना तालुक्यातून घरभाडे चार पाच रुपयांहून अधिक पडत नसे. आता इतके भाडे पाहून माझी छातीच दडपली. आम्हां सनदी अधिकाऱ्यांची एक सहकारी संस्था होती. मी वीस हजारांचे कर्ज घेतले. माझे मेहुणे, बापू आणि अरविंद पुणतांबेकर यांचीही मला या कामात आर्थिक मदत झाली. मी जागेच्या शोधात होतो. योगायोग पाहा. कवि माधव जूलियन यांच्या आयुष्यात आलेल्या वरदा नायडू यांचे पती केशवलू (सेवानिवृत्त एज्यु-केशन इन्स्पेक्टर) यांनी आपल्या घराचा काही भाग विकायला काढला. जागा

ऐसपैस होती. युनिव्हर्सिटी रोडवरील ती जागा मी विकत घेऊन तेथे घर बांधले. मे १९५० मध्ये मी आपल्या हक्काच्या घरात राहण्यास गेलो. घराचे नाव मी प्रियाविलास ठेवले. माझ्या घराला चांगले अंगण आहे. एक छोटीशी बाग आहे. अंगणात खुर्च्या टाकून बसले की गप्पागोष्टींत वेळ कसा जातो हे समजत नाही. मुंबईतील फ्लॅट आणि ब्लॉक आणि टेन बाय टेनच्या खोल्या विथ ए बाथरूम अटॅच्ड या समस्या सारख्या अनुभवाला येतात त्यावेळीं आपल्या स्वतंत्र घरकुलाची, अंगणाची, तुळशीवृंदावनाची, फुलबागांची आठवण कुणाला येणार नाही ? पण आयुष्यभरात मला मालकीच्या घरात चारपाच वर्षांहून अधिक काळ राहण्यास मिळाले नाही. माझ्या पत्रिकेत मालकीचे घर मला धार्जिणे नाही असे दिसते.

कदाचित आमच्या घराण्यातच स्थावर मिळकत उपभोगण्याचा योग नसावा. माझे पणजोबा यांनी आमचे इनाम असलेले गाव कारजोळ येथे घर बांधले. माझे आजोबा नोकरीनिमित्ताने जन्मभर भटकत राहिले. स्वतःच्या मालकीचे घर असे त्यांना लाभले नाही. कारजोळमधील आमचे घर पडून गेले असून ती जागा आम्ही कडबा रचण्यासाठी भाड्याने दिली आहे. माझ्या वडिलांनी गुलबर्ग्याला इ. स. १९११ मधे घर बांधले. त्यात ते दोनतीन वर्षे राहिले. जामिनकीच्या प्रकरणात ते घर हातचे गेले आणि त्याऐवजी एक लहानसे घर गुलबर्ग्याला मिळाले; ते महिना दहा पंधरा रुपये भाड्याने दिले. तेही पुढे विकले गेले. १९५० मध्ये मी हैदराबादला घर बांधले. पण १९५६ अखेर मुंबईला आल्यापासून मला त्या घरात राहण्याचा योग आला नाही. अशी ही माझ्या घराची कथा आणि व्यथा आहे.

पंधरा सप्टेंबर १९५० रोजी माझा मुलगा अनिरुद्ध उर्फ अनिलकुमार याचा जन्म झाला. आता तो सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्समधे शिकत आहे. अनिल हा माझा शेवटचा मुलगा. मला एकंदर चार मुलगे आणि चार मुली. त्यांपैकी एक मुलगा अभिमन्यू आणि मुलगी अचला ही देवाघरी गेली. अनिलचा जन्म झाला त्यावेळी मला एकेचाळीसावे वर्ष चालू होते. उषा छत्तीस वर्षांची होती. त्यानंतर आम्हांला मुले झाली नाहीत. यात फॅमिली प्लॅनिंगचा काही संबंध नव्हता.

इ. स. १९५१ पर्यंत माझी आदिवासींच्यावरची चार पुस्तके प्रसिद्ध झाली. गोंडी आणि कोलामी या भाषांवरील माझ्या व्याकरण ग्रंथांचा बराच गवगवा झाला. इ. स. १९५० मधे मी एकंदर पंधरा इंग्रजी पुस्तके वाचली.

१९५१ मधे औरंगाबादचे प्रशासक ल. ग. राजवाडे, आय. सी. एस.

(सध्या महाराष्ट्र राज्याच्या गृहखात्याचे सचिव) हे हैदराबाद राज्याचे मुख्य सचिव होऊन आले. त्यांच्या जागी औरंगाबादचा कलेक्टर म्हणून माझी नेमणूक करण्यात आली. त्याप्रमाणे मे १९५१ मधे औरंगाबादेस कलेक्टर म्हणून मी कामाचा चार्ज घेतला.

१७

औरंगाबाद
१९५१ ते १९५२

सतरा मे १९५१ रोजी औरंगाबादेस मी कलेक्टर म्हणून काम पाहण्यास सुरवात केली. औरंगाबाद हे मोठे आकर्षक शहर आहे. तसे पाहिले तर हे शहर स्थापन होऊन फक्त साडेतीनशे वर्षे झाली आहेत. येथे पूर्वी खडकी नावाचे लहानसे खेडे होते. पण निजामशहाचा प्रसिद्ध वजीर मलिकंबर याने इ. स. १६१२ मधे मोगल सरदार अब्दुल्लाखान याचा या ठिकाणी पराजय केला आणि नंतर तेथे कायमची वस्ती केली. त्याने आणि त्याच्या सरदारांनी येथे मोठमोठे वाडे आणि मशिदी बांधल्या, बाजारपेठ वसविली आणि शहर भरभराटीस आणले. मलिकंबरने शहराला पाणीपुरवठ्याची जी योजना केली ती अद्वितीय आहे. त्याने तीन मैल लांबीचा कालवा तयार करविला. औरंगाबादेच्या नजीक असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी आणि ओढ्याच्या पात्रात असलेले पाण्याचे झरे यांचे पाणी शहरात आणण्याकरिता त्याने जमिनीखाली तीन मैल लांबीचे बोगदेच जणू तयार केले. शहराबाहेर हे पाणी साठवून मातीच्या नळांद्वारे त्याने ते

शहरात ठिकठिकाणी खेळविले. शहरांत ठिकठिकाणी हौद बांधण्यात आले. हीच पद्धत पुढे मोगलांच्या काळीं वाढविण्यात येऊन बारा कालवे शहरात आणण्यात आले. मलिकंबरच्या कालव्यांचे फारसी वर्णन "खैरे जारी" म्हणजे 'वाहती कृपा' असे करण्यात आले आहे. हा कालवा इ. स. १६१६ मधे तयार करण्यात आला. त्यावर अडीच लाख रुपये खर्च आला.

मलिकंबरच्या काळच्या थोड्या इमारती आज शिल्लक आहेत. त्याचा राजवाडा, बादशहा हवेली आता शिल्लक नाही. त्याने बांधलेल्या नौखंडा वाड्याचे अगदी थोडे आणि तेही पडके अवशेष राहिले आहेत. पण शहरातील भडकल दरवाजा, जुन्या बाजारातील काळी मशीद ही उत्तम स्थितीत आहेत. मलिकंबरने जुम्मामशीद बांधण्यास घेतली, पण तिचे काही भागच तो पूर्ण करू शकला. संपूर्ण मशीद औरंगजेब सुभेदार होता त्या काळात पूर्ण झाली. (इ. स. १६५८).

मलिकंबरच्या मृत्यूनंतर (इ. स. १६२६) दहा वर्षांत मोगलांनी अहमदनगरचे राज्य पूर्णपणे खालसा केले. राजपुत्र औरंगजेब हा इ. स. १६३६ मधे दक्षिणचा पहिला सुभेदार होऊन आला. मलिकंबरच्या या शहराला त्याने औरंगाबाद हे नाव दिले. त्यावेळेपासून दक्षिण सुभ्याची राजधानी म्हणून औरंगाबादची भरभराट होऊ लागली.

औरंगाबादेत औरंगजेबाने स्वतःसाठी वाडा बांधला आणि त्याच्या भोवती तटबंदी केली. त्या भागाला किलेअर्क म्हणतात. औरंगजेबाच्या वाड्याचे अवशेष आलमगिरी महाल म्हणून ओळखले जातात. मलिकंबरने शहराच्या लगतच एक मोठा तलाव बांधला होता. त्याला अंबरी तलाव म्हणत. औरंगजेब आणि त्याचे सरदार यांचे वाडे या भागातच बांधण्यात आले. औरंगजेबाची बायको दिल्रासबानू ही इ. स. १६५७ मध्ये औरंगाबादेस वारली. तिचा मुलगा आज्जम याने तिच्या कबरीवर भव्य दर्गा बांधला. तो बिबीचा मकबरा म्हणून ओळखला जातो. ताजमहालाच्या धर्तीवर ही इमारत बांधण्यात आली आहे. औरंगाबादेतील अत्यंत प्रेक्षणीय इमारतींपैकी ही एक आहे.

शायिस्ताखान हा इ. स. १६५९ मध्ये औरंगाबादेस सुभेदार होऊन आला. औरंगाबादच्या चौकात त्याने एक भव्य मशीद बांधली. ती अद्याप शाबूत आहे. आग्र्यास जाताना शिवाजी महाराज हे एप्रिल १६६६ मध्ये औरंगाबादेस राहून गेले. संभाजी हाही मोगली मन्सबदार म्हणून नोव्हेंबर १६६७ मध्ये काही दिवस औरंगाबादेस राहिला. मोगलांच्या काळात औरंगाबाद शहरात एकूण बावन्न पुरे होते. जयसिंगाचा जयसिंगपुरा, जसवंतसिंगाचा जसवंतपुरा, बिकानेरचा

रावकर्ण याचा करणपुरा, त्याचा मुलगा पद्मसिंग याचा पदमपुरा, अमरसिंहाचा मुलगा रावराजसिंग याचा रावरसपुरा, देवीसिंग बुंदेल्याचा देवीपुरा, शहाजी राजांचे चुलतभाऊ मालोजी आणि परसोजी भोसले यांचे मालजीपुरा आणि परसोजीपुरा, औरंजेबाची बायको नबाबबाई हिचा बायजीपुरा, जालना येथे शिवाजीशी लढणारा रणमस्तखान पन्नी याचा रणमस्तपुरा, ओरछाचा राजा पहाडसिंग याचा पहाडसिंगपुरा असे कितीतरी पुरे औरंगाबादेत आहेत. पहाडसिंगाने बांधलेला राजवाडा सोनेरी महाल या नावाने प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकात रजपूत सरदारांनी औरंगाबादेस बांधलेल्या वाड्यांपैकी सोनेरी महाल तेवढा शिल्लक राहिला आहे. पण त्यावरून रजपूत स्थापत्याची आपल्याला पूर्ण कल्पना येते.

इ. स. १६८२ मध्ये मराठ्यांच्या वाढत्या आक्रमणाला आळा घालण्यासाठी औरंगजेबाच्या आज्ञेने शहराभोवती चार मैल लांबीची तटबंदी अवघ्या चार महिन्यांत बांधण्यात आली. तिला तीन लाख रुपये खर्च आला. या तटबंदीचे दिल्ली, पैठण, रोशन, जफर असे अनेक दरवाजे अद्याप शाबूत आहेत.

मोगलांचे महत्त्वाचे केंद्र म्हणून औरंगाबादेस या काळात अनेक विद्वान, कवी, साहित्यिक, सूफी आणि साधू आकृष्ट झाले. त्यांपैकी शहा महमूद आणि शहा मुसाफिर हे मध्य आशियातून आले होते. त्यांच्या कबरीच्या जागेत एक सुंदर मशीद, ग्रंथालय, अतिथिगृह ही अठराव्या शतकाच्या सुरवातीस बांधण्यात आली. शहराबाहेरून कालवा आणण्यात येऊन पाण्याचा धबधबा, हौद, कारंजी, आणि उद्यान ही तयार करण्यात आली. धबधब्याच्या जोरावर धान्य दळण्याची व्यवस्था केल्यामुळे या रमणीय स्थळाला पनचक्की हे नाव मिळाले. औरंगाबादच्या दक्षिणेस शहानूर हमवी सूफी साधूची कबर आहे. दर्ग्याभोवती बाग, कारंजी, विविध प्रकारची फुलझाडे असल्यामुळे हा दर्गाही मोठा प्रेक्षणीय वाटतो. तेथील बकुळीची फुले आज इतक्या वर्षांनंतरही माझ्या आठवणीत ताजी आहेत. तसेच निजामुल्मुल्काचा गुरू निजामुद्दीन याचा दर्गाही प्रेक्षणीय आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) सय्यद बंधूंपैकी सय्यद हुसेन अलीखान सुभेदार याने शहागंजमधील भव्य मशीद बांधली. निजामुल्मुल्काच्या काळातील अनेक इमारती आहेत. सध्या कमिशनरचे ऑफिस आणि निवासस्थान असलेली इमारत पूर्वी निजामुल्मुल्काच्या आतेचा नवरा इवजखान याची बारादरी म्हणून ओळखली जात असे. औरंगाबादेवर मराठ्यांच्या स्वाऱ्या अनेकदा झाल्या. इ.स. १७५८ मध्ये दत्ताजी शिंदे आणि विश्वासराव पेशवे यांची आणि निजामाची लढाई येथे झाली. १७६३ मध्ये माधवराव पेशवे आणि राघोबादादा यांनी

औरंगाबादेवर हल्ला चढविला होता. यानंतर झालेल्या औरंगाबादच्या तहने मराठ्यांनी निजामाकडून पंच्याऐंशी लाख उत्पन्नाचा मुलूख घेतला.

औरंगाबादेत अनेक उर्दू आणि फारसी साहित्यिक होऊन गेले. आधुनिक उर्दूचा आद्य कवी वली, कविश्रेष्ठ सिराज औरंगाबादी, सुप्रसिद्ध फारसी साहित्यिक गुलामअली आजाद बिल्ग्रामी, मोगल साम्राज्याच्या चरित्रकोशाचा, मासिरुल उमराचा, कर्ता शहानवाजखान, इतिहासकार लाला मन्साराम, कवी आणि इतिहासकार लक्ष्मीनारायण शफीक, कवी आणि पत्रलेखक मूसवी, आत्मा चरित्र लिहिणारा भीमसेन सक्सेना हे सर्व औरंगाबादचे होत.

एकोणिसाव्या शतकात औरंगाबादने १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतला. यापायी औरंगाबादेत तिघांना तोफेच्या तोंडी देण्यात आले, एकाला फासावर लटकविण्यात आले आणि एकवीस जणांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले.

विसाव्या शतकात औरंगाबाद हे चळवळीचे मोठे केंद्र बनले. अनंत कान्हेरे याचे जॅक्सन खुनाचे कारस्थान प्रथम औरंगाबादेस शिजले. यानंतरच्या काळात या शहराला डॉक्टर सीमंत, माणिकचंद पहाडे, गोविंददास श्राफ, दिगंबरदास चौधरी, गणपतराव वैद्य, वैशंपायन, वाघमारे पतिपत्नी, भालेराव, पाठक, इत्यादी अनेक सामाजिक आणि राजकीय पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला.

औरंगाबाद म्हणजे मराठवाड्याची मनोरमाच होय. अशा या शहरात मला एक वर्षभर काम करण्यास मिळाले हे मी आपले भाग्य समजतो.

औरंगाबाद जिल्हा हा तेरा तालुक्यांचा अजंठ्यापासून पैठणपर्यंत आणि जालन्यापासून वैजापूरपर्यंतचा प्रदेश म्हणजे अनेक इतिहासप्रसिद्ध स्थळांनी भरून गेला आहे. वेरूळ अजंठ्याची लेणी, देवगिरी, अंतूर, पीतळवाडी हे किल्ले; असई, पालखेड ही रणक्षेत्रे; पैठणसारखी प्राचीन नगरे या जिल्ह्यात आहेत. या भूमीत अनेक साधुसंत, कवी आणि साहित्यिक होऊन गेले, ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे (आपेगाव), महानुभाव पंथस्थापक श्रीचक्रधर, सुप्रसिद्ध महानुभाव संत नागदेवाचार्य, कवयित्री महदंबा, लीळाचरित्राचा कर्ता महिम्न व्यास (शिराळा, वैजापूर तालुका), महानुभाव कवी नरेंद्र (रुक्मिणी-स्वयंवराचा कर्ता), दामोदर (वत्सहरण काव्याचा कर्ता), हेमाद्री, सारंगधर, संत भानुदास, एकनाथ आणि मुक्तेश्वर, बहिरापिसा, अमृतराय, शिवदिन केसरी (पैठण), संत बहिणाबाई (देवापूर), कवी मध्वमुनीश्वर, अशी किती नावे सांगावीत !

औरंगाबाद जिल्ह्यात काम करताना मला विलक्षण उत्साह वाटे. जिल्ह्यात

माझे दौरे सारखे चालू असत. मी या जिल्ह्यातील एकूण एक खेडे पाहिले. त्या एका वर्षात मी एकोणतीस हजार मैल फिरलो. त्यावरून माझ्या जिल्ह्यातील फिरण्याची कल्पना यावी.

कलेक्टरीच्या कामांत फुरसतीचे क्षण क्वचितच लाभतात. दुष्काळी कामांची पाहणी, नगरसुधारणांच्या योजना आणि त्यासाठी शहरातून रोज दोन-तीन तास फिरणे, ऑफिसमधील रेव्हेन्यूचे खटले ऐकणे, जिल्ह्यातील लेव्ही धान्याची वसुली, पार्लमेंट आणि स्थानिक कायदेमंडळाच्या निवडणुकींची व्यवस्था, येणाऱ्याजाणाऱ्या प्रसिद्ध व्यक्तींचे स्वागत आणि निरोप असे किती म्हणून सांगावे. मी औरंगाबादेस असताना राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, पंतप्रधान नेहरू, उत्तर प्रदेशचे राज्यपाल के. एम. मुन्शी, मद्रासचे गोपाळ रेड्डी वगैरे मंत्री, मिसेस रुझवेल्ट, चिनी शिष्टमंडळ (तो काळ हिंदी-चिनी भाई भाईचा होता), हैदराबादचे मुख्य मंत्री बी. रामकृष्णराव अशी किती तरी मंडळी औरंगाबादेस येऊन गेली. त्यांपैकी अनेकजण वेरूळ-अजंठ्याच्या निमित्ताने येत. मुंबईचे मुख्य मंत्री बाळासाहेब खेर हेही १९५२ च्या जानेवारीत पैठणला भेट देऊन गेले. मुंबईपुण्याकडील विद्वानांपैकी महामहोपाध्याय पोतदार, प्रा. न. र. फाटक, डॉक्टर शं. गो. तुळपुळे, डॉ. पी. एम्. जोशी, कवी मंगेश पाडगावकर, नटसम्राट बालगंधर्व ही मंडळी औरंगाबादेस मी असताना येऊन गेली. प्रमुख मंडळींच्याबरोबर म्हणून पाच सात वेळा तरी मला वेरूळ-अजंठ्याला जावे लागले.

कामाच्या गर्दीत संशोधन, लेखन, वाचन इत्यादि गोष्टींसाठी सवड मिळणे कठिण होते. पण एका योगायोगाने मी संशोधनकार्याकडे वळलो.

पैठण हे साधुसंतांचे माहेर, कामाचा चार्ज घेतल्यानंतर मी सरकारी कामानिमित्त पैठणला भेट दिली. एकनाथांच्या समाधीचे दर्शन घ्यावे म्हणून मी मंदिरात गेलो. समाधीजवळ पुजारी गंध उगाळीत बसले होते. मी कोण आहे हे मी त्यांना कळू दिले नाही. मी मुद्दाम भोळेपणाचा आव आणून पुजाऱ्यांना विचारले, 'महाराज ही समाधी कुणाची आहे?' पुजाऱ्यांनी माझ्याकडे पाहात विचारले, "आपण 'धर्मात्मा' हा सिनेमा पाहिला आहे?" मी होकारार्थी मान हलविली. पुजारी म्हणाले-"धर्मात्मा सिनेमात बालगंधर्वांनी ज्यांची भूमिका केली ते कोण होते?" मी म्हटले "एकनाथ." पुजारी म्हणाले-"त्या एकनाथांची समाधी" त्याचे हे उद्गार ऐकून मी थक्क झालो. पुढे गावात मी शोध घेतला, तेव्हा एकनाथांचे वाङ्मय अगर एकनाथांवरील पुस्तके कुणाजवळही सापडेनात. नाथमंदिरात नाथभागवताची एक जुनी प्रत

होती. नाथवंशजांकडे आजगावकर कृत एकनाथचरित्र तेवढे सापडले. पैठणला समग्र नाथवाङ्मय सापडू नये याचे मला फार वाईट वाटले. मी ताबडतोब मुंबईला माणसे पाठवून एकनाथांचे समग्र वाङ्मय आणि एकनाथांविषयी जे ग्रंथ लिहिले गेले ते सर्व मागवून घेतले. एकंदर पुस्तकांची संख्या दीडशे भरली आणि त्यावर चारशे रुपये खर्च आला. ती पुस्तके मी नाथांच्या समाधिमंदिरात दोन कपाटांत ठेवली. त्या लहानशा ग्रंथालयाचे उद्‌घाटन पुढे बाळासाहेब खेर यांच्या हस्ते झाले.

माझे मित्र बळवंतराव घाटे हे त्यावेळी औरंगाबादेस सेशन जज्ज होते. त्यांचा संतवाङ्मयाचा दांडगा अभ्यास आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ इत्यादि संतांवर तर त्यांची नितांत भक्ती आहे. नाथवाङ्मयाचे संशोधन व्हावे म्हणून मी आणि घाटे यांनी अनेक गावांना भेटी देऊन लोकांना त्या कार्याची महती पटवून देण्याचा प्रयत्न केला. सध्याचे आपले गृहखात्याचे उपमंत्री कल्याणराव पाटील यांचे वडील हे मोठे सच्छील आणि साधुतुल्य असून नाथांचे मोठे भक्त होते. त्यांनी या कार्यात घाट्यांना पूर्ण सहकार्य दिले. घाटे आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नाने औरंगाबादेस खडकेश्वर येथे एकनाथ संशोधन मंदिर उभे राहिले. ही संस्था शके १८७३ च्या जन्माष्टमीच्या दिवशी स्थापन झाली. या संस्थेचे अध्यक्ष हे माझे पुण्याच्या माझ्या शालेय जीवनातील मित्र आणि औरंगाबादेचे प्रसिद्ध वकील श्रीपादराव नेवासेकर हे झाले. संस्थेचे विश्वस्त मी आणि घाटे हे होतो. या संस्थेतर्फे पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला तो म्हणजे 'एकनाथदर्शन प्रथम खन्ड' होय. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद हे औरंगाबादेस आले असताना मी आणि घाटे यांनी या ग्रंथाला त्यांचा अभिप्राय मिळविला. तो ग्रंथांत समाविष्ट करण्यात आला.

या संस्थेचे दुसरे पुस्तक म्हणजे मी लिहिलेले "सूफी संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि कार्य" हे होय.

सूफी म्हणजे मुसलमानांतील साधुसंत. मध्ययुगीन भारतात या सूफींनी महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे. अजमेरचा ख्वाजा मुइनुद्दीन चिश्ती, दिल्लीचा निजामुद्दीन औलिया, गुलबर्ग्याचा ख्वाजा बंदेनवाज गेसूदराज, असे अनेक सूफी हिंदुस्थानात होऊन गेले. महाराष्ट्रातही अनेक सूफींच्या कामगिरीचा आपल्याला दाखला मिळतो. माहीमला हाजीअली, कल्याणला हाजीमलंग, पुण्याला सलाहुद्दीन, परंड्याला ताजुद्दीन, उस्मानाबादला शम्सुद्दीन, नाशिकला सरमस्त, कंधारला (नांदेडजवळ) सुल्तान सांगडे, पैठणला निजामुद्दीन आणि मौलानासाहेब, औरंगाबादला निजामुद्दीन, शहानूर, शहा मुसाफिर, श्रीगोंद्याला

शेख महंमद, कोकणात बाबा याकूत, देवगिरीजवळ जलालुद्दीन आणि मोमिन आरिफ, खुल्दाबादेला जरजरी बख्श, बुऱ्हाणुद्दीन आणि जैनुद्दीन असे अनेक सूफी महाराष्ट्रात होऊन गेले.

सामान्यपणे महाराष्ट्रातील विद्वानांत समजूत अशी की, मुसल्मानांतील सूफी पंथ हा आपल्या महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाप्रमाणे आहे. सूफी पंथावर आपल्या भागवत धर्माचा प्रभाव पडला असून भागवत धर्मावरही सूफींचा परिणाम झालेला दिसून येतो. सूफी हे राजकारणापासून अलिप्त आणि शहरापासून लांब राहात. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजांत एकोपा निर्माण व्हावा, कर्मठपणा सोडून त्यांनी परमेश्वराची भक्तिपूर्वक आराधना करावी आणि परस्परांशी स्नेहाने वागावे, अशी शिकवण सूफींनी दिली. सुल्तान आणि बादशहा यांच्यामुळे आणि त्यांच्या सैन्यामुळे पीडित झालेल्या लोकांना दिलासा देण्याचे काम सूफींनी केले.

वरील विचारसरणी प्रा. न. र. फाटक यांनी आपल्या एकनाथ चरित्रातील लोकस्थितीचा आढावा या प्रकरणात मांडली. सूफींच्या संबंधी, ते कोणत्या शतकात, कधी होऊन गेले याबद्दल त्यांनी दिलेली माहिती वाचीत असता ती अपुरी आहे असे मला वाटू लागले. पांगारकरांनीही आपल्या मराठी साहित्याच्या इतिहासात सूफींच्या संबंधी दिलेली माहिती अशीच अपुरी आणि असमाधानकारक आहे.

या विषयावर मी एक लेख लिहून मुंबईच्या एका मासिकाकडे पाठविला. पण लेखात फाटकांच्यावर टीका करण्यात आली, ही सबब दाखविण्यात येऊन तो लेख मला साभार परत करण्यात आला. पुढे माझे मित्र आणि मिलिंद महाविद्यालयातील प्राध्यापक दत्तात्रय विष्णु जोग (सध्या प्राध्यापक पवई इन्स्टिट्यूट) यांच्या प्रयत्नाने तो लेख पुण्याच्या ‘ वाङ्मयशोभा ’ मासिकात प्रसिद्ध झाला.

१९५१ च्या दिवाळीत प्रा. न. र. फाटक हे व्याख्यानांच्या निमित्ताने औरंगाबादेस आले. त्याच वेळीं माझे श्वशुर प्रा. पुणतांबेकर हेही नागपूरहून आले होते. फाटकांच्या माहितीसाठी म्हणून मी सूफी संतांच्या कामगिरीवर व्याख्यान दिले. माझे व्याख्यान संपल्यानंतर फाटक मला म्हणाले, “ माधवराव, या विषयावर तुम्ही लिहीत का नाही. ”

फाटकांच्या वरील उद्गारांनी माझ्यात एक प्रकारची जिद्द निर्माण झाली. सूफी पंथ, तत्त्वज्ञान, परंपरा आणि सूफींची भारतातील मुस्लिम राजकीय आक्रमणातील कामगिरी या गोष्टींचा मी कसून अभ्यास सुरू केला. या विषयावर मी अनेक उर्दू, फारसी आणि इंग्रजी पुस्तके वाचून काढली. इस्लामच्या

आध्यात्मिक तत्त्वज्ञानात सूफींनी अत्यंत महत्त्वाची भर घातली आहे यांत संशय नाही. अली हुजवेरी (इ. स. दहाशे ते दहाशे त्रेसष्ट) याचा कशफुल महजुब, निजामुद्दीन औलिया (जन्म बाराशे त्रेसष्ट) याची संभाषणे ज्यात ग्रथित झाली आहेत तो ग्रंथ 'फवायदुल फवाद' ख्वाजा बंदेनवाज (इ. स. १३२४ ते १४२०) याचा असमाउल असरार, रुक्नुद्दीन दबीर काशानी (पंधरावे शतक) याचा ग्रंथ शिमाइल इतकिया हे मुस्लिम सूफी तत्त्वज्ञानात प्रमाणभूत ग्रंथ मानले जातात. सूफीचा मराठीत एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. तो म्हणजे शेख मुहंमद बाबा श्रीगोंदेकर यांचा 'योगसंग्राम' हा होय.

सर्वच सूफी कुराणप्रणीत धर्माचरणाला विरुद्ध होते अगर धर्माचरणाकडे दुर्लक्ष करावे असे म्हणणारे होते असे नाही. पण अनेक सूफींनी अद्वैत तत्त्वज्ञानावर भर दिला, ही गोष्ट द्वैतवादी इस्लामला रुचणारी नव्हती. गुरुभक्ती, गुरुशिष्यपरंपरा, गुरूंच्या समाधीचे (दर्ग्याचे) स्तोम, गुरूपदेश या गोष्टी कुराणप्रणीत इस्लाम मानीत नाही. सूफींच्यामुळे गुरुभक्ती, दर्गे, मठ इत्यादींचे महत्त्व वाढले. सूफींनी अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला आणि निवृत्तिमार्गावर भर दिला. यामुळे इस्लामचे अतोनात नुकसान झाले असे म्हणणारा वर्ग मुसलमान विद्वानात आहे. उर्दू कविश्रेष्ठ इक्बाल हे सूफी तत्त्वज्ञानाचे प्रखर विरोधक होते.

माझ्या या विषयावरील अभ्यासासाठी मी माझ्या दौऱ्यात वेळात वेळ काढून फकीर आणि औलियांचे दर्गे पाहात असे. बऱ्याच ठिकाणी पूर्वीच्या मंदिरांच्या जागी सूफींचे दर्गे स्थापन झाल्याचे मला आढळून आले. अनेक ठिकाणी मोडतोड करून त्या जागी सूफी संत स्थानापन्न झाले असावेत, हे कुणाच्याही ध्यानात येईल. सूफी हे राजकारणापासून अलिप्त होते असा जो गैरसमज विद्वानात पसरला आहे त्याला काही आधार नाही. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या आक्रमक धोरणात सूफींनी पूर्णपणे सहकार्य केले हे उघड आहे. एकच उदाहरण देतो.

शहा मुईजुद्दीन उर्फ मौलानासाहेब हा खुल्दाबादहून पैठणला आला (चौदावे शतक). पैठणास त्यावेळी सर्वात सुप्रसिद्ध असे महालक्ष्मीचे मंदिर होते. मुईजुद्दीनने महालक्ष्मीच्या देवळाचा ताबा घेतला. त्या झटापटीत बरेच लोक मारले गेले. महालक्ष्मी, रेणुकादेवी आणि गजानन अशी तिन्ही मंदिरे एका टेकडीवर होती. ती पाडण्यात येऊन त्या जागेवर मशीद बांधण्यात आली. महानुभावांच्या स्थानपोथीत पुढील उल्लेख आहे. "तीही देऊळाची जगति एकचि : जगतीची दारोठा पूर्वाभिमुख : त्याची मशीद केली."

अशी अनेक उदाहरणे देता येतील. माझ्या या विषयावरील अभ्यासाचे फळ म्हणजे माझा "सूफी संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि कार्य" हा छोटासा ग्रंथ होय. ते पुस्तक मी तीन महिन्यांत लिहून काढले. माझे मित्र प्राध्यापक द. वि जोग यांच्या प्रयत्नाने मुंबईच्या परचुरे प्रकाशन मंदिराने ते पुस्तक मार्च १९५३ मध्ये प्रकाशित केले.

मी औरंगाबादेस असता राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी औरंगाबादला भेट दिली. खुल्दाबाद, वेरूळ, अजंठा इत्यादी स्थळे त्यांनी पाहिली. खुल्दाबादेस औरंगजेबाची कबर पाहण्यास जाताना राजेंद्रप्रसादांनी मला सूफींच्यासंबंधी माहिती विचारली. त्यावेळी माझा या विषयावरचा अभ्यास मला अतिशय उपयोगी पडला. मी जवळ जवळ एक तासभर अस्खलित उर्दूतून त्यांना भारतातील सूफी साधुसंतांच्या संबधी माहिती देत होतो. पुढे त्यांनी हिंदुस्थान सरकारचे सचिव मिस्टर बुच यांच्याशी बोलताना माझा उल्लेख 'ए मोस्ट लर्नेड पर्सन' असा केला, त्यावेळी मला माझ्या अभ्यासाचे सार्थक झाले असे वाटले. रात्रीच्या डिनरच्या वेळीं, राष्ट्रपती, डॉ. आंबेडकर, गृहमंत्री दिगंबरराव बिंदू, मी आणि माझी पत्नी असे एकत्र होतो. त्यावेळीं डॉक्टर आंबेडकरांनीही माझे कौतुक केले तेव्हा मला धन्य धन्य वाटले.

मुसलमान सूफी साधुसंतांचा माझा अभ्यास चालू असतानाच माझे लक्ष महानुभाव वाङ्मयाकडे वळले. महाराष्ट्रात इ. सनाच्या तेराव्या शतकात महानुभाव पंथ अस्तित्वात आला. या पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर हे होते. इ. स. १२६८ पासून त्यांनी महाराष्ट्रात आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. महानुभव हे श्री दत्तात्रेय, चक्रपाणी (मूळ फलटणचे, यांना द्वारावतीचे चांगदेव राऊळ म्हणतात.) रितमूरचे श्री गुंडम राऊळ आणि श्री चक्रधर यांना परमेश्वराचे अवतार मानतात. श्री चक्रधरांना श्रीकृष्णाचाही अवतार समजतात. महानुभाव पंथ हा द्वैतवादी. मूर्तिपूजा या पंथात नाही. विष्णु, ब्रह्मा, महेश पासून सगळ्या देवता म्हणजे परमेश्वर नव्हेत. त्यांच्याहि वर परमेश्वर आहे. प्राण्यांचा उद्धार करण्याचे सामर्थ्य या वरील देवतांना नाही. ते फक्त परमेश्वरच करतो. म्हणून परमेश्वराचीच आराधना करावी. तो अधिकार सर्व स्त्री-पुरुषांना आहे. श्रीकृष्ण चरित्र वर्णन हा महानुभावांचा आवडता विषय आहे. महदंबेची धवळी, नरेंद्राचे रुक्मिणी-स्वयंवर, दामोदर पंडिताचे वत्सहरण, भास्कर भट्ट बोरीकराची शिशुपाल वध आणि उद्धवगीता हे महानुभाव लेखकांचे ग्रंथ श्रीकृष्ण-चरित्रावर आधारले आहेत.

महानुभावांनी तेराव्या आणि चौदाव्या शतकात अनेक गद्य आणि पद्य ग्रंथ

रचून मराठी साहित्यात जी भर घातली ती केवळ अमोल आहे. श्री चक्रधरांच्या लीला ज्यात एकत्र आणल्या आहेत त्या लीळाचरित्र ग्रंथामुळे महाराष्ट्राला तेराव्या शतकातील मराठी बोलभाषेचा कितीतरी प्रमाणात परिचय झाला आहे. या आणि इतर महानुभावीय ग्रंथामुळे यादवकालीन महाराष्ट्र कसा काल घडल्याप्रमाणे डोळ्यांसमोर उभा राहतो. महानुभावीय मराठी साहित्याचे संशोधन आपल्याकडे अनेक विद्वानांनी केले आहे. नेने, भवाळकर, भावे, य. खु. देशपांडे, डोळके, शं. गो. तुळपुळे, डॉक्टर कोलते इत्यादींच्या प्रयत्नांनी महानुभावांचे प्रचंड वाङ्मय मराठी भाषाभ्यासकांना उपलब्ध झाले आहे. या विद्वानांच्या या कामगिरीचे मोल करणे अशक्य आहे.

महानुभावांनी आपले ग्रंथ सांकेतिक लिपीतून लिहून ठेवले त्यामुळे ते जसेच्या तसे टिकले आहेत. त्यामुळे व्यवहारात बोलली जाणारी यादवकालीन मराठी आजतागायत या ग्रंथांतून सुरक्षित राहिली आहे. श्रीचक्रधराचे भ्रमण नगर, नाशिक, मराठवाडा, विदर्भ या भागात होते. त्यांनी ज्या स्थानांना भेटी दिल्या, जेथे मुक्काम केले त्या सर्व स्थळांची माहिती स्थानपोथीत आली आहे. ती स्थळे महानुभावियांना वंद्य आहेत. जेथे चक्रधर राहिले, बसले तेथे महानुभावियांनी ओटे बांधले आहेत. त्यांना महानुभाव तीर्थांचे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या स्थानांची महानुभावांनी केलेली वर्णने इतकी अचूक आहेत की, ती वाचून मन थक्क होते. या वर्णनांद्वारे तेराव्या शतकाचा महाराष्ट्राचा भूगोलच आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. श्रीचक्रधरांशी निगडित असलेल्या तीर्थांची संख्या साडेसातशे असे समजण्यात येते. श्रीचक्रधर आपल्या भ्रमणात कधी देवळात, तर कधी एखाद्या झोपडीत (त्यांना गुंफा म्हणत) तर एखाद्या मळ्यात मुक्काम करीत. देवळाच्या गाभाऱ्यात डोकावून पाहाताना त्यांनी दरवाजाच्या दोन्ही बाजूंवर दोन हात ठेवले की, ती दोन तीर्थे समजली जात.

लीळा चरित्र आणि स्थानपोथी यांचा अभ्यास करताना मला त्यातील स्थळांची वर्णने, समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींच्या हालचाली, त्यांचे बोलणे, त्यांची बोलभाषा, त्यांचे अनेक व्यवहार, जेवणी-खाणी, वस्त्रालंकार इत्यादींची अशी काही भुरळ पडली की, मी खेडोपाडीच्या दौऱ्यावर निघालो की श्रीचक्रधरांच्या स्पर्शाने पुनीत झालेले एकही स्थळ पाहिल्याशिवाय सोडीत नसे. दौऱ्यात माझ्याबरोबर लीळाचरित्र आणि स्थानपोथी ही सतत असत. औरंगाबाद जिल्ह्यात मी महानुभावांची चौसष्ट स्थळे पाहिली. एखाद्या स्थळी पोहोचलो की स्थान पोथी आणि लीळाचरित्र यातील उतारे पाहून चक्रधर काळी ती स्थाने कशी दिसत असतील याची मी कल्पना करीत असे. कितीतरी

प्रसंग मला अद्याप आठवतात.

सविता नागनाथ या गावी माझा मुक्काम होता. श्रीचक्रधर तेथे असताना देवगिरीला राज्यक्रांती होऊन रामदेवराय गादीवर बसला. ही बातमी त्यांनी आपल्या शिष्यांना दिली. लीळा चरित्रातील पुढील हकीकत अशी आहे. तेथे नागनाथाचे देऊळ अद्याप आहे. " गोसावि यासी उपहड : मग गोसावी सवीते यासी बीजे केले. महादेवो पाठक गावी गेले. गोसावी यांसी नागनाथी चौकी आसन. बाईसी इंद्रभटाते तेल आणू पाठविले. गोसावी बाहीरी बीजे केले; दारवंठाचीये उतरिले. सोंडीयेवरि आसन. तंव इंद्रबा तेल घेऊनि आले. सर्वज्ञे म्हणीतले, इंद्रेया : गांवातु वार्ता काई. जी, जी कांहीं नाहीं जी. सर्वज्ञे म्हणीतले वार्ता कैसी नाहीं, राज्यांतर जाले, रामदेवो रावो राजीं बैसला. आमण देवो खालि उतरीला, देवगीरी पालटीली, हा नव्हे लेकू पळतु असे, जा वार्ता शोधा. "

तसेच मी एकदा सावखेडा या स्थळीं गेलो. तेथे शिवना आणि गोदावरी या नद्यांचा संगम आहे. जवळच संगमेश्वराचे देऊळ आहे. या देवळाला चक्रधरांनी भेट दिली आणि तेथे काही लीला केल्या. स्थानपोथीतील काही स्थळांची नावे आता बदलली आहेत. सेलवड म्हणजे आजचे सिल्लोड हे तालुक्याचे ठिकाण. तेथील वामेश्वर देवळाला आता भौमासुर म्हणतात. खडकुली गावाला किचकपाट म्हणतात, पिंपळगावला साष्टी पिंपळगाव, पिंपळवाडी हे सध्याचे तारु पिंपळवाडी, बल्हेग्राम म्हणजे बालेगाव, भोगवर्धन हे आजचे भोकरधन, यळापूर म्हणजे वेरुळ, वडवाळी म्हणजे आजचे वडोळी, हिवरळी म्हणजे आजचे जालना शहर. अशी बऱ्याच गावांची नावे बदलली आहेत.

मला नवल वाटे ते या गोष्टीचे की, महानुभावांनी स्थळांची अंतरे, त्यांच्या दिशा इतक्या अचूक कशा दिल्या. अनेक ठिकाणी मी अंतर मोजून या गोष्टीची खात्री करून घेतली. कडेठाण गावी श्रीचक्रधर जेथे उतरले त्या देवळात वायव्येला तीस पावलांवर विहीर आहे. त्यांच्या आसनापासून विहिरीचे अंतर मी पावले टाकीत मोजून पाहिले ते स्थानपोथीतील वर्णनाशी अचूक जुळले. तोच प्रकार सिल्लोडच्या वामेश्वर देवळासमोरील विहिरीचा. पैठण या गावचा तेराव्या शतकातील भूगोल तर केवळ स्थानपोथीतील उल्लेखांवरून तयार करता येण्यासारखा आहे.

हिवरळी म्हणजे जालना या गावी महानुभावांचा मोठा मठ आहे. महानुभाव पंथ पुढे पंजाबात व पेशावर भागात पसरला. काबूलमधील हिंदू, चक्रधराला चक्रपीर म्हणतात. तेथे त्याला जयकृष्णी पंथ म्हणतात. अनेक पंजाबी मंडळींनी

महानुभाव ग्रंथांचा अभ्यास केला. ग्रंथांची भाषा यादवकालीन मराठी असल्यामुळे ही मंडळी मराठी बोलत तेव्हा आपण डोळे मिटून घेतले की, आपण यादवकालीन महाराष्ट्रात वावरत आहोत असा भास होतो. हा अनुभव मला जालना, पंचाळेश्वर (बीड जिल्हा) आणि माहूर (नांदेड जिल्हा) येथील मठांतून पंजाबी महानुभावांशी बोलताना आला. माझ्याही बोलण्यात यादवकालीन मराठीची छटा डोकावू लागली. त्यामुळे घरच्या मंडळींना मोठी गंमत वाटे.

पैठण हे तर महानुभावांचे मोठे क्षेत्र. तेथील भोगनारायणाच्या देवळात श्रीचक्रधर हे कित्येक दिवस राहिले, तेथेच त्यांनी संन्यास घेतला. ते पैठणला आले ते इ. स. १२६८ मध्ये. तेथूनच त्यांच्या धर्मप्रसाराला सुरुवात झाली. पैठणला पहिल्याच दिवशी त्यांनी नागांबिकेला दर्शन दिले. हीच ती त्यांची शिष्या बाइसा. पुढे पैठणलाच मूर्धादित्याच्या देवळात श्रीचक्रधरांच्यावर चौकशीचा प्रसंग ओढवला. स्थानपोथीत पैठणच्या अनेक स्थळांची वर्णने आहेत. भोगनारायण, भैरव, पार्वती-सोमनाथ, महालक्ष्मी, शिवमंदिर, विनायक मंदिर, छायागोपाळ जनार्दन, निंबादित्य, मल्लिनाथ, मुक्तेश्वर, प्रयागमाधव, नागनाथ, कालिका, ओंकारमांधात, मूर्धादित्य, खंडनाथ, सिद्धनाथ, खोलेश्वर, केदार, उग्रादित्य, म्हाळसा, ढोरेश्वर, पिंपळेश्वर, नारायण, एकवीरा, चक्रपाणी, अमरेश्वर, गर्गनारायण, चांगदेव, कामाक्षी, रामनाथ, वैजनाथ इत्यादि देवळांचे उल्लेख आपल्याला आढळतात.

मी पैठणला अनेक वेळा गेलो. एकनाथांचे दर्शन घेतले की मी स्थानपोथीतील उल्लेखिलेल्या देवळांचा छडा लावीत असे. माझे मित्र आणि जिल्हा लोकल बोर्डाचे चिटणीस सीतारामपंत याडकीकर हे मोठे उत्साही गृहस्थ. अनेक वेळा ते दौऱ्यात माझ्याबरोबर असत. पैठणमधील काही देवळे अद्याप शिल्लक आहेत. चक्रपाणींच्या देवळाच्या जागी मशीद उभी होती. गोदावरीच्या प्रवाहाने ती मशीदही ढासळली असून तिच्या नुसत्या भिंती उभ्या आहेत. कालाय तस्मै नमः । नागघाटाजवळ दुर्गादेवीची दोन देवळे होती. स्थानपोथीतील वर्णनाप्रमाणे एक तो " तुर्कीचे आवारांतु पडली " आणि दुसरे देऊळ " तियेचा घुमट केला. " रेणुकादेवीचे देऊळ म्हणजे आज मौलाना साहेबाचा दर्गा झाला आहे. भोगनारायणाच्या देवळापाशी मी, याडकीकर आणि लोकलबोर्ड इंजिनीयर भालचंद्र लेले असे उभे राहून पैठणच्या दिशेने पाहात होतो. तेराव्या शतकात गजबजलेली ब्राह्मणआळी आता अगदी उद्ध्वस्त होती. वस्ती आता नाथ मंदिराच्या बाजूने सरकली आहे. उद्ध्वस्त ब्राह्मणआळीच्या जागी घरांचे ओटे

दिसत होते. मी याडकीकरांना म्हटले, ब्राह्मणआळी कशी दिसत असेल याची कल्पना येणे कठिण आहे. पण एक घर तरी कोठे असेल हे आपल्याला शोधता येईल. मी लीळाचरित्र काढले. यादव राजांचा भांडारिक गदाधर ऊर्फ गदोनाईक यांचे घर पैठणला होते. त्यांच्या आळीत मायलेकीचे एक घर होते. तेथे चक्रधर गेले होते. "गदोनायेकाचिए ब्रह्मपुरीये मायेधुवांचा आवारु" मी माझ्या मित्रांना म्हटले, "बघा समोरच्या उद्‌ध्वस्त भागात महानुभावांचा एखादा ओटा सापडतो का" आम्ही घरांचे अवशेष, चौथरे, इत्यादीतून वाट काढीत गेलो. तो काय आश्चर्य. आम्हांला महानुभावांचा ओटा सापडला. त्यामुळे गदोनायकाची आळी आणि मायधुवांचा म्हणजे मायलेकींचा आवारू यांचा आम्हांला पत्ता लागला. धन्य आहे महानुभावांची.

मी पैठणला गेलो आणि भोगनारायणाच्या देवळापाशी उभा राहिलो, की माझे भान हरपल्यासारखे होई. तेराव्या शतकातील पैठण माझ्यासमोर उभे राहिल्यासारखे वाटे. श्रीचक्रधर, महदाश्रम, ब्रह्मसानू, नागदेव, माइंतेहरि, गदोनाइक भांडारी, महादाइसा, बाइसा, उमाइसा, पुराणिक सारंग पंडित, त्याची मुलगी धानाइसा, देवळातील गुरव, पुजारी, शंखिये, नर्तकी आणि तिचे साजिंदे, शेतकरी, मोळीविके, अशी एक की दोन कितीतरी पात्रे आपली सुखदुःखे सांगत, डोळ्यांसमोरून सरकत. इतका मी त्या काळच्या महाराष्ट्र जीवनात समरस होऊन गेलो होतो. औरंगाबादेत काम करण्याचा योग आला, त्यामुळे मला महानुभाव वाङ्मयाचा परिचय झाला हे मी माझे भाग्य समजतो.

हाय, महानुभावांच्या वाङ्मयात उभा राहिलेला महाराष्ट्र हा तेराव्या शतकाच्या अखेरचा होता. इ. स. १२९५ मध्ये अलाउद्दीन खिल्जीने महाराष्ट्रावर स्वारी केली. त्यानंतर लागोपाठच्या स्वाऱ्या झाल्या आणि इ. स. १३१७ मध्ये यादवांचे राज्य संपुष्टात आले. खिलजी, तुघलख आणि बहमनी यांच्या राजवटीत महाराष्ट्राचे जीवन पार बदलून गेले.

औरंगाबादेच्या माझ्या वास्तव्यात महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींशी माझा परिचय झाला. महामहोपाध्याय पोतदार यांची प्रथम ओळख तेथेच झाली. पैठणच्या एका समारंभात फाटक, पोतदार, आमचे शिक्षणमंत्री फूलचंद गांधी आणि मी असे एकत्र आलो. याच सुमारास आम्ही श्रीज्ञानेश्वरांचे आपेगाव पाहिले. ज्ञानेश्वरांचे मंदिर पाहून मला काय वाटले हे शब्दांत वर्णन करणे अशक्य आहे. "रविबिंबासम पाउल पहिले, ज्ञानेशांचे जिथे उमटले" ते स्थळ मी डोळे भरून पाहात होतो. श्रीएकनाथांच्या वाङ्मयाचा अभ्यास माझा झाला तो माझे मित्र बळवंतराव घाटे यांच्या सहवासाने. माझे मन

अध्यात्मात रमत नाही. पण नाथकालीन समाजदर्शन या दृष्टीने मी नाथ-वाङ्मयाचा अभ्यास केला. भावार्थ-रामायण, भारुडे इत्यादि ग्रंथ माझ्या वाचनात आले. गंगापूर, कायगावटोके, प्रवरासंगम आणि तेथील मुक्तेश्वराचे देऊळ ही मी अनेकदा पाहिली. वेरूळ, अजंठा, पीतळखोरे, भोकरदन येथील लेणी तर मी दहाबारा वेळा तरी पाहिली असावीत. ती पाहून मी धन्य झालो. त्या लेण्यांनी मला बौद्धकालात नेऊन सोडले.

कैलास लेण्याचे वर्णन करताना तत्कालीन एका लेखात म्हटले आहे की, खऱ्या कैलासाकडे जाण्यास निघालेले एक गंधर्व जोडपे वेरूळचा कैलास हाच कैलास असे समजून खाली उतरले. कैलास कोरून झाल्यावर शिल्पकार स्वतःच म्हणू लागले की, अहो ही कृती याच हातांनी घडविली असेल काय ? वेरूळ-अजंठ्याच्या निमित्ताने मी यजदानी आणि बर्गेस यांचे वेरूळ-अजंठ्यावरील ग्रंथ वाचून काढले. समर्थांचे जांबही मी पाहून घेतले.

मी औरंगाबादेस असताना बालगंधर्व आपली कंपनी घेऊन आले होते. इ. स. १९२२ मध्ये पुण्याला किर्लोस्कर थिएटरमध्ये मी प्रथम त्यांना पाहिले होते ते मृच्छकटिक नाटकातील वसंतसेनेच्या वेषात. औरंगाबादेस त्यांच्या आग्रहाने मी विद्याहरण, सौभद्र ही नाटके पाहिली. सौभद्रात त्यांनी अर्जुनाचे काम केले. गोहरबाई सुभद्रा झाल्या होत्या. विद्याहरणातील त्यांचे देवयानीचे काम मी पाहिले. या उतारवयातील त्यांची ती भूमिका पाहून मला अतिशय वाईट वाटले. समोर बालगंधर्व देवयानीच्या वेषात वावरत होते आणि मी डोळे मिटून माझ्या लहानपणी पाहिलेल्या त्यांच्या वसंतसेना, सिंधू, रुक्मिणी या भूमिका आठवत होतो.

ख्वाब था जो कुछ के देखा
जो सुना अफसाना था

कवी यशवंत हेही त्या काळात औरंगाबादेस येऊन गेले. त्यांच्याबरोबर दोनतीन तासपर्यंत काव्यचर्चा करण्याचा योग आला. १९५२ च्या जानेवारीत मुंबईचे मुख्य मंत्री बाळासाहेब खेर हे पैठणला आले. त्यांच्याबरोबर बाळासाहेब भारदे आणि डॉ. पी. एम. जोशी हे होते. बाळासाहेबांना मी सूफी साहित्य आणि संत वाङ्मय याची माहिती दिली. माझे श्वशुर प्राध्यापक श्री. त्र्यं. पुणतांबेकर आणि बाळासाहेब हे इ. स. १९२५ च्या सुमारास मुंबईच्या नॅशनल कॉलेजच्या कार्यकारिणीवर होते. ती आठवण त्यांनी सांगितली. नाथ-मंदिरात मी नाथांचे वाङ्मय एकत्र ठेवले होते. त्या ग्रंथालयाचे उद्घाटन बाळासाहेबांच्या हस्ते झाले.

माझे श्वशुर बाबासाहेब पुणतांबेकर हे १९४६ मध्ये बनारस सोडून नागपूरला आले होते. नागपूर विद्यापीठात राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९५२ मध्ये ते फेब्रुवारीच्या बारा तारखेस लखनौ विद्यापीठाच्या एका सभेला हजर राहण्यास निघाले. नागपूर आणि काटोलच्या दरम्यान गाडीतच त्यांना हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच मी आणि उषा ताबडतोब नागपूरला गेलो. माझे मित्र प्राध्यापक रानडे (नागपूर विद्यापीठ) हे बाबासाहेबांचे विद्यार्थी. त्यांनी या प्रसंगी अतिशय श्रम घेतले.

बाबासाहेबांचा विद्येचा सतत व्यासंग, त्यांची निर्भीड विचारसरणी आणि अमोघ वक्तृत्व इत्यादि गुणांचा माझ्या आयुष्यावर अतिशय परिणाम झाला आहे. त्यांच्या खासगी ग्रंथालयात पाच हजारांच्यावर पुस्तके होती. माझ्या ज्ञानोपासनेत मी सतत त्यांचाच आदर्श माझ्या डोळ्यांसमोर ठेवीत आलो आहे. निजामी राजवटीत मी तालुक्यातालुक्यांतून हिंडत असता माझ्या सांगण्यावरून त्यांनी कितीतरी इंग्रजी पुस्तके आपल्या ग्रंथालयातून काढून माझ्याकडे पाठविली, त्यांच्या प्रभावामुळेच त्या काळात माझा व्यासंग टिकून राहिला, असेच मला वाटते. बाबासाहेबांनी अनेक ग्रंथ लिहिले. नागरिक नीती, इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास, खादीचे अर्थशास्त्र, आशियाची वाढती संघटना हे त्यांचे इंग्रजी ग्रंथ सर्वमान्य झाले आहेत. औरंगाबादेस माझे सूफी परंपरेवर भाषण झाले त्यावेळीं बाबासाहेब हजर होते. भाषणानंतर ते उषाला म्हणाले, " जावईबुवा आमच्या जोडीला आले. " हे त्यांचे उद्‌गार ऐकून मला अतिशय समाधान वाटले. माझा इतिहासावरील एखादा ग्रंथ प्रसिद्ध झाला किंवा माझे एखाद्या ऐतिहासिक विषयावरील व्याख्यान गाजले, की माझ्या मनात एकच विचार येतो, " बाबासाहेब आज असते तर " आणि मग आतून कालवाकालव होते. पुण्याला भांडारकर इन्स्टिटयूटपाशी त्यांनी स्वतःसाठी बंगला बांधला होता. पण त्यात त्यांना एक दिवससुद्धा राहाणे लाभले नाही.

पैठणला नाथांच्या समाधिमंदिरात मी बाळासाहेब खेरांच्या हस्ते ग्रंथालयाचे उद्‌घाटन करविले, त्यावेळेपासून माझे लक्ष वाचनालये स्थापन करण्याकडे वळले. औरंगाबादेस समाजसेवक संघ ही संस्था होती. या संस्थेत गणपतराव वैद्य, विमलाबाई टाकळकर, प्राध्यापक चिखलीकर इत्यादि मंडळीं होती. माझी पत्नी उषा ही या समाजसेवा मंडळाची अध्यक्ष होती. संस्थेपाशी पंचवीस हजार रुपयांचा निधी होता. तो कोणत्या कामात खर्च करावयाचा याचा ही मंडळी विचार करीत होती. मला कल्पना सुचली की, या निधीतून आपण

हजारोंनी पुस्तके मागवावी आणि शंभर शंभर दीडदीडशें पुस्तकांचे सेट करावे आणि शहरे आणि खेडी यांतून ते सेट ठेवून वाचनालये स्थापन करावी. सेटची किंमत स्थानिक लोकांनी भरावयाची. ती रक्कम समाजसेवा संत्रात जमा करण्यात येई. माझे मित्र चिखलीकर हे मिलिंद महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक होते. ते मोठे उत्साही आणि सौजन्यशील गृहस्थ. ते पूर्वी सिद्धार्थ कॉलेजात प्राध्यापक होते. ते मुंबईचे असल्यामुळे त्यांचा मुंबईच्या अनेक संस्थांशी परिचय होता. गोंड जमातीवरील माझ्या " अमंग दि गोंडस ऑफ आदिलाबाद " या पुस्तकाची दुसरी आवृत्ती, मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशनने काढली. हे काम चिखलीकरांच्या प्रयत्नाने झाले. चिखलीकर हे हिशेबात अतिशय चोख. त्यांनी मुंबईतील पुस्तकविक्रेत्यांशी संपर्क साधून पंचवीस हजार रुपयांस चाळीस हजार पुस्तके मागविली. खेड्यापाड्यांतून वाचनालये स्थापन करण्यासाठी मी माझ्या सरकारी कामाच्या दौऱ्यात चिखलीकरांना बरोबर घेत असे. कधी कधी मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य चिटणीस हेही आमच्या बरोबर असत. माझ्या जीपमध्ये पुस्तकांचे गठ्ठे असत. खेड्यात पोहोचल्याबरोबर आम्ही गावकऱ्यांना गोळा करून त्यांना पुस्तकांचे महत्त्व पटवून देत असू आणि गावातील शाळेचा शिक्षक आणि गावप्रमुख यांची एक कमिटी स्थापन करीत असू. पुस्तके शाळेत ठेवण्यात येत.

१९५२ चे पहिले सहा महिने मी ठिकठिकाणी वाचनालये स्थापन करीत होतो. त्या सहा महिन्यांत दीडशे वाचनालये उघडली गेली. औरंगाबाद शहरात मी मुलांसाठी अकरा वाचनालये स्थापन केली. गुजराती मंडळींसाठी मी मुंबईहून गुजराती पुस्तके मागविली आणि त्यांच्या आळीत एक वाचनालय स्थापन केले. शायिस्ताखानाच्या मशिदीत मी उर्दू वाचनालय सुरू केले. पनचक्कीत मी उर्दू, फारसी आणि अरबी ग्रंथांचे वाचनालय चालू केले. त्याचे उद्घाटन हैदराबाद राज्याचे सल्लागार वेलोडी, आय. सी. एस. यांच्या हस्ते झाले. औरंगाबाद शहरात टाउन हॉलच्या जुन्या इमारतीत मी ग्रंथालय स्थापन केले. त्याला पैसे कमी पडू लागले म्हणून मी क्रिकेटची फेस्टिवल मॅच ठरविली. तीत उषा क्रिकेट खेळली. मॅचच्या उत्पन्नातून मी पुस्तके मागविली. टाउन हॉलमधील ग्रंथालयाचे उद्घाटन गृहमंत्री दिगंबरराव बिंदू यांच्या हस्ते झाले. माझ्या वाचनालयांच्या प्रसारात मी सरकारी तुरुंगही सोडले नाहीत. तेथेही मी मराठी पुस्तके पुरविली. त्या पुस्तकांची यादी अद्याप माझ्या डायरीत आहे. तुरुंगात काही तेलगू भाषिक कैदी होते. त्यांच्यासाठी मी तेलगू पुस्तके मागविली. कैद्यांनी साक्षर व्हावे म्हणून मी तुरुंगात साक्षरतेचे वर्ग सुरू केले आणि साक्षर

होत गेले त्यांना अधिक वाचनाची गोडी लागावी म्हणून योग्य पुस्तके त्यांना पुरविली. सारांश माझ्या त्या सहा महिन्यांच्या प्रयत्नाने औरंगाबाद जिल्ह्याच्या खेड्यापाड्यातून कमीत कमी पन्नास हजार तरी मराठी पुस्तके पसरली असावीत. औरंगाबादमधील माझ्या एक वर्षाच्या वास्तव्यात मी एकूणतीस हजार मैल फिरलो. याच काळात माझी निरनिराळ्या विषयांवर पाचपन्नास तरी व्याख्याने झाली.

औरंगाबाद शहराच्या सुधारणेकडेही मी लक्ष दिले. शहर नगरपालिकेचा मी अध्यक्ष होतो. बरेच रस्ते मी सिमेंटचे करवून घेतले. नवीन रस्ते तयार करविले. शहागंजच्या मशिदीला लागूनच मी व्यापाऱ्यांसाठी एक मार्केट तयार करविले. मजुरांच्यासाठी किलेअर्कच्या आवारात घरे बांधविली. हिमरु आणि मश्रूचे लहानसहान धंदे औरंगाबादेत चालू होते. त्यांना मी अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या.

औरंगाबादची मंडळी अतिशय प्रेमळ. माझ्या प्रत्येक कार्यात त्यांनी उत्साहाने माझ्याशी सहकार्य केले. कै. द्वारकादास पटेल, गणपतराव वैद्य, दिलीपसिंग, डॉक्टर धारवाडकर. डॉक्टर श्रॉफ, प. वा माणिकचंद पहाडे, प्रा. थत्ते, बळवंतराव घाटे, शंभुदयाल शर्मा इत्यादि मंडळींचे मला सतत सहकार्य लाभत गेले. उषानेही समाजसेवा संघ, महिला मंडळ, बालक मंदिर इत्यादि संस्थांच्या कामाला चांगलीच चालना दिली.

वाचनालयाच्या कामावर खर्च झालेले पंचवीस हजार रुपये समाजसेवा संघाला परत मिळाले. माझे उत्साही आणि तडफदार मित्र माधवराव पळनिटकर, आय. ए. एस. हे त्यावेळी जालन्याला डेप्युटी कलेक्टर होते. त्यांनी ग्रामीण भागांत रेडिओ सेट्स ठेवण्याची योजना मांडली. ती मला पसंत पडली. पळनिटकरांनी समाजसेवा संघाच्या निधीतून एकुणचाळीस रेडिओसेट मुंबईहून आणले. ज्या खेड्यांतून त्यांना मागणी होती तेथे ते सेट देण्यात आले. त्यांच्या किमती वसूल करण्यात येऊन ती रक्कम समाजसेवा संघाच्या निधीत जमा करण्यात आली.

१९५२ च्या जून महिन्यात माझी औरंगाबादेहून बदली झाली. हैदराबाद येथील रेव्हेन्यूबोर्डाचा सेक्रेटरी म्हणून माझी नेमणूक झाली.

अकरा जून १९५२ रोजी मी हैदराबादेस आपल्या नव्या कामाचा चार्ज घेतला.

औरंगाबादेत मी एक वर्षात जे काही काम करू शकलो त्याचे मला अत्यंत समाधान वाटते. शहरसुधारणा, सूफीपंथाचे संशोधन, महानुभाववाङ्मयाचा

अभ्यास, दीडशे वाचनालयांची स्थापना इत्यादि कामांत मी वर्षभर झटत होतो. मराठवाड्यातील दिलदार आणि प्रेमळ जनतेचा मला जो परिचय लाभला त्यामुळे त्या समाजपुरुषाचे मला मोठे हृद्य दर्शन घडले. त्याची सेवा करण्यातच मला साफल्य लाभले. ती आठवण ही मी आपली अमूल्य ठेव समजतो.

१८

हैदराबाद
१९५२ ते १९५६

१९५२ च्या अकरा जून रोजी मी रेव्हेन्यू बोर्डाचा सेक्रेटरी म्हणून हैदराबाद येथे कामाचा चार्ज घेतला. आमचे महसूलमंत्री कोंडावेंकट रंगा रेड्डी हे होते. महसूल खात्याचे सचिव माझे मित्र अब्दुल्ला हे होते. माझ्याप्रमाणे तेही आय. ए. एस. मध्ये निवडून आले होते. रेव्हेन्यू बोर्डाचे प्रमुख मद्रासचे एक अधिकारी सुब्बाराव हे होते. त्यांचे वय साठच्या जवळपास असावे. पण त्यांच्या इतका मेहनती माणूस मी क्वचितच पाहिला असेल, कामाचे डोंगर कसे पाडावे हे खरे म्हणजे आम्हां हैदराबादच्या अधिकाऱ्यांना बाहेरच्या लोकांनी शिकविले. हैदराबादच्या सरकारी कामकाजात बराच ऐसपैसपणा असे. हिंदू अधिकाऱ्यांना वाटे, की आपण कितीही काम केले तरी आपल्याला बढती मिळणे शक्य नाही, मग काम करायचे तरी कशाला ? मुसलमान अधिकाऱ्यांना वाटे आपण काही काम केले नाही तरी आपल्याला बढती ही मिळाल्याशिवाय राहात नाही; मग काम कशाला करा ? आपले काम व्यवस्थितपणे करणारे अधिकारी नव्हते असे नाही. पण

त्यांचे प्रमाण फार थोडे होते.

पण आता परिस्थिती पालटली होती. हैदराबादच्या अधिकाऱ्यांना सपाटून काम करावे लागे. इंग्रजी न येणाऱ्या अधिकाऱ्यांची तारांबळ उडे, पण अशांची संख्या सेवानिवृत्तीमुळे झपाट्याने कमी होऊ लागली. रजाकार राजवटीने केलेले आघात आता बुजत चालले होते. प्रमुख अधिकारी आणि रजाकार यांच्यावर खटले चालू होते. पण जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे लोक या खटल्यांकडे सौम्य दृष्टीने पाहू लागले. जुन्या राजवटीतील बरेच मंत्री, अधिकारी आणि रजाकार पुढारी हे पळून गेले होते. लायक अली, यामीन झुबेरी, इकामुल्ला, मुईन नवाज जंग हे मंत्री पाकिस्तानला निघून गेले होते. मीर नवाज जंग हे हैदराबाद सरकारचे लंडनमधील एजंट. ते पॅरिसमधे स्थायिक झाले. कासिम रजवी अद्याप हैदराबादच्या तुरुंगात होता. त्याचे काही सहकारी तुरुंगात खितपत पडले होते. हैदराबादचे अनेक अधिकारी त्यांच्या खटल्याचे निकाल लागेपर्यंत निर्बंधात होते. त्यांपैकी काहीजण खटले संपल्यानंतर आय. ए. एस. मध्ये निवडून आले आणि मोठ्या अधिकारावर चढले. काहीजण सेवानिवृत्त होऊन पेन्शन उपभोगू लागले. फार काय अधिकाऱ्यांच्या पैकी जे मंत्री झाले होते त्यांनाही पेन्शनी मिळू लागल्या. काहींना त्यांच्या नोकऱ्या सुटल्यानंतर हैदराबादेत किंवा परदेशांत मोठ्या नोकऱ्या मिळाल्या. माझा मित्र मुअज्जम हुसेन याची हकीकत विलक्षणच म्हटली पाहिजे. तो नलगोंडा जिल्ह्याचा कलेक्टर असताना त्या जिल्ह्यांत अनेक अत्याचार झाले होते. आपण त्या त्या ठिकाणी हजर असून आपणच ते घडवून आणले अशी प्रौढी मुअज्जम हुसेनने सरकारात पाठविलेल्या डायऱ्यांतून मिरविली होती. हेतू हा की, रजाकार राजवटीत आपले महत्त्व वाढावे. खटल्यात खालच्या कोर्टाने त्याला मृत्यूची शिक्षा फर्माविली ती त्या डायऱ्यांच्या आधारावर. वरील कोर्टात मुअज्जम हुसेनने अपील केले. त्यात कोर्टाला आढळून आले की, डायऱ्यांतील नोंदी खोट्या होत्या. अत्याचारांच्या ठिकाणी मुअज्जम हुसेन हजरच नव्हता. मग फक्त लबाड वागणुकीच्या आरोपावरून त्याला कोर्टाने कामावरून काढून टाकले. मुअज्जम हुसेन आता पॅरिसला युनेस्कोच्या कचेरीत असून त्याला महिन्याचे उत्पन्न पाचसात हजारांचे आहे.

उस्मानाबादचा कलेक्टर महंमद हैदर याच्या काळात उस्मानाबाद जिल्ह्यात पठाण लोकांनी बरेच अत्याचार केले होते. पेशवाईतील गारदी लोकांप्रमाणे हे पठाणही शिरजोरीने वागत. ते कलेक्टरसमोर टेबलावर पाय ठेवून सिग्रेट ओढीत. महंमद हैदरला विचारीत, 'क्या तालुकदार, क्या हाल है?' महंमद हैदरने आपला खटला चालविण्यासाठी लंडनहून बॅरिस्टर आणला होता.

त्याला नोकरीतून काढून टाकण्याची शिक्षा देण्यात आली. पुढे तो निजामाच्या खाजगीत अधिकारी झाला. आज हैदराबादच्या सधन लोकांत त्याची गणना आहे.

फखरुद्दीन मसूद हा पूर्वीच्या राजवटीत अबकारी खात्याचा कमिशनर होता. अधिकाऱ्यांवरील खटल्यांसाठी सरकारने एक ट्रायब्यूनल नेमून त्यावर कर्नल रहमान यांची नेमणूक केली होती. खटल्याच्या वेळीही फखरुद्दीनचा पीळ कायम होता. कर्नल रहमानला म्हणावे लागले की, हे गृहस्थ जुन्या राजवटीत जसे वागत तसेच आजही माझ्या समोर वागत आहेत. फखरुद्दीनला सेवानिवृत्त करण्यात आले. आज तो एका मोठ्या कंपनीत असून सुस्थितीत आहे. बऱ्याच लोकांना मात्र हलाखीच्या स्थितीत दिवस काढावे लागले.

हैदराबादेतील अनेक हिंदू आणि मुसलमान मंडळी पुढे देशात मोठ्या पदावर पोहोचली. अलीयावर जंग हे जुन्या राजवटीत मंत्रिपदापर्यंत चढले होते. रजाकारांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी राजीनामा दिला होता. ते आता अमेरिकेत आपले वकील आहेत. मेहदीनवाज जंग हे राष्ट्रीय वृत्तीचे. जुन्या राजवटीत ते सचिवपदापर्यंत पोहोचले, नंतर ते गुजरातचे राज्यपाल झाले. पद्मजा नायडू या हैदराबादच्या. परवा परवापर्यंत त्या बंगालच्या राज्यपाल होत्या. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

१९५३ च्या फेब्रुवारी महिन्यात माझी नेमणूक शिक्षणखात्याचा संचालक म्हणून झाली. वीस वर्षे मी रेव्हेन्यू खात्यात काम केल्यावर माझा त्या खात्याशी संबंध सुटला तो सुटलाच. शिक्षणखात्यावर माझी नेमणूक शिक्षण मंत्री फूलचंद गांधी यांच्या सल्ल्याने झाली. आठ मे १९५३ रोजी हैदराबादेत मराठवाडा साहित्य परिषदेचे पाचवे अधिवेशन भरले. परिषदेचा अध्यक्ष म्हणून माझी निवड करण्यात आली. स्वागताध्यक्ष होते फूलचंद गांधी. ते नुकतेच शिक्षण-मंत्र्याच्या पदावरून निघाले होते. त्यांच्या जागी श्री. देवीसिंग चव्हाण (आता सभासद, महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशन) हे शिक्षणमंत्री झाले. माझ्या आयुष्यात मला साहित्य संस्थेचे अध्यक्षपद लाभले, ते एकदाच आणि ते म्हणजे मराठवाडा साहित्यपरिषदेचे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मी म्हटले,

"मराठवाडा साहित्य परिषदेच्या या पाचव्या अधिवेशनासाठी आपण माझी अध्यक्ष म्हणून निवड केली याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. गेल्या पंधरा वर्षांत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठी वाङ्मयाच्या निरनिराळ्य क्षेत्रांत जी काही थोडीफार सेवा करण्याचे भाग्य मला लाभले, त्याबद्दल कौतुक

आणि प्रोत्साहन म्हणून आपण या अध्यक्षपदाचा हा बहुमान मला दिला हे उघड आहे.

"१९३७ मध्ये मराठवाडा साहित्य परिषद स्थापन झाल्यापासून आतापर्यंत अवघी चारच अधिवेशने भरावीत यावरूनच त्या काळात मराठी भाषेच्या जोपासनेला आणि संवर्धनाला किती अडचणी येत होत्या याची कल्पना येईल. मराठवाड्यातील साहित्याची गती ही मराठवाड्यातील गेल्या दीडशे वर्षांच्या समाजस्थितीची निदर्शक आहे. इ. स. १७२४ मध्ये दक्षिणेत राजकीय क्रांती होऊन एका स्वतंत्र राजवटीची जेव्हा स्थापना झाली, तेव्हापासूनचा काळ घेतला तर महाराष्ट्रातील मराठ्यांच्या चढत्या आणि उतरत्या वैभवास अनुसरूनच मराठवाड्यातील समाजाचे महत्त्व कमी अगर अधिक होते हे इतिहासाच्या अभ्यासकांस सांगणे नकोच. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत निजामाच्या राजवटीला सर्वात मोठे संकट मराठ्यांच्याकडून होते. निजामाच्या राज्यात अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत तरी वऱ्हाड, महाराष्ट्रातील नगर, नाशिक, सोलापूर, पूर्व व पश्चिम खानदेश या भागांचाही समावेश होत असल्यामुळे या राजवटीतील महाराष्ट्रीय जनता ही बहुसंख्य होती हे उघड आहे. अठराव्या शतकात निजामाचे मराठ्यांशी हर्षामहर्षांचे अनेक प्रसंग उद्भवले. त्यामुळे निजामराज्यातील मराठे सरदार, शिपाई, मुत्सद्दी व इतर गुणी माणसांची कदर करणे हे निजामी राज्यकर्त्यांना आवश्यक होऊन बसले. दक्षिणेत मराठे हे जमीनदार आहेत, त्यांना कोणत्याही प्रकारे दुखवू नये अशा प्रकारचा आदेश निजामुल्मुल्क आसफजहा याने आपला मुलगा नासिरजंग यास दिल्याचे प्रसिद्ध आहे.

"सतराशेचोवीस ते अठराशे या कालखंडात मराठ्यांचे वजन दक्षिणच्या दरबारात किती होते याची साक्ष अनेक सरदार घराणी देतात. चंद्रसेन जाधव, रामचंद्र जाधव, रावरंभा निंबाळकर, सुल्तानजी. निंबाळकर, जानोजी निंबाळकर, सरदार आटोळे, विठ्ठल सुंदर प्रतापवंत इत्यादि सरदारांचे येथील दरबारात आणि राजकारणात इतके वजन होते की, त्यांच्या सल्लामसलतीशिवाय येथे पानही हलत नव्हते. मुत्सद्यांपैकी एकेकाळी हैदराबादचे पंतप्रधान बनलेले शामराज रायरायान, तत्कालीन राजकारणात महत्त्वाचा भाग घेणारे गंगाखेडचे राजराजेंद्र रघोत्तमराव इत्यादींची नावे आपल्याला आढळून येतात. पुणे रेसिडेन्सीचा अलीकडे प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार पाहाता येथील दरबारात मराठ्यांशी स्नेह-संबंध राखण्याच्या धोरणाचा पुरस्कार करणारा एक पक्ष तरी काही दिवस अत्यंत प्रबल होता हे उघड दिसून येईल. पुण्याचे रेसिडेन्ट सर चार्लस मॅलेट

यांच्या पत्रव्यवहारावरून हैदराबाद हे मराठ्यांचे मांडलिक झाले होते आणि या स्थितीत बदल होऊ न देण्याबद्दल मराठे डोळ्यात तेल घालून योजना करीत असे दिसून येईल. मराठवाड्यांतील परगण्यापरगण्यातून मराठ्यांचे वकील हैदराबादच्या दरबारात आपले वर्चस्व गाजवीत, हे तत्कालीन राजकारणाच्या अभ्यासकांस माहीतच आहे. हे सर्व सांगण्याचा उद्देश हा की, मराठ्यांचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात होते तोपर्यंत हैदराबाद राज्यातील महाराष्ट्रीय समाजाचे स्थान राजकारणात, मुत्सद्देगिरीत, आणि इतर प्रकारच्या सामाजिक क्षेत्रात गौरवाचे, मानाचे आणि धडाडीचे होते. मराठी ऐतिहासिक कागदपत्रे महाराष्ट्रात, मध्यभारतात, गुजरातेत आणि इतर ठिकाणी हजारोंनी व लाखोंनी आता उपलब्ध झाली आहेत. या बाबतीत मराठवाड्याचा वाटा उपेक्षणीय खास नाही. दप्तर दीवाणीमालच्या खात्यात उपलब्ध असणाऱ्या मराठी कागदपत्रांची संख्या पाच सहा लाखांपर्यंत जाऊ शकेल यात शंका नाही. हैदराबादेतील प्रमुख साहित्यिक व संशोधक श्री. र. मु. जोशी यांच्या प्रयत्नाने 'सनपुरीची बखर' ही अलीकडे प्रसिद्ध झाली आहे. गंगाखेडच्या घराण्यातील कागदपत्रे हजारोंनी मोजण्याइतकी आता सरकारी दप्तरात दाखल झाली आहेत. या व इतर घराण्यांच्या कागदपत्रांचे निवडक भाग प्रसिद्ध करण्यात आले तर महाराष्ट्रातील अठराव्या शतकातील गद्य वाङ्मयात बहुमोल भर पडेल हे निश्चित. औरंगाबादेस कलेक्टर म्हणून मी काम करीत असता सहज तपासणीत जाफराबादच्या नबाबाच्या कारकीर्दीत लिहिली गेलेली पानिपतची बखर माझ्या हाती पडली. तिचे संशोधन सध्या चालू आहे. याशिवाय श्रीएकनाथांच्या वंशजांपाशी शिंदे, पेशवे इत्यादींनी दिलेली कागदपत्रे फुलंब्र मुक्कामी मला आढळून आली. या सर्व कागदपत्रांचे संशोधन होणे हे मराठवाड्याच्या दृष्टीनेच नव्हे तर महाराष्ट्राच्या दृष्टीनेही आवश्यक आहे.

"इ. स. १८०० पर्यंत येथील राजकारणात आणि सामाजिक जीवनात महाराष्ट्रीयांचे स्थान टिकून होते. महाराष्ट्रातून हैदराबादेकडे आणि इकडून महाराष्ट्राकडे लोकांची सारखी ये-जा होत होती. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्रीयांत एकप्रकारचा जिवंतपणा होता हे निश्चित. १८०० च्या नंतर ही स्थिती पालटली. मराठेशाहीचा अस्त झाल्यावर महाराष्ट्रातील राजवट ही भिन्न वळणावर गेली. त्याबरोबरच मराठवाडा आणि महाराष्ट्र यांचे संबंध दुरावले. परचक्राची भीती नाहीशी झाल्यामुळे निजामाला महाराष्ट्रीय समाजाला संतुष्ट ठेवणे किंवा त्यांची आर्जवे करणे याची गरज राहिली नाही. आणि त्यामुळे इ. स. १८०० पासून १८७० पर्यंतच्या काळात मराठवाड्यातील सार्वजनिक जीवन संकुचित आणि

खुरटे बनले. सरदारांची आणि मुत्सद्यांची घराणी केवळ निष्प्रभ अशी बनली. काही देशमुख–देशपांडे इत्यादींची नावे सोडल्यास या कालखंडात प्रमुख मराठ्यांची नावे आपल्याला ऐकू येत नाहीत. या काळात काही लेखकांची, संतांची नावे आपल्याला आढळून येतात. परभणीचे हंसराज स्वामी (यांची समाधी उस्मानाबाद जिल्ह्यात परंडा येथे आहे), परंडा येथील नाथभुजंग. नांदेड भागांतील संत कवी (यांच्या वाङ्मयाचें संशोधन श्री. कानोले यांनी अत्यंत आस्थेने चालविले आहे), ही मंडळी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात होऊन गेली. मराठवाड्यातील संत वाङ्मयाच्या सतत प्रवाहाची दखल या दृष्टीने हे वाङ्मय प्रकाशित होणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सारस्वताचा आढावा घेताना मराठवाडा विभागात होऊन गेलेल्या मुकुंदराज आणि श्रीज्ञानेश्वर यांजपासून श्रीहंसराज स्वामींपर्यंतच्या कवींचा व संतांचा परामर्ष घेण्याचा शिरस्ता आहे हे योग्यच आहे. या विभूतींच्यावर केवळ महाराष्ट्राचाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानचा हक्क आहे हे निर्विवाद. पण वरील व्यक्ती सोडून दिल्या तर मराठवाड्यात इतर जे शेकडो लहानमोठे लेखक होऊन गेले त्यांची नोंद घेण्यास मराठी वाङ्मयाचे इतिहासकार हमखास विसरतात. मराठवाड्यातील साहित्यिकांना काहीसा अप्रिय असा वाटणारा हा विषय आहे हे उघडपणे सांगण्यास, मला वाटते काही हरकत नाही. नाहीतर नांदेड-परभणी विभागातील संतकवी, मराठवाड्यातील बखरकार इत्यादींचा परामर्श घेणे ही काही कठीण गोष्ट नव्हती. हे काम मराठवाड्याच्या साहित्यिकांनी आणि संशोधकांनी त्वरेने हातात घेण्यासारखे आहे. जुने कागदपत्र कालाच्या भक्ष्यस्थानी पडण्याआधीच ते एकत्र केले जाऊन त्यांचे संशोधन आणि प्रकाशन झाले तर मराठी वाङ्मयात मराठवाड्याचे स्वतंत्र दालन उघडले जाईल याबद्दल संशय नाही.

"मराठवाड्याच्या इतिहासात १८७० पासून नवीन कालखंडाला सुरुवात होते. हैदराबादचे तत्कालीन पंतप्रधान पहिले सालार जंग यांच्या प्रयत्नांमुळे राज्यकारभारात आमूलाग्र सुधारणा होऊ लागली. जमाबंदी, न्याय, पोलीस, मोजणी इत्यादि खाती अस्तित्वात आली. ही खाती चालविण्यास बाहेरून माणसे आणावी लागली. या निमित्ताने मद्रास, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब आणि महाराष्ट्र येथून तज्ज्ञ माणसे हैदराबादेस आली. रेव्हेन्यू आणि मोजणी खात्यात महाराष्ट्रीयांची नेमणूक त्या काळात मोठ्या प्रमाणात झाली. मुंबई आणि हैदराबाद यात रेल्वे मार्ग निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रातून या भागात ये-जा पुन्हा सुरू झाली आणि १८०० ते १८७० मध्ये तुटलेला महाराष्ट्र आणि मराठवाडा यातील दुवा पुन्हा सांधला गेला. शिक्षणाच्या निमित्ताने एकोणिसाव्या शतकाच्या

शेवटच्या दशकात हैदराबादेतील बरीच मुले पुणे, मुंबई या भागात गेली. तेथे शिक्षण घेतल्यानंतर ही मंडळी महाराष्ट्रातील शिक्षण, समाज, राजकारण या क्षेत्रांत सुरू असलेल्या चळवळीचे लोण घेऊन आली. त्यांच्यामुळेच मराठवाड्यातील सार्वजनिक जीवनाला चालना मिळाली हे उघड आहे. अशा रीतीने मराठवाड्यात नवीन रक्त संचारू लागले. तत्कालीन राजकारणाची चौकट सांभाळून सार्वजनिक जीवन क्रियाशील करण्याचे प्रयत्न झाले. या प्रसंगी हैदराबादचे रानडे हे सार्थ नामाभिधान पावलेले, कै. न्यायमूर्ति केशवरावजी कोरटकर यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. मराठवाडा हा थंड गोळा होऊन पडला होता. त्यात ऊब आणण्याचे महत्कार्य रावसाहेब कोरटकरांनी केले, याबद्दल मराठवाडा हा सदैव त्यांचा ऋणी राहील. नूतन विद्यालय गुलबर्गा, विवेकवर्धिनी, एक्सेल्सियर मिडलस्कूल, मराठी ग्रंथसंग्रहालय, बलवंत वाचनालय औरंगाबाद, सामाजिक परिषदा, इत्यादि संस्थांच्या निर्मितीत आणि संवर्धनात रावसाहेब कोरटकर आणि कै. धर्मवीर वामनराव नाईक यांची जोडी केवळ अपूर्व अशीच ठरली.

“विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून मराठवाड्यातील सुशिक्षित वर्ग हा समाज, शिक्षण, राजकारण व वाङ्मय या क्षेत्रांत हळूहळू भाग घेऊ लागला. वाङ्मयीन प्रांतात सुरवातीची तोडेवाले, पाटील इत्यादींची नावे सोडून दिली तरी १९२० पासून बरीच नावे प्रामुख्याने चमकत असलेली आपल्याला आढळतात. सुदैवाने यांपैकी बरेच लेखक अद्यापपर्यंत वाङ्मयसेवा करीत आहेत. मराठवाड्याच्या साहित्यिकांच्या अग्रस्थानी असलेले डॉक्टर वामनराव गाडगीळ, नांदेड भागातील कवींना स्फूर्ती देणारे देवीदास लक्ष्मण महाजन, कान्त, कुळकर्णी, कृष्णाकुमार, पद्माकर, दुर्गादयाळ चंडीप्रसाद दीक्षित, श्रीकृष्ण वामन गाडगीळ, सीतारामपंत मनाठकर, बी. रघुनाथ, यशवंतराव कोरेकल, नारायणराव नांदापूरकर, इत्यादींच्या कलाकृतींनी मराठी वाङ्मयात चांगलीच भर पडली हे मराठवाड्यास भूषणावह आहे. उस्मानिया विद्यापीठात मराठीचा प्रवेश झाल्यापासून संशोधनपर कार्यही सुरू झाले आहे. महानुभाव वाङ्मयात श्री. भुसारी आणि मोरोपंत मुक्तेश्वरांच्या परिशीलनात श्री. नारायणराव नांदापूरकर यांनी भरीव कामगिरी केली आहे. आर्षविज्ञानासारख्या रुक्ष विषयात श्री. र. मु. जोशी यांनी ग्रंथरचना केली आहे. ती प्रकाशित झाल्यास मराठी वाङ्मयात एका नवीन विषयाचा प्रवेश झाल्यासारखे होईल. कथाकादंबऱ्या इत्यादि ललित-वाङ्मयाच्या क्षेत्रात बरेच होतकरू लेखक काम करीत असले तरी प्रकाशनाच्या अभावी त्यांना प्रोत्साहन मिळत नाही ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

१९४८ पूर्वी साध्यासुध्या गोष्टींतही लेखन वगैरे कामात किती अडचणी येत होत्या याची काही उदाहरणे स्वतःच्या अनुभवाने मी सांगू शकतो. पाकिटांवर मराठी पत्ते लिहिले तर ती आपल्या ठिकाणी पोहोचण्यास हटकून विलंब लागायचाच. मराठीतून मनिऑर्डरी लिहिल्या तर मनिऑर्डरी घेणाऱ्याच्या कपाळीं आठ्या पडावयाच्या. भाषणे मराठीतून केली तर राजभाषा अवगत असूनही हे मराठीतून भाषणे करतात अशी तक्रार व्हावयाची. मराठी वाचनालये स्थापन केली तर माझा वर्ग झाल्याबरोबर वाचनालयाच्या इमारतीत पोलीस खात्यातील घोडे बांधून वाचनालयाचे तवेले करण्यापर्यंत मजल गेली. मराठी वर्तमानपत्रे मागविली तर ती घरी येऊन पडण्यापूर्वी त्यांची कसून छाननी व्हावयाची. मराठी लेख बाहेर पाठविले तर पोस्ट आणि पोलीस यांच्या तावडीतून ते लेख जाऊ शकायचेच नाहीत. आणि त्या लेखांतील अर्थाचा अनर्थ करण्यात येऊन सरकारतर्फे तंबी मिळे. या सर्व दिव्यांतून मी स्वतःच पार पडलो आहे. फार काय, फलकांवर मराठी आणि उर्दू यांतून मजकूर लिहून लावला तर मराठी मजकूर वर का आणि उर्दू मजकूर खाली का ? यात राज-भाषेचा अपमान होतो अशी तक्रार करण्यापर्यंत त्या काळात मजल गेली होती. डॉक्टर वामनराव गाडगीळ यांनी आपल्या लेखनात तत्कालीन समाजाचे परीक्षण करताना उपरोधाचा जो सर्रास वापर केला त्याच्या पाठीमागे तत्कालीन परिस्थिती होती हे उघड आहे. या निमित्ताने का होईना, ‘ जदीद व कदीम गणपती ’सारखे सुंदर लेख त्यांच्या लेखणीतून बाहेर पडले असे म्हणावे लागेल.

“ मराठवाड्यातील साहित्यिकांच्या लिखाणात, जी तीक्ष्ण धार दिसते तिच्या पाठीमागे प्रतिकूल परिस्थितीमुळे उत्पन्न होणारी तळमळ होती, ‘ बंदी अशा गायनाते करोनी, गळे कापुले आमुचे हे जरी, गातील गाणी मराठी कबंधे, मराठी खुल्या माळरानावरी ’ किंवा ‘ फडफडाट पंखांचे होती, अंगी तेजोलहरी भिनती, निखाऱ्यात मम पंख करपती, तरी फुलवितो गान ’ किंवा ‘ मराठी आज कांजीहूनहि का फिकी ’ असे उद्‌गार मराठवाड्यातील साहित्यात जागोजाग आढळून येतात. मराठवाड्यातील या तळमळीची कल्पना महाराष्ट्राला इतक्या तीव्र प्रमाणात कधीच नव्हती हे सांगण्यास मला कोणत्याही प्रकारचा संकोच वाटत नाही. ‘ उर्दू भाषा शिकण्याचा मोठा प्रसंग लाभला आहे; त्याचा योग्य उपयोग करून घ्या ’ अशा प्रकारचे उपदेश करणारे जेव्हा करीत होते तेव्हा खुद्द मराठवाड्यात मराठी भाषेला, ज्ञानेश्वरांच्या, एकनाथांच्या, आणि समर्थांच्या मराठी भाषेला किती संकटे येत होती याची कल्पनाच केलेली बरी.

" नाथ, तुम्ही आपल्या काळी मराठीला अमृतमय करून सोडले. संत, कवी, आणि उदार गृहस्थ असा आदर्श जगापुढे ठेवलात. आज मराठी पोरकी झाली आहे. ' अक्षरे तुम्हाविण कोण करील वज्राची ' असे निराश उद्गार कुणाचेही हृदय पिळवटून टाकतील अशी परिस्थिती त्या काळी होती.

" बंधुभगिनींनो, सुदैवाने या गोष्टी आता गत झाल्या आहेत. आता मराठवाड्यात मराठी हक्काने वावरत आहे. मराठी माध्यमातून मुलामुलींना शिक्षण मिळण्याची सोय आता उपलब्ध झाली आहे. आता मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या संवर्धनात कोणत्याही प्रकारच्या अडचणी राहिल्या नाहीत. साहित्यपरिषदेने आता जोमाने काम करण्यास काही हरकत नाही. गेल्या एका वर्षात साहित्यपरिषदेच्या बऱ्याच शाखा उघडल्या गेल्या. शेकडोंनी सभासद नोंदवून घेण्यात आले. सरकारतर्फे आर्थिक सहाय्य मिळाले. साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्या व्यक्तींना शिक्षण खात्यातील निरनिराळ्या समित्यांतून घेण्यात आले आहे. यावरून सरकारचे किती सहकार्य या कामास लाभत आहे याची कल्पना येईल. साहित्यपरिषदेच्या येत्या वर्षाच्या कार्यक्रमात सभासदांची मोठ्या संख्येने नोंद, तालुकानिहाय शाखांचे उद्घाटन, ऐतिहासिक कागदपत्र गोळा करण्याची मोहीम, वाचनालयांचा प्रसार आणि योग्य वाङ्मयाचे प्रकाशन यांचा समावेश करणे आवश्यक आहे. वाचनालयाच्या प्रसारासंबंधी औरंगाबाद जिल्ह्यात कलेक्टर म्हणून काम करीत असता मला आलेला अनुभव मी आपल्यासमोर मांडणार आहे.

औरंगाबादेत प्रौढांची वाचनालये चांगल्या स्थितीत नव्हती. त्यांची कारण-मीमांसा करताना लहानपणी वाचनाची सवय न लागल्यामुळे, प्रौढ वाचकवर्ग या वाचनालयांचा उपयोग करण्याचा कंटाळा करतो; असे मला दिसून आले. त्यामुळे बालवाचनालये स्थापन करणे हे जास्त सोयीचे होईल, हा विचार करून मी समाजसेवासंघाच्या निधीमधून पहिले बालवाचनालय औरंगाबादेस उघडले. ते अत्यंत यशस्वी झाले. त्यामुळे खेड्यापाड्यांतून असा प्रचार करण्याची कल्पना मला सुचली. मुंबईच्या प्रमुख पुस्तकविक्रेत्यांशी पत्रव्यवहार करून मी एकंदर चाळीस हजार पुस्तके मागविली आणि त्यांचे पाचशे, चारशे, तीनशे आणि दोनशे पुस्तकांचे असे चार भाग करून योग्य ती किंमत आकारून त्यांचा प्रसार खेडोपाडी केला. मला सांगण्यास अत्यंत आनंद वाटतो की पाच-सहा महिन्यांच्या आत औरंगाबाद जिल्ह्यात खेड्यापाड्यांतून दीडशे वाचनालये स्थापन झाली. आणि समाजसेवासंघाने या कामी खर्च केलेल्या पंचवीस हजार रुपयांपैकी जनतेने ही पुस्तके घेऊन चोवीस हजार रुपये परत केले. मी आणखी

काही दिवस औरंगाबादेस राहिलो असतो तर एक लाखापर्यंत पुस्तके मागवून चारशेपर्यंत बालवाचनालये स्थापन केली असती.

हैदराबादेस मी बदलून आल्यावर दोन हजार तेलुगू पुस्तके मागवून मी हैदराबाद जिल्ह्यात दहा वाचनालये चालू केली. सामुदायिक योजना (कम्युनिटी डेव्हलपमेंट) आपल्या राज्यात निजामाबाद, तुंगभद्रा आणि मुलुग येथे चालू आहेत. त्यांपैकी तुंगभद्रा भागात सरकारी निधीतून साडेतीन हजार कानडी पुस्तके मागवून तेरा वाचनालये चालू करण्यात आली आहेत. इतर भागांतही मुलांच्या प्राथमिक शाळांना लागून पन्नास रुपयांचे एक अशी शेदीडशे वाचनालये स्थापन करण्याची योजना सरकारसमोर आहे. हे सर्व सांगण्याचा उद्देश हा की, वाचनालयांचा प्रसार साहित्यपरिषदेच्या कार्यक्रमात प्रामुख्याने असल्यामुळे साहित्यपरिषदेस या कार्यक्रमात सरकारतर्फे पूर्ण सहकार्य मिळण्याची शक्यता आहे. वाचनालयाकरिता देणगी म्हणून सरकारने हजारो रुपयांची तरतूद केली आहे. मागणीच्या अभावी यापैकी बरीचशी रक्कम उपयोगात आणली जाऊ शकली नाही ही खेदाची गोष्ट होय. येत्या वर्षात तरी वाचनालये स्थापन करून किंवा चालू असलेल्या वाचनालयांकडून मागणी झाल्यास सरकारतर्फे देणग्या मिळतील यात मला तरी शंका वाटत नाही. बालवाङ्मया-संबंधी सुद्धा सरकारने प्रादेशिक समिती स्थापन केली असून बालवाङ्मयाला उत्तेजन देण्याची योजना आखली आहे. यात निरनिराळ्या लेखकांकडून विविध विषयांवर पुस्तके लिहवून घेणे, त्यांच्या प्रकाशनास प्रोत्साहन देणे, उत्कृष्ट बालवाङ्मय निर्माण करणाऱ्यांना पारितोषके देणे, बालवाङ्मयाची केंद्रे उघडणे, सार्वजनिक ग्रंथालयांतून बालविभाग उघडणे इत्यादि योजना यावेळी सरकारच्या समोर आहेत. या कामात साहित्यपरिषद बराच मोठा वाटा उचलू शकेल याबद्दल मला संशय वाटत नाही. शिक्षण खात्याच्या योजना मोठ्या प्रमाणात आता विस्तार पावू लागल्या आहेत. इतर स्थानिक भाषांच्या बरोबरीने मराठी माध्यमातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणसंस्था शेकडो, हजारोंनी अस्तित्वात येत आहेत. ही एकच गोष्ट मराठी भाषेच्या अभिवृद्धीला निस्संशयपणे चालक ठरेल.

"मराठवाड्यातील हजारो खेडी जेव्हा शिक्षण घेऊन बोलू लागतील तेव्हाच मराठी साहित्याच्या उत्कर्षाला अनुकूल वातावरण निर्माण होईल हे सांगणे नको. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संस्थांच्या बरोबरीने प्रौढ साक्षरतेच्या प्रश्नाकडे सरकारने लक्ष घातले आहे. या कामात सरकारतर्फे या घटकेस पाचशे पर्यंत केंद्रे उघडण्यात आली असून, सार्वजनिक संस्थांनाही या कामात सरकारी

मदत मिळत आहे. साहित्यपरिषदेने आपल्या निरनिराळ्या शाखांच्या द्वारे प्रौढ साक्षरतेची केंद्रे उघडली तर त्यांना सरकारकडून निश्चित मदत मिळेल.

" अशा रीतीने साहित्यपरिषदेच्या कामात सरकारी संस्थांच्याकडून सहकार्य मिळण्याची परिस्थिती असल्यामुळे या गोष्टीचा पूर्णपणे उपयोग साहित्य-परिषदेने करून घ्यावा, असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

" मराठवाड्यातील समाजाचे थोडेबहुत निरीक्षण जे वर आले आहे त्यामध्ये एका नवीन गोष्टीकडे मी अगदी जिव्हाळ्याने आपले लक्ष वेधू इच्छितो. मराठवाड्याच्या पूर्वसरहद्दीवर आदिलाबाद जिल्ह्यात आदिवासींची बरीच वस्ती आहे. या समाजात गोंड, थुट्टी, नायकपोड, प्रधान, कोलाम, वझा इत्यादि जमातींचा समावेश होतो. हिंदुस्थानात गोंडांची वस्ती तीस लाखांपर्यंत असून त्यांपैकी जवळजवळ पंचवीस लाख गोंड मध्यप्रदेशात आहेत. मध्यप्रदेशाच्या हिंदी व मराठी भागात त्यांची वाटणी जवळपास सारख्याच संख्येत झाली आहे. आदिलाबाद जिल्ह्यात एक लाखाच्यावर गोंडांची वस्ती आहे. गेल्या दहा वर्षांपासून सरकारच्या समाजसेवा खात्यातर्फे आदिलाबाद जिल्ह्यात आदि-वासींच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यात येत आहे. आदिलाबाद जिल्ह्यात मराठी बोलणारे दोन तालुके आहेत. ते राजुरा आणि किनवट हे होत. आदिलाबाद जिल्ह्याच्या पश्चिम भागात, विशेषतः किनवट, राजुरा, उटनूर या भागातील आदिवासी मराठीशी चांगलेच परिचित आहेत. यांच्याकरिता सरकारतर्फे ज्या शाळा उघडण्यात आल्या आहेत त्यांतून गोंडी भाषेबरोबरच मराठीही शिकविली जाते. इतकेच नव्हे तर इतर विषयांचे माध्यम या शाळांतून मराठीच आहे. अशा शाळांची संख्या पन्नासचे वर असून, या शाळांतून शिक्षक नेमण्याकरिता म्हणून उटनूर तालुक्यात मारलवाई या गावी सरकारतर्फे गेल्या नऊ दहा वर्षां-पासून शिक्षकांचे ट्रेनिंग सेंटर कार्य करीत आहे. या संस्थेतील माध्यमही मराठीच आहे. या कामात साहित्यपरिषदेने विविध वाङ्मय पुरवून, संस्थांची पाहणी करून सरकारशी सहकार्य केल्यास ते स्वागतार्हच ठरेल यात शंका नाही. मराठवाड्यातील पूर्व सरहद्दीवर असलेल्या या जमातींच्या मराठी भाषेचे संरक्षण हे किती महत्त्वाचे आहे हे मी काय सांगायला हवे ? औरंगाबाद भागातील भिल्ल आणि नांदेड परभणीकडील आंध यांनाही शेड्यूल्ड ट्राइब्स असे लेखण्यात आल्यामुळे या जमातीच्या सर्वांगीण उन्नतीच्या योजना सरकारच्या समोर आहेत. त्यांपैकी शिक्षणविषयक योजनेत साहित्यपरिषद योग्य प्रकारे सहकार्य देऊ शकेल असा मला भरंवसा वाटतो. मराठवाड्यातील समाजाच्या निर-निराळ्या भागात एकजिनसीपणा निर्माण होणे हे किती आवश्यक आहे हे

सांगणे नकोच. साहित्यपरिषदेने साहित्यिक दृष्टीबरोबरच सामाजिक दृष्टीनेही कार्य करण्यास आता प्रवृत्त झाले पाहिजे. तरच मराठवाड्यातील साहित्याच्या निर्मितीचे, जोपासनेचे, व संवर्धनाचे कार्य पुरे होऊ शकेल. खेड्यापाड्यांतून वाचनालये व ग्रंथालये स्थापन झाली तर ती पुढेमागे साहित्याच्या उन्नतीची केंद्रेच बनतील. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, प्रौढ-साक्षरता-केंद्र यांची वाढ झाली तर त्यांना लागणारे विविध प्रकारचे वाङ्मय प्रकाशित होऊ लागेल आणि त्यामुळे मराठी साहित्याची अभिवृद्धी होईल हे निश्चित. या सर्व संस्था साहित्यविषयक चळवळींना पूरकच ठरतील.

"माझ्या भाषणात महाराष्ट्रात सध्या चालू असलेल्या निरनिराळ्या कथा-वादांचा मी मुद्दामच उल्लेख केला नाही. महाराष्ट्राचे एकीकरण, भाषावार प्रांत-रचना, राज्याची भाषावार विभागणी इत्यादी प्रश्न महत्त्वाचे असले तरी मराठ-वाडा-साहित्यपरिषदेने मराठी भाषा व साहित्य यांची उन्नती कशी होईल, मराठवाड्यातील समाजात एकजिनसीपणा कसा निर्माण होईल या गोष्टींवरच आपले लक्ष केंद्रित करून आपला कार्यक्रम आखावा असे मला वाटते. या बाबतीतही कार्यक्षेत्र इतके विस्तृत आहे की पुढील वर्षच काय त्यापुढचीही अनेक वर्षे हा कार्यक्रम पूर्णपणे सिद्धीस नेण्यास लागतील.

"मी उल्लेखिलेला कार्यक्रम अंमलात आणणे अशक्य आहे असे वाटत नाही. अखिल महाराष्ट्रापुरते कार्य मराठी साहित्यपरिषद व इतर संस्था करीतच आहेत. मराठवाड्यातील साहित्यपरंपरा ही खात्रीने उपेक्षणीय नाही. मराठवाडा भाग हाही काही लहानसहान नव्हे. सव्वीस हजार चौरस मैलांचा आणि चाळीस लाख लोकसंख्येचा हा भाग विदर्भ किंवा मराठी मध्यप्रदेश यांपेक्षा खात्रीने मोठा आहे. अखिल महाराष्ट्राच्या साहित्यिक चळवळीत मराठवाड्याला योग्य ते स्थान लाभलेच पाहिजे आणि ते मिळवून देण्याची जबाबदारी मराठवाड्याच्या साहित्य-परिषदेवर आहे. ही जबाबदारी पूर्णपणे पार पडो, मराठवाड्यातील साहित्यिकांना योग्य तो वाव मिळो आणि मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास इत्यादी विभूतींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या आपल्या मराठवाड्यात पुन्हा एकदा साहित्याचे नवयुग निर्माण होवो अशी परमेश्वरापाशी प्रार्थना करून मी आपले भाषण संपवितो."

माझ्या भाषणाला महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांतून चांगलीच प्रसिद्धी मिळाली. परिषदेच्या संमेलनात श्री. ना. सी. फडके यांचे एक व्याख्यान झाल्याचे आठवते.

माझ्या अध्यक्षपदाच्या काळात साहित्यपरिषदेच्या सभासदांची, शाखांची आणि परीक्षा केंद्रांची संख्या वाढली. माझ्या दौऱ्यांत परिषदेचे कार्यवाह

प्राध्यापक रामकृष्णपंत माढेकर हे माझ्याबरोबर परभणी, जिंतूर, नांदेड, देगलूर, बिलोली, उदगीर इत्यादी ठिकाणी आले. आणि तेथे परिषदेच्या कार्याला त्यांनी चालना दिली. विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे माझ्या सूचनेने साहित्यपरिषदेचे मासिक 'प्रतिष्ठान' हे सुरू करण्यात आले. या मासिकाने मराठी नियतकालिकांच्या सृष्टीत आपले स्वतंत्र असे स्थान प्रस्थापित केले आहे हे पाहून मला धन्य वाटते.

शिक्षणखात्याचा संचालक म्हणून मी दोन अडीच वर्षे काम केले. पोलीस कारवाईनंतर हैदराबादच्या शिक्षणखात्यात आमूलाग्र बदल करण्याचे मोठे श्रेय शिक्षणमंत्री फूलचंद गांधी यांच्याकडे जाते. शिक्षक, इन्स्पेक्टर, डेप्युटी-डायरेक्टर, डायरेक्टर, इत्यादि जागांवर पूर्वी मुसलमान नोकरांचे प्रमाण शेकडा ऐंशी ते नव्वद असे होते. हिंदूंचे प्रमाण अत्यल्प होते. उर्दू हेच शिक्षणाचे माध्यम होते. फूलचंद गांधींनी अगदी १९४९–'५० पासूनच मराठी, कानडी, तेलुगू या भाषांचे माध्यम शाळांतून चालू केले. शाळांचे इन्स्पेक्टर हे जवळजवळ सगळेच मुसलमान होते. काही हायस्कुलांवर हिंदू हेडमास्तर होते. त्यांना इन्स्पेक्टर म्हणून बदलण्यात आले. बरेच मुसलमान शिक्षक राज्य सोडून पळून गेले होते. बरेचजण सेवानिवृत्त झाले. त्यांच्या जागी हिंदूंच्या नेमणुका करण्यात आल्या. सरकारी नोकरांना एक तरी स्थानिक भाषा आली पाहिजे हा नियम असे. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी क्वचितच होई. आता या नियमाचे कसोशीने पालन होऊ लागले. मुसलमान शिक्षकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्यांना ठरीव मुदतीत स्थानिक भाषा शिकून घेण्याची सवलत देण्यात आली. स्थानिक भाषांचे माध्यम हायस्कुलापर्यंत करण्यात आल्यामुळे शेकडो हिंदू शिक्षकांना नोकऱ्या मिळाल्या. उलट उर्दू माध्यमातून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या घटल्यामुळे उर्दू भाषिक शिक्षकांना काम राहिले नाही. अशा अनेक शिक्षकांना कोठे ड्राइंग मास्तर म्हणून, कोठे ड्रिलमास्तर म्हणून तर कोठे शाळेचे हिशेब ठेवणारी माणसे म्हणून कामावर ठेवण्यात आले. या अवधीत ते मराठी, तेलुगू, कानडी इत्यादि भाषा शिकू लागले.

या गोष्टींचा विनाकारण असा गवगवा करण्यात आला की, उर्दू भाषिक शिक्षकांवर अतिशय अन्याय होत आहे. त्यांना जबरदस्तीने नोकऱ्यांतून काढून टाकण्यात येत आहे. समाजकंटकांनी या गोष्टीचे मोठे भांडवल केले. मोर्चे, उपवास इत्यादि सर्व प्रकार अवलंबिण्यात आले. पण सरकारने स्वीकारलेले खंबीर, सहानुभूतिपूर्ण आणि न्याय्य असे आपले धोरण शेवटास नेऊन राज्यातील शिक्षणाचे स्वरूप पार बदलून टाकले. पोलीस ॲक्शननंतर काही

वर्षांच्या आत प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च अशा शाळांची संख्या दोन ते तीन हजारांनी वाढली. कॉलेजेही भराभर उघडू लागली. औरंगाबादेस मिलिंद महाविद्यालय हे डॉक्टर आंबेडकरांनी सुरू केलेले कॉलेज चालू झाले होते. औरंगाबादेतील सरकारी कॉलेजही डिग्री कॉलेज करण्यात आले. उस्मानिया विद्यापीठातील माध्यम हे पूर्वी उर्दू होते. आता त्याची जागा इंग्रजीने घेतली.

उर्दू भाषिक शिक्षकांवर अन्याय होत आहे अशी जी ओरड होत होती ती बरोबर नाही हे स्पष्ट करण्याचे काम मला अनेक वेळा करावे लागले. डॉक्टर जाकिर हुसेन (आपले दिवंगत राष्ट्रपती) यांचे बंधू डॉक्टर यूसुफ हुसेनखान हे उस्मानिया विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक होते. एकदा त्यांनी मला चहाचे आमंत्रण दिले. मी त्यांच्याकडे गेलो असता तेथे डॉक्टर जाकिर हुसेन यांची गाठ पडली. त्यांच्या बरोबर वर्धा योजना, हैदराबादेतील शिक्षणाचे बदललेले स्वरूप इत्यादीसंबंधी मी चर्चा केली.

मी माझी गोंडी, कोलामी इत्यादि भाषांच्या व्याकरणाची पुस्तके त्यांना दिली. ‘ इस काम के लिये तो आपको डाक्टरेट मिलनी चाहिये ’ असे म्हणून त्यांनी माझे कौतुक केल्याचे मला अद्याप आठवते.

शिक्षणखात्याचा संचालक म्हणून मी पुण्याला भरलेल्या भाषासंमेलनात भाग घेतला. या संमेलनाचे अध्यक्ष सर गिरिजाशंकर वाजपेयी आणि स्वागताध्यक्ष डॉक्टर जयकर हे होते. या प्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक वि. द. घाटे यांचा माझा परिचय झाला. त्याच दिवशी संध्याकाळी गणेशखिंड येथे गार्डन पार्टी झाली. तेथे इतिहासकार सरदेसाई यांचा मला परिचय झाला.

सरकारी कामाच्या निमित्ताने मला दिल्लीलाही दोनतीन वेळा जावे लागले. सेकंडरी बोर्डाच्या मीटिंगसाठी मी दिल्लीला गेलो. उषा माझ्याबरोबर होती. दिल्लीहून आम्ही डेहराडूनला गेलो. तेथील नॅशनल डिफेन्स ॲकेडमीची संस्था आम्ही पाहिली. चवदा नोव्हेंबर १९५३ ला आम्ही मसूरीला गेलो. तेथून परतताना आम्ही राजपूर गावावरून येत होतो; तेव्हा मला मी तेथे १९२९ मधे राजपूरच्या शक्ती आश्रमात एक महिना काढल्याची आठवण झाली. साधू वास्वानी, मिसेस सुवीरादेवी शास्त्री इत्यादींच्या आठवणींनी माझे मन व्याकुळ झाले.

शिक्षणखात्याचा संचालक या नात्याने मी हैदराबाद राज्यातील सतराच्या सतरा जिल्ह्यांतून फिरलो. औरंगाबादेस असताना मी सुरू केलेली वाचनालयाची चळवळ व्यापक करण्याची मला फार मोठी संधी लाभली. शाळांतून वाचनालये समृद्ध करण्यासाठी मी तीन वर्षे सारखा खपत होतो. शाळेला भेट देण्याचे

कोणी आमंत्रण दिले की माझी अट असावयाची, 'तुम्ही आपले शालेय वाचनालय वाढवीत असाल तर मी येतो.' स्थानिक वाचनालयांच्या बाबतीतही माझी हीच अट असे. गावातील प्रतिष्ठित मंडळी, शाळांचा अधिकारीवर्ग, धनिक आश्रयदाते इत्यादींना माझी एकच विनंती असे, तुमच्या गावातील, शाळांतील वाचनालये समृद्ध करा. शाळांची पाहणी करताना मी प्रथम वाचनालयांच्या खोल्या पाही. वाचनालय हा शाळातील अतिशय उपेक्षित असा भाग असे. एखादी लहानशी, अरुंद अंधारकोठडी आणि तीत कशीबशी मांडलेली पुस्तके हा प्रकार पाहून मला वाईट वाटे. अशा खोलीला मी शाळेतील अडगळीची खोली म्हणे. शरीरातील आत्मा हा अंगुष्ठाएवढा असतो असे म्हणतात. मी आपल्या भाषणात याचा उल्लेख करून नेहमी म्हणे की शाळेचा आत्मा म्हणजे वाचनालय. तो या इमारतीत अंगुष्ठमात्र आहे.

माझ्या या अहर्निश चाललेल्या चळवळीचा परिणाम दिसून येऊ लागला. माझ्या प्रयत्नाने माझ्या तीन वर्षांच्या कारकीर्दीत हैदराबाद राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च अशा शाळांच्या वाचनालयांतून नऊ लाख पुस्तकांची भर पडली. त्यांत तीन लाख तेलुगू, तीन लाख मराठी, दोन लाख कानडी आणि एक लाख उर्दू अशी पुस्तके होती. त्यावेळच्या माझ्या डायऱ्यांतून फक्त शाळा आणि पुस्तके यांच्या नोंदी दिसून येतात. हैदराबाद शहरात शिक्षण खात्यातर्फे बालवाचनालय चालू करण्याची खटपट मी केली. शहराच्या सार्वजनिक उद्यानात आयर्न बंगलो नावाची इमारत होती. तीत निजाम-घराण्यातील मंडळींनी शिकार केलेल्या पशूंची कातडी, डोकी, आणि ट्राफी या ठेवलेल्या असत. मी तो बंगला वाचनालयासाठी मिळविला. सरकारात खटपट करून या एका बालवाचनालयासाठी मी शिक्षणखात्याच्या बजेटमधे वार्षिक एकोणीस हजार रुपयांची कायम तरतूद करून घेतली. या बालवाचनालयाचे उद्‌घाटन पंतप्रधान नेहरू यांच्या हस्ते झाले. उत्तम इमारत, विविध भाषांतील बालवाङ्मय, लहान लहान टेबल-खुर्च्या, आणि पुस्तके वाचण्यात गढून गेलेली मुले. मला माझ्या डोळ्यांचे पारणे फिटल्यासारखे वाटले. ते बालवाचनालय अद्याप सुस्थितीत चालले आहे. मी हैदराबादेस गेलो की वाचनालयात एखादी फेरी टाकल्याशिवाय राहात नाही, आपल्या परीने आपण लहान मुलांसाठी काही केले याचे मला अत्यंत समाधान वाटते.

हैदराबाद राज्यातही वर्धा योजनेस अनुसरून बेसिक पद्धतीचे शिक्षण देणाऱ्या शाळा चालू करण्यात आल्या. याबद्दल नेमलेल्या सल्लागार मंडळात सेवाग्रामचे आर्यनायकम् यांना घेण्यात आले होते. त्यांचा माझा परिचय झाला.

पुढे देवीसिंह चव्हाण यांच्या जागी शिक्षणमंत्री म्हणून गोपाळराव एकबोटे (सध्या आंध्र हायकोर्टाचे न्यायमूर्ती) यांची नेमणूक झाली असताना मी त्यांच्याबरोबर सेवाग्रामची यात्रा केली. महात्माजी राहात ती झोपडी, आणि भोवती पसरलेला आश्रम ही पाहून मी अगदी भारावून गेलो. सेवाग्रामच्या पवित्र वातावरणात मला दोन दिवस राहाण्यास मिळाले हे मी माझे मोठे भाग्य समजतो.

माझ्या हैदराबादच्या वास्तव्यात महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक हैदराबादेस आले असताना त्यांच्याशी माझ्या ओळखी झाल्या. सुप्रसिद्ध साहित्यिक अ. का. प्रियोळकर हे हैदराबादेस आले असताना माझ्या घरी येऊन गेले. मला मधुमेहाचा विकार जडला होता. यावर त्यांनी नवोज्योत या औषधाचा उपयोग सुचविल्याचे मला अद्याप आठवते. सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक वा. सी. बेंद्रे, य. खु. देशपांडे, महामहोपाध्याय डॉक्टर मिराशी, नागपूरचे पेंडसे, सांगलीचे तात्या शिखरे इत्यादि मंडळी हैदराबादेस येऊन गेली.

एकदा सरदेसाई आणि सर जदुनाथ सरकार हे हैदराबादेस येऊन गेले. सर जदुनाथ सरकार यांना मी भेटलो, त्यांचे इतिहासावरील समग्र ग्रंथ मी वाचून काढले होते. त्यांच्याशी पंधरा मिनिटे मला बोलण्यास मिळाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. भारतीय इतिहासकारांत सर जदुनाथांची बरोबरी करणारा दुसरा इतिहासकार झाला नाही.

१९५५ च्या एप्रिल महिन्यात मला बढती मिळून मी गृहखात्याचा सचिव झालो. तोपर्यंत हैदराबाद राज्यातील तेलंगण भागातील कम्युनिस्ट चळवळ संपली होती. आचार्य विनोबा भावे यांची पदयात्रा सुरू झाली होती. त्यांची प्रवचने ऐकण्याचा मला योग आला. सुमारे आठ महिनेपर्यंत मी गृहखात्यावर होतो. या काळात मला दक्षिण भारतात प्रवास करण्याचा योग आला. ट्रान्स्पोर्ट अंडरटेकिंगची कॉन्फरन्स त्रिवेंद्रम येथे नोव्हेंबर १९५५ मधे भरली होती. हैदराबाद सरकारतर्फे मी कॉन्फरन्सला हजर होतो.

१९५५ च्या नोव्हेंबर महिन्यात मी प्रथम मद्रासला गेलो. मद्रासचे सुप्रसिद्ध मरीना बीच, माउंट रोड, रेकार्ड ऑफिस, कोनामेरा लायब्ररी, म्यूझियम, अड्यार ही स्थळे मी पाहिली. मद्रासहून निघून मी दुसऱ्या दिवशी रात्री त्रिवेंद्रमला पोहोचलो. केरळच्या सृष्टिसौंदर्याचे काय आणि किती वर्णन करावे! नद्या, कालवे, समुद्रकाठ, खाडीचे पाणी, या ना त्या निमित्ताने जेथे पाहावे तेथे जलाशयाचे दर्शन घडते. त्रिवेंद्रम हे गर्द झाडीत वसले असून अतिशय स्वच्छ आणि नीटनेटके आहे. त्रिवेंद्रमला मी अनंतशयन पद्मनाभाचे देऊळ पाहिले,

अक्वेरियमही पाहिले, युनिव्हर्सिटी, म्युझियम या संस्था पाहिल्या. आमची कॉन्फरन्स कनक्कण्णू (सुवर्णनेत्र) पॅलेसमधे भरली होती. त्या दिवशी संध्याकाळी केरळचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यास मिळाला. कथकली नृत्य पाहिले.

हिंदुस्थानच्या सर्व भागांचा इतिहास मी वाचून काढला होता. त्रावणकोरचा इतिहास तेवढा मला वाचण्यास मिळाला नव्हता. या विषयावर पुस्तके अशी नव्हतीच. केरळ विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. पणिक्कर यांना मी ही व्यथा बोलून दाखविली. त्रावणकोरचा एक इतिहास मागे श्री. करुणाकर मेनन यांनी लिहिला असून त्याची एकच प्रत त्रिवेंद्रमच्या सार्वजनिक वाचनालयात आहे असे ते म्हणाले. दुसरी प्रत कोठेच उपलब्ध नाही असे कळले. मी त्यांना म्हटले, "कृपा करून मला वाचनालयातील प्रत मिळवून द्या. मी ती उद्यापर्यंत तुम्हांला परत करीन." त्यांनी थोडेसे आढेवेढे घेतले; पण नंतर स्वतःच्या जबाबदारीवर लायब्ररीतून ती प्रत घेऊन ते आले.

तो दिवस नऊ नोव्हेंबरचा होता. त्रावणकोरवरचा इतिहासग्रंथ जवळजवळ एक हजार पानांचा होता. मला अगदी हपापल्यासारखे झाले होते. मी रात्रभर तो ग्रंथ वाचीत होतो. एक क्षणभरही मी झोप घेतली नाही. सकाळीं पणिक्कर आले तसे मी त्यांना ते पुस्तक परत केले. केरळने भारताला चार अलौकिक व्यक्तींची देणगी दिली आहे. आद्य शंकराचार्य, ज्योतिःशास्त्रज्ञ आर्यभट्ट, संगीतज्ञ नृपति स्वाति तिरुनल आणि राजा रविवर्मा. केरळांचा इतिहासही मोठा स्फूर्तिदायक आहे. कालीकतच्या झामोरिनने (समुद्रिन, समुद्राधिपती) शेवटपर्यंत पोर्तुगीजांशी लढा दिला. भारतात पाश्चात्त्यांचा धुव्वा दोनच जमातींनी उडविला. इ. स. १७३८ मधे चिमाजी अप्पाने वसई घेऊन उत्तर कोकणातून पोर्तुगिजांची सत्ता नाहीशी केली. आणि इ. स. १७४५ मधे त्रावणकोरचा राजा मार्तंडवर्मा याने कोलाचलच्या नाविक युद्धात डचांचा दणदणीत पराजय केला. केरळचा इतिहास वाचीत असता मी अक्षरशः देहभान विसरलो होतो. दहा नोव्हेंबरला आम्ही सकाळीं कन्याकुमारीला गेलो. त्रिवेंद्रमहून कन्याकुमारी पंचावन्न मैल अंतरावर आहे. वाटेत आम्ही त्रावणकोरची जुनी राजधानी पद्मनाभपुरम ही पाहिली. तेथे महाराजांचा जुना राजवाडा आहे. राजवाड्यात डच नौकादलाचा सेनापती राजा मार्तंडवर्मा याला शरण येत आहे हे दाखविणारे चित्र आम्ही पाहिले. भारतीयांनी अभिमान बाळगावा असेच ते दृश्य होते. आम्ही तीन प्रहरच्या सुमारास कन्याकुमारीला पोहोचलो. भक्तिभावाने मी तेथील पार्वतीचे, कन्याकुमारीचे दर्शन घेतले. समोरच, समुद्रात विवेकानंद थांबले होते ते बेट दिसत होते. एकीकडे बंगालची खाडी, समोर भारतीय महासागर आणि उजवीकडे अरबी महासमुद्र

असे ते भव्य दृश्य होते. तीस ऑगस्ट १९४३ रोजी मी काश्मीरात श्रीनगरला होतो. आणि आज दहा नोव्हेंबर १९५५ रोजी मी कन्याकुमारीजवळ समुद्राकडे पाहात होतो. ही आमची पितृभू, हीच आमची पुण्यभू. कन्याकुमारीला माझ्या मनात अशा विचारांची एकच गर्दी उसळली होती.

त्रिवेंद्रमला परत आल्यानंतर मी तेथील संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह पाहिला. ताडपत्रावर लिहिलेले अनेक ग्रंथ तेथे माझ्या पाहण्यात आले. तेथील संस्कृत-मधील हस्तलिखित ग्रंथांची एकंदर संख्या तेवीस हजार आहे. भासाची नाटके यांचा शोध प्रथम त्रिवेंद्रमलाच लागला हे कित्येकांना ठाऊक नसेल. केरळ संस्कृतीवर संस्कृतचा फार मोठा प्रभाव पडला आहे. दक्षिणेतील सर्वांत अधिक संस्कृतप्रचुर भाषा म्हणजे मल्याळी होय. त्रिवेंद्रमच्या संस्कृत ग्रंथालयात मला घडलेले संस्कृत साहित्याचे दर्शन मी कधीच विसरणे शक्य नाही.

दुसऱ्या दिवशी मी त्रिवेंद्रम सोडले. लॉंचने मी कोट्टायमला आलो. तेथे मी रबराचा कारखाना पाहिला. नंतर तेथून मी डोंगरात असलेली पेरिमाळगेम सॅंक्चुअरी पाहण्यास गेलो. वाटेत मी रबराची झाडे आणि चहाचे मळे पाहात होतो. ती पाहण्याचा माझ्या आयुष्यातील पहिलाच प्रसंग होता. पेरुमाळला नदी अडविण्यात आली आहे. त्यामुळे गर्द झाडी असलेली बेटे निर्माण झाली आहेत. तेथे हत्ती, वाघ इत्यादि जनावरे मनसोक्त फिरताना दिसतात. तीन तासपर्यंत आम्ही नावेतून फिरत होतो. हत्तींचा कळप पाणी पिण्यासाठी काठावर जमलेला पाहून मला मोठी गंमत वाटली. पेरिमाळहून निघून मी दुसऱ्या दिवशी अलेप्पीला आलो. तेथील अल्यूमिनमचा कारखाना पाहून मी अकरा वाजता कोचीनच्या एर्नाकुलम या शहराला आलो. तेथून जवळच असलेले वेलिंग्डन बेट मी पाहिले. कोचीनचे निसर्गसौंदर्य अवर्णनीय आहे. भारतात अशी रम्य बंदरे क्वचितच आढळतील.

कोचीनहून निघून मद्रासमार्गे मी हैदराबादेस परत आलो.

मी शिक्षणखात्याचा संचालक असताना एकदा तुरुंगांचे इन्स्पेक्टर जनरल भवनानी यांजबरोबर हैदराबादच्या सेंट्रल जेलला भेट दिली. याच तुरुंगात कासिम रजवीला ठेवण्यात आले होते. मी आणि भवनानी हे रजवीला ठेवलेल्या खोलीत गेलो. रजवीचे केस पिकले होते. तो शांतपणे आमच्याशी बोलत होता. पण त्याच्या डोळ्यांकडे पाहिले तर हा कोणी वेडा माणूस असावा असे वाटे. काळाचा महिमा मोठा विचित्र आहे. हाच तो कासिम रजवी. जमरूद महाल-मधल्या त्याच्या भाषणाने मी हादरून गेलो होतो. हजारो लोकांना मंत्रमुग्ध करण्याचा प्रभाव त्याच्या वाणीत होता. या माणसाने हैदराबादच्या हिंदू जनतेवर

केवढे संकट आणले होते. आणि आज माझ्यासमोर उभा असलेला रजवी किती लहान, क्षुल्लक आणि भांबावलेला असा दिसत होता. त्याचा गर्व, दरारा, वल्गना, धमक्या ही पार नाहीशी झाली होती. थोडा वेळ त्याच्याशी बोलून मी परत फिरलो. इतिहासाच्या अडगळींत जाऊन पडलेला तो. त्याला महत्त्व असे काय राहिले होते!

आमच्या गृहखात्याचे मंत्री दिगंबरराव बिंदू हे होते. हैदराबादच्या स्वातंत्र्य-युद्धात त्यांनी फार मोठी कामगिरी बजाविली होती. त्यांचा साहित्याचा व्यासंगही दांडगा होता. आज ते हैदराबादेस शांतपणे लेखन-वाचन करीत समाधानाचे आयुष्य कंठीत आहेत.

१९५६ च्या फेब्रुवारी महिन्यात गृहखात्यावरून माझी बदली शिक्षण-खात्यावर झाली. राज्य पुनर्रचनेपर्यंत मी त्याच खात्यावर होतो.

भारतसरकारने स्वातंत्र्याच्या चळवळींचा इतिहास लिहिला जावा म्हणून एक योजना तयार केली. प्रत्येक राज्यात या कामासाठी समित्या नेमण्यात आल्या. स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाची साधने एकत्र आणून ती प्रसिद्ध करण्याचे काम या समित्यांच्याकडे देण्यात आले. या समितीचे कन्व्हीनर म्हणून माझे मित्र श्री. र. मु. जोशी यांनी काही दिवस काम केले. पुढे मी शिक्षण-खात्याचा संचालक असताना मला हे काम देण्यात आले.

हैदराबाद राज्यातील स्वातंत्र्याच्या चळवळीला सुरवात निजामाचे स्वातंत्र्य नष्ट झाले तेव्हापासून झाली असे मी ठरविले. बारा आक्टोबर आठराशे रोजी निजाम आणि ईस्ट इंडिया कंपनी यांचा तह झाला. या तहाअन्वये निजामाच्या संरक्षणाकरिता इंग्रजांची फौज सिकंदराबादेस कायम झाली. निजामाने हिंदुस्थानातील कोणत्याही राजेरजवाड्याबरोबर कसलाही संबंध ठेवणार नाही असे कबूल केले. इंग्रजांनीही निजामाचे परचक्रापासून आणि राज्यातील बंडखोरांपासून रक्षण करण्याची जबाबदारी पत्करली. झालेला हा प्रकार कित्येकांना आवडला नाही, त्यात खुद्द निजाम निजामअली याचा मुलगा सिकंदरजहा, निजामाचा वऱ्हाडचा सुभेदार राजा महिपतराम इत्यादी मंडळी होती. निजाम निजामअलीखान याचा मृत्यू इ. स. १८०३ मधे झाला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा सिकंदरजहा, हा गादीवर आला. याच सुमारास निजामाचा दिवाण आणि काही दिवस मराठ्यांच्या कैदेत असलेला मुशीरुलमुल्क हा मरण पावला. इंग्रजांनी मीर आलमची दिवाण म्हणून नेमणूक करविली. ही गोष्ट सिकंदरजहाला आवडली नाही. राजा महिपतराम याने इंग्रजांना विरोध केला. एक दोन लढाया झाल्यावर महिपतराम हा होळकरांच्या आश्रयाला निघून गेला. त्याचा मित्र

आणि इंग्रजांचा विरोधी म्हणून निजामाचा मुख्य सचिव राजे रघोत्तमराव गंगाखेडकर याला इंग्रजांनी बडतर्फ करविले. हैदराबादचा मराठा सरदार राजे रावरंभा निंबाळकर याला हैदराबाद शहर सोडून आपल्या जहागिरीवर जाऊन राहण्याचा हुकूम देण्यात आला. इ. स. १८१२ मधे निजाम सरकारची फौज व्यवस्थित रीतीने तरवेज करण्याचा निर्णय रेसिडेंटने निजामाच्या परवानगीने घेतला. निजामाच्या स्वतःच्या सैन्यात काही इंग्रज अधिकारी होते. त्यांपैकी कॅप्टन गॉर्डनविरुद्ध सैनिकांनी बंड करून त्याला तोफेच्या तोंडी बांधण्यापर्यंत मजल आणली म्हणून निजामाच्या नावाने आणि त्याच्याच खर्चाने इंग्रज अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आणि रेसिडेंटच्या पूर्ण ताब्यात असलेली फौज तयार करण्यास इंग्रजांनी सुरवात केली. हीच ती कॉन्टिन्जेंट फौज होय. इंग्रजांची तैनाजी फौज वेगळी होती. कॉन्टिन्जेन्ट फौजेची मुख्य छावणी बोलाराम येथे असून लहान-सहान छावण्या औरंगाबाद, मोमिनाबाद, जालना, लिंगसगूर, मख्तल, वरंगल, इलिचपूर इत्यादि ठिकाणी कायम करण्यात आल्या. निजामाच्या राज्यातील वाईट कारभारामुळे बंडे उद्भवत. इंग्रजांनी अंतर्गत बंडाळींपासून निजामाचे रक्षण करण्याची हमी घेतली होती. पण राज्यात सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी घेण्याचे त्यांनी कसोशीने टाळले. त्यामुळे निजाम हा राज्यात सुधारणा करीना आणि इंग्रज बंड करू देईनात अशी निजामी प्रजेची स्थिती झाली. इ. स. १८१८ पासून १८५८ पर्यंतचा निजाम राज्याचा इतिहास हा प्रजेच्या बंडांचा इतिहास आहे. इंग्रजांनी ही बंडे मोडली नसती तर निजामाचे राज्य कधीच रसातळाला गेले असते असे उद्‌गार इंग्रज अधिकाऱ्यांनी काढले आहेत. औरंगाबाद येथील भिल्लांचे बंड (१८२७), नांदेड जिल्ह्यातील हटकरांचे बंड (१७९८–१८२०), बीदर, निजामाबाद आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांतील देशमुखांची बंडे (१८२०), सिरोंचा व महादेवपूर येथील जमीनदारांचे बंड (१८२०), रायचूर जिल्ह्यातील वीरप्पाचे बंड (१८१९), कोहरान अरब आणि नरसिंगरावची उठावणी (१८४०), अशी अनेक बंडे या काळात उद्‌भवली.

या बंडांचा समावेश मी स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासात केला. आमच्या समितीच्या काही मुसलमान सभासदांना हे आवडले नाही. फक्त इंग्रजांविरुद्ध झालेल्या कारस्थानांची नोंद घ्या. निजामाला इंग्रजांनी कसे लुबाडले हे तेवढे सांगा. प्रजेची निजामाविरुद्ध झालेली बंडे ही स्वातंत्र्याच्या चळवळीत कशी मोडतात असे त्यांनी मला विचारले. मी भूमिका घेतली की संस्थानी प्रजा म्हणजे गुलामांचे गुलाम होत. त्यांच्या चळवळी दडपून टाकण्यासाठी संस्थानिक

आणि इंग्रज सरकार या दोन्ही सत्तांची शक्ती खर्ची पडत होती. या चळवळींची नोंद आवश्यक आहे. या मतभेदामुळे काही मुसलमान सभासदांनी समितीच्या कामात लक्ष घालण्याचे सोडून दिले. पण मी आपल्या दृष्टिकोनातूनच हा इतिहास लिहीत गेलो.

कॉंटिजेंट सैन्याच्या खर्चापायी निजामाला इ. स. १८५३ मधे वऱ्हाड गमवावा लागला. १८५३ पासून वऱ्हाडवरचा निजामाचा ताबा सुटला ही फार चांगली गोष्ट झाली. त्यामुळे त्या भागाची विलक्षण प्रगती झाली. वऱ्हाड (सतरा हजार चौरस मैल) आणि मराठवाडा (सव्वीस हजार चौरस मैल) अशा त्रेचाळीस हजार चौरस मैल म्हणजे महाराष्ट्राच्या एकतृतीयांश भागावर निजामाची सत्ता होती. ती आता मराठवाड्यापुरती म्हणजे महाराष्ट्राच्या एक-पंचमांश भागापुरती मर्यादित राहिली.

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात हैदराबादचा दिवाण सालारजंग याने इंग्रजांचा पक्ष घेतला. असे असूनही हैदराबाद आणि औरंगाबाद या शहरांत बंडे झाली. सुरपुरचा वेंकटप्पा नाईक याने बंड केले. ती मोडून काढण्यात आली. तोच प्रकार कोप्पळच्या भीमराव देसाई याच्या बाबतीत झाला. नानासाहेब पेशव्यांचा हस्तक बीडचा रंगराव रत्नाकर पागे नरखेडकर हा बंडास चिथावणी देण्याच्या आरोपावरून पकडला गेला. त्याला काळे पाण्याची शिक्षा झाली. तेथेच त्याचा इ. स. १८६० मधे अंत झाला. पेशव्यांचा आणखी एक हस्तक रावसाहेब याने हैदराबादेस उठाव करण्याचा प्रयत्न केला. त्यात चाळीस माणसे पकडण्यात आली. रावसाहेबाला आश्रय देणारा रामरतनगीर गोसावी याने पोटात सुरा खुपसून घेऊन आत्महत्या केली. इ. स. १८६७ मध्ये रामराव ऊर्फ जंग बहादुर याने बीदर जिल्ह्यात जमाव करून बंड करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्याला अटक करून काळे पाण्यास पाठविण्यात आले.

मराठवाड्यात बीड जिल्ह्यातही १८५७ मधे बंड झाले. शंकर आत्माराम, तात्या मुद्गल, बाळाजी गोसाई व दाजी खर्डेकर, यांनी बंड करून खर्ड्याची गढी हस्तगत करण्याचे कारस्थान केले. हे बंड मोडण्यात येऊन संबंधितांना कडक शिक्षा ठोठावण्यात आल्या. यापुढील काळात महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारकांनी हैदराबाद राज्यात येऊन महाराष्ट्रात उठाव करण्याचे प्रयत्न केले.

इ. स. १८७९ मधे क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके याने हैदराबाद राज्यात उठाव करण्याचा प्रयत्न केला. एकवीस जुलै १८७९ रोजी वासुदेव बळवंत यास हैदराबाद राज्याच्या सरहद्दीवर पकडण्यात आले. राज्यातील त्याचे साथीदार, इस्माईलखान रोहिला, छन्नू नाईक, रामचंद्र विश्वामित्र इत्यादींना कडक शिक्षा

ठोठावण्यात आल्या. पुण्याच्या सुप्रसिद्ध चाफेकर बंधूंपैकी बाळकृष्ण हरि चाफेकर यास डिसेंबर १८९८ मधे रायचूर जिल्ह्यात कोप्पळ भागात अटक करण्यात आली. इ. स. १८९९ मधे महाराष्ट्रातील एक इसम बाबासाहेब याने बीड जिल्ह्यात उठावणी केली. चौदा एप्रिल १८९९ रोजी इंग्रजांच्या कॉंटिजेंट-दलाने बाबांच्या टोळीवर हल्ला करून बरीच माणसे मारली आणि साठ-सत्तर लोकांना पकडले. एकवीस डिसेंबर १९०९ रोजी नाशिकचे कलेक्टर मिस्टर जॅक्सन यांचा खून झाला. त्याचे कारस्थान कान्हेरे याने औरंगाबादेत शिजविले होते. औरंगाबादेतील काही तरुणांनी एक गुप्त मंडळ स्थापन केले होते. हैदराबादेत चौकशी होऊन अनेकांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. आणि काहींना हैदराबाद राज्यातून बाहेर घालविण्यात आले. हैदराबाद शहरात यापूर्वीच राजकीय जागृतीची चिन्हे दिसू लागली होती. सरोजिनी नायडूंचे वडील डॉक्टर अघोरनाथ चट्टोपाध्याय यांना वीस मे १८८३ रोजी हद्दपार करण्यात आले. इ. स. १८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसचा जन्म झाला. त्याला हैदराबादचे डॉक्टर अघोरनाथ, मुल्ला अब्दुल्कयूम, रामचंद्र पिल्ले, मुहिब हुसेन इत्यादींनी पाठिंबा दिला. १८९२ मधे आर्यसमाजाची स्थापना आणि १८९४ पासून गणेशोत्सवाचा प्रारंभ या दोन घटना हैदराबादेतील भावी चळवळींच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या होत्या. इ. स. १९०० पासून पुढील दोन दशकांत काम करणाऱ्या पुढाऱ्यांत केशवरावजी कोरटकर, वामन नाईक सातवळेकर, दत्तो अप्पाजी तुळजापूरकर, इत्यादींची नावे येतात. १९०८ मध्ये तुळजापूरकरांना हद्दपार करण्यात आले. श्रीपाद दामोदर सातवळेकर हे हैदराबाद सोडून निघून गेले. पहिले महायुद्ध संपल्यानंतर हैदराबादेतील चळवळींना जोर चढू लागला. १९२०–३० च्या काळात आंध्रसभा, कर्नाटकपरिषद, महाराष्ट्रपरिषद या सभा पुढे येऊ लागल्या. हिंदूमहासभा आणि आर्यसमाज यांनीही या काळात आपल्या कार्यांना सुरवात केली. कॉंग्रेस आणि आर्यसमाज यांचे सत्याग्रह १९३८ मधे झाले. हैदराबादच्या इतिहासात १९३८ हे वर्ष निर्णायक समजले पाहिजे. त्यानंतर रजाकार संघटना, जनतेचा लढा, आणि पोलीस ॲक्शन इत्यादि घटनांनी हैदराबादचे नाव चहूकडे गाजले.

वरील इतिहास लिहिताना मी शेकडो कागदपत्र पाहिले. अनेक पुस्तके वाचून काढली. मराठीत या विषयावरील माझे लेख प्रतिष्ठान मासिकात आले. तो संग्रह पुढे 'हैदराबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळींचा इतिहास' या नावाने मराठवाडा-साहित्यपरिषदेने १९५६ मधे प्रसिद्ध केला. इंग्रजीत मी याच विषयावर 'हिस्ट्री ऑफ फ्रीडम स्ट्रगल इन हैदराबाद, या नावाने तीन खंड लिहून काढले. त्यांत

म्हणत), फोडणीचा भात, शिजवितानाच वरण भाज्या इत्यादी कालवून तयार केलेला भात, सारभात, वरणभात, लोणची कालवलेला भात, फोडणीचा दहीभात असे किती प्रकार सांगावेत. केशरीभात (साखरभात) करीत, पण त्याचे प्रमाण बेताचेच असे. चटण्या अनेक प्रकारच्या करीत. तांदळाची खीर करीत. पण कर्नाटकात गव्हाची किंवा मुगाच्या डाळींची खीर करीत. तो प्रघात तेलंगणात नव्हता. बटाटे, कोबी, टोम्याटो हे प्रकार आम्हांस माहीत नव्हते. त्यामुळे बटाटेभात किंवा कोबीचा मसालेदार भात खाल्ल्याचे आठवत नाही. मटरभातही आठवत नाही. चटण्यांपैकी अंबाड्याची चटणी ही तेलंगणात अतिशय लोकप्रिय आहे. सांडगे, पापड, भजी, वडे, वरणातील फळे, डाळवांगे, मसाल्याची वांगी, मेतकूट, पुडचटणी, हे प्रकार आठवतात. पक्वान्नात श्रीखंड खाल्ल्याची आठवण नाही. पण लाडू, जिलेबी, फेण्या, ही आठवतात. पातळ-भाजी हा प्रकार आम्हांला माहीत नव्हता. पण साधे वरण (हे घट्ट असे), फोडणीचे वरण, आमटी (कटाची) ही आठवतात.

फराळात, कालवलेले पोहे हे एक लोकप्रिय खाद्य होते. पोहे, तूप, मीठ, मेतकूट, हिरवी मिरची, खोबरे, फुटाणे, असे कालवीत. तेलंगणात त्यावर दही घालून खात. मला आवडणारे पदार्थ म्हणजे दहीपोहे, ताकात कालविलेले लाह्याचे पीठ, अनारसे आणि तिळाचे लाडू. बोर्नव्हिटा, कॉर्नफ्लेक, हॉर्लिक हे प्रकार आम्हांला ऐकूनही ठाऊक नव्हते. चहा, कॉफी, केक, बिस्किटे यांचा आम्हांला पत्ताही नव्हता. घरी रोज वैद्य येऊन नाड्या पाहून जात आणि आजारी माणसाला काढे देऊन जात. कुणाचे डोळे आले तर मला वाटते, त्यांत तंबाखू घालीत असावेत. त्याचा अनुभव मला एकदोनदा आला आहे. डॉक्टरांचा इलाज मला आठवत नाही. दात धुण्यास गोवऱ्याची राखुंडी, आंघोळींत तेले, शिकेकाई वापरीत. साबण अंगाला लावल्याचे मला आठवत नाही.

माझ्या भोवतालचा समाज हा बराच आळशी असावा. कामाचा उरक दिसत नसे. सगळे व्यवहार संथपणे होत. आमच्या शेजारी कोडंगलचे देशपांडे राहात. त्यांच्या घरी पूजाअर्चा, गप्पासप्पा संपून जेवणी होण्यास दुपारचे तीन वाजत. गडबड नाही, धडपड नाही. सगळे काही संथपणे चालत असे. एकादशीसारखे कडकडीत उपवासाचे दिवस असले की लोक आणखी निष्क्रिय होत. मला तर उपवास सहनच होत नाहीत. पण आमच्या घरी वडील, आजी, मोठी काकी, ही कडकडीत उपवास करीत. दोन एकादशा आल्या तर त्यांची स्थिती विचारू नका.

कोडंगल हे तालुक्याचे ठिकाण होते. जिल्ह्याचे ठिकाण गुलबर्गा. जिल्हा-

इ. स. १८०० पासून १९२० पर्यंत हकीकत आली होती. हे तिन्ही खंड हैदराबाद सरकारने प्रसिद्ध केले. त्यांपैकी पहिल्या दोन खंडांचे प्रकाशन चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते झाले. या निमित्ताने माझा त्यांच्याशी परिचय झाला.

१९५३ पासून १९५६ अखेरपर्यंत माझे इंग्रजी आणि मराठी वाचन चांगलेच झाले. या तीन वर्षांत मी एकशे अठ्ठावीस इंग्रजी, आणि तितकीच मराठी पुस्तके वाचून काढली. या काळात माझे इंग्रजीत स्वातंत्र्याच्या चळवळींवरील तीन खंड आणि मराठीत सूफीसंप्रदाय, आणि स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास हे दोन ग्रंथ अशी एकूण पाच पुस्तके बाहेर पडली.

१९५६ च्या सुरवातीपासूनच हैदराबाद राज्याचे तुकडे उडणार असा रंग दिसू लागला. महाराष्ट्र, म्हैसूर आणि आंध्र या तीन राज्यांत हैदराबाद संस्थान वाटले जाणार होते. सरकारी नोकरांपैकी कुणाला कोणत्या राज्यात पाठवायचे याचा खल सुरू झाला. आपल्यालाही म्हैसूर अगर महाराष्ट्र या राज्यात जावे लागणार हे मला दिसू लागले. हैदराबादेत आपल्याला आज जे स्थान आहे ते उद्या राहणार नाही, आणि मुंबई किंवा म्हैसूर येथे आपल्याला कोणी ओळखणारे नाही. या विचारांनी मी अस्वस्थ झालो. माझी मुलगी अलकनंदा ही मॅट्रिक पास होऊन डॉमेस्टिक सायन्स कॉलेजमधे शिकत होती. काही झाले तरी हैदराबाद सोडण्यापूर्वी तिचा विवाह उरकून घ्यावा असे मी ठरविले.

सुदैवाने तिला स्थळही चांगले मिळाले. उस्मानाबादचे दिवाकर देशपांडे हे एम. बी. बी. एस असून मेडिकल खात्यात नोकरीला होते. सोळा मे १९५६ रोजी अलकनंदाचा विवाह मोठ्या थाटाने पार पडला. दिवाकर देशपांडे हे पुढे लष्करात गेले. ते सध्या आर्मी मेडिकल कोरमधे मेजर असून त्यांची नेमणूक उत्तर प्रदेशात रुडकी येथे झाली आहे.

राज्यपुनर्रचनेमुळे मला मुंबई राज्यात पाठविण्याचे ठरले. मला हैदराबाद सोडण्याची मुळीच इच्छा नव्हती. मोठ्या कष्टाने आणि को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे कर्ज काढून मी हैदराबादेस घर बांधले होते. कर्जाचे दर चक्रवाढ व्याजाचे. थोडेबहुत हप्ते मी भरले होते. तरी पण घरावर सोसायटीचे तीस हजार रुपये देणे शिल्लक होते. घर विकून टाकावे तर त्याची किंमत तीस-पस्तीस हजारांच्या वर होण्याचा संभव नव्हता. म्हणजे कर्जफेडीत घर गेले अशी स्थिती होणार होती. मुलीच्या विवाहात मला बराच खर्च आला. म्हणजे आयुष्यात प्रथमच मला चाळीस हजारांपर्यंत कर्ज झाले होते. हैदराबादेसच मी राहिलो असतो तर आपल्या घरात राहून चार-पाच वर्षांत सगळी देणी फेडून टाकली असती. माझा मोठा मुलगा अरुण याचे बी. एससीचे शिक्षण पूर्ण होण्यास एक

वर्ष अवकाश होता. धाकटा अशोक हा एम. ए. प्रीव्हियसच्या वर्गात होता. त्यांना १९५८ च्या मे महिन्यापर्यंत तरी हैदराबादेस राहणे भाग होते. हैदराबाद आणि मुंबई या दोन ठिकाणी बिऱ्हाडे चालवायची आणि वर आपल्या पगारातून चाळीस हजारांचे कर्ज फेडावयाचे असे मोठे संकट माझ्यासमोर उभे राहिले. मी घर इतक्या मेहनतीने बांधले ते त्यात राहण्यास मिळावे म्हणून, पण चार वर्षांच्यावर मला त्यात राहता आले नाही. राज्य पुनर्रचनेमुळे हैदराबादचे घर धड काढता येईना, धड त्याचा उपभोग घेता येईना.

"आमचे लहानसे घरटे बांधण्यासाठी आम्ही गवताच्या काड्या गोळा करण्यात सगळे आयुष्य वेचले. पारध्याने त्या घरट्याची आणि आमची ताटातूट घडवून आणली."

"सय्यादने छुडाया हमसे वो आशियाना
इक उम्र जिसकि खातिर तिनके चुना किये हम"

हैदराबादचे जग आम्हांला परिचित होते. तेथील नोकरीत आमच्या तीन पिढ्या गेल्या होत्या. १९४८ नंतर ज्यांना बढत्या मिळाल्या त्यांत माझ्याप्रमाणे त्रास सहन केलेले माझे अनेक मित्र होते. मंत्र्यांपैकी जवळ जवळ सर्वांशीच माझे फार पूर्वीपासून मित्रत्वाचे संबंध होते. त्यामुळे सरकारी कामातही वातावरण जिव्हाळ्याचे राहिले होते. माझ्या मित्रांत आंध्र, कर्नाटकी, महाराष्ट्रीय, हिंदी आणि उर्दू भाषिक असे सर्व प्रकारचे लोक होते. योगायोगाने आमच्या भोवतालचे सगळे वातावरण कॉस्मोपालिटन होते. ते जग सोडून आता मला अपरिचित आणि वेगळ्या अशा जगात जावयाचे होते. मुंबईचा अफाटपणा, तेथील राज्यकारभाराची कडक शिस्त, जिव्हाळ्याचा आणि पर्सनल टचचा अभाव इत्यादींच्या अशा काही गोष्टी माझ्या कानावर पडू लागल्या की मी मनातून हादरून गेलो.

हैदराबादमधेच आपल्याला राहण्यास मिळावे अशी मी पुष्कळ खटपट केली. पण काही उपयोग झाला नाही.

पाच नोव्हेंबर १९५६ रोजी मी आणि उषा यांनी अतिशय विषण्ण मनाने हैदराबाद सोडले. त्यावेळी मला सत्तेचाळीसावे वर्ष चालू होते. माझ्या आयुष्यातील एका नव्या पर्वाला सुरवात झाली.

१९

मुंबई
१९५६ पासून

सहा नोव्हेंबर १९५६ रोजी मी आणि उषा मुंबईला घेऊन पोहोचलो. दुसऱ्या दिवशी मी सचिवालयात रुजू झालो. सचिवालयाच्या शिक्षण खात्यात डेप्युटी सेक्रेटरी, नायब सचिव म्हणून नेमणूक झाली. बेडेकर हे आय. सी. एस. अधिकारी शिक्षण खात्याचे सचिव होते. सुखटणकर (सध्या शिक्षणखात्याचे सचिव) हे त्यावेळी माझ्याप्रमाणेच नायब सचिव होते.

मुंबईस आल्यावर आम्ही प्रथम काही दिवस मॅजेस्टिक हॉटेलमध्ये राहिलो. त्यानंतर चर्चगेट स्टेशनजवळ सरकारने तात्पुरत्या खोल्या बांधल्या होत्या तेथे आमची राहण्याची सोय झाली. त्या खोल्यांना शेल्टर म्हणत. जेवणाखाणासाठी कँटीनची सोय करण्यात आली होती. शेल्टरमधे अनेक अधिकाऱ्यांचा परिचय झाला. शेल्टरमध्ये मी तीस एप्रिल १९५७ पर्यंत होतो. एक मे रोजी मला मी सध्या राहात असलेला फ्लॅट (सुशील, आर्थर बंदर रोड, कुलाबा) मिळाला. गेली बारा वर्षे मी त्याच फ्लॅटमध्ये राहात आहे.

मुंबईच्या अफाटपणाने मी मनातून बावरून गेलो होतो. हैदराबादच्या संथ आणि ऐसपैस जीवनाला सरावलेली माणसे आम्ही. त्यातून माझी कित्येक वर्षे खेड्यापाड्यांत आणि तालुक्याच्या गावी गेलेली. मुंबईत आम्हांला ओळखणारे कोणीच नव्हते. प्रत्येकजण आपल्याच नादात. कँटीनचे जेवण जेवताना आम्हांला घरच्या जेवणाची पदोपदी आठवण येई. उषा लवकरच हैदराबादला परत गेली. मला अतिशय एकेकटे आणि उदास वाटू लागले. ऑफिसचे काम मी व्यवस्थितपणे करीत होतो. पण आपण कालपर्यंत हैदराबाद राज्यात सेक्रेटरीच्या हुद्यावर होतो. तो आज डेप्युटी सेक्रेटरी झालो आहोत ही जाणीव मनाला सतत बोचीत असे. मुंबई राज्यातील कामाची शिस्त, अधिकाऱ्यांच्या परस्पराशी वागण्याच्या पद्धती याही आम्हां हैदराबादच्या लोकांना नवीन होत्या. त्यांतील रुक्षपणामुळेही मी अस्वस्थ झालो. कासवानें आपले पाय पोटात खेचावे तसे मी वागू लागलो. सेक्रेटरीचा हुद्दा, ग्रंथालयांच्या चळवळींचा हव्यास इत्यादि गोष्टी मला विसराव्या लागल्या.

सुदैवाने लवकरच माझा येथील रसिक साहित्यिक मंडळींशी परिचय होऊ लागला, प्राध्यापक न. र. फाटक यांचा माझा औरंगाबादेपासून परिचय होता. त्यांच्यामुळे मी अधूनमधून साहित्यसंघ मंदिरात जाऊ लागलो. तेथे बावडेकर, आमोणकर, चिखलीकर, पांगे इत्यादि मंडळींची ओळख झाली. या मंडळींच्या स्नेहाचा लाभ मला गेली बारा वर्षे होत आला आहे.

डिसेंबर १९५६ मध्ये सरकारतर्फे मराठी नाट्यमहोत्सव सुरू झाला. नाटकांचा परीक्षक म्हणून माझी नेमणूक करण्यात आली. माझ्याबरोबर परीक्षक म्हणून लीला चिटणीस आणि भांडारकर (सध्या ॲटामिक एनर्जीच्या आफिसमध्ये) यांचीही नेमणूक झाली. त्या निमित्तानें पंधरावीस नाटके पाहून झाली. त्या वेळेपासून नाटकांची गोडी लागली ती काही सुटता सुटत नाही.

मला वाटते ती १९५७ ची सव्वीस जानेवारीची तारीख असावी. पु. ल. देशपांडे यांचे ' तुझे आहे तुजपाशी ' हे नाटक प्रथमच रंगभूमीवर आले. मी त्या नाटकाला हजर होतो. दाजी भाटवडेकर, वर्तक, विजया खोटे, राजा पटवर्धन, अरविंद देशपांडे इत्यादींच्या भूमिका बहारीच्या झाल्या. भाटवडेकरांचे काकाजीचे पात्र हे अप्रतिम झाले. त्यांनी एका उर्दू कवितेच्या दोन ओळी म्हटल्या. त्याबरोबर त्यांनी हेही म्हटले, " गालिबनें म्हटले आहे, " असे म्हणून ते म्हणाले,

लुत्फे मय तू क्या जाने जाहिद
नादान तूनें कभी पीही नहीं

'अरे कर्मठा, मद्याची गोडी तुला काय माहीत असणार ! अरे नादाना, ती तर तू कधीच प्याला नाहीस !' वास्तविक पाहता या ओळी कवी दाग याच्या आहेत; गालिबच्या नाहीत. भाटवडेकरांच्या तोंडचा हा चुकीचा उल्लेख ऐकून मी अस्वस्थ झालो. पु. ल. देशपांडे यांचे नाटक मी वाचले. त्यात कवीचे नाव न देता मोघम 'शाइरने म्हटले आहे,' असे लिहिले होते. नाटक पाहून परत येताना सहज माझ्या मनात विचार आला की महाराष्ट्रात उर्दू काव्याबद्दल इतकी जिज्ञासा आहे; पण भाषेचा परिचय नसल्यामुळे अशा चुका होतात. योगायोगाने आपल्याला उर्दू फारसीचे ज्ञान आहे. उर्दू काव्याचा परिचय आपण महाराष्ट्राला का करून देऊ नये ? एखादा उर्दू कवी घ्यावा आणि त्याच्या समग्र काव्याचा मराठी अनुवाद करून टाकावा. उर्दू काव्यातील त्रिमूर्ती म्हणजे मीर, गालिब आणि इक्बाल हे होत. त्यांतही निवड करायची म्हटले तर गालिबला उर्दूचा सर्वश्रेष्ठ कवी समजावा लागेल. गालिबच्या उर्दू काव्याचा मराठी अनुवाद करण्याचे मी ठरविले.

याच सुमारास माझा एका थोर आणि सज्जन अशा विद्वानाशी परिचय झाला. प्राध्यापक नजीब अश्रफ नदवी हे जोगेश्वरी कॉलेजमध्ये फारसीचे प्राध्यापक होते. त्या जागेवरून निवृत्त झाल्यावर त्यांना अंजुमने इस्लाम या संस्थेने उर्दू संशोधन केंद्राचे संचालक म्हणून नेमले. या केंद्राचे मोठे असे उर्दू ग्रंथालय असून त्यात पंधरा ते वीस हजार ग्रंथ आहेत. उर्दू संशोधन केंद्र हे बोरीबंदर स्टेशनच्या समोर टाइम्स ऑफ इंडियाच्या ऑफिसला लागून आहे. प्राध्यापक नदवी हे एक दिवस मला ऑफिसमध्ये भेटण्यास आले. अतिशय विद्वान मनुष्य. ते मूळचे बिहार प्रांताचे. सर जदुनाथ सरकार यांच्याबरोबर त्यांनी काही दिवस काम केले. औरंगजेबाच्या सुमारे पाचशे पत्रांचे संपादन करून ती पत्रे त्यांनी दोन खंडांत प्रसिद्ध केली. पत्रांना त्यांनी लिहिलेली प्रस्तावना ही जवळजवळ दोनशे पानांची असून तिच्या पानापानावर नदवींचा व्यासंग आणि संशोधक दृष्टी यांचा प्रत्यय येतो. मी त्यांना त्यांच्या संशोधन-केंद्रात भेटलो. गालिबच्या काव्याचा मराठीत अनुवाद करावा असे मी ठरविले आहे, असे मी त्यांना सांगितले. ते ऐकून नदवींना फार आनंद झाला. त्यांनी ताबडतोब आपल्याजवळची गालिबच्या काव्याची प्रत मला दिली आणि या कामात तुम्हांला हवे ते साहाय्य करीन असे ते म्हणाले.

त्या दिवसापासून मी ऑफिसमधून घरी आलो की गालिबच्या काव्याचा अनुवाद करीत बसे. पुढील सात आठ महिने मी या कामात अगदी गुंगून गेलो. उर्दू कवी आणि त्यांच्या कविता यांवरील अनेक पुस्तके मी नदवींच्याकडून

घेऊन येत असे. त्यामुळे माझा उर्दू काव्याचा सपाटून अभ्यास होऊ लागला.

आयुष्यातील योगायोग हे विलक्षणच म्हटले पाहिजेत. हैदराबादेतील माझे सगळे आयुष्य उर्दूतून सरकारी कामकाज करण्यात गेले. पंधरा सोळा वर्षेपर्यंत मामलेदार म्हणून किंवा डेप्युटी कलेक्टर म्हणून माझा रात्रंदिवस उर्दूशी संबंध येई. सरकारी पत्रव्यवहार, खटले, न्यायनिवाडे, इत्यादि सर्व उर्दूतून चालत. पण ऑफिसचे काम संपले की मी मराठी अगर इंग्रजीकडे वळत असे. उर्दू साहित्याचा असा अभ्यास मी केलाच नाही. उलट त्या विषयाचा कंटाळाच करीत गेलो. आणि आता मुंबईत आल्यावर मी उर्दू साहित्याचा सतत अभ्यास करू लागलो. गालिबचा माझा अभ्यास चालू होता; पण इतर उर्दू कवींच्या अभ्यासाकडे वळण्यास कारण घडले तेही अनपेक्षित होते.

माझे मित्र दत्तात्रय विष्णु जोग हे मी औरंगाबादेस कलेक्टर असताना तेथील मिलिंद महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक होते. मी मुंबईला आलो तेव्हा ते येथील रुइया कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत होते. एक दिवस ते माझ्याकडे आपल्या दोघा मित्रांना घेऊन आले. ते मला म्हणाले, " हे माझे मित्र विद्याधर गोखले आणि गोविंद तळवळकर. हे दोघेही ' लोकसत्ता ' दैनिकात संपादक म्हणून काम करीत असतात. " गोखले आणि तळवळकर यांचा आणि माझा तो पहिला परिचय. गोखल्यांना उर्दू काव्याची अतिशय आवड दिसली. मी त्यांना माझा गालिबचा अनुवाद सुरू असल्याचे सांगितले. ते मला म्हणाले, " उर्दू गजल वाङ्मयावर एखादा लेख का देत नाही ? आमच्या लोकसत्ता दैनिकात तो आम्ही छापू. " मी लेख देण्याचे कबूल केले. ' उर्दू गजल शायरीची मुशाफरी ' हा माझा पहिला लेख ' लोकसत्ता ' साप्ताहिक अंकात तीन फेब्रुवारी १९५७ रोजी प्रसिद्ध झाला. त्या एका लेखाने मला महाराष्ट्रभर प्रसिद्धी मिळवून दिली. यानंतर गोखल्यांच्या उत्तेजनाने मी लोकसत्तेत उर्दू कवींच्यावर लेखमाला सुरू केली. उर्दूतील सुप्रसिद्ध कवी सौदा, मीर, जुर्रत, रंगीन, मीर हसन, मीर असर, दयाशंकर, मोमिन, इन्शा, जौक, अमानत, शौक लखनवी, शौक किदवाई, दाग, हसरत, इक्बाल, जिगर, जोश, इत्यादींच्यावर मी लेख लिहिले. पुढे ' उर्दू काव्याचा परिचय ' हा माझा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात हे पंचवीस लेख समाविष्ट करण्यात आले.

मुंबईत मी व्याख्याने देण्यास सुरुवात केली ती जानेवारी १९५७ पासून. गोविंद तळवळकरांच्यामुळे माझ्या पहिल्या व्याख्यानाचा योग आला. लघुकथा-लेखक अग्निहोत्री यांच्या कथासंग्रहावर चर्चा करण्यासाठी कल्याणला हे व्याख्यान ठेवण्यात आले होते. मुंबईत माझे पहिले मराठी व्याख्यान कुलाबा महिला

मंडळात झाले, ते महिला मंडळाच्या चिटणीस सौ. वाकनीस यांच्यामुळे. मुंबईला आल्यानंतर ज्या काही थोड्या मंडळींबरोवर माझा जिव्हाळ्याचा स्नेह जमला त्यांत वाकनीस पतिपत्नी आहेत. श्री. वाकनीस हे बडोदे संस्थानात पूर्वी मुख्य चिटणीस होते. राज्यपुनर्रचनेनंतर ते मुंबईत ग्रंथालय खात्याचे संचालक म्हणून काम करू लागले. त्यांची विद्वत्ता, व्यासंग आणि रसिक स्वभाव यामुळे आमचा स्नेह जुळून आला तो आजपर्यंत चालू आहे.

सुप्रसिद्ध लेखिका दुर्गा भागवत यांनी तीस एप्रिल १९५७ रोजी एशियाटिक सोसायटीत माझे पहिले इंग्रजी व्याख्यान घडवून आणले. मी आदिवासींच्या प्रश्नावर व्याख्यान दिले. त्याचा परिणाम म्हणून दुसऱ्या दिवशीच्या भारत ज्योतीमधे माझा परिचय प्रसिद्ध झाला. १९५७ पासून आजपर्यंत मी अडीचशेच्या वर व्याख्याने दिली. ही व्याख्याने मराठी, कन्नड, हिंदी, उर्दू , इंग्रजी या पाचही भाषांतून झाली आहेत. सरकारी कामाच्या निमित्ताने मी मुंबईबाहेर गेलो की परगावची मंडळी माझी व्याख्याने घडवून आणतात. पुणे, सातारा, वाई, नगर, नाशिक, वसई, डहाणू , ठाणे, उरण, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नांदेड, परभणी, आंबेजोगाई इत्यादि ठिकाणी मला व्याख्याने देण्याचा योग आला.

उर्दू कविश्रेष्ठ गालिब याच्या समग्र उर्दू गजलांचा मराठी अनुवाद मी पूर्ण केला. तो प्रकाशित कसा करावा या विचारात मी होतो. माझे मित्र प्राध्यापक चिखलीकर (आता प्राचार्य, देवगिरी कॉलेज, औरंगाबाद) यांनी माझी पॉप्युलर प्रकाशनचे भटकल यांच्याशी गाठ घालून दिली. सदानंद भटकलांच्यामुळे माझा गालिबच्या गजलांचा मराठी अनुवाद इ. स. १९५८ मध्ये प्रसिद्ध झाला.

इ. स. १९५७ मधे सरकारने मराठवाडा विद्यापीठ कमिशन नेमले. कमिशनचे अध्यक्ष न्यायमूर्ती पळनिटकर हे होते. कमिशनच्या सभासदांत मुंबई विद्यापीठाचे रेक्टर डोंगरकेरी, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉक्टर कोलते, शिक्षणतज्ज्ञ डॉक्टर शेंदारकर इत्यादि मंडळी होती. मी कमिशनचा सभासद सचिव होतो. कमिशनच्या कामाच्या निमित्ताने आम्ही औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, आंबेजोगाई, पुणे इत्यादि स्थळांना भेटी दिल्या. डॉक्टर कोलते, श्री. डोंगरकेरी, शामराव कदम इत्यादि सभासदांबरोबर माझे जिव्हाळ्याचे संबंध जडले. डोंगरकेरी म्हणजे विद्वत्ता, व्यासंग आणि सौजन्य यांचा मनोहारी संगमच जणू. कमिशनने सादर केलेल्या रिपोर्टवरून सरकारने १९५९ मध्ये औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ स्थापन केले. तेव्हा मला किती समाधान वाटले असेल याची कल्पनाच केलेली बरी. निजामी राजवटीतील मराठीची कुचंबणूक मी प्रत्यक्ष अनुभविली होती. तो अनुभव मी कधीच विसरणे शक्य नाही. आज मराठ-

वाड्यात जिल्ह्याजिल्ह्यांतून कॉलेजे झाली आहेत. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा खूपच प्रसार झाला आहे. मराठवाड्यात मराठी हक्काने वावरते आहे. ' चिमण्या चालल्या उन्हाच्या ' अशी तिची स्थिती राहिली नाही. " काय सांगू बाई, माझ्या चुड्याची नवती, भांगोभांग मोती, माझ्या कुंकवाच्या भवती " असे वैभव तिला प्राप्त झाले आहे. अलीकडे औरंगाबादला गेलो असताना विद्यापीठाची भव्य इमारत मी पाहिली. आपल्या डोळ्यांचे पारणे फिटले असे मला वाटले. विद्यापीठाचे पहिले उपकुलगुरु म्हणून सरकारने श्री. डोंगरकेरी यांची नेमणूक केली. त्यांच्यामुळे मराठवाडा विद्यापीठाची झपाट्याने प्रगती झाली.

१९५७ हे वर्ष मला फार त्रासाचे गेले. मुलांचे शिक्षण हैदराबादेस चालू असल्यामुळे उषाला हैदराबाद सोडता येईना. मुंबईला मी एकटाच होतो. खाण्यापिण्याचे बरेच हाल होत. कुलाबा, बोरीबंदर आणि चर्चगेटच्या भागातील सगळी हॉटेले आणि खाणावळी मी अनुभविल्या. घरगुती जेवणाची सर त्या हॉटेलांना आणि विश्रांतिगृहांना कोठून येणार ? मला तर हॉटेलच्या जेवणाची शिसारी बसली; पण नाइलाज होता.

मुंबईची महागाई, हैदराबाद आणि मुंबई येथील दोन बिऱ्हाडांचा खर्च, त्यातच घरावरील कर्जाचे हप्ते फेडणे यामुळे मला मुंबईत अस्वस्थ आणि एकाकी वाटे. विरंगुळा होता तो फक्त लेखनवाचनाचा.

शेवटी १९५८ मधे अरुण बी. एससी. पास झाला. माझा धाकटा मुलगा अशोक हाही एम. ए. पास झाला. आता हैदराबादेत वेगळे बिऱ्हाड ठेवण्याचे आम्हांला काही कारण नव्हते. १९५८ च्या मे महिन्यात उषा आणि मुले मुंबईला आली. आणि आम्ही सगळे एकत्र राहू लागलो. हैदराबादच्या आमच्या घरात माझी आई, माझा भाऊ राघवेंद्र आणि त्याचे कुटुंब ही राहू लागली. माझी आई मुंबईला दोनतीन वेळा येऊन गेली. पण तिचे सोवळे-ओवळे, मुंबईच्या वातावरणात जमेना, त्यामुळे ती हैदराबादेतच राहू लागली.

हैदराबादच्या घराचे कर्ज फेडण्यासाठी मला दर महिन्यास तीनचारशे रुपये पाठवावे लागत. इ. स. १९६४ अखेरपर्यंत मी सगळे कर्ज फेडून टाकले आणि घर माझ्या पूर्ण मालकीचे झाले.

इ. स. १९५९ च्या जानेवारी महिन्यात मी क्षयाने आजारी पडलो. ते दुखणे तीन महिनेपर्यंत चालू होते. त्यातून उठल्यावर मला नोकरीत बढती मिळून अर्थखात्याचा संयुक्त सचिव म्हणून माझी नेमणूक झाली. त्या कामावर मी एक वर्ष होतो. इ. स. १९६० च्या मे महिन्यात महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. त्या-

वेळी मला पुन्हा बढती मिळून मला सचिवाचा हुद्दा मिळाला; पण माझी नेमणूक महाराष्ट्र जिल्हा गॅजेटियर्सचा कार्यकारी संपादक म्हणून करण्यात आली.

माझे रसिक स्नेही विद्याधर गोखले यांच्या प्रोत्साहनाने उर्दू कवींवरची माझी लेखमाला लोकसत्तेत चालू असताना गोखल्यांचे पंडितराज जगन्नाथ हे नाटक रंगभूमीवर आले.

ते नाटक लिहीत असताना जगन्नाथ पंडित आणि त्याचा काळ यासंबंधी माझ्या आणि गोखल्यांच्या अनेक वेळा चर्चा झाल्या. या निमित्ताने मी जगन्नाथ पंडितासंबंधी मिळेल ती माहिती वाचून काढली. डॉक्टर गोळ्यांचे लेख, प्राध्यापक आर्येंद्र शर्मा यांनी संपादिलेले जगन्नाथ पंडिताचे वाङ्मय, रामस्वामीकृत जगन्नाथ पंडिताचे चरित्र, दिवाकर कृष्णकृत 'तोड ही माळ' नाटक इत्यादि पुस्तके मी वाचून काढली. शहाजहान बादशहाचे समकालीन असे फारसी चरित्र बादशहानामा यात शहाजहान बादशहाच्या पदरी असलेल्या जगन्नाथ कलावंत या गवयाची माहिती मिळते. जगन्नाथ कलावंत आणि जगन्नाथ पंडित हे एकच होत अशी डॉक्टर गोळ्यांनी समजूत करून घेतली. अहमदाबादचे प्राध्यापक आठवले यांचाही हाच समज झाला आहे. शहाजहानच्या शेवटच्या काळात त्याचा सरदार मुल्ला फकीरुल्ला याने मानसिंह तोमर याच्या संगीतविषयक मान कौतूहल' या ग्रंथाचा फारसी अनुवाद केला. ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने जगन्नाथ कलावंताची माहिती दिली आहे. ती पाहाता जगन्नाथ पंडित आणि जगन्नाथ कलावंत या व्यक्ती भिन्न होत याची मला खात्री वाटली. एखाद्या यवनीचा संबंध आलाच असेल तर तो जगन्नाथ कलावंताच्या जीवनात; जगन्नाथ पंडिताच्या नव्हे; याबद्दल मला संशय नाही. या विषयावर नवभारतात माझा एक संशोधनात्मक लेख प्रसिद्ध झाला. गोखल्यांचे पंडितराज जगन्नाथ नाटक मात्र बहारीचे उतरले आहे यात शंका नाही.

मुल्ला फकीरुल्लाने केलेला रागदर्पण (मान कौतूहल) चा फारसी अनुवाद पाहात असता मला संस्कृत आणि इतर भारतीय भाषांचा अभ्यास करून फारसीतून ग्रंथरचना करणाऱ्या मध्ययुगीन भारतातील मुसलमान साहित्यिकांची माहिती गोळा करावीशी वाटली. मला मिळालेल्या माहितीने मी थक्क झालो. बाराव्या शतकात मुलतानचा रहिवासी आणि मीर हसनचा मुलगा अब्दुर्रहमान याने अपभ्रंश भाषेत 'संदेश रासक' नावाचे अप्रतिम काव्य लिहिले. नायिकेचा पती परदेशी गेला असून; ती आपली विरहकथा एका प्रवाशाला सांगून आपला संदेश पतीपाशी पोहोचविण्याची त्याला विनंती करीत आहे असा या काव्याचा विषय आहे. याचे संपादन भारतीय विद्याभवनतर्फे डॉक्टर हरिवल्लभ भायाणी

यांनी केले आहे. ते काव्य वाचून मी मुग्ध होऊन गेलो. त्यावर मी पुण्याच्या सकाळमध्ये एक लेख लिहिला. काव्यातील काही ओळी पाहा—

उत्तरायणि वड्ढिहि दिवस
णिसि दक्खिण इहु पुव्व णिउइड
दुच्चिय वड्ढहि जत्थपिय
इहू तीयउ विरहायणु होइयऊ

उत्तरायणात दिवस वाढतो, दक्षिणायनात रात्री वाढतात. पण ज्यात दिवस आणि रात्र ही दोन्ही वाढतात तो हा विरहायन होय.

जामिणि जं वयणिज्ज तुअ
तं तिहुयणि ण हू माइ
दुक्खिहि होइ चउग्गणी
झिज्जइ सुहसंगाइ

हे यामिनी, तुझी पापे त्रिभुवनात मावायची नाहीत. दुःखाच्या समयी तू चौपट होतेस तेच सुखाच्या समयी तू लहान होतेस.

मध्ययुगात मुसलमानांनी भारतीय संगीताचा अभ्यास केला. आणि त्यावर फार्सीत ग्रंथ लिहिले. अकबर बादशहाने तर भाषांतराचे एक स्वतंत्र खातेच उघडले. अबुल्फजल, फैजी, अब्दुल्कादर बदायूनी इत्यादि मंडळींच्याकडून त्याने महाभारत, रामायण, हरिवंश, भागवत, योगवासिष्ठ, राजतरंगिणी, पंचतंत्र, सिंहासन-बत्तिशी इत्यादि संस्कृत ग्रंथांची फारसी भाषांतरे करवून घेतली. त्याचा राजकवी फैजी याने तर नळदमयंती आख्यानावर फारसीतून एक महाकाव्य रचले आहे. या काव्यातून त्याचा भारतीय संस्कृतीबद्दलचा अभिमान व्यक्त झालेला आपल्याला आढळून येतो. तो म्हणतो,

" माझ्या लेखणीच्या द्वारे मी काळाच्या गळ्यात यज्ञोपवीत अडकवीत आहे. मला या काव्याची (नळदमयंती) धुंदी का चढू नये ? ही मदिरा हिंदुस्थानच्या साखरेची बनलेली आहे. धन्य आहे, जगाच्या चित्रशाळेला या अमर चित्राचा, नळदमयंती काव्याचा लाभ झाला. नळदमयंती आख्यानाच्या चंदनाने गंध उगाळून मी प्रभात काळाच्या कपाळावर टिळा लावीत आहे."

जहांगीरच्या काळात मुल्ला मसीहा याने रामायणावर फार्सीतून महाकाव्य रचिले. तो म्हणतो, " मसीहा, तू कुणाच्याही टीकेची पर्वा न करता निस्संकोच मनाने रामकथा लिही बरे. प्रथम गंगाजलाने तोंड पवित्र करून घे आणि मग रामकथा सांग."

शहाजहानचा मुलगा दारा शुकोह हा तर भारतीय संस्कृतीचा मोठा चहाता

होता. त्याने अनेक पंडितांना आश्रय दिला. पासष्ट उपनिषदांचे त्याने अनुवाद करविले. त्याने स्वतः भगवद्गीतेचा फारसी अनुवाद केला. योगवासिष्ठाचे त्याने भाषांतर करविले. इस्लाम आणि हिंदूधर्म यांच्यांत समान तत्त्वे कशी आहेत हे दाखविण्यासाठी त्याने मज्मुअल बहरैन म्हणजे ' समुद्र-संगम ' हा फारसी ग्रंथ लिहिला. तीस ऑगस्ट १६५९ रोजी औरंगजेबाच्या आज्ञेने त्याचा अत्यंत क्रूरपणे वध करण्यात आला. दारा शुकोहची काही संस्कृत पत्रे उपलब्ध झाली आहेत. वाराणशीच्या नृसिंहाश्रम या यतिवर्याला त्याने लिहिलेल्या संस्कृत पत्राचा मायना पाहा. " सच्चिदानंदस्वरूपेषु महायतिवरभूपेषु परिकल्पितनिर्विकल्प-समाधिविध्वस्तसंसारमहाश्रमेषु श्री गोस्वामि नृसिंहाश्रमेषु प्रकटित परमानंद-संदोहतत्त्वज्ञान महामोहसमवगत सप्त भूमिका समारोह मुहंमद दारा शिकोहकृता ओन्नमोनारायणायेत्यष्टाक्षरमंत्रपूर्वकः नमस्काराः संति ।"

संदेशरासककर्ता अब्दुर्रहमान, नळदमयंती आख्यान रचणारा फैजी, फार्सी रामायणकार मुल्ला मसीहा, उपनिषदांचे अनुवाद करविणारा राजपुत्र दारा शुकोह इत्यादींच्यावर मी लेख लिहिले. नागपूरच्या सुविचार प्रकाशन या संस्थेने माझे मणिकांचन हे पुस्तक इ. स. १९६१ मध्ये प्रसिद्ध केले. त्यात हे सगळे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत.

उर्दू कविश्रेष्ठ मिर्जा गालिब याच्या गझलांचा मी केलेला मराठी अनुवाद प्रसिद्ध झालाच होता, लोकसत्तेतील लेखांच्या निमित्ताने माझा उर्दू काव्याचा अभ्यास सतत चालू होता. एखादे फारसी महाकाव्य अनुवादण्यासाठी घ्यावे असे मला वाटू लागले. माझे लक्ष फिर्दौसीच्या शहानाम्याकडे गेले.

इराणचा कविकुलगुरू फिर्दौसी याने रचिलेले शहानामा महाकाव्य म्हणजे इराणचे महाभारतच होय. अरबांनी इ. स. ६४० मध्ये इराण जिंकून तो इस्लाममय करून टाकला. त्यापूर्वी इराणमध्ये पारसी लोकांचा झरतुश्त धर्म नांदत होता.

इराणचे साम्राज्य एकेकाळी सगळे मध्यपूर्व, अफगाणिस्तान, सिंध, बलुचिस्तान इत्यादि प्रदेशांवर पसरले होते. जमशीद, फरीदून खुस्रौ, दारा, नौशीरवान इत्यादि प्रतापी सम्राट, सुहराब, रुस्तमसारखे पराक्रमी वीर प्राचीन इराणात होऊन गेले. फिर्दौसीने आपल्या पन्नास हजार ओळींच्या शहानाम्यात इराणच्या प्राचीन राजवंशाच्या कथा दिल्या आहेत. अरबांच्यामुळे इराण्यांना इस्लाम धर्म स्वीकारावा लागला. पण त्यांनी फारसीची, स्वभाषेची जोपासना केली. इराणच्या गतवैभवाचा अभिमान आपल्या मनात सतत बाळगला. इराणची अस्मिता कायम ठेवण्याचे महत्त्वाचे काम शहानामा या महाकाव्याने केले आहे.

या एका महाकाव्यामुळे इराण्यांना आपण अरबांहून भिन्न असून आपली संस्कृती प्राचीन, बलशाली आणि वैभवपूर्ण आहे अशी जाणीव झाली. इस्लामला राष्ट्रवादाचे वावडे आहे. पण इराण्यांनी इस्लामच्या चौकटीत राहूनही आपल्या इराणी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. त्यांनी अरबांचे वर्चस्व झुगारून दिले, अरबी भाषेच्या ऐवजी आपल्या फार्सी भाषेचा पुरस्कार केला, फार काय, बहुसंख्य मुसलमानांना न आवडणारा शिया पंथ, हा आपला राष्ट्रीय धर्म बनविला आणि इस्लामी धर्मशास्त्रात न बसणाऱ्या आणि अद्वैत वेदांताकडे नेणाऱ्या सूफी सांप्रदायाचा आपल्या धार्मिक वाङ्मयातून आणि काव्यांतून हिरिरीने पुरस्कार केला. फार्सी भाषेत अनेक कवी, आणि वाङ्मयाचे निर्माते होऊन गेले. कविश्रेष्ठांत फिर्दौसी, फरीदुद्दीन अत्तार, शेख सादी शीराजी, हाफिज, जामी, रूमी, निजामी इत्यादींनी फार्सी काव्य समृद्ध करून सोडले. यूरोपमध्ये फ्रेंच भाषेला जे स्थान आहे तेच स्थान फार्सीला इराण, अफगाणिस्तान, उजबेकिस्तान, भारत इत्यादि देशांत प्राप्त झाले. इ. स. १५२० मध्ये इराणमध्ये शहा इस्माईल सफवी याने राष्ट्रीय अशा इराणी राजवंशाची स्थापना केली. इ. स. ६४० मध्ये इराण्यांचे राष्ट्रीय साम्राज्य अरबांच्या वर्चस्वाखाली गेले ते नऊशे वर्षांनंतर पुन्हा अरबांच्या तावडीतून मुक्त झाले.

इराणची अस्मिता जागृत ठेवण्याचे काम फिर्दौसीच्या शहानाम्याने केले. त्यातील इराणी सम्राटांच्या आणि वीरपुरुषांच्या (ते सर्व पारसी आणि झरतुश्त धर्मानुयायी होते) कथा मी आवडीने वाचू लागलो. याच सुमारास 'शशि' मासिकाच्या संपादिका गुलाबबाई जोशी यांनी मला शशीसाठी लेख लिहून देण्यास सांगितले. मी त्यासाठी फिर्दौसीच्या शहानाम्यातील कथा निवडल्या. त्या कथांचे मराठी अनुवाद शशीत नियमाने प्रसिद्ध होऊ लागले. जाल आणि रुदाबे, सियावश आणि सुदावे, बेजन आणि मनीजे, सुहराब आणि रुस्तम इत्यादि फार्सी कथा मी मराठीत आणल्या. शहानामा महाकाव्यातील दहा हजार ओळींचा मी मराठी अनुवाद केला. तो पुढे माझे मित्र आणि व्हीनस प्रकाशनचे प्रमुख श्री. पाध्ये यांनी फिर्दौसीच्या कथा या नावाने दोन भागांत प्रसिद्ध केला.

इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र शासनाने साहित्य संस्कृती मंडळ स्थापन केले. मंडळाचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध विद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना देण्यात आले. मंडळाचा सभासद सचिव म्हणून माझी नेमणूक करण्यात आली. १९६८ अखेरपर्यंत मी मंडळाचा सचिव म्हणून काम केले. या आठ वर्षांच्या काळात माझा महाराष्ट्रातील अनेक विद्वानांशी घनिष्ठ संबंध आला. सुप्रसिद्ध

संस्कृतज्ञ डॉक्टर दांडेकर, प्राच्य विद्येचे तज्ज्ञ महामहोपाध्याय मिराशी, भाषाशास्त्रज्ञ डाक्टर घाटगे, सुप्रसिद्ध टीकाकार वा. ल. कुलकर्णी, प्रसिद्ध लेखिका दुर्गा भागवत, प्रसिद्ध नाटककार आणि लेखक पु. ल. देशपांडे अशा किती तरी महनीय व्यक्तींच्या सहवासाचा लाभ मला झाला, ही मी मोठ्या भाग्याची गोष्ट समजतो.

१९६० मध्ये गॅजेटियर बोर्ड, साहित्यसंस्कृति-मंडळ या खात्यांच्या जोडीने मला नाट्यपूर्व परीक्षण मंडळाचा अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. हे काम मी पाच वर्षे केले. या निमिताने मला शेकडो नाटके वाचावी लागली, आणि किती तरी नाटके पाहावी लागली. या मंडळावर ग. ल. ठोकळ, वामनराव चोरघडे, राम शेवाळकर, सरोजिनी बाबर, प्राध्यापक धोंड, कै. डॉक्टर व्यास इत्यादि रसिक मंडळी होती. त्यांच्या सहवासामुळे मला मराठी नाटकवाङ्मय अभ्यासण्यास मदत झाली आणि मराठी रंगभूमीचे जवळून निरीक्षण आणि परीक्षण करता आले.

माझा मोठा मुलगा अरुण हा हैदराबादेहून बी. एससी. पास होऊन आला होता. नोकरीच्या मागे न लागता स्वतंत्र धंदा करावा असे त्याने ठरविले. माझे मित्र श्री. भांडारकर (सध्या अॅटामिक एनर्जीच्या खात्यात) हे त्यावेळी भारत सरकारच्या टेक्निकल शिक्षणाचे पश्चिम भागापुरते डायरेक्टर होते. त्यांनी सल्ला दिला की अरुणने कोणत्यातरी कारखान्यात फाउंड्रीचे शिक्षण घ्यावे. त्यांच्या प्रयत्नाने अरुणला मॅलिएबल आयर्न या कारखान्यात प्रोवेशनर म्हणून प्रवेश मिळाला. तेथे एक वर्ष त्याने शिक्षण घेतले. त्यानंतर फोर्बस कॅंपबेल या सुप्रसिद्ध कंपनीत तेथील एक व्यवस्थापक श्री. राजवाडे यांच्या प्रयत्नाने, अरुणला स्प्रिंग वॉशर्सचे काम शिकण्याची संधी मिळाली. तेथे तो दोन वर्षे होता. स्प्रिंग वॉशर्सचे काम त्याने शिकून घेतले. त्याची इच्छा स्वतःचा कारखाना काढावा अशी होती. पण आमच्याजवळ भांडवल नव्हते. दोन वर्षेपर्यंत कोणी भांडवलदार मिळविण्याच्या खटपटीत तो होता. या बाबतीत त्याला काही कटू अनुभव आले. सुदैवाने कच्छी समाजातील एक होतकरू तरुण श्यामजीभाई त्याला येऊन मिळाला. १९६२ मध्ये त्या दोघांनी मिळून मुलुंडला कारखाना चालू केला. कंपनीत अरुणची शेकडा तीसची भागीदारी असून, कारखान्याच्या तांत्रिक विभागाचा तोच डायरेक्टर आहे. आपल्या धंद्यात त्याचा चांगला जम बसला आहे.

१९६२ मध्ये बारा मार्च रोजी अरुणचा विवाह झाला. पुण्याचे मिलिटरी इंजीनियरिंग सर्व्हिसचे श्री. देशमुख यांची मुलगी वासंती हिच्याबरोबर त्याचा

विवाह झाला. वासंती पदवीधर असून चित्रकलेचा तिला नाद आहे. अरुणला एक मुलगा प्रियदर्शन आणि मुलगी प्रीती अशी दोन अपत्ये आहेत. आम्ही सगळे एकत्रच राहातो.

माझा दुसरा मुलगा अशोक याने दोन तीन ठिकाणी नोकऱ्या केल्या. पण त्यालाही स्वतंत्र धंदा करावा अशी इच्छा झाली. दोनतीन वर्षेपर्यंत तो शक्ती केमिकल्स या कंपनीत भागीदार आणि कंपनीचा सेल्स-ऑफिसर होता. आता त्याने अशोक एंटरप्राइजेस म्हणून स्वतंत्र धंदा सुरू केला आहे.

एकोणीसशे त्रेसष्टच्या फेब्रुवारी महिन्याच्या सत्तावीस तारखेला अशोकचा विवाह पुण्याचे श्री. लोणकर यांची मुलगी कल्याणी हिच्याबरोबर झाला. कल्याणी ही पुणे विद्यापीठाची बी. ए. ऑनर्स असून, बी. ए. ला तिचा संस्कृत हा विषय होता. तिच्यामुळे आमच्या घरात मुलाबाळांना संस्कृतची गोडी निर्माण झाली आहे. अशोकला दोन मुली प्रियंवदा आणि गायत्री या आहेत. आम्ही पतिपत्नी, आमची चार मुले, दोन सुना, चार नातवंडे आणि एक वहिनी असे आमचे तेरा माणसांचे कुटुंब आहे.

माझी मोठी मुलगी अलकनंदा हिचा विवाह हैदराबादला १९५६ मधे झाला. माझे जावई दिवाकर देशपांडे हे आर्मी मेडिकल कोरमध्ये मेजर असून, सध्या ते रुडकीला आहेत. अलकनंदाला तीन मुले असून तिचा संसार सुखाने चालला आहे. माझी दुसरी मुलगी अंजली ही १९६४ मध्ये मॅट्रिक पास झाली. ती जयहिंद कॉलेजमध्ये चार पाच महिने होती तोच तिचे लग्न जुळले. बेंगळूरहून दीडशे मैलांवर, बेंगळूर आणि मंगळूर यांच्यामध्ये जावळी या गावी कॉफीचे मळे आहेत. मळ्याचे मालक अरविंद गुर्जर हे तरुण आणि धडाडीचे आहेत. गुर्जर घराणे मूळचे साताराचे. पाच पिढ्यांपूर्वी ते कर्नाटकात स्थायिक झाले. अंजलीचा अरविंद गुर्जरशी डिसेंबर १९६४ मध्ये विवाह झाला. तिला दोन मुले असून तिचाही संसार सुखाने चालला आहे.

मुंबईला आल्यावर मी उर्दू आणि फार्सी काव्याच्या अभ्यासात वेळ घालवीत होतो. इतिहाससंशोधनाकडे माझे लक्ष कदाचित गेलेही नसते. पण १९५७ मध्ये सरदेसायांनी लिहिलेले नानासहेब पेशव्यांचे चरित्र माझ्या वाचण्यात आले. त्यातील 'निजामशाहीचा अपकर्ष' या एका प्रकरणात मला तेवीस चुका आढळल्या. त्या पाहून मी थक्क झालो. व्यक्तींच्या नावासंबंधीचे घोटाळे काही विचारू नका. निजामाकडील एकाच व्यक्तीला दोन पदव्या असल्या की सरदेसायांना वाटे की त्या व्यक्ती दोन असल्या पाहिजेत. निजामअलीखानाचा एक प्रधान मीर मूसा हा होता. त्याला रुक्नुद्दौला ही पदवी होती. सरदेसायांनी



मी १९६३

आपल्या पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या व्यक्तिनामसूचीत मीर मूसा आणि रुक्नुद्दौला या दोन व्यक्ती भिन्न असाव्यात असे समजून त्यांची माहिती वेगळी वेगळी दिली आहे. तसेच निजामाचा भाऊ मीर मोगल हा निजामाचा प्रधान होता असे त्यांनी लिहिले आहे. का तर निजामाच्या एका प्रधानाची पदवी आणि मीर मोगल याची पदवी एकच होती म्हणून. नावाचा असाच घोटाळा महाराष्ट्रातील इतर इतिहासलेखकांनी केला आहे. निजामाला बंदगाने आली म्हणत. बंदगाने आली म्हणजे आपण श्रीमंत, महाराज, म्हणतो तो अर्थ. शेजवलकरांनी आलीचा अल्ली केला आणि लिहिले की निजामअली हा बंदगानअल्ली ही पदवी धारण करून गादीवर बसला. निजाम हा आपल्या सरदारांना पदव्या देताना अनेक वेळा मुलाला त्याच्या मरहूम बापाचे नावच पदवीदाखल देई. उदाहरणार्थ सुल्तानजी निंबाळकर वारल्यानंतर त्याचा मुलगा हणमंतराव याला सुल्तानजी ही पदवी देण्यात आली. ही गोष्ट माहीत नसल्यामुळे हटाळकरांनी आपल्या मराठे व फ्रेंच या इंग्रजी ग्रंथात सुल्तानजी हा सतराशे अठ्ठेचाळीसमध्ये वारला असता निजामी कागदपत्रात इ. स. १७५२ च्या लढायातून पुन्हा सुल्तानजींचा उल्लेख कसा येतो याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे.

मराठेशाहीतील मोडी कागदपत्रांत अनेक फारसी शब्द येतात. ती भाषा अवगत नसल्यामुळे मोडीच्या वाचनात इतिहासलेखकांनी अनेक चुका केल्या आहेत. सरदेसायांनी बारयाबी (हुजुरात हजर होणे) याचा बोरया (चटई) केला आहे. वासुदेवशास्त्री खरे यांनी बदर्का (संरक्षक पथक) याचा बदरखां नावाचा गाडदी सरदार बनविला आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

हे पाहून मला वाटू लागले की निजाम घराण्याच्या आणि मराठ्यांच्या संबंधावर फारसी भाषेतून जी साधने आहेत त्यांचा मराठीतून अभ्यासकांसाठी परिचय करून द्यावा. मराठे-निजाम संबंधावर फारसीतून विपुल अशी साधन-सामग्री आहे. निजामुल्मुल्काचा दिवाण खाफीखान याने लिहिलेला मोगल साम्राज्याचा इतिहास यांत निजामुल्मुल्काच्या प्रथम सुभेदारीची (१७१३ ते १७१५) माहिती आली आहे. निजामुल्मुल्काचे समकालीन असे त्याचे चरित्रकार आणि चरित्रे म्हणजे यूसूफ महंमद तुराणी आणि त्याचा ग्रंथ तारीखे फतहैया, मुहंमद कासिम औरंगाबादी आणि त्याचा अहवाले खवाकीन. लाला मन्साराम याचा मासिरे निजामी, गुलाम हुसेन आजाद बिलग्रामी याचा खजानाये आमिरा, आणि शहानवाजखान, याचा ग्रंथ मासिरुल उमरा, निजामुल्मुल्काच्या दोन चिटणिसांनी, जुर्रत आणि रामसिंग यांनी संपादिलेले निजामुल्मुल्काचे दोन

पत्रसंग्रह, लक्ष्मीनारायण शफीक औरंगाबादी याने लिहिलेले निजाम अलीखानाचे चरित्र मासिरे आसफी, त्याने लिहिलेला मराठ्यांचा इतिहास बिसातुलगनायम, अबू तुराब याने लिहिलेला ग्रंथ हदीकतुल आलम, तजल्लीशहाकृत १७९५ पर्यंतचा निजाम घराण्याचा इतिहास तुजके आसफिया, हैदराबाद रेसिडेन्सीचा मुन्शी मखनलाल याचा इ. स. १८२० मध्ये लिहिला गेलेला यादगारे मखनलाल, मुनीमखान औरंगाबादी याचा सवानेह दकन, गुलाम हुसेनचा गुल्जारे आसफीया हा ग्रंथ अशी कितीतरी फारसी साधने उपलब्ध आहेत. यांपैकी फार थोडी मुद्रित आहेत. हस्तलिखिते हैदराबादच्या सरकारी दप्तरखान्यात आहेत. या बाबतीत महाराष्ट्र राज्याच्या दप्तरखान्याचे संचालक डॉक्टर पी. एम्. जोशी यांची मला फार मदत झाली. डॉक्टर पी. एम्. जोशी हे विद्वान, व्यासंगी आणि मोठ्या खिलाडू वृत्तीचे आहेत. त्यांनी हैदराबाद आणि कलकत्ता येथून अनेक फारसी हस्तलिखितांच्या फोटोप्रती मागवून माझ्या अभ्यासाची सोय केली.

वरील फारसी साधनांचा मी मराठीत आणि इंग्रजीत परिचय करून देऊ लागलो. माझा इंग्रजी ग्रंथ ‘एटीन्थ सेंच्युरी डेक्कन’ हा पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केला. डॉक्टर पी. एम्. जोशींनी मला केलेल्या मदतीची अल्पशी फेड म्हणून मी तो ग्रंथ त्यांना अर्पण केला आहे. मराठे-निजाम संबंधावर लिहीत असताना मला शेजवलकरांच्या पेशवे-निजाम संबंध या ग्रंथाची चर्चा करावी लागली.

मराठे-निजाम संबंधावरील माझे मराठी लेख पुस्तकरूपाने प्रकाशित केले ते मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेने. या माझ्या मराठे व निजाम या पुस्तकाला श्री. न. र. फाटक यांची प्रस्तावना लाभली आहे. प्राध्यापक फाटक यांच्याइतका व्यासंगी अभ्यासक मला मुंबईत कोठेच आढळला नाही. आज त्यांचे वय पंचाहत्तरच्या पुढे आहे. पण त्यांचे लेखन आणि वाचन सतत चालू असते. त्यांच्या घरी गेले तर ते आपल्या असंख्य पुस्तकांच्या गराड्यात वाचन करीत असलेले दिसतील. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांनी लिहिलेले न्यायमूर्ती रानडे यांचे चरित्र, आणि एकनाथ यांचे चरित्र ही मला विशेष महत्त्वाची वाटतात. फाटकांचा व्यासंग अलीकडच्या पिढीत सापडणे कठीण झाले आहे.

१९५७ आणि १९५८ मध्ये १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धावर माझी अनेक व्याख्याने झाली. हैदराबादेस असताना हैदराबाद राज्यातील स्वातंत्र्याच्या चळवळींच्या इतिहासाची साधने एकत्रित करण्याचे काम मला देण्यात आले

होते. त्या निमित्ताने मी १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामावर इंग्रजी, मराठी, उर्दू, फारसी अशी अनेक पुस्तके वाचून काढली होती. मुंबईला आल्यावर या विषयावर माझे सात आठ लेख प्रसिद्ध झाले. दिल्लीच्या बहादुरशहाचा मानकरी जहीर देहलवी याचे आत्मचरित्र, बहादुरशहाचा प्रधान हकीम अहसनुल्ला-खान याने लिहिलेली स्वतःची कैफियत, दिल्लीतील अब्दुल्लतीफ याने त्या काळासंबंधी लिहून ठेवलेली दैनंदिनी, बहादुरशहाचा न्यायाधीश फजले हक खैराबादी याने अंदमानबेटात लिहिलेली स्वतःची कैफियत, बरेलीचा सरदार बहादुरखान याची हकीकत, उर्दू कविश्रेष्ठ गालिब याची त्या काळातील दैनंदिनी ही सर्व साधने मी मराठीत प्रसिद्ध केली.

इ. स. १९६१ मध्ये पानिपतच्या युद्धाला दोनशे वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने मी पानिपतच्या युद्धासंबंधीची फारसी साधने मराठीत आणू लागलो. पानिपतवर शुजाउद्दौल्याचा कारभारी काशिराज हा महाराष्ट्रीय गृहस्थ हजर होता. त्याने फारसीतून पानिपतच्या युद्धाची हकीकत लिहून ठेवली आहे. तिचे इंग्रजी भाषांतर झाले आहे. मी काशिराजाच्या हकीकतीचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला. रामपूरच्या रोहिला नवाबाचा चिटणीस शिवप्रसाद हा पानिपतवर हजर होता. त्याने तारीखे फैजबख्श या आपल्या ग्रंथात पानिपतच्या युद्धाचे वर्णन केले आहे. पानिपतवर हजर असलेला तिसरा लेखक म्हणजे शहा पसंदखान या सरदाराचा अधिकारी मुहंमद जाफर शामलू हा होय. त्याने आपल्या मनाजिले फतूह या ग्रंथात पानिपतच्या युद्धाचे वर्णन केले आहे. पानिपतनंतर अहमदशहा अबदालीने जयपूरच्या महाराजांना लिहिलेले पत्र, अबदालीचा वजीर शहावलीखान याने काढलेला जाहीरनामा, होळकरांच्या कैफियतीतील राजवाड्यांना न सापडलेली दहा पाने, अशी विविध साधने मी मराठीत आणली. प्राध्यापक न. र. फाटक यांनी आणि मी असे मिळून पानिपतचा संग्राम हे पुस्तक इ. स. १९६१ मधे प्रसिद्ध केले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने हे पुस्तक प्रकाशित केले.

माझे मित्र आणि इतिहाससंशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनी संभाजी महा-राजांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले. त्या वेळेपासून माझे लक्ष मराठे-मोगल संघर्षाच्या इतिहासाकडे लागले. या विषयावर फारसी भाषेत बरीच साधने उपलब्ध आहेत. सुप्रसिद्ध इतिहासकार खाफीखान हा मोगलांनी इ. स. १६८९ मध्ये रायगड घेतल्यानंतर त्या परिसरात काही दिवस मोगलांतर्फे अधिकारी म्हणून काम करीत होता. त्याने मोगल साम्राज्याचा इतिहास लिहिला आहे, मी त्या ग्रंथातील औरंगजेबाच्या मराठ्यांविरुद्ध झालेल्या युद्धाच्या भागाचा

मराठी अनुवाद केला. तो पुण्याचे जोशी लोखंडे यांनी ' मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, खाफीखानाचा साधन ग्रंथ ' या नावाने प्रसिद्ध केला. माझा ऐतिहासिक विषयावरील लेखांचा एक संग्रह ' महाराष्ट्र आणि मराठे ' या नावाने जोशी लोखंडे यांनीच प्रसिद्ध केला.

औरंगजेबाचा चिटणीस साकी मुस्तादखान हा औरंगजेबाच्या दक्षिणच्या मोहिमेत शेवटपर्यंत हजर होता. त्याने इ. स. १७०९ मध्ये औरंगजेबाचे चरित्र ' मासिरे आलिमगीरी ' हे लिहून काढले. त्याचा इंग्रजी अनुवाद सर जदुनाथ सरकार यांनी केला आहे. मी त्या ग्रंथाचा इ.स. १६८० ते १७०७ पर्यंतचा भाग मराठीत आणला. ते पुस्तक पुण्याचे ज्ञानराज प्रकाशन या संस्थेचे चालक आणि महादेवशास्त्री जोशी याचे चिरंजीव अशोक जोशी यांनी ' मराठे व औरंगजेब ' या नावाने प्रसिद्ध केला. त्यांनीच माझा आणखी एक ऐतिहासिक लेखसंग्रह ' इतिहासाचा मागोवा ' या नावाने प्रसिद्ध केला आहे.

औरंगजेबाच्या काळात भीमसेन सक्सेना नावाचा एक कायस्थ अधिकारी होऊन गेला. तो दहा वर्षांचा असताना इ. स. १६५८ मध्ये आपल्या बापाबरोबर औरंगाबादेस आला. औरंगाबादेचा मोगल सुभेदार राजपुत्र मुअज्जम याच्या तोफखान्याच्या खात्यावर हिशेबविभागाचा प्रमुख म्हणून भीमसेनाचा बाप काम करीत होता. इ. स. १६६६ मध्ये शिवाजीमहाराज आग्र्यास जाताना काही काळ औरंगाबादेत थांबले होते. त्यावेळी भीमसेनने त्यांना पाहिले. इ. स. १६६७–६८ मध्ये भीमसेन हा जोधपूरचा राजा जसवंतसिंग याचा चिटणीस म्हणून काम करीत होता. पुढे त्याला दक्षिणच्या सुभेदाराच्या, बहादुरखानाच्या कचेरीत कायमची नोकरी लागली. इ. स. १६७८ मध्ये संभाजी मोगलांना येऊन मिळाला त्यावेळीं भीमसेन हा मोगलांच्या छावणीत हजर होता. इ. स. १६८२ मध्ये मोगलांनी रामसेजच्या किल्ल्याला वेढा घातला त्यावेळीं भीमसेन हा बहादुरखानाच्या बरोबर वेढ्यात हजर होता. १६७० च्या वणी-दिंडोरीच्या लढाईत तो हजर आहे. १६८९ मध्ये संभाजी राजांना औरंगजेबाच्या छावणीत आणण्यात आले त्यावेळीं भीमसेन छावणीत होता. पुढे तो दतियाचा राजा राव दलपत याचा चिटणीस म्हणून काम करू लागला. राव दलपतबरोबर तो जिंजीला गेला. जिंजीच्या वेढ्यात तो हजर होता. इ. स. १६९८ मध्ये मोगलांनी जिंजी घेतली तेव्हा किल्ल्यात प्रथम प्रवेश करणारा भीमसेनच. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर भीमसेनने तारीखे दिल्कुशा नावाचे आत्मचरित्र फारसी भाषेतून लिहून काढले. ग्रंथ अप्रतिम आहे. मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने तर त्याचे मूल्य असाधारण आहे. डॉक्टर पी. एम. जोशी यांच्या प्रयत्नाने मला

त्याचे हस्तलिखित उपलब्ध झाले. मी ग्रंथाचा संपूर्ण मराठी अनुवाद केला. तो पुण्याचे श्री. ठोकळ यांनी 'मोगल आणि मराठे' या नांवाने प्रसिद्ध केला.

याच सुमारास मिर्जा राजा जयसिंग याची पत्रे, अकबर आणि औरंगजेब, अकबर आणि संभाजी यांचा पत्रव्यवहार, निजामुल्मुल्काचा मामा लुत्फुल्ला (खटाव येथील मोगल अधिकारी) याची पत्रे इत्यादी साधने मला मिळाली. मराठीत मी लेख लिहून त्या साधनांची ओळख करून दिली. या लेखांचा संग्रह पुढे 'मोगल मराठा संघर्ष' या नावाने चित्रशाळा प्रेसतर्फे प्रसिद्ध झाला.

संभाजी, राजाराम आणि ताराबाई या काळावर माझा दिवसरात्र अभ्यास चालू होता. माझे मित्र आणि व्हीनस प्रकाशनचे मालक श्री. स. कृ. पाध्ये यांनी या विषयावर मी व्याख्यानें द्यावीत असे मला सुचविले. त्याप्रमाणे मी पुण्याला दोन व्याख्यानें दिली. ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावयाची आहेत सबब ती लिहून काढा असा श्री. पाध्ये यांनी आग्रह धरला. फुटकळ लेख लिहावे आणि ते पुढे संग्रहरूपाने प्रसिद्ध करावे ही माझी वृत्ती. मांडी मोडून बसून मी एखादा ग्रंथ लिहून काढला असे मला जमत नाही. पाध्यांचा आग्रह मी टाळू पाहात होतो. पण माझ्या ऑफिसमधील माझे सहकारी डॉक्टर भ. ग. कुंटे यांनी मला आवर्जून सांगितले, "तुम्ही आतापर्यंत फारसी साधनें मराठीत आणली. पण संभाजी, राजाराम, ताराबाई या कालखंडाचे महत्त्वमापन करण्याची ही संधी आहे. हा स्वतंत्र आणि सर्वमान्य असा ग्रंथ होईल. थोडा त्रास झाला तरी लिहून काढा." त्यांच्या आग्रहामुळे मी अतिशय श्रम करून ग्रंथ हा लिहून काढला. 'हिंदवी स्वराज्य आणि मोगल' हा माझा ग्रंथ व्हीनस प्रकाशनने इ. स. १९६६ मध्ये प्रसिद्ध केला. या ग्रंथात माझा फारसी साधनांच्या अभ्यासाचा परिपाक उतरला आहे. हा ग्रंथ अतिशय लोकप्रिय झाला याचे मला समाधान वाटते.

याच विषयावर माझा इंग्रजी ग्रंथ मराठा मोगल रिलेशन्स नागपूर विद्यापीठाने प्रसिद्ध केला आहे. याचाही इतिहास वरीलप्रमाणेच आहे. हरी वाठोडकर स्मारक व्याख्यानमालेत मी व्याख्याने द्यावीत अशी नागपूर विद्यापीठाने मला विनंती केली. मात्र त्यांना व्याख्याने लिहून हवी होती. आणि तीच गोष्ट माझ्याने होईना. मी नागपूर विद्यापीठाची विनंती नाकारू पाहात होतो. पण डॉक्टर कुंट्यांनी मला पुन्हा गळ घातली की इंग्रजीत या विषयावर ग्रंथ नाहीत. तुमचा हा ग्रंथ इंग्रजीत एक स्टँडर्ड ग्रंथ होईल. काही झाले तरी व्याख्याने लिहून काढा. शेवटी मी अतिशय मेहनत घेऊन व्याख्याने लिहून काढली. नागपूर विद्यापीठात झालेली ही माझी इंग्रजी व्याख्याने चांगलीच गाजली.

गेल्या वर्षी (१९६८) माझे आणखी एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध होण्याचा योग आला. इ. स. १७५८ मध्ये मराठ्यांनी पंजाब जिंकून घेतला. वीस एप्रिल १७५८ रोजी मराठ्यांनी लाहोर घेतले. त्यांना लाहोरचे दरवाजे उघडून देणारा अफगाणांचा अधिकारी तहमासखान याचे फारसी आत्मचरित्र माझ्या हाती आले. मी त्याचा समग्र इंग्रजी अनुवाद लिहून काढला. माझा हा ग्रंथ 'तहमासनामा' पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांनी प्रसिद्ध केला. तो मी माझे मित्र आणि मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. मार्शल यांना अर्पण केला आहे.

माझ्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात फारसी आणि उर्दू ग्रंथ मराठीत आणण्याची प्रवृत्ती हळूहळू वाढू लागली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. डॉक्टर भ. ग. कुंटे यांनी चांदबिबीचा समकालीन इतिहासकार सय्यद अहमद तबातबाई याचा फारसी ग्रंथ बुऱ्हाणे मासिर हा इंग्रजी अनुवादावरून मराठीत आणला. तो प्रसिद्ध झाला आहे. माझे मित्र गुरुनाथ दिवेकर यांनी शेखसादीच्या गुलिस्तान या प्रसिद्ध फारसी ग्रंथाचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला आहे. वरील दोन्ही ग्रंथांना माझ्या प्रयत्नाने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ या संस्थेकडून अनुदान मिळाले.

गेल्या बारा वर्षांत मी जवळ जवळ चाळीस फारसी इतिहासकारांचा आणि त्यांच्या साधनग्रंथांचा मराठी अभ्यासकांस परिचय करून दिला आहे. या ग्रंथांची पृष्ठसंख्या पाच हजारांच्यावर जाईल. माझ्या प्रयत्नाने मराठ्यांच्या इतिहाससंबंधी मौलिक अशी साधनसामुग्री उपलब्ध झाली आहे.

या काळात इतिहाससंशोधकांशी वादविवादाचे प्रसंग आले नाहीत असे नाही. शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीची गोष्टच घ्या. शिवभारतात परमानंदाने शिवजन्म शके १५५१ च्या फाल्गुन वद्य तृतीयेला झाला असे म्हटले आहे. त्यामुळे जुना इ. स. १६२७ चा (शके १५४९) चा पक्ष मागे पडून शके १५५१ एकोणीस फेब्रुवारी १६३० चा पक्ष पुढे आला. या पक्षाचा मुख्य भर परमानंदावर आहे. मी शिवभारत बारकाईने वाचू लागलो तो परमानंदाची काही विधाने परस्परविरोधी असल्याचे मला आढळून आले. परमानंदाने म्हटले आहे की शहाजी हा आदिलशहाला सोडून निजामशहाला मिळाला. या दरम्यान शहाजीचा मुलगा संभाजी आणि शिवनेरीचा किल्लेदार विश्वासराव याची मुलगी जयंती यांचा विवाह शिवनेरीवर झाला. लग्नानंतर शहाजीने आपली गरोदर पत्नी (जिजाबाई) हिला शिवनेरीवर ठेवली आणि दर्याखानाविरुद्ध लढण्यासाठी निघाला. तो दर्याखानाशी लढत असता इकडे शिवनेरीवर

शिवाजीचा जन्म झाला. पुढे शिवाजीला अन्नग्रहणसंस्कार झाला तेव्हा दर्याखानाचा पराजय करून शहाजी परत आला आणि त्याने प्रथमच शिवाजीचे मुखावलोकन केले. फारसी साधने पाहात असता मला जे आढळून आले ते हे की शहाजी आणि दर्याखान याची लढाई झाली ती इ. स. १६२८ मध्ये. १६३० मध्ये शहाजी आणि दर्याखान यांची गाठच पडली नाही, असे असूनही परमानंद हा एकीकडे महाराजांचा जन्म इ. स. १६३० मध्ये झाला असे म्हणतो आणि दुसरीकडे महाराजांच्या जन्माच्या वेळीं शहाजी दर्याखानाशी लढत होता असे म्हणतो; तर यात काही तरी चूक तरी असावी किंवा महाराजांच्या जन्मतिथीबद्दल परमानंदाला चुकीची माहिती मिळाली असावी. महाराष्ट्रात बखरीतून जी परंपरा आहे ती शके १५४९ ची आहे. शिवदिग्विजयात तर गुरुवार, रोहिणी नक्षत्र हा तपशील आला आहे. हा तपशील शके १५५० ला जुळतो. आणि शहाजी दर्याखानाच्या हालचालींशीही जुळतो. म्हणून मी शिवजन्माची तिथी शके १५५० वैशाख शुद्ध द्वितीया गुरुवार, रोहिणी नक्षत्र (२४-२५ एप्रिल १६२८) ही ठरविली. हा वाद अद्याप चालूच आहे.

उर्दूतील गद्य आणि पद्य वाङ्मय चांगलेच समृद्ध आहे. जुन्या उर्दू काव्याची सुरुवात प्रथम दक्षिणेत झाली. इब्राहीम आदिलशहा, मुहंमद कुली कुतबशहा, अली आदिलशहा, वजही, नुस्रती, वली इत्यादी अनेक कवींनी दक्षिणी उर्दूतून काव्यरचना केली. दक्षिणी उर्दू ही हिंदीला इतकी जवळ आहे की हिंदीचे साहित्यिक तिला दक्षिणी हिंदी म्हणू लागले आहेत. ही परंपरा इ. स. १७३० च्या सुमारास संपुष्टात आली. यानंतर दिल्लीच्या परिसरातील फारसीमिश्रित उर्दू हीच टंकसाळी भाषा बनली. दक्षिणी उर्दू आणि आधुनिक उर्दू यांच्यांतील फरक म्हणजे ज्ञानेश्वरीतील मराठी आणि आजची मराठी यांतील फरक असे म्हणता येईल. इ. स. १७३० नंतर आधुनिक उर्दूची वाढ सर्वत्र, विशेषतः दिल्ली, लखनौ आणि लाहोर या भागांत झपाट्याने होऊ लागली. उर्दूचे गेल्या दोनशे वर्षांतील प्रमुख कवी म्हणजे सौदा, मीर, रंगीन, जुर्रत, ख्वाजा मीर दर्द, कथानक काव्याचे कवी मीर हसन, दयाशंकर नसीम, मुसहफी, वाजदअली शहा (लखनौचा नवाब), शौक लखनवी, गजलकार गालिब, जौक, मोमिन, दाग, हस्रत, जिगर, जोश, तत्त्वज्ञ कवी इक्बाल, रोमँटिक कवी अख्तर शिरानी, गजलकार रघुपति सहाय, फिराक गोरखपुरी, पैगंबरांचे नातू हसन हुसेन यांच्यावर शोकगीते रचणारे अनीस, आणि दबीर, गजलकार आतिश, कथानक काव्य लिहिणारा शौक किदवाई, गजलकार अमीर मीनाई इत्यादी होत. विद्यमान कवीत हफीज जाल धरी, जगन्नाथ आजाद, फिराक गोरखपुरी, फैज अहमद

फैज हे प्रसिद्ध आहेत. उर्दू गद्यवाङ्मयही विपुल आहे. उर्दू साहित्याचे पंचप्राण म्हणजे समाजसुधारक आणि निबंधकार सर सय्यद अहमद, कवी आणि चरित्रकार अल्ताफ हुसेन हाली, टीकाकार आणि निबंधकार मुहंमद हुसेन आजाद, कादंबरीकार नजीर अहमद, आणि इतिहासकार शिब्ली नेमानी हे होत. कादंबरीकार रतननाथ सरशार, अब्दुल्हलीम शरर, नजीर अहमद, अजीज अहमद, कृष्णचंद्र, उपेंद्रनाथ अश्क, मुन्शी प्रेमचंद, राजेंद्रसिंग वेदी, श्रीमती कुर्तुलऐन हैदर इत्यादी मंडळी प्रसिद्ध आहेत. नाटककारांत आगाहश्र कश्मीरी, इम्तियाज अली ताज, प्राध्यापक मजीद, फजलुर्रहमान इत्यादींची नावे प्रसिद्ध आहेत. विनोदी लेखकांत सरशार, सिराजुल्हसन, ताज, अजीमबेग चुगताई,फरहतुल्लाबेग, शौकत मानवी इत्यादींची नावे प्रसिद्ध आहेत.

मी मुंबईला आल्यानंतर आठपंधरा दिवसांतच माझी आणि आलमगीरचे संपादक बावडेकर यांची ओळख झाली. त्यानंतर दोन तीन वर्षे मी आलमगीरच्या दिवाळी अंकासाठी लेख लिहीत असे. इ. स. १९६० मध्ये बावडेवर मला म्हणाले, " सेतुमाधवराव, तुम्ही आमच्या साप्ताहिक आलमगीर मध्ये लिहीत चला. मात्र लेख सात आठ पानांहून अधिक नसावा. लेख चुरचुरीत असावेत. " मला एखादे जाडजूड पुस्तक लिहून काढणे जमत नाही. आठवड्यातून सात आठ पानांचा लेख लिहून काढणे म्हणजे एका रविवारचे, सुट्टीच्या दिवसाचे काम. बावडेकरांचे म्हणणे मी आनंदाने कबूल केले. आणि इ. स. १९६० पासून आलमगीरमध्ये नेमाने लिहू लागलो. बावडेकर हाडाचे खरे पत्रकार. अत्यंत रसिक मनुष्य, ' राखावी बहुतांची अंतरे ' हे सूत्र त्यांच्याकडून शिकून घ्यावे. एक लेख प्रसिद्ध झाला की त्यांचा फोन आलाच, ' सेतुमाधवराव, पुढच्या लेखाची वाट पाहात आहे. ' मग मी एखादा विषय घेऊन त्याच्यावर लेख लिहून त्यांच्याकडे पाठवून द्यावा. प्रथम प्रथम मी हैदराबाद राज्यातील माझ्या अनुभवांतील गंमती लिहिल्या. त्यानंतर मी उर्दू साहित्य आणि साहित्यिक यांच्याकडे वळलो. उर्दू कवी, मुशाइरे, मैफिली, लखनौचा नबाब वाजद अलीशहा आणि उर्दु रंगभूमी, निजाम घराण्यातील राजपुत्र, उर्दू कादंबरीकार, लघुकथा-लेखक, टीकाकार, विनोदी लेखक आणि त्यांचे साहित्य यांचा मी माझ्या लेखातून परिचय करून देऊ लागलो. हा प्रकार सतत सहा वर्षे चालू होता. या विषयावर आलमगीरमध्ये माझे जवळजवळ दोनशे लेख प्रसिद्ध झाले. ते आवर्जून माझ्याकडून लिहून घेण्याचे सगळे श्रेय बावडेकरांना आहे. या लेखांच्या निमित्ताने माझा उर्दू वाङ्मयाचा अभ्यास भक्कम झाला. बावडेकरांनी मला प्रोत्साहन देऊन आलमगीरची पाने माझ्यासाठी मोकळी केली नसती तर उर्दू

साहित्यावर माझे इतके लेखन झालेच नसते. बावडेकरांचे आणि माझे संबंध जितके जिव्हाळ्याचे आणि स्नेहाचे झाले तितके मुंबईत इतर कुणाशीच झाले नाहीत.

बावडेकर इतकेच करून थांबले नाहीत. हे लेख पुस्तकरूपाने छापण्याची कल्पना त्यांचीच. त्यांच्या सूचनेवरून माझे जुने मित्र परचुरे यांनी ते लेखसंग्रह प्रकाशित करण्याची तयारी दाखविली. यामुळे उर्दू साहित्याची हसतखेळत ओळख करून देतील असे माझे दोन लेखसंग्रह प्रसिद्ध झाले. 'विडा रंगतो असा' आणि 'सुंदरा मनामध्ये भरली' ही ती दोन पुस्तके. ही दोन्ही पुस्तके अतिशय लोकप्रिय झाली. तिसरा संग्रहही परचुरे प्रकाशित करीत आहेत.

एकोणीसशे सहासष्टच्या नोव्हेंबरमध्ये बावडेकरांनी मला म्हटले, "सेतुमाधवराव, तुम्ही आपले आत्मचरित्र लिहिण्यास घ्या. हैदराबादची निजामी राजवट तुम्ही पाहिली आहे. तिकडच्या भागाची इकडील लोकांना विशेष माहिती नाही. तुमचे लेख वाचकांना आवडतील. ते आलमगीरमधून क्रमशः प्रसिद्ध होऊ द्या." मला प्रथम आत्मचरित्र लिहिण्याची कल्पना पटेना. मला वाटले, मी एक मध्यम वर्गातला सामान्य माणूस. इतरांना आकर्षक वाटावे असे कोणते अनुभव माझ्या जीवनात आले असणे शक्य आहे. आत्मचरित्र म्हणजे आत्मगौरवाचाच प्रकार नाही का! आत्मनिष्ठ अनुभव वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून वर्णन करणे आपल्याला जमेल का. अशा शंका येऊ लागल्या. पण बावडेकरांनी आग्रह धरला. माझी पत्नी उषा हिनेही मला अनेक वेळा सुचविले की तुम्ही आत्मचरित्र लिहून काढा.

गेली कित्येक वर्षे मी अनेकांची आत्मचरित्रे वाचीत होतो. मी वाचलेल्या इंग्रजी, मराठी, उर्दु आणि फारसी आत्मचरित्रांची संख्या शंभरावर जाईल. रुसो, चेस्टर्टन, एच्. जी. वेल्स, बाबर, जहांगीर, कवी मीर, चर्चिल, ईडन, डफ कूपर, हॅराल्ड मॅक्मिलन, द गॉल, ॲडीनार, आयसेन हॉवर, कॉर्डेल हल, जनरल डीन, ला मार्टिनेर, जांसार्त्र, सिमन दो बोवाइ, महात्मा गांधी, स्वामी श्रद्धानंद, पंडित नेहरू, कृष्णा हथीसिंग, चौधरी खलीकुज्जमान, एरिक चौ, विल् डयूरांट, मार्क ट्वेन, राजेंद्रप्रसाद, अय्यूबखान, कुचबिहारच्या राणीसाहेब, खोसला, महाजन, लामा गोविंद, मेडोज टेलर, किंग्स्ले मार्टिन, बर्ट्रांड रसेल, रजा अली, बेगम शायस्ता इक्रामुल्ला, हिटलर अशी किती नावे सांगावीत. मराठी आत्मचरित्रांपैकी मी वाचलेली काही पुस्तके म्हणजे दादोबा पांडुरंग तर्खडकर, भवाळकर, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे, अण्णासाहेब कर्वे, तात्यासाहेब कोल्हटकर, तात्यासाहेब केळकर, वीर सावरकर, आचार्य अत्रे,

कमलाबाई देशपांडे, नानासाहेब चाफेकर, चिंतामणराव कोल्हटकर, बाळासाहेब पंतप्रतिनिधी, विठ्ठल रामजी शिंदे, वि. द. घाटे, यशोदाबाई जोशी, आनंदीबाई कर्वे अशी अनेक आत्मचरित्रे होती.

ही सगळी आत्मचरित्रे वाचून पाहता एक गोष्ट माझ्या लक्षात आली. ती म्हणजे आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराला विशिष्ट अशा तंत्राची कसोटी लावणे कठीण आहे. आपल्या आयुष्यात आपल्याला जे अनुभव येत गेले त्यांचे प्रामाणिकपणे वर्णन करणे हे आत्मचरित्राचे मुख्य सूत्र असावे. हे लक्षात ठेवून मी आत्मचरित्र लिहू लागलो. आलमगीरमध्ये एकोणीसशे सहासष्टच्या डिसेंबर पासून माझे आत्मचरित्र क्रमशः प्रसिद्ध होऊ लागले. कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांचा व माझा परिचय अगदी अलीकडचा. तसे ते एकदा मी हैदराबादला असतानाच माझ्याकडे येऊन गेले होते. पण खरी ओळख अगदी अलीकडची आमच्या रमेश देशमुखमुळे. त्यांच्या वाचनात माझ्या आत्मचरित्रातील काही पाने आली होती. त्यांनी हे पुस्तक प्रकाशनार्थ हौसेने मागून घेतले. होतील तसतशी आलमगीरमधील कात्रणे मी त्यांच्याकडे पाठवून देत होतो. " पुस्तक दोन भागात काढावे. पहिला भाग कसा काय खपतो ते पाहा आणि व्यावहारिक दृष्ट्या इष्ट वाटले तरच दुसऱ्या भागाच्या फंदात तुम्ही पडा " असे मी त्यांना सुचवून पाहिले. पण त्यांनी सबंध जीवन-सेतूचीच मागणी केली. पण बासष्ट लेख प्रसिद्ध झाल्यावर माझ्या दुर्दैवाने आलमगीर साप्ताहिक बंद पडले. अनेक अडचणींमुळे बावडेकरांना आलमगीर बंद करावा लागला.

सुदैवाने धनुर्धारीचे सच्चरित्र आणि सौजन्यशील संपादक श्री. द. मा. सुतार यांनी माझे पुढील लेख छापण्याची तयारी दर्शविली. सुतारांचे आयुष्य म्हणजे एका त्यागी आणि चारित्र्यवान माणसाचे जीवन होय. अशा थोर माणसाशी माझा, उशीरा का होईना परिचय झाला हे मी माझे भाग्य समजतो. अशा सज्जनांच्या सहवासानेच आपले जीवन समृद्ध होत जाते हा माझा स्वतःचा अनुभव आहे.

मुंबईतील गेली तेरा वर्षे माझ्या साहित्यिक जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरली. गेल्या तेरा वर्षांत मी तेराशे पुस्तके वाचली. त्यांत सातशे इंग्रजी, चारशे मराठी आणि दोनशे उर्दू-फारसी या भाषांतील पुस्तके होती. म्हणजे वर्षाला शंभर किंवा साधारणपणे तीन दिवसाला एक असे माझे वाचनाचे प्रमाण पडत गेले आहे. आयुष्यात मी वाचलेल्या पुस्तकांची संख्या तीन सव्वातीन हजारांपर्यंत जाईल. सतराअठराशे इंग्रजी ग्रंथ, एक हजाराच्यावर मराठी आणि चारपांचशेच्यावर उर्दू-फारसी असे माझे वाचन झाले आहे.

लेखनाच्या बाबतीतही मला मुंबईत चांगले क्षेत्र मिळाले. गेल्या तेरा वर्षांत माझे पाचशे लेख प्रसिद्ध झाले. साधारणपणे वर्षाला चाळीस असे माझ्या लेखांचे प्रमाण राहिले आहे. ग्रंथनिर्मितीतही मला समाधानकारक यश लाभले. मुंबईला येण्यापूर्वी माझी नऊ मराठी आणि सात इंग्रजी पुस्तके प्रसिद्ध झाली होती. मुंबईला आल्यावर माझी तीन इंग्रजी आणि सोळा मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली. माझी एकंदर पस्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

निजामी राजवटीत माझी अतिशय कुचंबणूक झाली होती. मुंबईस आल्यावर माझी लेखन, वाचन आणि भाषण यांची जिद्द उसळून वर आली. समर्थ म्हणतात, " उदंड झाले पाणी स्नान संध्या करावया. " मला तर वाटले की या महाराष्ट्रराज्यात मला पूर्वी कधी मिळाले नव्हते ते लेखन–वाचन–भाषण या माझ्या गुणांस अगदी मोकळे वातावरण मिळाले. मुंबईस आल्याने माझे जीवन धन्य झाले. सफल झाले, कृतार्थ झाले.

या तेरा वर्षांत अनेक आप्तेष्टांचा वियोग मला सहन करावा लागला. माझी आतेबहीण अंबाक्का, माझे चुलत बंधू व्यंकोबराव, माझे मेहुणे बापू पुणतांबेकर, माझ्या सासू रमाबाई पुणतांबेकर, चुलत सासरे गोविंदराव, दादासाहेब, अप्पासाहेब, आतेसासू इंदूताई, चुलत सासू सत्यभामाबाई अशी अनेक मंडळी परलोकी निघून गेली. गेल्या तेरा वर्षांत उषाने बराच प्रवास केला. बेंगळूर, जावली (माझी मुलगी अंजली हिचे सासर), दिल्ली, सागर, खजुराहो, भूपाल इत्यादी ठिकाणी ती फिरून आली. मीही दिल्लीला चार पाच वेळां जाऊन आलो. मी आणि उषा दोघे मिळून हैदराबाद, पुणे, नागपूर, अहमदाबाद, अमरावती, कलकत्ता, जगन्नाथपुरी या स्थळांना जाऊन आलो. कलकत्त्याला रामकृष्ण परमहंसांचे दक्षिणेश्वर आणि स्वामी विवेकानंद यांचा बेलूर मठ, रवींद्रनाथ टागोरांचा वाडा ही स्थळे पाहून आम्ही धन्य झालो. जगन्नाथपुरीला चैतन्य महाप्रभूंचा आश्रम आम्ही पाहिला. तेथील भक्तिमय वातावरणामुळे आम्हांला तेथून निघावेसे वाटेना.

उषाला अलीकडे अध्यात्माची ओढ लागली आहे. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध, तुकारामाची गाथा, आत्मबोध, भजगोविंदम् इत्यादी ग्रंथांचा तिने अभ्यास केला आहे. अद्याप तरी मला अध्यात्माची ओढ लागली नाही. माझे मन अजून लेखन, वाचन, इतिहाससंशोधन, साहित्य यांतच रमलेले आहे. शेवटपर्यंत ते असेच रमावे हीच इच्छा आहे.

साहित्य आणि संस्कृती मंडळाचा चिटणीस या नात्याने मला वाईला अनेक वेळा जावे लागले. मंडळाच्या देखरेखीखाली वाईला विश्वकोशाचे काम चालले

आहे. वाईला लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सहवासात प्रत्येक वेळेस माझ्या ज्ञानात भरच पडत गेली. वाई हे मोठे डौलदार गाव आहे. तेथे कृष्णा नदीवरून दिसणारा देखावा रमणीय आहे. वाई हे आमचे मूळ गाव. माझे पूर्वज एकनाथ ऊर्फ नाथोपंत हे वाईचे. त्यामुळे मी वाईला गेलो की मला आमच्या पूर्वजांची सारखी आठवण येऊन मन गलबलल्यासारखे होई. डिसेंबर १९६८ मध्ये मी वाईला गेलो होतो त्यावेळीं तर कृष्णेच्या काठावर बसून मी तास दोन तास जुन्या आठवणींत गुंगून गेलो होतो.

सत्तावीस ऑागस्ट १९६९ ला मला साठावे वर्ष लागले. तीन सप्टेंबरला मी सेवानिवृत्त झालो. तीस ऑगस्टला उषाला छप्पन्नावे वर्ष सुरू झाले आता आम्हां दोघांनाही थकवा जाणवू लागला आहे. माझी विद्यार्थीदशा दारिद्र्याशी झगडण्यात गेली. तारुण्यात निजामी राजवटीखाली मानसिक कुचंबणा झाली. मधुमेह मला एकोणीसशे बावन्नमध्ये जडला, एकोणीसशे एकूणसाठमध्ये क्षय झाला, एकोणीसशे अडुसष्टमध्ये अनेमिया झाला. शारीरिक आणि मानसिक अशा दगदगीतून शरीर झिजत चालले. माझ्या पत्रिकेप्रमाणे माझे आयुर्मान चौसष्ट वर्षांचे आहे. उषाही थोडीशी मागे पुढे जाईल. या प्रसंगी डफ कूपरने आपल्या पत्नीला उद्देशून म्हटलेल्या ओळी मला आठवतात :

फीयर नॉट, स्वीट लव्ह, व्हॉट टाइम क्यान डू
दो सिल्वर डिम्स दि गोल्ड
ऑफ युअर सॉफ्ट हेअर बिलीव द्याट यू
क्यान चेंज बट नॉट ग्रो ओल्ड ॥ १ ॥

दो सिन्स वी म्यारीड थर्टी ईयर्स
ॲंड फोर ह्याव फ्लोन अवे
ॲज ब्राइट यूअर ब्यूटी स्टिल अपीयर्स
ॲज ऑन अवर वेडिंग डे ॥ २ ॥

वी विल नॉट वीप द्याट स्प्रिंग बी पास्ट
ॲण्ड ऑटम श्याडोज फॉल
दीज ईयर्स शाल बी आल्दो दि लास्ट
दि लवलियस्ट ऑफ ऑल ॥ ३ ॥

या साठ वर्षांत जीवनात मला अनेक अनुभव आले. बा कालचक्रा, मी तुझा ऋणी आहे. तुझ्यामुळे मला जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अनुभव आला.

शुक्रिया अय गर्दिशे अय्याम तेरा शुक्रिया
हमने दुनियाकी हर पहलू देख ली

मुंबई १९५६ पासून

कनिष्ठ मध्यम वर्गातील आणि धार्मिक वातावरणात वावरणारे आमचे कुटुंब. पण लहानपणापासूनच माझ्यावर अनेक संस्कार होत गेले. माझ्या वडिलांच्यामुळे मला महाभारत, भागवत, रामायण इत्यादींची गोडी लागली. आलेल्या संकटांना धैर्याने तोंड देणे, आयुष्यात कधीही खचून न जाणे, संसारातील आपल्या जबाबदाऱ्या न कुरकुरता पार पाडणे या गोष्टी मी त्यांच्याकडून शिकलो. अण्णासाहेब पाटणकरांच्यामुळे बनारसला माझे पाय स्थिर झाले आणि ज्ञानोपासनेची ओढ लागली. माधवराव पटवर्धनांच्यामुळे माझ्या साहित्यसेवेचे स्वरूप निश्चित झाले. माझे श्वशुर प्राध्यापक पुणतांबेकर यांच्या इतिहासव्यासंगाचा परिणाम माझ्या मनावर झाला. स्वाभिमान आणि प्रामाणिकपणा या दोन गोष्टींच्या बळावर मी निजामी राजवटीच्या दिव्यातून बाहेर पडलो. माझे मित्र वा. वि. भागवत यांच्यामुळे मी लेखनाकडे वळलो. मला माझ्या आयुष्यात चांगलीच माणसे भेटत गेली हे मी माझे सुदैव समजतो. माझे सर्वांत मोठे स्फूर्तिस्थान म्हणजे माझी पत्नी उषा. तिने माझ्या संसारात मला सर्व काही मिळवून दिले.

मी कुणाचे वाईट इच्छिले नाही. शक्य तितके सर्वांच्या उपयोगी पडत गेलो. या माझ्या स्वभावामुळे ही माझी संसारयात्रा सुखरूपपणे पार पडत आहे अशी माझी श्रद्धा आहे. काहीसा अनासक्तियोग, काहीशी स्थितप्रज्ञता, काहीसे घट्ट मन या गोष्टी संसारात आवश्यक आहेत. धर्माची सगळी शिकवण यासाठीच आहे. नाशवंत वस्तूवरील श्रद्धा पुरी पडत नाही. अविनाशी शक्तीची कल्पना करून तिच्यावर श्रद्धा ठेवल्याने श्रद्धेला तडे जाण्याची भीती नसते. म्हणून परमेश्वरावर श्रद्धा ठेवण्याची आवश्यकता धर्माने सांगितली असे मी समजतो. पुनर्जन्माबद्दल मी साशंक आहे. पण मिळालेले जीवन निर्धाराने आणि जबाबदारीच्या जाणिवेने जगणे याला मी अधिक महत्त्व देतो.

आता आयुष्याची संध्याकाळ झाली. हे जीवन मी हिरीरीने जगलो. कोणत्याच गोष्टीविषयी कसलीही आसक्ती न बाळगता अंतिम बोलावण्याच्या हाकेला ओ देण्यास मी तयार आहे.